सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

## सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९

# महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

( ९ जून २०१४ पर्यंत सुधारित )

## Act No. LIX of 1949

# The Maharashtra Municipal Corporations Act

**( As modified upto 9th June 2014 )**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२०१५

[ किंमत : रुपये ]

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९

# महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

( ९ जून २०१४ पर्यंत सुधारित )

Act No. LIX of 1949

# The Maharashtra Municipal Corporations Act

( As modified upto 9th June 2014 )

# महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९

## अनुक्रमणिका

### प्रकरण एक

### प्रारंभिक

उद्देशिका.


| कलमे. | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | |
| २. | व्याख्या. | .. | |
| ३. | अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांचा विनिर्देश व महानगरपालिकांची रचना | .. | |
| ३-क. | ( वगळले ). | .. | |


### प्रकरण दोन

### रचना

### नगरपालिका प्राधिकारी


| | | | |
|---|---|---|---|
| ४. | अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम सोपविण्यात आलेले नगरपालिका प्राधिकारी. | | |
| ५. | महानगरपालिकेची रचना. | .. | |
| ५-अ. | जागांचे आरक्षण. | .. | |
| ५-ब. | राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे. | | |
| ६. | महानगरपालिकेची मुदत. | .. | |
| ६-अ. | पालिका सदस्यांचा पदावधी. | .. | |
| ६-ब. | महानगरपालिकेची रचना करण्यासाठी निवडणूक. | .. | |
| ७. | पालिका सदस्याने पदाचा राजीनामा देणे. | .. | |
| ७-अ १. | ( वगळले ). | .. | |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण दोन — चालू

## रचना — चालू

### नगरपालिका मतदार यादी


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ७-अ. | नगरपालिका मतदार यादी तयार करणे. | .. |
| ७-अअ. | ( वगळले ). | .. |
| ७-अअअ. | ( वगळले ). | .. |
| ७-ब. | नगरपालिका मतदार यादीत नावनोंदणी करणे. | .. |
| | **मतदारांच्या व पालिका सदस्यांच्या अर्हता व अनर्हता** | |
| ८. | मत देण्यास अर्हता असलेल्या व्यक्ती. | .. |
| ८-अ. | मतदानाची रीत. | .. |
| ९. | पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अर्हता. | .. |
| १०. | पालिका सदस्य होण्यास अनर्हता. | .. |
| ११. | पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यास असमर्थता. | .. |
| १२. | अनर्हतेसंबंधीच्या प्रश्नांचा निर्णय न्यायाधीशाने करणे. | .. |
| १३. | पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे. | .. |
| | **पालिका सदस्यांची निवडणूक** | |
| १४. | राज्य निवडणूक आयोग. | .. |
| १४-अ. | तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी निदेश देण्याचा राज्य निवडणूक आयुक्ताचा अधिकार. | |
| १५. | नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भरावयाच्या. | .. |
| १६. | निवडणूक अर्ज. | .. |
| १७. | ( वगळले ). | .. |
| १८. | निवडणूक निष्फळ झाली किंवा रद्द ठरविण्यात आली तर अनुसरावयाची कार्यपद्धती. | |
| १९. | महापौर व उपमहापौर. | .. |
| १९ एक-अ. | सभागृहाचा नेता. | .. |
| १९एक-अअ. | विरोधी पक्षनेता. | .. |
| | **मानधन, फी व भत्ते** | |
| १९-अ. | मानधन, फी किंवा भत्ते. | .. |

# अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण दोन — चालू

## रचना — चालू

### स्थायी समिती


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २०. | स्थायी समितीची रचना. | .. |
| २१. | स्थायी समितीच्या सभापतीची नेमणूक. | .. |
| २२. | स्थायी समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांची जागा रिकामी होणे. | |
| २३. | स्थायी समितीतील नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भरावयाच्या. | .. |
| २४. | स्थायी समितीस विशेष समितीकडे किंवा उप-समितीकडे अधिकार प्रत्यायोजित करता येतील. | |


### परिवहन समिती


| | | |
|---|---|---|
| २५. | परिवहन समितीची नेमणूक. | .. |
| २६. | परिवहन समितीच्या सदस्यांच्या अनर्हता. | .. |
| २७. | परिवहन समितीचा सभापती. | .. |
| २८. | परिवहन समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी वाहन खर्च. | .. |
| २९. | परिवहन समितीच्या उप-समित्या. | .. |


### प्रभाग समित्या


| | | |
|---|---|---|
| २९-अ. | प्रभाग समित्यांची रचना. | .. |


### विशेष व तदर्थ समित्या


| | | |
|---|---|---|
| ३०. | महानगरपालिकेच्या विशेष समित्या. | .. |
| ३१. | तदर्थ समित्यांची नेमणूक. | .. |
| ३१-अ. | प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करणे. | |


### संयुक्त समित्या


| | | |
|---|---|---|
| ३२. | अन्य स्थानिक प्राधिकरणांबरोबर संयुक्त व्यवहार. | .. |


### कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतुदी


| | | |
|---|---|---|
| ३३. | महानगरपालिका, इत्यादीमध्ये जागा रिकामी झाल्यामुळे तिचे कामकाज विधिग्राह्य न होणे. | |
| ३४. | महानगरपालिका सदस्य इत्यादींच्या अनर्हतेमुळे तिच्या कामकाजास बाधा न येणे. | |

## **प्रकरण दोन** — चालू

### **रचना** — चालू


| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| ३५. | तद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत सभांचे कामकाज उचित व विधिग्राह्य असणे. | |
| ३५-अ. | महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकारांचा वापर करणे व तिची कर्तव्य पार पाडणे. | |
| ३५-ब. | समितीचे सभापती किंवा उपसभापती यांना पदावरून दूर करणे. | .. |
| | **नगरपालिका आयुक्त** | |
| ३६. | आयुक्ताची नेमणूक. | .. |
| ३७. | आयुक्ताचे वेतन. | .. |
| ३८. | आयुक्ताला अनुपस्थित रजा देणे व रजा भत्ता. | .. |
| ३९. | हंगामी आयुक्ताची नेमणूक व त्याचे पारिश्रमिक. | .. |
| ३९-अ. | महानगरपालिका अतिरिक्त आयुक्ताची नेमणूक. | .. |
| | **परिवहन व्यवस्थापक** | |
| ४०. | परिवहन व्यवस्थापकाची नेमणूक. | .. |
| ४१. | परिवहन व्यवस्थापकाची रजा. | .. |
| | **आयुक्ताच्या अनर्हता** | |
| ४२. | महानगरपालिकेबरोबर केलेल्या कोणत्याही (संविदेत) आयुक्ताचा हितसंबंध असता कामा नये. | |


## **प्रकरण तीन**

### **महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती व अन्य संस्था यांचे कामकाज**


| | | |
|---|---|---|
| ४३. | महानगरपालिका, स्थायी समिती इत्यादीचे कामकाज. | .. |
| ४४. | प्रश्न विचारण्याचा अधिकार. | .. |


## **प्रकरण चार**

### **महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी--त्यांची नेमणूक व सेवेच्या शर्ती**

### **शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, नगरपालिका सचिव, नगरपालिका उप-आयुक्त व नगरपालिका सहायक आयुक्त**


| | | |
|---|---|---|
| ४५. | शहर अभियंता इत्यादींची नेमणूक. | .. |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण चार — चालू

### महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी--त्यांची नेमणूक व सेवेच्या शर्ती — चालू


| कलमे | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| ४५-अ. | महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाची नेमणूक .. | |
| ४५-ब. | प्रतिनियुक्तीद्वारे भरावयाची पदे अनुसूचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| ४६. | शहर अभियंता व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये .. | |
| ४७. | नगरपालिका, मुख्य लेखापरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये. .. | |
| ४८. | नगरपालिका सचिवाचे अधिकार व कर्तव्ये. .. | |
| ४९. | नगरपालिका उप-आयुक्ताचे किंवा सहायक आयुक्ताचे अधिकार व कर्तव्ये .. | |
| ५०. | महानगरपालिकेच्या सांविधिक अधिकाऱ्याच्या सेवेच्या शर्ती. .. | |


### अन्य अधिकारी व कर्मचारी


| | | |
| --- | --- | --- |
| ५१. | अन्य नगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या, पदनामे, श्रेणी इत्यादी. | |
| ५२. | स्थायी अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीवर निर्बंध. .. | |
| ५३. | नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे. .. | |
| ५४. | नेमणुका करण्याची रीत. .. | |
| ५५. | प्रकरण वीस अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत व्यावृत्ती. | |


### शास्ती लादणे


| | | |
| --- | --- | --- |
| ५६. | नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शास्ती लादणे. .. | |


### अनुपस्थिती रजा, हंगामी नेमणुका इत्यादी


| | | |
| --- | --- | --- |
| ५७. | अनुपस्थिती रजा. .. | |
| ५८. | हंगामी नेमणुका. .. | |


### नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची अनर्हता


| | | |
| --- | --- | --- |
| ५९. | नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची अनर्हता. .. | |
| ५९-अ. | महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खटला भरण्यास मंजुरी देणे. | |
| ६०. | नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिकेने पुरविलेल्या जागांचा भोगवटा करणे व त्या सोडण्याची जबाबदारी. | |
| ६०-अ. | विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे. | |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण पाच

## अत्यावश्यक सेवा


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ६१. | अत्यावश्यक सेवेतील व्यक्तींनी परवानगीशिवाय राजीनामा न देणे, इत्यादी.. | |
| ६२. | आणीबाणी जाहीर करण्याचा [ राज्य ] शासनाचा अधिकार. .. | |


## प्रकरण सहा

## नगरपालिका प्राधिकारी व अधिकारी यांची कर्तव्ये व अधिकार

## महानगरपालिकेची आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्ये


| | | |
|---|---|---|
| ६३. | महापालिकेने तरतूद करावयाच्या बाबी. .. | |
| ६४. | पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार करण्यासाठी महानगरपालिकेने तरतूद करणे. | |
| ६५. | वेडे व कुष्ठरोगी यांच्या पोषणासाठी महानगरपालिकेने तरतूद करणे. .. | |
| ६६. | महानगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार तरतूद करता येईल अशा बाबी. .. | |
| ६६-अ. | कामे अभिकरणांनी पार पाडणे. .. | |
| ६७. | निरनिराळ्या नगरपालिका प्राधिकाऱ्यांची कामे. .. | |
| ६७-अ. | पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल. .. | |
| ६८. | आयुक्ताने अन्य कायद्याखालील महानगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करणे व कर्तव्ये पार पाडणे. | |
| ६९. | नगरपालिका अधिकाऱ्यांना आयुक्ताचे किंवा परिवहन व्यवस्थापकाचे काही अधिकार इत्यादींचा वापर करण्यास अधिकार प्रदान करता येईल. | |
| ७०. | महानगरपालिकेला स्थायी समिती इत्यादींकडून कामकाज, इत्यादीचे उतारे मागविता येतील. | |
| ७१. | महानगरपालिकेस दस्तऐवज सादर करण्यास आणि विवरणे, प्रतिवृत्ते इत्यादी पुरविण्याविषयी आयुक्ताला फर्माविता येईल. | |
| ७२. | अधिकाराचा वापर करणे हे, महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजुरी देण्याच्या अधीन असणे. | |
| ७२-अ. | नागरिकांचा जाहिरनामा. .. | |
| ७२-ब. | अधिकार सोपविणे. .. | |
| ७२-क. | शिस्तभंगाची कारवाई .. | |
| ७२-ड. | विवक्षित परिस्थितीत कलम ७२-ग च्या तरतुदी लागू न होणे. .. | |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण सात

## संविदा


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ७३. | महानगरपालिकेच्यावतीने संविदा करून देण्याचा आयुक्ताचा अधिकार. | .. |
| ७४. | संविदा करण्याची पद्धत. | .. |
| ७५. | परिवहन उपक्रमासंबंधीच्या संविदा. | .. |


## प्रकरण आठ

## नगरपालिकेची मालमत्ता

### मालमत्तेचे संपादन


| | | |
|---|---|---|
| ७६. | मालमत्ता संपादन करण्यासंबंधीचा महानगरपालिकेचा अधिकार. | .. |
| ७७. | स्थावर मालमत्ता संपादन करणे. | .. |
| ७८. | करार करून मालमत्ता संपादन करणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती. | |


### मालमत्तेचा विनियोग


| | | |
|---|---|---|
| ७९. | नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतुदी. | .. |
| ८०. | मालमत्तेसंबंधी महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेविरुद्ध केलेल्या दाव्यांचा निर्णय. | |
| ८१. | त्यावेळच्या जमीन मालकाविरुद्ध प्रसंविदेची अंमलबजावणी करण्याचा महानगरपालिकेचा अधिकार. | |


## प्रकरण आठ-क

## महानगरपालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार


| | | |
|---|---|---|
| ८१-अ. | व्याख्या. | .. |
| ८१-ब. | महानगरपालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार. | .. |
| ८१-क. | भाड्याची किंवा नुकसानभरपाईची रक्कम, मालमत्ता कराची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा अधिकार. | |
| ८१-ड. | महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्याबाबतीत त्यांच्या वेतनातून किंवा मजुरीतून वजात करून भाडे वसूल करणे. | |
| ८१-ई. | आयुक्तास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. | .. |
| ८१-फ. | अपिले. | .. |
| ८१-ग. | आदेश अंतिम असणे. | .. |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण आठ-क – चालू

## महानगरपालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार– चालू

**कलमे** **पृष्ठे**


८१-ह. अधिकारितेस प्रतिबंध. ..

८१-आय. विनियम करण्याचा अधिकार. ..

८१-ज. या प्रकरणाखालील अधिकारांचा कायदेशीर वापर करताना अडथळा आणण्याबद्दल शास्ती.


### प्रकरण नऊ

### नगरपालिका निधी व अन्य निधी

### नगरपालिका निधी


८२. नगरपालिका निधीची स्थापना. ..

८२-अ. जमीन महसूल, कृषीतर आकारणी व करमणूक शुल्क यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून राज्य शासनाने वार्षिक अनुदान देणे.

८३. नगरपालिका निधीच्या खाती जमा होणारा सर्व पैसा आयुक्ताने स्वीकारणे व तो बँकेत ठेवणे.

८४. निधीतून पैसा कसा काढण्यात येईल. ..

८५. सोयीस्कर असेल तेव्हा, नगरपालिका निधीचा भाग शहराबाहेरील बँकेत किंवा अभिकरणाकडे ठेव म्हणून ठेवता येईल.

८६. नगरपालिका निधीतून खर्च करण्यावर निर्बंध. ..

८७. अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेली रक्कम कलम ८६, पोट-कलम (२), खंड (ङ), (च), (छ) किंवा (ज) अन्वये खर्च करण्यात येईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

८८. ज्यासाठी नगरपालिका निधीचे उपयोजन करावयाचे ते प्रयोजन. ..

८९. नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा. ..

९०. लोकसेवेसाठी तातडीने आवश्यक असलेल्या कामांसाठी नगरपालिका निधीतून तात्पुरत्या रकमा देणे.


### विशेष निधी


९१. विशेष निधीची स्थापना. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण नऊ — चालू

## नगरपालिका निधी व अन्य निधी — चालू

## विशेष निधी — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ९१-अ. | एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्ज निधीची स्थापना. | .. |
| ९१-ब. | जल व मलप्रवाह निधीची स्थापना. | .. |
| | **शिल्लक रकमांचा विनियोग** | |
| ९२. | शिलकी पैशाची गुंतवणूक. | .. |
| | **लेखे** | |
| ९३. | स्थायी समितीने विहित केलेल्या नमुन्यांमध्ये लेखे ठेवणे. | .. |
| ९४. | वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र तयार करणे. | .. |
| | **वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज** | |
| ९५. | आयुक्ताने दरवर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार करणे. | .. |
| ९५-अ. | अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबत अहवाल. | .. |
| ९६. | स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे. | .. |
| ९७. | परिवहन व्यवस्थापकाने दरवर्षी परिवहन उपक्रमाचे खर्च व उत्पन्न यांचा अंदाज तयार करणे. | |
| ९८. | परिवहन समितीने अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' तयार करणे. | .. |
| ९९. | करांचे दर निश्चित करणे. | .. |
| ९९-अ. | प्रथम बसवावयाच्या उपकराला कलम ९९ च्या तरतुदी लागू न होणे. | .. |
| ९९-ब. | स्थानिक संस्था कराकरिता मालाचा प्रवर्ग निश्चित करणे. | .. |
| ९९-क. | कलम ९९-ख च्या तरतूदी प्रथमत: स्थानिक संस्था कर बसविताना लागू न होणे. | |
| ९९-ड. | स्थानिक संस्था कराच्या दरामध्ये सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| १००. | अर्थसंकल्पीय अंदाजाची अंतिम स्वीकृती. | .. |
| १००-अ. | उत्पन्न व खर्च यांचे अंदाज अर्थसंकल्पीय अंदाज मानने. | .. |
| १०१. | महानगरपालिकेस अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल आणि अतिरिक्त अनुदाने मंजूर करता येतील. | |
| १०२. | खर्च न केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानासंबंधी तरतूद. | .. |

# अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण नऊ — चालू

## नगरपालिका निधी व अन्य निधी — चालू

## वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज— चालू

**कलमे** **पृष्ठे**


१०३. रकमा कमी करणे किंवा बदली करणे. ..

१०४. आवश्यक असेल तेव्हा महानगरपालिकेने सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुन:समायोजन करणे.


## लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा


१०५. नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने लेख्यांची साप्ताहिक छाननी करणे व स्थायी समितीने लेख्यांची छाननी करणे.

१०६. मुख्य लेखापरीक्षकाने अहवाल सादर करणे. ..

१०७. कलमे १०५ व १०६ ही परिवहन निधीच्या लेख्यांच्या बाबतीत लागू होणे. ..

१०७-अ. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून लेखापरीक्षा आवश्यक करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

१०८. राज्य शासनास विशेष लेखापरीक्षेसाठी निदेश देता येईल. ..


## प्रकरण दहा

## कर्ज घेण्याचे अधिकार


१०९. पैसा कर्जाऊ घेण्याचे महानगरपालिकेचे अधिकार. ..

१०९-अ. महानगरपालिकेने निर्माण केलेल्या निधीच्या वापरावरील निर्बंध. ..

११०. सार्वजनिक कर्जरोख्यांवर बँकांकडून कर्ज घेण्याचे महानगरपालिकेचे अधिकार.

१११. कर्जाची परतफेड केव्हा व कशी केली जाईल. ..

११२. कर्जनिवारण निधी स्थापन करणे व त्याचा विनियोग. ..

११३. कर्जनिवारण निधीची गुंतवणूक. ..

११४. महानगरपालिकेने काढलेल्या ऋणपत्रामध्ये कर्जनिवारण निधीची व शिलकी रकमांची गुंतवणूक.

११५. कर्जनिवारण निधीची वार्षिक तपासणी. ..

११६. नियत दिवसापूर्वी उभारलेल्या कर्जासंबंधी तरतुदी. ..

११७. कर्जाच्या परतफेडीत कसूर केल्यास नगरपालिका निधीची किंवा परिवहन निधीची जप्ती.

## **प्रकरण दहा**— चालू

## **कर्ज घेण्याचे अधिकार** — चालू

| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| ११८. | ऋणपत्रांचे नमुने. | .. |
| ११९. | ऋणपत्रास जोडलेल्या सर्व कुपनांवर स्थायी समितीच्या सभापतीची व आयुक्ताची सही असणे. | |
| १२०. | दोन किंवा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे दिलेली ऋणपत्रे. | .. |
| १२१. | कर्जरोख्यांची दुसरी प्रत देणे. | .. |
| १२२. | ऋणपत्रांचे नवीकरण. | .. |
| १२३. | नवीकृत ऋणपत्राबाबत दायित्व. | .. |
| १२४. | विवक्षित बाबतीत मुक्तता. | .. |
| १२५. | क्षतिपूर्ती. | .. |
| १२६. | आयुक्ताने वार्षिक विवरणपत्र तयार करणे. | .. |

## **प्रकरण अकरा**

## **नगरपालिका कराधान**

| | | |
|---|---|---|
| १२७. | या अधिनियमान्वये बसवावयाचे कर. | .. |
| १२८. | नगरपालिका कर वसूल करण्याची रीत. | .. |
| १२८-अ. | मालमत्ता करामध्ये कोणत्या कराचा समावेश होतो. | .. |

## **मालमत्ता कर**

## **बसवता येण्याजोगे मालमत्ता कर**

| | | |
|---|---|---|
| १२९. | करयोग्य मूल्यावर किंवा यथास्थिति भांडवली मूल्यावर बसविता येण्याजोगे मालमत्ता कर व ते कोणत्या दराने बसवता येण्याजोगे असतील. | |
| १२९-१अ. | विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणे. | |
| १२९-अ. | जिल्हा परिषदेच्या क्षेत्राचा शहरात समावेश करण्यात येईल तेव्हा कमी केलेल्या दरात सामान्य कर बसविण्यासाठी तात्पुरती तरतूद. | |
| १३०. | पाणीपट्टी (किंवा पाणीपुरवठा लाभ कर) कोणत्या जागांवर बसवावयाचा. | .. |
| १३१. | साफसफाई कर ( किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर ) कोणत्या जागांवर बसवावयाचा. | |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण अकरा— चालू

### बसवता येण्याजोगे मालमत्ता कर — चालू

**कलमे** **पृष्ठे**

१३२. सामान्य कर कोणत्या जागांवर बसवावयाचा. ..

१३३. सामान्य कराच्या ऐवजी राज्य शासनाने महानगरपालिकेस द्यावयाची रक्कम..

१३३-अ. नैसर्गिक आपत्ती, इत्यादींमुळे बाधा पोचलेल्या व्यक्तींना भोगवटा केलेल्या इमारतीच्या बाबतीत मालमत्ता कर माफ करण्याचा अधिकार.

**पाणीपट्टी व साफसफाई कर यासंबंधी विशेष तरतुदी**

१३४. पुरवलेल्या पाण्याबद्दल कराऐवजी ठराविक आकार व प्रदानासाठी करार. ..

१३५. मोजणी करून पाण्याबद्दल शासनाकडून आकार घेणे. ..

१३६. पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक कारंजे इत्यादींतून पुरवलेल्या पाण्यावर कर न बसवणे.

१३७. विवक्षित बाबतीत विशेष दरांनी साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर निश्चित करता येईल.

१३८. कोणत्याही व्यक्तीने दिलेली (पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभ कर, साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर किंवा मलप्रवाह सुविधा लाभ कर) तिला, ज्या जागेबद्दल तो दिला असेल त्या जागेचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तींकडून वसूल करता येईल.

**मालमत्ता कराबाबत दायित्व**

१३९. मालमत्ता करांबाबतची प्राथमिक जबाबदारी कोणावर असावी. ..

१४०. भोगवटादारांना मालमत्ता कर देण्याबद्दल केव्हा जबाबदार धरता येईल. ..

१४०-अ. मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट. ..

१४०-ब. परिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा.

१४१. ज्या जागांवर मालमत्ता कर आकारला असेल त्या जागांवर तो प्रथम भार असणे.

**वाहने, नावा व जनावरे यांवरील कर**

१४२. वाहने, नावा व पशु-जनावरे यावरील कर. ..

१४३. करापासून सूट. ..

१४४. तबेल्यांचे मालक किंवा अन्य व्यक्ती यांच्याशी तडजोड करता येईल...

१४५. तबेल्यांची पाहणी करण्याचा व कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तींना समन्स काढून बोलावण्याचा अधिकार.

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण अकरा— चालू

### जकातीपासून सूट


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १४६. | शासनाच्या मालकीच्या वस्तूंना जकातीपासून सूट व शासनाची मालमत्ता होणाऱ्या वस्तूंवरील जकातीचा परतावा. | |
| १४७. | तात्काळ निर्यातीसाठी आयात केलेल्या वस्तू. | |


### नाट्यगृहावरील करापासून सूट


| | | |
|---|---|---|
| १४८. | नाट्यगृहावरील करापासून सूट. | .. |


### शिक्षण उपकर


| | | |
|---|---|---|
| १४८-अ. | शिक्षण उपकर बसविणे. | .. |
| १४८-ब. | राज्य शासनाने महानगरपालिका शिक्षण उपकराऐवजी करावयाचे प्रदान. | .. |


### रस्ता कर


| | | |
|---|---|---|
| १४८-क. | रस्ता कर बसविणे. | .. |


### अन्य कर


| | | |
|---|---|---|
| १४९. | अन्य कर बसवताना अनुसरावयाची कार्यपद्धती. | .. |
| १४९-अ. | महानगरपालिका क्षेत्रांमधील स्थावर मालमत्तांच्या विवक्षित हस्तांतरणावरील अतिरिक्त मुद्रांक शुल्क. | |


### अनुपूरक कराधान


| | | |
|---|---|---|
| १५०. | या अधिनियमान्वये लादण्याजोग्या कोणत्याही करात अनुपूरक कराधान लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. | |
| १५०-अ. | कर निर्धारण झाले नसेल अशा प्रकरणांमध्ये आकारणी करण्याचा अधिकार. | |


### परतावे


| | | |
|---|---|---|
| १५१. | करांचे परतावे कसे मिळवता येतील. | .. |


### कर निर्लेखित करणे


| | | |
|---|---|---|
| १५२. | वसूल न होण्याजोगे कर निर्लेखित करणे. | .. |
| १५२-१अ. | कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार. | |

## प्रकरण अकरा–अ

## जकातीऐवजी उपकर बसविणे, तो गोळा करणे व याची वसुली करणे यासंबंधीच्या तरतुदी


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १५२-अ. | उपकर बसविणे. | .. |
| १५२-ब. | उपकराचा भार. | .. |
| १५२-क. | विवक्षित उपकरापासून सूट मिळण्यास पात्र नसणे. | .. |
| १५२-ड. | विवक्षितबाबतीत उपकरविषयक दायित्व. | .. |
| १५२-ई. | उपकर प्राधिकारी. | .. |
| १५२-फ. | नोंदणी. | .. |
| १५२-ग. | विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन. | .. |
| १५२-ह. | उपकर वसूल करण्यास मनाई. | .. |
| १५२-आय. | लेखे ठेवण्याची व सादर करण्याची जबाबदारी. | .. |
| १५२-ञ. | लेखे व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती, लेखापुस्तके आणि माल, इत्यादी जप्त करणे. | |
| १५२-के. | आयुक्ताला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. | .. |
| १५२-ल. | अपराध व शास्ती. | .. |
| १५२-म. | आयुक्त, नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती उघड करणे. | |
| १५२-न. | अपराधाबाबत तडजोड करणे. | .. |
| १५२-ओ. | क्षतिपूर्ती. | .. |


## प्रकरण अकरा–ब


| | | |
|---|---|---|
| १५२-प. | स्थानिक संस्था कर बसविणे. | .. |
| १५२-क्यू. | विवक्षित माल स्थानिक संस्था कर बसविण्यास पात्र नसणे. | .. |
| १५२-र. | प्रकरण अकरा-अ च्या विवक्षित तरतुदींची प्रयोज्यता. | .. |
| १५२-स. | व्यापाऱ्यांचे निर्धारण करणे. | .. |
| १५२-ट. | या प्रकरणांच्या प्रयोजनांसाठी नियम तयार करण्याचे राज्य शासनाचे अधिकार. | |


## प्रकरण बारा

## नाल्या व जलनि:सारण

### नगरपालिकेच्या नाल्या


| | | |
|---|---|---|
| १५३. | आयुक्ताने नाल्या बांधणे व त्या दुरूस्त स्थितीत ठेवणे. | .. |

## **अनुक्रमणिका** — चालू

## **प्रकरण बारा**— चालू

## **नाल्या व जलनि:सारण** — चालू

## **नगरपालिकेच्या नाल्या** — चालू

**कलमे** **पृष्ठे**

१५४. नाल्या व जलनि:सारणाची किंवा मलजलाची विल्हेवाट लावण्याची कामे यांचा महानगरपालिकेने अंगीकार करणे.

१५५. नाल्या बांधण्याचे अधिकार. ..

१५६. नाल्यांमध्ये फेरफार करणे व त्या बंद ठेवणे. ..

१५७. नाल्या साफ करणे. ..

### **खाजगी रस्त्यांच्या नाल्या व जागांचे जलनि:सारण**

१५८. खाजगी रस्त्यांच्या नाल्या नगरपालिकेच्या नाल्यांशी जोडण्याचा हक्क. ..

१५९. इमारतीच्या व जमिनीच्या मालकांचा व भोगवटादारांचा आपली नाली नगरपालिकेच्या नाल्यामध्ये नेऊन सोडण्याचा हक्क.

१६०. नाली किंवा नियोजित नाली सामान्य व्यवस्थेचा भाग होईल अशा रीतीने बांधण्यास भाग पाडण्याचे आयुक्ताचे अधिकार.

१६१. कलम १५८ किंवा १५९ यास अनुरूप असेल त्याव्यतिरिक्त, अन्य रीतीने नगरपालिकेच्या नालीशी अन्य नाली न जोडणे.

१६२. जागांच्या मालकांचा व भोगवटादारांचा अन्य व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीमधून नाली नेण्याचा हक्क.

१६३. जमिनीच्या मालकाने आपल्या जमिनीमधून नाली नेण्याची इतरांना परवानगी देणे.

१६४. नगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत असलेल्या ज्या जागांत नि:सारणाची व्यवस्था नाही त्या जागांच्या जलनि:सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

१६५. नगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत नसलेल्या ज्या जागांत नि:सारणाची व्यवस्था नाही त्या जागांच्या जलनि:सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

१६६. औद्योगिक नि:सृतासंबंधी विशेष तरतुदी. ..

१६७. जागांचे संयुक्त जलनि:सारण करण्याचा आयुक्ताचा अधिकार. ..

१६८. आयुक्तास अस्तित्वात असलेल्या खाजगी नाल्या बंद करता येतील किंवा त्यांचा वापर मर्यादित करता येईल.

१६९. केवळ मालमत्तेच्या वापरासाठी नाल्या निहित होणे व त्या सुस्थितीत राखणे.

## **प्रकरण बारा**— चालू

## **नाल्या व जलनि:सारण** — चालू

## **खाजगी रस्त्यांच्या नाल्या व जागांचे जलनि:सारण**

**कलमे** **पृष्ठे**


१७०. महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या जागांवर नगरपालिका निधीतून बांधलेल्या नाल्या, इत्यादींवर महानगरपालिकेचा हक्क.

१७१. नाल्यांशिवाय नवीन इमारती उभारता कामा नये. ..

१७२. नाल्यांच्या मालकावर त्यांचा इतरांना वापर करू देण्याचे किंवा त्यांची सामाईक मालकी होऊ देण्याचे बंधन असणे.

१७३. मालकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीस नालीचा वापर करण्याचा किंवा तिची सामाईक मालकी मिळविण्याचा हक्क कसा मिळविता येईल.

१७४. मलजलाच्या व पावसाच्या पाण्याच्या नाल्या वेगवेगळ्या असणे. ..

१७५. नाल्या, इत्यांदीमध्ये हवा खेळती राहण्यासाठी नळ जोडणे. ..


### **मलजलाची विल्हेवाट**


१७६. नाल्या नेऊन सोडण्यासाठी आणि मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठरवून देणे.

१७७. मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी साधनांची तरतूद. ..


### **जलधौत संडास, शौचकूप, मुतान्या इत्यादी**


१७८. जलधौत संडास व शौचकूप बांधणे. ..

१७९. नव्याने बांधलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या इमारतीत जलधौत संडासाची व अन्य सोय.

१८०. लोकांसाठी आवश्यक सोयी. ..


### **पाहणी**


१८१. महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या नाल्या इत्यादींची पाहणी व तपासणी करता येणे.

१८२. पाहणी व तपासणी करण्यासाठी जमीन, इत्यादी खोदण्याचा अधिकार. ..

१८३. निरीक्षणाचा व तपासणीचा खर्च. ..

१८४. आयुक्त, दुरुस्ती इत्यादी करण्यास भाग पाडू शकेल. ..

१८५. विवक्षित बाबतीत बांधकामे तपासण्याचा व पार पाडण्याचा खर्च. ..

१८५-अ. इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवणे व तसा राखणे, ही मालकी किंवा भोगवटादार यांची जबाबदारी असणे.

१८५-ब. शहरी सौंदर्याचा सुरेख मिलाप साधण्याबाबत घोषणा करण्याचा आयुक्तांचा अधिकार.

## प्रकरण बारा— चालू

## नाल्या व जलनि:सारण — चालू

### सर्वसाधारण तरतुदी

**कलमे** **पृष्ठे**


१८६. या अधिनियमाच्या तरतुदी, नियम किंवा उपविधी यांचे उल्लंघन करण्याच्या किंवा मंजुरी न घेता केलेल्या कृत्यांना मनाई.

१८७. जलधौत संडास, इत्यादी खराब न करणे किंवा ते अयोग्य रीतीने दूषित न करणे.

१८८. या अधिनियमान्वये करावयाची विवक्षित बांधकामे करण्याचा विकल्प संबंधित व्यक्तींना न देता, ती आयुक्तास करता येतील.


## प्रकरण तेरा

## पाणीपुरवठा

### नगरपालिका जलव्यवस्था केंद्रे बांधणे व ती सुस्थितीत राखणे


१८९. पाणीपुरवठा. ..

१९०. राज्य शासनाने नेमलेल्या व्यक्तींनी नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची पाहणी करणे.

१९१. नगरपालिका जलव्यवस्था केंद्रात प्रवेश करण्याचा अधिकार. ..

१९२. पाण्याचे मुख्य नळ, इत्यादी नेण्याचा अधिकार. ..

१९३. अग्निशामक नळखांबांची तरतूद करणे. ..

१९४. नगरपालिका जलव्यवस्था केंद्रास हानीकारक अशी विवक्षित कृत्ये करण्यास मनाई.

१९४-अ. सामाईक सुविधेमध्ये सहभागी होणे महानगरपालिकेस बंधनकारक असणे.

१९५. परवानगीवाचून नगरपालिकेच्या पाण्याच्या मुख्य नळांवर इमारती, इत्यादी न बांधणे.


### मोफत सार्वजनिक पाणीपुरवठा


१९६. पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक झरे, इत्यादी महानगरपालिकेकडे निहित असणे.

१९७. पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक झरे, इत्यादी विशिष्ट प्रयोजनांसाठी अलग राखून ठेवता येतील.


### खाजगी पाणीपुरवठा


१९८. पाण्याच्या वापरासंबंधीच्या शर्तीचे उल्लंघन न करणे. ..

१९९. जेथे पाणी दूषित होईल अशा जागी पाण्याचे नळ, इत्यादी न बसविणे. ..

२००. लबाडीने व अनधिकृतपणे पाण्याचा वापर करण्यास मनाई. ..


### सर्वसाधारण


२०१. शहराबाहेर पाणी पुरविण्याचा अधिकार. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण चौदा

## रस्ते

## रस्ते बांधणे, सुस्थितीत राखणे व सुधारणे

**कलमे** **पृष्ठे**


२०२. सार्वजनिक रस्ते महानगरपालिकेकडे निहित होणे. ..

२०३. सार्वजनिक रस्त्यांसंबंधी आयुक्ताचा अधिकार. ..

२०४. बंद केलेल्या रस्त्यांच्या जागांचा विनियोग. ..

२०५. नवीन सार्वजनिक रस्ते तयार करण्याचा अधिकार. ..

२०६. नवीन सार्वजनिक रस्त्यांची किमान रुंदी. ..

२०७. कोणताही भुयारी मार्ग, पूल इत्यादी आपल्याकडे घेण्याचा, बांधण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा अधिकार.

२०८. विवक्षित प्रकारच्या रहदारीसाठी सार्वजनिक रस्त्यांचा उपयोग करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

२०९. सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन करण्याचा अधिकार. ..

२१०. रस्त्याच्या रेषा विहित करण्याचा अधिकार. ..

२११. इमारती, रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटविणे. ..

२१२. इमारती, रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटविण्यासंबंधी आयुक्ताचा अतिरिक्त अधिकार.

२१३. रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेली खुली किंवा जिच्यावर चबुतरे इत्यादी आहेत अशी जमीन संपादन करणे.

२१४. रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेल्या इमारतींच्या व जमिनींच्या भागांचे संपादन केल्यानंतर त्यांच्या राहिलेल्या भागांचे संपादन करणे.

२१५. इमारती, रस्त्याच्या रेषेपर्यंत पुढे आणणे. ..

२१६. भरपाई देणे व सुधार आकार वसूल करणे. ..


## खाजगी रस्त्यासंबंधी तरतुदी


२१७. इमारती व खाजगी रस्ते यासाठी जमिनीचे रेखांकन करण्याचा उद्देश असल्याची नोटीस आयुक्तास देणे.

२१८. आयुक्तास आणखी तपशील मागवता येईल. ..

२१९. आयुक्तास, लायसेन्सदार सर्वेकाकडून मानचित्रे तयार करून घेण्याविषयी फर्मावता येईल.

२२०. जमिनीचे रेखांकन, इमारतीच्या प्रत्येक भूखंडाचे आकारमान व क्षेत्र, खाजगी रस्त्यांचे व इमारतींचे रेखांकन व इमारतींची उंची या गोष्टी आयुक्ताने ठरविणे.

## **प्रकरण चौदा** --- चालू

## **रस्ते** --- चालू

## **खाजगी रस्त्यासंबंधी तरतुदी** --- चालू


**कलमे** **पृष्ठे**

२२१. नोटिशीची मुदत संपेपर्यंत व आयुक्ताने दिलेल्या निदेशानुसार असेल त्या व्यतिरिक्त अन्य रीतीने जमिनीचा इमारतीसाठी विनियोग न करणे व खाजगी रस्त्यांचे रेखांकन न करणे.

२२२. कलम २२० अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुरोधाने न केलेली कामे पार पाडण्याच्या उद्देशाची नव्याने नोटीस देणे.

२२३. खाजगी रस्ते व जाण्या-येण्याचे मार्ग समतल करणे व त्यातील जलनि:सारण.

२२४. खाजगी रस्त्यामध्ये मलजलवाही इत्यादी बांधल्यावर ते सार्वजनिक रस्ते म्हणून जाहीर करण्याचा अधिकार.

२२५. एखादा रस्ता अंशत: सार्वजनिक व अंशत: खाजगी असेल तेव्हा, कलमे २२३ व २२४ लागू करणे.

**पुढे येणारे भाग व अडथळे**

२२६. रस्ते, इत्यादींवर पुढे येणाऱ्या भागांस मनाई. ..

२२७. विवक्षित बाबतीत रस्त्याच्या वर पुढे येणाऱ्या भागास परवानगी देता येईल. ..

२२८. तळमजल्याचे दरवाजे, वगैरे रस्त्यावर बाहेरच्या बाजूने उघडता कामा नये..

२२९. ज्यामुळे रस्त्यात अडथळा होतो अशा बांधकामास किंवा खिळणीस मनाई ..

२३०. रस्त्यात वस्तू ठेवणे, इत्यादीस मनाई. ..

२३१. आयुक्तास, या अधिनियमाचे उल्लंघन करून उभारलेली, ठेवलेली, फेरीने विकण्यात येणारी किंवा विक्रीसाठी मांडलेली कोणतीही वस्तू नोटीस न देता काढून टाकता येईल.

२३२. नियत दिवसापूर्वी उभारलेले किंवा केलेले कोणतेही बांधकाम किंवा खिळणी काढून टाकण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार.

२३३. सार्वजनिक रस्त्यांमध्ये जनावरांना दोरीने बांधून ठेवण्यास मनाई. ..

**उत्सवाच्या प्रसंगी, रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणे**

२३४. आयुक्तास, उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यांवर मंडप इत्यादी उभारण्यास परवानगी देता येईल.

## **प्रकरण चौदा** — चालू

### **रस्ते** — चालू

### रस्त्यामध्ये किंवा रस्त्याजवळ कामे करण्यासंबंधी तरतुदी

**कलमे** **पृष्ठे**

२३५. नगरपालिकेच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी रस्ता फोडला असेल तेव्हा तो विलंब न लावता पूर्ववत करणे.

२३६. ज्या रस्त्यात काम चालू असेल तो रस्ता आयुक्तास बंद करता येईल. ..

२३७. कोणत्याही रस्त्यात नगरपालिकेचे काम चालू असताना वाहतूक इत्यादीसाठी आयुक्ताने व्यवस्था करणे.

२३८. कोणत्याही रस्त्यात नगरपालिकेचे काम चालू असताना सार्वजनिक सुरक्षिततेसाठी बाळगावयाची सावधगिरी.

२३९. परवानगीवाचून रस्ते न खोदणे किंवा न फोडणे किंवा त्यावर बांधकामाची सामग्री न ठेवणे.

२४०. ज्यांना कलम २३९ अन्वये परवानगी दिली असेल त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी बाळगावयाची सावधगिरी.

२४१. कलम २३९ अन्वये परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी रस्ते, इत्यादी पूर्ववत केलेच पाहिजेत.

२४२. कलम २३९ अन्वये परवानगी दिलेल्या व्यक्तींनी वाहतूक, इत्यादीसाठी करावयाची तरतूद.

२४३. रस्त्यांच्या कोपऱ्यांवरील इमारती. ..

### वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यासाठी करावयाची तरतूद

२४३-अ. वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्या संबंधातील फी किंवा शुल्क यासाठी करावयाची तरतूद.

### आकाशचिन्हे व जाहिराती

२४४. आकाशचिन्हांबाबत विनियम. ..

२४५. जाहिरातींचे नियमन व नियंत्रण. ..

### धोकादायक जागा व जेथे माणसाच्या सुरक्षिततेस किंवा सोयीस बाधक असे काही बांधकाम करण्यात येत असेल त्या जागा

२४६. रस्त्याच्या लगतच्या कोणत्याही इमारतीवर काम चालू असताना कुडण घालणे.

२४७. धोक्याच्या जागा किंवा जेथे सुरक्षिततेस किंवा सोयीस बाधक असे काम करण्यात येत असेल, त्या जागा दुरुस्त करण्यासाठी व त्यास कुंपण घालण्यासाठी आयुक्ताने कार्यवाही करणे.

२४८. इमारती पाडण्याचे काम चालू असताना करावयाच्या संरक्षक उपाययोजना. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण चौदा — चालू

## रस्ते — चालू

### रस्त्यांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २४९. | सार्वजनिक रस्त्यांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे. | .. |
| | **रस्त्यांवर पाणी शिंपणे** | |
| २५०. | रस्त्यांवर पाणी शिंपण्यासाठी उपाययोजना. | .. |
| | **किरकोळ** | |
| २५१. | रस्त्यावरील दिवे किंवा नगरपालिकेच्या मालकीची अन्य कोणतीही मालमत्ता काढून नेणे, इत्यादीस मनाई. | |
| २५२. | एखाद्या व्यक्तीकडून चुकून दिवे, इत्यादी फुटल्यास तिने मोडतोड दुरुस्त करणे. | |
| | **प्रकरण पंधरा** | |
| | **इमारतीसंबंधी विनियम** | |
| | **इमारती बांधणे, इत्यादीसंबंधी नोटिसा** | |
| २५३. | इमारत बांधण्याच्या उद्देशाची आयुक्तास नोटीस देणे. | .. |
| २५४. | इमारतीत वाढ करणे, इत्यादीसंबंधीच्या उद्देशाची नोटीस आयुक्तास देणे. | .. |
| २५५. | सादर केलेले नकाशे, इत्यादी विहित केलेल्या रीतीने जर काढले वगैरे नसतील तर ते नाकारणे. | |
| २५६. | आयुक्ताने दिलेल्या आदेशांचे अनुपालन न केल्याचा परिणाम. | .. |
| | **बांधकामाची सुरुवात** | |
| २५७. | इमारतींचे व कामाचे पर्यवेक्षण. | .. |
| २५८. | अर्जदाराने महत्त्वाची विपर्यस्त माहिती दिल्याच्या कारणांवरून परवानगी रद्द करण्याचा आयुक्ताचा अधिकार. | |
| २५९. | इमारतीचे बांधकाम किंवा त्यात फेरफार करणे, इत्यादी चालू असताना त्यांची पाहणी करणे. | |
| २६०. | नियमांच्या किंवा उपविधींच्या विरुद्ध सुरू केलेल्या बांधकामाच्या किंवा कामाच्या बाबतीत करावयाची कार्यवाही. | |
| २६१. | अधिनियमाच्या विरुद्ध सुरू करण्यात आलेली इमारत किंवा काम पाहणीच्या प्रयोजनासाठी तोडता येईल किंवा खुले करता येईल. | |
| २६२. | इमारती व कामे यासंबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी. | .. |
| २६३. | समाप्ती प्रमाणपत्रे, भोगवटा करण्यास किंवा वापरण्यास परवानगी देणे. | .. |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण पंधरा — चालू

## इमारतीसंबंधी विनियम — चालू

## ज्यामुळे नियमांचे किंवा उपविधींचे उल्लंघन होत असेल अशी पूर्वी कायदेशीररीत्या उभारलेली बांधकामे

**कलमे** **पृष्ठे**


२६३-अ. ज्यांमुळे नियमांचे किंवा उपविधींचे उल्लंघन होत असेल अशा पूर्वी कायदेशीररीत्या बांधलेल्या झोपड्या किंवा छपऱ्या मोडण्यास किंवा त्यात फेरफार करण्यास फर्माविण्याचा अधिकार.

### धोकादायक बांधकामे

२६४. मोडकळीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली बांधकामे, इत्यादी काढून टाकणे.

२६५. इमारतीची नियतकालिक पहाणी. ..

२६५-अ. बाथरूम सुस्थिती प्रमाणपत्र. ..

२६६. इमारतीमधील धोक्याच्या खुल्या जागा. ..

### बेकायदेशीररीत्या केलेली कामे

२६७. बेकायदेशीररीत्या काम करवून घेणाऱ्या व्यक्तीस काढून टाकण्याविषयी निर्देश देण्याचे आयुक्ताचे अधिकार.

२६७-अ. अवैध इमारतीवर शास्ती बसविणे. ..

### जागा सोडावयास लावण्याचा अधिकार

२६८. विवक्षित परिस्थितीमध्ये कोणतीही इमारत सोडावयास लावण्याचा आयुक्ताचा अधिकार.

### विशिष्ट वस्त्यांमधील विवक्षित वर्गाच्या इमारतींचे नियमन

२६९. विशिष्ट रस्त्यांमध्ये किंवा वस्त्यांमध्ये भविष्यकाळात विवक्षित वर्गाच्या इमारतींच्या बांधकामाचे नियमन करण्याचा अधिकार.

### प्रकरण सोळा

### सुधारणा योजना

२७०. आयुक्ताने सुधारणा योजनेचा मसुदा तयार करणे. ..

२७१. सुधारणा योजनेमध्ये तरतूद करावयाचा तपशील. ..

२७२. योजना पूर्ण झाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती. ..

२७३. इमारत बांधण्याची कामे चालू असतील तेव्हा, अधिसूचना काढल्यावर जमीन संपादन करण्याची मागणी करण्याचा मालकाचा हक्क.

२७४. अधिसूचनेच्या दिनांकानंतर दोन वर्षांचा कालावधी गेल्यानंतर महानगरपालिकेने जमीन संपादन करण्याबद्दल किंवा प्रस्ताव मागे घेण्याबद्दल मागणी करण्याचा मालकाचा हक्क.

## **प्रकरण सोळा** — चालू

## **सुधारणा योजना** — चालू

**कलमे** **पृष्ठे**

२७५. नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर आणि बजावल्यानंतर स्थायी समितीने योजना मान्यतेसाठी महानगरपालिकेकडे पाठविणे.

२७६. महानगरपालिकेने सुधारणा योजना विचारात घेणे आणि ती मान्य करणे किंवा अमान्य करणे.

२७७. योजनेस मंजुरी देण्यासाठी आयुक्ताने राज्य शासनाकडे अर्ज करणे. ..

२७८. मंजुरी मिळाल्यानंतर संपादन करावयाच्या जमिनीचा तपशील देणारे घोषणापत्र प्रसिद्ध करणे व असे घोषणापत्र प्रसिद्ध झाल्यावर आयुक्ताला योजनेची अंमलबजावणी करण्यास प्राधिकृत करणे.

२७९. महानगरपालिकेने जमीन संपादन करण्यात कसूर केल्यास मालकास ती जमीन संपादन करण्याविषयी किंवा प्रस्ताव मागे घेण्याविषयी महानगरपालिकेला विनंती करता येईल.

२८०. सुधार आकारांच्या परिगणनेची पद्धती. ..

२८१. आकार ठरविण्याची कार्यपद्धती. ..

२८२. कराराव्यतिरिक्त अन्य रीतीने जमीन संपादन करण्याच्या बाबतीत, भूमि संपादन अधिनियम लागू होण्याची मर्यादा.

२८३. भरपाईसंबंधी विशेष तरतुदी. ..

२८४. जिल्हाधिकाऱ्याने न्यायनिवाडा दिल्यानंतर जमिनीचा कब्जा घेणे व ती महानगर-पालिकेकडे हस्तांतरित करणे.

## **प्रकरण सतरा**

## **नगरपालिका अग्निशामक पथक**

२८५. अग्निशामक कर्मचारी आणि आवश्यक ते आगीचे बंब, इत्यादी ठेवणे. ..

२८६. आगीच्या ठिकाणी अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिकाऱ्याचे अधिकार. ..

२८७. पोलीस आणि नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निशामक पथकास सहाय्य करणे.

२८८. अग्निशामक पथकाकडून झालेले नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान असल्याचे मानणे.

२८९. आगीचे प्रतिवृत्त सादर करणे. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण अठरा

## स्वच्छताविषयक तरतुदी

### झाडलोट आणि साफसफाई करणे

**कलमे** **पृष्ठे**

२९०. रस्त्यांची साफसफाई करणे आणि कचरा हलविणे यासाठी आयुक्ताने तरतूद करणे.

२९१. केरकचरा इत्यादी महानगरपालिकेची मालमत्ता असणे. ..

२९२. केरकचरा इत्यादीसाठी कचऱ्याचे डबे, कचऱ्याच्या पेट्या व जागा यांची तरतूद करणे व त्या नेमून देणे.

२९३. मलमूत्र व दूषित पदार्थ गोळा करणे इत्यादीसाठी आयुक्तास तरतूद करता येईल.

२९४. विवक्षित जागांमध्ये स्वच्छताविषयक खास व्यवस्था. ..

२९५. विवक्षित बाबतीत आयुक्ताच्या परवानगीशिवाय खाजगी व्यक्तींना मेहतरांची कामे करता न येणे.

### जागांची पाहणी व स्वच्छताविषयक विनियमन

२९६. स्वच्छताविषयक प्रयोजनांसाठी जागांची पाहणी करण्याचा अधिकार. ..

२९७. कोणतीही इमारत साफ करण्यास व तिला चुना लावण्यास फर्माविता येईल.

२९८. मानवी वस्तीस अयोग्य अशा इमारती किंवा इमारतीतील खोल्या. ..

२९९. स्वच्छताविषयक सोयी नसलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

३००. स्वच्छताविषयक सोयी नसलेल्या इमारती पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

३०१. पाडून टाकण्याचा आदेश दिल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती. ..

३०२. मानवी वस्तीसाठी योग्य केलेली इमारत ही, त्यानंतर केलेल्या विनियमास अनुसरून नसेल तर दहा वर्षे ती अयोग्य आहे असे न मानणे.

३०३. अडथळा आणणाऱ्या इमारती पाडून टाकण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

३०४. अडथळा आणणारी इमारत पाडून टाकण्याविषयी दिलेल्या आदेशाचा परिणाम.

३०५. अडथळा आणणारी इमारत संपादन केल्याबद्दल दिलेली भरपाई विवक्षित बाबतीत सुधारणा खर्च म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

३०६. पाडून टाकण्याबाबतच्या आदेशाविरुद्ध अपील. ..

३०७. बेसुमार गर्दीच्या राहत्या जागा. ..

३०८. स्वच्छताविषयक सोयी नसलेल्या झोपड्या व छपऱ्या. ..

### जनावरांच्या प्रेतांची विल्हेवाट लावणे

३०९. जनावरांची प्रेते हलविणे. ..

## **प्रकरण अठरा** — चालू

### **स्वच्छताविषयक तरतुदी** — चालू

### सार्वजनिक ठिकाणी स्नान करणे, धुणे इत्यादीचे विनियमन


| कलमे | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| ३१०. | आयुक्ताने सार्वजनिक स्नानाच्या जागा इत्यादी ठरवून देणे आणि अशा जागांच्या उपयोगांबाबत विनियमन. | |
| ३११. | आदेशाविरुद्ध स्नान करणे इत्यादीस मनाई. | .. |
| ३१२. | जनावरे किंवा अन्य पदार्थ बुडवून पाणी दूषित करण्यास मनाई. | .. |


### कारखाने, धंदे इत्यादीचे विनियमन


| | | |
| --- | --- | --- |
| ३१३. | आयुक्ताच्या परवानगीशिवाय कारखाना इत्यादी नव्याने स्थापन करता कामा नये. | |
| ३१४. | रासायनिक द्रव्ये इत्यादींद्वारे पाणी दूषित करण्यास मनाई. | .. |


### दुर्धर रोगांचा प्रतिबंध करणे आणि त्यांचा फैलाव होऊ न देणे


| | | |
| --- | --- | --- |
| ३१५. | दुर्धर रोगांच्या बाबतीत आयुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी इत्यादींचे अधिकार. | |
| ३१६. | दुर्धर रोगांच्या फैलावास प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही जागेची कोणत्याही वेळी पाहणी करता येईल. | |
| ३१७. | आवश्यक असेल तेव्हा झोपड्या आणि छपऱ्या नष्ट करणे. | .. |
| ३१८. | निवासगृहे आणि खाद्यगृहे बंद करणे. | .. |


### स्वच्छताविषयक खास उपाययोजना


| | | |
| --- | --- | --- |
| ३१९. | कोणत्याही भयंकर दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास आयुक्तास, खास उपाययोजना करता येतील. | |


### प्रेतांची विल्हेवाट लावणे


| | | |
| --- | --- | --- |
| ३२०. | प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या जागांची नोंदणी करणे. | .. |
| ३२१. | प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागांची तरतूद करणे. | .. |
| ३२२. | आयुक्ताच्या परवानगीशिवाय प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागा सुरू करता कामा नयेत. | |
| ३२३. | राज्य शासनास, प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली कोणतीही जागा बंद करण्याविषयी निदेश देता येईल. | |

## **प्रकरण अठरा** — चालू

## **स्वच्छताविषयक तरतुदी** — चालू

### **प्रेतांची विल्हेवाट लावणे** — चालू

**कलमे** **पृष्ठे**

३२४. राज्य शासनास, प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी बंद करण्यात आलेल्या जागा पुन्हा उघडण्यास, मंजुरी देता येईल.

३२५. आयुक्तांच्या परवानगीशिवाय पूजाअर्चेच्या जागी प्रेते पुरता कामा नयेत किंवा उकरून बाहेर काढता कामा नयेत.

३२६. प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात मनाई केलेली कृत्ये. ..

**प्रकरण एकोणीस**

**बाजार व कत्तलखाने**

**बाजार व कत्तलखाने यांचे परिरक्षण व नियमन**

३२७. नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने कशास म्हणावे. ..

३२८. नवीन नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने यांची तरतूद. ..

३२९. नगरपालिका, बाजार, कत्तलखाने आणि पशु-आवारे बंद करता येतील. ..

३३०. नगरपालिका बाजारात विकण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री करण्यास मनाई. ..

३३१. खाजगी बाजार आणि खाजगी कत्तलखाने उघडणे. ..

३३२. नगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि पशु-आवारे यांवर दुकान-भाडे, भाडे आणि फी बसविणे.

३३३. कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यातून, पशू आवारातून, बाजारातून किंवा जागेतून जिवंत गुरेढोरे, मेंढ्या, बकऱ्या किंवा डुकरे हलविणे.

३३४. नियमांचे, उपविधींचे किंवा स्थायी आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार.

३३५. परवानगीशिवाय शहरात गुरेढोरे इत्यादींची आयात करण्यास मनाई. ..

**विक्रीच्या जागा इत्यादींचे निरीक्षण**

३३६. ज्या जागेत या अधिनियमाच्या तरतुदीविरुद्ध जनावरांची कत्तल करण्यात येते किंवा मांसाची विक्री करण्यात येते असा संशय असेल अशा कोणत्याही जागेत आयुक्तास प्रवेश करता येईल.

## प्रकरण एकोणीस — चालू

## बाजार व कत्तलखाने — चालू

### विक्रीच्या जागा इत्यादींचे निरीक्षण — चालू

**कलमे** **पृष्ठे**


३३७. मानवी आहारासाठी ठेवलेल्या वस्तुंची पाहणी करण्यासाठी आयुक्ताने तरतूद करणे.

३३८. आरोग्यास अपायकारक वस्तू इत्यादी अभिग्रहण करणे. ..

३३९. कलम ३३८ अन्वये अभिग्रहण केलेल्या नाशिवंत वस्तुंची विल्हेवाट लावणे. ..

३४०. मुंबई प्राणी परिरक्षण अधिनियम, १९४८ ची व्यावृत्ती. ..


## प्रकरण वीस

## परिवहन उपक्रम

### उपक्रम चालविणे आणि बांधकामे करणे व त्यांची देखभाल करणे


३४१. या प्रकरणाच्या तरतुदी केव्हा लागू होतील. ..

३४२. परिवहन व्यवस्थापकाने उपक्रमांचे व्यवस्थापन करणे. ..


### भाडे व आकार


३४३. परिवहन सेवांबद्दल भाडे व आकार वसूल करणे. ..


### मालमत्ता संपादन करणे आणि तिचा विनियोग करणे


३४४. स्थावर मालमत्ता संपादन करणे. ..

३४५. नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्याच्या बाबतीत लागू असलेल्या तरतुदी.


### अधिकारी आणि कर्मचारी


३४६. परिवहन व्यवस्थापकाने कायम अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे विवरणपत्र तयार करणे आणि परिवहन समितीने ते मंजूर करणे.

३४७. कायम अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीवरील निर्बंध. ..

३४८. तात्पुरती पदे निर्माण करणे. ..

३४९. नेमणूक करण्याचा अधिकार कोणामध्ये निहित असेल. ..

३५०. अनुपस्थिती रजा. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण वीस — चालू

## महसूल आणि खर्च

## परिवहन निधी

**कलमे** **पृष्ठे**


३५१. परिवहन निधी स्थापन करणे. ..

३५२. परिवहन निधीत जमा करावयाच्या सर्व रकमा परिवहन व्यवस्थापकाने स्वीकारणे आणि त्या बँकेत भरणे.

३५३. परिवहन निधीतून रकमा कशा काढाव्यात. ..

३५४. सोयीस्कर असेल तेव्हा, परिवहन निधीचा भाग शहराबाहेरील बँकेत किंवा संस्थेत ठेवता येईल.

३५५. फक्त अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश असलेल्या रकमा परिवहन निधीतून खर्च करणे.

३५६. अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश नसलेली रक्कम कलम ३५५, पोट-कलम (२), खंड (ग), (घ) किंवा (ङ) अन्वये खर्च करण्यात येईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

३५७. ज्या प्रयोजनासाठी परिवहन निधीचा विनियोग करावयाचा ती प्रयोजने. ..

३५८. शिलकी पैशाची गुंतवणूक. ..


### अतिरिक्त शिलकीतून रकमा देणे


३५९. नगरपालिका निधीत नियत वार्षिक रक्कम भरणे. ..

३६०. महसुलाच्या जादा शिलकीचा विनियोग करणे. ..


### लेखे


३६१. परिवहन उपक्रमाचे लेखे. ..

३६२. वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र तयार करणे. ..


## प्रकरण एकवीस

## जीवनविषयक आकडेवारी

### जन्म आणि मृत्यूंची नोंदणी


३६३. निबंधकांची नेमणूक. ..

३६४. नोंदवह्या ठेवणे. ..

३६५. निबंधकांनी सर्व जन्म आणि मृत्यूसंबंधी स्वत:हून माहिती करून घेणे. ..

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण एकवीस — चालू

## जीवनविषयक आकडेवारी — चालू

## जन्म आणि मृत्यूंची नोंदणी — चालू


**कलमे** **पृष्ठे**

३६६. जन्मासंबंधी माहिती सात दिवसांच्या आत देणे. ..

३६७. नवजात मूल आढळल्यास त्यासंबंधी माहिती देणे. ..

३६८. मृत्यूसंबंधी माहिती देणे. ..

३६९. ज्या वैद्यक व्यवसायीकाने मृत व्यक्तीवर उपचार केले असतील त्याने त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबत प्रमाणपत्र देणे.

३७०. जन्म किंवा मृत्यूच्या नोंदवह्यांतील चुका दुरूस्त करणे. ..

३७१. मुलाच्या नावाची किंवा मुलाच्या नावात केलेल्या फेरफाराची नोंदणी. ..


## प्रकरण बावीस

## लायसेन्स आणि परवाने

### एक.– सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे


३७२. वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे.

३७३. सर्वेक्षक इत्यादींच्या मार्गदर्शनासाठी आदेश विहित करता येतील. ..

३७४. स्थायी समितीने लायसन्सदार नळकारागीरांची फी आणि आकार विहित करणे.

३७५. काम योग्य रीतीने पार पाडणे हे लायसन्सदार नळकारागीरांवर बंधनकारक असणे.


### दोन.– व्यवसाय लायसन्स आणि जनावरे व विवक्षित वस्तू ठेवण्यासाठी अन्य लायसन्स


३७६. लायसन्सशिवाय विवक्षित गोष्टी न ठेवणे आणि विवक्षित व्यवसाय व कामे न करणे.

३७६-अ. एखाद्या जागेचा वापर करणे हे घातक किंवा उपद्रवकारक असेल तेव्हा असा वापर थांबवण्याचा अधिकार.


### तीन.– नगरपालिका बाजारांतील विक्रीसाठी लायसन्स


३७७. आयुक्तांच्या लायसन्सशिवाय नगरपालिका बाजारात विक्री करण्यास मनाई.

**प्रकरण बावीस** — चालू

**लायसन्स आणि परवाने** — चालू

## चार.--खाजगी बाजारांसाठी लायसन्स


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३७८. | लायसन्सशिवाय खाजगी बाजार उघडे न ठेवणे. | .. |
| ३७९. | अनधिकृत खाजगी बाजारामध्ये विक्री करण्यास मनाई. | .. |
| ३८०. | कातड्यांसाठी जनावरांची कत्तल करणे. | .. |
| | **पाच.– बाजाराबाहेर खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी लायसन्स** | |
| ३८१. | बाजाराव्यतिरिक्त अन्य जागी जनावरे इत्यादी विकण्यास मनाई. | .. |
| | **सहा.– खाटीक इत्यादींना लायसन्स देणे** | |
| ३८२. | खाटीक आणि जनावरांचे मांस विकणाऱ्या व्यक्ती यांना लायसन्स देणे. | .. |
| | **सात.– दुग्धशाळा उत्पादनांसाठी लायसन्स** | |
| ३८३. | दुग्धशाळा उत्पादनाच्या व्यवहारासाठी लायसेन्स आवश्यक असेल. | .. |
| | **आठ.– फेरीने माल विकणे इत्यादींसाठी लायसन्स** | |
| ३८४. | सार्वजनिक जागी विक्री करण्यासाठी लायसन्स. | .. |
| ३८५. | सार्वजनिक जागेत किंवा रस्त्यावर लाभासाठी हस्तव्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यासाठी किंवा सेवा उपलब्ध करून देण्यासाठी लायसन्स. | |
| | **नऊ.– लायसन्स आणि परवाने यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी** | |
| ३८६. | लायसन्स व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी, इत्यादी बसवणे यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी. | |
| | **प्रकरण तेवीस** | |
| | **प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार** | |
| ३८७. | प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार. | .. |
| ३८८. | प्रवेश करण्याची वेळ. | .. |

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण चोवीस

## भरपाई


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३८९. | विवक्षित बाबतीत किमान नुकसान करणे. | .. |
| ३९०. | आयुक्ताने भरपाईची रक्कम ठरवणे. | .. |
| ३९१. | अपील. | .. |


## प्रकरण पंचवीस

## शास्ती


| | | |
|---|---|---|
| ३९२. | दंडाची शिक्षा होण्यायोग्य विवक्षित अपराध. | .. |
| ३९३. | दंड संहितेअन्वये शिक्षापात्र अपराध. | .. |
| ३९४. | मतदारांच्या खोट्या याद्या तयार करण्याच्या अपराधाबद्दल शिक्षा. | .. |
| ३९५. | महानगरपालिकेशी केलेली संविदा इत्यादीत हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करण्याबद्दल शिक्षा. | |
| ३९६. | कलम ६१ चा किंवा ६२ चा भंग केल्याबद्दल शिक्षा. | .. |
| ३९७. | कलम १९४ विरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा. | .. |
| ३९७-अ. | कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये दिलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा. | |
| ३९७-ब. | विवक्षित अपराध आपसात मिटविणे. | .. |
| ३९८. | जकात किंवा पथकर चुकवण्याबद्दल शास्ती. | .. |
| ३९८-अ. | जकात चुकविण्याबाबतचा अपराध आपसात मिटविणे. | .. |
| ३९८-ब. | कलम २६५-अ बद्दलच्या उल्लंघनाची शिक्षा. | .. |
| ३९९. | सर्वसाधारण शास्ती. | .. |
| ४००. | मालकांचे अभिकर्ते आणि विश्वस्त यांची शिक्षाविषयक जबाबदारीची मर्यादा. | .. |
| ४०१. | कंपनी इत्यादींनी केलेला अपराध. | .. |
| ४०२. | या अधिनियमाविरुद्ध अपराध केलेल्या व्यक्तींनी केलेल्या नुकसानीबद्दल त्यांनी देय असलेली भरपाई. | |

## प्रकरण सव्वीस

## न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यापुढील कार्यवाही

### एक.— निवडणूक चौकशी


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ४०३. | निवडणूक चौकशीची कार्यपद्धती. | .. |
| ४०४. | निवडणुकीसंबंधी विवक्षित अपराध केल्यामुळे पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अनर्हता. | |


### दोन.— न्यायाधीशांकडे बाब निर्णयासाठी पाठवणे


| | | |
|---|---|---|
| ४०५. | न्यायाधीशांकडे बाब निर्णयासाठी पाठवणे. | .. |


### तीन.— मूल्यनिर्धारण आणि कर याविरुद्ध अपिले


| | | |
|---|---|---|
| ४०६. | अपिले केव्हा आणि कोणाकडे करता येतील. | .. |
| ४०७. | तक्रारीचे कारण घडले आहे असे केव्हा मानले जाईल. | .. |
| ४०८. | लवाद. | .. |
| ४०९. | तज्ज्ञ मूल्यनिर्धारकांची नेमणूक. | .. |
| ४१०. | जिल्हा न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविणे. | .. |
| ४११. | जिल्हा न्यायालयाकडे अपिले करणे. | .. |
| ४१२. | अपिलातील कार्यवाह्यांचा खर्च. | .. |
| ४१३. | अपील न करण्यात आलेले मूल्य व कर आणि अपिलावरील निर्णय अंतिम असणे. | |
| ४१३-अ. | नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे. | |


### चार.— न्यायाधिशांकडे आणि जिल्हा न्यायालयाकडे अपिले करणे


| | | |
|---|---|---|
| ४१४. | न्यायाधिशांकडे अपिले करणे. | .. |
| ४१५. | इमारत पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुद्ध अपिले. | .. |
| ४१६. | केलेल्या कामाचा खर्च देण्यासंबंधीच्या न्यायाधिशांच्या निर्णयाविरुद्ध अपिले. | .. |
| ४१६-अ. | जिल्हा न्यायालयापुढील अपिलातील फी. | .. |


### पाच.— न्यायाधिशांपुढील कार्यवाह्या


| | | |
|---|---|---|
| ४१७. | जो भोगवटादार या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन करण्यास इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकास प्रतिबंध करील त्या भोगवटादारांविरुद्ध मालकाने करावयाची उपाययोजना. | |

## **प्रकरण सव्वीस** -- चालू

## **न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यापुढील कार्यवाही** -- चालू

### **पाच.-- न्यायाधिशांपुढील कार्यवाह्या**-- चालू


| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| ४१८. | साक्षीदारांना समन्स काढून बोलावण्याचा व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार. | |
| ४१९. | न्यायाधिशांपुढील कार्यवाहीतील फी. | .. |
| ४२०. | गरीब व्यक्तींना फी भरण्यापासून सूट. | .. |
| ४२१. | सुनावणीपूर्वी तडजोड झाल्यास अर्धी फी परत करणे. | .. |
| | **सहा.-- दंडाधिकाऱ्यांची नेमणूक** | |
| ४२२. | पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याची नेमणूक. | .. |
| | **सात.-- दंडाधिकाऱ्याकडे बाबी निर्णयासाठी पाठविणे.** | |
| ४२३. | दंडाधिकाऱ्याकडे बाबी निर्णयासाठी पाठविणे. | .. |
| ४२४. | कलम ३३८ अन्वये ताब्यात घेतलेली जनावरे व नासण्यासारख्या नसलेल्या वस्तू यांची विल्हेवाट. | |
| ४२५. | नासके, सडलेले, आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य असे खाद्यपदार्थ कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती. | |
| ४२६. | समन्स काढण्याविषयीचा अर्ज वाजवी मुदतीच्या आत करण्यात आला नसेल तर समन्स काढण्यास नकार देणे. | |
| | **आठ -- दंडाधिकारी व सत्र न्यायालय यांच्यापुढील कार्यवाह्या** | |
| ४२७. | अपराधांची दखल. | .. |
| ४२८. | या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधासंबंधीच्या तक्रारी ज्या मुदतीच्या आत स्वीकारण्यात येतील ती मुदत. | |
| ४२९. | आरोपीच्या अनुपस्थितीत प्रकरणांची सुनावणी करण्याचा दंडाधिकाऱ्यांचा अधिकार. | |
| ४३०. | शासनाच्या रासायनिक विश्लेषकांचा अहवाल. | .. |
| ४३१. | उपद्रवासंबंधी तक्रार. | .. |
| ४३२. | कलम ४३१ अन्वये दिलेल्या आदेशावर सत्र न्यायालयाकडे अपील करणे. | .. |

## **अनुक्रमणिका** — चालू

## **प्रकरण सव्वीस** — चालू

## **न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यापुढील कार्यवाही** — चालू

### **नऊ.— अपराध्यांना अटक करणे**

**कलमे** **पृष्ठे**


४३३. या अधिनियमाविरुद्ध अपराध करणाऱ्यांना विवक्षित बाबतीत पोलीस अधिकाऱ्यांकडून अटक केली जाऊ शकेल.

४३३-अ. अधिकारितेस रोध. ..


### **दहा.— किरकोळ**


४३४. दिवाणी प्रक्रिया संहिता लागू होणे. ..

४३५. मुदत मर्यादा. ..

४३६. न्यायाधिशांच्या आणि जिल्हा न्यायाधिशांच्या आदेशांची अंमलबजावणी ..

४३७. दंडाधिकाऱ्यांपुढे चालू असलेल्या सर्व चौकशांना व कार्यवाह्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता लागू असणे.


## **प्रकरण सत्तावीस**

## **करांव्यतिरिक्त नगरपालिकेस येणे असलेल्या अन्य रकमांची वसुली**


४३८. विवक्षित कलमान्वये सामान इत्यादी हलवण्यासाठी आयुक्तास आलेल्या खर्चाची वसुली.

४३९. या अधिनियमान्वये वसुलीयोग्य असलेला खर्च मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला पाहिजे आणि मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला नाही तर, तो मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

४४०. कसूरदार हा, ज्या जागेच्या बाबतीत खर्च देय असेल अशा जागेचा मालक असेल तर, भोगवटादारदेखील असा खर्च देण्यास जबाबदार असेल.

४४१. खर्चाची रक्कम हप्त्यांनी स्वीकारण्यासंबंधी आयुक्तास करार करता येईल. ..

४४२. विवक्षित खर्च हे, सुधारणा खर्च म्हणून जाहीर करता येतील. ..

४४३. सुधारणा खर्चाचा प्रमाणशीर भाग भाड्यातून वजा करता येईल. ..

४४४. सुधारणा खर्चाच्या भाराचे विमोचन. ..

४४५. कलम ४४१ व ४४२ अन्वये देय असलेल्या हप्त्यांची वसुली. ..

४४६. कोणत्याही जागेच्या मालकाने कसूर केल्यास, जागेच्या भोगवटादारास आवश्यक काम पार पाडता येईल आणि त्याचा खर्च मालकाकडून वसूल करता येईल.

४४७. खर्च किंवा भरपाई देण्यास दायी असलेल्या व्यक्तींविरुद्ध त्या वसुलीसाठी दावा दाखल करता येईल.

## अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण अठ्ठावीस

## नियंत्रण


| कलमे | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| ४४८. | कोणत्याही नगरपालिका प्राधिकाऱ्याने कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्यास ती पार पाडण्यास भाग पाडण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| ४४९. | कलम ४४८ अन्वये अंमलात आणलेल्या उपाययोजनांचा खर्च कसा वसूल करता येईल. | |
| ४५०. | कार्यवृत्ते इत्यादीतील उतारे मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | .. |
| ४५०-अ. | राज्य शासनाचा अनुदेश किंवा निदेश देण्याचा अधिकार. | .. |
| ४५१. | विवक्षित प्रकरणांमध्ये, महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकाऱ्यांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबित किंवा विखंडित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| ४५२. | महानगरपालिका विसर्जित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | .. |
| ४५२-अ. | महानगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना नियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |


## प्रकरण एकोणतीस

## नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश


| | | |
| --- | --- | --- |
| ४५३. | अनुसूचीतील नियम हे, अधिनियमाचा भाग असणे. | .. |
| ४५४. | अनुसूची 'घ' मध्ये फेरफार करणे किंवा तीत भर घालणे. | .. |
| ४५५. | नियम करण्याचा अधिकार हा, राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधीन असणे. | .. |
| ४५६. | नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | .. |
| ४५६-अ. | नियम करण्याचे राज्य शासनाचे विशेष अधिकार. | .. |
| ४५७. | ज्या बाबींसाठी नियम करता येतील त्या बाबी. | .. |
| ४५८. | उपविधी कोणत्या प्रयोजनासाठी करता येतील. | .. |
| ४५९. | आयुक्ताने उपविधीचा मसुदा महानगरपालिकेपुढे तिच्या विचारार्थ ठेवणे. | .. |
| ४६०. | प्रस्तावित उपविधीबाबत घेण्यात आलेले आक्षेप महानगरपालिकेने ऐकणे. | .. |
| ४६१. | राज्य शासनाने उपविधी कायम करणे. | .. |
| ४६२. | राज्य शासनाने कायम केलेले उपविधी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करणे. | .. |

# अनुक्रमणिका — चालू

## प्रकरण एकोणतीस — चालू

## नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश — चालू

**कलमे** **पृष्ठे**


४६३. उपविधींच्या मुद्रित प्रती विक्रीसाठी ठेवणे. ..

४६४. राज्य शासनाला उपविधींमध्ये फेरबदल करता येतील किंवा ते निरसित करता येतील.

४६५. विनियम. ..

४६६. आयुक्ताने स्थायी आदेश देणे. ..

४६७. स्थायी आदेश आणि दुकान भाडे, भाडे इत्यादींचा तक्ता लावणे. ..

४६८. नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांचा भंग करण्याबद्दल शास्ती.


## प्रकरण तीस

## किरकोळ

### जाहीर नोटीस आणि जाहिराती


४६९. जाहीर नोटिसा कोणत्या रीतीने माहीत करून द्यावयाच्या. ..

४७०. जाहिराती कशा द्यावयाच्या. ..

४७१. महानगरपालिका इत्यादींची संमती इत्यादी लेखी दस्तऐवजाने सिद्ध करता येईल.


### नोटिसा इत्यादी बजावणे


४७२. नोटिसा इत्यादी कोणी बजावावयाच्या किंवा सादर करावयाच्या. ..

४७३. जागांच्या मालकांवर व अन्य व्यक्तींवर बजावणी कशी करावयाची. ..

४७४. जागांच्या मालकांवर किंवा भोगवटादारांवर बजावणी कशी करावयाची. ..

४७५. कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ ही दंडाधिकाऱ्याने काढलेल्या समन्सला लागू न होणे.

४७६. नोटीसा इत्यादींवर सहीचा शिक्का मारता येईल. ..

४७७. जागेच्या मालकीसंबंधी माहिती मागवण्याचा आयुक्ताचा अधिकार. ..


### अनधिकृत बांधकामे


४७८. आयुक्तांच्या लेखी परवानगीशिवाय केलेले बांधकाम किंवा गोष्ट अनधिकृत मानणे.

**अनुक्रमणिका** — चालू

**प्रकरण तीस** — चालू

**किरकोळ** — चालू

**कामे इत्यादी पार पाडण्यासंबंधी आदेशांची अंमलबजावणी**


**कलमे** **पृष्ठे**

४७९. कोणत्याही व्यक्तीस जी कामे इत्यादी पार पाडण्यास फर्माविले असेल अशी कामे विवक्षित बाबतीत आयुक्तास अशा व्यक्तींच्या खर्चाने पार पाडता येतील.

४८०. सामग्री पुरविणे. ..


**न्यायालयीन कार्यवाही**


४८१. दिवाणी व फौजदारी कार्यवाही दाखल करणे इत्यादीसंबंधी तरतुदी आणि कायदेविषयक सल्ला घेणे.


**सर्वसाधारण**


४८२. पालिका सदस्य इत्यादी लोकसेवक असल्याचे मानणे. ..

४८३. पोलीस इत्यादींचे सहकार्य. ..

४८४. जमिनीचे भाडे वसूल करण्यासाठी सहाय्य. ..

४८५. आकारणी इत्यादींतील उपचार, दोष व चुका यामुळे अशी आकारणी इत्यादी बेकायदेशीर ठरते असे मानले जाणार नाही.

४८६. सद्भावनापूर्वक केलेल्या गोष्टींबद्दल संरक्षण. ..

४८७. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींचे दाव्यापासून संरक्षण. ..

४८८. मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या विवक्षित तरतुदींच्या बाबतीत व्यावृत्ती.

४८९. मालकाच्या, अभिकर्त्याच्या किंवा विश्वस्ताच्या जबाबदारीची मर्यादा. ..


**प्रकरण एकतीस**

**निरसन आणि सुधारणा**


४९०. विवक्षित अधिनियम शहरास लागू होण्याचे बंद होणे. ..

४९१. विवक्षित अधिनियमितीत सुधारणा. ..

४९२. निरसन. ..

४९३. संक्रमणकालीन तरतुदी.

## परिशिष्टे


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| **परिशिष्ट एक** | सुधारणेच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यासंबंधी नियमन करणाऱ्या, भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदी. | |
| **परिशिष्ट दोन** | शास्तींचा तक्ता. | .. |
| **परिशिष्ट तीन** | सुधारलेल्या अधिनियमिती. | .. |
| **परिशिष्ट चार** | संक्रमणकालीन तरतुदी. | .. |
| **अनुसूची अ** | | .. |
| **अनुसूची ब** | | .. |
| **अनुसूची क** | | .. |
| **अनुसूची ड** | | .. |
| **प्रकरण एक** | निवडणूक नियम. | .. |
| **प्रकरण दोन** | महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज. | |
| **प्रकरण तीन** | विवक्षित नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीची पद्धत आणि त्यांची कर्तव्ये व अधिकार. | |
| **प्रकरण चार** | अत्यावश्यक सेवा. | .. |
| **प्रकरण पाच** | संविदा. | .. |
| **प्रकरण सहा** | विशेष निधी. | .. |
| **प्रकरण सात** | अर्थसंकल्प. | .. |
| **प्रकरण आठ** | कराधान नियम. | .. |
| **प्रकरण नऊ** | जलनि:सारण आणि जलनि:सारणाची कामे. | .. |
| **प्रकरण दहा** | पाणीपुरवठा. | .. |
| **प्रकरण अकरा** | रस्ते. | .. |
| **प्रकरण बारा** | इमारत विनियम आणि इमारत कर्जे. | .. |
| **प्रकरण तेरा** | अग्निशामक पथकाच्या अधिकाऱ्यांचे अधिकार. | .. |
| **प्रकरण चौदा** | स्वच्छताविषयक तरतुदी. | .. |
| **प्रकरण पंधरा** | बाजार आणि कत्तलखाने. | .. |
| **प्रकरण सोळा** | परिवहन उपक्रम. | .. |
| **प्रकरण सतरा** | जीवनविषयक आकडेवारी. | .. |
| **प्रकरण अठरा** | ज्या वस्तू ठेवण्यासाठी आणि जे धंदे व व्यवसाय करण्यासाठी लायसन्सची आवश्यकता आहे अशा वस्तू, धंदे व व्यवसाय. | |
| **प्रकरण एकोणीस** | दंड. | |
| **नमुने** | | .. ४ |

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९[1]

## [ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ]

[ या अधिनियमास दिनांक २१ डिसेंबर, १९४९ रोजी गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाली; ही अनुमती प्रथम मुंबई शासन राजपत्र, भाग चारमध्ये, दिनांक २९ डिसेंबर, १९४९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. ]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :---

विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०*.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४५.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४.
सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९.
सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.
सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४.
मुंबई विधि अनुकूलन ( राज्य व समवर्ती विषय ) आदेश, १९५६.

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४९, भाग ५, पृष्ठ ५९७ पहा.

* हा अधिनियम, दिनांक २० नोव्हेंबर, १९५१ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. [ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १ (२) पहा.]

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८०.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन ( राज्य व समवर्ती विषय ) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ †.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ ‡.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ §.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

---

† हा अधिनियम, दिनांक १ एप्रिल, १९६२ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. [सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १ (२) पहा.]

‡ सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ६ अन्वये सन १९६७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन करण्यात आले.

§ सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये सन १९६८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन करण्यात आले.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३. ¶

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३. (२७-१२-१९७३)*

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ ££ (२०-५-१९७४)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (१-४-१९७५)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (२७-८-१९७५)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३† (२२-९-१९७५)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६८ (२४-१२-१९७५)*

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ (१-१०-१९७६)*

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ (११-८-१९७७)*

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ †† (२१-४-१९७९)*

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ $ (१५-७-१९७९)*

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (१३-२-१९८०)*

---

¶ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३ अन्वये सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन करण्यात आले.

* ही खूण अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

££ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ अन्वये सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन करण्यात आले.

† सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६३, कलम ११ याद्वारे सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा निरसित करण्यात आला.

†† सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ याद्वारे सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा निरसित करण्यात आला.

$ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ३ याद्वारे सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा निरसित करण्यात आला.

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ¶ (१६-१०-१९८०)*

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ @ (४-२-१९८१)*

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६८ (२८-१२-१९८१)*

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६९ (२८-१२-१९८१)*

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ ††$ (४-८-१९८२)*

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ‡‡ (२०-५-१९८३)*

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ $ (३०-३-१९८४)*

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ £@@ (५-९-१९८४)*

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ @@ (११-२-१९८५)*

---

¶ सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २३ याद्वारे सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ हा निरसित करण्यात आला.

@ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ७ द्वारे सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ हा निरसित करण्यात आला.

†† $ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ९ द्वारे सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा निरसित करण्यात आला.

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ द्वारे पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे :--

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ हा राज्याच्या उर्वरित भागास लागू करणे.

२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ हा, याद्वारे, महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित क्षेत्राला लागू करण्यात येत आहे. १९४९ चा मुंबई ५९.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

‡‡ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ द्वारे सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा निरसित करण्यात आला.

$ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ३ द्वारे सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा निरसित करण्यात आला.

£@@ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ (१) याद्वारे सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा निरसित करण्यात आला.

@@ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १० द्वारे सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ हा निरसित करण्यात आला.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ @@@ (२०-१२-१९८५)*

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ £ (१९-१२-१९८६)*

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (१-११-१९८७)*

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ (४-१२-१९८७)*

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ ££ (११-७-१९८८)*

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@@@ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ७ द्वारे सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ हा निरसित करण्यात आला.

£ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :--

प्रशासकानी केलेल्या कृतीचे व गोष्टींचे विधि-ग्राह्यीकरण.

१९८६ चा महाराष्ट्र अधिनियम, ४४.

"३. मुख्य अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य अधिनियमाचे परिशिष्ट ४ च्या २२ व्या परिच्छेदातील खंड (अब) मध्ये निर्दिष्ट केलेला एकूण तीन वर्षांचा कालावधी ज्या तारखेस समाप्त होतो त्या तारखेस सुरू होणाऱ्या आणि "मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८६ " याच्या प्रारंभाच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत (ज्याचा, यात यापुढे, " उक्त कालावधी " असा निर्देश करण्यात आलेला आहे). उक्त खंड (अब) अन्वये नेमलेल्या प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी विधिग्राह्य ठरतील आणि त्या नेहमीकरिताच विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल; आणि प्रशासकाने त्याच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून एकूण तीन वर्षांच्या कालावधीत पालिका सदस्यांच्या निवडणुका झाल्या नव्हत्या आणि त्याला उक्त कालावधीत अशा कृती किंवा गोष्टी करण्याचे प्राधिकार नव्हते या कारणासाठी, अशा कोणत्याही प्रशासकाविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध दावा किंवा कार्यवाही सुरू किंवा चालू करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही."

££ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :--

प्रशासकांनी केलेल्या कृतींचे व गोष्टींचे विधि-ग्राह्यीकरण.

१९८८ चा महाराष्ट्र १८.

" ३. मुख्य अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य अधिनियमाच्या परिशिष्ट ४ च्या परिच्छेद २२, खंड (अब) मध्ये निर्दिष्ट केलेला एकूण पाच वर्षांचा कालावधी ज्या तारखेस समाप्त होतो त्या तारखेस सुरु होणाऱ्या आणि "मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८८" याच्या प्रारंभाच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत (यात यापुढे ज्याचा "उक्त कालावधी" असा निर्देश करण्यात आलेला आहे). उक्त खंड (अब) अन्वये नेमलेल्या प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी विधिग्राह्य ठरतील आणि त्या नेहमीकरिताच विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल; आणि प्रशासक त्याच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून एकूण पाच वर्षांच्या कालावधीत पालिका सदस्यांच्या निवडणुका झाल्या नव्हत्या आणि त्याला उक्त कालावधीत अशा कृती किंवा गोष्टी करण्याचे प्राधिकार नव्हते या कारणासाठी, अशा कोणत्याही प्रशासकाविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध दावा किंवा कार्यवाही सुरु करण्यात किंवा चालू करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही."

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ †

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ £££ (१२-६-१९८९)*

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ££££ (१६-३-१९९०)*

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ¶ (१२-२-१९९०)

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

† सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :--

प्रशासकांनी केलेल्या कृतींचे व गोष्टींचे विधि-ग्राह्यीकरण.

" ३. मुख्य अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य अधिनियमाच्या परिशिष्ट ४ च्या परिच्छेद २२, खंड (अब) मध्ये निर्दिष्ट केलेला एकूण सहा वर्षांचा कालावधी ज्या तारखेस समाप्त होतो त्या तारखेस सुरू होणाऱ्या आणि " मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८९ " याच्या प्रारंभाच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत (यात यापुढे, ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आलेला आहे). उक्त खंड (अब) अन्वये नेमलेल्या प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी विधिग्राह्य ठरतील आणि त्या नेहमीकरिताच विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल; आणि प्रशासक त्याच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून एकूण पाच वर्षांच्या कालावधीत पालिका सदस्यांच्या निवडणुका झाल्या नव्हत्या आणि त्याला उक्त कालावधीत अशा कृती किंवा गोष्टी करण्याचे प्राधिकार नव्हते या कारणासाठी, अशा कोणत्याही प्रशासकाविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध दावा किंवा कार्यवाही सुरू करण्यात किंवा चालू करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही."

१९८९ चा महाराष्ट्र १९.

£££ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ८ द्वारे सन १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ निरसित करण्यात आला.

££££ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ११ द्वारे सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित करण्यात आला.

¶ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १४ द्वारे सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १३ पुढीलप्रमाणे आहे :--

विद्यमान नगरसेवकांची पदे चालू ठेवणे.

" १३. शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकांचा किंवा नागपूर शहर महानगरपालिकेचा किंवा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिकेचा सदस्य म्हणून निवडून आलेली आणि असा सदस्य म्हणून पद धारण करणारी आणि " महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९०" च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी जी एकवीस वर्षांची झालेली नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, तिने राजीनामा दिलेला असल्याखेरीज, किंवा तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी तिला असे सदस्याचे पद धारण करण्यास अनर्ह ठरविण्यात आले असल्याखेरीज, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९० अन्वये संबंधित नगरपालिका कायद्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणा या जणुकाही केव्हाही करण्यात आलेल्या नव्हत्या असे मानून तिची मुदत समाप्त होईपर्यंत असा सदस्य असण्याचे चालू राहील."

१९४९ चा मुंबई ५९.
१९६५ चा महाराष्ट्र ४०.
१९९० चा महाराष्ट्र १२.
१९९० चा महाराष्ट्र १२.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ $$ (१४-११-१९९०)

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ @ (१६-२-१९९१)*

सन १९९१ चा महाराष्ट्र अधीनियम क्रमांक २६ @* (२९-१०-१९९१)*

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ( १-१-१९९३ )*

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ *@ † ( १०-८-१९९२ ).

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ( ४-१-१९९३ )*

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ ( ३१-५-१९९४ ).*†

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ ( ११-११-१९९४ ).*@ @

---

$$ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम १० द्वारे सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित करण्यात आला आणि

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याचे कलम ९ पुढीलप्रमाणे आहे :--

" ९. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ट चारच्या भाग चार मधील परिच्छेद २२ च्या खंड (अब) मध्ये निर्देश केलेला आठ वर्षांचा एकूण कालावधी ज्या दिनांकास सुरू होईल त्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधीत" असा करण्यात आला आहे). उक्त खंड (अब) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी या वैध असतील व त्या कायम वैध असल्याचे मानण्यात येईल; आणि अशा प्रशासकाने ज्या दिनांकास पद धारण केले असेल त्या दिनांकापासून आठ वर्षांच्या एकूण कालावधीत पालिका सदस्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या नव्हत्या व त्याला उक्त कालावधीत अशा कृती किंवा गोष्टी करण्याचा कोणताही प्राधिकार नव्हता या कारणावरून अशा कोणत्याही प्रशासकाविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही सुरू करता येणार नाही, दाखल करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही." प्रशासकांनी केलेल्या कृती व गोष्टी वैध ठरविणे.

@ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ११ द्वारे सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा निरसित करण्यात आला.

@* सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ द्वारे सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

*@† सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ द्वारे सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ निरसित केला.

0*† सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १६३ द्वारे सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित केला.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ @ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ११ द्वारे सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ निरसित केला.

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ ( ३१-५-१९९४ ).*@ @ @

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ( ३१-५-१९९४ ).*††

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ( ३१-८-१९९५ ).

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ ( ३१-८-१९९५ ).*@ @ @ @

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ( २९-१-१९९६ ).

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ ( ४-३-२००० ).*@ @ @ @ @

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ ( ९-११-२००० ).*@ @ @ @ @ @

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ @ @ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ६ द्वारे सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ निरसित केला.

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याची कलमे ४ व ५ पुढीलप्रमाणे आहेत :--

"४. मुख्य अधिनियमातील परिशिष्ट चारचा भाग चार वगळण्यात आला असला तरी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, त्या भागाखाली नियुक्त केलेले महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी, कोणतेही असल्यास, ते मुख्य अधिनियमाच्या प्रकरण चारमध्ये असलेल्या तत्सम तरतुदींअन्वये नियुक्त करण्यात आलेले आहेत असे मानण्यात येईल आणि उक्त तत्सम तरतुदींअन्वये त्यांच्या नियुक्त्या यथोचितरीत्या समाप्त करण्यात आल्या नसतील तर, ते महानगरपालिकेचे कर्मचारी असण्याचे चालू राहतील. १९९५ चा महाराष्ट्र ४.

प्रशासकाने केलेल्या कृती आणि गोष्टी विधिग्राह्य ठरविणे.

५. मुख्य अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य अधिनियमाच्या परिशिष्ट चारच्या भाग चार मधील परिच्छेद २२, खंड (अब) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कल्याण शहर महानगरपालिकेच्या प्रशासकाने उक्त खंड (अब) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला दहा वर्षांचा एकूण कालावधी ज्या तारखेस समाप्त झाला त्या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत (यात यापुढे, ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे) केलेल्या सर्व कृती व गोष्टी विधिग्राह्य असतील आणि त्या नेहमीच विधिग्राह्य होत्या असे मानण्यात येईल; आणि प्रशासक त्यांच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून एकूण दहा वर्षांच्या कालावधीत पालिका सदस्याची निवड करण्याकरिता उक्त महानगरपालिकेच्या निवडणुका घेण्यात आल्या नव्हत्या आणि त्याला, उक्त कालावधीमध्ये अशा कृती किंवा गोष्टी करण्याचा कोणताही प्राधिकार नव्हता, या कारणासाठी उक्त प्रशासकाविरुद्ध किंवा उक्त महानगरपालिकेविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही." १९९५ चा महाराष्ट्र ४.

*†† सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १३ द्वारे सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित केला.

@ @ @ @ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ९ द्वारे सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित केला.

@ @ @ @ @ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ५ द्वारे सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित केला.

@ @ @ @ @ @ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ४ द्वारे सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ निरसित केला.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ ( १६-९-२००० ).*@ @ @ @ @ @ @

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ( ७-९-२००१ ).*@ @ @ @ @ @ @ @

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ ( १-१-२००५ ).*@

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.*@ @

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.*@ @ @

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ ( २७-१०-२००६ ).$

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ( २७-२-२००७).£

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ (२७-१०-२००६).† #

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ @ @ @ @ @ @ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ५ द्वारे सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ निरसित केला.

@ @ @ @ @ @ @ @ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २४ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८ निरसित केला.

@ महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-ए मध्ये, उप-विभाग क्रमांक १-पृ. १, दिनांक १ जानेवारी २००५ पहा.

@@ महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-आठ, पृष्ठ १४-१५, दिनांक ४ जानेवारी २००५ जादा २००५ पहा.

@ @ @ शासकीय अधिसूचना, न.वि.वि., बीएनएम-५००५/२१८-सीआर-४३/२००५/यूडी-३२, दिनांक २१ जून, २००६ पहा. दिनांक २१ जून २००६ पासून लागू.

$ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ६ द्वारे सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित केला.

£ सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १३ द्वारे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ निरसित केला.

# सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, याचे कलम ६ पुढीलप्रमाणे आहे.

१९६५ चा महाराष्ट्र ४०. ६. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९-अ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जो राखीव जागेवर निवडून आलेला असेल, आणि ज्याला तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसेल असा कोणताही पालिका किंवा परिषद सदस्य, वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तीन महिन्यांची मुदत, जणू काही, आणखी एक महिन्याने वाढविणेत आली असल्याप्रमाणे, आणखी एक महिन्याच्या मुदतीकरिता पालिका किंवा परिषद सदस्याचे पद धारण करणे चालू ठेवील; आणि तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिने समाप्त झाल्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००७ याच्या प्रसिद्धीच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत अशा पालिका किंवा परिषद सदस्याने केलेली कोणतीही कार्यवाही ही, वैधरीतीने केलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि केवळ तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत त्याने वैधता प्रमाणपत्र सादर केले नव्हते या कारणावरून, कोणत्याही न्यायालयात तिच्याबाबत आक्षेप घेता येणार नाही. (विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.) (२००७ चा महाराष्ट्र १५.)

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ (१-३-२००८). ‡

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ (४-१-२००८ ).†

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ (४-१-२००८).†

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (२-५-२००८).†

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (१२-५-२००८).¶ %

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ (३-१०-२००८).α

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.(१४-२-२००९).†

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ( ६-२-२००९ ).ß

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ϕ

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (३१-८-२००९).Ψ

---

‡ शासकीय अधिसूचना, न. वि. वि., बी. एम. एम. -५००६/३५/सीआर-७९/युडी-३२, दिनांक २८ फेब्रुवारी २००८ पहा. दिनांक १ मार्च २००८ पासून लागू.

% शासकीय अधिसूचना, न. वि. वि., बी. एम. एम. -५००७/४३४/सीआर-११९/युडी-३२, दिनांक १२ मे २००८ पहा. दिनांक १२ मे २००८ पासून लागू.

¶ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १३ यांचे कलम ६ पुढीलप्रमाणे आहे.

शंका दूर करणे. ६. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या राखीव जागेसाठीची निवडणूक, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियिम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियिम, १९६५ अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या संबंधित तरतुदींद्वारे विनियमित करण्यात येईल.

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

α सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ९ द्वारे सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित केला.

ß शासकीय अधिसूचना न.वि.वि. एम.एम.सी.-२००८/२९१/सीआर-१०३/युडी-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २००९ पहा. दिनांक ६ फेब्रुवारी २००९ पासून लागू.

ϕ ४ जून १०१४ पर्यंत अमलात न आणलेला.

Ψ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ द्वारे सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ निरसित केला.

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (१-६-२०१०).∞ ©

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ¥ @@

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (१-५-२०११).**

---

∞ शासकीय अधिसूचना न.वि.वि. एम.एम.सी.२००८/४६६/सीआर-१६७/०८/युडी-३२, दिनांक ३१ मे २०१० पहा. दिनांक १ जून २०१० पासून लागू.

© सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याचे कलम ४३ पुढीलप्रमाणे आहे.

४३. शंका दूर करण्यासाठी याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, मालमत्ता कर बसविण्यासाठी आधार म्हणून भांडवली मूल्याचा स्वीकार करण्यासाठी, महानगरपालिकेने कलम १२९ च्या पोट-कलम (२) खाली निर्धारित केलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या कोणत्याही कालावधीशी संबंधित करयोग्य मूल्याच्या आधारे बसविलेल्या कोणत्याही मालमत्ता कराचे कोणतेही निर्धारण, पुन:निर्धारण तो बसविणे (शास्ती व व्याज बसविण्यासह) आणि तो गोळा करणे यासंबंधीची सर्व कार्यवाही ही, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु त्यात अन्यथा स्पष्ट शब्दात तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, जणू काही हा सुधारणा अधिनियम अधिनियमित करण्यात आला नसल्याप्रमाणे, प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये, सुरू राहील. शंका दूर करणे.

¥ २ ऑगस्ट २०१० पासून कलम १, १० आणि १२ लागू आणि २६ ऑगस्ट २०१० पासूल कलम २ ते ९, ११ आणि १३ ते १९ लागू.

! सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २० द्वारे सन २००९ आणि २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ व १० निरसित केला.

@ @ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ यांचे कलम १९ पुढीलप्रमाणे आहे.

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

१९. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदींशी विसंगत नसणारी, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट, प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार, राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून, करता येईल. अडचण दूर करण्याचा अधिकार.

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

परंतु, या अधिनियमाच्या संबद्ध कलमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

** शासकीय अधिसूचना न.वि.वि. बी.एम.सी.-५००७/२६७/सीआर-७१/युडि-३२, दिनांक १ मे २०११ पासून कलम ३, ५, ७ व ९ लागू पहा. दिनांक २७ एप्रिल २०११ कलम ४१ हा अधिनियम दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत लागू नाही.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१०-३-२०११).$$

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (१०-३-२०११).££

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ( १०-३-२०११ ).## ††

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ( २१-४-२०११ ). † % %

---

$$ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित केला.

££ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ८ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ निरसित केला.

## सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३१ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित केला.

†† सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याचे कलम २९ पुढीलप्रमाणे आहे.

अडचणी दूर करणे.

२९. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या नगरपालिका अधिनियम किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या नियमांच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या नगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी अशी कोणतीही गोष्ट, प्रसंग उद्भवेल त्यानुसार, आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश, काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेला असा प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

%% सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याचे कलम ६ पुढीलप्रमाणे आहे.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

६. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कारणामुळे किंवा त्या अधिनियमांपैकी कोणतेही अधिनियम, या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवली तर, राज्य शासनास प्रसंग उद्भवेल त्यानुसार, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी, कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ ( २६-५-२०११ ).ΠΠ

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ (११-९-२०११ ).ααßß

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ( २१-५-२०११ ).ϕϕ

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ ( २४-१०-२०११ ).### % % %

---

ΠΠ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ५ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित केला.

αα शासकीय अधिसूचना क्र. एम.एम.सी.-२०१०/सीआर-६/युडि-३२, दिनांक ९ सप्टेंबर २०११ पहा. दिनांक १२ सप्टेंबर २०११ पासून लागू.

ßß सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, याचे कलम ९ पुढीलप्रमाणे आहे.

१८८८ च्या मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

९. (१) या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसेलेली कोणतीही गोष्ट राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून करता येईल.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

ϕϕ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४९ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ निरसित केला.

### सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याचे कलम ६ व सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ निरसित केला.

% % % सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याचे कलम ५ पुढीलप्रमाणे आहे.

मुंबई ५९. १९६५ चा महा. ४०.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

५. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी परंतु संबंधित कायद्याच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल.

परंतु, या अधिनियमाच्या संबंधित कलमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २* (२२-३-२०१२ ).

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ ( ४-८-२०१२ ).

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३** ( ५-१२-२०१२ ).% % % %

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ ( २०-१२-२०१२ ).

## [१] [ महाराष्ट्र राज्यातील ] [२] [ बृहन्मुंबईखेरीज सर्व मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी ] महानगरपालिका स्थापन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम

---

* शासकीय अधिसूचना क्र. न.वि.वि., क्र. एम.एम.सी.-२००९/७२/सीआर-४८/२००९/युडी-३२, दिनांक २२ मार्च २०१२ पहा; दिनांक २२ मार्च २०१२ पासून लागू.

** शासकीय अधिसूचना क्र. न.वि.वि., एम.एम.सी.-२००९/सीआर-५४/युडी-३२, दिनांक १ डिसेंबर २०१२ पहा; दिनांक १ डिसेंबर २०१२ पासून लागू.

**% % % %** सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, याचे कलम ९ पुढीलप्रमाणे आहे.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

९. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी परंतु उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ द्वारे "मुंबई प्रांतातील" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम २ द्वारे "काही अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

ज्याअर्थी, [१] [महाराष्ट्र राज्यातील] [२] [बृहन्मुंबईखेरीज सर्व मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी] नगरपालिका शासन अधिक चांगले व्हावे या हेतूने [३] [उक्त अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी] महानगरपालिका स्थापन करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :-

## प्रकरण १

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास [४] [महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम] असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[५] [(२) तो या अधिनियमान्वये रचना केलेल्या किंवा रचना केल्याचे मानण्यात येणाऱ्या महानगरपालिकांच्या क्षेत्रांना लागू असेल.]

[६] [ * * * * * ]

व्याख्या.

**२.** विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास, या अधिनियमात,------

(१) **"परिशिष्ट"** म्हणजे, या अधिनियमास जोडलेले परिशिष्ट;

[७] [ * * * * * ]

१९२५ चा मुंबई ७. [८] [(२-अ) **"मान्य सहकारी बँक"** म्हणजे, मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ अन्वये* नोंदलेली किंवा नोंदण्यात आलेली आहे असे मानण्यात येणारी जी सहकारी बँक राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मान्य करील ती सहकारी बँक; ]

---

१ सन १९८२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ३ द्वारे "काही अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४२ (ब) (दोन) द्वारे " उक्त शहरात " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ४ द्वारे "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ४३ (अ) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी दाखल करण्यात आले.

६ वरील अधिनियमाच्या कलम ४३ (ब) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

७ वरील अधिनियमाच्या कलम ४४ (अ) द्वारे खंड (२) वगळण्यात आला.

८ सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम २ अन्वये खंड (२-अ) दाखल करण्यात आला.

* आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) पहा.

[1] [(२-ब) "विधानसभा मतदारसंघ" म्हणजे, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी कायद्याद्वारे तरतूद केलेला मतदारसंघ किंवा त्यावेळी शहरात समाविष्ट असलेला त्याचा कोणताही भाग ;

(२-क) "विधानसभा मतदारांची यादी" म्हणजे, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीनुसार कोणत्याही विधानसभा मतदारसंघासाठी तयार केलेली मतदारांची यादी; ] १९५० चा ४३.

(३) "बेकरी किंवा भटारखाना" म्हणजे, ज्या जागेत विक्रीसाठी किंवा नफ्यासाठी पाव, बिस्किटे किंवा मिठाई कोणत्याही प्रकारे भाजली, शिजवली किंवा तयार केली जाते अशी कोणतीही जागा ;

[2] [ (३-क) "नागरिकांचा मागास वर्ग" म्हणजे, राज्य शासनाने इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग किंवा त्यांमधील गट ; ]

(४) "अर्थसंकल्पीय अनुदान" म्हणजे, नियमांनी विहित केलेल्या व महानगरपालिकेने स्वीकारलेल्या प्रधान शीर्षाखाली अर्थसंकल्पीय अंदाजात खर्चाच्या बाजूस नमूद केलेली एकूण रक्कम आणि त्यात हा अधिनियम व नियम यांच्या तरतुदीनुसार अन्य शीर्षातून किंवा शीर्षात बदली केल्यामुळे ज्या कोणत्याही रकमेने अशी अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम वाढेल किंवा कमी होईल त्या रकमेचा समावेश होतो ;

(५) "इमारत" या संज्ञेत माणसाने राहण्याचे घर म्हणून किंवा अन्य प्रकारे उपयोग करण्यात येत असलेले कोणतेही घर, उपगृह, तबेला, छपरी, झोपडी व अन्य परिवेष्टित जागा किंवा संरचना यांचा समावेश होतो – मग ती चिरेबंदी असो किंवा विटा, लाकूड, चिखल, धातू किंवा कोणतेही अन्य सामान याने बांधलेली असो, तसेच त्या संज्ञेत व्हरांडे, कायम बसवलेले चबुतरे, जोते, दाराच्या पायऱ्या, आवाराच्या भिंती व कुंपण धरून भिंती व तत्सम भाग यांचा समावेश होतो.

[3] [(५-अ) "धंदा" या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) कोणताही व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती किंवा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती यांच्या स्वरूपातील कोणताही उद्यम किंवा संस्था —मग असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था ही लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने चालविली जात असो किंवा नसो —आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था यापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो —आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था याच्या व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

(ब) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था यांच्याशी संबंधित किंवा त्याला अनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार — मग असा व्यवहार भांडवली मतांच्या संबंधात असो किंवा नसो आणि तो लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो आणि अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

---

१ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये खंड (२-ब) व (२-क) हे, समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (ब) द्वारे खंड (३-अ) समाविष्ट केला.

३ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (अ) द्वारे खंड (५-अ) समाविष्ट केला.

(क) ज्यामध्ये मालाच्या शहरातील आयातीचा, खरेदीचा किंवा विक्रीचा अंतर्भाव होईल असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था या स्वरूपातील कोणताही प्रासंगिक व्यवहार - मग अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो आणि असा व्यवहार लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो ;

(ड) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था सुरू करण्याशी किंवा बंद करण्याशी संबंधित किंवा त्याला अनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार-मग असा व्यवहार, लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो.

**स्पष्टीकरण** :– या खंडाच्या प्रयोजनार्थ मनुष्यनिर्मित वने उभारणे किंवा बीजरोपे अथवा रोपे वाढवणे ही कामे धंदा असल्याचे मानन्यात येईल.]

(६) "उपविधी" म्हणजे, कलम ४५८ अन्वये केलेला उपविधी ;

[१] [(६-अ) "उपकर" म्हणजे, शहरामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर प्रकरण ११-क च्या तरतुदीनुसार बसवलेला उपकर], [२] [परंतु त्यात खंड (३१-अ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे स्थानिक संस्था कराचा किंवा खंड ४२ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जकातीचा समावेश होत नाही.]

(७) "मलकुंडी" या संज्ञेत इमारतीतील घाण गोळा करण्यासाठी किंवा तिची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या अवसादन टाकीचा किंवा अन्य टाकीचा समावेश होतो ;

[३] [(८) "शहर" म्हणजे, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४३-थ, खंड (२) अन्वये किंवा शहर बनणारे या अधिनियमाचे कलम ३, पोट-कलम (२) अन्वये अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांच्या संबंधात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले असे, अधिक मोठे नागरी क्षेत्र ; ] [४] [ आणि नागपूर शहराच्या संदर्भात, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) आणि नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) अधिनियम, २०११ याच्या प्रारंभाच्या दिनांकास नागपूर शहरात समाविष्ट असलेले क्षेत्र. ]

(९) "आयुक्त" म्हणजे, कलम ३६ अन्वये नेमलेल्या शहराचा नगरपालिका आयुक्त व त्यामध्ये कलम ३९ अन्वये नेमलेल्या हंगामी आयुक्ताचा समावेश होतो ;

[५] [(१०) "महानगरपालिका" म्हणजे, शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी रचना केलेली किंवा रचना केलेली असल्याचे मानण्यात येणारी महानगरपालिका ; ]

[६] [(११) "पालिका सदस्य" म्हणजे, महानगरपालिकेचा सदस्य म्हणून रीतसर निवडून आलेली व्यक्ती आणि त्यामध्ये, ज्याला,–

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ (ब) द्वारे खंड (६-अ) समाविष्ट केला.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ (क) द्वारे "परंतु त्यात खंड (४२) मध्ये केलेल्या व्याख्याप्रमाणे असलेल्या जकातीचा समावेश होत नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (क) द्वारे मूळ खंड (८) ऐवजी दाखल केला.

४ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ५ द्वारे "शहर बनवणारे" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "अधिक मोठे नागरी क्षेत्र" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल केला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ४४ (ड) द्वारे मूळ खंड (१०) ऐवजी दाखल केला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ४४ (ई) द्वारे मूळ खंड (११) ऐवजी दाखल केला.

(एक) महानगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या समित्यांच्या कोणत्याही सभेमध्ये मत देण्याचा, आणि

(दोन) महानगरपालिकेचा महापौर म्हणून किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा हक्क असणार नाही अशा नामनिर्देशित पालिका सदस्यांचा समावेश होतो ; ]

(१२) "घनफळ" ही संज्ञा जेव्हा इमारतीच्या मोजणीच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा तिचा अर्थ, इमारतीच्या भिंती व छप्पर यांचा बाहेरील पृष्ठभाग व तिच्या सर्वात खालच्या मजल्याच्या जमिनीचा वरचा पृष्ठभाग आणि इमारत फक्त एकच मजली असल्यास तिच्या जमिनीचा वरचा पृष्ठभाग यात समावलेली जागा, असा होतो ;

(१३) "दुग्धशाळा" या संज्ञेत जेथून विक्रीसाठी दूध पुरविण्यात येते किंवा जेथे विक्रीच्या प्रयोजनासाठी दूध ठेवण्यात येते किंवा विक्रीसाठी दुधापासून लोणी, तूप, चीझ, दही किंवा दुधाची भुकटी किंवा संघनित दूध तयार करण्यात येते, असे कोणतेही दुग्धशाळा प्रक्षेत्र, गुरांचा गोठा, दुग्ध भांडार, दुधाचे दुकान किंवा अन्य जागा यांचा समावेश होतो ; आणि ज्या दुग्ध व्यवसायीच्या ताब्यात दुधाच्या विक्रीसाठी कोणतीही जागा नाही अशा दुग्ध व्यवसायीच्या बाबतीत, त्या संज्ञेत दुधाच्या विक्रीसाठी त्याने वापरलेली भांडी तो ज्या ठिकाणी ठेवतो त्या जागेचा समावेश होतो ; परंतु, तीत ज्या दुकानात किंवा अन्य जागेत तेथल्या तेथेच पिण्यासाठी दूध विकण्यात येते अशा दुकानांचा किंवा जागेचा समावेश होत नाही ;

(१४) "दुग्ध व्यवसायी" या संज्ञेत जिचे दूध मनुष्याने पिण्याकरिता देऊ केले असेल किंवा देण्याचा उद्देश असेल अशी गाय, म्हैस, शेळी, गाढवी किंवा अन्य जनावर पाळणारा आणि कोणताही दूध पुरवणारा व दुग्धशाळेचा कोणताही भोगवटादार यांचा समावेश होतो ;

(१५) "दुग्धशाळा उत्पादन" या संज्ञेत दूध, लोणी, तूप, दही, ताक, मलई, चीझ व दुधापासून तयार केलेला प्रत्येक पदार्थ यांचा समावेश होतो ;

(१६) "घातक रोग" म्हणजे, पटकी, प्लेग, देवी किंवा ज्याच्यामुळे मानवी जीवितास धोका उत्पन्न होतो व जो महानगरपालिका जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी घातक रोग म्हणून जाहीर करील असा अन्य कोणताही साथीचा किंवा संक्रामक रोग ;

[१] [ (१६-अ) "व्यापारी" म्हणजे, जी स्वत:च्या धंद्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्वत:च्या धंद्याच्या संबंधात किंवा त्या अनुषंगाने शहरात कोणत्याही मालाची कमिशन, पारिश्रमिक यावर किंवा अन्यथा आयात, खरेदी किंवा विक्री करते अशी कोणतीही व्यक्ती ; आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(अ) जो शहरामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्यांच्या —मग त्यांची माहिती उघड केलेली असो वा नसो — मालकीच्या कोणत्याही मालाची खरेदी करतो, विक्री करतो, त्याचा पुरवठा करतो, त्यांचे वितरण करतो किंवा त्यांची आयात करतो असा, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा आणि यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या अशा त्याच वर्णनाचा असणारा किंवा नसणारा असा अडत्या, दलाल, कमिशन एजंट, आश्वासक, अभिकर्ता किंवा कोणताही वाणिज्य अभिकर्ता ;

(ब) जो शहरामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या -- मग त्याची माहिती उघड केलेली असो वा नसो – मालकीच्या मालाची विक्री करतो किंवा लिलाव करतो तो लिलावकार -- मग इच्छुक खरेदीदाराचा देकार त्याने किंवा प्रकर्त्याने किंवा प्रकर्त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने स्वीकारलेला असो किंवा नसो ;

(क) कमिशनवर, पारिश्रमिकावर किंवा अन्यथा प्रत्यक्षपणे वा अन्यथा मालाची खरेदी, विक्री, पुरवठा, वितरण किंवा आयात (मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो) करणारे केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन ;

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याचा कलम २ (क) द्वारे खंड (१६-अ) समाविष्ट केला.

(ड) आपल्या सदस्यांसाठी किंवा त्यांच्या वतीने रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा कमिशनवर, पारिश्रमिकावर किंवा अन्यथा मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण – मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो — करणारी संस्था, क्लब किंवा व्यक्तींचा अन्य संघ (मग ते विधिद्वारा संस्थापित असोत किंवा नसोत ) ;

**स्पष्टीकरण** — या खंडाच्या प्रयोजनार्थ — **(अ)** अनिवासी व्यापाऱ्याचा शहरामध्ये राहणारा जो व्यवस्थापक किंवा अभिकर्ता शहरामध्ये मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण करतो अथवा अशा व्यापाराच्या वतीने —

१९३० चा ३. (अ) माल विक्रय अधिनियम, १९३० मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेला वाणिज्य अभिकर्ता म्हणून, किंवा

(ब) मालाची किंवा मालाच्या संबंधातील हक्कविषयक दस्तऐवजांची हाताळणी करणारा अभिकर्ता म्हणून, किंवा

(क) मालाच्या विक्रीची किंमत वसूल करण्यासाठी वा देण्यासाठी किंवा अशा वसुलीची वा प्रदानाची हमी देण्यासाठी अभिकर्ता म्हणून ;

काम करतो तो व्यापारी किंवा अशा वसुलीसाठी अथवा प्रदानासाठी हमीदार असल्याचे मानण्यात येईल.

**( ब )** खंड (५ क) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढीलपैकी जी व्यक्ती व संस्था मालाची -- यामध्ये बेवारशी असलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या किंवा निकामी झालेल्या किंवा भंगार, जादा, जुने, अप्रचलित असलेले किंवा काढून टाकलेले सामान किंवा टाकाऊ उत्पादन म्हणून असलेल्या मालाचा समावेश आहे -- लिलावाद्वारे वा अन्यथा, प्रत्यक्षपणे किंवा अभिकर्त्यामार्फत रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा अन्य कोणताही मौल्यवान मोबदला घेऊन विल्हेवाट लावते ती प्रत्येक व्यक्ती व संस्था व्यापारी असल्याचे मानण्यात येईल. :--

(अ) बंदर विषयक विश्वस्तमंडळे ;

(ब) महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा आणि इतर स्थानिक प्राधिकरणे ;

१८९० चा ९. (क) * भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेले रेल्वे प्रशासन ;

(ड) जहाज वाहतूक, परिवहन व बांधकाम कंपन्या ;

(ई) विमान परिवहन कंपन्या व विमान वाहतूक कंपन्या ;

१९८८ चा ५९. (फ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेला, भाड्याने वा मोबदल्यादाखल वापरल्या जाणाऱ्या किंवा वापर करण्यासाठी जुळत्या करून घेतलेल्या परिवहन वाहनांचा परवाना धारण करणाऱ्या वाहतूक करणाऱ्या व्यक्ती ;

१९५० चा ६४. (ग) मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ;

१९६२ चा ५२. (ह) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ची अंमलबजावणी करणारा, भारत सरकारचा सीमाशुल्क विभाग ;

(आय) विमा व वित्तीय महामंडळे किंवा कंपन्या, आणि बँकव्यवसायी कंपन्या ;

(जे) जाहिरात कंपन्या ;

(के) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्यांनी स्थापन केलेले अथवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले अन्य कोणतेही महामंडळ, कंपनी, संस्था किंवा प्राधिकरण ;

* आता रेल्वे अधिनियम, १९८९ पहा (सन १९८९ चा २४).

अपवाद.—(एक) केवळ स्वत:च्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती आणि धंद्यामध्ये न गुंतलेला राज्य किंवा केंद्र शासनाचा विभाग हे व्यापारी असणार नाहीत.

(दोन) जो शेतकरी केवळ त्याने स्वत: कसलेल्या जमिनीत काढलेले कृषि उत्पादन विकतो तो शेतकरी या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानण्यात येणार नाही ; ]

[१][(१६-ब) "पदनिर्देशित अधिकारी" म्हणजे, कलम २६० च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी.]

(१७) "नाली" या संज्ञेत मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ, दूषित पाणी, घाण, सांडपाणी, पावसाचे पाणी किंवा भूपृष्ठाखालील पाणी वाहून नेण्यासाठी किंवा त्याची व्यवस्था लावण्यासाठी केलेला मलजल वाही, बोगदा, नळ, खंदक, गटार किंवा पाट आणि कोणताही हौद उद्वावन टाकी, मलकुंड किंवा अन्य साधने यांचा समावेश होतो. तसेच तीत कोणताही अध:प्रणाल वायुविजनाचा दांडा किंवा नळ किंवा त्यांच्याशी संबंध असलेले अन्य उपयंत्र किंवा जोडणीकाम यांचा व कोणतीही उत्सर्जक, संपीडित वात प्रधानवाही, पक्के बंद केलेले मलजल प्रधानवाही आणि कोणत्याही जागेतून मलजल किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ वर काढणारी, गोळा करणारी, काढून टाकणारी किंवा दूर करणारी खास यंत्रसामग्री किंवा उपकरणसंच यांचा समावेश होतो ;

(१८) "खाद्यगृह" म्हणजे, ज्या जागेत लोकांना किंवा लोकांच्या कोणत्याही विशिष्ट वर्गास प्रवेश दिला जातो व ज्या जागेत तिची मालकी असणाऱ्या किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या किंवा तिची व्यवस्था पाहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नफ्यासाठी किंवा लाभासाठी कोणत्याही प्रकारचा खाद्यपदार्थ तेथल्या तेथेच किंवा अन्यत्र सेवन करण्यासाठी तयार केला जातो किंवा पुरवला जातो अशी कोणतीही जागा ;

(१९) "अत्यावश्यक सेवा" म्हणजे, ज्या सेवेत महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची किंवा अन्य व्यक्तींची नेमणूक करण्यात आली असेल ; आणि ज्या नियमांत विनिर्दिष्ट केलेल्या असतील त्या सेवा ;

(२०) "कारखाना " म्हणजे, कारखाने अधिनियम, १९४८ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला कारखाना ; १९४८ चा ६३.

(२१) "घाण" संज्ञेत मलजल, मलमूत्र व सर्व दुर्गंधी पदार्थ यांचा समावेश होतो ;

[२][ (२१-अ) "वित्त आयोग" म्हणजे, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४३-झ च्या तरतुदीनुसार रचना केलेला वित्त आयोग ; ]

(२२) "अन्न" या संज्ञेत औषधिद्रव्ये किंवा पाणी याखेरीज अन्य ज्या ज्या पदार्थांचा खाण्यासाठी किंवा पिण्यासाठी उपयोग करण्यात येतो अशा प्रत्येक पदार्थांचा आणि जो कोणताही पदार्थ मनुष्याच्या अन्नात सामान्यपणे असतो किंवा असे अन्न बनविण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी ज्याचा उपयोग केला जातो अशा कोणत्याही पदार्थांचा समावेश होतो ; तसेच, या संज्ञेत मिठाई, स्वाद आणणारे व रंग आणणारे पदार्थ आणि मसाल्याचे जिन्नस व मसाले यांचाही समावेश होतो ;

(२३) "नमुना" म्हणजे, नियमांस जोडलेला नमुना ;

(२४) "ढाचेदार इमारत" म्हणजे, ज्या इमारतीच्या बाहेरील भिंती लाकडी ढाचाच्या किंवा लोखंडी ढाचाच्या बांधलेल्या असतात व जिचे स्थैर्य अशा ढाचावर अवलंबून असते अशी इमारत ;

(२५) "माल" या संज्ञेत प्राण्यांचा समावेश होतो ;

(२६) "घराची नाली" म्हणजे, एका किंवा अधिक इमारतींची किंवा जागांची व त्यांच्या नि:सारणासाठी वापरण्यात येणारी आणि तेथून केवळ नगरपालिका नालीमध्ये मलप्रवाह नेऊन सोडण्याच्या प्रयोजनासाठी तयार केलेली नाली ;

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १० द्वारे खंड (१६-ब) दाखल केला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (अ) द्वारे खंड (२१-अ) समाविष्ट केला.

(२७) "घराची गल्ली" किंवा "साफसफाईसाठी जाण्यायेण्याचा मार्ग" म्हणजे, नाली, म्हणून उपयोगात आणण्याच्या प्रयोजनासाठी किंवा संडास, मुत्री, मलकुंडी किंवा घाणेरड्या किंवा दूषित पदार्थांसाठी ठेवलेले अन्य पात्र याकडे जाण्यासाठी नगरपालिकेच्या सेवकांना किंवा तो साफ करण्यासाठी किंवा त्यातील घाण काढून नेण्याकरिता नेमलेल्या व्यक्तीस त्याकडे जाण्यासाठी तयार केलेला, अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला मार्ग किंवा जमिनीची पट्टी ;

(२८) "झोपडी" म्हणजे, जी मुख्यत: लाकूड, चिखल, पाने, गवत, कापड, किंवा गवताचे छप्पर यांची बांधलेली आहे अशी कोणतीही इमारत व तीत या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका जिला झोपडी म्हणून जाहीर करील अशी कोणत्याही आकाराची कोणतीही तात्पुरती संरचना किंवा कोणतेही सामान वापरून बांधलेली अशी कोणतीही लहान इमारत ;

[१][(२८-अ) "आयात करणारा" म्हणजे, जी व्यक्ती शहरामध्ये उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी शहराच्या क्षेत्राबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून शहराच्या हद्दीमध्ये कोणताही माल आणते किंवा आणण्यास कारणीभूत होते ती व्यक्ती ; ]

(२९) "न्यायाधीश" म्हणजे, [२][ [३][पुणे] शहरात ] लघुवाद न्यायालयाचा न्यायाधीश ; आणि अन्य कोणत्याही शहरात, अशा शहरात अधिकारिता असलेला दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) ] ;

(३०) "जमीन" या संज्ञेत जिच्यावर बांधकाम करण्यात येत आहे किंवा करण्यात आले आहे किंवा जी पाण्याने आच्छादलेली आहे अशी जमीन, जमिनीपासून उत्पन्न होणारे फायदे जमिनीशी जोडलेल्या वस्तू किंवा कोणत्याही जमिनीशी जोडलेल्या वस्तूशी कायमच्या जखडलेल्या वस्तू आणि विधानमंडळाने पारित केलेल्या अधिनियमान्वये कोणत्याही रस्त्यावर निर्माण केलेले हक्क यांचा समावेश होतो ;

[४][(३०-अ) "अधिक मोठे नागरी क्षेत्र" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड (२) अन्वये किंवा अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र ; ]

(३१) "लायसन्सदार नळकारागीर", "लायसन्सदार सर्वेक्षक", "लायसन्सदार वास्तुशास्त्रज्ञ", "लायसन्सदार अभियंता", "लायसन्सदार संरचना संकल्पचित्रकार" व "लायसन्सदार बांधकाम लिपिक" म्हणजे, महानगरपालिकेने या अधिनियमान्वये अनुक्रमे नळकारागीर, सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ, अभियंता, संरचना संकल्पचित्रकार किंवा बांधकाम लिपिक म्हणून लायसन्स दिलेली व्यक्ती ;

[५][ (३१-अ) "स्थानिक संस्था कर" याचा अर्थ उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी शहरांच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर प्रकरण अकरा-ख च्या तरतुदींनुसार बसविण्यात आलेला कर असा आहे, परंतु त्यात खंड (६-अ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे उपकराचा आणि खंड ४२ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जकातीचा समावेश होत नाही. ]

(३२) "निवासगृह" म्हणजे, जेथे पैशाच्या मोबदल्यात भोजन किंवा अन्य सेवेसह किंवा भोजनावाचून किंवा अन्य सेवेवाचून राहण्याची सोय केली जाते अशी इमारत किंवा इमारतीचा भाग ;

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (३) द्वारे खंड (२८-अ) समाविष्ट केला.

२ मूळ शब्दाऐवजी हे शब्द, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ द्वारे "पुणा" याऐवजी दाखल केले.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (ग) द्वारे खंड (३०-अ) समाविष्ट केला.

५ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ (ख) द्वारे खंड (३१-अ) दाखल केला.

(३३) "बाजार" या संज्ञेत ज्या कोणत्याही जागेत गुरेढोरे किंवा गुराढोरांसाठी अन्न किंवा मांस, मासळी, फळे, भाजीपाला माणसाने खाण्यासाठी असलेली जनावरे किंवा मनुष्यांनी खाण्यासाठी असलेले अन्य कोणतेही पदार्थ यांची विक्री करण्याकरिता किंवा ती विक्रीसाठी ठेवण्याकरिता लोक जागेच्या मालकाच्या संमतीने किंवा संमतीवाचून एकत्र जमतात त्या जागेचा समावेश होतो; मग तेथे विकत घेणाऱ्या व विकणाऱ्या व्यक्ती एकत्र जमण्याबाबत कोणताही सामान्य विनियम नसला तरी हरकत नाही ; आणि अशा जागेच्या मालकाकडून किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीकडून बाजारात चालणाऱ्या धंद्यांवर किंवा तेथे येणाऱ्या व्यक्तींवर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येत असो वा नसो ;

(३४) "चिरेबंदी इमारत" म्हणजे, ढाचेदार इमारत किंवा झोपडीव्यतिरिक्त अन्य कोणतीही इमारत; व तीत जिचा बराचसा भाग चिऱ्यांनी किंवा पोलाद, लोखंडे किंवा अन्य धातू यांनी बांधलेला आहे अशा कोणत्याही संरचनेचा समावेश होतो ;

(३५) "नगरपालिकेची नाली" म्हणजे, महानगरपालिकेत निहित असलेली नाली ;

(३६) "नगरपालिका बाजार" म्हणजे, महानगरपालिकेमध्ये निहित असलेला किंवा तिच्या व्यवस्थेखाली असलेला बाजार ;

(३७) "नगरपालिका कत्तलखाना" म्हणजे महानगरपालिकेमध्ये निहित असलेला किंवा तिच्या व्यवस्थेखाली असलेला कत्तलखाना ;

(३८) "नगरपालिका कर" म्हणजे, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये बसवलेला कोणताही कर ;

(३९) "नगरपालिका जलव्यवस्था केंद्र" म्हणजे, महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले किंवा तिच्यामध्ये निहित असलेले जलव्यवस्था केंद्र ;

(४०) "उपद्रव" या संज्ञेत, ज्यामुळे डोळे, नाक, कान यांच्या शक्तीस इजा, धोका, त्रास किंवा पीडा होते किंवा होण्याचा संभव आहे किंवा जे जीवितास घातक किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस हानिकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही कृतीचा, अकृतीचा, जागेचा किंवा वस्तूचा समावेश होतो ;

(४१) "भोगवाटदार" या संज्ञेत पुढील व्यक्तींचा समावेश होतो –

(अ) ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भाडे दिले जाते किंवा देण्याजोगे असते अशा जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग जी कोणतीही व्यक्ती मालकास त्यावेळी देत असेल किंवा देण्यास पात्र असेल अशी व्यक्ती ;

(ब) आपल्या जमिनीवर किंवा इमारतीत राहणारा किंवा अन्यथा तिचा वापर करणारा मालक ;

(क) भाडे माफ असलेला भाडेकरी ;

(ड) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करीत असलेला लायसन्सधारक; आणि

(ई) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर व भोगवटा केल्याबद्दल मालकास नुकसान भरपाई देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती ;

(४२) "जकात " म्हणजे, खप, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीत मालाच्या प्रवेशावर बसवलेला उपकर ; [१][ परंतु, त्यात खंड (६-अ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे उपकराचा किंवा खंड (३१-अ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे स्थानिक संस्था कराचा समावेश होत नाही ;]

(४३) "दुर्गंधीयुक्त पदार्थ" या संज्ञेत जनावरांची प्रेते, शेण, घाण व मलजलाव्यतिरिक्त अन्य सडणारे किंवा सडण्यास कारणीभूत होणारे पदार्थ यांचा समावेश होतो ;

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ (ग) द्वारे "परंतु यामध्ये खंड (६-अ) मध्ये केलेल्या व्याख्येनुसार असलेल्या उपकराचा समावेश होत नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(४४) "सरकारी वर्ष [1] [ किंवा वर्षे ]" म्हणजे, एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस सुरू होणारे वर्ष ;

(४५) "मालक" म्हणजे, —

(अ) एखाद्या जागेच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा, जी व्यक्ती अशा जागेचे भाडे घेते ती व्यक्ती किंवा उक्त जागा भाड्याने दिली असती तर ज्या व्यक्तीस तिचे भाडे घेण्याचा हक्क प्राप्त झाला असता ती व्यक्ती व तीत पुढील व्यक्तींचा समावेश होतो —

(एक) मालकाच्या वतीने असे भाडे घेणारा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(दोन) जो धार्मिक किंवा धर्मदाय प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही जागेचे भाडे घेतो किंवा अशी जागा ज्यांच्याकडे सोपविली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(तीन) उक्त जागेचा कब्जा घेण्यासाठी किंवा तिचा मालक म्हणून हक्क बजावण्यासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक ;

(चार) कब्जे गहाणदार ; आणि

(ब) कोणतेही जनावर, वाहन किंवा नाव यांच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा, त्यामध्ये अशा प्राण्याचा, वाहनाचा किंवा नावेचा त्यावेळी ताबा असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(४६) "जागा" या संज्ञेत घरवाड्या, इमारती आणि कोणत्याही धारणा अधिकारात येणाऱ्या जमिनी यांचा समावेश होतो —मग त्या खुल्या असोत वा परिवेष्टित असोत किंवा त्यांच्यावर बांधकाम केलेले असो वा नसो, आणि त्या सार्वजनिक असोत वा खाजगी असोत ;

[2] [ (४६-अ) "विहित" म्हणजे, नियमांद्वारे विहित ; ]

(४७) "खाजगी रस्ता" म्हणजे, जो सार्वजनिक रस्ता नाही असा रस्ता ;

(४८) "संडास" या संज्ञेत अर्थ, मलविसर्जनासाठी किंवा मूत्र विसर्जनासाठी किंवा या दोन्ही कारणांसाठी अलग राखलेली जागा, तसेच अशी काही जागा ज्यात आहे असे बांधकाम, माणसांच्या मलमुत्रासाठी ठेवलेले पात्र, त्यास जोडण्यात आली असतील अशी जोडणीकामे व उपकरण संच असा होतो ; आणि तीत निर्जल शौच्यस्थान, जलधौत संडास, शौचकूप व मुत्री यांचा समावेश होतो ;

(४९) "मालमत्ता कर" म्हणजे, शहरातील इमारती व जमिनी यांवरील कर ;

(५०) "सार्वजनिक जागा" यात कोणतेही सार्वजनिक उपवन किंवा उद्यान किंवा जेथे लोकांना प्रवेश करता येते किंवा प्रवेश करण्यास परवानगी असते अशी कोणतीही जागा, यांचा समावेश होतो ;

(५१) "सरकारी कर्ज रोखे" म्हणजे, —

(अ) केंद्र सरकारचे व कोणत्याही [3] [ राज्य ] शासनाचे कर्ज रोखे ;

(ब) ज्यावरील व्याजाची हमी केंद्र किंवा [3] [ राज्य ] शासनाने दिलेली आहे असे कर्ज रोखे, रोखे, ऋणपत्रे किंवा शेअर ;

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (फ) द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

२ वरील अधिनियमांचा कलम २ (ण) द्वारे खंड (४६-अ) समाविष्ट केला.

३ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

(क) [१] [ भारताच्या राज्य क्षेत्रातील ] कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या वतीने पैशाबद्दल दिलेली ऋणपत्रे किंवा अन्य कर्जरोखे ;

(ड) [२] [ राज्य ] शासनाने याबाबत दिलेल्या कोणत्याही आदेशान्वये स्पष्टपणे प्राधिकृत केलेले कर्जरोखे ;

(५२) "सार्वजनिक रस्ता" म्हणजे, —

(अ) नगरपालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक निधीच्या खर्चाने यापूर्वी समतल करण्यात आलेला, फरसबंदी करण्यात आलेला, खडी घालण्यात आलेला, पाणी वाहून जाण्याकरता पाट काढण्यात आलेला, मलप्रणाल खोदण्यात आलेला किंवा दुरुस्त करण्यात आलेला ; किंवा

(ब) जो कलम २२४ च्या तरतुदीन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीन्वये सार्वजनिक रस्ता होतो, असा कोणताही रस्ता ;

(५३) "जबर भाडे" म्हणजे, ज्या जागेच्या संदर्भात ही संज्ञा वापरण्यात येईल ती जागा ज्या वार्षिक भाड्याने वर्षावर्षाला भाड्याने देण्यात येईल अशी वाजवी रीतीने अपेक्षा असेल, त्या वार्षिक भाड्याचे करयोग्य मूल्य ठरविण्याच्या प्रयोजनासाठी निश्चित केलेली रक्कम ;

(५४) "करयोग्य मूल्य" याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदी आणि मालमत्ता कराच्या आकारणीच्या प्रयोजनासाठी केलेले नियम यानुसार निश्चित केलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मूल्य ;

[३] [ (५४-अ) "नोंदणीकृत व्यापारी" म्हणजे कलम १५२ चे अन्वये नोंदणी करण्यात आलेला व्यापारी ;]

(५५) "विनियम" म्हणजे, कलम ४६५ अन्वये केलेला विनियम ;

(५६) (अ) एखादी व्यक्ती ज्या कोणत्याही राहण्याच्या जागेचा किंवा तिच्या काही भागाचा झोपण्याची खोली म्हणून कधीकधी वापर करत असेल त्या जागेत ती "राहते" असे मानले जाते – मग असा वापर ती अधूनमधून करत असो वा नसो ; आणि

(ब) एखादी व्यक्ती अशा राहण्याच्या जागेत अनुपस्थित असते किंवा जेथे ती राहते अशी तिची अन्यत्र दुसरी राहण्याची जागा आहे, परंतु त्या जागेत कोणत्याही वेळी परत येण्याचे तिला स्वातंत्र्य असते व तिने त्या जागेत परत येण्याचा आपला उद्देश सोडून दिला नसेल तर, ती अशा जागेत अनुपस्थित असते किंवा तिची अन्यत्र दुसरी राहण्याची जागा आहे केवळ याच कारणावरून ती अशा जागेत "राहण्याचे" बंद झाले आहे असे मानले जाणार नाही ;

(५७) "कचरा" या संज्ञेत धूळ, राख, विटांचे तुकडे, चुना, काचेचे तुकडे, बागेतील किंवा तबेल्यातील केरकचरा व दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा मलजल नसलेला कोणत्याही प्रकारचा केरकचरा यांचा समावेश होतो ;

(५८) "नियम" या संज्ञेत [४] [ अनुसूची ड ] मधील नियम आणि कलमे ४५४ व ४५६ अन्वये केलेले नियम यांचा समावेश होतो ;

---

१ मूळ शब्दांऐवजी हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आले.

२ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

३ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (ह) द्वारे खंड (५४ अ) समाविष्ट केला.

४ १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (आय) द्वारे "अनुसूचीतील" या शब्दाऐवजी दाखल केले.

[1] [(५९) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमास जोडलेली कोणतीही अनुसूची ; ]

१९३४ चा २. [2] [(५९-अ) "अनुसूचित बँक" म्हणजे, भारताची रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ च्या दुसऱ्या अनुसूचीत अंतर्भूत केलेली बँक ; ]

[3] [(५९-ब) "अनुसूचित जाती" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात अनुसूचित जाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या जाती, वंश किंवा अशा जाती, वंश किंवा जनजाती (जमाती) यांचे भाग किंवा त्यामधील गट ;

(५९-क) "अनुसूचित जनजाती" म्हणजे, भारताच्या, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती म्हणून मानण्यात येत असलेल्या जनजाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जनजाती किंवा जनजाती समूह यांचे भाग किंवा त्यांतील गट ; ]

(६०) "मलजल" म्हणजे, मलमूत्र व जलधौत संडास, शौचकूप, संडास, मुत्र्या, मलकुंड्या किंवा नाल्या यातील अन्य घाण आणि सांडवण्या, स्नानगृहे, तबेले, पशुशाला व तत्सम अन्य जागा यातील दूषित पाणी व तीत धंद्याच्या जागेतील नि:सृत व सर्व प्रकारच्या कारखान्यातील नि:सरण यांचा अंतर्भाव होतो ;

(६१) "विशेष निधी" म्हणजे, कलम ९१ अन्वये स्थापन केलेला निधी ;

(६२) "स्थायी आदेश" म्हणजे, कलम ४६६ अन्वये दिलेला आदेश ;

[4] [(६२-अ) "राज्य निवडणूक आयोग" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-न, खंड (१) याच्या तरतुदीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयुक्ताचा समावेश असलेला राज्य निवडणूक आयोग ;]

(६३) "रस्ता" या संज्ञेत कोणताही महामार्ग आणि ज्यावर लोकांना जाण्या-येण्याच्या किंवा प्रवेश करण्याचा हक्क असेल किंवा वीस वर्षाच्या मुदतीत ज्यावरून लोक अव्याहतपणे जात-येत होते किंवा त्यांना प्रवेश करता येत होता असा कोणताही साकव, पूल, सेतू, कमान, सडक, गल्ली, पायवाट, भुयारी मार्ग, आवार, बोळ किंवा रपेट मार्ग किंवा मार्ग यांचा समावेश होतो, – मग ते रहदारीचे मार्ग असोत किंवा नसोत; आणि जेव्हा कोणत्याही रस्त्यात पायवाट किंवा वाहनमार्ग असेल तेव्हा उक्त संज्ञेत या दोहोंचाही समावेश होतो ;

(६४) "मिठाईचे दुकान" म्हणजे, कोणतेही आईस्क्रीम, मेवामिठाई किंवा मिठाई विक्रीसाठी तयार करण्याकरता, त्यावर प्रक्रिया करण्याकरिता किंवा साठवण्याकरिता किंवा त्यांची घाऊक किंवा किरकोळ विक्री करण्याकरिता वापरण्यात येत असेल अशी कोणतीही जागा किंवा अशा कोणत्याही जागेचा भाग, मग असे आईस्क्रीम, मेवामिठाई किंवा मिठाई कोणत्याही प्रकारची असो, कोणाही करिता केलेली असो व कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असो आणि ती अशा जागेत किंवा जागेच्या बाहेर खाण्यासाठी ठेवलेली असो ;

(६५) "नाट्यगृह कर" म्हणजे, मनोरंजन किंवा करमणूक यावरील कर ;

---

१ वरील अधिनियमाच्या कलम २ (जे ) द्वारे मूळ खंड (५९) ऐवजी दाखल केला.

२ हा खंड सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (ह) द्वारे खंड (५९-ब) व (५९-क) समाविष्ट केले.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (आय) द्वारे खंड (६२-अ) समाविष्ट केला.

(६६) "उद्योगधंद्यापासून निर्माण होणारे नि:सृत" म्हणजे, धंद्याच्या जागेत कोणताही व्यापार किंवा उद्योग चालू असताना पूर्णत: किंवा अंशत: उत्पन्न झालेला त्यात तरंगणाऱ्या पदार्थाच्या कणांसहित किंवा कणांशिवाय असलेला कोणताही प्रवाही पदार्थ आणि कोणत्याही धंद्याच्या जागेच्या संबंधात, अशा जागी कोणताही व्यापार किंवा उद्योग चालू असताना अशा रीतीने उत्पन्न झालेला, पूर्वी सांगितल्याप्रमाणे असलेला कोणताही प्रवाही पदार्थ, परंतु त्यामध्ये राहत्या घरातून येणाऱ्या मलजलाचा समावेश होत नाही ;

(६७) "धंद्याची जागा" म्हणजे, कोणताही व्यापार किंवा उद्योग चालविण्याकरीता वापरण्यात येणारी किंवा जी वापरण्याचा उद्देश आहे अशी कोणतीही जागा ;

(६८) "धंद्यातील केरकचरा" म्हणजे, कोणत्याही धंद्यातील, निर्मितीतील किंवा व्यवसायातील केरकचरा, व त्यात अशा केरकचऱ्याचा समावेश होतो ;

(६९) "परिवहन व्यवस्थापक" म्हणजे, कलम ४० अन्वये नेमलेल्या परिवहन उपक्रमाचा परिवहन व्यवस्थापक आणि त्यात कलम ४१ अन्वये नेमलेल्या हंगामी परिवहन व्यवस्थापकांचा समावेश होतो ;

(७०) "परिवहन उपक्रम" म्हणजे, लोकांची ने-आण करण्याकरिता यंत्रचालित वाहतुकीच्या सोयींची तरतूद करण्यासाठी महानगरपालिकेने संपादन केलेले, आयोजित केलेले, बांधलेले, चालू ठेवलेले, विस्तारित केलेले, व्यवस्थेखाली ठेवलेले किंवा चालवलेले सर्व उपक्रम आणि त्यात अशा प्रत्येक उपक्रमाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये विहित असलेली किंवा होणारी सर्व स्थावर किंवा जंगम मालमत्ता व हक्क यांचा समावेश होतो ;

[१] [(७०-अ) " खरेदी उलाढाल " म्हणजे, व्यापाराने किंवा व्यक्तीने एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही खरेदीसंबंधात त्या व्यापाराने किंवा व्यक्तीने दिलेल्या आणि तिने देय असलेल्या खरेदी किमतीच्या एकूण रकमांतून, विक्रेत्याकडून खरेदी करण्यात आलेल्या आणि सहा महिन्याच्या मुदतीत त्यास परत करण्यात आलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या विक्रेत्याने त्या व्यापाराला किंवा व्यक्तीला खरेदी किमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास, ती रक्कम वजा करून राहिलेली रक्कम ;

(७०-ब) "विक्रीची उलाढाल" म्हणजे, व्यापाराला किंवा व्यक्तीला एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही विक्रीसंबंधात मिळालेल्या व मिळण्यायोग्य असलेल्या विक्री किमतीच्या एकूण रकमांतून, खरेदीदाराने त्याच्याकडून खरेदी केलेल्या आणि सहा महिन्याच्या मुदतीत त्यास परत केलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या व्यापाराने किंवा व्यक्तीने खरेदीदाराला विक्री किमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास ती रक्कम वजा करून आणि नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले असेल त्या बाबतीत ते ज्या तारखेपासून रद्द होईल त्या तारखेपूर्वी केलेल्या विक्रीच्या संबंधात अशा तारखेनंतर मिळालेल्या किंवा मिळण्यायोग्य असलेल्या रकमा वजा करून राहिलेली रक्कम ;]

[२] [(७०-ग) ज्या शहरामध्ये आयात मालावर यथामूल्य "जकात" किंवा "उपकर" बसविला जातो अशा शहरामध्ये आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या संबंधात "वस्तूचे मूल्य" म्हणजे, मूळ बीजकामध्ये नमूद केलेले मूल्य, आणि त्यामध्ये अशा वस्तूंवरील जहाज वाहतूक मालप्रेषण विषयक देय रक्कम, विमा, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, प्रतिशुल्क, कोणताही विक्रीकर (असल्यास), मूल्यवर्धित कर, परिवहन खर्च, विक्रेत्याचा वाहतूक खर्च, वाहन खर्च आणि इतर सर्व अनुषंगिक खर्च यांचा समावेश होईल. ]

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ (के) द्वारे खंड (७०-अ) व (७०-ब) समाविष्ट केले.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २ द्वारे खंड (७०-ग) दाखल केला.

(७१) "वाहन" या संज्ञेत गाडी, छकडा, व्हॅन, खटारा, मालमोटार, हातगाडी, सायकल, तिचाकी, मोटार गाडी आणि रस्त्यावर वापरण्यात येणारे किंवा वापरण्यास योग्य असलेले चाकाचे प्रत्येक वाहन यांचा समावेश होतो ;

[१] [(७१-अ) "प्रभाग समिती" म्हणजे, या अधिनियमाचा कलम २९-क अन्वये रचना करण्यात आलेली प्रभाग समिती ; ]

(७२) "जलधौत संडास" म्हणजे, ज्यात जलनि:सारण यंत्रणेस जोडलेले व कायम बसवलेले असे स्वतंत्र पात्र असेल व जो यांत्रिक किंवा स्वयंचलित क्रियेने स्वच्छ पाण्याने खळदिशी धुतला जाण्याची सोय केलेली असेल असा संडास ;

(७३) "जलसंयोजन" या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो —

(अ) खाजगी मालमत्ता असलेली व महानगरपालिकेच्या मालकीच्या पाण्याचा मुख्य नळाशी किंवा नळाशी जोडलेली कोणतीही टाकी, हौद, नळखांब, उभा नळ, मीटर किंवा तोटी ; आणि

(ब) अशा टाकीला, हौदाला, नळखांबाला, उभ्या नळाला, मीटरला किंवा तोटीला अशा पाण्याच्या मुख्य नळाशी किंवा नळाशी जोडणारा पाण्याचा नळ ;

(७४) "जलप्रवाह" या संज्ञेत कोणतीही नदी, ओढा किंवा नैसर्गिक किंवा कृत्रिम पाट यांचा समावेश होतो ;

(७५) "घरगुती प्रयोजनासाठी पाणी" या शब्दप्रयोगात जेथे गुरेढोरे, घोडे किंवा वाहने विक्रीसाठी किंवा भाड्याने देण्यासाठी किंवा भाड्याचा धंदा करणाऱ्याने ठेवलेली असतात तेथील गुरांसाठी किंवा घोड्यांसाठी किंवा वाहने धुण्यासाठी वापरावयाच्या पाण्याचा समावेश होत नाही ; तसेच त्यात कोणत्याही धंद्यासाठी, निर्मितीसाठी किंवा व्यवसायासाठी किंवा बांधकामाच्या प्रयोजनासाठी किंवा बागांना पाणी घालण्यासाठी किंवा कारंजासाठी किंवा कोणत्याही शोभेच्या किंवा यांत्रिक कामासाठी वापरावयाच्या पाण्याचा समावेश होणार नाही ;

(७६) "जलव्यवस्था केंद्र" या संज्ञेत सरोवर, ओढा, झरा, विहीर, पंप, जलाशय, हौद, टाकी, वाहिनी — मग ती झाकलेली असो किंवा उघडी असो — जलद्वार, मुख्य नळ, अध:प्रणाल, इंजिन, पाण्याची गाडी, नळखांब, उभा नळ, प्रणाल आणि पाण्याचा पुरवठा करण्याकरिता असलेली किंवा वापरण्यात येणारी किंवा पाणीपुरवठ्यांच्या साधनांचे संरक्षण करण्याकरिता असलेली यंत्रसामग्री, जमीन, इमारत किंवा वस्तू यांचा समावेश होतो.

[१] [ **अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांच्या विनिर्देश व महानगरपालिकांची रचना.** ]

सन १९९४ चा महा. अध्या. १०.

**३.** [२] [(१) भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४३-थ, खंड (२) अन्वये, अधिक मोठ्या नागरी क्षेत्राच्या संबंधात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या अशा प्रत्येक शहराची, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अध्यादेश, १९९४ अंमलात येण्याच्या दिनांकास अस्तित्वात असलेली, या अधिनियमान्वये रचना केलेली महानगरपालिका ही ".... शहर महानगरपालिका" या नावाने ओळखली जाणारी, एक शहर बनणाऱ्या अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या अधिक मोठ्या नागरी क्षेत्राची यथोचितरीत्या रचना केलेली महानगरपालिका असल्याचे मानण्यात येईल.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ (जे) द्वारे खंड (७१-अ) समाविष्ट केला.

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४५ (ब) (तीन) द्वार मूळ समासटीपे ऐवजी दाखल केले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४५ (अ) द्वारे पोट-कलम (१) व (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल केली.

[१] [(१-अ) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) अन्वये या संदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये विधी संस्थापित करण्यात आलेली नागपूर शहर महानगरपालिका ही, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) आणि नागपूर शहर महानगरपालिका निरसन अधिनियम, २०११ अंमलात येण्याच्या दिनांकास व तेव्हापासून या अधिनियमान्वये स्थापन केली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार या अधिनियमाच्या तरतुदी नागपूर शहराच्या क्षेत्राला लागू होतील.] १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड-२. २०१२ चा महा. २३.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केली आहे त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, राज्य शासनाला भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन, तीन लाखापेक्षा कमी नसेल इतकी लोकसंख्या असलेले कोणतेही नागरी क्षेत्र राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करता येईल.

(२-अ) पोट-कलम (२) अन्वये राज्य शासनाने अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेले प्रत्येक अधिक मोठे नागरी क्षेत्र एक शहर बनेल आणि अशा अधिक मोठ्या आणि अशा अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी "......... शहर महानगरपालिका" या नावाने ओळखली जाणारी एक महानगरपालिका असेल. ]

(३) [२] [ (अ) [३] [ पोट-कलम (२) च्या तरतुदीस अधीन राहून राज्य शासनास ] वेळोवेळी, महानगरपालिकेशी विचारविनिमय करून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही [४] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी ] विनिर्दिष्ट केलेल्या सीमामध्ये, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र समाविष्ट करण्यासाठी किंवा त्यामधून वगळण्यासाठी फेरफार सुद्धा करता येतील.

[३] [ (ब) खंड (क) अन्वये [४] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्राच्या ] हद्दीतील कोणत्याही क्षेत्राचा समावेश करण्यात येईल त्याबाबतीत या अधिनियमान्वये किंवा त्या [५] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रात ] त्यावेळी अंमलात असेल अशा कोणत्याही अन्य अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नेमणुका, योजना, नियम, उपविधी किंवा नमुने, काढलेल्या अधिसूचना, नोटिसा, आदेश दिलेली लायसन्स, परवानग्या, बसविलेले कर हे, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या कलम १२९-क मध्ये किंवा कोणत्याही अन्य तरतुदींमध्य अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, त्या [५] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रात] ते क्षेत्र समाविष्ट करण्यात आले असले त्या तारखेपासून अतिरिक्त क्षेत्रातही लागू होतील आणि अंमलात येतील. ]

(४) या कलमान्वये अधिसूचना काढण्याचा अधिकार पूर्वप्रसिद्धीच्या अधीन असेल.

**३-क.** [५] [ * * * * * * ]

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ६ द्वारे उपखंड (१-अ) दाखल केला.

२ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६ अन्वये पोट-कलम (३) ला खंड (अ) असा फेरक्रमांक देण्यात आला व खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४५ (ब ) (एक) द्वारे "राज्य शासनास" या मजकुराऐवजी दाखल केले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ४५ (ब ) (दोन) द्वारे "शहर" हा शब्द त्याचा व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याऐवजी हा मजकूर दाखल केला.

५ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४६ द्वारे कलम ३-अ वगळण्यात आले.

## प्रकरण २

## रचना

### नगरपालिका प्राधिकारी

**४.** (१) प्रत्येक शहरासाठी या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे काम ज्या नगरपालिका प्राधिकरणांकडे / प्राधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहे ते पुढीलप्रमाणे आहेत :— अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवण्यात आलेले नगरपालिका प्राधिकारी.

(अ) महानगरपालिका ;

(ब) स्थायी समिती ;

[१] [(ब अ) प्रभाग समिती ; ब ब महापौर ; आणि ]

(क) नगरपालिका आयुक्त ;

आणि, महानगरपालिकेने परिवहन उपक्रम स्थापन केला असेल किंवा संपादन केला त्या बाबतीत :—

(ड) परिवहन समिती ;

(ई) परिवहन व्यवस्थापक.

(२) प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत महानगरपालिकेवर लादलेली कर्तव्य *मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम,
१९४७ चा मुंबई ६१. १९४७ च्या तरतुदींनुसार पार पाडण्यात येतील आणि उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिका ही, उक्त अधिनियमाच्या अर्थानुसार प्राधिकृत नगरपालिका आहे असे मानले जाईल व तिला शहरातील सर्व मान्य शाळांवर नियंत्रण ठेवण्याचा व प्रशासन अधिकारी नेमण्याचे अधिकार असेल.

**५.** (१) प्रत्येक महानगरपालिका ही ". . . . शहराची महानगरपालिका " या नावाचा निगम निकाय असेल व तिची अखंड परंपरा असेल व तिचा एक सामाईक शिक्का असेल. अशा नावाने तिला दावा लावता येईल व तिच्यावर दावा लावता येईल. महानगरपालिकेची रचना.

[२] [(२) प्रत्येक महानगरपालिका पुढील सदस्यांची बनली असेल —

(अ) प्रत्यक्ष प्रभाग निवडणुकांमध्ये थेट निवडून आलेले खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या संख्येतील पालिका-सदस्य —

**तक्ता**

| लोकसंख्या | पालिका सदस्यांची संख्या |
|---|---|
| (एक) ३ लाखापेक्षा अधिक व ६ लाखापर्यंत | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी असेल ३ लाखापेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका - सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या ८५ पेक्षा अधिक होणार नाही. |

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ५ द्वारे खंड (ब अ) व (ब ब) दाखल केले.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम २४ द्वारे "महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम" (१९४७ चा ६१) कलम २ व ३ अनुसूची नोंद क्रमांक २८ नुसार १ मे १९६० पासून त्याच्या संक्षिप्त नावात सुधारणा करण्यात आली.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ (अ) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी दाखल केले.

**तक्ता**--चालू

| | लोकसंख्या | पालिका सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| (दोन) | ६ लाखापेक्षा अधिक व १२ लाखापर्यंत | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी असेल. ६ लाखापेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका - सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या ११५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (तीन) | १२ लाखापेक्षा अधिक व २४ लाखापर्यंत | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी असेल १२ लाखापेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका - सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या १४५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (चार) | २४ लाखापेक्षा अधिक | पालिका सदस्यांची किमान संख्या १४५ इतकी असेल. १ लाख इतक्या प्रत्येक अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या २२१ इतकी असेल. |

(ब) विहित करण्यात येईल अशा रीतीने महानगरपालिकेने नामनिर्देशित करावयाचे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेले, पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या संख्येतील पालिका सदस्य. ]

(३) पालिका सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्यांची संख्या व सीमा [1] [ राज्य निवडणूक आयुक्त ] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील. [2] [ म्हणजे ज्यायोगे, व्यवहार्य असेल तितपत, सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्रे होतील आणि प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या अगदी अलीकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार अदमासे तीच राहील. प्रत्येक प्रभाग फक्त एकाच पालिका सदस्यांची निवड करील.]

[3][ शक्य असेल तेथवर दोन पालिका-सदस्य परंतु दोन पेक्षा कमी नाहीत व तीन पेक्षा अधिक होणारे नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्रत्येक मतदाराला त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.]

[4][ **स्पष्टीकरण** –या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या "अलीकडच्या जनगणनेची आकडेवारी" या शब्द प्रयोगाचा अर्थ, –

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ (ब) (एक) द्वारे "राज्य शासनास" या शब्दाऐवजी दाखल केला.

२ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २ द्वारे "प्रत्येक प्रभाग ....... निवडून देण्यात येईल" या मजकुराऐवजी दाखल केले.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल केला.

४ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ५ (दोन) द्वारे स्पष्टीकरण जादा दाखल केले.

(अ) अंतिमत: प्रसिध्द झालेली अलीकडच्या जनगणनेची आकडेवारी असा असेल आणि अलीकडच्या जनगणनेची अंतिम आकडेवारी प्रसिद्ध होईपर्यंत त्याचा अर्थ अशा जनगणनेची प्रसिद्ध झालेली तात्पुरती आकडेवारी, असा असेल ; आणि

(ब) अलीकडच्या जनगणनेची संबंधित अंतिम किंवा तात्पुरती आकडेवारी उपलब्ध नसेल तेव्हा अलीकडच्या जनगणनेच्या लगतपूर्वी झालेल्या जनगणनेची संबंधित अंतिम आकडेवारी, असा असेल ]

[१] [ परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी
१९९५ चा सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर, पोट-कलम (३) अन्वये काढलेली कोणतीही
महा. ११. अधिसूचना, अशा अधिसूचनेच्या तारखेनंतर घेण्यात आलेली सार्वत्रिक निवडणूक व त्यानंतरच्या निवडणुका या व्यतिरिक्त अन्य निवडणुकांच्या बाबतीत परिणामकारक असणार नाही. ]

[२] [ * * * * * * * * ]

[३] [ आणखी असे की, पोट-कलम (३) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी तिचा मसुदा शासकीय राजपत्रात आणि ज्या रीतीने ही माहिती, अशा मसुद्यामुळे बाधा पोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या निदर्शनास आणता येईल अशा [४] [ राज्य निवडणूक आयुक्ताच्या] मते उत्कृष्ट असलेल्या अन्य रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे व त्या बरोबरच ज्या तारखेपर्यंत किंवा तारखेपूवी कोणतेही आक्षेप व सूचना स्वीकारल्या जातील ती तारीख आणि, ज्या तारखेनंतर मसुदा विचारात घेतला जाईल ती तारीख विनिर्दिष्ट करणारी नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे. ]

[५] [ (४) पोट-कलम (३) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सार्वत्रिक निवडणुकानंतर, एखाद्या शहराच्या क्षेत्राचा विस्तार करण्यात आल्यास विस्तारित क्षेत्राच्या लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जमेल तितक्या लवकर निवडणूक घेण्यात येईल आणि पोट-कलम (३) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह अशा निवडणुकांना लागू होतील.

परंतु या पोट-कलमान्वये केलेल्या विस्तारीत क्षेत्रासाठी नव्याने रचना केलेल्या प्रभागासह नगरपालिका क्षेत्रातील एकूण प्रभागाची संख्या ही पोट-कलम (२) खंड (क) मधील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या निवडणूक प्रभागांपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या प्रभागांची लोकसंख्या इतर प्रभागांच्या सरासरी लोकसंख्येपेक्षा अंशत: अधिक किंवा कमी होऊ शकते.

परंतु तसेच, या पोट-कलमान्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या पालिका सदस्यांचा पदावधी महानगरपालिकेच्या कालावधी एवढाच असेल.

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल केले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ (ब) (तीन) द्वारे दुसरे परंतुक व त्याचे स्पष्टीकरण आणि तिसरे परंतुक वगळले.

३ हे परंतुक सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ (ब) (तीन) अन्वये दाखल करण्यात आले.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ४८ (ब) (चार) अन्वये " राज्य शासनाच्या " या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

५ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३३ अन्वये पोट-कलम (४) व (५) दाखल करण्यात आले.

(५) महानगरपालिकेचा उर्वरित अवधी जर एका वर्षापेक्षा कमी असेल तर, पोट-कलम (४) अन्वये निवडणूक घेता येणार नाही.]

जागांचे आरक्षण. [१] [ **५-अ.** (१) (अ) महानगरपालिकेतील निवडणुकीद्वारे भरावयाच्या एकूण जागांमध्ये, राज्य निवडणूक आयोग विहित रीतीने ठरवून देईल इतक्या जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्ती आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतील ;

(ब) महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांचे त्या महानगरपालिकेमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, त्या महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिती अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल आणि अशा जागा महानगरपालिकेतील वेगवेगळ्या निवडणूक प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील ;

परंतु, अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या [२] [ एक-द्वितीयांश ] इतक्या जागा अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिति अनुसूचित जनजातीच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यास येतील ;

परंतु आणखी असे की, अनुसूचित जातींसाठी किंवा यथास्थिति, अनुसूचित जनजातींसाठी केवळ एक जागा राखून ठेवलेली असेल तर अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिति, अनुसूचित जनजातीच्या स्त्रियांसाठी कोणतीही जागा राखून ठेवण्यात येणार नाही. [३] [ * * * ]

(क) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या सत्तावीस टक्यांइतक्या असतील आणि अशा जागा महानगरपालिकेतील वेगवेगळ्या निवडणूक प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील ;

परंतु अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संस्थेच्या [४] [ एक-द्वितीयांश ] जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियासांठी राखून ठेवण्यात येतील ;

(ड) महानगरपालिकेमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या [५] [ एक-द्वितीयांश ] जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांसह) स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि अशा जागा महानगरपालिकेतील वेगवेगळ्या निवडणूक प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील.

[६] [(ई) खंड (क) ते खंड (घ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य निवडणूक आयुक्त काही कारणांमुळे सार्वत्रिक निवडणुकीनंतर प्रभागांच्या संख्येत बदल झाला आहे अशा महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग व महिला यांच्यासाठी आळीपाळीने राखीव प्रभाग निश्चित करण्याविषयीच्या सूचना आदेशाद्वारे काढील.]

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४९ द्वारे कलम ५-अ समाविष्ट केला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ (१) (क) द्वारे "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (ख) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) द्वारे "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ३ (३) द्वारे "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

६ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३४ द्वारे खंड (ई) समाविष्ट केला.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये करावयाचे जागांचे आरक्षण (स्त्रियांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त इतर) हे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर अंमलात असण्याचे बंद होईल.]

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

[1] [ **५-ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ]

२००१ चा महा. २३.

[2] [ * * * * ]

महानगरपालिकेची मुदत.

[3] [**६.** (१) प्रत्येक महानगरपालिका तिचे अगोदरच विसर्जन करण्यात आले नाही तर तिच्या पहिल्या सभेसाठी नेमून दिलेल्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत चालू राहील आणि त्यापेक्षा अधिक काळ चालू राहणार नाही.

(२) एखाद्या महानगरपालिकेचे तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी विसर्जन करण्यात आल्यानंतर रचना करण्यात आलेली महानगरपालिका ही, विसर्जित महानगरपालिका तिचे अशा प्रकारे विसर्जन झाले नसते तर पोट-कलम (१) अन्वये ज्या उर्वरित कालावधीसाठी चालू राहिली असती त्या उर्वरित कालावधीपर्यंत चालू राहील.]

पालिका सदस्यांचा पदावधी.

[4] [**६-अ.** पालिका सदस्यांचा पदावधी महानगरपालिकेच्या मुदतीबरोबर समाप्त होईल.

महानगरपालिकेची रचना करण्यासाठी निवडणूक.

**६-ब.** महानगरपालिकेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक, —

(क) कलम ६, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी ; किंवा

(ख) तिचे विसर्जन करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, पूर्ण करण्यात येईल ;

परंतु, विसर्जित महानगरपालिका ज्या उर्वरित कालावधीसाठी चालू राहिली असती तो कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल त्याबाबतीत, अशा कालावधीसाठी महानगरपालिकेची रचना करण्यासाठी या कलमान्वये कोणतीही निवडणूक घेणे आवश्यक असणार नाही.]

---

१ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४ द्वारे कलम ५-ब समाविष्ट केला.

२ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ द्वारे दोन्ही परंतुके वगळण्यात आले.

३ मूळ कलमाऐवजी हे कलम सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५० अन्वये दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये कलम ६-अ व ६-ब समाविष्ट करण्यात आले.

पालिका सदस्याने पदाचा राजीनामा देणे.

**७.** कोणत्याही पालिका सदस्यास कोणत्याही वेळी आयुक्तास लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि अशी नोटीस देण्यात आल्यावर, त्याचे पद नोटीशीच्या तारखेपासून रिकामे होईल.

**७-अ.** (१) [१][ * * * * * * * * * * ]

## नगरपालिका मतदार यादी

नगरपालिका मतदार यादी तयार करणे.

[२][**७-अ.** राज्य निवडणूक आयुक्त, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करील अशा तारखेस, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधानसभा मतदार यादीची राज्य निवडणूक आयुक्तांकडून, शहरातील निरनिराळ्या प्रभागांशी अनुरूप असलेल्या निरनिराळ्या भागात विभागणी करण्यात येईल; आणि अशा प्रकारे राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने विभागणी केलेल्या व अधिप्रमाणित केलेल्या मतदार यादीच्या प्रत्येक भागाची मुद्रित प्रत ही, प्रत्येक प्रभागासाठी प्रभाग यादी असेल. ]

**७-अ.** अ अ [३][ * * * * * * * * * * ]

**७-अ.** अ अ अ [३][ * * * * * * * * * ]

नगरपालिका मतदार यादीत नावनोंदणी करणे.

[४][**७-ब.** कोणत्याही प्रभाग यादीत ज्या व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीची नगरपालिका मतदार यादीत नावनोंदणी झाल्याचे मानण्यात येईल. ]

## मतदारांच्या व पालिका सदस्यांच्या अर्हता व अनार्हता

मत देण्यास अर्ह असलेल्या व्यक्ती.

[५][ ८. ज्या व्यक्तीचे नाव [६][ प्रभाग मतदारांच्या यादीत ] असेल अशा प्रत्येक व्यक्तीला प्रभाग निवडणुकीत मत देण्याचा हक्क आहे असे मानले जाईल, आणि ज्या व्यक्तीचे नाव उक्त यादीत नसेल अशा प्रत्येक व्यक्तीला मत देण्याचा हक्क नाही असे मानले जाईल. ]

मतदानाची रीत.

[७][ **८-अ.** निवडणुकीमध्ये मतपत्रिकेद्वारे किंवा ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्यात येईल आणि बदली व्यक्तीकडून देण्यात आलेली कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत.]

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५२ द्वारे कलम ७-अ. (१) वगळण्यात आले.

२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ५ द्वारे मूळ कलम ७-अ ऐवजी दाखल केले.

३ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ६ द्वारे कलम ७-अ.अ व कलम ७-अ.अ अ वगळण्यात आले.

४ हे कलम सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आले.

५ मूळ कलमाऐवजी कलम ८ हे सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आले.

६ सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम ८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ द्वारे कलम ८-अ समाविष्ट केला.

**९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन [१] [ ज्या व्यक्तीचे [२] [ वय, कोणत्याही सार्वजनिक निवडणुकी-करिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकाला एकवीस वर्षांहून कमी नसेल व जिचे ] नाव एखाद्या प्रभागासाठी मतदार म्हणून नगरपालिका मतदाराच्या यादीत नोंदवले असेल ], ती व्यक्ती पालिका सदस्य होण्यास आणि अशा प्रभागातून किंवा अन्य कोणत्याही प्रभागातून निवडून येण्यास अर्ह असेल. पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अर्हता.

(२) जी कोणतीही व्यक्ती पालिका सदस्य असण्याचे बंद होईल ती व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये अर्ह असल्यास, पालिका सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास पात्र असेल.

१९७१ चा महाराष्ट्र १३. १८६० चा ४५.

**१०.** (१) कलम १३, [३] [ * ] व ४०४ च्या तरतुदींच्या अधीन, कोणतीही व्यक्ती पुढील परीस्थितीत पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होईल :— पालिका सदस्य होण्यास अनर्हता.

[४] [ (अ-एक) महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या कलम ५ च्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी भारतीय दंड संहितेचे कलम १५३-अ किंवा कलम ५०५ चे पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये, शिक्षापात्र अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आली असेल :

परंतु अशी अनर्हता अशा, अपराधसिध्दिच्या तारखेपासून सहा वर्षांच्या मुदतीपर्यंत राहील ].

[५] [(अ-दोन) तिला —

(एक) राज्य विधानमंडळाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये अशा प्रकारे निरर्ह ठरवण्यात आलेले असेल ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीच्या वयाची एकवीस वर्षे पूर्ण झालेली असतील तर तिचे वय पंचवीस वर्षांपेक्षा कमी आहे या कारणावरून तिला निरर्ह ठरवण्यात येणार नाही ;

(दोन) महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये अशा प्रकारे निरर्ह ठरवण्यात आलेले असेल तर ; किंवा

(अ) नैतिक अध:पाताचा अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने तिला निरापराध ठरवलेले असेल तर - मात्र अशा अपराधसिद्धीच्या दिनांकापासून सहा वर्षांचा कालावधी उलटून गेलेला असेल तर ती गोष्ट वेगळी ; किंवा ]

परंतु, अशा शिक्षेची मुदत संपल्यावर, या खंडान्वये ओढवून घेतलेली अनर्हता समाप्त होईल ;

आणखी असे की, अशा शिक्षेची मुदत संपल्यामुळे अशा व्यक्तीस पालिका सदस्य म्हणून चालू राहण्याचा किंवा पालिका सदस्यांच्या चालू पदावधीच्या उर्वरित मुदतीत झालेल्या कोणत्याही पोट-निवडणुकीत निवडणुकीसाठी उभे राहण्याचा हक्क असणार नाही ;

(ब) ती अमुक्त नादार असेल ;

(क) ती आयुक्ताचे पद किंवा महानगरपालिकेच्या अधिकाराखालील कोणतेही अन्य लाभ, पद किंवा जागा धारण करत असेल ;

---

१ सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ७ द्वारे "ज्या व्यक्तीचे" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट केला.

३ हा मजकूर सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ अन्वये वगळण्यात आला.

४ हा खंड सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आला.

५ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५५ द्वारे खंड (अ) ऐवजी दाखल केले.

(ड) ती लायसन्स दिलेला सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंता, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक किंवा नळकारागीर असेल किंवा अशी कोणतीही लायसन्स दिलेली व्यक्ती जिची सदस्य असेल त्या व्यवसाय संस्थेची ती सदस्य असेल ;

(ई) शहराच्या सीमांमध्ये अधिकारिता असलेले कोणतेही न्यायिक पद धारण करत असेल ;

(फ) पोट-कलम (२) च्या तरतुदीच्या अधीन, तिचा महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात किंवा महानगरपालिकेच्या नोकरीत तिचा स्वत:चा किंवा तिच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल ;

(ग) ज्यात महानगरपालिकेचा, आयुक्ताचा किंवा परिवहन व्यवस्थापकाचा हितसंबंध असेल किंवा ज्याच्याशी तो संबंधित असेल अशा कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत, तिला, पालिका सदस्य म्हणून निवडून आल्यावर, व्यावसायिक नात्याने व्यक्तीश: किंवा जिचा ती भागीदार आहे किंवा जिने तिला व्यावसायिक नात्याने नेमले आहे अशा व्यावसायिक संस्थेच्या नावाने ठेवून घेतले असेल किंवा नेमले असेल ; किंवा

(ह) विश्वस्त या नात्याव्यतिरिक्त अन्य नात्याने महानगरपालिकेस देय असलेली कोणत्याही प्रकारची थकबाकी देण्याविषयी आयुक्ताने याबाबतीत खास नोटीस बजावल्यानंतर तीन महिन्याच्या आत ती भरण्यास ती कसूर करील ;

[१] [(आय) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर : २००० चा

परंतु महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश "असा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे) दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही. तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही : महा. ४३.

परंतु आणखी असे की, असा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण** — या खंडाच्या प्रयोजनार्थ —

(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) "मूल" यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही. ]

[२] [(ज) राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा सदस्य झाला असेल ;

परंतु विद्यमान सदस्यांच्या सदस्यत्वावर असा पालिका सदस्य म्हणून असलेला त्याचा चालू पदावधी समाप्त होईपर्यंत या खंडातील कोणत्याही गोष्टींचा परिणाम होणार नाही ;

परंतु आणखी असे की, अशा पालिका सदस्याने दिनांक ७ ऑक्टोबर २००१ पासून २० ऑक्टोबर २००१ या महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २००१ च्या प्रसिद्धीच्या दिनांकापर्यंत कालावधीत केलेली कोणतीही कारवाई वैधरीत्या करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत या खंडान्वये त्याला अनर्ह ठरविण्यात आलेले होते केवळ याच कारणावरून अशा कारवाईस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही. ] २००१ चा महा. अध्या. ३१.

१ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३ द्वारे खंड (आय) समाविष्ट केला.

२ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ द्वारे खंड (ज) समाविष्ट केले.

[1] [(१-१-अ) जर, एखादा पालिका सदस्य किंवा एखादी व्यक्ती, महापौर किंवा यथास्थिति, उप महापौर हे पद धारण करीत असताना किंवा जेव्हा ती महापौर अथवा उप महापौर हे पद धारण करीत होती त्यावेळी तिचे पदीय कर्तव्य पार पाडताना तिने केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तनाबद्दल दोषी असल्याचे आढळून आल्यास, राज्य शासनास, अशा पालिका सदस्यास अथवा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर.--

(अ) अशा पालिका सदस्यास त्याच्या पालिका सदस्य म्हणून असलेल्या उर्वरित कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरविता येईल ; आणि तसेच अशा निरर्हतेच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरविता येईल ;

(ब) अशा व्यक्तीस अशा निरर्हतेच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरविता येईल.

[2] [(१-अ) कोणतीही व्यक्ती, आपल्या पदावधीत कोणत्याही वेळी, "महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण
१९८७ चा सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६" अन्वये पालिका सभासद होण्याला अनर्ह ठरली तर ती पालिका
महा. २०. सभासद होण्यास अनर्ह ठरेल. ]

[3] [[4] [ (१-ब) * * * * * *

(१-क) * * * * * *]

(१-ड) जर पालिका सदस्याने, स्वत: त्याच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा/ त्याच्या अवलंबिताने या
१९६६ चा अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या किंवा उक्त अधिनियमाखाली
महा. ३७. करण्यात आलेल्या नियमाच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचा भंग करून कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत संरचनात्मक बांधकाम केले असेल किंवा करीत असेल किंवा असे बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंवा पालिका सदस्य या नात्याने मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यास कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असेल तर अशा पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल अशी अनर्हता उक्त अधिनियमाच्या तरतुदीन्वये संबंधित प्राधिकाऱ्याने अशी संरचना बेकायदेशीर किंवा अनधिकृत असल्याचे घोषित केल्याच्या दिनांकापासून किंवा यथास्थिति सक्षम प्राधिकाऱ्याविरुद्ध पालिका सदस्याने हस्तक्षेप किंवा अडथळा केल्याच्या दिनांकापासून पालिका सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत असेल. ]

[5] [ (१-ई) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने.--

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे; आणि

(ब) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही;

तर राज्य निवडणूक आयोग **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील. आणि अशी व्यक्ती अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(१-फ) राज्य निवडणूक आयोगास कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१ई) खालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.]

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १६ द्वारे (१-१-अ) दाखल केले.

२ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ११ च्या अनुसूचीद्वारे पोट-कलम (१-अ) समाविष्ट केले.

३ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३५ द्वारे पोट-कलम (१-ब) (१-क) व (१-ड) समाविष्ट केले.

४ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५ द्वारे पोट-कलम (१-ब) व (१-क) वगळले.

५ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३ द्वारे (१-ई) व (१-फ) ही पोट-कलमे दाखल केली.

(२) कोणत्याही व्यक्तीने —

(अ) तिला नगरपालिकेकडून निवृत्तीवेतन मिळते ;

[१] [ (अअ) तिचा कोणताही नातलग महानगरपालिकेत नोकरीस आहे किंवा महानगरपालिकेने किंवा तिच्यावतीने त्या नातलगास आपला अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून नोकरीस लावले आहे ;]

(ब) (एक) कोणत्याही जमिनीच्या पट्ट्यात, विक्रीत, अदलाबदलीत किंवा खरेदीत ;

(दोन) पैशाच्या कर्जासाठी केलेल्या कोणत्याही करारात किंवा केवळ पैसे चुकते करण्यासाठी दिलेल्या कोणत्याही तारणात ;

(तीन) महानगरपालिकेच्या कामकाजासंबंधी ज्यात कोणतीही जाहिरात देण्यात आली असेल अशा कोणत्याही वर्तमानपत्रात ;

(चार) महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताबरोबर किंवा परिवहन व्यवस्थापकाबरोबर जो करार करील किंवा त्याच्याकडून नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ * अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेत ; १९२५ चा

(पाच) ती ज्या कोणत्याही वस्तुचा नियमितपणे व्यापार करत असेल त्या वस्तुची कोणत्याही एका सरकारी वर्षात दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या किमतीपर्यंत महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास अधूनमधून करण्यात येणाऱ्या विक्रीत ; किंवा मुंबई ७.

(सहा) कोणत्याही एका सरकारी वर्षात एकूण पाचशे रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेपर्यंत कोणतीही वस्तू महानगरपालिकेस अधूनमधून भाड्याने देण्यात किंवा महानगरपालिकेकडून भाड्याने घेण्यात,

तिचा कोणताही भाग किंवा हितसंबंध आहे ;

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही जागेचा राहण्यासाठी भाडेकरी म्हणून ती भोगवटा करते ; किंवा

(क) परिवहन समितीचा सदस्य म्हणून तिला वाहनखर्च मिळतो ;

केवळ याच कारणावरून पोट-कलम (१), खंड (य) अन्वये अनर्हता ओढवून घेतली आहे असे मानले जाणार नाही.

पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यास असमर्थता.

**११.** जर कोणताही पालिका सदस्य आपल्या पदावधीत कोणत्याही वेळी —

(अ) कलम १० च्या तरतुदीन्वये पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होईल ;

(ब) तात्पुरता आजार किंवा महानगरपालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वत: गैरहजर राहील ;

(क) कोणत्याही कारणामुळे— मग ते महानगरपालिकेने मान्य केलेले असो वा नसो— लागोपाठ सहा महिन्याच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वत: गैरहजर राहील, किंवा हजर राहण्यास असमर्थ होईल ; किंवा

(ड) ज्या बाबतीत त्याच्या स्वत:चा किंवा आपल्या भागीदारांमार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कलम १०, पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेला कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल किंवा ज्याबाबतीत त्याचा पक्षकाराच्या, प्रकर्त्याच्या किंवा अन्य व्यक्तींच्या वतीने व्यवसाय दृष्ट्या हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी चर्चा चालू असताना त्यावेळी मत देऊन किंवा तीत भाग घेऊन किंवा अशा बाबीसंबंधी कोणताही प्रश्न विचारून महानगरपालिकेचा सदस्य किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य या नात्याने काम करील तर, त्याचे पालिका सदस्य म्हणून पद धारण करणे बंद होईल.

---

१ सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४ अन्वये खंड (अअ) दाखल करण्यात आले.

* आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महा. २४) पहा.

**१२.** (१) एखाद्या पालिका सदस्याचे कलम ११ अन्वये पालिका सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद झाले आहे किंवा काय याविषयी कोणतीही शंका किंवा वाद उद्‌भवल्यास अशा पालिका सदस्यास किंवा कोणत्याही अन्य पालिका सदस्यास तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठवता येईल, आणि महानगरपालिकेने, विनंती केल्यास, आयुक्ताने तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविला पाहिजे.

अनर्हते-संबंधीच्या प्रश्नांचा निर्णय न्यायाधीशाने करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये असा प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविण्यात आल्यावर न्यायाधीश या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या रीतीने चौकशी करून अशा पालिका सदस्यांचे पद धारण करण्याचे बंद झाले आहे, असा निर्णय देईपर्यंत असा पालिका सदस्य अनर्ह झाला आहे असे मानले जाणार नाही.

[१] [ **१३.** (१) (अ) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदवधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर, राज्य शासनास, स्वत:हून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल.

पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.

(ब) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास, एकूण पालिका सदस्यापैकी कमीत कमी तीन-चतुर्थांश पालिका सदस्यांनी मत देऊन पाठिंबा दिलेल्या, महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या पालिका सदस्याला पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास, अशी शिफारस किंवा यथास्थिती, आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही.

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वत:हून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे देण्यात येत आहे.

(४) या कलमान्वये पालिका सदस्याला काढून टाकण्याबाबत आणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास, अशा पालिका सदस्यास आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरून आयुक्तास न्यायाधीशाकडे त्याचा निर्देश (reference) करता येईल.]

१ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४ द्वारे मूळ कलमऐवजी कलम १३ दाखल केले.

## पालिका सदस्यांची निवडणूक

राज्य निवडणूक आयोग.

[1][**१४.** (१) महानगरपालिकेच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यासाठी निर्देश देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे आणि अशा सर्व निवडणुका घेणे, ही कामे राज्य निवडणूक आयुक्ताकडे निहित असतील.

(२) राज्य निवडणूक आयुक्ताला, त्याच्या अधिकारांपैकी आणि कामांपैकी कोणतेही अधिकार व कामे, आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाच्या, उपजिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा महानगरपालिकेच्या, सहाय्यक पालिका आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(३) हा अधिनियम किंवा नियम या अन्वये किंवा मतदार याद्या करणे आणि महानगरपालिकेच्या निवडणुका घेणे यासाठी नेमण्यात आलेले किंवा विशेष रीतीने नेमण्यात आलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी राज्य निवडणूक आयुक्तांच्या देखरेखीखाली निदेशानुसार व नियंत्रणाखाली काम करतील.

(४) या अधिनियमामध्ये आणि नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य निवडणूक आयुक्ताला न्याय आणि नि:पक्षपाती निवडणुकासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश अथवा निदेश काढता येतील.]

तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी निदेश देण्याचा राज्य निवडणूक आयुक्ताचा अधिकार.

[2][ **१४-अ.** निवडणुकीच्या वेळी मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयुक्त, त्यास योग्य वाटतील असे निदेश, मतदान केंद्राध्यक्षांना देऊ शकेल आणि अशा निदेशामध्ये मतदारांना, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या तरतुदीअन्वये देण्यात आलेली छायाचित्रांसहित ओळखपत्रे, त्यांनी मतदानाच्या वेळी सादर करण्याच्या सूचनांचाही समावेश असेल. ] १९५१ चा ४३.

नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भरावयाच्या.

**१५.** (१) पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीने पदाचा अस्वीकार केला असेल किंवा असा पालिका सदस्य त्याच्या पदावधीत मरण पावला असेल, त्याने राजीनामा दिला असेल, तो अनर्ह ठरला असेल किंवा त्याला पदावरून काढून टाकले असेल त्या प्रसंगी त्यांची जागा ही नैमित्तिक रिकामी जागा आहे असे मानले जाईल आणि अशी रिकामी झालेली जागा, सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर [3][ * * * ] त्या जागी एखाद्या व्यक्तीची निवडणूक करून भरली पाहिजे व अशा व्यक्तीने ज्या पालिका सदस्यांच्या जागी ती निवडूण आली असेल त्या पालिका सदस्याने ते पद रिकामे झाले नसेल तर ते जितक्या अवधीपर्यंत धारण केले असेल तितक्याच अवधीपर्यंत पद धारण केले पाहिजे :

परंतु, जागा रिकामी झालेल्या तारखेपासून [4][ * * * ] सहा महिन्यांच्या आत सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या असतील तर, अशी नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेता कामा नये.

[5][ * * * * * ]

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५६ द्वारे मूळ कलम १४ ऐवजी दाखल केला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ५ द्वारे नवीन कलम १४ अ समाविष्ट केले.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५७ (अ) द्वारे "व कोणत्याही बाबतीत" या मजकुराने सुरू होण्यारा व "तीन महिन्याच्या आत" हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाचा कलम ५७ (ब) द्वारे पहिल्या परंतुकातील "किंवा यथास्थिति, दुसऱ्या परंतुकात निर्दिष्ट केलेल्या तारखेच्या समाप्तीनंतरच्या" हा मजकूर वगळला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ५७ (क) द्वारे दुसरे परंतुक वगळले.

(२) कलम १८ च्या तरतुदी नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीस लागू होतील.

**१६.** (१) पालिका सदस्य म्हणून निवडून आल्याचे जाहीर करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अर्हतेसंबंधी विवाद उत्पन्न करण्यात आला असेल, किंवा [१] [ राज्य निवडणूक आयुक्ताने ] नामनिर्देशन पत्र आयोग्य रीतीने फेटाळल्यामुळे किंवा एखादे मत अयोग्य रीतीने स्वीकारल्यामुळे किंवा नाकारल्यामुळे किंवा निवडणुकीच्या कामकाजातील महत्त्वाच्या नियमबाह्यतेमुळे, भ्रष्टाचारामुळे किंवा निवडणुकीच्या निकालावर महत्त्वाचा परिणाम घडवून आणणाऱ्या कोणत्याही अन्य गोष्टीमुळे निवडणुकीच्या विधिग्राह्यतेविषयी हरकत घेण्यात आली असेल तेव्हा, नगरपालिका मतदारांच्या यादीत जिचे नाव नोंदलेले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी अशा विवादाचा किंवा हरकतीचा निर्णय करण्यासाठी न्यायाधीशांकडे अर्ज करता येईल. निवडणूक अर्ज.

(२) गैरवाजवी दडपण आणण्याचे किंवा लाचलुचपतीचे अनेक प्रकार घडल्यामुळे निवडणूक खुल्या वातावरणात झाली नाही असे [२] [ राज्य निवडणूक आयुक्तास ] सकारण वाटत असेल तर, त्यास लेखी आदेशाद्वारे निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत कोणत्याही वेळी निवडून आलेल्या उमेदवारांची किंवा उमेदवाराची निवडणूक निरर्थक आहे, असे जाहीर करण्यासाठी न्यायाधीशांकडे अर्ज करण्याकरिता [३] [ आयोगाच्या ] कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

[४] [(२-क) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या न्यायाधीशाकडे सादर केलेल्या निवडणूक विनंती अर्जाद्वारे असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत कोणत्याही महानगरपालिकेच्या कोणत्याही निवडणुकीस हरकत घेता येणार नाही आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या न्यायाधीशाव्यतिरिक्त इतर कोणताही न्यायाधीश अशा निवडणुकीच्या संबंधातील कोणताही विवाद दाखल करून घेणार नाही. ]

(३) या अधिनियमान्वये किंवा त्यानुसार तरतूद केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर न्यायाधीशाने पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये करण्यात आलेल्या अर्जाचा निर्णय केला पाहिजे.

**स्पष्टीकरण** .— या कलमाच्या प्रयोजनासाठी —

(१) "भ्रष्टाचार" म्हणजे पुढीलपैकी कोणतेही एक कृत्य :—

(अ) उमेदवाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही व्यक्तीस निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्यास किंवा न राहण्यास किंवा आपली उमेदवारी मागे घेण्यास त्या व्यक्तीस किंवा निवडणुकीच्या वेळी मत देण्यास किंवा मत न देण्यास मतदारास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रवृत्त करण्याच्या हेतूने किंवा त्या व्यक्तीस, ती निवडणुकीत अशा रीतीने उभी राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा तिने आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल किंवा मतदारास मत दिल्याबद्दल किंवा न दिल्याबद्दल बक्षीस म्हणून कोणताही मोबदला देणे, देऊ करणे किंवा तो देण्याचे अभिवचन देणे-मग ते पैशाच्या स्वरूपात असो किंवा अन्य स्वरूपात असो ;

१ वरील अधिनियमाच्या कलम ५८ (अ) द्वारे "आयुक्ताने" या शब्दाऐवजी दाखल केले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५८ (ब) (एक) द्वारे "राज्य शासनास" या मजकुराऐवजी दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम ५८ (ब) (दोन) द्वारे "कोणत्याही अधिकाऱ्यांस" या मजकुरापूर्वी समाविष्ट केले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५८ (क) द्वारे पोट-कलम (२-अ) समाविष्ट केले.

(ब) उमेदवाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने, अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणताही मतदानाचा हक्क स्वेच्छापूर्वक वापरला जाण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करणे ; यात कोणत्याही प्रकारची इजा करण्याच्या धमकीचा उपयोग करणे किंवा दैवी अवकृपेची किंवा पाप लागण्याची भीती निर्माण करणे किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे या गोष्टींचा समावेश होतो ; परंतु त्यात सार्वजनिक धोरण जाहीर करणे किंवा सार्वजनिक स्वरूपाची कामे करण्याबद्दल वचन देणे किंवा लोकांच्या कायदेशीर हक्कांमध्ये हस्तक्षेप करण्याचा उद्देश न ठेवता केवळ कायदेशीर हक्कांचा वापर करणे या गोष्टींचा समावेश होत नाही;

(क) उमेदवाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने, अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने, कोणत्याही व्यक्तीने एखाद्या व्यक्तीस हयात किंवा मृत अशा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावाने किंवा खोट्या नावाने किंवा एखाद्या व्यक्तीस तिने त्याच किंवा अन्य कोणत्याही प्रभागात अगोदरच मत दिल्यामुळे तिला मत देण्याचा हक्क नसेल तेव्हा तिच्या स्वत:च्या नावाने मतपत्रिकेसाठी अर्ज करावयास लावणे किंवा त्या कामी अपप्रेरणा देणे किंवा तसे करण्याचा प्रयत्न करणे ;

(ड) उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने कोणत्याही व्यक्तीने मतदानाच्या वेळात मतदान केंद्रातून मतपत्रिका घेऊन जाणे ;

(ई) उमेदवाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने कोणत्याही अन्य व्यक्तीने, जे खोटे आहे असे तिला वाटते किंवा जे खरे आहे असे तिला वाटत नाही आणि जे त्या उमेदवाराच्या निवडणुकीच्या यशावर प्रतिकूल परिणाम व्हावा या हेतुने केले आहे असे कोणत्याही उमेदवाराच्या वैयक्तिक चारित्र्यासंबंधी किंवा वर्तनासंबंधी कोणतेही निवेदन प्रसिद्ध करणे ;

(फ) जी व्यक्ती उमेदवार नाही किंवा त्याचा अभिकर्ता नाही किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मूक संमतीने काम करणारी व्यक्ती नाही अशा व्यक्तीने परिच्छेद (अ), (ब), (ड) व (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृत्ये करणे ;

(ग) एखाद्या व्यक्तीने निवडणुकीच्या वेळी हयात किंवा मृत अशा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावाने किंवा अन्य कोणत्याही प्रभागात अगोदरच मत दिल्यामुळे तिला मत देण्याचा हक्क नसेल तेव्हा, तिच्या स्वत:च्या नावाने मतपत्रिकेसाठी अर्ज करणे ; किंवा

(ह) परिच्छेद (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करण्याच्या किंवा न करण्याच्या हेतूने किंवा बक्षीस म्हणून त्यात वर्णन केलेल्या प्रकारचा कोणताही मोबदला स्वीकारणे किंवा स्वीकारण्याचे कबूल करणे ;

(२) एखादा भ्रष्टाचार क्षुल्लक व मर्यादित स्वरूपाचा होता व त्यामुळे निवडणुकीच्या निकालावर प्रतिकूल परिणाम झाला नाही आणि अन्य सर्व बाबतीत निवडणुकीत उमेदवाराकडून किंवा त्याच्या कोणत्याही अभिकर्त्याकडून कोणताही भ्रष्टाचार घडला नाही व असा भ्रष्टाचार उमेदवाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या मंजुरीवाचून किंवा त्याच्या मूक संमती वाचून किंवा त्याच्या आदेशांविरुध्द झाला आणि उमेदवाराने व त्याच्या अभिकर्त्यांनी निवडणुकीच्या वेळी भ्रष्टाचार होऊ नये म्हणून योग्य ते सर्व उपाय योजले होते, याबाबत न्यायाधीशाचे समाधान झाले तर, असा भ्रष्टाचार हा, निवडून आलेल्या उमेदवाराच्या हिताच्या दृष्टीने करण्यात आला होता, असे मानले जाणार नाही.

**१७.** [ भ्रष्टाचार केल्याबद्दल मतदारांच्या अनर्हता ] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ७ अन्वये वगळण्यात आले.

**१८.** (१) कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी किंवा नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी घेतलेल्या निवडणुकीच्या वेळी कोणताही पालिका सदस्य निवडून आला नसेल किंवा आवश्यक त्या संख्येइतके पालिका सदस्य निवडून आले नसतील किंवा या अधिनियमान्वये कोणत्याही किंवा सर्व पालिका सदस्यांची निवडणूक रद्द ठरवण्यात आली असेल आणि अशा पालिका सदस्यांच्या किंवा सदस्यांच्या जागी निवडून आल्याचे मानता येईल असा कोणताही अन्य उमेदवार नसेल किंवा असे कोणतेही अन्य उमेदवार नसतील तर [1][ राज्य निवडणूक आयुक्त ] नव्याने निवडणूक घेण्यासाठी दुसरा एखादा दिवस नेमील व तद्नुसार नव्याने निवडणूक घेण्यात येईल. निवडणूक निष्फळ झाली किंवा रद्द ठरवण्यात आली तर अनुसरावयाची कार्यपध्दत.

(२) या कलमान्वये निवडून आलेला पालिका सदस्य हा, कलम १५ अन्वये नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी निवडून आला आहे असे मानण्यात येईल.

**१९.** [2][ (१) पोट-कलम (१अ) च्या तरतुदींच्या अधीन राहून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात येणाऱ्या पहिल्या बैठकीत पालिका सदस्यांमधून एकाची महापौर म्हणून व दुसऱ्याची उपमहापौर म्हणून निवड करील. महापौर व उपमहापौर यांचा पदावधी अडीच वर्षे इतका असेल : महापौर व उपमहापौर.

परंतु महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २००० अंमलात आला असल्याच्या दिनांकापासून महापौर व उपमहापौर यांच्या पदावधीचे नियमन पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(क) महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या सभेपासून ज्यांनी त्यांच्या मुदतीचे पहिले वर्ष पूर्ण केले असेल, परंतु अद्याप दोन वर्षे पूर्ण केलेली नसतील अशा महानगरपालिकांच्या बाबतीत महापौर व उपमहापौर यांचा पदावधी, प्रत्येकी दोन वर्षांचा असेल ;

(ख) इतर सर्व बाबतीत, उक्त दिनांकास पदावर असतील अशा महापौर व उपमहापौर यांचा पदावधी निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या पदावधीपर्यंत वाढविण्यात येईल आणि त्यांचा पदावधीबरोबरच समाप्त होईल :

परंतु आणखी असे की, महापौराचे पद आळीपाळीने राखून ठेवण्याच्या नामावलीमध्ये, महापौराच्या या वाढवलेल्या पदावधीच्या दृष्टीने सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल .]

[3][ (१क) महानगरपालिकेच्या महापौराचे पद अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, स्त्रिया व नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी विहित पद्धतीने आळीपाळीने राखून ठेवण्यास येईल. ]

[4][ (२ब) अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेषमागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.]

(२) महापौर व उपमहापौर हे पोट-कलम (१) अन्वये नवीन महापौर व नवीन उपमहापौर निवडण्यात येईपर्यंत पद धारण करतील आणि ज्यावर्षी सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या असतील त्या वर्षी निवडणुकांच्या निकालावरून ते पालिका सदस्य म्हणून निवडून आले नसले तरीही ते असे पद धारण करतील.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५९ द्वारे "आयुक्त" या मजकुराऐवजी दाखल केले.

२ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी दाखल केले.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६० (ब) द्वारे पोट-कलम (१-अ) समाविष्ट केले.

४ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ६ द्वारे पोट-कलम (२-ब) दाखल केले.

(३) निवृत्त होणारा महापौर किंवा उप महापौर हा दोहोंपैकी कोणत्याही पदावर पुन्हा निवडून येण्यास पात्र असेल.

(४) उप महापौर यास कोणत्याही वेळी महापौर यास लेखी सूचना देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि महापौर यास कोणत्याही वेळी महानगरपालिकेस लेखी सूचना देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल.

(५) महापौर किंवा उप महापौर यांच्या पदाची कोणतीही नैमित्तिक जागा रिकामी झाल्यास, महानगरपालिकेने अशी जागा रिकामी झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आपल्या पालिका सदस्यांपैकी एकाची निवड केली पाहिजे आणि अशा रीतीने निवडून आलेल्या प्रत्येक महापौराने किंवा उप महापौराने ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक झाली असेल, त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर जितक्या अवधीपर्यंत पद धारण करण्याचा हक्क प्राप्त झाला असता तितक्याच अवधीपर्यंत पद धारण केले पाहिजे.

[१] [ (६) जर महापौर किंवा उप महापौर या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या लागोपाठ दोन सभा बोलावण्यात कसूर करील तर, त्याला राज्य शासन पदावरून दूर करू शकेल, आणि अशा रितीने दूर केलेला महापौर किंवा उप महापौर, त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत, महापौर किंवा यथास्थिति, उप महापौर म्हणून पुन्हा निवडून येण्यास किंवा पुनर्नियुक्ती केली जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, अशा महापौराला किंवा उप महापौराला आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज त्याला पदावरून दूर करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये महापौर किंवा उप महापौर याला पदावरून दूर केल्यामुळे त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत तो पालिका सदस्य म्हणून असण्याचे चालू राहण्यास बाधा येणार नाही.]

सभागृहाचा नेता.

[२] [१९-एक अ (१) जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या पक्षाचा त्यावेळी नेता असेल आणि महापौराकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल तो सभागृहाचा नेता असेल.

**स्पष्टीकरण** —जेव्हा एकसमान संख्याबळ असलेले दोन सत्ताधारी पक्ष असतील तेव्हा महापौर पक्षाचा दर्जा लक्षात घेऊन अशा पक्षामधून कोणत्याही एका पक्षातील नेत्याला सभागृहाचा नेता म्हणून मान्यता देईल.

(२) सभागृहाच्या नेत्याला मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमांद्वारे तरतूद केल्यानुसार मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.

विरोधी पक्षनेता.

१९-एक-अ अ (१) जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या विरोधी पक्षाचा त्यावेळी नेता असेल आणि महापौराकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल जो विरोधी पक्षनेता असेल.

**स्पष्टीकरण** — जेव्हा एकसमान संख्याबळ असलेले दोन किंवा अधिक विरोधी पक्ष असतील तेव्हा महापौर, पक्षाचा दर्जा लक्षात घेऊन अशा पक्षामधून कोणत्याही एका पक्षातील नेत्याला विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता देईल.

(२) विरोधी पक्षनेत्याला मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमांद्वारे तरतूद केल्यानुसार मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.]

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १७ द्वारे मूळ पोट-कलम (६) दाखल केले.

२ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३६ द्वारे कलम १९ एक-अ व १९ एक-अ अ समाविष्ट केले.

### [1] [ मानधन, फी व भत्ते

**१९-अ.** (१) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, महानगरपालिकेस या कलमान्वये महानगरपालिकेने केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल असे मानधन, फी किंवा अन्य भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील. मानधन, फी किंवा भत्ते.

[2] [(२) महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निर्धारित करतील एवढी रक्कम दरवर्षी अतिथ्य भत्ता म्हणून महापौरांकडे सुपूर्द केली पाहिजे.]

(३) कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या पालिका सदस्याने उपरोक्त असे कोणतेही मानधन, फी किंवा भत्ता घेतल्यामुळे कोणतीही व्यक्ती पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा त्याप्रमाणे असण्यास अनर्ह ठरणार नाही.

### स्थायी समिती

**२०.** (१) स्थायी समितीत [3] [ सोळा ] पालिका सदस्य असतील. स्थायी समितीची रचना.

(२) महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणुकांनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी [3] [ सोळा ] व्यक्तींची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

(३) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील :

परंतु, सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतील तेव्हा, स्थायी समितीचे जे सदस्य पदावर असतील ते सर्व पोट-कलम (२) अन्वये नवीन समितीची निवडणूक झाल्यावर आपल्या पदावरून निवृत्त होतील.

(४) पोट-कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एका वर्षाने पोट-कलम (३) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोट-कलम (३) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरवील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्या टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्ती जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील :

परंतु, पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्यांच्या बाबतीत, या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी त्याच्या पदाची मुदत त्याच्या फेरनेमणुकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(५) महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

(६) जो कोणताही पालिका सदस्य स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल तो पुन्हा नेमला जाण्यास पात्र असेल.

**२१.** (१) स्थायी समितीने कलम २०, पोट-कलम (२) अन्वये तिच्या नेमणुकीनंतर, तिच्या पहिल्या सभेत आणि त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी त्याच महिन्यात तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यांपैकी एकाची सभापती म्हणून नेमणूक केली पाहिजे. स्थायी समितीच्या सभापतीची नेमणूक.

(२) सभापतीने आपल्या उत्तराधिकाऱ्याची पोट-कलम (१) अन्वये नेमणूक होईपर्यंत पद धारण केले पाहिजे, परंतु तो पुन्हा नेमला जाण्यास पात्र असेल.

---

१ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८० याच्या कलम २ द्वारे शीर्ष व कलम १९-अ समाविष्ट केले.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १२ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी दाखल केले.

३ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १५ द्वारे "बारा" या मजकुराऐवजी दाखल केले.

(३) पोट-कलम (१) व (२) च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सभापती हा समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद झाल्याबरोबर त्याने आपले पद सोडून दिले पाहिजे.

(४) सभापतींच्या पदाची कोणतीही नैमत्तिक जागा रिकामी झाल्यास स्थायी समितीने अशी जागा रिकामी झाल्यानंतर सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी एका सदस्याची नेमणूक केली पाहिजे आणि अशा रीतीने नेमलेला प्रत्येक सभापती ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या अवधीपर्यंत पद धारण केले असते त्याच अवधीपर्यंत पदावर राहील.

[१] [* (५) जर कोणत्याही कारणासाठी स्थायी समितीने पोट-कलम (१) किंवा (४) अन्वये कलम २०, पोट-कलम (२) खाली तिच्या नेमणुकीच्या तारखेपासून किंवा त्या कलमाच्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निम्म्या सदस्यांच्या निवृत्तीच्या तारखेनंतरच्या तारखेपासून किंवा यथास्थिति सभापतीच्या पदाची कोणतीही नैमत्तिक जागा रिकामी झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत सभापतींची नेमणूक केली नाही तर उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेकडून उक्त तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत बोलवण्यात आलेल्या व भरलेल्या विशेष सभेत स्थायी समितीच्या सदस्यांमधून सभापतींची नेमणूक करण्यात आली पाहिजे. अशा सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांच्या बहुमताने त्या प्रश्नांचा निर्णय करण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल व तो त्याचा वापर करील अशा रीतीने नेमलेला प्रत्येक सभापती स्थायी समितीने नेमलेला सभापती ज्या अवधीपर्यंत पदावर राहिला असता त्याच अवधीपर्यंत पदावर राहील.]

स्थायी समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांची जागा रिकामी होणे.

**२२.** स्थायी समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजारी किंवा समितीने मान्य केलेले अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य कारणामुळे लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील किंवा कोणत्याही कारणामुळे —मग ते समितीने मान्य केलेले असो वा नसो —लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

---

१ सन १९६८ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ अन्वये पोट-कलम (५) दाखल करण्यात आले.

* सन १९६८ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ चे पोट-कलम (२) पुढीलप्रमाणे आहे :— "(२) रचना करण्यात आलेल्या आणि कोणत्याही कारणासाठी ३० ऑगस्ट १९६८ पूर्वी सभापतींची नेमणूक करण्यात आली नसेल अशा स्थायी समितीच्या बाबतीत, या अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या तरतुदी, तीस दिवसांचा कालावधी अशा तारखेपासून मोजण्यात येईल या फेरफाराच्या अधीन, परिणामक असतील."

**२३.** स्थायी समितीचा सदस्य म्हणून नेमलेल्या पालिका सदस्याने पदाचा स्वीकार न केल्यास किंवा उक्त समितीचा सदस्य मरण पावल्यास, त्याने राजीनामा दिल्यास किंवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी तो काम करण्यास असमर्थ झाल्यास किंवा कलम २२ अन्वये त्याची जागा रिकामी झाल्यास किंवा तो पालिका सदस्य असण्याचे बंद झाल्यास, अशी रिकामी झालेली जागा, त्या जागी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि अशी व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण करण्याचा हक्क असता त्या मुदतीपर्यंत सदस्य म्हणून पद धारण करील.

स्थायी समितीतील नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भरावयाच्या.

**२४.** (१) स्थायी समितीस, तिच्या सभेस उपस्थित असलेल्या तिच्या सदस्यांपैकी कमीतकमी दोन-तृतीयांश सदस्यांनी पारित केलेल्या ठरावाद्वारे कलम ३० अन्वये नेमलेली कोणतीही विशेष समिती ज्या बाबींचा विचार करण्यास सक्षम असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये वेळोवेळी अशा समितीकडे सोपवता येतील किंवा अशा कोणत्याही समितीकडे अशी बाब निकालात काढण्याकरिता किंवा त्यावर प्रतिवृत्त सादर करण्याकरता पाठवता येईल आणि अशा प्रत्येक विशेष समितीने स्थायी समितीकडून तिला याबाबत वेळोवेळी जे कोणतेही अनुदेश देण्यात येतील ते पाळले पाहिजेत.

स्थायी समितीस विशेष समितीकडे किंवा उप-समितीकडे अधिकार प्रत्यायोजित करता येतील.

परंतु, स्थायी समितीने अशा प्रत्येक ठरावाचे प्रतिवृत्त महानगरपालिकेकडे शक्य तितक्या लवकर पाठविले पाहिजे आणि महानगरपालिकेस असा ठराव कोणत्याही वेळी रद्द करता येईल.

(२) स्थायी समितीस नियमांच्या अधीन राहून याबाबतच्या विशिष्ट ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये उपसमित्यांकडे सोपवता येतील. अशा उप-समित्यांत स्थायी समितीस योग्य वाटतील असे तिच्या सदस्यांपैकी कमीत कमी तीन सदस्य असतील आणि अशा प्रत्येक उपसमितीने स्थायी समितीकडून तिला वेळोवेळी जे कोणतेही अनुदेश देण्यात येतील ते पाळले पाहिजेत.

## परिवहन समिती

**२५.** (१) महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यास या अधिनियमाच्या तरतुदींनुसार व त्यात असलेल्या शर्ती व मर्यादा यांस अधीन राहून असा उपक्रम चालवण्याच्या प्रयोजनासाठी [१][ तेरा ] सदस्यांची एक परिवहन समिती असेल.

परिवहन समितीची नेमणूक.

(२) महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यक्तींमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून [२][ बारा ] व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

---

१ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १६ (अ) द्वारे "नऊ" या शब्दाऐवजी दाखल केले.

२ वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) द्वारे "आठ" या शब्दाऐवजी दाखल केले.

(३) जर एखादी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह असेल तर ती व्यक्ती परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमली जाण्यास व सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल.

(४) स्थायी समितीचा सभापती हा परिवहन समितीचा पदसिद्ध सदस्य असेल.

(५) महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त होतील.

[1] [ परंतु, परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या पालिका सदस्यांच्या बाबतीत त्याच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी तो पालिका सदस्य असण्याचे बंद होईल तर, तो परिवहन समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल. उक्त रिकामे पद, जणू काही ते कलम २६ अन्वये रिकामे झाले असल्याप्रमाणे, पोट-कलम (९) च्या तरतुदींनुसार भरण्यात येईल ].

(६) पोट-कलम (२) अन्वये सदस्यांच्या नेमणुकीनंतर दोन वर्षांनी जे सदस्य निवृत्त होतील त्यांची निवड त्यांच्या निवृत्तीच्या निकटपूर्वीच्या महिन्यांच्या पहिल्या तारखेपूर्वी परिवहन समितीचा सभापती ठरवील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल. त्यानंतर परिवहन समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील :

परंतु, पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्यांच्या बाबतीत, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याचा पदावधी ज्या तारखेस त्याची पुन्हा नेमणूक करण्यात आली असेल त्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(७) पोट-कलम (५) अन्वये सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिकाम्या होणाऱ्या जागा महानगरपालिकेने अशा जागा रिकाम्या होणाच्या निकटपूर्वीच्या महिन्यातील आपल्या सर्वसाधारण सभेत त्यावर यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करून भरल्या पाहिजेत :

परंतु, ज्या वर्षी पालिका सदस्यांच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या असतील त्या वर्षी, अशा निवडणुकांनंतर महानगरपालिकेची पहिली सभा अशा जागा रिकाम्या झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत भरणार असेल तर, अशा रिकाम्या जागा अशा पहिल्या सभेत भरल्या पाहिजेत आणि अशा प्रसंगी जे सदस्य पोट-कलम (५) अन्वये त्यात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस निवृत्त झाले असते या पोट-कलमान्वये नवीन सदस्यांची नेमणूक करण्यात येईपर्यंत पदावर राहतील.

(८) निवृत्त होणारा सदस्य फेरनेमणुकीस पात्र असेल.

(९) परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पदाचा स्वीकार न केल्यास किंवा अशा समितीचा सदस्य मरण पावल्यास, त्याने राजीनामा दिल्यास किंवा तो अनर्ह ठरल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यास किंवा कलम २६ च्या तरतुदीन्वये अशी रिकामी झालेली जागा महानगरपालिकेने

---

१ हे परंतुक, सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ७ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

त्या जागी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर भरली पाहिजे; आणि अशी व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत पद धारण करील.

**२६.** (१) जी कोणतीही व्यक्ती परिवहन समितीचा सदस्य म्हणून तिची नेमणूक झाल्यावर —(अ) कलम २५, पोट-कलम (३) च्या तरतुदीन्वये समितीचा सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल किंवा परिवहन समितीच्या सदस्यांच्या अनर्हता.

(ब) ज्या बाबतीत तिचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कलम १०, पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेला कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल किंवा ज्या बाबतीत तिचा पक्षकाराच्या, प्रकर्त्यांच्या किंवा अन्य व्यक्तींच्या वतीने व्यवसाय दृष्ट्या हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी चर्चा चालू असताना त्यावेळी मत देऊन किंवा तीत भाग घेऊन किंवा अशा बाबीसंबंधी कोणताही प्रश्न विचारून समितीचा सदस्य म्हणून काम करील, किंवा

(क) तात्पुरता आजार किंवा समितीने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील, किंवा

(ड) कोणत्याही कारणामुळे — मग ते समितीने मान्य केलेले असो वा नसो — लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल ; ती व्यक्ती समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर तिचे पद रिकामे होईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही जागा रिकामी झाली आहे किंवा काय याविषयी कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास आयुक्ताने महानगरपालिकेच्या विनंतीवरून तो प्रश्न न्यायाधिशाकडे पाठविला पाहिजे.

**२७.** (१) परिवहन समितीने कलम २५, पोट-कलम (२) अन्वये तिच्या नेमणुकीनंतर तिच्या पहिल्या सभेत आणि त्यापुढील प्रत्येक वर्षी त्याच महिन्यात तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यांपैकी एकास सभापती म्हणून नेमले पाहिजे. परिवहन समितीचा सभापती.

(२) सभापतीने आपल्या उत्तराधिकाऱ्याची पोट-कलम (१) अन्वये नेमणूक होईपर्यंत पद धारण केले पाहिजे, परंतु तो पुन्हा नेमला जाण्यास पात्र असेल.

(३) पोट-कलम (१) व (२) च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सभापती हा समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद झाल्याबरोबर त्याने आपले पद सोडून दिले पाहिजे.

(४) सभापतीचे पद त्याची मुदत संपण्यापूर्वी रिकामे झाल्यास, समितीने असे पद रिकामे झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर आपल्या सदस्यांपैकी एक सदस्याची अशा रिकाम्या झालेल्या जागेवर नेमणूक केली पाहिजे आणि अशा रीतीने नेमलेला सभापती, ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत पद धारण करील.

परिवहन समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी वाहन खर्च.

**२८.** सभापती व परिवहन समितीचे सदस्य यांस, समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा वाहन खर्च देण्यात येईल.

परिवहन समितीच्या उपसमित्या.

**२९.** (१) परिवहन समितीस वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून तिला योग्य वाटतील इतक्या व्यक्ती समाविष्ट असलेल्या उपसमित्या नेमता येतील.

(२) समितीस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी कमीत कमी दोन-तृतीयांश सदस्यांनी पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये उपसमितीकडे सोपवता येतील. तसेच तिला, तशाच ठरावाद्वारे अशा उपसमितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल.

(३) समिती ज्या बाबीचा विचार करण्यास सक्षम असेल अशा कोणत्याही बाबीची चौकशी करून त्यावर प्रतिवृत्त सादर करण्याकरिता किंवा त्यावर अभिप्राय देण्याकरता समितीस अशी बाब पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या उपसमितीकडे सोपवता येईल.

**[1] [प्रभाग समित्या**

प्रभाग समित्यांची रचना.

**२९ अ.** (१) प्रत्येक शहरात पुढील तक्त्यानुसार महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल :—

**तक्ता**

| लोकसंख्या | प्रभाग समित्यांची किमान संख्या | अतिरिक्त लोकसंख्येसाठी अतिरिक्त प्रभाग समित्या | प्रभाग समित्यांची कमाल संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ३ लाखांपेक्षा अधिक व ४.५ लाखांपर्यंत | ३ | — | ४ |
| ४.५ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत | ४ | १,५०,००० | ९ |
| १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत | ९ | ३,००,००० | १३ |
| २४ लाखांपेक्षा अधिक | १३ | ६,००,००० | २५ |

(२) प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(अ) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रामधील निवडणूक प्रभागांचे प्रतिनिधित्व करणारे पालिका सदस्य;

(ब) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्राचा प्रभारी असलेला अधिकारी ;

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६२ द्वारे उपशीर्ष व कलम २९-अ समाविष्ट केले.

(क) खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या पालिका सदस्यांनी, प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या, समाजकल्याणाच्या कार्यात गुंतलेल्या अशा मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटना व समाजलक्षी संघटना यांच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसेल इतक्या संख्येतील इतर सदस्य :

परंतु, अशा व्यक्तींची, प्रभाग समितीच्या अधिकारितेमधील प्रभागातील मतदार म्हणून नोंदणी झालेली असेल :

परंतु, आणखी असे की, स्वयंसेवी संघटनांना मान्यता देण्यासंबंधीची प्रमाणके ; सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि ज्या रीतीने त्यांना नामनिर्देशित करावयाचे ती रीत या गोष्टी राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असतील.

(३) प्रभाग समितींची मुदत महानगरपालिकेच्या मुदतीबरोबर समाप्त होईल.

(४) पोट-कलम (२) च्या उप-खंड (क) मध्ये निर्देशिलेले निवडून आलेले पालिका सदस्य, प्रभाग समितीच्या, प्रत्येक सरकारी वर्षातील पहिल्या सभेमध्ये त्यांच्या स्वत:मधून सभापती निवडून देतील आणि तो लगतनंतरच्या सरकारी वर्षातील पहिल्या सभेपर्यंत पद धारण करील.

(५) प्रभाग समितीचा सभापती पालिका-सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर त्याने आपले पद रिकामे केले असल्याचे मानण्यात येईल.

(६) सभापतीच्या अधिकारपदाचा अवधी समाप्त होण्यापूर्वी ते रिकामे होईल, त्यावेळी प्रभाग समिती नवीन सभापती निवडून देईल :

परंतु, अशाप्रकारे निवडून दिलेला सभापती ज्याच्या जागी त्याला निवडून दिलेले असेल त्या सभापतीने ते पद रिकामे झाले नसते तर जोपर्यंत ते धारण केले असते तोपर्यंत केवळ ते पद धारण करील.

(७) प्रभाग समितीची कामे, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण देखरेखीच्या व नियंत्रणाच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) पाणीपुरवठा, जलनि:सारण, स्वच्छता आणि पावसाच्या तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट यासारख्या स्थानिक व अत्यावश्यक पालिका सेवांच्या संबंधातील, नागरिकांची सर्वसाधारण गाऱ्हाणी त्वरेने दूर करणे ;

(ब) प्रभागांशी संबंधित खर्चाच्या अंदाजाबद्दलचे अर्थसंकल्पाच्या निरनिराळ्या लेखा शीर्षाखालील प्रस्ताव आयुक्ताकडे पाठविण्यापूर्वी त्यावर विचार करणे व त्याबाबत शिफारशी करणे ;

(क) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात पार पाडावयाच्या, पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या पालिका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे मात्र महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विनिर्दिष्ट तरतूद केलेली असली पाहिजे.

(८) पोट-कलम (७) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिका एक ठराव करून त्याद्वारे तिला योग्य आणि इष्ट वाटतील अशी इतर कामे प्रभाग समितीकडे सोपवू शकेल.

(९) प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्यातून किमान एकदा तिच्या प्रभाग कार्यालयात होईल.]

## विशेष व तदर्थ समित्या

महानगर-पालिकेच्या विशेष समित्या.

**३०.** (१) महानगरपालिकेस, वेळोवेळी, आपल्या पालिका सदस्यांमधून [1] [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल, अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत.

[2] [(१ अ) महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे महिला पालिका सदस्यांमधील असतील.

**स्पष्टीकरण :—**सदस्यांची पंच्याहत्तर टक्के संख्या मोजण्याच्या प्रयोजनासाठी कोणताही अपूर्णांक असल्यास, तो पूर्णांक धरण्यात येईल.]

(२) महानगरपालिकेस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत-कमी दोन-तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमत: समुचित समितीपुढे ठेवले पाहिजेत व अशा समितीच्या शिफारशीसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजेत असा निदेश देता येईल. तसेच महानगरपालिकेस, तशाच ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

(३) प्रत्येक विशेष समितीने आपल्या सदस्यांपैकी दोन सदस्यांची सभापती व उप सभापती म्हणून नेमणूक केली पाहिजे :

परंतु, कोणत्याही पालिका सदस्यांस एकाच वेळी एकापेक्षा अधिक विशेष समित्यांचा सभापती होता येणार नाही.

[3] [ परंतु, आणखी असे की, महिला व बालकल्याण समितीवरील सभापती, उप-सभापती या तिच्या महिला पालिका सदस्यांमधील असतील.]

(४) सभापती व त्याच्या अनुपस्थितीत उप-सभापती आणि या दोघांच्या अनुपस्थितीत, विशेष समितीचे जे सदस्य सभेत उपस्थित असतील त्यांनी निवडलेला अन्य सदस्य सभेच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम चालवील.

(५) विशेष समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा अशा समितीने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य कारणामुळे लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील किंवा कोणत्याही कारणामुळे —मग ते अशा समितीने मान्य केलेले असो वा नसो —लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वत: अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो अशा समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल व त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

(६) प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेल :

परंतु, पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवताना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल

---

१ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१ याच्या कलम १७ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) द्वारे पोट-कलम (१ अ) समाविष्ट केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १७ (क) द्वारे हे परंतुक समाविष्ट केले.

तर, अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये यासंबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन राहणार नाही. मात्र, अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी निदान दोन-तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे :

आणखी असे की, कोणत्याही विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार उपाययोजना करण्यास विलंब झाल्यास त्यामुळे अत्यंत गैरसोय होईल असे वाटत असेल तर, तिला आपले कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाणे आवश्यक असेल अशा बाबतीत, अशा कायम करण्याची वाट न पाहता अशी उपाययोजना करण्यात यावी; असा निदेश, एकूण सदस्यांपैकी निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे देता येईल; परंतु महानगरपालिकेने अशा समितीचे कामकाज नंतर कायम केले नाही तर, महानगरपालिकेचे आदेश अंमलात आणण्यासाठी त्यावेळी व्यवहार्य असतील अशा उपाययोजना विलंब न लावता करण्यात आल्या पाहिजेत.

(७) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल.

(८) विशेष समित्यांची रचना व अशा समित्यांच्या सभात कामकाज चालवणे, कामकाजाच्या टिपण्या ठेवणे व प्रतिवृत्त सादर करणे व अशा समित्यांपुढील अन्य बाबी यांचे नियमन नियमांद्वारे करता येईल.

तदर्थ समित्यांची नेमणूक.

**३१.** (१) महानगरपालिकेस वेळोवेळी पालिका सदस्यांमधून तिला योग्य वाटतील इतके पालिका सदस्य समाविष्ट असलेल्या तदर्थ समित्या नेमता येतील आणि तिला योग्य वाटतील असे या अधिनियमांच्या प्रयोजनासंबंधीचे खास विषय त्यासंबंधी चौकशी करून त्यावर प्रतिवृत्त सादर करण्याकरता किंवा त्यावर अभिप्राय देण्याकरता अशा समित्यांकडे पाठवता येतील; आणि अशा कोणत्याही समितीचे प्रतिवृत्त स्थायी समितीमार्फत किंवा कलम ३० अन्वये रचना करण्यात आलेल्या विशेष समितीमार्फत सादर करण्यात आले पाहिजे असा निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या तदर्थ समितीस महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीने जे पालिका सदस्य नाहीत, परंतु जे समितीच्या मते समितीवर काम करण्यासाठी विशेष अर्हता धारण करतात अशा जास्तीत जास्त दोन व्यक्तींना स्वीकृत करून घेता येईल :

[1] [परंतु, अशा व्यक्ती, अशा समितीचा सभापती म्हणून निवडून येण्यास पात्र नसतील आणि त्यांना समितीच्या कोणत्याही सभेत मत देण्याचा अधिकार नसेल.]

प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नाम निर्देशनाद्वारे नियुक्ती करणे.

[2] [ **३१-अ** (१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तद्न्वये केलेल्या नियमांत किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदीअनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यात येईल-- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो ;

(क) स्थायी समिती ;

(ख) परिवहन समिती ;

(ग) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती ;

(घ) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती ;

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ याच्या कलम ६३ द्वारे हे परंतुक समाविष्ट केले.

२ सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११ याच्या कलम ६ द्वारे कलम ३१ दाखल केले.

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश करील ;

[१] [ परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमत: पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटाला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करून तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटाला प्रत्येकी **एक** याप्रमाणे वाटून देण्यात येतील. ]

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षांचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

सन १९८७ चा महा. २०.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.]

## संयुक्त समित्या

अन्य स्थानिक प्राधिकरणांबरोबर संयुक्त व्यवहार.

**३२.** (१) महानगरपालिकेस पुढील बाबतीत एखाद्या स्थानिक प्राधिकरणाबरोबर किंवा संयुक्त स्थानिक प्राधिकरणांबरोबर वेळोवळी सहभागी होता येईल :—

(अ) ज्यात त्यांचा संयुक्तपणे हितसंबंध आहे अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आपापल्या संस्थेतून एक संयुक्त समिती नेमणे आणि अशा समितीचा सभापती नेमणे ;

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७ याच्या कलम ११ द्वारे पहिल्या परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल केले.

(ब) संयुक्तपणे करावयाचे कोणतेही काम बांधणे व पुढे ते सुस्थितीत राखणे याबाबत अशा प्रत्येक संस्थेस बंधनकारक अशा अटी तयार करण्याच्या अधिकाराचे व अशा संस्थांपैकी कोणत्याही संस्थेस वापर करता येईल अशा कोणत्याही अधिकाराचे अशा कोणत्याही समितीकडे प्रत्यायोजन करणे ; आणि

(क) ज्या प्रयोजनासाठी समिती नेमण्यात आली असेल त्या प्रयोजनासंबंधी अशा समितीच्या कामकाजाचे नियमन करण्याबाबत नियम करणे व त्यात फेरबदल करणे.

(२) जेव्हा महानगरपालिकेने कोणत्याही बाबी संबंधी पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये कोणत्याही अन्य स्थानिक प्राधिकरणास सहमती देण्याविषयी विनंती केली असेल आणि अशा अन्य स्थानिक प्राधिकरणाने सहमती देण्याचे नाकारले असेल तेव्हा, छावणी प्राधिकरण नसलेल्या अशा कोणत्याही अन्य स्थानिक प्राधिकरणास उक्त बाबतीत सहमती देण्यास भाग पाडण्याविषयी [१][राज्य] शासनास त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील ; आणि अशा कोणत्याही अन्य स्थानिक प्राधिकरणाने असे आदेश पाळले पाहिजेत.

(३) महानगरपालिका व या कलमान्वये महानगरपालिकेबरोबर सहभागी झालेले अन्य कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्यामध्ये एखाद्या बाबीसंबंधी कोणताही मतभेद निर्माण झाल्यास, ती बाब [१] [ राज्य ] शासनाकडे पाठवण्यात येईल आणि [१] [ राज्य ] शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम व बंधनकारक राहील :

परंतु, संबंधित स्थानिक प्राधिकरण हे छावणी प्राधिकरण असेल तर असा कोणताही निर्णय केंद्र सरकारने कायम केल्या खेरीज तो बंधनकारक असणार नाही.

(४) महानगरपालिकेस [२] [ कोणत्याही छावणी प्राधिकरणाच्या बाबतीत, राज्य शासन आणि समादेश क्षेत्राचा मुख्य समादेशक अधिकारी यांच्या मंजुरीने व अन्य बाबतीत ] [१] [ राज्य ] शासनाच्या मंजुरीने स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने महानगरपालिकेने जकात किंवा पथकर [३] [ किंवा वाहने, नावा किंवा जनावरे यावरील कर ] वसूल करण्याकरिता अशा स्थानिक प्राधिकरणाशी किंवा संयुक्त स्थानिक प्राधिकरणांशी वेळोवेळी करार करता येईल, आणि तसे झाल्यास या अधिनियमाच्या तरतुदी, जणू अशा स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा संयुक्त स्थानिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाच्या अधीन असलेले क्षेत्र किंवा क्षेत्रे समाविष्ट करण्याकरीता अशा शहराचे क्षेत्र विस्तारित करण्यात आले आहे असे समजून, अशा वसुलीच्या बाबतीत लागू होतील.

[४] [ (५) पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणताही करार करण्यात आला असेल तेव्हा अशा शहरात आणि सामान्यपणे अशा स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा प्राधिकरणांच्या नियंत्रणाच्या अधीन असलेल्या क्षेत्रांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये मिळालेली अशी जकात, पथकर किंवा कर यांची एकूण रक्कम आणि त्यासाठी आलेला खर्च, कराराद्वारे ठरवण्यात आले असेल अशा प्रमाणात, यथास्थिती, नगरपालिका निधी आणि अशा स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा प्राधिकरणांच्या नियंत्रणाधीन असलेला निधी किंवा असलेले निधी यांच्यामध्ये विभागण्यात येईल. ]

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ (१) (अ) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

३ वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (ब) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

## कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतुदी

महानगरपालिका इत्यादीमध्ये जागा रिकामी झाल्यामुळे तिचे कामकाज विधिग्राह्य न होणे.

**३३.** महानगरपालिकेत किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या कोणत्याही समितीत किंवा उप-समितीत कोणतीही जागा रिकामी झाली या कारणावरून तिच्या कृत्यास किंवा कामकाजास आक्षेप घेता येणार नाही.

महानगरपालिका सदस्य इत्यादींच्या अनर्हतेमुळे तिच्या कामकाजास बाध न येणे.

**३४.** पालिका सदस्य म्हणून किंवा महापौर किंवा उप महापौर म्हणून किंवा महानगरपालिकेचा अध्यक्षपदस्थ प्राधिकारी म्हणून किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या कोणत्याही समितीचा किंवा उप समितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या अनर्हतेमुळे किंवा तिच्या निवडणुकीत किंवा नेमणुकीत दोष असल्यामुळे, यथास्थिती, महानगरपालिकेच्या किंवा अशा कोणत्याही समितीच्या किंवा उप-समितीच्या ज्या कोणत्याही कृतीत किंवा कामकाजात अशा व्यक्तीने भाग घेतला असेल त्या कृतीस किंवा कामकाजास बाध येते असे मानले जाणार नाही. मात्र अशा, कृतीत किंवा कामकाजात ज्यांनी भाग घेतला होता अशा व्यक्तीपैंकी बहुसंख्य व्यक्तींना काम करण्याचा हक्क असला पाहिजे.

तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत सभांचे कामकाज उचित व विधीग्राह्य असणे.

**३५.** तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, महानगरपालिकेच्या किंवा समितीच्या किंवा उप-समितीच्या ज्या ज्या सभेच्या कामकाजाच्या बाबतीत या अधिनियमानुसार किंवा नियमांनुसार कार्यवृत्त तयार करण्यात येऊन त्यावर सही करण्यात आली असेल ती प्रत्येक सभा रीतसर बोलवण्यात व भरवण्यात आली आहे असे मानले जाईल आणि त्या सभेचे सर्व सदस्य यथोचितरीत्या अर्हताप्राप्त आहेत असे मानले जाईल ; आणि जेथे असे कामकाज एखाद्या समितीचे किंवा उप-समितीचे कामकाज असेल तेथे अशा समितीची किंवा उप-समितीची रचना रीतसर करण्यात आली होती व अशा कार्यवृत्तात उल्लेख केलेल्या बाबींचा विचार करण्याचा तिला अधिकार होता असे मानले जाईल.

महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकारांचा वापर करणे व तिची कर्तव्या पार पाडणे.

[१][ **३५ अ.** जर या अधिनियमाखालील कोणतीही समिती किंवा विशेष समिती कोणत्याही वेळी घटीत केली नसेल, किंवा ती कोणत्याही कारणामुळे या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत नसेल तर, अशी समिती घटित करण्यात येईपर्यंत किंवा आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत येईपर्यंत, महानगरपालिका समितीच्या अधिकारांचा वापर करील आणि तिची कर्तव्ये पार पाडील.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १८ द्वारे कलम ३५-अ आणि ३५-ब दाखल केले.

**३५ ब.** या अधिनियमान्वये घटित केलेल्या कोणत्याही समितीच्या सभापतीने किंवा उपसभापती असल्यास त्याने, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे समितीच्या लागोपाठच्या दोन सभा बोलावण्यात कसूर केली तर, राज्य शासन त्यास पदावरून दूर करू शकेल, आणि अशा प्रकारे पदावरून दूर केलेला सभापती किंवा उपसभापती त्यांच्या पदाच्या उर्वरित कालावधीत, त्या समितीचा सभापती किंवा, यथास्थिती, उपसभापती म्हणून पुन्हा निवडून येण्यास किंवा पुनर्नियुक्ती केली जाण्यास पात्र असणार नाही : समितीचे सभापती किंवा उपसभापती यांना पदावरून दूर करणे.

परंतु, अशा सभापतीस किंवा उपसभापतीस आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज त्याला पदावरून दूर करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, या कलमान्वये सभापती किंवा उपसभापती याला पदावरून दूर केल्यामुळे त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत तो पालिका सदस्य म्हणून असण्याचे चालू राहण्यास बाधा येणार नाही.]

## नगरपालिका आयुक्त

**३६.** (१) आयुक्ताची नेमणूक वेळोवेळी [१] [ राज्य ] शासनाकडून करण्यात येईल. आयुक्ताची नेमणूक.

(२) आयुक्त हा, प्रथमत: [१] [ राज्य ] शासन ठरवील त्याप्रमाणे तीन वर्षांहून अधिक नसेल अशा कालावधीपर्यंत पद धारण करील आणि त्याची नेमणूक एका वेळी तीन वर्षांहून अधिक नसेल, अशा कालावधीसाठी वेळोवेळी नवीकृत करता येईल.

(३) पोट-कलम (२) च्या तरतुदीमध्ये काहीही असले तरी, आयुक्ताचा [२] [ शासकीय ] सेवेवर धारणधिकारी असेल तर, राज्य शासनास [३] [ * * * ] त्याला कोणत्याही वेळी अशा सेवेवर परत बोलवता येईल आणि त्याला असमर्थता, गैरवर्तणूक किंवा कर्तव्य पार पाडण्यात केलेली हयगय याबद्दल कोणत्याही वेळी [१] [ राज्य ] शासनाद्वारे पदावरून काढून टाकता येईल आणि महानगरपालिकेच्या सभेत एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी पाच अष्टमांश सदस्यांनी त्यास काढून टाकण्याविषयी ठरावाच्या बाजूने मत दिले असेल तर, [१] [ राज्य ] शासनाने त्याला अशा रीतीने ताबडतोब पदावरून काढून टाकले पाहिजे.

**३७.** (१) आयुक्तास [१] [ राज्य ] शासन महानगरपालिकेशी विचारविनिमय करून वेळोवेळी ठरवील असे मासिक वेतन व भत्ते नगरपालिका निधीतून मिळतील : आयुक्ताचे वेतन.

परंतु, आयुक्ताची नेमणूक ज्या कालावधीसाठी करण्यात आली असेल किंवा नवीकृत करण्यात आली असेल त्या कालावधीत त्याच्या वेतनात त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल करता येणार नाही.

(२) आयुक्त आपला सर्व वेळ व लक्ष्य या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात विहित केल्याप्रमाणे असलेली आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकडे लावील आणि त्याला अन्य कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करता येणार नाही :

परंतु, त्यास महानगरपालिकेच्या मंजुरीने कोणत्याही स्थानिक चौकशीच्या प्रयोजनार्थ किंवा स्थानिक महत्त्वाचा किंवा हिताचा कोणताही उद्देश साध्य करण्यासाठी रचना केलेल्या कोणत्याही समितीवर काम करता येईल.

(३) [२] [ शासनाच्या ] वेतनी कर्मचाऱ्यांची आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली असेल तेव्हा [१] [ शासनाकडील ] त्याच्या सेवेच्या शर्तीनुसार त्याने किंवा त्याच्या वतीने त्याचे निवृत्तीवेतन, रजेचे व अन्य भत्ते याबद्दल जे अंशदान देणे आवश्यक असेल ते [१] [ राज्य ] शासनास नगरपालिका निधीतून देण्यात आले पाहिजे.

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १३ द्वारे "महानगरपालिकेशी विचारविनिमय केल्यानंतर" हा मजकूर वगळण्यात आला.

आयुक्ताला अनुपस्थिती रजा देणे व रजा भत्ता.

**३८.** (१) [१][ राज्य ] शासनास, वेळोवेळी स्थायी समितीच्या अनुमतीने, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी आयुक्ताला अनुपस्थिती रजा देता येईल.

(२) आयुक्त अनुपस्थिती रजेवर असताना त्याला द्यावयाचे भत्ते हे, त्याच्या वेतनाहून अधिक नसेल अशी जी रक्कम [१][ राज्य ] शासन निश्चित करील त्या रकमेइतके असतील ; आणि आयुक्त हा, [२][ शासनाचा ] वेतनी कर्मचारी नसेल, तर असे भत्ते नगरपालिका निधीतून देण्यात येतील :

परंतु, आयुक्त [२][ शासनाचा ] वेतनी कर्मचारी असेल तर, अशा भत्त्यांची रक्कम ही, त्याच्या वर्गातील [२][ शासनाच्या ] वेतनी कर्मचाऱ्यांच्या रजेच्या भत्त्याबाबत त्यावेळी जे नियम अंमलात असतील त्या नियमाप्रमाणे विनियमित करण्यात येईल.

हंगामी आयुक्ताची नेमणूक व त्याचे पारिश्रमिक.

**३९.** [१][ राज्य ] शासनास, आयुक्ताच्या रजेच्या काळात किंवा त्याचे पद तात्पुरते रिकामे झाले असेल त्या काळात आयुक्त म्हणून काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेली प्रत्येक व्यक्ती या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये आयुक्तास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील व सोपविलेली कर्तव्ये पार पाडील आणि आयुक्त ज्या दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल व त्या सर्व दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन अशी व्यक्ती असेल व तिला [१][ राज्य ] शासन ठरवील असे त्यावेळी आयुक्तास देय असलेल्या वेतनाहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळेल.

महानगरपालिका अतिरिक्त आयुक्ताची नेमणूक.

[३][ **३९-अ.** (१) राज्य शासनास, महानगरपालिकेत महानगरपालिका अतिरिक्त आयुक्ताची एक किंवा अनेक पदे निर्माण करता येतील आणि अशा पदांवर योग्य त्या व्यक्तींची नेमणूक करता येईल, जो, आयुक्ताच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, आयुक्ताच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील आणि त्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कार्ये पार पाडील.

(२) महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त म्हणून अशा प्रकारे नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, आयुक्त ज्या दायित्वांच्या, निर्बंधांच्या आणि सेवेच्या अटी व शर्तींच्या अधीन असेल त्याच दायित्वांच्या, निर्बंधांच्या आणि सेवेच्या अटी व शर्तींच्या अधीन राहील.

## परिवहन व्यवस्थापक

परिवहन व्यवस्थापकाची नेमणूक.

**४०.** (१) महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन केल्यास किंवा स्थापन केल्यास महानगरपालिका [१][ राज्य ] शासनाच्या मान्यतेच्या अधीन, परिवहन उपक्रमाचा परिवहन व्यवस्थापक म्हणून योग्य व्यक्तीची नेमणूक करील.

(२) परिवहन व्यवस्थापकास, महानगरपालिका [१][ राज्य ] शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी ठरवील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील :

परंतु, परिवहन व्यवस्थापकाच्या पदाच्या कालावधीत त्याच्या वेतनास अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल करता येणार नाहीत.

परिवहन व्यवस्थापकाची रजा.

**४१.** (१) परिवहन समितीस, महानगरपालिकेच्या अनुमतीने, परिवहन व्यवस्थापकाला वेळोवेळी अनुपस्थिती रजा देता येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांताच्या" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३२ याच्या कलम १९ द्वारे कलम ३९-अ दाखल केले.

(२) परिवहन व्यवस्थापक याप्रमाणे अनुपस्थिती रजेवर असताना त्याला द्यावयाचा भत्ता त्याच्या वेतनाच्या रकमेहून अधिक नसेल अशी जी रक्कम महानगरपालिका निश्चित करील त्या रकमेइतका असेल.

(३) परिवहन व्यवस्थापकाच्या अनुपस्थिती रजेच्या काळात किंवा त्याचे पद तात्पुरते रिकामे झाले असेल त्या काळात परिवहन समितीस, महानगरपालिकेच्या संमतीने, परिवहन व्यवस्थापक म्हणून काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल; अशा रीतीने नेमलेली प्रत्येक व्यक्ती परिवहन व्यवस्थापकास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील व त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडील आणि परिवहन व्यवस्थापक ज्या दायित्वांच्या, निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीन असेल त्याच दायित्वांच्या, निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीन अशी व्यक्ती असेल आणि तिला महानगरपालिका ठरवील असे त्यावेळी परिवहन व्यवस्थापकास देय असलेल्या वेतनाहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळेल.

### आयुक्ताच्या अनर्हता

महानगरपालिकेबरोबर केलेल्या कोणत्याही [४][संविदेत] आयुक्ताच्या हितसंबंध असता कामा नये.

**४२.** (१) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत, [१][ * * * * ] कोणत्याही व्यक्तीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर, ती व्यक्ती आयुक्त म्हणून नेमली जाण्यास किंवा आयुक्त म्हणून पदावर राहण्यास पात्र असणार नाही.

(२) जो कोणताही आयुक्त पूर्वोक्त अशा कोणत्याही संविदेत [२][ * * * * ] स्वत: किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही भाग किंवा तद्संबंध संपादन करील तो आयुक्त असण्याचे बंद होईल आणि त्याचे पद रिकामे होईल.

(३) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [३][ * * * * ] जो कोणताही भाग किंवा हितसंबंध धारण करणे कलम १०, पोट-कलम (२), खंड (ख), उपखंड (दोन) किंवा (चार) अन्वये पालिका सदस्यास अनुज्ञेय आहे व जो धारण केल्यामुळे पालिका सदस्य होण्यास तो अनर्ह ठरत नाही अशा कोणत्याही भागाच्या किंवा हितसंबंधाच्या बाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४२ च्या कलम ६ (अ) याद्वारे "किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली", या शब्दांनी सुरू होणारा व "अन्य कोणत्याही नोकरीत" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) याद्वारे "किंवा नोकरीत" हा मजकूर वगळण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ६ (क) याद्वारे "किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली" या शब्दांनी सुरू होणारा व "कोणत्याही नोकरीत" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ६ (ड) याद्वारे "संविदा इत्यादीमध्ये" या मजकुराऐवजी "संविदेत" हा मजकूर दाखल करण्यात आला.

# प्रकरण तीन

## महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती व अन्य संस्था यांचे कामकाज

महानगर-पालिका, स्थायी समिती इत्यादीचे कामकाज.

**४३.** (१) महानगरपालिका, स्थायी समिती, [1] [ प्रभाग समित्या ], स्थायी समितीच्या उप-समित्या, परिवहन समिती, परिवहन समितीच्या उप-समित्या, विशेष समित्या व तदर्थ समित्या यांच्या सभा नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने भरवण्यात येतील व त्यांच्यापुढील कामकाज त्याच रीतीने उरकण्यात येईल ;

[2] [ परंतु, कलम ५, पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेल्या पालिका सदस्यांना हा अधिनियम व अनुसूची यात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही सभेत मत देण्याचा हक्क असणार नाही. ]

[3] [ (२) आयुक्तास किंवा आयुक्ताच्या वतीने उपस्थित असलेल्या, उप-आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या अधिकाऱ्यास, महानगरपालिकेच्या अथवा जिच्या समितीच्या कोणत्याही सभेमध्ये होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा आणि अन्यथा सहभाग घेण्याचा, तसेच महापौराच्या किंवा समितीच्या पीठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीने सभेमध्ये आपली मते मांडण्याचा अधिकार असेल, परंतु त्यास कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा तो मांडण्याची मुभा असणार नाही. ]

(३) महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आपली कर्तव्ये पार पाडत असताना केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल महानगरपालिकेच्या ज्या कोणत्याही सभेमध्ये किंवा सभांमध्ये चर्चा चालू असेल त्या सभेमध्ये किंवा सभांमध्ये अशा अधिकाऱ्यास उपस्थित राहण्याविषयी महानगरपालिकेस फर्माविता येईल ; अशा रीतीने कोणत्याही अधिकाऱ्यास अशा कोणत्याही सभेत उपस्थित राहण्याविषयी फर्मावण्यास येईल तेव्हा त्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल वस्तुस्थितीसंबंधी निवेदन किंवा स्पष्टीकरण करण्याविषयी किंवा अशा गोष्टीसंबंधी त्याच्याजवळ असलेली जी माहिती महानगरपालिकेस आवश्यक वाटेल ती पुरविण्याविषयी त्याला फर्मावता येईल.

(४) आयुक्तास स्थायी समितीच्या किंवा उप-समितीच्या सभेस उपस्थित राहण्याचा, तीत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा उक्त समितीच्या सदस्याला जो अधिकार असतो तोच अधिकार असेल, परंतु त्यास अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याची किंवा प्रस्ताव मांडण्याची मोकळीक असणार नाही.

(५) आयुक्तास व त्याच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या उप-आयुक्तास किंवा सहायक आयुक्तास आणि परिवहन व्यवस्थापकास व त्याच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास परिवहन समितीच्या किंवा उप समितीच्या सभेत उपस्थित राहण्याचा व तीत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा अशा समितीच्या सदस्यास जो अधिकार असतो तोच अधिकार असेल, परंतु, त्यास अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याची किंवा प्रस्ताव मांडण्याची मोकळीक असणार नाही.

प्रश्न विचारण्याचा अधिकार.

**४४.** पालिका सदस्याला नियमाद्वारे विहित केलेल्या शर्तींच्या अधीन या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहरातील महानगरपालिकेचा कारभार यासंबंधीच्या कोणत्याही बाबीसंबंधी प्रश्न विचारता येतील.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ याच्या कलम ६४ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ६४ (ब) द्वारे परंतुक समाविष्ट केले.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २० द्वारे पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल केले.

## प्रकरण चार

### महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी – त्यांची नेमणूक व सेवेच्या शर्ती

### शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, नगरपालिका सचिव, नगरपालिका उप आयुक्त व नगरपालिका सहायक आयुक्त.

शहर अभियंता इत्यादींची नेमणूक.

**४५.** (१) महानगरपालिका वेळोवेळी, योग्य अशा व्यक्तींची शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, [१] [ * * * * ] व नगरपालिका सचिव म्हणून नेमणूक करील.

(२) महानगरपालिकेस वेळोवेळी [२] [ राज्य ] शासनाच्या मान्यतेने नगरपालिका उप-आयुक्ताची एक जागा किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताची एक जागा किंवा तिला आवश्यक वाटतील इतक्या अशा जागा निर्माण करता येतील आणि तिला अशा जागांवर योग्य अशा व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक करता येईल.

(३) या कलमान्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास नियमाखाली विहित करण्यात येतील अशा अर्हता असल्या पाहिजेत व त्यास महानगरपालिका [२] [ राज्य ] शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निश्चित करील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील :

परंतु, कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदाच्या कालावधीत त्याच्या वेतनात त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल करता येणार नाही.

(४) नगरपालिका सचिवाच्या नेमणुकी व्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक [२] [ राज्य ] शासनाकडून कायम करण्याच्या अधीन असेल आणि ज्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक कायम करण्याचे [२] [ राज्य ] शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरून काढून टाकण्यात येईल.

(५) या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पदाची जागा रिकामी झाल्यास ज्या तारखेस ती रिकामी झाली असेल त्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत किंवा पोट-कलम (४) अन्वये एखाद्या अधिकाऱ्यास पदावरून काढून टाकण्यात आल्यास महानगरपालिकेस [२] [ राज्य ] शासनाचा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत महानगरपालिकेने त्या जागी दुसऱ्या व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

(६) पोट-कलम (५) अन्वये महानगरपालिकेने एखादी नेमणूक करण्यात कसूर केल्यास [२] [ राज्य ] शासनास अशी रिकामी जागा भरण्यासाठी योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशी नेमणूक सर्व प्रयोजनांसाठी, महानगरपालिकेने केली आहे असे मानण्यात येईल.

(७) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (५) अन्वये नेमणुकीची व्यवस्था होईपर्यंत, महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून ती जागा तात्पुरती भरता येईल आणि अशारीतीने नेमणूक केलेल्या व्यक्तीला पोट-कलम (३) अन्वये त्यावेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके महानगरपालिकेस योग्य वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील असा निदेश देता येईल :

परंतु अशी कोणतीही नेमणूक, ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांहून अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा ती अशा तारखेपासून सहा महिने झाल्यानंतर करता येणार नाही.

सन २०११ चा महा. १२.

महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाची नेमणूक.

[३] [ **४५-अ.** (१) राज्य शासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या कलम ५ च्या प्रारंभाचा दिनांक म्हणजेच दिनांक १० मार्च २०११ रोजी व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील :

---

१ वरील अधिनियमाच्या क्रमांक १२ कलम ४ द्वारे "नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक" हा मजकूर वगळण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १२ याच्या कलम ५ द्वारे कलम ४५-क दाखल केले.

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या कलम ५ च्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक १० मार्च २०१० रोजी असे पद धारण करीत असलेल्या महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाच्या नियुक्ती व सेवेच्या अटी व शर्तींना बाधा पोहोचणार नाही.] सन २०११ चा महा. १२.

प्रतिनियुक्ती-द्वारे भरावयाची पदे अधिसूचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[1] [ **४५-ब.** (१) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट केलेल्या राज्य शासनाच्या संवर्गातून, एखाद्या योग्य अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करून भरण्यासाठी कोणत्याही महानगरपालिकेतील कोणतेही पद किंवा कोणत्याही पदांचा वर्ग **राजपत्रात** अधिसूचित करणे राज्य शासनासाठी विधिसंमत असेल :

परंतु, अशी प्रत्येक अधिसूचना निर्गमित केल्यानंतर ती राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये पद किंवा पदांचा वर्ग विनिर्दिष्ट करण्याकरिता काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेमध्ये राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या ज्या संवर्गातून पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेली पदे भरण्यात येतील त्या अधिकाऱ्यांच्या संवर्गाचे (यात यापुढे ज्याचा निर्देश "पूरक संवर्ग" असा केला आहे) वर्णन अंतर्भूत असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर त्यानुसार अधिसूचित करण्यात आलेल्या पदांच्या संख्येइतकी पदे पूरक संवर्गात निर्माण करून पूरक संवर्गातील पदांच्या संख्याबलात वाढ करण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये पूरक संवर्गात निर्माण केलेली वाढीव पदे, शक्यतोवर, संबंधित महानगरपालिकेच्या एका किंवा अनेक योग्य अधिकाऱ्यांची राज्य शासन, नियमांद्वारे, विहित करील अशा रीतीने निवड करून, भरण्यात येतील :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीचा पोट-कलम (१) अन्वये ज्या दिनांकास अधिसूचना काढण्यात येईल त्या दिनांकास, महानगरपालिकेतील ते अधिसूचित पद धारण करणाऱ्या पदधारकाच्या नियुक्तीवर आणि त्याच्या सेवेच्या अटी व शर्तींवर परिणाम होणार नाही. ]

शहर अभियंता व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये.

**४६.** शहर अभियंता व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जी कर्तव्ये पार पाडण्याचा त्यांना निदेश देण्यात आला असेल ती कर्तव्ये आणि जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी त्यांना आयुक्तांकडून फर्मावण्यात येईल अशी अन्य कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये.

**४७.** (१) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक याने पुढील गोष्टी केल्या पाहिजेत :—

(अ) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार पार पाडण्याविषयी त्यास निदेश देण्यात येईल अशी कर्तव्ये पार पाडणे आणि नगरपालिका निधीच्या [2] [ जल व मलप्रवाह निधीच्या आणि एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्जनिधीच्या ] लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिकेकडून किंवा स्थायी समितीकडून व परिवहन निधीच्या लेखापरीक्षेसंबंधी परिवहन समितीकडून जी अन्य कर्तव्ये पार पाडण्याविषयी त्यास फर्माविण्यात येईल ती कर्तव्ये पार पाडणे ;

(ब) स्थायी समिती वेळोवेळी जे निदेश देईल त्याच्या अधीन, प्रत्यक्ष त्यांच्या हाताखाली काम करणारे लेखापरीक्षक व सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची कर्तव्ये विहित करणे ; आणि

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४० याच्या कलम ३ द्वारे कलम ४५-ब दाखल केले.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(क) स्थायी समितीच्या आदेशांच्या अधीन, उक्त लेखापरीक्षक, सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांच्या कृतीवर व कामकाजांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे आणि विनियमांच्या अधीन, उक्त लेखापरीक्षक, सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची सेवा, पारिश्रमिक व विशेषाधिकार व यासंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निकाल करणे.

(२) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हा आपले पद धारण करण्याचे बंद झाल्यावर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणखी पद धारण करण्यास पात्र असणार नाही.

नगरपालिका सचिवाचे अधिकार व कर्तव्ये.

**४८.** नगरपालिका सचिव, हा महानगरपालिकेचा व स्थायी समितीचाही सचिव असेल व त्याने पुढील कर्तव्ये पार पाडली पाहिजेत —

(अ) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार पार पाडण्याविषयी त्यास निदेश देण्यात येईल अशी कर्तव्ये आणि महानगरपालिका व स्थायी समितीमधील व त्यांच्यासंबंधीची जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी अनुक्रमे महानगरपालिकेकडून व स्थायी समितीकडून त्यास फर्मावण्यात येईल अशी अन्य कर्तव्ये पार पाडणे ;

(ब) (एक) महानगरपालिकेच्या कलम ३० किंवा ३१ अन्वये महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही समितीच्या;

(दोन) स्थायी समितीच्या व तिच्या कोणत्याही उपसमितीच्या ; कामकाजासंबंधी सर्व कागदपत्रे व दस्तऐवज अभिरक्षेत ठेवणे ;

(क) स्थायी समिती वेळोवेळी जे निदेश देईल त्यांच्या अधीन, प्रत्यक्ष त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये विहित करणे ; आणि

(ड) स्थायी समितीच्या आदेशांच्या अधीन, उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कृतीवर व कामावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे आणि विनियमांच्या अधीन, उक्त अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, पारिश्रमिक व विशेषाधिकार यांसंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निकाल करणे.

नगरपालिका उप-आयुक्ताचे किंवा सहायक आयुक्ताचे अधिकार व कर्तव्ये.

**४९.** (१) नगरपालिका उप आयुक्ताने किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताने आयुक्ताच्या आदेशांच्या अधीन राहून, आयुक्त आपले अधिकार व कर्तव्यपैकी वेळोवेळी त्याच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत :

परंतु, आयुक्त नगरपालिका उप आयुक्ताकडे किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताकडे आपले जे अधिकार व कर्तव्ये वेळोवेळी सोपवील त्याविषयी त्याने महानगरपालिकेस कळवले पाहिजे.

(२) नगरपालिका उप आयुक्ताने किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताने आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ही सर्व प्रयोजनांसाठी आयुक्ताने पार पाडली आहेत व केली आहेत असे मानले जाईल.

महानगर-पालिकेच्या सांविधिक अधिकाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती.

**५०.** (१) परिवहन व्यवस्थापक व कलम ४५ अन्वये नेमलेले सर्व अधिकारी, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, आपला सर्व वेळ व लक्ष आपापल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकडे लावतील आणि त्यांना अन्य कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करता येणार नाही.

(२) महानगरपालिकेस, विनियमांच्या अधीन परिवहन व्यवस्थापकाला किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला, तो कामावर असताना किंवा रजेच्या काळात एखाद्या खाजगी व्यक्तीसाठी किंवा संस्थेसाठी किंवा स्थानिक प्राधिकरण धरून एखाद्या सार्वजनिक संस्थेसाठी किंवा शासनासाठी एखादे विनिर्दिष्ट काम किंवा अनेक कामे करण्यास व त्याबद्दल पारिश्रमिक स्वीकारण्यास परवानगी देता येईल.

(३) परिवहन व्यवस्थापकाने किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अन्य अधिकाऱ्याने गैरवर्तन केल्यास किंवा आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास हयगय केल्यास किंवा ती पार पाडण्यास तो अक्षम ठरल्यास, त्याला एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी निम्म्या सदस्यांच्या मतांनी कोणत्याही वेळी काढून टाकता येईल.

(४) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात न आलेल्या सर्व बाबींमध्ये, परिवहन व्यवस्थापकाच्या व पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अन्य अधिकाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती विनियमांद्वारे विनियमित करण्यात येतील.

**अन्य अधिकारी व कर्मचारी**

अन्य नगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या, पदनामे, श्रेणी इत्यादी.

**५१.** (१) स्थायी समिती, अनुक्रमे नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष हाताखाली नेमावयाचे लेखापरीक्षक, सहायक लेखापरीक्षक, अधिकारी, लिपिक व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते स्थायी समिती पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन, वेळोवेळी ठरवील.

(२) आयुक्ताने वेळोवेळी एक विवरणपत्र तयार करून ते स्थायी समितीपुढे मांडले पाहिजे व त्यात त्यांच्या मते जे अन्य अधिकारी व कर्मचारी ठेवणे आवश्यक आहे, त्यांची संख्या, पदनामे व श्रेणी आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी व भत्ते देण्याची त्याने सूचना केली असेल त्यांची रक्कम व स्वरूप नमूद केले पाहिजे.

(३) स्थायी समितीने पोट-कलम (४) च्या तरतुदीच्या अधीन, असे विवरणपत्र जसेच्या तसे किंवा तिला इष्ट वाटतील असे फेरबदल करून मंजूर केले पाहिजे.

[१] [ (४) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करता येणार नाहीत :

परंतु, पदे निर्माण करण्याबाबत महानगरपालिकेकडून सर्वार्थाने परिपूर्ण असा पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर त्यावर शासनाकडून घेण्यात आलेला निर्णय असा प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत महानगरपालिकेला कळविण्यात येईल. ]

[२] [ **स्पष्टीकरण.**--वेतनमान किंवा वेतन संरचना यातील कोणतीही सुधारणा किंवा विशेष वेतन किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा भत्त्यांतील सुधारणा (महागाई भत्ता वगळून) किंवा पदनामातील बदल हे पोट-कलम (४) च्या प्रयोजनासाठी, नवीन पदाची निर्मिती असल्याचे मानण्यात येईल. ]

स्थायी अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीवर निर्बंध.

**५२.** कोणत्याही कायम अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, कलम ४० किंवा ४५ अन्वये नेमण्यात आले नसेल किंवा त्याचे पद व वित्तलब्धी ही कलम ५१, पोट-कलम (१) अन्वये ठरवलेली नसतील किंवा ती कलम ५१, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या व त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्रात समाविष्ट करण्यात आली नसतील तर, त्यास महानगरपालिका प्रशासनाच्या कोणत्याही विभागात नोकरीस लावता येणार नाही.

**नेमणुकीचा** अधिकारी कोणामध्ये निहित असणे.

**५३.** (१) [३] [ महानगरपालिकेचा जो अधिकारी, सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे ]—मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत —त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल :

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३२ याच्या कलम २१ (क) द्वारे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम २१ (ख) द्वारे हे स्पष्टीकरण दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम २२ (क) (एक) द्वारे "महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक आहे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

परंतु, आयुक्ताला [1] [ महानगरपालिकेचा सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या] कर्जाविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळवले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी —मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत —यांची नेमणुका करण्याचा अधिकार, कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळवण्याच्या अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल. मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणांत किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरवले तर, अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी – मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत —यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल :

परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि [2] [ लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या ] कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्या- नंतर नवीकरण करता येणार नाही.

नेमणुका करण्याची रीत.

**५४.** (१) आयुक्त किंवा त्याने याबाबत पदनिर्देशित केलेला कोणताही अन्य अधिकारी नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, संबंधित विभागप्रमुख व आयुक्ताने नामनिर्देशित केलेला फक्त एक अन्य अधिकारी यांची मिळून बनलेली एक कर्मचारी निवड समिती असेल.

(२) आधीच नगरपालिका सेवेत असलेल्या व्यक्तीमधून नेमणूक करण्याचे योजले असेल त्याव्यतिरिक्त किंवा नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची असून सहा महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी नसेल तर, कर्मचारी निवड समितीने नियमाद्वारे विहित केलेल्या रीतीने कलम ५३, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नेमणुकांव्यतिरिक्त व महानगरपालिका [3] [ राज्य ] शासनाच्या पूर्वमंजुरीने आदेशाद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा नेमणुकांव्यतिरिक्त नगरपालिका सेवेतील अन्य सर्व नेमणुकांसाठी उमेदवारांची निवड केली पाहिजे.

(३) नगरपालिका सेवेत नेमणुका करण्यास सक्षम असलेला प्रत्येक प्राधिकारी कर्मचारी निवड समितीने दिलेल्या निदेशानुसार अशा रीतीने निवडलेल्या उमेदवारांच्या नेमणुका करील.

(४) प्रकरण २० अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संदर्भात या कलमाच्या तरतुदी त्यात "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून लागू होतील.

---

१ वरील अधिनियमाच्या कलम २२ (क) (दोन) द्वारे "भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक मासिक वेतन असलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३२ याचा कलम २२ (ख) द्वारे "भत्ते वगळून शंभर रुपयांहून अधिक मासिक वेतन असलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(५) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक नियमात स्पष्टपणे तरतूद केली असेल, त्याव्यतिरिक्त, अशा नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

प्रकरण २० अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत व्यावृत्ती.

**५५.** प्रकरण २० च्या तरतुदीन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कलम ५१, ५२ व ५३ यातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**शास्ती लादणे**

नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शास्ती लादणे.

**५६.** (१) एखादा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी विभागीय नियमांचा किंवा शिस्तीचा भंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणा किंवा कर्तव्यात हयगय केल्याबद्दल किंवा अन्य गैरवर्तणुकीबद्दल दोषी आहे किंवा तो अक्षम आहे याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, त्यास, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन अशा अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तींपैकी कोणतीही शास्ती लादता येईल :

परंतु –

(अ) [१][सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.] अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास [२][महानगरपालिकेच्या] पूर्वसंमतीवाचून आयुक्ताकडून बडतर्फ केले जाणार नाही ;

[३][(ब) आयुक्त, प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन व्यवस्थापक वगळून, महानगरपालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, महानगरपालिकेचा आदेश होईतोपर्यंत निलंबित करू शकेल व अशा प्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी हा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्ताने ताबडतोब महानगरपालिकेस कळविली पाहिजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल :

परंतु, अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर असलेल्या आरोपांची चौकशी होईतोपर्यंत त्या अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे निलंबन हे शास्ती असल्याचे समजण्यात येणार नाही.]

(ग) आयुक्तास, [३][परिवहन व्यवस्थापक हा प्रतिनियुक्तीवर असलेला शासकीय अधिकारी असेल तर अशा परिवहन व्यवस्थापका व्यतिरिक्त,] महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यावर पोट-कलम (२), खंड (अ), (ब), [४][ * * ], (ड), [५][(ई) व (फ)] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तींपैकी कोणतीही शास्ती लादता येईल.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २३ (अ) (एक) द्वारे 'भत्ते वगळून ज्याचे मासिक वेतन हजार रुपयांहून अधिक आहे' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम २३ (अ) (दोन) द्वारे 'स्थायी समितीच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १४ (ब) द्वारे मूळ खंड (ब) ऐवजी दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १४(क)(तीन) द्वारे "परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नेमलेला अधिकारी यांच्या व्यतिरिक्त" या मजकुराऐवजी समाविष्ट केले.

४ वरील अधिनियमाच्या कलम १४ (क) (एक) द्वारे "(क)" हा मजकूर वगळला.

५ वरील अधिनियमाच्या कलम १४ (क) (दोन) द्वारे "व (ई)" या मजकुराऐवजी दाखल केले.

(क) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास व नगरपालिका सचिवास त्यांच्या हाताखाली प्रत्यक्ष काम करणाऱ्या [1][ * * * ] कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर स्थायी समितीकडे अपील करण्याच्या अधिकाराच्या अधीन, पोट-कलम (२), खंड (क), (ख), (ग), (घ) व (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तींपैकी कोणतीही शास्ती लादता येईल आणि स्थायी समितीस अशा कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर अन्य कोणतीही शास्ती लादता येईल व तसेच तिला नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक किंवा नगरपालिका मुख्य सचिव यांच्या हाताखाली प्रत्यक्ष काम करणाऱ्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर कोणतीही शास्ती लादता येईल.

[2][स्पष्टीकरण.--या कलमाच्या व कलम ५३ च्या प्रयोजनार्थ, जर एका पदाचे वेतनश्रेणीतील किमान व कमाल वेतन दुसऱ्या पदासारखेच असेल, तर ती दोन्ही पदे समतुल्य आहेत असे मानले जाईल. जर एका पदाचे किमान वेतन हे दुसऱ्या पदाच्या वेतनश्रेणीतील निदान किमान वेतनाएवढे असेल परंतु कमाल वेतन त्यापेक्षा अधिक असेल तर, पहिले पद दुसऱ्या पदापेक्षा उच्च दर्जाचे मानले जाईल. वेतन संरचनेच्या बाबतीत, जर एका पदाचे वेतन संरचनेतील श्रेणी वेतन हे दुसऱ्याएवढे किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर, पहिले पद हे दुसऱ्या पदाच्या अनुक्रमे समतुल्य किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाचे मानले जाईल.]

(२) या कलमान्वये ज्या शास्ती लादता येतील त्या पुढीलप्रमाणे आहेत :–

(अ) ठपका देणे ;

(ब) वेतनवाढ किंवा पदोन्नती रोखून ठेवणे यात दक्षतारोध ओलांडू न देणे याचा समावेश होतो ;

(क) खालच्या पदावर किंवा खालच्या समयश्रेणीत आणणे किंवा समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणणे ;

(ड) दंड करणे ;

(ई) महानगरपालिकेच्या झालेल्या कोणत्याही आर्थिक हानीची रक्कम पूर्णत: किंवा अंशत: वेतनातून वसूल करणे ;

(फ) निलंबित करणे ;

(ग) पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतून काढून टाकणे ;

(ह) पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशाप्रकारे नगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे.

(३) कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या कलमान्वये खालच्या पदावर आणणे, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे याविरुद्ध कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशारीतीने खालच्या पदावर आणता येणार नाही, सेवेतून काढून टाकता येणार नाही किंवा बडतर्फ करता येणार नाही :

परंतु, हे पोट-कलम पुढील बाबतीत लागू होणार नाही :–

(अ) जेव्हा एखाद्या व्यक्तीला, तिच्या वर्तणुकीमुळे फौजदारी आरोपावरून सिद्धापराध ठरवल्यामुळे खालच्या पदावर आणले असेल, सेवेतून काढून टाकले असेल किंवा बडतर्फ केले असेल ; किंवा

(ब) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याने लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव, एखाद्या व्यक्तीला कारण दाखवण्याची संधी देणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही याविषयी सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री झाली असेल.

---

१ वरील अधिनियमाच्या कलम १४ (ड) द्वारे "व भत्ते वगळून --- वेतन मिळविणाऱ्या" हा मजकूर वगळला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २३ (ख) द्वारे हे स्पष्टीकरण दाखल केले.

(४) पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (घ) च्या तरतुदींच्या अधीन, ज्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास खालच्या पदावर आणण्याचा, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत, ज्या प्राधिकाऱ्याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल आणि अपील प्राधिकाऱ्यास, ज्या प्राधिकाऱ्याने शास्ती लादली असेल त्याच्याकडून अभिप्राय मिळवल्यानंतर दिलेला आदेश कायम करता येईल किंवा अशा आदेशाऐवजी त्यास न्याय्य वाटेल असा आदेश देता येईल. यात एखादी कमी शास्ती लादण्याच्या आदेशाचा समावेश होतो आणि अपील प्राधिकाऱ्याने दिलेला आदेश ताबडतोब अंमलात येईल व तो निर्णायक असेल :

परंतु, या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी स्थायी समिती आयुक्ताची निकट वरिष्ठ प्राधिकारी आहे असे मानले जाईल आणि महानगरपालिका स्थायी समितीची निकट वरिष्ठ प्राधिकारी आहे असे मानले जाईल.

(५) प्रकरण २० अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संदर्भात या कलमाच्या तरतुदी त्यात "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द आणि "स्थायी समिती" या शब्दाऐवजी "परिवहन समिती" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून लागू होतील.

**स्पष्टीकरण.—**(१) या कलमाच्या प्रयोजनांसाठी सक्षम प्राधिकारी म्हणजे जो प्राधिकारी या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नगरपालिकेच्या विशिष्ट अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर नेमणूक करण्यास सक्षम असेल असा प्राधिकारी.

(२) ज्या आदेशान्वये शास्ती देण्यात आली असेल त्या आदेशाच्या निकटपूर्वीच्या तारखेस एखाद्या नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास सामान्यपणे जे मासिक वेतन अनुज्ञेय असेल ते वेतन, पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या प्रयोजनासाठी त्याचे वेतन आहे असे मानले जाईल.

### अनुपस्थिति रजा, हंगामी नेमणुका, इत्यादी

अनुपस्थिति रजा.

**५७.** (१) आयुक्तास, त्यास ज्या नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास नेमण्याचा अधिकार असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला, विनियमांच्या अधीन अनुपस्थिति रजा देता येईल आणि त्यास, परिवहन व्यवस्थापक, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष हाताखाली असलेले अधिकारी व कर्मचारी आणि प्रकरण २० अन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याला एका महिन्याहून अधिक नसेल अशा कालावधीपर्यंत अनुपस्थिति रजा देता येईल.

(२) यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास किंवा नगरपालिका सचिवास त्याच्या प्रत्यक्ष हाताखाली काम करणाऱ्या व भत्ते वगळून दीडशे रुपयांहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळणाऱ्या लिपिकाला किंवा कर्मचाऱ्याला अनुपस्थिति रजा देता येईल.

(३) स्थायी समितीस, परिवहन व्यवस्थापक आणि प्रकरण २० अन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खाली न येणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला अनुपस्थिति रजा देता येईल.

**५८.** (१) ज्या प्राधिकाऱ्याने एखाद्या अधिकाऱ्याला अनुपस्थिति रजा दिली असेल त्या प्राधिकाऱ्यास, आवश्यक वाटेल तेव्हा व विनियमांच्या अधीन, अनुपस्थिति रजेवर असलेल्या अधिकाऱ्याच्या जागी काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल ; इंगामी नेमणुका.

परंतु —

(अ) कलम ४५ अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास एक महिन्याहून अधिक कालावधीसाठी अनुपस्थिति रजा देण्यात आली असेल तेव्हा, त्याच्या जागी काम करण्यासाठी महानगरपालिकेने एखाद्या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे आणि नगरपालिका सचिवाच्या जागी काम करण्यासाठी केलेल्या नेमणुकीव्यतिरिक्त, ती [१][राज्य] शासनाला ताबडतोब कळविली पाहिजे.

(ब) खंड (अ) अन्वये [१][राज्य] शासनास कळविण्यात आलेली कोणतीही नेमणूक त्यास ना मंजूर करता येईल आणि ती अशा रीतीने [१][राज्य] शासनाचा नामंजुरीचा आदेश महानगरपालिकेस मिळाल्याच्या तारखेपासून रद्दबातल होईल.

(२) या कलमान्वये कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या जागी काम करण्यासाठी नेमलेली व्यक्ती अशारीतीने काम करताना, असा अधिकारी किंवा कर्मचारी जी कर्तव्ये पार पाडण्यास बांधलेला असेल किंवा ज्या अधिकारांचा वापर करण्यास पात्र असेल किंवा ज्या दायित्वांच्या, निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीन असेल, तीच कर्तव्ये पार पाडील व त्याच अधिकारांचा वापर करील व त्याच दायित्वांच्या, निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीन असेल.

## नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची अनर्हता

**५९.** (१) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [२][ * * * * * ] कोणत्याही व्यक्तीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर ती व्यक्ती नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून पदावर राहण्यास अनर्ह असेल. नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची अनर्हता.

(२) जो कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी उपरोक्त अशा कोणत्याही संविदेत [३][ * * * ] स्वत: किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही भाग किंवा हितसंबंध संपादन करील, तो नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून असण्याचे बंद होईल व त्याचे पद रिकामे होईल.

(३) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही संविदेत [४][ * * * ] जो कोणताही भाग किंवा हितसंबंध धारण करण्यास कलम १०, पोट-कलम (२) खंड (ख), उप-खंड (दोन) किंवा (चार) अन्वये पालिका सदस्यास परवानगी आहे व जो धारण केल्यामुळे पालिका सदस्य होण्यास अनर्ह ठरत नाही अशा कोणत्याही भागास किंवा हितसंबंधास या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ७ (अ) द्वारे "किंवा महानगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेने" या मजकुराने सुरू होणारा व "कोणत्याही नोकरीत" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) द्वारे "किंवा नोकरीत" हे शब्द वगळण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७ (क) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खटला भरण्यास मंजुरी देणे.

[1] [ **५९-अ.** कलम ५३ किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलिसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती महानगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील.]

**स्पष्टीकरण.—**"नगरपालिका अधिकारी" या संज्ञेत, कलम ४० अन्वये नेमलेला परिवहन व्यवस्थापक व कलम ४१ अन्वये परिवहन व्यवस्थापक म्हणून काम करण्यासाठी नेमलेली कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो.

नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिकेने पुरवलेल्या जागांचा भोगवटा करणे व त्या सोडण्याची जबाबदारी.

**६०.** (१) जो कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी महानगरपालिकेने त्यास राहण्यासाठी पुरवलेल्या कोणत्याही जागेचा भोगवटा करत असेल त्याने—

(अ) महानगरपालिकेकडून सामान्यत: किंवा विशेष बाबतीत विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व अटींच्या अधीन, अशा जागेचा भोगवटा केला पाहिजे, आणि

(ब) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, त्याने महानगरपालिकेच्या नोकरीचा राजीनामा दिल्यावर, त्यास बडतर्फ करण्यात आल्यावर, काढून टाकण्यात आल्यावर किंवा तो सेवानिवृत्त झाल्यावर अशी जागा सोडली पाहिजे किंवा जेव्हा जेव्हा आयुक्तास महानगरपालिकेच्या संमतीने, त्यास तसे करण्यास फर्मावणे आवश्यक व इष्ट आहे असे वाटेल तेव्हातेव्हा त्याने अशी जागा सोडली पाहिजे.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये कोणतीही जागा सोडण्यास बांधलेली असेल किंवा तिला तसे करण्यास फर्मावण्यात आले असेल व तिने तसे करण्यात कसूर केली तर, आयुक्तास अशा व्यक्तीला अशी जागा सोडून देण्याविषयी आदेश देता येईल आणि अशा व्यक्तीने अशा जागेत राहू नये व तीत पुन्हा प्रवेश करू नये म्हणून उपाययोजना करता येतील.

(३) प्रकरण २० अन्वये नेमलेल्या नगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या संदर्भात, या कलमाच्या तरतुदी त्यात "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून लागू होतील.

## प्रकरण चार-अ

## विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे

विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.

[2] [ **६०-अ.** (१) महानगरपालिका आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्याची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेला प्रकट करता येईल.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४ द्वारे कलम ५९-अ दाखल केले.

२ सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ द्वारे प्रकरण ४-अ दाखल केले.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,–

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन ) इंटरनेटवर ;

(तीन) महानगरपालिकेच्या मुख्यालयामधील तसेच प्रभाग कार्यालयांमधील सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने,

माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, महानगरपालिका ती माहिती प्रकट करेल.

(३) महानगरपालिकेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) महानगरपालिकेचा तपशील ;

(दोन) महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र-मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहिचा लेखापरीक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल ;

(आठ) महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती ;

(अकरा) महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने ;

(ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.]

## प्रकरण पाच

## अत्यावश्यक सेवा

अत्यावश्यक सेवेतील व्यक्तींनी परवानगी-शिवाय राजीनामा न देणे इत्यादी.

**६१.** (१) **अत्यावश्यक** सेवेतील कोणत्याही व्यक्तीने—

(अ) आयुक्ताच्या किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय, आजारपणामुळे किंवा अपघातामुळे ती आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत किंवा आयुक्ताने किंवा अशा अधिकाऱ्याने पुरेसे म्हणून स्वीकृत केलेल्या कारणाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी आयुक्तास निदान दोन महिन्यांची नोटीस दिल्यावाचून आपल्या पदाचा राजीनामा देता कामा नये, आपल्या पदाच्या कर्तव्यातून अंग काढून घेता कामा नये किंवा अशी कर्तव्ये बजाविताना गैरहजर राहता कामा नये, किंवा

(ब) आपली कर्तव्ये बजावितांना हयगय करता कामा नये किंवा ती बजाविण्याचे नाकारता कामा नये किंवा आयुक्ताच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या मते अकार्यक्षम असेल अशारीतीने ती जाणून-बुजून बजाविता कामा नये,

(२) प्रकरण २० अन्वये नेमलेल्या अत्यावश्यक सेवेतील व्यक्तीच्या संदर्भात, या कलमाच्या तरतुदी त्यात "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून लागू होतील.

**६२.** कोणत्याही अत्यावश्यक सेवा बजावण्याचे काम बंद पाडण्यामुळे किंवा बंद पडण्यामुळे शहरातील लोकांच्या सुरक्षिततेस किंवा आरोग्यास किंवा त्यांच्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या सेवा चालू ठेवण्यास बाधा येईल असे [1][राज्य] शासनाचे मत होईल तर, त्यास, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, शहरात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे अशा अत्यावश्यक सेवांमधील कोणत्याही व्यक्तीने अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत, त्यावेळी कोणताही कायदा अंमलात असला किंवा कोणताही करार करण्यात आला असला तरीही ;

आणीबाणी जाहीर करण्याचा [1][राज्य] शासनाचा अधिकार.

(अ) आजारपणामुळे किंवा अपघातामुळे ती आपली कर्तव्ये बजाविण्यास असमर्थ झाली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत तिने आपल्या पदाच्या कर्तव्यातून अंग काढून घेऊ नये किंवा अशी कर्तव्ये बजावितांना गैरहजर राहू नये.

(ब) आपली कर्तव्ये बजाविताना हयगय करू नये, ती बजाविण्याचे नाकारू नये किंवा [1][राज्य] शासन याबाबत विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्यांच्या मते अकार्यक्षम असेल अशारीतीने ती जाणून-बुजून बजावू नये.

## प्रकरण सहा

## नगरपालिका प्राधिकारी व अधिकारी यांची कर्तव्ये व अधिकार

### महानगरपालिकेची आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्ये

**६३.** ज्या साधनांचा वापर करण्यास किंवा ज्या उपाययोजना करण्यास महानगरपालिका कायदेशीररीत्या सक्षम असेल अशा कोणत्याही साधनांचा वापर करून किंवा अशा कोणत्याही उपाययोजना करून पुढीलपैकी प्रत्येक बाबीसाठी वाजवी व पुरेशी तरतूद करणे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य असेल, त्या बाबी अशा :—

महानगर-पालिकेने तरतूद करावयाच्या बाबी.

(१) शहराच्या सीमा किंवा त्या सीमांमधील फेरफार दर्शवणारी भक्कम सीमा चिन्हे [1][राज्य] शासन मान्य करील अशाप्रकारे व अशा ठिकाणी उभारणे ;

[2][(१-अ) सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना आखणे ;

(१-ब) नागरी वनीकरण, पर्यावरण संरक्षण व पारिस्थितिकीय गोष्टींना चालना देणे ] ;

(२) शहरातील सर्व सार्वजनिक रस्ते व जागा यावर पाणी शिंपणे, त्यांची झाडलोट व साफ-सफाई करणे आणि तेथून केरकचरा काढून नेणे ;

(३) मलजल, दुर्गंधियुक्त पदार्थ व कचरा गोळा करणे, काढून नेणे, त्याची व्यवस्था व विल्हेवाट लावणे आणि [1][राज्य] शासनाने तसे फर्मावल्यास असे मलजल, दुर्गंधियुक्त पदार्थ कचरा यांपासून मिश्रखत तयार करणे ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६५ द्वारे खंड (१-अ) व (१-ब) समाविष्ट केले.

(४) नाल्या व नि:सारणाची कामे आणि सार्वजनिक शौचकूप, संडास, मुताऱ्या व तत्सम सोयी बांधणे, सुस्थितीत ठेवणे व त्यांची साफ-सफाई करणे ;

(५) आग विझवण्यासाठी व आगीपासून जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य त्या उपयंत्रांनी सुसज्ज असे अग्निशामक पथक तयार ठेवणे ;

(६) सांसर्गिक किंवा संक्रामक रोगाने आजारी असलेल्या किंवा अशा रोगाची बाधा झाल्याची शंका असलेल्या व्यक्तींना वेगळे ठेवण्यासाठी व उपचार करण्यासाठी असलेल्या रुग्णालयांसहित सार्वजनिक रुग्णालये व दवाखाने बांधणे किंवा संपादन करणे व ती सुस्थितीत ठेवणे आणि सार्वजनिक वैद्यकीय सहाय्यासाठी आवश्यक असतील अशा अन्य उपाययोजना करणे ;

(७) महानगरपालिकेमध्ये निहित असलेले सार्वजनिक रस्ते, नगरपालिका बाजार व सार्वजनिक इमारती या ठिकाणी दिवाबत्ती करणे ;

(८) महानगरपालिकेचे कार्यालय व महानगरपालिकेमध्ये निहित असलेली सार्वजनिक स्मारके, खुल्या जागा व अन्य मालमत्ता सुस्थितीत ठेवणे ;

(९) महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नाव देणे किंवा त्यांवर क्रमांक घालणे आणि अन्य जागांवर क्रमांक घालणे ;

(१०) उपद्रवकारक व धोकादायक उद्योग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे ;

(११) प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठेवणे, त्या बदलणे व त्यांचे नियमन करणे आणि उक्त प्रयोजनांसाठी नवीन जागांची तरतूद करणे व बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावणे ;

(१२) सार्वजनिक बाजार व कत्तलखाने बांधणे किंवा संपादन करणे व ते सुस्थितीत ठेवणे आणि सर्व बाजार व कत्तलखाने यांचे नियमन करणे ;

(१३) कोंडवाडे बांधणे किंवा संपादन करणे व ते सुस्थितीत ठेवणे ;

(१४) *मुंबई जिल्हा लसटोचणी अधिनियम, १८९२ च्या तरतुदींनुसार लोकांना लस टोचणे ; १८९२ चा मुंबई १.

(१५) प्राथमिक शिक्षणासाठी शाळा चालवणे, त्यांना मदत देणे व त्यांच्यासाठी योग्य जागेची व्यवस्था करणे ;

(१६) रोगट वस्त्यांची सुधारणा, उपद्रवकारक झाडेझुडपे काढून टाकणे व सामान्यपणे सर्व उपद्रवांचे उपशमन करणे ;

(१७) जन्म व मृत्यू यांची नोंदणी ;

---

* आता, महाराष्ट्र लसटोचणी अधिनियम, १९६४ (सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम ३७) पहा.

(१८) सार्वजनिक रस्ते, पूल, भुयारी मार्ग, अध:प्रणाल, सेतूमार्ग व तत्सम कामे बांधणे, सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार करणे व ती सुधारणे ;

(१९) रस्ते, पूल व अन्य सार्वजनिक जागा यातील किंवा यावरील अडथळे व पुढे आलेले भाग काढून टाकणे ;

(२०) महानगरपालिकेच्या सर्व पाणीपुरवठा केंद्रांची व्यवस्था, ती सुस्थितीत ठेवणे आणि सार्वजनिक व खाजगी प्रयोजनांसाठी पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक अशी नवीन बांधकामे बांधणे किंवा संपादन करणे ;

(२१) दुर्धर रोगांच्या प्रसारास प्रतिबंध करणे व आळा घालणे ;

(२२) धोक्याच्या इमारती किंवा जागा सुरक्षित करणे किंवा काढून टाकणे ;

(२३) नगरपालिकेच्या साफ-सफाई कर्मचारीवर्गासाठी निवासस्थाने बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

(२४) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये असलेली कोणतीही जबाबदारी पार पाडणे ;

(२५) वर विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी पुरेशी तरतूद करण्याच्या अधीन, दुष्काळाच्या व टंचाईच्या वेळी शहरातील निराश्रित लोकांना मदत देणे व अशा वेळी दुर्भिक्षनिवारक कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार करण्यासाठी महानगर-पालिकेने तरतूद करणे.

**६४.** पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दंशावर औषधोपचार घेण्यासाठी योग्य ठिकाण म्हणून [१] [ राज्य ] शासन शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे शहरामधील किंवा बाहेरील जी कोणतीही संस्था जाहीर करील त्या संस्थेस, तिला लागू असलेल्या नियमानुसार पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दंशावर उपचार करून घेण्यासाठी गरीब लोक जातील व औषधोपचार करून घेतील त्यांच्या पोषणाचा व औषधोपचाराचा खर्च व त्यांचा आवश्यक तो अन्य खर्च महानगरपालिकेने [१] [ राज्य ] शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळो-वेळी विहित करील त्या दरानी व त्या शर्तींच्या अधीन राहून दिला पाहिजे ;

परंतु, गरीब व्यक्ती म्हणून, पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर उपरोक्त संस्थेत औषधोपचार करून घेण्यासाठी अशा कोणत्याही संस्थेत जाणारी कोणतीही व्यक्ती, अशा संस्थेत तिला दाखल करण्याच्या निकटपूर्वी त्या शहरात निदान एक वर्ष राहत नसेल व ती अशा संस्थेत त्या शहरातून आली नसेल, तर तिच्या पोषणाचा, औषधोपचाराचा व अन्य आवश्यक खर्च देण्यास महानगरपालिका या कलमान्वये जबाबदार असणार नाही.

---

१ ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

वेडे व कुष्ठरोगी यांच्या पोषणासाठी महानगर-पालिकेने तरतूद करणे.

**६५.** (१) * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण ३४ अन्वये ज्यांच्या बाबतीत बंदिवासात ठेवण्यासंबंधी आदेश अंमलात नसेल अशा अकिंचन वेड्यांसाठी व शहरातील किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमिती अन्वये शहरातून बाहेर नेलेल्या कुष्ठ रोग्यांसाठी योग्य ठिकाण म्हणून [१][राज्य] शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जाहीर करील अशा शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही उपचारगृहात, रुग्णालयात किंवा घरात निर्वाहासाठी व उपचारासाठी त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्तीसाठी [१][राज्य] शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी विहित करील अशा दरानी, महानगरपालिका पैसे देईल : १८९८ चा ५.

परंतु, कोणत्याही वेड्यास किंवा कुष्ठरोग्यास उपरोक्त अशा कोणत्याही उपचारगृहात, रुग्णालयात किंवा घरात दाखल करून घेण्याच्या निकटपूर्वी तो शहरात निदान एक वर्ष राहत नसेल तर, त्यांच्या पोषणासाठी किंवा औषधोपचारासाठी महानगरपालिका या कलमान्वये जबाबदार असणार नाही.

आणखी असे की [१][राज्य] शासनाने विहित केलेले दर हे, ज्या वेड्यांच्या निर्वाहासाठी व औषधोपचारासाठी महानगरपालिका या कलमान्वये पात्र असेल त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्तींच्या निर्वाहाकरिता व औषधोपचाराकरिता आलेल्या एकूण खर्चाच्या निम्म्याहून अधिक असता कामा नये ;

तसेच, भारतीय वेड्यांबाबतचा अधिनियम, १९१२ कलम, ८८ अन्वये न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल तेव्हा अशी, वेडी व्यक्ती अकिंचन नाही व अशा वेड्या व्यक्तीचा निर्वाह चालवता येईल अशी तिची संपत्ती आहे किंवा तिचा निर्वाह चालवण्यास कायद्याने बांधलेली व निर्वाह चालवण्याची ऐपत असलेली व्यक्ती आहे हे दाखवण्याची महानगरपालिकेला संधी दिल्यावाचून, अशा वेड्या व्यक्तीच्या निर्वाहाचा खर्च, महानगरपालिकेने देण्याविषयी कोणताही आदेश देता कामा नये. १९१२ चा ५.

(२) या कलमान्वये ज्यांच्या निर्वाहासाठी व औषधोपचारासाठी महानगरपालिका जबाबदार आहे अशा वेड्यांना किंवा कुष्ठरोग्यांना ज्यात दाखल करण्यात आले असेल त्या उपचारगृहाच्या, रुग्णालयाच्या किंवा घराच्या प्रभारी अधिकाऱ्याने अशा उपचारगृहात, रुग्णालयात किंवा घरात दाखल केलेल्या अशा प्रत्येक वेड्याच्या व कुष्ठरोग्यांच्या पोषणासाठी व औषधोपचारासाठी केलेल्या खर्चाचा स्पष्ट हिशेब ठेवला पाहिजे, व त्या हिशेबाची एक प्रत महानगरपालिकेस पुरवली पाहिजे.

महानगर-पालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार, तरतूद करता येईल अशा बाबी.

**६६.** महानगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी वेळोवेळी पूर्णत: किंवा अंशत: तरतूद करता येईल :—

(१) ज्या व्यक्ती अपंग किंवा आजारी आहेत किंवा बऱ्या होण्यासारख्या नाहीत अशा व्यक्तींची काळजी घेण्यासाठी किंवा आंधळे, बहिरे, मुके किंवा अन्यथा विकलांग व्यक्ती किंवा अधू बालके यांची काळजी घेण्यासाठी व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शहरात किंवा शहराबाहेर संस्था स्थापन करणे, चालवणे किंवा तिची व्यवस्था ठेवणे ;

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[1][(१-अ) गलिच्छ वस्त्यांची सुधारणा व त्यांचा दर्जा वाढवणे ;

(१-ब) नागरी क्षेत्रातील गरिबी कमी करणे ;

(१-क) कोंडवाडे उघडणे व प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करणे ;

(१-ड) धर्मसंस्करणीचे नियमन ;]

(२) प्रसूतिगृहे व बाल कल्याण केंद्र स्थापन करणे, चालवणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(३) गर्भवती स्त्रियांसाठी किंवा अंगावर पाजणाऱ्या मातांसाठी किंवा बालकांसाठी किंवा शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतूद करणे ;

(४) पाणी, अन्न किंवा औषधिद्रव्ये यांची तपासणी किंवा पृथक्करण करण्याकरिता किंवा रोग शोधून काढण्याकरिता किंवा सार्वजनिक आरोग्यासंबंधी संशोधन करण्याकरिता रासायनिक किंवा अणुजीवशास्त्रीय प्रयोगशाळा स्थापन करणे, चालविणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(५) पोहण्याचे तलाव, धुण्याच्या सार्वजनिक जागा, सार्वजनिक स्नानगृहे व सार्वजनिक आरोग्य सुधारण्याच्या हेतू असलेल्या अन्य संस्था ;

(६) शहरातील रहिवाशांच्या हितासाठी दूध व दुधापासून तयार होणारे पदार्थ यांचा पुरवठा, व वाटप व त्याबाबत प्रक्रिया करण्यासाठी दुग्धशाळा किंवा दुग्धशाळा प्रक्षेत्रे ;

(७) सार्वजनिक रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी माणसांसाठी पिण्याच्या पाण्याचे नळ व जनावरांसाठी पाण्याचे हौद बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे ;

(८) सडकांच्या बाजूस व अन्य ठिकाणी झाडे लावणे व त्यांची निगा ठेवणे ;

(९) लोकांसाठी संगीताची तरतूद करणे ;

(१०) सार्वजनिक उद्याने, बागा, क्रीडांगणे व मनोरंजनासाठी जागा यांची तरतूद करणे ;

(११) प्रदर्शने, व्यायामाचे किंवा अन्य खेळांचे सामने भरवणे ;

(१२) शहरातील निवासगृहे, छावणीची मैदाने व विश्रामगृहे यांचे विनियमन ;

(१३) रुग्णवाहिका सेवेची व्यवस्था ;

(१४) नाट्यगृहे, विश्रामगृहे व अन्य सार्वजनिक इमारती बांधणे, स्थापन करणे व त्या सुस्थितीत ठेवणे.

(१५) टंचाईच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची विक्री करण्याकरिता दुकाने किंवा विक्री केंद्रे स्थापन करणे किंवा चालवणे ;

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६६ द्वारे "खंड (१-अ) ते खंड (१-ड)" समाविष्ट केले.

(१६) नगरपालिका अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणे किंवा खरेदी करणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

(१७) [1][ * * * ] नगरपालिका कर्मचाऱ्यांना घरबांधणीसाठी महानगरपालिकेकडून विहित करण्यात येतील अशा अटींच्या व शर्तीच्या अधीन कर्जे देणे ;

(१८) नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाययोजना करणे ;

(१९) वीजशक्ती किंवा गॅस पुरवण्याकरिता कोणतेही उपक्रम खरेदी करणे किंवा जनतेच्या सर्वसाधारण हिताकरता असा कोणताही उपक्रम सुरू करणे किंवा त्यास अर्थसहाय्य देणे ;

(२०) शहरात किंवा शहराबाहेर लोकांची किंवा मालाची ने-आण करण्यासाठी छोटे लोहमार्ग, ट्राम मार्ग बांधणे बिनरूळाच्या ट्रामगाड्या खरेदी करणे, किंवा मोटार परिवहनाच्या सोयी संघटित करणे व वरील  सर्व गोष्टी सुस्थितीत राखणे किंवा त्यांची व्यवस्था पाहणे.

(२१) कलम ६३, खंड (१५) मध्ये उल्लेख केलेल्या उद्दिष्टांव्यतिरिक्त अन्य शैक्षणिक उद्दिष्टे पार पाडणे व शहरातील किंवा शहराबाहेरील शैक्षणिक परिसंस्थांना अनुदाने देणे ;

(२२) ग्रंथालये, संग्रहालये व कलादालने, वनस्पती-संग्रहालये किंवा प्राणी संग्रहालये स्थापन करणे, ती सुस्थितीत राखणे किंवा त्यांना मदत देणे आणि त्यांच्यासाठी इमारती खरेदी करणे किंवा बांधणे ;

(२३) प्राण्यासाठी अपंगालये किंवा रुग्णालये बांधणे किंवा चालवणे ;

(२४) उपद्रव देणाऱ्या पक्षांचा किंवा प्राण्यांचा किंवा जीवजंतूंचा नाश करणे व भटकणाऱ्या किंवा मालक नसलेल्या कुत्र्यांना अटकावून ठेवणे किंवा त्यांचा नायनाट करणे ;

(२५) शहरातील लोकांच्या दु:खनिवारणासाठी किंवा सार्वजनिक कल्याणासाठी उभारलेल्या कोणत्याही सार्वजनिक निधीस अंशदान देणे ;

(२६) उल्लेखनीय व्यक्तींना देण्यासाठी मानपत्रे तयार करणे किंवा ती त्यांना देणे ;

(२७) विवाह नोंदणी ;

(२८) जीवनविषयक आकडेवारीची नोंद अचूकपणे करण्यास साह्यभूत ठरेल अशा प्रकारची माहिती देण्याबद्दल बक्षिसे देणे ;

(२९) कोणत्याही वृत्तिधारी दंडाधिकाऱ्याचे न्यायालय चालवण्याच्या संबंधात वेतन व भत्ते, भाडे व अन्य खर्च किंवा अशा खर्चाचा कोणताही भाग देणे ;

---

१ "चारशे रुपयांहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळणाऱ्या" हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम २ द्वारे वगळण्यात आला.

(३०) चराई क्षेत्रे संपादन करणे व ती सुस्थितीत राखणे व गुरांच्या पैदाशीसाठी वळू ठेवणे व त्यांची निगा राखणे ;

(३१) मलजलाची विल्हेवाट लावण्याकरता प्रक्षेत्रे किंवा कारखाने स्थापन करणे व ते सुस्थितीत राखणे ;

(३२) महानगरपालिकेने मान्य केलेल्या सामान्य पद्धतीनुसार जागांत किंवा जागांच्या उपयोगाकरिता त्या जागांतील मलजल महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील नाल्यांमध्ये नेऊन सोडण्यासाठी पात्रे, जोडणीकामे, नळ व अन्य कोणतीही उपकरणे पुरवणे, तयार करणे व ती सुस्थितीत राखणे.

(३३) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी, नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांच्या उल्लंघनासंबंधी माहिती देण्याबद्दल बक्षिसे देणे ;

(३४) कोणत्याही क्षेत्रात – मग तेथे पूर्वीच इमारती बांधलेल्या असोत किंवा नसोत – नवीन सार्वजनिक रस्ते आखणे आणि त्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करणे आणि अशा रस्त्याला किंवा रस्त्यांना लागून इमारती बांधण्याकरिता किंवा त्यांच्या अंगणाकरिता आवश्यक असलेली जमीन संपादन करणे ;

(३५) गरीब व कामगार वर्गासाठी राहण्यास योग्य अशी घरे बांधणे किंवा खरेदी करणे व ती सुस्थितीत राखणे किंवा अशा घरांची तरतूद करण्याची आवड असलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस किंवा संघास कर्जे किंवा अन्य सवलती देणे ;

(३६) निराश्रित किंवा गृहहीन व्यक्तींसाठी आश्रयस्थानांची व गरिबांसाठी कोणत्याही स्वरूपाच्या मदतीची तरतूद करणे ;

(३७) भाड्याच्या वाहनांसाठी किंवा गाड्यांसाठी वापरण्यात येणारे घोडे, तट्टे किंवा गुरे यांच्यासाठी किंवा दुभत्या गुरांसाठी आरोग्यप्रद तबेले किंवा गोठे बांधणे किंवा खरेदी करणे व ते सुस्थितीत ठेवणे ;

(३८) इमारतीचे किंवा जमिनीचे भूमापन ;

(३९) शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना करणे ;

(४०) स्थानिक स्वयंशासन संस्था, मुंबई हिच्या निधीस अंशदान देणे ;

[१][(४१) कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रम यांसाठी कोणतेही अंशदान देणे :

परंतु असे की, कोणत्याही शासकीय वर्षामध्ये अशा अंशदानापोटी केलेला एकूण खर्च, पंचवीस हजार रुपये किंवा राज्य शासन याबाबतीत **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी त्यापेक्षा मोठी रक्कम, यापेक्षा अधिक असता कामा नये ; ]

---

१ खंड (४१) हा सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ८ द्वारे मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आला.

[1][(४१-अ) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने व राज्य शासन ज्या अटी व शर्ती लादील त्यास अधीन राहून कत्तलखाना चालविण्यासाठी अथवा उभारण्यासाठी किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये महानगरपालिकेवर लादलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेला उपयुक्त ठरतील अशा इतर कोणत्याही सेवांची शहरात तरतूद करण्यासाठी स्थापन केलेल्या किंवा स्थापन करावयाच्या, मर्यादित दायित्व असलेल्या, कोणत्याही कंपनीच्या किंवा सहकारी संस्थेच्या भागभांडवलास अंशदान देणे.]

(४२) सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य, सोय किंवा शिक्षण यांचे संवर्धन होण्याचा संभव असेल अशी यात यापूर्वी खास निर्दिष्ट न केलेली कोणतीही उपाययोजना करणे.

कामे अभिकरणांनी पार पाडणे.

[2][**६६-अ.** या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये महानगरपालिकेवर कोणतेही कर्तव्य लादण्यात आले असेल किंवा कोणतेही काम तिला नेमून देण्यात आलेले असेल, किंवा राज्य शासनाकडून किंवा एखाद्या इतर प्राधिकरणाकडून एखादी योजना राबवण्याचे काम महानगरपालिकेकडे सोपविण्यात आलेले असेल त्या बाबतीत,—

(एक) महानगरपालिकेला स्वत:च अशी कर्तव्ये पार पाडता येतील किंवा अशी कामे करता येईल, किंवा अशा योजना राबवता येतील ; किंवा

(दोन) राज्य शासन देईल अशा निदेशाच्या आणि ठरवून देईल अशा अटींच्या व शर्तीच्या अधीन राहून कोणत्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची, करण्याची किंवा राबवण्याची व्यवस्था करता येईल ;

परंतु, महानगरपालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी, राज्य शासन ठरवून देईल अशा अटींशी व शर्तीशी विसंगत नसलेल्या अटी व शर्तीदेखील विनिर्दिष्ट करता येतील.]

## निरनिराळ्या नगरपालिका प्राधिकाऱ्यांची कामे

निरनिराळ्या नगरपालिका प्राधिकाऱ्यांची कामे.

**६७.** (१) निरनिराळ्या नगरपालिका प्राधिकाऱ्यांची कामे, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार विशेष रीतीने विहित करण्यात येतील अशी असतील.

(२) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, शहरातील पालिका शासन महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

---

१ खंड (४१-अ) हा सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६८, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६७ द्वारे ''कलम ६६-अ'' समाविष्ट केले.

(३) जेव्हा जेव्हा या अधिनियमात स्पष्टपणे तसा निदेश देण्यात आला असेल तेव्हा तेव्हा महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या मान्यतेस किंवा मंजुरीस अधीन राहून, तसेच या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये घातलेले अन्य सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यांस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदींची व त्यावेळी अंमलात असलेल्या ज्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये महानगरपालिकेकडे कोणतेही कर्तव्य सोपवले असेल किंवा कोणताही अधिकार प्रदान केला असेल त्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेला संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्ताकडे निहित असेल ; तसेच त्याने —

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये त्याच्याकडे विनिर्देशपूर्वक सोपवलेली सर्व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत व प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर केला पाहिजे ;

(ब) नगरपालिका सचिव व नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व त्यांच्या प्रत्यक्ष हाताखाली काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अन्य सर्व नगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये विहित केली पाहिजेत, आणि त्यांच्या कृत्यांवर व कार्यवाहीवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवले पाहिजे, आणि विनियमांस अधीन राहून, उक्त अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, वेतन, विशेषाधिकार व भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढले पाहिजेत ;

(क) कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखाद्या नगरपालिका प्राधिकाऱ्याच्या किंवा [१][राज्य] शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे ;

परंतु, आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च याविषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे.

(ड) या अधिनियमान्वये परिवहन व्यवस्थापकाकडे सोपविलेली कर्तव्ये व प्रदान केलेले अधिकार त्याच्या अनुपस्थितीत किंवा त्याने अशी कर्तव्ये पार पाडण्यात किंवा अशा अधिकारांचा वापर करण्यात कसूर केल्यास, पार पाडले पाहिजेत व वापरले पाहिजेत.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(४) जेव्हा जेव्हा या अधिनियमात स्पष्टपणे तसा निदेश देण्यात आला असेल तेव्हा तेव्हा, महानगरपालिकेच्या किंवा परिवहन समितीच्या मान्यतेस अधीन राहून, तसेच या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये घातलेले अन्य सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यांस अधीन राहून, प्रकरण २० च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यास आवश्यक असलेले संपूर्ण कार्यकारी अधिकार परिवहन व्यवस्थापकाकडे निहित असतील ; तसेच त्याने —

(अ) या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरित्या सोपविलेली सर्व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत व प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर केला पाहिजे आणि परिवहन समिती त्यास फर्मावील अशी परिवहन उपक्रमांच्या संबंधातील अन्य कर्तव्ये पार पाडली पाहिजेत ;

(ब) प्रकरण २० अन्वये नियुक्त केलेल्या सर्व नगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कामे विहित केली पाहिजेत व त्यांच्या कृत्यांवर व कामांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवले पाहिजे आणि विनियमांस अधीन राहून, उक्त अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, वेतन, विशेषाधिकार व भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढले पाहिजेत ;

(क) आणीबाणीच्या परिस्थितीत, मानवी जीविताच्या किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी किंवा परिवहन उपक्रमाने जनतेसाठी तरतूद केलेली सेवा चालू ठेवण्यासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही केली पाहिजे ; असे केल्यावर, त्याने आपण केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल, तो खर्च याविषयीचे प्रतिवृत्त परिवहन समितीकडे ताबडतोब पाठविले पाहिजे.

पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल.

[1][**६७ अ.** आयुक्त, शहरातील पर्यावरणाच्या स्थितीबाबतचा, राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा बाबींचा समावेश असलेला, लगतपूर्ववर्ती सरकारी वर्षासंबंधीचा अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा पद्धतीने दर वर्षी ३१ जुलै पूर्वी महानगरपालिकेसमोर ठेवील.]

आयुक्ताने अन्य कायद्यांखालील महानगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करणे व कर्तव्ये पार पाडणे.

**६८.** (१) त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये महानगरपालिकेला प्रदान केलेले किंवा तिच्याकडे सोपविलेले किंवा तिच्यामध्ये निहित असलेले कोणतेही अधिकार, कर्तव्ये व कामे, अशा कायद्यांच्या तरतुदींच्या व महानगरपालिका घालील अशा निर्बंधाच्या मर्यादांच्या व शर्तींच्या अधीन आयुक्ताने वापरले पाहिजेत, बजावली पाहिजेत व केली पाहिजेत.

(२) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, लेखी आदेशाद्वारे, कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास आयुक्ताच्या नियंत्रणाखाली व त्याच्या पुनर्रीक्षणाच्या आणि त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन, अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास, कर्तव्य किंवा काम बजावण्यास किंवा काम करण्यास अधिकार देता येतील.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६८ द्वारे "कलम ६७ ब" समाविष्ट केले.

**नगरपालिका अधिकाऱ्यांना आयुक्ताचे किंवा परिवहन व्यवस्थापकाचे काही अधिकार इत्यादींचा वापर करण्यास अधिकार प्रदान करता येईल.**

**६९.** (१) पोट-कलमे (२) व (३) च्या तरतुदींच्या अधीन, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींन्वये किंवा तद्‌नुसार आयुक्त किंवा परिवहन व्यवस्थापक यास प्रदान केलेले किंवा त्याच्याकडे सोपवलेले किंवा त्याच्यामध्ये निहित असलेले कोणतेही अधिकार, कर्तव्ये किंवा कामे ही, आयुक्त किंवा परिवहन व्यवस्थापक याबाबत लेखी आदेशाद्वारे सामान्यपणे किंवा विशेषरित्या ज्याला अधिकार प्रदान करील अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास यथास्थिती, आयुक्ताच्या किंवा परिवहन व्यवस्थापकाच्या नियंत्रणाखाली व त्याच्या पुनर्रीक्षणाच्या व नियमाद्वारे विहित करण्यात येतील अशा किंवा या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा नियमांशी विसंगत नसेल अशा रितीने त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन वापरता येतील, बजावता येतील, किंवा करता येतील, आणि कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास अशा रीतीने अधिकार प्रदान करण्यात येतील त्या मर्यादेपर्यंत या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीत आलेल्या "आयुक्त" व "परिवहन व्यवस्थापक" या शब्दात अशा अधिकाऱ्याचा समावेश होतो असे मानले जाईल.

(२) आयुक्तास पुढील कोणतीही कलमे, पोट-कलमे व खंड या खालील त्याचे अधिकार, कर्तव्ये किंवा कामे यावर परिणाम करणारा पोट-कलम (१) खालील आदेश स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेशिवाय देता येणार नाही :—

१० (१) (ज), १२ (१), १८ (१), २६ (२), ४३ (२), ४३ (४), ४३ (५), ५१ (२), ६७ (३) (ख), ६७ (३) (ग), ६७ (३) (घ), ७१ (२), ७३, ७७, ७८ (१), ८५, ८६, ८७, ९०, ९२, (२), ९४, ९५, १२१, १२२, १२५, १२६, १३० (१) (ख), १३१ (१), १३४, १३७, १४४, १५२, १५४, १६०, १७४, १७६, १७७, १८८, १९५, १९६, १९७, २०१, २०५, २०७, २०८, २०९, २१०, २१२, २१३, २१४, २१६, २२०, २२४, २३२, २४३, २६८, २६९, २७०, २७२, (२), २७३, २७४, २७५ (१), २७७, २७८, २८१, २९८, ३००, ३०१, ३०३, ३०४, ३०५, ३१०, ३१७, ३१९, ३२१, ३२२, ३२३, ३२४, ३२५, ३२८, ३२९, ३३०, ३३१, ३३२, ३६३, ३६४, ३७१ (२), ३७३, ३८६ (२), ४३९ (३), ४३९ (४), ४४१, ४४२, ४४५, ४४६, पोट-कलम (१) चा खंड (क) व्यतिरिक्त ४८१.

(३) परिवहन व्यवस्थापकास पुढील कोणत्याही तरतुदीखालील त्याचे अधिकार, कर्तव्ये व कामे यांवर परिणाम करणारा पोट-कलम (१) खालील आदेश परिवहन समितीच्या पूर्वमान्यतेशिवाय देता येणार नाही :—

४३ (५), ६७ (४) (ख), ६७ (४) (ग), ७१ (२), ७३, ९७, ३४४, ३४६, ३४८, ३५४, ३५५, ३५६, ३५८, ३६२, पोट-कलम (१), खंड (क) व्यतिरिक्त ४८१.

महानगर-पालिकेला स्थायी समिती इत्यादीकडून कामकाज इत्यादीचे उतारे मागवता येतील.

**७०.** महानगरपालिकेस, कोणत्याही वेळी या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या किंवा उप-समितीच्या कोणत्याही कामकाजाचा कोणताही उतारा मागवता येईल, आणि अशा कोणत्याही समितीला किंवा उप-समितीला या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार ज्या बाबतीत अधिकार प्रदान करण्यात आला असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी किंवा संबंधात कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखा किंवा प्रतिवृत्त मागवता येईल ; आणि यथास्थिती, अशा समितीने किंवा उप-समितीने अशी प्रत्येक मागणी गैरवाजवी विलंब न लावता पुरी केली पाहिजे.

**७१.** (१) महानगरपालिकेस, कोणत्याही वेळी, पुढील गोष्टी करण्याविषयी आयुक्तास फर्मावता येईल —

महानगर-पालिकेस दस्तऐवज सादर करण्यास आणि विवरणे, प्रतिवृत्ते इत्यादी पुरवण्याविषयी आयुक्ताला फर्मावता येईल.

(अ) आयुक्त या नात्याने त्याच्या कब्जात असलेला किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेला किंवा त्याच्या कार्यालयात किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कार्यालयात अभिलिखित किंवा दप्तरदाखल केलेला कोणताही अभिलेख, पत्रव्यवहार, नकाशा किंवा अन्य दस्ताऐवज सादर करणे ;

(ब) या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहराच्या पालिका प्रशासनाशी संबद्ध असलेल्या कोणत्याही बाबींसंबंधीचे कोणतेही विवरण, नकाशा, अंदाज, विवरणपत्र, लेखा किंवा आकडेवारी पुरवणे ;

(क) या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहराचे पालिका शासन यासंबंधीच्या कोणत्याही विषयावर प्रतिवृत्त स्वत: पुरवणे किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडून असे प्रतिवृत्त मिळवून ते आपल्या अभिप्रायासह पुरवणे.

(२) यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, आयुक्त अशा प्रत्येक मागणीचे गैरवाजवी विलंब न लावता अनुपालन करील आणि अशा कोणत्याही मागणीच्या अनुरोधाने आयुक्ताने दिलेला कोणताही आदेश पाळणे हे प्रत्येक नगरपालिका अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याचे अवश्य कर्तव्य असेल :

परंतु, पूर्वोक्त अशी मागणी करण्यात आल्यावर, तिचे तत्काळ अनुपालन केल्यास ते महानगरपालिकेच्या किंवा जनतेच्या हितास बाधक होईल असे आयुक्ताने जाहीर केल्यास त्याने तसे जाहीर केल्यानंतर, महानगरपालिकेची दुसरी सर्वसाधारण सभा ज्या वेळी भरेल त्यापेक्षा उशिरा नसेल इतक्या मुदतीपर्यंत त्याने असे अनुपालन लांबणीवर टाकणे कायदेशीर असेल.

(३) जर अशा सभेत किंवा त्यानंतरच्या कोणत्याही सभेत महानगरपालिका अशी मागणी पुन्हा करील व त्याही वेळेस आयुक्तास तिचे अनुपालन करणे इष्ट वाटत नसेल तर, त्याने तसे जाहीर केले पाहिजे, आणि त्यानंतर महानगरपालिकेने एक सदस्य निवडून देणे कायदेशीर असेल व असा सदस्य, महापौर व स्थायी समितीचा सभापती यांची मिळून किंवा महापौर स्थायी समितीचा सभापतीही असल्यास, महापौर व स्थायी समितीने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेला एक सदस्य यांची मिळून एक समिती बनवण्यात येईल व यात यापुढे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, अशी समिती तिला उघड करण्यात येतील असे दस्तऐवज व बाबी आणि त्यांचा आशय गुप्त ठेवील ; आणि आयुक्तास माहीत असलेले त्याच्या नियंत्रणाखाली असलेले किंवा त्यास उपलब्ध असलेले व अशा मागणीत समाविष्ट असलेले सर्व लेख व बाबी अशा समितीस माहीत करून देण्यास व उघड करण्यास तो बांधलेला असेल.

(४) अशा समितीने अशा रीतीने तिच्यापुढे ठेवलेल्या माहितीची, लेखाची व बाबींची दखल घेतल्यानंतर, अशा सर्व बाबी किंवा त्याचा एखादा भाग आणि असल्यास कोणता भाग महानगरपालिकेला उघड करावा किंवा कसे किंवा ठरावीक मुदतीपर्यंत गुप्त ठेवावा किंवा कसे यासंबंधी मतभेद असल्यास, बहुमताने निर्णय केला पाहिजे. समितीचा असा निर्णय निर्णायक असेल आणि तो महानगरपालिकेस तिच्या पुढील सर्वसाधारण सभेच्या वेळी कळवण्यात येईल, आणि त्यावेळी आयुक्तास महानगरपालिकेकडून तसे करण्याविषयी आदेश होईल तेव्हा समितीचा निर्णय अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील तसे दस्तऐवज हजर करणे व कोणतेही प्रतिवृत्त किंवा निवेदन करणे त्यास बंधनकारक असेल.

(५) पोट-कलम (१) ते (४) यांच्या तरतुदी परिवहन उपक्रमाशी संबंधित असलेल्या बाबींना लागू करताना, अशा तरतुदी, जणू त्यात "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द व "स्थायी समिती" या शब्दाऐवजी "परिवहन समिती" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून अंमलात येतील.

अधिकारांचा वापर करणे हे महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजुरी देण्याच्या अधीन असणे.

**७२.** कलम ८६, पोट-कलम (२) किंवा कलम ३५५, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीव्यतिरिक्त, कोणत्याही नगरपालिका प्राधिकारी, ज्यात खर्च अंतर्भूत असेल अशा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्याकडे सोपवलेले कोणतेही कर्तव्ये पार पाडताना, पुढील शर्तीच्या अधीन असेल —

(अ) ज्या सरकारी वर्षात अशा अधिकारांचा वापर केला असेल किंवा असे कर्तव्य पार पाडले असेल त्या वर्षात, असा खर्च जितपत करावयाचा असेल तितपत, त्या खर्चासाठी चालू अर्थसंकल्पीय अनुदानात अशा खर्चाची तरतूद केलेली असली पाहिजे ; आणि

(ब) अशा अधिकारांचा वापर केल्यामुळे किंवा असे कर्तव्य पार पाडल्यामुळे असे सरकारी वर्ष संपल्यानंतर कोणत्याही कालावधीसाठी किंवा कोणत्याही वेळी खर्च करावा लागणार असेल किंवा खर्च होण्याचा संभव असेल तर, अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेतलेली असली पाहिजे.

**[1][ कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध**

नागरिकांचा जाहीरनामा.

२०११ चा महा. २९.

**७२-अ.** (१) आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत, नागरिकांची सनद, सर्वसाधारण जनतेला अशा सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी काल मर्यादेसह, महानगरपालिका कार्यालयाने किंवा विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची यादी तयार करून प्रसिद्ध करील.

(२) नागरिकांच्या सनदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये, संबंधित प्राधिकाऱ्यांकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही तर, आवश्यक ती कार्यवाही न केल्याबद्दल त्यांना जबाबदार धरले जाईल आणि संबंधित अधिनियम, नियम किंवा विनियम यांमध्ये उल्लेखिलेली कारवाई त्यांच्यावर करण्यात येईल.

अधिकार सोपवणे.

**७२-ब.** (१) आयुक्त, त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या, त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे अंतिम निर्णय घेण्यासाठी सोपविण्यात आलेल्या अधिकारांची यादी प्रसिद्ध करील.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५ द्वारे हे शीर्षक व कलम ७२-अ ते ७२-ड दाखल केले.

(२) आयुक्त, महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील बाबींवर अंतिम निर्णय घेण्यास सक्षम असलेल्या संबंधित सांविधिक समितीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे कोणतीही बाब सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे चार किंवा त्यापेक्षा कमी स्तर निर्धारित करील.

२०११ चा महा. २९. (३) दुय्यम अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या अधिकारांची सूची आणि बाब सादर करण्यासाठी असलेले अधिकाऱ्यांचे स्तर, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत तयार करण्यात येतील व प्रसिद्ध करण्यात येतील व पुढील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी ते अद्ययावत करण्यात येतील.

**७२-क.** (१) प्रत्येक महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्ये व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल ; शिस्तभंगाची कारवाई.

परंतु, साधारणपणे कोणतीही फाईल महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे कामाच्या सात दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही ;

परंतु आणखी असे की, तत्काळ आणि तातडीच्या स्वरूपाच्या फाईली, त्या प्रकरणाच्या निकडीनुसार शक्य तितक्या शीघ्रतेने आणि प्राधान्याने, तत्काळ फाईल शक्यतो एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरूपाची फाईल शक्यतो चार दिवसात, कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून किंवा कर्मचाऱ्याकडून निकालात काढण्यात येईल ;

परंतु तसेच, महानगरपालिकेतील दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या आणि कोणत्याही सांविधिक समितीकडे सादर करावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात, संबंधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांच्या आत निर्णय घेईल आणि आवश्यक ती कार्यवाही करील आणि दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता असलेल्या मात्र, कोणत्याही सांविधिक समितीकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात, तीन महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) एखाद्या महानगरपालिका अधिकाऱ्यास आणि कर्मचाऱ्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य किंवा शासकीय काम पार पाडण्यास जाणूनबुजून किंवा हेतुपुर:स्सर विलंब लावणे किंवा दुर्लक्ष करणे ही, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कर्तव्यपालनातील कसूर ठरेल आणि असा महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी त्यांना लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होईल.

(३) कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेली कर्तव्य पालनातील अशी कोणतीही कसूर, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या लक्षात आल्यावर किंवा त्याच्या लक्षात आणून दिल्यावर, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेल्या अशा कर्तव्यपालनातील कसुरीबाबत त्याची खात्री पटल्यावर, तो कसूर करणाऱ्या अशा महानगरपालिका अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या वार्षिक गोपनीय अहवालात अशा कर्तव्यपालनातील कसुरी संबंधातील नोंद करण्यासह संबद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाची कारवाई करील.

**७२-ड.** कलम ७२-ग मधील कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू होणार नाही,— विवक्षित परिस्थितीत कलम ७२-ग च्या तरतुदी लागू न होणे.

(एक) न्यायप्रविष्ट बाबी ;

(दोन) लोक आयुक्त किंवा उप-लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, इत्यादी यांच्याकडे निर्देशित केलेली प्रकरणे ;

(तीन) न्यायिकवत बाबी ;

(चार) केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे ;

(पाच) विधि विधानाशी संबंधित बाबी ; आणि

(सहा) मुख्य धोरणात्मक बाबीसंबंधीची प्रकरणे.

## प्रकरण सात

## संविदा

**७३.** स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरून, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील, त्या अशा :— महानगर-पालिकेच्या-वतीने संविदा करून देण्याचा आयुक्ताचा अधिकार.

(अ) आयुक्त, महानगरपालिकेच्यावतीने अशी प्रत्येक संविदा करील ;

(ब) आयुक्ताला दुसऱ्या एखाद्या नगरपालिका प्राधिकाऱ्याची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्यावाचून जे प्रयोजन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये पार पाडता येणार नाही, अशा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रथमत: रीतसर अशी मान्यता किंवा मंजुरी देण्यात येईपर्यंत किंवा देण्यात आली नसेल तर, त्यास अशी कोणतीही संविदा करता येणार नाही ;

[१][(क) स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्याशी संबंधित कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधीच्या संविदाखेरीज, ज्यात पंचवीस लाख रुपयांहून अधिक परंतु पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा खर्च अंतर्भूत असेल अशी इतर कोणतीही संविदा महापौराने पूर्व मान्यता दिल्याशिवाय आयुक्ताने करता कामा नये. तथापि, महापौराने मान्यता दिलेल्या सर्व संविदांची एकूण रक्कम वर्षभरात दोन कोटी पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये. वरील तरतुदींच्या अधिनतेने, पंचवीस लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पूर्व मान्यता आवश्यक असेल :

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २४ (अ) द्वारे खंड (क) दाखल केला.

परंतु, अनुसूची 'ड' च्या प्रकरण दोनमध्ये, नियम ३ मधील खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे कोणत्याही संविदेसाठी आयुक्ताकडून स्थायी समितीची मान्यता घेतली जाते अशा बाबतीत, स्थायी समिती, त्यासंदर्भात आयुक्ताने केलेल्या प्रस्तावावर, तो प्रस्ताव समितीस मिळाल्यानंतरच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील — मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेण्यात आलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा संविदेस स्थायी समितीने मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल. ] ;

(ड) ज्यात [1][पाच लाख रुपयांपेक्षा] अधिक परंतु [2][पंचवीस लाख रुपये] किंवा खंड (क) अन्वये त्यावेळी विहित करण्यात येईल अशी त्याहून अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतर्भूत असेल अशा, आयुक्ताने केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती त्याने अशी संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत स्थायी समितीस कळविली पाहिजे ;

(ई) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना आयुक्तास प्रसंगानुसार जी संविदा करावी लागेल अशा प्रत्येक संविदेस या कलमाच्या पूर्वगामी तरतुदी शक्यतोवर लागू होतील ; आणि या कलमाच्या ज्या तरतुदी मूळ संविदेस लागू असतील त्या, अशा संविदेच्या कोणत्याही बदलास किंवा मुक्ततेस लागू होतील.

संविदा करण्याची पद्धत.

**७४.** (१) या अधिनियमान्वये संविदा करण्याची पद्धत नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी असेल.

(२) जी संविदा या अधिनियमाच्या तरतुदी व नियम यांस अनुसरून केली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असणार नाही.

परिवहन उपक्रमां-संबंधीच्या संविदा.

**७५.** केवळ परिवहन उपक्रमासंबंधीच्या संविदांच्या बाबतीत, कलम ७३ व अनुसूचीच्या प्रकरण ५ च्या तरतुदी जणु, त्यात जेथे जेथे " आयुक्त" हा शब्द येईल तेथे तेथे त्या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द आणि जेथे जेथे "स्थायी समिती" हे शब्द येतील तेथे तेथे त्या शब्दाऐवजी "परिवहन समिती" हे शब्द दाखल करण्यात आले होते असे समजून, लागू होतील.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २४ (ब) (एक) द्वारे " पन्नास हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी दाखल केले.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २४ (ब) द्वारे " दहा लाख रुपये " या मजकुराऐवजी दाखल केले.

## प्रकरण आठ

## नगरपालिकेची मालमत्ता

### मालमत्तेचे संपादन

**७६.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, महानगरपालिकेस, स्थावर व जंगम मालमत्ता किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंध संपादन करता येईल किंवा धारण करता येईल — मग अशी मालमत्ता शहराच्या सीमांच्या आत असो किंवा बाहेर असो. मालमत्ता संपादन करण्या-संबंधीचा महानगर-पालिकेचा अधिकार.

(२) जी स्थावर व अन्य मालमत्ता नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस —

(अ) ज्या क्षेत्रासाठी कोणतीही नगरपालिकेची किंवा स्थानिक प्राधिकरणाची रचना केली होती ते क्षेत्र शहरात समाविष्ट केल्यामुळे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार अधिक्रमण करण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिकेमध्ये किंवा स्थानिक प्राधिकरणामध्ये ; किंवा

(ब) अशा नगरपालिकेसंबंधीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणासंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये अशा नगरपालिकेचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे अधिक्रमण किंवा विसर्जन झाल्यामुळे [१][शासनामध्ये], निहित होती अशी सर्व स्थावर व अन्य मालमत्ता — मग ती कोठेही असो — उक्त तारखेस व उक्त तारखेनंतर अशा शहरात अधिकारिता असलेल्या महानगरपालिकेमध्ये निहित होईल व या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी विश्वस्त म्हणून अशा मालमत्तेसंबंधी जी कोणतीही विश्वस्तव्यवस्था, भार व दायित्वे असतील त्यांच्या अधीन राहून महानगरपालिका ती धारण करील.

१९४७ चा मुंबई ६१. (३) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, कलम १२ च्या तरतुदींन्वये ज्या प्राथमिक शाळा आणि स्थावर किंवा जंगम अशा अन्य मालमत्ता नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस, ज्या जिल्ह्यात असे शहर असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळामध्ये निहित असतील अशा सर्व प्राथमिक शाळा, त्यांच्या जमिनी, इमारती, अभिलेख व सामग्री यांसह आणि अशा सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता अशा शहरात समाविष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात उक्त तारखेस व उक्त तारखेनंतर महानगरपालिकेमध्ये निहित होतील, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विश्वस्त म्हणून महानगरपालिका अशा मालमत्तेसंबंधी जी कोणतीही विश्वस्तव्यवस्था, भार व दायित्वे असतील त्यांच्या अधीन राहून, त्या धारण करील :

परंतु, कोणतीही विशिष्ट मालमत्ता अशा रीतीने महानगरपालिकेमध्ये निहित होईल किंवा काय व अशा रीतीने ती धारण करील किंवा काय याविषयी कोणताही प्रश्न, विवाद किंवा शंका उद्भवेल तेव्हा, ती बाब [२][राज्य] शासनाकडे पाठवण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

---

१ मूळ शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(४) [1][राज्य] शासनास, लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की कोणत्याही शहराच्या सीमेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात असलेली किंवा त्याच्याशी संबंध असलेली जी कोणतीही स्थावर किंवा अन्य मालमत्ता नियत दिवशी अशा क्षेत्रापलीकडे अधिकारिता असलेल्या एखाद्या स्थानिक प्राधिकरणामध्ये निहित असेल, तर अशी मालमत्ता महानगरपालिकेमध्ये निहित होईल व या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विश्वस्त म्हणून महानगरपालिका अशा मालमत्तेसंबंधी असलेली सर्व विश्वस्तव्यवस्था, भार व दायित्वे यांच्या अधीन राहून, ती धारण करील.

(५) शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येईल अशी कोणतीही स्थावर मालमत्ता हस्तांतरण करण्याच्या वेळी शासन विशिष्ट आकस्मिक प्रसंगी मालमत्तेचे पुनर्ग्रहण करील या शर्तीसह शासन लादील किंवा विनिर्दिष्ट करील अशा शर्तीच्या अधीन महानगरपालिकेकडून धारण करण्यात येईल व अशा प्रयोजनांसाठी त्या मालमत्तेचा उपयोग करण्यात येईल.

स्थावर मालमत्ता संपादन करणे.

**७७.** (१) आयुक्तास कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करता येईल अशी या अधिनियमात जेव्हा जेव्हा तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा किंवा आयुक्त अशी मालमत्ता संपादन करील हे, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट असेल तेव्हा तेव्हा, आयुक्तास महानगरपालिकेच्या वतीने करार करून सामान्यपणे कोणत्याही वर्गाच्या प्रकरणांसाठी किंवा विशेषत: कोणत्याही विशिष्ट प्रकरणात स्थायी समिती मान्य करील अशा अटींवर व अशा दरांनी किंवा किंमतीला किंवा स्थायी समिती मान्य करील अशा कमाल मर्यादेहून अधिक नसेल अशा दरांनी किंवा किंमतीला स्थावर मालमत्ता संपादन करता येईल.

(२) जेव्हा जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये आयुक्तास कोणतीही मालमत्ता संपादन करण्यासाठी झालेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देण्याविषयी संमती देण्यास प्राधिकृत केले असेल तेव्हा तेव्हा, तो पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्थायी समिती मान्य करील अशा अटींवर व अशा दरांनी किंवा किंमतीला किंवा स्थायी समिती मान्य करील अशा मर्यादेहून अधिक नसेल अशा दरांनी किंवा अशी किंमत देऊन तसे करील.

(३) आयुक्तास, महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेसंबंधीचा कोणताही सुविधाधिकार करार करून महानगरपालिकेच्यावतीने संपादन करता येईल, आणि पोट-कलमे (१) व (२) च्या तरतुदी अशा संपादनास लागू होतील.

करार करून मालमत्ता संपादन करणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**७८.** (१) जेव्हा जेव्हा आयुक्त कलम ७७ अन्वये कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेसंबंधीचा कोणताही सुविधाधिकार करार करून संपादन करण्यास असमर्थ असेल तेव्हा तेव्हा किंवा जेव्हा जेव्हा कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेसंबंधीचा कोणताही सुविधाधिकार यांची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा, [1][राज्य] शासनास, स्वेच्छानिर्णयानुसार, स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्ताने केलेल्या अर्जावरून व या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीन जणू अशी मालमत्ता किंवा असा सुविधाधिकार, भूमी संपादन अधिनियम, १८९४ च्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली जमीन आहे असे समजून अशी मालमत्ता किंवा असा सुविधाधिकार महानगरपालिकेच्या-वतीने संपादन करण्यासाठी कार्यवाही करण्याचा आदेश देता येईल. १८९४ चा १.

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

(२) जेव्हा जेव्हा नवीन रस्त्याची तरतूद करण्याकरिता किंवा विद्यमान रस्ता रुंद करण्याकरिता किंवा सुधारण्याकरिता जमीन संपादन करण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये अर्ज करण्यात येईल तेव्हा तेव्हा आयुक्ताने नवीन रस्त्याने किंवा विद्यमान रस्त्याने व्यापल्या जाणाऱ्या जमिनीस लागून असलेली व अशा रस्त्याच्या कोणत्याही बाजूस उभारावयाच्या इमारतींच्या जागांसाठी आवश्यक असलेली अतिरिक्त जमीन संपादन करण्यासाठी अर्ज करणे कायदेशीर असेल, आणि अशी अतिरिक्त जमीन या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक आहे असे मानले जाईल.

(३) अशी कोणतीही मालमत्ता संपादन करताना दिलेल्या नुकसान भरपाईची रक्कम व झालेला इतर सर्व खर्च आयुक्ताने, या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदींच्या अधीन, ताबडतोब दिला पाहिजे, आणि त्यानंतर अशी मालमत्ता महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

### मालमत्तेचा विनियोग

नगर-पलिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतुदी.

**७९.** केवळ परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेचा विनियोग करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील ; त्या अशा :—

(अ) आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, प्रत्येक बाबतीत पाचशे रुपयांपेक्षा किंवा [1][राज्य] शासनाच्या मान्यतेने महानगरपालिका वेळोवेळी ठरवील अशा अधिक रकमेपेक्षा अधिक किंमतीची नसेल अशा महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेची विक्री करून, भाड्याने देऊन किंवा अन्यथा विनियोग करता येईल किंवा महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता, एकावेळी जास्तीत जास्त बारा महिन्यांच्या कालावधीसाठी पट्ट्याने देता येईल ; यात मच्छीमारी किंवा फळे गोळा करून ती नेण्याचा कोणताही व तत्सम अन्य हक्क यांचा समावेश होतो.

परंतु, मासिक भाडेदारीसाठी केलेली संविदा सोडून व जिचे वार्षिक जबर भाडे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक नाही अशी स्थावर मालमत्ता सोडून, आयुक्ताने स्थावर मालमत्तेच्या प्रत्येक पट्ट्याबाबत, ती पट्ट्याने दिल्यापासून पंधरा दिवसांच्या आत स्थायी समितीस कळवले पाहिजे.

(ब) आयुक्तास, स्थायी समितीच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या जंगम मालमत्तेचे मूल्य पाच हजार रुपयांहून अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेचा विनियोग विक्री करून, भाड्याने देऊन किंवा अन्य प्रकारे करता येईल ; आणि त्यास, उपरोक्त असा कोणताही हक्क धरून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षाहून अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी, तशीच मंजुरी घेऊन, पट्ट्याने देता येईल किंवा जिचे मूल्य किंवा अधिमूल्य पन्नास हजार रुपयांहून अधिक नसेल किंवा जिचे वार्षिक भाडे तीन हजार रुपयांहून अधिक नसेल अशी महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा कायमच्या पट्ट्याने देता येईल ;

(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल.

---

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

(ड) जो मोबदला घेऊन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्ट्याने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये ;

(ई) स्थायी समितीने किंवा महानगरपालिकेने खंड (ब) किंवा खंड (क) अन्वये द्यावयाची मंजुरी ही, सामान्यत: प्रकरणांच्या कोणत्याही वर्गासाठी किंवा विशेषत: कोणत्याही विशिष्ट प्रकरणात देता येईल ;

(फ) या कलमाच्या पूर्वोक्त तरतुदी व नियमांच्या तरतुदी, अनुक्रमे, या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेच्या प्रत्येक विनियोगास लागू होतील :

परंतु —

(अ) कोणत्याही विशिष्ट विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी ती धारण करण्यात आली असेल त्यास बाध येईल अशा रीतीने पट्ट्याने देता, विकता किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येणार नाही ;

(ब) शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेली कोणतीही मालमत्ता समुचित शासनाच्या पूर्व मंजुरीवाचून, हस्तांतरणाच्या शर्तीविरुद्ध अशा कोणत्याही रीतीने पट्ट्याने देता, विकता किंवा अभिहस्तांतरित करता येणार नाही.

[१][(ग) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने, महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदीअन्वये गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करण्यात आलेली, महानगरपालिकेच्या मालकीची जमीन, गलिच्छ वस्तीतील रहिवाश्यांच्या सहकारी संस्थेला, "किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींनीच केवळ निर्माण केलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थेला किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागास किंवा उपक्रमास, किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी किंवा वैद्यकीय आणि शैक्षणिक प्रयोजनांसाठीच केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासाला ; किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या संस्थेस किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीस किंवा व्यक्तीस सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या आणि तत्सम सुविधांची तरतूद करण्याच्या प्रयोजनांसाठी किंवा विष्टा किंवा इतर घाण किंवा कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता संयंत्रे उभारण्यासाठी." अशा रीतीने भाडेपट्ट्याने देण्याकरिता नियत असलेल्या कमाल भाड्याच्या बाजारमूल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाड्याने व महापालिका लादील अशा शर्तीस अधीन राहून, तीस वर्षांहून अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता भाडेपट्ट्याने देता येईल.

१९५० चा मुंबई २९.
१८६० चा २१.
१९६० महा.
१९५६ चा १.

या खंडाखाली राज्य शासनाने द्यावयाची मान्यता ही, अशा जमिनींबाबतच्या प्रकरणांच्या कोणत्याही वर्गाला किंवा अशा जमिनींबाबतच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणाच्याबाबतीत देता येईल :

परंतु, आयुक्तास, महानगरपालिका ठरवील व लादील अशा मुदतीकरिता व अशा शर्तीस अधीन राहून वेळोवेळी, त्याच रीतीने, भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करता येईल.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २ द्वारे खंड (ग) जादा दाखल केला.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनार्थ, "गलिच्छ वस्तीतील रहिवासी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्यांची नावे —

(अ) १९७६ साली केलेल्या झोपडपट्टी गणनेच्यावेळी तयार केलेल्या झोपडपट्टी रहिवाशांच्या यादीत ; किंवा

(ब) अशा प्रकारे झोपडपट्टीची गणना करण्यात आली नसेल त्याबाबतीत १९७६ साली अंमलात असलेल्या विधानसभा यादीत ; किंवा

(क) १९८० मध्ये तयार करण्यात आलेल्या व मे १९८० मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या विधानसभा यादीत ; किंवा

(ड) गलिच्छ वस्तीतील एखाद्या रहिवाश्याचे नाव १९८० च्या विधानसभा यादीत समाविष्ट करण्याचे राहून गेले आहे असे समजण्यात आले असेल त्याबाबतीत, १९७७, १९७८ किंवा १९७९ मध्ये अंमलात असलेल्या विधानसभा यादीत.

समाविष्ट करण्यात आली आहेत व अशी जमीन भाडेपट्ट्याने देण्यात यावी याकरिता आपल्या सहकारी संस्थेमार्फत महापालिकेकडे अर्ज करण्याच्या दिनांकाला जे अशा जमिनीचा भोगवटा करीत असतील असे गलिच्छ वस्तीतील रहिवासी, असा आहे.]

मालमत्तेसंबंधी महानगर-पालिकेने किंवा महानगर-पालिकेविरुद्ध केलेल्या दाव्याचा निर्णय.

८०. (१) कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा अशा कोणत्याही मालमत्तेमधील किंवा मालमत्तेवरील कोणताही हक्क यांवर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने किंवा महानगरपालिकेविरुद्ध कोणत्याही व्यक्तीने दावा सांगितला असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने, योग्य नोटीस देऊन रीतसर चौकशी केल्यानंतर, अशा दाव्याचा निर्णय करून आदेश देणे कायदेशीर असेल.

(२) महानगरपालिकेस किंवा पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, अशा आदेशाची योग्य नोटीस महानगरपालिकेस किंवा अशा व्यक्तीस ज्या तारखेस मिळाली असेल त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, असा आदेश रद्द करण्यासाठी किंवा त्याविरुध्द अनुतोष मागण्यासाठी कोणत्याही सक्षम दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल.

असा कोणताही दावा अशा आदेशाची नोटीस दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर दाखल करण्यात आला तर, असा दावा, तो मुदतबाह्य आहे असा मुद्दा बचाव म्हणून मांडण्यात आला नसला तरीही, फेटाळण्यात येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या कलमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार सहायक किंवा उपजिल्हाधिकाऱ्याकडे किंवा *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ मध्ये

व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या सर्वेक्षण अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

१८७९ चा मुंबई ५.

(४) या कलमात उल्लेख केलेली रीतसर चौकशी पूर्वोक्त संहितेच्या तरतुदींनुसार करण्यात येईल.

(५) या कलमान्वये एखाद्या व्यक्तीस चौकशीची किंवा आदेशांची नोटीस [1][राज्य] शासनाने याबाबत केलेल्या नियमांनुसार देण्यात आली असेल तर, ती त्यास योग्य रीतीने मिळाली आहे असे मानले जाईल.

त्यावेळच्या जमीन मालकाविरुध्द प्रसंविदेची अंमलबजावणी करण्याचा महानगर-पालिकेचा अधिकार.

**८१.** कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या मालकाने किंवा महानगरपालिकेची अशी मालमत्ता जिच्याकडे विक्री करून किंवा अदलाबदल करून हस्तांतरित करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने अशा मालमत्तेसंबंधी या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेबरोबर केलेल्या प्रसंविदेची अंमलबजावणी महानगरपालिकेस कोणत्याही व्यक्तीविरुद्ध करता येईल. जिच्या फायद्यासाठी अशी प्रसंविदा करण्यात आली ती मालमत्ता महानगरपालिकेच्या कब्जात नसली किंवा तीत तिचा हितसंबंध नसला तरीही, जणू अशी मालमत्ता तिच्या कब्जात होती किंवा तीत तिचा हितसंबंध होता असे समजून त्याच रीतीने व त्या मर्यादेपर्यंत, प्रसंविदाकर्त्याच्या अधीन हक्क प्राप्त करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुध्द करता येईल.

### [2][ प्रकरण आठ-अ

### महानगरपालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार

**८१-अ.** या प्रकरणात —

व्याख्या.

(अ) कोणत्याही महानगरपालिकेने परिवहन उपक्रम स्थापन किंवा संपादन केलेला असताना किंवा स्थापन किंवा संपादन करताना, परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेकडे निहित झालेल्या किंवा तिने धारण केलेल्या तिच्या जागांच्या संबंधात "आयुक्त" या संज्ञेचा अर्थ परिवहन व्यवस्थापक असा समजावा ;

(ब) "महानगरपालिकेच्या जागा" म्हणजे महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा तिच्याकडे निहित असलेल्या किंवा महानगरपालिकेने पट्ट्याने घेतलेल्या कोणत्याही जागा ;

(क) "विनियम" म्हणजे, आयुक्ताने कलम ८१-झ अन्वये केलेले विनियम ;

(ड) महानगरपालिकेच्या कोणत्याही जागेच्या बाबतीत "अनधिकृत भोगवटा" म्हणजे अशा रीतीने भोगवटा करण्याचा प्राधिकार नसताना महानगरपालिकेच्या जागांचा कोणत्याही व्यक्तीने केलेला भोगवटा ; व त्यामध्ये ज्या प्राधिकारान्वये जागेचा भोगवटा करण्याची परवानगी देण्यात आली असेल तो प्राधिकार संपल्यानंतर किंवा तो रीतसर समाप्त करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने जागांचा भोगवटा करण्याचे चालू ठेवणे या गोष्टींचा समावेश होतो.

**८१-ब.** (१) जर पुढील बाबतीत आयुक्ताची खात्री होईल की —

---

* आता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक) पहा.

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये दाखल करण्यात आला.

२ प्रकरण ८-अ हे, सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

महानगर-पालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार.

(अ) महानगरपालिकेच्या कोणत्याही जागांचा भोगवटा करण्याचा प्राधिकार मिळालेल्या व्यक्तीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (द्वितीय सुधारणा) अधिनियम, १९६९ च्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर,— १९७० चा महा. ८.

(एक) अशा जागांच्या संबंधात त्याच्याकडून कायदेशीररीत्या येणे असलेले भाडे किंवा कर हे दोन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत दिलेले नाहीत ; किंवा

(दोन) त्याच्या भोगवट्याच्या अटींविरुद्ध आणि शर्तीविरुद्ध अशा संपूर्ण जागा किंवा त्यांचा कोणताही भाग पोटभाड्याने दिलेला आहे ; किंवा

(तीन) जागेचे मूल्य बऱ्याच प्रमाणात कमी होण्याचा किंवा जागेच्या उपयुक्ततेस बऱ्याच प्रमाणात नुकसान पोचण्याचा ज्यामुळे संभव असेल अशी हानिकारक कृत्ये केलेली आहेत किंवा ती करीत आहे ; किंवा

(चार) ज्या स्पष्ट किंवा गर्भित अटींनुसार तिला अशा जागांच्या भोगवटा करण्याचा प्राधिकार देण्यात आला असेल त्या अटींपैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन करून अन्यथा वर्तन केले आहे ;

(ब) कोणतीही व्यक्ती महानगरपालिकेच्या कोणत्याही जागेचा अनधिकृतपणे भोगवटा करीत आहे ;

(क) कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असलेल्या महानगरपालिकेच्या कोणत्याही जागा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महानगरपालिकेस आवश्यक आहेत ;

तर त्याबाबतीत आयुक्तास, डाकेने नोटीस पाठवून किंवा तिची एक प्रत अशा जागांच्या बाहेरील दारावर किंवा इतर कोणत्याही ठळक जागी चिकटून किंवा विनियमांन्वये तरतूद करण्यात येईल अशा इतर रीतीने ती बजावून असा आदेश देता येईल की, त्या व्यक्तीने व त्याचप्रमाणे जी व्यक्ती त्या जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा भोगवटा करीत असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीने नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ती जागा रिकामी केली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यापूर्वी आयुक्त सर्व संबंधित व्यक्तींवर त्यांना काढून टाकण्याबाबत आदेश का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्यासाठी एक लेखी नोटीस यात पुढे तरतूद केलेल्या रीतीने बजावील.

नोटिशीत,—

(अ) ज्या कारणांवरून जागेतून काढून टाकण्याबाबतचा आदेश देण्याचे ठरवण्यात आले असेल ती कारणे विनिर्दिष्ट करण्यात येतील ; आणि

(ब) सर्व संबंधित व्यक्तींना म्हणजे, महानगरपालिकेच्या जागांचा भोगवटा करीत आहेत किंवा करीत असतील अशा किंवा त्या जागांमध्ये हितसंबंध असल्याचा दावा करीत असतील अशा सर्व व्यक्तींना नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा तत्पूर्वी नियोजित आदेशाविरुध्द कारण दाखवण्यास फर्मावण्यात येईल.

जर अशी व्यक्ती, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली मुदत वाढवण्याबद्दल आयुक्ताकडे अर्ज करील

तर, आयुक्तास नोटिशीत मागणी केलेली रक्कम देण्यासंबंधी आणि तिच्या वसुलीसंबंधी त्यास योग्य वाटेल अशा अटींवर उक्त अर्ज मंजूर करता येईल.

कोणत्याही व्यक्तीने नोटिशीस अनुसरून केलेले कोणतेही लेखी निवेदन आणि सादर केलेले दस्तऐवज हे उक्त प्रकरणाच्या कागदपत्रात दाखल करण्यात येतील आणि अशा व्यक्तीस अधिवक्ता, न्याय प्रतिनिधी किंवा इतर विधि व्यवसायींमार्फत आयुक्तापुढे हजर राहण्याचा हक्क असेल.

या पोट-कलमान्वये बजावावयाची नोटीस ही पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यासाठी जी रीत ठरवण्यात आली असेल त्या रीतीने बजावण्यात येईल ; अणि त्यानंतर सर्व संबंधित व्यक्तींना नोटीस वाजवी रीतीने देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचे नाकारील किंवा पालन करण्यात कसूर करील तर आयुक्तास, अशा व्यक्तीस आणि त्यास जी अडथळा करील अशा इतर कोणत्याही व्यक्तीस काढून टाकता येईल आणि जागेचा ताबा घेता येईल ; आणि त्यास त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

(४) आयुक्तास, पोट-कलम (३) अन्वये जिच्याकडून महानगरपालिकेच्या जागेचा ताबा घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस पूर्ण चौदा दिवसांची नोटीस दिल्यानंतर आणि अशी नोटीस शासकीय राजपत्रात आणि अशा ठिकाणी खप असलेल्या कमीत कमी एका वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर, अशा जागेमध्ये राहिलेली कोणतीही मालमत्ता काढून टाकता येईल किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल किंवा जाहीर लिलाव करून तिचा विनियोग करता येईल. अशी नोटीस पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यासाठी ज्या रीतीची तरतूद करण्यात आली असेल त्याच रीतीने बजावण्यात आली पाहिजे.

(५) पोट-कलम (४) अन्वये मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्याबाबतीत विक्री करून आलेल्या रकमेतून विक्री खर्च वजा करता बाकी राहिलेली रक्कम, आयुक्ताच्या मते ती रक्कम घेण्याचा ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना हक्क असेल अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात येईल :

परंतु, शिल्लक राहिलेली रक्कम कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात यावी याबाबत किंवा रकमेची वाटणी कशी करावी याबाबत आयुक्त निर्णय घेऊ शकत नसेल त्याबाबतीत त्याने, असा विवाद सक्षम अधिकारिता असणाऱ्या दिवाणी न्यायालयाकडे पाठविला पाहिजे आणि न्यायालयाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(६) पोट-कलम (१), खंड (क), उपखंड (एक) किंवा (चार) अन्वये कोणत्याही जागा सोडून जाण्याबद्दल जिला आदेश देण्यात आला असेल अशी व्यक्ती नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत किंवा आयुक्त जो अधिक अवधी मान्य करील त्या अवधीत थकलेल्या भाड्याची व कराची रक्कम आयुक्तास देईल किंवा यथास्थिति, तिने उल्लंघन केलेल्या अटी आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने पूर्ण करील किंवा अन्यथा त्यांचे पालन करील तर आयुक्त पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस काढून टाकण्याऐवजी (पूर्वोक्त उल्लंघनाबद्दल नुकसानभरपाई किंवा भरपाई म्हणून कोणतीही रक्कम देणे असल्यास तिचा समावेश करून ) अशा कोणत्याही अटी असल्यास, त्या अटींवर पोट-कलम (१) अन्वये दिलेला आपला आदेश रद्द करील ; आणि त्यानंतर अशी व्यक्ती, तिच्यावर अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या लगतपूर्वी ज्या अटींवर तिने अशा जागा धारण केल्या असतील त्या अटींवर जागा धारण करण्याचे चालू ठेवील.

**८१-क.** (१) या बाबतीत आयुक्ताने जे कोणतेही विनियम केले असतील त्यांस अधीन राहून, परंतु कलम ८१-ख च्या तरतुदींना बाध न आणता, कोणत्याही व्यक्तीकडे महानगरपालिकेच्या कोणत्याही जागांच्या बाबतीतील भाडे बाकी असेल त्याबाबतीत, आयुक्तांस, कलम ८१-ख, पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यासाठी ज्या रीतीची तरतूद करण्यात आली असेल त्या रीतीने बजावण्यात आलेल्या नोटिशीद्वारे, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दहा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीत अशा व्यक्तीस भाडे देण्याबाबत आदेश देता येईल.

भाड्याची किंवा नुकसान-भरपाईची रक्कम मालमत्ता कराची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा अधिकार.

(२) कोणत्याही महानगरपालिकेच्या जागा कोणत्याही व्यक्तींच्या अनधिकृतपणे भोगवट्यात असतील तर, आयुक्तास, विनियमान्वये तरतूद करण्यात येईल अशा रीतीने व त्यात ठरवून दिलेली नुकसानभरपाईची आकारणी करण्याबद्दलची तत्त्वे विचारात घेऊन जागांचा वापर केल्याबद्दल किंवा त्या भोगवट्यात ठेवल्याबद्दल त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करता येईल आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने नोटीस बजावून त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत नुकसानभरपाईची रक्कम देण्याबद्दल त्या व्यक्तीस आदेश देता येईल.

(३) जर कोणतीही व्यक्ती नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत पोट-कलम (१) खालील भाड्याची थकबाकी किंवा पोट-कलम (२) खालील नुकसानभरपाईची रक्कम देण्यास नकार देईल किंवा रक्कम देण्यात कसूर करील तर, आयुक्तास, यथास्थिति, भाड्याची रक्कम किंवा नुकसानभरपाईची रक्कम, अशा व्यक्तीकडून येणे असलेला सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर ज्या रीतीने वसूल करण्यात येतो त्याच रीतीने वसूल करता येईल.

(४) अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी मुदतीत, असा आदेश का देण्यात येऊ नये याबाबत कारण दर्शवण्याबद्दलची लेखी नोटीस अशा व्यक्तींवर बजावण्यात येईपर्यंत आणि तिचे कोणतेही आक्षेप असल्यास, ते आक्षेप आणि त्यांच्या पुष्ट्यर्थ ती जो कोणताही पुरावा सादर करील तो पुरावा आयुक्ताकडून विचारात घेण्यात येईपर्यंत, पोट-कलम (२) अन्वये कोणताही आदेश देता येणार नाही.

**८१-ड.** कलम ८१-ख च्या तरतुदींना बाध न आणता महानगरपालिकेचा कर्मचारी असलेल्या आणि महानगरपालिकेच्या कोणत्याही जागा जिला नेमून दिल्या असतील अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशा जागेच्या संबंधात तिच्याकडून येणे असलेल्या भाड्याची रक्कम ही अशी व्यक्ती ज्याच्या हाताखाली काम करत असेल त्या महानगरपालिका विभागाच्या प्रमुखाकडे किंवा अधिकाऱ्याकडे आयुक्ताने याबाबतीत लेखी मागणी केल्यानंतर अशा व्यक्तीस देय असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून वजा केली जाण्यास पात्र असेल. अशी मागणी मिळाल्यानंतर, यथास्थिती असा विभाग प्रमुख किंवा असा अधिकारी मागणीत विनिर्दिष्ट केलेली रक्कम अशा व्यक्तीस देय असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून वजा करील आणि अशा रीतीने वजा केलेली रक्कम तिच्याकडून येणे असलेल्या भाड्याची फेड म्हणून आयुक्ताला देईल.

महानगर-पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या वेतनातून किंवा मजुरीतून वजात करून भाडे वसूल करणे.

आयुक्तास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. **८१-ई.** दावा चालवताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे अधिकार निहित असतील तेच अधिकार या प्रकरणाखाली कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्तास पुढील गोष्टींच्या संबंधात असतील :— १९०८ चा ५.

(अ) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे ;

(ब) दस्तऐवजांचा शोध करण्यास व ते सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) कलम ८१-झ अन्वये केलेल्या विनियमान्वये विहित करण्यात येईल अशी कोणतीही अन्य बाब.

अपिले. **८१-फ.** (१) महानगरपालिकेच्या कोणत्याही जागांच्या बाबतीत कलम ८१-ख किंवा कलम ८१-ग अन्वये आयुक्ताने दिलेल्या प्रत्येक आदेशावर अपील अधिकाऱ्याकडे अपील करता येईल. तो अपील अधिकारी जिल्हा न्यायाधीश असला पाहिजे किंवा कमीत कमी दहा वर्षे सेवा झालेला, जिल्हा न्यायाधीशाने याबाबतीत पदनिर्देशित केलेला शहरातील अन्य न्याय अधिकारी असला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये दाखल करावयाचे अपील :—

(अ) कलम ८१-ख अन्वये दिलेल्या आदेशावर दाखल करावयाच्या अपिलाच्या बाबतीत, त्या कलमाच्या पोट-कलम (१) खालील आदेशासंबंधीची नोटीस बजाविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे, आणि

(ब) कलम ८१-ग अन्वये दिलेल्या आदेशावर दाखल करावयाच्या अपिलाच्या बाबतीत, यथास्थिती त्या कलमाच्या पोट-कलम (१) किंवा (२) खालील आदेशांसंबंधीची नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे :

परंतु, अपीलकर्ता, पुरेशा कारणामुळे वेळेवर अपील दाखल करू शकलेला नाही अशी अपील अधिकाऱ्याची खात्री झाल्यास त्यास तीस दिवसांची उक्त मुदत संपल्यानंतरही अपील स्वीकारता येईल.

(३) आयुक्ताच्या आदेशावर अपील दाखल करण्यात आले असेल, त्याबाबतीत अपील अधिकाऱ्यास त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत व शर्तीवर त्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

(४) या कलमान्वये केलेले प्रत्येक अपील, अपील अधिकाऱ्याने शक्य तितक्या शीघ्रतेने निकालात काढले पाहिजे.

आदेश अंतिम असणे. **८१-ग.** या प्रकरणात स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त आयुक्ताने किंवा अपील अधिकाऱ्याने या प्रकरणान्वये दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल, आणि कोणताही मूळ दावा, अर्ज किंवा अंमलबजावणी कार्यवाही यांत त्यास हरकत घेता येणार नाही.

अधिकारितेस प्रतिबंध. **८१-ह.** या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही दिवाणी न्यायालयास कलम ८१-ख मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणास्तव महानगरपालिकेच्या कोणत्याही जागांतून कोणत्याही व्यक्तीला काढून टाकण्याच्या बाबतीत किंवा अशा जागांचा वापर केल्याबद्दल किंवा भोगवटा केल्याबद्दल द्यावयाचा भाड्याच्या किंवा नुकसानभरपाईच्या वसुलीच्या बाबतीत कोणताही दावा किंवा कोणतीही कार्यवाही स्वीकारण्याची अधिकारिता असणार नाही.

**८१-आय.** आयुक्तास स्थायी समितीच्या संमतीने आणि यथास्थिती, परिवहन व्यवस्थापकास, परिवहन समितीच्या संमतीने पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी विनियम करता येतील :— विनियम करण्याचा अधिकार.

(अ) कलम ८१-ख व ८१-ग खालील नोटिशींचे नमुने आणि त्या कलमान्वये त्या ज्या अन्य रीतीने बजावण्यात येतील ती अन्य रीत विहित करणे ;

(ब) या प्रकरणान्वये चौकशी करणे ;

(क) कलम ८१-ख अन्वये महानगरपालिकेच्या कोणत्याही जागांचा कब्जा घेताना अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ड) कलम ८१-ग अन्वये ज्या रीतीने नुकसानभरपाई निर्धारित करण्यात येईल ती रीत आणि अशी नुकसानभरपाई निर्धारित करताना विचारात घ्यावयाची तत्त्वे ;

(ई) कलम ८१-च अन्वये ज्या रीतीने अपील दाखल करता येईल ती रीत आणि अशा अपिलात अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(फ) या प्रकरणान्वये विनियमांनी विहित करावयाची असेल किंवा विहित करता येईल अशी कोणतीही अन्य बाब.

**८१-ज.** जी कोणतीही व्यक्ती, या प्रकरणाद्वारे किंवा प्रकरणान्वये सोपवण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा कायदेशीर वापर करण्यास अडथळा आणील तिला अपराधसिद्धीनंतर एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.] या प्रकरणाखालील अधिकाराचा कायदेशीर वापर करताना अडथळा आणण्याबद्दल शास्ती.

## प्रकरण नऊ

## नगरपालिका निधी व अन्य निधी

### नगरपालिका निधी

१९४७ चा मुंबई ६१. **८२.** या अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून आणि मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, कलम ४४ च्या तरतुदींच्या अधीन राहून,— नगरपालिका निधीची स्थापना.

(अ) हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये किंवा कोणत्याही संविदेअन्वये महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेच्या वतीने मिळालेला सर्व पैसा ;

(ब) महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने मालमत्तेचा विनियोग करून मिळालेले सर्व उत्पन्न ;

(क) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेपासून उपार्जित होणाऱ्या भाड्याच्या सर्व रकमा ;

(ड) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी कोणताही कर बसवून उभारलेला सर्व पैसा ;

(ई) न्यायालयाने लादलेल्या दंडांव्यतिरिक्त हा अधिनियम किंवा कोणताही नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश याअन्वये देय असलेल्या व वसूल केलेल्या फीच्या व दंडाच्या रकमा ;

(फ) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नुकसानभरपाईच्या रूपाने किंवा अपराध आपसात मिटवण्याबद्दल मिळालेला सर्व पैसा ;

(ग) शासन किंवा सार्वजनिक संस्था, खाजगी संस्था किंवा खाजगी व्यक्ती यांच्याकडून अनुदान, देणगी किंवा ठेव म्हणून महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेच्या वतीने मिळालेला सर्व पैसा, अशा अनुदानांशी, देणगीशी किंवा ठेवीशी संलग्न शर्ती असल्यास त्या शर्तींच्या अधीन ; आणि

(ह) महानगरपालिकेच्या मालकीचा कोणताही पैसा गुंतवल्यामुळे किंवा अशा पैशासंबंधी कोणताही व्यवहार केल्यामुळे मिळणाऱ्या व्याजाच्या व नफ्याच्या सर्व रकमा ;

'नगरपालिका निधी' या नावाच्या निधीमध्ये जमा करण्यात येतील व त्या या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिका यातील तरतुदींच्या अधीन, विश्वस्त व्यवस्था म्हणून धारण करील.

जमीन महसूल कृषितर आकारणी व करमणूक शुल्क यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून राज्य शासनाने वार्षिक अनुदान देणे.

[१] [ **८२-अ.** राज्य शासनास, याबाबतीत रीतसर केलेल्या विनियोजनाद्वारे, प्रत्येक महानगरपालिकेस, तिच्या अधिकारितेतील क्षेत्रात राज्य शासनाकडून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये बसविण्यात व गोळा करण्यात आलेला जमीन महसूल व कृषितर आकारणी व * महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ अन्वये बसविण्यात व वसूल करण्यात आलेले करमणूक शुल्क यांपासून मिळणारे उत्पन्न विचारात घेऊन, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशी रक्कम, दरवर्षी अनुदान म्हणून देता येईल. हे अनुदान, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा अटींने व शर्तीस अधीन ठेवून, देण्यात येईल. अशा अनुदानाच्या रूपाने महानगरपालिकेस मिळणारा सर्व पैसा नगरपालिका निधीत जमा केला पाहिजे.]

१९६६ चा महा. ४१
१९२३ चा मुंबई १.

[२] [ परंतु, राज्य शासन, राज्य शासनास, किंवा कोणत्याही शासकीय महामंडळास, शासकीय कंपनीस किंवा महाराष्ट्र शासनाने रचना केलेल्या इतर कोणत्याही वैधानिक प्राधिकरणास येणे असलेली कोणतीही रक्कम,—

(अ) राज्य शासनाने दिलेल्या अनुदानामधून, किंवा

---

१ कलम ८२-अ हे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ७ द्वारे समाविष्ट केले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ६९ द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूचीद्वारे 'महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम' या शीर्षामध्ये सुधारणा करण्यात आली.

(ब) सहायक अनुदान दर्शविणाऱ्या किंवा वित्त आयोगाच्या शिफारशीवरून राज्याने बसवलेले कर, शुल्के, पथकर आणि फी यांच्या निव्वळ उत्पन्नातील असलेला राज्य शासनाने वितरित केलेला महानगरपालिकेचा हिस्सा दर्शविणाऱ्या कोणत्याही रकमेतून,

कापून घेण्यास सक्षम असेल :

परंतु आणखी असे की, अशा प्रकारची वजात करण्यापूर्वी त्याबाबतचे महानगरपालिकेचे म्हणणे शासन विचारात घेईल.]

नगरपालिका निधीच्या खाती जमा होणारा सर्व पैसा आयुक्ताने स्वीकारणे व तो बँकेत ठेवणे.

८३. नगरपालिका निधीच्या खाती भरण्याजोगा सर्व पैसा आयुक्त स्वीकारील आणि तो *इंपिरिअल बँक ऑफ इंडियामध्ये [1][किंवा कोणत्याही अन्य अनुसूचित बँकेत] [2][किंवा मान्य सहकारी बँकेत] "........ नगरपालिका निधी खाते" या नावाच्या खात्यात ताबडतोब भरण्यात येईल :

परंतु, आयुक्तास, स्थायी समितीने दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन राहून, चालू प्रदानांसाठी आवश्यक असेल अशी रोख शिल्लक रक्कम आपल्याजवळ ठेवता येईल :

[3][आणखी असे की, मान्य सहकारी बँकेत भरावयाची रक्कम, कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत राज्य शासनाकडून सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.]

निधीतून पैसा कसा काढण्यात येईल.

८४. (१) कलम ४४९ च्या तरतुदींच्या अधीन राहून पूर्वोक्त कोणत्याही बँकेने मुख्य लेखापाल किंवा उप लेखापाल किंवा उप लेखापालाची जागा नसेल तर, अशा मुख्य लेखापालाच्या प्रत्यक्ष हाताखालील अधिकारी आणि आयुक्त किंवा उप आयुक्त किंवा सहायक आयुक्त यांनी सही केलेला धनादेश मिळाल्याशिवाय नगरपालिका निधीतून कोणतीही प्रदाने करता कामा नये.

(२) शंभर रुपयांपेक्षा अधिक किंवा स्थायी समिती सामान्यत: किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रदानांच्या वर्गासाठी वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेव्हा, ती, पूर्वी म्हटल्याप्रमाणे सही केलेल्या धनादेशाद्वारे दिली पाहिजे ; ती अन्य कोणत्याही रीतीने देता कामा नये.

---

* या शब्दाऐवजी "भारताच्या स्टेट बँकेत" हे शब्द स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट, १९५५ (१९५५ चा २३) च्या कलम ५६ प्रमाणे दिनांक १-७-१९५५ पासून वाचावे.

१ मूळ शब्दांऐवजी हे शब्द, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ३ अन्वये दाखल करण्यात आले.

२ हे शब्द, १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ४ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

३ हे परंतुक, वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) अन्वये दाखल करण्यात आले.

(३) आयुक्तास, पोट-कलम (२) खाली न येणाऱ्या देय रकमा रोख देता येतील आणि अशा प्रयोजनासाठी हाती असलेली रोख रक्कम अपुरी पडेल तेव्हा अशा प्रदानांसाठी प्रत्येकी दोन हजार रुपयांहून अधिक नसलेल्या रकमांचे पूर्वी म्हटल्याप्रमाणे सही केलेले धनादेश वेळोवेळी देता येतील.

सोयीस्कर असेल तेव्हा नगरपालिका निधीचा भाग शहराबाहेरील बँकेत किंवा अभिकरणाकडे ठेव म्हणून ठेवता येईल.

**८५.** कलमे ८३ व ८४ मध्ये काहीही असले तरी, आयुक्तास, स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने नगरपालिका निधीचा कोणताही भाग शहराबाहेरील कोणत्याही ठिकाणी असलेल्या बँकेत किंवा अन्य अभिकरणाकडे वेळोवेळी पाठवून ठेव म्हणून ठेवता येईल, आणि नगरपालिका निधीच्या खाती भरावयाचा किंवा त्यातून द्यावयाचा जो कोणताही पैसा अशा कोणत्याही बँकेत किंवा अभिकरणाकडे असलेल्या महानगरपालिकेच्या खाती आयुक्ताच्या मते अतिशय सोयीस्करपणे भरता येईल किंवा त्यातून देता येईल तो पैसा अशा रीतीने भरता येईल किंवा देता येईल.

नगरपालिका निधीतून खर्च करण्यावर निर्बंध.

**८६.** (१) यापुढे तरतूद केलेली असेल त्याखेरीज, खर्च करावयाच्या कोणत्याही रकमेचा चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश नसेल तर आणि अशा अर्थसंकल्पीय अनुदानाची पुरेशी शिल्लक रक्कम त्यावेळी उपलब्ध नसेल तर, आयुक्ताने नगरपालिका निधीतून कोणतीही रक्कम, ती नियमान्वये कोणत्याही प्रकारे कमी करण्यात किंवा हस्तांतरीत करण्यात आली असली तरीही, देता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मधील मनाईतून पुढील बाबी वगळण्यात येतील :—

(अ) ज्यांच्या खर्चासाठी कलम १०२ अन्वये स्थायी समितीने मंजुरी दिली असेल त्या रकमा ;

(ब) लोकसेवेसाठी तातडीने करणे आवश्यक असलेल्या कामांसाठी कलम ९० अन्वये तात्पुरत्या दिलेल्या रकमा ;

(क) करांचे व अन्य पैशांचे जे परतावे देण्यास आयुक्तास या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार प्राधिकृत करण्यात आले आहे ते परतावे ;

(ड) कंत्राटदारांच्या किंवा अन्य व्यक्तींच्या मालकीच्या ठेव म्हणून ठेवलेल्या परत करावयाच्या रकमा तसेच नगरपालिका निधीत चुकीने भरलेल्या किंवा जमा केलेल्या परत करावयाच्या रकमा ;

(ई) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये किंवा कोणत्याही अन्य अधिनियमितीअन्वये नुकसानभरपाई म्हणून द्यावयाच्या रकमा ;

(फ) कलम ८८, खंड (ज) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही परिस्थितीत द्यावयाच्या रकमा ;

(ग) आयुक्ताने कलम ३१९ अन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना केलेल्या खर्चाची रक्कम ;

(ह) आयुक्ताने कलम ६७, पोट-कलम (३), खंड (ग) अन्वये केलेल्या खर्चाची रक्कम.

**८७.** जेव्हा जेव्हा आयुक्ताने कलम ८६, पोट-कलम (२), खंड (ड), (च), (छ) किंवा (ज) अन्वये कोणतीही रक्कम खर्च केली असेल तेव्हा तेव्हा त्याने ज्या परिस्थितीत ती रक्कम खर्च केली असेल ती परिस्थिती स्थायी समितीला ताबडतोब कळवली पाहिजे व स्थायी समितीने नियमान्वये अतिरिक्त खर्चाच्या रकमेचा समावेश करून घेण्यासाठी त्या परिस्थितीत शक्य व इष्ट वाटेल अशी उपाययोजना केली पाहिजे किंवा कलम १०१ अन्वये किंवा नियमान्वये अशी उपाययोजना करण्याविषयी महानगरपालिकेस शिफारस केली पाहिजे.

अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेली रक्कम कलम ८६, पोट-कलम (२), खंड (ड), (च), (छ) किंवा (ज) अन्वये खर्च करण्यात येईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

८८. नगरपालिका निधीत वेळोवेळी जमा केलेल्या रकमांचे उपयोजन, या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील अशा किंवा हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीन्वये ज्या देण्याबद्दल योग्य रीतीने निदेश देण्यात आला असेल किंवा मंजुरी देण्यात आली असेल अशा सर्व रकमा, आकार व खर्च देण्यासाठी करण्यात येईल व त्यात पुढील रकमांचा समावेश होतो :—

ज्यासाठी नगरपालिका निधीचे उपयोजन करावयाचे ते प्रयोजन.

(अ) प्रत्येक प्रभाग निवडणुकीचा खर्च ;

(ब) आयुक्ताचे वेतन, पदग्रहण अवधी भत्ता व अन्य भत्ते, तसेच त्याच्या नावे [1][राज्य] शासनास जे कोणतेही रजा किंवा निवृत्तिवेतन अंशदान द्यावयाचे असेल ते ;

(क) हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेले विनियम यांच्या तरतुदींन्वये किंवा या अधिनियमान्वये तयार केलेल्या व त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्रात तरतूद केल्याप्रमाणे सर्व नगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वेतन व अन्य भत्ते आणि भविष्य निर्वाह निधीस द्यावयाची अंशदाने, निवृत्तिवेतने, उपदाने व अनुकंपा भत्ते ;

(ड) आयुक्ताने, या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य पार पाडताना केलेला सर्व खर्च. यात नुकसानभरपाई म्हणून ज्या रकमा देणे त्यास आवश्यक आहे किंवा ज्या रकमा देण्यास त्यास अधिकार प्रदान करण्यात आला आहे त्या रकमांचा समावेश होतो ;

१९४७ चा मुंबई ६१.

(ई) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, अन्वये शहरासाठी ठेवलेल्या प्राथमिक शिक्षण निधीस त्या अधिनियमाच्या कलम ४४ अन्वये द्यावयाचे अनुदान ;

(फ) बांधकामाच्या प्रयोजनांसाठी नियमान्वये दिलेली कर्जे ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(ग) कलम १०८ अन्वये आकारणीयोग्य असलेली कोणतीही रक्कम ;

(ह) (एक) कलम ४२२ किंवा कलम ४४९, पोट-कलम (१) अन्वये [1][राज्य] शासनास देय असलेली प्रत्येक रक्कम ;

(दोन) महानगरपालिका किंवा पदसिद्ध आयुक्त, उप आयुक्त किंवा सहायक आयुक्त यांच्याविरुद्ध दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये देय असलेली प्रत्येक रक्कम ;

(तीन) कलम ४८१ अन्वये केलेल्या कोणत्याही दाव्याच्या किंवा अन्य कायदेशीर कारवाईच्या किंवा मागणीच्या तडजोडीनुसार देय असलेली प्रत्येक रक्कम ;

(आय) सार्वजनिक संस्थांना दिलेली अंशदाने ;

(जे) रहदारीच्या चिन्हांची तरतूद केल्याबद्दल झालेला खर्च.

नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा.

**८९.** महानगरपालिकेने नगरपालिका निधीमधून करावयाचा खर्च, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, फक्त शहरातच केला जाईल, परंतु एकूण पालिका सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी शहराच्या बाहेर करता येईल.

लोकसेवेसाठी तातडीने आवश्यक असलेल्या कामांसाठी नगरपालिका निधीतून तात्पुरत्या रकमा देणे.

**९०.** (१) [1][राज्य] शासन याबाबत विशेषरीत्या प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याने लेखी मागणी केली असता, एखादे काम लोकसेवेसाठी तातडीने करणे आवश्यक आहे असे अशा अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास, आयुक्त ते काम कोणत्याही वेळी हाती घेऊ शकेल, आणि या प्रयोजनासाठी, नगरपालिकेच्या नेहमींच्या प्रशासनात उगीचच हस्तक्षेप न करता रकमा देता येतील तितपत नगरपालिका निधीतून रकमा तात्पुरत्या देऊ शकेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये पार पाडलेल्या सर्व कामाचा व ते पार पाडण्यासाठी कामावर लावलेल्या कर्मचारीवर्गासाठी झालेला खर्च [1][राज्य] शासनाकडून देण्यात आला पाहिजे व अशा खर्चाची रक्कम नगरपालिका निधीत जमा केली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये मागणी मिळाल्यावर, आयुक्ताने, तीबाबत त्याने केलेल्या कार्यवाहीच्या प्रतिवृत्तासह तिची प्रत तात्काळ महानगरपालिकेकडे पाठविली पाहिजे.

## विशेष निधी

विशेष निधींची स्थापना.

**९१.** [2][ या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज, महानगरपालिकेस,] नियमाद्वारे विहित करण्यात आले असतील असे विशेष निधी व या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील असे अन्य निधी स्थापन करता येतील. अशा निधींची स्थापना व विनियोग नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने केली पाहिजे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ द्वारे " महानगरपालिकेस " या मजकुराऐवजी दाखल केले.

[1] [ **९१-अ.** (१) महानगरपालिका, प्रकरणे बारा व तेराच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, "एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्जनिधी" या नावाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करील व अर्थसंकल्पीय अंदाज 'क' च्या प्रयोजनार्थ तो स्वतंत्र ठेवील. एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्ज निधीची स्थापना.

(२) उक्त कर्जनिधीमध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) प्रकरणे बारा ते तेरा यांच्या प्रयोजनार्थ ; या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ;

(ख) महापालिका वेळोवेळी निर्धारित करील असा, कलम ११२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्जनिवारण निधीचा भाग.

(३) अशाप्रकारे स्थापन करण्यात आलेल्या निधीचा पुढील प्रयोजनांकरिता वापर करण्यात येईल :—

(क) प्रकरणे बारा व तेराच्या प्रयोजनांकरिता, भांडवली कामांवरील खर्च ;

(ख) अशा भांडवली कामांकरिता उभारण्यात आलेल्या कर्जाची परतफेड.

(४) पोट-कलम (३) अनुसार वापरण्यात न आलेल्या किंवा तातडीने वापरण्यात न यावयाच्या उक्त निधीतील कोणत्याही रकमेची गुंतवणूक आयुक्त, महानगरपालिकेच्या वतीने व स्थायी समितीच्या मंजुरीने, त्यास योग्य व उचित वाटेल अशा रीतीने करील.

**९१-ब.** (१) महानगरपालिका, "जल व मलप्रवाह निधी" या नावाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करील व तो वेगळा ठेवील. जल व मलप्रवाह निधीची स्थापना.

(२) कलम १२९ चा खंड (क) किंवा (ख) किंवा कलम १३४ ते १३८ (दोन्ही धरून) या अन्वये महानगरपालिकेला मिळालेल्या किंवा महानगरपालिकेच्या वतीने घेतलेल्या सर्व रकमा किंवा प्रकरणे बारा व तेराच्या प्रयोजनांसाठी घेतलेल्या अन्य कोणत्याही रकमा जल व मलप्रवाह निधीमध्ये जमा करण्यात येतील.

(३) उक्त निधीच्या नावे देय असलेला सर्व पैसा आयुक्त स्वीकारील व तो, ताबडतोब तो पैसा, स्थायी समितीने या बाबतीत वेळोवेळी मान्यता दिलेल्या बँकेत किंवा बँकांमध्ये "जल व मलप्रवाह निधी लेखा" या खात्यावर जमा करील :

परंतु, आयुक्तास, प्रकरणे बारा व तेरा यांच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल तेवढी शिल्लक रक्कम रोख स्वरूपात ठेवून घेता येईल.

(४) वेळोवेळी उक्त विधीत जमा केलेल्या रकमेचा वापर, प्रकरणे बारा व तेरा यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या सर्व रकमा, आकार व खर्च यांचे प्रदान करण्यासाठीच केवळ करता येईल.

---

१ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनिय क्रमांक २८ याच्या कलम ७ द्वारे "कलम ९१-अ व ९१-ब" समाविष्ट केले.

(५) पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ज्या रकमेचा ताबडतोब किंवा लवकरात लवकर वापर करणे शक्य नसेल अशी उक्त निधीमध्ये जमा असलेली अधिक रक्कम, वेळोवेळी आयुक्ताला, स्थायी समितीने मान्यता दिलेली बँक किंवा बँका यांमध्ये व्याजाने ठेवता येईल किंवा सार्वजनिक कर्जरोख्यांमध्ये गुंतवता येईल.

(६) स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व ठेवी ठेवील व गुंतवणुकी करील व आयुक्तास, तशाच मंजुरीने अशा रीतीने ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळी काढून घेता येतील किंवा कोणतेही कर्जरोखे विकता येतील व अशा रीतीने काढून घेतलेला पैसा किंवा अशा कर्जरोख्यांची विक्री करून आलेला पैसा पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतवता येईल ; परंतु अशी ठेव ठेवण्यासंबंधातील किंवा गुंतवणूक करण्यासंबंधातील किंवा (ठेव) काढून घेण्यासंबंधातील किंवा (कर्जरोख्यांची) विक्री करण्यासंबंधातील कोणताही आदेश, तो लेखी असल्याखेरीज आणि धनादेशावर सही करण्यासंबंधात कलम ८४ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने दोन व्यक्तींनी त्यावर सही केलेली असल्याखेरीज, कोणत्याही प्रकारे विधिग्राह्य ठरणार नाही.

(७) अशी कोणतीही ठेव किंवा गुंतवणूक यांमुळे होणारा तोटा, कोणताही असल्यास जल व मलप्रवाह निधीमध्ये खर्चखाती टाकण्यात येईल.]

### शिल्लक रकमांचा विनियोग

शिलकी पैशाची गुंतवणूक.

**९२.** (१) नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा विनियोग या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये उभारलेल्या कोणत्याही कर्जाच्या प्रयोजनांसाठी ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने वेळोवेळी, इंपिरिअल बँक ऑफ इंडियामध्ये [१][किंवा कोणत्याही अन्य अनुसूचित बँकेत] [२][किंवा मान्य सहकारी बँकेत] ठेवता [३][किंवा राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संविधिक महामंडळाकडे] येईल किंवा सार्वजनिक कर्जरोख्यांत [४][किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यामध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये.] गुंतवता येईल :

[५][परंतु, मान्य सहकारी बँकेत ठेवावयाची रक्कम कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत राज्य शासनाकडून सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.]

(२) स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व ठेवी ठेवील व गुंवतणुकी करील, आणि आयुक्तास, तशाच मंजुरीने अशा रीतीने ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळी काढून घेता येतील किंवा कोणतेही कर्जरोखे विकता येतील व अशा रीतीने काढून घेतलेला पैसा किंवा अशा कर्जरोख्यांची विक्री करून आलेला पैसा पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतवता येईल.

---

१ मूळ शब्दांऐवजी हे शब्द, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ४ अन्वये दाखल करण्यात आले.

२ हे शब्द, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

३ सन १९८६ चा, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ३ द्वारे किंवा मान्य सहकारी बँकेत या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट केला.

४ सन २०११ चा, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २६ द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

५ हे परंतुक, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (२) अन्वये दाखल करण्यात आले.

(३) अशा कोणत्याही ठेवीमुळे किंवा गुंतवणुकीमुळे काही नुकसान झाल्यास ते नगरपालिका निधीच्या खाती खर्ची टाकले जाईल.

## लेखे

१९४७ चा मुंबई ६१. **९३.** मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ च्या कलम ३६१ च्या तरतुदींच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून, महानगरपालिकेच्या जमाखर्चाचे लेखे, स्थायी समिती वेळोवेळी निदेश देईल त्या रितीने व त्या नमुन्यांमध्ये ठेवण्यात आले पाहिजेत : स्थायी समितीने विहित केलेल्या नमुन्यांमध्ये लेखे ठेवणे.

[१][परंतु असे की, एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्ज निधी आणि जल व मलप्रवाह निधी यांचे लेखे स्थायी समितीने अन्यथा निदेश दिले नसेल तर, उपार्जित तत्त्वावर ठेवण्यात येतील.]

**९४.** (१) आयुक्ताने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाव्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशीलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शवणाऱ्या विवरणपत्रासहित तयार करून स्थायी समितीस सादर केला पाहिजे. वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र तयार करणे.

(२) असा अहवाल स्थायी समिती वेळोवेळी निदेश देईल अशा नमुन्यात असेल व त्यात स्थायी समिती वेळोवेळी निदेश देईल अशी माहिती समाविष्ट असेल.

(३) स्थायी समितीने अहवालाची व विवरणपत्राची तपासणी व त्यांचा आढावा घेतल्यानंतर अशा अहवालाची व विवरणपत्राची छापील प्रत समितीच्या आढाव्यासह प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या ठिकाणी किंवा माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी स्थायी समिती वेळोवेळी विहित करील अशा तारखेपर्यंत पाठविली पाहिजे व त्यांच्या प्रती आयुक्त ठरवील अशा किंमतीस विक्रीसाठी महानगरपालिका कार्यालयात ठेवल्या पाहिजेत.

## वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज

**९५.** आयुक्ताने दरवर्षी, महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी, स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात — आयुक्ताने दरवर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार करणे.

(अ) त्याच्या मते [२][कलमे ९१ क व ९१ ख यांअन्वये स्थापन केलेल्या निधीसह] महानगरपालिकेने पुढील सरकारी वर्षात नगरपालिका निधीतून प्राथमिक शिक्षण निधीस महानगरपालिकेने द्यावयाच्या अनुदानाची रक्कम धरून जो खर्च केला पाहिजे किंवा करावा तो खर्च आणि त्याच्या मते विशेष निधीत जमा केल्या पाहिजेत किंवा त्यातून खर्च केल्या पाहिजेत अशा काही रकमा असल्यास त्या रकमा यांचा नियमानुसार वर्गीकरण केलेला अंदाज ;

---

१ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ द्वारे परंतुक जादा दाखल केले.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ९ द्वारे 'त्याच्या मते' यानंतर हा मजकूर दाखल केला.

(ब) पुढील सरकारी वर्षाच्या सुरुवातीस पुनर्विनियोजन करण्यासाठी किंवा खर्च करण्यासाठी उपलब्ध होतील अशा कोणत्याही शिल्लक रकमा असल्यास त्यांचा अंदाज ;

(क) करापासून व परिवहन उपक्रमापासून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त पुढील सरकारी वर्षातील महानगरपालिकेच्या जमा रकमा व उत्पन्न यांचा अंदाज ;

(ड) पुढील सरकारी वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशा कराधानासंबंधीच्या प्रस्तावांचे विवरणपत्र व कराधानापासून मिळणाऱ्या जमा रकमांचा अंदाज ;

(ई) पुढील सरकारी वर्षात परिवहन निधीतून बदली करावयाच्या रकमांचा अंदाज तयार केला पाहिजे व स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा स्वरूपात तिला सादर केला पाहिजे.

[१][परंतु, प्रकरण बारा व प्रकरण तेरा खालील सेवांच्या संबंधात पुढील सरकारी वर्षासाठी महानगरपालिकेचे उत्पन्न व खर्च यांचा स्वतंत्र अंदाज तयार केला पाहिजे.]

**स्पष्टीकरण.—**कोणत्याही विशेष निधीत कोणतीही शिल्लक उपलब्ध असल्यास ती, नियमांन्वये अशा निधीतून भागवता येईल अशा खर्चाव्यतिरिक्त अन्य खर्चाच्या बाबतीत, खंड (ब) अन्वये पुढील सरकारी वर्षाच्या सुरुवातीस पुनर्विनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध आहे असे मानले जाणार नाही, आणि अशी संपूर्ण शिल्लक किंवा तिचा कोणताही भाग पुढील सरकारी वर्षाच्या सुरुवातीस अशा खर्चासाठी उपलब्ध असलेली रक्कम म्हणून हिशोबात धरली जाईल किंवा काय हे आयुक्ताने ठरविले पाहिजे.

अर्थसहाय्य देऊन पुरवलेल्या सेवांबाबत अहवाल.

[२]**[९५-अ.** (१) या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी यथास्थिती, आयुक्त किंवा परिवहन व्यवस्थापक, स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्यासोबत एक अहवाल जोडील. या अहवालामध्ये, लगत पूर्वीच्या वर्षी पुढील सेवा अर्थसहाय्य देऊन पुरवण्यात आल्या होत्या किंवा कसे आणि तशा त्या पुरविण्यात आल्या असल्यास अर्थसहाय्याची मर्यादा, ज्या साधनातून अर्थसहाय्य देण्यात आले ते साधन आणि स्थानिक लोकसमुदायाचे जे भाग किंवा वर्ग अशा अर्थसहाय्याचे लाभाधिकारी होते ते भाग किंवा वर्ग दर्शवण्यात येतील. सदर सेवा म्हणजे.—

(क) पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट ;

(ख) कचरा साफ करणे, त्यांची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे ;

(ग) महापालिका परिवहन, आणि

(घ) सडकांवरील दिवाबत्तीची व्यवस्था.

(२) स्थायी समिती किंवा यथास्थिती, परिवहन समिती त्या अहवालाची तपासणी करील व तिच्या कोणत्याही शिफारशी असल्यास त्यांच्यासह तो अहवाल महानगरपालिकेसमोर ठेवील.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७० द्वारे परंतुक समाविष्ट केले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७१ द्वारे कलम ९५-अ समाविष्ट केले.

**स्पष्टीकरण.**—एखाद्या सेवेचा, ती चालवणे व तिची देखभाल यांवरील खर्च आणि भत्तांच्या घसाऱ्यासाठी व ऋणखर्चासाठी असलेली पुरेशी तरतूद मिळून बनलेला एकूण खर्च हा ती सेवा देण्याशी संबंध लावता येण्याजोगा प्राप्तीपेक्षा अधिक असेल तर ती सेवा अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात येत आहे असा तिचा अन्वयार्थ लावण्यात येईल.]

**९६.** (१) स्थायी समितीने आयुक्ताचे अंदाज व प्रस्ताव विचारात घेतले पाहिजेत आणि आयुक्ताकडून जी कोणतीही आणखी तपशीलवार माहिती मागवणे तिला योग्य वाटेल ती मिळवून आणि या अधिनियमाच्या सर्व आवश्यक गोष्टी लक्षात घेऊन, ती त्यावरून तिला योग्य वाटतील अशा फेरफारांच्या व त्यामध्ये करावयाच्या वाढींच्या अधीन, [1][पुढील सरकारी वर्षासाठी पुढीलप्रमाणे दोन अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले पाहिजेत :— स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

(अ) (एक) प्रकरणे बारा व तेरा यांच्या प्रयोजनांसंबंधातील उत्पन्न व खर्च ;

(दोन) परिवहन उपक्रमाच्या संबंधातील उत्पन्न व खर्च

यांव्यतिरिक्त असलेले उत्पन्न व खर्च यांचा अर्थसंकल्पीय अंदाज " क " ;

(ब) प्रकरण बारा व तेरा यांच्या प्रयोजनांसंबंधातील उत्पन्न व खर्च यांचा अर्थ संकल्पीय अंदाज "क";]

(२) अर्थसंकल्पीय अंदाज "अ" मध्ये स्थायी समितीने —

(अ) प्रकरण ११ च्या तरतुदींच्या संदर्भात तिला योग्य वाटतील असे नगरपालिका करांचे दर व मर्यादा प्रस्तावित केल्या पाहिजेत ;

(ब) आयुक्ताने अंदाज केलेली रक्कम तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे [2][पोट-कलम (२-क) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराव्यतिरिक्त ] सुधारून कोणत्याही विशेष निधीकडे तिचे विनियोजन करण्यासाठी परवानगी दिली पाहिजे ;

(क) परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन, तो चालवणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल जबाबदार असेल अशा सर्व रकमा व मुद्दलाचे व व्याजाचे हप्ते याव्यतिरिक्त, महानगरपालिका ज्या देण्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार असेल अशा सर्व रकमा व मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबद्दल तरतूद केली पाहिजे ;

(ड) कोणत्याही विशेष निधीतील शिलकीमधून जो कोणताही खर्च करणे तिला आवश्यक वाटेल त्यासाठी तरतूद केली पाहिजे ;

---

१ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १० (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) द्वारे "योग्य वाटेल त्याप्रमाणे" यानंतर हा मजकूर समाविष्ट केला.

(ई) कोणत्याही विशेष निधीतील कोणतीही शिल्लक असल्यास त्याव्यतिरिक्त एक लाखाहून कमी नसेल इतकी किंवा [1][राज्य] शासन वेळोवेळी मान्य करील अशी त्याहून लहान रक्कम उक्त वर्षाच्या शेवटी रोख शिल्लक म्हणून ठेवण्याची परवानगी दिली पाहिजे.

[2][(२-अ) अर्थसंकल्पीय अंदाज " ग " मध्ये स्थायी समितीन.—

(अ) प्रकरण अकराच्या तरतुदींच्या संदर्भात प्रकरणे बारा व तेरा यांच्या प्रयोजनांसाठी तिला योग्य वाटतील असे महानगरपालिका करांचे, म्हणजेच, पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभ कर, मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर यांचे किंवा जेथे लागू असेल तेथे साफसफाई कराचे ; दर व त्यांची व्याप्ती प्रस्तावित केली पाहिजे ;

(ब) उक्त करांच्यामुळे मिळणाऱ्या रकमेचा किंवा अन्य कोणत्याही रकमांचा अंदाज नमूद केला पाहिजे ;

(क) प्रकरणे बारा व तेरा यांमध्ये समाविष्ट असलेल्या बाबींच्या संदर्भात या अधिनियमान्वये महानगरपालिका ज्यासाठी जबाबदार असेल त्या सर्व रकमा व मुद्दल आणि व्याज यांचे सर्व हप्ते, ते जसजसे देय होतील तसतसे प्रदान करण्यासाठी तरतूद केली पाहिजे ;

(ड) आयुक्ताला आवश्यक वाटेल असा, प्रकरणे बारा व तेरा यांच्या प्रयोजनांसाठी पुढील सरकारी वर्षात महानगरपालिकेकडून करण्यात येणारा खर्च, कोणताही असल्यास, त्यासाठी तरतूद केली पाहिजे.]

(३) आयुक्ताने, स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्पीय अंदाज छापण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि त्याची छापील प्रत महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा तारखेच्या सुमारास प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी किंवा माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी पाठविला पाहिजे.

(४) स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्पीय अंदाज महानगरपालिकेपुढे ठेवला जाईल आणि महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत त्याचा विचार करण्याच्या कामास सुरुवात केली पाहिजे.

परिवहन व्यवस्थापकाने दरवर्षी परिवहन उपक्रमाचे खर्च व उत्पन्न यांचा अंदाज तयार करणे.

**९७.** परिवहन व्यवस्थापकाने, प्रत्येक वर्षी महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी, परिवहन समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यामध्ये —

(अ) त्याच्या मते महानगरपालिकेने पुढील आगामी सरकारी वर्षात परिवहन उपक्रमासाठी जो खर्च केला पाहिजे किंवा करावा तो खर्च आणि त्याच्या मते विशेष निधीत जमा केल्या पाहिजेत किंवा त्यातून खर्च केल्या पाहिजेत अशा काही रकमा असल्यास त्यांचा नियमानुसार वर्गीकरण केलेला अंदाज ;

(ब) पुढील आगामी सरकारी वर्षाच्या सुरुवातीस पुनर्विनियोजन करण्यासाठी किंवा खर्च करण्यासाठी उपलब्ध होतील अशा कोणत्याही शिल्लक रकमा असल्यास त्यांचा अंदाज व पुढील आगामी वित्तीय वर्षात कलमे ३५९ व ३६० अन्वये नगरपालिका निधीत बदली करावयाच्या रकमांचा अंदाज ;

---

१ " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १० (क) द्वारे पोट-कलम (२-अ) समाविष्ट केला.

(क) पुढील आगामी सरकारी वर्षात महानगरपालिकेस परिवहन उपक्रमापासून मिळणाऱ्या रकमांचा व उत्पन्नाचा अंदाज,

तयार केला पाहिजे व परिवहन समिती वेळोवेळी मान्य करील अशा स्वरूपात तिला सादर केला पाहिजे.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही विशेष निधीत कोणतीही शिल्लक उपलब्ध असल्यास, ती नियमान्वये अशा निधीतून भागवता येईल अशा खर्चाव्यतिरिक्त अन्य खर्चाच्या बाबतीत, खंड (ब) अन्वये पुढील सरकारी वर्षाच्या सुरुवातीस पुनर्विनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध आहे असे मानले जाणार नाही आणि अशी संपूर्ण शिल्लक किंवा तिचा कोणताही भाग पुढील सरकारी वर्षाच्या सुरुवातीस अशा खर्चासाठी उपलब्ध असलेली रक्कम म्हणून हिशेबात धरली जाईल किंवा काय हे परिवहन व्यवस्थापकाने ठरविले पाहिजे.

परिवहन समितीने अर्थसंकल्पीय अंदाज ‘ब’ तयार करणे.

९८. (१) परिवहन समितीने, परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेतले पाहिजेत आणि परिवहन व्यवस्थापकाकडून जी कोणतीही आणखी तपशीलवार माहिती मागवणे तिला योग्य वाटेल ती मिळवून आणि या अधिनियमाच्या सर्व आवश्यक गोष्टी लक्षात घेऊन ती त्यावरून तिला योग्य वाटतील अशा फेरफारांच्या व त्यामध्ये करावयाच्या वाढींच्या अधीन परिवहन उपक्रमाच्या बाबतीत मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च यांचा पुढील सरकारी वर्षाचा “अर्थसंकल्पीय अंदाज ‘ब’ ” या नावाचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला पाहिजे.

(२) अर्थसंकल्पीय अंदाज ‘ब’ मध्ये उक्त समितीने —

(अ) परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन, तो चालवणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रकमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबद्दल तरतूद केली पाहिजे ;

(ब) परिवहन व्यवस्थापकाने अंदाज केलेली रक्कम तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे सुधारून कोणत्याही विशेष निधीकडे तिचे विनियोजन करण्यास परवानगी दिली पाहिजे ;

(क) पुढील आगामी सरकारी वर्षात कलमे ३५९ व ३६० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नगरपालिका निधीत रकमा बदली करण्याची परवानगी दिली पाहिजे ;

(ड) कोणत्याही विशेष निधीतील शिलकीमधून जो कोणताही खर्च करणे तिला आवश्यक वाटेल त्यासाठी तरतूद केली पाहिजे ;

(ई) कोणत्याही विशेष निधीतील कोणतीही शिल्लक असल्यास त्याव्यतिरिक्त एक लाखाहून कमी नसेल इतकी किंवा महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून लहान रक्कम अशा वर्षाच्या शेवटी रोख शिल्लक म्हणून ठेवण्याची परवानगी दिली पाहिजे.

(३) परिवहन व्यवस्थापकाने, परिवहन समितीने तयार केलेला अर्थसंकल्पीय अंदाज “ ब ” महानगरपालिका याबाबत वेळोवेळी निश्चित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी स्थायी समितीपुढे ठेवला पाहिजे आणि स्थायी समितीने त्यावर प्रतिवृत्त तयार करून त्यात तिचे कोणतेही अभिप्राय व शिफारशी असल्यास त्यांचा समावेश करून ते महानगरपालिकेकडे पाठविले पाहिजे.

(४) नगरपालिकेच्या सचिवाने अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' व त्यावरील स्थायी समितीचे प्रतिवृत्त छापण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि महानगरपालिका याबाबत वेळोवेळी निश्चित करील अशा तारखेच्या आत त्याची छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी किंवा माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या स्थानिक निवासस्थानी पाठविले पाहिजे.

करांचे दर निश्चित करणे.

**९९.** महानगरपालिकेने, याबाबत स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन, पुढील सरकारी वर्षात कलम १२७, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले नगरपालिका कर ज्या दरानी बसवण्यात येतील ते दर आणि उक्त कलमाच्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या करांपैकी जे कोणतेही कर [1][(त्याच्या खंड (क क क) खालील स्थानिक संस्था कर वगळून)] बसवण्याचे तिने ठरवले असेल ते कर पुढील सरकारी वर्षात ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसवण्यात येतील ते दर व ती मर्यादा, प्रकरण ११ मध्ये विहित केलेल्या मर्यादांस व शर्तीस अधीन राहून, फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापूर्वी निश्चित केले पाहिजेत.

प्रथम बसवावयाच्या उपकराला कलम ९९ च्या तरतुदी लागू न होणे.

[2][**९९-अ.** कलम १२७, पोट-कलम (२) च्या खंड (कक) मध्ये विनिर्दिष्ट केलेला उपकर बसवण्यांचे महानगरपालिका प्रथम ठरवील त्या वेळी कोणत्याही वर्षाच्या १ एप्रिल पूर्वी, या अधिनियमाच्या कलम ९९ च्या तरतुदी आणि इतर संबद्ध तरतुदी यांनुसार उपकर बसवता येत नसेल तर कलम ९९ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी महानगरपालिकेला, प्रकरण ११-क मध्ये विहित केलेल्या मर्यादा व शर्ती यांच्या आणि नियमांच्या अधीन राहून, ज्या दराने ज्या मर्यादेपर्यंत आणि ज्या तारखेपासून उपकर बसवण्यात येईल ते दर, मर्यादा व तारीख निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी बोलावलेल्या विशेष सभेमध्ये त्या गोष्टी निश्चित करता येतील ; आणि त्यानंतर, अशा रीतीने निश्चित केलेल्या दरांनी व तारखेपासून उपकर बसवण्यात येईल आणि या अधिनियमाचे कलम ९९ व इतर तरतुदी यांद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असावा अशा प्रकारे या अधिनियमाच्या सर्व संबद्ध तरतुदी शक्य असेल तेथवर उपकराला लागू होतील.]

स्थानिक संस्था कराकरिता मालाचा प्रवर्ग निश्चित करणे.

[3][**९९-ब.** राज्य शासन, पुढील वर्षात, कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क क क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मालाच्या विविध प्रवर्गासाठीचे कर ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसवण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत आयुक्तांचा प्रस्ताव विचारात घेऊन आणि प्रकरण ११-ख मध्ये निर्धारित केलेल्या मर्यादांस व शर्तीस अधीन राहून, प्रत्येक वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापूर्वी निश्चित करील आणि असे दर व अशी मर्यादा **राजपत्रात** अधिसूचित करील.]

कलम ९९-ख च्या तरतुदी प्रथमत: स्थानिक संस्था कर बसविताना लागू न होणे.

**९९-क.** कलम १२७, पोट-कलम (२) च्या खंड (क क क) मध्ये विनिर्दिष्ट केलेला स्थानिक संस्था कर बसविण्याचे प्रथमच ठरविण्यात येईल त्यावेळी कोणत्याही वर्षाच्या १ एप्रिल पूर्वी, या अधिनियमाच्या कलम ९९-ख च्या तरतुदी आणि इतर संबद्ध तरतुदी यांनुसार स्थानिक संस्था कर बसवता येत नसेल तर कलम ९९-ख मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्रकरण ११-ख मध्ये निर्धारित केलेल्या मर्यादा व शर्ती यांच्या व नियमांच्या अधीन राहून, ज्या दराने, आणि ज्या मर्यादेपर्यंत आणि ज्या तारखेपासून स्थानिक संस्था कर निर्धारित करण्यात येईल ते दर, मर्यादा व तारीख निश्चित करता येतील ; आणि त्यानंतर, अशा रीतीने अधिसूचित केलेल्या दरांनी, मर्यादांनी व तारखेपासून

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३ द्वारे हे शब्द, कंस व आकडे दाखल केले.

२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ द्वारे कलम ९९-अ समाविष्ट केले.

३ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४ द्वारे कलम ९९-ख आणि ९९-ग दाखल केले.

स्थानिक संस्था कर बसवण्यात येईल आणि या अधिनियमाचे कलम ९९-ख व इतर तरतुदी यांद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असावा अशा प्रकारे या अधिनियमाच्या सर्व संबद्ध तरतुदी शक्य असेल तेथवर स्थानिक संस्था कराला लागू होतील.]

[1][**९९-ङ.** (१) कलम ९९-ख किंवा ९९-ग मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास कलम ९९-ख, किंवा यथास्थिती, कलम ९९-ग अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या स्थानिक संस्था कराच्या दरांमध्ये व मर्यादांमध्ये कोणत्याही वेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि अशा अधिसूचनेमध्ये कारणे विनिर्दिष्ट करून, सुधारणा करता येईल. स्थानिक संस्था कराच्या दरांमध्ये सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) द्वारे काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.]

**१००.** कलम ९९ अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधीन राहून, महानगरपालिकेस अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' [2][किंवा यथास्थिती, अर्थसंकल्पीय अंदाज 'ग'] स्थायी समितीकडे व अर्थसंकल्पीय अंदाज 'ख' परिवहन समितीकडे अधिक विचारासाठी परत पाठवता येतील किंवा तिला सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाज किंवा कोणतेही सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज जसेच्या तसे किंवा तिला इष्ट वाटतील असे फेरफार त्यात करून स्वीकृत करता येतील : अर्थसंकल्पीय अंदाजाची अंतिम स्वीकृती.

परंतु, महानगरपालिकेने अंतिमरीत्या स्वीकारलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात, यथास्थिती [3][कलम ३६, पोट-कलम (२), खंड (ग) व (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक बाबीसाठी आणि पोट-कलम (२-क), खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसाठी ] आणि कलम ९८, पोट-कलम (२), खंड (क), (ग) व (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक बाबीसाठी पूर्णपणे तरतूद करण्यात आली पाहिजे :

परंतु आणखी असे की, महानगरपालिकेने मार्च महिन्याच्या एकतीस तारखेस किंवा त्यापूर्वी अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरीत्या स्वीकारले नाहीत तर, यथास्थिती स्थायी समितीने किंवा परिवहन समितीने शिफारस केलेले अर्थसंकल्पीय अंदाज हे अशा रीतीने असे अंदाज स्वीकारण्यात येईपर्यंत महानगरपालिकेने अंतिमरीत्या स्वीकारलेले अंदाज आहेत असे मानले जाईल.

[1][**१००-अ.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अर्थसंकल्पीय अंदाज ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असतील त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी स्थायी समितीने ते अर्थसंकल्पीय अंदाज, कोणत्याही कारणास्तव महानगरपालिकेसमोर सादर केले नसतील आणि त्यामुळे किंवा अन्यथा महानगरपालिकेने ते अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्वीकृत केलेले नसतील तर, महानगरपालिका या अधिनियमाच्या तरतुदीनुसार ते अर्थसंकल्पीय अंदाज रीतसर स्वीकृत करेपर्यंत, कलम ९५ अन्वये आयुक्ताने तयार केलेले उत्पन्न व खर्च यांचे अंदाज, त्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज असल्याचे मानण्यात येईल.] उत्पन्न व खर्च यांचे अंदाज अर्थसंकल्पीय अंदाज मानणे.

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १० द्वारे कलम ९९-घ दाखल केले.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ (अ) द्वारे समाविष्ट केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) द्वारे समाविष्ट केला.

महानगरपालिकेस अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल आणि अतिरिक्त अनुदाने मंजूर करता येतील.

**१०१.** (१) नगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाच्या बाबतीत स्थायी समितीच्या आणि परिवहन निधीतून करावयाच्या खर्चाच्या बाबतीत परिवहन समितीच्या शिफारशीवरून महानगरपालिकेस वेळोवेळी सरकारी वर्षात, उक्त वर्षात उद्‌भवलेली कोणतीही विशेष किंवा अकल्पित गरज भागवण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदाने मंजूर करता येतील, परंतु असे करताना कोणत्याही विशेष निधीची शिल्लक असल्यास ती सोडून अशा वर्षाच्या अखेरीस अंदाजित रोख शिल्लक एक लाख रुपयाहून किंवा नगरपालिका निधी किंवा परिवहन निधी यापैकी कोणत्याही निधीच्या बाबतीत महानगरपालिकेने त्यावेळी निश्चित केली असेल अशा अन्य रकमेहून कमी होता कामा नये.

(२) अशी वाढीव किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदाने ही ज्या वर्षात ती अशा रीतीने वाढवण्यात किंवा अतिरिक्त मंजूर करण्यात आली असतील त्या वर्षासाठी महानगरपालिकेने स्वीकृत केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आली आहेत असे मानले जाईल.

खर्च न केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानासंबंधी तरतूद.

**१०२.** संपूर्ण अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या वर्षासाठी ते अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आले असेल त्या वर्षाच्या अखेरीस खर्च न होता तसेच राहिले असेल व ते पुढील दोन वर्षांपैकी कोणत्याही वर्षाच्या अर्थसंकल्पात नमूद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या किंवा परिवहन निधीच्या प्रारंभिक शिलेत हिशेबात घेतले नसेल तर, यथास्थिती स्थायी समितीस किंवा परिवहन समितीस यथास्थिती असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षांच्या मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उद्दिष्टांसाठी नव्हे तर, ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते ते प्रयोजन किंवा उद्दिष्ट हे, मूळ उद्देशाप्रमाणे किंवा मंजुरीप्रमाणे साध्य करण्यासाठी खर्च करण्यास मंजुरी देता येईल.

रकमा कमी करणे किंवा बदली करणे.

**१०३.** कोणत्याही अर्थसंकल्पीय शीर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शीर्षातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय शीर्षात किंवा अर्थसंकल्पीय शीर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत.

आवश्यक असेल तेव्हातेव्हा महानगरपालिकेने सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुन:समायोजन करणे.

**१०४.** (१) समुचित समितीने नियमान्वये अर्थसंकल्पीय अनुदानात कोणतीही कपात केली असली तरीही, यथास्थिती, नगरपालिका निधीचे किंवा परिवहन निधीचे उक्त वर्षातील उत्पन्न उक्त वर्षाच्या अशा रीतीने कमी केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात मंजूर केलेला खर्च भागवण्यास आणि कोणत्याही विशेष निधीची कोणतीही शिल्लक असल्यास ती वगळून एक लाख रुपयांहून किंवा नगरपालिका निधी किंवा परिवहन निधी यांपैकी कोणत्याही निधीच्या बाबतीत महानगरपालिकेकडून त्यामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अन्य रकमेहून कमी नसेल इतकी रोख शिल्लक वर्षाच्या अखेरीस मागे ठेवण्यास पुरेसे नाही असे स्थायी समितीच्या किंवा परिवहन समितीच्या अभिवेदनावरून महानगरपालिकेस कोणत्याही सरकारी वर्षात कोणत्याही वेळी दिसून येईल तर त्या वर्षाच्या उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आवश्यक असेल अशी कोणतीही उपाययोजना करण्यासाठी ताबडतोब मंजुरी देणे हे महानगरपालिकेचे अवश्य कर्तव्य असेल.

(२) या प्रयोजनासाठी, महानगरपालिकेस, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा परिवहन उपक्रमासंबंधीची जबाबदारी याकडे योग्य लक्ष देऊन शक्य असेल तितपत, त्या वर्षासाठी मंजूर केलेला खर्च कमी करण्याचा किंवा यथास्थिती पूरक कराधान किंवा परिवहन उपक्रमाच्या संबंधात बसवलेली भाडी व आकार सुधारणे या उपायांचा अवलंब करता येईल.

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २७ द्वारे कलम १००-अ दाखल केले.

## लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा

**१०५.** (१) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षा केली पाहिजे आणि त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविला पाहिजे व स्थायी समिती देखील वेळोवेळी व तिला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत स्वतंत्रपणे महानगरपालिकेच्या लेख्यांची तपासणी व लेखापरीक्षा करू शकेल.

नगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाने लेख्यांची साप्ताहिक छाननी करणे व स्थायी समितीने लेख्यांची छाननी करणे.

(२) या प्रयोजनासाठी स्थायी समितीस व नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेचे सर्व लेखे व त्यासंबंधीचे सर्व अभिलेख व पत्रव्यवहार पाहता येईल आणि स्थायी समिती किंवा नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, जमा रकमा व संवितरित रकमा यांसंबंधी जो कोणताही खुलासा मागवतील तो आयुक्ताने त्यास ताबडतोब दिला पाहिजे.

**१०६.** (१) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने —

मुख्य लेखा परीक्षकाने अहवाल सादर करणे.

(अ) महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत जे कोणतेही महत्त्वाचे अयोग्य किंवा नियमबाह्य प्रकार त्यास कोणत्याही वेळी आढळून येतील त्यासंबंधी स्थायी समितीस अहवाल सादर केला पाहिजे.

(ब) लेखापरीक्षेच्या प्रगतीबाबत स्थायी समिती वेळोवेळी जी माहिती मागवील ती उक्त समितीला पुरविली पाहिजे.

(२) स्थायी समितीने नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने स्थायी समितीस सादर केलेला प्रत्येक अहवाल व नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाच्या अभिप्रायाचे प्रत्येक विवरणपत्र किंवा या अधिनियमान्वये त्यास नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणे व त्याच्याकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करणे यासंबंधी जी बाब महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक स्थायी समितीस सांगेल अशी कोणतीही बाब, अशा अहवालावर किंवा विवरणपत्रावर स्थायी समितीने कोणते आदेश दिले आहेत हे नमूद करणाऱ्या अहवालासह महानगरपालिकेपुढे ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि महानगरपालिकेला पूर्वोक्त बाबींसंबंधी तिला आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करता येईल.

(३) प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने, महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहिजे.

(४) आयुक्ताने उक्त अहवाल छापून त्याची प्रत कलम ९४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रशासन अहवालाच्या व लेखा विवरणपत्राच्या छापील प्रतीसह प्रत्येक पालिका सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१०७.** कलमे १०५ व १०६ मध्ये—

कलमे १०५ व १०६ ही परिवहन निधीच्या लेख्यांच्या बाबतीत लागू होणे.

(एक) "स्थायी समिती" हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे त्याऐवजी "परिवहन समिती" हे शब्द आणि "आयुक्त" हा शब्द जेथे जेथे येईल तेथे तेथे त्या ऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून, आणि

(दोन) कलम १०६, पोट-कलम (४) मध्ये "९४" या आकड्याऐवजी "३६२" हा आकडा दाखल करण्यात आला आहे असे समजून,

उक्त कलमे परिवहन निधीच्या लेख्यांच्या बाबतीत लागू होतील.

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून लेखापरीक्षा आवश्यक करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[1][**१०७-अ** राज्य शासन, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून परिवहन उपक्रम असल्यास, त्याच्या लेख्यांसह महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन, तो आयुक्ताकडे पाठवील. आयुक्त, अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, असा लेखापरीक्षा अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील. त्यानंतर, आयुक्त, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यातील तरतुदींनुसार अहवालावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करील.]

[2][राज्य] शासनाला विशेष लेखापरीक्षे-साठी निदेश देता येईल.

**१०८.** (१) [2][राज्य] शासन, परिवहन उपक्रमाचे लेखे धरून महानगरपालिकेच्या लेख्यांची विशेष लेखापरीक्षा करण्याच्या व त्यावर [2][राज्य] शासनास अहवाल सादर करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही वेळी लेखापरीक्षकाची नेमणूक करू शकेल आणि अशा कोणत्याही लेखापरीक्षेचा [2][राज्य] शासन ठरवील असा खर्च, यथास्थिति, नगरपालिका निधीवर किंवा परिवहन निधीवर आकारण्याजोगा असेल.

(२) अशा रीतीने नेमलेला लेखापरीक्षकाला नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाला ज्या अधिकाराचा वापर करता येईल अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करता येईल.

## प्रकरण दहा

## कर्ज घेण्याचे अधिकार

पैसा कर्जाऊ घेण्याचे महानगर-पालिकेचे अधिकार.

**१०९.** (१) महानगरपालिकेस [2][राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीने, ऋणपत्रे काढून किंवा अन्य रीतीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या किंवा या अधिनियमान्वये तिने संपादन करण्याचे योजलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या किंवा या अधिनियमाच्या किंवा परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनासाठी जे कर बसविण्याचा तिला प्राधिकार आहे त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही करांच्या किंवा त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही कर्ज रोख्यांच्या प्रतिभूतीवर,—

(अ) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना तिने केलेला किंवा करावयाचा कोणताही परिव्यय, आकार किंवा खर्च भागवण्याच्या ;

(ब) या अधिनियमान्वये काढलेले कोणतेही कर्ज किंवा ज्याच्या परतफेडीसाठी महानगरपालिका जबाबदार असेल असे कोणतेही अन्य कर्ज फेडण्याच्या ;

(क) या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेली कर्जे देणे धरून सामान्यत: या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याच्या ;

प्रयोजनासाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम वेळोवेळी कर्जाऊ किंवा पुन्हा कर्जाऊ घेता येईल व व्याजाने घेता येईल ;

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ६ द्वारे कलम १०७-अ दाखल केले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परंतु,—

(एक) कायम स्वरूपाच्या कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम पार पाडण्यासाठी कोणतेही कर्ज उभारले जाणार नाही ; 'कायम स्वरूपाचे काम' या संज्ञेत, ज्या कामाचा खर्च काही वर्षांच्या मुदतीत विभागला जावा असे [1][राज्य] शासनाचे मत असेल अशा कोणत्याही कामाचा समावेश होईल ;

(दोन) ज्या शर्तीवर व ज्या पद्धतीने कर्ज उभारावयाचे व त्याची परतफेड करावयाची त्या शर्ती व ती पद्धत [1][राज्य] शासनाने मान्य केल्यावाचून, कोणतेही कर्ज उभारले जाता कामा नये ;

(तीन) ज्या कालावधीत कर्जाची परतफेड करावयाची तो कालावधी कोणत्याही बाबतीत साठ वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये आणि जेथे पूर्वीच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी नवीन कर्ज उभारले असेल तेथे, नंतरच्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी [1][राज्य] शासनाने तसा निदेश दिला नसेल तर, मूळ कर्जाच्या परतफेडीसाठी निश्चित केलेल्या कालावधीच्या उरलेल्या कालावधीपेक्षा अधिक असता कामा नये आणि कोणत्याही बाबतीत, मूळ कर्ज उभारल्याच्या तारखेपासून साठ वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये कोणतीही रक्कम कर्जाऊ किंवा पुन्हा कर्जाऊ घेतली असेल तेव्हा —

(अ) तिच्या कोणत्याही भागाचा विनियोग [1][राज्य] शासनाच्या पूर्व मंजुरीवाचून, ज्या प्रयोजनासाठी ते उभारले असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी केला जाता कामा नये ;

(ब) कोणतेही बांधकाम पार पाडण्यासाठी बांध कर्जाऊ घेतलेल्या किंवा पुन्हा कर्जाऊ घेतलेल्या बांध कोणत्याही रकमेच्या कोणत्याही भागाचा विनियोग, जे बांधकाम बांधण्यासाठी पैसा कर्जाऊ घेतला असेल त्याच बांधकामावर लावलेले नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन किंवा भत्ते देण्यासाठी केला जाता कामा नये ;

परंतु, अशा कामाचे नकाशे व अंदाज तयार करणे किंवा असे बांधकाम बांधणे किंवा त्यावर देखरेख ठेवणे किंवा अशा कामाचे हिशेब ठेवणे, यासाठी अंशत: कामावर लावलेल्या नगरपालिका अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देण्यासाठी झालेल्या खर्चाचा स्थायी समिती निश्चित करील असा भाग अशा रीतीने कर्जाऊ घेतलेल्या किंवा पुन्हा कर्जाऊ घेतलेल्या रकमेतून देता येईल.

[2][**१०९-अ.** कलम १०९ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय, महानगरपालिकेने निर्माण केलेल्या कोणत्याही निधीतून महानगरपालिकेस कोणतेही अंतर्गत कर्ज घेता येणार नाही, तसेच, महानगरपालिकेस, ज्या कारणांकरिता तो निधी निर्माण करण्यात आला आहे त्या कारणांखेरीज अन्य कोणत्याही कारणांसाठी अशा निधीचा वापर करता येणार नाही.]

महानगरपालिकेने निर्माण केलेल्या निधीच्या वापरावरील निर्बंध.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २८ द्वारे कलम १०९-अ दाखल केले.

सार्वजनिक कर्जरोख्यांवर बँकांकडून कर्ज घेण्याचे महानगर-पालिकेचे अधिकार.

**११०.** कलम १०९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, या अधिनियमांच्या प्रयोजनांसाठी, नगरपालिका निधीच्या किंवा परिवहन निधीच्या खाती जमा असलेला शिल्लक पैसा ज्या बँकेत किंवा बँकात ठेवण्यात येईल अशा कोणत्याही बँकेकडून किंवा बँकांकडून महानगरपालिकेची रोख शिल्लक त्यावेळी ज्यात गुंतवण्यात येईल अशा कोणत्याही सार्वजनिक कर्जरोख्यांवर कर्ज घेता येईल.

कर्जाची परतफेड केव्हा व कशी केली जाईल.

**१११.** महानगरपालिकेने कलम १०९ अन्वये उभारलेल्या प्रत्येक कर्जाची उक्त कलमाच्या पोट-कलम (१), परंतुक (दोन) अन्वये मान्य केलेल्या कालावधीत आणि पुढे दिलेल्या पद्धतींपैकी उक्त परंतुकानुसार मान्य करण्यात येईल अशा पद्धतींनी परतफेड केली जाईल.

(अ) अशा कर्जाच्या बाबतीत, कलम ११२ अन्वये स्थापन केलेल्या कर्ज निवारण निधीतून रकमा देऊन ;

(ब) मुद्दल व व्याज यांच्या समान रकमा देऊन ;

(क) मुद्दलाच्या समान रकमा देऊन ;

(ड) नेमलेल्या दिवसापूर्वी घेतलेल्या कर्जाच्या बाबतीत, अशा दिवसाच्या निकटपूर्वी अशा कर्जाच्या परतफेडीसाठी वार्षिक रकमा काढण्याची पद्धत अंमलात असेल तर, अशा वार्षिक रकमा काढून ;

(ई) कलम १०९ (१) (ख) खालील प्रयोजनासाठी कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेतून देऊन ; किंवा

(फ) अंशत: अशा कर्जाच्या बाबतीत कलम ११२ अन्वये स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधीतून व अंशत: कलम १०९ (१) (ख) खालील प्रयोजनासाठी कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेतून देऊन.

कर्जनिवारण निधी स्थापन करण व त्याचा विनियोग.

**११२.** (१) जेव्हा जेव्हा कलम १०९, पोट-कलम (१) च्या परंतुक (दोन) अन्वये कर्जनिवारण निधीतून कर्जाची परतफेड करण्यास मंजुरी देण्यात आली असेल तेव्हा तेव्हा, महानगरपालिकेने असा निधी स्थापन केला पाहिजे आणि चक्रवाढ व्याजाच्या संचित रकमांसह जी रक्कम, सर्व खर्चाच्या रकमा दिल्यानंतर, मान्य केलेल्या कालावधीत कर्ज चुकते करण्यासाठी पुरेशी होईल अशी रक्कम अशा निधीत उक्त परंतुकान्वये मान्य केलेल्या तारखांस भरली पाहिजे :

परंतु, कोणत्याही कर्जाची परतफेड करण्यासाठी स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधीच्या खाती जमा असलेली रक्कम ही, चक्रवाढ व्याजाने ती साचू दिल्याने मान्य केलेल्या कालावधीत कर्जाची परतफेड करण्यास कोणत्याही वेळी पुरेशी झाल्यास [१][राज्य] शासनाच्या परवानगीने अशा निधीत आणखी रकमा भरणे बंद करता येईल.

(२) महानगरपालिकेस कर्जनिवारण निधीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा विनियोग ज्यासाठी असा निधी स्थापन केला होता त्या कर्जाची फेड करण्यात किंवा फेड करण्याकडे करता येईल आणि महानगरपालिकेने अशा कर्जाची किंवा भागाची पूर्णपणे फेड करण्यात येईपर्यंत, त्याचा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी विनियोग करता कामा नये.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**११३.** (१) कर्जनिवारण निधीत भरलेला सर्व पैसा, कलम ११२, पोट-कलम (१) अन्वये ज्या तारखेस तो भरावयाचा होता त्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सरकारी कर्जरोख्यात गुंतवला जाईल.

कर्जनिवारण निधीची गुंतवणूक.

(२) अशा कोणत्याही गुंतवणुकीबाबत मिळालेले सर्व व्याज व अन्य रकमा कर्जनिवारण निधीत भरण्यात येतील आणि त्या मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, पोट-कलम (१) मध्ये विहित केलेल्या रीतीने गुंतवल्या जातील.

(३) दोन किंवा अधिक कर्जनिवारण निधींच्या खाती जमा असलेला पैसा, महानगरपालिकेच्या स्वेच्छानिर्णयानुसार सामाईक निधीत गुंतवता येईल आणि महानगरपालिकेस अशा गुंतवणुकीत धारण केलेले कर्जरोखे निरनिराळ्या कर्जनिवारण निधीत विभागण्याची आवश्यकता असणार नाही.

(४) जेव्हा कर्जनिवारण निधीचा कोणताही भाग महानगरपालिकेने काढलेल्या ऋणपत्रात गुंतवला असेल किंवा त्याचा विनियोग कर्जाच्या कोणत्याही भागाची फेड, त्यासाठी ठरवलेल्या मुदतीपूर्वी करण्याकडे केला असेल तेव्हा, अशा ऋणपत्रांवर किंवा कर्जाच्या अशा भागावर अन्यथा जे कोणतेही व्याज देय झाले असते ते कर्जनिवारण निधीत भरले जाईल व पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या रीतीने गुंतवले जाईल.

(५) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या गुंतवणुकीत वेळोवेळी फेरबदल करता येईल किंवा ती एका कर्जनिवारण निधीतून दुसऱ्या कर्जनिवारण निधीत बदली करता येईल :

परंतु, ज्या निधीतून अशी बदली केली असेल त्या निधीत, ज्या तारखेस अशी बदली केली असेल त्या तारखेस असलेल्या अशा गुंतवणुकीच्या मूल्याची प्रतिपूर्ती केली जाईल.

(६) ज्या कर्जाच्या परतफेडीसाठी कर्जनिवारण निधी स्थापन करण्यात आला असेल ते कर्ज ज्या वर्षात परतफेड योग्य असेल त्या वर्षात, अशा कर्जनिवारण निधीच्या मुद्दलाचा भाग म्हणून वेगळी काढून ठेवावयाची रक्कम आणि अशा कर्जनिवारण निधीचा भाग असलेल्या पैशांवरील व्याजाबद्दल मिळणारी रक्कम महानगरपालिकेस तिला योग्य वाटेल त्या स्वरूपात ठेवून घेता येईल.

**११४.** (१) जो कर्जनिवारण निधी सार्वजनिक कर्जरोख्यात गुंतवण्याविषयी या अधिनियमान्वये महानगरपालिकेस निदेश देण्यात आला असेल किंवा प्राधिकृत करण्यात आले असेल अशा कोणत्याही कर्जनिवारण निधींच्या बाबतीत आणि जो शिल्लक पैसा तशाच कर्जरोख्यात गुंतवण्याबाबत या अधिनियमान्वये महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास अधिकार प्रदान करण्यात आला असेल अशा कोणत्याही शिल्लक पैशाच्या बाबतीत, ज्यासाठी [१][राज्य] शासनाची मंजुरी रीतसर मिळवण्यात आली आहे अशा कोणत्याही कर्जाबद्दल काढलेली किंवा काढावयाची कोणतीही ऋणपत्रे महानगरपालिकेने अशा कोणत्याही गुंतवणुकीसाठी राखून ठेवणे व वेगळी काढून ठेवणे हे कायदेशीर असेल :

महानगर-पालिकेने काढलेल्या ऋणपत्रामध्ये कर्ज निवारण निधीची व शिलकी रकमांची गुंतवणूक.

परंतु, अशी ऋणपत्रे अशा रीतीने राखून ठेवण्याचा व वेगळी काढून ठेवण्याचा उद्देश, कर्ज काढण्याची शर्त म्हणून [१][राज्य] शासनास कळवलेला असला पाहिजे.

(२) अशी कोणतीही ऋणपत्रे महानगरपालिकेच्या वतीने प्रत्यक्ष महानगरपालिका आयुक्ताला व त्याच्या नावाने किंवा प्रत्यक्ष परिवहन उपक्रमाच्या परिवहन व्यवस्थापकाला व त्याच्या नावाने काढल्याने ती नष्ट किंवा रद्द होणार नाहीत ; परंतु अशा रीतीने काढलेले प्रत्येक ऋणपत्र हे सर्व बाबतीत जणू कोणत्याही अन्य व्यक्तीस व तिच्या नावाने काढण्यात आले आहे असे समजून कायदेशीर असेल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) महानगरपालिकेने काढलेले कोणतेही ऋणपत्र महानगरपालिकेने किंवा तिच्या वतीने आयुक्ताने किंवा परिवहन व्यवस्थापकाने खरेदी केल्याने किंवा तिच्याकडे किंवा त्याच्याकडे हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित केल्याने किंवा पृष्ठांकित केल्याने असे कोणतेही ऋणपत्र नष्ट किंवा रद्द होणार नाही. परंतु असे ऋणपत्र जणू काही अन्य कोणत्याही व्यक्तीने धारण केल्याप्रमाणे किंवा तिच्याकडे हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित किंवा पृष्ठांकित केल्याप्रमाणे, त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत कायदेशीर व परक्राम्य असेल.

कर्जनिवारण निधीची वार्षिक तपासणी.

**११५.** (१) या अधिनियमान्वये स्थापन केलेले किंवा ठेवलेले सर्व कर्जनिवारण निधी [१][मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा], यांच्या वार्षिक तपासणीच्या अधीन असतील व मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, याने अशा निधीत जमा असलेली रोकड व त्यातील कर्ज रोख्यांचे मूल्य, रकमा नियमितपणे गुंतवल्या असत्या व मुळात अंदाज केलेल्या दराने त्यापासून व्याज मिळाले असते तर अशा कर्ज निवारण निधीत जी रक्कम जमा झाली असती त्या रकमेइतकी प्रत्यक्ष रक्कम आहे किंवा कसे याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे.

(२) कर्जनिवारण निधीच्या खाती जी रक्कम जमा असावयास पाहिजे त्या रकमेची परिगणना, सर्व रकमा नियमितपणे गुंतवल्या आहेत व मुळात अंदाज केलेल्या दराप्रमाणे त्यापासून व्याज मिळत आहे असे गृहीत धरून या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अशा निधीत पुढे भरणे आवश्यक असलेल्या सर्व रकमांच्या विद्यमान मूल्याच्या आधारे करण्यात आली पाहिजे.

(३) या अधिनियमान्वये काढलेल्या किंवा महानगरपालिका ज्याबद्दल जबाबदार असेल व जे नियत दिवसापूर्वी उभारले असेल अशा कोणत्याही कर्जासाठी काढलेल्या ऋणपत्रांव्यतिरिक्त अन्य बाबतीत या कलमाच्या प्रयोजनांसाठी कर्जनिवारण निधीतील कर्जरोख्यांचे मूल्य त्यांच्या चालू बाजार मूल्याच्या आधारे ठरविले पाहिजे आणि अशा ऋणपत्रांचे मूल्य नेहमी दर्शनी मूल्याइतके धरण्यात आले पाहिजे, मात्र कर्जाच्या परतफेडीच्या वेळी अशा ऋणपत्राची प्रत्यक्ष विक्री केल्यानंतर जो कोणताही तोटा होईल त्याची महानगरपालिकेने ताबडतोब भरपाई केली पाहिजे.

(४) [२][राज्य] शासनाने क्रमाक्रमाने पुन: समायोजन करण्यास खास मंजुरी दिली नसेल तर, महानगरपालिकेने कोणत्याही कर्जनिवारण निधीत जी रक्कम कमी असल्याचे [१][मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा] प्रमाणित करील ती रक्कम ताबडतोब भरली पाहिजे.

(५) कोणत्याही कर्जनिवारण निधीच्या खाती जमा असलेली रोख रक्कम व कर्जरोख्यांचे मूल्य अशा निधीच्या खाती जी रक्कम जमा असावयास पाहिजे अशा रकमेपेक्षा अधिक असेल तर, [१][मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा] अशी अधिक रक्कम प्रमाणित करील व त्यानंतर महानगरपालिकेस अशी अधिक रक्कम नगरपालिका निधीत हस्तांतरित करता येईल :

परंतु, ज्या कर्जनिवारण निधीतून हस्तांतरण करण्यात आले असेल तो कर्जनिवारण निधी, परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी पूर्णत: किंवा अंशत: उभारलेल्या कर्जासंबंधी असेल तर महानगरपालिकेस अशी अधिक रक्कम किंवा ती ठरवील असा तिचा भाग परिवहन निधीमध्ये हस्तांतरित करता येईल.

(६) पोट-कलम (४) किंवा (५) अन्वये [१][मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा], याने दिलेले कोणतेही प्रमाणपत्र बिनचूक आहे किंवा कसे याविषयी कोणताही विवाद उद्‌भवल्यास, रक्कम भरल्यानंतर किंवा तिचे हस्तांतरण केल्यानंतर महानगरपालिकेस ती बाब [२][राज्य] शासनाकडे पाठवता येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

---

१ " महालेखापाल मुंबई " या शब्दाऐवजी हा मजकूर सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, ४२, कलम १८ द्वारे दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**११६.** महानगरपालिका ज्यासाठी जबाबदार आहे अशा, नियत दिवसापूर्वी उभारलेल्या सर्व कर्जाच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :— नियत दिवसापूर्वी उभारलेल्या कर्जासंबंधी तरतुदी.

(अ) अशी कर्जे उभारण्यात आली तेव्हा ती कर्जनिवारण निधीतून परतफेडयोग्य करण्यात आली असतील तर, महानगरपालिकेने अशा कर्जाच्या परतफेडीसाठी कर्जनिवारण निधी स्थापन केला पाहिजे आणि कर्जे उभारण्यात आली त्यावेळी निश्चित करण्यात आल्या असतील अशा रकमा, त्या निश्चित करण्यात आल्या असतील अशा तारखांस अशा कर्जनिवारण निधीमध्ये भरल्या पाहिजेत ;

(ब) अशा कर्जाच्या परतफेडीसाठी स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधीमध्ये नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस धारण केलेले सर्व कर्जरोखे व रोख रक्कम ही खंड (अ) अन्वये स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधींचा भाग म्हणून महानगरपालिकेने धारण केली पाहिजे ;

(क) कलम ११२ च्या तरतुदी अशा कर्जनिवारण निधींना लागू होतील ;

(ड) अशी कर्जे उभारण्यात आली तेव्हा ती मुद्दल व व्याज यांच्या समान हप्त्यांनी किंवा मुद्दलाच्या समान हप्त्यांनी किंवा वार्षिक रकमा काढून परतफेडयोग्य करण्यात आली असतील तर, महानगरपालिकेने असे हप्ते किंवा वर्षावर्षाला काढलेल्या रकमा या, अशी कर्जे उभारण्यात आली त्यावेळी निश्चित करण्यात आल्या असतील अशा तारखांना व निश्चित करण्यात आली असेल अशा रीतीने भरल्या पाहिजेत.

(ई) कलम ११७ च्या तरतुदी अशा कर्जांना लागू होतील.

**११७.** (१) महानगरपालिकेने कर्जाऊ घेतलेला कोणताही पैसा किंवा त्यासंबंधी देणे असलेले कोणतेही व्याज किंवा खर्च यांची कर्जाच्या शर्तीनुसार परतफेड करण्यात आली नाही तर, [१][राज्य] शासन, कर्ज त्याने स्वत:च दिले असल्यास, नगरपालिका निधी किंवा परिवहन निधी किंवा नगरपालिका निधीचा किंवा परिवहन निधीचा भाग जप्त करू शकेल आणि अन्य प्रकरणात कर्ज देणाऱ्याने अर्ज केल्यावर, नगरपालिका निधी किंवा परिवहन निधी किंवा नगरपालिका निधीचा किंवा परिवहन निधीचा भाग जप्त करील. कर्जाच्या परतफेडीत कसूर केल्यास नगरपालिका निधीची किंवा परिवहन निधीची जप्ती.

(२) अशा जप्तीनंतर, [१][राज्य] शासनाने याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने जप्त केलेल्या निधीसंबंधी किंवा त्याच्या भागासंबंधी कोणत्याही प्रकारे व्यवहार करता कामा नये ; परंतु अशी जप्ती झाली नसती तर, कोणत्याही नगरपालिका प्राधिकाऱ्यास, अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास त्यासंबंधी जे व्यवहार करता आले असते ते सर्व व्यवहार अशा अधिकाऱ्यास करता येतील आणि अशा अधिकाऱ्यास, अशा जप्तीच्या उत्पन्नाचा विनियोग, सर्व थकबाकी व त्यासंबंधी देय असलेले सर्व व्याज व खर्च व जप्तीमुळे व त्यानंतरच्या कार्यवाहीमुळे झालेला सर्व खर्च देण्याकडे करता येईल :

परंतु, जप्त झालेला निधी किंवा त्याचा भाग ज्या ऋणासाठी पूर्वी कायद्यानुसार तारण म्हणून देण्यात आला होता असे कोणतेही ऋण अशा जप्तीमुळे विफल होणार नाही किंवा त्यास बाध येणार नाही आणि ज्या दायित्वाबाबत अशी जप्ती केली आहे त्या दायित्वाच्या पूर्तीसाठी अशा उत्पन्नाचा विनियोग करण्यापूर्वी अशा निधीच्या किंवा त्याच्या भागाच्या जप्तीच्या उत्पन्नातून असे आधीचे सर्व बोजे चुकते करण्यात येतील.

**११८.** (१) या अधिनियमान्वये काढलेली ऋणपत्रे, महानगरपालिका [१][राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा नमुन्यात असली पाहिजेत. ऋणपत्राचे नमुने.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये रीतसर प्राधिकृत केलेल्या नमुन्यातील कोणतेही ऋणपत्रधारकास त्याच्या बदली अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही नमुन्यातील ऋणपत्र महानगरपालिका वेळोवेळी ठरवील अशा अटींवर मिळवता येईल.

(३) या अधिनियमान्वये महानगरपालिकेने काढलेले प्रत्येक ऋणपत्र पृष्ठांकनाद्वारे हस्तांतरणीय असेल.

(४) अशा कोणत्याही ऋणपत्रांद्वारे प्रतिभूत केलेले पैसे मिळण्याचा व त्यासंबंधी दावा लावण्याचा हक्क हा, अशा ऋणपत्रांपैकी काही ऋणपत्रे इतरांपेक्षा आधीच्या तारखेची आहेत केवळ याच कारणामुळे अग्रक्रम न मिळता त्या त्या वेळी अशी ऋणपत्रे धारण करणाऱ्यामध्ये निहित असेल.

ऋणपत्रास जोडलेल्या सर्व कुपनांवर स्थायी समितीच्या सभापतींची व आयुक्ताची सही असणे.

**११९.** या अधिनियमान्वये काढलेल्या ऋणपत्रांना जोडलेल्या सर्व कुपनांवर स्थायी समितीच्या सभापतीने व महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताने सही केलेली असली पाहिजे आणि अशा सह्या कोरता येतील, शिलामुद्रित करता येतील किंवा कोणत्याही यांत्रिक क्रियेने उमटवता येतील.

दोन किंवा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे दिलेली ऋणपत्रे.

**१२०.** भारतीय संविदा अधिनियम, १८७२, कलम ४५ यात काहीही अंतर्भूत असले तरी — १८७२ चा ९.

(१) या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही ऋणपत्राची किंवा कर्जरोख्याची रक्कम दोन किंवा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे देय असेल आणि त्यापैकी एक किंवा कोणीही मरण पावल्यास अशा ऋणपत्राची किंवा कर्जरोख्याची रक्कम अशा व्यक्तींच्या उत्तरजीवीला किंवा उत्तरजीवींना देय असेल :

परंतु या पोट-कलमातील काहीही अशा उत्तरजीवी व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध मृत व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या कोणत्याही हक्कावर परिणाम करणार नाही ;

(२) जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही ऋणपत्राचे किंवा कर्जरोख्याचे संयुक्त धारक असतील तेव्हा, अशा व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती अशा ऋणपत्राच्या किंवा कर्जरोख्याच्या बाबतीत देय असलेल्या कोणत्याही व्याजाबद्दल किंवा लाभांशाबद्दल, अशा व्यक्तींपैकी अन्य व्यक्तीने महानगरपालिकेस विरुद्ध नोटीस दिलेली नसेल तर, प्रभावी पावती देऊ शकेल.

कर्जरोख्यांची दुसरी प्रत देणे.

**१२१.** (१) जेव्हा या अधिनियमान्वये दिलेले ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा संपूर्णत: किंवा अंशत: नष्ट झाले आहे असे अभिकथित करण्यात आले असेल आणि असे ऋणपत्र हरवले नसते, चोरीस गेले नसते किंवा नष्ट झाले नसते तर त्याची रक्कम ज्यास देय झाली असती ती व्यक्ती आपण आहोत असा दावा एखादी व्यक्ती करत असेल तेव्हा, तिने आयुक्ताकडे अर्ज केल्यानंतर आणि ते हरवल्याविषयी, चोरीस गेल्याविषयी किंवा नष्ट झाल्याविषयी व आपला दावा न्याय्य असल्याविषयी आयुक्ताचे समाधान होईल असा पुरावा दाखल केल्यानंतर, तिला —

(अ) जे ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले किंवा नष्ट झाले आहे असे अभिकथित करण्यात आले असेल त्याची रक्कम पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षांपेक्षा अधिक मुदतीनंतर देय असेल तर —

(एक) ऋणपत्राची दुसरी प्रत देण्यात येईपर्यंत त्या ऋणपत्राबाबत व्याज देण्याविषयी, आणि

(दोन) अर्जदारास देय असलेल्या ऋणपत्राची दुसरी प्रत देण्याविषयी, किंवा

(ब) जे ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा नष्ट झाले असे अभिकथित करण्यात आले असेल त्याची रक्कम पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षांच्या आत देय असेल तर —

(एक) ऋणपत्राची दुसरी प्रत न देता त्या ऋणपत्राबाबत व्याज देण्याविषयी, आणि

(दोन) ऋणपत्राची रक्कम ज्या तारखेस देय असेल त्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर ऋणपत्राबाबत देय असलेली मुद्दलाची रक्कम अर्जदारास देण्याविषयी आयुक्तांकडून आदेश मिळवता येईल.

(२) ऋणपत्र हरवल्यासंबंधी, चोरीस गेल्यासंबंधी किंवा नष्ट झाल्यासंबंधी महानगरपालिकेकडून विहित करण्यात येईल अशी अधिसूचना काढण्यात येईपर्यंत आणि महानगरपालिकेकडून विहित करण्यात येईल अशी मुदत संपेपर्यंत, आणि हरवलेल्या, चोरीस गेलेल्या किंवा नष्ट झालेल्या ऋणपत्रान्वये हक्क प्राप्त होणाऱ्या सर्व व्यक्तींच्या दाव्याच्या पोटी अर्जदार महानगरपालिकेकडून सांगण्यात येईल अशी क्षतिपूर्ती करून देईपर्यंत, पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश देण्यात येता कामा नये.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्या ऋणपत्रांबाबत आदेश देण्यात आला असेल त्यांची यादी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

(४) जे संपूर्ण ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा नष्ट झाले आहे असे अभिकथित करण्यात आले असेल अशा कोणत्याही ऋणपत्रासंबंधीच्या जबाबदारीतून महानगरपालिकेची कलम १२४ च्या तरतुदींन्वये मुक्तता होण्यापूर्वी कोणत्याही वेळी असे ऋणपत्र सापडले तर, त्याच्या बाबतीत या कलमान्वये दिलेला कोणताही आदेश रद्द करण्यात येईल.

**१२२.** (१) या अधिनियमान्वये दिलेल्या ऋणपत्रावर आपला हक्क आहे असा दावा सांगणाऱ्या व्यक्तीस आयुक्ताकडे अर्ज केल्यानंतर आणि आपला दावा न्याय्य असल्याविषयी त्याचे समाधान केल्यानंतर आणि आयुक्त विहित करील अशा रीतीने पोच दिलेले ऋणपत्र स्वाधीन केल्यानंतर आणि आयुक्त विहित करील अशी फी दिल्यानंतर, अर्ज करणाऱ्या व्यक्तीस देय असलेले नवीकृत ऋणपत्र मिळवता येईल ; ऋणपत्रांचे नवीकरण.

(२) या अधिनियमान्वये दिलेल्या ज्या ऋणपत्राच्या बाबतीत नवीकरण करण्याविषयी अर्ज करण्यात आला असेल त्याच्या हक्काविषयी विवाद असेल, तर आयुक्तास —

(अ) विवादातील कोणत्याही पक्षकाराने त्याचा अशा ऋणपत्रावर हक्क आहे असे घोषित करणारा अंतिम निर्णय सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडून मिळवला असेल तर, अशा पक्षकारांच्या नावे नवीकृत ऋणपत्र देता येईल ;

(ब) असा निर्णय मिळविण्यात येईपर्यंत, ऋणपत्राचे नवीकरण करण्याचे नाकारता येईल, किंवा

(क) यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे चौकशी केल्यानंतर व अशा चौकशीतून निष्पन्न झालेल्या गोष्टींचा विचार केल्यानंतर, त्याच्या मते अशा पक्षकारांपैकी कोणत्या पक्षकारांचा अशा ऋणपत्रावर हक्क आहे हे लेखी आदेशाद्वारे जाहीर करता येईल, आणि अशा रीतीने जाहीर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतर जर कोणत्याही व्यक्तीने अशा ऋणपत्रावर आपला हक्क प्रस्थापित करण्याकरिता सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयात कार्यवाही दाखल केली आहे अशी नोटीस अशा मुदतीत त्यास मिळाली नसेल तर पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार अशा पक्षकाराच्या नावे नवीन ऋणपत्र करून देता येईल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी "अंतिम निर्णय" या संज्ञेचा अर्थ, ज्यावर अपील करता येत नाही असा निर्णय किंवा ज्यावर अपील करता येते, परंतु कायद्यान्वये परवानगी असलेल्या मुदतीच्या आत ज्यावर अपील करण्यात आले नाही असा निर्णय असा आहे.

(३) पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या चौकशीच्या प्रयोजनासाठी आयुक्तास पक्षकार दाखल करतील अशा सर्व साक्षीपुराव्याची किंवा त्यापैकी कोणत्याही साक्षीपुराव्याची स्वत: नोंद करता येईल किंवा त्याची नोंद करण्याविषयी किंवा करून घेण्याविषयी, त्यास, [1][बृहन्मुंबईत, राज्य शासनाने विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या इलाखा दंडाधिकाऱ्यास व अन्यत्र जिल्हा दंडाधिकाऱ्यास] विनंती करता येईल. ज्यास अशी विनंती करण्यात आली असेल तो दंडाधिकारी अशा साक्षीपुराव्याची स्वत: नोंद करू शकेल किंवा त्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास त्याची नोंद करण्याविषयी निदेश देऊ शकेल आणि त्याने अशा साक्षीपुराव्याचा अभिलेख आयुक्ताकडे पाठविला पाहिजे.

(४) आयुक्तास किंवा या कलमान्वये काम करणाऱ्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटल्यास शपथेवर साक्षीपुराव्याची नोंद करता येईल.

नवीकृत ऋणपत्राबाबत दायित्व.

**१२३.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या नावे कलम १२२ अन्वये नवीकृत ऋणपत्र देण्यात आले असेल तेव्हा अशा रीतीने दिलेले ऋणपत्र हे, महानगरपालिका आणि अशी व्यक्ती व त्यानंतर तिच्यामार्फत हक्क प्राप्त होणाऱ्या सर्व व्यक्ती यांच्यामधील एक नवीन करार होय असे मानले जाईल.

(२) अशा कोणत्याही नवीकरणामुळे, अशा रीतीने नवीकृत ऋणपत्रांसंबंधी कोणत्याही अन्य व्यक्तीच्या महानगरपालिकेविरुद्ध असलेल्या हक्कास बाध येणार नाही.

विवक्षित बाबतीत मुक्तता.

**१२४.** जेव्हा कलम १२१ अन्वये ऋणपत्राची दुसरी प्रत देण्यात आली असेल किंवा कलम १२२ अन्वये ऋणपत्राचे नवीकरण करण्यात आले असेल किंवा ज्यांच्या बाबतीत ऋणपत्राची दुसरी प्रत न देता मुद्दलाची रक्कम देण्याविषयी कलम १२१ अन्वये आदेश देण्यात आला असेल त्या ऋणपत्राच्या मुद्दलाची रक्कम ज्या तारखेस ती देय झाली असेल त्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर देण्यात आली असेल तेव्हा यथास्थिती ज्या ऋणपत्राऐवजी त्याची दुसरी प्रत अशा रीतीने देण्यात आली असेल किंवा ज्याच्या बाबतीत अशी रक्कम देण्यात आली असेल त्या ऋणपत्रासंबंधीच्या सर्व दायित्वांतून महानगरपालिकेची पुढे दिलेल्या मुदतीनंतर मुक्तता होईल.—

---

१ सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २, अनुसूची भाग-३ अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(अ) ऋणपत्राची दुसरी प्रत देण्यात आली असेल त्या बाबतीत, कलम १२१, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून किंवा मूळ ऋणपत्रावर शेवटी व्याज दिल्याच्या तारखेपासून, या दोहोपैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून सहा वर्षे लोटल्यानंतर ;

(ब) नवीकृत ऋणपत्राच्या बाबतीत ते देण्यात आल्याच्या तारखेपासून सहा वर्षे लोटल्यानंतर, आणि

(क) ऋणपत्राची दुसरी प्रत न देता, मुद्दलाची रक्कम देण्यात आली असेल त्या बाबतीत, कलम १२१, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सहा वर्षे लोटल्यानंतर.

**१२५.** कलम १२२ मध्ये काहीही असले तरी, त्या कलमाखाली उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबतीत आयुक्तास,— क्षतिपूर्ती.

(१) मूळ ऋणपत्रान्वये मागणी करणाऱ्या सर्व व्यक्तींच्या हक्काबद्दल महानगरपालिकेच्या व आयुक्ताच्या नावे आयुक्तास वाटेल अशी क्षतिपूर्ती केल्यावर नवीकृत ऋणपत्र देता येईल ; किंवा

(२) अशी क्षतिपूर्ती केली नसेल, तर नवीकृत ऋणपत्र नाकारता येईल.

**१२६.** (१) आयुक्ताने प्रत्येक वर्षाच्या शेवटी पुढील गोष्टी दर्शविणारे एक विवरणपत्र तयार केले पाहिजे,— आयुक्ताने वार्षिक विवरणपत्र तयार करणे.

(अ) महानगरपालिका ज्याबद्दल दायी आहे व ज्याची वर्ष सुरू होण्यापूर्वी पूर्णपणे परतफेड करण्यात आली नाही अशी मागील वर्षात काढलेली कर्जे, वर्षाच्या सुरुवातीस देणे असलेली बाकी रक्कम, कर्ज घेतल्याची तारीख व कर्जाबद्दल द्यावयाचे वार्षिक आकार यांच्या तपशीलासह ;

(ब) वर्षामध्ये महानगरपालिकेने काढलेली कर्जे, कर्जाची रक्कम, कर्ज काढल्याची तारीख व कर्जाबद्दल द्यावयाचे वार्षिक आकार यांच्या तपशीलासह ;

(क) ज्यासाठी कर्जनिवारण निधी स्थापन करण्यात आला आहे अशा प्रत्येक कर्जाच्या बाबतीत वर्षअखेर अशा वर्षात निधीच्या खाती जमा करण्यात आलेली रक्कम वेगळी दाखवून कर्जनिवारण निधीत साचलेली रक्कम ;

(ड) त्या वर्षात फेडलेली कर्जे आणि हप्त्यांनी किंवा वार्षिक रक्कम काढून फेडलेल्या कर्जाच्या बाबतीत त्या वर्षात फेडलेल्या रकमा आणि वर्षअखेरीस देणे असलेली बाकी रक्कम ;

(ई) ज्या कर्जरोख्यांमध्ये कर्जनिवारण निधीच्या रकमा गुंतवण्यात आल्या आहेत किंवा ज्यांच्या साठी त्या राखून ठेवण्यात आल्या आहेत त्या कर्जरोख्यांचा तपशील.

(२) असे प्रत्येक विवरणपत्र महानगरपालिकेच्या बैठकीपुढे ठेवण्यात आले पाहिजे व ते **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आले पाहिजे आणि अशा विवरणपत्राची एक प्रत [१][राज्य] शासनाकडे व महालेखापाल, मुंबई यांच्याकडे पाठवण्यात आली पाहिजे.

---

१ ‘‘प्रांतिक’’ या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

## प्रकरण अकरा

## नगरपालिका कराधान

या अधि-नियमान्वये बसवावयाचे कर.

**१२७.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, महानगरपालिका पुढील कर बसवील :—

(अ) मालमत्ता कर ;

(ब) वाहने, नावा व जनावरे यांवरील कर.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करांच्या शिवाय आणखी, महानगरपालिकेस या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व त्याच्या तरतुदीच्या अधीन राहून पुढीलपैकी कोणतेही कर बसवता येतील —

(अ) जकात ;

[१][(अअ) शहरामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने जकातीऐवजी बसवावयाचा कर.]

[२][परंतु, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे महानगरपालिकेला, उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकातीएवढे उपकर बसविण्याकरिता, निदेश देता येतील.]

[३][(ककक) उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाने असा निदेश दिल्यास, जकात किंवा उपकर यांचेऐवजी बसवावयाचा स्थानिक संस्था कर.]

(ब) [४][ * * * * * * ]

(क) कुत्र्यांवरील कर ;

(ड) नाट्यगृहांवरील कर ;

(ई) शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने, [५][ * * * * ] यांवरील पथकर ;

* (फ) [६][संविधानान्वये] [७][राज्य] विधानमंडळास [७][राज्यात] बसवावयाचा अधिकार असलेला [८][व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील करांव्यतिरिक्त] कोणताही अन्य कर ;

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४ द्वारे खंड (अअ) समाविष्ट केला.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, याच्या कलम ४ द्वारे हे परंतुक दाखल केले.

३ वरील अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ५ द्वारे खंड (ककक) जादा दाखल केले.

४ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १६, कलम २८, अनुसूची दोन द्वारे खंड (ब) वगळण्यात आला.

५ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५, कलम २५, तिसऱ्या अनुसूची अन्वये हे शब्द वगळण्यात आले.

* मुंबई विधी अनुकूलन [राज्य व समवर्ती विषय] आदेश, १९५६ कलम १२७, पोट-कलम (२), खंड (फ) आणि पोट-कलम (४) अन्वये यात काहीही फेरबदल होत नाही.

६ विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारत सरकार अधिनियम, १९३५" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

७ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

८ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १६, कलम २८, अनुसूची दोन द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

१९५८ चा मुंबई ६५. [1][(२-क) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८, कलम २० मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त मोटार वाहनांवर, कोणताही कर किंवा पथकर बसवला जाणार नाही.]

(३) नगरपालिका करांची आकारणी व वसुली या अधिनियमाच्या तरतुदी व नियम यानुसार करण्यात येईल.

* (४) [2][राज्य] विधानमंडळास [3][संविधानान्वये] [2][राज्यात] जो कर बसविण्याचा अधिकार नाही असा कोणताही कर बसवण्यास या कलमातील कोणतीही गोष्ट प्राधिकृत करणार नाही.

**१२८.** नगरपालिका कर, नियमांनी विहित केलेल्या रीतीने पुढील प्रक्रियेने वसूल करता येतील :— नगरपालिका कर वसूल करण्याची रीत.

(१) बिल सादर करून ;

(२) [4][ * * * * ]

(३) कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून तिची विक्री करून ;

(४) कसूरदाराची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून ;

(५) जकात व पथकर यांच्या बाबतीत, माल व वाहने जप्त करून व त्यांची विक्री करून ;

(६) मालमत्ता कराच्या बाबतीत त्या मालमत्तेच्या संबंधात येणे असलेले भाडे जप्त करून ;

(७) दावा लावून.

## मालमत्ता कर

### [5] [करयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य यांवर बसवता येण्याजोगे मालमत्ता कर ]

[6] **[१२८-अ.** (१) या अधिनियमान्वये शहरातील इमारती व जमिनी यांवर बसवता येण्याजोग्या मालमत्ता करांत, पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार यांचा समावेश होईल. मालमत्ता करांमध्ये कोणत्या करांचा समावेश होतो.

(२) मालमत्ता कर बसविण्याच्या प्रयोजनासाठी " इमारत " या शब्दप्रयोगामध्ये, सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग यांचा समावेश होतो.

(३) सर्व किंवा कोणतेही मालमत्ता कर क्रमश: वाढत्या प्रमाणात लादता येतील.

(४) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महानगरपालिका, कलम १२९ च्या पोट-कलम (२) अन्वये, इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या भांडवली मूल्याच्या आधारे कोणतेही किंवा सर्व मालमत्ता कर बसविण्याच्या पद्धतीचा स्वीकार करेपर्यंत, अशा इमारतींच्या व जमिनींच्या करयोग्य मूल्यावर सर्व किंवा कोणतीही मालमत्ता कर बसविणे महानगरपालिकेने चालू ठेवणे हे कायदेशीर असेल.]

---

१ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम २५, तिसऱ्या अनुसूची अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

* मुंबई विधी अनुकूलन [राज्य व समवर्ती विषय] आदेश, १९५६ कलम १२७ पोट-कलम (२), खंड (फ) आणि पोट-कलम (४) अन्वये यात काहीही फेरबदल होत नाही.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " भारत सरकार अधिनियम, १९३५ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

४ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ (१) द्वारे खंड (२) वगळण्यात आले.

५ वरील अधिनियमाच्या कलम २ (२) द्वारे ' बसवता येणे मालमत्ता कर ' या शीर्षकाऐवजी दाखल केले.

६ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ द्वारे कलम १२८ (अ) दाखल केले.

१[करयोग्य मूल्यावर किंवा यथास्थिती, भांडवली मूल्यावर बसवता येण्याजोगे मालमत्ता कर व ते कोणत्या दरांनी बसवता येण्याजोगे असतील.]

**१२९.** २[ १ ] ३[ पुढील मालमत्ता कर यात यापुढे दिलेल्या अपवादांच्या, मर्यादांच्या व शर्तींच्या अधीन राहून, शहरातील इमारती व जमिनी यावर बसवण्यात येतील.]

(अ) शहराला पाणीपुरवठा करण्याची तरतूद करण्यासाठी महानगरपालिकेस वाजवी वाटेल अशा त्यांच्या करयोग्य मूल्याच्या ४[ किंवा यथास्थिती त्याच्या भांडवली मूल्याचा ] टक्केवारीने पाणीपट्टी ;

५[ (अअ) पाणीपुरवठ्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामांवर केलेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कार्य भाग भागवण्यासाठी महानगरपालिकेस आवश्यक वाटेल एवढ्या त्या कामांच्या करयोग्य मूल्याच्या ६[ किंवा यथास्थिती त्याच्या भांडवली मूल्याचा ] टक्केवारीने आकारावयाची "पाणीपुरवठा लाभकर" या नावाने ओळखली जाणारी अतिरिक्त पाणीपट्टी ]

७[ (ब) मूलभूत किंवा इतर कचरा गोळा करण्यासाठी, हलविण्यासाठी आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेस आवश्यक वाटेल असा, त्याच्या करयोग्य मूल्याच्या ८[ किंवा यथास्थिती त्याच्या भांडवली मूल्याच्या ] टक्केवारीने साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर ;

(बब) मूलभूत किंवा इतर कचरा गोळा करण्यासाठी, हलविण्यासाठी आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी भांडवली कामांवर केलेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागवण्यासाठी महानगरपालिकेस आवश्यक वाटेल एवढ्या, त्या कामांच्या करयोग्य मूल्याच्या ८[ किंवा यथास्थिती त्याच्या भांडवली मूल्याचा ] टक्केवारीने आकारावयाचा "मलप्रवाह सुविधा लाभ कर" या नावाने ओळखला जाणारा अतिरिक्त साफसफाई किंवा मलप्रवाह कर ; ]

(क) त्यांच्या करयोग्य मूल्याच्या बारा टक्यांहून कमी नाही ९[ किंवा यथास्थिती, त्यांच्या भांडवली मूल्याच्या ०.१ टक्क्यांहून कमी नाही आणि १ टक्क्याहून अधिक नाही ] इतका महानगरपालिकेने तसे ठरवल्यास, १०[ * * * ] बसवता येईल असा सामान्य कर ११[ व कलम ६३, खंड (५) आणि प्रकरण सतरा द्वारे किंवा तदन्वये महानगरपालिकेवर लादण्यात आलेली किंवा त्यामधून उद्भवणारी कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल अशा खर्चाची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या करयोग्य मूल्याच्या कमीत कमी एक-अष्टमांश टक्क्यांइतके आणि जास्तीत जास्त १२[ दोन टक्क्यांएवढे ] मूल्य सामान्य करात समाविष्ट करण्यात येईल.] :

---

१ वरील अधिनियमाच्या कलम ४ (१) द्वारे ही समास टीप दाखल केली.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) द्वारे कलम १२९ ला पोट-कलम (१) नवीन क्रमांक देण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) (क) (१) द्वारे "कलम १२७" या मजकुराने सुरू होणाऱ्या व समावेश होईल या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) (क) (२) द्वारे "करयोग्य मूल्य" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल केला.

५ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १२ (अ) द्वारे खंड (अअ) समाविष्ट केला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) (खख) मध्ये "करयोग्य मूल्याच्या" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल केला.

७ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १२ (ब) द्वारे खंड (ब) ऐवजी हे खंड दाखल केले.

८ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ (२) (क) (तीन), (चार) आणि (पाच) द्वारे हा मजकूर दाखल केला.

९ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) (क) (सहा) (ग) द्वारे हा मजकूर दाखल केला.

१० सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७२ (अ) द्वारे "क्रमश: वाढत्या प्रमाणात" हा मजकूर वगळला.

११ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

१२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १६ (अ) द्वारे "तीन चतुर्थांश टक्क्याएवढे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

**स्पष्टीकरण.—** जेथे इमारतींचा किंवा जमिनींचा कोणताही भाग, सामान्य करापेक्षा अधिक दरास पात्र असेल तेथे, असा भाग नगरपालिका कराधानाच्या प्रयोजनासाठी एक वेगळी मालमत्ता असल्याचे मानले जाईल.

[१] [ (ड) कलम १४८ अ अन्वये बसवावयाचा शिक्षण उपकर ;

(ई) कलम १४८ क अन्वये बसवावयाचा रस्ता कर : ]

[२] [ (च) प्रकरण १६ अन्वये बसवता येण्याजोगा सुधार आकार : ]

[३] [ * * * * ]

[४] [ (२) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये व स्पष्टीकरणामध्ये तरतूद केली असेल त्या व्यितरिक्त महानगरपालिकेला कलम ९९ च्या तरतुदींनुसार तिला निर्धारित करता येईल अशा दरांनी व अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासून इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्यांच्या आधारे शहरातील इमारतींवर व जमिनींवर मालमत्ता कर बसविण्याची पद्धत स्वीकारण्याचा ठराव संमत करता येईल :

परंतु, भांडवली मूल्यावर असा मेलमत्ता कर बसविण्यात आला असेल अशा दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी, असा कर.—

(एक) निवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्याबाबतीत बसवता येण्याजोग्या असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही, आणि

(दोन) अनिवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या किंवा जमिनींच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्याबाबतीत बसवता येण्याजोग्या असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या तिप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

[५] [ (२) परंतु, आणखी असे की, ज्या कोणत्याही निवासी किंवा अनिवासी इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बाबतीतील मालमत्ता कर हा, संती-नि-परवानगी आकार (लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स आकार) मग तो कोणत्ही नावाने संबोधला गिला असेल, विचारात घेऊन आलेल्या वार्षिक भाडे मूल्याच्या आधारे बसविला असेल अशा इमारती व तिच्या भागाच्या संबंधात, पहिल्या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, अशा लगतपूर्वीच्या वर्षामध्ये बसविण्यायोग्य असलेला असा मालमत्ता कर हा, अशी इमारत किंवा तिच्या भागाचा स्वत: भोगवटा करीत असल्याप्रमाणे आणि तशी निर्धारण पुस्तकात नोंद घेतली असल्याप्रमाणे, निश्चित करणे आयुक्तास विधिसंमत असेल ];

[६] [ परंतु, [७] (तसेच) महानगरपालिकेस, इमारतीच्या किंवा जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या वापरकर्त्यांच्या निरिनराळ्या प्रवर्गाकरिता मालमत्ता कराचे निरनिराळे दर निर्धारित करता येतील. ]

---

१ वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) द्वारे खंड (ड) व खंड (ई) जादा दाखल केले.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ (२) (७) द्वारे दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) (क) (आठ) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

४ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ (२) (ख) द्वारे हे पोट-कलम (२) दाखल केले.

५ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८ (क) द्वारे हे परंतुक दाखल केले.

६ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ११ (१) द्वारे हे परंतुक दाखल केले.

७ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ८ (ख) द्वारे "आणखी असे की" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल केले.

[१] [ तसेच ] आणखी असे की, अनुसूची 'घ' च्या प्रकरण आठ मधील कराधान नियमाच्या नियम ७-अ पोट-कलम (३) अन्वये सुधारित केलेल्या कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनींच्या भांडवली मूल्याच्या आधारे बसवलेला मालमत्ता कर हा, काहीही झाले तरी, अशा सुधारणा इतक्या रकमेहून अधिक असणार नाही :

परंतु, तसेच या पोट-कलमान्वये भांडवली मूल्य हा आधार समजून मालमत्ता कर बसविण्याचा स्वीकार केल्याच्या वर्षापासून सुरू होणाऱ्या पाच वर्षाच्या कालावधीकरिता४६.४५ चौरस मीटर (५०० चौरस फूट) किंवा त्यापेक्षा कमीफरसबंद क्षेत्र असलेल्या निवासी इमारतीच्या किंवा निवासी गाळ्याच्या संबंधात बसवावयाची मालमत्ता कराची रक्कम. भांडवली मूल्य हा आधार समजून मालमत्ता कर बसविण्याचा स्वीकार केल्याच्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांसाठी, महानगरपालिकेने, भांडवली मूल्य हा आधार समजून, मालमत्ता कर बसविण्याच्या स्वीकार केल्यानंतर, करयोग्य इमारतीच्या संबंधातील मालमत्ता करामध्ये, प्रत्येक पाच वर्षानंतर सुधारणा करण्यात येईल आणि अशा प्रत्येक सुधारणेनंतर, अशी मालमत्ता कराची रक्कम, कोणत्याही बाबतीत सुधारणा केल्याच्या वर्षाच्या लगत पूर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही.]

विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणे.

[२] [ **१२९-१अ.** कलम १२९ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष विकास प्रकल्पांच्या मालकीच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधीकरिता व वेगवेगळ्या विशेष प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील.

**स्पष्टीकरण :**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "विशेष विकास प्रकल्प" याचा अर्थ —

(एक) शासनाने किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१९) च्या अर्थांतर्गत असलेला, नियोजन प्राधिकरणाने हाती घेतलेला विकास प्रकल्प ; किंवा १९६६ चा महा. ३७.

(दोन) एकत्रित प्रोत्साहन योजना, २००१ च्या अंतर्गत असलेला "मेगा प्रकल्प", आणि शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मान्य केलेला व राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष विकास प्रकल्प म्हणून घोषित केलेला प्रकल्प, असा आहे. ]

भांडवली मूल्यावरील मालमत्ता कराच्या बाबतीत संक्रमणकालीन तरतुदी.

[३] [ **१२९-२-अ.** (१) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्याच्या आधारे, शहरातील इमारती व जमिनी यांवर मालमत्ता कर बसविण्याच्या पद्धतीचा स्वीकार करण्यांसाठी महानगरपालिकेने ठराव संमत केला असेल तेथे, ज्या सरकारी वर्षात इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्याच्या आधारे, असा कर बसविला असेल त्या वर्षात पुढील तरतुदी लागू होतील :—

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ११ (२) द्वारे " परंतु " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल केले.

२ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ४ द्वारे "कलम १२९-१अ" समाविष्ट केले.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९ द्वारे कलम १२९-२अ दाखल केले.

(एक) शहरातील इमारती व जमिनी यांचे भांडवली मूल्य निश्चित करण्यात येईपर्यंत, अशा इमारती व जमिनी यांच्या संबंधात बसविण्यायोग्य आणि देय असलेला मालमत्ता कर हा, तात्पुरत्या स्वरूपात, मागील वर्षामध्ये, बसविण्यायोग्य व देय असषलेल्या कराच्या रकमेइतका असेल ; आणि तद्नुसार महानगरपालिकेस, त्या कराकरिता तात्पुरते बिल बजावणे विधिसंमत असेल ;

(दोन) इमारतीचे व जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित केल्यानंतर, महानगरपालिका, मालमत्ता करांच्या आकारणीचे अंतिम बिल बजावील ;

(तीन) अशा अंतिम निर्धारणानंतर, निर्धारितीने अधिक रक्कम भरली आहे असे आढळून आले तर, अशी अधिक रक्कम, अंतिम बिल बजावल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, अंतिम बिलाच्या दिनांकापासून व्याजासह, परत करण्यात येईल किंवा निर्धारितीची संमती मिळवून, पुढील वर्षाच्या मालमत्ता कराच्या देय रकमेचे, कोणतीही असल्यास, प्रदान म्हणून ती रक्कम समायोजित करण्यात येईल ; आणि अंतिम निर्धारणानंतर कराची रक्कम ही निर्धारितीने यापूर्वीच भरलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, त्यातील फरकाची रक्कम निर्धारितीकडून वसूल करण्यात येईल.

(२) महानगरपालिका, ज्या सरकारी वर्षामध्ये, भांडवली मूल्याच्या आधारे इमारती व जमिनीवर मालमत्ता कर बसविण्याचे ठरवील ते सरकारी वर्ष समाप्त झाल्यावर, या कलमाच्या तरतुदी, अंमलात असण्याचे बंद होईल.]

[१] [ **१२९-अ.** [२] [ (१) ] १२९ किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदी यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा

जिल्हा परिषदेच्या क्षेत्राचा [४][अधिक मोठ्या नागरी क्षेत्रात] समावेश करण्यात येईल तेव्हा कमी केलेल्या दरात सामान्य कर बसविण्या-साठी तात्पुरती तरतूद.

(अ) पूर्णपणे किंवा अंशत: जिल्हा परिषद क्षेत्राचा समावेश [३] [ असणारे अधिक मोठे नागरी क्षेत्र ] कलम ३, पोट-कलम (२) अन्वये [३] [ विनिर्दिष्ट ] करण्यात येईल, किंवा,

(ब) जिल्हा परिषदेच्या कोणत्याही क्षेत्राचा समावेश होईल अशा रीतीने कलम ३, पोट-कलम (३) अन्वये एखाद्या [४] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्राच्या ] हद्दीमध्ये बदल करण्यात येईल,

(तेव्हा पूर्वीच्या जिल्हा परिषद क्षेत्रातील इमारतीवर व जमिनीवर यासोबत जोडलेल्या तक्यांच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्याच्या स्तंभ २ मध्ये त्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या रकमांच्या दराने, सामान्य कर बसवण्यात येईल आणि या रकमा, उक्त मुदतीमध्ये, कलम १५० खाली वाढवल्या जाण्यास पात्र होणार नाहीत.)

---

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७ द्वारे कलम १२९ अ समाविष्ट केले.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १७ द्वारे कलम १२९ अ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७३ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७३ (ब) द्वारे "शहर" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याऐवजी "अधिक मोठे नागरी क्षेत्र" हा मजकूर त्यांच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल केला.

**तक्ता**

| मुदत | सामान्य कराची रक्कम | |
|---|---|---|
| (१) | (२) | |
| १. त्या क्षेत्राचा त्या [१] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये ] समावेश करण्यात आल्याच्या तारखेपासून, ते क्षेत्र त्या [१] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये ] ज्या वर्षी, समाविष्ट करण्यात आले असेल [२] [ त्या वर्षानंतरच्या दुसऱ्या वर्षाच्या ] ३१ मार्चपर्यंत एवढी मुदत. | [३] [ ते क्षेत्र त्या [१] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये ] समाविष्ट करण्याच्या निकटपूर्वी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १२४, पोट-कलम (१), खंड (एक) अन्वये किंवा यथास्थिती, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १५७, पोट-कलम (१) च्या खंड (ड) अन्वये त्या क्षेत्रातील जमिनींवर व इमारतींवर देय असणाऱ्या कराच्या दराने काढलेली रक्कम (या तक्त्यात यापुढे जिचा निर्देश "त्या जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेल्या कराची रक्कम" असा करण्यात आला आहे).] | १९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महाराष्ट्र ५. |
| २. नोंद १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या नंतरची एक वर्षाची मुदत. | त्या [१] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये ] देय असलेल्या सामान्य कराच्या रकमेच्या [४] [ २० टक्के ] एवढी रक्कम, किंवा त्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये देय अशी कराची रक्कम, या दोहोंपैकी जी अधिक असेल ती रक्कम. | |
| ३. नोंद २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या नंतरची एक वर्षाची मुदत. | त्या [१] [ अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये ] देय असलेल्या सामान्य कराच्या रकमेच्या [५] [ ४० टक्के ] एवढी रक्कम, किंवा त्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये देय अशी कराची रक्कम, या दोहोंपैकी जी अधिक असेल ती रक्कम. | |

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७३ (ब) द्वारे "शहर" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याच्या ऐवजी "अधिक मोठे नागरी क्षेत्र" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल केला.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १७ (१) (अ) (एक) याद्वारे "त्या वर्षाच्या नंतरच्या वर्षाच्या" या मजकुराऐवजी दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १७ (१) (अ) (दोन) द्वारे स्तंभ (२) मधील परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल केला.

४ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १७ (१) (ब) द्वारे "४० टक्के" याऐवजी दाखल केले.

५ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १७ (१) (क) द्वारे "६० टक्के" याऐवजी दाखल केले.

| | |
|---|---|
| ४. नोंद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या नंतरची एक वर्षाची मुदत. | त्या [१][अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये] देय असलेल्या सामान्य कराच्या रकमेच्या [२][६० टक्के] एवढी रक्कम, किंवा त्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये देय अशी कराची रक्कम, या दोहोंपैकी जी अधिक असेल ती रक्कम. |
| [३][५. नोंद ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीनंतरच्या एक वर्षाची मुदत. | त्या [१][अधिक मोठ्या नागरी क्षेत्रामध्ये] देय असलेल्या सामान्य कराच्या रकमेच्या ८० टक्के एवढी रक्कम, किंवा त्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये देय असलेल्या कराची रक्कम, या दोहोंपैकी जी अधिक असेल ती रक्कम. |
| ६. नोंद ५ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतरची कोणतीही मुदत. | त्या [१][अधिक मोठ्या नागरी क्षेत्राच्या] उर्वरित क्षेत्रामध्ये जो अंमलात व देय असेल तेवढ्याच सामान्य कराची रक्कम.] |

[४][(२) महानगरपालिका, पोट-कलम (१) मधील तक्त्याच्या नोंद क्र. १ ते ५ मध्ये उल्लेखलेल्या मुदतींसाठी नव्याने समाविष्ट केलेल्या क्षेत्रातील विकास कामावर, जिल्हा परिषद क्षेत्राचा समावेश केल्याच्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षात महानगरपालिका क्षेत्रात करण्यात आलेल्या दरडोई खर्चाच्या एक-तृतीयांशाहून कमी नसेल एवढ्या दराने काढलेली रक्कम किंवा खर्च करणे शक्य असेल अशी कोणतीही अधिक रक्कम खर्च करील.]

**१३०.** (१) कलम १३४ च्या तरतुदीच्या अधीन राहून, पुढील जागांच्या बाबतीतच पाणीपट्टी बसवण्यात येईल :— पाणीपट्टी [५][ किंवा पाणीपुरवठा लाभ कर ] कोणत्या जागांवर बसवावयाची.

(अ) ज्या जागांना कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून खाजगीरीत्या पाणीपुरवठा होत असेल किंवा ज्या जागा कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रांशी पाणी वाहून नेणाऱ्या नळांच्या सहाय्याने जोडल्या असतील अशा जागा ; किंवा

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७३ (ब) द्वारे "शहर" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याच्या ऐवजी "अधिक मोठे नागरी क्षेत्र" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल केला.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १७ (१) (ड) द्वारे "८० टक्के" याऐवजी दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १७ (१) (ई) द्वारे नोंद ५ ऐवजी नवीन नोंदी दाखल करण्यात आल्या.

४ वरील अधिनियमाच्या कलम १७ (२) द्वारे पोट-कलम (२) जादा दाखल केले.

५ वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(ब) पाण्याचे खाजगी नळ किंवा सार्वजनिक नळ किंवा, कारंजे यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य प्रकारे नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून पाणीपुरवठा करण्याची महानगरपालिकेने सोय केली आहे अशी जाहीर नोटीस आयुक्ताने शहराच्या ज्या भागात दिली असेल त्या भागात असलेल्या जागा.

[१] [(२) शहरामध्ये स्थित असलेल्या सर्व जागांच्या बाबतीत "पाणीपुरवठा लाभ कर" आकारण्यात येईल.]

साफसफाई कर [३] [किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर] कोणत्या जागांवर बसवावयाचा.

**१३१.** (१) साफसफाई कर [२] [किंवा मलप्रवाह कर] पुढील जागांच्या बाबतीतच बसविण्यात येईल :—

(अ) संडास, मुत्र्या व मलकुंड्या यातून मलमूत्र व दूषित पदार्थ गोळा करणे, काढून नेणे व त्याची विल्हेवाट लावणे ही कामे महानगरपालिकेच्या अभिकरणामार्फत केली जातील अशी जाहीर नोटीस आयुक्ताने शहराच्या ज्या कोणत्याही भागात दिली असेल त्या भागात असलेल्या जागा ; किंवा

(ब) ज्या जागांमध्ये — मग त्या कोठेही असोत — नगरपालिका नालीशी नालीने जोडलेला संडास, शौचकूप, मलकुंडी, मुत्री, स्नानाची जागा किंवा स्वयंपाकाची जागा असेल अशी जागा :

परंतु, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शहराच्या ज्या कोणत्याही भागात किंवा त्यावर आयुक्ताच्या मते अशी घाण साचत नाही किंवा टाकली जात नाही त्या भागात असलेल्या कोणत्याही जागांच्या बाबतीत उक्त कर बसवता कामा नये.

(२) ज्या जागांच्या बाबतीत, वेगळ्या शौचकुपाची, संडासाची किंवा मुत्रीची सोय करण्याची जरूरी नाही असा आयुक्ताने निर्देश दिला असेल अशा जागा, जर अशा निदेशाच्या अभावी त्यांच्या बाबतीत साफसफाई कर बसवता आला असता तर, साफसफाई कर बसवण्यास पात्र आहेत असे मानले जाईल.

[४] [(३) शहरामध्ये स्थित असलेल्या सर्व जागांच्या बाबतीत "मल प्रवाह सुविधा लाभ कर" आकारण्यात येईल.]

सामान्य कर कोणत्या जागांवर बसवावयाचा.

**१३२.** (१) सामान्य कर पुढील इमारती व जमिनींव्यतिरिक्त शहरातील सर्व इमारतींवर व जमिनींवर बसवण्यात येईल :—

(अ) केवळ मृतांच्या विल्हेवाटीशी संबंधित प्रयोजनासाठीच वापरण्यात येणाऱ्या इमारती व जमिनी ;

(ब) केवळ सार्वजनिक पूजाअर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठीच भोगवट्यात असलेल्या व वापरण्यात येत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग ;

---

१ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १३ (अ) द्वारे पोट-कलम (२) जादा दाखल केला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (अ) द्वारे हा मजकूर दाखल केला.

३ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १४ (क) द्वारे हा मजकूर दाखल केला.

४ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १४ (ब) द्वारे पोट-कलम (३) जादा दाखल केला.

(क) केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या व व्यापारासाठी किंवा फायदा मिळवण्यासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या ज्या इमारती व जमिनी [१] [शासनामध्ये] निहित आहेत किंवा ज्या इमारती व जमिनी महानगरपालिकेमध्ये निहित आहेत व ज्यांच्या बाबतीत उक्त कर बसवला असता तर यात यापुढे दिलेल्या तरतुदींन्वये तो अनुक्रमे प्रथमत:

[१] [शासनाकडून] किंवा महानगरपालिकेकडून वसूल करता आला असता त्या इमारती व जमिनी ;

(२) पुढील इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग हे, पोट-कलम (१), खंड (ख) च्या अर्थानुसार केवळ सार्वजनिक पूजेअर्चेसाठी किंवा सार्वजनिक धर्मादायाच्या प्रयोजनासाठी भोगवट्यात आहेत व वापरण्यात येत आहेत असे मानले जाणार नाही :—

(अ) ज्यात कोणताही व्यापार किंवा धंदा चालवला जातो अशा इमारती किंवा जमिनी किंवा त्यांचे भाग, आणि

(ब) ज्यापासून भाडे मिळते अशा इमारती किंवा जमिनी किंवा त्यांचे भाग — मग अशा भाड्याचे उपयोजन केवळ धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी करण्यात येत असो वा नसो.

(३) जेथे कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा कोणताही भाग केवळ सार्वजनिक पूजेअर्चेसाठी किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी भोगवट्यात आहे व वापरण्यात येतो या कारणावरून त्यास सामान्य करापासून सूट देण्यात आली असेल तेव्हा, असा भाग नगरपालिका कराधानाच्या प्रयोजनासाठी वेगळी मालमत्ता असल्याचे मानले जाईल.

सामान्य कराच्या ऐवजी [२][राज्य] शासनाने महानगर-पालिकेस द्यावयाची रक्कम.

**१३३.** (१) [२] [राज्य] शासन प्रतिवर्षी महानगरपालिकेस, [३] [राज्य शासनामध्ये] निहित असलेल्या इमारतींना व जमिनींना कलम १३२, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये ज्यापासून सूट देण्यात आली आहे अशा सामान्य कराच्या ऐवजी पोट-कलम (२) [४] [(२-क)] व (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निश्चित केलेली रक्कम प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या ३० तारखेपर्यंत व मार्च महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत देय असलेल्या दोन सहामाही हप्त्यांमध्ये देईल.

(२) [१] [शासनामध्ये] निहित असलेल्या व लाभप्रद रीतीने भोगवट्यात असलेल्या ज्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात, उक्त सूट नसती तर [२] [राज्य] शासनाकडून सामान्य कर वसूल केला असता, त्यांचे करयोग्य मूल्य [२] [राज्य] शासन महानगरपालिकेच्या सहमतीने याबाबत वेळोवेळी नेमील अशा व्यक्तीकडून निश्चित केले पाहिजे. उक्त व्यक्तीने, उक्त मूल्य, मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

३ वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हे शब्द दाखल केले.

४ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ (१) द्वारे कंस, आकडे व शब्द दाखल केले.

मालमत्तेच्या मूल्यांकनासंबंधी या अधिनियमाच्या व संबंधित नियमांच्या तरतुदी सामान्यपणे लक्षात घेऊन, त्यास योग्य व वाजवी वाटेल अशा रकमेएवढे निश्चित केले पाहिजे. अशा रीतीने नेमलेल्या व्यक्तीचा निर्णय पाच वर्षांच्या मुदतीपर्यंत अंमलात राहील. परंतु दरम्यान [१] [त्या शहरातील राज्य शासनामध्ये निहित असलेल्या] इमारतींची व जमिनींची संख्या किंवा व्याप्ती यात महत्त्वाची वाढ किंवा घट झाली तर, त्या वाढीच्या किंवा घटीच्या प्रमाणातच अशा रकमेत फरक होईल.

[२] [(२-क) महानगरपालिकेने इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्यावर मालमत्ता कर बसविण्याचा स्वीकार केला असेल तर, शासनाकडे निहित असलेल्या व किफायतशीररीत्या भोगवट्यात असलेल्या शहरातील ज्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात, उक्त माफी दिली गेली नसती तर, राज्य शासनाकडून सर्वसाधारण कर बसविण्यात आला असता, त्याबाबतीत त्या इमारतींचे व जमिनींचे भांडवली मूल्य हे शासकीय अभिलेखामधील अशा जमिनींच्या किंवा इमारतींच्या पुस्तक मूल्याइतके असेल, आणि असे भांडवली मूल्य पाच वर्षांच्या मुदतीकरिता अंमलात राहील; मात्र दरम्यान, शासनाकडे निहित असलेल्या इमारतींची व जमिनींची संख्या किंवा व्याप्ती यात मोठ्या प्रमाणात वाढ किंवा घट झाली तर त्या वाढीच्या किंवा घटीच्या प्रमाणातच अशा मूल्यात बदल होईल.]

(३) [३] [राज्य] शासनाने महानगरपालिकेस प्रतिवर्षी द्यावयाची रक्कम, त्या शहरातील इमारतींच्या किंवा जमिनींच्या सर्वसाधारण मालकास पोट-कलम (२) [४] [किंवा यथास्थिती, पोट-कलम (२-क)] अन्वये निश्चित केलेल्या तितक्याच रकमेच्या करयोग्य * मूल्यावर [२] [किंवा यथास्थिती, भांडवली मूल्यावर] सामान्य कराबद्दल जेवढी रक्कम देय होईल त्या रकमेच्या आठदशांशाइतकी असेल.

नैसर्गिक आपत्ती इत्यादींमुळे बाधा पोचलेल्या व्यक्तिंनी भोगवटा केलेल्या इमारतींच्या बाबतीत मालमत्ता कर माफ करण्याचा अधिकार.

[५] [**१३३-अ.** या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, ती विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी व अशा शर्तींच्या अधीन कोणत्याही इमारतींच्या बाबतीत देय असलेल्या सर्व किंवा कोणत्याही मालमत्ता करांपैकी सर्व कर किंवा त्यांचा कोणताही भाग, जर उक्त कर प्रथमत: त्यांच्या प्रत्यक्ष भोगवटादारांकडून, शासनाकडून, महानगरपालिकेकडून किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडून वसूल करण्याजोगे असतील आणि दिनांक १२ जुलै १९६१ रोजी पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे झालेल्या विध्वंसामुळे किंवा कोणताही भयंकर पूर, आग, घर कोसळणे किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासनाने, महानगरपालिकेने किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने हाती घेतलेल्या कोणत्याही गलिच्छ वस्ती * निर्मूलन योजनेमुळे बाधित व्यक्तीकडून त्या इमारतीचा भोगवटा करण्यात आला असेल किंवा भोगवटा करण्याचा उद्देश असेल तर, माफ करता येईल.]

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ (२) (क) द्वारे पोट-कलम (२-क) दाखल केला.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५ (३) (ख) द्वारे हे शब्द, कंस व आकडे दाखल केले.

५ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ अन्वये १३३-अ दाखल करण्यात आले.

## पाणीपट्टी व साफसफाई कर यासंबंधी विशेष तरतुदी

**१३४.** (१) आयुक्तास,— पुरवलेल्या पाण्याबद्दल कराऐवजी ठरावीक आकार व प्रदानांसाठी करार.

(अ) स्थायी समिती सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत, पाणीपट्टी देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जागांच्या संबंधात पाणीपट्टी बसवण्याऐवजी अशा जागांना पुरवलेल्या पाण्याबद्दल, मोजणी करून याबाबत उक्त समितीकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा दराने किंवा नगरपालिकेच्या मुख्य नळास जोडलेल्या नळाचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी पुरवण्यात आले ते प्रयोजन यानुसार, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा दरांनी आकार घेता येईल.

(ब) स्थायी समिती सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत, कोणत्याही जागेला पाच वर्षांहून अधिक नसलेल्या एक किंवा अधिक वर्षाच्या नवीकरणयोग्य मुदतीसाठी उक्त जागांच्या बाबतीत अशा व्यक्तीकडून अन्यथा जी पाणीपट्टी किंवा मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून जो आकार वसूल करता आला असता त्याऐवजी एक ठरावीक नियतकालिक रक्कम दिल्यावर पाणी पुरवण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीबरोबर तडजोड करता येईल.

(२) आयुक्त, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून, पाण्याबद्दल आकार घेईल, अशा प्रकरणांसाठी, स्थायी समितीस, मीटर *नादुरुस्त असेल किंवा त्याची दुरुस्ती चालू असेल तेव्हा, पाण्याच्या वापरासंबंधी किंवा वापरलेल्या पाण्याबद्दल द्यावयाच्या आकारासंबंधी तिला योग्य वाटतील अशा शर्ती वेळोवेळी विहित करता येतील ; आणि उक्त कलमाच्या खंड (ब) अन्वये तडजोड करण्यात आली असेल अशा प्रकरणांसाठी, उक्त समितीस पाण्याच्या वापरासंबंधी तिला योग्य वाटतील अशा शर्ती विहित करता येतील :

परंतु, या पोट-कलमान्वये विहित करण्यात आलेली कोणतीही शर्त या अधिनियमाशी किंवा नियमांशी किंवा उपविधींशी विसंगत असता कामा नये.

(३) मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून पाण्याबद्दल ज्या व्यक्तीकडून आकार घेण्यात येत असेल किंवा ठरावीक नियतकालिक रक्कम देण्याबाबत ज्या व्यक्तीने तडजोड केली असेल ती व्यक्ती, पाणीपट्टी देण्यास पात्र असणार नाही ; परंतु पाण्याबद्दल तिने देय असलेली कोणतीही रक्कम, ती ज्या तारखेस देय होत असेल त्या तारखेस भरली नाही तर, ती जणू काही पाणीपट्टीची थकबाकी असल्याप्रमाणे आयुक्तास वसूल करता येईल.

मोजणी करून पाण्याबद्दल [१] [ शासनाकडून ] आकार घेणे.

**१३५.** केवळ सार्वजनिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येत असलेल्या व फायद्यासाठी किंवा राहण्याच्या धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या ज्या जागांच्या बाबतीत या अधिनियमान्वये [१] [ शासनाकडून ] पाणीपट्टी वसूल करता आली असती त्या जागांच्या बाबतीत, आयुक्तास, अशी पट्टी वसूल करण्याऐवजी, अशा जागांना पुरवलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून, *स्थायी समिती याबाबत विहित करील अशा दराने आकार घेता येईल. असा दर कलम, १३४, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये अन्य कोणत्याही व्यक्तीकडून त्यावेळी घेण्यात येणाऱ्या किमान दरापेक्षा अधिक असता कामा नये ; आणि असा आकार उक्त कलमाच्या पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक कारंजे इत्यादीतून पुरवलेल्या पाण्यावर कर न बसवणे.

**१३६.** शहरातील रहिवाशांना पाण्याचा नि:शुल्क पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे व महानगरपालिकेमध्ये निहित असलेले कोणतेही पिण्याच्या पाण्याचे कारंजे, टाकी, जलाशय, हौद, पंप, विहीर, वाहिनी, उभा नळ किंवा पाणीपुरवठ्याचे अन्य साधन यातील किंवा यातून मिळणाऱ्या पाण्याच्या वापरावर कोणत्याही प्रकारचा कर किंवा आकार बसवला जाता कामा नये किंवा त्याची मागणी केली जाता कामा नये :

परंतु अशा कोणत्याही साधनातील किंवा साधनातून मिळणारे पाणी फक्त वैयक्तिक किंवा घरगुती प्रयोजनासाठी वापरण्यात येत असले पाहिजे ; धंद्याच्या किंवा विकण्याच्या प्रयोजनासाठी नव्हे.

विवक्षित बाबतीत विशेष दरांनी साफसफाई कर [ किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभ कर निश्चित करता येईल.]

**१३७.** (१) आयुक्तास, जेव्हा जेव्हा त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, कोणतेही हॉटेल, क्लब, तबेला, किंवा अन्य मोठी जागा यांच्या बाबतीत द्यावयाच्या साफसफाई कर [२] [ किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर ] स्थायी समिती याबाबत सामान्यत: मान्य करील अशा विशेष दरांनी निश्चित करता येईल-मग ज्या सेवेच्या बाबतीत असा कर बसवण्याजोगा असेल ती सेवा माणसांकडून करण्यात येत असो किंवा त्याऐवजी अन्य साधने किंवा उपयंत्रे यांच्या साहाय्याने करण्यात येत असो.

(२) केवळ सार्वजनिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येत असलेल्या व फायद्यासाठी किंवा राहण्याच्या किंवा धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या ज्या जागांच्या बाबतीत [१] [ शासनाने ] साफसफाई कर [२] [ किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर ] देय असेल त्या जागांच्या बाबतीत आयुक्ताने वर सांगितल्याप्रमाणे मान्य केलेल्या विशेष दराने उक्त कर निश्चित केला पाहिजे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १५ द्वारे कलम १३७ मध्ये तसेच समास टीपेमध्ये "साफसफाई कर" आणि "साफसफाई कराची" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्यानंतर अनुक्रमे "किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर" आणि "किंवा मलप्रवाह कराची आणि मलप्रवाह सुविधा लाभ कराची" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(३) अशा कोणत्याही बाबीत साफसफाई कराची [१] [किंवा मलप्रवाह कराची आणि मलप्रवाह सुविधा लाभकराची] रक्कम नगरपालिकेच्या साफसफाई कर्मचारी वर्गामार्फत अशा जागांतून मलमूत्र व दूषित पदार्थ गोळा करण्याचा, काढून नेण्याचा किंवा विल्हेवाट लावण्याचा खर्च किंवा संभवनीय खर्च यांच्या संदर्भात निश्चित करण्यात आली पाहिजे.

कोणत्याही व्यक्तीने दिलेली [२] [पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभ कर, साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर किंवा मलप्रवाह सुविधा लाभ कर] तिला, ज्या जागे-बद्दल तो दिला असेल त्या जागेचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तींकडून वसूल करता येईल.

**१३८.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही जागेबद्दल आयुक्तास कोणतीही [२] [पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभ कर, साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर किंवा मलप्रवाह सुविधा लाभकर] दिला असेल त्या व्यक्तीने ज्या कालावधीसाठी तिने अशा कराची रक्कम भरली असेल त्या कालावधीत अशा जागेचा भोगवटा केला नसेल तर, तिला [३] [ * * * ] अशा कालावधीत ज्या व्यक्तीने अशा जागेचा प्रत्यक्ष भोगवटा केला असेल त्याव्यक्तीकडून उक्त रक्कम घेण्याचा हक्क असेल.

(२) पूर्वोक्त व्यक्तीकडून उक्त रक्कम वसूल करण्यासाठी, ज्या व्यक्तीने ती भरली असेल त्या व्यक्तीस, जणू अशी रक्कम ज्या व्यक्तीकडून ती घेण्याचा तिला अधिकार आहे त्या व्यक्तीने तिला देय असलेले भाडे आहे असे समजून तेच अधिकार असतील व त्याच उपाययोजना करता येतील.

[४] [(३) जर भाडेदारीच्या अटीनुसार अशा कोणत्याही जागेच्या भाडे आकारात, [५] [पाणी पट्टीचा, पाणी पुरवठा लाभ कराचा] किंवा पाण्यावरील आकाराचा समावेश असेल व नंतर पाणीपुरवठा समाईक मीटरमधून केला जात असेल व जर मालकाने किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कोणतेही [५] [पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभकर] किंवा पाण्यावरील आकार भरला असेल तर अशा मालकास जागेच्या भोगवटादाराकडून फक्त त्याच्याकडून पूर्वी देय असलेला पाण्यावरील आकार आणि अशी प्रत्येक जागा ज्या रकमेने भाड्याने दिली असेल त्या प्रमाणात यथाप्रमाण आधारावर अशा जागेकरिता देय असलेली [५] [पाणीपट्टी, पाणीपुरवठा लाभकर] किंवा पाण्यावरील आकार यांमधील फरक वसूल करण्याचा हक्क असेल.]

---

१ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १५ द्वारे कलम १३७ मध्ये तसेच समास टीपेमध्ये "साफसफाई कर" आणि "साफसफाई कराची" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्यानंतर अनुक्रमे "किंवा मलप्रवाह कर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर" आणि "किंवा मलप्रवाह कराची आणि मलप्रवाह सुविधा लाभ कराची" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १६ (अ) द्वारे "पाणीपट्टी किंवा साफसफाई कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १९(अ) द्वारे "कोणत्याही विरुद्ध कराराच्या किंवा संविदेच्या अधीन राहून" हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १९(ब) द्वारे पोट-कलम (३) जादा दाखल केले.

५ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १६ (ब) द्वारे "पाणीपट्टीचा आणि पाणीपट्टी" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल केला.

[१] मृ

**मालमत्ता कराबाबत दायित्व**

मालमत्ता करांबाबतची प्राथमिक जबाबदारी कोणावर असावी.

**१३९.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदीच्या अधीन राहून, कोणत्याही जागांवर आकारलेला मालमत्ता कर पुढीलप्रमाणे प्रथमत: वसूल करता येईल :—

(अ) जागा प्रत्यक्ष [1][शासनाकडून] किंवा महानगरपालिकेकडून धारण केल्या असतील तर त्यांच्या प्रत्यक्ष भोगवटादाराकडून :

परंतु, [1][शासनामध्ये] निहित असेलेल्या व [1][शासनाचे] कर्मचारी किंवा अन्य व्यक्ती भाडे देऊन, भोगवटा करत असलेल्या इमारतींच्या बाबतीत, देय मालमत्ता कर प्रथमत: [1][शासनाकडून] वसूल करण्यात येईल ;

याच्या कलम १३९ ची सुधारणा.

[2][(अ-१) जी मालक नाही अशा व्यक्तीने जागा धारण केली असेल किंवा ती तिचा भोगवटा करीत असेल आणि जागेच्या मालकाचा ठावठिकाणा निश्चित माहीत नसेल तर अशा धारकाकडून किंवा भोगवटादाराकडून ; आणि

(अ-२) विकासकाने किंवा मुखत्याराने अथवा कोणत्याही व्यक्तीने जागा धारण केली असेल किंवा तिचा विकास केला असेल मग अशा व्यक्तीने कोणत्याही नात्याने ती जागा धारण केलेली असेल आणि त्यापैकी प्रत्येकाला त्या जागेची विक्री करण्याचा अधिकार असेल-किंवा तिने ती संपादित केली असेल तर अशा धारकाकडून, विकासकाकडून, मुखत्यारांकडून किंवा, यथास्थिती, त्या व्यक्तीकडून ]

(ब) जागा याप्रमाणे धारण केल्या नसतील तर —

(एक) जागा भाड्याने देण्यात आल्या असतील तर पट्टाकाराकडून ;

(दोन) जागा पोट-भाड्याने देण्यात आल्या असतील तर, वरिष्ठ पट्टाकाराकडून ;

(तीन) जागा भाड्याने देण्यात आल्या नसतील तर, त्या भाड्याने देण्याचा हक्क ज्या व्यक्तीस असेल त्या व्यक्तीकडून.

(२) जर कोणतीही जमीन एखाद्या भाडेकऱ्यास एक वर्षाहून अधिक मुदतीसाठी भाड्याने दिली असेल आणि अशा भाडेकऱ्याने अशा जमिनीवर इमारत बांधली असेल, तर अशा जमिनीवर व तिच्यावर बांधलेल्या इमारतीवर आकारण्यात आलेला मालमत्ता कर, अशा भाडेकऱ्याकडून किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीने कायद्याचा अंमल किंवा अभिहस्तांकन किंवा हस्तांतरण (यामुळे परंतु पोट-पट्ट्याने दिल्यामुळे नव्हे अशा भाडेकऱ्याकडून हक्क संपादन केला असेल त्या व्यक्तीकडून) किंवा अशा भाडेकऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीकडून प्रथमत: वसूल करता येईल — मग अशी जागा उक्त भाडेकऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या किंवा कायदेशीर प्रतिनिधीच्या किंवा पोट-भाडेकऱ्याच्या भोगवट्यात असो वा नसो.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ६ द्वारे खंड (अ-१) व (अ-२) दाखल केले.

**१४०.** (१) कोणत्याही मालमत्ता कराबद्दल देय असलेली रक्कम, ती देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीस त्याबद्दलचे बिल नियमान्वये रीतसर देण्यात आल्यानंतर द्यावयाची राहील आणि उक्त व्यक्ती ज्या जागेसंबंधी कर देय असेल त्या जागेचा त्यावेळी भोगवटादार नसेल, तर आयुक्तास, त्या रकमेचे बिल उक्त जागेच्या भोगवटादारास देता येईल, किंवा, त्या जागेचे दोन किंवा अधिक भोगवटादार असतील तर त्यांच्यापैकी प्रत्येकास, अशा भोगवटादाराने दिलेल्या भाड्याचे उक्त जागेबद्दल दोघांनी किंवा सर्वांनी दिलेल्या भाड्याच्या एकूण रकमेशी जे प्रमाण बसत असेल तेच प्रमाण देय असलेल्या एकूण रकमेशी ज्या भागाचे बसत असेल त्या भागाचे बिल देता येईल.

भोगवटादारांना मालमत्ता कर देण्याबद्दल केव्हा जबाबदार धरता येईल.

[१] [(१-अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १२९ च्या पोट-कलम (२) अन्वये मालमत्ता कर बसविण्याकरिता, भांडवली मूल्य हा आधार समजून स्वीकार म्हणून स्वीकृत केल्याच्या दिनांकास आणि दिनांकापासून, परंतु या अधिनियमाच्या इतर तरतुदीस अधीन राहून, आयुक्तास, उक्त जागेच्या अशा भोगवटादाराला मालमत्ता कराच्या रकमेकरिता बिल देता येईल किंवा, अशा जागेचे दोन किंवा अधिक भोगवटादार असतील तर, त्यापैकी प्रत्येकावर भांडवली मूल्यावर आधारित कराच्या संपूर्ण रकमेसाठी देय असलेल्या रकमेच्या भागाकरिता उक्त जागेचे संबंधात भांडवली मूल्यावर आधारित कराच्या एकूण रकमेशी, एक किंवा अनेक भोगवटादारांच्या जागांच्या अशा भागासाठी असलेल्या भांडवली मूल्याच्या, त्याच प्रमाणात देय असलेल्या रकमेकरिता बिल देता येईल.]

(२) असा भोगवटादार किंवा भोगवटादारांपैकी कोणीही असे कोणतेही बिल दिल्यापासून तीस दिवसांच्या आत, त्यात मागणी केलेली रक्कम देण्यात कसूर केली तर, उक्त रक्कम नियमांनुसार त्याच्याकडून वसूल करता येईल.

(३) मालमत्ता कराची जी थकबाकी [२][ * * * * ] ज्या जागेवर कर आकारला असेल ती जागा ज्या कालावधीत भोगवटादाराच्या भोगवट्यात नव्हती त्या कालावधीबद्दलची देय अशी कोणतीही थकबाकी या कलमान्वये भोगवटादाराकडून वसूल केली जाता कामा नये.

(४) या कलमान्वये भोगवटादाराने कोणतीही रक्कम दिली असेल किंवा ती त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल तर, त्यास ती रक्कम देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीच्या खाती जमा करण्याचा हक्क असेल.

[३][**१४०-अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.

मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.

---

१ वरील अधिनियमाच्या कलम ७(१) द्वारे पोट-कलम (१-अ) दाखल केले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७(२) द्वारे " एका वर्षापेक्षा अधिक मुदतीपर्यंत देण्याची राहिली असेल किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

३ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ७ अन्वये कलम १४०-अ व कलम १४०-ब दाखल केले आहे.

पारिस्थितीकीय-दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा.

**१४०-ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी पारिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट किंवा परतावा देईल आणि पारिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालू ठेवण्याकरिता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेऊन, सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारित करता येतील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " पारिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजना " या शब्दप्रयोगात पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर अपारंपरिक ऊर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चक्रण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि पारिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो.]

ज्या जागांवर मालमत्ता कर आकारला असेल त्या जागांवर तो प्रथम भार असणे.

**१४१.** (१) कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत या अधिनियमान्वये देय असलेले मालमत्ता कर, अशा इमारतीबद्दल किंवा जमिनीबद्दल [१][राज्य] शासनास जो कोणताही जमीन महसूल देणे असेल तो प्रथम दिला पाहिजे या शर्तीच्या अधीन राहून, प्रत्यक्ष [२][शासनाकडून] धारण केलेल्या, कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत, असे कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचा अशा इमारतीत किंवा जमिनीत जो कोणताही हितसंबंध असेल त्यावर आणि अशा इमारतीत किंवा जमिनीवर अशा व्यक्तीच्या मालकीची जी कोणतीही जंगम मालमत्ता सापडेल तीवर, प्रथम भार असेल ; आणि अन्य कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत अशा इमारतीवर किंवा जमिनीवर आणि असे कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीच्या मालकीची उक्त इमारतीत किंवा जमिनीवर जी कोणतीही जंगम मालमत्ता सापडेल तीवर, प्रथम भार असेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमातील "मालमत्ता कर" या संज्ञेत, कोणत्याही जागांना पुरविलेल्या पाण्याबद्दल द्यावयाचे आकार व नियमामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मालमत्ता कर वसूल करण्याचा खर्च यांचा समावेश आहे असे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये निर्माण झालेल्या भाराची अंमलबजावणी करण्यासाठी दाखल केलेल्या दाव्यात कोणताही हुकूमनामा देताना, न्यायालयास, देय रकमेवर दावा दाखल केल्याच्या तारखेपासून रकमेची वसुली होईपर्यंत न्यायालयास वाजवी वाटेल अशा दराने महानगरपालिकेस व्याज देण्याविषयी आदेश देता येईल, आणि दाव्याचा खर्च व संबंधित जागा किंवा जंगम मालमत्ता ज्यांची हुकूमनाम्यान्वये विक्री करण्यासाठी झालेला खर्च धरून असे व्याज व उक्त भाराची अंमलबजावणी करण्याचा खर्च यांच्या रकमा,

---

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

२ मूळ शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे अधीन राहून, देय असल्याचे आढळून आलेल्या रकमेसह अशा जागेवर व जंगम मालमत्तेवर नवीन भार असतील, आणि विक्रीच्या उत्पन्नातून त्या रकमा महानगरपालिकेस देण्याविषयी न्यायालय निदेश देऊ शकेल.

## वाहने, नावा व जनावरे यांवरील कर

**१४२.** (१) यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त याबाबत [१][ राज्य ] शासनाकडून लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा दरांपेक्षा अधिक नसलेल्या दरांनी अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वर्णनांची वाहने, बोटी व जनावरे यांवर, वाहने व नावा यांच्या बाबतीत उतारूंची किंवा मालाची ने आण करण्यासाठी आणि जनावरांच्या बाबतीत बसण्यासाठी, शर्यतीसाठी, (वाहने) ओढण्यासाठी किंवा ओझी वाहण्यासाठी त्यांचा उपयोग करण्याकरिता ती शहरात ठेवली असतील तेव्हा, कर बसवण्यात येईल : वाहने, नावा, पशु व जनावरे यांवरील कर.

१९५८ चा मुंबई ६५. [२][ परंतु, *मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याच्या कलम २० मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त मोटार वाहनांवर कोणताही कर बसवला जाता कामा नये.]

**स्पष्टीकरण.—** शहराच्या हद्दीबाहेर ठेवलेले परंतु अशा हद्दीच्या आत नियमितपणे वापर करण्यात येत असलेले वाहन, नाव किंवा जनावर शहरात उपयोग करण्यासाठी ठेवण्यात आले आहे असे मानले जाईल.

---

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

२ हे परंतुक सन १९५८, चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५, कलम २५, अनुसूची ३ अन्वये दाखल करण्यात आले.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूचीद्वारे " महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम " असे शीर्षक बदलण्यात आले.

(२) ज्या दरानी कर बसवण्यात येईल ते दर कलम ९९ अनुसार दरवर्षी महानगरपालिकेने ठरविले पाहिजेत :—

करापासून सूट. **१४३.** (१) उक्त कर पुढील बाबतीत बसवता येणार नाही —

(अ) केवळ परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेली वाहने किंवा जनावरे वगळता महानगरपालिकेच्या मालकीची अन्य वाहने, नावा व जनावरे ;

(ब) संरक्षण दलाच्या मालकीची वाहने, नावा व जनावरे यांसह [१] [ शासनामध्ये ] निहित असलेली, व केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेली व फायद्यासाठी वापरण्यात येत नसलेली किंवा वापरण्याचा उद्देश नसलेली वाहने, नावा व जनावरे ;

(क) जखमी, आजारी व्यक्तींना किंवा मोफत प्रेते वाहून नेण्यासाठीच फक्त वापरण्याचा उद्देश असलेली वाहने व नावा ;

(ड) मुलांच्या बाबागाड्या व तिचाकी सायकली ;

(ई) ज्यांना आपल्या नेमणुकीच्या अटींनुसार आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी वाहन ठेवणे आवश्यक आहे अशा नगरपालिका अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या मालकीची वाहने :

परंतु, या खंडान्वये दिलेली सूट प्रत्येक अधिकाऱ्यासाठी एकापेक्षा अधिक वाहनांच्या बाबतीत किंवा अशा अधिकाऱ्याने जे वाहन ठेवणे आवश्यक असेल त्या वर्गातील ते नसेल तर अशा वाहनाच्या बाबतीत मिळणार नाही ;

(फ) वाहनांच्या किंवा नावेच्या खऱ्याखुऱ्या व्यापाऱ्याने फक्त विक्रीसाठी ठेवलेली व वापरण्यात न येणारी वाहने व नावा :

परंतु, महानगरपालिका [२] [ राज्य ] शासनाच्या मान्यतेने याबाबत निश्चित करील, अशा दराने मोटार १९३९ चा ४.
वाहनांच्या प्रत्येक व्यापाऱ्याकडून मोटार वाहन अधिनियम, १९३९ * अन्वये केलेल्या नियमांनुसार ज्यांच्याबाबतीत त्यास व्यापार प्रमाणपत्र देण्यात आले असेल अशा दर सात मोटार वाहनांबद्दल सहामाही कर आगाऊ वसूल करण्यात येईल.

(२) [१] [ शासनामध्ये ] निहित असलेले कोणतेही वाहन, नाव किंवा जनावर हे फायद्यासाठी वापरण्यात येत आहे किंवा नाही किंवा असा पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याचा निर्णय अंतिम असेल.

तबेल्यांचे मालक किंवा अन्य व्यक्ती यांच्याशी तडजोड करता येईल. **१४४.** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने तबेल्यांचा कोणताही मालक किंवा भाड्याने देण्यासाठी वाहने किंवा घोडे किंवा बैल ठेवणारी अन्य व्यक्ती किंवा ज्यात अडत घेऊन किंवा अन्य प्रकारे विक्रीसाठी घोडे ठेवण्यात येतात असे तबेले ठेवणारा कोणताही व्यापारी, कलम १४२ अन्वये जे कर बसवण्यायोग्य आहेत व जे देण्यास असा तबेल्याचा मालक किंवा अन्य व्यक्ती किंवा व्यापारी अन्यथा पात्र झाला असता त्या करांऐवजी एकावेळी एका वर्षाहून अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीसाठी ठोक रक्कम देण्याबाबत तडजोड करता येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

* आता, मोटार वाहन अधिनियम,१९८८ (१९८८ चा अधिनियम क्रमांक ५९) पहा.

**१४५.** (१) आयुक्तास कोणताही तबेला, मोटारघर किंवा घोडागाडीचे घर किंवा ज्यात या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेले कोणतेही वाहन, बोट किंवा जनावरे ठेवली आहेत असा त्यास ठाम विश्वास असेल अशा कोणत्याही जागेची पाहणी करता येईल.

तबेल्यांची पाहणी करण्याचा व कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तिंना समन्स काढून बोलावण्याचा अधिकार.

(२) आयुक्तास लेखी समन्स काढून, जी कोणतीही व्यक्ती वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावर या बाबतीत कर देण्यास पात्र आहे असा त्यास विश्वास असेल तिला किंवा तिच्या कोणत्याही नोकराला आपल्यापुढे हजर राहण्याविषयी भाग पाडता येईल. तसेच त्यास, अशा व्यक्तीच्या मालकीचा किंवा तिच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील वाहने, नावा व जनावरे यांची संख्या व वर्णन यासंबंधी अशा व्यक्तिची किंवा नोकराची तपासणी करता येईल ; आणि याप्रमाणे बोलावलेली प्रत्येक व्यक्ती आयुक्ता पुढ हजर राहून अशा गोष्टींसंबंधी तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे किंवा समजुतीप्रमाणे खरी असलेली माहिती देण्यास बांधलेली असेल.

## जकातीपासून सूट

**१४६.** (१) ज्या कोणत्याही वस्तूबद्दल ती आयात करण्याच्या वेळी संबंधित शासनाने याबाबत अधिकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्याने, ती [१] [ शासनाच्या ] मालकीची आहे व तिचा उपयोग केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठीच करावयाचा आहे किंवा करण्याचा उद्देश आहे व तिचा उपयोग फायद्यासाठी करावयाचा नाही किंवा करण्याचा उद्देश नाही असे प्रमाणपत्र दिले असेल अशा वस्तूवर कोणतीही जकात बसवता येणार नाही.

[१][शासनाच्या] मालकीच्या वस्तुंना जकातीपासून सूट व [१][शासनाची] मालमत्ता होणाऱ्या वस्तूंवरील जकातीचा परतावा.

(२) ज्या कोणत्याही वस्तूवर जकात भरली आहे ती * वस्तू शासनाशी केलेला विनिर्दिष्ट करार पूर्ण करण्यासाठी किंवा अन्यथा [१] [ शासनाच्या ] उपयोगासाठी आयात करण्यात येत आहेत असे आयातकराने सही केलेले प्रतिज्ञापत्र देऊन आयात केली असेल तर, याप्रमाणे आयात केलेली * वस्तू [१] [ शासनाची ] मालमत्ता झाली आहे व तिचा उपयोग केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठीच करण्यात येत आहे किंवा करण्याचा उद्देश आहे व तिचा उपयोग फायद्यासाठी करण्यात येत नाही किंवा करण्याचा उद्देश नाही अशा अर्थाचे संबंधित शासनाने याबाबत अधिकार देण्यात आलेल्या अधिकाऱ्याने सही केलेले प्रमाणपत्र आयात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी दाखल केल्यावर, तिच्याबद्दल दिलेल्या जकातीची संपूर्ण रक्कम परत करण्यात येईल.

**१४७.** तद्विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यंत, शहरात आयात केलेला कोणताही माल, स्थायी आदेशान्वये ठरवण्यात येईल अशा मार्गांनी, अशा मुदतीत, अशा पर्यवेक्षणाखाली आणि अशी फी दिल्यानंतर आयात केलेल्या ठिकाणापासून निर्यात करण्याच्या ठिकाणी नेण्यात आला नसेल तर, तो शहरात खप ; वापर किंवा विक्री करण्यासाठी आयात करण्यात आला आहे असे गृहीत धरण्यात येईल.

तात्काळ निर्यातीसाठी आयात केलेल्या वस्तू

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मुळ शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

## नाट्यगृहावरील करापासून सूट

नाट्यगृहावरील करापासून सूट. **१४८.** पुढील बाबतीत नाट्यगृहावरील कर बसवता येणार नाही, —

(अ) ज्यात प्रवेश मिळण्यासाठी कोणताही आकार घेण्यात येत नाही किंवा फक्त नाममात्र आकार घेण्यात येतो असा करमणुकीचा किंवा मनोरंजनाचा कोणताही कार्यक्रम ;

(ब) जो पैसे देऊन सर्वसाधारण लोकांसाठी खुला नाही असा करमणुकीचा किंवा मनोरंजनाचा कोणताही कार्यक्रम ;

(क) खर्च वजा न करता ज्याचे संपूर्ण उत्पन्न सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनांसाठी खर्च करण्याचा उद्देश आहे असा करमणुकीचा किंवा मनोरंजनाचा कोणताही कार्यक्रम.

[१] [ (ड) पोलीस आयुक्त, जिल्हादंडाधिकारी किंवा राज्य शासन यांनी मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३ खाली करमणूक शुल्काची माफी दिलेला कोणताही करमणुकीचा कार्यक्रम ]. १९२३ चा मुंबई १.

स्पष्टीकरण —या कलमाच्या प्रयोजनासाठी, नाममात्र आकार हा नियमान्वये निश्चित करण्यात येईल असा आकार असेल.

## [२] [शिक्षण उपकर

शिक्षण उपकर बसविणे. **१४८ अ** (१) कलम ६३ च्या खंड (१५) च्या प्रयोजनार्थ, महानगरपालिका [३] [ * * * ] आपल्या क्षेत्रात, इमारती व जमिनीवर [४] [ महानगरपालिका निश्चित करील त्याप्रमाणे करयोग्य मूल्याच्या किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्याच्या पाच टक्क्यांहून अधिक असणार नाही एवढे टक्के जादा कर (यात यापुढे ज्याचा निर्देश "शिक्षण उपकर" असा करण्यात आला आहे) बसवू शकेल. ]

परंतु —

(अ) केंद्र सरकारकडे निहित असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

(ब) कलम १३२ अन्वये सामान्य करातून वगळण्यात आलेल्या इतर सर्व इमारती व जमिनी ;

(क) महानगरपालिका निश्चित करील अशा रकमेपेक्षा कमी करयोग्य मूल्य [५] [ किंवा यथास्थिति भांडवली मूल्य ] असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

यांना शिक्षण उपकर बसविण्यातून सूट देण्यात येईल.

---

१ सन १९७५ चा महा. अधि. २७, कलम ४ द्वारे खंड (ड) समाविष्ट केला.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम १८ द्वारे कलम १४८ नंतर पुढील शीर्षक व कलमे १४८ अ, १४८ ब व १४८ क समाविष्ट केले.

३ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५ द्वारे "राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने" हा मजकूर वगळला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ व ३, अनुसूची नोंद १५, दिनांक १ मे १९६० पासून महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (१९२३ चा १) नुसार याच्या शीर्षकात सुधारणा करण्यात आली.

४ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ८ (१) द्वारे "महानगरपालिका निश्चित करील" त्याप्रमाणे या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "बसविता येईल" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

५ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १० (२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

(२) महानगरपालिका, या अधिनियमान्वये बसविण्यात आलेल्या सामान्य करामध्ये भर घालून त्याद्वारे, पोट-कलम (१) अन्वये निश्चित करण्यात आलेल्या शिक्षण उपकराची रक्कम वसूल करणे आयुक्ताला आवश्यक करू शकेल. आयुक्त, या पोट-कलमान्वये लादण्यात आलेली, सामान्य करामधील ही भरीची रक्कम, त्या रकमेस दायी असलेल्या प्रत्येक, व्यक्तीकडून, तिच्याकडून येणे असलेला सामान्य कर ज्या पध्दतीने वसूल करण्यात येत असेल त्याच पध्दतीने वसूल करील. शिक्षण उपकर हा जणू काही या अधिनियमान्वये बसविलेल्या सामान्य कराचाच एक भाग असल्याप्रमाणे त्याला, कलम १३९ व १४० यांच्या तरतुदी लागू होतील.

**१४८ ब** (१) १ एप्रिल १९९३ पासून आणि कलम १४८ अ अन्वये ज्या कालावधीत शिक्षण उपकर बसविण्यात आला असेल त्या कालावधीच्या संबंधात, राज्य शासन, दरवर्षी महानगरपालिकेला राज्य शासनाकडे निहित असलेल्या इमारती व जमिनी यांना कलम १४८ अ च्या पोट-कलम (१) च्या परंतुकाचा खंड (ब) याच्या आधारे, ज्या शिक्षण उपकरात सूट मिळालेली असेल (या कलमात यापुढे ज्यांच्या निर्देश "सूट मिळालेल्या इमारती व जमिनी" असा करण्यात आला आहे.) त्या शिक्षण उपकराच्या रकमेऐवजी पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या पध्दतीने निश्चित केलेली रक्कम प्रदान करील.

राज्य शासनाने महानगर-पालिका शिक्षण उपकराऐवजी करावयाचे प्रदान.

(२) राज्य शासनाने महानगरपालिकेला दरवर्षी प्रदान करावयाची रक्कम, शहरातील इमारतीच्या किंवा जमिनीच्या सर्वसाधारण मालकाकडून, सूट देण्यात आलेल्या इमारतींच्या व जमिनीच्या संबंधात कलम १३३ च्या पोट-कलम (२) [१] [ किंवा पोट-कलम (२क) ] अन्वये, निश्चित करण्यात आलेल्या रकमेइतक्या करयोग्य मूल्यावर [२] [ किंवा यथास्थिति भांडवली मूल्य ] शिक्षण उपकर म्हणून देय होऊ शकेल किंवा देय झाली असती त्या रकमेच्या आठदशांश एवढी असेल.

## रस्ता कर

**१४८ क** (१) महानगरपालिकेला, कलम ६३ च्या खंड (१८) च्या प्रयोजनार्थ, तिच्या क्षेत्रामध्ये, इमारती व जमिनी यावर, महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे त्यांच्या करयोग्य मूल्याच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतके टक्के [३] [ किंवा यथास्थिति त्याच्या भांडवली मूल्याइतके टक्के ] अतिरिक्त कर (यात यापुढे ज्याचा निर्देश "रस्ता कर" असा करण्यात आला आहे) बसविता येईल.

रस्ता कर बसविणे.

परंतु –

(अ) केंद्र सरकारकडे निहित असलेल्या सर्व इमारती व जमिनी ; –

(ब) कलम १३२ अन्वये सामान्य करामधून सूट देण्यात आलेल्या अन्य सर्व इमारती व जमिनी ;

(क) महानगरपालिकेकडून निश्चित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा कमी करयोग्य मूल्य [४] [ किंवा यथास्थिति, भांडवली मूल्य ] असलेल्या सर्व इमारती व जमिनी,

यांना रस्ता कर बसविण्यातून सूट देण्यात येईल.

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ९ (२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) द्वारे हे कंस, आकडे व शब्द दाखल केले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १० (१) द्वारे हा मजकूर दाखल केला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १० (२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

(२) महानगरपालिका, या अधिनियमान्वये बसविण्यात आलेल्या सामान्य करामध्ये भर घालून त्याद्वारे, पोट-कलम (१) अन्वये निश्चित करण्यात आलेल्या रस्ता कराची रक्कम वसूल करणे आयुक्तास आवश्यक करू शकेल. आयुक्त, या पोट-कलमान्वये लादलेल्या सामान्य करामधील ही भरीची रक्कम ती देण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, तिच्याकडून येणे असलेला सामान्य कर ज्या पध्दतीने वसूल करण्यात येत असेल त्या पध्दतीने वसूल करील. रस्ता कर हा जणू काही या अधिनियमान्वये बसविलेल्या सामान्य कराचाच एक भाग असल्याप्रमाणे कलमे १३९ व १४० यांच्या तरतुदी त्याला लागू होतील.]

**अन्य कर**

अन्य कर बसविताना अनुसरावयाची कार्यपध्दती.

**१४९.** (१) महानगरपालिकेने कलम १२७ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करांपैकी कोणताही कर बसवण्याचे ठरवले असेल त्या प्रसंगी, तिने पुढील गोष्टींबाबत, नियमांच्या स्वरूपात जर अधिनियमात त्या विषयी तपशिलवार तरतूद करण्यात आली नसेल तर, त्यावेळी जे नियम अंमलात असतील त्यात सुधारणा करून, वाढ करून किंवा भर घालून तपशिलवार तरतूद केली पाहिजे, त्या गोष्टी अशा :—

(अ) कराचे स्वरूप, त्याचे दर, तो देण्यास पात्र असलेल्या व्यक्तिंचा, वस्तूंचा किंवा मालमत्तेचा एक किंवा अनेक वर्ग आणि त्यापासून कोणतीही सूट द्यावयाची असल्यास ती ;

(ब) आकारणीची पध्दती व वसुलीची पध्दत आणि कर वसूल करण्यासाठी आयुक्ताने किंवा अन्य अधिकाऱ्यांनी वापरावयाचे अधिकार ;

(क) कर पात्रतेबद्दल देणे आवश्यक असलेली माहिती ;

(ड) ज्या व्यक्ती कर देण्याचे टाळतील किंवा चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती पुरवतील किंवा माहिती पुरवण्यात कसूर करतील त्यांना होणाऱ्या शास्ती ;

(ई) या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा महानगरपालिकेस इष्ट वाटणाऱ्या अन्य बाबी :

परंतु, कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (च) खाली येणाऱ्या कोणत्याही कराच्या (बाबतीत महानगरपालिकेने केलेल्या कराच्या) निवडीस [१] [ राज्य ] शासनाने प्रथम तात्पुरती मान्यता दिलेली असल्यावाचून महानगरपालिकेकडून कोणतेही नियम केले जाता कामा नये.

(२) महानगरपालिकेने असे नियम, [१] [ राज्य ] शासनास सादर केले पाहिजेत आणि [१] [ राज्य ] शासन त्यांना मंजुरी देण्यास नकार देऊ शकेल किंवा महानगरपालिकेकडे आणखी विचारासाठी ते परत पाठवू शकेल किंवा ते असतील त्या स्वरूपात किंवा त्याला योग्य वाटतील त्या फेरबदलांसह मंजूर करू शकेल तथापि, अशी मंजुरी देताना तो बसवावयाच्या दरामध्ये किंवा त्यांच्या व्याप्तीत वाढ होईल अशा रीतीने त्यात फेरबदल करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) अन्वये [१] [ राज्य ] शासनाने दिलेली कोणतीही मंजुरी, [१] [ राज्य ] शासन मंजुरीच्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा मंजुरीच्या तारखेपासून एक महिन्याहून आधीच्या नसलेल्या तारखेस अंमलात येईल ; आणि महानगरपालिका मंजूर केलेला कर अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून बसवण्यास सक्षम असेल.

(४) कलम १५० अन्वये अनुपूरक कराधानासाठी केलेल्या प्रस्तावाच्या अनुरोधाने मंजुरी देण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, महानगरपालिकेने व [१] [ राज्य ] शासनाने मंजुरीच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेली तारीख ही, एप्रिल महिन्याची पहिली तारीख असेल अशी तरतूद करण्यासाठी व्यवहार्य असेल त्याप्रमाणे उपाययोजना केली पाहिजे ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परंतु [१] [ राज्य ] शासनाची मंजुरी, निकटपूर्वीच्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस देण्यात आली नसेल आणि [१] [ राज्य ] शासन कर बसविण्यास प्रारंभ करण्यासाठी एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतरची तारीख आदेशात विनिर्दिष्ट करील तर, पोट-कलम (४) मधील कोणत्याही गोष्टींमुळे एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतरच्या तारखेपासून कर बसवण्याच्या महानगरपालिकेच्या अधिकारास बाध येणार नाही.

(५) कोणत्याही करासाठी निश्चित केलेल्या दरात किंवा व्यक्तिंच्या, वस्तूंच्या किंवा मालमत्तांच्या वर्गात किंवा वर्गामध्ये किंवा त्यापासून कोणतीही सूट द्यावयाची असल्यास तीत जे कोणतेही फेरफार करण्याचे महानगरपालिका वेळोवेळी ठरवील त्यांस, या कलमाच्या तरतुदी शक्य असेल तितपत लागू होतील.

[२] [ (६) या कलमामध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १२९-१क अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता, वस्तूंच्या शहरातील प्रवेशावरील जकात कर, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधीकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पाकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. ]

१९५८ चा मुंबई ६०.

महानगरपालिका क्षेत्रांमधील स्थावर मालमत्तांच्या विवक्षित हस्तांतरणावरील अतिरिक्त मुद्रांक शुल्क.

[३] [ **१४९ अ** (१) * मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेची अनुकमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवावयाच्या मुद्रांक शुल्कात, जेव्हा असा संलेख हा, कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ककक) च्या तरतुदी ज्या शहरास (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "अधिसूचित शहर" असा करण्यात आला आहे) लागू होतात त्या शहरामध्ये स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या संबंधातील असेल ; आणि राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा तारखेस किंवा त्यानंतर तो निष्पादित केला असेल तेव्हा, विक्री किंवा देणगीच्या बाबतीत अशा रीतीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मूल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रकमेवर एक टक्का या दराने अधिभार आकारून वाढ करण्यात येईल आणि उक्त अधिनियमान्वये तो गोळा करण्यात येईल.

१९५८ चा मुंबई ६०.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम २८ च्या तरतुदी, —

(अ) अधिसूचित शहरात स्थित असलेली मालमत्ता ; आणि

(ब) अन्य कोणत्याही क्षेत्रात स्थित असलेली मालमत्ता,

यांच्या संबंधात, जणू काही त्यामध्ये निर्देशित केलेले तपशील स्वतंत्रपणे मांडून ती विनिर्देशपूर्वक आवश्यक केल्याप्रमाणे वाचण्यात येईल आणि अंमलात येईल.

(३) राज्य शासन, प्रत्येक वर्षी, याबाबतीत कायद्याद्वारे यथोचित विनियोजन करून, प्रत्येक अधिसूचित शहराच्या महानगरपालिकेला त्या महानगरपालिकेच्या अधिकारितेत स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या संबंधात या कलमान्वये बसवण्यात आलेल्या अधिभारामुळे वसूल केलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेएवढे अदमासे सहायक अनुदान प्रदान करील.

---

१ "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

२ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ च्या कलम ५ द्वारे पोट-कलम (६) जादा दाखल केला.

३ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ६ द्वारे कलम १४९ (अ) दाखल केले.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ व ३, अनुसूची नोंद ६७, दिनांक १ मे १९६० पासून महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) द्वारे शीर्षकात बदल करण्यात आला.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाने भागवावयाच्या खर्चाची आवश्यक रक्कम राज्याच्या एकत्रिकृत निधीवर भारित असेल.

(५) शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या कलमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(६) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(७) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता अधिवेशन चालू असताना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, यथास्थिति, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा तो नियम अंमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही. ]

## अनुपूरक कराधान

या अधिनियमान्वये लादण्याजोग्या कोणत्याही करात अनुपूरक कराधान लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल.

**१५०.** जेव्हा जेव्हा महानगरपालिका कलम १०४ अन्वये कोणत्याही सरकारी वर्षात, अनुपूरक कराधानाचा अवलंब करण्याचे ठरवील तेव्हा तेव्हा तिने उक्त वर्षाच्या न संपलेल्या भागांसाठी या अधिनियमान्वये लादण्याजोगा कोणताही कर ज्या दरांनी बसवण्यात येत असेल त्या दरांत, अशा करासाठी या अधिनियमात किंवा [1] [ राज्य ] शासनाच्या आदेशात किंवा मंजुरीत ज्या मर्यादा व शर्ती विहित करण्यात आल्या असतील त्यास अधीन राहून वाढ करून किंवा या अधिनियमान्वये लादण्याजोगा परंतु त्यावेळी लादण्यात येत नसलेला कर रीतसर मंजुरी घेऊन बसवून तसे केले पाहिजे.

करनिर्धारण झाले नसेल अशा प्रकरणांमध्ये आकारणी करण्याचा अधिकार.

[2] [ **१५० क.** या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमात एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये बसविण्यायोग्य असलेले कोणतेही कर किंवा फी यांचा भरणा करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही कारणास्तव, जर कोणत्याही वर्षातील करनिर्धारण केले गेले नसेल तर, आयुक्तास, ज्या दिनांकास ती व्यक्ती, आकारणी करण्यास पात्र झाली असेल त्या दिनांकापासून सहा वर्षांच्या आत, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तीवर कराची आणि देय फीची आकारणी करणारी नोटीस बजावता येईल ; आणि अशी नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तीद्वारे त्यावरील प्रदानाची मागणी करता येईल आणि या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, ज्या वर्षात कराचा किंवा फीचा संबंध येतो त्या वर्षात अशी आकारणी करण्यात आली होती असे समजून, लागू करण्यात येतील. ]

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १० द्वारे कलम १५० क दाखल केले.

## परतावे

**१५१.** नगरपालिका कराच्या परताव्यांची मागणी नियमांनी विहित केलेल्या रीतीने व शर्तीच्या अधीन राहून करता येईल. करांचे परतावे कसे मिळवता येतील.

## कर निर्लेखित करणे

**१५२.** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल. वसूल न होण्याजोगे कर निर्लेखित करणे.

[१] [ **१५२-१अ.** या अधिनियमाच्या कलम १५२ किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, जी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकांनुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील. अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल. ] कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार.

## [२] [ **प्रकरण ११-अ** ]

**जकातीऐवजी उपकर बसविणे, तो गोळा करणे व याची वसुली करणे यासंबंधीच्या तरतुदी.** उपकर बसविणे.

**१५२-अ.** (१) या प्रकरणाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने महानगरपालिकेला शहरामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या, अनुसूची 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या प्रवेशावर, त्या अनुसूचीतील, स्तंभ ३ मध्ये प्रत्येक मालासमोर विनिर्दिष्ट केलेल्या कमाल दरापेक्षा अधिक नसेल इतक्या दराने उपकर बसविता येईल.

[३] [ परंतु असे की, महानगरपालिकेला, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीला अधीन राहून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अनुसूची 'अ' मध्ये कोणत्याही नोंदी दाखल करता येतील, त्यात बदल करता येईल किंवा त्या वगळता येतील किंवा त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कमाल दरांसह दर बदलता येतील.

परंतु आणखी असे की, अशी अधिसूचना पूर्व प्रसिध्द करून लोकांकडून मागविण्यात आलेले आक्षेप व सूचना (असल्यास) त्या विचारात घेतल्यानंतर, अशी अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. ]

[४] [ (१-अ) या कलमामध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १२९-१क अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता मालाच्या शहरातील प्रवेशावरील उपकर, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधीकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. ]

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ८ द्वारे कलम १५२-१ अ दाखल केले.

२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ द्वारे प्रकरण ११-अ व त्याची कलमे १५२-क ते कलम १५२-ण समाविष्ट करण्यात आली.

३ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ द्वारे पोट-कलम (१) नंतर परंतुक जादा दाखल करण्यात आली.

४ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ६ द्वारे कलम १ (क) समाविष्ट केले.

[ (१ अ-१) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मात्र, त्यामधील परंतुकांच्या तरतुदींना अधीन राहून, जेव्हा राज्य शासनाने कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अअ) च्या परंतुकान्वये अधिसूचना प्रसिद्ध करून उपकर बसविण्याचा निदेश दिला असेल तेव्हा महानगरपालिका अनुसूची अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या, शहराच्या हद्दीमध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी होणाऱ्या प्रवेशावर, त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येक मालाच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने उपकर बसवील. ]

(२) या प्रकरणान्वये उपकर भरण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी या प्रकरणाच्या व नियमांच्या तरतुदीनुसार उपकर भरील.

उपकराचा भार. **१५२-ब.** (१) महानगरपालिकेने ज्या वर्षामध्ये कलम १२७ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला उपकर बसवण्याचे ठरवले असेल, —

(अ) त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये ; किंवा

(ब) त्या वर्षामध्ये, झालेली ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रिची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल यासंबंधात विहित करण्यात आलेल्या संबंधीत मर्यादेपेक्षा अधिक झालेली असेल किंवा अधिक होत असेल तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल ;

परंतु, ज्या व्यापाऱ्याला उप-खंड (क) लागू होत नसेल, परंतू उप-खंड (ख) लागू होत असेल आणि महानगरपालिकेने उपकर बसविण्याचे ठरविले असेल त्या वर्षाच्या १ एप्रिल नंतर ज्या व्यापाऱ्याची सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल, विहित करण्यात आलेल्या संबध्द मर्यादेपेक्षा प्रथमत: अधिक होईल, तो व्यापारी, त्याने शहराच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास, उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या संबंधात विहित करण्यात आलेल्या संबध्द मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंत पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या नंतरचे वर्ष असलेल्या अशा, दिनांक १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या कोणत्याही वर्षात, ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल ही याबाबतीत विहित केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा प्रथमच अधिक होईल, तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल.

परंतु, तो व्यापारी, त्याने शहराच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दींमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास उक्त वर्षाच्या १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या आणि उक्त वर्षाच्या १ एप्रिल पासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल यासंबंधात विहित करण्यात आलेल्या संबध्द मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंतच्या मुदतीत पात्र ठरणार नाही.

(३) उपकर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक व्यापारी, त्याची नोंदणी योग्य रीतीने रद्द करण्यात येईपर्यंत अशा रीतीने उपकर भरण्यास पात्र असण्याचे चालू राहील ; आणि ज्या दिवशी त्याच्या विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल किंवा आयातीची उलाढाल ही या बाबतीत विहित केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा पुन्हा प्रथमच अधिक होईल त्या दिवशी तो पुन्हा उपकर भरण्यास पात्र होईल.

**१५२-क.** (१) अनुसूची 'ब' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर कोणताही उपकर बसवता येणार नाही. विवक्षित उपकरापासून सूट मिळण्यास पात्र नसणे.

(२) अनुसूची 'क' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालापैकी कोणत्याही मालासमोर कोणत्याही शर्ती, निर्बंध किंवा अपवाद नमूद केलेले असल्यास त्या शर्ती, निर्बंध किंवा अपवाद यांच्या अधीन राहून त्या मालाला उपकर देण्यातून सूट मिळेल.

[१] [ परंतु असे की, महानगरपालिकेला, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीला अधीन राहून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची 'ब' आणि 'क' मध्ये कोणत्याही नोंदी दाखल करता येतील, त्यात बदल करता येईल किंवा त्या वगळता येतील :

परंतु आणखी असे की, अशी अधिसूचना पूर्वप्रसिध्द करून लोकांकडून मागविण्यात आलेले आक्षेप व सूचना (असल्यास) त्या विचारात घेतल्यानंतर, अशी अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. ]

**१५२-ड.** जेव्हा महानगरपालिकेने उपकर बसविण्याकरिता निश्चित केलेल्या दिनांकास आणि त्यानंतर, या प्रकरणान्वये उपकर बसवण्यायोग्य असेल असा कोणताही माल, (नोंदणीकृत व्यापारी नसणाऱ्या) कोणत्याही व्यक्तीने शहराच्या क्षेत्राच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणाहून शहराच्या हद्दीमध्ये आयात केला असेल आणि एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला विकला असेल तेव्हा महानगरपालिकेने नियमानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने अशा मालावर उपकर बसविण्यात व वसूल करण्यात येईल आणि असा नोंदणीकृत व्यापारी अशा प्रकारे बसविण्यात आलेला उपकर भरण्यास पात्र असेल : विवक्षित बाबतीत उपकरविषयक दायित्व.

परंतु, जर अशा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने, उक्त मालावर महानगरपालिकेकडे उपकर अगोदरच भरण्यात आलेला आहे असे आयुक्तांची खात्री पटेल अशा प्रकारे सिध्द केले तर त्या मालावर कोणताही उपकर बसविण्यात येणार नाही.

**१५२-ई.** (१) या प्रकरणाची आणि नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आयुक्त हा मुख्य प्राधिकारी असेल. उपकर प्राधिकारी

(२) त्याच प्रमाणे, महानगरपालिकेला आवश्यक वाटतील तितक्या संख्येतील –

(क) पालिका उप आयुक्त,

(ख) निर्धारक व समाहारक,

(ग) उप-निर्धारक व समाहारक,

(घ) सहायक निर्धारक व समाहारक आणि

(ङ) इतर अधिकारी आणि व्यक्ती

नियुक्त करता येतील आणि त्यांना महानगरपालिकेला आवश्यक वाटतील अशी पदनामे देता येतील.

(३) आयुक्तास, महानगरपालिकेच्या प्रादेशिक हद्दी इतकी अधिकारिता असेल, इतर सर्व अधिकाऱ्यांना आणि व्यक्तींना आयुक्त विनिर्दिष्ट करील अशा, महानगरपालिकेच्या एका किंवा अनेक क्षेत्रात अधिकारिता असेल.

---

१ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ द्वारे परंतुक जादा दाखल केले.

(४) आयुक्तास या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील आणि त्याच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील ते सर्व अधिकार आयुक्ताला असतील व तो त्या अधिकारांचा वापर करील आणि ती सर्व कर्तव्ये पार पाडील.

(५) उप आयुक्तास आयुक्ताने अन्यथा निदेश दिला असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये आयुक्तास प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार असतील आणि तो त्यांचा वापर करील व आयुक्तांवर जी कर्तव्ये लादली असतील ती सर्व कत्यव्ये तो पार पाडील.

(६) निर्धारक व समाहारक आणि इतर अधिकारी व व्यक्ती आपल्या अधिकारितेत, या अधिनियमान्वये आयुक्तास असलेल्या अधिकारांपैकी व कर्तव्यांपैकी जे अधिकार व कर्तव्ये, आयुक्त लेखी आदेशाद्वारे घालून देईल अशा शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीन राहून त्यांच्याकडे सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विशिष्ट गोष्टीबाबत किंवा गोष्टींच्या वर्गांबाबत सोपवील त्या अधिकारांचा वापर करतील व ती कर्तव्ये पार पाडतील.

(७) कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला, पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या प्रादेशिक अधिकारितेबाबत हरकत घेण्याचा हक्क असणार नाही.

(८) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व सर्व व्यक्ती, आयुक्तास दुय्यम असतील, आणि (आयुक्तांव्यतिरिक्त इतर) अधिकारी व व्यक्ती यांची आपापसातील दुय्यमता खालीलप्रमाणे असेल.—

(क) पालिका उप आयुक्त हा आयुक्ताला दुय्यम असेल,

(ख) निर्धारक व समाहारक हा पालिका उप आयुक्ताला व आयुक्त यांना दुय्यम असेल,

(ग) उप निर्धारक व समाहारक आणि सहायक निर्धारक व समाहारक हे निर्धारक व समाहारक, पालिका उप आयुक्त व आयुक्त यांना दुय्यम असतील.

(घ) पोट-कलम (२) च्या खंड (ङ) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी किंवा व्यक्ती ही ज्याच्या अधिकारितेत ती व्यक्ती तिची कामे पार पाडत असेल तो सहायक निर्धारक व समाहारक, उप निर्धारक व समाहारक आणि निर्धारक व समाहारक पालिका उप आयुक्त व आयुक्त यांना दुय्यम असेल.

नोंदणी **१५२-फ.** (१) कोणताही व्यापारी या प्रकरणातील व नियमांतील तरतुदी अन्वये उपकर देण्यास पात्र असताना, विहित करण्यात आलेले विधिग्राह्य नोंदणी प्रमाणपत्र त्यांच्याकडे नसेल तर तो व्यापारी म्हणून धंदा करणार नाही :

परंतु, त्या व्यापाऱ्याने अशा नोंदणीसाठी, विहित केलेल्या रीतीने व वेळेत अर्ज केल्यानंतर किंवा यथास्थिती, नोंदणीसाठी केलेला त्याचा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत विहित कालावधीत, तो असा धंदा करीत असेल तर या कलमाच्या तरतुदींचा भंग झालेला असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेल्या अर्जावरून, त्या व्यक्तीची किंवा व्यापाऱ्याची नियमान्वये व्यापारी म्हणून नोंदणी करण्यात आली असेल आणि त्यानंतर या नियमांच्या तरतुदी अन्वये तिची किंवा त्याची अशा रीतीने नोंदणी करावयास नको होती असे आढळून आले तर, ती व्यक्ती किंवा तो व्यापारी या प्रकरणातील व नियमातील इतर तरतुदींन्वये उपकर देण्यास पात्र नसेल तरीही, तिचे किंवा त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आल्याच्या तारखेपासून ते रद्द करण्यापर्यंतच्या कालावधीसाठी उपकर देण्यास पात्र असेल.

**१५२-ग.** जर, —

(क) एखादा नोंदणीकृत व्यापारी दुसऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यास माल विकील किंवा

(ख) एखादा नोंदणीकृत व्यापारी चालू वर्षात कोणत्याही एका व्यवहारात कोणत्याही अन्य व्यक्तीस, दहा रुपयांपेक्षा अधिक किंमत असलेला कोणताही माल विकील तर, तो त्याने किंवा त्याच्या नोकराने, व्यवस्थापकाने किंवा अभिकर्त्याने अनुक्रमांक व दिनांक यासह सही केलेले आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शविणारे देयक किंवा रोखीचे टिपण खरेदीदारास देईल. तो अशा देयकाची किंवा रोखीच्या टिपणाची यथोचितरीत्या अनुक्रमांक घातलेली, सही केलेली व दिनांक नमूद केलेली स्थळप्रत किंवा दुसरी प्रत स्वत:कडे ठेवील आणि ती, विक्रीच्या तारखेपासून पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी जतन करील.

विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन.

**१५२-ह.** [१] [ * * * * * ]

**१५२-आय** प्रत्येक व्यापारी आणि विहित केलेली अशी अन्य व्यक्ती, तिने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या उपभोग घेतलेल्या, उपयोगात आणलेल्या किंवा विकलेल्या मालाच्या किमतीचा विहित करण्यात आल्याप्रमाणे खरा लेखा ठेवील.

लेखे ठेवण्याची व सादर करण्याची जबाबदारी.

**१५२-ज.** (१) (क) आयुक्त, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास कोणतेही लेखे किंवा कागदपत्रे त्याच्याकडे सादर करण्यास किंवा त्या व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्यासंबंधी किंवा त्याने केलेली मालाची आयात, खरेदी विक्री आणि पोचवणी यासंबंधी कोणतीही माहिती पुरविण्यास किंवा त्याच्या धंद्यासंबंधीची आवश्यक असेल अशी अन्य कोणतीही माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(ख) आयुक्त ज्याने शहरात कोणताही माल आयात केला असेल व तो एखाद्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला विकलेला असेल अशा कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा कोणत्याही व्यक्तीस, अशा मालांच्या संबंधात आवश्यक असतील अशी कागदपत्रे सादर करण्यास किंवा अशी माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(२) कोणत्याही व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्याशी किंवा त्याने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या, विकलेल्या आणि पोचवणी केलेल्या मालाशी संबंधित असलेले सर्व लेखे, नोंदवह्या व कागदपत्रे आणि कोणत्याही व्यापाऱ्याने कोणत्याही ठिकाणी ठेवलेला सर्व माल व रोकड, ही सर्व वाजवी वेळी तपासणीसाठी, आयुक्तास खुली असेल आणि आयुक्तास आवश्यक वाटतील अशा उक्त लेख्यांच्या किंवा कागदपत्रांच्या प्रती किंवा त्यातील उतारे आणि मालाची आणि रोख रकमेची सूची घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

लेखे व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती, लेखा पुस्तके आणि माल इत्यादी जप्त करणे.

(३) कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने त्यांच्याकडून किंवा तिच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही उपकराचे प्रदान चुकवले आहे किंवा ते चुकविण्याचा प्रयत्न करत आहे असे आयुक्तास सकारण वाटले तर, त्याला त्या व्यापाऱ्याची किंवा व्यक्तींची झडती घेताना त्या जागेमध्ये सापडलेले लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे यापैकी आवश्यक असतील असे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करता येतील आणि त्याबद्दल तो पावती देईल आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्याकरता आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल. तथापि, आयुक्त, कोणत्याही व्यापाऱ्याची कोणतीही लेखा पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा माल जप्त करील तेव्हा तो तसे करण्याची कारणे लेखी नमूद केल्याशिवाय, ती लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे एकवीस दिवसांपेक्षा जास्त काळ ठेऊन घेणार नाही.

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५ द्वारे कलम १५२-ज वगळण्यात आले.

(४) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) च्या प्रयोजनासाठी, आयुक्तास कोणत्याही व्यापाऱ्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी किंवा एखाद्या व्यक्तीच्या व्यवहाराच्या कोणत्याही ठिकाणी किंवा ज्या अन्य कोणत्याही ठिकाणी तो व्यापारी किंवा व्यक्ती त्याच्या धंद्याचे किंवा व्यवहाराचे कोणतेही लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा त्याच्या धंद्याशी संबंधित मालाचा साठा ठेवत असतो किंवा त्यावेळी त्याने ठेवला आहे असे आयुक्तास सकारण वाटेल अशा अन्य कोणत्याही ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या जागेची झडती घेता येईल.

(५) कोणत्याही झडतीच्या किंवा तपासणीच्या वेळी, कोणतीही लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळून येईल. त्याबाबतीत एतद्विरुध्द सिध्द करण्यात आले नाही तर, अशी लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल अशा व्यक्तीच्या मालकीचा असल्याचे समजण्यात येईल.

आयुक्ताला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

**१५२-के.** (१) आयुक्तास, प्रकरणान्वयेची कामे पार पाडण्यासाठी, खालील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :— १९०८ चा ५

(क) शपथपत्रावर पुरावा घेणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलविणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर किंवा प्रतिज्ञाकथनावर तिची तपासणी करणे ;

(ग) कागदपत्रांचा शोध घेण्यास किंवा ती सादर करण्यास भाग पाडणे ;

(घ) साक्षीदारांच्या किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे ; आणि

(ङ) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी करावयाच्या कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत आयुक्ताने या संबंधात नियुक्त केलेला कोणताही अधिकारी अभिसाक्षीस शपथ देवू शकेल.

(३) त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस बाध न आणता विवक्षित ठिकाणी व वेळी एकतर साक्ष देण्यासाठी किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याबद्दल जिच्या नावे आयुक्ताने समन्स काढले असेल अशा व्यक्तीने, अशा विवक्षित ठिकाणी व वेळी हजर राहण्याचे किंवा यथास्थिती, अशी पुस्तके नोंदवह्या किंवा कागदपत्रे सादर करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल त्या बाबतीत, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल असा, पाचशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतका दंड तिच्यावर लादता येईल व अशा रीतीने बसवण्यात आलेला दंड, उपकराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल :

परंतु, असा कोणताही दंड लादण्यापूर्वी, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) आयुक्ताने जिच्या नावे समन्स काढले होते त्या व्यक्तीने, कोणतीही कागदपत्रे सादर केली असतील व कोणत्याही व्यक्तीने, तिच्याकडून येणे असलेला कोणताही उपकर चुकवलेला आहे किंवा ती चुकवण्याचा प्रयत्न करीत आहे व सादर करण्यात आलेली कागदपत्रे अशा व्यक्तीविरुध्द केलेले तथ्यकथन सिध्द करण्यासाठी आवश्यक आहेत असे आयुक्तास सकारण वाटले तर, आयुक्तास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून ती कागदपत्रे अडकवून ठेवता येतील व त्यासाठी तो पावती देईल व या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्यासाठी आवश्यक असेल तितक्या मुदतीसाठी तो ती ठेऊन घेईल.

(५) आयुक्त किंवा त्याला दुय्यम असलेला कोणताही अधिकारी अथवा व्यक्ती याने या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशास कोणत्याही न्यायालयात हरकत घेतली जाणार नाही.

**१५२-ल.** (१) जो कोणी, – अपराध व शास्ती.

(क) कलम १५२-च अन्वये नोंदणीकृत व्यापारी नसताना, माल विकताना किंवा विकत घेताना किंवा आयात करताना किंवा मालाची पोचवणी करताना आपण नोंदणीकृत व्यापारी आहोत किंवा होतो असे खोटेच दर्शवील, किंवा

(ख) जाणूनबुजून खोटे विवरण सादर करील, किंवा

(ग) कलम १५२-त्र मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जाणुनबुजून खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंव इतर कागदपत्र आयुक्ताला सादर करील, किंवा

(घ) कलम १५२-झ चे उल्लंघन करून त्याने विकत घेतलेल्या किंवा आयात केलेल्या किंवा विकलेल्या अथवा पोचवणी केलेल्या मालाच्या किमतीचे जाणुनबुजून खोटे लेखे ठेवील, किंवा

(ङ) जाणुनबुजून खोटे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्र सादर करील किंवा जाणुनबुजून खोटी माहिती सादर करील, किंवा

(च) कोणत्याही व्यक्तीला, नियमांच्या संबध्द तरतुदी अन्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र देईल किंवा जे खोटे आहे असे त्याला माहीत असेल किंवा खोटे असल्याचे सकारण वाटत असेल असे खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक किंवा इतर कागदपत्र देईल, किंवा

(छ) या प्रकरणान्वये बसवण्यायोग्य असलेला कोणताही कर चुकविण्यासाठी बुध्दिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(ज) या प्रकरणाच्या तरतुदींखालील कोणताही उपकर, शास्ती, व्याज किंवा जप्त झालेली रक्कम यांचे प्रदान चुकविण्यासाठी बुध्दिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(झ) खंड (क) ते (ज) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृती करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला साहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल, किंवा

(ञ) नियमांद्वारे आवश्यक असलेली कोणतीही माहिती देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ट) नियमांद्वारे आवश्यक असलेले कोणतेही विवरण विहित केलेल्या तारखेपर्यंत व विहित रीतीने पुरविण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ठ) हे प्रकरण आणि नियम या अन्वये आवश्यक असलेला कोणताही उपकर देण्यात कसूर करील, किंवा

(ड) कलम १५२-ज अन्वये त्याला आवश्यक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ढ) कलम १५२-ज अन्वये कोणतीही झडती घेताना किंवा जप्ती आणताना कोणत्याही अधिकाऱ्यास अडथळा आणील, किंवा

(ण) कलमे १५२-च, १५२-छ, [१] [ * * * ] किंवा १५२-झ यांच्या तरतुदींचे पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय उल्लंघन करील, —

त्याला, अपराधसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(२) जो कोणी पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही कृती करील आणि तो अपराध पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीन्वये चालू राहणार असेल तर त्याला अपराधसिध्दिनंतर या कलमान्वये तरतूद करण्यात आलेल्या शिक्षांव्यतिरिक्त आणखी अपराध करणे चालू राहील त्या कालावधीत दररोज शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एक वर्षाच्या कालावधीत चुकविण्यात आलेल्या किंवा चुकविण्याचा प्रयत्न करण्यात आलेल्या उपकराची एकूण रक्कम दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल तर त्या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कृतींसाठी कोणत्याही व्यक्तीवर त्या पोट-कलमान्वये कार्यवाही करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध केल्याचा आरोप व्यापाऱ्यावर ठेवण्यात आला असेल, त्याबाबतीत अशा व्यापाऱ्याच्या धंद्याचा व्यवस्थापक असल्याचे समजण्यात आलेल्या व्यक्तीने, हा अपराध तिच्या नकळत करण्यात आला होता किंवा तो घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व उचित खबरदारी घेतली होती असे सिध्द केले नाही तर ती व्यक्ती देखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल.

(५) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदीन्वये आयुक्ताकडून ज्या गोष्टीसंबंधात शास्ती लादण्यात आली असेल त्याच गोष्टीसंबंधात, या कलमाखाली अपराधासाठी किंवा कोणत्याही नियमाचा भंग केल्याबद्दल कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

आयुक्त, नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती उघड करणे.

**१५२-म.** (१) या प्रकरणानुसार किंवा नियमांनुसार केलेल्या कोणत्याही निवेदनातील, पुरविलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही लेख्यांतील किंवा कागदपत्रातील किंवा (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाही व्यतिरिक्त) या प्रकरणाच्या तरतुदीन्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या कोणत्याही साक्षीपुराव्याच्या किंवा अभिलेखातील किंवा या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या, कोणत्याही आकारणीच्या कार्यवाहीच्या किंवा मागणीच्या वसुलीसंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत गोपनीय समजण्यात येईल.

(२) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून एरवी, जर कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याने, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या तपशीलापैकी कोणताही तपशील उघड केला तर, त्यास, अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) या कलमाच्या तरतुदी, नियमांद्वारे विहित केलेल्या प्रयोजनांसाठी उघड करण्यात आलेल्या बाबींच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ६ द्वारे कलम १५२-ल मधील पोट-कलम १ मधील खंड-ब मध्ये १५२-ज हा मजकूर वगळण्यात आला.

**१५२-न.** (१) आयुक्ताला, कलम १५२-ठ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अशा कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, असा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून अपराधाबाबत तडजोड म्हणून उपकराची जितकी रक्कम देय झाली असती त्या रकमेच्या दहापटीहून अधिक नसेल परंतु चार पटीहून कमी नसेल इतकी रक्कम स्वीकारता येईल. अपराधांबाबत तडजोड करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताकडून ठरवण्यात येईल अशी रक्कम दिल्यानंतर त्याच अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तींविरुध्द आणखी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

**१५२-ओ.** या प्रकरणाच्या तरतुदीन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.] क्षतिपूर्ती.

[१] [ **प्रकरण ११-ब**

**स्थानिक संस्था कराच्या संबंधातील तरतुदी**

**१५२-प.** या प्रकरणाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ज्या महानगरपालिकांना कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ककक) च्या तरतुदी लागू होतात, त्या महानगरपालिकेला उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या प्रवेशावर, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, स्थानिक संस्था कर बसविता येईल व तो गोळा करता येईल. स्थानिक संस्था कर बसविणे.

**१५२-क्यू.** राज्य शासनास, या बाबतीतील आयुक्तांचा प्रस्ताव विचारात घेतल्यावर, आणि **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मालाचे जे विविध प्रवर्ग कोणतीही स्थानिक संस्था कर बसविण्यायोग्य नसतील ते प्रवर्ग विनिर्दिष्ट करता येतील. विवक्षित माल स्थानिक संस्था कर बसविण्यास पात्र नसणे.

**१५२-र.** प्रकरण अकरा-क च्या कलम १५२-ख, १५२-घ, १५२-ङ, १५२-च, १५२-छ, १५२-झ, १५२-ञ, १५२-ट, १५२-ठ, १५२-ड, १५२-ढ व १५२-ण यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, या प्रकरणाखालील स्थानिक संस्था कर बसविण्यास व तो गोळा करण्यास लागू होतील. प्रकरण अकरा-क च्या विवक्षित तरतुदींची प्रयोज्यता.

**१५२-स.** आयुक्तास, या अधिनियमान्वये स्थानिक संस्था कर बसविण्याच्या, तो गोळा करण्याच्या व वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी व अशा रीतीने, अशा व्यापाऱ्यांचे निर्धारण करता येईल. व्यापाऱ्यांचे निर्धारण करणे.

**१५२-ट.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम तयार करता येतील. या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी नियम तयार करण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

(२) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ७ द्वारे प्रकरण अकरा-ख व कलम १५२-ल ते १५२-न दाखल केले.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता अधिवेशन चालू असताना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, यथास्थिति, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा तो नियम अंमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही. ]

## प्रकरण बारा

## नाल्या व जलनि:सारण

### नगरपालिकेच्या नाल्या

आयुक्ताने नाल्या बांधणे व त्या दुरुस्त स्थितीत ठेवणे.

**१५३.** (१) आयुक्ताने नगरपालिकेच्या सर्व नाल्यांचे परीक्षण केले पाहिजे व त्या दुरुस्त स्थितीत ठेवल्या पाहिजेत आणि महानगरपालिकेच्या मान्यतेने शहरातील परिणामकारक जलनि:सारणासाठी वेळोवेळी आश्यक असतील अशा नवीन नाल्या बांधल्या पाहिजेत.

(२) तसेच, आयुक्ताने, जर कोणत्याही रस्त्यात नगरपालिकेची नाली असेल त्या रस्त्याच्या बाबतीत कोणत्याही जागेच्या नाल्यांचा जो भाग नगरपालिकेच्या नालीशी जोडावयाचा आहे व जो अशा रस्त्याच्या कोणत्याही भागाखालून नेणे आवश्यक आहे तो नगरपालिका निधीतून खर्च करून बांधला पाहिजे आणि याप्रमाणे रस्त्याखालून नेलेला व नगरपालिकेच्या नालीशी जोडलेला भाग महानगरपालिकेमध्ये निहित होईल व तो नगरपालिकेची नाली म्हणून आयुक्ताकडून त्यांचे परिरक्षण केले जाईल व तो दुरुस्त ठेवला जाईल.

नाल्या व जलनि:सारणाची किंवा मलजलाची विल्हेवाट लावण्याची कामे यांचा महानगरपालिकेने अंगीकार करणे.

**१५४.** (१) आयुक्तास महानगरपालिकेच्या मान्यतेने, कोणत्याही वेळी शहरात असलेली किंवा शहरासाठी उपयोगी असलेली कोणतीही नाली किंवा तिचा भाग किंवा कोणतीही जलनि:सारणाची किंवा मलजलाची विल्हेवाट लावण्याची कामे किंवा त्यांच्या कोणताही भाग घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून महानगरपालिकेमध्ये निहित होईल असे घोषित करता येईल :

परंतु, जेव्हा आयुक्त या पोट-कलमान्वये घोषणा काढण्याचा प्रस्ताव करील तेव्हा त्या त्याने प्रस्तावाची लेखी नोटीस संबंधित नालीच्या किंवा कामाच्या मालकास किंवा मालकांना दिली पाहिजे आणि त्याच्या प्रस्तावाविरुध्द पोट-कलम (२) अन्वये कोणताही आक्षेप दाखल न केला गेल्यास तेव्हापासून एक महिनासंपेपर्यंत किंवा यथास्थिती, अशा रीतीने दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही आक्षेपाचा रीतसर विचार हाईपर्यंत त्याने त्या बाबतीत कोणतीही कार्यवाही करता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये घोषणा काढण्याच्या आयुक्ताच्या प्रस्तावामुळे व्यथित झालेल्या मालकास, प्रस्तावाची नोटीस त्याच्यावर बजावल्यापासून एक महिन्याच्या आत [१] [ राज्य ] शासनाकडे किंवा [१] [ राज्य ] शासन याबाबत शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे पदनिर्देशित करील अशा [१] [ राज्य ] शासनाच्या अधिकाऱ्याकडे अपील करता येईल ; आणि त्याने अशा रीतीने अपील केल्यास त्याने त्याबद्दलची लेखी सूचना आयुक्तास दिली पाहिजे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (२) खालील अपिलाचा विचार केल्यानंतर व आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, [१] [ राज्य ] शासनास किंवा उक्त अधिकाऱ्यास पोट-कलम (४) च्या तरतुदीकडे योग्य लक्ष देऊन, आयुक्ताचा प्रस्ताव मान्य करता येईल किंवा अमान्य करता येईल ; आणि त्यास योग्य वाटल्यास, ज्या शक्तीच्या अधीन राहून किंवा तो प्रस्ताव मान्य करील त्या शर्ती आयुक्ताने नुकसान भरपाई देण्यासंबंधीच्या शर्ती अतंर्भूत धरून, विनिर्दिष्ट करता येतील.

(४) पोट-कलम (१) अन्वये घोषणा करावी किंवा कसे हे ठेवताना, आयुक्ताने त्या बाबतीतील सर्व परिस्थिती व विशेषत: पुढील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत :–

(अ) प्रस्तुत नाली किंवा कामे ही, आयुक्ताने शहरासाठी किंवा शहराच्या कोणत्याही भागासाठी तरतूद केलेल्या किंवा तरतूद करण्याचे योजलेल्या अशा जलनि:सारणीच्या किंवा मलजलाची विल्हेवाट लावण्याच्या सर्वसाधारण व्यवस्थेशी अनुकूल करून घेतली आहेत किंवा कसे किंवा त्यासाठी आवश्यक आहेत किंवा कसे ;

(ब) अशी नाली रस्त्याखाली किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार रस्त्यासाठी राखून ठेवलेल्या जमिनीखाली बांधण्यात आली आहे किंवा कसे;

(क) ज्या इमारतींसाठी नालीचा उपयोग करण्याचे योजले असेल त्या इमारतींची संख्या आणि जवळपासच्या इमारती व भविष्यकाळात होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता, अधिक इमारतींसाठी अशा नालीची आवश्यकता असण्याचा संभव आहे किंवा कसे ;

(ड) नाली किंवा कामे यांच्या बांधणीची पध्दती व त्यांच्या दुरुस्तीची स्थिती ; आणि

(ई) प्रस्तावित घोषणा केल्यामुळे प्रस्तुत नालीच्या किंवा कामांच्या मालकास ते हानिकारक होईल किंवा कसे.

(५) पोट-कलम (१) अन्वये घोषणा काढण्याच्या निकटपूर्वी ज्या कोणत्याही व्यक्तीस प्रस्तुत नालीचा उपयोग करण्याच्या हक्क होता, तिला नालीचा किंवा त्याऐवजी बांधलेल्या कोणत्याही नालीचा, जणू अशी घोषणा करण्यात आली नव्हती असे समजून, तितक्याच मर्यादेपर्यंत उपयोग करण्याचा हक्क असेल ;

(६) जेव्हा महानगरपालिकेव्यतिरिक्त एखाद्या अन्य स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत असलेल्या किंवा शहरात असलेल्या परंतु अशा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेतील क्षेत्रासाठी किंवा त्याच्या भागासाठी उपयोगी असलेल्या नालीसंबंधी किंवा जलनि:सारण किंवा मलजल विल्हेवाट कामांसंबंधी पोट-कलम (१) अन्वये घोषणा करण्याचा प्रश्न आयुक्त विचारात घेण्याच्या बेतात असेल तेव्हा, त्याने त्या प्राधिकरणास नोटीस दिली पाहिजे आणि असे प्राधिकरण तसे करण्यास संमती देईपर्यंत किंवा [१] [ राज्य ] शासन त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून अशी संमती बिनशर्त किंवा त्यास योग्य वाटतील अशा शर्ती घालून अनावश्यक करीपर्यंत, त्याने कोणतीही घोषणा करता कामा नये.

(७) जेव्हा महानगरपालिकेव्यतिरिक्त एखाद्या अन्य स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत असलेल्या नालीसंबंधी किंवा जलनि:सारण विल्हेवाट किंवा मलजल विल्हेवाट कामांसंबंधी आयुक्त पोट-कलम (१) अन्वये घोषणा काढील तेव्हा, त्याने त्याबद्दलची नोटीस अशा प्राधिकरणास ताबडतोब दिली पाहिजे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(८) जेव्हा कोणतीही नाली किंवा तिचा भाग किंवा कोणतीही कामे महानगरपालिकेव्यतिरिक्त एखाद्या स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा केंद्र शासनामध्ये किंवा रेल्वे प्रशासन मंडळामध्ये निहित असतील तेव्हा, संबंधित प्राधिकरणाने, शासनाने किंवा प्रशासन मंडळाने विनंती केलेली असल्यावाचून, आयुक्ताने त्यासंबंधी पोट-कलम (१) अन्वये कोणतीही घोषणा करता कामा नये.

नाल्या बांधण्याचे अधिकार.

**१५५.** (१) आयुक्तास, कोणतीही नगरपालिकेची नाली कोणत्याही रस्त्यामधून किंवा रस्ता म्हणून रेखांकित किंवा तसा उद्देश असलेल्या कोणत्याही जागेमधून, त्यांच्या आरपार किंवा त्याच्या खालून किंवा कोणत्याही रस्त्याखाली असलेल्या कोणत्याही भुयाराखालून किंवा कमानीखालून नेता येईल आणि मालकास किंवा भोगवटादारास वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर, अशी नाली शहारातील किंवा मलजल उत्सर्जनासाठी किंवा वितरणासाठी शहराबाहेरील, कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेता येईल.

(२) आयुक्तास, ज्या कोणत्याही जमिनीत नगरपालिकेची कोणतीही नाली अधीच कायदेशीररीत्या बांधण्यात आली असेल अशा जमिनीवर प्रवेश करता येईल आणि तीत असलेल्या नालीच्या जागी कोणतीही नवीन नाली बांधता येईल किंवा त्याप्रमाणे बांधलेली नगरपालिकेची कोणतीही नाली दुरुस्त करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल.

नाल्यांमध्ये फेरफार करणे व त्या बंद ठेवणे.

**१५६.** आयुक्तास नगरपालिकेची कोणतीही नाली वाढवता येईल किंवा तिचा मार्ग बदलता येईल. किंवा तिचा आकार कमी करता येईल, तिच्यावर कमान बांधता येईल किंवा अन्य रीतीने तीत सुधारणा करता येईल, आणि त्याच्या मते निरुपयोगी किंवा अनावश्यक झालेली कोणतीही नाली बंद ठेवता येईल, बंद करता येईल किंवा नष्ट करता येईल किंवा अशा कोणत्याही नालीचा संपूर्णपणे किंवा दूषित पाण्याच्या निचऱ्यासाठी किंवा जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या निचऱ्यासाठी उपयोग करण्याची मनाई करता येईल :

परंतु, या कलमान्वये काहीही केल्यामुळे कोणतीही व्यक्ती कोणत्याही नालीचा कायदेशीर उपयोग करण्यास वंचित झाली तर, तिच्या उपयोगासाठी आयुक्ताने शक्य तितक्या लवकर, जी नाली बंद ठेवण्यात आली असेल, बंद करण्यात आली असेल किंवा तिचा उपयोग करण्यास मनाई करण्यात आली असेल त्या नालीप्रमाणेच उपयुक्त अशा कोणत्याही अन्य नालीची तरतूद केली पाहिजे.

नाल्या साफ करणे.

**१५७.** (१) नगरपालिकेच्या नाल्या, त्यापासून व्यवहार्य असेल इतका कमीत कमी उपद्रव होईल अशा रीतीने बांधण्यात येतील, सुस्थितीत ठेवण्यात येतील व त्यांचे परिरक्षण करण्यात येईल आणि त्या वेळोवेळी योग्य रीतीने पाण्याने धुतल्या जातील, साफ केल्या जातील व रिकाम्या केल्या जातील.

(२) उक्त नाल्या पाण्याने धुण्यासाठी, साफ करण्यासाठी व रिकाम्या करण्यासाठी आयुक्तांस त्यास वेळोवेळी आवश्यक वाटतील असे जलाशय, जलद्वार, इंजिने किंवा अन्य कामे बांधता येतील किंवा उभारता येतील.

## खाजगी रस्त्यांच्या नाल्या व जागांचे जलनि:सारण

खाजगी रस्त्यांच्या नाल्या नगरपालिकेच्या नाल्यांशी जोडण्याचा हक्क.

**१५८.** खाजगी रस्त्याच्या मालकास अशा रस्त्याची नाली नियमांमध्ये विहित केलेल्या शर्तीच्या अधीन राहून नगरपालिकेच्या नालीशी जोडण्याचा हक्क असेल.

**१५९.** (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही जागांच्या मालकास किंवा भोगवटादारास आपली नाली नगरपालिकेच्या नालीमध्ये किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेत नेऊन सोडण्याचा हक्क असेल ;

इमारतींच्या व जमिनींच्या मालकांचा व भोगवटादारांचा आपली नाली नगरपालिकेच्या नाल्यामध्ये नेऊन सोडण्याचा हक्क.

परंतु, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीस पुढील गोष्टी करण्याचा हक्क असणार नाही :—

(अ) कलम १६६ च्या तरतुदींना अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही उद्योगधंद्यापासून निर्माण होणारा प्रवाही कचरा किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार सोडण्याची मनाई असलेला कोणताही द्रव पदार्थ किंवा अन्य पदार्थ नगरपालिकेच्या नालीमध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सोडणे ;

(ब) जेथे दूषित पाण्याच्या व जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या नि:सारणासाठी नगरपालिकेच्या वेगवेगळ्या नाल्यांची तरतूद करण्यात आली असेल तेथे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे —

(एक) जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या नि:सारणासाठी तरतूद केलेल्या नालीमध्ये घाणपाणी सोडणे ; किंवा

(दोन) आयुक्ताच्या परवानगीवाचून, घाण पाण्याच्या नि:सारणासाठी तरतूद केलेल्या नालीमध्ये जमिनीच्या पृष्ठभागावरील पाणी सोडणे ; किंवा

(क) पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नालीस आपली नाली प्रत्यक्षपणे जोडणे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आयुक्तांची लेखी परवानगी घेतली पाहिजे आणि ती नगरपालिकेच्या नालीशी किंवा पूर्वोक्त अन्य जागांशी ज्या पध्दतीने व ज्या देखरेखीखाली नाल्या जोडल्या पाहिजेत त्या पध्दतीसंबंधी व देखरेखीसंबंधी आयुक्त विहित करील अशा शर्तीचे अनुपालन केले पाहिजे.

(३) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीला आपली नाली किंवा मलप्रणाल नगरपालिकेच्या नालीशी किंवा पूर्वी म्हटल्याप्रमाणे अन्य जागेशी जोडण्यास परवानगी देण्याऐवजी संबंधित व्यक्तीला तिचा अर्ज मिळाल्यापासून चौदा दिवसांच्या आत नोटीस देऊन स्वत: अशी नाली किंवा मलप्रणाल जोडता येईल ; आणि अशा रीतीने केलेल्या कोणत्याही कामाचा वाजवी खर्च अशा व्यक्तीने दिला पाहिजे.

**१६०.** (१) जेव्हा एखाद्या व्यक्तीने नाली बांधण्याचे योजले असेल तेव्हा, नियोजित नाली महानगरपालिकेने तरतूद केलेल्या किंवा तरतूद करण्याचे योजलेल्या जलनि:सारणाच्या सामान्य व्यवस्थेचा भाग म्हणून असणे आवश्यक आहे किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे असे आयुक्तास वाटत असेल तर, नळ तयार करताना वापरावयाचे साहित्य किंवा नळाचा आकार, खोली, उतार, दिशा किंवा उत्सर्जन यांच्या बाबतीत किंवा अन्य बाबतीत ज्या रीतीने नाली बांधण्याचे अशा व्यक्तीने योजले असेल किंवा ज्या अन्य रीतीने बांधण्यास त्यास अशा व्यक्तीस फर्माविता आले असते त्या रीतीहून निराळ्या रीतीने त्या व्यक्तीस अशी नाली बांधण्यास फर्मावता येईल ; आणि आयुक्ताने ज्या रीतीने नाली बांधण्यास अशा व्यक्तीस फर्मावले असेल त्या रीतीने नाली बांधणे हे तिचे कर्तव्य असेल.

नाली किंवा नियोजित नाली सामान्य व्यवस्थेचा भाग होईल अशा रीतीने बांधण्यास भाग पाडण्याचे आयुक्ताचे अधिकार.

(२) आयुक्ताने या कलमान्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला विशिष्ट रीतीने नाली बांधण्यास फर्माविले असेल त्या व्यक्तीने आयुक्ताने सांगितलेल्या रीतीव्यतिरिक्त अन्य रीतीने अशी नाली बांधता कामा नये किंवा बांधवून घेता कामा नये.

(३) आयुक्ताने पोट-कलम (१) मध्ये सांगितलेल्या रीतीने नाली बांधणाऱ्या व्यक्तीस अशा रीतीने नाली बांधण्यासाठी तिला वाजवीरीत्या आलेला खर्च नगरपालिका निधीतून परत दिला पाहिजे आणि अशी नाली नगरपालिकेची नाली होईपर्यंत, ती अशा रीतीने बांधण्यात आल्यामुळे तिला ती दुरूस्त ठेवण्यास व सुस्थितीत राखण्यास वाजवी रीतीने जो खर्च आला असेल तो खर्च देखील आयुक्ताने नगरपालिका निधीतून वेळोवेळी परत दिला पाहिजे.

कलम १५८ किंवा १५९ यास अनुरूप असेल त्या व्यतिरिक्त अन्य रीतीने नगरपालिकेच्या नालीशी अन्य नाली न जोडणे.

**१६१.** कोणत्याही व्यक्तीने, यथास्थिती, कलम १५८ किंवा १५९ च्या तरतुदींचे व नियमांचे पालन न करता स्वत:च्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची नाली नगरपालिकेच्या कोणत्याही नालीशी किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेशी जोडता किंवा जोडवून घेता कामा नये ; आणि आयुक्तास, या कलमाचे उल्लंघन करून जोडलेली कोणतीही नाली बंद करता येईल, पाडून टाकता येईल किंवा तीत फेरफार करता येईल किंवा ती नव्याने बांधता येईल आणि असे करताना आयुक्तास आलेला खर्च, ज्याच्या फायद्यासाठी नाली जोडण्यात आली होती त्या रस्त्याच्या मालकाने किंवा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने किंवा अपराध करणाऱ्या व्यक्तीने दिला पाहिजे.

जागांच्या मालकांचा व भोगवटा-दारांचा अन्य व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीमधून नाली नेण्याचा हक्क.

**१६२.** (१) कोणत्याही जागेचा मालक किंवा भोगवटादार आपली नाली नगरपालिकेच्या नालीत किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेत ज्या एकमेव किंवा सर्वात सोयीस्कर मार्गाने नेऊन सोडू शकेल तो मार्ग म्हणजे ती नाली, उक्त मालक किंवा भोगवटादार या व्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेणे हा आक्षेप आहे असे आयुक्तास वाटेल तर, त्यास त्या जमिनीच्या मालकास त्याचा जो कोणताही आक्षेप असेल तो निवेदन करण्यास वाजवी संधी दिल्यानंतर, कोणताही आक्षेप घेण्यात आला नसेल किंवा घेण्यात आलेला कोणताही आक्षेप आयुक्तास विधि अग्राह्य किंवा अपुरा वाटला तर, लेखी आदेशाद्वारे, उक्त मालकास किंवा भोगवटादारास आपली नाली त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अशा जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेऊ देण्यास परवानगी देता येईल.

(२) आयुक्तांची सही असलेला असा प्रत्येक आदेश, ज्या व्यक्तींच्या नावे तो दिला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनासाठी नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस तसे करण्याचा आपला उद्देश आहे अशी वाजवी लेखी नोटीस जमिनीच्या मालकास दिल्यानंतर किंवा त्याच्यावर बजावल्यानंतर, अशा जमिनीवर सहायकांना व कामगारांना घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करण्यास आणि आवश्यक ते काम पार पाडण्यास पूर्ण प्राधिकार असेल.

(३) या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही जागेच्या मालकास किंवा भोगवटाधारास किंवा त्याने या प्रयोजनासाठी नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस, ज्या कोणत्याही जमिनीत त्यांच्या उक्त जागेच्या जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या आधीच नाली बांधली असेल त्या जमिनीच्या मालकास तसे करण्याचा आपला उद्देश आहे अशी वाजवी नोटीस दिल्यानंतर किंवा त्याच्यावर बजावल्यानंतर उक्त जमिनीवर सहायक व श्रमिकांना घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल आणि तीत असलेल्या नालीच्या जागी नवीन नाली बांधता येईल किंवा अशा रीतीने बांधलेली कोणतीही नाली दुरुस्त करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल.

(४) या कलमान्वये कोणतेही काम पार पाडताना, फारसे नुकसान होणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे आणि ज्या जागेच्या फायद्यासाठी असे काम करण्यात येईल त्या जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने –

(अ) असे काम शक्य तितक्या कमी वेळात करविले पाहिजे ;

(ब) उक्त काम पार पाडण्यासाठी जो जमीन किंवा कोणत्याही इमारतीचा अन्य बांधकामाचा जो कोणताही भाग उघडला, फोडला किंवा काढून नेला असेल तो, शक्य तितक्या लवकर आपल्या स्वत:च्या खर्चाने भरुन काढला पाहिजे, पूर्ववत केला पाहिजे व नीट करून दिला पाहिजे ;

(क) उक्त काम पार पाडल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे नुकसान होईल तिला नुकसानभरपाई दिली पाहिजे.

(५) या कलमान्वये ज्या कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून कोणतीही नाली त्या जमिनीवर बांधकाम केलेले नसताना नेण्यात आली असेल त्या जमिनीचा मालक नंतर कोणत्याही वेळी तिच्यावर इमारत बांधू इच्छील तर, आयुक्ताने ज्या जागेच्या फायद्यासाठी अशी नाली बांधण्यात आली असेल त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन आयुक्त मान्य करील अशा रीतीने ती बंदी करण्यास, काढून टाकण्यास किंवा वळवण्यास आणि जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नाली नेण्यात आली नव्हती असे समजून अशी जमीन भरून काढण्यास, पूर्ववत करण्यास व नीट करून देण्यास फर्माविले पाहिजे ;

परंतु, नियोजित इमारत बांधता यावी म्हणून किंवा तिचा सुरक्षितपणे उपभोग घेता यावा म्हणून अशी नाली बंद करणे, काढून टाकणे किंवा वळवणे आवश्यक व इष्ट आहे असे आयुक्ताचे मत असल्याखेरीज अशी मागणी करता कामा नये.

जमिनीच्या मालकाने आपल्या जमिनीमधून नाली नेण्याची इतरांना परवानगी देणे.

**१६३.** जमिनीचा प्रत्येक मालक, ज्या व्यक्तीच्या नावे कलम १६२, पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अशा आदेशात विहित करण्यात येतील अशा अटींवर आपल्या जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नाली नेण्याची मुभा देण्यास बांधलेला असेल.

नगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत असलेल्या ज्या जागात नि:सारणाची व्यवस्था नाही त्या जागांच्या जलनि:सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

**१६४.** आयुक्ताच्या मते कोणत्याही जागेमध्ये परिणामकारक रीतीने जलनि:सारण करण्याची पुरेशी सोय नसेल आणि उक्त जागेच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांहून अधिक नसेल इतक्या अंतरावर नगरपालिकेची नाली किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेली अन्य जागा असेल त्या बाबतीत, आयुक्तास, लेखी नोटीशीद्वारे, उक्त जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास पुढील गोष्टी करण्याविषयी फर्माविता येईल.

(अ) आयुक्तास आवश्यक वाटेल असे साहित्य वापरून, अशा आकाराची, वर्णनाची अशा सपाटीवर असलेली व अशा रचनेप्रमाणे असलेली व असा उतार व उत्सर्जन असलेली नाली बांधणे व ती आयुक्तास योग्य वाटेल अशा नगरपालिकेच्या नालीत किंवा पूर्वोक्त जागेत आयुक्तास योग्य वाटेल त्या ठिकाणी नेऊन सोडणे :

परंतु, महानगरपालिकेने सांगितल्याप्रमाणे जेव्हा कोणत्याही जागेत नालीची व्यवस्था आधीच करण्यात आली असेल व त्या जागेत नवीन जागा बांधावयाच्या असतील तेव्हा, स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून अशी कोणतीही मागणी करता कामा नये.

(ब) उक्त जागेतील पाणी जमा करण्यासाठी व ते अशा जागेतून काढून टाकण्यासाठी आणि अशी नाली तीला पक्की जोडलेली प्रत्येक वस्तू चांगल्या रीतीने पाण्याने धुऊन काढण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटतील अशी सर्व उपयंत्रे व जोडणीकामे यांची तरतूद करणे व ती बसवणे ;

(क) आयुक्ताच्या मते आरोग्यास हानिकारक अशी कोणतीही विद्यमान नाली किंवा जलनि:सारणासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणण्याचा उद्देश असलेले अन्य उपयंत्र व वस्तू काढून टाकणे ;

(ड) आरोग्यास हानिकारक असेल किंवा हानिकारक होण्याचा संभव असेल अशा उघड्या नालीऐवजी बंद नालीची तरतूद करणे किंवा अन्य उपयंत्राची किंवा वस्तूची एकतर नव्याने किंवा कोणत्याही विद्यमान उपयंत्राच्या किंवा वस्तूच्या ऐवजी तरतूद करणे किंवा विद्यमान उघड्या नालीऐवजी व अन्य उपयंत्राच्या किंवा वस्तूच्या ऐवजी बंद नाली व असे अन्य उपयंत्र किंवा वस्तू या दोहोंची तरतूद करणे ;

(ई) इमारतींचे मजले किंवा गॅलऱ्या धुतल्यानंतर, त्यातील सांडपाणी जमा करण्याच्या प्रयोजनासाठी आणि ते थेट रस्त्यावर किंवा इमारतीच्या कोणत्याही खालच्या भागाच्या आतील बाजूस पडू नये म्हणून पन्हाळीमधून किंवा पाणी खाली वाहून नेणाऱ्या नळांमधून वाहून नेण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटतील अशी सर्व उपयंत्रे व जोडणीकामे यांची तरतूद करणे व ती उभारणे.

नगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत नसलेल्या ज्या जागांत नि:सारणाची व्यवस्था नाही त्या जागांच्या जलनि:सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

**१६५.** (१) आयुक्तांच्या मते कोणत्याही जागांना परिणामकारक रीतीने जलनि:सारणाची पुरेशी सोय नसेल व उक्त जागांच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांच्या आत कोणतीही नगरपालिकेची नाली किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशी कोणतीही जागा नसेल तेथे आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे उक्त जागांच्या मालकास किंवा भोगवटादारांस,

(अ) अशा नोटीशीत विहित केलेल्या परंतु अशा जागेच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांपेक्षा अधिक अंतरावर नसलेल्या ठिकाणापर्यंत नाली बांधण्यास, किंवा

(ब) आयुक्तास आवश्यक वाटेल असे साहित्य वापरून, अशा आकाराची व वर्णनाची व अशा जागी, अशा सपाटीवर व अशा उतरणीची बंद मलकुंडी बांधण्यास आणि अशा मलकुंडीत पाणी नेऊन सोडणारी एक किंवा अनेक नाल्या बांधण्यास फर्मावता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नाली बांधण्यासाठी दिलेल्या आदेशात कलम १६४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तपशिलाचा समावेश करता येईल.

औद्योगिक नि:सृतासंबंधी विशेष तरतुदी.

**१६६.** हा अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही धंद्याच्या जागांच्या भोगवटादारास, आयुक्ताच्या संमतीने किंवा अशा कोणत्याही नियमान्वये किंवा उपविधीअन्वये अशी संमती न घेता करता येत असेल तितपत अशा जागेतील औद्योगिक नि:सृत नगरपालिकेच्या नाल्यांमध्ये सोडता येईल.

**१६७.** (१) अस्तित्वात असलेली किंवा बांधावयाची नगरपालिकेची नाली किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेली अन्य जागा यापासून शंभर फुटांच्या आत ज्याचा एखादा भाग असेल अशा जागांच्या कोणत्याही समूहाचे किंवा गटाचे जलनि:सारण वेगवेगळे करण्यापेक्षा संयुक्तपणे करणे हे अधिक काटकसरीचे किंवा फायद्याचे होईल असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास त्यासाठी अत्यंत सोईस्कर वाटेल अशा पद्धतीने अशा जागांच्या समुहाच्या किंवा गटाच्या जलनि:सारणाची व्यवस्था करता येईल, आणि असे करताना आयुक्तास आलेला खर्च, त्यास योग्य वाटेल अशा प्रमाणात अशा जागांच्या मालकांनी दिला पाहिजे.

जागांचे संयुक्त जलनि:सारण करण्याचा आयुक्तांचा अधिकार.

(२) ज्या जागांचे जलनि:सारण करावयाचे असेल त्या सर्व जागांच्या मालकांना, या कलमान्वये कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी आयुक्ताने —

(अ) नियोजित कामाच्या स्वरूपाची,

(ब) अशा कामाच्या अंदाजित खर्चाची, आणि

(क) प्रत्येक मालकाने असा खर्च ज्या प्रमाणात द्यावयाचा त्या प्रमाणाची,

कमीत कमी पंधरा दिवस आधी नोटीस दिली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये जलनि:सारण केले जाणाऱ्या समूहातील किंवा गटातील अनेक जागांचे त्यावेळी असलेले मालक हे, केवळ अशा जागांच्या खास उपयोगासाठी व फायद्यासाठी बांधलेल्या, उभारलेल्या किंवा बसवलेल्या किंवा चालू ठेवलेल्या प्रत्येक नालीचे सामाईक मालक असतील आणि आयुक्तास पोट-कलम (१) अन्वये आलेला खर्च अशा जागांच्या मालकांनी ज्या प्रमाणात दिला पाहिजे असे ठरवण्यात येईल त्या प्रमाणात, ते अशी प्रत्येक नाली दुरुस्त स्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याच्या खर्चास जबाबदार असतील :

परंतु, आयुक्ताने अशी प्रत्येक नाली, नगरपालिका निधीतून खर्च करून, वेळोवेळी पाण्याने धुऊन काढण्याची, स्वच्छ करण्याची व रिकामी करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१६८.** (१) कोणत्याही जागेला नगरपालिकेच्या नालीशी किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेशी जोडणारी नाली, उक्त जागेच्या परिणामकारक जलनि:सारणासाठी पुरेशी असली व कोणत्याही प्रकारे आक्षेप घेण्याजोगी नसली तरी, आयुक्ताच्या मते अशी नाली शहराच्या किंवा ती शहराच्या ज्या भागात असेल त्या भागाच्या जलनि:सारणाच्या सामान्य व्यवस्थेला अनुकूल अशी नसेल तर, त्यास —

आयुक्तास अस्तित्वात असलेल्या खाजगी नाल्या बंद करता येतील किंवा त्यांचा वापर मर्यादित करता येईल.

(अ) पोट-कलम (२) च्या तरतुदीच्या अधीन राहून, उक्त नाली बंद करता येईल, बंद ठेवता येईल किंवा नष्ट करता येईल व त्या प्रयोजनासाठी जे कोणतेही काम करणे आवश्यक असेल ते करवून घेता येतील ;

(ब) अशी नाली तो याबाबत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून केवळ घाण पाण्यासाठी व मलजलासाठीच वापरण्यात येईल किंवा केवळ पावसाच्या पाण्यासाठीच वापरण्यात येईल किंवा केवळ

भूपृष्ठाखालील दूषित न झालेल्या पाण्यासाठीच वापरण्यात येईल किंवा केवळ पावसाचे पाणी व भूपृष्ठाखालील दूषित न झालेले पाणी या दोहोंसाठीच वापरण्यात येईल, असा निदेश देता येईल आणि त्यास अशा जागांच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन पावसाच्या पाण्यासाठी किंवा भूपृष्ठाखालील दूषित न झालेल्या पाण्यासाठी पावसाचे पाणी व भूपृष्ठाखालील दूषित न झालेले पाणी या दोहोंसाठी किंवा घाणपाणी मलजल यासाठी संपूर्णत: वेगळी नाली बांधण्याचा निदेश देता येईल.

(२) एखाद्या जागेच्या जलनि:सारणासाठी आणि कोणत्याही नगरपालिकेच्या नालीशी किंवा आयुक्तास योग्य वाटेल अशा पूर्वी म्हटल्याप्रमाणे असलेल्या अन्य जागेशी जोडलेल्या दुसऱ्या एखाद्या उपयुक्त नालीची तरतूद केल्याखेरीज आयुक्ताला पोट-कलम (१), बाब (अ) अन्वये कोणतीही नाली बंद करता येणार नाही, बंद ठेवता येणार नाही किंवा नष्ट करता येणार नाही आणि आयुक्ताने याप्रमाणे पुरविलेल्या नाल्या बांधण्यासाठी व उक्त बाबीखाली केलेल्या कामासाठी आलेला खर्च आयुक्ताने दिला पाहिजे.

(३) पोट-कलम (१), बाब (ख) अन्वये आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशात, कलम १६४ बाब (अ) किंवा (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तपशिलाचा समावेश करता येईल.

केवळ मालमत्तेच्या वापरासाठी नाल्या निहित होणे व त्या सुस्थितीत राखणे.

**१६९.** कलम १५३, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, बांधलेली, बसवलेली, उभारलेली किंवा सुरू केलेली किंवा जागेच्या किंवा जागांच्या समुहाच्या केवळ वापरासाठी व फायद्यासाठी चालू ठेवलेली प्रत्येक नाली मग ती महानगरपालिकेच्या खर्चाने बांधलेली, बसवलेली, उभारलेली किंवा सुरू केलेली असो वा नसो —

(अ) कलम १७० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवशी व दिवसापासून अशा जागेच्या किंवा जागांच्या गटाच्या मालकाकडे निहित होईल ;

(ब) तिचा अधिक परिणामकारक रीतीने उपयोग व्हावा म्हणून आयुक्तास आवश्यक वाटतील अशी आणखी सर्व उपयंत्रे व जोडणीकामे यांची तरतूद तीत करण्यात आली पाहिजे. तसेच ती अशा जागांच्या किंवा जागांच्या समुहाच्या मालकाकडून चांगल्या दुरुस्त स्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवण्यात आली पाहिजे आणि नगरपालिका निधीतून खर्च करून वेळोवेळी ती पाण्याने धुऊन काढण्याची, साफ करण्याची व रिकामी करण्याची आयुक्ताकडून व्यवस्था करण्यात आली पाहिजे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या जागांवर नगरपालिका निधीतून बांधलेल्या नाल्या इत्यादींवर महानगरपालिकेचा हक्क.

**१७०.** महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जागांवर नगरपालिका निधीतून खर्च करून किंवा नियत दिवसापूर्वी शहराच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करून, कोणत्याही वेळी बांधलेल्या, उभारलेल्या किंवा सुरू केलेल्या आणि केवळ त्या जागांच्या किंवा जागांच्या समूहाच्या वापरासाठी व फायद्यासाठी नसतील अशा सर्व नाल्या, हवेचे स्तंभ व नळ आणि जलनि:सारणाच्या कामास जोडलेली सर्व उपयंत्रे व जोडणीकामे महानगरपालिकेने अन्यथा तसे ठरवले नसल्यास, तिच्यामध्ये निहित होतील.

**१७१.** (१) (अ) कोणत्याही इमारतीच्या जलनि:सारणासाठी आयुक्तास आवश्यक वाटेल अशा आकाराची, असे साहित्य वापरून, अशा वर्णनाची आणि अशा सपाटीवर व असा उतार असलेली नाली बांधल्यावाचून व बांधण्यात येईपर्यंत ; नाल्यांशिवाय नवीन इमारती उभारता कामा नये.

(ब) अशा इमारतीत व त्या इमारतीस लागून असलेल्या जागांमध्ये उक्त इमारतीतील व उक्त जागेतील पाणी जमा करण्यासाठी व काढून नेण्यासाठी आणि अशा इमारतीची नाली व तिला जोडलेल्या सर्व वस्तू परिणामकारक रीतीने धुऊन साफ होण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटतील अशी सर्व उपयंत्रे व जोडणीकामे यांची तरतूद करण्यात व ती बसवण्यात आल्यावाचून व बसवण्यात येईपर्यंत ; कोणतीही इमारत उभारणे किंवा पुन: उभारणे किंवा नव्याने उभारलेली किंवा पुन: उभारलेली इमारत भोगवट्यात आणणे कायदेशीर असणार नाही.

(२) पूर्वी म्हटल्याप्रमाणे बांधावयाची नाली नगरपालिकेच्या नालीत किंवा अशी इमारत ज्या जागेत असेल त्या जागेपासून शंभर फुटांहून अधिक अंतरावर नसलेल्या पाणी काढून टाकण्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेत नेऊन सोडली पाहिजे, परंतु अशी कोणतीही नाली किंवा जागा अशा अंतराच्या आत नसेल तर, अशी नाली आयुक्त निर्देश देईल अशा मलकुंडीत नेऊन सोडली पाहिजे.

**१७२.** नगरपालिकेच्या नालीशी किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेशी जोडलेल्या नालीच्या प्रत्येक मालकावर, कलम १७३ अन्वये विहित करण्यात येतील अशा अटींवर इतरांना तिचा वापर करू देण्याचे किंवा अन्य व्यक्तीस तिचा सामाईक मालक होऊ देण्याचे बंधन असेल. नाल्याच्या मालकावर त्यांचा इतरांना वापर करू देण्याचे किंवा त्यांची सामाईक मालकी होऊ देण्याचे बंधन असणे.

**१७३.** (१) कोणत्याही व्यक्तीची आपल्या जागेतील पाणी दुसऱ्या नालीमधून नगरपालिकेच्या नालीमध्ये नेऊन सोडण्याची इच्छा असेल व ती अशा नालीचा मालक नसेल तर तिला, अशा नालीच्या मालकाबरोबर तिचा वापर करण्यास परवानगी देण्यासाठी खाजगी व्यवस्था करता येईल किंवा तिचा वापर करण्याचा प्राधिकार मिळवण्यासाठी किंवा आपण तिचे सामाईक मालक असल्याचे जाहीर करण्यासाठी आयुक्ताकडे अर्ज करता येईल. मालकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीस नालीचा वापर करण्याचा किंवा तिची सामाईक मालकी मिळवण्याचा हक्क कसा मिळवता येईल.

(२) जर अशा अर्जावरून किंवा अन्यथा, कोणत्याही जागेचा मालक किंवा भोगवटादार आपली नाली नगरपालिकेच्या नालीत किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागेत ज्या मार्गाने नेऊन सोडू शकेल असा एकमेव किंवा सर्वात सोयीस्कर मार्ग म्हणजे उक्त मालक किंवा भोगवटादार या व्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या मालकीच्या असलेल्या व अशा नगरपालिकेच्या नालीशी किंवा पूर्वी म्हटल्याप्रमाणे अन्य जागेशी जोडलेल्या नालीतून नेणे हा होय, असे आयुक्तांचे मत झाले तर, त्यास अशा नालीच्या मालकास त्याचा जो कोणताही आक्षेप असेल तो निवेदन करण्यास वाजवी संधी दिल्यानंतर, कोणताही आक्षेप घेण्यात आला नसेल किंवा घेण्यात आलेला कोणताही आक्षेप त्यास विधिअग्राह्य किंवा अपुरा वाटेल तर, लेखी आदेशाद्वारे, त्यास उक्त मालकास किंवा भोगवटादारास भाडे किंवा भरपाई देण्यासंबंधी, अशा

जागेतील नाली नगरपालिकेच्या नालीशी जोडण्यासंबंधी, सामाईक मालकीची अशी नाली सुस्थितीत राखणे, तिची दुरुस्ती करणे, ती पाण्याने धुऊन काढणे, साफ करणे व रिकामी करणे किंवा अन्य गोष्टी करणे याबाबतच्या दोन्ही पक्षांच्या जबाबदाऱ्या यासंबंधी न्याय वाटतील अशा अटींवर उक्त मालकास किंवा भोगवटादारास अशा नालीचा वापर करण्यास प्राधिकृत करता येईल किंवा त्यास तिचा सामाईक मालक म्हणून जाहीर करता येईल.

(३) आयुक्ताची सही असलेला प्रत्येक आदेश, ज्या व्यक्तीच्या नावे तो दिला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनांसाठी तिने नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस अशा नालीच्या मालकास उक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेली भरपाईची किंवा भाड्याची रक्कम दिल्यानंतर किंवा देऊ केल्यानंतर व अन्यथा उक्त आदेशातील शर्ती शक्य असेल तितपत पूर्ण केल्यानंतर आणि तसे करण्याचा आपला उद्देश आहे अशी वाजवी लेखी नोटीस उक्त नालीच्या मालकास दिल्यानंतर उक्त नाली असलेल्या जमिनीवर सहाय्यकांना व कामगारांना घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करण्यास आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदींच्या अधीन राहून, पुढील कामे करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा गोष्टी करण्यास पूर्ण प्राधिकार असेल, —

(अ) अशा दोन्ही नाल्या जोडणे ; किंवा

(ब) जोडलेल्या नाल्या नव्याने बांधणे, दुरुस्त करणे किंवा त्यात फेरफार करणे ; किंवा

(क) जिच्या नावाने आयुक्ताने आदेश दिला असेल त्या व्यक्तींची अशी सामाईक मालकीची नाली किंवा तिचा कोणताही भाग सुस्थितीत राखणे, दुरुस्त करणे, पाण्याने धुऊन काढणे, साफ करणे किंवा रिकामा करणे या संबंधी जी कोणतीही जबाबदारी असेल ती पार पाडणे.

(४) पोट-कलम (३) अन्वये कोणतेही काम पार पाडण्याच्या बाबतीत, ज्या व्यक्तीच्या नावाने आयुक्ताने आदेश दिला असेल ती व्यक्ती, कलम १६२, पोट-कलम (४) मध्ये जे निर्बंध व ज्या जबाबदाऱ्या विनिर्दिष्ट करण्यात आल्या आहेत त्याच निर्बंधाच्या व जबाबदाऱ्यांच्या अधीन असेल.

मलजलाच्या व पावसाच्या पाण्याच्या नाल्या वेगवेगळ्या असणे.

**१७४.** कोणत्याही जागेच्या परिणामकारक जलनि:सारणासाठी आयुक्त उपाययोजना करील किंवा करू शकेल अशी या प्रकरणात जेव्हा जेव्हा तरतूद करण्यात येईल तेव्हा तेव्हा घाण, मलमूत्र व दूषित पाणी यासाठी एक नाली असेल आणि पावसाचे पाणी व भूपृष्ठाखालील दूषित न झालेले पाणी यासाठी किंवा पावसाचे पाणी व भूपृष्ठाखालील दूषित न झालेले पाणी या दोहोंसाठी एक पूर्णत: स्वतंत्र अशी दुसरी नाली असेल आणि अशी प्रत्येक नाली नगरपालिकेच्या वेगवेगळ्या नाल्यात किंवा जलनि:सारणासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या अन्य जागांत किंवा अन्य सोयीस्कर जागांत सोडण्यात येईल असे आयुक्तास फर्मावता येईल.

नाल्या इत्यादींमध्ये हवा खेळती राहण्यासाठी नळ जोडणे.

**१७५.** (१) महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही नालीत किंवा मलकुंडीत हवा खेळती राहण्याच्या प्रयोजनांसाठी आयुक्तास आवश्यक वाटेल असा कोणताही वायुवीजनाचा दांडा किंवा नळ कोणत्याही जागेवर उभारता येईल किंवा कोणत्याही इमारतीच्या बाहेरील भागास किंवा कोणत्याही झाडास जोडता येईल आणि असा वायुवीजनाचा दांडा किंवा नळ इमारतीच्या कोणत्याही पुढे आलेल्या भागातून नेण्यासाठी असा पुढे आलेला भाग व अशा इमारतीच्या कोणत्याही छपराच्या वळचणी छेदता येतील आणि ज्या नालीत किंवा मलकुंडीत हवा खेळती ठेवण्याचा उद्देश असेल त्या नालीला किंवा मलकुंडीला वायुवीजनाचा दांडा किंवा नळ जोडण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असलेली साधने कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून बसवता येईल.

(२) असा वायुवीजनाचा दांडा किंवा नळ नियमांमध्ये नमूद केलेल्या रीतीने उभारला किंवा जोडला किंवा काढून टाकला जाईल.

(३) जर नियमान्वये एखाद्या वायुवीजनाचा दांडा किंवा नळ काढून टाकण्यास आयुक्ताने नकार दिला तर ज्यावर तो उभारण्यात किंवा ज्याला जोडण्यात आला असेल त्या जागेच्या, इमारतीच्या किंवा झाडाच्या मालकास आयुक्ताचे उत्तर त्यास मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये छेदलेल्या, उघडलेल्या किंवा अन्य रीतीने वापरलेल्या कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक हा, जिच्यात हवा खेळती ठेवण्याचा उद्देश आहे अशा नालीचा किंवा मलकुंडीचा मालक नसेल त्याबाबतीत आयुक्ताने नगरपालिका निधीतून खर्च करून व्यवहार्य असेल तितपत, अशी इमारत पूर्ववत केली पाहिजे, दुरुस्त केली पाहिजे आणि अशी जमीन भरून काढून व नीट करून दिली पाहिजे.

## मलजलाची विल्हेवाट

नाल्या नेऊन सोडण्यासाठी आणि मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठरवून देणे.

**१७६.** आयुक्तास, नगरपालिकेच्या किंवा कोणत्याही नाल्या शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही जागेत नेऊन सोडण्याची आणि शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही जागेत व त्या प्रयोजनांसाठी, त्यास योग्य अशा कोणत्याही रीतीने मलजलाची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु —

(अ) आयुक्ताने, महानगरपालिकेच्या मंजुरीवाचून, आतापर्यंत ज्या जागेत नगरपालिकेची नाली नेऊन सोडण्यात आलेली नाही अशा कोणत्याही जागेत नगरपालिकेची कोणतीही नाली सोडण्याची व्यवस्था करता कामा नये किंवा आतापर्यंत ज्या जागेत किंवा ज्या रीतीने मलजलाची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही. अशा कोणत्याही जागेत किंवा अशा कोणत्याही रीतीने मलजलाची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करता कामा नये ;

(ब) नगरपालिकेची कोणतीही नाली ज्या कोणत्याही जागेत नेऊन सोडवण्यास व कोणत्याही मलजलाची विल्हेवाट ज्या जागेत ज्या रीतीने लावण्यास परवानगी न देणे हे [१] [ राज्य ] शासनास योग्य वाटेल अशा कोणत्याही जागेत व अशा कोणत्याही रीतीने अशी नाली नेऊन सोडता कामा नये.

मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी साधनांची तरतूद.

**१७७.** आयुक्तास, मलजल जमा करण्याच्या, त्यावर प्रक्रिया करण्याच्या ते साठवण्याच्या, जंतुरहित करण्याच्या, ते ठिकठिकाणी पाठविण्याच्या किंवा अन्य रीतीने त्याची विल्हेवाट लावण्याच्या प्रयोजनासाठी शहरात किंवा शहराबाहेर कोणतेही बांधकाम करता येईल किंवा शहरात किंवा शहराबाहेर कोणतीही जमीन, इमारत, इंजिन, सामग्री किंवा उपकरण संच खरेदी करता येईल किंवा भाडेपट्ट्याने घेता येईल किंवा शहरात किंवा शहराबाहेर मलजल काढून नेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी २० वर्षांहून अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीसाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणतीही व्यवस्था करता येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## जलधौत संडास शौचकूप, मुत्र्या इत्यादी

जलधौत संडास व शौचकूप बांधणे.

**१७८.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीपासून आणि त्यावेळी अंमलात असलेला कोणताही नियम किंवा उपविधी याच्याशी विसंगत नसतील अशा ज्या अटी तो विहित करील त्यांचे पालन केल्यावाचून कोणत्याही जागेसाठी जलधौत संडास किंवा शौचकूप बांधणे कायदेशीर असणार नाही.

(२) अशा कोणत्याही अटी विहित करताना, आयुक्तास, प्रत्येक बाबतीत पुढील गोष्टी ठरवता येतील—

(अ) अशा जागेत जलधौत संडासाची व्यवस्था करण्यात यावी किंवा शौचकूपाची व्यवस्था करण्यात यावी किंवा अंशत: जलधौत संडासांची व अंशत: शौचकूपांची व्यवस्था करण्यात यावी किंवा कसे ; आणि

(ब) प्रत्येक जलधौत संडास किंवा शौचकूप कोणत्या ठिकाणी किंवा जागी असावा.

(३) जर पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणत्याही जागेवर कोणताही जलधौत संडास किंवा शौचकूप बांधण्यात आला तर, आयुक्तास, अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास कमीतकमी दहा दिवसांची नोटीस दिल्यानंतर, असा जलधौत संडास किंवा शौचकूप बंद करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो पाडून टाकता येईल आणि असे करताना आयुक्तास आलेला खर्च अशा मालकाने, भोगवटादाराने किंवा अपराध करणाऱ्या व्यक्तीने दिला पाहिजे.

नव्याने बांधलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या इमारतीत जलधौत संडासांची व अन्य सोय.

**१७९.** (१) माणसांनी राहण्यासाठी किंवा राहण्याचा उद्देश असलेल्या किंवा जेथे किंवा जिच्यामध्ये मजूर किंवा कामगार कामावर लावावयाचे असतील अशा कोणत्याही इमारतीत आयुक्त विहित करील अशा जलधौत संडासाची किंवा शौचकूपांची सोय व मूत्रीची सोय व स्नानासाठी किंवा धुण्यासाठी व घरातील कामासाठी लागणारी भांडी धुण्यासाठी सोय केल्यावाचून, कलम २५३ च्या अर्थानुसार कोणतीही इमारत बांधणे, पुन्हा बांधणे किंवा तिचे रूपांतर करणे कायदेशीर असणार नाही :

[१] [ परंतु, एखादे क्षेत्र तुलनात्मकदृष्ट्या किती अविकसित व ग्रामीण स्वरूपाचे आहे हे विचारात घेऊन, अशा क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये जलधौत संडासाची किंवा शौचकुपाची सोय करणे अनावश्यक आहे असे आयुक्तास वाटले तर, एक हजार चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ नसलेल्या जमिनीच्या भूखंडावर आयुक्ताने, स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने दिलेल्या परवानगीने, पूर्वी म्हटल्याप्रमाणे जलधौत संडासाशिवाय किंवा शौचकूपाशिवाय कोणतीही इमारत बांधणे, पुन्हा बांधणे किंवा तिचे रूपांतर करणे कायदेशीर असेल. ]

(२) अशा कोणत्याही सोयीसंबंधी विहित करताना, आयुक्तास, प्रत्येक बाबतीत पुढील गोष्टी ठरवता येतील :—

(अ) अशा इमारतीत किंवा बांधकामात जलधौत संडासाची सोय करण्यात यावी किंवा शौचकूपाची सोय करण्यात यावी किंवा अशंत: जलधौत संडासाची व अंशत: शौचकूपाची सोय करण्यात यावी किंवा कसे ;

(ब) प्रत्येक जलधौत संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा कोणत्या ठिकाणी किंवा जागी असावी आणि त्यांची संख्या.

(३) पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असलेल्या सोयीसंबंधी ठरवताना आयुक्ताने, इमारतीच्या भोगवटादारांनी घरकामासाठी कामावर लावलेल्या नोकरांसाठी पुरेशी व योग्य अशी जलधौत संडासांची किंवा शौचकूपांची किंवा स्नानांच्या जागांची तरतूद करण्याच्या आवश्यकतेकडे लक्ष पुरविले पाहिजे.

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम २ (अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[1] [ (४) कोणत्याही क्षेत्रात जलधौत संडासाशिवाय किंवा शौचकूपाशिवाय कोणतीही इमारत बांधण्यास, पुन्हा बांधण्यास किंवा तिचे रूपांतर करण्यास पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये परवानगी देण्यात आली असेल तेव्हा आयुक्ताने याबाबत, राज्य शासन आयुक्ताशी विचारविनमय करून ठरवील अशा कालावधीच्या आत त्या क्षेत्रात किंवा त्या क्षेत्राच्या जवळपास योग्य व सोईस्कर ठिकाणी संडासांची व मुत्र्यांची तरतूद केली पाहिजे व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(५) जर आयुक्ताने, पूर्वी सांगितल्याप्रमाणे ठरवलेल्या कालावधीच्या आत शौचकूपांची व मुत्र्यांची तरतूद करण्यात कसूर केली तर, राज्य शासनास अशा शौचकूपांची व मुत्र्यांची तरतूद करता येईल आणि तो खर्च नगरपालिका निधीतून देण्यात येईल असा निदेश देता येईल आणि त्यानंतर, कलम ४४९ च्या तरतुदी ज्याप्रमाणे कलम ४४८, पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या आदेशानुसार खर्चाची वसुली करण्यासंबंधी लागू होताच, त्याचप्रमाणे त्या अशा खर्चाची वसुली करण्यास लागू होतील. ]

**१८०.** आयुक्ताने योग्य व सोयीस्कर ठिकाणी लोकांच्या सोयीसाठी जलधौत संडास, शौचकूप संडास व मुत्र्या आणि तत्सम अन्य सोयी यांची तरतूद केली पाहिजे व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत. लोकांसाठी आवश्यक सोयी.

## पाहणी

**१८१.** (१) ज्या महानगरपालिकेच्या मालकीच्या नसतील किंवा ज्या महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या जागांवर उक्त जागांच्या मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या वापरासाठी किंवा फायद्यासाठी नगरपालिका निधीतून खर्च करून बांधण्यात, उभारण्यात किंवा सुरू करण्यात आल्या असतील अशा सर्व नाल्या, वायुवीजनाचे दांडे व नळ मलकुंड्या, घरांच्या गल्ल्या, जलधौत संडास, संडास, शौचकूप व मुत्र्या आणि स्नानांच्या व धुण्याच्या जागा आयुक्तांकडून त्यांची पाहणी व तपासणी करण्यासाठी खुल्या असतील. महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या नाल्या इत्यादींची पाहणी व तपासणी करता येणे.

(२) आयुक्तास, पोट-कलम (१) अन्वये पाहणी किंवा तपासणी करताना, त्याने पाहणी किंवा तपासणी केलेल्या धंद्याच्या जागेतून नगरपालिकेच्या नालीत वाहून जाणाऱ्या कोणत्याही उद्योगधंद्यापासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा नमुना घेऊन तो नेता येईल. अशा नमुन्याचे विश्लेषण नियमांनी विहित केलेल्या रीतीने करण्यात आले पाहिजे.

(३) पोट-कलम (२) अन्वये घेतलेल्या, नमुन्याचे कोणतेही विश्लेषण करून काढलेले निष्कर्ष, या अधिनियमान्वये कायदेशीररीत्या चालू केलेल्या कोणत्याही कामात पुरावा म्हणून ग्राह्य असतील.

**१८२.** अशा पाहणीच्या व तपासणीच्या प्रयोजनासाठी, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी, जमीन किंवा कोणत्याही नालीचा कोणताही भाग किंवा इमारतीच्या बाहेरील कोणतेही अन्य बांधकाम किंवा इमारतीचा कोणताही भाग उघडावयास, फोडावयास किंवा काढावयास लावता येईल. पाहणी व तपासणी करण्यासाठी जमीन इत्यादी खोदण्याचा अधिकार.

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम २ (ब) अन्वये पोट-कलमे (४) व (५) ही दाखल करण्यात आली.

निरीक्षणाचा व तपासणीचा खर्च.

**१८३.** (१) पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशी कोणतीही पाहणी व तपासणी केल्यानंतर अशी तपासणी केलेली नाली, वायुवीजनाचा दांडा किंवा नळ, मलकुंडी, घराची गल्ली, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा योग्य व चांगल्या स्थितीत आहे व ती बांधण्याच्या किंवा सुस्थितीत राखण्याच्या बाबतीत, हा अधिनियम, नियम किंवा उपविधी किंवा त्यावेळी अंमलात असलेली अन्य कोणतीही अधिनियमिती यांच्या कोणत्याही तरतुदीचं उल्लंघन करण्यात आलेले नाही आणि त्यावर कोणतेही अतिक्रमण करण्यात आलेले नाही असे आढळून आल्यास, अशा पाहणीच्या व तपासणीच्या प्रयोजनासाठी उघडलेली, फोडलेली किंवा काढलेली कोणतीही जमीन किंवा कोणत्याही इमारतीचा, नालीचा किंवा अन्य बांधकामाचा कोणताही भाग आयुक्ताने भरुन दिला पाहिजे, पूर्ववत केला पाहिजे, तो दुरुस्त करून दिला पाहिजे.

(२) अशा रीतीने तपासणी केलेली कोणतीही नाली, वायुवीजनाचा दांडा किंवा नळ, मलकुंडी, घराची गल्ली, जलधौत संडास, संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा सुस्थितीत किंवा चांगल्या स्थितीत नाही असे आढळून आल्यास किंवा ती दुरुस्त केली असेल, तीत बदल केला असेल, फेरफार केला असेल किंवा तीवर अतिक्रमण केले असेल तर किंवा ती आयुक्ताच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार बांधण्यात आली असेल, त्या व्यतिरिक्त, हा अधिनियम किंवा नियम किंवा उपविधी किंवा त्यावेळी अंमलात असलेली अन्य कोणतीही अधिनियमती यांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून बांधण्यात आली असेल तर, अशा पाहणीचा व तपासणीचा खर्च त्या जागेच्या मालकाने दिला पाहिजे आणि अशा पाहणीसाठी व तपासणीसाठी उघडलेली, फोडलेली किंवा काढलेली कोणतीही जमीन किंवा कोणत्याही इमारतीचा, नालीचा किंवा अन्य बांधकामाचा कोणताही भाग उक्त मालकाने स्वत:च्या खर्चाने भरून काढला पाहिजे, पूर्ववत केला पाहिजे व तो दुरुस्त करून दिला पाहिजे.

आयुक्त, दुरुस्ती इत्यादी करण्यास भाग पाडू शकेल.

**१८४.** (१) जेव्हा पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशा पाहणीचा व तपासणीचा निष्कर्ष कलम १८३, पोट-कलम (२) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असेल तेव्हा, आयुक्तास —

(अ) ज्या जागेत अशी नाली, वायुवीजनाचा दांडा किंवा नळ, मलकुंडी, घराची गल्ली, जलधौत संडास, संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा असेल किंवा ज्याच्या फायद्यासाठी ती बांधली असेल, उभारली असेल किंवा सुरू केली असेल, त्या जागेच्या मालकास किंवा त्या त्या जागेच्या मालकांना लेखी नोटीस देऊन —

(एक) ती किंवा तिच्यावरील कोणतेही अतिक्रमण बंद करण्यास किंवा काढून टाकण्यास किंवा कलम १८६, पोट-कलम (१), खंड (क) च्या परंतुकाच्या अधीन राहून, तिच्यावरील कोणताही पुढे आलेला भाग काढून टाकण्यास, किंवा

(दोन) ती नव्याने बांधण्यास, दुरुस्त करण्यास, आच्छादण्यास, पुन्हा आच्छादण्यास, जाळी बसवण्यास, त्यात हवा खेळती राहण्यास, पाण्याने साफ धुण्यास, त्यात फरसबंदी करण्यास व डांबर लावण्यास त्यास जी अन्य बांधकामे करण्यास सांगणे योग्य वाटेल अशी बांधकामे करून, नाली इत्यादी चालू स्थितीत ठेवण्यास, अन्य व्यवस्था करण्यास आणि अशा पहाणीसाठी व तपासणीसाठी उघडलेली, फोडलेली किंवा काढलेली कोणतीही जमीन, इमारत किंवा वस्तू भरून काढण्यास व पूर्ववत करण्यास व दुरुस्त करण्यास भाग पाडता येईल ; आणि

(ब) अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा नियम किंवा उपविधी यांचे उल्लंघन करून ज्या नालीतून घाण किंवा मलजल कोणत्याही जागेमधून, जागेतून, जागेत किंवा जागेवर नेले जाते अशी कोणतीही नाली नोटीस न देता बंद करता येईल, भरून काढता येईल किंवा पाडून टाकता येईल ; आणि असे करताना आयुक्तास आलेला खर्च अशा मालकाने किंवा मालकांनी दिला पाहिजे.

(२) जी नाली एखाद्या मालमत्तेच्या उपयोगासाठी व फायद्यासाठी किंवा दोन किंवा अधिक मालमत्तांच्या उपयोगासाठी व फायद्यासाठी बांधण्यात किंवा उभारण्यात आली असेल अशा कोणत्याही नालीसंबंधी पोट-कलम (१), खंड (क) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशात, अशा नालीचा जो भाग अशा मालमत्तेच्या किंवा मालमत्तांच्या पलीकडे केवळ त्यांच्या उपयोगासाठी व फायद्यासाठी विस्तारित करण्यात आला असेल अशा कोणत्याही विस्ताराचा समावेश करता येईल.

विवक्षित बाबतीत बांधकामे तपासण्याचा व पार पाडण्याचा खर्च.

**१८५.** जी नाली केवळ दोन किंवा अधिक जागांच्या उपयोगासाठी व फायद्यासाठी बांधण्यात, उभारण्यात किंवा बसवण्यात आली असेल किंवा चालू ठेवण्यात आली असेल, आणि

(अ) जी कलम १६७, पोट-कलम (१) अन्वये बांधण्यात आलेली नाली नसेल ; किंवा

(ब) जिच्या बाबतीत पक्षकारांच्या आपापल्या जबाबदाऱ्यासंबंधीच्या शर्ती कलम १७३, पोट-कलम (२) अन्वये जाहीर करण्यात आल्या असतील अशी नाली नसेल ;

अशा कोणत्याही नालीच्या बाबतीत कलम १८१ अन्वये आयुक्ताने केलेल्या कोणत्याही पाहणीचा व तपासणीचा आणि कलम १८४ अन्वये आवश्यक असलेले कोणतेही काम पार पाडण्यासाठी झालेला खर्च –मग असे काम कलम १८८ अन्वये पार पाडण्यात आलेले असो वा नसो –अशा जागांच्या मालकांनी आयुक्त ठरवील अशा प्रमाणात दिला पाहिजे.

इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवणे व तसा राखणे ही मालक किंवा भोगवटादार यांची जबाबदारी असणे.

[1] [ **१८५ अ.** (१) इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवण्यात व तसा राखण्यात आला आहे आणि तो नादुरुस्त स्थितीत नाही, अथवा ज्यामुळे इमारतीचे वा तिच्या भागाचे दर्शनी स्वरूप खराब होते अशा प्रकारचे तडे, डाग, गचाळपणाने बंदिस्त केलेल्या जागा, लटकत्या तारा व केबल किंवा अपायकारक वस्तू ठेवणे यांमुळे तो खराब झालेला नाही, याची खातरजमा करणे ही प्रत्येक इमारत मालकाची किंवा भोगवटादाराची जबाबदारी असेल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रांना तसेच ज्या इमारतींच्याबाबत सक्षम प्राधिकरणाने पुनर्विकास आराखडा मंजूर केला आहे किंवा तो सक्षम प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे, अशा इमारतींना लागू असणार नाही.

(२) आयुक्ताने अशा इमारतींची किंवा तिच्या भागाची तपासणी केल्यावर अशा कोणत्याही इमारतीचा किंवा तिच्या भागाचा दर्शनी हिस्सा सुस्थितीत ठेवण्यात व तसा राखण्यात आलेला नाही आणि पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणांमुळे तो खराब झालेला आहे असे आयुक्ताचे मत बनले तर, लेखी नोटिशीद्वारे त्या इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला, त्या इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवण्यासाठी व तसा राखण्यासाठी त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असे आवश्यक काम पार पाडण्यास फर्मावता येईल; आणि तो मालक किंवा यथास्थिति, भोगवटादार त्या नोटिशीचे पालन करील.

---

१ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ द्वारे कलम १८५ अ व १८५ ब दाखल केले.

(३) इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, पोट-कलम (२) अन्वये आयुक्ताने दिलेल्या नोटिशीमध्ये नमूद केलेले काम, नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, किंवा पार पाडावयाच्या कामाचे स्वरूप व व्याप्ती विचारात घेऊन आयुक्त विनिर्दिष्ट करील अशा वाढीव कालावधीच्या आत, पार पाडील.

(४) मालकाने किंवा, यथास्थिति, भोगवटादाराने पोट-कलम (२) खालील नोटिशीचे पालन करण्यात कसूर केली तर, आयुक्त नोटिशीमध्ये नमूद केलेले काम पार पाडण्याची व्यवस्था करील आणि मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, आयुक्ताने त्याबाबतीत केलेला खर्च, मागणी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत देण्यास जबाबदार असेल आणि अशा मालकाने किंवा भोगवटादाराने खर्च देण्यात कसूर केली तर अशा खर्चाची संपूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत आयुक्ताने खर्च केलेल्या रकमेवर प्रत्येक महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल.

(५) या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, अशा खर्चाची रक्कम, कोणतेही व्याज असल्यास त्यासह, मालमत्ता कर म्हणून देय असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(६) पोट-कलम (४) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, कलम ४०६ खालील ज्या न्यायाधीशाकडे अपील दाखल करण्यात येते त्यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशा प्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्यप्रत अपीलासोबत जोडण्यात आली नसेल तर, असा न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(७) जर अपीलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशा प्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतींच्या बाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.

शहरी सौंदर्याचा सुरेख मिलाफ साधण्याबाबत घोषणा करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**१८५ ब.** (१) आयुक्तास, राज्य शासनाची मान्यता मिळविल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि दोनपेक्षा कमी नसतील इतक्या स्थानिक वृत्तपत्रांमधील जाहिरातीद्वारे, अशी घोषणा करता येईल की, एखाद्या विशिष्ट शहरी भागाचे वास्तुशास्त्रीय स्वरूप जपण्याबरोबरच तेथे सौंदर्याचा सुरेख मिलाफ साधण्यासाठी तसेच त्याच्या स्वरूपात सौंदर्यात्मक सुधारणा करून ते अधिक सुशोभित करण्यासाठी, अशा घोषणेच्या प्रसिद्धीच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या किंवा त्यानंतर बांधून पूर्ण करण्याचे प्रस्तावित केलेल्या आणि अशा घोषणेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महानगरपालिका क्षेत्रामधील कोणत्याही वसतिक्षेत्रातील अथवा त्याच्या भागातील कोणत्याही सडकेवर स्थित असलेल्या कोणत्याही इमारतीचे वा इमारतींचे दर्शनी स्वरूप, त्यावर कोणत्याही जोडण्या असल्यास आणि त्यांच्या सीमेच्या भिंती, कोणत्याही असल्यास, त्यासह, अशा घोषणेमध्ये नमूद करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीत ठेवण्यात व राखण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील घोषणेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, आयुक्त, अशी घोषणा करण्याचा त्याचा उद्देश स्पष्ट करणारी आणि उक्त प्रस्तावावर कोणताही आक्षेप घेणाऱ्या अथवा त्यावर कोणतीही सूचना करण्यास इच्छुक असलेल्या सर्व व्यक्तींनी त्याबाबतची कारणे देऊन, अशी सूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, आयुक्ताकडे लेखी सादर करण्यासाठी त्यांच्याकडून आक्षेप व सूचना मागवणारी नोटीस, **राजपत्रात** जाहिरातीद्वारे आणि दोनपेक्षा कमी नसतील इतक्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीद्वारे देण्याची व्यवस्था करील एक महिन्याचा उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर, आयुक्त, एक महिन्याच्या आत, त्या आक्षेपांवर व सूचनांवर विचार करील.

(३) मालक, पोट-कलम (१) अन्वये, करण्यात आलेल्या घोषणेनुसार आवश्यकतांचे, त्या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत, पालन करण्यास कसूर करीत असेल तर, एक महिन्याच्या आत आयुक्तास, घोषणेनुसार पूर्ण करावयाचे काम पार पाडण्यासाठी उपाययोजना करता येतील अथवा तशी व्यवस्था करता येईल ; आणि याबाबतीत महानगरपालिकेने केलेला खर्च, जणू काही उक्त मालकाकडून येणे असलेली त्या इमारतीच्या मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल आणि अशा खर्चाची उक्त मालकाकडे मागणी केल्यावर तो अशा मालकावर देय असेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये, ज्या खर्चाच्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेबाबत कोणताही विवाद असेल तर, मालकाला, या अधिनियमाच्या कलम ४०६ खालील ज्या न्यायाधीशाकडे अपील दाखल करण्यात येते त्यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल ती रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्यात आली असेल आणि अशा प्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याचे दर्शविणाऱ्या पावतीची सत्यप्रत अपीलासोबत जोडण्यात आली नसेल तर,

असा न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(५) जर अपीलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने अशा प्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतींच्या बाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील. ]

## सर्वसाधारण तरतुदी

**१८६.** (१) कोणत्याही व्यक्तीने –

(अ) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी, नियम किंवा उपविधी किंवा या अधिनियमान्वये काढलेली कोणतीही नोटीस किंवा दिलेला कोणताही निदेश यांचे उल्लंघन करून किंवा आयुक्तांची लेखी परवानगी घेतल्यावाचून कोणतीही नाली, वायुवीजनाचा दांडा किंवा नळ मलकुंडी जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा किंवा तिच्याशी जोडलेली कोणतीही जाळी, आच्छादन किंवा अन्य जोडणीकाम किंवा साधन जसे किंवा ज्या जागी बसवले असेल त्यात कोणत्याही रीतीने फेरफार करता कामा नये किंवा ते बांधता कामा नये, नव्याने करता कामा नये, उभारता कामा नये, पुन्हा बांधता कामा नये किंवा काढून टाकता कामा नये किंवा त्यात अडथळा निर्माण करता कामा नये, ते बंद करता कामा नये, नष्ट करता कामा नये किंवा त्यात बदल करता कामा नये ;

या अधि-**नियमाच्या** तरतुदी, नियम किंवा उपविधी यांचे उल्लंघन करण्याच्या किंवा मंजुरी न घेता केलेल्या कृत्यांना मनाई.

(ब) जी कोणतीही नाली किंवा नळ, मलकुंडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा किंवा जे कोणतेही जोडणीकाम किंवा साधन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा नियम किंवा उपविधी याअन्वये काढून टाकण्यात आले असेल, पाडून टाकण्यात आले असेल किंवा बंद करण्यात आले असेल किंवा तसे करण्याविषयी आदेश देण्यात आला असेल ते, आयुक्तांच्या लेखी परवानगीवाचून नव्याने करता कामा नये, पुन्हा बांधता कामा नये किंवा चालू करता कामा नये ;

(क) आयुक्तांच्या लेखी परवानगीवाचून, कोणतीही नाली, मलकुंडी, घराची गल्ली, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा यावर कोणताही भाग पुढे येईल असा बांधता कामा नये किंवा त्यावर अतिक्रमण करता कामा नये किंवा कोणत्याही प्रकारे ती खराब करता कामा नये, खराब करावयास लावता कामा नये किंवा खराब करण्यास परवानगी देता कामा नये ;

परंतु लागून असलेल्या घराच्या भिंतीसमोर किंवा खिडकीसमोर नसलेल्या कोणत्याही खिडकीवरील दोन फुटांपेक्षा अधिक रुंदी नसलेल्या निवारक झडपीला या खंडातील काहीही लागू होणार नाही ;

(ड) कोणत्याही नालीत विटा, दगड, माती, राख, शेण, लीद किंवा ज्यामुळे अशी नाली खराब होईल किंवा तिच्यामधील घाण चांगल्या रीतीने वाहून जाण्यास अडथळा होईल किंवा तिच्यामधील घाणीची व्यवस्था व विल्हेवाट लावण्यावर प्रतिकूल परिणाम होईल असा कोणताही पदार्थ किंवा वस्तू तीत टाकता कामा नये, जाऊ देता कामा नये, ठेवता कामा नये किंवा टाकावयास लावता कामा नये, जाऊ देण्यास लावता कामा नये किंवा ठेवावयास लावता कामा नये किंवा टाकण्यास परवानगी देता कामा नये, जाऊ देण्यास परवानगी देता कामा नये किंवा ठेवण्यास परवानगी देता कामा नये ;

(ई) विशिष्ट प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या कोणत्याही नालीतून ज्याच्या वाहनासाठी तरतूद करण्यात आलेली नाही अशी कोणतीही वस्तू किंवा द्रवपदार्थ अशा नालीत जाऊ देता कामा नये, जाऊ देण्यास परवानगी देता कामा नये किंवा जाऊ देण्यास लावता कामा नये ;

(फ) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, जो कोणताही रासायनिक केरकचरा, वाया जाणारी वाफ किंवा एकशेवीस फॅरनहाईट डिग्रीपेक्षा अधिक तपमान असलेला कोणताही द्रवपदार्थ, त्यावर अशी क्रिया केली असता नालीतील घाणीबरोबर किंवा तीत मिसळला असता घातक, उपद्रवकारक किंवा आरोग्यास अहितकारक होत असेल तर तो कोणत्याही नालीत सोडता कामा नये किंवा सोडू देता कामा नये ;

(ग) कॅल्शियम कार्बाईड किंवा चाचणी घेताना त्र्याहत्तर डिग्री फॅरनहाईटपेक्षा कमी तापमानात ज्यापासून ज्वालाग्राही वाफ तयार होते असे कोणतेही अशुद्ध पेट्रोलियम, पेट्रोलियम, दगडी कोळसा, शेल किंवा डांबरी पदार्थ यापासून तयार केलेले कोणतेही तेल किंवा पेट्रोलियमपासून बनवलेला असा पदार्थ किंवा पेट्रोलियम असलेले असे कोणतेही मिश्रण कोणत्याही नालीत सोडावयास लावता कामा नये किंवा सोडू देता कामा नये ;

(२) पोट-कलम (१) च्या कोणत्याही खंडाचे उल्लंघन करून कोणतेही काम पार पाडणारी किंवा कोणतेही कृत्य करणारी व्यक्ती नोटीस बजावण्यात आली त्यावेळी अशा इमारतीचा किंवा कामाचा मालक नसेल तर, अशा इमारतीचा किंवा कामाचा मालक हा, ज्या प्रकारे अशी व्यक्ती अशा सर्व आवश्यक गोष्टी करण्यास जबाबदार असेल त्याचप्रकारे त्या करण्यास जबाबदार आहे असे मानले जाईल.

जलधौत, संडास इत्यादी खराब न करणे किंवा ते अयोग्य रीतीने दूषित न करणे.

**१८७.** (१) कोणत्याही व्यक्तीने एका किंवा अधिक इमारतीतील रहिवाशांच्या सामाईक वापरासाठी तरतूद केलेला कोणताही जलधौत संडास, संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा किंवा त्यास जोडलेली कोणतीही जोडणीकामे किंवा साधने खराब करता कामा नयेत किंवा ती दूषित करता कामा नयेत.

(२) असा कोणताही जलधौत संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा किंवा तिला जोडलेले कोणतेही जोडणीकाम किंवा साधन किंवा त्याकडे जाण्या-येण्याचे मार्ग किंवा त्यांच्या भिंती तळ किंवा बसवण्याच्या जागा किंवा त्यांच्या संबंधात वापरण्यात आलेली कोणतीही वस्तू यांची योग्यरीतीने सफाई न केल्यामुळे अशा एका किंवा अनेक इमारतीतील कोणत्याही रहिवाशास किंवा त्या भागातील कोणत्याही रहिवाशांस किंवा जाणाऱ्या-येणाऱ्या व्यक्तीला उपद्रव किंवा त्रास होत असेल तर अशा जागेचा वापर करणाऱ्या व्यक्तीपैकी ज्या व्यक्तीने कसूर केली असेल तिने किंवा तिचा सामाईक वापर करणाऱ्या व्यक्तीपैकी कोणत्या व्यक्तीने कसूर केली आहे यासंबंधी पुरावा नसेल तर, त्यापैकी प्रत्येक व्यक्तीने या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे मानले जाईल.

(३) इमारतीचा किंवा इमारतींचा मालक हा, ज्या कोणत्याही शास्तीस अन्यथा पात्र झाला असता त्यास या कलमाच्या तरतुदींमुळे त्या शास्तीपासून सूट मिळणार नाही.

या अधिनियमान्वये करावयाची विवक्षित बांधकामे करण्याचा विकल्प संबंधित व्यक्तींना न देता ती आयुक्तांस करता येतील.

**१८८.** (१) आयुक्तांस, त्यास योग्य वाटल्यास, या प्रकरणात किंवा अनुसूचीच्या प्रकरण ९ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम ते अन्यथा ज्या कोणत्याही व्यक्तीस करावे लागले असते ते तिला प्रथमत: करण्याचा विकल्प न देता, आपल्या स्वत:च्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या किंवा अन्य अभिकरणामार्फत करवून घेता येईल.

(२) अशारीतीने केलेल्या कोणत्याही कामाचा खर्च, असे काम नगरपालिका निधीतून खर्च करून करण्यात यावे अशी महानगरपालिकेने सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देऊन किंवा ठराव संमत करून मंजुरी दिली नसल्यास पूर्वोक्त व्यक्तीने दिला पाहिजे आणि अशी मंजुरी देण्यास महानगरपालिकेस याद्वारे अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

## प्रकरण १३

## पाणीपुरवठा

### नगरपालिका जलव्यवस्था केंद्रे बांधणे व ती सुस्थितीत राखणे

पाणीपुरवठा

**१८९. (१)** शहराच्या कोणत्याही भागास नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून पाण्याच्या खाजगी नळांच्या सहाय्याने किंवा सार्वजनिक नळ उभे करून किंवा कोणत्याही अन्य मार्गाने पाणीपुरवठा करण्याची महानगरपालिकेने व्यवस्था केली आहे अशी जाहीर नोटीस आयुक्ताने कलम १३०, पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये दिली असेल, तेव्हा, त्याने शहराच्या अशा भागातील रहिवाशांच्या वाजवी गरजा भागविण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करण्याकरिता व्यवहार्य असतील अशा सर्व उपाययोजना करणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये लादलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आणि शहरास खाजगी व सार्वजनिक प्रयोजनासाठी योग्य व पुरेशा पाणीपुरवठ्याची तरतूद करण्यासाठी आयुक्तास महानगरपालिकेची मान्यता घेऊन पुढील गोष्टी करता येतील :--

(अ) शहरात किंवा शहराबाहेर जल व्यवस्था केंद्रे बांधणे, ती चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवणे, त्यात फेरबदल करणे, सुधारणा करणे किंवा वाढ करणे आणि त्यासाठी आवश्यक अशा अन्य कोणत्याही कृती करणे;

(ब) शहरातील किंवा शहराबाहेरील कोणतेही जल व्यवस्था केंद्र किंवा कोणतेही पाणी किंवा पाणी साठवण्याचा किंवा ते घेऊन नेण्याचा हक्क खरेदी करणे किंवा पट्ट्याने घेणे;

(क) पाणी पुरवठा करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर व्यवस्था करणे.

(३) सर्व नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची व्यवस्था आयुक्ताने ठेवली पाहिजे.

[१][राज्य] शासनाने नेमलेल्या व्यक्तींनी नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची पाहणी करणे.

**१९०.** [१][राज्य] शासनाने याबाबत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस सर्व वाजवी वेळी कोणत्याही नगरपलिका जलव्यवस्था केंद्रात प्रवेश करण्याची व त्याची पाहणी करण्याची मोकळीक असेल.

नगरपालिका जलव्यवस्था केंद्रात प्रवेश करण्याचा अधिकार.

**१९१.** आयुक्तास व [१][राज्य] शासनाने याबाबत कलम १९० अन्वये नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातील, त्यावरील किंवा त्यासंबंधीच्या कोणत्याही कामाची पाहणी करण्यासाठी किंवा दुरुस्ती करण्यासाठी किंवा ते पार पाडण्यासाठी, सर्व वाजवी वेळी ;

(अ) अशा जलव्यवस्था केंद्रास लागून असलेल्या किंवा त्याच्या जवळपास असलेल्या शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल व तिच्यातून जाता येईल, मग अशी जमीन कोणाकडेही निहित असो;

(ब) अशा कोणत्याही जमिनीतून आवश्यक ती सर्व माणसे, सामान, हत्यारे व साधने नेण्याची व्यवस्था करता येईल.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**१९२.** (१) शहरातील किंवा शहराबाहेरील पाण्याचे मुख्य नळ, नळ व वाहिन्या नेण्यासाठी, नव्याने बांधण्यासाठी व दुरुस्त करण्यासाठी, आयुक्तास शहरात नाल्या नेण्यासाठी, नव्याने बांधण्यासाठी व दुरुस्त करण्यासाठी यात यापूर्वी असलेल्या तरतुदीन्वये जे अधिकार आहेत व ज्या निर्बंधाच्या अधीन तो आहे तेच अधिकार असतील व त्याच निर्बंधाच्या अधीन तो असेल.

पाण्याचे मुख्य नळ इत्यादी नेण्याचा अधिकार.

(२) हे कलम नगरपालिकेचे पाण्याचे मुख्य नळ, नळ व वाहिन्या नेण्याच्या, नव्याने बांधण्याच्या व दुरुस्त करण्याच्या बाबतीत ज्याप्रमाणे लागू आहे त्याचप्रमाणे ते पाण्याचे खाजगी मुख्य नळ, नळ व वाहिन्या यांच्या बाबतीत लागू होईल.

**१९३.** आग लागल्यास पाणीपुरवठा करण्यासाठी अग्निशामक नळखांब, आवश्यक ती सर्व बांधकामे, यंत्रसामग्री व सहाय्य यांची आयुक्ताने तरतूद केली पाहिजे व ती सुस्थितीत ठेवली पाहिजेत आणि असे अग्निशामक नळखांब कोठे आहेत हे दर्शविण्यासाठी रस्त्यावरील इमारतींवर, भिंतींवर किंवा अन्य कोणत्याही ठळक रीतीने शब्द किंवा खुणा रंगवून किंवा करवून घेतल्या पाहिजेत आणि शहरात ज्या ठिकाणी नगरपालिकेचा आगीचा बंब ठेवला असेल अशा प्रत्येक ठिकाणी अग्निशामक नळखांबाची किल्ली ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे व पूर्वोक्त प्रयोजनासाठी त्यास इष्ट वाटतील अशा अन्य गोष्टी केल्या पाहिजेत.

अग्निशामक नळखांबांची तरतूद करणे.

**१९४.** (१) महानगरपालिकेच्या परवानगीवाचून कोणत्याही व्यक्तीने ;

नगरपालिका जलव्यवस्था केंद्रास हानिकारक अशी विवक्षित कृत्ये करण्यास मनाई.

(अ) ज्यामधून नगरपालिका जलव्यवस्था केंद्रास पाणीपुरवठा केला जातो असा तलाव, टाकी, विहीर किंवा जलाशय यांच्या भोवतालच्या, आयुक्त सीमांकित करील अशा क्षेत्राच्या कोणत्याही भागावर कोणत्याही प्रयोजनासाठी कोणतीही इमारत बांधता कामा नये;

(ब) पूर्वोक्त क्षेत्राची सीमांकन बांधकामे काढून टाकता कामा नये, त्यात फेरफार करता कामा नये, ती खराब करता कामा नये, त्यांचे नुकसान करता कामा नये किंवा त्यात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करता कामा नये ;

(क) पूर्वोक्त क्षेत्रात आधीच अस्तित्वात असलेल्या कोणत्याही इमारतीचा विस्तार करता कामा नये, तीत फेरफार करता कामा नये किंवा यापूर्वी ज्या प्रयोजनासाठी तिचा उपयोग करण्यात येत होता त्यापेक्षा निराळ्या प्रयोजनासाठी तिचा उपयोग करता कामा नये ;

(ड) ज्यायोगे असा कोणताही तलाव, टाकी, विहीर किंवा जलाशय किंवा त्याचा कोणताही भाग यास क्षती पोचेल किंवा अशा कोणत्याही तलावातील, टाकीतील, विहिरीतील किंवा जलाशयातील पाणी दूषित होईल किंवा कमी आरोग्यप्रद होईल अशा कोणत्याही रीतीने पूर्वोक्त क्षेत्रात कोणतीही निर्मितीची, व्यापाराची किंवा शेतीची क्रिया करता कामा नये किंवा असे कोणत्याही प्रकारचे कृत्य करता कामा नये.

(२) यात यापुढे जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही व्यक्तीने—

(अ) ज्यामुळे कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातील पाणी कोणत्याही प्रकारे खराब किंवा दूषित होईल किंवा त्यांच्या गुणवत्तेत बदल होईल अशी कोणतीही गोष्ट त्यामध्ये किंवा त्यावर झिरपावयास लावता कामा नये किंवा झिरपू देता कामा नये अथवा पाझरविता किंवा पाझरवू देता कामा नये अथवा आणता किंवा आणू देता कामा नये किंवा असे कोणतेही कृत्य करविता कामा नये किंवा करू देता कामा नये.

(ब) अशा कोणत्याही जलव्यवस्था केंद्रास लागून असलेल्या किंवा त्याचा भाग असलेल्या नगरपालिकेच्या कोणत्याही जमिनीत खणून किंवा तिच्यावर कोणताही पदार्थ टाकून तिच्या पृष्ठभागात फेरफार करता कामा नये.

(क) अशा जलव्यवस्था केंद्रातील पाण्यात कोणतेही जनावर आणविता कामा नये किंवा आणू देता कामा नये ;

(ड) अशा जलव्यवस्था केंद्रातील पाण्यात किंवा पाण्यावर कोणतीही वस्तू फेकता किंवा ठेवता कामा नये ;

(ई) अशा जलव्यवस्था केंद्रात किंवा त्याच्याजवळ स्नान करता कामा नये; किंवा

(फ) अशा जलव्यवस्था केंद्रात किंवा त्याच्याजवळ कोणतेही जनावर किंवा कोणतीही वस्तू धुता कामा नये किंवा धुवावयास लावता कामा नये.

*सामाईक सुविधेमध्ये सहभागी होणे महानगरपालिकेस बंधनकारक असणे.*

१[**१९४-अ.** राज्य शासनाने किंवा, राज्य शासनाच्या अनुदेशान्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही अभिकरणाने, घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा मलजलावर किंवा सांडपाण्यावर संस्करण किंवा पुनश्चक्रण करण्यासाठी किंवा मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा करण्यासाठी किंवा पिण्याच्या प्रयोजनार्थ पाण्याचे संस्करण करण्यासाठी एखादी सामाईक सुविधा निर्माण केली असेल तर, राज्य शासनाने तसे निदेश दिल्यास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा अटी व शर्तींनुसार त्या सुविधेमध्ये सहभागी होणे हे महानगरपालिकेसाठी अनिवार्य असेल :

परंतु, राज्य शासन, या कलमान्वये कोणताही निदेश देण्यापूर्वी, पंधरा दिवसांच्या आत याबाबत निवेदन, कोणतेही असल्यास, सादर करण्याची महानगरपालिकेला संधी देईल. महानगरपालिकेने पंधरा दिवसांच्या आत निवेदन सादर न केल्यास, किंवा सादर केलेले निवेदन विचारात घेतल्यावर असे निदेश देणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास तसे निदेश देता येतील.]

*परवानगीवाचून नगरपालिकेच्या पाण्याच्या मुख्य नळावर इमारती इत्यादी न बांधणे.*

**१९५.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, नगरपालिकेच्या कोणत्याही पाण्याच्या मुख्य नळावर कोणतीही इमारत, भिंत किंवा कोणत्याही प्रकारचे बांधकाम नव्याने बांधता कामा नये किंवा पुन्हा बांधता कामा नये किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही पाण्याच्या मुख्य नळावर कोणताही रस्ता किंवा लहान लोहमार्ग बांधता कामा नये.

(२) अशा रीतीने कोणतीही इमारत, भिंत किंवा बांधकाम बांधले किंवा पुन्हा बांधले किंवा अशा रीतीने कोणताही रस्ता किंवा लहान लोहमार्ग बांधला तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, ते काढून टाकता येईल किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने त्यांची व्यवस्था करता येईल, आणि असे केल्यामुळे झालेला खर्च, असा अपराध करणाऱ्या व्यक्तीने दिला पाहिजे.

### मोफत सार्वजनिक पाणीपुरवठा

*पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक झरे इत्यादी महानगरपालिकेमध्ये निहित असणे.*

**१९६.** (१) शहरातील रहिवाशांना मोफत वापरण्यासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता अस्तित्वात असलेले पिण्याच्या पाण्याचे सर्व सार्वजनिक झरे, तलाव, जलाशय, हौद, पंप, विहिरी, वाहिन्या आणि अन्य कामे ही महानगरपालिकेमध्ये निहित असतील व ती आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असतील.

(२) आयुक्तांस उक्त कामे सुस्थितीत ठेवता येतील व त्यात पाण्याची तरतूद करता येईल आणि महानगरपालिकेने याबाबत प्राधिकृत केले असेल तेव्हा, त्यास शहरातील रहिवाशांना मोफत वापरण्यासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता अशी कोणतीही अन्य कामे बांधता येतील;

परंतु, शहरातील कोणत्याही रहिवाशांकडून अशा कोणत्याही साधनातून नेण्यात येणारे पाणी केवळ खाजगी किंवा घरगुती प्रयोजनासाठीच नेण्यात येईल, ते धंद्याच्या किंवा विक्रीच्या प्रयोजनासाठी नेता कामा नये आणि आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, ते पिंपातून, गाडीतून, पखालीतून किंवा मसाकीतून नेता कामा नये.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४ द्वारे कलम १९४-अ दाखल केले.

(३) आयुक्तास, पाणीपुरवठ्याचे असे कोणतेही साधन तात्पुरते आणि महानगरपालिकेच्या मान्यतेने कायमचे, पूर्णत: किंवा अंशत: बंद करता येईल.

(४) आयुक्ताने असे कोणतेही साधन पूर्णत: किंवा अंशत: कायमचे बंद केले तर, त्याची किंवा अशा रीतीने बंद करण्यात आलेल्या त्याच्या भागाची जागा व त्याची सामग्री यांची विल्हेवाट महानगरपालिकेची मालमत्ता असल्याप्रमाणे लावता येईल;

परंतु, पूर्णत: किंवा अंशत: कायमचे बंद करण्यात आलेले असे कोणतेही पाणीपुरवठ्याचे साधन एखाद्या खाजगी व्यक्तीने लोकांना दिलेली देणगी असेल तर, अशी जागा व सामग्री किंवा त्याची विक्री करून आलेली रक्कम यांचा विनियोग, ती किंमतीच्या मानाने क्षुल्लक नसेल किंवा महानगरपालिकेस पुरेशा कारणावरून अन्यथा निदेश देणे योग्य वाटत नसेल तर, अशा व्यक्तीच्या नावाने सार्वजनिक उपयोगाच्या एखाद्या स्थानिक कामासाठी किंवा कामाकडे केला पाहिजे किंवा तिचा विनियोग, महानगरपालिका व उक्त व्यक्तीचे जे वारस किंवा अन्य प्रतिनिधी असतील त्यांनी मान्य केलेल्या अशा कोणत्याही स्थानिक कामासाठी किंवा कामाकडे केला पाहिजे.

पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक झरे इत्यादी विशिष्ट प्रयोजनासाठी अलग राखून ठेवता येतील.

**१९७.** (१) आयुक्तास पाणीपुरवठ्याच्या अशा साधनांपैकी प्रत्येक साधन व त्यातील पाणी लोकांच्या वापरासाठी त्यास योग्य वाटेल अशा प्रयोजनासाठीच नेमून देता येईल व अलग राखून ठेवता येईल, आणि असे प्रत्येक साधन ज्या प्रयोजनासाठी अशा रीतीने नेमून देण्यात आले असेल व अलग राखून ठेवण्यात आले असेल ते प्रयोजन अशा साधनांवरील किंवा त्याच्याजवळील एखाद्या ठळक भागावर नोटीस लावून दर्शविण्याची व्यवस्था आयुक्ताने केली पाहिजे.

(२) कोणत्याही व्यक्तीने, असे कोणतेही साधन, ते ज्या प्रयोजनासाठी अशा रीतीने नेमून देण्यात आले असेल किंवा अलग राखून ठेवण्यात आले असेल त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी त्याचा किंवा त्यातील कोणत्याही पाण्याचा उपयोग करता कामा नये.

## खाजगी पाणीपुरवठा

पाण्याच्या वापरासंबंधीच्या शर्तींचे उल्लंघन न करणे.

**१९८.** ज्या व्यक्तीला मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून किंवा ठरावीक नियकालिक रक्कम दिल्यानंतर पाणी पुरवण्यात येत असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशा पाण्याचा वापर करण्यासंबंधी कलम १३४, पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करता कामा नये किंवा अशा कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करण्यास परवानगी देता कामा नये.

जेथे पाणी दूषित होईल अशा जागी पाण्याचे नळ इत्यादी न बसविणे.

**१९९.** पाण्याचे कोणतेही नळ एखाद्या नालीत किंवा खुल्या पाटाच्या पृष्ठभागावर किंवा घरांच्या गल्लीत किंवा दूषित मलकुंडीपासून वीस फुटांच्या आत, किंवा जेथे असा नळ खराब होण्याचा संभव आहे किंवा त्यातील पाणी दूषित होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही ठिकाणी बसवता कामा नये आणि शौचकुप, जलघौत संडास किंवा मलकुंडी यापासून वीस फुटांच्या आत कोणतीही विहीर किंवा टाकी व आयुक्तांची संमती घेतल्यावाचून कोणताही हौद बांधता कामा नये.

लबाडीने व अनधिकृतपणे पाण्याचा वापर करण्यास मनाई.

**२००.** (१) कोणत्याही व्यक्तीने महानगरपालिकेकडून तिला पुरविण्यात आलेल्या पाण्याची लबाडीने विल्हेवाट लावता कामा नये.

(२) महानगरपालिकेने जिला खाजगीरीत्या पाणी पुरवले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, पुरवलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार घेण्यात येत असेल त्याव्यतिरिक्त, ज्या जागेच्या संबंधात पाणीपट्टी भरण्यात येत असेल अशा जागेत राहत नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या जागेस पाणी पुरवण्यात आले असेल त्या जागेमधून पाणी नेण्याची परवानगी देता कामा नये.

शहराबाहेर पाणी पुरवण्याचा अधिकार.

(३) कोणत्याही व्यक्तीने, ज्या जागेच्या संबंधात पाणीपट्टी भरण्यात येत असेल त्या जागेत ती रहात नसेल तर, तिने महानगरपालिकेने खाजगीरीत्या पाणीपुरवठा केलेल्या कोणत्याही जागेमधून पाणी नेता कामा नये, मात्र ज्या बाबतीत अशा रितीने पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार घेण्यात येत असेल अशा कोणत्याही बाबतीत ज्या व्यक्तीस अशा रीतीने पाणीपुरवठा करण्यात आला असेल त्या व्यक्तींच्या परवानगीने तिला पाणी नेता येईल.

## सर्वसाधारण

सार्वजनिक रस्ते महानगर-पालिकेकडे निहित होणे.

**२०१.** पैसे भरण्याबाबत व पाणीपुरवठा करण्याची मुदत व शर्ती याबाबत महानगरपालिका सामान्यत: किंवा (विशेषत: मान्य करील अशा अटींवर आयुक्तास शहराबाहेरील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस) नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून पाणी पुरविता येईल.

## प्रकरण १४

## रस्ते

## रस्ते बांधणे, सुस्थितीत राखणे व सुधारणे

सार्वजनिक रस्त्यांसंबंधी आयुक्तांचा अधिकार.

**२०२.** जे रस्ते नियम दिवशी [१][शासनामध्ये] निहित असतील किंवा जे रस्ते उक्त दिवसानंतर महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य प्राधिकरणाकडून बांधण्यात व सुस्थितीत राखण्यात येतील त्या रस्त्यांखेरीज शहरातील जे अन्य रस्ते सार्वजनिक रस्ते असतील किंवा कोणत्याही वेळी सार्वजनिक रस्ते होतील असे सर्व रस्ते व त्यांच्या फरशा, दगड व त्यांची अन्य सामग्री महानगरपालिकेमध्ये निहित होतील व आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असतील.

**२०३.** (१) आयुक्ताने, वेळोवेळी, प्रसंगानुसार आवश्यक असेल, त्याप्रमाणे महानगरपालिकेमध्ये निहित असलेले सर्व सार्वजनिक रस्ते समतल करण्याची, त्यावर खडी घालण्याची किंवा फरसबंदी करण्याची, पाट काढण्याची, त्यात फेरफार करण्याची व ते दुरुस्त करण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि त्यास कोणताही रस्ता वेळोवेळी रुंद करता येईल, वाढविता येईल किंवा अन्य प्रकारे सुधारता येईल, किंवा तो उंच करता येईल किंवा खोल करता येईल, (किंवा त्यात फेरफार करता येईल आणि त्यास, पदचाऱ्यांच्या सुरक्षितेसाठी अशा रस्त्यांवर कुंपण घालता येईल) किंवा खांब बसवता येतील व ते दुरुस्त स्थितीत ठेवता येतील ;

परंतु, ज्याचा एकूण खर्च पाच हजार रुपयांपेक्षा किंवा महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक होईल असे, सार्वजनिक रस्ता रुंद करण्याचे, वाढवण्याचे किंवा सुधारण्याचे कोणतेही काम हाती घेण्याचा प्राधिकार महानगरपालिकेने दिल्याखेरीज किंवा महानगरपालिका देईपर्यंत आयुक्ताने ते काम हाती घेता कामा नये.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेला सार्वजनिक रस्ता किंवा त्याचा कोणताही भाग आयुक्तास कायमचा बंद करता येईल ;

परंतु, ज्या बैठकीत मंजुरी देण्याविषयी निर्णय घेण्यात येईल, त्या बैठकीच्या निदान एक महिना अगोदर असा रस्ता किंवा त्याचा भाग बंद करण्याच्या प्रस्तावाची माहिती रहिवाशांना कळविणारी आयुक्तांच्या सहीची नोटीस अशा रस्त्यात किंवा त्याच्या भागात लावण्यात आल्यावाचून आणि अशा बैठकीच्या दिवसापूर्वी कोणत्याही वेळी उक्त प्रस्तावासंबंधी महानगरपालिकेस कोणतेही लेखी आक्षेप मिळेपर्यंत व त्यांचा ती विचार करीपर्यंत महानगरपालिकेने अशी मंजुरी देता कामा नये.

**२०४.** जेव्हा जेव्हा कलम २०३ अन्वये कोणताही सार्वजनिक रस्ता किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा बंद करण्यात येईल तेव्हा तेव्हा [१] [राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन राहून अशा रस्त्याच्या जागेचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा विनियोग महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या जमिनीप्रमाणे करता येईल. बंद केलेल्या रस्त्यांच्या जागांचा विनियोग.

**२०५.** आयुक्तास, याबाबत महानगरपालिकेकडून प्राधिकृत करण्यात येईल तेव्हा, कोणत्याही वेळी पुढील गोष्टी करता येतील :-- नवीन सार्वजनिक रस्ते तयार करण्याचा अधिकार.

(अ) नवीन सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करणे ;

(ब) कोणत्याही व्यक्तींच्या जमिनीतून, पूर्णपणे अशा व्यक्तीच्या खर्चाने किंवा अंशत: अशा व्यक्तींच्या व अंशत: महानगरपालिकेच्या खर्चाने सार्वजनिक उपयोगासाठी रस्ता तयार करण्यासाठी आणि असा रस्ता पूर्ण झाल्यावर तो सार्वजनिक रस्ता होईल व तो महानगरपालिकेमध्ये निहित होईल असा करार अशा व्यक्तींबरोबर करणे ;

(क) पूल व भुयारी मार्ग बांधणे;

(ड) महानगरपलिकेमध्ये निहित असलेला विद्यमान सार्वजनिक रस्ता किंवा त्याचा कोणताही भाग फिरवणे किंवा वळवणे.

**२०६.** (१) महानगरपालिकेने वेळोवेळी [१][राज्य] शासनाच्या मंजुरीने सार्वजनिक रस्त्यांवर जी रहदारी चालू राहण्याचा संभव आहे तिचे स्वरूप, ज्या वस्त्यांमध्ये ते असतील त्या वस्त्या, ज्या उंचीपर्यंत अशा रस्त्यांना लागून असलेल्या इमारती उभारता येतील ती उंची व त्यासारख्या अन्य गोष्टी यानुसार निरनिराळ्या वर्गाच्या सार्वजनिक रस्त्यासाठी किमान रुंदी विर्निदिष्ट केली पाहिजे. नवीन सार्वजनिक रस्त्यांची किमान रुंदी

(२) कलम २०५ अन्वये तयार केलेल्या नवीन सार्वजनिक रस्त्यांची रुंदी ही, असा रस्ता ज्या वर्गातील असेल त्या वर्गासाठी पोट-कलम (१) अन्वये विहित केलेल्या रुंदीपेक्षा कमी असणार नाही आणि कोणत्याही पायऱ्या आणि कलम २२७ अन्वये आयुक्तांची लेखी परवानगी घेतल्यावाचून अन्य कोणतेही पुढे येणारे भाग अशा कोणत्याही रस्त्यावर येता कामा नये.

**२०७.** आयुक्तांस, याबाबत महानगरपलिकेकडून प्राधिकृत करण्यात येईल तेव्हा-- कोणताही भुयारी मार्ग पूल, इत्यादी आपल्याकडे घेण्याचा, बांधण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा अधिकार.

(अ) कोणताही विद्यमान किंवा प्रकल्पित भुयारी मार्ग, पूल, सेतू किंवा कमान व त्याकडे जाण्याचे मार्ग आपल्याकडे घेण्यासाठी व सुस्थितीत राखण्यासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर करार करता येईल आणि त्यास त्याप्रमाणे असा भुयारी मार्ग, पूल, सेतू किंवा कमान व त्याकडे जाण्याचे मार्ग सार्वजनिक रस्त्याचे भाग म्हणून किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेली मालमत्ता म्हणून आपल्याकडे घेता येतील व सुस्थितीत राखता येतील, किंवा

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) असा कोणताही भुयारी मार्ग, पूल, सेतू किंवा कमान बांधण्याकरिता किंवा त्यात फेरफार करण्याकरिता किंवा त्याच्या पायासाठी व आधारासाठी किंवा त्याकडे जाण्याच्या मार्गासाठी आवश्यक असलेली लगतची कोणतीही जमीन पूर्णत: अशा व्यक्तींच्या खर्चाने किंवा अंशत: अशा व्यक्तीच्या व अंशत: महानगरपालिकेच्या खर्चाने खरेदी करण्यासाठी किंवा संपादन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर करार करता येईल.

विवक्षित प्रकारच्या रहदारीसाठी सार्वजनिक रस्त्यांचा उपयोग करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

२०८. (१) आयुक्ताने महानगरपालिकेच्या मंजुरीने पुढील गोष्टी करणे कायदेशीर असेल—

(अ) लोकांस धोका पोहोचू नये किंवा अडथळा होऊ नये किंवा त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही विशिष्ट सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा त्यांच्या भागाच्या दोन्ही टोकास खांब रोवून अशा रस्त्यांवर वाहनांच्या रहदारीस मनाई करणे ;

(ब) सर्व सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा विशिष्ट सार्वजनिक रस्त्यांच्या बाबतीत ज्यायोगे रस्त्यास किंवा त्यावरील कोणत्याही बांधकामास क्षती पोहोचण्याचा संभव आहे किंवा अशा रस्त्यांच्या किंवा रस्त्यांच्या बाजूस किंवा त्यावर असणाऱ्या वाहनांना किंवा पादचाऱ्यांना धोका पोहोचण्याचा किंवा अडथळा होण्याचा संभव आहे असे वाटेल अशा नमुन्याच्या, बांधणीच्या, वजनाच्या किंवा आकाराच्या किवा अशा जड किंवा बोजड वस्तू लादलेल्या कोणत्याही वाहनांच्या रहदारीस, आयुक्तांकडून प्रत्येक बाबतीत वाहनांच्या रहदारीची वेळ, ती ओढून नेण्याची किंवा त्यांचे स्थलांतर करण्याची पद्धत, रस्त्यांच्या संरक्षणासाठी साधनांचा उपयोग, दिव्याची व सहायकांची संख्या व अन्य सर्वसाधारण सावधगिरीचे उपाय व विशेष आकार देणे, यासंबंधी सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, मनाई करणे ;

(२) पोट-कलम (१) मध्ये केलेल्या मनाईसंबंधीच्या नोटिसा, अशी मनाई सामान्यत: सर्व सार्वजनिक रस्त्यांच्या बाबतीत करण्यात आली नसेल तर, त्या ज्या सार्वजनिक रस्त्यांसंबंधी किंवा त्यांच्या भागासंबंधी असतील त्यांच्या दोन्ही टोकास किंवा टोकांजवळ ठळक जागी लावल्या पाहिजेत.

सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन करण्याचा अधिकार.

२०९. (१) आयुक्तास कलमे ७७, ७८ व ७९ च्या तरतुदीच्या अधीन राहून पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) कोणताही सार्वजनिक रस्ता, पूल, किंवा भुयारी मार्ग सुरू करण्यासाठी, रुंद करण्यासाठी, वाढवण्यासाठी, वळवण्यासाठी किंवा अन्य प्रकारे त्याची सुधारणा करण्यासाठी किंवा कोणताही नवीन सार्वजनिक रस्ता, पूल किंवा भुयारी मार्ग तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन व अशा जमिनीवर कोणत्याही इमारती असल्यास त्या इमारती संपादन करणे ;

(ब) अशी जमीन व तिच्यावर असलेल्या कोणत्याही इमारती याखेरीज आणखी अशा रस्त्याच्या नियमित रेषेबाहेरील किंवा नियोजित नियमित रेषेबाहेरील महानगरपालिकेस संपादन करणे इष्ट वाटेल अशी सर्व जमीन व तिच्यावर ज्या कोणत्याही इमारती असतील त्या इमारती संपादन करणे ;

(क) खंड (ब) अन्वये खरेदी केलेली कोणतीही जमीन किंवा इमारत पट्ट्याने देणे, विकणे किंवा अन्यथा तिचा विनियोग करणे.

(२) वाहने उभी करण्याच्या जागेची तरतूद करण्यासाठी, ती वाढविण्यासाठी किंवा तिची सुधारणा करण्यासाठी जमीन संपादन करणे, हे सार्वजनिक रस्त्यांची तरतूद करण्यासाठी, तो वाढविण्यासाठी किंवा त्याची सुधारणा करण्यासाठी जमीन संपादन करणे होय असे मानले जाईल.

(३) पोट-कलम (१), खंड (ग) अन्वये जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही अभिहस्तांतरण पत्रात, विद्यमान इमारत काढून टाकणे, बांधण्यात यावयाच्या नवीन इमारतींचे वर्णन, अशी नवीन इमारत ज्या कालावधीत पूर्ण होईल तो कालावधी व अशा अन्य गोष्टी यासंबंधी आयुक्तास योग्य वाटतील अशा शर्ती समाविष्ट करता येतील.

२१०. (१) आयुक्तास–

रस्त्याच्या रेषा विहित करण्याचा अधिकार.

(अ) कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या एका किंवा दोन्ही बाजूंच्या रेषा विहित करता येतील ;

परंतु, नियत दिवसांच्या निकटपूर्वीच्या दिवशी शहराच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये चालू असलेली सार्वजनिक रस्त्यांची प्रत्येक नियमित रेषा ही या खंडान्वये आयुक्ताकडून रस्त्याची रेषा विहित करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी रस्त्यांची रेषा आहे असे मानले जाईल ;

(ब) वेळोवेळी, परंतु प्रत्येक बाबतीत स्थायी समितीची पूर्वमान्यता घेऊन, अशा रितीने विहित केलेल्या रेषेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बदली नवीन रेषा विहित करता येईल ;

परंतु, मान्यता देण्यासंबंधीचा निर्णय स्थायी समितीच्या ज्या बैठकीत घेण्यात येईल त्या बैठकीच्या निदान एक महिना अगोदर आयुक्ताने अशा प्रस्तावासंबंधी जाहीर नोटीस स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून दिलेली असल्यावाचून, तसेच ज्या रस्त्यास किंवा रस्त्याच्या ज्या भागासाठी नवीन रेषा विहित करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या रस्त्यात किंवा त्या भागात त्यासंबंधी आयुक्ताच्या सहीची विशेष नोटीस लावलेली असल्यावाचून आणि अशा प्रस्तावासंबंधी जे कोणतेही लेखी आक्षेप अशा बैठकीच्या दिवसांपूर्वी निदान तीन पूर्ण दिवस अगोदर महानगरपालिका सचिवांच्या कार्यालयात सादर करण्यात आले असतील त्यांचा स्थायी समितीकडून विचार करण्यात येईपर्यंत, अशी मान्यता देता कामा नये.

(२) त्यावेळी विहित केलेल्या रेषेस "रस्त्याची नियमित रेषा" असे संबोधण्यात येईल.

(३) आयुक्ताने, ज्यांच्या बाबतीत रस्त्यांची नियमित रेषा विहित करण्यात आली आहे असे सर्व सार्वजनिक रस्ते दर्शविणारी नोंदवही, त्यांच्या रेखाचित्रासह ठेवली पाहिजे आणि अशा नोंदवहीत आयुक्तास आवश्यक वाटेल असा तपशील असेल आणि स्थायी समिती वेळोवेळी विहित करील अशी फी दिल्यावर अशी नोंदवही कोणत्याही व्यक्तीस पाहण्यासाठी खुली असेल.

(४) (अ) पोट-कलम (५) च्या तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून व तीत घातलेल्या शर्तीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, रस्त्यांच्या नियमित रेषेच्या आतील जमिनींवर कोणत्याही इमारतीचा कोणताही भाग बांधता किंवा पुन्हा बांधता कामा नये आणि या बाबतीत आयुक्त अशी परवानगी देईल अशा प्रत्येक बाबतीत त्याने त्याचवेळी स्थायी समितीस त्याबाबतची आपली कारणे लेखी कळविली पाहिजेत.

(ब) कोणत्याही व्यक्तीने आयुक्तांच्या लेखी परवानगीवाचून, रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत कोणत्याही हद्दीची भिंत किंवा हद्दीच्या भिंतीचा भाग बांधता किंवा पुन्हा बांधता कामा नये ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीने हद्दीची भिंत किंवा तिचा भाग बांधण्यास किंवा पुन्हा बांधण्यास परवानगी मिळण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यानंतर साठ दिवसांच्या आत, आयुक्ताने कलम २१३ अन्वये रस्त्याच्या नियमित रेषेच्या आतील जमीन संपादन केली नाही तर, अशा व्यक्तीस, या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदी किंवा नियम किवा उपविधी यांच्या अधीन राहून, यथास्थिती, अशी हद्दीची भिंत किंवा तिचा भाग बांधण्याचे किंवा पुन्हा बांधण्याचे काम सुरू करता येईल.

(५) (अ) जेव्हा आयुक्त पोट-कलम (४), खंड (क) अन्वये रस्त्यांच्या नियमित रेषेच्या आतील जमिनीवर कोणतीही इमारत बांधण्यास किंवा पुन्हा बांधण्यास परवानगी देईल, तेव्हा, आयुक्तास, त्या इमारतीच्या मालकास, त्यानंतर कोणत्याही वेळी, त्या इमारतीच्या मालकास व त्यांच्या हक्क उत्तराधिकाऱ्यास लेखी नोटीस देऊन अशा परवानगीनुसार केलेले कोणतेही बांधकाम किंवा त्याचा कोणताही भाग काढून टाकण्याविषयी सांगितले असता कोणतीही भरपाई मागितली जाणार नाही व असे बांधकाम काढून टाकण्यात कसूर केल्यास ते काढून टाकण्यासाठी आयुक्तास आलेला खर्च देण्यात येईल, असे स्वत:स व त्याच्या हक्क उत्तराधिकाऱ्यांना बांधून घेण्याविषयी करार करण्यास, त्या इमारतीच्या मालकास आयुक्तास फर्माविता येईल.

(ब) अशी परवानगी देण्यापूर्वी आयुक्तास, बांधकाम काढून टाकण्याचा खर्च भागविण्यासाठी त्याच्या मते पुरेशी रक्कम आणि अशा इमारतीच्या कोणत्याही हक्क उत्तराधिकाऱ्यास किंवा हस्तांतरिता जी कोणतीही भरपाई द्यावी लागेल तिची रक्कम नगरपलिकेच्या कार्यालयात अनामत ठेवण्याविषयी अशा मालकास फर्माविता येईल.

इमारती, रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटवणे.

**२११.** (१) सार्वजनिक रस्त्यास लागून असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल तर, आयुक्तास, जेव्हा—

(अ) अशी इमारत पुन्हा बांधण्याचे किंवा अशा इमारतीचा जमिनीच्या सपाटीवरील अर्ध्यापेक्षा अधिक भाग—असा अर्धा भाग घनफुटात मोजला पाहिजे—पाडण्याचे प्रस्तावित केले असेल ; किंवा

(ब) असा इमारतीचा जो कोणताही भाग रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल तो काढून टाकण्याचे, पुन्हा बांधण्याचे किंवा वाढविण्याचे किंवा त्यात रचनात्मक फेरफार करण्याचे प्रस्तावित केले असेल, तेव्हा तेव्हा, अशी इमारत पुन्हा बांधणे, तीत फेरफार करणे किंवा तिची दुरुस्ती करणे यासंबंधी तो, जो कोणताही आदेश देईल, त्याद्वारे अशी इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटवण्यास फर्माविता येईल.

(२) रस्त्याच्या नियमित रेषेच्या आतील कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पडेल, जळेल किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा अन्यथा पाडण्यात येईल तेव्हा, आयुक्तास रस्त्याच्या नियमित रेषेच्या आतील जमिनीचा जो भाग उक्त इमारतीने व्यापला असेल तो महानगरपालिकेच्यावतीने ताबडतोब कब्जात घेता येईल व आवश्यक असेल तर तो मोकळा करता येईल.

(३) या कलमान्वये संपादन केलेली जमीन त्यानंतर सार्वजनिक रस्त्याचा भाग म्हणून मानण्यात येईल व तो असा भाग म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

**२१२.** (१) कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग, सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल आणि आयुक्ताच्या मते अशी इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटविणे आवश्यक असेल तर, त्यास कलम २११ च्या तरतुदी लागू होत नसल्यास, लेखी नोटिशीद्वारे--

इमारती रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटविण्यासंबंधी आयुक्तांचा अतिरिक्त अधिकार.

(अ) अशा इमारतीच्या मालकास, रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेली अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग का पाडून टाकण्यात येऊ नये आणि अशा रेषेच्या आतील जमीन आयुक्ताकडून का संपादन करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत त्याने किंवा त्याबाबत त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने सही केलेल्या व आयुक्ताच्या नावे लिहिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दाखविण्यास फर्मावता येईल; किंवा

(ब) उक्त मालकास, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी, अशा वेळी व अशा जागी जातीने किंवा त्याने याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास व रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेली अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग का पाडून टाकण्यात येऊनये आणि अशा रेषेच्या आतील जमीन, आयुक्तांकडून का संपादन करण्यात येऊनये याबद्दल कारण दाखवण्यास फर्मावता येईल.

(२) रस्त्यांच्या नियमित रेषेच्या आत आलेली अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग पूर्वी सांगितल्याप्रमाणे का काढून टाकण्यात येऊ नये आणि उक्त रेषेच्या आतील जमीन का संपादन करण्यात येऊ नये याबद्दल आयुक्तांचे समाधान होईल असे पुरेसे कारण मालक दाखवू शकला नाही तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, अशा मालकास लेखी नोटीस देऊन, रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेली अशी इमारत किंवा तिचा भाग नोटिशीत विहित केलेल्या कालावधीत पाडून टाकण्याविषयी फर्मावता येईल.

(३) रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत आलेली अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग अशा कालावधीत पाडून टाकण्यात मालकाने कसूर केल्यास आयुक्तांस तो पाडून टाकता येईल आणि असे करण्यासाठी झालेला सर्व खर्च मालकाने दिला पाहिजे.

(४) उक्त रेषेच्या आतील जमिनीचा जो भाग उक्त इमारतीने व्यापला असेल तो महानगरपालिकेच्या-वतीने आयुक्ताने ताबडतोब कब्जात घेतला पाहिजे आणि त्यानंतर अशी जमीन सार्वजनिक रस्त्याचा भाग म्हणून मानण्यात येईल व ती तसा भाग म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

(५) या कलमातील कोणतीही गोष्ट [१][शासनामध्ये] निहित असलेल्या इमारतींना लागू होते असे मानले जाणार नाही.

**२१३.** महानगरपालिकेमध्ये निहित नसलेली कोणतीही जमीन–मग ती खुली असो किंवा कुंपण घातलेली असो–सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल आणि तिच्यावर एखादी इमारत नसेल किंवा सार्वजनिक रस्त्यास लागून असलेल्या इमारतीच्या बाहेरील चबुतरा, व्हरांडा, पायरी, आवाराची भिंत, वई किंवा कुंपण किंवा अन्य संरचना किंवा अशा चबुतऱ्याचा, व्हरांड्याचा, पायरीचा, आवाराच्या भिंतीचा, वईचा किंवा कुंपणाचा किंवा अन्य संरचनेचा भाग अशा रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत येत असेल तर, आयुक्तास तसे करण्याचा आपला उद्देश असल्याची कमीत कमी संपूर्ण सात दिवसांची लेखी नोटीस जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकास दिल्यानंतर उक्त जमीन तिच्या भोवती कोणतीही भिंत, वई किंवा कुंपण असल्यास त्यासह, किंवा रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत आलेला पूर्वी सांगितल्याप्रमाणे असलेला चबुतरा, व्हरांडा, पायरी किंवा अन्य संरचना किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे असलेला उक्त चबुतऱ्याचा, व्हरांड्याचा, पायरीचा किंवा अन्य संरचनेचा भाग महानगरपालिकेच्यावतीने ताबडतोब कब्जात घेता येईल आणि आवश्यक असल्यास

रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेली खुली किंवा जिच्यावर चबुतरे इत्यादी आहेत अशी जमीन संपादन करणे.

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

मोकळा करता येईल आणि अशा रितीने संपादन केलेली जमीन त्यानंतर अशा सार्वजनिक रस्त्याचा भाग म्हणून मानण्यात येईल;

परंतु, अशी जमीन किंवा इमारत [1][शासनामध्ये] निहित असेल तेव्हा, संबंधित शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून पूर्वी सांगितल्याप्रमाणे कब्जात घेता कामा नये आणि जेव्हा ती जमीन किंवा इमारत त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेल्या कोणत्याही महानगरपालिकेमध्ये निहित असेल तेव्हा [2] [राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून पूर्वी सांगितल्याप्रमाणे कब्जात घेता कामा नये.

रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असलेल्या इमारतीच्या व जमिनींच्या भागांचे संपादन केल्यानंतर त्यांच्या राहिलेल्या भागाचे संपादन करणे.

**२१४.** (१) जर एखादी इमारत किंवा जमीन अंशत: सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल आणि उक्त रेषेच्या आतील भाग काढून टाकल्यानंतर राहिलेली जमीन कोणत्याही फायदेशीर उपयोगासाठी सोयीस्कर किंवा योग्य असणार नाही अशी आयुक्तांची खात्री झाली तर, त्यास मालकाने विनंती केली असता उक्त रेषेच्या आतील जमिनीशिवाय आणखी अशी जमीन संपादन करता येईल आणि अशी अतिरिक्त जमीन महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या सार्वजनिक रस्त्याचा भाग आहे असे मानले जाईल.

(२) त्यानंतर अशा अतिरिक्त जमिनीचा उपयोग कलम २१५ अन्वये इमारती पुढे आणण्याच्या कामी करता येईल.

इमारती रस्त्याच्या रेषेपर्यंत पुढे आणणे.

**२१५.** (१) सार्वजनिक रस्त्यास लागून असलेली कोणतीही इमारत अशा रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल तर, आयुक्तास, जेव्हा जेव्हा--

(अ) अशी इमारत पुन्हा बांधण्याचे प्रस्तावित केले असेल, किंवा

(ब) उक्त रस्त्यास लागून असलेली अशी इमारत किंवा तिचा भाग जमिनीच्या पातळीपासून अशा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या अर्ध्यापेक्षा अधिक भागापर्यंत–असा भाग घनफुटात मोजला पाहिजे–पाडून टाकणे किंवा पुन्हा बांधणे ज्यायोगे आवश्यक होईल अशा कोणत्याही रीतीने त्यात फेरफार किंवा दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित केले असेल ;

तेव्हा तेव्हा, अशी इमारत पुन्हा बांधणे, तीत फेरफार करणे किंवा ती दुरुस्त करणे यासंबंधी तो, जो कोणताही आदेश देईल त्याद्वारे अशी इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत पुढे आणण्याची परवानगी देता येईल किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने तसे करण्याविषयी फर्मावता येईल.

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, सार्वजनिक रस्त्यापासून कोणतीही जागा अलग करणारी भिंत ही इमारत आहे असे मानले जाईल; आणि आयुक्त मान्य करील अशी सामग्री वापरून व अशा आकाराची बांधलेली भिंत उक्त रेषेवर बांधण्यात आली असेल तर, इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत पुढे आणण्यासंबंधी ज्या आदेशाद्वारे परवानगी देण्यात आली असेल किंवा फर्मावण्यात आले असेल त्या आदेशाचे पुरेसे अनुपालन झाले आहे असे मानले जाईल.

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ वरील आदेशान्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**२१६.** (१) कलम २११, २१२, २१३ किंवा २१४ अन्वये सार्वजनिक रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास, त्याची इमारत किंवा जमीन अशा रीतीने संपादन केल्यामुळे झालेल्या अशा मालकाच्या कोणत्याही हानीबद्दल व आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे अशा मालकास आलेल्या कोणत्याही खर्चाबद्दल, आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे ; भरपाई देणे व सुधार आकार वसूल करणे.

परंतु—

(एक) अशा रीतीने संपादन केलेली जमीन किंवा इमारत ज्या मालमत्तेचा भाग असेल त्या मालमत्तेच्या उरलेल्या भागाच्या मूल्यात इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटवल्यामुळे जी कोणतीही वाढ किंवा घट होण्याचा संभव असेल ती अशा भरपाईची रक्कम ठरवताना विचारात घेतली पाहिजे व जमेस धरली पाहिजे.

(दोन) मूल्यात झालेली अशी कोणतीही वाढ, अशा मालकाच्या झालेल्या हानीच्या किंवा त्यास आलेल्या खर्चाच्या रकमेहून अधिक असेल तर, आयुक्तास अशा अधिक रकमेपैकी निम्मी रक्कम सुधार आकार म्हणून वसूल करता येईल.

(२) कलम २१५ अन्वये इमारत पुढे आणण्याविषयी आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे अशा इमारतीच्या मालकीची कोणतीही हानी किंवा नुकसान होईल तर अशा हानी किंवा नुकसानीबद्दल आयुक्ताने त्यास इमारत पुढे आणल्यामुळे मूल्यात जी कोणतीही वाढ होण्याचा संभव असेल ती विचारात घेऊन, भरपाई दिली पाहिजे.

(३) इमारत पुढे आणण्याविषयी कलम २१५ अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीस फर्माविले असेल किंवा परवानगी दिली असेल त्या व्यक्तीच्या जागेत समाविष्ट केली जाणारी अतिरिक्त जमीन महानगरपालिकेच्या मालकीची असेल तर, इमारत पुढे आणण्यासंबंधी आयुक्ताने दिलेला आदेश किंवा परवानगी ही, उक्त जमिनीसंबंधी उक्त मालकास करून दिलेले पुरेसे अभिहस्तांतरणपत्र आहे असे मानले जाईल, आणि अशा अतिरिक्त जमिनीबद्दल उक्त मालकाने महानगरपालिकेस द्यावयाची किंमत आणि अभिहस्तांतरणपत्राच्या अन्य अटी व शर्ती उक्त आदेशात किंवा परवानगीत नमूद करण्यात आल्या पाहिजेत.

(४) आयुक्ताने इमारत पुढे आणण्याविषयी फर्माविले असेल तेव्हा महानगरपालिकेस देण्यासाठी निश्चित केलेली किंमत व अभिहस्तांतरणपत्राच्या कोणत्याही अन्य अटी किंवा शर्तीमुळे इमारतीच्या मालकाचे असमाधान झाले असेल तर आयुक्ताने, उक्त मालकाने अर्ज केल्यावर, उक्त अटी व शर्ती त्यास कळविण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, ती बाब निर्णयासाठी न्यायाधीशांकडे पाठविली पाहिजे.

## खाजगी रस्त्यासंबंधी तरतुदी

**२१७.** ज्या कोणत्याही व्यक्तीचा— इमारती व खाजगी रस्ते यासाठी जमिनीचे रेखांकन करण्याचा उद्देश असल्याची नोटीस आयुक्तास देणे.

(अ) कोणतीही जमीन खरेदीदाराने किंवा पट्टेदाराने तिच्यावर इमारती बांधण्यासंबंधी करावयाच्या प्रसंविदेस करारास अधीन राहून, विकण्याचा किंवा पट्ट्याने देण्याचा,

(ब) जमिनीची (मग अशा जमिनीवर बांधकाम करण्यात आलेले नसो किंवा अंशत: बांधकाम करण्यात आलेले असो ) इमारतीच्या भूखंडांमध्ये विभागणी करण्याचा,

(क) कोणत्याही जमिनीचा किंवा तिच्या भागाचा इमारतीच्या प्रयोजनांसाठी उपयोग करण्याचा किंवा उपयोग करण्याची परवानगी देण्याचा, किंवा

(ड) खाजगी रस्ता तयार करण्याचा किंवा त्याचे रेखांकन करण्याचा--मग अशा रस्त्यावरून जाण्यायेण्याचा किंवा प्रवेशाचा हक्क लोकांना देण्याचा उद्देश असो किंवा नसो ;

उद्देश असेल अशा प्रत्येक व्यक्तीने आपल्या उद्देशाची लेखी नोटीस आयुक्तास दिली पाहिजे व अशा नोटिशीबरोबर मानचित्रे व भाग सादर केला पाहिजे व त्यात अशा इमारतीच्या जमिनीचे व खाजगी रस्त्याच्या जागेचे (तशी असल्यास) स्थान व त्याच्या हद्दी व तसेच अशा इमारतीची जमीन किंवा अशी जागा अशा व्यक्तींच्या अन्य ज्या जमिनीचा भाग म्हणून असेल त्या सर्व जमिनींचे स्थान व त्यांच्या हद्दी व अशा इमारतीच्या जमिनीचा उद्देशित विकास, रेखांकन व भूखंड पाडणे व इमारतीच्या प्रत्येक भूखंडाचे आकारमान व क्षेत्र आणि अशा खाजगी रस्त्याची उद्देशित पातळी, दिशा, रुंदी, जलनि:सारणाची साधने, त्यास फरसबंदी करणे, खडी घालणे व दिवाबत्ती करणे, अशा खाजगी रस्त्याच्या बाजूस झाडे लावण्याची व ती वाढविण्याची तरतूद, आणि अशा जमिनींवर बांधण्याचे प्रस्तावित केलेल्या इमारतीची किंवा इमारतींची उंची, त्यातील जलनि:सारणाची साधने, त्यातील वायुजीवन आणि, कोणतीही इमारत बांधल्यानंतर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे, त्यावेळी करण्याचा उद्देश असलेल्या रस्त्यास ती लागून येत नसेल तर अशा इमारतीतून किंवा इमारतीकडे जाण्यायेण्याचा मार्ग व अशा जाण्यायेण्याच्या मार्गावर ज्या रीतीने फरसबंदी करण्यात येईल, खडी घालण्यात येईल, नाली बांधण्यात येईल व दिवाबत्ती करण्यात येईल, ती रीत या गोष्टी दर्शविल्या पाहिजेत.

आयुक्तास आणखी तपशील मागवता येईल.

**२१८.** कलम २१७ अन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीत आयुक्तास अशा प्रकरणाचा समाधानकारक रीतीने विचार करण्यासाठी त्यास आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्यात आली नसेल किंवा उक्त कलमाच्या खंड (क), (ख) आणि (ग) मध्ये नमूद केलेल्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी दिलेल्या अशा कोणत्याही नोटिशीत खाजगी रस्ता तयार करण्याबाबत किंवा त्याचे रेखांकन करण्याचा कोणताही प्रस्ताव किंवा उद्देश नसेल तर, आयुक्तास, उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही वेळी, ज्या व्यक्तीने उक्त नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन--

(अ) नियमात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही दस्तऐवजांसह आवश्यक असलेली माहिती पुरवण्याविषयी, किंवा

(ब) उक्त खंड क, ख, किंवा ग अन्वये सादर केलेल्या सर्व किंवा कोणत्याही योजना सुधारून त्यात ज्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित केले असेल अशा रुंदीच्या जाण्यायेण्याच्या कोणत्याही मार्गाशिवाय आणखी किंवा त्याऐवजी आयुक्त विनिर्दिष्ट करील अशा रुंदीचे एक किंवा अनेक खाजगी रस्ते तयार करण्याची किंवा त्यांचे रेखांकन करण्याची तरतूद करण्याविषयी व अशा रीतीने सुधारलेल्या एका किंवा अनेक योजनांसंबंधी तो विनिर्दिष्ट करील अशी आणखी माहिती व दस्तऐवज पुरवण्याविषयी, फर्मावता येईल.

आयुक्तास, लायसन्सदार सर्वेक्षकाकडून मानचित्रे तयार करून घेण्याविषयी फर्मावता येईल.

**२१९.** ज्या मानचित्रावर, भागावर किंवा वर्णनावर लायसन्सदार सर्वेक्षकाने ते स्वत: किंवा त्याच्या देखरेखीखाली तयार केले होते असे दर्शविणारी खुण म्हणून अशा सर्वेक्षकाची सही नसेल असे कोणतेही मानचित्र, भाग किंवा वर्णन कलम २१७ किंवा २१८ च्या प्रयोजनासाठी पुरेसे म्हणून स्वीकारण्यास आयुक्तास नकार देता येईल.

२२०. (१) इमारतीसाठी असलेल्या जमिनीचे रेखांकन, इमारतीच्या प्रत्येक भूखंडाचे आकारमान व क्षेत्र, प्रत्येक खाजगी रस्त्यांची पातळी, दिशा, रुंदी व जलनि:सारणाची साधने, अशा रस्त्याच्या बाजूस लावण्याच्या व वाढवावयाच्या झाडाचा प्रकार व त्याची संख्या, आणि अशा जमिनींवर किंवा अशा रस्त्याच्या दोन्ही बाजूस बांधावयाच्या सर्व इमारतींची उंची, त्यामधील जलनि:सारणाची व वायुवीजनाची साधने, त्याकडे जाण्यायेण्याचे मार्ग या सर्व गोष्टी, अशा जमिनीचे किंवा शेजारील कोणत्याही जमिनीचे रेखांकन करण्याच्या व उपयोग करण्याच्या संबंधात आरोग्यकारक स्थिती सुखसोयी व सोयी उपलब्ध करण्याच्या सर्वसाधारण हेतूने व प्रस्तावित खाजगी रस्त्याच्या नवीन रस्ते तयार करण्यासाठी किंवा त्या वस्तीस्थानातील विद्यमान रस्त्याची सुधारणा करण्यासाठी तयार केलेली कोणतीही सर्वसाधारण योजना पार पाडण्यासाठी केलेल्या किंवा आयुक्ताच्या मते केल्या जाण्याचा संभव असलेल्या कोणत्याही व्यवस्थेशी विरोध येऊ नये या सर्वसाधारण हेतूने स्थायी समिती वेळोवेळी जे निदेश देईल अशा सर्वसाधारण निदेशाच्या अधीन राहून, आयुक्तांकडून निश्चित करण्यात व ठरवण्यात आल्या पाहिजेत : जमिनीचे रेखांकन इमारतीच्या प्रत्येक भूखंडाचे आकारमान व क्षेत्र, खाजगी रस्त्याचे व इमारतीचे रेखांकन व इमारतीची उंची या गोष्टी आयुक्ताने ठरवणे.

परंतु, कलम २१७ अन्वये दिलेली कोणतीही नोटीस किंवा कलम २१८ अन्वये मागविलेली कोणतीही मानचित्रे, भाग, वर्णन, योजना किंवा आणखी माहिती आयुक्तास मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या पूर्वोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात आयुक्ताने आपली अमान्यता, नोटीस देणाऱ्या व्यक्तीस कळवली नाही तर, उक्त व्यक्तीने सादर केलेल्या प्रस्तावास आयुक्ताने मान्यता दिली आहे असे मानले जाईल.

(२) जेव्हा आयुक्त विवक्षित शर्तीवर किंवा कोणतीही शर्त न घालता उक्त कामास मान्यता दिल्याचे उक्त व्यक्तीस लेखी सूचित करील, किंवा आयुक्ताने उक्त कामास पूर्वी सांगितल्याप्रमाणे मान्यता दिली आहे असे मानण्यात येईल तेव्हा, उक्त व्यक्तीस, कलम २१७ अन्वये आयुक्तास नोटीस दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी त्या नोटीशीत किंवा पूर्वोक्त अशा कोणत्याही दस्तऐवजात वर्णन केलेल्या उद्देशानुसार आणि आयुक्ताने ज्या कोणत्याही शर्ती विहित केल्या असतील त्यानुसार परंतु या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा कोणताही नियम किंवा उपविधी याचे उल्लंघन न होईल अशा रीतीने, उक्त काम सुरू करता येईल.

२२१. (१) कोणत्याही व्यक्तीने--

(अ) आपल्या उद्देशाची कलम २१७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आगाऊ लेखी नोटीस दिल्यावाचून तसेच अशी नोटीस दिल्याच्या तारखेपासून साठ दिवसांची मुदत संपेपर्यत व कलम २२०, पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या व ठरवलेल्या निदेशानुसार (तसे निदेश असल्यास) असेल त्या व्यतिरिक्त ;

(ब) कलम २२०, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली एक वर्षाची मुदत संपल्यानंतर ;

(क) जे कोणतेही काम पार पाडण्याचा तिला हक्क आहे ते ज्या तारखेस सुरू करण्याचे तिने प्रस्तावित केले असेल त्या तारखेची लेखी नोटीस शहर अभियंत्यास दिल्यावाचून व तीत उल्लेख केलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत ते सुरु केल्यावाचून ;

कोणतीही जमीन--मग ती अविकसित असो किंवा अंशत: विकसित असो--इमारतीसाठी विकता कामा नये, पट्ट्याने देता कामा नये, तिचा उपयोग करता कामा नये किंवा उपयोग करण्याची परवानगी देता कामा नये किंवा अशा कोणत्याही जमिनीची इमारतीच्या भूखंडामध्ये विभागणी करता कामा नये किंवा कोणत्याही खाजगी रस्त्याचे रेखांकन करता कामा नये.

नोटिशीची मुदत संपेपर्यंत व आयुक्ताने दिलेल्या निदेशानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने जमिनीचा इमारतीसाठी विनियोग न करणे व खाजगी रस्त्याचे रेखांकन न करणे.

(२) या कलमाचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य करण्यात आले किंवा असे कृत्य करण्यास परवानगी देण्यात आली तर, आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, असे कृत्य करणाऱ्या किंवा करण्यास परवानगी देणाऱ्या व्यक्तीस--

(अ) अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी किंवा त्यापूर्वी त्याने त्याबाबत सही केलेल्या व आयुक्तांच्या नावे लिहिलेल्या लेखी निवेदनाद्वारे, या कलमाचे उल्लंघन करून रेखांकन करण्याचे, भूखंड पाडण्याचे, रस्त्याचे किंवा इमारतीचे जे काम केले असेल त्यात आयुक्ताचे समाधान होईल अशा रितीने फेरफार का करण्यात येऊ नये किंवा तसे करणे त्याच्या मते अव्यवहार्य असेल, तर असा रस्ता किंवा इमारत का पाडून किंवा काढून टाकण्यात येऊ नये किंवा असे अनधिकृत काम करण्यापूर्वी जमीन जशी होती तशी ती का करण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्यास; किंवा

(ब) अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी, वेळी व जागी जातीने किंवा तिने त्याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याविषयी व पूर्वी सांगितल्याप्रमाणे कारण दाखवण्यास, फर्मावता येईल.

(३) अशा रस्त्यात किंवा इमारतीत अशारीतीने का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ती का पाडून किंवा काढून टाकण्यात येऊ नये याविषयी आयुक्ताचे समाधान होईल असे कारण दाखवण्यास अशी व्यक्ती कसूर करील तर, आयुक्तास असे फेरफार करण्याचे, पाडून टाकण्याचे, काढून टाकण्याचे किंवा पूर्ववत करण्याचे काम पार पाडण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा कामाचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे.

कलम २२० अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुरोधाने न केलेली कामे पार पाडण्याच्या उद्देशाची नव्याने नोटीस देणे.

**२२२.** कलम २२० अन्वये कोणतेही काम सुरू करण्याचा हक्क जिला आहे त्या व्यक्तीने ते काम त्यात विनिर्दिष्ट केलेल्या एक वर्षाच्या मुदतीच्या आत सुरू करण्यात कसूर केली तर, तिला असे काम पार पाडण्याविषयीच्या आपल्या उद्देशाची नवीन नोटीस कोणत्याही वेळी देता येईल आणि अशी नोटीस कलम २१७ अन्वये दिलेली नवीन नोटीस आहे असे समजण्यात येईल.

खाजगी रस्ते व जाण्या-येण्याचे मार्ग समतोल करणे व त्यातील जलनि:सारण.

**२२३.** जर कोणताही खाजगी रस्ता किंवा इमारतीकडे जाण्यायेण्याचा कोणताही अन्य मार्ग आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने समतल केला नसेल, त्यावर खडी घातली नसेल, त्यास चिरेबंदी किंवा फरसबंदी केली नसेल, त्यात मलजलवाही नसेल, त्याचे त्याचे नि:सारण केले नसेल, त्यातून पाट काढला नसेल, दिवाबत्तीची सोय केली नसेल किंवा सावलीसाठी झाडांची तरतूद केली नसेल तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या मंजुरीने, लेखी नोटीस देऊन अशा रस्त्यासमोरील किंवा अन्य मार्गासमोरील किंवा त्यास जोडून असलेल्या किंवा लागून असलेल्या किंवा अशा रस्त्यामधून किंवा मार्गाने ज्यात प्रवेश मिळतो किंवा या कलमान्वये केलेल्या कोणत्याही कामामुळे ज्यांचा फायदा होईल अशा अनेक जागांच्या मालकास किंवा मालकांना तो निदेश देईल अशा रीतीने पूर्वोक्त आवश्यक गोष्टींपैकी एक किंवा अनेक गोष्टी पार पाडण्याविषयी फर्माविता येईल.

**२२४.** जेव्हा कोणताही खाजगी रस्ता आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने समतल केला असेल, त्यावर खडी घालण्यात आली असेल, त्यास चिरेबंदी किंवा फरसबंदी करण्यात आली असेल, त्यात मलजलवाही नाली किंवा पाट बांधण्यात आलेला असेल व तो चांगला करण्यात आला असेल तेव्हा आयुक्तास, अशा रस्त्यात दिवे, दिव्याचे खांब व दिवाबत्तीची सोय करण्यासाठी आवश्यक असलेला अन्य उपकरण संच यांची त्यांचे समाधान होईल अशारीतीने तरतूद करण्यात आली असेल आणि अशा रस्त्यात समाविष्ट असलेल्या जमिनीबाबत [१][राज्य] शासनास द्यावयाचा सर्व जमीन महसूल दिलेला असेल तर, अशा रस्त्याच्या कोणत्याही भागात लेखी नोटीस लावून तो सार्वजनिक रस्ता आहे असे जाहीर करता येईल आणि अशा रस्त्याच्या मालकांनी किंवा त्यापैकी कोणीही विनंती केली असता त्याने तसे जाहीर केली पाहिजे, आणि त्यानंतर असा रस्ता सार्वजनिक रस्ता होईल व तो सार्वजनिक रस्ता म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित होईल; खाजगी रस्त्यामध्ये मलजलवाही इत्यादी बांधल्यावर ते सार्वजनिक रस्ते म्हणून जाहीर करण्याचा अधिकार.

परंतु, अशी नोटीस लावल्यानंतर एक महिन्याच्या आत अशा रस्त्याच्या किंवा त्याचा जो मोठा भाग असेल त्याच्या मालकाने आयुक्तास लेखी नोटीस देऊन आक्षेप घेतला तर, असा कोणताही रस्ता सार्वजनिक रस्ता होणार नाही.

**२२५.** कोणत्याही रस्त्याचा फक्त काही भाग सार्वजनिक असेल तर अशा रस्त्याचा राहिलेला बाकी भाग कलमे २२३ व २२४ यांच्या प्रयोजनासाठी खाजगी रस्ता आहे असे मानले जाईल. एखादा रस्ता अंशत: सार्वजनिक व अंशत: खाजगी असेल तेव्हा कलमे २२३ व २२४ लागू करणे.

## पुढे येणारे भाग व अडथळे

**२२६.** (१) कलम २२७ मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती जे बांधकाम किंवा खिळण-- रस्ते इत्यादींवर पुढे येणाऱ्या भागास मनाई.

(अ) कोणत्याही रस्त्यावर लोंबकळत राहील किंवा वर येईल किंवा त्याच्यावर कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करील किंवा अशा रस्त्यावरून लोकांस सुरक्षितपणे किंवा सोयीस्करपणे जाण्या-येण्यास अडथळा करील, किंवा

(ब) कोणत्याही रस्त्यावरील कोणत्याही नालीचा किंवा उघड्या पाटाचा उपयोग करण्यात किंवा तो योग्य रीतीने चालू राहण्यात कोणत्याही प्रकारे व्यत्यय येईल किंवा त्याची तपासणी करण्यास किंवा तो साफ करण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा होईल अशा रितीने अशा नालीत किंवा पाटात किंवा त्यावर पुढे येईल किंवा अतिक्रमण करील,

असे कोणतेही बांधकाम किंवा खिळणी कोणत्याही जागेस लागून किंवा तिच्यासमोर उभारणार नाही, करणार नाही, जोडणार नाही किंवा ठेवणार नाही.

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(२) आयुक्त लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही जागांच्या मालकास किंवा भोगवटादारास, या कलमाचे किंवा नियत दिवसांच्या निकटपूर्वीच्या दिवशी शहरात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून उक्त जागेस लागून किंवा तिच्या समोर उभारलेले, केलेले, जोडलेले किंवा ठेवलेले कोणतेही बांधकाम किंवा खिळणी काढून टाकण्यास किंवा त्यासंबंधी तो निदेश देईल अशी अन्य व्यवस्था करण्यास सांगू शकेल.

(३) उक्त जागेच्या भोगवटादाराने अशा नोटिशीस अनुसरून कोणतेही बांधकाम किंवा खिळणी काढून टाकली किंवा त्यामध्ये फेरफार केला तर, असे बांधकाम किंवा खिळणी त्याने स्वत: उभारलेली, केलेली किंवा ठेवलेली नसल्यास, त्यास उक्त नोटिशीचे अनुपालन करण्यासाठी आलेला सर्व वाजवी खर्च अशा जागेच्या मालकाकडे असलेल्या खाती जमा करण्याचा हक्क असेल.

(४) पोट-कलम (१) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेले असे कोणतेही बांधकाम किंवा खिळणी दिनांक १ एप्रिल १९०१ पूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही जागेस लागून किंवा तिच्या समोर उभारण्यात, करण्यात, जोडण्यात किंवा ठेवण्यात आली असेल तर, आयुक्तास उक्त जागांच्या मालकास किंवा भोगवटादारास पूर्वी सांगितल्याप्रमाणे नोटीस देता येईल;

परंतु, अशा कोणत्याही बाबतीत, असे बांधकाम किंवा खिळणी कायदेशीररीत्या उभारण्यात, करण्यात, जोडण्यात किंवा ठेवण्यात आली असेल तर ती काढून टाकल्यामुळे किंवा तीत फेरफार केल्यामुळे ज्याची हानी किंवा नुकसान होईल अशा प्रत्येक व्यक्तीस आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे.

विवक्षित बाबतीत रस्त्यांच्या वर पुढे येणाऱ्या भागास परवानगी देता येईल.

**२२७.** (१) आयुक्तास, कोणत्याही रस्त्यालगत असलेल्या कोणत्याही इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास, प्रत्येक बाबतीत त्यास योग्य वाटेल अशा अटींवर—

(अ) अशा रस्त्यावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कमानी उभारण्यास, किंवा

(ब) कोणत्याही मजल्यावरून कोणत्याही रस्त्यावर किंवा त्याच्या भागावर पुढे येणारा किंवा त्याच्या आडवा येणारा व्हरांडा, सज्जा, कमान, जोडमार्ग, उन्हापासून संरक्षणासाठी छपरी, हवामान चौकट, छत वितान किंवा असे अन्य बांधकाम किंवा वस्तू उभारण्यास लेखी परवानगी देता येईल;

परंतु, ज्या सार्वजनिक रस्त्यावर, कमानी बांधण्यासाठी महानगरपालिकेने सामान्यपणे मंजुरी दिलेली नसेल अशा कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर कमानी बांधण्यास आयुक्ताने परवानगी देता कामा नये.

(२) या कलमान्वये दिलेल्या परवानगीच्या शर्ती अन्वये व तद्नुसार उभारलेल्या किंवा उभ्या केलेल्या कोणत्याही कमानी, व्हरांडा, सज्जा, कमान, जोडमार्ग, उन्हापासून संरक्षणासाठी छपरी, हवामान चौकट, छत वितान किंवा अन्य बांधकाम किंवा वस्तू यांस कलम २२६ च्या तरतुदी लागू होतात असे मानले जाणार नाही.

(३) आयुक्त, कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार उभा केलेला व्हरांडा, सज्जा, उन्हापासून संरक्षणासाठी छपरी, हवामान चौकट किंवा तत्सम वस्तू काढून टाकण्यात फर्मावू शकेल आणि अशा मालकास, भोगवटादारास त्याप्रमाणे कार्यवाही करणे भाग पडेल; परंतु अशा त्या काढून टाकण्यामुळे झालेल्या हानीबद्दल व त्यावर झालेल्या खर्चाबद्दल त्याला भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

**२२८.** कोणत्याही जागेचा तळमजल्याचा जो दरवाजा, फाटक, अडसर, किंवा खिडकी रस्त्यावर किंवा रस्त्याच्या सुधारणेसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही जमिनींवर बाहेरच्या बाजूने अशा रीतीने उघडत असेल की, त्यामुळे आयुक्ताच्या मते लोकांना अशा रस्त्यावरून सुरक्षितपणे किंवा सोयीस्करपणे जाण्या-येण्यास अडथळा होतो, असा कोणताही दरवाजा, फाटक, अडसर किंवा खिडकी बाहेरच्या बाजूने उघडणार नाही अशा रीतीने त्यामध्ये फेरफार करण्याविषयी आयुक्त अशा तळमजल्यावरील जागेच्या मालकास कोणत्याही वेळी लेखी नोटीस देऊन फर्मावू शकेल.

तळमजल्याचे दरवाजे वगैरे रस्त्यावर बाहेरच्या बाजूने उघडता कामा नये.

**२२९.** (१) कलम २२७ किंवा २३४ अन्वये आयुक्तांची परवानगी घेतल्यावाचून कोणत्याही व्यक्तीने, रस्त्यात किंवा रस्त्यावर किंवा कोणत्याही रस्त्यातील कोणत्याही उघड्या पाटावर, नालीवर, विहिरीवर किंवा टाकीवर अशा रस्त्याच्या पाटाच्या, नालीच्या विहिरीच्या किंवा टाकीच्या कोणत्याही भागाला अडथळा होईल किंवा त्यावर अतिक्रमण होईल किंवा त्यांच्यावर येईल किंवा तो व्यापला जाईल अशा रीतीने कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप, किंवा अन्य बांधकाम—मग ते पक्के बसविलेले असो किंवा हलविण्याजोगे असो आणि कायम स्वरूपाचे असो किंवा तात्पुरत्या स्वरूपाचे असो—किंवा कोणतीही खिळणी बांधता किंवा उभारता कामा नये.

ज्यामुळे रस्त्यात अडथळा होतो अशा बांधकामास किंवा खिळणीस मनाई.

(२) कलम २३९, पोट-कलम (१), खंड (ग) ज्यास लागू होतो अशा कोणत्याही बांधकामास किंवा वस्तूस या कलमातील काहीही लागू होते असे मानले जाणार नाही.

**२३०.** (१) आयुक्तांच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही व्यक्तीने—

रस्त्यात वस्तू ठेवणे इत्यादीस मनाई.

(अ) कोणत्याही रस्त्यावर किंवा कोणत्याही रस्त्यातील कोणत्याही उघड्या पाटावर, नालीवर किंवा विहिरीवर किंवा कोणत्याही सार्वजनिक जागेत, त्यास अडथळा येईल किंवा त्यावर, अतिक्रमण होईल अशा रीतीने कोणताही गाळा, खुर्ची, बाक, पेटी, शिडी, गासडी किंवा अन्य वस्तू मांडता किंवा ठेवता काम नये.

(ब) कोणत्याही रस्त्यावर किंवा कोणत्याही रस्त्यातील उघड्या पाटावर, नालीवर, विहिरीवर किंवा टाकीवर अशा रस्त्याच्या पृष्ठभागापासून बारा फुटापेक्षा कमी उंचीवर कोणताही फलक किंवा खुर्ची कोणत्याही इमारतीच्या जोत्याच्या रेषेबाहेर पुढे आणता कामा नये.

(क) रस्त्यालगत असलेल्या इमारतीच्या कोणत्याही भिंतीला किंवा भागाला पूर्वोक्त उंचीपेक्षा कमी उंचीवर दुसरे काहीही जोडता कामा नये किंवा त्यापासून लोंबते सोडता कामा नये.

(२) पोट-कलम (१), खंड (क) मधील कोणतीही गोष्ट, बांधकाम सामानास लागू होणार नाही.

आयुक्तास, या अधिनियमाचे उल्लंघन करून उभारलेली, ठेवलेली फेरीने विकण्यात येणारी किंवा विक्रीसाठी मांडलेली कोणतीही वस्तू, नोटीस न देता काढून टाकता येईल.

**२३१.** आयुक्तास नोटीस न देता—

(अ) नियत दिवसानंतर, या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यावर किंवा कोणत्याही उघड्या पाटावर, नालीवर, विहिरीवर किंवा टाकीवर उभारण्यात किंवा उभी करण्यात येईल अशी कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप, किंवा अन्य बांधकाम—मग ते पक्के बसवलेले असो किंवा हलविण्याजोगे असो आणि कायम स्वरूपाचे असो किंवा तात्पुरत्या स्वरूपाचे असो किंवा कोणतीही खिळणी ;

(ब) या अधिनियमाचे उल्लंघन करून कोणत्याही जागी किंवा जागेवर ठेवलेला, मांडलेला किंवा जागेपासून पुढे आणलेला, तिला जोडलेल्या किंवा तिच्यापासून लोंबते सोडलेला, कोणताही गाळा, खुर्ची, बाक, पेटी, शिडी, गासडी, फळी, खण किंवा अन्य कोणतीही वस्तू ;

(क) या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून कोणत्याही सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक रस्त्यावर फेरीने विकण्यात येणारा किंवा विक्रीसाठी मांडलेला कोणताही जिन्नस व असा जिन्नस ज्यात किंवा ज्यावर ठेवला असेल असे कोणतेही वाहन, पुडके, पेटी, किंवा अन्य कोणतीही वस्तू, काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल.

नियत दिवसांपूर्वी उभारलेले किंवा केलेले कोणतेही बांधकाम किंवा खिळणी काढून टाकण्याविषयी फर्मावण्याचा अधिकार.

**२३२.** जर कोणत्याही जागेचा लगत किंवा समोर किंवा जोडून कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा अन्य बांधकाम किंवा खिळणी बांधणे किंवा उभारणे या अधिनियमान्वये बेकायदेशीर होईल व नियत दिवसांपूर्वी ते बांधण्यात किंवा उभारण्यात आले असेल तर आयुक्तास, अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देवून उक्त भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा अन्य बांधकाम किंवा वस्तू काढून टाकण्याविषयी फर्माविता येईल;

परंतु, जर कोणत्याही बाबतीत असे बांधकाम किंवा खिळणी कायदेशीररित्या बांधण्यात किंवा उभारण्यात आली असेल तर, ती काढून टाकल्यामुळे किंवा तीत फेरफार केल्यामुळे जिची हानी किंवा नुकसान होईल अशा प्रत्येक व्यक्तीस आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे.

सार्वजनिक रस्त्यांमध्ये जनावरांना दोरीने बांधून ठेवण्यास मनाई.

**२३३.** (१) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात कोणत्याही जनावरास दोरीने बांधून ठेवता कामा नये किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरांतील कोणत्याही व्यक्तीस त्याला दोरीने बांधून ठेवावयास लावता कामा नये किंवा बांधून ठेवण्यास परवानगी देता कामा नये.

(२) आयुक्त किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी पूर्वी सांगितल्याप्रमाणे दोरीने बांधून ठेवलेल्या कोणत्याही जनावराला तेथून हलवून पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करू शकेल किंवा पोलीस अधिकारी अशा जनावराला तेथून हलवू शकेल व भटकताना आढळलेल्या जनावराची ज्याप्रमाणे व्यवस्था लावण्यात येते, त्याप्रमाणे त्याने अशा जनावराची व्यवस्था केली पाहिजे.

## उत्सवाच्या प्रसंगी, रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणे

**२३४.** [1] [ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रातील पोलीस आयुक्ताच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या आणि अन्यत्र जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहमतीने] आयुक्तास, कोणत्याही रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यासाठी लेखी परवानगी देता येईल.

आयुक्तास उत्सवांच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप इत्यादी उभारण्यास परवानगी देता येईल.

## रस्त्यामध्ये किंवा रस्त्याजवळ कामे करण्यासंबंधी तरतुदी

**२३५.** जेव्हा जेव्हा कोणत्याही रस्त्याची जमीन किंवा फरसबंदी महानगरपालिकेच्या वतीने कोणतेही काम करण्यासाठी आयुक्ताच्या किंवा कोणत्याही नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल तेव्हा तेव्हा ज्या कामासाठी ती खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल ते काम पूर्ण करण्यात आले पाहिजे आणि अशी जमीन किंवा फरसबंदी शक्य तितक्या त्वरेने भरली पाहिजे. पुन्हा बसविली पाहिजे व ती पूर्वी होती तशी केली पाहिजे; आणि काम पूर्ण झाल्यानंतर खणून काढलेली जी कोणतीही माती व सामान शिल्लक राहील ते आणि अशा कामामुळे झालेला सर्व कचरा विलंब न लावता काढून टाकला पाहिजे.

नगरपालिकेच्या कोणत्याही प्रयोजनासाठी रस्ता फोडला असेल तेव्हा तो विलंब न लावता पूर्ववत करणे.

**२३६.** (१) पूर्वोक्त असे कोणतेही काम किंवा कोणत्याही रस्त्यामध्ये कायदेशीररीत्या करता येईल असे कोणतेही काम चालू असेल तेव्हा, आयुक्तास, उक्त रस्ता वाहतुकीसाठी किंवा त्यास योग्य वाटेल अशा प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णत: किंवा अंशत: बंद करण्यात येईल असा निदेश देता येईल; आणि त्याने ज्या मर्यादिपर्यंत वाहतूक बंद करण्याविषयी निदेश दिला असेल त्या मर्यादिपर्यंत वाहतुकीस मनाई करण्यासंबंधीचा आदेश ठळक जागी लावला पाहिजे व अशा रस्त्यात वाहतूक बंद करण्यासाठी किंवा नियंत्रित करण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा कांबी, साखळ्या किंवा खांब अशा रस्त्यामध्ये किंवा रस्त्यावर आडवे लावून ठेवले पाहिजेत.

ज्या रस्त्यात काम चालू असेल तो रस्ता आयुक्तास बंद करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या परवानगीवाचून किंवा अन्य कायदेशीर प्राधिकारावाचून अशा रीतीने लावून ठेवलेली कांब, साखळी किंवा खांब काढून टाकता कामा नये किंवा वाहतुकीस मनाई करण्यासंबंधीचा जो आदेश अशा रीतीने लावला असेल त्याचे उल्लंघन करता कामा नये.

**२३७.** महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही रस्त्यात कोणतेही काम चालू असताना, आयुक्ताने वाजवी रीतीने व्यवहार्य असेल तितपत, वाहतूक चालू राहण्यासाठी किंवा तिचा मार्ग वळवण्यासाठी अशा रस्त्यातून ज्या जागांकडे जाता येते, त्या सर्व जागांकडे जाण्यायेण्यासाठी आणि उक्त काम चालू केल्यामुळे ज्या कोणत्याही जलनि:सारणाच्या, पाणी पुरवठ्याच्या किंवा दिवाबत्तीच्या साधनांच्या बाबतीत अडथळा आला असेल, अशा गोष्टींसाठी योग्य ती व्यवस्था केली पाहिजे.

कोणत्याही रस्त्यात नगरपालिकेचे काम चालू असताना वाहतूक, इत्यादीसाठी आयुक्ताने व्यवस्था करणे.

---

१ मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६, कलम ३, अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आला.

कोणत्याही रस्त्यात नगरपालिकेचे काम चालू असताना सार्वजनिक सुरक्षिततेसाठी बाळगावयाची सावधगिरी.

**२३८.** (१) महानगरपलिकेच्या वतीने कोणत्याही रस्त्यात कोणतेही काम चालू असताना आयुक्ताने—

(अ) अपघात होऊ नये म्हणून लागून असलेल्या इमारतींना टेकू लावून व त्यांचे संरक्षण करून योग्य ती सावधगिरी बाळगली पाहिजे;

(ब) ज्या कोणत्याही जागी माती किंवा फरसबंदी खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल त्या जागेला कुंपण घातले पाहिजे व तिचे रक्षण केले पाहिजे;

(क) अशा कोणत्याही जागेजवळ किंवा कलम २३६ अन्वये ज्या कोणत्याही कांबी, साखळ्या किंवा खांब लावले असतील त्यांच्याजवळ अशी जागा खोदलेली किंवा फोडलेली राहील तोपर्यंत किंवा अशा कांबी, साखळ्या किंवा खांब लावलेले असतील तोपर्यंत जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना धोक्याची सूचना मिळण्यास पुरेसे असे दिवे प्रत्येक रात्री लावून ठेवले पाहिजेत.

(२) कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा कायदेशीर प्राधिकारावाचून या कलमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी लावलेले किंवा कामी लावलेले लाकडी टेकू किंवा कुंपण काढून टाकता कामा नये किंवा ठेवलेला कोणताही दिवा काढून टाकता किंवा विझवता कामा नये.

परवानगी वाचून रस्ते न खोदणे किंवा न फोडणे किंवा त्यावर बांधकामाची सामग्री न ठेवणे.

**२३९.** (१) आयुक्त किंवा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा अन्य कायदेशीर प्राधिकारावाचून—

(अ) कोणत्याही रस्त्याचा भाग असणारी माती किंवा फरसबंदी किंवा कोणतीही भिंत, कुंपण, खांब, साखळी किंवा अन्य सामान किंवा वस्तू खोदता, फोडता, काढता, घेता किंवा तीत कोणताही फेरफार करता किंवा तिची कोणत्याही प्रकारे खराबी करता कामा नये;

(ब) कोणत्याही रस्त्यात बांधकामाची कोणतीही सामग्री ठेवता कामा नये किंवा

(क) कोणत्याही रस्त्यात कोणत्याही प्रकारच्या कामाच्या प्रयोजनासाठी कोणतीही परांची किंवा कोणतीही तात्पुरती उभारणी उभारता कामा नये किंवा कमावलेला चुना तयार करण्यासाठी किंवा विटा, चुना, कचरा किंवा अन्य सामान ठेवण्यासाठी अशा रस्त्यात कोणतेही खांब, कांबी, कठडे, फळ्या, किंवा अन्य वस्तू लावून कोणत्याही जागेला कुंपण घालता कामा नये.

(२) पोट-कलम (१), खंड (ख) किंवा (ग) अन्वये दिलेली कोणतीही परवानगी आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, ज्या व्यक्तीस अशी परवानगी देण्यात आली होती तिला त्याने निदान चोवीस तासांची लेखी नोटीस दिल्यावर समाप्त करता येईल.

(३) ज्या बाबतीत बांधकाम सामग्री कोणत्याही रस्त्यात ठेवण्यासाठी पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये परवानगी मिळण्याकरिता अर्ज करण्यात आला असेल आणि अर्जाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत अर्जदारास कोणतेही उत्तर पाठविण्यात आले नसेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत जी कोणतीही बांधकाम सामग्री किंवा कोणतीही परांची किंवा कोणतीही तात्पुरती उभारणी किंवा कुंपणाच्या रूपाने जे कोणतेही खांब, कांबी, कठडे, फळ्या किंवा अन्य वस्तू पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परवानगीवाचून किंवा प्राधिकारावाचून कोणत्याही रस्त्यात ठेवण्यात किंवा उभारण्यात आल्या असतील किंवा ज्या अशा परवानगीने किंवा प्राधिकारानुसार ठेवण्यात किंवा उभारण्यात येऊन पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्यात आल्या नसतील त्या नोटीस न देता काढून टाकण्याची व्यवस्था आयुक्तास करता येईल.

**२४०.** ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणतीही परवानगी दिली आहे अशा प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वत:च्या खर्चाने, जेथे माती किंवा फरसबंदी खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल किंवा जेथे कोणतीही बांधकाम सामग्री ठेवण्यात आली असेल किंवा कोणतीही परांची उभारणी किंवा अन्य वस्तू उभारण्यात आली असेल त्या जागेस योग्य रीतीने कुंपण घालण्याची व तिची राखण करण्याची व्यवस्था केली पाहिजे. आणि अपघात टाळण्यासाठी दिवाबत्ती करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतीत अशा जागी रात्रीच्या वेळी चांगल्या प्रकारे दिवाबत्ती करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

ज्यांना कलम २३९ अन्वये परवानगी दिली असेल त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी बाळगावयाची सावधगिरी.

**२४१.** (१) ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा फोडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती अन्य कायदेशीर प्राधिकारानुसार कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदील किंवा फोडील अशा प्रत्येक व्यक्तीने, ज्या कामासाठी ती खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल ते काम शक्य तितक्या त्वरेने पुरे केले पाहिजे आणि आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने विलंब न लावता अशी जमीन भरली पाहिजे व खोदलेल्या किंवा फोडलेला रस्ता किंवा फरसबंदी पुन्हा बसविली पाहिजे व पूर्वी होती तशी करून दिली पाहिजे.

(२) जर उक्त व्यक्तीने पूर्वी सांगितल्याप्रमाणे असा रस्ता किंवा फरसबंदी पुन्हा बसविण्यात व पूर्वी होती तशी करून देण्यात कसूर केल्यास, आयुक्तास, असा रस्ता किंवा फरसबंदी पूर्ववत करता येईल, आणि असे करण्यासाठी त्यास आलेला खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे.

कलम २३९ अन्वये परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी रस्ते इत्यादी पूर्ववत केलेच पाहिजेत.

**२४२.** ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा फोडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती कोणत्याही अन्य कायदेशीर प्राधिकारानुसार कोणतेही काम करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदील किंवा फोडील अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त लेखी नोटिशीद्वारे वाहतूक चालू राहण्यासाठी किंवा तिचा मार्ग वळवण्यासाठी अशा रस्त्यातून ज्या जागेकडे जाता येते त्या जागांकडे जाण्यायेण्यासाठी आणि उक्त काम चालू केल्यामुळे ज्या कोणत्याही जलनि:सारणाच्या, पाणी पुरवठ्याच्या किंवा दिवाबत्तीच्या साधनांच्या बाबतीत अडथळा येईल त्यासाठी आपले समाधान होईल अशा रीतीने तरतूद करण्याविषयी फर्मावू शकेल.

कलम २३९ अन्वये परवानगी दिलेल्या व्यक्तींनी वाहतूक इत्यादीसाठी करावयाची तरतूद.

**२४३.** (१) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने लेखी आदेश देऊन जी इमारत अगोदरच बांधण्यात आली असेल किंवा नव्याने बांधावयाची असेल किंवा पुन्हा बांधावयाची किंवा दुरुस्त करावयाची असेल व जी दोन किंवा अधिक रस्ते ज्या ठिकाणी मिळतात अशा ठिकाणी असेल अशा कोणत्याही इमारतीचा कोपरा वर्तुळाकार करण्याविषयी किंवा तो ठरविल अशा उंचीपर्यंत व अशा रीतीने तो तिर्यक करण्याविषयी फर्माविता येईल आणि अशा आदेशात अशा इमारतीच्या अंगभूत जागेत आवाराची भिंत, कुंपण किंवा वई किंवा अन्य कोणतेही बांधकाम बांधण्यासंबंधी किंवा कोणतेही झाड लावण्यासंबंधी किंवा ते तेथे राहू देण्यासंबंधी त्यास आवश्यक वाटतील अशा शर्ती घालता येतील.

रस्त्यांच्या कोपऱ्यावरील इमारती.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशामुळे झालेल्या कोणत्याही हानी किंवा नुकसानीबद्दल आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे.

**[1][ वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद.**

वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्यासंबंधातील फी किंवा शुल्क यांसाठी करण्याची तरतूद.

**२४३-अ.** (१) आयुक्तास, पोलीस आयुक्ताशी किंवा पोलीस आयुक्त नसेल त्याबाबतीत महापालिका क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांच्या अधिकार श्रेणीमध्ये सर्वात वरिष्ठ दर्जा असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर, वेळोवेळी, सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागामध्ये त्याला योग्य वाटतील अशा जागी वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे म्हणून राखून ठेवता येतील.

(२) आयुक्तास, महानगरपलिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीकडून तिने वाहन उभे करून ठेवण्यासाठी किंवा थांबवण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरिता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी त्याला योग्य वाटेल अशी फी, किंवा शुल्क आकारता येईल.]

## आकाशचिन्हे व जाहिराती

आकाशचिन्हां-बाबत विनियम.

**२४४.** (१) कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, नियमांनी विहित करण्यात येईल अशा प्रकारचे कोणतेही आकाशचिन्ह उभारता, लावता किंवा ठेवता कामा नये-- मग ते नियत दिवशी अस्तित्वात असो वा नसो [2][आकाशचिन्ह हे चलचित्रपटातील, रंगभूमीवरील नाटकातील किंवा रंगभूमीवरील इतर प्रयोगातील कोणत्याही दृश्यांचे चित्रण करणारे भिंतीपत्रे असेल त्याबाबतीत, अशा भिंतीपत्रांची आयुक्तांकडून पूर्व तपासणी झाल्याशिवाय आणि असे भिंतीपत्र उभारल्यामुळे किंवा लावल्यामुळे सभ्यतेचा किंवा नितीमत्तेचा भंग होण्याची शक्यता नाही याबद्दल त्याची खात्री झाल्याशिवाय अशी परवानगी देता कामा नये. या कलमाखालील परवानगी ] प्रत्येक वेळी ती दिल्याच्या किंवा तिचे नवीकरण केल्याच्या तारखेपासून [3][जास्तीत जास्त दोन वर्षाच्या कालावधीसाठी देता येईल किंवा तिचे नवीकरण करता येईल ] मात्र अशी परवानगी पुढील बाबतीत निरर्थक असल्याचे मानले जाईल या अटीच्या अधीन असेल—

(अ) शहर अभियंत्यांच्या निदेशान्वये आकाशचिन्ह मजबूत करण्यासाठी त्यात जी कोणतीही वाढ करावयाची असेल त्याव्यतिरीक्त त्यात अन्य कोणतीही वाढ करण्यात येईल तर;

(ब) अशा आकाशचिन्हात किंवा त्याच्या कोणत्याही भागात कोणताही बदल करण्यात येईल तर;

(क) असे आकाशचिन्ह किंवा त्याचा कोणताही भाग अपघातामुळे जीर्ण झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे पडेल तर;

(ड) ज्या कोणत्याही इमारतीवर किंवा बांधकामावर असे आकाशचिन्ह उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल त्यात कोणतीही वाढ किंवा फेरफार करण्यात आला व त्यामुळे असे आकाशचिन्हे किंवा त्याचा कोणताही भाग हलवण्यात आला तर;

(ई) ज्या इमारतीवर किंवा बांधकामावर असे आकाशचिन्हे उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल ती इमारत किंवा बांधकाम रिकामे झाले किंवा पाडून टाकण्यात किंवा नष्ट करण्यात आले तर;

---

१ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ द्वारे शीर्ष व कलम २४३-अ समाविष्ट केले.

२ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ४२, कलम २० द्वारे अशी "लेखी परवानगी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, दुसऱ्या अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जेव्हा नियत दिवसानंतर कोणत्याही जमिनीवर, इमारतींवर किंवा बांधकामावर कोणतेही आकाशचिन्ह उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात येईल तेव्हा, यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे परवानगी देण्यात आली असेल ती खेरीज करून व त्याव्यतिरीक्त अशा जमिनीच्या, इमारतीच्या, किंवा बांधकामाच्या मालकाने किंवा भोगवटादाराने असे आकाशचिन्ह या कलमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून उभारले, लावले किंवा ठेवले आहे असे मानले जाईल, मात्र असे उल्लंघन आपल्या नोकरीत किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या व्यक्तीने केले होते किंवा त्याकडे आपण डोळेझाक केली नव्हती असे तो सिद्ध करील तर, ते त्याने केले होते असे मानले जाणार नाही.

(३) जर कोणतेही आकाशचिन्ह या कलमाच्या तरतुदीविरुद्ध उभारण्यात लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल किंवा कोणत्याही कालावधीसाठी ते उभारण्यासाठी, लावण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी देण्यात आलेली परवानगी संपली असेल किंवा अशी परवानगी निरर्थक झाली असेल तर, आयुक्त लेखी नोटिशीद्वारे ज्या जमिनीवर, इमारतीवर किंवा बांधकामावर असे आकाशचिन्ह उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल त्या जमिनीच्या, इमारतीच्या, किंवा बांधकामाच्या मालकास किंवा भोगवटादारास ते खाली उतरवून काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

**२४५.** (१) आयुक्त लेखी, नोटिशीद्वारे, कोणत्याही जमिनीच्या, इमारतीच्या, भिंतीच्या जाहिरात फलकाच्या किंवा बांधकामाच्या मालकास किंवा भोगवटादारास अशा जमिनीवरील, इमारतीवरील, भिंतीवरील, जाहिरात फलकावरील किंवा बांधकामावरील कोणतीही जाहिरात अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत खाली उतरवण्याविषयी किंवा काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

जाहिरातीचे नियमन व नियंत्रण.

(२) अशा कालावधीत अशी जाहिरात खाली उतरवण्यात किंवा काढून टाकण्यात आली नाही तर आयुक्तास, ती खाली उतरवण्याची किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल, व त्यासाठी वाजवी रीतीने झालेला खर्च अशा मालकाने किंवा व्यक्तीने दिला पाहिजे.

[१][(३) चलचित्रपट, रंगभूमीवरील नाटक किंवा रंगभूमीवरील इतर प्रयोग यातून घेतलेले दृश्य चित्रीत करणाऱ्या भिंतीपत्रांच्या बाबी सोडून, ह्या कलमाच्या तरतुदी] पुढील कोणत्याही जाहिरातीस लागू होणार नाहीत :--

(अ) कोणत्याही इमारतीच्या खिडकीच्या आत प्रदर्शित केलेली जाहिरात ;

(ब) जाहिरात ज्या जमिनीवर किंवा इमारतीवर प्रदर्शित केली असेल त्या जमिनीवर किंवा इमारतीत चालवण्यात येत असलेल्या व्यापारासंबंधी किंवा धंद्यासंबंधी असलेली किंवा अशा जमिनीच्या, इमारतीच्या किंवा त्यामधील कोणत्याही मालाच्या कोणत्याही विक्रीसंबंधी असलेला किंवा ती भाड्याने देण्यासंबंधी असलेली किंवा अशा जमिनीवर किंवा इमारतीत करावयाच्या विक्रीसंबंधी, करमणुकीच्या प्रयोगासंबंधी किंवा भरावयाच्या सभेसंबंधी असलेली जाहिरात ;

(क) कोणत्याही रेल्वे प्रशासनाच्या कामकाजासंबंधी असलेली जाहिरात ;

(ड) कोणत्याही रेल्वे स्थानकाच्या आत किंवा रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या भिंतीच्या किंवा मालमत्तेच्या पृष्ठभागाचा जो कोणताही भाग कोणत्याही रस्त्यासमोर येत असेल त्या व्यतिरिक्त, अशा कोणत्याही भिंतीवर किंवा अन्य मालमत्तेवर प्रदर्शित केलेली जाहिरात.

---

१ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ४२, कलम २१ द्वारे "या कलमाचे उपबंध" मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

## धोकादायक जागा व जेथे माणसाच्या सुरक्षिततेस किंवा सोयीस बाधक असे काही बांधकाम करण्यात येत असेल त्या जागा

रस्त्याच्या लगतच्या कोणत्याही इमारतीवर काम चालू असताना कुडण घालणे.

**२४६.** (१) ज्या व्यक्तीने कोणतीही इमारत किंवा भिंत बांधण्याचे, पाडण्याचे किंवा पुन्हा बांधण्याचे किंवा कोणत्याही इमारतीच्या किंवा भिंतीच्या कोणत्याही भागात फेरफार करण्याचे किंवा दुरुस्त करण्याचे ठरविले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, ज्याबाबतीत कोणत्याही लगतच्या रस्त्यातील पायवाटेस त्यामुळे अडथळा होईल किंवा ती कमी सोयीची होईल अशा कोणत्याही बाबतीत, प्रथम योग्य व पुरेसे कुडण किंवा कुंपण घालण्याची आणि पुरेशी जागा असल्यास व आयुक्ताच्या मते तसे करणे इष्ट असल्यास, अशा कुडणाच्या किंवा कुंपणाच्या बाहेर वाटसरूंसाठी पायवाट म्हणून उपयोग होण्याकरिता सोईस्कर असा चबुतरा व त्यासाठी कठडा बांधण्याची व्यवस्था केल्याशिवाय असे काम सुरू करता कामा नये.

(२) आयुक्ताच्या लेखी पूर्व परवानगीवाचून कोणतेही कुडण किंवा कुंपण घालता कामा नये, आणि अशी परवानगी घेऊन घातलेले प्रत्येक कुडण किंवा कुंपण व पूर्वोक्त असा चबुतरा व कठडा लोकांच्या सुरक्षिततेसाठी व सोईसाठी आवश्यक असेल त्या अवधीत ते काम करणाऱ्या व्यक्तीने कायम ठेवला पाहिजे व आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने चांगल्या स्थितीत ठेवला पाहिजे ; आणि अपघात टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक असेल अशा रीतीने चांगल्या स्थितीत ठेवला पाहिजे; आणि अपघात टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतीत, उक्त व्यक्तीने रात्रीच्या वेळी अशा कुडणाच्या किंवा कुंपणाच्या जागी चांगल्या प्रकारे दिवाबत्तीची व्यवस्था केली पाहिजे.

(३) आयुक्त पूर्वोक्त व्यक्तीस लेखी नोटीस देऊन अशा रीतीने घातलेले कोणतेही कुडण किंवा कुंपण काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

धोक्याच्या जागा किंवा जेथे सुरक्षितेस किंवा सोयीस बाधक असे काम करण्यात येत असेल त्या जागा दुरुस्त करण्यासाठी व त्यास कुंपण घालण्यासाठी आयुक्ताने कार्यवाही करणे.

**२४७.** (१) जर आयुक्ताच्या मते, कोणतीही जागा, पुरेशी दुरुस्ती, संरक्षण, किंवा कुंपण यांच्या अभावी किंवा त्यावर करण्यात येत असलेल्या कोणत्याही कामांमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंना किंवा तेथे जाण्याचा कायदेशीर अधिकार असलेल्या व्यक्तींना किंवा तिच्या जवळपास राहणाऱ्या लोकांना धोक्याची असेल किंवा जर आयुक्तांच्या मते असे कोणतेही काम अशा व्यक्तीच्या सुरक्षिततेस किंवा सोयीस बाधक असेल तर, तो त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटिशीद्वारे उक्त जागा, दुरुस्त करण्यास, संरक्षित करण्यास किंवा तिला कुंपण घालण्यास किंवा तिच्यापासून असलेला धोका टाळण्यासाठी किंवा अशा व्यक्तीच्या सुरक्षिततेची किंवा सोयीची तरतूद करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करण्यास फर्मावू शकेल.

(२) अशी कोणतीही नोटीस देण्यापूर्वी किंवा अशा कोणत्याही नोटिशीची मुदत संपण्यापूर्वी उक्त जागेपासून असलेला धोका टाळण्यासाठी किंवा अशा कामाच्या ठिकाणी सुरक्षितता व सोय यांची तरतूद करण्यासाठी आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी तात्पुरती उपाययोजना करता येईल, आणि अशी तात्पुरती उपाययोजना करण्यासाठी आयुक्तास आलेला कोणताही खर्च ज्या जागेसंबंधी उक्त नोटीस दिली असेल त्या जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने दिला पाहिजे.

२४८. (१) ज्या कोणत्याही व्यक्तीने एखादी इमारत किंवा तिचा भाग पाडण्याचे ठरविले असेल त्या व्यक्तीने कलम २४६ अन्वये तिला जे कुडण किंवा कुंपण घालणे आवश्यक असेल त्याशिवाय आणखी सभोवतालची हवा धुळीमुळे दूषित होऊ नये म्हणून किंवा कोणताही दगडमातीचा ढिगारा, विटा, लाकडे व अन्य सामान पडण्यामुळे कोणतीही इजा किंवा नुकसान होऊ नये म्हणून अशा इमारतीच्या संपूर्ण उंचीपर्यंत तिच्या सर्व बाजूस पडदे लावण्याची व्यवस्था केल्यावाचून असे काम सुरू करता कामा नये.

इमारती पाडण्याचे काम चालू असताना करावयाच्या संरक्षक उपाययोजना.

(२) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून असे कोणतेही काम सुरू करण्यात आले तर, आयुक्तास, ते ताबडतोब बंद करण्याची व ते करणाऱ्या व्यक्तीस पोलीस अधिकाऱ्याकडून अशा जागेतून बाहेर घालवण्याची व्यवस्था करता येईल.

## रस्त्यांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे

२४९. (१) आयुक्ताने—

(अ) सार्वजनिक रस्ते, नगरपालिकेच्या बागा व खुल्या जागा, नगरपालिकेचे बाजार आणि महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या सर्व इमारती यांच्यामध्ये सोयीस्कर रीतीने दिवाबत्ती करण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे ;

सार्वजनिक रस्त्यांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे.

(ब) उक्त प्रयोजनासाठी आवश्यक असतील इतके दिवे, दिव्यांचे खांब व अन्य अंगभूत वस्तू मिळवल्या पाहिजेत, उभारल्या पाहिजेत व सुस्थितीत ठेवल्या पाहिजे ; आणि

(क) असे दिवे तेल, गॅस, वीज किंवा महानगरपालिका वेळोवेळी ठरवील असे अन्य साधन यांनी लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) आयुक्तास, असे दिवे लावण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही स्थावर मालमत्तेखाली, तिच्यावर तिच्या बाजूला किंवा तिच्यामधून विजेच्या तारा घालता येतील व सुस्थितीत ठेवता येतील आणि त्यास दिवे किंवा विजेच्या तारा नेण्याकरिता, लोंबत्या ठेवण्याकरिता किंवा त्यास आधार देण्याकरिता अशा मालमत्तेच्या आत किंवा वर खांब, बल्या, उभे खांब, आधार, टेकू, ब्रॅकेट व अन्य साधने बसवता येतील व सुस्थितीत राखता येतील व असे करण्यामुळे आयुक्त भरपाईच्या कोणत्याही मागणीस जबाबदार असणार नाही :

परंतु अशा तारा, खांब, बल्या, उभे खांब, आधार, टेकू, ब्रॅकेट व अन्य साधने यापासून कोणत्याही व्यक्तीस कमीत कमी गैरसोय किंवा उपद्रव्य होईल अशा रीतीने ती ठेवण्यात येतील.

## रस्त्यावर पाणी शिंपणे

२५०. आयुक्तास—

(अ) त्यास योग्य वाटेल अशा वेळी, अशा ऋतूत व अशा रीतीने रस्त्यावर पाणी शिंपण्यासाठी उपाययोजना करता येईल ;

रस्त्यावर पाणी शिंपण्यासाठी उपाययोजना.

(ब) उक्त प्रयोजनासाठी त्यास योग्य वाटतील अशी वाहने, जनावरे व उपकरण संच मिळवता येतील व सुस्थितीत राखता येतील.

### किरकोळ

रस्त्यावरील दिवे किंवा नगरपालिकेच्या मालकीची अन्य कोणतीही मालमत्ता काढून नेणे, इत्यादीस मनाई.

**२५१.** कोणत्याही व्यक्तीने कायदेशीर प्राधिकारावाचून—

(अ) कोणत्याही सार्वजनिक रस्त्यामध्ये किंवा नगरपालिकेची कोणती बाग, खुली, जागा किंवा बाजार किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेली इमारत यामध्ये लावलेला कोणताही दिवा, दिव्याचा खांब किंवा दिव्याची लोखंडी शलाका ;

(ब) असा कोणताही दिवा लावण्यासाठी असलेली कोणतीही विजेची तार ;

(क) अशी कोणतीही विजेची तार किंवा दिवा नेण्याकरिता, लोंबता ठेवण्याकरिता किंवा त्यास आधार देण्याकरिता असलेला कोणताही खांब, बल्ली, उभा खांब, आधार टेकू, ब्रॅकेट किंवा अन्य साधन ;

(ड) कोणत्याही रस्त्यावरील महानगरपालिकेची कोणतीही मालमत्ता ;

काढून नेता कामा नये, बुद्धिपुर:सर फोडता कामा नये, खाली फेकता कामा नये किंवा त्याची नुकसानी करता कामा नये ; आणि कोणत्याही व्यक्तीने असा कोणताही दिवा बुद्धिपुर:सर विझवता कामा नये किंवा अशा कोणत्याही दिव्याच्या, कोणत्याही, अंगभूत वस्तूची नुकसानी करता कामा नये.

एखाद्या व्यक्तींकडून चुकून दिवे इत्यादी फुटल्यास तिने मोडतोड दुरुस्त करणे.

**२५२.** जर एखाद्या व्यक्तीकडून निष्काळजीपणामुळे किंवा चुकून, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा नगरपालिकेच्या बाजारामध्ये किंवा बागेत किंवा सार्वजनिक जागेत किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या इमारतीमध्ये लावलेला दिवा फोडला जाईल किंवा कोणत्याही रस्त्यावरील, महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेची मोडतोड होईल किंवा तिचे नुकसान होईल तर, तिने अशा रीतीने तिच्याकडून झालेली मोडतोड दुरुस्त करण्यासाठी झालेला खर्च दिला पाहिजे.

## प्रकरण १५

## इमारतीसंबंधी विनियम

### इमारती बांधणे, इत्यादीसंबंधी नोटीसा

इमारत बांधण्याच्या उद्देशाची आयुक्तास नोटीस देणे.

**२५३.** (१) इमारत बांधण्याचा जिचा उद्देश असेल अशा प्रत्येक व्यक्तीने उपविधीत विहित केलेल्या नमुन्यात आणि उपविधीनुसार पुरवणे आवश्यक असलेली सर्व माहिती अंतर्भूत असलेली आपल्या उक्त उद्देशाची नोटीस आयुक्तास दिली पाहिजे.

(२) अशा प्रत्येक नोटिशीवर उपविधीत विहित केलेल्या रीतीने सही केली पाहिजे आणि याप्रमाणे विहित करण्यात येतील असे कागदपत्रे व नकाशे सोबत जोडले पाहिजेत.

(३) या प्रकरणात इमारत बांधणे म्हणजे—

(अ) कोणत्याही जागेवर—मग त्या ठिकाणी पूर्वी बांधकाम केलेले असो वा नसो--एखादी इमारत नव्याने बांधणे;

(ब) (एक) ज्या इमारतीच्या जोत्याच्या पातळीवरील तिच्या घनफळाच्या अर्ध्यापेक्षा अधिक भाग पाडण्यात आला असेल, जळला असेल, किंवा नष्ट झाला असेल अशी कोणतीही इमारत पुन्हा बांधणे,

(दोन) जिच्या जोत्याच्या पातळीवरील बाहेरच्या भिंतीच्या पृष्ठफळाच्या तीन चतुर्थांपेक्षा अधिक भाग पाडण्यात आला असेल अशी दगडी इमारत पुन्हा बांधणे, किंवा

(तीन) जिच्या बाहेरच्या भिंतीतील एकूण खांब किंवा तुळ्यांपैकी तीन चतुर्थांपेक्षा अधिक खांब किंवा तुळ्या पाडण्यात आल्या असतील अशी ढाचेदार इमारत पुन्हा बांधणे.

(क) मूलत: मानवी वस्तीसाठी न बांधलेल्या किंवा मूलत: अशा प्रयोजनासाठी बांधलेल्या, परंतु अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेल्या अशा कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे राहत्या घरात रूपांतर करणे ;

(ड) मूलत: फक्त एकच राहते घर म्हणून बांधलेल्या एखाद्या इमारतीचे एकापेक्षा अधिक राहत्या घरात रूपांतर करणे;

(ई) मूलत: धार्मिक पूजेअर्चेची जागा किंवा पवित्र स्थान म्हणून न बांधलेल्या कोणत्याही जागेचे किंवा इमारतीचे संरचनात्मक फेरफार करून धार्मिक पूजेअर्चेच्या जागेत किंवा पवित्र स्थानात रूपांतर करणे;

(फ) भिंती किंवा इमारती यांच्यामध्ये असलेल्या खुल्या जागेवर छप्पर किंवा आच्छादन घालून जे बांधकाम तयार होईल त्यासंबंधी छप्पर किंवा आच्छादन घालणे;

(ग) कोणतीही संरचनात्मक फेरफार करून इमारतीतील दोन किंवा त्यापेक्षा अधिक गाळ्यांचे त्याहून अधिक किंवा कमी गाळ्यांमध्ये रूपांतर करणे;

(ह) इमारतीच्या जलनि:सारण व्यवस्थेवर किंवा आरोग्यविषयक व्यवस्थेवर किंवा तिच्या स्थैर्यावर परिणाम होईल असा कोणताही संरचनात्मक फेरफार इमारतीमध्ये करणे;

(आय) जी इमारत मूलत: गाळा, दुकान, वखार किंवा गोदाम म्हणून वापरण्यासाठी बांधलेली नाही अशा कोणत्याही इमारतीचे अशा गाळ्यात, दुकानात, वखारीत किंवा गोदामात रूपांतर करणे किंवा

(ज) भिंतीच्या मालकामध्ये निहित नसलेल्या कोणत्याही रस्त्यालगतच्या किंवा जमिनीलगतच्या अशा भिंतीमध्ये, अशा रस्त्यावर किंवा जमिनीवर उघडणारे दार बांधणे;

आणि या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी वरील कामापैकी प्रत्येक काम हे नवीन इमारत बांधणे आहे असे मानले जाईल.

इमारतीत वाढ करणे इत्यादी संबंधीच्या उद्देशाची नोटीस आयुक्तास देणे.

२५४. (१) (अ) एखाद्या इमारतीत वाढ करण्याचा,

(ब) जी ढाचेदार इमारत नाही अशा इमारतीच्या बाबतीत तिची बाहेरची किंवा हद्दीची भिंत, किंवा जिचा तिच्या छपरास आधार मिळत असेल अशा कोणत्याही भिंतीचा जोत्याच्या पातळीवरील अर्ध्यापेक्षा अधिक भाग–असा अर्धा भाग चौरस फुटात मोजला पाहिजे–काढून टाकावा लागणार असेल किंवा पुन्हा बांधावा लागणार असेल अशा प्रकारचा कोणताही फेरफार किंवा दुरुस्ती अशा इमारतीत करण्याचा,

(क) एखाद्या ढाचेदार इमारतीत तिच्या पूर्वोक्त अशा भिंतीतील निम्म्यापेक्षा अधिक खांब किंवा तुळ्या काढाव्या लागणार असतील किंवा पुन्हा उभाराव्या लागणार असतील अशा प्रकारचा फेरफार किंवा दुरुस्ती किंवा ज्यात इमारतीच्या पूर्वोक्त अशा भिंतीचा, जोत्याच्या पातळीपासून पूर्वी सांगितल्याप्रमाणे चौरस फुटात मोजलेला अर्ध्यापेक्षा अधिक भाग, काढून टाकावा लागणार असेल किंवा पुन्हा उभारावा लागणार असेल, अशा प्रकारचा फेरफार किंवा दुरुस्ती करण्याचा;

(ड) एखाद्या इमारतीत—

(एक) ज्यात अशा इमारतीमधील कोणत्याही खोलीच्या, दोन किंवा अधिक वेगळ्या खोल्या बनवण्यासाठी त्या खोलीची पोट विभागणी करावी लागणार असेल; किंवा

(दोन) ज्यात अशा इमारतीमधील जाण्यायेण्याच्या मार्गाचे किंवा जागेचे एक किंवा अधिक खोल्यामध्ये रूपांतर करावे लागणार असेल, अशा प्रकारचा कोणताही फेरफार करण्याचा ;

(ई) एखाद्या रस्त्यालगत असलेली जी कोणतीही इमारत अशा रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल त्या इमारतीच्या कोणत्याही भागाची दुरुस्ती करण्याचा, तो काढून टाकण्याचा, बांधण्याचा, पुन्हा बांधण्याचा किंवा त्यात वाढ करण्याचा ;

(फ) एखाद्या इमारतीत--

(एक) ज्यात छप्पर बांधावे किंवा पुन्हा बांधावे लागणार असेल ;

(दोन) ज्यात छप्पराचे गच्चीत रूपांतर करावे लागणार असेल ;

(तीन) ज्यात गच्चीचे छप्परात रूपांतर करावे लागणार असेल ; किंवा

(चार) ज्यात उद्वाहन कूपक बांधावे लागणार असतील ;

अशा प्रकारचे कोणतेही काम करण्याचा-

(ग) ज्यामुळे एखादा मजला किंवा खोली बांधता येईल (तळमजला सोडून) अशा प्रकारची एखाद्या इमारतीची दुरुस्ती करण्याचा ;

(ह) बाहेरच्या भिंतीतील कोणतेही दार किंवा खिडकी कायमची बंद करण्याचा; किंवा

(आय) मुख्य जिना काढून टाकण्याचा किंवा पुन्हा बांधण्याचा किंवा त्याची जागा बदलण्याचा,

ज्या व्यक्तीचा उद्देश असेल अशा कोणत्याही व्यक्तीने उपविधीत विहित केलेल्या नमुन्यात आणि उपविधी अन्वये जी माहिती पुरविणे आवश्यक असेल अशी सर्व माहिती अंतर्भूत असलेली नोटीस आयुक्तास दिली पाहिजे.

(२) अशा प्रत्येक नोटिशीवर उपविधीत विहित केलेल्या रीतीने सही केली पाहिजे आणि त्यासोबत विहित करण्यात येतील असे कागदपत्र व नकाशे असले पाहिजेत.

**२५५.** जो कोणताही नकाशा, भाग, वर्णन, संरचनात्मक आराखडे किंवा संरचनात्मक परिगणन उपविधीत विहित केलेल्या रीतीने काढलेल्या, दिलेल्या, तयार केलेल्या किंवा सही केलेल्या नसतील तर त्या या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी पुरेशा म्हणून स्वीकारण्यास आयुक्ताने नकार दिला पाहिजे.

सादर केलेले नकाशे इत्यादी विहित केलेल्या रीतीने जर काढले वगैरे नसतील तर ते नाकारणे.

**२५६.** जर आयुक्ताने नियमानुसार दिलेल्या ज्या आदेशान्वये अधिक तपशील पुरविण्याविषयी फर्मावण्यात आले असेल अशा कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात आले नाही तर कलम २५३ किंवा २५४ अन्वये द्यावयाची नोटीस देण्यात आलेली नाही असे मानले जाईल.

आयुक्ताने दिलेल्या आदेशाचे अनुपालन न केल्याचा परिणाम.

## बांधकामाची सुरुवात

**२५७.** एखादी इमारत बांधण्याचा किंवा कलम २५४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे कोणतेही काम करण्याचा जिचा उद्देश आहे अशा प्रत्येक व्यक्तीने उपविधीन्वये विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा पर्यवेक्षणाखाली अशा अर्हताप्राप्त अभिकरणांमार्फत आणि अशा शर्तीच्या व निर्बंधाच्या अधीन राहून ती इमारत बांधली पाहिजे किंवा ते काम केले पाहिजे.

इमारतीचे व कामाचे पर्यवेक्षण.

**२५८.** कोणतेही बांधकाम किंवा काम सुरू करण्यास नियमान्वये परवानगी देण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी कलम २५३ किंवा २५४ अन्वये दिलेल्या नोटिशीत किंवा पुरविलेल्या माहितीत अंतर्भूत असलेल्या महत्त्वाच्या विपर्यस्त माहितीमुळे किंवा लबाडीच्या निवेदनामुळे किंवा आणखी कोणतीही माहिती जर पुरविण्यात आली असेल तर त्या माहितीमुळे, अशी परवानगी देण्यात आली होती अशी आयुक्ताची खात्री झाली तर, त्यास अशी परवानगी रद्द करता येईल, आणि त्याखाली केलेले कोणतेही काम हे त्याच्या परवानगीवाचून करण्यात आले आहे असे मानले जाईल.

अर्जदाराने महत्त्वाची विपर्यस्त माहिती दिल्याच्या कारणावरून परवानगी रद्द करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**२५९.** आयुक्तास, कोणत्याही वेळी एखाद्या इमारतीचे बांधकाम चालू असताना किंवा कलम २५४ मध्ये वर्णन केलेले असे कोणतेही काम चालू असताना तसे करण्याच्या आपल्या उद्देशाची आगाऊ नोटीस न देता, त्यांची पाहणी करता येईल.

इमारतीचे बांधकाम किंवा त्यात फेरफार करणे इत्यादी चालू असताना त्यांची पाहणी करणे.

नियमांच्या किंवा उपविधीच्या विरुद्ध सुरु केलेल्या बांधकामाच्या किंवा कामाच्या बाबतीत करावयाची कार्यवाही.

**२६०.** [१][(१) आयुक्त, या कलमाच्या आणि कलमे २६१, २६४, २६७ व ४७८ यांच्या प्रयोजनांकरिता राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, "पदनिर्देशित अधिकारी" म्हणून महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करता येतील.]

[२][(१-अ) जर एखादी इमारत बांधण्याचे किंवा कलम २५४ मध्ये वर्णन केलेले असे कोणतेही काम नियम किंवा उपविधीच्या तरतुदींविरुद्ध सुरु करण्यात किंवा करण्यात आले तर, [३][पदनिर्देशित अधिकारी] कलम २६४ अन्वये अशा इमारतीच्या किंवा कामाच्या बाबतीत कार्यवाही करणे त्यास आवश्यक वाटले नसेल तर,—

(अ) जी व्यक्ती अशी इमारत बांधत आहे किंवा असे काम करत आहे किंवा जिने अशी इमारत बांधली आहे किंवा काम केले आहे त्या व्यक्तीस, लेखी नोटीस देऊन अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी किंवा दिवसापूर्वी तिने किंवा याबाबत तिने रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने सही केलेल्या व [३][पदनिर्देशित अधिकारी] आयुक्ताच्या नावे लिहिलेल्या निवेदनाद्वारे अशी इमारत किंवा काम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याविषयी पुरेसे कारण दाखवण्यास फर्मावू शकेल, किंवा

(ख) उक्त व्यक्तीस, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी व अशा वेळी व जागी जातीने किंवा त्याबाबत तिने रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास व अशी इमारत किंवा काम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याविषयी पुरेसे कारण दाखवण्यास फर्मावू शकेल.

(२) अशी इमारत किंवा काम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याबद्दल [३][पदनिर्देशित अधिकारी] खात्री होईल अशा रीतीने कारण दाखवण्यात जर अशी व्यक्ती कसूर करील तर, [३][पदनिर्देशित अधिकारी] ती इमारत किंवा ते काम काढून टाकता येईल, त्यात फेरफार करता येतील किंवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे.

अधिनियमांच्या विरुद्ध सुरु करण्यात आलेली इमारत किंवा काम पाहणीच्या प्रयोजनासाठी तोडता येईल किंवा खुले करता येईल.

**२६१.** (१) जर कलम २६० मध्ये निर्दिष्ट केलेली अशी कोणतीही इमारत बांधण्यामध्ये किंवा असे कोणतेही काम करण्यामध्ये या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा कोणत्याही नियमाच्या, किंवा कोणत्याही उपविधीच्या विरुद्ध एखादी गोष्ट करण्यात आली आहे, किंवा अशा कोणत्याही तरतुदीन्वये, नियमान्वये किंवा उपविधीअन्वये करणे आवश्यक आहे, असे कोणतेही काम करण्यास आलेले नाही असा संशय येण्यास वाजवी कारण असेल; आणि जर, अशा इमारतीच्या किंवा कामाच्या निरीक्षणानंतर, ती इमारत पूर्ण झालेली आहे किंवा त्या गोष्टीची खात्री करून घेणे शक्य होणार नाही इतकी तिच्या कामात प्रगती झालेली आहे असे आढळून आले असेल तर [४][पदनिर्देशित अधिकारी] स्थायी समितीच्या मान्यतेने ज्या व्यक्तीने अशी इमारत बांधली आहे किंवा असे काम केले आहे किंवा जी कोणी व्यक्ती अशी इमारत बांधत आहे किंवा असे काम करत आहे त्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन अशा गोष्टीची खात्री करून देण्यास त्या इमारतीच्या जेवढ्या भागामुळे अडथळा येत असेल तेवढा भाग, अशा गोष्टींची खात्री करून घेणे शक्य होईल इतक्या मर्यादेपर्यंत तोडण्याची, खुला करण्याची किंवा पाडून टाकण्याची व्यवस्था करण्यास फर्मावू शकेल.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११ (१) द्वारे पोट-कलम (१) दाखल केले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ११ (१) द्वारे पोट-कलम (१) ला नवीन क्रमांक पोट-कलम (१-अ) देण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) द्वारे "आयुक्त" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "आयुक्त" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) त्यानंतर अशी इमारत बांधण्यात किंवा असे काम करण्यात या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या विरुद्ध काहीही करण्यात आलेले नाही आणि अशा कोणत्याही तरतुदीअन्वये, नियमान्वये किंवा उपविधीन्वये करणे असलेली कोणतीही गोष्ट वगळण्यात आलेली नाही असे आढळून आले तर, ती इमारत किंवा काम तोडल्यामुळे, खुले केल्यामुळे किंवा पाडल्यामुळे झालेले नुकसान किंवा हानी याबद्दल पूर्वोक्त व्यक्तीस आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे.

इमारती व कामे यासंबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी.

**२६२.** आयुक्तास, इमारतीचे बांधकाम किंवा पूर्वोक्त असे कोणतेही काम चालू असताना कोणत्याही वेळी किंवा ते पुरे झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, लेखी नोटीस देऊन, अशी इमारत बांधण्यामुळे किंवा असे काम करण्यामुळे ज्या बाबतीत अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होत असेल अशी कोणतीही बाब विनिर्दिष्ट करता येईल, आणि त्यास अशी इमारत बांधणाऱ्या किंवा असे काम करणाऱ्या व्यक्तीस किंवा जिने अशी इमारत बांधली आहे किंवा काम केले आहे त्या व्यक्तीस किंवा जिने अशी इमारत बांधली आहे किंवा असे काम केले आहे ती व्यक्ती नोटिशीच्या वेळी त्या इमारतीचा किंवा कामाचा मालक नसेल तर अशा इमारतीचा किंवा कामाचा जो मालक आहे त्यास अशा कोणत्याही तरतुदीच्या, नियमाच्या किंवा उपविधीच्या विरुद्ध केलेले कोणतेही काम सुधारण्यास किंवा अशा कोणत्याही तरतुदीन्वये, नियमान्वये किंवा उपविधीअन्वये करणे आवश्यक असेल परंतु जे करण्यात आले नसेल असे कोणतेही काम करण्यास फर्मावता येईल.

समाप्ती प्रमाणपत्रे भोगवटा करण्यास किंवा वापरण्यास परवानगी देणे.

**२६३.** (१) प्रत्येक व्यक्तीने, इमारत बांधण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर किंवा कलम २५४ मध्ये उल्लेख केलेले असे कोणतेही काम पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत, असे काम पूर्ण करण्यात आल्याची नोटीस, उपविधीत विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या रीतीने स्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र जोडून आयुक्ताच्या कार्यालयात आयुक्ताच्या स्वाधीन केली पाहिजे किंवा पाठवली पाहिजे किंवा स्वाधीन करवण्याची किंवा पाठवण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि अशा इमारतीची किंवा कामाची पाहणी करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सोयी आयुक्ताला दिल्या पाहिजेत आणि इमारतीचा भोगवटा करण्यास परवानगी मिळण्यासाठी तिने अर्ज केला पाहिजे.

(२) कोणत्याही व्यक्तीने—

(अ) आयुक्ताकडून त्याबाबत परवानगी मिळेपर्यंत किंवा,

(ब) काम पूर्ण केल्याची नोटीस मिळाल्यानंतर आयुक्ताने एकवीस दिवसांच्या आत उक्त परवानगी नाकारल्याचे कळवले नसेल तोपर्यंत ;

अशा कोणत्याही इमारतीचा भोगवटा करता कामा नये किंवा भोगवटा करण्यास परवानगी देता कामा नये किंवा कोणत्याही कामामुळे बाधा पोचलेली इमारत किंवा तिचा भाग वापरता कामा नये किंवा वापरण्याची परवानगी देता कामा नये.

**[1][ज्यामुळे नियमाचे किंवा उपविधीचे उल्लंघन होत असेल अशी पूर्वी कायदेशीररीत्या उभारलेली बांधकामे**

ज्यामुळे नियमांचे किंवा उपविधीचे उल्लंघन होत असेल अशी पूर्वी कायदेशीररीत्या बांधलेल्या झोपड्या किंवा छपऱ्या मोडण्यास किंवा त्यात फेरफार करण्यास फर्मावण्याचा अधिकार.

**२६३-अ.** (१) जर नियत दिवसापूर्वी उभारलेली किंवा बांधलेली कोणतीही झोपडी किंवा छपरी ही झोपड्या किवा छपऱ्या उभारण्यासंबंधी कोणत्याही नियमांच्या किंवा उपविधीच्या तरतुदीविरुद्ध असेल, आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशी झोपडी किंवा छपरी, किंवा त्याचा कोणताही भाग पाडून टाकणे किंवा त्यात फेरफार करणे आवश्यक आहे असे आयुक्तास वाटेल तर आयुक्त, अशा झोपडीच्या किंवा छपराच्या मालकास लेखी नोटीस देऊन अशी झोपडी किंवा छपरी किंवा त्याचा कोणताही भाग पाडून टाकण्यास किंवा त्यात फेरफार करण्यास किंवा अशा नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी मालकाच्या किंवा याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यांच्या सहीने आयुक्तांच्या नावे लिहिलेल्या पत्राद्वारे अशी झोपडी किंवा छपरी का पाडून टाकण्यात येऊ नये किंवा त्यात अशा रीतीने का फेरफार करण्यात येऊ नये याबद्दल पुरेसे कारण दर्शवण्यास फर्मावू शकेल.

(२) अशी व्यक्ती, अशी झोपडी किंवा छपरी किंवा त्याचा कोणताही भाग का नष्ट करू नये किंवा त्यात अशा रीतीने का फेरफार करण्यात येऊ नये याबद्दल आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने पुरेसे कारण दर्शविण्यात कसूर करील तर, तिने आयुक्ताकडून तिला तसे करण्यास फर्माविण्यात येईल अशा मुदतीत अशी झोपडी किंवा छपरी पाडून टाकली पाहिजे किंवा त्यात फेरफार केला पाहिजे व तसे करण्यात ती कसूर करील तर, आयुक्तास, अशी झोपडी किंवा छपरी पाडून टाकता येईल किंवा त्यात फेरफार करता येतील.

(३) आयुक्ताने, पूर्वी सांगितल्याप्रमाणे कोणतीही झोपडी किंवा छपरी पाडून टाकल्यामुळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे ज्या व्यक्तीची हानी किंवा नुकसान झाले असेल अशा प्रत्येक व्यक्तीस (झोपडी किंवा छपरी पाडून टाकण्याबद्दलचा किंवा त्यात फेरफार करण्याबद्दलचा कोणताही खर्च धरून) भरपाई दिली पाहिजे.]

**धोकादायक बांधकामे**

मोडकळीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली बांधकामे इत्यादी काढून टाकणे.

**२६४.** (१) कोणतेही बांधकाम (या संज्ञेत, इमारतीची कोणतीही भिंत, कठडा भिंत, फरसबंदी, जमीन, पायऱ्या, कठडे, दाराच्या किंवा खिडकीच्या चौकटी किंवा झडपा किंवा छप्पर, किंवा अन्य बांधकाम आणि कोणत्याही इमारतीस, भिंतीस, कठडा भिंतीस किंवा अन्य बांधकामास जोडलेली किंवा त्यापासून बाहेर येणारी किंवा त्यावर असलेली कोणतीही वस्तू यांचा समावेश होतो) मोडकळीस आलेले आहे किंवा पडण्यासारखे आहे किंवा त्यापासून अशा बांधकामाच्या किंवा त्याच्या शेजारच्या कोणत्याही बांधकामाचा किंवा जागेचा भोगवटा करणाऱ्या किंवा तीत जाणाऱ्या-येणाऱ्यास किंवा जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारे धोका आहे असे [2][पदनिर्देशित अधिकारी] कोणत्याही वेळी वाटेल तर त्यास, अशा बांधकामाच्या मालकास किंवा त्याच्या भोगवटादारास लेखी नोटीस देऊन, असे बांधकाम किंवा अशी वस्तू पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास किंवा यापैकी एक किंवा अधिक गोष्टी करण्यास आणि त्यापासून होणाऱ्या धोक्याच्या सर्व कारणांसह प्रतिबंध करण्यास फर्माविता येईल.

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम २ अन्वये हे शब्द, दाखल करण्यात आले.

२ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १३(१) द्वारे "आयुक्तास" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) तसेच आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर उक्त नोटिशीद्वारे उक्त मालकास किंवा भोगवटादारास ताबडतोब किंवा उक्त बांधकाम किंवा वस्तू पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास सुरूवात करण्यापूर्वी रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्या किंवा अन्य व्यक्तीच्या संरक्षणासाठी योग्य व पुरेसे फळ्यांचे कुडण किंवा कुंपण घालण्यास आणि अशा फळ्यांच्या कुंडणाच्या किंवा कुंपणाच्या बाहेरून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांसाठी पायवाट म्हणून उपयोग करण्यासाठी सोयीस्कर असा चबुतरा व लहान कठडा करण्यासाठी पुरेशी जागा असेल तर आणि [१][पदनिर्देशित अधिकारी] तसे करणे इष्ट वाटेल तर, असा कठडा तयार करण्यास फर्मावता येईल.

(३) मोडकळीस आलेल्या किंवा पडण्याच्या बेतात असलेल्या अशा बांधकामापासून तात्काळ धोका आहे असे [२][पदनिर्देशित अधिकारी] वाटत असेल तर, त्यास, पूर्वोक्त नोटीस देण्यापूर्वी किंवा नोटीशीची मुदत संपण्यापूर्वी उक्त बांधकामास, कुंपण घालता येईल, ते पाडता येईल, मजबूत करता येईल किंवा दुरुस्त करता येईल किंवा धोका टाळण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील किंवा आवश्यक असेल असे काम करून घेता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये [३][पदनिर्देशित अधिकारी] आलेला कोणताही खर्च बांधकामाच्या मालकाने किंवा भोगवटादाराने दिला पाहिजे.

(५) (अ) एखादा अर्ज आला असता किंवा अन्यथा, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बांधकामाचा मालक किंवा भोगवटादार ज्या रीतीने असे बांधकाम पाडू शकेल, मजबूत करू शकेल, काढून टाकू शकेल किंवा दुरुस्त करू शकेल अशी एकमेव किंवा सोयीस्कर रीत म्हणजे दुसऱ्या एखाद्या व्यक्तींच्या मालकीच्या असलेल्या शेजारच्या कोणत्याही जागेत प्रवेश करून तसे करणे ही होय, असे [४][पदनिर्देशित अधिकारी] मत असेल तेव्हा अशा व्यक्तीस तिचा कोणताही आक्षेप असल्यास तो सांगण्याची तिला संधी दिल्यानंतर, जर असा, आक्षेप घेण्यात आला नाही किंवा घेण्यात आलेला आक्षेप [४][पदनिर्देशित अधिकारी] बेकायदेशीर किंवा अपुरा वाटेल तर, [४][पदनिर्देशित अधिकारी] लेखी आदेशाद्वारे उक्त मालकास किंवा भोगवटादारास अशा शेजारच्या इमारतीत प्रवेश करण्यास प्राधिकृत करता येईल.

(ब) [४][पदनिर्देशित अधिकारी] सही असलेला असा प्रत्येक आदेश हा, जिच्या नावे तो दिला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनासाठी तिने नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस, तिने जागेच्या मालकास तसे करण्याचा आपला उद्देश असल्याची वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर, उक्त जागेमध्ये आपले सहायक व कामगार यांसह सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणत्याही वेळी प्रवेश करण्यास आणि आवश्यक ते काम करण्यास पुरेसा अधिकार असेल.

(क) या कलमान्वये कोणतेही काम पार पाडताना शेजारच्या मालकाच्या मालमत्तेस फारसे नुकसान पोचणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे, आणि ज्याच्या फायद्यासाठी काम करण्यात आले असेल अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने—

(एक) शक्य तितक्या त्वरेने काम पार पाडण्याची व्यवस्था केली पाहिजे;

(दोन) उक्त काम केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस भरपाई दिली पाहिजे.

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १३(२) द्वारे "आयुक्ताला" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३(३) द्वारे "आयुक्तास" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३(४) द्वारे "आयुक्ताला" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३(५) द्वारे "आयुक्त" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

इमारतींची नियतकालीक पाहणी.

**२६५.** (१) इमारतीचा प्रत्येक भाग आणि तदंगभूत प्रत्येक वस्तू तिच्यापासून धोका निर्माण होणार नाही अशा रीतीने दुरुस्त करून सुस्थितीत ठेवणे हे प्रत्येक इमारतीच्या मालकाचे अवश्य कर्तव्य असेल.

(२) आयुक्त, कोणत्याही इमारतीच्या मालकास लेखी नोटीस देऊन, उपविधींमध्ये विहित करण्यात येईल अशा मुदतीत व रीतीने इमारतीची पाहणी करून घेण्यास सांगू शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये पाहणी केल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत मालकाने कलम २६४ मधील अर्थानुसार बांधकामास मजबुती आणण्याच्या प्रयोजनासाठी पाहणीत आवश्यक म्हणून दर्शविलेल्या सर्व दुरुस्त्या करण्याचे काम अशा दुरुस्त्यांच्या संबंधातील या अधिनियमाच्या तरतुदींचे आणि नियमांचे व उपविधींचे पालन केल्यानंतर हाती घेतले पाहिजे आणि अशा दुरुस्त्या पूर्ण केल्यानंतर अशा दुरुस्त्या समाधानकारकरित्या केल्याबद्दल जिने अशी पाहणी केली त्या व्यक्तीच्या सहीचे एक प्रमाणपत्र आयुक्तास सादर केले पाहिजे.

(४) पोट-कलम (२) अन्वये केलेल्या प्रत्येक पाहणीचा अहवाल जिने अशी पाहणी केली त्या व्यक्तीने आयुक्तास ताबडतोब सादर केला पाहिजे आणि पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यात मालक कसूर करील तर, आयुक्तास या कलमान्वये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीअन्वये अशा इमारतीच्या बाबतीत त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करता येईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये आयुक्ताने केलेला खर्च मालकाने दिला पाहिजे.

बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

[१][**२६५अ.** (१) कलम २६५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या इमारतीच्या संबंधात,—

(एक) महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम २६३ अन्वये इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश "बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र" असा करण्यात आला आहे) महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल अशा बांधकाम अभियंत्याने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, आणि त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटादाराने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन, आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आयुक्तास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून आयुक्ताने निदेशात नमूद केलेल्या तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील.

---

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४ द्वारे कलम २६५-अ दाखल केले.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, आयुक्ताचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, जो मालक किंवा, यथास्थिती, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा, यथास्थिती, भोगवटादारास, कलम ३९८अ मध्ये तरतूद केलेल्या दंडासह शिक्षा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी, दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार उक्त कालावधीच्या आत, अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास, मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, या अधिनियमाच्या कलम ४०६ खालील ज्या न्यायाधीशाकडे अपील दाखल करण्यात येते यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्यप्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर, असा न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.]

इमारती-मधील धोक्याच्या खुल्या जागा.

**२६६.** इमारतीच्या कोणत्याही भागामधील कोणतीही खुली जागा ही, ज्यामुळे मानवी जीवितास धोका पोचण्याचा संभव आहे अशा ठिकाणी आहे असे आयुक्तास कोणत्याही वेळी वाटेल तर, त्यास, लेखी नोटीशीद्वारे अशी खुली जागा, गज, जाळ्या किंवा त्यास समाधानकारक वाटेल अशा रीतीने परिवेष्टित किंवा संरक्षित करण्यास भाग पाडता येईल.

## बेकायदेशीररीत्या केलेली कामे

बेकायदेशीररीत्या काम करवून घेणाऱ्या व्यक्तीस काढून टाकण्याविषयी निदेश देण्याचे [१][पदनिर्देशित अधिकारी] अधिकार.

**२६७.** (१) कोणत्याही जागेमध्ये कोणतीही इमारत बांधण्याचे किंवा कलम २५४ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम बेकायदेशीररीत्या सुरू केलेले आहे किंवा बेकायदेशीररीत्या करण्यात येत आहे अशी [१][पदनिर्देशित अधिकारी] खात्री झाली तर त्यास, लेखी नोटीशीद्वारे असे बांधकाम किंवा अन्य काम करवून घेणाऱ्या किंवा करणाऱ्या व्यक्तीस ताबडतोब थांबवण्यास भाग पाडता येईल.

(२) जर असे बांधकाम किंवा करण्यात येणारे काम ताबडतोब थांबवण्यात आले नाही तर, [३][पदनिर्देशित अधिकारी] असे बांधकाम किंवा काम करवून घेणाऱ्या किंवा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा जागेमधून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत काढून टाकता येईल आणि त्यास त्याच्या परवानगीशिवाय अशा व्यक्तीस त्या जागेत पुन्हा प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करण्याची व्यवस्था करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही उपाययोजना करण्यासाठी झालेला खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे.

अवैध इमारतीवर शास्ती बसविणे.

[४][**२६७अ.** (१) जो कोणी, —

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून आपल्या जमिनीवर ;

(ब) प्रादेशिक नियोजन व नगररचनेशी संबंधित कायद्यान्वये मान्यता न घेता तयार केलेल्या आपल्या मालकीच्या जागेवर ;

(क) या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा परविधी अथवा हा अधिनियम किंवा असा नियम किंवा उपविधी यांअन्वये वैधरीत्या दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली मागणी यांचा भंग करून आपल्या जमिनीवर ; किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करून महानगरपालिका, अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर ;

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल :

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १४(१) द्वारे "आयुक्त" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम १४(३) द्वारे समास टिपेत "आयुक्त" या मजकूराएवजी हा मजकूर दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १४(२) द्वारे "आयुक्त" या मजकूराएवजी हा मजकूर समाविष्ट केला.

४ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ द्वारे कलम २६७अ समाविष्ट करण्यात आले.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही— मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल.]

**जागा सोडावयास लावण्याचा अधिकार**

**२६८.** (१) अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदीत तद्विरुद्ध काहीही असले तरी, आयुक्तास, पुढील बाबतीत लेखी नोटीशीद्वारे, ताबडतोब किंवा अशा नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग सोडावयास लावता येईल— विवक्षित परिस्थितीमध्ये कोणतीही इमारत सोडावयास लावण्याचा आयुक्ताचा अधिकार.

(अ) कलम २६३ चे उल्लंघन करून अशा इमारतीचा किंवा तिच्या भागाचा भोगवटा बेकायदेशीररीत्या केला असेल तर;

(ब) जर अशा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या संबंधात नोटीस देण्यात आली असेल आणि अशा नोटीशीद्वारे कोणताही विद्यमान जिना, गॅलरी मार्ग किंवा जिन्याचा टप्पा यात फेरफार करण्याविषयी किंवा तो पुन्हा बांधण्याविषयी फर्मावण्यात आले असेल अशा नोटीशीत विनिर्दिष्ट केलेली कामे सुरू करण्यात किंवा पूर्ण करण्यात आलेली नसतील तर ;

(क) कलम २६४ च्या अर्थांतर्गत अशी इमारत किंवा तिचा भाग मोडकळीस आला असेल किंवा त्यापासून धोका निर्माण झाला असेल तर ;

(२) अशा प्रत्येक नोटीशीत आयुक्ताने अशी इमारत किंवा तिचा भाग सोडण्यासाठी आवश्यक असलेली कारणे स्पष्टपणे विनिर्दिष्ट केली पाहिजेत.

(३) अशी लेखी नोटीस अशा जागांच्या कोणत्याही भागावर लावल्याने अशा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या भोगवटादारांना योग्य ती सूचना देण्यात आली आहे असे मानले जाईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये नोटीस आल्यावर, ज्या इमारतीसंबंधाने किंवा इमारतीच्या ज्या भागासंबंधाने अशी नोटीस देण्यात आली असेल त्या इमारतीचा किंवा त्या भागाचा भोगवटा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, नोटीशीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी इमारत किंवा भाग सोडला पाहिजे आणि जोपर्यंत अशी नोटीस मागे घेण्यात येणार नाही तोपर्यंत, कोणत्याही व्यक्तीने कायदेशीररीत्या तिला करता येईल असे कोणतेही काम पूर्ण करण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी अशा इमारतीत किंवा तिच्या भागात प्रवेश करता कामा नये.

(५) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (४) चे उल्लंघन करून वर्तन करील तिला अशा इमारतीतून किंवा तिच्या भागातून, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून काढून टाकण्याविषयी आयुक्त निदेश देऊ शकेल.

(६) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटीशीच्या अनुरोधाने जिने एखादी जागा सोडलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीकडून अर्ज आल्यावर आयुक्ताने अशी नोटीस मागे घेण्यात आली असता कोणत्याही संरचनात्मक फेरफारामुळे किंवा बांधकाम पाडल्यामुळे भोगवट्याच्या सारत: त्याच शर्ती चालू ठेवणे अव्यवहार्य आहे असे त्याचे मत नसेल तर, उक्त जागा अशा व्यक्तीच्या ताब्यात परत दिली पाहिजे.

(७) आयुक्तास पोट-कलम (६) अन्वये कोणतीही उपाययोजना करताना त्यास जी कोणतीही व्यक्ती अडथळा करील तिला कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून उक्त जागेतून काढून टाकण्याविषयी निदेश देता येईल आणि तसेच, त्यास, उक्त जागेमध्ये प्रवेश करता यावा यासाठी वाजवी रीतीने आवश्यक असेल अशा बलाचा वापर करता येईल.

**विशिष्ट वस्त्यांमधील विवक्षित वर्गाच्या इमारतीचे नियमन**

विशिष्ट रस्त्यामध्ये किंवा वस्त्यांमध्ये भविष्यकाळात विविक्षित वर्गाच्या इमारतीच्या बांधकामाचे नियमन करण्याचा अधिकार.

**२६९.** (१) तीन महिन्यांच्या मुदतीच्या आत दाखल करण्यात येईल अशा कोणत्याही कायदेशीर आक्षेपाच्या अधीन राहून, आयुक्तास पुढीलप्रमाणे जाहीर करण्याच्या आपल्या उद्देशाची जाहीर नोटीस देता येईल,—

(अ) अशा नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रस्त्यांमध्ये किंवा रस्त्याच्या भागांमध्ये त्यानंतर बांधण्यात किंवा पुन्हा बांधण्यात येणाऱ्या सर्व इमारतींच्या किंवा कोणत्याही वर्गातील इमारतीच्या दर्शनी भागाची उंची व बांधणी ही त्याच्या वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्यांच्या संबंधात महानगरपालिकेस त्या वस्तीच्या दृष्टीने योग्य वाटेल अशी असली पाहिजे;

(ब) नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वस्त्यांमध्ये फक्त अलग इमारती किंवा अंशत: अलग असलेल्या इमारती किंवा दोन्ही प्रकारच्या इमारती बांधण्याची परवानगी देण्यात येईल आणि अशा प्रत्येक इमारतीची अंगभूत जमीन अशा नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रफळाहून कमी असता कामा नये;

(क) विवक्षित वस्त्यांमधील इमारतींच्या भूखंडाचा किमान आकार विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रफळाइतका असला पाहिजे;

(ड) नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वस्त्यांमधे प्रत्येक एकर जमिनीवर विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपेक्षा अधिक इमारती बांधता येणार नाहीत; किंवा

(ई) अशा नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रस्त्यांमध्ये, रस्त्यांच्या भागात किंवा वस्त्यांमध्ये दुकाने, वखारी, कारखाने, झोपड्या किंवा विशिष्ट वापरासाठी संकल्पित इमारती, याबाबत स्थायी समितीने तयार केलेल्या सामान्य विनियमानुसार देण्यात आलेल्या व केवळ अशा परवानगीच्या अटींच्या अधीनतेने, आयुक्ताच्या खास परवानगीवाचून बांधता येणार नाहीत.

(२) स्थायी समितीने अशी नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीत आत आलेले सर्व आक्षेप विचारत घेतले पाहिजेत आणि त्यानंतर, आलेल्या आक्षेपांच्या विवरणपत्रासह अशी नोटीस आपल्या अभिप्रायासह महानगरपालिकेस सादर केली पाहिजे.

(३) उक्त तीन महिन्यांनी मुदत संपल्यानंतर ओलेले कोणतेही आक्षेप विचारात घेता कामा नयेत.

(४) पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेले सर्व कागदपत्र मिळाल्यानंतर दोन महिन्यांच्या मुदतीच्या आत महानगरपालिकेने ते सर्व आपल्या अभिप्रायासह [१][राज्य] शासनाकडे सादर केले पाहिजेत.

(५) [१][राज्य] शासनास, अशा घोषणापत्रासंबंधी त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील;

परंतु, अशा आदेशामुळे असे घोषणापत्र, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या कोणत्याही रस्त्यास, रस्त्याच्या भागास किंवा वस्तीस लागू करता येणार नाही.

(६) [१][राज्य] शासनाने कायम केलेले किंवा सुधारणा केलेले घोषणापत्र शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले पाहिजे आणि ते अशा प्रसिद्धीच्या तारखेपासून अंमलात येईल.

(७) कोणत्याही व्यक्तीने अशा कोणत्याही घोषणापत्राचे उल्लंघन करून कोणतीही इमारत बांधता किंवा पुन्हा बांधता कामा नये.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

## प्रकरण १६

## सुधारणा योजना

**२७०.** (१) पोट-कलम (४) च्या तरतुदीच्या अधीन राहून, जर आयुक्तास असे वाटले की– आयुक्ताने सुधारणा योजनेचा मसुदा तयार करणे.

[अ] शहराच्या कोणत्याही भागांमधील विशिष्ट हद्दीमध्ये–

(अ) मानवी वसतिस्थानासाठी उपयोगात आणलेल्या किंवा उपयोगात आणण्याचा उद्देश असलेल्या किंवा उपयोगात आणल्या जाण्याचा संभव आहे अशा कोणत्याही इमारती मानवी वसतिस्थानासाठी अयोग्य आहेत ;

(ब) अशा हद्दीमधील रस्ते आणि इमारती किंवा इमारतीचा गट यांचा अरुंदपणा, दाटी आणि त्यांची वाईट रचना किंवा वाईट स्थिती ही किंवा उजेड, हवा, वायुवीजन किंवा योग्य ती सोय यांचा अभाव, किंवा स्वच्छताविषयक अन्य दोष, किंवा अशी एक किंवा अनेक कारणे ही, अशा हद्दीमधील इमारतीच्या किंवा शेजारच्या इमारतींच्या रहिवाश्यांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहेत, आणि अशा इमारतीच्या संबंधातील अनिष्ट गोष्टी आणि अशा क्षेत्रातील स्वच्छता विषयक दोष, हे अशा क्षेत्रातील रस्त्यांच्या आणि इमारतीच्या किंवा अशा काही रस्त्यांच्या किंवा इमारतीच्या पुनर्रचनेसाठी आणि पुनर्बांधणीसाठी सुधारणा योजनेव्यतिरिक्त अन्य रीतीने सुधारता येत नाहीत, किंवा

(क) समाजातील गरीब वर्गातील लोकांना राहण्यासाठी इमारती बांधण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे; किंवा

[ब] नवीन इमारतींसाठी जागांची तरतूद करण्याच्या किंवा शहराच्या कोणत्याही भागाच्या वायु-वीजनाच्या सदोष व्यवस्थेची सुधारणा करण्याच्या, किंवा शहरातील निरनिराळ्या भागात दळणवळणाची नवीन साधने व रहदारीसाठी नव्या सोयी निर्माण करण्याच्या किंवा विद्यमान साधनात व सोयीत वाढ करण्याच्या प्रयोजनासाठी शहराच्या कोणत्याही भागात नवीन रस्ते तयार करणे किंवा विद्यमान रस्त्यात फेरफार करणे किंवा कोणतेही पूल, सेतुमार्ग व भुयारी मार्ग किंवा त्यास अंगभूत असलेली अन्य बांधकामे करणे किंवा पुन्हा करणे इष्ट आहे असे आयुक्तास वाटेल तर त्यास,–

(एक) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने–जी साधनसंपत्ती पुरेशी असल्याबद्दल महानगरपालिकेची खात्री झाल्याखेरीज दिली जाणार नाही–एक अधिसूचना तयार करता येईल आणि अशा अधिसूचनेत एक सुधारणा योजना तयार करण्याचा आयुक्ताचा प्रस्ताव आहे असे नमूद करण्यात येईल व त्यास असा निर्णय ज्या क्षेत्रासंबंधी आहे ते क्षेत्र आणि अशा योजनेमध्ये अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित केलेली कामे विनिर्दिष्ट केली जातील आणि ज्या ठिकाणी उक्त क्षेत्राचा नकाशा सर्व वाजवी वेळी पाहता येईल त्या ठिकाणचे नाव नमूद करण्यात येईल ;

(दोन) उक्त अधिसूचनेची एक प्रत लागोपाठ तीन आठवड्यात एकाच वेळी **शासकीय राजपत्रात** व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करता येईल; आणि

(तीन) सुधारणा योजनेचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू करता येईल आणि ती योजना स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करता येईल.

(२) सुधारणा योजना तयार करताना एका सुधार योजनेमध्ये एकाहून अधिक क्षेत्रे अंतर्भूत करता येतील.

(३) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने, आयुक्तास, सुधारणा योजना तयार करण्याच्या प्रयोजनासाठी करावयाच्या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांच्या हद्दींच्या आतील किंवा बाहेरील क्षेत्रांचे भूमापन करवून घेण्याची व्यवस्था करता येईल.

(४) या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, * मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ च्या तरतुदीन्वये ज्या क्षेत्रासाठी गृहनिर्माण योजना मंजूर करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रांसाठी कोणतीही सुधारणा योजना तयार केली जाणार नाही. १९४८ चा मुंबई ६९.

सुधारणा योजनेमध्ये तरतूद करावयाचा तपशील.

**२७१.** (१) ज्या सुधारणा योजनेत कलम २७० मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत समाविष्ट केलेल्या क्षेत्राचा कोणताही भाग वगळता येईल, किंवा कोणत्याही शेजारच्या जमिनीचा समावेश करता येईल त्या सुधारणा योजनेत, जर आयुक्ताच्या मते ती योजना योग्य रीतीने अंमलात आणण्यासाठी तिचा असा समावेश करणे किंवा ती वगळणे आवश्यक असेल तर,—

(अ) योजनेत अंतर्भूत असलेल्या क्षेत्राच्या हद्दीमध्ये पुढील गोष्टींची तरतूद केली पाहिजे—

(एक) आयुक्ताच्या मते जी जमीन अशा योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असेल किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदीच्या अधीन राहून, अशा योजनेच्या अंमलबजावणीमुळे जिच्यावर परिणाम होईल अशी कोणतीही जमीन संपादन करणे,

(दोन) इमारती बांधणे किंवा पुन्हा बांधणे आणि रस्ते तयार करणे व त्यामध्ये फेरफार करणे यांसहित, सर्व किंवा कोणत्याही जमिनीची पुन्हा आखणी करणे,

(तीन) अशा रीतीने तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या रस्त्यांतील पाण्याचा कार्यक्षम रीतीने निचरा करण्यासाठी व वाहून नेण्यासाठी आवश्यक असतील अशा पर्जन्य नाल्या आणि मलजलवाही बांधणे;

(चार) अशा रीतीने तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या रस्त्यांवर दिवाबत्ती करणे,

(ब) पूर्वोक्त हद्दीच्या आत पुढील गोष्टींची तरतूद करता येईल—

(एक) पूल, सेतुमार्ग, भुयारी मार्ग किंवा त्यास अंगभूत असलेली अन्य बांधकामे करणे किंवा पुन्हा करणे;

(दोन) त्या वस्तीमधील जलनि:सारणाची व्यवस्था अधिक चांगल्या रीतीने करण्यासाठी कोणत्याही जमिनीची सपाटी उंच करणे इष्ट आहे असे आयुक्तास वाटत असेल तर त्या जमिनीची सपाटी उंच करणे;

(तीन) योजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्रात किंवा त्यास लागून असलेल्या कोणत्याही क्षेत्रात वायुवीजनाची सोय अधिक चांगल्या रीतीने करण्यासाठी खुल्या जागा तयार करणे ;

(चार) आवश्यक असलेली स्वच्छताविषयक व्यवस्था पूर्णत: किंवा अंशत: करणे; आणि

---

* आता, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम, १९७६ (१९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८) पहा.

(क) पूर्वोक्त हद्दीच्या आत किंवा बाहेर, समाजातील गरीब वर्गातील लोकांची यात योजनेच्या अंमलबजावणीमुळे विस्थापित होणाऱ्या सर्व किंवा त्यापैकी काही लोकांचा अंतर्भाव होता—राहण्याची सोय करण्यासाठी इमारती बांधण्याची तरतूद करता येईल :

परंतु, योजनेत शेजारच्या जमिनीचा समावेश करण्याविषयी कलम २७०, पोट-कलम (१) बाब (दोन) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नोटीस दिलेली नसेल तर, अशी जमीन सुधार योजनेमध्ये समाविष्ट करता कामा नये.

(२) आयुक्ताच्या मते, पूर्वोक्त हद्दीतील जी जमीन अशी योजना अंमलात आणण्यासाठी आवश्यक नसेल, अशा कोणत्याही जमिनींच्या किमतीत, अशी योजना अंमलात आणल्यामुळे वाढ होईल तर, अशा योजनेत अशी जमीन संपादन करण्याऐवजी तिच्या किमतीत झालेल्या वाढीच्या संबंधात, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे सुधारणा आकार बसवण्याची तरतूद करता येईल.

(३) कोणत्याही क्षेत्रासाठी एखादी सुधारणा योजना तयार करताना शहराच्या आसपासचे भाग व संपूर्ण शहर यांची स्थिती व स्वरूप याकडे आणि आसपासचे भाग व शहराचे अन्य भाग यासाठी सुधार योजना करावी लागण्याचा संभव आहे किंवा कसे याकडे लक्ष पुरविले पाहिजे.

योजना पूर्ण झाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**२७२.** (१) आयुक्ताने सुधारणा योजनेचा मसुदा सादर केल्यानंतर स्थायी समितीने अशी योजना विचारात घेतली पाहिजे आणि तिला योग्य वाटतील अशा फेरफारांसह किंवा फेरफारांवाचून ती योजना मंजूर करता येईल.

(२) स्थायी समितीने अशी सुधारणा योजना मान्य केल्यानंतर, आयुक्ताने ताबडतोब एक अधिसूचना तयार केली पाहिजे आणि अशा अधिसूचनेमध्ये अशी योजना तयार करण्यात आली आहे ही गोष्ट आणि तीमध्ये अंतर्भूत केलेल्या क्षेत्राच्या हद्दी नमूद केल्या पाहिजेत आणि योजनेचा तपशील, तिचा नकाशा आणि जी जमीन संपादन करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा जिच्या संबंधात सुधार आकार बसवण्याचे प्रस्तावित केले आहे त्या जमिनीसंबंधीचे विवरणपत्र, ज्या ठिकाणी सर्व वाजवी वेळी पाहण्यास मिळेल त्या ठिकाणाचा नामनिर्देश केला पाहिजे आणि त्याने—

(अ) अशा अधिसूचनेची एक प्रत, तपशील, नकाशा आणि विवरणपत्र महानगरपालिकेकडे पाठविले पाहिजे.

(ब) कलम २७० अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी विहित केलेल्या रीतीने अधिसूचना प्रसिद्ध केली पाहिजे.

(३) अशी अधिसूचना ज्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली असेल त्यानंतरच्या तीन दिवसांमध्ये जी कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भाग संपादन करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा जिच्या संबंधात सुधारणा आकार बसविण्याचे प्रस्तावित केले त्या जमिनीवर, इमारतीवर किंवा इमारतीच्या भागांवर या अधिनियमान्वये बसविण्याजोगे मालमत्ता कर देण्यास प्रथमत: जबाबदार म्हणून ज्या व्यक्तीचे नाव आयुक्ताच्या आकारणी पुस्तकात असेल अशा प्रत्येक व्यक्तीवर आयुक्ताने एक नोटीस बजावली पाहिजे.

(४) अशा नोटिशीत--

(अ) आयुक्ताने महानगरपालिकेच्यावतीने सुधारणा योजनेच्या प्रयोजनांसाठी किंवा त्या संबंधात अशी जमीन किंवा इमारत किंवा इमारतीचा भाग संपादन करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा त्याच्या संबंधात एक सुधारणा आकार बसवण्याचे प्रस्तावित केले आहे असे नमूद करण्यात आले पाहिजे, आणि

(ब) अशारीतीने जिच्यावर नोटीस बजावण्यात आली आहे ती व्यक्ती, जर अशा रीतीने संपादन करण्यास किंवा आकार बसवण्यास आक्षेप घेईल तर, तिला नोटीस बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसाच्या आत आपली कारणे लेखी नमूद करण्याविषयी फर्मावण्यात आले पाहिजे.

इमारत बांधण्याची कामे चालू असतील तेव्हा अधिसूचना काढल्यावर जमीन संपादन करण्याची मागणी करण्याचा मालकाचा हक्क.

**२७३.** (१) कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या ज्या विवरणपत्रात संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन विनिर्दिष्ट करण्यात आली आहे अशा कोणत्याही विवरणपत्रामध्ये जर कोणतीही जमीन समाविष्ट केली असेल आणि अशा जमिनीचा मालक जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने उक्त अधिसूचनेच्या तारखेस अशा जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर इमारत बांधण्याची कामे चालू होती आणि पहिल्या मजल्याच्या पातळीपर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले होते, असे सिद्ध करील तर जिल्हाधिकाऱ्याने आयुक्तास अशी जमीन संपादन करण्यास विनंती केली पाहिजे.

(२) अशी नोटीस मिळाल्यानंतर, आयुक्ताने ती गोष्ट स्थायी समितीस ताबडतोब कळविली पाहिजे आणि उक्त समितीने त्यानंतर नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली जमीन संपादन करणे तिच्या मते इष्ट आहे किंवा कसे किंवा संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घ्यावा किंवा कसे हे ठरविले पाहिजे आणि आपला निर्णय दोन महिन्यांच्या आत महानगरपालिकेस कळविला पाहिजे आणि तो मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत महानगरपालिकेने त्या बाबतीतील आपला निर्णय आयुक्ताला कळविला पाहिजे आणि त्यानंतर आयुक्ताने ताबडतोब अशा निर्णयानुसार, एक तर, अशी जमीन संपादन करण्याचे काम सुरू केले पाहिजे किंवा संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला आहे अशी लेखी नोटीस मालकास दिली पाहिजे.

(३) जर महानगरपालिकेने जमीन संपादन करण्याचे ठरविले तर, आयुक्ताने अशा निर्णयाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास आणि मालकास दिली पाहिजे, आणि जिल्हाधिकाऱ्याने संबंधित जमिनीच्या बाबतीत *भूमि संपादन अधिनियम, १८९४ कलम ६ अन्वये घोषणापत्र काढण्यात आले आहे असे समजून कार्यवाही केली पाहिजे. १८९४ चा १.

(४) महानगरपालिकेने पोट-कलम (२) अन्वये कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर, अशी जमीन प्रस्ताव मागे घेतल्याची लेखी नोटीस मालकास दिल्याच्या तारखेनंतर दोन वर्षांचा कालावधी संपेपर्यंत, कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनंतर तयार केलेल्या, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेल्या जमिनीच्या कोणत्याही विवरणपत्रात समाविष्ट करता येणार नाही.

(५) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर महानगरपालिकेने पोट-कलम (२) अन्वये कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर, अशी जमीन, जिच्या संबंधात सुधारणा आकार बसवण्याचे प्रस्तावित केले असेल अशा जमिनीसंबंधी कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या विवरणपत्रात समाविष्ट किंवा जादा दाखल करता येईल;

---

१ आता, भूमी संपादन व पुनर्वसन करताना उचित भरपाई करण्याचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) पहा.

परंतु, कलम २७२ ची पोट-कलमे (३) व (४) यांच्या तरतुदी, जणू उक्त पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली ३० दिवसांची मुदत जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यात आल्याची नोटीस मालकास दिल्याच्या तारखेस सुरू झाली आहे असे समजून, अशा जमिनीच्या बाबतीत लागू होतील.

अधिसूचनेच्या तारखेनंतर दोन वर्षांचा कालावधी गेल्यानंतर महानगर-पालिकेने जमीन संपादन करण्याबद्दल किंवा प्रस्ताव मागे घेण्याबद्दल मागणी करण्याचा मालकाचा हक्क.

**२७४.** (१) कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या कोणत्याही विवरणपत्रात संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली ती जमीन समाविष्ट केली आहे अशा कोणत्याही जमिनीच्या मालकास कलम २७८ अन्वये घोषणापत्र प्रसिद्ध करण्यापूर्वी कोणत्याही वेळी व अशा अधिसूचनेच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर, अशा जमिनीचा तपशील नमूद करणारी एक लेखी नोटीस आयुक्ताला देऊन महानगरपालिकेच्यावतीने ती जमीन संपादन करण्याची आयुक्तास विनंती करता येईल.

(२) अशी नोटीस मिळाल्यावर आयुक्ताने ताबडतोब ती गोष्ट स्थायी समितीस कळविली पाहिजे आणि उक्त समितीने नोटिशीत नमूद केलेली जमीन संपादन करणे इष्ट आहे किंवा कसे हे ठरविले पाहिजे आणि दोन महिन्यांच्या आत आपला निर्णय महानगरपालिकेस कळविला पाहिजे आणि असा निर्णय कळवल्यापासून दोन महिन्यांच्या आत महानगरपालिकेने त्याबाबतीतील आपला निर्णय समितीला व आयुक्ताला कळविला पाहिजे आणि त्यानंतर आयुक्ताने अशा निर्णयास अनुसरून एक तर अशी जमीन संपादन करण्याचे ठरविले पाहिजे किंवा जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव त्याने मागे घेतला असल्याबद्दल मालकास नोटीस दिली पाहिजे.

(३) जर महानगरपालिकेने जमीन संपादन करण्याचे ठरवले तर तिने अशा निर्णयाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास व मालकास देण्याबाबत आयुक्तास सूचना दिली पाहिजे, आणि जिल्हाधिकाऱ्याने संबंधित जमिनीच्या बाबतीत, भूमि संपादन अधिनियम, १८९४ कलम ६ अन्वये घोषणापत्र काढण्यात आले आहे असे समजून कार्यवाही केली पाहिजे.

(४) जर महानगरपालिकेने पोट-कलम (२) अन्वये कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर, अशी जमीन प्रस्ताव मागे घेतल्याची लेखी नोटीस मालकास दिल्याच्या तारखेनंतर दोन वर्षांचा कालावधी संपेपर्यंत, कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या संपादन करण्याचे प्रस्तावित केलेल्या जमिनीच्या विवरणपत्रात समाविष्ट करता येणार नाही.

(५) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेने पोट-कलम (२) अन्वये कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर, अशी जमीन, जिच्या संबंधात सुधारणा आकार बसवण्याचे प्रस्तावित केले आहे अशा जमिनीसंबंधी कलम २७२ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या विवरणपत्रात, समाविष्ट किंवा जादा दाखल करता येईल ;

परंतु, कलम २७२, पोट-कलमे (३) व (४) च्या तरतुदी, जणू उक्त पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली तीस दिवसांची मुदत, अशी जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यात आल्याची नोटीस मालकास दिल्याच्या तारखेस सुरू झाली आहे असे समजून, अशा जमिनीच्या बाबतीत लागू होतील.

नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर आणि बजावल्यानंतर स्थायी समितीने योजना मान्यतेसाठी महानगर-पालिकेकडे पाठविणे.

**२७५.** (१) योजनेच्या नोटिसा प्रसिद्ध करण्याच्या बाबतीतील पूर्वगामी तरतुदीचे अनुपालन केल्यानंतर आयुक्ताने कलम २७२ अन्वये आलेला कोणताही आक्षेप किंवा अभिवेदन, योजनेत फेरबदल करण्याच्या संबंधात जी कोणतीही सूचना करण्याची त्याची इच्छा असेल त्या सूचनेसह स्थायी समितीस सादर केले पाहिजे.

(२) स्थायी समितीने असा कोणताही आक्षेप, अभिवेदन किंवा सूचना विचारात घेतल्यानंतर आणि तिला योग्य वाटतील असे फेरबदल योजनेत दाखल केल्यानंतर अशी योजना, कोणताही आक्षेप, अभिवेदन किंवा सूचना यासह मान्यतेसाठी महानगरपालिकेस सादर केले पाहिजे.

महानगरपालिकेने सुधारणा योजना विचारात घेणे आणि ती मान्य करणे किंवा अमान्य करणे.

**२७६.** महानगरपालिकेने स्थायी समितीकडून योजना आल्यानंतर कलम २७२ किंवा २७५ अन्वये आलेला कोणताही आक्षेप अभिवेदन किंवा करण्यात आलेली कोणतीही सूचना यासह अशी योजना विचारात घेण्यात सुरुवात केली पाहिजे आणि योजना फेरबदलासह किंवा फेरबदलावाचून मान्य केल्यानंतर किंवा योजनेस मान्यता नाकारल्यानंतर, तशा अर्थाचा ठराव पारित केला पाहिजे.

योजनेस मंजुरी देण्यासाठी आयुक्ताने [१][राज्य] शासनाकडे अर्ज करणे.

**२७७.** (१) महानगरपालिकेने योजनेस मान्यता दिल्यानंतर लवकरात लवकर आयुक्ताने योजनेस मंजुरी देण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने [१] [राज्य] शासनाकडे अर्ज केला पाहिजे.

(२) महानगरपालिकेने योजना मान्य करण्यास नकार दिला तर, आयुक्ताने योजना तयार करण्याच्या कामास सुरुवात न करण्याविषयी महानगरपालिकेने ठराव केला आहे असे नमूद करणारी एक अधिसूचना तयार केली पाहिजे व ती कलम २७० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे आणि अशा रीतीने ती प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर कलमे २७० आणि २७२ अन्वये प्रसिद्ध केलेली योजनेसंबंधीची अधिसूचना रद्द करण्यात आली आहे असे मानले जाईल.

(३) मंजुरीसाठी पोट-कलम (१) अन्वये [१] [राज्य] शासनाकडे करावयाच्या अर्जासोबत, पुढील कागदपत्रे असली पाहिजेत :--

(अ) कलम २७२ अन्वये स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावाची एक प्रत ;

(ब) कलम २७० अन्वये महानगरपालिकेने पारित केलेल्या ठरावाची एक प्रत ;

(क) योजनेत केलेल्या कोणत्याही फेरबदलाच्या कारणासहीत योजनेचे पूर्ण तपशिलासह वर्णन ;

(ड) संपूर्ण नकाशा आणि योजना अंमलात आणण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाज ;

(ई) जी जमीन संपादन करण्याचे प्रस्तावित केले असेल किंवा जिच्या बाबतीत सुधार आकार बसविण्याचे प्रस्तावित केले असेल अशी जमीन विनिर्दिष्ट करणारे विवरणपत्र ;

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “प्रांतिक” या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(क) कलम २७२, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेल्या नोटिशीच्या उत्तरादाखल त्यांची जमीन संपादन करण्याच्या बाबतीत किंवा सुधार आकार बसवण्याच्या बाबतीत ज्या कोणत्याही व्यक्तींनी आक्षेप घेतला असेल त्यांच्या नावाची यादी व अशा व्यक्तींनी अशा आक्षेपाबद्दल कोणतीही कारणे दिली असल्यास ती कारणे ;

(ग) कलम २७२ अन्वये जमिनीसंबंधी काढण्यात आलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस खंड (ई) खालील विवरणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनींचे आणि योजना अंमलात आणताना तयार करावयाच्या किंवा फेरफार करावयाच्या कोणत्याही रस्त्याच्या कोणत्याही बाजूपासून ८० फुटांच्या आत पूर्णत: किंवा अंशत: असलेल्या कोणत्याही जमिनींचे, आयुक्ताच्या आकारणी पुस्तकात नोंद केलेले करयोग्य मूल्य दर्शविणारी अनुसूची.

मंजुरी मिळाल्यानंतर संपादन करावयाच्या जमिनीचा तपशील देणारे घोषणापत्र प्रसिद्ध करणे व असे घोषणापत्र प्रसिद्ध झाल्यावर आयुक्ताला योजनेची अंमलबजावणी करण्यास प्राधिकृत करणे.

**२७८.** (१) (अ) [1] [राज्य] शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर आयुक्ताने अशी मंजुरी मिळाल्याची गोष्ट व योजनेच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेने संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे हे नमूद करणारे घोषणापत्र [1] [राज्य] शासनाकडे अधिसूचनेसाठी पाठविले पाहिजे.

(ब) [1] [राज्य] शासनाचा आदेश ज्या रीतीने प्रसिद्ध केला जातो त्याच रीतीने असे घोषणपत्र प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यात, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन ज्या हद्दीच्या आत आहे त्या हद्दी, ज्या प्रयोजनासाठी ती आवश्यक आहे ते प्रयोजन, तिचे अंदाजे क्षेत्र, आणि ज्या ठिकाणी जमिनीचा नकाशा पाहता येईल ते ठिकाण, या गोष्टी नमूद करण्यात आल्या पाहिजेत.

(क) अशी जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे याविषयी उक्त घोषणापत्र निर्णायक पुरावा असेल आणि उक्त घोषणापत्राच्या प्रसिद्धीनंतर, आयुक्ताने योजना अंमलात आणण्याची कार्यवाही केली पाहिजे.

(२) (अ) योजनेच्या कोणत्याही भागात सुधारणा करणे शक्य आहे असे यथास्थिती, आयुक्तास स्थायी समितीस किंवा महानगरपालिकेस कोणत्याही वेळी दिसून आले तर, महानगरपालिकेस अशी सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी योजनेत फेरबदल करता येईल आणि त्यानंतर आयुक्ताने ताबडतोब या पोट-कलमातील पुढील दोन खंडामधील तरतुदीच्या अधीन राहून, अशी फेरबदल केलेली योजना अंमलात आणण्याची कार्यवाही केली पाहिजे.

(ब) जर फेरबदल केलेली योजना अंमलात आणण्यासाठी अंदाज केलेली निव्वळ खर्चाची रक्कम ही मंजूर केलेली योजना अंमलात आणण्यासाठी अंदाज केलेल्या निव्वळ खर्चाच्या रकमेपेक्षा दहा टक्क्यांनी अधिक असेल तर, आयुक्ताने महानगरपालिकेच्या व [1] [राज्य] शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून फेरबदल केलेली योजना अंमलात आणण्याची कार्यवाही करता कामा नये.

(क) जर अशा रीतीने फेरबदल केलेल्या योजनेमुळे कलम २७७, पोट-कलम (३) अन्वये योजनेला जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीव्यतिरिक्त अन्य कोणतीही जमीन, कराराशिवाय अन्य रीतीने संपादन करणे किंवा कोणत्याही जमिनीच्या बाबतीत सुधार आकार बसवणे भाग पडत असेल तर, कलमे २७२ व २७७ आणि पोट-कलम (१) च्या तरतुदी, जणू फेरबदल केलेला योजनेचा असा भाग, ही योजनाच आहे असे समजून, फेरबदल केलेल्या अशा भागाच्या बाबतीत लागू होतील.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

महानगरपालिकेने जमीन संपादन करण्यात कसूर केल्यास मालकास ती जमीन संपादन करण्याविषयी किंवा प्रस्ताव मागे घेण्याविषयी महानगरपालिकेला विनंती करता येईल.

**२७९.** पूर्वोक्त घोषणापत्राच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत, जर महानगरपालिकेने अशा घोषणापत्रामध्ये समाविष्ट केलेली कोणतीही जमीन किंवा अशा जमिनीचा कोणताही भाग संपादन करण्यात कसूर केल्यास, अशा जमिनीच्या मालकास, अशा जमिनीचा तपशील नमूद करणाऱ्या लेखी नोटिशीद्वारे महानगरपालिकेला अशी जमीन संपादन करण्याची किंवा ती संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती करता येईल आणि त्यानंतर कलम २७४, पोट-कलमे (२) ते (५) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरली पाहिजे.

सुधार आकाराच्या परिगणनेची पद्धती.

**२८०.** जेव्हा कलम २७१, पोट-कलम (२) अनुसार सुधारणा योजनेत सुधार आकार बसवण्याची तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, असा सुधार आकार, जमिनीवर कोणतीही इमारत असल्यास ती धरून अशा जमिनीच्या मूल्यात जी वाढ होईल तिच्या निम्म्या रकमेइतका असेल, आणि असा सुधार आकार हा, उक्त योजना अंमलात आणण्याचे काम पूर्ण झाल्यावर उक्त जमिनीचे मूल्य कलम २७२ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या वेळी तिचे जे मूल्य असेल त्याहून जितक्या रकमेने अधिक असेल त्या रकमेवरून परिगणित केला जाईल.

आकार ठरवण्याची कार्यपद्धती.

**२८१.** (१) सुधार आकाराची रक्कम ठरवणे शक्य होण्याइतकी सुधार योजनेच्या कामात प्रगती झाली आहे असे आयुक्तास वाटेल तेव्हा, त्याने त्या अर्थाचा अहवाल स्थायी समितीकडे पाठविला पाहिजे आणि स्थायी समितीस, अहवाल विचारात घेतल्यानंतर, सुधार आकाराची रक्कम ठरविण्याच्या प्रयोजनासाठी सुधार योजना ज्या तारखेस पूर्ण झाली आहे असे मानले जाईल ती तारीख ठरावाद्वारे जाहीर करता येईल.

(२) प्रत्येक बाबतीत बसविण्याजोगी, सुधार आकाराची रक्कम, महानगरपालिकेच्या विनंतीवरून [१][राज्य] शासन राजकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याने पोट-कलम (३) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, कलम २८०-क नुसार ठरवली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये तारीख निश्चित करण्यात आल्यावर आणि पोट-कलम (२) अन्वये अधिकारी नेमण्यात आल्यावर आयुक्ताने अशा अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर बाधा पोचलेल्या मालमत्तेच्या बाबतीत ज्या व्यक्तींवर कलम २७२, पोट-कलम (३) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे अशा प्रत्येक व्यक्तीवर एक नोटीस बजावली पाहिजे, अशा नोटिशीत पुढील गोष्टी नमूद केल्या पाहिजेत :--

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(अ) पूर्वी सांगितल्याप्रमाणे पोट-कलम (१) अन्वये स्थायी समितीने जाहीर केलेली तारीख ;

(ब) अशा अधिकाऱ्यांकडून सुधार आकाराची आकारणी ज्यावेळी व ज्या ठिकाणी विचारात घेतली जाईल ती वेळ— ही वेळ, नोटीस बजावल्यानंतर कमीत कमी एकवीस दिवसांची असेल— व ते ठिकाण; आणि ज्या व्यक्तीवर अशी नोटीस बजावण्यात आली असेल त्या प्रत्येक व्यक्तीस, अशा अधिकाऱ्याकडून अशा बाबींचा विचार करण्यात येईल तेव्हा जातीने किंवा रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल हे.

(४) जेव्हा कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत बसविण्याजोगी सुधार आकाराची रक्कम अशा अधिकाऱ्याने ठरवली असेल तेव्हा, आयुक्ताने, संबंधित व्यक्तीवर एक नोटीस बजावून तीत अशा रीतीने ठरवलेली रक्कम नमूद केली पाहिजे.

(५) पोट-कलम (४) अन्वये नोटीस बजावल्याच्या तारखेपासून व यात यापुढे पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, जिल्हा न्यायालयाकडे पाठविलेल्या कोणत्याही बाबींवरील निर्णयाच्या अधीन राहून, पूर्वी सांगितल्याप्रमाणे ठरवलेली सुधार आकाराची रक्कम व असल्यास त्यावरील कोणतेही व्याज, ज्या मालमत्तेच्या संबंधात तो बसविण्यात आला असेल त्या मालमत्तेवर भार म्हणून असेल, आणि ती कलम ४४२ अन्वये सुधार खर्च म्हणून जाहीर केलेला खर्च ज्या रीतीने वसूल करता येतो त्याच रीतीने वसूल करता येईल.

(६) पोट-कलम (२) अन्वये [१][राज्य] शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याने ठरवलेल्या आकारामुळे जर एखाद्या व्यक्तीचे समाधान झाले नसेल तर, आयुक्ताने पोट-कलम (४) अन्वये नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत कोणत्याही वेळी अशा व्यक्तीने अर्ज केल्यावर, ती बाब जिल्हा न्यायालयाकडे पाठविली पाहिजे आणि जिल्हा न्यायालयाने त्यावर दिलेला निर्णय अंतिम असेल,

(७) पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जिल्हा न्यायालयाच्या निर्णयासाठी कोणताही अर्ज करण्यात आला नाही तर [१][राज्य] शासनाने याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्याने सुधार आकाराची रक्कम ठरवण्याचा दिलेला निर्णय अंतिम असेल.

१८९४ चा १. **२८२.** *भूमि संपादन अधिनियम, १८९४-- ज्याचा यात यापुढे भूमि संपादन अधिनियम असा निर्देश केला आहे— हा, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, या प्रकरणाखालील कराराव्यतिरिक्त अन्य रीतीने जमीन संपादन करण्याच्या बाबींचे नियमन करील व अशा बाबीस लागू होईल, आणि त्या प्रयोजनासाठी तो या प्रकरणाच्या तरतुदीच्या व तसेच पुढील तरतुदीच्या अधीन राहून, जणू तो यात अधिनियमित करण्यात आला आहे असे समजून त्याच रीतीने या प्रकरणांचा भाग आहे असे मानले जाईल—

करारा-व्यतिरिक्त अन्य रीतीने जमीन संपादन करण्याच्या बाबतीत भूमि संपादन अधिनियम लागू होण्याची मर्यादा.

(१) भूमि संपादन अधिनियमाच्या कोणत्याही कलमाचा केलेला उल्लेख हा, या प्रकरणाच्या तरतुदीन्वये फेरबदल करण्यात आल्याप्रमाणे अशा कलमासंबंधीचा उल्लेख आहे असे मानले जाईल आणि भूमि संपादन अधिनियमात वापरलेल्या 'जमीन' या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाचे कलम २, खंड (३०) मध्ये तिचा जो अर्थ दिलेला आहे तोच आहे असे मानले जाईल, आणि भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ३, खंड (ख) मध्ये या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी "सर्व व्यक्तींचा समावेश होतो" या शब्दाच्या पूर्वी ([१][शासन] धरून) हे शब्द व

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

* आता, भूमी संपादन व पुनर्वसन करताना उचित भरपाई करण्याचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) पहा.

कंस दाखल करण्यात आले आहेत आणि "जमिनीच्या वहिवाटीच्या हक्कात त्याचा हितसंबंध असेल तर" या शब्दाच्या नंतर "किंवा जमिनीचा भाग म्हणून असलेल्या कोणत्याही रस्त्यावर विधानमंडळाच्या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या कोणत्याही हक्कांचा तो मालक असेल तर" हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून उक्त खंड वाचण्यात येईल.

(२) भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (२) आणि या प्रकरणाच्या तरतुदी यांचा अन्वयार्थ लावताना, उक्त पोट-कलमांच्या तरतुदी या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी, कलम २७०, पोट-कलम (१) अन्वये ठराव पारित झाल्यावर ताबडतोब लागू होतील आणि [१] [राज्य] शासन या संज्ञेत आयुक्ताचा अंतर्भाव होतो असे मानले जाईल आणि "अशा वस्तीमधील" या शब्दांचा अर्थ कोणत्याही ठरावात निर्दिष्ट केलेली वस्ती असा मानला जाईल.

(३) या प्रकरणाचा भाग असल्याचे मानण्यात आलेल्या भूमि संपादन अधिनियमाच्या कलमांचा आणि या प्रकरणांच्या तरतुदींचा अन्वयार्थ लावताना, कलम २७०, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध केलेली अधिसूचना ही भूमि संपादन अधिनियम, कलम ४, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध केलेली अधिसूचना आहे असे मानले जाईल आणि कलम २७८ अन्वये घोषणापत्र प्रसिद्ध केल्याची तारीख ही; भूमि संपादन अधिनियम, कलम ६ अन्वये घोषणापत्र प्रसिद्ध केल्याची तारीख आहे असे मानले जाईल;

परंतु, जेव्हा कलम २७३ किंवा कलम २७४, पोट-कलम (३) अन्वये जमीन संपादन करण्यात आली असेल, तेव्हा कलम २७२, पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्याची तारीख ही भूमी संपादन अधिनियमाच्या कलम ६ अन्वये घोषणापत्र प्रसिद्ध केल्याची तारीख आहे असे मानले जाईल.

(४) भूमि संपादन अधिनियमाचे कलम ५०, पोट-कलम (२) आणि या प्रकरणाच्या तरतुदींचा अन्वयार्थ लावताना आयुक्त हा संबंधित स्थानिक प्राधिकारी किंवा कंपनी आहे असे मानले जाईल.

(५) भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ४९, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, इमारतीच्या ज्या कोणत्याही भागाचे संपादन करण्याचे प्रस्तावित केले आहे तो भाग जिल्हाधिकाऱ्याच्या मते अन्य भागापासून त्याचे कोणतेही विशेष नुकसान होऊ न देता अलग करता येईल तेव्हा अशा इमारतीच्या मालकास त्याच्या सबंध जमिनीचे संपादन करण्याविषयी आग्रह धरता येणार नाही;

परंतु, अशा इमारतीच्या मालकाने मागणी केली असता, जिल्हाधिकाऱ्याने असा भाग उरलेल्या भागापासून त्याचे विशेष नुकसान होऊ न देता अलग करता येईल किंवा कसे हा प्रश्न न्यायालयाच्या निर्णयासाठी पाठविला पाहिजे आणि न्यायालयाने जणू तो उक्त पोट-कलमान्वये न्यायालयाकडे पाठवलेला प्रश्न आहे असे समजून त्यावर निर्णय दिला पाहिजे.

आणखी असे की, जर जिल्हाधिकाऱ्याच्या मते किंवा प्रश्न निर्णयासाठी पाठवण्यात आलेला असल्यास न्यायालयाच्या मते ज्या भागाचे संपादन करण्याचे प्रस्तावित केले आहे तो भाग उरलेल्या भागापासून त्याचे विशेष नुकसान होवू न देता अलग करता येत नसेल तर [१] [राज्य] शासनास आयुक्ताच्या विनंती वरून उरलेल्या भागाचे संपादन करण्याविषयी आदेश देता येईल आणि अशा बाबतीत नवीन घोषणापत्राची आवश्यकता असणार नाही, परंतु जिल्हाधिकाऱ्याने [१] [राज्य] शासनाच्या आदेशाची प्रत हितसंबंधित व्यक्तीस

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

किंवा व्यक्तींना विलंब न लावता पुरविली पाहिजे आणि त्यानंतर राहिलेल्या भागाचे संपादन करण्यासाठी जणू अशा संपादनाची तरतूद सुधारणा योजनेत मूळातच करण्यात आली होती असे समजून पूर्णपणे त्याच रीतीने व त्याच अधिकारांचा वापर करून आदेश दिला पाहिजे.

**२८३.** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या भरपाईची रक्कम ठरवताना पुढील आणखी तरतुदी लागू होतील :-- भरपाईसंबंधी विशेष तरतुदी.

(१) जमिनीचे संपादन केल्यामुळे, किंवा इमारतीचे संपादन केल्यामुळे, तीत फेरबदल केल्यामुळे किंवा ती पाडून टाकल्यामुळे हितसंबंधित व्यक्तींच्या मालकीच्या अन्य कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मूल्यात जी कोणतीही वाढ होण्याचा संभव असेल ती न्यायालयाने विचारात घेतली पाहिजे.

(२) जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात कलम २७२, पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर, अशा जमिनीत किंवा इमारतीत कोणतीही वाढ किंवा सुधारणा केली असेल तेव्हा, अशी वाढ किंवा सुधारणा ही (इमारत योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवण्यास तिची आवश्यकता असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत) अशा जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या भरपाईच्या रकमेत वाढ होईल अशा रीतीने अंतर्भूत करता कामा नये, तसेच उक्त तारखेनंतर संपादन केलेल्या हितसंबंधाच्या बाबतीत, त्याच्या मूल्याचा कोणताही वेगळा अंदाज उक्त भरपाईच्या रकमेत वाढ होईल अशा रीतीने करता कामा नये;

(३) कलम २७२, पोट-कलम (२) अन्वये जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधाने अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेस अशा जमिनीचे किंवा इमारतीचे बाजार मूल्य ठरवताना न्यायालयाने मालमत्तेचे स्वरूप आणि कोणतीही इमारत असल्यास, तिच्या विद्यमान स्थितीनुसार ती किती काळ टिकू शकेल आणि सुस्थितीत राहू शकेल, या गोष्टी आणि या कलमाच्या खंड (४), (५) व (६) च्या तरतुदी विचारात घेतल्या पाहिजेत;

(४) जर न्यायालयाच्या मते, जमिनीचा किंवा इमारतीचा बेकायदेशीर प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येत असल्यामुळे किंवा तेथे रहात असलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका किंवा इजा होईल इतकी बेसुमार गर्दी तेथे झालेली असल्यामुळे अशा जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे वाढवण्यात आले असेल तर, अशा जमिनीचा किंवा इमारतीचा उपयोग केवळ कायदेशीर प्रयोजनासाठी करण्यात आला असता किंवा बेसुमार गर्दीचा धोका न पत्करता जितक्या व्यक्ती त्या ठिकाणी योग्य रीतीने सामावल्या जाऊ शकल्या असत्या तितक्याच व्यक्तींनी तिचा भोगवटा केला असता तर जे भाडे मिळू शकले असते त्यापेक्षा ते अधिक आहे असे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण** -- या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "बेसुमार गर्दी" या संज्ञेचा अर्थ कलम ३०७ मध्ये केल्याप्रमाणे लावला जाईल.

(५) जर न्यायालयाच्या मते इमारत आरोग्यदृष्ट्या सदोष स्थितीत असेल, किंवा ती योग्य प्रकारे दुरुस्त ठेवण्यात आलेली नसेल तर, भरपाईची रक्कम इमारत आरोग्यदृष्ट्या योग्य स्थितीत आणल्यानंतर किंवा योग्यरीतीने दुरुस्त केल्यानंतर मालमत्तेच्या अंदाज केलेल्या मूल्यातून अशा रीतीने केलेल्या कामाचा अंदाजित खर्च वजा करून जी रक्कम येईल त्याहून अधिक असता कामा नये;

(६) जर न्यायालयाच्या मते, मानवी वस्तीसाठी वापरण्यात येत असलेली किंवा वापरण्याचा उद्देश असलेली किंवा वापरली जाण्याचा संभव असलेली इमारत वाजवी रीतीने विचार करता मानवी वस्तीसाठी योग्य म्हणून वापरण्यासारखी नसेल तर, इमारतीच्या भरपाईची रक्कम ही सामानाच्या मूल्यातून इमारत पाडून टाकण्याचा खर्च वजा करून जी रक्कम राहील त्यापेक्षा अधिक असता कामा नये;

(७) संपादन करण्याचे योजलेल्या कोणत्याही इमारतीचा भाग अलग करण्याच्या बाबतीत न्यायालयास योग्य वाटेल तर, अशा भागाच्या मूल्याशिवाय आणखी भरपाई देता येईल.

जिल्हाधिकाऱ्याने न्यायनिवाडा दिल्यानंतर जमिनीचा कब्जा घेणे व ती महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे.

**२८४.** या अधिनियमाद्वारे लागू करण्यात आलेला भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ११ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने निवाडा दिला असेल तेव्हा त्यास अशा जमिनीचा कब्जा घेता येईल, आणि त्यानंतर अशी जमीन सर्व भारांपासून मुक्त होऊन [१][शासनामध्ये] पूर्णपणे निहित होईल, आणि संपादन करण्यासाठी झालेला खर्च देण्यात आल्यावर जिल्हाधिकाऱ्याने जमिनीचा कब्जा आयुक्तास दिला पाहिजे आणि त्यानंतर अशी जमीन, ती संपादन केल्यामुळे आणखी जो कोणताही खर्च येईल तो महानगरपालिकेच्यावतीने देण्याबाबतच्या आयुक्ताच्या जबाबदारीच्या अधीन राहून, महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

## प्रकरण- सतरा

## नगरपालिका अग्निशामक पथक

अग्निशामक कर्मचारी आणि आवश्यक ते आगीचे बंब इत्यादी ठेवणे.

**२८५.** (१) आग विझविण्याचे आणि आग लागल्यास जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य महानगरपालिकेने पार पाडण्याच्या दृष्टीने आयुक्ताने कलम ५१ अन्वये नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचे वेळोवेळी जे विवरणपत्र त्याने तयार केले असेल त्यात अग्निशामक कर्मचारी व त्यावर देखरेख ठेवणारे पुरेसे अधिकारी यांच्या, "नगरपालिका अग्निशामक पथक" या नावाने ओळखण्यात येणाऱ्या एका पथकाची तरतूद केली पाहिजे आणि अशा पथकास त्यांची कर्तव्ये कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक असे सर्व आगीचे बंब, आगीपासून बचाव करण्याची साधने, वाहने, सरंजाम, हत्यारे, उपकरणे आणि परस्पर दळणवळणाची साधने पुरविली पाहिजेत.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(२) एखाद्या व्यक्तीस, ती अन्य कोणतेही पद धारण करत असेल किंवा अन्य कोणतेही काम करत असेल तरी त्याशिवाय आणखी अग्निशामक पथकाचा सदस्य म्हणून नेमता येईल.

(३) महानगरपालिकेस, ती ठरवील अशा अटींवर व शर्तीवर, व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेस नगरपालिका अग्निशामक पथकास पूरक असे स्वयंसेवक अग्निशामक पथक म्हणून मान्यता देता येईल.

**२८६.** आग लागली असता अग्निशामक पथकाच्या मुख्य किंवा अन्य प्रभारी अधिकाऱ्यास, आयुक्त याबाबत वेळोवेळी देईल अशा आदेशांच्या अधीन राहून, हजर असलेले सर्व नगरपालिका अधिकारी व कर्मचारी आणि त्याच्या हाताखाली स्वेच्छेने काम करण्यास तयार होतील अशा अन्य कोणत्याही व्यक्ती यांना आपल्या अधिकाराखाली आणता येईल; आणि अशा प्रसंगी, नियमात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करता येईल.

आगीच्या ठिकाणी अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिकाऱ्याचे अधिकार.

**२८७.** (१) अग्निशामक पथकास त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी साह्य करणे हे सर्व पोलीस अधिकारी आणि सर्व नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य असेल.

(२) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास, ज्या कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ आग लागली असेल असा रस्ता बंद करता येईल आणि ज्या कोणत्याही व्यक्ती आपल्या उपस्थितीमुळे अग्निशामक पथकाच्या कामात हस्तक्षेप करत असतील त्यांना तेथून दूर करता येईल.

पोलीस आणि नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निशामक पथकास साह्य करणे.

**२८८.** (१) अग्निशामक पथकाकडून आपली कर्तव्ये योग्य रीतीने बजावत असताना झालेले कोणतेही नुकसान किंवा अग्निशामक पथकास साह्य करणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा नगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेले कोणतेही नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान आहे असे मानले जाईल.

(२) कलम २८६ किंवा २८७ यास अनुसरून कोणतेही कार्य पार पाडताना कोणत्याही व्यक्तीने सद्भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई देय असणार नाही.

अग्निशामक पथकाकडून झालेले नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान असल्याचे मानणे.

**२८९.** शहरात लागलेल्या प्रत्येक आगीचे प्रतिवृत्त, अग्निशामक पथकाच्या मुख्य किंवा अन्य प्रभारी अधिकाऱ्याने आग लागल्याच्या दिवसाच्या पुढील दिवसाच्या आत आयुक्तास सादर केले पाहिजे व आयुक्ताने आणखी जी कोणतीही चौकशी करणे त्यास आवश्यक वाटेल ती चौकशी केली पाहिजे आणि शहरात लागलेल्या सर्व आगीचे एक साप्ताहिक विवरण स्थायी समितीस पुरविले पाहिजे.

आगीचे प्रतिवृत्त सादर करणे.

## प्रकरण १८

## स्वच्छताविषयक तरतुदी

### झाडलोट आणि साफसफाई करणे

रस्त्यांची साफसफाई करणे आणि कचरा हलवणे यासाठी आयुक्ताने तरतूद करणे.

**२९०.** सर्व रस्ते आणि जागा यांची झाडलोट करण्याचे व त्यांची साफसफाई करण्याचे काम कार्यक्षम रीतीने करून घेण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्ताने पुढील गोष्टींबाबत उपाययोजना केली पाहिजे :—

(अ) शहरातील सर्व रस्त्यांचे पृष्ठभाग दररोज स्वच्छ करणे आणि त्यावरील केरकचरा काढून टाकणे ;

(ब) सर्व कचऱ्याचे डबे व कचऱ्याच्या पेट्या यातील कचरा काढून नेणे ; आणि धूळ, राख, केरकचरा, कचरा, धंद्यातील कचरा, जनावरांची प्रेते, मलमूत्र व दूषित पदार्थ तात्पुरते साठवण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींन्वये आयुक्ताने तरतूद केलेल्या किंवा नेमून दिलेल्या सर्व जागांत साचलेले पदार्थ काढून नेणे.

केरकचरा इत्यादी महानगर-पालिकेची मालमत्ता असणे.

**२९१.** कलम २९२ अन्वये तरतूद केलेले किंवा नेमून दिलेले सार्वजनिक कचऱ्याचे डबे, कचऱ्याच्या पेट्या आणि जागा यात टाकण्यात आलेले सर्व पदार्थ आणि कलमे २९० व २९३ अनुसार महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी किंवा कंत्राटदारांनी जमा केलेले सर्व पदार्थ महानगरपालिकेची मालमत्ता राहील.

केरकचरा इत्यादींसाठी कचऱ्याचे डबे, कचऱ्याच्या पेट्या व जागा यांची तरतूद करणे व त्या नेमून देणे.

**२९२.** पुढील गोष्टी तात्पुरत्या ठेवण्यासाठी किंवा त्याची अंतिम विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्ताने योग्य आणि सोईस्कर अशा ठिकाणी सार्वजनिक कचऱ्याचे डबे, कचऱ्याच्या पेट्या व जागा पुरविल्या पाहिजेत किंवा त्या नेमून दिल्या पाहिजेत :—

(अ) धूळ, राख, केरकचरा व कचरा ;

(ब) धंद्यातील केरकचरा ;

(क) जनावरांची प्रेते ;

(ड) मलमूत्र व दूषित पदार्थ :

परंतु महानगरपालिकेच्या मंजुरीशिवाय उक्त पदार्थांची ज्या कोणत्याही जागेत किंवा ज्या कोणत्याही रीतीने आतापर्यंत विल्हेवाट लावण्यात आलेली नसेल अशा जागेत किंवा अशा रीतीने त्यांची अंतिम विल्हेवाट लावता कामा नये किंवा जी कोणतीही जागा किंवा रीत नामंजूर करणे [1][राज्य] शासनास योग्य वाटेल अशा जागेत किंवा अशा रीतीने त्यांची अंतिम विल्हेवाट लावता कामा नये.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**२९३.** शहराच्या विवक्षित भागात संडास, मुत्र्या व मलकुंड्या यातील सर्व मलमूत्र व दूषित पदार्थ नगरपालिकेच्या एजन्सीमार्फत गोळा करण्यासाठी, ते काढून नेण्यासाठी व त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी तरतूद करण्याविषयीच्या आपल्या उद्देशाची, कलम १३१, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये आयुक्ताने जाहीर नोटीस दिली असेल तेव्हा शहराच्या उक्त भागात असलेल्या जागांतून असे पदार्थ दररोज गोळा करण्यासाठी, काढून नेण्यासाठी व त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्ताने उपाययोजना करणे कायदेशीर असेल.

मलमूत्र व दूषित पदार्थ गोळा करणे इत्यादींसाठी आयुक्तास तरतूद करता येईल.

**२९४.** (१) आयुक्ताने जेथे विशिष्ट प्रसंगी लोक मोठ्या संख्येत जमतात असे कोणतेही देऊळ, मठ, मशीद, थडगे, किंवा धार्मिक पूजेअर्चेची किंवा शिक्षणाची कोणतीही जागा यांच्या जवळपास किंवा जत्रा किंवा उत्सव भरण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेत स्वच्छता राखण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी खास व्यवस्था केली पाहिजे- मग ती कायमची असो की तात्पुरती असो.

(२) आयुक्त, पूर्वोक्त कोणत्याही जागेवर नियंत्रण असलेल्या कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (१) अन्वये केलेल्या खास व्यवस्थेच्या खर्चाबद्दल, महानगरपालिका वेळोवेळी ठरवील अशी रक्कम, महानगरपालिकेला देण्यास फर्मावू शकेल.

विवक्षित जागांमध्ये स्वच्छता-विषयक खास व्यवस्था.

**२९५.** शहराच्या ज्या कोणत्याही भागात कलम १३१, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये आयुक्ताने जाहीर नोटीस दिली असेल अशा भागात आणि ज्या कोणत्याही जागात — मग त्या कोठेही असोत — नगरपालिकेच्या नालीस जोडलेला शौचकूप किंवा जलधौत संडास असेल त्या जागांमध्ये ज्या व्यक्तीस आयुक्ताने किंवा त्याच्यावतीने कामावर लावलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीखेरीज मेहतराच्या कामांपैकी कोणतेही काम करणे कायदेशीर असणार नाही.

विवक्षित बाबतीत आयुक्ताच्या परवानगी-शिवाय खाजगी व्यक्तींना मेहतरांची कामे करता न येणे.

## जागांची पाहणी व स्वच्छताविषयक विनियमन

**२९६.** आयुक्तास, कोणत्याही इमारतीतील किंवा अन्य जागेतील स्वच्छतेबाबत खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी तिची पाहणी करता येईल.

स्वच्छता-विषयक प्रयोजनांसाठी जागांची पाहणी करण्याचा अधिकार.

कोणतीही इमारत साफ करण्यास व तिला चुना लावण्यास फर्मावता येईल.

**२९७.** जर आयुक्तास स्वच्छतेच्या प्रयोजनांसाठी तसे करणे आवश्यक वाटेल तर, त्यास, अशा रीतीने निरीक्षण केलेल्या इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास, लेखी नोटीस देऊन, अशा इमारतीला किंवा तिच्या काही भागाला एकतर बाहेरून किंवा आतून, किंवा बाहेरून व आतूनही चुना लावण्यास किंवा ती अन्य रीतीने साफ करण्यास फर्मावता येईल.

मानवी वस्तीस अयोग्य अशा इमारती किंवा इमारतीतील खोल्या.

**२९८.** (१) जर कोणत्याही कारणावरून आयुक्ताला असे दिसून आले की, राहण्यासाठी योजलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत किंवा इमारतीतील कोणतीही खोली मानवी वस्तीस अयोग्य आहे, तर आयुक्ताने अशा इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास असे कारण नमूद करणारी व यथास्थिती, अशा इमारतीचा किंवा खोलीचा राहण्याची जागा म्हणून या पुढे उपयोग करण्यास मनाई करण्याचा आपला उद्देश व्यक्त करणारी लेखी नोटीस दिली पाहिजे आणि अशा नोटिशीद्वारे पूर्वोक्त मालकास किंवा भोगवटादारास अशी नोटीस मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत त्याबाबतची कोणतीही हरकत लेखी सादर करण्यास सांगितले पाहिजे आणि जर पूर्वोक्त मदतीच्या आत अशा मालकाने किंवा भोगवटादाराने कोणतीही हरकत घेतली नसेल किंवा आयुक्ताच्या मते बेकायदेशीर किंवा अपुरी असेल अशी कोणतीही हरकत अशा मालकाने किंवा भोगवटादाराने अशा मुदतीच्या आत घेतली असेल तर, त्यास, स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने लेखी आदेशाद्वारे अशा इमारतीचा किंवा खोलीचा राहण्याची जागा म्हणून पुढे उपयोग करण्यास मनाई करता येईल :

परंतु, अशी मान्यता देण्यापूर्वी पूर्वोक्त मालकास किंवा भोगवटादारास स्थायी समितीपुढे जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याचा आणि अशी मान्यता का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्याचा हक्क असेल.

(२) जेव्हा पूर्वोक्त अशी कोणतीही मनाई करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्ताने, यथास्थिती, अशा इमारतीच्या किंवा खोलीच्या दारावर किंवा एखाद्या ठळक ठिकाणी अशा मनाईची नोटीस लावण्याची व्यवस्था केली पाहिजे व "मा. व. अ." (यू.एच.एच.) अशी अक्षरे रंगविण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि आयुक्ताने यथास्थिती, अशी इमारत किंवा खोली मानवी वस्तीसाठी योग्य करण्यात आली आहे असे लेखी प्रमाणपत्र देईपर्यंत अशा इमारतीच्या किंवा खोलीच्या कोणत्याही मालकाने किंवा भोगवटादाराने ती मानवी वस्तीसाठी वापरता कामा नये किंवा वापरू देता कामा नये.

(३) आयुक्ताने मालकास किंवा भोगवटादारास अशी इमारत किंवा खोली मानवी वस्तीसाठी योग्य अशी करण्यासाठी कोणत्या दुरुस्त्या किंवा फेरफार करणे आवश्यक आहे यासंबंधी प्रत्येक बाबतीत लेखी सूचना दिल्या पाहिजेत.

(४) आयुक्तास, जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (२) चे उल्लंघन करून एखाद्या इमारतीचा किंवा खोलीचा वापर करत असेल, तिला कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून अशा इमारतीतून किंवा खोलीतून काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल.

(५) आयुक्ताने यथास्थिती, एखाद्या इमारतीचा किंवा खोलीचा राहण्याची जागा म्हणून पुढे उपयोग करण्यास मनाई केली असेल तेव्हा, अशा इमारतीच्या मालकाने उपद्रव टाळण्यासाठी आवश्यक असेल तितपत अशी इमारत किंवा खोली स्वच्छ व राहण्यास योग्य ठेवली पाहिजे.

(६) कलम २६८, पोट-कलमे (६) व (७) मधील तरतुदी, आयुक्ताने यथास्थिती, अशी इमारत किंवा खोली मानवी वस्तीस योग्य असल्याबद्दलचे प्रमाणपत्र दिल्यानंतर जणू असे प्रमाणपत्र उक्त कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये दिलेली नोटीस मागे घेण्यात आली आहे असे समजून लागू होतील.

**२९९.** (१) राहण्याची जागा म्हणून उद्देशित असलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत कोणत्याही प्रकारे मानवी वस्तीस अयोग्य आहे आणि विनियमांना धरून नाही, असे आयुक्तास दिसून आले तर, आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे अशा इमारतीच्या मालकास एकवीस दिवसांपेक्षा कमी नसेल अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी मुदतीच्या आत ज्यायोगे ती इमारत मानवी वस्तीस योग्य होईल अशी कामे करण्यास किंवा असे फेरफार करण्यास फर्माविता येईल.

स्वच्छता-विषयक सोयी नसलेल्या इमारतींची दुरुस्ती करण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

(२) या कलमान्वये इमारतीच्या मालकावर नोटीस बजावण्याशिवाय आणखी, आयुक्तास अशा इमारतीत किंवा अशी इमारत जिच्यावर बांधण्यात आली असेल अशा जमिनीत जिचा गहाणदार म्हणून, पट्टेदार म्हणून किंवा अन्य प्रकारे हितसंबंध असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीस नोटिशीची एक प्रत देऊन ती बजावता येईल.

**३००.** (१) राहण्याची जागा म्हणून उद्देशित असलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत मानवी वस्तीस अयोग्य आहे आणि वाजवी खर्चाने अशा तऱ्हेने राहण्यास योग्य करता येण्यासारखी नाही असे आयुक्तास दिसून आले तर त्याने इमारतीच्या भोगवटादारावर व तिच्या मालकावर आणि अशा इमारतीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींची खात्री करून घेणे वाजवीरीत्या शक्य असेल तितपत अशा कोणत्याही व्यक्तीवर ज्यावेळी ( ही वेळ नोटीस बजावल्यानंतर एकवीस दिवसांपेक्षा कमी नसेल, अशी असेल ) व ज्या ठिकाणी इमारतीची स्थिती व कामे पार पाडणे किंवा त्या इमारतीचा पुढे उपयोग करणे यासंबंधी जो कोणताही प्रस्ताव तो सादर करू इच्छित असेल तो प्रस्ताव यांचा स्थायी समितीकडून विचार करण्यात येईल ती वेळ व जागा यासंबंधी नोटीस दिली पाहिजे आणि ज्या व्यक्तीवर अशी नोटीस बजावली असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, जेव्हा ती बाब अशा रितीने विचारात घेतली जाईल, तेव्हा एकतर जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

स्वच्छता-विषयक सोयी नसलेल्या इमारती पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

(२) ज्या व्यक्तीवर पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यात आली असेल तिने, जर कामे पार पाडण्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्याचा तिचा उद्देश असेल तर, तिच्यावर नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत असा प्रस्ताव सादर करण्याच्या आपल्या उद्देशाची लेखी नोटीस आयुक्तास दिली पाहिजे आणि आयुक्त परवानगी देईल अशा वाजवी मुदतीच्या आत जी कामे पार पाडण्याबद्दल तिने प्रस्ताव सादर केला असेल त्या कामांची एक यादी आयुक्तास सादर केली पाहिजे.

(३) आयुक्तास, स्थायी समितीची पूर्वमान्यता घेऊन, कोणत्याही मालकाकडून किंवा हितसंबंध असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून ती, आयुक्तांच्या मते ज्या कामांमुळे ती इमारत मानवी वस्तीसाठी योग्य होईल अशी कामे विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत पार पाडील किंवा ती इमारत मानवी वस्तीसाठी योग्य अशी करण्यात आली आहे अशी आयुक्ताची खात्री होईपर्यंत आणि तो स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने अशी हमी रद्द करीपर्यंत ती इमारत मानवी वस्तीसाठी वापरण्यात येणार नाही अशी लेखी हमी घेता येईल.

(४) जर पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणेची अशी कोणतीही हमी आयुक्ताने स्वीकारली नाही तर, किंवा आयुक्ताने हमी स्वीकारली असेल तर अशा बाबतीत ज्या कोणत्याही कामासंबंधी हमी दिली असेल ते काम विनिर्दिष्ट मुदतीच्या आत पार पाडण्यात आले नाही तर, किंवा हमीच्या अटींचे उल्लंघन करून कोणत्याही वेळी त्या इमारतीचा उपयोग करण्यात आला असेल तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने ती इमारत पाडून टाकण्याविषयी आदेश देता येईल आणि त्याद्वारे ती इमारत आदेश ज्या दिनांकापासून अंमलात येईल त्या दिनांकापासून अठ्ठावीस दिवसांपेक्षा कमी नसेल अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत रिकामी करण्यात आली पाहिजे असे, आणि ती मुदत संपल्यानंतर सहा आठवड्यांच्या आत, किंवा ती मुदत संपण्यापूर्वी इमारत रिकामी करण्यात आली नाही तर ज्या दिनांकास ती रिकामी करण्यात येईल त्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या आत किंवा कोणत्याही बाबतीत, आयुक्तास परिस्थितीनुसार विनिर्दिष्ट करणे योग्य वाटेल अशा आणखी मुदतीच्या आत, ती इमारत पाडून टाकण्यात येईल, असे फर्माविता येईल आणि पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताने काढलेली नोटीस त्याने त्या पोट-कलमान्वये ज्या व्यक्तींवर बजावणे आवश्यक असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर अशा आदेशाची प्रत देऊन त्याने ती बजावली पाहिजे.

(५) या कलमाच्या प्रयोजनासाठी एखादी इमारत मानवी वस्तीसाठी वाजवी खर्चात योग्य करता येईल किंवा कसे, हे ठरवताना ती अशा रीतीने योग्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या कामांचा अंदाजे खर्च आणि कामे पूर्ण झाल्यानंतर त्या इमारतीची अंदाजे जी किंमत होईल ती किंमत, या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत.

पाडून टाकण्याचा आदेश दिल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**३०१.** (१) कलम ३०० अन्वये इमारत पाडून टाकण्याविषयी दिलेला आदेश अंमलात आल्यानंतर, ज्या इमारतीस तो लागू आहे त्या इमारतीच्या मालकाने आदेशान्वये त्याबाबत मर्यादित केलेल्या मुदतीच्या आत इमारत पाडून टाकली पाहिजे ; आणि जर इमारत त्या मुदतीच्या आत पाडून टाकण्यात आली नाही तर, आयुक्ताने ती पाडून टाकण्याबद्दल उपाययोजना केली पाहिजे व तिचे सामान विकले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताला आलेला कोणताही खर्च, सामान विकून आलेली रक्कम जमा केल्यानंतर, इमारतीच्या मालकाने दिला पाहिजे आणि असा खर्च देण्यात आल्यानंतर, आयुक्ताजवळ शिल्लक राहिलेली कोणतीही रक्कम आयुक्ताने इमारतीच्या मालकास दिली पाहिजे किंवा एकापेक्षा अधिक मालक असतील तर ती, आयुक्त ठरवील त्या प्रमाणात दिली पाहिजे.

(३) आयुक्ताने पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस एक महिन्याच्या आत न्यायाधिशाकडे अपील करता येईल.

**३०२.** जेव्हा कलम २९९, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटिशीस अनुसरून कोणतीही इमारत आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने कामे व फेरफार करून मानवी वस्तीसाठी योग्य करण्यात आली असेल तेव्हा, अशी कामे व फेरफार पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या मुदतीपर्यंत तिच्या संरचनेसंबंधाने अशा दिनांकानंतर केलेल्या कोणत्याही विनियमास अनुसरून नाही केवळ याच कारणावरून ती मानवी वस्तीसाठी अयोग्य आहे असे मानले जाणार नाही.

मानवी वस्तीसाठी योग्य केलेली इमारत ही त्यानंतर केलेल्या विनियमास अनुसरून नसेल तर दहा वर्षे ती अयोग्य आहे असे न मानणे.

**३०३.** (१) आयुक्तास, जी इमारत अडथळा आणणारी आहे असे त्यास दिसून येईल, त्या इमारतीच्या मालकावर, ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकण्याविषयी आदेश देण्याचा प्रश्न स्थायी समितीकडून ज्या वेळी व ज्या ठिकाणी विचारात घेण्यात येईल (अशी वेळ नोटीस बजावल्यानंतर कमीत कमी एकवीस दिवसांची असेल) ती वेळ व ते ठिकाण यासंबंधी नोटीस बजावता येईल, आणि अशी बाब अशा रीतीने विचारात घेण्यात येईल तेव्हा मालकास जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

अडथळा आणणाऱ्या इमारती पाडून टाकण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

(२) अशा रीतीने ती बाब विचारात घेतल्यानंतर, स्थायी समितीने ती इमारत अडथळा आणणारी इमारत आहे आणि ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकला पाहिजे असा निर्णय दिला तर आयुक्तास ती इमारत पाडून टाकण्याविषयी आदेश देता येईल व त्याद्वारे अशी इमारत किंवा तिचा असा भाग पाडून टाकला पाहिजे आणि ती इमारत किंवा तिचा जो भाग इमारत पाडून टाकण्याच्या प्रयोजनासाठी रिकामा करणे आवश्यक असेल तो भाग, आदेश ज्या दिनांकापासून अंमलात येईल त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत रिकामा केला पाहिजे, असे फर्मावता येईल, आणि आयुक्ताने असा आदेश दिल्यास त्याने इमारतीच्या मालकावर त्याची प्रत देऊन तो बजावला पाहिजे.

(३) या कलमात "अडथळा आणणारी इमारत" या संज्ञेचा अर्थ, जी इमारत मानवी वस्तीसाठी अयोग्य नसली तरी अशा जागी असेल की, तिच्या अन्य कोणत्याही इमारतीशी असलेल्या सानिध्यामुळे किंवा संबंधामुळे —

(अ) अशा अन्य इमारतीत हवा खेळती राहण्याचे बंद होत असेल किंवा त्यास अडथळा येत असेल किंवा अशा अन्य इमारती मानवी वस्तीसाठी अयोग्य किंवा आरोग्यास घातक किंवा अपायकारक होत असतील किंवा होण्यास मदत होत असेल; किंवा

(ब) अशा अन्य इमारतींच्या बाबतीत आरोग्यास अपायकारक असलेला कोणताही उपद्रव किंवा तक्रार करण्यात आलेल्या अन्य अनिष्ट गोष्टी दूर करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यास प्रतिबंध होत असेल ;

अशी इमारत, असा होतो.

अडथळा आणणारी इमारत पाडून टाकण्याविषयी दिलेल्या आदेशाचा परिणाम.

**३०४.** (१) जर कलम ३०३ अन्वये एखाद्या इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बाबतीत ज्या मुदतीच्या आत ती इमारत किंवा तिचा भाग रिकामा करण्याबाबत आदेश देण्यात आला असेल ती मुदत संपण्यापूर्वी, अशा इमारतीच्या किंवा तिच्या जागेच्या कोणत्याही मालकाने किंवा तीत हितसंबंध असल्याचे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अशी इमारतीची जागा किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निर्धारित करावयाच्या भरपाईच्या रकमेइतक्या किमतीस महानगरपालिकेला विकण्याचा प्रस्ताव आयुक्तास कळवला तर, आयुक्ताने कलम ७७ अन्वये आवश्यक ती मंजुरी मिळवल्यावर तो प्रस्ताव स्वीकारला पाहिजे आणि कब्जा मिळवल्यानंतर शक्य तितक्या लवकर ती इमारत पाडण्याचे काम केले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली किंमत देण्यात आल्यावर उक्त इमारत व तिची जागा ही संपादन केलेल्या हितसंबंधाच्या मार्यादेपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

(३) जर पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणेच असा कोणताही प्रस्ताव उक्त मुदत संपण्यापूर्वी कळवण्यात आला नाही तर इमारतीच्या मालकाने त्या मुदतीच्या शेवटच्या दिवसापासून सहा आठवड्यांची मुदत संपण्यापूर्वी किंवा जर इमारत किंवा तिचा जो भाग रिकामा करणे आवश्यक आहे तो भाग त्या दिवसापर्यंत रिकामा करण्यात आला नाही तर ज्या दिवशी तो रिकामा करण्यात येईल त्या दिवसापासून सहा आठवड्यांची मुदत संपण्यापूर्वी, किंवा कोणत्याही बाबतीत आयुक्तास परिस्थितीनुसार योग्य वाटेल अशी आणखी मुदत संपण्यापूर्वी आदेशान्वये तरतूद केल्याप्रमाणे पाडून टाकण्याचे काम पार पाडले पाहिजे आणि जर अशा रीतीने पाडून टाकण्याचे काम पार पाडण्यात आले नाही तर आयुक्ताने ते काम पार पाडण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे आणि त्यापासून उपलब्ध झालेले सामान विकले पाहिजे.

(४) जेव्हा अडथळा आणणारी कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्ताकडून किंवा मालकाकडून पाडून टाकण्यात आला असेल तेव्हा आयुक्तास, महानगरपालिकेच्यावतीने, उक्त इमारतीने किंवा तिच्या भागाने व्यापलेली व त्यास अंगभूत असलेली जमीन ताबडतोब कब्जात घेता येईल आणि त्याने पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे भरपाई दिली पाहिजे.

(५) कलम ३०१, पोट-कलमे (२) व (३) च्या तरतुदी कलम ३०० अन्वये पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार इमारत पाडून टाकण्यात येईल तेव्हा, कोणताही खर्च किंवा शिल्लक रक्कम यांच्याबाबतीत ज्याप्रमाणे लागू होतात, त्याचप्रमाणे त्या आयुक्ताने पोट-कलम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही खर्चाच्या बाबतीत अणि आयुक्ताच्या हाती शिल्लक राहिलेल्या रकमेच्या बाबतीत लागू होतील.

(६) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही विक्री करण्यात आल्यावर, इमारत आणि तिची जागा यासाठी आयुक्ताने द्यावयाची भरपाई आणि पोट-कलम (४) अन्वये आयुक्ताने द्यावयाची भरपाई यांची रक्कम ही, कलम ३०३, पोट-कलम (२) अन्वये पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या दिनांकास जमिनीची व पाडून टाकलेल्या इमारतीची जी बाजार किंमत असेल त्या किमतीइतकी असेल.

**३०५.** (१) जेव्हा अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा कोणताही भाग यांच्या बाबतीत कलम ३०३ अन्वये पाडून टाकण्याबाबत आदेश देण्यात आला असेल तेव्हा आयुक्तास अशी अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा भाग ज्या अन्य इमारतीच्या फायद्यासाठी पाडून टाकण्याचे योजिले असेल त्या अन्य इमारती विनिर्दिष्ट करता येतील व स्थायी समितीस त्याबाबत कळवता येईल आणि त्याने अशा प्रत्येक अन्य इमारतीच्या मालकावर तशा अर्थाची नोटीस बजावली पाहिजे.

अडथळा आणणारी इमारत संपादन केल्याबद्दल दिलेली भरपाई विवक्षित बाबतीत सुधारणा खर्च म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

(२) अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा भाग पाडून टाकल्यामुळे ज्या जागेच्या फायद्यासाठी तो पाडून टाकण्यात आला असेल त्या जागेच्या मूल्यात आयुक्ताच्या मते वाढ होत असेल तर, आयुक्ताने मूल्यातील वाढीची रक्कम निर्धारित केली पाहिजे आणि स्थायी समितीच्या मान्यतेने, अडथळा आणणारी सबंध इमारत किंवा तिचा भाग तिच्या जागेसह संपादन करण्यासाठी द्यावयाच्या भरपाईच्या रकमेचा जेवढा भाग उक्त जागेच्या मूल्यात होणाऱ्या वाढीइतका असेल तेवढा भाग त्यांच्यात विभागून दिला पाहिजे.

(३) इमारत किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरवण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार आयुक्तास जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील तसेच अधिकार त्यास पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी असतील आणि या पोट-कलमान्वये विवरणपत्र सादर करण्यास किंवा देण्यास फर्माविण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम १७५ व १७६ च्या अर्थानुसार तसे करण्यास कायदेशीररीत्या बांधलेली आहे असे मानले जाईल.

१८६० चा ४५.

(४) आयुक्तास, जागांच्या मूल्यात वाढ झाल्याच्या बाबतीत अशा प्रत्येक जागेसाठी विभागून दिलेली रक्कम ही, अशा जागांच्या फायद्यासाठी झालेला सुधारणा खर्च आहे असे जाहीर करता येईल आणि त्यानंतर ती रक्कम अशा जागांवरील भार म्हणून असेल व ती कलम ४४२ अन्वये सुधारणा खर्च म्हणून जाहीर केलेला खर्च ज्या रीतीने वसुलीयोग्य असतो त्याच रीतीने वसुलीयोग्य असेल.

(५) आयुक्ताने पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध एक महिन्याच्या मुदतीच्या आत न्यायाधिशाकडे अपील करता येईल.

**३०६.** कलम ३०० किंवा कलम ३०३ अन्वये पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस आदेशाची प्रत बजावल्याच्या दिनांकानंतर एकवीस दिवसांच्या आत न्यायाधिशाकडे अपील करता येईल आणि आयुक्ताने, अपिलावर अंतिम निर्णय देण्यात येण्यापूर्वी ज्या आदेशाविरुद्ध असे अपील करण्यात आले आहे त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही कारवाई करता कामा नये :

पाडून टाकण्या-बाबतच्या आदेशाविरुद्ध अपील.

परंतु, ज्या जागेच्या संबंधात आदेश देण्यात आला असेल त्या जागेचा भोगवटा ज्या पट्ट्याची न संपलेली मुदत तीन वर्षापेक्षा अधिक नसेल अशा पट्ट्यान्वये किंवा करारान्वये जी व्यक्ती करीत असेल त्या व्यक्तीच्या विनंतीवरून कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

बेसुमार गर्दीच्या राहत्या जागा.

**३०७.** (१) मानवी वस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीत किंवा तिच्यातील कोणत्याही खोलीत बेसुमार गर्दी झाली आहे असे नियमान्वये पुरवलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रावरून किंवा अन्य प्रकारे आयुक्तास दिसून येईल तेव्हा, त्यास, अशा बेसुमार गर्दीस प्रतिबंध करण्यासाठी [1][जिल्हादंडाधिकाऱ्याकडे] अर्ज करता येईल आणि उक्त दंडाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यास प्रत्येक खोलीमध्ये जास्तीत जास्त जितक्या व्यक्तींना राहता येईल ती संख्या विहित करता येईल आणि त्यास लेखी आदेशाद्वारे इमारतीच्या मालकास उक्त आदेशात विहित करावयाच्या दहा दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा वाजवी मुदतीच्या आत उक्त इमारतीत किंवा खोलीत किंवा खोल्यांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींची, भाडेकऱ्यांची किंवा अन्य रहिवाशांची संख्या कमी करून अशा रीतीने विहित केलेल्या कमाल संख्येस अनुसरून आणि आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने त्यातील बेसुमार गर्दी कमी करण्याविषयी फर्मावता येईल किंवा त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा अन्य आदेश देता येईल.

**स्पष्टीकरण.—** इमारतीत राहणाऱ्या व्यक्तींचा, भाडेकऱ्यांचा किंवा अन्य प्रत्यक्ष रहिवाशांचा घरमालक हा, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी उक्त इमारतीचा मालक आहे असे मानले जाईल.

(२) अन्य कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संविदेत तद्‌विरुद्ध कोणतीही तरतूद असली तरी उक्त इमारतीतील किंवा खोलीतील प्रत्येक भाडेकऱ्याने, राहणाऱ्या व्यक्तीने किंवा रहिवाशाने पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अनुसरून मालकाने तसे करण्यास सांगितले असता, अशी इमारत किंवा खोली रिकामी केली पाहिजे.

(३) [2][राज्य] शासनास महानगरपालिकेशी विचारविनिमय केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे या कलमाच्या प्रयोजनासाठी कोणत्या गोष्टी मिळून बेसुमार गर्दी होते ते वेळोवेळी विनिर्दिष्ट करता येईल आणि त्यास, केवळ राहण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेत आणि राहण्यासाठी तसेच अन्य काही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेत प्रत्येक व्यक्तीसाठी तिच्या वयानुसार अनुज्ञेय असलेली किमान जागा अशा आदेशान्वये विनिर्दिष्ट करता येईल.

स्वच्छता विषयक सोयी नसलेल्या झोपड्या व छपऱ्या.

**३०८.** राहण्याची जागा म्हणून किंवा तबेला म्हणून वापरण्यात येणारी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी कोणतीही झोपडी किंवा छपरी जोत्याशिवाय बांधलेली असल्यामुळे किंवा अपुऱ्या उंचीच्या जोत्यावर बांधलेली असल्यामुळे किंवा जलनि:सारणाच्या किंवा हवा खेळती राहण्याच्या योग्य त्या साधनाशिवाय बांधलेली असल्यामुळे किंवा त्यात झाडलोट करता येणे शक्य नसल्यामुळे किंवा ज्या रीतीने तिची अन्य झोपड्या व छपऱ्या यांच्याबरोबर दाटी झाली आहे त्या रीतीमुळे त्यातील रहिवाशांस किंवा आसपास राहणाऱ्या लोकांस रोगाचा धोका निर्माण होण्याचा संभव आहे, किंवा कोणत्याही कारणामुळे सार्वजनिक आरोग्यास किंवा सुरक्षिततेस धोका पोहचण्याचा संभव आहे, असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास, अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या एखाद्या ठळक भागावर लेखी नोटीस लावून त्याद्वारे अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास, किंवा अशी झोपडी किंवा छपरी ज्या जमिनीवर असेल त्या जमिनीच्या मालकास अशी झोपडी किंवा छपरी काढून टाकण्याविषयी किंवा त्यात फेरफार करण्याविषयी किंवा त्यात आयुक्तास आवश्यक वाटेल अशा सुधारणा करण्यासाठी आदेश मिळविण्याविषयी फर्माविता येईल.

---

१ ''प्रथमवर्ग दंडाधिकाऱ्याकडे'' या शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २, अनुसूचीच्या भाग ३ अन्वये दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

## जनावरांच्या प्रेतांची विल्हेवाट लावणे

**३०९.** (१) शहरात मेलेल्या सर्व जनावरांची प्रेते हलवण्यासाठी तरतूद करणे हे आयुक्ताचे कर्तव्य असेल. जनावरांची प्रेते हलविणे.

(२) ज्या जागेत किंवा जागेवर कोणतेही जनावर मरण पावेल किंवा ज्या जागेत किंवा जागेवर कोणत्याही जनावराचे प्रेत आढळून येईल त्या जागेच्या भोगवटादाराने आणि रस्त्यावर किंवा कोणत्याही खुल्या जागी जे कोणतेही जनावर मरण पावेल त्या जनावरावर ताबा असणाऱ्या व्यक्तीने, असे जनावर मरण पावल्यानंतर तीन तासाच्या आत किंवा ते रात्री मरण पावले असल्यास सूर्योदयानंतर तीन तासांच्या आत त्याच्या मृत्यूविषयी महानगरपालिका आरोग्य विभागाच्या निकटतम कार्यालयास कळविले पाहिजे.

(३) नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याने हलवलेल्या जनावराच्या प्रत्येक प्रेताबद्दल जनावराचे प्रेत हलवण्यासाठी आयुक्त ठरवील अशा रकमेइतकी फी, जनावराच्या मालकाने किंवा मालक माहीत नसेल तर ज्या जागेत किंवा जागेवर उक्त जनावर मरण पावले असेल त्या जागेच्या भोगवटादाराने किंवा उक्त जनावर ज्या व्यक्तीच्या ताब्यात असताना मरण पावले असेल त्या व्यक्तीने दिली पाहिजे.

## सार्वजनिक ठिकाणी स्नान करणे व धुणे इत्यादींचे विनियमन

**३१०.** (१) आयुक्तास वेळोवेळी पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) नगरपालिकेमध्ये निहित असलेले नदीचे भाग किंवा निहित असलेल्या अन्य योग्य जागा लोकांनी स्नान करण्यासाठी, जनावरे धुण्यासाठी किंवा कपडे धुण्यासाठी किंवा वाळवण्यासाठी वापरण्याकरता अलग राखणे ; आयुक्ताने सार्वजनिक स्नानाच्या जागा इत्यादी ठरवून देणे आणि अशा जागांच्या उपयोगाबाबत विनियमन.

(ब) अशा जागा ज्या वेळी आणि स्त्री वर्ग व पुरुष वर्ग यापैकी ज्या वर्गातील व्यक्तींना वापरता येतील त्या वेळा व तो वर्ग विनिर्दिष्ट करणे ;

(क) अशा रीतीने अलग राखून न ठेवलेल्या कोणत्याही जागेचा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी लोकांनी वापर करण्यास जाहीर नोटिशीद्वारे मनाई करणे ;

(ड) महानगरपालिकेमध्ये निहित नसलेल्या नदीच्या कोणत्याही भागाचा किंवा जागेचा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी लोकांनी उपयोग करण्यास मनाई करणे ;

(ई) महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या आणि आयुक्ताने अलग राखून ठेवलेल्या नदीच्या कोणत्याही भागाचा किंवा अशा जागेचा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी लोकांनी वापर करण्याचे जाहीर नोटिशीद्वारे विनियमन करणे ;

(फ) महानगरपालिकेमध्ये निहित नसलेल्या नदीच्या कोणत्याही भागांचा किंवा अशा अन्य जागेचा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी आणि या अधिनियमान्वये नेमून दिलेल्या व अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही बांधकामाचा व कोणत्याही बांधकामातील पाण्याचा कोणत्याही विशिष्ट प्रयोजनासाठी लोकांनी वापर करण्याबाबत जाहीर नोटिशीद्वारे विनियमन करणे.

(२) आयुक्तास पोट-कलम (१), खंड (क) अन्वये राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेचा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील किंवा वर्गांमधील व्यक्तींनी, किंवा सर्वसामान्य जनतेने वापर करण्याबद्दल स्थायी समिती निश्चित करील अशी फी आकारता येईल.

आदेशाविरुद्ध स्नान करणे इत्यादींस मनाई.

**३११.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे परवानगी देण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही व्यक्तीने —

(अ) महानगरपालिकेमध्ये निहित असलेले कोणतेही तळे, तलाव, जलाशय, कारंजे, हौद, वाहिनी, उभा नळ, ओढा किंवा विहीर किंवा नदीचा कोणताही भाग किंवा अन्य जागा यामध्ये किंवा त्याच्याजवळ स्नान करता कामा नये ;

(ब) अशी कोणतीही जागा किंवा बांधकाम यामध्ये किंवा याच्याजवळ कोणतेही जनावर, कपडे किंवा अन्य वस्तू धुता कामा नये किंवा धुण्यास सांगता कामा नये ;

(क) अशा कोणत्याही जागेतील किंवा बांधकामातील पाण्यात कोणतेही जनावर किंवा अन्य वस्तू फेकता कामा नये, ठेवता कामा नये किंवा जाऊ देता कामा नये ;

(ड) ज्यायोगे अशा कोणत्याही जागेतील किंवा बांधकामातील पाणी कोणत्याही प्रमाणात घाण होईल किंवा दूषित होईल अशा रीतीने अशा जागेत किंवा बांधकामात किंवा त्यावर कोणतीही वस्तू वाहण्यास लावता कामा नये किंवा वाहू देता कामा नये किंवा आणावयास लावता कामा नये किंवा आणू देता कामा नये किंवा असे कोणतेही कृत्य करता कामा नये ;

(ई) अशा कोणत्याही जागेत किंवा जागेवर कपडे वाळवता कामा नये ;

आणि कोणत्याही व्यक्तीने —

(फ) आयुक्ताने कलम ३१० अन्वये केलेल्या कोणत्याही मनाईचे उल्लंघन करून, महानगरपालिकेकडे निहित नसलेल्या नदीच्या कोणत्याही भागाचा किंवा अशा कोणत्याही जागेचा उक्त कलमात नमूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करता कामा नये ;

(ग) नदीच्या अशा कोणत्याही भागाचा किंवा जागेचा अशा कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करण्यासाठी आयुक्ताने कलम ३१० अन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीतील तरतुदींचे उल्लंघन करता कामा नये.

जनावरे किंवा अन्य पदार्थ बुडवून पाणी दूषित करण्यास मनाई.

**३१२.** कोणत्याही व्यक्तीने —

(अ) कोणताही तलाव, जलाशय, ओढा, विहीर, किंवा खंदक यातील पाणी ज्यामुळे घाणेरडे किंवा आरोग्यास अपायकारक होण्याचा संभव आहे असे कोणतेही जनावर, भाजीपाला किंवा खनिज पदार्थ त्यात बुडवता कामा नये ;

(ब) कोणताही सांसर्गिक, संक्रामक किंवा ओंगळ रोग झाला असताना कोणतीही स्नानाची जागा, तळे, तलाव, जलाशय, कारंजे, हौद, वाहिनी, उभा नळ, ओढा किंवा विहीर यावर, त्यामध्ये किंवा त्याजवळ स्नान करता कामा नये.

## कारखाने, धंदे इत्यादींचे विनियमन

**३१३.** कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय, ज्यात वाफ, पाणी, विद्युतशक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्ती यांचा उपयोग करण्याचे योजले असेल असा कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा, किंवा कोणतीही बेकरी —

आयुक्ताच्या परवानगी-शिवाय कारखाना इत्यादी नव्याने स्थापन करता कामा नये.

(एक) कोणत्याही जागेमध्ये नव्याने स्थापन करता कामा नये ;

(दोन) एका जागेतून दुसऱ्या जागेत हलवता कामा नये ;

(तीन) तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी बंद केल्यानंतर पुन्हा उघडता कामा नये किंवा तिचे नवीकरण करता कामा नये ; किंवा

(चार) तिचे क्षेत्रफळ किंवा आकार वाढवता कामा नये किंवा विस्तृत करता कामा नये ; तसेच कोणत्याही व्यक्तीने अशा कोणत्याही कारखान्यात, कर्मशाळेत, कामाच्या जागेत किंवा बेकरीत काम करता कामा नये किंवा काम करण्यास परवानगी देता कामा नये :

परंतु, जर बंद ठेवल्याच्या कालावधीत असा कारखाना, कर्मशाळा किंवा बेकरी मुळात ज्या ठिकाणी स्थापन करण्यात आली असेल त्या ठिकाणाहून यंत्रसामग्री हलवण्यात आली नसेल तर, खंड (३) च्या प्रयोजनासाठी अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही.

**३१४.** कलम ३७६ मध्ये किंवा नियमांत विनिर्दिष्ट केलेला कोणताही धंदा किंवा वस्तू निर्मिती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने .—

रासायनिक द्रव्ये इत्यादीद्वारे पाणी दूषित करण्यास मनाई.

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही तळ्यात, तलावात, जलाशयात, हौदात, विहिरीत, वाहिनीत किंवा पाण्यासाठी असलेल्या अन्य जागेत किंवा कोणत्याही नालीत किंवा तिला जोडलेल्या नळात वर सांगितल्याप्रमाणे अशा कोणत्याही धंद्याच्या किंवा वस्तुनिर्मितीच्या ओघात निर्माण झालेला कोणताही धुण्याचा किंवा अन्य पदार्थ बुद्धिपुरस्सर आणावयास लावता कामा नये किंवा आणू देता कामा नये, किंवा वाहावयास लावता किंवा वाहू देता कामा नये ;

(ब) ज्यामुळे अशा कोणत्याही तळ्यातील, तलावातील, जलाशयातील, हौदातील, विहिरीतील, वाहिनीतील किंवा पाण्यासाठी असलेल्या अन्य जागेतील पाणी घाण होईल किंवा दूषित होईल असे वर सांगितल्याप्रमाणे अशा कोणत्याही धंद्याशी किंवा वस्तू निर्मितीशी संबंधित असलेले कोणतेही कृत्य बुद्धिपुरस्सर करता कामा नये.

## दुर्धर रोगांचा प्रतिबंध करणे आणि त्यांचा फैलाव होऊ न देणे

**३१५.** कोणत्याही व्यक्तीस दुर्धर रोग झाल्याचे आढळून आल्यास किंवा कोणत्याही जागेत किंवा वाहनात कोणतीही व्यक्ती अशा रोगाने आजारी असल्याचे आढळून आल्यास, आयुक्ताने किंवा वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने, नियमान्वये विहित करण्यात आली असेल अशी उपाययोजना करणे हे, कायदेशीर असेल.

दुर्धर रोगांच्या बाबतीत आयुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी इत्यादींचे अधिकार.

दुर्धर रोगांच्या फैलावास प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही जागेची कोणत्याही वेळी पाहणी करता येईल.

**३१६.** आयुक्तास कोणत्याही वेळी, दिवसा किंवा रात्री, नोटीस न देता किंवा परिस्थितीनुसार त्यास वाजवी वाटेल अशी आपल्या उद्देशाची नोटीस दिल्यानंतर, ज्या जागेत कोणताही दुर्धर रोग असल्याबद्दल माहीत झाले असेल किंवा संशय असेल अशा कोणत्याही जागेची पाहणी करता येईल आणि उक्त रोगाचा अशा जागेबाहेर फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करता येईल.

आवश्यक असेल तेव्हा झोपड्या आणि छपऱ्या नष्ट करणे.

**३१७.** जर, आयुक्ताच्या मते कोणत्याही दुर्धर रोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी कोणतीही झोपडी किंवा छपरी नष्ट करणे आवश्यक असेल तर, त्यास, अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या मालकास किंवा भोगवटादारास, त्या परिस्थितीत त्यास वाजवी वाटेल अशी आपल्या उद्देशाची आगाऊ नोटीस दिल्यानंतर अशी झोपडी किंवा छपरी आणि तिची सर्व सामग्री नष्ट करण्यासाठी उपाययोजना करता येईल.

निवासगृहे आणि खाद्यगृहे बंद करणे.

**३१८.** सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे, आवश्यक आहे अशी आयुक्ताची खात्री झाल्यास त्यास लेखी आदेशाद्वारे, ज्या ठिकाणी खाण्याचे पदार्थ व पेये विकण्यात येतात किंवा तयार करण्यात येतात, विक्रीसाठी साठविली जातात किंवा मांडली जातात अशा कोणत्याही निवासगृहात किंवा कोणत्याही जागेत दुर्धर रोगाचा रुग्ण असल्यामुळे किंवा नुकताच आढळल्यामुळे असे निवासगृह किंवा अशी जागा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीपर्यंत बंद करण्यात यावी, असा निदेश देता येईल :

परंतु, जर वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने असे निवासगृह किंवा जागा जंतुविरहित केली आहे किंवा संसर्गविरहित आहे असे प्रमाणपत्र दिले तर, असे निवासगृह किंवा जागा उघडण्यात आली आहे असे जाहीर करता येईल.

### स्वच्छताविषयक खास उपाययोजना

कोणत्याही दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास आयुक्तास, खास उपाययोजना करता येतील.

**३१९.** (१) शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा प्रादुर्भाव होण्याची भीती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणताही सांसर्गिक रोग उद्भवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये (या संज्ञेत मेंढ्या व बकऱ्या यांचा अंतर्भाव होतो) त्याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमांच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपुऱ्या आहेत असे आयुक्तास वाटेल तर, त्यास [१][राज्य] शासनाच्या मंजुरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगाच्या प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे —

(अ) खास उपाय योजता येतील, आणि

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(ब) जाहीर नोटिसीद्वारे लोकांनी किंवा कोणत्याही व्यक्तीने किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तींनी पालन करावयाचे तात्पुरते आदेश विहित करता येतील.

(२) आयुक्ताने पोट-कलम (१) अन्वये त्याने जे कोणतेही उपाय योजले असतील आणि जे कोणतेही आदेश दिले असतील ते महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजेत.

## प्रेतांची विल्हेवाट लावणे

प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या जागांची नोंदणी करणे.

**३२०.** (१) प्रेतांच्या दफनासाठी, दहनासाठी किंवा त्यांची अन्य रीतीने विल्हेवाट लावण्यासाठी आधीच वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेच्या प्रत्येक मालकाने किंवा ती, जिच्या नियंत्रणाखाली असेल अशा प्रत्येक व्यक्तीने नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या मुदतीच्या आत अशा जागेची नोंदणी करण्यासाठी आयुक्ताकडे अर्ज केला पाहिजे आणि आयुक्ताने तिची नोंदणी करविली पाहिजे.

(२) अशा अर्जासोबत नोंदणी करावयाच्या जागेचा नकाशा जोडला पाहिजे आणि अशा नकाशावर तो लायसन्सदाराकडून किंवा त्याच्या देखरेखीखाली तयार करण्यात आला असल्याची खूण म्हणून अशा भूमापकाची सही असली पाहिजे व त्यात अशा जागेचे स्थान, तिच्या हद्दी व मर्यादा या गोष्टी दर्शविण्यात आल्या पाहिजे ; तसेच अशा अर्जात, मालकाचे किंवा अशा जागेत हितसंबंध असलेल्या व्यक्तीचे किंवा जमातीचे नाव, व्यवस्थापन पद्धती आणि आयुक्तास आवश्यक वाटेल असा आणखी तपशील देण्यात आला पाहिजे.

(३) आयुक्तास, असा अर्ज आणि नकाशा मिळाल्यावर, या प्रयोजनासाठी ठेवण्यात येईल अशा नोंदवहीत उक्त जागेची नोंदणी करता येईल.

(४) आयुक्ताने नोंदणी करण्याच्या वेळी पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेला नकाशा नगरपालिका कार्यालयात ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(५) जर असा नकाशा किंवा विवरणपत्र किंवा तपशील यामुळे आयुक्ताचे समाधान झाले नाही, तर त्याचे आक्षेप दूर करण्यात येईपर्यंत, त्यास नोंदणी करण्याचे नाकारता येईल किंवा ती पुढे ढकलता येईल.

(६) प्रेतांच्या दफनासाठी, दहनासाठी किंवा त्यांची अन्य रीतीने विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येत असेल अशा महानगरपालिकेकडे निहित असलेल्या प्रत्येक जागेची पोट-कलम (३) अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंदणी करण्यात आली पाहिजे आणि तिचे स्थान, मर्यादा व हद्दी दर्शविणारा व शहर अभियंत्याची सही असलेला एक नकाशा नगरपालिका कार्यालयात ठेवण्यात आला पाहिजे.

प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागांची तरतूद करणे.

**३२१.** (१) जर प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या विद्यमान जागा अपुऱ्या आहेत असे कोणत्याही वेळी दिसून आले, तर किंवा कलम ३२३ च्या तरतुदीअन्वये अशी कोणतीही जागा बंद करण्यात आली असेल, तर आयुक्ताने महानगरपालिकेच्या मंजुरीने शहरात किंवा शहराबाहेर उक्त प्रयोजनासाठी अन्य योग्य आणि सोयीस्कर जागांची तरतूद केली पाहिजे आणि कलम ३२० अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत त्यांची नोंदणी करविली पाहिजे आणि अशा रीतीने तरतूद केलेल्या प्रत्येक जागेची नोंदणी करण्याच्या वेळी, त्या जागेचे स्थान, मर्यादा व हद्दी दर्शविणारा आणि शहर अभियंत्याची सही असलेला एक नकाशा नगर पालिका कार्यालयात ठेवला पाहिजे.

(२) या अधिनियमाच्या आणि नियमांच्या व उपविधींच्या सर्व तरतुदी पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आलेली जी कोणतीही जागा शहराबाहेर असेल आणि महानगरपालिकेकडे निहित असेल अशा जागेच्या बाबतीत जणू ती जागा शहरात आहे असे समजून लागू होतील.

आयुक्तांच्या परवानगी-शिवाय प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागा सुरू करता कामा नयेत.

**३२२.** जी जागा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली जागा म्हणून पूर्वी कधीही कायदेशीररीत्या वापरात आणलेली नसेल आणि जिची अशी जागा म्हणून नोंदणी झालेली नसेल अशी कोणतीही जागा कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय उक्त प्रयोजनासाठी वापरण्यास सुरू करता कामा नये. आयुक्तास महानगरपालिकेच्या मान्यतेने अशी परवानगी देता येईल किंवा रोखून ठेवता येईल.

[1][राज्य] शासनास प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली कोणतीही जागा बंद करण्याविषयी निदेश देता येईल.

**३२३.** (१) सक्षम व्यक्तींनी पुरवलेल्या माहितीवरून व स्वत: जातीने पाहणी केल्यानंतर जर आयुक्ताचे कोणत्याही वेळी असे मत झाले की, —

(अ) सार्वजनिक पूजेअर्चेची कोणतीही जागा, तिच्या भिंतीच्या आतील किंवा त्याखालील किंवा तिला लागून असलेल्या चर्चच्या आवारातील किंवा दफनभूमीतील प्रेतकक्षक किंवा थडगी यांच्या स्थितीमुळे आरोग्यास अपायकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे; किंवा

(ख) प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोगात आणली जाणारी अन्य कोणतीही जागा आरोग्यास अपायकारक होईल किंवा होण्याचा संभव आहे अशा स्थितीत आहे किंवा जी अन्यथा यापुढे असा उपयोग करण्यासाठी योग्य नाही ; तर त्यास आपले उक्त मत, त्याबद्दलच्या आपल्या कारणांसह महानगरपालिकेस सादर करता येईल आणि महानगरपालिकेने त्यावरील आपल्या अभिप्रायासह ते [1][राज्य] शासनाकडे विचारासाठी पाठविले पाहिजे.

(२) असा अभिप्राय मिळाल्यानंतर, [1][राज्य] शासनास त्यास आणखी जी कोणतीही चौकशी करवणे योग्य वाटेल ती चौकशी करवल्यानंतर राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशी सार्वजनिक पूजेअर्चेची जागा किंवा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली अन्य जागा यापुढे प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येऊ नये असा निदेश देता येईल. अशा रीतीने दिलेल्या प्रत्येक आदेशाची कलम ३२० अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंद केली पाहिजे.

(३) [1][राज्य] शासनाच्या अशा कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदत संपल्यानंतर असा आदेश ज्या जागेसंबंधी असेल अशी जागा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी बंद करण्यात येईल.

(४) उक्त अधिसूचनेची एक प्रत, महानगरपालिका वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेत किंवा भाषांमध्ये केलेल्या तिच्या अनुवादासह अशी अधिसूचना ज्या जागेसंबंधी असेल त्या जागेवरील किंवा जागेजवळील एखाद्या ठळक भागावर लावली पाहिजे. मात्र ती जागा सार्वजनिक पूजेअर्चेची जागा असता कामा नये.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**३२४.** (१) जर स्वत: निरीक्षण केल्यानंतर आयुक्ताचे कोणत्याही वेळी असे मत झाले की, प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी पूर्वी उपयोगात आणली जाणारी जी कोणतीही जागा कलम ३२३ च्या तरतुदीन्वये किंवा अन्य कोणत्याही कायद्यान्वये किंवा प्राधिकारान्वये बंद करण्यात आली असेल अशी कोणतीही जागा, काही कालावधी गेल्यामुळे यापुढे आरोग्यास अपायकारक राहिलेली नाही आणि ती गैरसोय न होता किंवा अपाय होण्याचा धोका न राहता उक्त प्रयोजनासाठी पुन्हा उपयोगात आणता येईल तर, आयुक्तास आपले उक्त मत, त्याबद्दलच्या कारणांसह, महानगरपालिकेस सादर करता येईल आणि महानगरपालिकेने आपल्या अभिप्रायासह ते [1][राज्य] शासनाकडे विचारासाठी पाठविले पाहिजे.

[1][राज्य] शासनास प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी बंद करण्यात आलेल्या जागा पुन्हा उघडण्यास मंजुरी देता येईल.

(२) असा अभिप्राय मिळाल्यानंतर [1][राज्य] शासनास, त्यास आणखी जी कोणतीही चौकशी करवणे योग्य वाटेल, अशी चौकशी करवल्यानंतर, कलम ३२३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशी जागा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी पुन्हा उघडण्यात यावी असा निदेश देता येईल. अशा रीतीने दिलेल्या प्रत्येक आदेशाची कलम ३२० अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंद केली पाहिजे.

**३२५.** (१) कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (२) अन्वये आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय —

आयुक्ताच्या परवानगी-शिवाय पूजाअर्चेच्या जागी प्रेते पुरता कामा नयेत किंवा उकरून बाहेर काढता कामा नयेत.

(अ) पूजाअर्चेच्या कोणत्याही जागेच्या कोणत्याही भिंतीमध्ये किंवा तिच्यातील कोणताही मार्ग, द्वारमंडप, पोर्टिको, जोते किंवा व्हरांडा याखाली कोणताही प्रेतकक्षक किंवा थडगे किंवा पुरण्याची जागा करता कामा नये ;

(ब) कलम ३२३ अन्वये प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी बंद केलेल्या कोणत्याही जागेत कोणतेही प्रेत पुरता कामा नये किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट लावता कामा नये ;

(क) कलम ३२० अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत जिची नोंदणी केलेली नाही अशा कोणत्याही जागी कोणतेही थडगे किंवा प्रेतकक्षक बांधता किंवा खणता कामा नये किंवा बांधावयास किंवा खणावयास लावता कामा नये किंवा कोणत्याही शवाची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावू देता कामा नये किंवा विल्हेवाट लावण्यास परवानगी देता कामा नये ;

१८९८ चा ५. (ड) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* च्या कलम १७६ च्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदीअन्वये असेल त्या व्यतिरिक्त, प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या कोणत्याही जागेतून कोणतेही प्रेत उकरून बाहेर काढता कामा नये.

(२) आयुक्तास, विशेष बाबींमध्ये, पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी [1][राज्य] शासन याबाबत वेळोवेळी देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीन राहून, परवानगी देता येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द करण्यत आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पाहा.

प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात मनाई केलेली कृत्ये.

**३२६.** कोणत्याही व्यक्तीने, —

(अ) मृत्यूनंतर एखादे प्रेत उपद्रव निर्माण होईल एवढ्या वेळेपर्यंत कोणत्याही जागेत दहन केल्याशिवाय, पुरल्याशिवाय किंवा त्याची अन्य रीतीने कायदेशीररीत्या विल्हेवाट लावल्याशिवाय ठेवता कामा नये.

(ब) प्रेत किंवा प्रेताचा भाग व्यवस्थित रीतीने आच्छादलेला असल्याशिवाय किंवा आच्छादलेला ठेवल्याशिवाय किंवा रोगाच्या संसर्गाचा धोका होण्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास अपाय होण्यास प्रतिबंध करण्यासाठी आयुक्तास जाहीर नोटिसींद्वारे वेळोवेळी जी सावधगिरी बाळगण्यास भाग पाडणे योग्य वाटेल ती सावधगिरी बाळगल्याशिवाय असे प्रेत कोणत्याही रस्त्यातून नेता कामा नये ;

(क) अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नसेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत, ज्या कोणत्याही रस्त्यावरून प्रेत नेण्यास आयुक्ताने याबाबत काढलेल्या जाहीर नोटिसीद्वारे प्रतिबंध केला असेल अशा रस्त्यावरून एखादे प्रेत किंवा प्रेताचा भाग नेता कामा नये ;

(ड) प्रेत किंवा प्रेताचा जो भाग विच्छेदनासाठी ठेवला असेल किंवा विच्छेदनाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल, ते प्रेत किंवा प्रेताचा तो भाग बंद पेटीतून किंवा बंद वाहनातून हलवण्याव्यतिरिक्त अन्य रीतीने हलवता कामा नये ;

(ई) प्रेत किंवा प्रेताचा भाग वाहून नेत असताना, निकडीची आवश्यकता असल्याखेरीज, ते प्रेत किंवा प्रेताचा तो भाग कोणत्याही रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ ठेवता किंवा सोडून जाता कामा नये ;

(फ) शवपेटिकेचा पृष्ठभाग किंवा कोणतीही शवपेटिका वापरण्यात आली नसेल तेव्हा कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग हा, जमिनीच्या पृष्ठभागापासून सहा फुटांपेक्षा कमी अंतरावर राहील अशा रीतीने असे प्रेत किंवा प्रेताचा भाग थडग्यात, प्रेतकक्षकात किंवा अन्य प्रकारे पुरता कामा नये किंवा पुरण्याची व्यवस्था करता कामा नये ;

(ग) कोणत्याही कबरस्थानात कोणतेही थडगे किंवा प्रेतकक्षक अन्य कोणत्याही थडग्यापासून किंवा प्रेतकक्षकापासून दोन फुटांपेक्षा कमी अंतरावर बांधता किंवा खणता कामा नये किंवा बांधावयास किंवा खणावयास लावता कामा नये ;

(ह) कोणत्याही कबरस्थानात या प्रयोजनासाठी आयुक्ताच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार खूण न केलेल्या कोणत्याही रेषेमध्ये एखादे थडगे किंवा प्रेतकक्षक बांधता किंवा खणता कामा नये किंवा बांधावयास किंवा खणावयास लावता कामा नये ;

(आय) आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय, ज्यात पूर्वीच प्रेत पुरलेले असेल असे थडगे किंवा प्रेतकक्षक दुसरे प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग पुरण्याकरता पुन्हा उघडता कामा नये ;

(ज) कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग स्मशानभूमीत आणल्यानंतर किंवा आणावयास लावल्यानंतर, ते स्मशानभूमीत आणल्यापासून सहा तासांच्या आत प्रेताचे दहन करण्यात किंवा दहन करण्याची व्यवस्था करण्यात कसूर करता कामा नये ;

(के) कोणत्याही प्रेताचे किंवा प्रेताच्या भागाचे दहन करताना किंवा दहन करण्याची व्यवस्था करताना, असे प्रेत किंवा त्याचा कोणताही भाग त्याची पूर्णपणे राख झाल्यावाचून राहू देता कामा नये किंवा असे प्रेत किंवा प्रेताचा भाग वाहून नेण्याकरता किंवा दहन करण्याकरता वापरलेले कोणतेही कापड किंवा अन्य वस्तू हलवू देता कामा नये किंवा तिची पूर्णपणे राख झाल्यावाचून दहन करण्याच्या जागी किंवा जागेजवळ राहू देता कामा नये.

## प्रकरण एकोणीस

### बाजार व कत्तलखाने

### बाजार व कत्तलखाने यांचे परिरक्षण व नियमन

**३२७.** जे बाजार व कत्तलखाने महानगरपालिकेच्या मालकीचे असतील किंवा ज्यांचे परिरक्षण महानगरपालिका करत असेल अशा सर्व बाजारांना व कत्तलखान्यांना "नगरपालिका बाजार" आणि "नगरपालिका कत्तलखाने" असे संबोधण्यात येईल. अन्य सर्व बाजार आणि कत्तलखाने खाजगी आहेत असे मानण्यात येईल. नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने कशास म्हणावे.

**३२८.** (१) आयुक्तास, याबाबत महानगरपालिकेकडून प्राधिकृत करण्यात येईल तेव्हा, नगरपालिका बाजार किंवा नगरपालिका कत्तलखाना किंवा पशु-आवार स्थापन करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या कोणत्याही बाजारात किंवा कत्तलखान्यात वाढ करण्याच्या किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही इमारत बांधता येईल किंवा कोणतीही इमारत किंवा जमीन खरेदी करता येईल, भाडेपट्ट्याने घेता येईल किंवा अन्य प्रकारे संपादन करता येईल आणि वेळोवेळी, त्यास योग्य वाटतील असे नगरपालिका बाजार, कत्तलखाने व पशु-आवारे बांधता येतील व सुस्थितीत ठेवता येतील आणि अशा नगरपालिका बाजारात, कत्तलखान्यात किंवा पशु-आवारात व्यापार किंवा धंदा करणाऱ्या किंवा त्या ठिकाणी वारंवार येणाऱ्या व्यक्तींच्या उपयोगासाठी त्यास योग्य वाटतील असे गाळे, दुकाने, छपऱ्या, कोंडवाडे व अन्य इमारती बांधता येतील किंवा सुस्थितीत ठेवता येतील किंवा अशा सोयी करता येतील आणि अशा नगरपालिका बाजारात विकण्यात येणाऱ्या मालाचे वजन करण्यासाठी व तो मोजण्यासाठी अशा बाजारात त्यास योग्य वाटतील अशा इमारतींची, जागांची, यंत्रांची, वजनांची, तराजूंची व मापांची तरतूद करता येईल आणि ती सुस्थितीत ठेवता येतील. नवीन नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने यांची तरतूद.

(२) नगरपालिका कत्तलखाने व पशु-आवारे ही शहरात किंवा [१][राज्य] शासनाच्या मंजुरीने शहराबाहेर ठेवता येतील.

**३२९.** आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने कोणत्याही वेळी कोणताही नगरपालिका बाजार किंवा कत्तलखाना किंवा पशु-आवार किंवा त्यांचा कोणताही भाग बंद करता येईल आणि अशा रीतीने बंद केलेल्या कोणत्याही बाजारासाठी किंवा कत्तलखान्यासाठी किंवा पशु-आवारासाठी किंवा त्यांच्या कोणत्याही भागासाठी ताब्यात असलेल्या जागांचा विनियोग त्या जागा महानगरपालिकेची मालमत्ता असल्याप्रमाणे करता येईल. नगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि पशु-आवारे बंद करता येतील.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

नगरपालिका बाजारात विकण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री करण्यास मनाई.

**३३०.** (१) आयुक्ताने, महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीने, वेळोवेळी जाहीर नोटिसीद्वारे, अशा नोटिसीत विनिर्दिष्ट केलेल्या ज्या वस्तू उक्त नगरपालिका बाजारात सामान्यपणे विकण्यात येत असतील अशा वस्तू किंवा अशा वस्तूंपैकी कोणतीही वस्तू कोणत्याही नगरपालिका बाजारापासून पन्नास यार्डांच्या आत विकण्यास किंवा विक्रीसाठी मांडण्यास मनाई करणे हे कायदेशीर असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेली कोणतीही नोटीस तशीच मंजुरी घेऊन कोणत्याही वेळी आयुक्तास रद्द करता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल.

खाजगी बाजार आणि खाजगी कत्तलखाने उघडणे.

**३३१.** (१) महानगरपालिका, शहरात किंवा शहराच्या कोणत्याही विनिर्दिष्ट भागात नवीन खाजगी बाजार स्थापन करण्यास किंवा नवीन खाजगी कत्तलखाने स्थापन करण्यास किंवा चालवण्यास परवानगी द्यावी किंवा कसे हे वेळोवेळी ठरवील.

(२) कोणत्याही व्यक्तीने, मानवी खाद्यासाठी असलेली जनावरे किंवा मानवी खाद्यासाठी असलेले कोणतेही पदार्थ किंवा गुरेढोरे किंवा गुराढोरांचे खाद्यपदार्थ विकण्यासाठी किंवा विक्रीसाठी मांडण्याच्या प्रयोजनासाठी खाजगी बाजार स्थापन करता कामा नये किंवा आयुक्ताच्या मंजुरीने असेल त्या व्यतिरिक्त खाजगी कत्तलखाना स्थापन करता कामा नये किंवा चालवता कामा नये. अशी मंजुरी देताना आयुक्तास पोट-कलम (१) अन्वये त्यावेळी अंमलात असलेले महानगरपालिकेचे निर्णय मार्गदर्शक ठरतील.

(३) एखादा खाजगी बाजार किंवा कत्तलखाना स्थापन करण्यास अशा रीतीने मंजुरी देण्यात आली असेल तेव्हा, आयुक्ताने, महानगरपालिका वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेतील किंवा भाषांमधील, अशा मंजुरीची नोटीस, असा बाजार ज्या इमारतीत किंवा ज्या जागेत भरवण्यात येणार असेल त्या इमारतीच्या किंवा जागेच्या किंवा इमारतीजवळील किंवा जागेजवळील ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

स्पष्टीकरण.—पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी, ज्या जागेत खाजगी बाजार किंवा कत्तलखाना स्थापन करण्यात आला असेल अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने असा बाजार स्थापन केला आहे असे मानले जाईल.

नगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि पशु-आवारे यांवर दुकान-भाडे, भाडे आणि फी बसवणे.

**३३२. आयुक्तास —**

(अ) नगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु-आवारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल आणि नगरपालिका बाजारात विक्रीसाठी माल मांडण्याच्या अधिकाराबद्दल आणि अशा कोणत्याही बाजारात विकलेल्या मालाचे वजन करण्याबद्दल व तो मोजण्याबद्दल आणि कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याच्या अधिकाराबद्दल याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने, तो वेळोवेळी ठरवील असे दुकान-भाडे, भाडे आणि फी आकारता येईल ;

(ब) स्थायी समितीच्या मान्यतेने, वर सांगितल्याप्रमाणे आकारणीयोग्य असलेले दुकान-भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याने देता येईल.

(क) नगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंव पशु-आवारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याचा विशेषाधिकार, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावाने देता येईल किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरीत्या विक्री करून विनियोग करता येईल.

**३३३.** (१) कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय आणि तो विहित करील अशी फी दिल्याशिवाय, कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यातून किंवा पशु-आवारातून किंवा अशा कत्तलखान्यासाठी किंवा पशु-आवारासाठी किंवा त्यांच्या संबंधात वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही नगरपालिका बाजारातून किंवा जागेतून कोणतीही जिवंत गुरेढोरे, मेंढ्या, बकऱ्या किंवा डुकरे हलवता कामा नये : कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यातून, पशु-आवारातून, बाजारातून किंवा जागेतून जिवंत गुरेढोरे, मेंढ्या, बकऱ्या किंवा डुकरे हलविणे.

परंतु, जे जनावर अशा कत्तलखान्यात, पशु-आवारात, बाजारात किंवा जागेत विकण्यात आलेले नसेल आणि जे अशा कत्तलखान्यात, पशु-आवारात, बाजारात किंवा जागेत याबाबत आयुक्ताने दिलेल्या आदेशान्वये विहित करण्यात आलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल किंवा जे कोणत्याही उपविधीस अनुसरून अशा कत्तलखान्यात, बाजारात किंवा जागेत कत्तल करण्यास अयोग्य म्हणून नाकारण्यात आले असेल, असे कोणतेही जनावर हलवण्यासाठी अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही.

(२) पांजरपोळात नेलेल्या कोणत्याही जनावराच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये परवानगीसाठी दिलेली कोणतीही फी, याबाबत आयुक्ताने दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून, पांजरपोळाच्या प्राधिकाऱ्यांकडून असे जनावर त्यांच्या ताब्यात मिळाले आहे असे प्रमाणपत्र सादर करण्यात आल्यावर, परत करण्यात आली पाहिजे.

**३३४.** (१) आयुक्तास, कोणत्याही नगरपालिका बाजारात, कत्तलखान्यात किंवा पशु-आवारात अंमलात असलेल्या कोणत्याही नियमाचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल ज्या कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या नोकरास सिद्धापराध ठरवण्यात आले असेल तिला अशा कोणत्याही नगरपालिका बाजारातून, कत्तलखान्यातून किंवा पशु-आवारातून काढून टाकता येईल आणि अशा व्यक्तीने स्वत: किंवा तिच्या नोकराकडून अशा बाजारात, कत्तलखान्यात किंवा पशु-आवारात त्यापुढे कोणताही व्यापार किंवा धंदा चालवण्यास किंवा त्यात कोणताही गाळा, दुकान उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी, कोंडवाडा किंवा अन्य जागा याचा भोगवटा करण्यास त्या व्यक्तीस प्रतिबंध करता येईल आणि अशा व्यक्तीचा अशा कोणत्याही गाळ्यात, दुकानात, उभ्याने माल विकण्याच्या जागेत, छपरीत, कोंडवाड्यात किंवा जागेत जो कोणताही पट्टा किंवा धारणा अधिकार असेल असा पट्टा किंवा धारणा अधिकार समाप्त करता येईल. नियमांचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये लायसन्स दिलेल्या कोणत्याही खाजगी बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या मालकास किंवा अशा बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या किंवा त्यातील कोणत्याही गाळ्याच्या पट्टेदारास किंवा अशा मालकाच्या किंवा पट्टेदाराच्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा नोकरास कोणत्याही नियमाचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आले असेल तर, आयुक्त अशा मालकास, पट्टेदारास, अभिकर्त्यास किंवा नोकरास अशा कोणत्याही बाजारातून किंवा कत्तलखान्यातून आदेशपत्रात नमूद करण्यात येईल अशा मुदतीच्या आत स्वत:हून निघून जाण्यास फर्मावू शकेल आणि त्याने अशा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास, त्यास या अधिनियमान्वये जी कोणतीही शिक्षा देण्यात येईल त्याशिवाय आणखी, त्यास अशा जागेतून तडकाफडकी काढून टाकता येईल.

(३) अशा कोणत्याही बाबतीत मालक किंवा पट्टेदार हा वर सांगितल्याप्रमाणे ज्या नोकरास किंवा अभिकर्त्यास सिद्धापराध ठरवण्यात आले आहे व ज्याने पोट-कलम (२) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे अशा नोकराबरोबर किंवा अभिकर्त्यांबरोबर संगनमत करीत आहे असे आयुक्तास आढळून येईल तेव्हा, त्यास योग्य वाटेल तर, त्यास अशा जागेच्या संबंधातील अशा मालकाचे किंवा पट्टेदाराचे लायसन्स रद्द करता येईल.

**३३५.** (१) कोणत्याही व्यक्तीस आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय, मानवी आहारासाठी असलेली कोणतीही गुरेढोरे, मेंढ्या, बकऱ्या किंवा डुकरे किंवा या अधिनियमान्वये चालवण्यात येत नसलेल्या किंवा लायसन्स न दिलेल्या कोणत्याही कत्तलखान्यात किंवा जागेत कत्तल केलेल्या अशा कोणत्याही जनावराचे मांस, शहरात आणता येणार नाही.

परवानगी-शिवाय शहरात गुरेढोरे इत्यादींची आयात करण्यास मनाई.

(२) कोणताही पोलीस अधिकारी, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणतेही जनावर किंवा मांस शहरात आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अधिपत्राशिवाय अटक करू शकेल.

(३) या कलमाचे उल्लंघन करून शहरात आणलेले कोणतेही जनावर, आयुक्त किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी किंवा रेल्वेच्या जागेत किंवा जागेवर रेल्वेचा कर्मचारी जप्त करू शकेल आणि अशा रीतीने जप्त केलेले कोणतेही जनावर किंवा मांस विकता येईल किंवा आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे त्याची अन्यथा विल्हेवाट लावता येईल आणि त्यापासून कोणतेही उत्पन्न आल्यास ते महानगरपालिकेच्या मालकीचे होईल.

(४) या कलमातील कोणताही मजकूर खारवलेल्या किंवा संस्करण केलेल्या मांसास लागू होतो असे मानले जाणार नाही.

### विक्रीच्या जागा, इत्यादीचे निरीक्षण

**३३६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये रीतसर प्राधिकृत न केलेल्या कोणत्याही जागेत किंवा प्राधिकृत न केलेल्या मानवी आहारासाठी असलेल्या कोणत्याही जनावराची कत्तल करण्यात आली आहे किंवा करण्यात येत आहे किंवा केली जाण्याचा संभव आहे किंवा अशा कोणत्याही जनावराचे मांस विकण्यात येत आहे किंवा विक्रीसाठी मांडण्यात येत आहे असे मानण्यास आयुक्तास संयुक्तिक कारण असेल तर त्यास, अशा ठिकाणी या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होत आहे किंवा कसे याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी नोटीस न देता, दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी अशा ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या ठिकाणी आढळलेले असे कोणतेही जनावर किंवा अशा जनावराचे प्रेत किंवा असे मांस जप्त करता येईल.

ज्या जागेत या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध जनावरांची कत्तल करण्यात येते किंवा मांसाची विक्री करण्यात येते असा संशय असेल अशा कोणत्याही जागेत आयुक्तास प्रवेश करता येईल.

(२) आयुक्तास, पोट-कलम (१) अन्वये अभिग्रहण केलेले कोणतेही जनावर किंवा कोणत्याही जनावराचे प्रेत किंवा असे कोणतेही मांस हलवता येईल आणि लिलाव करून विकता येईल किंवा अन्य प्रकारे त्याची विल्हेवाट लावता येईल.

(३) अशा रीतीने अभिग्रहण केल्यापासून एक महिन्याच्या आत अशा जनावराचा, प्रेताचा किंवा मांसाचा मालक उपस्थित होण्यात आणि आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने आपला हक्क सिद्ध करण्यात कसूर करील किंवा अशा मालकास अशा जनावरांच्या प्रेताच्या किंवा मांसाच्या बाबतीत या अधिनियमाखालील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आले तर, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही विक्रीचे उत्पन्न महानगरपालिकेकडे निहित होईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही प्रवेशामुळे किंवा असा प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही बळाच्या वापरामुळे अपरिहार्यपणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नुकसानभरपाईसाठी कोणताही दावा लावता येणार नाही.

**३३७.** विक्रीसाठी मांडलेली किंवा फेरीने विक्रीसाठी नेलेली किंवा विक्रीच्या प्रयोजनासाठी किंवा विक्रीसाठी माल तयार करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही ठिकाणी ठेवलेली किंवा आणलेली आणि मानवी आहारासाठी किंवा औषधासाठी योजलेली जनावरे, जनावरांची प्रेते, मांस, कोंबड्या, वन्य प्राणी, मांस, मासे, फळे, भाजीपाला, धान्य, पाव, पीठ, दुग्ध पदार्थ आणि अन्य कोणतेही पदार्थ यांची सतत आणि दक्षतेने पाहणी करण्यासाठी तरतूद करणे हे आयुक्ताचे कर्तव्य असेल आणि ते विक्रीसाठी मांडण्यात आले नव्हते किंवा फेरीने विक्रीसाठी नेले नव्हते किंवा अशा कोणत्याही प्रयोजनासाठी ठेवलेले किंवा आणलेले नव्हते किंवा मानवी आहारासाठी किंवा औषधासाठी योजलेले नव्हते हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपित व्यक्तीवर राहील.

मानवी आहारासाठी ठेवलेल्या वस्तुंची पाहणी करण्यासाठी आयुक्ताने तरतूद करणे.

**३३८.** (१) आयुक्तास, वर सांगितल्याप्रमाणे असे कोणतेही जनावर किंवा वस्तू आणि अशी वस्तू बनवण्यासाठी, तयार करण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी वापरलेले कोणतेही पात्र किंवा भांडे यांची सर्व वाजवी वेळी पाहणी व तपासणी करता येईल.

(२) असे कोणतेही जनावर किंवा वस्तू, यथास्थिती, रोगट किंवा सडलेली किंवा आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य आहे असे, किंवा ती जशी आहे म्हणून सांगण्यात आले आहे तशी ती नाही असे, किंवा असे कोणतेही पात्र किंवा भांडे हे, त्यात तयार केलेली, बनवलेली किंवा ठेवलेली कोणतीही वस्तू ज्यायोगे आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य होईल अशा प्रकारचे किंवा अशा स्थितीत आहे असे आयुक्तास आढळून येईल तर त्यास, अशा जनावराचे, वस्तूचे, पात्राचे किंवा भांड्याचे यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने त्याची व्यवस्था लावण्याकरिता अभिग्रहण करता यईल किंवा घेऊन जाता येईल आणि त्यास, असे कोणतेही जनावर किंवा वस्तू ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अटक करता येईल आणि निकटतम पोलीस ठाण्यात नेता येईल.

आरोग्यास अपायकारक वस्तू इत्यादी अभिग्रहण करणे.

**३३९.** कलम ३३८ अन्वये कोणतेही मांस, मासे, भाजीपाला किंवा नाशवंत स्वरूपाच्या अन्य वस्तुचे अभिग्रहण करण्यात येईल आणि आयुक्ताच्या मते ती यथास्थिती, रोगयुक्त, सडलेली, आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य असेल तर, ती पुन्हा विक्रीसाठी मांडता येणार नाही किंवा मानवी आहारासाठी वापरता येणार नाही अशा रीतीने आयुक्तास ती ताबडतोब नष्ट करविता येईल आणि त्याचा खर्च, अशी वस्तू जप्त करण्याच्या वेळी ती ज्या व्यक्तीच्या कब्जात असेल त्या व्यक्तीने दिला पाहिजे.

कलम ३३८ अन्वये अभिग्रहण केलेल्या नाशिवंत वस्तुंची विल्हेवाट लावणे.

१९४८ चा ८१. **३४०.** या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे, मुंबई प्राणी परिरक्षण अधिनियम, १९४८ याच्या तरतुदींच्या अंमलबजावणीस कोणत्याही रीतीने बाध येते असे मानले जाणार नाही.

मुंबई प्राणी परिरक्षण अधिनियम, १९४८ ची व्यावृत्ती.

## प्रकरण वीस

### परिवहन उपक्रम

### उपक्रम चालविणे आणि बांधकामे करणे व त्यांची देखभाल करणे

या प्रकरणाच्या तरतुदी केव्हा लागू होतील.

**३४१.** महानगरपालिका परिवहन उपक्रम संपादन करील किंवा स्थापन करील अशा प्रसंगी या प्रकरणाच्या तरतुदी लागू होतील.

परिवहन व्यवस्थापकाने उपक्रमाचे व्यवस्थापन करणे.

**३४२.** (१) परिवहन समितीच्या आणि महानगरपालिकेच्या अधीक्षणाच्या अधीन, परिवहन व्यवस्थापकाने, परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापन केले पाहिजे आणि काटकसरीने व कार्यक्षम रीतीने उपक्रमाचे परिरक्षण, परिचालन, प्रशासन व विकास करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कामे केली पाहिजेत.

(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध आणता, परिवहन व्यवस्थापकास, परिवहन समितीच्या मंजुरीने आणि या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या निर्बंधांच्या किंवा शर्तींच्या अधीन राहून, शहरात किंवा शहराबाहेर —

१९३९ चा ४.

(अ) * मोटार वाहन अधिनियम, १९३९ च्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेच्या नावाने दिलेल्या कोणत्याही लायसन्सच्या, परवान्याच्या किंवा मंजुरीच्या शर्तींच्या अधीन, लोकांची वाहतूक करण्यासाठी यंत्रचालित परिवहन सोयी धरून परिवहन उपक्रमांची रचना करता येईल किंवा ते संपादन करता येतील ;

(ब) परिवहन उपक्रम चालविण्यासाठी किंवा त्याच्या विकासासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा प्रत्येक प्रकारच्या इमारती आणि कर्मशाळा बांधता येतील ;

(क) कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता किंवा कोणतेही हक्क खरेदी करता येतील किंवा पट्ट्याने घेता येतील किंवा भाड्याने घेता येतील किंवा अन्य प्रकारे संपादन करता येतील ;

१९३९ चा ४.

(ड) * मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वये विराम परवाना धारण करणाऱ्या लायसन्सधारकाच्या ज्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास महानगरपालिकेस त्यावेळी प्राधिकृत करण्यात आले असेल अशा अधिकारांचा आणि लोकांची वाहतूक करण्यासाठी यंत्रचालित परिवहन सोयी करण्याच्या तरतुदींच्या संबंधात उक्त अधिनियमान्वये महानगरपालिकेस वापरण्याजोगे असतील अशा अन्य कोणत्याही अधिकारांचा वापर करता येईल.

### भाडे व आकार

परिवहन सेवांबद्दल भाडे व आकार वसूल करणे.

**३४३.** (१) परिवहन उपक्रमाने तरतूद केलेल्या वाहतुकीच्या कोणत्याही साधनाने उतारूंची ने-आण करण्याबद्दल किंवा मालाच्या वाहतुकीबद्दल, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेस देण्यात आलेल्या कोणत्याही लायसन्सच्या अधीन राहून, महानगरपालिकेच्या मान्यतेने परिवहन समिती वेळोवेळी ठरवील अशा दरांनी भाडे व आकार वसूल करता येईल.

---

* आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ पाहा.

[१][(२) या कलमान्वये त्यावेळी बसविण्यात आलेली सर्व प्रवासभाडी व आकार याची, मराठी किंवा इंग्रजी भाषेमधील मुद्रित यादी, जनतेच्या वाहतुकीसाठी परिवहन उपक्रमाकडून वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक वाहनाच्या आत, ठळक जागी प्रदर्शित करण्यात आली पाहिजे.

(३) या कलमान्वये बसविण्यात आलेली प्रवासभाडी व आकार हे, परिवहन समिती पूर्वोक्त यादीस जोडलेल्या नोटिसीद्वारे नेमील अशा व्यक्तींना, परिवहन सेवेच्या विहित प्रवास मार्गावर किंवा त्याच्याजवळ असलेल्या अशा जागी व अशा रीतीने दिली पाहिजेत.

(४) परिवहन उपक्रमाच्या कोणत्याही वाहनातून प्रवास करणारी किंवा जिने प्रवास केला आहे अशी कोणतीही व्यक्ती, आपले प्रवास भाडे देण्याचे टाळील किंवा टाळण्याचा प्रयत्न करील किंवा जी कोणतीही व्यक्ती विशिष्ट अंतरापर्यंतचे आपले भाडे देऊन अशा कोणत्याही वाहनातून अशा अंतरापलीकडे जाणूनबूजून व हेतुपुरस्सर जाईल आणि अशा जादा अंतराबद्दल जादा भाडे देणार नाही किंवा ते देण्याचे टाळण्याचा प्रयत्न करील, किंवा कोणतीही व्यक्ती, जेथपर्यंत तिने प्रवास भाडे दिले असेल अशा ठिकाणी आल्यानंतर, असे वाहन सोडून जाण्याचे जाणूनबुजून व हेतुपुरस्सर नाकारील किंवा त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करील त्या व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर, [२][पन्नास रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. अशी व्यक्ती (तिने ज्या अंतरापर्यंत प्रवास केला असेल अशा अंतराचे साधारण एकेरी प्रवास भाडे किंवा तिने ज्या ठिकाणापासून प्रवास सुरू केला अशा ठिकाणाबद्दल कोणतीही शंका असेल त्याबाबतीत, वाहन मूलत: ज्या ठिकाणापासून निघाले असेल, अशा ठिकाणापासूनचे साधारण एकेरी भाडे या व्यतिरिक्त किंवा तिने दिलेले कोणतेही प्रवास भाडे व जादा अंतरासाठी देय असलेले प्रवास भाडे यामधील फरकांव्यतिरिक्त) परिवहन व्यवस्थापकाने याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या परिवहन उपक्रमाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कर्मचाऱ्याने मागणी केल्यावर, या बाबतीत परिवहन व्यवस्थापक, परिवहन समितीच्या मान्यतेने ठरवील असा [२][पन्नास रुपयांपेक्षा] अधिक नसेल असा अतिरिक्त आकार देण्यास पात्र राहील.

(५) लगत पूर्ववर्ती पोट-कलमान्वये, ठरविण्यात आलेला अतिरिक्त आकार देण्यास पात्र असलेला प्रवासी, त्याकरिता मागणी करण्यात आल्यावर, तो देण्यात कसूर करील किंवा देण्यास नकार देईल, तर परिवहन व्यवस्थापकास किंवा त्या पोट-कलमान्वये रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा इतर कर्मचाऱ्यास, देय असलेली अशी रक्कम जणू काही दंड असल्याप्रमाणे, वसूल करण्यासाठी, न्याय दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल व अशी रक्कम देय असल्याबद्दल त्या दंडाधिकाऱ्याची खात्री झाल्यास, त्याने तो आकार रीतीने वसूल करण्याबद्दल व वसूल झाल्यानंतर तो परिवहन व्यवस्थापकास देण्याबद्दल आदेश दिला पाहिजे.

(६) या प्रकरणान्वये नेमलेल्या प्रत्येक नगरपालिका कर्मचाऱ्याने, आणि त्याने आपल्या सहाय्यासाठी बोलविलेल्या सर्व व्यक्तींनी, जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (४) खालील अपराध करीत आहे किंवा तसा तिने तो केला आहे किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा तसा प्रयत्न केला आहे असे त्यांना आढळून येईल आणि जिचे नाव व पत्ता त्यांना माहीत नसेल आणि ते सांगण्याचे जिने नाकारले असेल अशा व्यक्तीला अटक करून नजीकच्या पोलीस ठाण्यावर घेऊन जाणे कायदेशीर असेल ; आणि

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ५ अन्वये मूळ पोट-कलमे (२) व (३) याऐवजी पोट-कलमे (२) ते (६) दाखल करण्यात आली.

२ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ द्वारे "दहा रुपयांपर्यंत" याऐवजी हा मजकूर दाखल केला.

उक्त पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याने, उक्त व्यक्तीला शक्यतोवर कमीतकमी विलंब लावून न्यायदंडाधिकाऱ्यापुढे उपस्थित करविण्यासाठी आवश्यक असतील अशा कायदेशीर उपाययोजना केल्या पाहिजेत.]

## मालमत्ता संपादन करणे आणि तिचा विनियोग करणे

स्थावर मालमत्ता संपादन करणे.

**३४४.** (१) परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी परिवहन व्यवस्थापकाने कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करणे आवश्यक किंवा इष्ट असेल तेव्हा परिवहन व्यवस्थापकास महानगरपालिकेच्यावतीने अशी मालमत्ता, परिवहन समिती कोणत्याही प्रकारच्या बाबीसाठी सामान्यपणे किंवा कोणत्याही विशिष्ट बाबतीत विशेषरीत्या मान्यता देईल अशा अटींवर आणि अशा दरांनी किंवा अशा किंमतीस किंवा अशा कमाल मर्यादेपेक्षा अधिक नसतील अशा दरांनी किंवा किंमतीस, करार करून संपादन करता येईल.

(२) परिवहन व्यवस्थापक पोट-कलम (१) अन्वये करार करून कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करण्यास असमर्थ असेल तेव्हा [1][राज्य] शासनाला आपल्या विवेकानुसार, परिवहन व्यवस्थापकाने परिवहन समितीच्या मान्यतेने अर्ज केल्यावर आणि या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीन राहून जणू अशी मालमत्ता, भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली जमीन आहे असे समजून, ती महानगरपालिकेच्या वतीने संपादन करण्यासाठी कार्यवाही करण्यासंबंधी आदेश देता येईल.

१८९४ चा १.

(३) अशी कोणतीही मालमत्ता संपादन करताना द्यावयाची नुकासानभरपाईची रक्कम आणि झालेला अन्य सर्व खर्च, या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीन राहून परिवहन व्यवस्थापकाने ताबडतोब दिला पाहिजे आणि त्यानंतर उक्त मालमत्ता परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेकडे निहित होईल.

नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्याच्या बाबतीत लागू असलेल्या तरतुदी.

**३४५.** केवळ परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेकडे निहित असलेल्या मालमत्तेचा विनियोग करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :—

(अ) परिवहन व्यवस्थापकास, प्रत्येक बाबतीत दोन हजार रुपयांपेक्षा किंवा महानगरपालिका [1][राज्य] शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी ठरवील अशा अधिक रकमेपेक्षा अधिक किंमत नसेल अशा महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेची विक्री करून, भाड्याने देऊन किंवा अन्यथा विनियोग करता येईल ;

(ब) परिवहन व्यवस्थापकास, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एका वेळी बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीसाठी पट्ट्याने देता येईल ;

परंतु, परिवहन व्यवस्थापकाने (मासिक भाडेदारीसाठी असलेल्या संविदेव्यतिरिक्त) दिलेल्या ज्या पट्ट्याचे जबर भाड्याने वार्षिक भाडे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक पट्ट्याच्या बाबतीत त्याने, तो दिल्यापासून पंधरा दिवसांच्या आत परिवहन समितीस कळवले पाहिजे ;

(क) परिवहन व्यवस्थापकास, परिवहन समितीच्या मंजुरीने, जिची रक्कम दहा हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेचा, विक्री करून किंवा अन्यथा विनियोग करता येईल, आणि महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा अधिक अशा कोणत्याही मुदतीसाठी पट्ट्याने देता येईल, किंवा महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या कोणत्याही स्थावर मालमत्तेची किंमत पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल किंवा जिचे वार्षिक भाडे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल, अशी स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा अखंड पट्ट्याने देता येईल ;

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ड) परिवहन व्यवस्थापकास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल.

## अधिकारी आणि कर्मचारी

**३४६.** (१) परिवहन व्यवस्थापकाने परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनासाठी त्याच्या मते जे अधिकारी व कर्मचारी सेवेत कायम ठेवले पाहिजेत अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदनामे व श्रेणी, आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी व भत्ते देण्याचे त्याने योजले असेल त्याची रक्कम व स्वरूप दर्शविणारे एक विवरणपत्र वेळोवेळी तयार केले पाहिजे आणि ते परिवहन समितीपुढे ठेवले पाहिजे.

परिवहन व्यवस्थापकाने कायम अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे विवरणपत्र तयार करणे आणि परिवहन समितीने ते मंजूर करणे.

(२) परिवहन समितीने असे विवरणपत्र जसे असेल तसे, किंवा तिला इष्ट वाटतील अशा फेरबदलांच्या अधीन राहून मंजूर केले पाहिजे :

परंतु,—

(अ) ज्या स्थायी पदाचे भत्ते वगळून किमान मासिक वेतन दोनशे रुपयांपेक्षा अधिक असेल असे कोणतेही नवीन स्थायी पद महानगरपालिकेच्या मंजुरीशिवाय निर्माण करता कामा नये आणि ज्या पदाचे भत्ते वगळून किमान मासिक वेतन पाचशे रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असेल किंवा भत्ते वगळून कमाल मासिक वेतन आठशे रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असेल असे कोणतेही नवीन पद [१][राज्य] शासनाच्या मंजुरीशिवाय निर्माण करता कामा नये ;

(ब) अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गासाठी किंवा श्रेणींसाठी असलेल्या वेतन श्रेणीत महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय बदल करता येणार नाही, असा महानगरपालिकेस ठरावाद्वारे निदेश देता येईल आणि असा ठराव अंमलात असेल तोपर्यंत, परिवहन समितीस अशा मान्यतेशिवाय अशा वेतन श्रेणीतील कोणताही बदल प्राधिकृत करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—कोणत्याही कायम पदाच्या वेतनातील वाढीमुळे किमान मासिक वेतन, भत्ते वगळून, यथास्थिती, दोनशे रुपयांपेक्षा अधिक होत असेल किंवा पाचशे रुपये किंवा त्याहून अधिक होत असेल किंवा कमाल मासिक वेतन, भत्ते वगळून, आठशे रुपये किंवा त्यापेक्षा अधिक होत असेल तर, पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी, अशा कोणत्याही कायम पदाच्या वेतनातील अशी वाढ ही नवीन पद निर्माण करणे होय, असे मानले जाईल.

**३४७.** कोणत्याही कायम अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे पद व वित्तलब्धी कलम ३४६ अन्वये तयार केलेल्या आणि मंजूर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्रात समाविष्ट करण्यात आली असल्याशिवाय त्यास परिवहन उपक्रमांच्या कोणत्याही विभागात घेतले जाता कामा नये.

कायम अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीवरील निर्बंध.

**३४८.** (१) परिवहन व्यवस्थापकास सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी ज्यांचे मासिक वेतन, भत्ते वगळून, दोनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी तात्पुरती पदे निर्माण करता येतील आणि परिवहन समितीच्या पूर्वमंजुरीशिवाय अशी कोणतीही पदे अशा मुदतीनंतर चालू ठेवता येणार नाहीत.

तात्पुरती पदे निर्माण करणे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) परिवहन समितीस, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी, ज्यांचे मासिक वेतन, भत्ते वगळून, दोनशे रुपयांपेक्षा अधिक असेल अशी तात्पुरती पदे निर्माण करता येतील. समितीने अशा निर्माण केलेल्या प्रत्येक पदाविषयी ताबडतोब महानगरपालिकेस कळवले पाहिजे आणि महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीशिवाय असे कोणतेही पद सहा महिन्यांच्या मुदतीनंतर चालू ठेवता येणार नाही.

नेमणूक करण्याचा अधिकार कोणाकडे निहित असेल.

**३४९.** कलमे ३४७ आणि ३४८ च्या तरतुदींच्या अधीन राहून जर भत्ते वगळून किमान मासिक वेतन दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल, तर परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी नगरपालिका अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार परिवहन व्यवस्थापकाकडे निहित असेल आणि अन्य सर्व बाबतीत, परिवहन समितीमध्ये निहित असेल.

अनुपस्थिती रजा.

**३५०.** (१) विनियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून परिवहन व्यवस्थापकास, ज्या अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार त्यांच्याकडे निहित असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास अनुपस्थिती रजा देता येईल आणि या प्रकरणाच्या तरतुदींन्वये नेमणूक करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी अनुपस्थिती रजा देता येईल.

(२) परिवहन समितीस, तिने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक असणाऱ्या मुदतीसाठी अनुपस्थिती रजा देता येईल.

## महसूल आणि खर्च

### परिवहन निधी

परिवहन निधी स्थापन करणे.

**३५१.** कलम ९१ मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, परिवहन उपक्रमाच्या परिचालनाच्या बाबतीत महानगरपालिकेस किंवा तिच्या वतीने मिळालेला सर्व पैसा एका निधीत जमा करण्यात आला पाहिजे. या निधीस " .................. शहर परिवहन निधी " असे संबोधण्यात येईल आणि यात समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीन राहून उक्त उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने तो निधी विश्वस्त निधी म्हणून धारण केला पाहिजे.

परिवहन निधीत जमा करावयाच्या सर्व रकमा परिवहन व्यवस्थापकाने स्वीकारणे आणि त्या बँकेत भरणे.

**३५२.** परिवहन निधीत जमा करण्यायोग्य सर्व पैसा परिवहन व्यवस्थापकाने स्वीकारला पाहिजे आणि ताबडतोब [१][भारताच्या इंपिरिअल बँकेत] [२][किंवा अन्य कोणत्याही अनुसूचित बँकेत] [३][किंवा मान्यताप्राप्त सहाकारी बँकेत] " ............. शहर परिवहन निधी खाते" या नावाच्या खात्यात जमा केला पाहिजे :

परंतु, परिवहन व्यवस्थापकास, परिवहन समितीने दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन राहून परिवहन उपक्रमाच्या कामांसाठी आवश्यक असेल अशी रोख शिल्लक ठेवून घेता येईल :

[४][परंतु, आणखी असे की, मान्यताप्राप्त सहकारी बँकेत जमा करावयाची रक्कम ही, राज्य शासन कोणत्याही सहकारी बँकेच्या बाबतीत सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.]

---

[१] या शब्दांऐवजी "भारताच्या स्टेट बँकेत" हे शब्द स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट, १९५५ (१९५५ चा २३) च्या कलम ५६ प्रमाणे, दिनांक १-७-१९५५ पासून वाचावे.

[२] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आला.

[३] हे शब्द, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

[४] हे परंतुक, वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) अन्वये दाखल करण्यात आले.

**३५३.** (१) पूर्वोक्त बँकेने खाली विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने दोन व्यक्तींनी सही केलेल्या धनादेशाद्वारे असेल त्या व्यतिरिक्त, अन्य कोणत्याही रीतीने परिवहन निधीतून कोणतीही रक्कम देता कामा नये :-

परिवहन निधीतून रकमा कशा काढाव्यात.

(क) आयुक्ताने किंवा परिवहन व्यवस्थापकाने किंवा दोघांच्या अनुपस्थितीत, परिवहन समितीने मान्य केलेल्या, धनादेशावर सही करण्यास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत ज्याचे नाव असेल अशा अधिकाऱ्याने सही केलेल्या धनादेशाद्वारे ;

(ख) खंड (क) अन्वये ज्या अधिकाऱ्याने धनादेशावर सही केली असेल त्या अधिकाऱ्याव्यतिरिक्त, उक्त यादीत ज्या नगरपालिका अधिकाऱ्याचे नाव असेल अशा अधिकाऱ्याने सही केलेल्या धनादेशाद्वारे.

(२) महानगरपालिकेने परिवहन निधीतून देणे असलेली शंभर रुपयांपेक्षा अधिक किंवा परिवहन समिती सामान्यपणे किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गाच्या प्रदानांसाठी वेळोवेळी निश्चित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक असणारी कोणतीही रक्कम, वर सांगितल्याप्रमाणे सही केलेल्या धनादेशाद्वारेच दिली पाहिजे. अन्य कोणत्याही रीतीने देता कामा नये.

(३) परिवहन व्यवस्थापकास, पोट-कलम (२) खाली न येणाऱ्या रकमा रोख देता येतील, आणि अशा रकमा देण्यासाठी, प्रत्येकी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचे वर सांगितल्याप्रमाणे सही केलेले धनादेश वेळोवेळी काढता येतील.

**३५४.** कलमे ३५२ आणि ३५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिवहन व्यवस्थापकास, परिवहन समितीच्या पूर्वमान्यतेने, वेळोवेळी शहराच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणी असलेल्या बँकेत किंवा अन्य संस्थेत, परिवहन निधीचा कोणताही भाग पाठवता येईल व जमा करता येईल, आणि परिवहन निधीमध्ये जमा करण्यायोग्य किंवा त्यातून खर्च करण्यायोग्य असलेला कोणताही पैसा, परिवहन व्यवस्थापकाच्या मते, अशा कोणत्याही बँकेत किंवा संस्थेत असलेल्या निधीच्या खात्यात किंवा खात्यातून सर्वात सोयीस्करपणे जमा करता येत असेल किंवा देता येत असेल तर, तो अशा रीतीने जमा करता येईल किंवा देता येईल.

सोयीस्कर असेल तेव्हा परिवहन निधीचा भाग शहराबाहेरील बँकेत किंवा संस्थेत ठेवता येईल.

**३५५.** (१) यात यापुढे तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, ज्या कोणत्याही रकमेच्या खर्चाचा चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश नसेल आणि अशा अर्थसंकल्पीय अनुदानात पुरेशी शिल्लक उपलब्ध नसेल तर, नियमान्वये त्यात कोणतीही कपात किंवा खातेबदल केला असला तरी, परिवहन व्यवस्थापकाने परिवहन निधीतून अशी कोणतीही रक्कम देता कामा नये.

फक्त अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश असलेल्या रकमा परिवहन निधीतून खर्च करणे.

(२) खालील बाबी, पोट-कलम (१) मधील मनाईतून वगळण्यात येतील :—

(अ) ज्या रकमा खर्च करण्यास परिवहन समितीने कलम १०२ अन्वये मंजुरी दिली असेल अशा रकमा ;

(ब) कंत्राटदारांच्या किंवा अन्य व्यक्तींच्या अनामत म्हणून ठेवून घेतलेल्या रकमांची आणि परिवहन निधीमध्ये चुकीने भरलेल्या किंवा जमा केलेल्या रकमांची परतफेड ;

(क) परिवहन व्यवस्थापकास या अधिनियमाच्या किंवा अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदीन्वये भरपाई म्हणून ज्या रकमा देणे आवश्यक असेल किंवा ज्या रकमा देण्याचा त्यास अधिकार देण्यात आलेला असेल अशा रकमा ;

(ड) परिवहन व्यवस्थापकाने कलम ६७ अन्वये केलेला खर्च ;

(ई) आयुक्ताने परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनासाठी कलम ८६ च्या तरतुदींन्वये नगरपालिका निधीतून दिलेल्या कोणत्याही रकमेची नगरपालिका निधीत भरपाई करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम.

अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश नसलेली रक्कम कलम ३५५, पोट-कलम (२), खंड (ग), (घ) किंवा (ङ) अन्वये खर्च करण्यात येईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**३५६.** जेव्हा परिवहन व्यवस्थापकाने कलम ३५५, पोट-कलम (२), खंड (ग), (घ) किंवा (ङ) अन्वये कोणतीही रक्कम खर्च केली असेल तेव्हा, त्याने ती परिस्थिती ताबडतोब परिवहन समितीस कळवली पाहिजे आणि परिवहन समितीने अशा जादा खर्चाची रक्कम भरून काढण्यासाठी त्या परिस्थितीत शक्य व इष्ट वाटेल अशी कार्यवाही नियमान्वये केली पाहिजे किंवा अशी कार्यवाही करण्याविषयी महानगरपालिकेस शिफारस केली पाहिजे.

ज्या प्रयोजनांसाठी परिवहन निधीचा विनियोग करावयाचा ती प्रयोजने.

**३५७.** परिवहन निधीमध्ये वेळोवेळी जमा करण्यात आलेल्या पैशाचा विनियोग, परिवहन उपक्रम संपादन करण्याच्या, ठेवण्याच्या, चालवण्याच्या आणि त्यामध्ये सुधारणा करण्याच्या प्रयोजनांसाठी आणि या प्रकरणाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा, किंवा ज्या देण्याबद्दल या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा तरतुदींन्वये रीतसर निदेश देण्यात येतील किंवा मंजुरी देण्यात येईल अशा सर्व रकमा, आकार व खर्च देण्यासाठी, करण्यात येईल. यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी नगरपालिका निधीतून संवितरित केलेल्या कोणत्याही रकमेची त्या निधीत भरपाई करणे. यात आयुक्ताने नगरपालिका निधीच्या खर्चाने अशा कोणत्याही प्रयोजनासाठी पुरवलेल्या गोष्टी आणि दिलेल्या सेवा याबद्दलचा खर्च किंवा वाजवी आकार यांचा समावेश होतो ;

(ब) जर परिवहन उपक्रमाच्या जमिनी, इमारती आणि अन्य मालमत्ता महानगरपालिकेमध्ये निहित नसती तर अशा जमिनी, इमारती किंवा अन्य मालमत्ता-जंगम आणि स्थावर-यांच्या संबंधात नगरपालिका करांबद्दल या अधिनियमान्वये जी रक्कम देय झाली असती, अशा रकमेइतकी रक्कम नगरपालिका निधीस देणे ;

(क) परिवहन समितीच्या अध्यक्षास व सदस्यांना फी देणे, आणि परिवहन व्यवस्थापकास वेतन व भत्ते देणे ;

(ड) या प्रकरणाच्या तरतुदींन्वये नेमण्यात आलेल्या सर्व नगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते देणे आणि या प्रकरणाच्या किंवा विनियमांच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही विवरणपत्राच्या तरतुदींन्वये देय असलेली भविष्यनिर्वाह निधी, निवृत्तिवेतने, उपदाने आणि अनुकंपा भत्ते यांची सर्व अंशदाने देणे ;

(ई) या अधिनियमाच्या किंवा अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींन्वये परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी किंवा परिवहन उपक्रमाच्या संबंधात परिवहन व्यवस्थापकास देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्यावर लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडताना त्याने केलेला सर्व खर्च आणि परिव्यय देणे,— यात भरपाईबद्दल त्याने जी रक्कम देणे आवश्यक असेल किंवा देण्याचा त्यास अधिकार प्रदान करण्यात आला असेल त्या रकमेचा समावेश होतो ;

(फ) परिवहन उपक्रम संपादन करणे, सुस्थितीत ठेवणे किंवा चालवणे यातून उद्‌भवलेल्या कोणत्याही कार्यवाहीत महानगरपालिकेविरुद्ध किंवा अधिकारपरत्त्वे आयुक्ताविरुद्ध किंवा परिवहन व्यवस्थापकाविरुद्ध दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये, किंवा अशा रीतीने संपादन करणे, सुस्थितीत ठेवणे किंवा चालवणे यातून उद्‌भवलेल्या कोणत्याही वादाच्या किंवा अन्य कायदेशीर कार्यवाहीच्या किंवा दाव्याच्या संबंधात कलम ४८१ अन्वये केलेल्या तडजोडीअन्वये देय असलेली प्रत्येक रक्कम देणे ;

(ग) कलम ३५९ किंवा ३६० च्या तरतुदीन्वये नगरपालिका निधीमध्ये हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक असेल अशी प्रत्येक रक्कम ;

(ह) कलम १०८ अन्वये आकारण्यायोग्य प्रत्येक रक्कम.

**३५८.** (१) परिवहन निधीमध्ये जमा असलेल्या ज्या शिलकी पैशाचा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी ताबडतोब किंवा लवकर विनियोग करणे शक्य नसेल, असा पैसा किंवा परिवहन उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी उभारलेल्या कोणत्याही कर्जापैकी शिलकी पैसा, वेळोवेळी [१][भारताच्या इंपिरिअल बँकेत] [२][किंवा अन्य कोणत्याही अनुसूचित बँकेत] [३][किंवा मान्य सहकारी बँकेत] व्याजाने ठेवला पाहिजे [४][किंवा सरकारी कर्जरोख्यात गुंतवला पाहिजे.] : शिलकी पैशाची गुंतवणूक.

[५][परंतु, [६][मान्य सहकारी बँकेत] जमा करावयाची रक्कम ही, राज्य शासन कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत सामान्यपणे किंवा विशेषरीत्या विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.]

(२) अशा सर्व रकमा महानगरपालिकेच्या वतीने परिवहन व्यवस्थापकाने परिवहन समितीच्या मंजुरीने जमा केल्या पाहिजेत आणि गुंतवल्या पाहिजेत आणि तशाच मंजुरीने, परिवहन व्यवस्थापकास, कोणत्याही वेळी अशा रीतीने जमा केलेली कोणतीही रक्कम काढता येईल किंवा कोणत्याही कर्जरोख्यांचा विनियोग करता येईल आणि अशा रीतीने काढलेली किंवा अशा कर्जरोख्यांचा विनियोग करून मिळालेली रक्कम पुन्हा जमा करता येईल किंवा पुन्हा गुंतवता येईल.

---

[१] स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट, १९५५ (१९५५ चा २३) च्या कलम ५६ प्रमाणे, या शब्दांऐवजी "भारताच्या स्टेट बँकेत" हे शब्द दिनांक १-७-१९५५ पासून वाचावे.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ७ (१) अन्वये हे शब्द, दाखल करण्यात आले.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम २ अन्वये हे शब्द, दाखल करण्यात आले.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ७ (२) अन्वये हे परंतुक, दाखल करण्यात आले.

[६] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २, अनुसूची अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द, दाखल करण्यात आले.

(३) अशा रीतीने कोणतीही रक्कम जमा करण्यामुळे किंवा गुंतवण्यामुळे कोणताही तोटा होत असेल तर तो परिवहन निधीत खर्ची घातला पाहिजे.

**अतिरिक्त शिलकीतून रकमा देणे**

नगरपालिका निधीत नियत वार्षिक रक्कम भरणे.

**३५९.** (१) प्रत्येक सरकारी वर्षाच्या अखेरीस उत्पन्नातून खर्च वजा जाता परिवहन निधीच्या महसूल खाती जमा असलेल्या शिलकीतून, उक्त निधीच्या महसूलातून देय असलेले सर्व आकार, परिव्यय आणि खर्च भागवल्यानंतर किंवा त्याची तरतूद केल्यानंतर आणि उक्त निधीमध्ये, कलम ९८ अन्वये विनिर्दिष्ट केलेली किंवा त्या कलमान्वये त्यावेळी निश्चित केलेली रोख शिल्लक जमा खाती ठेवून घेतल्यानंतर पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेली रक्कम खातेबदल करून नगरपालिका निधीमध्ये जमा करण्यात आली पाहिजे :

परंतु, पूर्वोक्त बाबींसाठी तरतूद करण्यात आल्यानंतर उक्त महसूल खात्यात जमा असलेली शिल्लक रक्कम, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, अशी सर्व शिल्लक रक्कम नगरपालिका निधीमध्ये बदली करण्यात आली पाहिजे आणि कलम ३६० अन्वये ठेवण्यात आलेल्या महसुली राखीव निधीतून रक्कम काढून ती नगरपालिका निधीमध्ये जमा करून कोणतीही तूट भरून काढण्यात आली पाहिजे, आणि तरीही तूट राहिल्यास, ती पुढच्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही वर्षी, पूर्वोक्त सर्व बाबींसाठी आणि पोट-कलम (२) मध्ये त्या वर्षासाठी तरतूद केलेल्या रकमेसाठी तरतूद केल्यानंतर, महसूल खात्यात शिल्लक राहिलेल्या रकमेतून नगरपालिका निधीमध्ये रक्कम जमा करून, भरून काढण्यात आली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये नगरपालिका निधीमध्ये बदली करावयाची रक्कम ही, प्रत्येक सरकारी वर्षाच्या बाबतीत, त्या वर्षाच्या सुरुवातीपूर्वी महानगरपालिका ठरवील अशी रक्कम असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बदली करावयाची रक्कम ही, ज्या शिलकीतून बदली करावयाची अशी शिल्लक ज्या वर्षीची असेल त्या वर्षाच्या समाप्तीच्या लगेचनंतरच्या जून महिन्याच्या ३० तारखेपूर्वी, परिवहन निधीच्या नावाने काढलेल्या धनादेशाद्वारे, ज्या बँकेत नगरपालिका निधी जमा करण्यात आला असेल अशा कोणत्याही बँकेत उक्त निधीच्या खाती भरण्यात आली पाहिजे.

महसुलाच्या जादा शिलकीचा विनियोग करणे.

**३६०.** (१) कलम ३५९ मध्ये नमूद केलेल्या बाबीसाठी तरतूद केल्यानंतर, परिवहन निधीच्या महसूल खाती खर्च वजा जाता आणखी कोणतीही जादा रक्कम शिल्लक राहात असेल तर, अशा जादा शिल्लक रकमेचा पुढीलप्रमाणे विनियोग करण्यात आला पाहिजे.

(अ) जादा शिल्लक रकमेच्या ३० टक्के इतकी रक्कम ३६१ अन्वये ठेवलेल्या लेख्यात एका स्वतंत्र शीर्षाखाली "महसुली राखीव निधी" या नावाच्या विशेष निधीमध्ये जमा करण्यात आली पाहिजे ; मात्र अशी रक्कम जमा करण्यात आल्यावर उक्त महसुली राखीव निधीतील शिल्लक, महानगरपालिका [१][राज्य] शासनाच्या मंजुरीने निश्चित करील अशा रकमेपेक्षा अधिक होता कामा नये. अशी शिल्लक, अशा रीतीने अधिक होत असेल तर त्या बाबतीत, अशा रीतीने निश्चित करण्यात आलेल्या रकमेइतकी रक्कम होण्यासाठी जितकी रक्कम आवश्यक असेल तितकीच रक्कम, तशी असल्यास, अशा रीतीने जमा करण्यात येईल आणि जादा शिलकीच्या ३० टक्क्यांइतक्या रकमेपैकी राहिलेली रक्कम, खंड (ख), (ग) आणि (घ) अन्वये जमा केलेल्या किंवा बदली केलेल्या रकमांमध्ये समप्रमाणात मिळवण्यात येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) जादा शिल्लक रकमेच्या ३० टक्के इतकी रक्कम आणि खंड (क) अन्वये उपलब्ध होईल अशी अतिरिक्त रक्कम, कलम ३६१ अन्वये ठेवलेल्या लेख्यात एका स्वतंत्र शीर्षाखाली ''परिवहन सुधारणा निधी'' या नावाच्या विशेष निधीमध्ये जमा करण्यात येईल ;

(क) जादा शिल्लक रकमेच्या २५ टक्के इतकी रक्कम आणि खंड (अ) अन्वये उपलब्ध होईल अशी अतिरिक्त रक्कम, नियमान्वये स्थापन केलेल्या कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी नगरपालिका निधीमध्ये बदली करण्यात आली पाहिजे ; आणि

(ड) जादा शिल्लक रकमेच्या १५ टक्के इतकी रक्कम आणि खंड (अ) अन्वये उपलब्ध होईल अशी अतिरिक्त रक्कम नगरपालिका निधीमध्ये बदली करण्यात आली पाहिजे.

(२) महसुली राखीव निधीचा विनियोग पुढील प्रयोजनांसाठी करण्यात आला पाहिजे :—

(एक) कलम ३५९ अन्वये कोणत्याही वर्षी नगरपालिका निधीमध्ये बदली करावयाच्या रकमेची भरपाई करण्यासाठी किंवा त्यातील कोणतीही तूट भरून काढण्यासाठी ; आणि

(दोन) परिवहन निधीतून कोणताही खर्च भागवण्यासाठी उक्त निधीतून त्या प्रयोजनासाठी उपलब्ध असलेली शिल्लक जेथवर अपुरी असेल त्या मर्यादेपर्यंत तो खर्च भागवण्यासाठी.

(३) परिवहन उपक्रमाने जनतेसाठी तरतूद केलेल्या सेवा, सुखसोयी आणि सोयी यामध्ये सुधारणा करण्यासाठी परिवहन सुधारणा निधीचा विनियोग करण्यात आला पाहिजे.

(४) पोट-कलम (१), खंड (ग) आणि (घ) अन्वये नगरपालिका निधीमध्ये बदली करावयाच्या रकमा, ज्या सरकारी वर्षात रकमा अशा बदली करावयाच्या असतील त्या वर्षाच्या समाप्तीच्या लगेचनंतरच्या जून महिन्याच्या ३० तारखेपूर्वी, परिवहन निधीच्या नावाने काढलेल्या धनादेशाद्वारे, ज्या बँकेत नगरपालिका निधी जमा करण्यात आला असेल अशा कोणत्याही बँकेत उक्त निधीच्या खाती भरण्यात आल्या पाहिजेत.

## लेखे

परिवहन उपक्रमाचे लेखे.

**३६१.** परिवहन उपक्रमासाठी झालेल्या महानगरपालिकेच्या जमा व खर्चाचे आणि उक्त उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या किंवा निहित होणाऱ्या मालमत्तेचे लेखे, परिवहन समिती वेळोवेळी विहित करील अशा रीतीने आणि अशा नमुन्यांत ठेवण्यात आले पाहिजेत.

वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र तयार करणे.

**३६२.** (१) परिवहन व्यवस्थापकाने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर, शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनासंबंधी सविस्तर अहवाल, आणि तसेच, उक्त वर्षात परिवहन निधीमध्ये जमा केलेल्या आणि खर्ची घातलेल्या अनुक्रमे जमा आणि संवितरणाच्या रकमा आणि उक्त वर्षाच्या अखेरीस निधीमध्ये जमा असलेली शिल्लक दर्शविणारे विवरणपत्र, त्याचप्रमाणे कर्जापैकी वसूल व्हावयाच्या बाकी रकमांचा हिशेब तयार करवून घेतला पाहिजे आणि परिवहन समितीस सादर केला पाहिजे.

(२) परिवहन समितीने अहवाल आणि विवरणपत्र यांची तपासणी केल्यानंतर आणि आढावा घेतल्यानंतर अहवालाची एक प्रत समितीच्या आढाव्याच्या प्रतीसह प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या पत्त्यावर पाठवण्यात आली पाहिजे आणि ज्या व्यक्तीला त्याच्या प्रतींची आवश्यकता असेल अशा व्यक्तीने, परिवहन व्यवस्थापक परिवहन समितीच्या पूर्वमान्यतेने ठरवील अशी वाजवी फी प्रत्येक प्रतीसाठी दिल्यानंतर, तिला अशा प्रती दिल्या पाहिजेत.

## प्रकरण एकवीस

## जीवनविषयक आकडेवारी

## जन्म आणि मृत्यूंची नोंदणी

निबंधकाची नेमणूक.

**३६३.** (१) जन्म आणि मृत्यूंची नोंदणी करण्याच्या प्रयोजनासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी हा शहराचा महानिबंधक असेल.

(२) आयुक्तास, महानिबंधकाशी विचारविनिमय करून —

(अ) त्यास वेळोवेळी योग्य वाटेल अशा आणि इतक्या विभागांत शहराची विभागणी करता येईल ;

(ब) अशा प्रत्येक विभागासाठी जन्म आणि मृत्यू निबंधक म्हणून एका नगरपालिका अधिकाऱ्यास नामनिर्देशित करता येईल ;

(क) प्रत्येक निबंधकासाठी, ज्या विभागासाठी त्याची नेमणूक करण्यात आली असेल अशा विभागात त्याचे कार्यालय म्हणून एक योग्य ठिकाण निश्चित करता येईल.

नोंदवह्या ठेवणे.

**३६४.** (१) आयुक्त, जन्म आणि मृत्यूसंबंधी वेळोवेळी निश्चित करील असा तपशील, जन्म व मृत्यूच्या वेगवेगळ्या नोंदवह्यांमध्ये नमूद करण्यात आला पाहिजे आणि अशा नोंदवह्या महानिबंधकाने किंवा शहराची विभागांमध्ये विभागणी करण्यात आली असेल, तर प्रत्येक विभागाच्या निबंधकाने ठेवल्या पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) अन्वये ठेवणे आवश्यक असलेल्या नोंदवह्यांचे नमुने आणि अशा नोंदवह्या ज्या रीतीने ठेवावयाच्या ती रीत आयुक्ताने विनिर्दिष्ट केली पाहिजे.

निबंधकांनी सर्व जन्म आणि मृत्यूसंबंधी स्वत:हून माहिती करून घेणे.

**३६५.** (१) महानिबंधकाने, किंवा कलम ३६३ अन्वये शहराची विभागांमध्ये विभागणी करण्यात आली असेल तर प्रत्येक विभागाच्या निबंधकाने, यथास्थिती, शहरात किंवा त्याच्या विभागात घडून येईल अशा प्रत्येक जन्म आणि मृत्यूसंबंधी, आणि कलम ३६४ अन्वये नोंदणी करण्यासाठी आवश्यक असेल अशा त्यासंबंधीच्या तपशिलाची स्वत:हून काळजीपूर्वक माहिती करून घेणे हे त्याचे कर्तव्य असेल, आणि त्याने, अशा प्रत्येक जन्मानंतर किंवा मृत्यूनंतर शक्य असेल तितक्या लवकर, त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या नोंदवहीत त्यासंबंधी नोंदणी केली पाहिजे. अशी नोंद करण्यासाठी, नगरपालिका अधिकारी म्हणून त्यास जे पारिश्रमिक मिळत असेल त्या व्यतिरिक्त कोणताही आकार न घेता किंवा कोणतीही फी किंवा बक्षीस न मागता किंवा न घेता, त्याने अशी नोंदणी केली पाहिजे.

(२) महानिबंधक आणि निबंधक यांच्याशिवाय, अन्य नगरपालिका अधिकाऱ्यांची नेमणूक करता येईल, आणि प्रत्येक जन्माची किंवा प्रत्येक मृत्यूची किंवा त्यांची अनुक्रमे ज्या विभागात नेमणूक करण्यात आली असेल त्या विभागातील प्रत्येक जन्माची आणि प्रत्येक मृत्यूची, आणि त्यासंबंधी नोंदणी करण्यासाठी आवश्यक अशा त्यासंबंधीच्या तपशीलाची स्वत:हून माहिती करून घेणे आणि अशी माहिती, यथास्थिती, महा निबंधकाकडे किंवा उक्त विभागाच्या निबंधकाकडे, किंवा आयुक्त निदेश देईल अशा अन्य व्यक्तीकडे सादर करणे, हे अशा अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

**३६६.** शहरात जन्मलेल्या प्रत्येक मुलाच्या आईवडिलांनी, आणि आईवडिलांनी कसूर केल्यास, ज्या जागेत त्या जागेच्या भोगवटादाराच्या माहितीप्रमाणे मूल जन्मले असेल त्या जागेच्या भोगवटादाराने, आणि जन्माच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, आणि त्या मुलाचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीने, आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे, महानिबंधकास किंवा शहराची विभागांमध्ये विभागणी करण्यात आली असेल तर, त्या विभागाच्या निबंधकास किंवा कलम ३६५ अन्वये नेमलेल्या नगरपालिका अधिकाऱ्यास अशा जन्मासंबंधी नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या तपशीलाची माहिती अशा जन्मानंतर सात दिवसांच्या आत देणे, हे त्याचे कर्तव्य असेल :

जन्मासंबंधी माहिती सात दिवसांच्या आत देणे.

परंतु —

(अ) अनौरस मुलाच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस अशा मुलाचे वडील म्हणून अशा मुलाच्या जन्मासंबंधी या अधिनियमान्वये माहिती देण्यास भाग पाडता येणार नाही, आणि यथास्थिती, महानिबंधकास किंवा निबंधकास, अशा मुलाच्या आईने आणि अशा मुलाचे वडील असल्याचे कबूल करणाऱ्या व्यक्तीने संयुक्तरीत्या विनंती केली असल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा मुलाचे वडील म्हणून नोंदवहीत लिहिता येणार नाही, आणि अशा बाबतीत अशा व्यक्तीने, तसेच अशा मुलाच्या आईने नोंदवहीत सही केली पाहिजे ;

(ब) केवळ दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने कसूर केल्यामुळे ज्या व्यक्तीने माहिती देणे आवश्यक असेल अशा व्यक्तीस अशी माहिती देण्यात आले आहे असे वाटत असेल आणि असे वाटण्यास तिला वाजवी कारण असेल तर, अशी माहिती देणे तिच्यावर बंधनकारक असणार नाही ;

(क) एखादे मूल रुग्णालयात जन्मले असेल तेव्हा, महानिबंधक वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात अशा जन्मासंबंधीचा अहवाल ताबडतोब यथास्थिती, महानिबंधकाकडे किंवा निबंधकाकडे पाठवणे हे त्या रुग्णालयाच्या प्रभारी अधिकाऱ्यावर बंधनकारक असेल.

**३६७.** कोणतेही नवजात मूल उघड्यावर टाकलेले आढळले तर त्या बाबतीत, असे मूल ज्या व्यक्तीस आढळले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, आणि असे मूल ज्या व्यक्तीच्या ताब्यात देण्यात येईल त्या व्यक्तीने आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे, महानिबंधकास किंवा निबंधकास किंवा पूर्वोक्त अन्य नगरपालिका अधिकाऱ्यास अशा मुलाच्या जन्मासंबंधी नोंदणी करण्यासाठी आवश्यक असेल अशा आपल्या जवळ असलेल्या तपशीलाची माहिती, असे मूल आढळल्यानंतर सात दिवसांच्या आत देणे हे त्याचे कर्तव्य असेल.

नवजात मूल आढळल्यास त्यासंबंधी माहिती देणे.

**३६८.** (१) शहरात मरण पावलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूच्या वेळी उपस्थित असलेल्या किंवा मृत व्यक्तीच्या शेवटच्या आजारपणात तिची शुश्रुषा करणाऱ्या अगदी जवळच्या नातेवाईकाने आणि अशा नातेवाईकाने कसूर केल्यास, मृत्यूच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, आणि ज्या जागेत त्या जागेच्या भोगवटादाराच्या माहितीप्रमाणे मृत्यू झाला असेल त्या जागेच्या भोगवटादाराने, आणि या कलमात यापूर्वी नमूद केलेल्या व्यक्तींनी कसूर केल्यास, अशा जागेत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे महानिबंधकास किंवा कलम ३६३ अन्वये शहराची विभागामध्ये विभागणी करण्यात आली असेल, तर ज्या विभागात मृत्यू झाला असेल त्या विभागाच्या निबंधकास किंवा कलम ३६५ अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास अशा मृत्यूसंबंधी नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या तपशिलाची माहिती मृत्यू झाल्यापासून चोवीस तासांच्या आत देणे हे त्यांचे कर्तव्य असेल :

मृत्यूसंबंधी माहिती देणे.

परंतु, मृत्यूचे कारण दूर्धर रोग हे आहे असे माहीत असेल तर, पूर्वोक्त माहिती मृत्यू झाल्यापासून बारा तासांच्या आत दिली पाहिजे.

ज्या वैद्यक व्यवसायीने मृत व्यक्तीवर उपचार केले असतील त्याने त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबत प्रमाणपत्र देणे.

**३६९.** ज्या व्यक्तीच्या शेवटच्या आजारपणात योग्य अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने उपचार केले असतील अशा व्यक्तीच्या बाबतीत, त्या वैद्यक व्यवसायीने अशा व्यक्तीच्या मृत्यूची माहिती त्यास मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत, आयुक्त याबाबत वेळोवेळी विहित करील अशा नमुन्यात, अशा व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचे प्रमाणपत्र सही करून महानिबंधकाकडे पाठवले पाहिजे ; आणि अशा प्रमाणपत्रात नमूद केलेले कारण, तसेच प्रमाणपत्र देणाऱ्या वैद्यक व्यवसायीचे नाव नोंदवहीत नमूद केले पाहिजे.

जन्म किंवा मृत्यूच्या नोंदवह्यातील चुका दुरुस्त करणे.

**३७०.** (१) जन्म नोंदवहीत किंवा मृत्यू नोंदवहीत जो कोणताही लेखन प्रमाद आढळेल तो, याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस दुरुस्त करता येईल.

(२) अशा कोणत्याही नोंदवहीतील वस्तुस्थितीसंबंधीची किंवा मजकुरासंबंधीची कोणतीही चूक दुरुस्त करण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीने, ज्या जन्माच्या संदर्भात किंवा मृत्यूच्या संदर्भात चूक झाली असेल त्या जन्मासंबंधी किंवा मृत्यूसंबंधी या अधिनियमान्वये ज्या व्यक्तींनी माहिती देणे आवश्यक असेल अशा दोन व्यक्तींनी, किंवा अशा व्यक्तीने कसूर केल्यास, या प्रकरणाची माहिती असलेल्या दोन विश्वसनीय व्यक्तींनी, दंडाधिकाऱ्याकडे केलेले आणि ते आपल्या उपस्थितीत केले आहे असे उक्त दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेले, चुकीचे स्वरूप व प्रकरणाची खरी वस्तुस्थिती नमूद करणारे, शपथेवर केलेले प्रतिज्ञापन, आयुक्तास सादर केल्यानंतर, वर सांगितल्याप्रमाणे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस मूळ नोंदीत कोणताही फेरफार न करता, समासात नोंद करून अशी चूक दुरुस्त करता येईल.

(३) वर सांगितल्याप्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त, अशा कोणत्याही नोंदवहीत कोणताही फेरफार करता येणार नाही.

मुलाच्या नावाची किंवा मुलाच्या नावात केलेल्या फेरफाराची नोंदणी.

**३७१.** (१) कोणत्याही मुलाच्या जन्माची नोंदणी करण्यात आली असेल आणि ज्या कोणत्याही नावाने नोंदणी करण्यात आली असेल त्या नावात फेरफार करण्यात आला असेल, किंवा नावाशिवाय त्याची नोंदणी करण्यात आली असेल तर त्याचे नाव ठेवण्यात येईल तेव्हा, अशा मुलाच्या आईवडिलांस किंवा पालकास किंवा अशा नावात फेरफार करवून घेणाऱ्या किंवा असे नाव ठेवणाऱ्या अन्य व्यक्तीस, जन्म नोंदणीनंतर बारा महिन्यांच्या आत, महानिबंधकाकडे किंवा कलम ३६३ अन्वये शहराची विभागांमध्ये विभागणी करण्यात आली असेल तर ज्या विभागात जन्माची नोंदणी करण्यात आली असेल त्या विभागाच्या निबंधकाकडे यात यापुढे नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र देता येईल, आणि महानिबंधकाने किंवा निबंधकाने ते प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मूळ नोंदीत कोणतीही खाडाखोड न करता, मुलाचे ठेवण्यात आलेले नाव म्हणून जे नाव प्रमाणपत्रात नमूद करण्यात आले असेल ते नाव ताबडतोब नोंदवहीत लिहिले पाहिजे.

(२) आयुक्त वेळोवेळी विहित करील अशा नमुन्यात असे प्रमाणपत्र असले पाहिजे, आणि ख्रिश्चन मुलाच्या बाबतीत, ज्या बाप्तिस्मा विधीनंतर नाव ठेवण्यात आले असेल किंवा त्यात फेरफार करण्यात आला असेल तो बाप्तिस्मा विधी करणाऱ्या ख्रिस्ती पुरोहिताने किंवा व्यक्तीने त्या प्रमाणपत्रावर सही केली पाहिजे, किंवा मुलाचा बाप्तिस्मा विधी झाला नसेल किंवा मूल ख्रिश्चन नसेल तर त्या मुलाच्या वडिलांनी, आईने किंवा पालकाने, किंवा मुलाचे नाव ठेवणाऱ्या किंवा त्यात फेरफार करवून घेणाऱ्या अन्य व्यक्तीने त्या प्रमाणपत्रावर सही केली पाहिजे.

(३) बाप्तिस्मा विधी करणाऱ्या प्रत्येक ख्रिश्चन पुरोहिताने किंवा व्यक्तीने या कलमान्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र, मागणी केल्यानंतर, एक रुपयापेक्षा अधिक नसेल इतकी फी घेऊन दिले पाहिजे.

## प्रकरण बावीस

## लायसन्स आणि परवाने

### एक.— सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे.

वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे.

**३७२.** (१) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी (एक) सर्वेक्षक ; (दोन) वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंता ; (तीन) संरचना संकल्पचित्रकार ; (चार) बांधकाम लिपिक ; किंवा (पाच) नळकारागीर म्हणून काम करण्यासाठी एका वर्षाच्या मुदतीसाठी, नवीकरण करता येईल असे लायसन्स देता येईल.

(२) अशा व्यक्तीस, उपविधीअन्वये विहित करण्यात येईल अशी अर्हता किंवा अनुभव, किंवा दोन्ही असल्याखेरीज, पोट-कलम (१) अन्वये कोणतेही लायसन्स दिले जाणार नाही.

(३) अर्जदारास, उपविधीअन्वये विहित केलेली अर्हता आणि अनुभव असेल तर; अक्षमता, गैरवर्तणूक किंवा अन्य गंभीर कारणांमुळे अर्जदार असे लायसन्स धारण करण्यास अयोग्य आहे या कारणावरून असेल त्या व्यतिरिक्त, लायसन्ससाठी केलेला कोणताही अर्ज नाकारता येणार नाही.

(४) आयुक्ताने पोट-कलम (३) अन्वये लायसन्ससाठी करण्यात आलेला कोणताही अर्ज नाकारला तर, त्याने, अर्जदाराच्या विनंतीवरून, कोणताही आकार न घेता, असा अर्ज नाकारण्यासंबंधीची त्याची कारणे अशा अर्जदारास आपल्या सहीने लेखी कळविली पाहिजेत.

सर्वेक्षक इत्यादींच्या मार्गदर्शनासाठी आदेश विहित करता येतील.

**३७३.** (१) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, अनुक्रमे लायसन्सदार, सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळ कारागीर यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आदेश काढता येतील.

(२) अशा रीतीने विहित करण्यात आलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या सर्व आदेशांच्या प्रती, आयुक्त ठरवील अशा किंमतीस नगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येतील आणि त्याची एक प्रत, अशा कार्यालयात सर्व वाजवी वेळी पाहणीसाठी ठेवण्यात आली पाहिजे.

स्थायी समितीने लायसन्सदार, नळकारागिरांची फी आणि आकार विहित करणे.

**३७४.** स्थायी समितीस, लायसन्सदार नळकारागीरांनी या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या कोणत्याही कामासाठी त्यांना द्यावयाची फी किंवा आकार वेळोवेळी विहित करता येतील, आणि कोणत्याही लायसन्सदार नळकारागिरास, अशा कोणत्याही कामासाठी अशा रीतीने विहित केलेल्या फी किंवा आकारापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता किंवा स्वीकारता येणार नाहीत.

काम योग्य रीतीने पार पाडणे हे लायसन्सदार नळ-कारागीरांवर बंधनकारक असणे.

**३७५.** कोणत्याही लायसन्सदार नळकारागीराने या अधिनियमान्वये करावयाचे कोणतेही काम निष्काळजीपणाने किंवा हयगयीने करता कामा नये किंवा अशा कामाच्या प्रयोजनासाठी कोणतेही खराब सामान, उपयंत्र किंवा जोडणी वापरता कामा नये.

**दोन.—व्यवसाय लायसन्स आणि जनावरे व विवक्षित वस्तू ठेवण्यासाठी अन्य लायसन्स**

लायसन्सशिवाय विवक्षित गोष्टी न ठेवणे आणि विवक्षित व्यवसाय व कामे न करणे.

**३७६.** (१) आयुक्ताने दिलेल्या लायसनसच्या अटी व शर्ती याअन्वये आणि त्यांस अनुसरून असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस —

(अ) नियमात विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वस्तू कोणत्याही जागेत किंवा जागेवर —

(एक) अशा वस्तूचे जे कमाल परिमाण त्या जागेत किंवा जागेवर एका वेळी ठेवता येईल म्हणून नियमात विनिर्दिष्ट केले असेल अशा कोणत्याही परिमाणात किंवा त्या परिमाणापेक्षा अधिक प्रमाणात लायसन्सशिवाय ठेवता येणार नाही ; आणि

(दोन) अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा विक्रीसाठी किंवा नियमात प्रत्येक वस्तूच्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा घरगुती वापराव्यतिरिक्त अन्य वापरासाठी ठेवता येणार नाही ;

(ब) राहण्याची जागा म्हणून योजलेल्या किंवा वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीत किंवा इमारतीवर, किंवा अशा इमारतीपासून पंधरा फुटांच्या आत, चार हंड्रेडवेटपेक्षा अधिक कापूस—दाबलेल्या गासड्याच्या स्वरूपात, किंवा बारदानांत किंवा सुटा— ठेवता येणार नाही ;

(क) कोणत्याही जागेत किंवा जागेवर घोडे, गुरेढोरे किंवा अन्य चतुष्पाद प्राणी—

(एक) विक्रीसाठी ;

(दोन) भाड्याने देण्यासाठी ;

(तीन) ज्या प्रयोजनासाठी, कोणताही आकार घेण्यात येत असेल किंवा कोणतेही पारिश्रमिक घेण्यात येत असेल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी, किंवा

(चार) त्यापासून मिळणाऱ्या कोणत्याही मालाच्या विक्रीसाठी ;
ठेवता येणार नाही किंवा ठेवण्याची परवानगी देता येणार नाही ;

(ड) कोणत्याही जागेत किंवा जागेवर—

(एक) नियमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यवसायाशी संबंधित असलेल्या व्यवसायापैकी किंवा कामांपैकी कोणताही व्यवसाय किंवा काम ;

(दोन) आयुक्ताच्या मते जो कोणताही व्यवसाय किंवा काम जीवितास किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस घातक असेल किंवा त्याच्या स्वरूपामुळे, किंवा त्या रीतीने किंवा ज्या परिस्थितीत तो चालवण्यात येत असेल किंवा चालवण्याचे योजले असेल, त्या रीतीमुळे किंवा त्या परिस्थितीमुळे उपद्रव होण्याचा संभव असेल तर, असा कोणताही व्यवसाय किंवा काम ;

चालवता येणार नाही किंवा चालवण्याची परवानगी देता येणार नाही ;

(ई) नालबंदाचा व्यवसाय किंवा काम शहरात चालवता येणार नाही, किंवा त्यासाठी कोणतीही जागा वापरता येणार नाही.

(२) एखादा व्यवसाय किंवा काम, पोट-कलम (१), खंड (घ), परिच्छेद (दोन) च्या अर्थानुसार घातक आहे किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव आहे अशा अर्थाची आयुक्ताच्या सहिची नोटीस एखाद्या व्यक्तीवर बजावण्यात आल्यानंतर किंवा ती ज्या जागेशी संबंधित असेल त्या जागेवर आल्यानंतर, असा व्यवसाय किंवा काम घातक आहे किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव आहे असे त्या व्यक्तीस माहीत झाले आहे, असे मानले जाईल.

(३) एखादी व्यक्ती अशा व्यवसायाच्या अभिवृद्धीसाठी कोणतेही कृत्य करील, किंवा ती त्या व्यवसायात प्रकर्ता, अभिकर्ता, लिपिक, मालक, नोकर, कामगार, हस्तव्यवसायी म्हणून किंवा अन्यथा, कोणत्याही रीतीने काम करत असेल किंवा त्याच्याशी संबंधित असेल तर, अशी व्यक्ती, पोट-कलम (१), खंड (घ) च्या अर्थानुसार व्यवसाय किंवा काम चालवत आहे किंवा चालवण्याची परवानगी देत आहे असे मानले जाईल.

(४) पोट-कलम (१), खंड (ग) किंवा (घ) मध्ये वर्णन केलेल्या रीतीने कोणतीही जागा वापरण्यात येत असेल तेव्हा, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने, किंवा अशा जागेचा मालक आणि भोगवटादार या दोघांनी अशा रीतीने त्या जागेचा वापर करण्यात परवानगी दिली आहे असे गृहीत करण्यात येईल.

(५) (अ) आयुक्तास विहित करण्यास योग्य वाटतील अशा निर्बंधांच्या किंवा शर्तींच्या (तशा असल्यास) अधीन, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेले कोणतेही लायसन्स देणे ; किंवा

(ब) असे कोणतेही लायसन्स रोखून ठेवणे ;
हे आयुक्ताच्या विवेकाधीन असेल.

(६) ज्या व्यक्तीस आयुक्ताने पोट-कलम (३) अन्वये लायसन्स दिले असेल, अशा प्रत्येक व्यक्तीने असे लायसन्स ज्या जागेच्या संबंधात असेल अशी कोणतीही जागा असल्यास, त्या जागेत किंवा जागेवर ते लायसन्स ठेवले पाहिजे.

(७) आयुक्तास, ज्या जागेचा वापर करण्यासाठी या कलमान्वये लायसन्स देण्यात आले असेल अशा कोणत्याही जागेत दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल आणि तिची पाहणी करता येईल.

(८) या कलमातील कोणताही मजकूर, कापूस, ताग, लोकर किंवा रेशीम यांचे सूत कातणाऱ्या किंवा कापड विणणाऱ्या गिरण्यांना, किंवा आयुक्त स्थायी समितीच्या मान्यतेने ज्या अन्य कोणत्याही मोठ्या गिरणीला किंवा कारखान्याला या कलमाच्या अंमलबजावणीपासून वेळोवेळी विशेषरीत्या सूट देईल अशा कोणत्याही गिरणीला किंवा कारखान्याला लागू होते असे मानले जाणार नाही.

एखाद्या जागेचा वापर करणे हे घातक किंवा उपद्रवकारक असेल तेव्हा असा वापर थांबविण्याचा अधिकार.

[1][**३७६-अ.** कोणत्याही जागेचा कलम ३७६, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करणे जीवितास, आरोग्यास किंवा मालमत्तेस घातक आहे किंवा त्याच्या स्वरूपामुळे किंवा ज्या रीतीने किंवा ज्या परिस्थितीत त्या जागेचा वापर करण्यात येत असेल त्या रीतीमुळे किंवा त्या परिस्थितीमुळे उपद्रव होत आहे आणि असा धोका किंवा उपद्रव ताबडतोब थांबवला पाहिजे असे आयुक्ताचे मत असेल, तर त्यास, कलम ३७६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास वाजवी वाटेल अशा, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत असा धोका किंवा उपद्रव थांबवण्यास अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास फर्मावता येईल आणि अशा आदेशाचे अनुपालन करण्यात अशा मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केल्यास, आयुक्तास स्वत: किंवा आपल्या हाताखालील अधिकाऱ्यामार्फत असा वापर थांबविण्याची व्यवस्था करता येईल ].

## तीन.— नगरपालिका बाजारांतील विक्रीसाठी लायसन्स

आयुक्ताच्या लायसन्स-शिवाय नगरपालिका बाजारात विक्री करण्यास मनाई.

**३७७.** (१) कोणत्याही व्यक्तीस, आयुक्ताने दिलेल्या लायसन्सशिवाय कोणत्याही नगरपालिका बाजारात कोणतेही जनावर किंवा कोणतीही वस्तु विकता येणार नाही किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाही.

(२) आयुक्त किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी या कलमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तडकाफडकी काढून टाकू शकेल.

## चार.— खाजगी बाजारासाठी लायसन्स

लायसन्स-शिवाय खाजगी बाजार उघडे न ठेवणे.

**३७८.** (१) कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सशिवाय किंवा लायसन्सच्या अटीस अनुसरून असेल त्या व्यतिरिक्त अन्य रीतीने --

(अ) खाजगी बाजार उघडा ठेवता येणार नाही किंवा उघडा ठेवण्यास परवानगी देता येणार नाही ;

(ब) शहरातील कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून किंवा मानवी आहारासाठी योजलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यासाठी, वापरता येणार नाही किंवा वापरण्यास परवानगी देता येणार नाही ;

---

१ सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये, कलम ३७६-अ हे दाखल करण्यात आले.

(क) शहराबाहेरील कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून किंवा अन्य रीतीने शहरात खपवावयाच्या मानवी आहारासाठी योजलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यासाठी, वापरता येणार नाही किंवा वापरण्यास परवानगी देता येणार नाही :

परंतु,—

(एक) नियत दिवशी कायदेशीररीत्या स्थापन केलेला खाजगी बाजार उघडा ठेवण्यासाठी लायसन्स मिळवण्यासाठी, त्या दिवसापासून दोन महिन्यांच्या आत अर्ज करण्यात आला असेल तर आयुक्तास असे लायसन्स नाकारता येणार नाही ; मात्र ज्या जागेत असा बाजार भरवण्यात येत असेल त्या जागेत या अधिनियमान्वये किंवा नियम, उपविधी किंवा स्थायी आदेश या अन्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही गोष्टीचे अनुपालन करण्यात कसूर करण्यात आली तर त्या कारणामुळे आयुक्तास असे लायसन्स देण्याचे नाकारता येईल ;

(दोन) खाजगी बाजाराच्या मालकाने या अधिनियमाच्या एखाद्या तरतुदीचे किंवा एखाद्या स्थायी आदेशाचे किंवा उपविधीचे अनुपालन करण्यात कसूर केली तर त्या कारणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी आयुक्तास, असा खाजगी बाजार उघडा ठेवण्यासाठी दिलेले कोणतेही लायसन्स रद्द करता येणार नाही किंवा निलंबित करता येणार नाही किंवा त्याचे नवीकरण करण्याचे नाकारता येणार नाही ;

(तीन) खाजगी बाजारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी, कोंडवाडा किंवा अन्य जागा यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून खाजगी बाजाराच्या मालकास किंवा त्याच्या अभिकर्त्यास मिळालेले कोणतेही दुकान-भाडे, भाडे, फी किंवा अन्य रक्कम याबद्दल या लायसन्सच्या शर्तीनुसार लेखी पावती देण्यात अशा मालकाने कसूर केल्यास, आयुक्तास असे कोणतेही लायसन्स रद्द करता येईल किंवा निलंबित करता येईल ;

(चार) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही उत्सवाच्या किंवा समारंभाच्या प्रसंगी किंवा विशेष परिस्थितीत, आयुक्तास योग्य वाटेल अशा कोणत्याही जागेत जनावराची कत्तल करण्यासाठी लेखी परवानगी देण्यास त्यास प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

(२) आयुक्ताने खाजगी बाजार उघडा ठेवण्यासाठी कोणतेही लायसन्स नाकारले असेल, रद्द केले असेल किंवा निलंबित केले असेल तेव्हा, त्याने तसे केल्याची नोटीस महानगरपालिका वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेत किंवा भाषांत, ज्या इमारतीत किंवा ज्या जागेत असा बाजार भरवण्यात आला असेल त्या इमारतीवर किंवा इमारतीजवळ किंवा त्या जागेवर किंवा जागेजवळ एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

अनधिकृत खाजगी बाजारांमध्ये विक्री करण्यास मनाई.

**३७९.** कोणताही खाजगी बाजार आयुक्ताच्या मंजुरीशिवाय स्थापन करण्यात आला आहे किंवा तो उघडा ठेवण्याचे लायसन्स आयुक्ताने नाकारल्यानंतर, रद्द केल्यानंतर किंवा निलंबित केल्यानंतरही तो उघडा ठेवण्यात आला आहे हे माहित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, त्या बाजारात मानवी आहारासाठी असलेले कोणतेही जनावर किंवा कोणतीही वस्तू किंवा कोणतीही गुरेढोरे किंवा गुराढोरांचे खाद्य विकता येणार नाही किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाही.

कातड्यासाठी जनावरांची कत्तल करणे.

**३८०.** आयुक्ताच्या लेखी परवानगीस अनुसरून असेल, त्या व्यतिरिक्त, कोणत्याही व्यक्तीस नगरपालिका कत्तलखान्याबाहेरील किंवा लायसन्स दिलेल्या कत्तलखान्याबाहेरील कोणत्याही जागी, कोणत्याही गुराढोरांची, घोड्यांची, मेंढ्यांची, बकऱ्यांची किंवा डुकरांची कातडी काढून घेण्यासाठी, त्यांची कत्तल करता येणार नाही किंवा अशा कोणत्याही जनावराचे प्रेत फाडता येणार नाही.

**पाच.— बाजाराबाहेर खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी लायसन्स**

बाजारा-व्यतिरिक्त अन्य जागी जनावरे, इत्यादी विकण्यास मनाई.

**३८१.** आयुक्ताकडून लायसन्स घेतल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस—

(अ) नगरपालिकेच्या किंवा खाजगी बाजाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागी, मानवी आहारासाठी योजलेले कोणतेही चतुष्पाद जनावर किंवा कोणतेही मांस किंवा मासळी विकता येणार नाही किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाही ;

(ब) नगरपालिका किंवा खाजगी बाजार किंवा लायसन्स दिलेले खाद्यगृह किंवा मिठाईचे दुकान याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागी, आईस्क्रीम आणि वायुमिश्रित पेये, कुल्फी, उसाचा रस, फोडी केलेली किंवा सोललेली फळे आणि भाजीपाला, कोणतीही मेवामिठाई किंवा मिठाई किंवा आयुक्त जाहीर सूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे मानवी आहारासाठी योजलेले अन्य शिजवलेले अन्न किंवा अन्य पदार्थ विकता येणार नाहीत किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाहीत.

**सहा.— खाटीक इत्यादींना लायसन्स देणे**

खाटीक आणि जनावरांचे मांस विकणाऱ्या व्यक्ती यांना लायसन्स देणे.

**३८२.** कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सशिवाय किंवा लायसन्सच्या अटींस अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने—

(अ) शहरात, किंवा कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात खाटकाचा व्यवसाय चालवता येणार नाही ;

(ब) शहरातील कोणतीही जागा मानवी आहारासाठी योजलेल्या कोणत्याही जनावराच्या मांसाची विक्री करण्यासाठी किंवा शहराबाहेरील कोणतीही जागा, शहरात खपवण्यासाठी अशा मांसाची विक्री करण्यासाठी वापरता येणार नाही.

**सात.— दुग्धशाळा उत्पादनासाठी लायसन्स**

दुग्धशाळा उत्पादनाच्या व्यवहारासाठी लायसन्स आवश्यक असेल.

**३८३.** कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सशिवाय किंवा लायसन्सच्या अटींस अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने—

(अ) शहरात दुग्धव्यवसाय किंवा दुधाचा धंदा करता येणार नाही ;

(ब) शहरातील कोणतीही जागा दुग्धशाळा म्हणून किंवा कोणत्याही दुग्धशाळा उत्पादनाची विक्री करण्यासाठी वापरता येणार नाही.

## आठ.—फेरीने माल विकणे इत्यादीसाठी लायसन्स

**३८४.** कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सच्या अटी व तरतुदी या अन्वये आणि त्यास अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने, कोणतीही वस्तू मग ती मानवी आहारासाठी असो किंवा नसो—फेरीने विकण्याच्या किंवा विक्रीसाठी मांडण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही सार्वजनिक जागेचा किंवा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा वापर करता येणार नाही.

सार्वजनिक जागी विक्री करण्यासाठी लायसन्स.

**३८५.** कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सच्या अटी व तरतुदी या अन्वये आणि त्यास अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने, लाभासाठी कोणत्याही हस्तव्यवसायातील आपल्या कौशल्याचा उपयोग करण्यासाठी किंवा जनतेस सेवा उपलब्ध करून देताना किंवा जनतेच्या सोयीसाठी कोणत्याही सार्वजनिक जागेचा किंवा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा वापर करता येणार नाही.

सार्वजनिक जागेत किंवा रस्त्यावर लाभासाठी हस्त व्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यासाठी किंवा सेवा उपलब्ध करून देण्यासाठी लायसन्स.

## नऊ.—लायसन्स आणि परवाने यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी

**३८६.** (१) जेव्हाजेव्हा कोणत्याही प्रयोजनासाठी लायसन्स किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा अशा लायसन्समध्ये किंवा लेखी परवानगीत, ज्या कालावधीसाठी आणि ज्या निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीन ते देण्यात आले आहे तो कालावधी आणि ते निर्बंध व त्या शर्ती, आणि त्याच्या नवीकरणासाठी ज्या तारखेस अर्ज करता येईल ती तारीख विनिर्दिष्ट केली पाहिजे आणि असे लायसन्स किंवा लेखी परवानगी आयुक्ताच्या किंवा ते देण्यास कलम ६९ अन्वये अधिकार देण्यात आलेल्या नगरपालिका अधिकाऱ्याच्या सहीने दिली पाहिजे.

लायसन्स व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी इत्यादी बसविणे यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी.

(२) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार अन्यथा तरतूद करण्यात येईल त्याव्यतिरिक्त, अशा प्रत्येक लायसन्ससाठी किंवा लेखी परवानगीसाठी, आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा दराने फी आकारता येईल.

(३) कलम ३७८, पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या तरतुदींच्या अधीन, या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी ही, धारकाने विपर्यस्त माहिती देऊन किंवा लबाडीने मिळवली आहे, किंवा ती ज्या व्यक्तीस देण्यात आली आहे त्या व्यक्तीने त्याच्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन

केले आहे किंवा त्या टाळल्या आहेत अशी आयुक्ताची खात्री झाली तर, किंवा उक्त व्यक्तीस असे लायसन्स किंवा परवानगी ज्या बाबींशी संबंधित असेल अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा कोणत्याही नियमाचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आले असेल तर, आयुक्तास असे लायसन्स किंवा परवानगी कोणत्याही वेळी निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल.

(४) असे कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी निलंबित केली असेल किंवा रद्द केली असेल तेव्हा, किंवा ती ज्या कालावधीसाठी देण्यात आली होती तो कालावधी संपला असेल तेव्हा, असे लायसन्स किंवा लेखी परवानगी निलंबित करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी आयुक्ताने दिलेला आदेश, त्याच्याकडून रद्द करण्यात येणार नाही तोपर्यत किंवा यथास्थिती, अशा लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात येणार नाही तोपर्यंत, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी, ज्या व्यक्तीस असे लायसन्स किंवा लेखी परवानगी देण्यात आली होती अशा व्यक्तीजवळ असे लायसन्स किंवा लेखी परवानगी नाही, असे मानले जाईल :

परंतु, लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यासाठी, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपर्यंत अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, अर्जदारास आदेश मिळेपर्यंत, जणू त्या लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात आले आहे असे समजून वागण्याचा हक्क असेल.

(५) ज्या व्यक्तीस असे कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी देण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशी लेखी परवानगी किंवा लायसन्स अंमलात असेपर्यंत, सर्व वाजवी वेळी आयुक्ताने तसे करण्यास सांगितल्यास, असे लायसन्स किंवा लेखी परवानगी सादर केली पाहिजे.

(६) लायसन्ससाठी किंवा परवानगीसाठी करावयाचा प्रत्येक अर्ज आयुक्ताला उद्देशून केला पाहिजे.

(७) आयुक्ताने किंवा त्याच्या वतीने लायसन्ससाठी किंवा परवानगीसाठी फी स्वीकारली आहे एवढ्याच कारणावरून फी देणाऱ्या व्यक्तीस लायसन्स किंवा परवानगी मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

## प्रकरण तेवीस

## प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार

प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार.

**३८७.** (१) आयुक्तास या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींन्वये किंवा तद्नुसार ज्या जागेत किंवा जागेवर प्रवेश करण्याचा किंवा तिची तपासणी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे अशा कोणत्याही जागेत किंवा जागेवर आयुक्तास, सहायकांसह किंवा कामगारांसह किंवा त्यांच्याशिवाय प्रवेश करता येईल किंवा कोणतीही तपासणी, सर्वेक्षण, मोजणी, मूल्यमापन किंवा चौकशी करण्यासाठी, किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जे कोणतेही काम करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे असे अधिकार, कोणतेही काम करण्यासाठी किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखालील कोणत्याही नियमांच्या उपविधींच्या, विनियमांच्या किंवा

स्थायी आदेशांच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी किंवा त्यांच्या कोणत्याही तरतुदींस अनुसरून जी गोष्ट करणे किंवा अंमलात आणणे आवश्यक आहे अशी कोणतीही गोष्ट करण्यासाठी, आयुक्तास वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही जागेत किंवा जागेवर प्रवेश करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, आयुक्तास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास पुढील बाबतीत कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा आणि त्या जागेचे किंवा कोणत्याही वस्तूची तपासणी करण्याचा अधिकार असेल :—

(अ) कलम १४५ अन्वये करपात्र असे कोणतेही वाहन, होडी किंवा जनावर ठेवण्यात आले असेल असा कोणताही गोठा, मोटार घर, तबेला किंवा कोणतीही जागा ;

(ब) कलम १५५ अन्वये ज्या जमिनीवर नगरपालिकेची कोणतीही नाली बांधण्यात आली असेल किंवा बांधण्याचे योजले असेल अशी कोणतीही जमीन ;

(क) कलमे १५९, १६१, १६७ आणि १६८ अन्वये कोणत्याही व्यक्तीची स्वत:ची नाली नगरपालिकेच्या नालीत नेऊन सोडण्याच्या प्रयोजनासाठी त्याच्या मालकीची असलेली कोणतीही जमीन ;

(ड) कलम १७५ अन्वये ज्या जमिनीवर नाल्यांमध्ये हवा खेळती राहण्यासाठी वायुवीजनाचे दांडे किंवा नळ बसवणे आवश्यक असेल अशी कोणतीही जमीन ;

(ई) कलम १८१ अन्वये नाल्या, वातके, वायुवीजनाचे दांडे, नळ, मलकुंड्या, शौचकूप, मुत्र्या, स्नानाच्या व धुण्याच्या जागा ;

(फ) कलम १९१ अन्वये कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राकडे जाण्यासाठी ज्या जमिनीतून मार्ग असेल अशी कोणतीही जमीन ;

(ग) जी जागा कलम ३७६ चे उल्लंघन करून कोणत्याही व्यवसायासाठी किंवा कोणत्याही वस्तू ठेवण्यासाठी वापरण्यात येत असल्याचा संशय असेल अशी कोणतीही जागा ;

(ह) ज्या जागेचा वापर करण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींन्वये लायसन्स आवश्यक आहे आणि ते देण्यात आले आहे अशी कोणतीही जागा ;

(आय) कोणतीही इमारत उभारण्याचे काम चालू असताना ती इमारत किंवा कोणत्याही कामाची अंमलबजावणी चालू असताना ते काम ;

(ज) नगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी महानगरपालिकेने दिलेल्या कोणत्याही जागा.

**३८८.** (१) असा कोणताही प्रवेश सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या दरम्यान करता येणार नाही; प्रवेश करण्याची वेळ.

परंतु, ज्या बाबतीत या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार स्पष्टपणे तरतूद करण्यात आली आहे अशा कोणत्याही बाबतीत दिवसा किंवा रात्री असा प्रवेश करता येईल.

(२) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, मानवी वस्तीसाठी म्हणून वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीत, तिच्या भोगवटादाराच्या लेखी संमतीने असेल त्याखेरीज, त्यास नियोजित प्रवेशासंबंधी आणि प्रवेशाचे प्रयोजन नमूद करणे इष्ट नाही असे वाटत असेल त्याव्यतिरिक्त, त्याच्या प्रयोजनासंबंधी निदान सहा तासांची लेखी नोटीस दिल्याशिवाय प्रवेश करता येणार नाही.

(३) अशा जागेत नोटीस न देता अन्यथा प्रवेश करण्यात येईल तेव्हा, स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या कोणत्याही खोलीतील व्यक्तींना तिथून निघून जाता यावे म्हणून प्रत्येक वेळी पुरेशी नोटीस दिली पाहिजे.

(४) ज्या जागेत प्रवेश केला असेल त्या जागेच्या भोगवटादारांच्या सामाजिक व धार्मिक चालीरीतींकडे, ज्या प्रयोजनासाठी प्रवेश केला असेल त्या प्रयोजनाच्या निकडीशी सुसंगत असेल तेथवर, नेहमी योग्य लक्ष पुरवले पाहिजे.

(५) कलम ३७६, पोट-कलम (७) अन्वये प्रवेश केल्यामुळे किंवा असा प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही बळाचा वापर केल्यामुळे अनिवार्यपणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध भरपाईसाठी कोणताही दावा लावता येणार नाही.

## प्रकरण चोवीस

## भरपाई

विवक्षित बाबतीत किमान नुकसान करणे.

**३८९.** (१) या अधिनियमाच्या पुढील तरतुदींन्वये अधिकारांचा वापर करताना आयुक्ताने किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार कोणतेही काम पार पाडण्यास प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने, फारसे नुकसान न पोहोचविता काम केले पाहिजे आणि अशा अधिकारांचा वापर करण्यामुळे ज्या व्यक्तीचे नुकसान होईल अशा कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार विहित केलेल्या रीतीने निर्धारित केलेली भरपाई दिली पाहिजे :—

(अ) कलम १५५, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नगरपालिका नाली, कोणत्याही रस्त्यातून किंवा रस्ता म्हणून आखणी केलेल्या किंवा त्यासाठी योजलेल्या कोणत्याही जागेतून, त्यामधून किंवा त्याखालून किंवा कोणत्याही रस्त्याखालील भुयारातून किंवा कमानीतून नेणे ;

(ब) कलम १५५, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही नव्या नालीत प्रवेश करणे व कोणतीही नवी नाली बांधणे किंवा आधीच बांधलेली कोणतीही नगरपालिका नाली दुरुस्त करणे किंवा तीत फेरफार करणे ;

(क) कलम १७५, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही नालीत किंवा मलकुंडीत हवा खेळती ठेवण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही इमारतीवर किंवा झाडावर नळ किंवा वायुवीजनाचे दांडे बसवणे ;

(ड) कलम १८२ अन्वये कोणतीही जमीन, नालीचा कोणताही भाग, इमारतीचा कोणताही भाग किंवा इमारतीच्या बाहेरच्या भागाचे कोणतेही बांधकाम खोदणे ;

(ई) कलम १९१ अन्वये जलव्यवस्था केंद्रालगतच्या कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे व तिच्यामधून जाणे किंवा अशा जमिनीमधून माणसे, सामग्री व हत्यारे नेणे किंवा न्यावयास लावणे ;

(फ) कलम २१६ अन्वये सार्वजनिक रस्त्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही इमारत किंवा जमीन संपादन करणे ;

(ग) कलम २२६, पोट-कलम (४), कलम २२७, पोट-कलम (३) आणि कलम २३२ अन्वये एखादे बांधकाम किंवा जोडणी काढून टाकणे किंवा त्यात फेरफार करणे ;

(ह) कलम २४३ अन्वये दोन किंवा अधिक रस्त्यांच्या कोपऱ्यावरील एखादी इमारत गोलाकार करणे किंवा तिर्यक करणे ;

(आय) कलम २६१ अन्वये कोणतीही इमारत किंवा बांधकाम फोडणे, खुले करणे किंवा पाडणे ;

[१][(आय-आय) कलम २६३-क अन्वये झोपडी किंवा छपरी पाडून टाकणे किंवा तीत फेरफार करणे ; ]

(ज) कलम ३०४ अन्वये अडथळा आणणारी इमारत पाडून टाकणे ;

(के) कलम ३१७ अन्वये आरोग्यास अपायकारक असलेली झोपडी किंवा छपरी नष्ट करणे ;

(ल) कलम ३१९ अन्वये एखाद्या दुर्धर किंवा सांसर्गिक रोगास प्रतिबंध करण्यासाठी आयुक्ताकडे निहित असलेल्या अधिकारांचा वापर करताना कोणतीही मालमत्ता नष्ट करणे ;

(म) ज्या बाबतीत भरपाई देण्याबद्दल अधिनियमात, नियमांत, किंवा उपविधीत स्पष्ट तरतूद केलेली नाही अशा अधिकारांचा वापर करणे किंवा असे कोणतेही काम पार पाडणे.

(२) कलम १९१ अन्वये अधिकारांचा वापर करताना [२][राज्य] शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याच्या एखाद्या कृतीमुळे नुकसान पोचले असेल, तर अशी भरपाई [२][राज्य] शासनाने दिली पाहिजे.

**३९०.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून आयुक्ताने किंवा याबाबत आयुक्त प्राधिकृत करील अशा अन्य अधिकाऱ्याने, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कलम ३८९ अन्वये द्यावयाची भरपाईची रक्कम ठरवली पाहिजे. आयुक्ताने भरपाईची रक्कम ठरवणे.

**३९१.** कलम ३९० अन्वये आयुक्ताच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस एक महिन्याच्या कालावधीच्या आत, प्रकरण २६ मधील तरतुदींस अनुसरून न्यायाधीशाकडे अपील करता येईल. अपील

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## प्रकरण पंचवीस

### शास्ती

दंडाची शिक्षा होण्यायोग्य विवक्षित अपराध.

**३९२.** (१) जो कोणी—

(अ) परिशिष्ट दोनमधील कोष्टकाच्या भाग एकमधील पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कोणत्याही कलमांच्या, पोट-कलमांच्या किंवा खंडांच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील, किंवा

(ब) उक्त कलमांपैकी, पोट-कलमांपैकी किंवा खंडांपैकी कोणत्याही कलमान्वये, पोट-कलमान्वये किंवा खंडान्वये त्याच्याकडे कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही मागणीचे अनुपालन करण्यात कसूर करील, त्यास अशा प्रत्येक अपराधाबद्दल, उक्त भागाच्या दुसऱ्या स्तंभात त्याबाबत नमूद केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) जो कोणी——

(अ) परिशिष्ट दोनमधील कोष्टकाच्या भाग-दोनमधील पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कोणत्याही कलमांच्या, पोट-कलमांच्या किंवा खंडांच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल, किंवा

(ब) उक्त कलमांपैकी, पोट-कलमांपैकी किंवा खंडांपैकी कोणत्याही कलमान्वये, पोट-कलमान्वये किंवा खंडान्वये त्याच्याकडे कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही मागणीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल ;

सिद्धापराध ठरवण्यात आल्यानंतर, यथास्थिती, उक्त तरतुदींचे उल्लंघन करण्याचे किंवा उक्त मागणीचे अनुपालन करण्यात कसूर करण्याचे चालू ठेवील, किंवा उक्त तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही काम किंवा केलेली कोणतीही गोष्ट काढून टाकण्यात किंवा दुरुस्त करण्यात कसूर करील, किंवा कोणतीही जागा रिकामी करण्यात कसूर करील, त्यास अशा रीतीने अपराध करण्याचे तो चालू ठेवील अशा प्रत्येक दिवसाबद्दल, उक्त भागाच्या दुसऱ्या स्तंभात त्याबाबत नमूद केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

दंड संहितेअन्वये शिक्षापात्र अपराध.

**३९३.** (१) जो कोणी पुढील तक्त्याच्या पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या या अधिनियमाच्या कोणत्याही कलमांच्या, पोट-कलमांच्या किंवा खंडांच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील ; आणि जो कोणी उक्त कलमांपैकी, पोट-कलमांपैकी किंवा खंडांपैकी कोणत्याही कलमान्वये, पोट-कलमान्वये किंवा खंडान्वये त्याच्याकडे कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही मागणीचे अनुपालन करण्यात कसूर करील त्याने उक्त तक्त्याच्या दुसऱ्या स्तंभात, भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमान्वये अशी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल ते कलम म्हणून, अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या उक्त संहितेच्या कलमान्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानले जाईल :—

| या अधिनियमाची कलमे | | ज्या अन्वये अपराधी शिक्षेस पात्र असतील अशी भारतीय दंड संहितेची कलमे |
|---|---|---|
| (१) | | (२) |
| १९४ (२), ३११, खंड (क), (ख), (ग) व (घ), ३१२ | .. | २७७ |
| ३१९ .. .. .. .. .. .. | .. | १८८ |
| ४७७ .. .. .. .. .. .. | .. | १७७ |

(२) इमारतीचा मालक किंवा भोगवटादार असणारा जो कोणी, प्रभाग निवडणुकीतील मतदारांची यादी किंवा नगरपालिका मतदारांची यादी तयार करण्यासंबंधी तपशील व माहिती ज्या अन्वये मागवली असेल त्या, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख न केलेल्या या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही लेखी नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर करील, किंवा जो कोणी, जो तपशील किंवा माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे त्यास माहीत असूनही असा तपशील किंवा माहिती पुरवील, त्याने भारतीय दंड संहितेच्या यथास्थिती, कलम १७६ अन्वये किंवा कलम १७७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानले जाईल.

(३) जो उमेदवार, लढवण्यात आलेल्या प्रभाग निवडणुकांत एकापेक्षा अधिक प्रभागातून पालिका सदस्य म्हणून निवडून आला असेल, आणि त्या प्रभागांपैकी कोणत्या प्रभागात त्याने काम करावयाचे तो प्रभाग निवडण्यास त्यास ज्या नोटिशीद्वारे फर्माविण्यात आले आहे अशा आयुक्ताने कायदेशीररीत्या दिलेल्या लेखी नोटिशीचे अनुपालन करण्यात जो कसूर करील अशा कोणत्याही उमेदवाराने भारतीय दंड संहितेच्या कलम १७७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानले जाईल.

(४) जो कोणी, कोणत्याही इमारतीचे करयोग्य मूल्य ठरवण्यासंबंधीची किंवा कोणताही नगरपालिका कर बसविण्यासंबंधीची किंवा त्याची आकारणी करण्यासंबंधीची माहिती किंवा लेखी विवरण सादर करण्यासाठी आयुक्ताने कायदेशीररीत्या केलेल्या मागणीचे, दिलेल्या नोटिशीचे किंवा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करील, किंवा जो कोणी, जी माहिती किंवा जे विवरण खोटे, चुकीचे किंवा दिशाभूल करणारे असल्याचे त्यास माहीत असूनही अशी माहिती पुरवील किंवा असे विवरण सादर करील, त्याने भारतीय दंड संहितेच्या यथास्थिती, कलम १७६ अन्वये किंवा कलम १७७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानले जाईल.

मतदारांच्या खोट्या याद्या तयार करण्याच्या अपराधाबद्दल शिक्षा.

**३९४.** महानगरपालिकेचा जो कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी प्रभाग निवडणुकांच्या वेळी जाणूनबुजून चुकीची किंवा खोटी असलेली मतदारांची यादी तयार करील [1][ किंवा त्यातील एखादी नोंद गाळील, त्यात भर घालील किंवा त्यातील नोंद दुरुस्त करील ] त्यास, अपराध सिद्धीनंतर, कैदेच्या दोहोपैकी कोणत्याही

१ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

एका प्रकारची सहा महिने मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या केदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या शिक्षा दोन्ही शिक्षा होतील.

महानगरपालिकेशी केलेली संविदा इत्यादीत हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करण्याबद्दल शिक्षा.

**३९५.** जो कोणताही पालिका सदस्य किंवा पालिका सदस्य नसलेला परिवहन समितीचा जो कोणताही सदस्य, महानगरपालिकेशी, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीत, कलम १० अन्वये पालिका सदस्यास जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करणे अनुज्ञेय आहे व जो धारण केल्याने तो पालिका सदस्य होण्यास अनर्ह ठरत नाही असा हिस्सा किंवा हितसंबंध याव्यतिरिक्त कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध जाणूनबुजून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संपादन करील, त्याने आणि जो कोणताही आयुक्त, परिवहन व्यवस्थापक, नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी महानगरपालिकेशी, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीत, कलम १०, पोट-कलम (२), उपखंड (दोन) किंवा (चार) अन्वये पालिका सदस्यास जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करणे अनुज्ञेय असेल व जो धारण केल्याने तो पालिका सदस्य होण्यास अनर्ह ठरत नाही असा हिस्सा किंवा हितसंबंध याव्यतिरिक्त, कोणताही, हिस्सा किंवा हितसंबंध जाणूनबुजून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संपादन करील, त्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १६८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानले जाईल.

कलम ६१ किंवा ६२ चा भंग केल्याबद्दल शिक्षा.

**३९६.** जो कोणी, ज्यामुळे कलम ६१ किंवा ६२ च्या तरतुदीचे उल्लंघन होते असे कृत्य करील किंवा असे कृत्य करण्यास अपप्रेरणा देईल त्यास, अपराध सिद्धीनंतर, दोहोपैकी, कोणत्याही प्रकारची एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल. इतक्या कैदेची शिक्षा होईल किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम १९४ विरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा.

**३९७.** (१) जो कोणी, कलम १९४, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, अपराध सिद्धीनंतर, एक महिना मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची शिक्षा होईल किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (१) अन्वये सिद्धापराध ठरवण्यात आले असेल तेव्हा, ज्या दंडाधिकाऱ्याने त्यास सिद्धापराध ठरवले असेल, त्या दंडाधिकाऱ्यास, ज्या बाबतीत त्यास दोषी ठरवण्यात आले असेल अशी कोणतीही इमारत ताबडतोब काढून टाकण्याविषयी किंवा अशा जमिनीवरील काम किंवा तिचा वापर ताबडतोब बंद करण्याविषयी आदेश देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात आले नाही किंवा त्याच्या अंमलबजावणीस प्रतिकार करण्यात आला, तर अपराध्यास, अपराध सिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कैदेची शिक्षा होईल किंवा शंभर रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

[1][३९७-अ (१) कलम २६०, २६१, २६४, २६७, किंवा ४७८ अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तींविरुद्ध नोटिस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने,--

कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये दिलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

(क) इमारतीचा पाया, जोते किंवा मजला, किंवा बांधकामाचे भाग किंवा भार पेलण्याऱ्या भिंती पूर्ववत करण्यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही व त्यायोगे, अशी इमारत किंवा तिच्या शेजारची अन्य कोणतीही इमारत किंवा जागा याचा भोगवटा करणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा त्या जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण केला तर, त्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ; किंवा

(ख) अनधिकृत बांधकाम हलविणे, पाडून टाकणे यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही तर त्या व्यक्तीला एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कलम २५४ मध्ये दिलेल्या प्रकारानुसार असे कोणतेही बांधकाम हे, अधिनियम, नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींविरुद्ध सुरू करण्यात आले आहे किंवा ते पार पाडण्यात येत आहे असे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल ; आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी पुरेशा कारणांशिवाय कलम २६०, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर त्याला दोषसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इत्यक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**३९७-ब** (१) आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम ३९७-क याच्या पोट-कलम (१) खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटविता येईल.

विवक्षित अपराध आपसात मिटवणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबंधात अपराधी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि याअगोदरच कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल, आणि अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल.

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५ द्वारे कलम ३९७, अ ३९७ ब समाविष्ट केले.

जकात किंवा पथकर चुकवण्याबद्दल शास्ती.

**३९८.** बाहेरून शहराच्या हद्दीत येणारे कोणतेही वाहन, जनावर किंवा माल, पथकर किंवा जकात देण्यास पात्र असेल तेव्हा, जी कोणतीही व्यक्ती, महानगरपालिकेस फसवण्याच्या उद्देशाने, शहराच्या हद्दीत आणताना देय असलेला पथकर किंवा जकात ज्यावर दिलेली नाही किंवा देऊ केलेली नाही असे कोणतेही वाहन, जनावर किंवा माल शहराच्या हद्दीत आणावयास लावील किंवा आणण्यास अपप्रेरणा देईल किंवा स्वत: आणील किंवा आणण्याचा प्रयत्न करील, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, अशा पथकराच्या किंवा जकातीच्या रकमेच्या दहापट रक्कम [१][* * * * ] इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

जकात चुकवण्याबाबतच्या अपराध आपसात मिटवणे.

[१][**३९८-१अ** (१) आयुक्तांस किंवा आयुक्ताने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या, सहायक आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, जकात रक्कम तसेच देय जकात रकमेच्या दहापट इतकी आणखी रक्कम भरल्यावर, जकात चुकवण्याबाबत कलम ३९८ अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा, आपसात मिटवलेल्या अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तींविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि आगोदर कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल आणि आरोपी व्यक्ती अभिरक्षेत असली तर, तिला मुक्त करण्यात येईल.

कलम २६५अ च्या उल्लंघना-बद्दलची शिक्षा

[२][**३९८-अ.** जो कोणी, कलम २६५ अ च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, पंचवीस हजार रुपये किंवा संबंधित इमारतीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल इतक्या रकमेच्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

सर्वसाधारण शास्ती.

**३९९.** जो कोणी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखालील कोणत्याही नियमाचे, उपविधीचे, विनियमाचे स्थायी आदेशाचे किंवा त्याअन्वये दिलेल्या कोणत्याही लायसन्सचे, परवानगीचे किंवा नोटिशीचे उल्लंघन करील किंवा अशा कोणत्याही तरतुदीन्वये कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही मागणीचे अनुपालन करण्यात कसूर करील त्यास, अशा उल्लंघनाबद्दल किंवा कसुरीबद्दल या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीमध्ये शास्तीची कोणतीही तरतूद करण्यात आली नसेल तर, अशा प्रत्येक अपराधाबद्दल शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या दिवशी असे उल्लंघन किंवा कसूर करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसाबद्दल आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ६ द्वारे कलम ३९८-१अ समाविष्ट करण्यात आले.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ द्वारे कलम ३९८-अ समाविष्ट करण्यात आले.

**४००.** जी कोणतीही व्यक्ती, कलम २, खंड (४५), उप-खंड (क) च्या परिच्छेद (एक), (दोन) किंवा (तीन) मध्ये वर्णन केलेल्या कोणत्याही नात्याने कोणत्याही जागेचे भाडे घेत असेल, तिने अशा जागेचा मालक म्हणून जी कृती करावयास पाहिजे अशी कोणतीही कृती केली नाही आणि तिच्याजवळ पैसे नसल्यामुळे अशी कसूर झाली किंवा आवश्यक असलेली कृती करण्याचा खर्च भागवण्यास मालक समर्थ असल्यामुळे अशी कसूर झाली असे, तिने सिद्ध केले तर, ती या अधिनियमान्वये कोणत्याही शास्तीस पात्र होणार नाही.

मालकांचे अभिकर्ते आणि विश्वस्त यांची शिक्षाविषयक जबाबदारीची मर्यादा.

**४०१.** या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, उपविधी, विनियम, किंवा स्थायी आदेश याअन्वये अपराध करणारी कोणतीही व्यक्ती ही, एखादी कंपनी, किंवा निगम निकाय किंवा व्यक्तींची संस्था (मग ती, कायद्याने संस्थापित असो किंवा नसो) किंवा भागीदारी संस्था असेल तर, तिचा प्रत्येक संचालक, व्यवस्थापक, सचिव, अभिकर्ता किंवा अन्य अधिकारी, किंवा तिच्या व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्ती, आणि भागीदारी संस्थेचा प्रत्येक भागीदार, असा अपराध त्याच्या नकळत किंवा त्याच्या संमतीशिवाय करण्यात आला असे त्याने सिद्ध केले नाही तर, अशा अपराधाबद्दल दोषी आहे, असे मानले जाईल.

कंपनी, इत्यादींनी केलेला अपराध.

**४०२.** (१) कोणतीही कृती केल्यामुळे किंवा न केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीस या नियमाविरुद्ध किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध एखादा अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आले असेल आणि उक्त व्यक्तीच्या अशा कृतीमुळे किंवा अशी कृती न करण्यामुळे महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर, उक्त अपराधाबद्दल तिला कोणतीही शिक्षा देण्यात आली असली तरीही, उक्त व्यक्तीने उक्त नुकसानीबद्दल भरपाई दिली पाहिजे.

या अधिनियमाविरुद्ध अपराध केलेल्या व्यक्तींनी केलेल्या नुकसानाबद्दल त्यांनी देय असलेली भरपाई.

(२) विवाद उत्पन्न झाल्यास, उक्त व्यक्तीने भरपाई म्हणून द्यावयाची रक्कम ही, त्या व्यक्तीस उक्त अपराधाबद्दल ज्या दंडाधिकाऱ्यासमोर सिद्धापराध ठरवण्यात आले असेल, त्या दंडाधिकाऱ्याने ठरवली पाहिजे आणि अशा रीतीने ठरवण्यात आलेली भरपाईची रक्कम भरण्यात आली नाही तर, ती रक्कम उक्त दंडाधिकाऱ्याच्या अधिपत्रान्वये, जणू ती देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस उक्त दंडाधिकाऱ्याने ठोठावलेला द्रव्यदंड आहे असे समजून वसूल केली पाहिजे.

## प्रकरण सव्वीस

### न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश आणि दंडाधिकारी यांच्यापुढील कार्यवाही

### एक.--निवडणूक चौकशी

निवडणूक चौकशीची कार्यपद्धती.

**४०३.** (१) कोणताही विशिष्ट उमेदवार निवडून आला आहे असे मानण्यात यावे असे जाहीर करण्यासाठी कलम १६ अन्वये अर्ज करण्यात आला असेल तर, अर्जदाराने, वादग्रस्त प्रभागातील जागेसाठी किंवा जागांसाठी रीतसर नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांना,— मग उक्त उमेदवार निवडून आले आहेत असे जाहीर करण्यात आले असो किंवा नसो,--आपल्या अर्जाचे पक्षकार केले पाहिजे, आणि निवडून आलेले म्हणून जाहीर केलेल्या उमेदवाराविरुद्ध किंवा उमेदवारांविरुद्ध कार्यवाही दाखल केली पाहिजे.

(२) उक्त अर्जातील अन्य पक्षकारांना जो कोणताही खर्च देण्याबद्दल अर्जदारास आदेश देण्यात येईल त्या खर्चासाठी तारण म्हणून रोख पाचशे रुपये किंवा त्या दिवशीच्या बाजारभावाने तितक्याच किमतीचे सरकारी कर्जरोखे न्यायालयात जमा करण्याविषयी न्यायाधीशाकडून फर्मावण्यात येईल तेव्हा अर्जदाराने अशी रक्कम किंवा असे कर्जरोखे अशा रीतीने जमा केले पाहिजे.

(३) न्यायाधीशास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जर त्यास असे आढळून येईल की, निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक घडवून आणली आहे किंवा मन वळवून करण्यात आली आहे किंवा कोणत्याही भ्रष्टाचाराने करण्यात किंवा करवण्यात आली आहे, किंवा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही भ्रष्टाचारामुळे महत्त्वाचा परिणाम झाला आहे, किंवा निवडून आलेल्या उमेदवाराच्या हितासाठी कोणताही भ्रष्टाचार करण्यात आला आहे किंवा कोणतेही, नामनिर्देशन अयोग्य रीतीने स्वीकारल्यामुळे किंवा फेटाळल्यामुळे, किंवा कोणतीही नामनिर्देशित व्यक्ती निवडणुकीसाठी अर्हताप्राप्त नव्हती किंवा अनर्ह ठरवलेली होती या कारणामुळे किंवा मत अयोग्य रीतीने घेतल्यामुळे किंवा नाकारल्यामुळे किंवा अग्राह्य मत स्वीकारल्यामुळे, किंवा या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याअन्वये केलेल्या निवडणुकीसंबंधीच्या कोणत्याही नियमांचे अनुपालन न केल्यामुळे किंवा कोणत्याही विहित नमुन्याचा उपयोग करताना झालेल्या कोणत्याही चुकीमुळे निवडणुकीच्या निकालावर महत्त्वाचा परिणाम झाला आहे, किंवा ज्या प्रकरणात लाचलुचपत करण्यात आली होती किंवा गैरवाजवी दडपण आणण्यात आले होते अशी बरीच प्रकरणे घडल्यामुळे, निवडणूक ही खुली निवडणूक झालेली नाही, तर न्यायाधीशाने निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द झाली आहे असे जाहीर केले पाहिजे, आणि जर त्याला तसे आढळून आले नाही तर त्याने निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक कायम केली पाहिजे.

(४) (क) ज्या अर्जात एकाच प्रभागाचे प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या पालिका सदस्याच्या निवडणुकीच्या कायदेशीरपणाविषयी हरकत घेण्यात आली असेल अशा, कलम १६ अन्वये आलेल्या सर्व अर्जांची सुनावणी एकाच न्यायाधीशाने केली पाहिजे ; आणि

(ख) ज्या अर्जात एकाच प्रभागाचा प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या एकाच पालिका सदस्याच्या निवडणुकीच्या कायदेशीरपणाविषयी हरकत घेण्यात आली अशा, कलम १६ अन्वये आलेल्या सर्व अर्जांची सुनावणी एकत्र करण्यात आली पाहिजे.

[१][ (५) (निवडून आल्याचे जाहीर करण्यात आलेल्या उमेदवाराव्यतिरिक्त) कोणताही विशिष्ट उमेदवार निवडून आला आहे असे मानण्यात यावे असे जाहीर करण्यासाठी कलम १६ अन्वये अर्ज करण्यात आला असेल तर, निवडून आलेल्या उमेदवारास किंवा अन्य कोणत्याही संबंधित व्यक्तीस ज्या व्यक्तीच्या वतीने असे जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे त्या व्यक्तीची निवडणूक, जर ती व्यक्ती निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले असते आणि तिच्या निवडणुकीस हरकत घेणारा अर्ज दाखल करण्यात आला असता तर, रद्द झाली असती असे सिद्ध करणारा साक्षीपुरावा देता येईल.

जर न्यायाधीशाचे असे मत असेल की,--

(एक) ज्या कोणत्याही उमेदवाराच्या वतीने असे जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे त्या उमेदवारास खरोखरच बहुसंख्य विधिग्राह्य मते मिळाली आहेत ; किंवा

(दोन) निवडून आलेल्या उमेदवाराने भ्रष्टाचाराने मते मिळवली नसती तर, अशा उमेदवाराने बहुसंख्य विधिग्राह्य मते मिळवली असती ;

तर, त्याने निर्वाचित उमेदवारांची निवडणूक रद्द झाल्याचे जाहीर केल्यानंतर, ज्या उमेदवाराच्या वतीने असे जाहीर करण्याची मागणी करण्यात आली असेल तो उमेदवार रीतसर निवडून आला आहे, असे जाहीर केले पाहिजे.]

(६) न्यायाधीशाने या कलमान्वये दिलेला आदेश निर्णायक असेल.

(७) पूर्वगामी तरतुदीनुसार ज्या निवडणुकीस हरकत घेण्यात आलेली नाही अशी प्रत्येक निवडणूक सर्व उद्देशासाठी, योग्य आणि विधिग्राह्य निवडणूक झाली आहे असे मानले जाईल.

**निवडणुकी-संबंधी विवक्षित अपराध केल्यामुळे पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अनर्हता.**

**४०४.** (१) एखाद्या उमेदवाराच्या हितासाठी भ्रष्टाचार करण्यात आला आहे या कारणामुळे न्यायाधीशाने अशा उमेदवाराची निवडणूक रद्द ठरवली तर, अधिनियमान्वये जी कोणतीही नवीन निवडणूक घेण्यात येईल त्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी अशा उमेदवारास अनर्ह ठरवण्यात आले आहे असे न्यायाधीशाने जाहीर केले पाहिजे.

(२) कलम १६ अन्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत, जर न्यायाधीशास असे आढळून येईल की, त्या कलमाच्या अर्थानुसार कोणत्याही व्यक्तीने भ्रष्टाचार केला आहे तर, न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल तर, अशा व्यक्तीस तो ठरवील अशा सात वर्षापेक्षा अधिक नसलेल्या मुदतीसाठी, निवडून येण्यास किंवा पालिका सदस्य असण्यास अनर्ह ठरवण्यात आले आहे असे जाहीर करता येईल :

परंतु, अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशा रीतीने जाहीर करता येणार नाही :

परंतु, आणखी असे की, [२][राज्य] शासनास, लेखी आदेशाद्वारे कोणत्याही वेळी अशा व्यक्तीस अशा अनर्हतेतून मुक्त करता येईल. परंतु, फक्त अशा आदेशाच्या अधीन राहून न्यायाधीशाने जाहीर केलेला निर्णय निर्णायक असेल.

---

१ मूळ पोट-कलम (५) ऐवजी हे पोट-कलम, सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

**दोन.--न्यायाधीशाकडे बाब निर्णयासाठी पाठवणे**

न्यायाधीशाकडे बाब निर्णयासाठी पाठवणे.

**४०५.** पुढील बाबतीत न्यायाधीशाकडे बाब निर्णयासाठी पाठवण्यात आली पाहिजे :--

(१) कलम १२ अन्वये पालिका सदस्याने पद धारण करण्याचे बंद झाले आहे किंवा कसे ;

[1][(१-अ) कलम १३ अन्वये पलिका सदस्यास काढून टाकण्यासंबंधी आणि निरर्ह ठरविण्यासंबंधी.]

(२) कलम २६ अन्वये एखादी व्यक्ती परिवहन समितीचा सदस्य असण्याचे बंद झाले आहे किंवा कसे ;

(३) कलम १७५ अन्वये इमारतीच्या किंवा झोपडीच्या मालकाने अर्ज केल्यावर वायुवीजनाचा दांडा किंवा नळ काढण्याविषयी आयुक्तास निदेश देण्यात यावा किंवा कसे ;

(४) कलम २१६ अन्वये इमारत पुढे आणण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या किमतीच्या रकमेसंबंधी ;

(५) कलम ४३९ अन्वये आयुक्तांच्या किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये केलेल्या कोणत्याही कामाच्या किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेच्या किंवा केलेल्या गोष्टींच्या खर्चाच्या रकमेसंबंधी किंवा असा खर्च देण्यासंबंधी ;

(६) या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीखाली येणाऱ्या व ज्यासाठी अन्यथा विनिर्देशपूर्वक तरतूद करण्यात आलेली नाही अशा खर्चाच्या किंवा भरपाईच्या रकमेसंबंधी किंवा असा खर्च किंवा भरपाई देण्यासंबंधी आणि अशा खर्चाचे किंवा भरपाईचे संविभाजन करण्यासंबंधी.

**तीन.--मूल्यनिर्धारण आणि कर याविरुद्ध अपिले**

अपिले केव्हा आणि कोणाकडे करता येतील.

**४०६.** (१) यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीन राहून या अधिनियमान्वये निश्चित केलेले किंवा आकारलेले कोणतेही करयोग्य मूल्य [2][किंवा यथास्थिती भांडवली मूल्य] कर याविरुद्ध केलेल्या अपिलांची सुनावणी किंवा निर्णय न्यायाधीशाने केला पाहिजे.

(२) (अ) तक्रारीचे कारण घडल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत अपील केले नसेल ;

(ब) करयोग्य मूल्याविरुद्ध [3][किंवा यथास्थिती भांडवली मूल्याविरुद्ध] केलेल्या अपिलाच्या बाबतीत, या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्ताकडे पूर्वीच तक्रार केली असेल आणि अशी तक्रार निकालात काढण्यात आली नसेल ;

---

१ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ द्वारे खंड (१-अ) समाविष्ट करण्यात येईल.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ११ (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १० याच्या कलम २ (क) व (ग) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(क) ज्या कराच्या मागणीविरुद्ध आयुक्ताकडे तक्रार करण्यासाठी या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आली आहे [1][असा कोणताही कर तसेच लादलेले व्याज व शास्ती यांविरूद्ध] केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अशी तक्रार पूर्वीच करण्यात आली असेल आणि निकालात काढण्यात आली नसेल ;

(ड) सरकारी वर्षात मालमत्ता कराच्या आकारणी पुस्तकात केलेल्या कोणत्याही सुधारणेविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत, व्यथित व्यक्तीने तिला अशा सुधारणेची नोटीस पहिल्यांदा मिळाल्यानंतर [2][एकवीस दिवसांच्या] आत तक्रार केली असेल आणि तिची तक्रार निकालात काढण्यात आली नसेल;

(ई) एखाद्या कराविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत किंवा [3][किंवा यथास्थिती भांडवली मूल्याविरुद्ध] केलेल्या अपिलाच्या बाबतीत [4][ अपील दाखल केल्याच्या दिनांकापर्यंतची अपीलकाराकडून मागणी केलेली विवादग्रस्त कराची रक्कम, किंवा अपील दाखल करण्याच्या दिनांकापर्यंतची, विवादग्रस्त [3][किंवा यथास्थिती भांडवली मूल्याचा] आधारे आकारणीयोग्य कराची रक्कम, अपीलदाराने आयुक्ताकडे जमा केली नसेल ;] तर [5][असे अपील विचारार्थ स्वीकारता कामा नये.]

[6][(२ अ) पोट-कलम २ च्या खंड (क) ते (ड) च्या तरतुदीनुसार जर अपील दाखल केले नसेल तर, ते अपील फेटाळून लावण्यास पात्र ठरेल.

[7][(३) न्यायाधीशाने विचारार्थ स्वीकारलेल्या परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी त्याने सुनावणी न केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अपील दाखल केल्याच्या दिनांकापर्यंतची अपीलदाराकडून मागणी केलेल्या विवादग्रस्त कराची किंवा यथास्थिती, विवादग्रस्त करयोग्य मूल्याच्या आधारे आकारणीयोग्य कराची रक्कम, आयुक्ताने, याबाबतीत स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण नोटीशीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अपीलकाराने आयुक्ताकडे भरल्याखेरीज, न्यायाधीशाने अशा अपिलाची सुनावणी करून त्यावर निर्णय देता कामा नये. त्याचबरोबर आयुक्तांने, अशा प्रत्येक अपीलकारावर, या अधिनियमाची कलमे ४७३ व ४७४ आणि इतर संबद्ध तरतुदीन्वये, अपीलकाराने त्याच्याकडे भरावयाच्या रकमेची सूचना देणारी नोटीस बजावली पाहिजे.

१९७५ चा महा. ६३.

---

१. सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ (क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ११-२ (ख) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ११ (२) (क) व (ख) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

४. मूळ खंड मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३ यांच्या कलम ८ (अ) (एक) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

५. हा मजकूर " अशा कोणत्याही अपिलाची सुनावणी करता येणार नाही." याऐवजी वरील अधिनियमांच्या कलम ८ (अ) (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

६. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ११ (३) द्वारे पोट-कलम (२ अ) समाविष्ट केले.

७. पोट-कलमे (३), (४) व (५) ही वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आली.

(४) शक्य असेल तेथवर, पोट-कलम (३) अन्वये विहित केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीपासून पंधरा दिवसांच्या आत, विहित कालावधीत आवश्यक ती रक्कम त्याच्याकडे भरलेल्या अपीलकारांची नावे व इतर तपशील आणि विहित कालावधीत अशी रक्कम त्याच्याकडे ज्यांनी भरली नाही अशा अपीलकारांची नावे व इतर तपशील, आयुक्ताने न्यायाधीशास कळविला पाहिजे. अशी माहिती मिळाल्यानंतर, न्यायाधीशाने संक्षिप्त चौकशी करून विहित कालावधीत ज्याने आयुक्तांकडे आवश्यक ती रक्कम भरलेली नाही अशा कोणत्याही अपीलकाराचे अपील फेटाळून लावले पाहिजे.

(५) पूर्वोक्त अधिनियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी न्यायाधीशाने जे विचारार्थ स्वीकारले असेल अशा किंवा उक्त दिनांकास किंवा त्यानंतर त्याच्याकडून विचारार्थ स्वीकारण्यात येईल अशा अपिलाच्या बाबतीत, अपील विचारार्थ स्वीकारल्यानंतर जी देण्यात आली असतील अशा बिलांपैकी प्रत्येक बिलात मागणी करण्यात आलेली कराची रक्कम संबंधित बिल ज्या सहामाहीशी संबंधित असेल त्या सहामाहीच्या पहिल्या महिन्यात वेळोवेळी, आयुक्ताकडे भरण्यात आल्याखेरीज, न्यायाधीशाने अशा अपिलाची सुनावणी करून त्यावर निर्णय देता कामा नये. अपिलाच्या निर्णयापूर्वी कोणत्याही वेळी अपीलकाराने कसूर केल्याच्या बाबतीत आयुक्तांकडून तशी माहिती मिळाल्यानंतर न्यायाधीशाने, संक्षिप्त चौकशी करून, ते अपील फेटाळून लावले पाहिजे.]

[१][(६) [२][प्रकरण ११-अ अन्वये उपकर आणि प्रकरण ११-ख स्थानिक संस्था कर बसविण्याबाबतच्या मागणी नोटिशी विरुद्धचे अपील,-]

(एक) जर ती मागणी नोटीस उपकर अधिकाऱ्याने [३][किंवा उपायुक्त नसेल अशा कोणत्याही अन्य अधिकाऱ्याने] काढलेली असेल तर, उपआयुक्ताकडे करण्यात येईल;

(दोन) जर ती मागणी नोटीस उपआयुक्ताने काढलेली नसेल तर, आयुक्ताकडे करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) खालील अपील, अशा मागणी नोटिशीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.]

[४][(८) अपीलकाराकडून मागणी केलेली विवादग्रस्त कराची रक्कम अपीलकराने आयुक्ताकडे जमा केली नसेल तर, उपायुक्त किंवा, यथास्थिती, आयुक्त पोट-कलम (६) अन्वये केलेले कोणतेही अपील विचारात घेणार नाही.]

---

१. सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ (ख) द्वारे पोट-कलम ६ व ७ जादा दाखल करण्यात आले.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १२ एक (क) द्वारे "प्रकरण ११-अ अन्वये उपकर बसविण्याबाबतच्या मागणी नोटिशीविरुद्धचे अपील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ (एक) (ख) द्वारे हा मजकूर दाखल केला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १२ (दोन) द्वारे पोट-कलम (८) जादा दाखल केले.

तक्रारीचे कारण घडले आहे, असे केव्हा मांडले जाईल.

**४०७.** कलम ४०६ च्या प्रयोजनांसाठी, पुढीलप्रमाणे तक्रारीचे कारण घडले आहे असे मानले जाईल :--

(अ) करयोग्य मूल्याविरुद्ध [1][किंवा यथास्थिती भांडवली मूल्याविरुद्ध] केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अशा मूल्याविरुद्ध आयुक्ताकडे केलेली तक्रार ज्या दिवशी निकालात काढण्यात आली असेल त्या दिवशी ;

(ब) उक्त कलमाच्या पोट-कलम (२), खंड (क) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही कराविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अशा कराविरुद्ध केलेली तक्रार आयुक्ताने ज्या दिवशी निकालात काढली असेल त्या दिवशी ;

(क) सरकारी वर्षात मालमत्ता कराच्या आकारणी पुस्तकात केलेल्या कोणत्याही सुधारणेविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत, व्यथित व्यक्तीने अशा सुधारणेविरुद्ध आयुक्ताकडे केलेली तक्रार ज्या दिवशी निकालात काढण्यात आली असेल त्या दिवशी ;

(ड) वरील खंड (ख) खाली न येणाऱ्या कराविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत, ज्या दिवशी असा कर देण्याची मागणी करण्यात आली असेल किंवा ज्या दिवशी त्याबद्दलचे बिल देण्यात आले असेल त्या दिवशी.

लवाद.

**४०८.** या अधिनियमान्वये निश्चित केलेले किंवा आकारण्यात आलेले करयोग्य मूल्य [2][किंवा यथास्थिती भांडवली मूल्य] किंवा कर याविरुद्ध केलेले कोणतेही अपील प्रलंबित असेल आणि त्यात हितसंबंध असलेले सर्व पक्षकार त्यांच्यातील मतभेदाची कोणतीही बाब लवादाकडे सोपवण्यात यावी या गोष्टीस कबूल असतील तेव्हा अशा अपिलाचा निर्णय देण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी, अशा पक्षकारांना अशी बाब निर्णयासाठी पाठविण्याविषयीच्या आदेशासाठी न्यायाधीशाकडे लेखी अर्ज करता येईल आणि असा अर्ज करण्यात आल्यावर, * [3][लवाद व समेट अधिनियम, १९९६] मधील वादांतील लवादासंबंधीच्या तरतुदी, जेथवर त्या लागू करता येतील तेथवर, अशा अर्जास आणि त्यावर होणाऱ्या कार्यवाहीस, जणू उक्त न्यायाधीश हा, त्या अधिनियमाच्या अर्थानुसार न्यायालय आहे असे समजून आणि उक्त अर्ज हा, वादात केलेला अर्ज आहे, असे समजून, लागू होतील.

१९४० चा १०.

**४०९.** [4][* * * * *]

---

* आता, लवाद व समेट अधिनियम (१९९६ चा २६) पाहा.

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १२ द्वारे हा मजकूर दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) द्वारे या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) द्वारे "लवाद अधिनियम, १९४०" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे कलम ४०९ वगळण्यात आले.

**४१०.** करयोग्य मूल्य [1][किंवा यथास्थिती भांडवली मूल्य] किंवा कर यासंबंधीच्या अपिलाची सुनावणी होण्यापूर्वी किंवा सुनावणी झाल्यानंतर, कायद्यासंबंधी किंवा कायद्याइतक्याच परिणामकारक असलेल्या परिपाठासंबंधी किंवा दस्तऐवजाचा अर्थ लावण्यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवला तर, न्यायाधीशास, त्या प्रकरणातील तथ्यांचे आणि अशा रीतीने उद्‌भवलेल्या प्रश्नाचे एक विवरणपत्र तयार करता येईल; आणि अपिलातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर न्यायाधीशाने तसे विवरणपत्र तयार केले पाहिजे ; आणि ते विवरणपत्र त्या मुद्द्यावरील आपल्या स्वत:च्या अभिप्रायासह जिल्हा न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविले पाहिजे.

जिल्हा न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविणे.

**४११.** (क) कलम ४०६ अन्वये केलेल्या अपिलात न्यायाधीशाच्या ज्या निर्णयाने [2][करयोग्य मूल्य किंवा यथास्थिती भांडवली मूल्य] ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही निर्णयाविरुद्ध; आणि

(ख) उक्त कलमान्वये केलेल्या अपिलात कायद्यासंबंधी किंवा कायद्याइतक्याच परिणामकारक असलेल्या परिपाठासंबंधी किंवा दस्तऐवजाचा अर्थ लावण्यासंबंधी उद्‌भवलेल्या प्रश्नावर उक्त न्यायाधीशाने दिलेल्या अन्य कोणत्याही निर्णयाविरुद्ध,

जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल :

परंतु, असे कोणतेही अपील न्यायाधीशाच्या निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात आले नसेल तर जिल्हा न्यायालयाकडून त्याची सुनावणी केली जाता कामा नये.

जिल्हा न्यायालयाकडे अपिले करणे.

**४१२.** कलम ४०८ अन्वये लवादाचा [3][* * * *] खर्च धरून, कलम ४०६ अन्वये न्यायाधीशापुढील अपिलातील सर्व कार्यवाहीचा खर्च, न्यायाधीश निदेश देईल, अशा पक्षकारांनी व अशा प्रमाणात देण्याजोगा असेल आणि त्याची रक्कम, आवश्यक असल्यास, जणू ती प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ अन्वये लघुवाद न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यान्वये येणे असलेली रक्कम आहे असे समजून, वसुलीयोग्य असेल.

अपिलातील कार्यवाहींचा खर्च.

१८८७ चा ९.

**४१३.** (१) या अधिनियमान्वये ठरवण्यात आलेल्या ज्या करयोग्य मूल्याविरुद्ध यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे कोणतीही तक्रार करण्यात आली नसेल असे प्रत्येक करयोग्य मूल्य [4][किंवा यथास्थिती भांडवली मूल्याविरुद्ध व किंवा यथास्थिती भांडवली मूल्य] या अधिनियमान्वये कोणत्याही कराबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून मागणी करण्यात आलेल्या रकमेविरुद्ध जर यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर अशी प्रत्येक रक्कम; आणि असे कोणतेही मूल्य किंवा कर याविरुद्ध केलेल्या अपिलात पूर्वोक्त न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध जर कलम ४११ अन्वये कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर, असा निर्णय, आणि असे अपील करण्यात आले असेल, तर, अशा अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

अपील न करण्यात आलेले मूल्य व कर आणि अपिलावरील निर्णय अंतिम असणे.

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे "दोन हजार रुपयांपेक्षा अधिक करयोग्य मूल्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे "आणि कलम ४०९ अन्वये मूल्यनिर्धारणाचा" हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(२) या न्यायाधीशाचा निर्णय अंतिम नसेल तर, तथापि, कलम ४०६ च्या तरतुदींना अधीन राहून, आयुक्ताने वर्षावर्षाला अनुसूची 'घ' च्या प्रकरण आठ मधील कराधान नियमाच्या नियम, ७ किंवा ७ क अन्वये निर्धारित केलेल्या करयोग्य मूल्याच्या किंवा यथास्थिती, भांडवली मूल्याच्या आधारे मालमत्ता कराचे निर्धारण करणे कायदेशीर असेल.]

२०११ चा महा. १४.

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

[२][**४१३-अ** (१) कलमे ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४११, ४१२ आणि ४१३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्य, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपालिका मालमत्ता कर मंडळ" असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरुद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मूल्याची किंवा भांडवली मूल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी जिल्हा न्यायाधीशाकडे करता येणार नाही ; आणि जर असे कोणतेही अपील कलम ४१० अन्वये यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

## चार.--न्यायाधीशाकडे आणि जिल्हा न्यायालयाकडे अपिले करणे

न्यायाधीशाकडे अपिले करणे.

**४१४.** पुढील बाबतीत आयुक्ताच्या आदेशांविरुद्ध न्यायाधीशाकडे अपील करता येईल :--

(१) कलम १७५ अन्वये--वायुवीजनाचा दांडा किंवा नळ काढून टाकण्यास नकार देणारा आदेश ;

(२) कलम २१५ अन्वये--इमारत पुढे आणण्यास भाग पाडणारा आदेश ;

(३) कलम २४७ अन्वये--धोक्याची असल्याचे आढळून आलेल्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास ती दुरुस्त करण्यास, संरक्षित करण्यास किंवा तिला कुंपण घालण्यास भाग पाडणारा आदेश :

(४) कलम ३०० अन्वये--आरोग्यास अपायकारक अशी इमारत पाडून टाकण्याविषयी निदेश देणारा आदेश ;

(५) कलम ३०३ अन्वये--अडथळा निर्माण करणारी इमारत पाडून टाकण्याविषयी निदेश देणारा आदेश ;

परंतु, असे कोणतेही अपील आयुक्ताच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दाखल न केल्यास, ते करता येणार नाही.

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १८ (२) द्वारे पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ अनुसूची द्वारे कलम ४१३ अ जादा दाखल करण्यात आले.

इमारत पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुद्ध आपिले.

**४१५.** (१) कलम ३०० किंवा ३०३ अन्वये इमारत पाडून टाकण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तेव्हा, न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, असा आदेश कायम करण्याबाबत किंवा रद्दबातल करण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत आदेश देता येईल, आणि त्यास योग्य वाटेल तर, आयुक्ताने अपीलदाराकडून जी कोणतीही हमी स्वीकारली असती अशी हमी त्यास स्वीकारता येईल, आणि न्यायाधीशाने अशा रीतीने स्वीकारलेली कोणतीही हमी, जणू ती कलम ३०० अन्वये आयुक्तास देण्यात आली होती व त्याने ती स्वीकारली होती असे समजून अंमलात येईल :

परंतु, कलम ३००, पोट-कलम (१) मध्ये नमूद करण्यात आलेली नोटीस ज्या अपीलदारावर बजावण्यात आली होती अशा अपीलदाराकडून, त्याने त्या कलमाच्या पोट-कलम (२) मधील आवश्यक गोष्टींचे अनुपालन केले नसेल तर, न्यायाधीशाने कोणतेही काम पार पाडण्याची हमी स्वीकारता कामा नये.

(२) या कलमान्वये केलेल्या अपिलात न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध, इमारत पाडून टाकण्याबाबतच्या ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश ज्या जागेला पूर्णत: किंवा अंशत: लागू असेल त्या जागेचे या अधिनियमाच्या तरतुदीनुसार आयुक्ताच्या आकारणी पुस्तकात नमूद केलेले करयोग्य मूल्य [१][किंवा यथास्थिती, भांडवली मूल्य] [२][राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल अशा रकमेपेक्षा अधिक असेल तर], अशा निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल.

(३) या कलमान्वये न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध पोट-कलम (२) अन्वये अपील करता येत नसेल, किंवा कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल, तर न्यायाधीशांचा निर्णय अंतिम असेल आणि अपील दाखल करण्यात आले असेल तर, अपिलातील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

(४) ज्या कोणत्याही आदेशाविरुद्ध या कलमान्वये अपील करता आले असते असा कोणताही आदेश, जर असे अपील करण्यात आले नसेल तर, कलम ३०६ मध्ये नमूद केलेली एकवीस दिवसांची मुदत संपल्यानंतर अंमलात येईल आणि तो, अशा अपिलात ज्या बाबी उपस्थित करता आल्या असत्या अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात अंतिम व निर्णायक असेल, आणि ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असा कोणताही आदेश, जर आणि जेथपर्यंत तो न्यायाधीशाकडून किंवा जिल्हा न्यायालयाकडून कायम करण्यात आला असेल तर आणि तेथपर्यंत, अपिलांच्या अंतिम निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(५) या कलमाच्या प्रयोजनासाठी, अपील काढून घेणे हे त्याचा अंतिम निर्णय लागला आहे, असे मानले जाईल आणि ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम करण्यासंबंधीच्या निर्णयाप्रमाणेच अंमलात येईल आणि पूर्वोक्त गोष्टींच्या अधीन राहून, जेव्हा जिल्हा न्यायालयाचा निर्णय

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १९ (अ) द्वारे हा मजकूर दाखल केला.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १९ (ब) द्वारे "दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

देण्यात आला असेल त्या दिनांकास किंवा जिल्हा न्यायालयाकडे कोणतेही अपील करण्यात आले नसेल अशा बाबतीत, असे अपील ज्या मुदतीत करता आले असते ती मुदत संपल्यानंतर किंवा जिल्हा न्यायालयाकडे कोणतेही अपील करता येत नसेल अशा बाबतीत, ज्या दिनांकास न्यायाधीशाने निर्णय दिला असेल त्या दिनांकास अपिलावर अंतिम निर्णय देण्यात आला आहे असे मानले जाईल.

केलेल्या कामाचा खर्च देण्यासंबंधीच्या न्यायाधीशाच्या निर्णयाविरुद्ध अपिले.

**४१६.** (१) कोणतेही काम केल्याबद्दल आलेल्या खर्चाची रक्कम किंवा तो खर्च देणे यासंबंधी न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध करावयाचे अपील, ज्या दाव्याच्या बाबतीत निर्णय देण्यात आला असेल त्या दाव्याची रक्कम दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा, जिल्हा न्यायालयाकडे केले पाहिजे :

परंतु असे कोणतेही अपील न्यायाधीशाच्या निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात आले नाही तर जिल्हा न्यायालयास त्याची सुनावणी करता येणार नाही.

(२) कोणतेही काम केल्याबद्दल आलेल्या खर्चाची रक्कम किंवा तो खर्च देणे यासंबंधी न्यायाधीशाने दिलेला निर्णय, जर या कलमान्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तर, अंतिम असेल आणि अपील दाखल करण्यात आले असेल तर, अशा अपिलातील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

(३) कोणतेही काम केल्याबद्दल आलेल्या खर्चाची रक्कम किंवा तो खर्च देणे यांसंबंधी दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, आयुक्ताने जिल्हा न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत, उक्त कलमान्वये येणे म्हणून ठरवलेल्या रकमेच्या वसुलीची कारवाई स्थगित केली पाहिजे, आणि निर्णय झाल्यानंतर, त्याअन्वये येणे म्हणून ठरवण्यात येईल एवढीच रक्कम, तशी रक्कम असल्यास, वसूल करण्याची कारवाई केली पाहिजे.

जिल्हा न्यायालया-पुढील अपिलातील फी.

[१][ **४१६-क.** राज्य शासनास वेळोवेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कलमे ४११, ४१५ आणि ४१६ अन्वये जिल्हा न्यायालयाकडे करावयाच्या अपिलासाठी जी कोणतीही फी दिली पाहिजे ती फी, तशी असल्यास, विहित करता येईल :

परंतु, जिल्हा न्यायालयास, त्यास योग्य वाटेल तेव्हा, विहित केलेली फी न घेता किंवा अशी फी अंशतः घेऊन, एखाद्या गरीब व्यक्तीने किंवा तिच्या वतीने केलेले अपील स्वीकारता येईल :

आणखी असे की, जिल्हा न्यायालयाकडे केलेल्या अपिलासंबंधी, त्याची सुनावणी होण्यापूर्वीच पक्षकाराच्या संमतीने तडजोड करण्यात येईल तेव्हा, जिल्हा न्यायालयाने, ज्या पक्षकाराने फी दिली असेल त्या पक्षकारास अशा फीची अर्धी रक्कम परत केली पाहिजे.]

---

१ सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४५, कलम २ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

## पाच.— न्यायाधीशापुढील कार्यवाही

जो भोगवटादार या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन करण्यास इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास प्रतिबंध करील त्या भोगवटा-दाराविरुद्ध मालकाने करावयाची उपाययोजना.

**४१७.** (१) कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास, या अधिनियमाच्या किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी यांच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन करण्यास किंवा अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात या अधिनियमान्वये किंवा असा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यास अशा इमारतीचा किंवा जमिनीचा भोगवटादार प्रतिबंध करील तर, अशा मालकास न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल.

(२) न्यायाधीशास, असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादारास, उक्त तरतुदींचे किंवा आदेशाचे अनुपालन करण्यासाठी मालकास सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देण्यास भाग पाडणारा लेखी आदेश देता येईल किंवा उक्त तरतुदी किंवा आदेश हा, अशा भोगवटादाराची सुरक्षितता किंवा सोय याच्या संबंधात कलम २६४ अन्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीसंबंधी असेल तर अशा भोगवटादारास ती जागा तात्पुरती रिकामी करण्यास भाग पाडणारा लेखी आदेश देता येईल; तसेच त्यास योग्य वाटेल तर, अशा अर्जाचा आणि आदेशाचा खर्च भोगवटादाराने दिला पाहिजे असा निदेश देता येईल.

(३) अशा आदेशाच्या दिनांकापासून आठ दिवसांनंतर, उक्त आदेशात विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, पूर्वोक्त प्रयोजनासाठी मालकास सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देणे किंवा जागा तात्पुरती रिकामी करणे हे भोगवटादाराचे अवश्य कर्तव्य असेल; आणि तो तसे करण्यास सतत नकार देईल तर, असा नकार देणे चालू असेल त्या कालावधीत, उक्त तरतुदीचे किंवा आदेशाचे अनुपालन करण्यात मालकाने कसूर केल्यामुळे मालकास अन्यथा जे कोणतेही दायित्व पत्करावे लागले असते त्यातून त्यास मुक्त करण्यात येईल.

(४) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणतीही जागा रिकामी करण्यास भाग पाडण्यासंबंधी या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीअन्वये आयुक्तास असलेल्या अधिकारांना बाध येणार नाही.

साक्षीदारांना समन्स काढून बोलावण्याचा व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

**४१८.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही चौकशीच्या किंवा कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी न्यायाधीशास प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ अन्वये किंवा तद्नुसार लघुवाद न्यायालयाच्या बाबतीत ज्या साधनांची व ज्या रीतीची तरतूद करण्यात आली असेल त्याच साधनांनी आणि शक्यतोवर त्याच रीतीने साक्षीदारांना समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडता येईल आणि त्यांना साक्ष देण्यास व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडता येईल आणि अशा कोणत्याही चौकशीसंबंधीच्या किंवा कार्यवाहीसंबंधीच्या सर्व बाबतीत न्यायाधीशाने, सर्वसाधारणपणे उक्त अधिनियमाच्या तरतुदी जेथवर लागू होतील तेथवर त्या अनुसरल्या पाहिजेत.

१८८७ चा ९.

(२) अशा कोणत्याही चौकशीच्या किंवा कारवाईच्या वेळी, ज्या व्यक्तीविरुद्ध तक्रार किंवा अर्ज करण्यात आला असेल त्या व्यक्तीस हजर राहण्याच्या प्रयोजनासाठी रीतसर समन्स काढून बोलावले असतानाही ती व्यक्ती हजर राहण्यात कसूर करील तर न्यायाधीशास त्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत त्या प्रकरणाची सुनावणी करता येईल व त्यावर निर्णय देता येईल.

१८८७ चा ९. (३) अशा प्रत्येक चौकशीसंबंधी किंवा कार्यवाहीसंबंधी न्यायाधीशाने ठरवलेला खर्च, न्यायाधीश निदेश देईल अशा पक्षकारांनी व अशा प्रमाणात देण्याजोगा असेल आणि त्याची रक्कम, आवश्यक असल्यास, जणू ती प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या लघुवाद न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याअन्वये येणे असलेली रक्कम आहे असे समजून, वसुलीयोग्य असेल :

परंतु, अशी चौकशी किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा तद्नुसार सुधारणा खर्च म्हणून जाहीर करण्यात आलेल्या खर्चासंबंधीच्या विवादाबाबत असेल तर, ज्या जागेच्या संबंधात किंवा ज्या जागेच्या फायद्यासाठी सुधारणा खर्च करण्यात आला आहे त्या जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने जो खर्च देण्याविषयी न्यायाधीशाने त्यास निदेश दिला असेल त्या खर्चाची रक्कम अशा जागेवर भार म्हणून राहील व तसेच, ती कलम ४४२ मध्ये विहित केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

**४१९.** (१) [राज्य] शासनास, वेळोवेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे— न्यायाधीशा-पुढील कार्यवाहीतील फी.

(अ) या अधिनियमान्वये न्यायाधीशाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जावर, अपिलावर किंवा निर्णयासाठी पाठवण्यात आलेल्या कोणत्याही बाबतीत ; आणि

(ब) या अधिनियमान्वये न्यायाधीशाने चालवलेल्या कोणत्याही चौकशीत किंवा कार्यवाहीत, कोणतेही समन्स किंवा अन्य आदेशिका काढण्यापूर्वी ;

जी कोणतीही फी दिली पाहिजे ती फी, तशी फी असल्यास, विहित करता येईल :

परंतु, ज्या बाबतीत दाव्याच्या किंवा विषयभूत बाबीच्या मूल्याचा पैशाच्या रूपात अंदाज करता येत असेल अशा बाबतीत, खंड (अ) अन्वये विहित करण्यात आलेली फी, तशी फी असल्यास, ज्या बाबतीत दाव्याचे किंवा विषयभूत बाबींचे मूल्य तितक्याच रकमेइतके असेल त्या बाबतीत प्रांतिक लघुवाद न्यायालय
१८८७ चा ९. अधिनियम, १८८७ च्या तरतुदीअन्वये त्यावेळी आकारण्यात आलेल्या फीपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) [१] [राज्य] शासनास, वेळोवेळी, तशाच अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये विहित केलेली कोणतेही फी, कोणत्या व्यक्तीने देण्यायोग्य असेल ते ठरवता येईल.

(३) पोट-कलम (१), खंड (क) अन्वये कोणताही अर्ज, अपील किंवा निर्णयासाठी पाठवावयाची बाब यासाठी विहित केलेली फी, तशी फी असल्यास, देण्यात येईपर्यंत, न्यायाधीशास असा कोणताही अर्ज, अपील किंवा प्रकरण स्वीकारता येणार नाही.

**४२०.** न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, कलम ४१९ अन्वये विहित केलेली फी न घेता किंवा अशी फी अंशत: घेऊन एखाद्या गरीब व्यक्तीने किंवा तिच्या वतीने या अधिनियमान्वये केलेला अर्ज, अपील किंवा निर्णयासाठी पाठवलेली बाब स्वीकारता येईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीच्या वतीने आदेशिका काढता येईल. गरीब व्यक्तींना फी भरण्यापासून सूट.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

सुनावणीपूर्वी तडजोड झाल्यास अर्धी फी परत करणे.

**४२१.** या अधिनियमान्वये न्यायाधीशाकडे केलेला कोणताही अर्ज, अपील किंवा निर्णयासाठी पाठवलेली बाब यासंबंधी, त्याची सुनावणी होण्यापूर्वीच पक्षकारांच्या संमतीने तडजोड करण्यात येईल तेव्हा, न्यायाधीशाने ज्या ज्या पक्षकारांनी फी दिली असेल अनुक्रमे त्या त्या पक्षकारांना, त्या वेळेपर्यंत देण्यात आलेल्या सर्व फीची अर्धी रक्कम परत केली पाहिजे.

## सहा.--दंडाधिकाऱ्यांची नेमणूक

पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याची नेमणूक.

**४२२.** (१) [१] [राज्य] शासनास, महानगरपालिकेच्या संमतीने, या अधिनियमाविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये केलेला कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध केलेल्या अपराधांसंबंधी खटले चालविण्यासाठी पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याची एक किंवा अधिक पदे निर्माण करता येतील आणि अशा पदावर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल ; तसेच त्यास, अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे प्रशासी अधिकारीही नेमता येईल :

परंतु, या कलमान्वये पहिल्या वर्गाच्या एक किंवा अधिक दंडाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असली तरीही, जिल्हा न्यायाधीशास, पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांच्या कामकाजाची विभागणी विनियमित करणाऱ्या *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम १७ अन्वये त्यावेळी १८९८ चा ५. अंमलात असलेल्या नियमास अधीन राहून, अशा अपराधासंबंधी खटल्याच्या कामाची आणि (या कलमान्वये नेमलेले कोणतेही दंडाधिकारी धरून) दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयापुढील अन्य सर्व कामाची, कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यास सर्वात हितावह वाटेल अशा रीतीने विभागणी करता येईल.

(२) अशा दंडाधिकाऱ्यास किंवा दंडाधिकाऱ्यांना आणि त्यांच्या आस्थापनेस, [१] [राज्य] शासन, वेळोवेळी ठरवील असे वेतन, निवृत्तिवेतन, रजा, भत्ते, आणि अन्य भत्ते देण्यात आले पाहिजेत.

(३) पोट-कलम (२) अन्वये ठरवलेले वेतन व अन्य भत्ते, तसेच अन्य सर्व अनुषंगिक खर्च यांच्या रकमांची महानगरपालिकेने [१] [राज्य] शासनास प्रतिपूर्ती केली पाहिजे तसेच, महानगरपालिकेने [१] [राज्य] शासनास, अशा दंडाधिकाऱ्याचे किंवा दंडाधिकाऱ्यांचे आणि त्याच्या आस्थापनेचे निवृतिवेतन, रजा व अन्य भत्ते यासाठी, [१] [राज्य] शासन वेळोवेळी ठरवील असे अंशदान दिले पाहिजे :

परंतु, [१] [राज्य] शासनास, महानगरपालिकेच्या सहमतीने, या कलमान्वये देय असलेल्या रकमांऐवजी महानगरपालिकेने [१] [राज्य] शासन याबाबत ठरवील अशा दिनांकास, [१] [राज्य] शासन याबाबत ठरवील इतकी रक्कम [१] [राज्य] शासनास दरवर्षी दिली पाहिजे असा निदेश देता येईल.

## सात.--दंडाधिकाऱ्यांकडे बाबी निर्णयासाठी पाठविणे

दंडाधिकाऱ्याकडे बाबी निर्णयासाठी पाठविणे.

**४२३.** पुढील बाबतीत, शहराच्या हद्दींच्या आत अधिकारिता असलेल्या पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्यांकडे बाबी निर्णयासाठी पाठवण्यात येतील :--

(क) कलम ३०७ अन्वये--बेसुमार गर्दी कमी करणे ;

(ख) दुर्धर रोग झालेल्या व्यक्तीस नियमान्वये सार्वजनिक रुग्णालयात अटकावून ठेवणे.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

* आता पाहा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)

**४२४.** (१) कलम ३३८ अन्वये ताब्यात घेतलेले कोणतेही जनावर व नासण्यासारखी नसलेली कोणतीही वस्तू आणि कोणतेही पात्र किंवा भांडे ताबडतोब पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याकडे नेण्यात आले पाहिजे.

कलम ३३८ अन्वये ताब्यात घेतलेली जनावरे व नासण्यासारख्या नसलेल्या वस्तू यांची विल्हेवाट.

(२) असे कोणतेही जनावर किंवा वस्तू, यथास्थिती, रोगग्रस्त किंवा सडलेली किंवा आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य आहे असे, किंवा ती जशी आहे म्हणून सांगण्यात आले आहे तशी ती नाही असे किंवा असे कोणतेही पात्र किंवा भांडे हे, त्यात तयार केलेली, बनवलेली किंवा ठेवलेली कोणतीही वस्तू ज्यायोगे आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य होईल अशा प्रकारचे किंवा अशा स्थितीत आहे, असे अशा दंडाधिकाऱ्यास आढळून येईल तर, त्यास, असे जनावर, वस्तू, पात्र किंवा भांडे ते ताब्यात घेण्यात आले त्यावेळी ते ज्या व्यक्तीच्या कब्जात होते त्या व्यक्तीच्या खर्चाने, असे जनावर किंवा वस्तू पुन्हा विक्रीसाठी मांडता येणार नाही किंवा फेरीने विकता येणार नाही किंवा मानवी आहारासाठी वापरता येणार नाही अशा रीतीने किंवा अशा पात्राचा किंवा भांड्याचा वर सांगितल्याप्रमाणे कोणतीही वस्तू तयार करण्यासाठी किंवा बनवण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी उपयोग करता येणार नाही अशा रीतीने त्यांचा नाश करवता येईल, आणि असे जनावर किंवा वस्तू रोगग्रस्त, सडलेली, आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य असेल तर, दंडाधिकाऱ्याने याप्रमाणे त्यांचा उपयोग करता येणार नाही अशा रीतीने त्यांचा नाश करविला पाहिजे.

**४२५.** कलम ४२४ अन्वये उपाययोजना केल्यावर, कोणताही खाद्यपदार्थ नासका, सडलेला, आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य आहे असे दंडाधिकाऱ्यास आढळून येईल अशा प्रत्येक बाबतीत, त्याच्या मालकास, किंवा त्याच्या केवळ निक्षेपग्राही किंवा वाहक याव्यतिरिक्त, ज्या व्यक्तीच्या कब्जात तो सापडला असेल त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर, जर अशा बाबतीत
१८६० चा भारतीय दंड संहिता, कलम २७३ च्या तरतुदी लागू होत नसतील तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल
४५. इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

नासके, सडलेले, आरोग्यास अपायकारक किंवा मानवी आहारासाठी अयोग्य असे खाद्यपदार्थ कब्जात ठेवण्याबद्दल शास्ती.

**४२६.** कलम ४२५ अन्वये भरावयाच्या सर्व खटल्यांच्या बाबतीत, ज्या कोणत्याही व्यक्तीवर अशा कलमाविरुद्ध अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला आहे त्या व्यक्तीने हजर राहण्यासाठी समन्स काढण्याविषयीचा अर्ज हा, त्या व्यक्तीवर जो अपराध केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे त्या अभिकथित आरोपाच्या दिनांकापासून वाजवी मुदतीच्या आत करण्यात आला नसेल तर दंडाधिकाऱ्याने असे समन्स काढण्यास नकार दिला पाहिजे.

समन्स काढण्याविषयीचा अर्ज वाजवी मुदतीच्या आत करण्यात आला नसेल तर समन्स काढण्यास नकार देणे.

## आठ.— दंडाधिकारी व सत्र न्यायालय यांच्यापुढील कार्यवाही

अपराधांची दखल.

**४२७.** (१) [1][(अ)] कलमे ६०, ६१ आणि ३२५ यांचे उल्लंघन केल्याबद्दलचे अपराध, दखलपात्र असतील.

[2][(ब) कलम ३९७ क खालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असतील.]

(२) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाविरुद्ध किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध केलेले सर्व अपराध— मग ते शहरात घडलेले असोत किंवा शहराबाहेर घडलेले असोत— शहरात अधिकारिता असलेल्या पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याने दखल घेण्यायोग्य असतील आणि असा कोणताही दंडाधिकारी हा, कोणताही नगरपालिका कर देण्यास तो पात्र आहे किंवा नगरपालिका निधीपासून त्यास लाभ होतो, केवळ याच कारणामुळे, अशा कोणत्याही अपराधाची किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेण्यास असमर्थ आहे असे मानले जाणार नाही. १८९८ चा ५.

(३) उक्त संहितेच्या कलम २०० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाविरुद्ध किंवा त्या अन्वये केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत, तक्रार लेखी सादर करण्यात आली असेल तेव्हा, तक्रार करणाऱ्याची तपासणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधासंबंधीच्या तक्रारी ज्या मुदतीच्या आत स्वीकारण्यात येतील ती मुदत.

**४२८.** हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासंबंधीची तक्रार कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे--

(अ) असा अपराध घडल्याच्या तारखेच्या लगेच नंतर सहा महिन्यांच्या आत ; किंवा

(ब) असा दिनांक माहीत नसेल किंवा अपराध करणे चालू राहिले असेल तर असा अपराध घडल्याच्या किंवा उघडकीस आल्याच्या दिनांकाच्या लगेच नंतर सहा महिन्यांच्या आत करण्यात आली नसेल तर, अशा दंडाधिकाऱ्याने अशा कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १६ द्वारे पोट-कलम (१) मध्ये खंड (अ) नव्याने दाखल केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे खंड (ब) दाखल केला.

* आता पाहा फौजदारी प्रक्रियासंहीता, १९७३ (१९७४ चा २).

**४२९.** हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या आरोपास उत्तर देण्यासाठी दंडाधिकाऱ्यापुढे हजर राहण्याविषयी समन्स काढण्यात आलेली कोणतीही व्यक्ती समन्समध्ये नमूद केलेल्या वेळी वा ठिकाणी हजर राहण्यात कसूर करील, आणि समन्स बजावण्यात आले होते असे दंडाधिकाऱ्यांची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध करण्यात आले व अशा व्यक्तीने हजर न राहण्याबद्दल कोणतेही पुरेसे कारण दाखवले नसेल तर, दंडाधिकाऱ्यास अशा व्यक्तीच्या अनुपस्थितीत अशा प्रकारची सुनावणी करता येईल व निर्णय देता येईल.

आरोपीच्या अनुपस्थितीत प्रकरणाची सुनावणी करण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.

**४३०.** शासनाच्या रासायनिक विश्लेषकाकडे पृथ:करणांसाठी रीतसर पाठवण्यात आलेल्या कोणत्याही वस्तूसंबंधी त्याने आपल्या सहीनिशी दिलेला अहवाल म्हणून अभिप्रेत असलेला कोणताही दस्तऐवज हा, या अधिनियमान्वये करण्यात येणाऱ्या कोणत्याही चौकशीमध्ये किंवा खटल्यामध्ये त्या दस्तऐवजात नमूद केलेल्या गोष्टीसंबंधी साक्षीपुरावा म्हणून उपयोगात आणता येईल.

शासनाच्या रासायनिक विश्लेषकाचा अहवाल.

**४३१.** (१) शहरात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, कोणताही उपद्रव होत असल्याविषयी किंवा कलमे १५६, १५७, १७५, १७६, १७७, २४९ किंवा २९२ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना प्रत्यक्षात कमीत कमी जितका उपद्रव होईल त्यापेक्षा अधिक उपद्रव होत आहे अशी तक्रार त्या शहरात अधिकारिता असलेल्या पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्यांकडे करता येईल.

उपद्रवासंबंधी तक्रार.

(२) अशी कोणतीही तक्रार मिळाल्यानंतर, दंडाधिकाऱ्यास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल तर,—

(अ) या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या, विनियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याविषयी किंवा अशा उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी, त्याचा उपशम करण्यासाठी, तो कमी करण्यासाठी किंवा त्यावर उपाय करण्यासाठी अशा दंडाधिकाऱ्यास व्यवहार्य व वाजवी वाटेल अशी उपाययोजना करण्याविषयी ;

(ब) उक्त तक्रारीचा व आदेशाचा आणि त्यासंबंधीचा, अशी तक्रार करण्यामध्ये तक्रार करणाऱ्याची जी कालहानी झाली असेल त्याबद्दलची भरपाई धरून, उक्त दंडाधिकारी ठरवील असा वाजवी खर्च, तक्रार करणाऱ्यास देण्याविषयी आयुक्तास निदेश देता येईल.

(३) कलम ४३२ च्या तरतुदींच्या अधीन राहून, अशा प्रत्येक आदेशाचे पालन करणे हे आयुक्ताचे अवश्य कर्तव्य असेल.

(४) कलमे १५६, १५७, १७५, १७६, १७७, २४९ किंवा २९२ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीस नुकसान पोचले असेल किंवा ज्या व्यक्तींच्या मालमत्तेस नुकसान पोचले असेल त्या व्यक्तीच्या, त्याबद्दल नुकसानभरपाई वसूल करण्याच्या कोणत्याही अधिकारास या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

कलम ४३१ अन्वये दिलेल्या आदेशावर सत्र न्यायालयाकडे अपील करणे.

**४३२.** (१) कलम ४३१ अन्वये दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावर तो दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सत्र न्यायालयाकडे अपील केले पाहिजे.

(२) सत्र न्यायालयास, पोट-कलम (१) अन्वये केलेले अपील निकालात काढताना, अपिलाचा खर्च, तसा खर्च असल्यास, कोणी द्यावयाचा आणि कोणत्या प्रमाणात द्यावयाचा याविषयी निदेश देता येईल, आणि अशा रीतीने जो खर्च देण्याविषयी निदेश देण्यात आला असेल तो खर्च, शहरात अधिकारिता असलेल्या पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्यास, त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर, सत्र न्यायाधीशाच्या निदेशानुसार जणू त्याने बसवलेला दंड आहे असे समजून वसूल करता येईल.

(३) या कलमान्वये सत्र न्यायालयाकडे अपील करण्यात आले असेल तेव्हा, आयुक्ताने असे अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, दंडाधिकाऱ्याच्या आदेशावर करावयाची कार्यवाही लांबणीवर टाकली पाहिजे आणि त्यानंतर, अशा अपिलात सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशाची ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे, किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशात सत्र न्यायालयाने कोणताही फेरफार केला नसेल तर, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाची त्याने ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे.

(४) सत्र न्यायालयास पोट-कलम (१) अन्वये अपिले दाखल करून घेण्याच्या बाबतीत आणि त्याचा अभिनिर्णय करताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीच्या बाबतीत नियमन करण्यासाठी वेळोवेळी नियम करता येतील.

## नऊ.--अपराध्यांना अटक करणे

या अधिनियमा विरुद्ध अपराध करणाऱ्यांना विवक्षित बाबतीत पोलीस अधिकाऱ्यांकडून अटक केली जाऊ शकेल.

**४३३.** (१) कोणतीही व्यक्ती एखाद्या पोलीस अधिकाऱ्यासमक्ष या अधिनियमाविरुद्ध किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध कोणताही अपराध करील आणि अशा व्यक्तीचे नाव व पत्ता अशा अधिकाऱ्यास माहीत नसेल व अशी व्यक्ती, तशी मागणी केल्यावर, आपले नाव व पत्ता देण्यास नकार देईल किंवा जे नाव व पत्ता खोटा आहे असे त्या अधिकाऱ्यास सकारण वाटेल असे नाव व पत्ता अशा अधिकाऱ्यास देईल तर, असा कोणताही पोलीस अधिकारी अशा व्यक्तीस अटक करू शकेल.

[१][ (२) अशा रीतीने अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे खरे नाव व पत्ता याविषयी खात्री करून घेतल्यानंतर किंवा [२][ निकटतम न्यायदंडाधिकाऱ्याच्या ] आदेशाशिवाय अशा कोणत्याही व्यक्तीस, अटक केल्यापासून चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत अटकेत ठेवता कामा नये ; उक्त कालावधीत, अटकेच्या ठिकाणापासून अशा दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या वेळेचा समावेश होणार नाही.]

---

[१] मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आले.

[२] " निकटतम दंडाधिकाऱ्याच्या " या शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २, अनुसूची भाग ३ अन्वये दाखल करण्यात आले.

**दहा.--किरकोळ**

[1]**[४३३. अ** या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याच्याव्यतिरिक्त, कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्याने काढलेली कोणतीही नोटीस, काढलेला कोणताही आदेश किंवा दिलेला कोणताही निदेश, यांना कोणत्याही दाव्यामध्ये किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीमध्ये हरकत घेता येणार नाही.] अधिकारितेस रोध.

१९०८ चा ५. **४३४.** (१) या प्रकरणात स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, मूळ हुकूमनाम्यावर केलेल्या अपिलासंबंधी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये ज्या तरतुदी असतील त्या, आयुक्ताच्या आदेशांविरुद्ध न्यायाधीशाकडे केलेल्या अपिलांच्या बाबतीत लागू होतील आणि अपील हुकूमनाम्यावर केलेल्या अपिलासंबंधी उक्त संहितेमध्ये ज्या तरतुदी असतील त्या जिल्हा न्यायालयाकडे केलेल्या अपिलांच्या बाबतीत लागू होतील. दिवाणी प्रक्रिया संहिता लागू होणे.

(२) या अधिनियमान्वये ज्या बाबतीत कोणतीही विशिष्ट तरतूद करण्यात आलेली नाही अशा अन्य सर्व बाबतीत, [2][राज्य] शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून वेळोवेळी जे नियम करील असे नियम लागू होतील.

१९०८ चा ९. **४३५.** (१) या प्रकरणात उल्लेख केलेले अपील किंवा अर्ज यासाठी विहित करण्यात आलेली मुदत मर्यादा मोजताना भारतीय मुदत मर्यादा अधिनियम, १९०८, याची कलमे ५, १२ आणि १४ यातील तरतुदी शक्य असेल तेथवर, लागू होतील. मुदत मर्यादा.

(२) एखादे अपील, अर्ज किंवा निर्देश सादर करण्यासाठी या अधिनियमान्वये कोणतीही मुदत विहित करण्यात आली नसेल तेव्हा, ज्या आदेशाच्या बाबतीत किंवा ज्या आदेशाविरुद्ध अपील, अर्ज किंवा निर्देश करावयाचा असेल त्या आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत असे अपील, अर्ज किंवा निर्देश करण्यात आला पाहिजे.

१८८७ चा ९. **४३६.** (१) न्यायाधीशांच्या सर्व आदेशांची अंमलबजावणी, असे आदेश जणू प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ अन्वये लघुवाद न्यायालयाने दिलेले हुकूमनामे आहेत असे समजून तशाच रीतीने करण्यात आली पाहिजे ; न्यायाधीशाच्या आणि जिल्हा न्यायाधीशाच्या आदेशांची अंमलबजावणी.

(२) जिल्हा न्यायाधीशाच्या सर्व आदेशांची अंमलबजावणी, असे आदेश जणू जिल्हा न्यायालयाचे हुकूमनामे आहेत असे समजून करण्यात आली पाहिजे.

१८९८ चा ५. **४३७.** * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या तरतुदी शक्य असेल तेथवर, दंडाधिकाऱ्यांपुढे या अधिनियमान्वये चालू असलेल्या सर्व चौकशांना व कार्यवाह्यांना लागू होतील. दंडाधिकाऱ्यांपुढे चालू असलेल्या सर्व चौकशांना व कार्यवाह्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता लागू असणे.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १७ द्वारे कलम ४३३ अ

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

* आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

## प्रकरण सत्तावीस

### करांव्यतिरिक्त नगरपालिकेस येणे असलेल्या अन्य रकमांची वसुली

विवक्षित कलमांन्वये सामान इत्यादी हलवण्यासाठी आयुक्तास आलेल्या खर्चाची वसुली.

**४३८.** (१) कलम ६०, कलम २३१ किंवा कलम २३९, पोट-कलम (३) अन्वये कोणतेही सामान हलवताना आयुक्तास आलेला खर्च किंवा कलम २२६, पोट-कलम (२) किंवा कलम २२७, पोट-कलम (३) किंवा कलम २३२, किंवा कलम २४४, पोट-कलम (२), किंवा कलम २४५, पोट-कलम (३), किंवा कलम २६४, किंवा कलम ३०८ अन्वये देण्यात आलेल्या लेखी नोटिशीचे अनुपालन करण्यात आले नसेल अशा प्रसंगी कलम ४७९ अन्वये आयुक्तास आलेला खर्च आणि पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला अन्य सर्व खर्च व आकार, तसे असल्यास, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन, हलवलेल्या सामानाची विक्री करून वसूल करता येईल आणि अशा विक्रीचे उत्पन्न पुरेसे नसेल तर, राहिलेली रक्कम उक्त सामानाच्या मालकाने दिली पाहिजे.

(२) सामान हलविण्यासाठी झालेला खर्च कोणत्याही बाबतीत, अशा सामानाची विक्री करण्यापूर्वी देण्यात आला तर, त्या सामानांची विक्री करण्यात येण्यापूर्वी किंवा अन्य प्रकारे, त्याची विल्हेवाट लावण्यात येण्यापूर्वी, त्या सामानाच्या मालकाने त्याची मागणी केल्यावर, आणि आयुक्ताने त्या बाबतीत किंवा त्याची नियोजित विक्री करण्याच्या किंवा विल्हेवाट लावण्याच्या बाबतीत केलेला अन्य सर्व खर्च, तसा असल्यास, आणि असे सामान साठवून ठेवण्यासाठी आयुक्त ठरवील असे सर्व आकार, तसे असल्यास, मालकाने दिल्यावर, आयुक्ताने असे सामान मालकास परत दिले पाहिजे.

(३) पोट-कलम (२) अन्वये सामान त्याच्या मालकास परत देण्यात आले नाही तर त्याची लिलावाने विक्री करण्यात येईल किंवा आयुक्तास योग्य वाटेल त्याप्रमाणे अन्य प्रकारे त्याची विल्हेवाट लावण्यात येईल :

परंतु, सामान नाशिवंत असेल तर त्याची ताबडतोब विक्री करण्यात आली पाहिजे किंवा विल्हेवाट लावण्यात आली पाहिजे आणि ते नाशिवंत नसेल तर, ते हलवल्याच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर सोयीस्कर असेल तितक्या लवकर त्याची विक्री करण्यात आली पाहिजे किंवा विल्हेवाट लावण्यात आली पाहिजे—मग ते हलवण्याचा खर्च किंवा ते साठवून ठेवण्याचा आकार, असल्यास तो आकार, दरम्यानच्या काळात देण्यात आलेला असो किंवा नसो--आणि विक्रीचे किंवा अन्य विल्हेवाटीचे उत्पन्न मिळाल्यास, त्यातून विक्रीचा किंवा अन्य विल्हेवाटीचा खर्च आणि आवश्यक असल्यास, हलवण्याचा खर्च व साठवून ठेवण्याचा आकार भागवून, नगरपालिका निधीच्या खाती जमा करण्यात आले पाहिजे, आणि ते महानगरपालिकेची मालमत्ता होईल.

**४३९.** (१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये आयुक्ताच्या किंवा कलम ६९ अन्वये याबाबत अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार केलेल्या कोणत्याही कामाचा, केलेल्या कोणत्याही उपाययोजनेचा किंवा कृतीचा खर्च कोणत्याही व्यक्तीने द्यावयाचा असेल तेव्हा तेव्हा मागणी करण्यात आल्यावर तो देण्यात आला पाहिजे.

या अधिनियमान्वये वसुलीयोग्य असलेला खर्च मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला पाहिजे ; आणि मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला नाही तर, तो मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

(२) उक्त खर्च, मागणी करण्यात आल्यावर देण्यात आला नाही तर, आयुक्तास, पोट-कलम (४) च्या व कलम ४१६ पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, अशा खर्चाची रक्कम ही जणू उक्त कसूरदाराकडून येणे असलेली मालमत्ता कराची रक्कम आहे असे समजून, कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून व तिची विक्री करून किंवा त्याची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून, अशा खर्चाची रक्कम वसूल करता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणताही खर्च देण्यासंबंधी आयुक्ताने मागणी केली असेल तेव्हा, अशा खर्चाची मागणी करण्यासंबंधीच्या त्याच्या अधिकाराविषयी किंवा मागणी केलेल्या रकमेविषयी विवाद असेल किंवा, कलम २४७, पोट-कलम (२) अन्वये तात्पुरती उपाययोजना करताना आयुक्तास आलेल्या खर्चाच्या बाबतीत, अशी तात्पुरती उपाययोजना करण्याच्या आवश्यकतेविषयी विवाद असेल तर आयुक्ताने ती बाब न्यायाधीशाकडे त्याच्या निर्णयासाठी पाठविली पाहिजे.

(४) न्यायाधीशाकडून निर्णय देण्यात येईपर्यंत आयुक्ताने, त्याने मागणी केलेल्या रकमेच्या वसुलीसंबंधी पुढील कार्यवाही लांबणीवर टाकली पाहिजे आणि निर्णय देण्यात आल्यानंतर, कलम ४१६ च्या तरतुदींच्या अधीन राहून अशा निर्णयानुसार येणे असलेली रक्कम म्हणून ठरवण्यात आली असेल तितकीच रक्कम, तशी रक्कम असल्यास, वसूल करण्यासाठी कार्यवाही केली पाहिजे.

**४४०.** उक्त खर्च हा, एखाद्या इमारतीवर किंवा जमिनीवर किंवा तिच्या संबंधात केलेल्या एखाद्या कामाच्या किंवा कृतीच्या बाबतीत. किंवा एखाद्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात केलेल्या एखाद्या उपाययोजनेच्या बाबतीत किंवा एखाद्या खाजगी रस्त्याच्या बाबतीत येणे असेल आणि कसूरदार हा, अशा इमारतीचा किंवा जमिनीचा किंवा, यथास्थिती, अशा रस्त्याच्या समोर असलेल्या किंवा रस्त्यास लागून असलेल्या किंवा त्यालगत असलेल्या जागेचा मालक असेल तर, उक्त खर्चाची रक्कम देण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी जी व्यक्ती उक्त मालकाच्या उक्त इमारतीचा, जमिनीचा किंवा जागेचा भोगवटा करत असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडे अशा रकमेची मागणी करता येईल ; आणि उक्त व्यक्तीने अशी रक्कम देण्यात कसूर केल्यास, अशी रक्कम ही जणू तिच्याकडून येणे असलेली मालमत्ता कराची रक्कम आहे असे समजून, तिची जंगम मालमत्ता अटकावून व तिची विक्री करून किंवा तिची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून, अशी रक्कम वसूल करता येईल :

कसूरदार हा, ज्या जागेच्या बाबतीत, खर्च देय असेल अशा जागेचा मालक असेल तर, भोगवटादार-देखील असा खर्च देण्यास जबाबदार असेल.

परंतु—

(अ) उक्त इमारतीच्या किंवा जागेच्या बाबतीत उक्त व्यक्तीने देय असलेली भाड्याची रक्कम आणि ती ज्या व्यक्तीला द्यावयाची असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता याविषयी खरी माहिती देण्याची आयुक्ताने विनंती केली असता उक्त व्यक्तीने ती माहिती देण्यात हयगय केली नाही किंवा ती देण्यास नकार दिला नाही तर, उक्त व्यक्ती, मागणीच्या वेळेपर्यंत उक्त इमारतीच्या, जमिनीच्या किंवा जागेच्या भाड्याबद्दल

मालकास जी रक्कम देण्यास जबाबदार असेल त्यापेक्षा अधिक रक्कम उक्त खर्चाबद्दल देण्यास जबाबदार असणार नाही; परंतु, उक्त व्यक्तीकडे मागणी करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही तिने मालकास द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी उक्त व्यक्तीवर राहील ;

(ब) उक्त खर्चाबद्दल उक्त व्यक्तीने दिलेली किंवा तिच्याकडून वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम मालकाच्या हिशेबात अशा व्यक्तीच्या नावे जमा म्हणून धरली जाण्याचा उक्त व्यक्तीस हक्क असेल ;

(क) वर सांगितल्याप्रमाणे कोणतेही काम, कृती किंवा उपाययोजना करण्याचा खर्च देण्याच्या बाबतीत उक्त व्यक्ती व ती भोगवटा करत असलेल्या इमारतीचा, जमिनीचा किंवा जागेचा मालक यांच्यामध्ये करण्यात आलेल्या कोणत्याही करारास या कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही.

खर्चाची रक्कम हप्त्यांनी स्वीकारण्यासंबंधी आयुक्तास करार करता येईल.

**४४१.** वर सांगितल्याप्रमाणे असा कोणताही खर्च, यांत यापूर्वी तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही रीतीने वसूल करण्याऐवजी, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, आणि स्थायी समितीच्या मान्यतेने, अशी येणे असलेली खर्चाची पूर्ण रक्कम त्यावरील व्याजासह ज्यायोगे वसूल होईल अशा रकमेच्या हप्त्यांनी व अशा कालांतरानी, पाच वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीच्या आत देण्याविषयी, जी व्यक्ती अशी रक्कम देण्यास जबाबदार असेल त्या व्यक्तीकडून करार करून घेता येईल ; उक्त व्याज हे, दरसाल दर शेकडा नऊपेक्षा अधिक नसेल असा जो दर स्थायी समिती वेळोवेळी ठरवील त्या दराने आकारण्यात आले पाहिजे.

विवक्षित खर्च हे, सुधारणा खर्च म्हणून जाहीर करता येतील.

**४४२.** (१) एखाद्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात पुरवलेले कोणतेही सामान किंवा जोडणी किंवा केलेले कोणतेही काम किंवा कृती यांच्या बाबतीत या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये आयुक्तास आलेला जो कोणताही खर्च अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यायोग्य असेल असा खर्च, हा सुधारणा खर्च म्हणून जाहीर करणे आयुक्तास महानगरपालिकेच्या मान्यतेने योग्य वाटेल तर, विनियमांच्या अधीन, तसे जाहीर करता येईल ; आणि अशा रीतीने जाहीर करण्यात आल्यावर, असा खर्च पोट-कलम (२) अन्वये त्यावर देय होणाऱ्या व्याजासह, ज्या जागेच्या बाबतीत किंवा ज्या जागेच्या फायद्यासाठी असा खर्च करण्यात आला असेल, त्या जागेवर भार म्हणून राहील.

(२) सुधारणा खर्च हा त्यावरील व्याजासह चुकता होण्यास पुरेशा अशा रकमेच्या हप्त्यानी—अशी रक्कम कोणत्याही जागेच्या बाबतीत दरसाल बारा रुपयांपेक्षा कमी असता कामा नये—आणि पुरेशा अशा कालांतरानी, आयुक्त, महानगरपालिकेच्या मान्यतेने प्रत्येक बाबतीत ठरवील अशा तीस वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीच्या आत वसूल करता येईल ; उक्त व्याज हे, दरसाल दर शेकडा सहापेक्षा अधिक नसेल असा जो दर स्थायी समिती वेळोवेळी ठरवील त्या दराने आकारण्यात आले पाहिजे.

(३) असा खर्च व त्यावरील व्याज यांचा भार अशा रीतीने ज्या जागेवर टाकण्यात आला असेल त्या जागेच्या भोगवटादाराने उक्त हप्ते दिले पाहिजेत किंवा असा खर्च देण्यासाठी ठरवण्यात आलेला कालावधी संपण्यापूर्वी किंवा अशी रक्कम वर सांगितल्याप्रमाणे तिच्यावरील व्याजासह पूर्णपणे देण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी उक्त जागा भोगवटारहित झाली असेल तर, जोपर्यंत ती अशी भोगवटारहित राहील तोपर्यंत उक्त जागेचा त्या त्या वेळी जो मालक असेल त्याने उक्त हप्ते दिले पाहिजेत.

**४४३.** (१) ज्या भोगवटादाराने कोणताही सुधारणा खर्च दिला असेल तो भोगवटादार, ज्या जागेवर असा खर्च व त्यावरील व्याज भार म्हणून टाकण्यात आले असेल ती जागा जबर भाड्यापेक्षा कमी नसेल अशा भाड्याने धारण करत असेल तेव्हा, भोगवटादारास, असा खर्च व वर सांगितल्याप्रमाणे त्यावरील व्याज याबद्दल त्याने दिलेल्या रकमेच्या तीन-चतुर्थांश रक्कम त्याने घरमालकास देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वजा करण्याचा हक्क असेल ; आणि तो अशी जागा जबर भाड्यापेक्षा कमी असेल अशा भाड्याने धारण करत असेल तर, त्यास अशा रीतीने देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून असा खर्च व वर सांगितल्याप्रमाणे त्यावरील व्याज याबद्दल त्याने दिलेल्या रकमेच्या तीन-चतुर्थांश रकमेचा त्याच्या भाड्याचे जबर भाड्याशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणातील भाग वजा करण्याचा हक्क असेल ;

सुधारणा खर्चाचा प्रमाणशीर भाग भाड्यातून वजा करता येईल.

(२) ज्या घरमालकाच्या भाड्यातून अशा रीतीने कोणतीही रक्कम वजा करण्यात आली आहे तो घरमालक, ज्या जागेच्या बाबतीत रक्कम वजा करण्यात आली आहे त्या जागेचे भाडे देण्यास स्वत: जबाबदार असेल तर, आणि अशी जागा ज्या मुदतीपैकी वीस वर्षांपेक्षा कमी वर्षे संपलेली नसतील अशा मुदतीसाठी (अन्य मुदतीसाठी नाही) धारण करत असेल तर, त्यास देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वजा करण्यात आलेल्या रकमेचा, त्याने देय असलेल्या भाड्याच्या रकमेचे, त्यास देय असलेल्या भाड्याच्या रकमेशी जे प्रमाण असेल, त्या प्रमाणातील भाग, त्याला अशा रीतीने देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वजा करता येईल आणि (ज्या मुदतीपैकी वीस वर्षांपेक्षा कमी वर्षे संपलेली नसतील अशा मुदतीसाठी अशी जागा धारण करणारा) त्याच जागेचा जो घरमालक, त्या जागेच्या संबंधात भाडे घेत असेल व भाडे देण्यास पात्र असेल अशा प्रत्येक घरमालकास अशा रीतीने रक्कम वजा करता येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीने देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वजा करण्यात आलेल्या पूर्ण रकमेपेक्षा अधिक रक्कम वजा करण्याचा तिला हक्क प्राप्त होतो, असा या कलमातील कोणत्याही मजकुराचा अर्थ लावता कामा नये.

**४४४.** कोणताही सुधारणा खर्च व त्यावरील व्याज देण्यासाठी ठरवलेला कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, ज्या जागेवर त्याचा भार टाकण्यात आला असेल त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास, उक्त खर्च व देय असलेले व्याज असल्यास ते व्याज, यांच्या रकमेपैकी जो भाग आधीच देण्यात किंवा वसूल करण्यात आला नसेल तो भाग आयुक्ताकडे भरून अशा भाराचे विमोचन करता येईल.

सुधारणा खर्चाच्या भाराचे विमोचन.

**४४५.** कलम ४४१ किंवा ४४२ अन्वये देय असलेला कोणताही हप्ता, तो देय झाला तेव्हा देण्यात आला नाही तर, आयुक्तास असा हप्ता हा जणू ज्या व्यक्तीकडून तो येणे असेल त्या व्यक्तीकडून येणे असलेला मालमत्ता कर आहे असे समजून, उक्त व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकावून व तिची विक्री करून किंवा तिची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून, असा हप्ता वसूल करता येईल.

कलमे ४४१ व ४४२ अन्वये देय असलेल्या हप्त्यांची वसुली.

कोणत्याही जागेच्या मालकाने कसूर केल्यास जागेच्या भोगवटादारास आवश्यक काम पार पाडता येईल आणि त्याचा खर्च मालकाकडून वसूल करता येईल.

**४४६.** कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक, या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये त्याने पार पाडणे आवश्यक असेल असे कोणतेही काम पार पाडण्यात कसूर करील तर, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादारास, तसा भोगवटादार असल्यास, आयुक्ताच्या मान्यतेने उक्त काम पार पाडता येईल, आणि तसे करण्यासाठी त्यास जो वाजवी खर्च आला असेल तो मालकाकडून वसूल करण्याचा त्यास हक्क असेल, आणि त्यास, वसुलीच्या अन्य कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, अशा खर्चाची रक्कम त्याने मालकास वेळोवेळी देय होणाऱ्या भाड्याच्या रकमेतून वजा करता येईल.

खर्च किंवा भरपाई देण्यास दायी असलेल्या व्यक्तीविरुद्ध त्या वसुलीसाठी दावा दाखल करता येईल.

**४४७.** कोणत्याही खर्चाबद्दल किंवा भरपाईबद्दल द्यावयाची जी रक्कम यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे ठरवण्यात आली असेल अशी कोणतीही रक्कम वसूल करण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही रीतीने कार्यवाही करण्याऐवजी किंवा अशी कार्यवाही अयशस्वी रीतीने किंवा अंशत: यशस्वी रीतीने करण्यात आल्यानंतर देय असलेली रक्कम, किंवा यथास्थिती, देय असलेल्या रकमेपैकी राहिलेली रक्कम ही, ती देण्यास दायी असलेल्या व्यक्तीविरुद्ध सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करून वसूल करता येईल.

## प्रकरण अठ्ठावीस

### नियंत्रण

कोणत्याही नगरपालिका प्राधिकाऱ्याने कर्तव्य पार पाडण्यात कसूर केल्यास, ती पार पाडण्यास भाग पाडण्याचा [1] [राज्य] शासनाचा अधिकार.

**४४८.** (१) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये किंवा तद्नुसार कोणत्याही नगरपालिका प्राधिकाऱ्यावर लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यात कसूर झाली असल्याची, तक्रार करण्यात आल्यावर किंवा अन्यथा, [1] [राज्य] शासनास कोणत्याही वेळी दिसून आले तर, [1] [राज्य] शासनास, योग्य चौकशीनंतर, अभिकथित कसूर करण्यात आली आहे अशी त्याची खात्री झाल्यास, ते कर्तव्य पार पाडण्यासाठी कालावधी विहित करणारा एक आदेश देता येईल:

परंतु, ज्या बाबतीत [1] [राज्य] शासनाला निकडीची परिस्थिती दिसून येईल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबतीत, महानगरपालिकेवर आणि [1] [राज्य] शासनाला योग्य वाटेल तर, आयुक्तावर एक लेखी नोटीस बजावून तिच्याद्वारे, असा आदेश का देण्यात येऊ नये याविषयी कारण दाखवण्यास फर्माविता येईल आणि अशा नोटिशीच्या दिनांकापासून एक महिना संपेपर्यंत, तसेच अशा रीतीने दाखवण्यात आलेले कारण असल्यास त्या कारणावर, [1] [राज्य] शासनाकडून विचार करण्यात येईपर्यंत असा कोणताही आदेश देता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशात विहित करण्यात आलेल्या कालावधीच्या आत कर्तव्य पार पाडण्यात आले नाही तर, [1] [राज्य] शासनाला ते कर्तव्य पार पाडण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि असे कर्तव्य पार पाडण्यासाठी होणारा खर्च व ते पार पाडणाऱ्या व्यक्तीस द्यावयाचे [1] [राज्य] शासन ठरवील असे वाजवी पारिश्रमिक आणि या कलमान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा खर्च हा नगरपालिका निधीतून देण्यात आला पाहिजे असा निदेश देता येईल.

कलम ४४८ अन्वये अंमलात आणलेल्या उपाय-योजनांचा खर्च कसा वसूल करता येईल.

**४४९.** (१) कलम ४४८, पोट-कलम (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणताही आदेश देण्यात आला असेल तेव्हा, महानगरपालिकेने, [1] [राज्य] शासनाने केलेल्या कोणत्याही मागणीपत्रात उक्त आदेशास अनुसरून वेळोवेळी जी रक्कम किंवा ज्या रकमा मागितल्या असतील ती रक्कम किंवा त्या रकमा [1] [राज्य] शासनाला देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) असे कोणतेही मागणीपत्र दिल्यापासून चौदा दिवसांच्या आत त्याचे अनुपालन करण्यात आले नाही तर, [1] [राज्य] शासनाला, लेखी आदेशाद्वारे नगरपालिका निधी ज्या बँकेत ठेवण्यात आला असेल त्या बँकेकडून उक्त आदेशात नमूद केलेली रक्कम किंवा रकमा घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीस प्राधिकृत करता येईल व तसे करण्याविषयी त्या व्यक्तीस निदेश देता येईल.

(३) उक्त लेखी आदेश सादर करण्यात आल्यावर, उक्त बँकेने उक्त रक्कम किंवा रकमा घेण्यासाठी उक्त आदेशात प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी रक्कम किंवा अशा रकमा ताबडतोब दिल्या पाहिजेत आणि बँकेने नगरपालिका निधीतून अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेबाबत किंवा रकमांबाबत तिची महानगरपालिकेसंबंधी जी जबाबदारी असेल अशा सर्व जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी उक्त लेखी आदेश पुरेसा असेल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

कार्यवृत्ते इत्यादीतील उतारे मागवण्याचा १ [राज्य] शासनाचा अधिकार.

**४५०.** (१) [1] [राज्य] शासनाला कोणत्याही वेळी, महानगरपालिकेच्या, स्थायी समितीच्या परिवहन समितीच्या किंवा त्या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही समितीच्या कोणत्याही कार्यवृत्तातील किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली कोणत्याही अभिलेखातील कोणताही उतारा आणि या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही आकडेवारी पुरविण्याविषयी महानगरपालिकेस फर्माविता येईल; आणि महानगरपालिकेने गैरवाजवी विलंब न लावता ती पुरवली पाहिजे.

(२) [1] [राज्य] शासनाला, कोणत्याही वेळी, आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास, त्या प्रत्येकाचा जेथवर संबंध असेल तेथवर, या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही माहिती, प्रतिवृत्त, स्पष्टीकरण किंवा आकडेवारी पुरविण्याविषयी फर्माविता येईल ; आणि आयुक्ताने किंवा यथास्थिती, परिवहन व्यवस्थापकाने गैरवाजवी विलंब न लावता ती पुरवली पाहिजे.

राज्य शासनाचा अनुदेश किंवा निदेश देण्याचा अधिकार.

[2][४५० अ. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महानगरपालिकेची कर्तव्ये आणि कार्ये याबाबत महानगरपालिकेने अनुसरावयाच्या धोरणात्मक बाबींसंबंधात महानगरपालिकेला सर्वसाधारण अनुदेश देता येतील, आणि विशेषत: त्यास व्यापक लोकहितासाठी, किंवा केंद्र सरकारची वा राज्य शासनाची धोरणे आणि राष्ट्रीय वा राज्यस्तरीय कार्यक्रम, प्रकल्प आणि योजना यांची अंमलबजावणी करण्यासाठी, निदेश देता येतील, असे अनुदेश किंवा निदेश दिल्यावर, असे अनुदेश किंवा निदेश अंमलात आणणे हे, महानगरपालिकेचे कर्तव्य असेल :

परंतु, राज्य शासन या कलमाखाली कोणतेही अनुदेश किंवा निदेश देण्यापूर्वी, महानगरपालिकेला असे अनुदेश किंवा निदेश का देण्यात येऊ नयेत याबाबत पंधरा दिवसांच्या आत अभिवेदन सादर करण्याची संधी देईल. महानगरपालिकेने पंधरा दिवसांच्या आत अभिवेदन सादर करण्यास कसूर केली किंवा, अभिवेदन सादर केल्यास, असे अभिवेदन विचारात घेतल्यावर, तसे अनुदेश किंवा निदेश देणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत झाले असेल तर, राज्य शासन तसे निदेश देईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५ द्वारे कलम ४५० अ दाखल करण्यात आले.

[१] [**४५१.** (१) महानगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशांचे कार्यान्वयन केल्याने किंवा महानगरपालिकेकडून किंवा अशा प्राधिकाऱ्याकडून किंवा तिच्या किंवा त्यांच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याची शक्यता आहे किंवा जी करण्यात येत असेल ती केल्याने हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा तद्न्वये देण्यात आलेल्या अधिकाराच्या विरुद्ध किंवा मर्यादेबाहेर आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा लोकांस किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास किंवा गटास इजा किंवा त्रास होण्याचा संभव आहे किंवा लोकहिताविरुद्ध नगरपालिका निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव आहे [२][किंवा ते महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या अथवा व्यापक लोकहिताच्या विरुद्ध आहे.] असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास, लेखी आदेशाद्वारे, अशा ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन, त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी, निलंबित करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करता येईल. अशा आदेशाची एक प्रत, राज्य शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास ताबडतोब पाठविली पाहिजे.

विवक्षित प्रकरणांमध्ये महानगर-पालिकेचा किंवा इतर प्राधिकाऱ्यांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबित किंवा विखंडित करण्याचा [३] [राज्य] शासनाचा अधिकार.

(२) उपरोक्तप्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर, महानगरपालिकेस किंवा आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास, त्यास योग्य वाटेल तर, उक्त आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल.

(३) राज्य शासनास, महानगरपालिकेकडून किंवा आयुक्तांकडून किंवा परिवहन व्यवस्थापकाकडून मिळालेले कोणतेही अभिवेदन विचारात घेतल्यानंतर व तीस दिवसांच्या मुदतीत असे कोणतेही अभिवेदन मिळाले नसेल त्याबाबतीत, पोट-कलम (१) अन्वये त्याने दिलेला आदेश एकतर रद्द करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा प्रकरणाची सर्व परिस्थिती विचारात घेऊन, उक्त बाबीच्या संबंधात, त्याच्या मते जी न्याय्य किंवा इष्ट असेल अशी इतर कार्यवाही करता येईल. पोट-कलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश कायम करण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासनास, ज्याच्या संबंधात पोट-कलम (१) अन्वये निलंबन आदेश देण्यात आला होता असा महानगरपालिकेचा किंवा तिच्या प्राधिकाऱ्याचा ठराव किंवा आदेश हा विखंडित झाला असल्याचे मानण्यात येईल असा निदेश देता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये, राज्य शासनाकडून कोणताही आदेश देण्यात येईल त्याबाबतीत, अशा आदेशाचे पालन करणे हे, प्रत्येक पालिका सदस्याचे व महानगरपालिकेचे व संबंधित इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याचे किंवा अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.]

---

१ मूळ कलमाऐवजी हे कलम, सन १९७५ चा महा. अधिनियम क्र. २७ याच्या कलम ६ अन्वये दाखल करण्यात आले.

२ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २९ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][महानगरपालिका विसर्जित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.]

**४५२.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार महानगरपालिकेवर लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास महानगरपालिका सक्षम नाही किंवा ती पार पाडण्यात दुराग्रहाने कसूर करत आहे किंवा ती आपल्या अधिकारांचा अतिक्रम किंवा दुरुपयोग करत आहे असे [१][राज्य] शासनाला, अभिवेदनावरून किंवा अन्यथा, कोणत्याही वेळी दिसून येईल तर, [१][राज्य] शासनाला, राजपत्रात एक आदेश व त्याबद्दलची कारणे प्रसिद्ध करून, आदेशात [२][ विनिर्दिष्ट करावयाच्या दिनांकापासून महानगरपालिका विसर्जित करता येईल;] मात्र असा आदेश प्रसिद्ध करण्यापूर्वी, असा आदेश का देण्यात येऊ नये याविषयी कारण दाखवण्याची संधी महानगरपालिकेस देण्यात आली पाहिजे. [३][ * * * ]

(२) पोट-कलम (१) अन्वये [४][ दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून, किंवा अनुच्छेद २४३ याच्या परंतुकान्वये महानगरपालिका विसर्जित होईल त्या दिनांकापासून ] पुढील परिणाम घडून येतील :—

(अ) [५][ * * * ]

(ब) [५][ * * * ]

[६][ (क) या अधिनियमान्वये स्थापन केलेली महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती व अन्य सर्व समित्या यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये, विसर्जनाच्या कालावधीत राज्य शासनाने, वेळोवेळी याबाबतीत नियुक्त केलेल्या अशा शासकीय अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांना वापरता येतील व पार पाडता येतील ] ;

[७][ (ड) महानगरपालिकेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, महानगरपालिका विसर्जित झाल्यानंतर राज्य शासनाकडे निहित होईल ; ]

(ई) खंड (ग) अन्वये नेमलेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना आपले अधिकार व कर्तव्ये एखाद्या व्यक्तीकडे किंवा एखाद्या समितीकडे किंवा उपसमितीकडे प्रत्यायोजित करता येतील.

[८][ (फ) खंड (ग) खाली नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांना आणि खंड (ड) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस किंवा समितीच्या किंवा उपसमितीच्या सदस्यांना, राज्य शासनाकडून, वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल एवढे पारिश्रमिक महानगरपालिका निधीमधून देण्यात येईल ];

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७४ (अ) द्वारे "विनिर्दिष्ट करण्यात येईल." अशा " .....निदेश देता येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (अ) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ब) (एक) द्वारे "आदेश देण्यात येईल तेव्हा" या मजकुराऐवजी दाखल केला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ब) (दोन) द्वारे खंड (क) व (ख) वगळण्यात आले.

६ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ब) (तीन) द्वारे खंड (क) ऐवजी दाखल केला.

७ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ब) (चार) द्वारे खंड (घ) ऐवजी दाखल केला.

८ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ब) (पाच) द्वारे खंड (च) जादा दाखल केला.

९ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ई) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

(३) [1] [***]

(४) [2] [कलम ६ ख च्या खंड (ख) च्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत सार्वत्रिक प्रभाग निवडणुकीच्या वेळी, पालिका सदस्यांची निवडणूक करून, महानगरपालिकेची पुन्हा रचना करण्यात येईल:]

परंतु, वर सांगितल्याप्रमाणे सदस्यांची निवडणूक करून रचना करण्यात आलेल्या महानगरपालिकेची पहिली सभा भरवण्यात येईपर्यंत, पोट-कलम (२) खंड (घ ) अन्वये नेमण्यात आलेल्या एका किंवा अनेक व्यक्तींनी महानगरपालिकेच्या, स्थायी समितीच्या आणि, यथास्थिती, परिवहन समितीच्या अधिकारांचा वापर करणे व त्यांची कर्तव्ये पार पाडणे चालू ठेवले पाहिजे.

महानगर-पालिकेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कामे व कर्तव्य पार पाडण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना नियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[3] **[४५२.—अ** [1] (१) कलम ३ च्या, यथास्थिती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी रचना करण्यात आली असल्याचे मानण्यात येणाऱ्या किंवा रचना करण्यात आलेल्या प्रत्येक महानगरपालिकेकरिता, राज्य शासनास, महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल :

परंतु, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये, अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी रचना करण्यात आलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या महानगरपालिकेकरिता ३१ मे १९९४ च्या लगतपूर्वी ज्या स्वरूपात अस्तित्वात होता त्या स्वरूपातील या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ३१ मे १९९४ पूर्वी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला उक्त दिनांकास पदावर असलेला प्रशासक हा, उक्त महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, या पोट-कलमान्वये नियुक्त करण्यात आलेला शासकीय अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला किंवा केलेले अधिकारी, महानगरपालिकेची पहिली सभा होईपर्यंत किंवा कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये ते क्षेत्र अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी यांपैकी जो आधी असेल त्या कालावधीपर्यंत, पद धारण करतील :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये शासकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेला असल्याचे मानण्यात येणारा प्रशासक, महानगरपालिकेची पहिली सभा होईपर्यंत पद धारण करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या किंवा नियुक्त करण्यात आलेला असल्याचे मानण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील असे वेतन आणि भत्ते नगरपालिका निधीतून मिळतील.]

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७४ (क) द्वारे पोट-कलम (३) वगळले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७४ (ड) द्वारे " पोट-कलम (१) अन्वये.....स्थापन करण्यात आली पाहिजे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २ द्वारे कलम ४५२-अ समाविष्ट केले.

## प्रकरण एकोणतीस

### नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश

अनुसूचीतील नियम हे, अधिनियमाचा भाग असणे.

**४५३.** वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या [1][अनुसूची ' घ ' मधील] नियम हे, या अधिनियमाचा भाग आहे असे मानले जाईल.

[2][अनुसूची-'घ'मध्ये] फेरफार करणे किंवा तीत भर घालणे.

**४५४.** उक्त [2][अनुसूची-' घ ' मध्ये] विचार करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीची तरतूद करण्यासाठी किंवा उक्त [2][अनुसूची-'घ'मध्ये] विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाच्या (या कलमात, या संज्ञेमध्ये उक्त [2][अनुसूची-' घ 'चा ] समावेश होत नाही असे मानले जाईल) तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम महानगरपालिकेस या [2][अनुसूची-' घ 'मध्ये] जादा दाखल करता येतील ; आणि त्याच मर्यादांच्या अधीन राहून, उक्त [2][अनुसूची-घ मधील] कोणत्याही नियमात सुधारणा करता येईल, फेरफार करता येईल किंवा त्याचे विलोपन करता येईल :

परंतु, एखाद्या अपराधाबद्दल द्यावयाच्या शिक्षेचे नियमन करणाऱ्या कोणत्याही नियमात फेरफार किंवा सुधारणा करण्यात आली तर, अशा फेरफार किंवा सुधारणा केलेल्या नियमान्वये देण्यात येणारी शिक्षा ही, कलम ४६८ मध्ये तरतूद केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये.

नियम करण्याचा अधिकार हा, [3][राज्य] शासनाच्या मंजुरीच्या अधीन असणे.

**४५५.** (१) कलम ४५४ अन्वये कोणताही नियम करण्याचा, त्यात भर घालण्याचा, फेरफार करण्याचा किंवा तो विखंडित करण्याचा अधिकार हा, [3][राज्य] शासनाच्या मंजुरीच्या आणि पूर्वप्रसिद्धीनंतर नियम करण्याच्या शर्तीच्या अधीन असेल.

(२) कलम ४५४ अन्वये करण्यात आलेले सर्व नियम अंतिमरीत्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत, आणि त्यानंतर ते, जणू या अधिनियमात अधिनियमित करण्यात आले आहेत असे समजून अंमलात येतील.

(३) पोट-कलमे (१) व (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करण्याशिवाय आणखी केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या नियमासाठी आणखी कोणती प्रसिद्धी आवश्यक आहे हे प्रत्येक बाबतीत महानगरपालिकेस ठरवता येईल.

---

१ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ द्वारे " अनुसूचीतील " या शब्दाऐवजी दाखल केला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे " अनुसूची " हा शब्द जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह " अनुसूची-ड " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" हा शब्द दाखल करण्यात आला.

**४५६.** (१) [१] [राज्य] शासनाला कलम ४५७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनाच्या किंवा बाबींच्या संबंधात कलम ४५४ अन्वये नियम करण्याविषयी महानगरपालिकेस कोणत्याही वेळी फर्माविता येईल.

नियम करण्याचा [१] [राज्य] शासनाचा अधिकार.

(२) [१] [राज्य] शासन ठरवील अशा वाजवी कालावधीच्या आत अशा आदेशाचे अनुपालन करण्यात महानगरपालिका कसूर करील तर, [१] [राज्य] शासनाला पूर्वप्रसिद्धीनंतर असे नियम करता येतील आणि अशा रीतीने करण्यात आलेले नियम, अंतिमरीत्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्यावर, जणू ते या अधिनियमात अधिनियमित करण्यात आले आहेत असे समजून अंमलात येतील.

[२] **[४५६-अ** (१) कलम ४५४ आणि ४५६ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, सामान्यत: या अधिनियमाची कोणतीही किंवा सर्व प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असे नियम तयार करता येतील. अशा नियमांमध्ये या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी फी आकारण्याची तरतूद करता येईल :

नियम करण्याचे राज्य शासनाचे विशेष अधिकार.

[३] [परंतु, मतदारांच्या याद्या तयार करण्याशी आणि निवडणुका घेण्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात राज्य निवडणूक आयुक्ताशी विचारविनिमय केल्याशिवाय नियम करण्यात येणार नाहीत.]

(२) या कलमान्वये करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहतील :

[४] [परंतु, राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यास, त्यास, या अधिनियमाखाली, निवडणुका घेण्याच्या प्रयोजनांसाठी या कलमान्वये करावयाच्या नियमांसाठी पूर्वप्रसिद्धीची अट काढून टाकता येईल.]

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल, इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून, यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

**४५७.** विशेषत: आणि कलम ४५४ अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता, त्या अन्वये केलेल्या नियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी व बाबींसाठी तरतूद करता येईल किंवा त्यांचे नियमन करता येईल :—

ज्या बाबींसाठी नियम करता येतील त्या बाबी.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७६ द्वारे कलम ४५६-अ समाविष्ट केले.

३ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५ द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

४ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

(१) **प्रभाग निवडणुका,—**

[१][* * * * * * ]

[२][(ब) नगरपालिका मतदाराची यादी सुस्थितीत ठेवणे, आणि तिच्या प्रती तयार करणे, प्रसिद्ध करणे व त्यांची विक्री करणे ; ]

(क) उमेदवारांचे नामनिर्देशन, नामनिर्देशन पत्रांचा नमुना, अशा नामनिर्देशनास हरकत घेणे आणि उमेदवारांकडून ठेव म्हणून रक्कम घेणे व ती त्यांना परत करणे ;

(ड) प्रभाग निवडणुकांचा दिनांक, वेळ व ठिकाण आणि लढवण्यात येणाऱ्या प्रभाग निवडणुकांची व्यवस्था ;

[३][* * * * * *]

(फ) मतदानाची पद्धती आणि मतपत्रिकेचा नमुना ;

(ग) मतमोजणी, निकाल जाहीर करणे, व समसमान मते पडल्याच्या बाबतीत किंवा एखादा सदस्य एकापेक्षा अधिक प्रभागांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ह) प्रभाग निवडणुकांशी संबंधित असलेल्या कागदपत्रांची अभिरक्षा व ते निकालात काढणे ;

(आय) प्रभाग निवडणुकांसंबंधी अन्य ज्या कोणत्याही बाबीची तरतूद करणे इष्ट वाटत असेल अशी बाब.

**(२) महानगरपालिकेचे व समित्यांचे कामकाज आणि कामकाज चालविण्याची रीत :—**

(अ) महानगरपालिकेच्या, समित्यांच्या व उपसमित्यांच्या सभेची वेळ व ठिकाण ;

(ब) अशा सभांची नोटीस ज्या रीतीने देण्यात येईल ती रीत ;

(क) अशा सभांतील कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेली गणसंख्या ;

(ड) अशा सभांची व्यवस्था ठेवणे व त्या तहकूब करणे आणि त्यातील कामकाज व्यवस्थितपणे चालवण्यासाठी नियमन करणे—यात गैरशिस्त वर्तणुकीबद्दल दोषी असलेल्या सदस्यांचे सदस्यत्व काढून घेणे किंवा निलंबित करणे या गोष्टींचा समावेश होतो ;

(ई) महानगरपालिकेच्या सभांत प्रश्न सादर करणे, विचारणे व त्यांची उत्तरे देणे ;

(फ) विशेष समित्यांची रचना करणे ;

(ग) महानगरपालिकेच्या, समित्यांच्या व उपसमित्यांच्या सभांचे कार्यवृत्त ठेवणे व अशा सभांचे अहवाल सादर करणे ;

---

१ उपखंड (अ) हा, सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० चे कलम १० अन्वये वगळण्यात आला.

२ मूळ उपखंड (ख) ऐवजी हा उपखंड (ख), वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) अन्वये दाखल करण्यात आला.

३ उपखंड (ई) हा, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ९ (क) अन्वये वगळण्यात आला.

(ह) स्थायी समितीचे अधिकार उपसमित्यांकडे प्रत्यायोजित करणे ;

(आय) परिवहन समितीच्या सभेत उपस्थित राहण्यासाठी अशा समितीच्या अध्यक्षास व सदस्यास वाहन खर्च देणे ;

(ज) महानगरपालिकेचे, समितीचे किंवा उपसमितीचे कामकाज, सभा भरवणे व त्यांचे नियमन करणे, चर्चेचे संचालन करणे, कार्यवृत्त पुस्तकांची पाहणी करणे आणि पालिका सदस्यांना किंवा अन्य व्यक्तींना फी घेऊन किंवा अन्यथा, कार्यवृत्तांच्या प्रती पुरवणे या गोष्टींशी संबंधित असेल अशी अन्य कोणतीही बाब.

**(३) नगरपालिका अधिकारी व कर्मचारी—**

(अ) ज्या जागांवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल त्या जागांसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागांवर नेमणूक करण्याची पद्धती ;

(ब) अन्य जागांवर नेमणूक करण्याची पद्धती ;

(क) नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक आणि त्याचा कर्मचारीवर्ग यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(ड) नगरपालिकेच्या अधिकाराखालील ज्या सेवा, प्रकरण ५ च्या प्रयोजनासाठी अत्यावश्यक सेवा म्हणून समजण्यात येतील त्या सेवा ठरवणे.

**(४) संविदा.—**

(अ) ज्या रीतीने संविदा करता येतील ती रीत ;

(ब) संविदाची योग्य रीतीने अंमलबजावणी करण्यासाठी मागावयाची प्रतिभूती ;

(क) निविदा मागवणे, त्यांची तपासणी व त्या स्वीकारणे ;

(ड) महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करताना अनुसरावयाची कार्यपद्धती. ;

**(५) विशेष निधी.**— नगरपालिका निधी किंवा परिवहन निधीमध्येच विशेष निधी स्थापन करणे, ते राखणे आणि त्यांचा विनियोग करणे.

**(६) अर्थसंकल्पीय अंदाज.**—(अ) खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे अर्थसंकल्प शीर्षानुसार वर्गीकरण करणे ;

(ब) अर्थसंकल्पीय अंदाजातील रकमा कमी करण्याची किंवा एका अर्थसंकल्पीय शीर्षाखालून दुसऱ्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली बदली करण्याची किंवा एकाच अर्थसंकल्पीय शीर्षाखाली बदली करण्याची रीत;

**(७) नगरपालिका कर.**—(अ) नगरपालिका करांची आकारणी व वसुली ;

(ब) ज्या शर्तीवर नगरपालिका करांच्या परताव्यास परवानगी देण्यात येईल त्या शर्ती.

(क) कलम १२७, पोट-कलम (२) अन्वये बसवण्यायोग्य कराच्या बाबतीत, कलम १४९, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या बाबी.

**(८) जलनि:सारण.**—(अ) नाल्या बांधणे, सुस्थितीत ठेवणे, त्यात सुधारणा करणे, फेरफार करणे आणि त्या बंद करणे ;

(ब) नाल्यांच्या संदर्भात पाळावयाच्या शर्ती व निर्बंध ;

(क) नगरपालिका नाल्यांशी नाल्या जोडण्याच्या शर्ती ;

(ड) व्यापारी जागांच्या भोगवटादारांना उद्योगधंद्यापासून निर्माण होणारे नि:सृत पाणी नगरपालिका नाल्यांमध्ये ज्या शर्तीवर सोडता येईल त्या शर्ती ;

(ई) कलम १७५ अन्वये हवा खेळती ठेवण्यासाठी वायुवीजनाचा दांडा किंवा नळ उभारताना किंवा बसवताना पाळावयाच्या शर्ती;

(फ) उद्योगधंद्यापासून निर्माण होणाऱ्या नि:सृत पाण्याच्या नमुन्यांचे ज्या रीतीने पृथ:करण करावयाचे ती रीत ;

(ग) संडास, शौचकूप, मुत्र्या, स्नानाच्या जागा आणि धुण्याच्या जागा बांधणे, त्यांचे स्थान ठरविणे आणि त्या सुस्थितीत ठेवणे.

**(९) पाणीपुरवठा.**—इमारतींना किंवा इतर जागांना पाणी पुरवण्याच्या अटी व शर्ती.

**(१०) रस्ते.**—(अ) इमारत आणि खाजगी रस्ते यासाठी जमिनींची आखणी करण्यासंबंधी पुरवावयाची माहिती आणि कागदपत्रे ;

(ब) आकाशचिन्हांची व्याख्या ;

(क) रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि [1][जागांना] क्रमांक देणे.

**(११) इमारतींचे नियमन.**—(अ) इमारती बांधणे, किंवा त्या वाढवणे, त्यात फेरफार करणे किंवा त्यांची दुरुस्ती करणे यासंबंधी आणखी माहिती आणि कागदपत्रे ज्या रीतीने पुरवावयाची ती रीत ;

(ब) इमारतीचे काम सुरू करताना, पार पाडताना आणि पूर्ण करताना आणि कामे पूर्ण झाल्यावर इमारतीचा भोगवटा करताना पाळावयाच्या शर्ती ;

(क) इमारतींचा उपयोग करण्याच्या बाबतीत ज्या निर्बंधान्वये फेरफार करता येतील ते निर्बंध ;

(ड) नव्याने बांधलेल्या इमारतींची पाहणी ;

(ई) ज्या शर्तीवर इमारतीसाठी नगरपालिका निधीतून कर्जे देता येतील त्या शर्ती आणि अशा कर्जासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना ;

**(१२) अग्निशामक पथक.**—आगीच्या प्रसंगी नगरपालिका, अग्निशामक पथकाच्या मुख्य किंवा अन्य अधिकाऱ्याने वापरण्याजोगे अधिकार ;

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (१) अन्वये "इमारतीस" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

**(१३) स्वच्छताविषयक तरतुदी.**—(अ) इमारतीत राहणाऱ्यांच्या संख्येसंबंधी माहिती पुरवणे ;

(ब) जागांमधून घाण, कचरा आणि दूषित व घाणेरड्या वस्तू हलविणे आणि त्यांची विल्हेवाट लावणे ;

(क) जागा आरोग्यकारक स्थितीत ठेवणे ;

(ड) विहिरींच्या बाबतीत मनाई करणे व नियमन करणे या गोष्टी धरून उपद्रव होण्यास प्रतिबंध करणे ;

(ई) झाडे व कुंपणे काढून टाकणे, छाटणे आणि कापणे ;

(फ) शहरात जनावरे पाळण्यासंबंधी नियमन करणे ;

(ग) सार्वजनिक ठिकाणी स्नान करणे आणि कपडे धुणे या गोष्टींचे नियमन करणे ;

(ह) कलम ३१३ ज्यास लागू आहे असा कारखाना, कर्मशाळा, कामाची जागा किंवा बेकरी स्थापन करणे, दुसरीकडे हलवणे किंवा पुन्हा सुरू करणे या गोष्टींसाठी परवानगी मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींनी पुरवावयाची माहिती ;

(आय) कलम ३७६ अन्वये दिलेल्या लायसन्सशिवाय, कोणत्याही जागेत किंवा जागेवर ज्या वस्तू, ठेवता येणार नाहीत अशा वस्तू आणि जे व्यवसाय व व्यवहार करता येणार नाहीत असे व्यवसाय व व्यवहार ;

(ज) कारखाना, कर्मशाळा, कामाची जागा किंवा बेकरी म्हणून वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्यात येत असल्याचा संशय असलेल्या जागेचे, किंवा लायसन्स देण्याजोग्या कोणत्याही व्यवसायासाठी किंवा धंद्यासाठी किंवा कोणत्याही वस्तू साठवून ठेवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्यात येत असल्याचा संशय असलेल्या लायसन्स देण्याजोग्या जागेची पाहणी करणे ;

(के) धूर, वाफ, ज्वाळा आणि अपायकारक वाफा बाहेर सोडण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे नियमन करणे ;

(ल) कोणत्याही यांत्रिक साधनांनी वाजवण्यात येणाऱ्या शिट्ट्या, तुताऱ्या आणि आवाज निर्माण करणारी वाद्ये यांचा उपयोग करण्यास मनाई करणे व त्यांचे नियमन करणे ;

(म) दुर्धर रोगाचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना.

**(१४) बाजार.**— नगरपालिकेच्या किंवा खाजगी बाजारांतील किंवा बाजाराबाहेरील विक्रीचे नियमन करणे.

**(१५) परिवहन उपक्रमाने बसवलेली भाडी व आकार.**— उतारूंची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांत भाडी व आकार यासंबंधी सूचना प्रदर्शित करणे ;

**(१६) जीवनविषयक आकडेवारी.**— मृत्यूच्या कारणासंबंधी द्यावयाच्या प्रमाणपत्राचे नमुने वैद्यक व्यवसायींना पुरवणे.

**(१७) सर्वसाधारण.**— ज्या बाबीची नियमान्वये विहित करून तरतूद केली आहे किंवा करता येईल अशी कोणतीही बाब.

उपविधी कोणत्या प्रयोजनासाठी करता येतील.

**४५८.** महानगरपालिकेस, पुढील बाबींसंबंधी, या अधिनियमांशी किंवा नियमांशी विसंगत नसतील असे उपविधी, वेळोवेळी करता येतील :—

(१) नाल्या, वायुवीजनाचे दांडे, किंवा नळ, मलकुंड्या, संडास, शौचकूप, मुत्र्या, धुण्याच्या जागा ; प्रत्येक वर्णनाची जलनि:सारणाची कामे — मग ती महानगरपालिकेच्या मालकीची असोत किंवा इतर व्यक्तींच्या मालकीची असोत, — नगरपालिकेची जलव्यवस्था केंद्रे, खाजगी जोड-नळ, खाजगी रस्ते आणि सार्वजनिक रस्ते बांधणे, सुस्थितीत ठेवणे, त्यांचे रक्षण करणे, ते पाण्याने धुणे, स्वच्छ करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे या गोष्टींचे या अधिनियमात किंवा नियमांत ज्या तपशिलाची विनिर्देशपूर्वक तरतूद करण्यात आली नसेल अशा कोणत्याही तपशिलाच्या बाबतीत, नियमन करणे ;

(२) पाण्याचा पुरवठा आणि वापर याच्याशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी आणि बाबी यांचे नियमन करणे ;

(३) सार्वजनिक आणि खाजगी गाडीतळ सुस्थितीत ठेवणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्यांचा उपयोग करणे आणि अशा गाडीतळांपैकी जे गाडीतळ महानगरपालिकेच्या मालकीचे असतील त्यांचा उपयोग करण्यासाठी फी बसविणे या गोष्टींचे नियमन करणे ;

(४) कलमे २५३ आणि २५४ अन्वये द्यावयाच्या नोटिसीचे नमुने, त्याबरोबर निरनिराळ्या प्रकारच्या संरचना किंवा बांधकामांच्या बाबतीत पुरवावयाची माहिती, दस्तऐवज आणि नकाशे, ज्या रीतीने व ज्या व्यक्तींनी नोटिसांवर सही करावयाची ती रीत व त्या व्यक्ती, आणि नकाशे, भाग, वर्णने, संरचनात्मक आरेखने किंवा संरचनात्मक परिगणना ज्या रीतीने काढावयाची, द्यावयाची, तयार करावयाची व त्यावर सही करावयाची ती रीत विहित करणे ;

(५) विशिष्ट प्रकारच्या इमारती उभारण्याचे किंवा पुन्हा उभारण्याचे काम आणि कलम २५४ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम ज्या रीतीने, ज्या देखरेखीखाली, ज्या अभिकरणाद्वारे आणि ज्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीन करण्यात येईल ती रीत, ती देखरेख, ते अभिकरण आणि त्या शर्ती व ते निर्बंध यांचे नियमन करणे ;

(६) भिंती, पाया, छप्परे व धुरांडी यांची संरचना, जिन्यांची संख्या, रुंदी व स्थिती, मार्गिका व मार्ग यांची रुंदी आणि इमारतींचे मजले व जिने व लाकडांचे चौकोनी तुकडे, तुळ्या, खांब व स्तंभ यासाठी वापरावयाचे सामान, त्यांचे आकार व मजबूतपणा, इमारतींच्या स्थैर्यासाठी, आगीचा प्रतिबंध करण्यासाठी व आग लागल्यास इमारतीमधील रहिवाशांची सुरक्षितता यासाठी आणि सामान्यत: किंवा संरचनेच्या प्रकारच्या संदर्भात आरोग्याच्या प्रयोजनासाठी, आणि ज्या प्रयोजनासाठी इमारतींचा उपयोग करण्याचे योजले असेल त्यांच्या संबंधात, नियमन करणे ;

(७) इमारतीचे बांधकाम चालू असताना तेथे काम करणाऱ्यांच्या व सर्वसाधारण लोकांच्या सुरक्षिततेसाठी परांची बांधणे ;

(८) हवा खेळती राहण्यासाठी इमारतीच्या आत किंवा बाहेर पुरेशा मोकळ्या जागेची तरतूद करणे व ती सुस्थितीत ठेवणे आणि इमारतींमध्ये योग्य रीतीने हवा खेळती राहण्यासाठी अन्य साधनांची तरतूद करणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

(९) इमारतीत जाण्या-येण्यासाठी योग्य मार्गांची तरतूद करणे व ते सुस्थितीत ठेवणे आणि त्यांवर अतिक्रमण होण्यास प्रतिबंध करणे ;

(१०) घराच्या गल्ल्या व दुरुस्तीसाठी जाण्या-येण्याच्या वाटांची तरतूद करणे व त्या सुस्थितीत ठेवणे ;

(११) ज्या शर्तीवर ढाचेदार इमारत बांधता येईल त्या शर्तीचे नियमन करणे ;

(१२) इमारतीच्या जागा म्हणून जमिनीच्या उपयोगाचे नियमन करणे, अशा जागांचा किमान आकार सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रासाठी विहित करणे आणि विनिर्दिष्ट रस्त्यांवरील किंवा रस्त्यांच्या वर्गांवरील किंवा विनिर्दिष्ट वस्त्यांमधील सर्व किंवा विशिष्ट वर्गांच्या इमारतीसाठी रस्त्यांच्या कडेपासून इमारती मागे हटवण्याबाबत नियमन करणे ;

(१३) संरचनेच्या उंचीचे, सर्वसाधारणपणे किंवा ज्या सामानाने ती बांधण्यात आली असेल त्या सामानाच्या संदर्भात, किंवा ती ज्या रस्त्यावर असेल त्या रस्त्याच्या रुंदीच्या संदर्भात किंवा ती ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्राच्या संदर्भात किंवा ती ज्या प्रयोजनासाठी वापरण्याचे योजले असेल त्या प्रयोजनाच्या संदर्भात, नियमन करणे ;

(१४) इमारतीतील मजल्यांची संख्या आणि त्यांची जमिनीपासून किंवा खालच्या मजल्यापासून उंची या गोष्टीचे नियमन करणे ;

(१५) कलम २६३ अन्वये आवश्यक असलेल्या समाप्ती प्रमाणपत्राचा नमुना विहित करणे आणि ज्या रीतीने व ज्या व्यक्तीने त्यावर सही करावयाची ती रीत व ती व्यक्ती विहित करणे ;

(१६) कलम २६५ अन्वये ज्या कालांतराने, ज्या रीतीने आणि ज्या व्यक्तींनी इमारतीची ठरावीक काळाने पाहणी केली पाहिजे ते कालांतर, ती रीत आणि त्या व्यक्ती यांचे नियमन करणे ;

(१७) महानगरपालिकेकडे निहित असलेल्या व समाजातील गरीब वर्गातील लोकांसाठी योजलेल्या राहण्याच्या जागांची व्यवस्था, परिरक्षण, नियंत्रण व वापर यांचे नियमन करणे ;

(१८) लायसन्सदार सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ, अभियंता, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळ कारागीर यांच्या अर्हता आणि अनुभव विहित करणे ;

(१९) साफसफाई व आरोग्य रक्षण, उंदीर व अन्य प्राणी यांचा नाश करणे, डास, माशा व अन्य कीटक यांविरुद्ध प्रतिबंधक व सुधारात्मक उपाययोजना करणे यासंबंधी, या अधिनियमात ज्या तपशिलाची विनिर्देशपूर्वक तरतूद करण्यात आली नसेल अशा कोणत्याही तपशिलाच्या बाबतीत, नियमन करणे ;

(२०) कलम ३७६ मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी उपयोगात आणलेल्या सर्व जागा आणि तेथे चालवण्यात येणारे सर्व व्यवसाय व निर्मिती यावर नियंत्रण आणि देखरेख ठेवणे आणि अशा कोणत्याही जागेचे बांधकाम, आकार, हवा खेळण्याची सोय, प्रकाशाची व्यवस्था, साफसफाई, जलनि:सारण आणि पाणीपुरवठा या गोष्टी विहित करणे व त्याचे नियमन करणे ;

(२१) दुभत्या जनावरांची पाहणी करणे आणि गोठे व दुग्धशाळा यांचे बांधकाम, आकार, हवा खेळण्याची सोय, प्रकाशाची व्यवस्था, साफसफाई, जलनि:सारण आणि पाणीपुरवठा या गोष्टी विहित करणे व त्यांचे नियमन करणे ;

(२२) दुग्ध भांडारे, दुधाची दुकाने आणि दुग्ध व्यवसायी किंवा दूध विक्रेते दूध ठेवण्यासाठी वापरत असलेली भांडी यांच्या स्वच्छतेविषयी खात्री करून घेणे ;

(२३) शहरातील दूध विक्रीचे नियमन करणे, दूध दूषित होऊ नये यांची खबरदारी घेणे आणि दूषित दुधाच्या विक्रीस प्रतिबंध करणे ;

(२४) कोणत्याही दुभत्या जनावरास कोणताही सांसर्गिक रोग झाला असेल तेव्हा नोटीस देण्यास भाग पाडणे आणि दुभत्या जनावरांचे संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी व दूध दूषित न होण्यासाठी घ्यावयाची खबरदारी विहित करणे ;

(२५) माणसांना संसर्ग होण्याजोग्या रोगाचा जनावरात प्रादुर्भाव झाला असेल तेव्हा करावयाच्या उपाययोजनांचे नियमन करणे आणि अशी उपाययोजना करणे सुकर होईल अशी माहिती पुरविणे ;

(२६) बाजार व कत्तलखाने यांचे आणि ज्यात मानवी आहारासाठी योजिलेल्या वस्तू ठेवण्यात किंवा विकण्यात येत असतील अशा दुकानांची कार्यक्षम रीतीने पाहणी होत असल्याविषयी खात्री करून घेणे ;

(२७) शहरात किंवा शहराबाहेरील नगरपालिका कत्तलखान्यात धंदा चालवणाऱ्या कसायांवर नियंत्रण आणि देखरेख ठेवणे ;

(२८) नगरपालिकेची कोणतीही बाजाराची इमारत, बाजाराची जागा किंवा कत्तलखाने किंवा त्यांचा कोणताही भाग यांच्या वापरांचे नियमन करणे ;

(२९) बाजार आणि कत्तलखाने यांच्या स्वच्छतेसंबंधीच्या स्थितीवर नियंत्रण ठेवणे आणि तिचे नियमन करणे, आणि त्यात क्रौर्याचा वापर करण्यास प्रतिबंध करणे ;

(३०) कलम १४३ अन्वये करापासून सूट दिलेल्या किंवा *मुंबई सार्वजनिक वाहन अधिनियम, १९२० अन्वये लायसन्स देण्यात आलेल्या भाड्याने चालवण्यात येणाऱ्या हातगाड्यांव्यतिरिक्त अन्य हातगाड्यांस लायसन्स देणे, आणि रीतसर लायसन्स देण्यात आले नसेल अशी कोणतीही हातगाडी जप्त करणे व ती अटकावून ठेवणे ; १९२० चा मुंबई ७.

(३१) दुर्धर रोग नसेल अशा कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या सांसर्गिक, साथीच्या किंवा स्थानिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याविषयी नोटीस देण्यास भाग पाडणे आणि अशा कोणत्याही रोगाने पीडित असलेल्या किंवा त्याचा संसर्ग झालेल्या व्यक्तींनी घ्यावयाची खबरदारी विहित करणे ;

(३२) प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे नियमन करणे आणि समाजातील निरनिराळ्या वर्गांच्या धार्मिक रुढींकडे योग्य लक्ष देऊन, प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या सर्व जागा चांगल्या स्थितीत आणि आरोग्यास धोका पोचणार नाही अशा स्थितीत ठेवणे;

---

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ आणि ३, अनुसूची, नोंद १४ नुसार, दिनांक १ मे १९६० पासून, आता, महाराष्ट्र सार्वजनिक वाहन अधिनियम (१९२० चा ७) नुसार संक्षिप्त नावात सुधारणा करण्यात आली आहे.

(३३) जनावरांच्या प्रेतांची कातडी काढण्यासाठी आणि ती कापण्यासाठी असलेल्या कोणत्याही जागेचा उपयोग करण्याचे नियमन करणे ;

(३४) जन्म आणि मृत्यूसंबंधी संपूर्ण व बिनचूक नोंदणीचे काम सुकर करणे व त्याची व्यवस्था करणे ;

(३५) विवाहासंबंधी नोंदणी करणे ;

(३६) महानगरपालिकेकडे निहित असलेली किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेली सार्वजनिक उद्याने, बागा, सार्वजनिक वाहनतळ आणि मोकळ्या जागा यांचे नुकसान किंवा गैरवापर होऊ नये म्हणून संरक्षण करण्याची व्यवस्था करणे, त्यांची व्यवस्था आणि ज्या रीतीने लोकांनी त्यांचा उपयोग करावा त्या रीतीचे नियमन करणे आणि त्यात लोकांनी योग्य वर्तन करण्याबाबत तरतूद करणे ;

(३७) ज्या कोणत्याही रस्त्याचा, पायवाटेचा किंवा जागेचा उपयोग करण्याचा किंवा तिथे वारंवार जाण्याचा लोकांना हक्क असेल त्या रस्त्यालगत, पायवाटेलगत, किंवा जागेलगत असलेल्या जमिनीस किंवा जागेस कुंपण घालण्यासाठी काटेरी तारेचा किंवा इतर सामानाचा उपयोग करण्याचे नियमन करणे ;

(३८) चिंध्या, हाडे किंवा जुने कपडे, बिस्तरा तत्सम अन्य वस्तू यांचा व्यवसाय करण्याचे नियमन करणे आणि अशी कोणतीही वस्तू आयात केल्यावर किंवा तेथून हलवण्यापूर्वी, विकण्यापूर्वी किंवा विक्रीसाठी मांडण्यापूर्वी किंवा कोणत्याही निर्मिती प्रक्रियेत तिचा उपयोग करण्यापूर्वी ती जंतुविरहित करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा यात समावेश होतो ;

(३९) शहरात जत्रा व औद्योगिक प्रदर्शने भरवण्याचे नियमन करणे ;

(४०) शहरातील कोणत्याही विनिर्दिष्ट भागात ज्वालाग्राही पदार्थांचा साठा करण्याचे किंवा विस्तव पेटवण्याचे नियमन करणे व त्यास मनाई करणे ;

(४१) कोणत्याही नगरपालिका प्राधिकरणाने दिलेल्या सेवेच्या आकारांचे नियमन करणे ;

(४२) नगरपालिका रुग्णालये, दवाखाने, अपंगालये, शुश्रुषा गृहे आणि तत्सम संस्था यांत जनतेतील कोणत्याही व्यक्तीने प्रवेश करणे व त्याचा उपयोग करणे यांचे आणि त्या ठिकाणी बसवावयाच्या फीचे नियमन करणे ;

(४३) महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ;

(४४) जनतेतील कोणत्याही व्यक्तींनी नगरपालिका अभिलेखांची पाहणी करणे आणि अशी पाहणी करण्यास परवानगी देण्यापूर्वी आकारावयाची फी, या गोष्टींचे नियमन करणे ;

(४५) नगरपालिका अभिलेखातून प्रमाणित प्रती किंवा उतारे देणे आणि अशा प्रतींसाठी किंवा उताऱ्यांसाठी आकारण्यायोग्य फी या गोष्टींचे नियमन करणे ;

(४६) शहरातील इमारतीत किंवा जमिनीत जे राहत नसतील अशा उक्त इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकांनी या अधिनियमांच्या किंवा नियमांच्या, विनियमांच्या किंवा उपविधींच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी अशा मालकांच्या वतीने काम करण्यासाठी शहरात किंवा शहराजवळ राहणाऱ्या अभिकर्त्यांची नेमणूक करण्याचे नियमन करणे ;

(४७) परिवहन उपक्रमास लागू असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदी आणि कोणत्याही नियमांच्या, उपविधींच्या, विनियमांच्या तरतुदीस, त्याअन्वये दिलेल्या परवान्यास किंवा लायसन्स यांस अधीन राहून, सर्वसाधारणपणे परिवहन उपक्रम चालवण्यासंबंधी बाबी आणि उतारूंच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या वाहनातून किंवा वाहनावरून प्रवास करणे या गोष्टींचे नियमन करणे, आणि विशेषत: उपक्रमांच्या संबंधात नेमलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी रस्त्यांचा वापर करणाऱ्या व्यक्तींना किंवा वाहनांना धोका पोचू नये म्हणून विवेक, सौजन्य व विशेष दक्षता दाखवणे ;

(४८) सर्वसाधारणपणे या अधिनियमाच्या तरतुदींचे व उद्दिष्टांचे पालन करणे.

आयुक्ताने उपविधींचा मसुदा महानगरपालिकेपुढे तिच्या विचारार्थ ठेवणे.

**४५९.** आयुक्ताने, वेळोवेळी, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाच्या पुरस्सरणार्थ जो कोणताही उपविधी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशा उपविधीचा मसुदा महानगरपालिकेपुढे तिच्या विचारार्थ ठेवणे हे, त्याचे कर्तव्य असेल.

प्रस्तावित उपविधीबाबत घेण्यात आलेले आक्षेप महानगरपालिकेने ऐकणे.

**४६०.** जर,—

(अ) कोणताही उपविधी विचारात घेण्याचा महानगरपालिकेचा विचार असल्याची नोटीस, ज्या दिनांकास महानगरपालिका अशा उपविधीवर अंतिमरीत्या निर्णय घेणार असेल त्या दिनांकाच्या पूर्वी निदान सहा आठवडे **राजपत्रात** आणि स्थानिक वृत्तपत्रांमध्ये देण्यात आली नसेल ;

(ब) अशा उपविधींची एक मुद्रित प्रत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात आली नसेल आणि खंड (क) अन्वये दिलेल्या नोटिसीच्या दिनांकापासून निदान एक महिन्यापर्यंत, तिचे अवलोकन करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वाजवी वेळी सार्वजनिक पाहणीसाठी ती विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली नसेल ;

(क) अशा उपविधीच्या मुद्रित प्रती ज्या व्यक्तीस आवश्यक असतील अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त प्रत्येक प्रतीसाठी ठरवील अशी फी देण्यात आल्यावर, त्या देण्यात आल्या नसतील ;

(ड) खंड (क) अन्वये दिलेल्या नोटिशीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, त्यासंबंधी कोणत्याही व्यक्तीकडून जे लेखी आक्षेप घेण्यात येतील आणि ज्या लेखी सूचना करण्यात येतील, ते सर्व आक्षेप आणि सूचना महानगरपालिकेने विचारात घेतल्या नसतील ;

तर महानगरपालिकेने असा कोणताही उपविधी करता कामा नये.

**४६१.** कलम ४५८ अन्वये केलेला कोणताही उपविधी जोपर्यंत [१] [राज्य] शासनाकडून कायम करण्यात येणार नाही तोपर्यंत तो कोणत्याही प्रकारे कायदेशीर असणार नाही. [१] [राज्य] शासनाने उपविधी कायम करणे.

**४६२.** [१] [राज्य] शासनाकडून कोणताही उपविधी कायम करण्यात येईल तेंव्हा, तो **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आला पाहिजे आणि त्यानंतर तो कायद्याप्रमाणे अंमलात येईल. [१] [राज्य] शासनाने कायम केलेले उपविधी राजपत्रात प्रसिद्ध करणे.

**४६३.** (१) आयुक्ताने, वेळोवेळी अंमलात असलेले सर्व उपविधी मुद्रित करून घेतले पाहिजेत आणि त्यांच्या मुद्रित प्रती, ज्या व्यक्तीस त्या आवश्यक असतील अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त प्रत्येक प्रतीसाठी ठरवील अशी फी देण्यात आल्यावर, देण्याची व्यवस्था केली पाहिजे. उपविधींच्या मुद्रित प्रती विक्रीसाठी ठेवणे.

(२) त्या वेळी अंमलात असलेल्या उपविधींच्या मुद्रित प्रती नगरपालिका कार्यालयाच्या ज्या भागात सर्वसाधारण लोकांना जाता येईल अशा भागात, आणि आयुक्तास योग्य वाटेल अशा सार्वजनिक स्थळी, बाजारात, कत्तलखान्यात किंवा लोकांचा संबंध येईल अशा अन्य कामांच्या ठिकाणी किंवा अन्य ठिकाणी सार्वजनिक निरीक्षणासाठी ठेवल्या पाहिजेत, आणि आयुक्ताने, वेळोवेळी, उक्त प्रतीचे नवीकरण केले पाहिजे.

(३) केवळ परिवहन उपक्रमाच्या कामकाजाशीच संबंध असलेल्या उपविधीच्या बाबतीत, या कलमाच्या तरतुदी, जणू "आयुक्त" या शब्दाऐवजी " परिवहन व्यवस्थापक " हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून आणि पोट-कलम (२) अन्वये, लोकांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या परिवहन उपक्रमाच्या प्रत्येक वाहनात संबंधित उपविधी पाहण्यासाठी ठेवण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे असे समजून, लागू होतील.

**४६४.** (१) कोणत्याही उपविधीत फेरबदल करण्यात यावेत किंवा ते पूर्णत: किंवा अंशत: निरसित करण्यात यावेत असे [१] [राज्य] शासनाचे कोणत्याही वेळी मत होईल तर, त्याने, त्याचे असे मत होण्याची कारणे महानगरपालिकेस कळवली पाहिजेत आणि त्यासंबंधी महानगरपालिकेस योग्य वाटेल असे कोणतेही अभिवेदन तिला ज्या मुदतीच्या आत करता येईल अशी वाजवी मुदत विहित केली पाहिजे. [१][राज्य] शासनाला उपविधीमध्ये फेरबदल करता येतील किंवा ते निरसित करता येतील.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(२) असे कोणतेही अभिवेदन मिळाल्यानंतर व त्याचा विचार केल्यानंतर, किंवा दरम्यानच्या काळात, असे कोणतेही अभिवेदन मिळाले नाही तर, विहित मुदत संपल्यानंतर [१] [राज्य] शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी अशा उपविधीत फेरबदल करता येईल किंवा तो पूर्णत: किंवा अंशत: निरसित करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये उपविधीत केलेला फेरबदल किंवा त्याचे केलेले निरसन हे, [१] [राज्य] शासन उक्त अधिसूचनेत निदेश देईल अशा दिनांकापासून, किंवा असा कोणताही दिनांक विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल तर उक्त अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, अंमलात येईल ; मात्र अशा दिनांकापूर्वी केलेल्या, करू दिलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीस ते लागू होणार नाही.

(४) उक्त अधिसूचना स्थानिक वृत्तपत्रांमध्येही प्रसिद्ध करण्यात येईल.

विनियम.

**४६५.** (१) स्थायी समितीस वेळोवेळी, पुढे नमूद केलेल्या गोष्टींबाबत या अधिनियमाशी व नियमांशी विसंगत नसतील असे, परंतु, महानगरपालिकेकडून पारित करण्यात येतील अशा कोणत्याही ठरावाशी अनुरूप असतील असे विनियम करता येतील :—

(अ) कलम ४५७, खंड (३), उप-खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नगरपालिका सेवेतील पदांव्यतिरिक्त अन्य पदांवरील नेमणुकीसाठी आवश्यक असलेल्या अर्हता विहित करणे ;

(ब) ज्या नगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने प्रतिभूती देणे इष्ट आहे असे वाटेल अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम व स्वरूप ठरवणे ;

(क) नगरपालिका अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना रजा देण्यासंबंधी नियमन करणे ;

(ड) उक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्यापैकी विवक्षित व्यक्तींना ते रजेवर असल्यामुळे अनुपस्थित असताना भत्ते देणे प्राधिकृत करणे ;

(ई) उक्त अधिकारी किंवा कर्मचारी रजेवर असल्यामुळे अनुपस्थित असतील तेव्हा, त्यांच्यापैकी कोणाच्याही ऐवजी काम करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना द्यावयाचे पारिश्रमिक ठरवणे ;

(फ) उक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना प्रवास भत्ता किंवा वाहन भत्ता देणे प्राधिकृत करणे ;

(ग) उक्त सर्व अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या कालावधीचे नियमन करणे ;

(ह) उक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही सेवानिवृत्तीनंतर किंवा सेवेतून मुक्त झाल्यावर ज्या शर्तीवर निवृत्तीवेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते मिळतील त्या शर्ती ; आणि त्यांच्यामागे राहिलेल्या विवाहसाथीला किवा मुलांना आणि विवाहसाथीला किंवा मुले नसतील तर, उक्त अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर अवलंबून असलेले आई, वडील, भाऊ आणि बहिणी असल्यास, त्यांना उक्त अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मृत्यूनंतर ज्या शर्तीवर अनुकंपा भत्ते आणि अशी निवृत्तीवेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते यांच्या रकमा मिळतील त्या शर्ती ठरवणे ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(आय) कलम ४० किंवा ४५ अन्वये नेमण्यात आला असेल असा अधिकारी किंवा अशा अधिकाऱ्यांच्या जागी काम करण्यासाठी नेमण्यात आलेला अधिकारी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास सेवेतून काढून टाकताना किंवा बडतर्फ करताना किंवा अन्य रीतीने शिक्षा करताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(ज) उक्त अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना स्थायी समितीच्या मान्यतेने जो कोणताही निवृत्तीवेतन निधी किंवा भविष्यनिर्वाह निधी स्थापन करता येईल त्या निधीसाठी किंवा उक्त अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महानगरपालिका स्थापन करील अशा भविष्यनिर्वाह निधीसाठी तसा निधी असल्यास, विवक्षित विहित दरांनी आणि विवक्षित विहित शर्तींच्या अधीन राहून अंशदान देणे प्राधिकृत करणे ;

(के) उक्त अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही कामावर असताना किंवा रजेवर असताना खाजगी व्यक्तींसाठी किंवा संस्थांसाठी किंवा स्थानिक प्राधिकरण धरून सार्वजनिक संस्थेसाठी किंवा शासनासाठी विनिर्दिष्ट सेवा करण्यासाठी आणि त्याबद्दल पारिश्रमिक स्वीकारण्यासाठी ज्या शर्तीवर आणि कलम ५०, पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, ज्या प्राधिकाऱ्यांकडून परवानगी देण्यात येईल त्या शर्ती आणि ते प्राधिकारी विहित करणे ;

(ल) सर्वसाधारणपणे, उक्त अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अन्य कोणत्याही शर्ती विहित करणे.

(२) तसेच, स्थायी समितीस, वेळोवेळी, पुढे नमूद केलेल्या गोष्टींबाबत या अधिनियमांशी व नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील :—

(अ) माणसांनी राहावयाच्या इमारतींच्या योग्यतेचे प्रमाण ठरवणे ;

(ब) एखाद्या इमारतींच्या किंवा जमिनीच्या संबंधात पुरवलेल्या कोणत्याही सामानाच्या किंवा जोडकामांच्या बाबतीत किंवा अशा इमारतींवर किंवा जमिनींवर किंवा त्यासंबंधात केलेल्या कामाच्या बाबतीत किंवा केलेल्या गोष्टींच्या बाबतीत, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीन्वये आयुक्तास जो खर्च आला असेल आणि जो मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करता येण्याजोगा असेल असा खर्च, सुधारणा खर्च म्हणून जाहीर करण्याचे नियमन करणे ;

(क) महानगरपालिकेच्या महसुलातून खर्च करण्यास मान्यता न देण्याच्या बाबतीत, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचे अधिकार आणि अशा खर्चाबाबत घेतलेल्या आक्षेपांची मिटवणूक करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(ड) कलम २६९ अन्वये अंमलात असलेल्या घोषणापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रस्त्यांवर, रस्त्यांच्या भागात किंवा वस्तीत विशिष्ट उपयोगासाठी योजलेली दुकाने, वखारी, कारखाने, झोपड्या किंवा इमारती बांधण्यासाठी आयुक्ताने परवानगी देण्याबाबत नियमन करणे.

(३) (अ) पोट-कलम (१) अन्वये किंवा पोट-कलम (२), खंड (क) अन्वये केलेला कोणताही विनियम महानगरपालिकेकडून कायम करण्यात येइपर्यंत आणि जर तो पोट-कलम (१), खंड (ज) अन्वये केला असेल तर तो महानगरपालिकेशिवाय आणखी [१][राज्य] शासनाकडून कायम करण्यात येईपर्यंत, अंमलात येता कामा नये.

(ब) [२][पोट-कलम (२), खंड (ग) ] खालील विनियम हे मुख्य लेखापरीक्षकाशी विचारविनियम करून करण्यात आले पाहिजेत आणि महानगरपालिकेने त्यास मंजुरी दिल्याशिवाय ते अंमलात येणार नाहीत.

(४) प्रकरण २० अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या संदर्भात आणि परिवहन निधीतून करावयाच्या खर्चाच्या बाबतीत, पोट-कलम (१) च्या आणि पोट-कलम (२), खंड (ग ) च्या तरतुदी या, जणू " स्थायी समिती " या शब्दाऐवजी " परिवहन समिती " हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून, लागू होतील.

आयुक्ताने स्थायी आदेश देणे.

**४६६.** (१) आयुक्तास, पुढे नमूद केलेल्या गोष्टींबाबत, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि नियमांशी व उपविधीशी सुसंगत असतील असे स्थायी आदेश देता येतील :——

[अ ] (अ) जकात आणि पथकर वसूल करण्यासाठी नाके विहित करणे ;

(ब) जकात आणि पथकर ज्या पद्धतीने व ज्या रीतीने वसूल करण्यात येईल ती पद्धत व ती रीत यांचे नियमन करणे ;

(क) आयात केलेल्या मालाच्या किमतीसंबंधी कोणताही विश्वसनीय पुरावा उपलब्ध नसेल तेव्हा जकातीची परिगणना कशी करावयाची ते ठरवणे ;

(ड) आयात केलेल्या मालावर शिक्के मारणे, तो मोहोरबंद करणे किंवा अन्य रीतीने चिन्हांकित करणे, या गोष्टीचे नियमन करणे ;

(ई) जकातीच्या परताव्यासाठी ज्या रीतीने मागणी करता येईल किंवा तो ज्या रीतीने परत करता येईल ती रीत आणि जकातीचा परतावा मिळण्यासाठी अभिकर्त्यांना ज्या शर्तीवर मान्यता देण्यात येईल त्या शर्ती विहित करणे ;

(फ) तातडीने निर्यात करण्याच्या योजनेला माल ज्या देखरेखाली, ज्या मार्गांनी आणि ज्या वेळेच्या आत शहराबाहेर पाठवण्यात येईल, ती देखरेख, ते मार्ग आणि ती वेळ, आणि अशा रीतीने माल पाठवणाऱ्या व्यक्तींनी भरावयाची फी ठरवणे ;

(ग) जकात वसूल करण्यासंबंधी या अधिनियमात तरतूद करण्यात आली नसेल अशी अन्य कोणतीही बाब ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२ सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[ब] नगरपालिकेस देणे असलेली रक्कम न भरल्याबद्दल जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री ज्या रीतीने करता येईल ती रीत ;

[क] (अ) नगरपालिका अग्निशामक पथकातील व्यक्ती आणि महानगरपालिकेने मान्यता दिलेले अग्निशामक पथकातील कोणतेही स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण, शिस्त आणि चांगली वर्तणूक ;

(ब) आग लागल्याची खबर मिळेल त्या प्रसंगी आगीचा बंब, आगीपासून बचाव करण्याची साधने आणि आवश्यक ती सर्व उपकरणे यांसह त्यांनी आगीच्या ठिकाणी तत्परतेने हजर होणे ;

(क) उक्त पथक सामान्यत: कार्यक्षम स्थितीत ठेवणे ;

(ड) आग लागल्याची खबर ज्या अधिकाऱ्यांना आणि ज्या ठिकाणी कळविली पाहिजे ते अधिकारी आणि ती ठिकाणे, आणि अशी खबर मिळाल्यानंतर करावयाची उपाययोजना ठरवणे ;

(ई) ज्या व्यक्तींनी आग लागल्याची खबर दिली असेल किंवा आग लागल्याच्या प्रसंगी ज्यांनी अग्निशामक पथकासाठी प्रशंसनीय सेवा केली असेल अशा व्यक्तींना उपदाने, बक्षिसे किंवा प्रमाणपत्रे देणे ;

[ड] (अ) कोणत्याही बाजाराच्या इमारतीत, बाजाराच्या जागेत, कत्तलखान्यात किंवा पशुआवारात किंवा त्यात येण्या-जाण्याच्या मार्गात उपद्रव किंवा अडथळा करण्यास प्रतिबंध करणे ;

(ब) कोणताही बाजार, कत्तलखाना किंवा पशुआवार ज्या दिवशी आणि ज्या वेळात भरवता येईल किंवा उपयोगासाठी उघडे ठेवता येईल ते दिवस आणि ती वेळ ठरवणे आणि कोणत्याही खाजगी बाजाराच्या मालकास अशा दिवशी किंवा अशा वेळी तो कायदेशीर कारणाशिवाय बंद ठेवण्यास मनाई करणे ;

(क) बाजारातील प्रत्येक विक्रेत्यास कायदेशीर कारणाशिवाय आपले दुकान, गाळा किंवा उभ्याने माल विकण्याची जागा लोकांसाठी बंद ठेवण्यास, किंवा तो सामान्यपणे ज्या वस्तूंचा व्यापार करत असेल त्या वस्तूंची विक्री करण्याचे नाकारण्यास मनाई करणे ;

(ड) प्रत्येक बाजाराची इमारत, बाजाराची जागा, कत्तलखाना किंवा पशुआवार स्वच्छ आणि योग्य स्थितीत ठेवणे, आणि त्यातील घाण व केरकचरा काढून टाकणे ;

(ई) कोणतीही बाजाराची इमारत, बाजाराची जागा, कत्तलखाना किंवा पशुआवार यात योग्य रीतीने हवा खेळती राहण्याची व्यवस्था करण्यास आणि त्यात पुरेशा पाणीपुरवठ्याची तरतूद करण्यास भाग पाडणे ;

(फ) बाजाराच्या इमारतीतील आणि बाजाराच्या जागांतील गाळ्यामध्ये लोकांना सोयीस्कररीत्या वापरता येतील इतक्या पुरेशा रुंदीचे मार्ग ठेवण्याची तरतूद करण्यास भाग पाडणे ;

(ग) टाकाऊ किंवा अपायकारक म्हणून कत्तल करण्यासाठी नाकारलेली जनावरे ओळखण्याच्या प्रयोजनासाठी त्यांच्यावर खूण करणे किंवा डागचिन्ह करणे ;

(ह) कत्तलखान्यात कत्तल करण्याच्या पद्धतीचे नियमन करणे ;

(आय) निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूंसाठी बाजारांमध्ये वेगवेगळे भाग नेमून देण्यास भाग पाडणे ;

(ज) सामान्यत: बाजार, कत्तलखाने आणि पशुआवारे यांची योग्यरीत्या व्यवस्था ठेवणे आणि त्यांवर नियंत्रण ठेवणे या गोष्टींचे नियमन करणे.

(२) पोट-कलम (१), खंड [क] अन्वये आयुक्ताने दिलेला कोणताही आदेश, तो स्थायी समितीने मान्य केल्याशिवाय आणि [१] [राज्य] शासनाने कायम केल्याशिवाय कायदेशीर असणार नाही, आणि पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये किंवा खंड (ग ), परिच्छेद (ङ) अन्वये आयुक्ताने दिलेला कोणताही आदेश, तो स्थायी समितीने मान्य केल्याशिवाय कायदेशीर असणार नाही.

स्थायी आदेश आणि दुकान भाडे, भाडे इत्यादींचा तक्ता लावणे.

**४६७.** स्थायी आदेशांची मुद्रित प्रत नगरपालिका कार्यालयात ठळक जागी लावण्यात येईल आणि कोणत्याही बाजारात, कत्तलखान्यात किंवा पशु आवारात कलम ३३२ आणि कलम ३३३ अन्वये अंमलात असलेले दुकान-भाडे आणि फी असल्यास, ती फी, यांच्या तक्त्यांची मुद्रित प्रत बाजाराच्या इमारतीत बाजाराच्या जागेत, कत्तलखान्यात किंवा पशुआवारात एखाद्या ठळक जागी लावण्यात येईल.

नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांचा भंग करण्याबद्दल शास्ती.

**४६८.** कलम ४५४ अन्वये नियम करताना किंवा उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश करताना, यथास्थिती, [१] [राज्य] शासनास, महानगरपालिकेस, स्थायी समितीस किंवा आयुक्तास अशी तरतूद करता येईल की, उक्त नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांचा कोणत्याही प्रकारे भंग करण्याबद्दल अपराध्यास, अपराधसिद्धीनंतर,—

(अ) पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाची शिक्षा होईल, आणि भंग करणे चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिल्यांदा भंग केल्याबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आल्यानंतर ज्या दिवशी भंग करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ब) भंग करणे बंद करण्याविषयी आयुक्ताकडून किंवा त्याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर ज्या दिवशी भंग करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(क) असा दंड करण्याशिवाय आणखी, आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर, अपकृती सुधारण्यास भाग पाडता येईल ;

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## प्रकरण तीस

## किरकोळ

### जाहीर नोटिसा आणि जाहिराती

**४६९.** या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, जाहीर नोटीस देता येईल किंवा दिली पाहिजे अशी तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, याविरुद्ध विशेष तरतूद नसेल तर अशी जाहीर नोटीस आयुक्तांच्या सहीने किंवा अशी नोटीस देण्यास कलम ६९ अन्वये अधिकार प्रदान केलेल्या नगरपालिका अधिकाऱ्याच्या सहीने लेखी देण्यात आली पाहिजे आणि ज्या वस्तीला ती परिणामकारक होणार असेल त्या वस्तीतील ठळक सार्वजनिक ठिकाणी तिच्या प्रती लावून किंवा दवंडी पिटवून तिची प्रसिद्धी करून किंवा स्थानिक वृत्तपत्रात तिची जाहिरात देऊन किंवा या साधनांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक साधनांनी आणि आयुक्तास योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही साधनांनी, ती मोठ्या प्रमाणावर माहीत करून देण्यात आली पाहिजे.

जाहीर नोटिसा कोणत्या रीतीने माहिती करून द्यावयाच्या.

**४७०.** या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन नोटीस देण्यात येईल किंवा स्थानिक वृत्तपत्रात अधिसूचना किंवा कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा, व्यवहार्य असल्यास, अशी नोटीस, अधिसूचना किंवा माहिती, शहरात प्रसिद्ध होणाऱ्या किंवा खप असलेल्या अशा निदान दोन वृत्तपत्रांत, महानगरपालिका याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेत किंवा भाषांमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल.

जाहिराती कशा द्यावयाच्या.

**४७१.** (१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश या अन्वये कोणतीही गोष्ट करणे किंवा करण्याचे वगळणे किंवा कोणत्याही गोष्टीचा कायदेशीरपणा हा-

(अ) महानगरपालिकेची, स्थायी समितीची, परिवहन समितीची किंवा अन्य कोणत्याही समितीची,

(ब) आयुक्तांची किंवा परिवहन व्यवस्थापकांची किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याची संमती, मंजुरी, मान्यता, सहमती किंवा शिक्कामोर्तब, घोषणा, मत किंवा समाधान यावर अवलंबून असेल तेव्हा पोट-कलम (२) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे सही केलेला व अशी संमती, मंजुरी, मान्यता, सहमती शिक्कामोर्तब, घोषणा, मत किंवा समाधान, नमूद करणारा किंवा निर्दिष्ट करणारा लेखी दस्तऐवज हा, अशी संमती, मंजुरी, मान्यता, सहमती, शिक्कामोर्तब, घोषणा, मत किंवा समाधान याबद्दलचा पुरेसा पुरावा असेल.

महानगर-पालिका इत्यादीची संमती इत्यादी लेखी दस्तऐवजाने सिद्ध करता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या दस्तऐवजावर--

(अ) संबंधित प्राधिकरण हे महानगरपालिका किंवा स्थायी समिती असेल किंवा परिवहन समितीव्यतिरिक्त अन्य कोणतीही समिती असेल तेव्हा, अशा प्राधिकरणाच्या वतीने नगरपालिका सचिवाने;

(ब) संबंधित प्राधिकरण हे परिवहन समिती असेल तेव्हा, त्या समितीच्या अध्यक्षाने ;

(क) संबंधित प्राधिकारी हा आयुक्त, परिवहन व्यवस्थापक किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी असेल तेव्हा यथास्थिति, आयुक्ताने परिवहन व्यवस्थापकाने किंवा अशा नगरपालिका अधिकाऱ्याने ; सही केली पाहिजे.

## नोटिसा इत्यादी बजावणे

नोटिसा इत्यादी कोणी बजावावयाच्या किंवा सादर करावयाच्या.

**४७२.** या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी या अन्वये कोणत्याही व्यक्तीवर बजावावयाच्या, काढावयाच्या किंवा तिला सादर करावयाच्या किंवा द्यावयाच्या नोटिसा, बिले, अनुसूच्या, समन्स आणि असे अन्य दस्तऐवज हे नगरपालिका अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी किंवा याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अन्य व्यक्तींनी बजावले, काढले, सादर केले किंवा दिले पाहिजेत.

जागांच्या मालकांवर व अन्य व्यक्तींवर बजावणी कशी करावयाची.

**४७३.** या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी या अन्वये कोणत्याही व्यक्तींवर कोणतीही नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा असा अन्य दस्तऐवज बजावणे, काढणे किंवा तिला सादर करणे आवश्यक असेल तेव्हा, ज्या बाबतीत कलम ४७४ मध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, अशा रीतीने नोटीस इत्यादी बजावण्याचे, काढण्याचे किंवा सादर करण्याचे काम पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(अ) अशा व्यक्तीस उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज देऊन किंवा देऊ करून किंवा ;

(ब) अशी व्यक्ती सापडत नसेल तर, उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज शहरातील त्याच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या ठिकाणी ठेवून, किंवा ती नोटीस, इत्यादी त्याच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीस किंवा नोकरास देऊन किंवा देऊ करून किंवा ती त्याच्या धंद्याचे नेहमीचे ठिकाण असल्यास, त्या ठिकाणी ठेवून किंवा अशा ठिकाणी त्याचा एखादा प्रौढ कर्मचारी असल्यास त्याला देऊन किंवा देऊ करून ; किंवा

(क) अशी व्यक्ती शहरात राहत नसेल आणि तिचा इतर ठिकाणचा पत्ता आयुक्तास माहीत असेल तर, उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज उक्त पत्ता लिहिलेल्या पाकिटातून त्या व्यक्तीकडे डाकेने पाठवून ; किंवा

(ड) वर सांगितलेल्या मार्गांपैकी एकही मार्ग उपलब्ध नसेल तर, उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज ज्या इमारतींशी किंवा जमिनींशी संबंधित असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या एखाद्या ठळक भागावर लावून.

जागांच्या मालकांवर किंवा भोगवटादारावर बजावणी कशी करावयाची.

**४७४.** या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी या अन्वये कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर कोणतीही नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज बजावणे, काढणे किंवा त्याला सादर करणे आवश्यक असेल तेव्हा, त्यात मालकाचे किंवा भोगवटादाराचे नाव लिहिण्याची आवश्यकता असणार नाही आणि अशा रीतीने नोटीस इत्यादी बजावण्याचे, काढण्याचे किंवा सादर करण्याचे काम निकट पूर्ववर्ती कलमाच्या तरतुदीनुसार न करता, पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(अ) उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास देऊन किंवा देऊ करून, किंवा मालक किंवा भोगवटादार एकापेक्षा अधिक असतील तर त्यापैकी कोणत्याही एका मालकास किंवा भोगवटादारास देऊन किंवा देऊ करून ; किंवा

(ब) मालक किंवा भोगवटादार, किंवा मालकांपैकी किंवा भोगवटादारांपैकी कोणीही सापडत नसेल तर, उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या किंवा मालकांपैकी किंवा भोगवटादारांपैकी कोणाच्याही कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीस किंवा नोकरास देऊन किंवा देऊ करून ; किंवा

(क) वर सांगितलेल्या मार्गांपैकी एकही मार्ग उपलब्ध नसेल तर, उक्त नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज ज्या इमारतीशी किंवा जमिनीशी संबंधित असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या एखाद्या ठळक भागावर लावून.

कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ ही दंडाधिकाऱ्याने काढलेल्या समन्सला लागू न होणे.

**४७५.** कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ मधील कोणतीही गोष्ट दंडाधिकाऱ्याने या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही समन्सला लागू होणार नाही.

नोटिसा इत्यादीवर सहीचा शिक्का मारता येईल.

**४७६.** (१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याअन्वये ज्यावर आयुक्तांची किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याची सही असणे आवश्यक आहे अशा प्रत्येक लायसन्सवर, लेखी परवानगीवर, नोटिशीवर, बिलावर, अनुसूचीवर, समन्सवर किंवा अन्य दस्तऐवजावर आयुक्तांच्या किंवा यथास्थिति अशा नगरपालिका अधिकाऱ्याच्या प्रतिरूप सहीचा शिक्का असेल तर त्यावर योग्यरीतीने सही करण्यात आली आहे असे मानले जाईल.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये नगरपालिका निधीवर किंवा परिवहन निधीवर काढलेल्या धनादेशाच्या बाबतीत किंवा कोणत्याही संविदापत्राच्या बाबतीत लागू होते असे मानले जाणार नाही.

जागेच्या मालकीसंबंधी माहिती मागवण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**४७७.** (१) आयुक्तास, कोणतीही नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा असा अन्य दस्तऐवज कोणत्याही व्यक्तीवर बजावण्याचे, काढण्याचे, तिला सादर करण्याचे किंवा देण्याचे काम सुकर होण्यासाठी कोणत्याही जागेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या मालकास किंवा भोगवटादारास, लेखी नोटिशीद्वारे, आयुक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत, त्या जागेत असलेल्या आपल्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्यात हितसंबंध असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचे नाव व पत्ता–मग असा हितसंबंध पूर्ण मालकी असणारा, गहाणदार, पट्टेदार म्हणून असो किंवा अन्यथा असो–जेथवर त्यास असे नाव व पत्ता माहीत असेल तेथवर, लेखी नमूद करण्यास फर्मावता येईल.

(२) आयुक्ताने, पोट-कलम (१) अनुसार त्यास कोणतीही माहिती देण्यास फर्मावलेली कोणतीही व्यक्ती त्याचे अनुपालन करण्यास आणि तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी माहिती देण्यास बांधलेली असेल.

**अनधिकृत बांधकामे**

[1][पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या] लेखी परवानगीशिवाय केलेले बांधकाम किंवा गोष्ट अनधिकृत मानणे.

**४७८.** (१) या अधिनियमाच्या किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी यांच्या कोणत्याही तरतुदीअन्वये ज्यास [1][पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या] लेखी परवानगीची आवश्यकता आहे असे कोणतेही बांधकाम किंवा गोष्ट कोणत्याही व्यक्तीने अशी लेखी परवानगी मिळवल्याशिवाय केली असेल किंवा अशी लेखी परवानगी [1][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] कोणत्याही कारणासाठी त्यानंतर तहकूब किंवा रद्द केली असेल तर असे बांधकाम किंवा गोष्ट अनधिकृत आहे असे मानले जाईल आणि या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीच्या अधीन राहून, [1][पदनिर्देशित अधिकाऱ्यास] कोणत्याही वेळी लेखी नोटिशीद्वारे अशारीतीने ते काम किंवा ती गोष्ट पार पाडणाऱ्या किंवा करणाऱ्या व्यक्तीस असे काम किंवा गोष्ट यथास्थिति, काढून टाकण्यास, पाडून टाकण्यास किंवा नष्ट करण्यास फर्मावता येईल. असे काम पार पाडणारी किंवा अशी गोष्ट करणारी व्यक्ती ही अशा नोटिशीच्या वेळी मालक नसेल तर, अशी नोटीस देण्याच्या वेळी जो मालक असेल तो, [1][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] मागणी केलेल्या गोष्टी पार पाडण्यास जबाबदार असेल.

(२) अशा लेखी नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, त्यात मागणी केलेल्या गोष्टी यथास्थिति, त्या व्यक्तीने किंवा मालकाने पार पाडल्या नसतील तर [1][पदनिर्देशित अधिकाऱ्यास] असे काम काढून टाकता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल किंवा अशी गोष्ट नष्ट करता येईल आणि त्याचा खर्च, यथास्थिति, अशा व्यक्तीला किंवा मालकाला द्यावा लागेल.

**कामे इत्यादी पार पाडण्यासंबंधी आदेशाची अंमलबजावणी**

कोणत्याही व्यक्तीस जी कामे इत्यादी पार पाडण्यास फर्माविले असेल अशी कामे विवक्षित बाबतीत आयुक्तास अशा व्यक्तीच्या खर्चाने पार पाडता येतील.

**४७९.** (१) या अधिनियमाच्या आणि नियमांच्या, विनियमांच्या, उपविधीच्या व स्थायी आदेशाच्या तरतुदींच्या अधीन राहून या अधिनियमांच्या किंवा कोणत्याही नियमांच्या, विनियमांच्या, उपविधीच्या किंवा स्थायी आदेशाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये आयुक्ताने किंवा याबाबत रीतसर अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने लेखी नोटिशीद्वारे कोणतीही मागणी केली असेल किंवा आदेश दिला असेल तेव्हा, अशा नोटिशीत अशी मागणी किंवा आदेश अंमलात आणण्यासाठी वाजवी कालावधी विहित केला पाहिजे आणि अशारीतीने विहित केलेल्या कालावधीच्या आत अशा मागणीचे किंवा आदेशाचे किंवा अशा मागणीच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही भागाचे अनुपालन करण्यात आले नाही तर, आयुक्तास, अशारीतीने केलेली मागणी किंवा दिलेला आदेश योग्य रीतीने अंमलात आणण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असेल अशी उपाययोजना करता येईल किंवा असे काम पार पाडण्याची किंवा अशी गोष्ट करण्याची व्यवस्था करता येईल ; आणि या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर, त्याचा खर्च अशा व्यक्तीला किंवा ज्या व्यक्तीच्या नावाने अशी मागणी करण्यात आली असेल किंवा आदेश देण्यात आला असेल अशा व्यक्तींपैकी कोणत्याही एका व्यक्तीला द्यावा लागेल.

(२) आयुक्तास, या कलमान्वये कोणतीही उपाययोजना करता येईल, कोणतेही काम पार पाडता येईल किंवा कोणतीही गोष्ट करवता येईल–मग ज्या व्यक्तीने मागणीचे किंवा आदेशाचे अनुपालन करण्यात

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १८ द्वारे "आयुक्त" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

कसूर केली आहे ती व्यक्ती शिक्षेस पात्र असो किंवा नसो किंवा अशारीतीने कसूर केल्याबद्दल तिच्यावर खटला भरण्यात आला असो किंवा नसो किंवा तिला कोणतीही शिक्षा देण्यात आली असो किंवा नसो.

**४८०.** या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या, विनियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदींन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीने कोणतीही सामग्री किंवा जोडकाम पुरवणे आवश्यक असेल अशा व्यक्तीने लेखी विनंती केल्यावर आयुक्तांस, अशा व्यक्तीच्या वतीने आवश्यक सामग्री किंवा जोडकाम पुरवता येईल किंवा आवश्यक काम करवून घेता येईल : सामग्री पुरवणे.

परंतु, कलम ४४१ किंवा ४४२ च्या तरतुदी लागू होणार नाहीत, तेव्हा आयुक्तांच्या मते उक्त सामग्रीच्या जोडकामाचा किंवा कामाचा खर्च भागवण्यासाठी पुरेशी होईल इतकी रक्कम उक्त व्यक्तीला पहिल्या प्रथम अनामत म्हणून ठेवावी लागेल.

**न्यायालयीन कार्यवाही**

**४८१.** (१) आयुक्तास पुढील गोष्टी करता येतील -- दिवाणी व फौजदारी कार्यवाही दाखल करणे इत्यादी संबंधी तरतुदी आणि कायदेविषयक सल्ला घेणे.

(अ) ज्या कोणत्याही व्यक्तीवर--

(एक) हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरु द्ध कोणताही अपराध केल्याबद्दल ;

(दोन) ज्या कोणत्याही अपराधामुळे महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेस किंवा हितसंबंधास किंवा या अधिनियमाची योग्य रीतीने अंमलबजावणी होण्यास बाध येत असेल किंवा बाध येण्याचा संभव असेल असा अपराध केल्याबद्दल ;

(तीन) कोणत्याही प्रकारचा उपद्रव केल्याबद्दल ;

आरोप ठेवण्यात आला असेल त्या व्यक्तींविरुद्ध कार्यवाही करणे किंवा ती मागे घेणे ;

(ब) हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध करण्यास आलेला जो कोणताही अपराध त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये कायदेशीररीत्या आपसात मिटवता येत असेल असा अपराध आपसात मिटवणे ;

(क) कलम १६ अन्वये सादर करण्यात आलेल्या कोणत्याही निवडणूक अर्जाचा बचाव करणे ;

(ड) कलम ४०६ अन्वये करयोग्य मूल्य [१][किंवा यथास्थिती, भांडवली मूल्य] किंवा कर याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलाचा बचाव करणे, ते दाखल करून घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(ई) खर्च किंवा भरपाई याबद्दल जी रक्कम महानगरपालिकेस येणे आहे असा दावा करण्यात आला असेल त्या रकमेच्या वसुलीसाठी कलम ४०२, पोट-कलम (२), कलम ४३९, पोट-कलमे (३) व (४) आणि कलमे ३९१ व ४१६ अन्वये कार्यवाही करणे, ती मागे घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(फ) आयुक्ताने कोणत्याही व्यक्तीबरोबर केलेल्या संविदेअन्वये देण्यायोग्य शास्तीच्या बाबतीत अशा व्यक्तीविरुद्ध पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा रकमेसाठी जो कोणताही दावा करण्यात आला असेल तो दावा किंवा पाचशे रुपयांपेक्षा अधिक असेल अशा रकमेसाठी जो कोणताही दावा करण्यात आला असेल तो दावा स्थायी समितीच्या मान्यतेने, मागे घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २० द्वारे हा मजकूर दाखल केला.

(ग) महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्ताविरुद्ध किंवा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध त्यांनी अनुक्रमे त्यांच्या पदीय नात्याने कोणतीही गोष्ट केल्याबद्दल किंवा करण्याचे वर्जिल्याबद्दल जो कोणताही वाद किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात आली असेल अशा वादाचा किंवा न्यायालयीन कार्यवाहीचा बचाव करणे ;

(ह) स्थायी समितीच्या मान्यतेने, वर सांगितल्याप्रमाणे कोणतीही गोष्ट केल्याबद्दल किंवा करण्याचे वर्जिल्याबद्दल महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्ताविरुद्ध किंवा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध करण्यात आलेला कोणताही दावा, वाद किंवा न्यायालयीन कार्यवाही दाखल करून घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(आय) तशाच प्रकारच्या मान्यतेने, कोणताही वाद दाखल करणे किंवा चालवणे, किंवा महानगरपालिकेच्या किंवा आयुक्ताच्या नावाने दाखल करण्यात आलेल्या किंवा करण्यात आलेल्या, खंड (च) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वर्णनाच्या दाव्याव्यतिरिक्त अन्य कोणताही वाद किंवा कोणताही दावा मागे घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(ज) या पोट-कलमाच्या पूर्वगामी खंडामध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा कोणतेही नगरपालिका प्राधिकरण किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यामध्ये निहित असलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यासाठी किंवा त्यांच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी जो कायदेविषयक सल्ला आणि साहाय्य मिळवणे त्यास वेळोवेळी आवश्यक किंवा इष्ट वाटेल किंवा जो कायदेविषयक सल्ला आणि साहाय्य त्याने मिळवावे अशी महानगरपालिकेची किंवा स्थायी समितीची इच्छा असेल असा कायदेविषयक सल्ला आणि साहाय्य मिळवणे आणि त्याबद्दल पैसे देणे :

परंतु, आयुक्तास, खंड (ग) अन्वये केलेल्या कोणत्याही वादाचा किंवा न्यायालयीन कार्यवाहीचा, त्याबाबत पहिल्याप्रथम कायदेविषयक सल्ला घेतल्याशिवाय, बचाव करता येणार नाही, आणि जो कोणताही वाद दाखल केला पाहिजे आणि चालवला पाहिजे असे महानगरपालिका ठरवील असा वाद त्याने दाखल केला पाहिजे आणि चालवला पाहिजे.

(२) परिवहन उपक्रम संपादन करणे, त्यात वाढ करणे, त्याचे व्यवस्थापन करणे, तो चालवणे आणि तो सुस्थितीत ठेवणे यामधून उद्‌भवणाऱ्या न्यायालयीन कार्यवाहीच्या संबंधात पोट-कलम (१) च्या तरतुदी या जणू, अनुक्रमे आयुक्त या शब्दाऐवजी परिवहन व्यवस्थापक हे शब्द आणि स्थायी समिती या शब्दांऐवजी परिवहन समिती हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून लागू होतील.

## सर्वसाधारण

पालिका सदस्य इत्यादी लोकसेवक असल्याचे मानणे.

**४८२.** (१) आयुक्त व परिवहन व्यवस्थापक आणि प्रत्येक पालिका सदस्य व पालिका सदस्य नसलेला परिवहन समितीचा प्रत्येक सदस्य आणि या अधिनियमान्वये नेमलेला प्रत्येक नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी, आणि कोणताही नगरपालिका कर वसूल करण्यासाठी असलेला प्रत्येक कंत्राटदार किंवा अभिकर्ता आणि अशा कोणत्याही कंत्राटदाराने किंवा अभिकर्त्याने कामावर लावलेला प्रत्येक नोकर किंवा अन्य व्यक्ती ही, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे मानले जाईल. १८६० चा ४५.

१८६० चा (२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनांसाठी, भारतीय दंड संहिता, कलम १६१ मधील वैध पारिश्रमिक
४५. च्या व्याख्येतील शासन या शब्दात महानगरपालिकेचा समावेश होतो असे मानले जाईल.

**४८३.** (१) शहरात अधिकारिता असलेला जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी स्वत: व आपल्या हाताखालील व्यक्तींमार्फत, या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यासाठी व त्या अंमलात आणण्यासाठी आणि शहरात सुव्यवस्था राखण्यासाठी आयुक्ताशी, शक्य होईल तितके, सहकार्य केले पाहिजे. पोलीस इत्यादींचे सहकार्य.

(२) शहरातील प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने या अधिनियमाविरुद्ध किंवा कोणताही नियम, विनियम किंवा उपविधी याविरुद्ध कोणताही अपराध करण्याच्या किंवा केल्याच्या कारस्थानाची जी कोणतीही माहिती त्यास मिळाली असेल ती माहिती विलंब न करता योग्य त्या नगरपलिका अधिकाऱ्यास कळवणे, आणि आयुक्ताने किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, या अधिनियमान्वये आयुक्तामध्ये किंवा अधिकाऱ्यामध्ये किंवा कर्मचाऱ्यामध्ये निहित असलेल्या कोणत्याही अधिकाराचा कायदेशीररित्या वापर करण्यासाठी त्याच्या साहाय्याची वाजवीरित्या मागणी केली असता त्यास साहाय्य करणे हे त्याचे कर्तव्य असेल.

१८७९ चा **४८४.** महानगरपलिकेमध्ये निहित असलेल्या किंवा तिने अन्यथा धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या
मुंबई ५. बाबतीत तिला कोणत्याही व्यक्तीकडून भाड्याबद्दल येणे असलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी मुंबई जमीन महसूल संहिता, *१८७९ कलमे ८६ व ८७ च्या अर्थानुसार महानगरपालिका ही अशा जमिनीची वरिष्ठ धारक आहे आणि अशी प्रत्येक व्यक्ती ही त्या जमिनीची कनिष्ठ धारक आहे असे मानले जाईल आणि वरिष्ठ धारक म्हणून महानगरपालिकेस अशा प्रत्येक रकमेच्या वसुलीसाठी, उक्त कलमान्वये कनिष्ठ धारकाने वरिष्ठ धारकास देय असलेल्या जमीन महसुलाच्या भाड्याच्या वसुलीसाठी वरिष्ठ धारकास जे साहाय्य मिळण्याचा हक्क आहे, असे सर्व साहाय्य मिळवण्याचा हक्क असेल. जमिनीचे भाडे वसूल करण्यासाठी साहाय्य.

**४८५.** (१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम, उपविधी किंवा स्थायी आदेश या अन्वये केलेल्या कोणत्याही आकारणीत किंवा कोणत्याही अटकावणीत किंवा केलेल्या जप्तीत किंवा काढलेल्या कोणत्याही नोटिशीत, बिलात, अनुसूचीत, समन्समध्ये किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही उपचारदोष, लेखन प्रमाद, वर्जन किंवा अन्य दोष असल्यास ते कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर, दुरुस्त करता येतील. आकारणी इत्यादीतील उपचारदोष व चुका यामुळे अशी आकारणी इत्यादी बेकायदेशीर ठरते असे मानले जाणार नाही.

(२) या अधिनियमाच्या आणि नियमांच्या, विनियमांच्या, उपविधींच्या व स्थायी आदेशांच्या तरतुदींचे तत्त्वार्थाने व वास्तविकरित्या अनुपालन करण्यात आले असेल तर अशा कोणत्याही उपचारदोषामुळे, लेखन प्रमादामुळे, वर्जनामुळे किंवा अन्य दोषामुळे उक्त आकारणी, अटकावणी, जप्ती, नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा अन्य दस्तऐवज विधिअग्राह्य किंवा बेकायदेशीर होतो असे मानले जाणार नाही परंतु, अशा कोणत्याही उपचारदोषामुळे, लेखन प्रमादामुळे, वर्जनामुळे किंवा अन्य दोषामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही विशेष नुकसान झाले असेल त्या व्यक्तीस, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयात वाद दाखल करून, त्याबद्दल भरपाई वसूल करण्याचा हक्क असेल.

---

* आता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) पाहा.

सद्भावना-पूर्वक केलेल्या गोष्टीबद्दल संरक्षण.

**४८६.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा आशय किंवा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही पालिका सदस्यांविरूद्ध किंवा पालिका सदस्य नसलेल्या परिवहन समितीच्या कोणत्याही सदस्याविरूद्ध किंवा आयुक्त, परिवहन व्यवस्थापक किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध किंवा महानगरपालिकेच्या किंवा या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही समितीच्या, आयुक्ताच्या, परिवहन व्यवस्थापकाच्या, कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या, किंवा दंडाधिकाऱ्याच्या निदेशान्वये व तद्नुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही करता येणार नाही.

या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तीचे दाव्यापासून संरक्षण.

**४८७.** (१) या अधिनियमास अनुसरून किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करताना किंवा, अंमलबजावणी करण्याचा उद्देश असताना केलेल्या किंवा करण्याचा आशय असलेल्या कोणत्याही कृत्याच्या बाबतीत किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करतानाच्या अभिकथित हयगयीच्या किंवा कसुरीच्या बाबतीत, महानगरपालिकेविरूद्ध किंवा आयुक्ताविरूद्ध किंवा परिवहन व्यवस्थापकाविरूद्ध किंवा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याविरूद्ध किंवा कर्मचाऱ्याविरूद्ध--

(अ) कारवाईचे कारण, आणि इच्छुक वादीचे आणि त्याचा कोणताही न्यायप्रतिनिधी, अधिवक्ता, वकील किंवा अभिकर्ता असल्यास, त्याचे नाव व राहण्याचे ठिकाण शक्य तेवढ्या बिनचूकपणे नमूद करण्यात आलेली लेखी नोटीस, अशा दाव्याच्या प्रयोजनासाठी, महानगरपालिकेच्या बाबतीत, नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात आल्यानंतर, आणि आयुक्ताच्या किंवा परिवहन व्यवस्थापकाच्या किंवा नगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत अशी नोटीस त्यास देण्यात आल्यानंतर किंवा त्याच्या कार्यालयात किंवा राहण्याच्या ठिकाणी ठेवण्यात आल्यानंतर एक महिना संपेपर्यंत, किंवा

(ब) कारवाईचे कारण घडल्यानंतर लगेच सहा महिन्याच्या आत उक्त दावा सुरू करण्यात आला नसेल तर, कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

(२) अशा कोणत्याही दाव्याच्या न्यायचौकशीच्या वेळी--

(अ) वादीने वर सांगितल्याप्रमाणे दिलेल्या किंवा ठेवलेल्या नोटिशीत कारवाईचे जे कारण नमूद केले असेल त्या कारणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासंबंधी पुरावा सादर करण्याची त्यास परवानगी देण्यात येणार नाही ;

(ब) नुकसानभरपाईसाठी मागणी केली असेल तेव्हा, दावा दाखल करण्यापूर्वी पुरेसा प्रतितोष देऊ करण्यात आला असेल तर, किंवा दावा दाखल करण्यात आल्यानंतर न्यायालयात खर्चासह पुरेशी रक्कम भरण्यात आली असेल तर असा दावा फेटाळण्यात येईल.

(३) अशा कोणत्याही दाव्यात प्रतिवादी हा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी असेल तेव्हा, दाव्यात किंवा दाव्याचा परिणाम म्हणून त्याने देय असलेली कोणतीही रक्कम किंवा कोणत्याही रकमेचा कोणताही भाग--मग तो दावा परिव्ययाच्या, आकाराच्या, खर्चाच्या, नुकसानभरपाईच्या संबंधात असो किंवा अन्यथा असो--स्थायी समितीच्या किंवा परिवहन समितीच्या पूर्वमंजुरीने, यथास्थिति, नगरपालिका निधीतून किंवा परिवहन निधीतून देता येईल.

१८७९ चा मुंबई ५. **४८८.** मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, * कलमे ४८, ६५, ६६ व ६७ च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी-- मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या विवक्षित तरतुदींच्या बाबतीत व्यावृत्ती.

(१) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कोणत्याही जमिनीचा ज्या कोणत्याही प्रयोजनासाठी कायदेशीररित्या उपयोग करता येईल त्या प्रयोजनासाठी असा उपयोग करण्यास, उक्त, संहितेअन्वये किंवा तद्नुसार देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मनाई करता येणार नाही ;

(२) शेतीच्या प्रयोजनासाठी आकारणी करण्यात आलेल्या किंवा धारण करण्यात आलेल्या जमिनीच्या कोणत्याही भोगवटादाराने, शेतीशी संबंधित नसलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी आपल्या धारण जमिनीचा किंवा तिच्या भागाचा उपयोग करण्यासाठी, फेरफार केलेली आकारणी आणि दंड असल्यास, तो दंड भरण्याच्या शर्तीच्या अधीन राहून, उक्त संहितेच्या कलम ६५ अन्वये अशा भोगवटादारास परवानगीचा हक्क मिळण्यासाठी त्याने या अधिनियमाच्या आणि नियमांच्या, विनियमांच्या आणि उपविधींच्या सर्व आवश्यक बाबींचे अनुपालन केले आहे असे आयुक्तांची खात्री होईल अशा रीतीने दाखवून दिले की ते पुरेसे होईल.

**४८९.** (१) जी कोणतीही व्यक्ती कलम २, खंड (४५), उप-खंड (क), परिच्छेद (एक), (दोन) किंवा (तीन) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही नात्याने कोणत्याही जागेचे भाडे घेत असेल ती व्यक्ती, जी कोणतीही गोष्ट या अधिनिमान्वये मालकाने करणे आवश्यक आहे अशी गोष्ट करण्यास जबाबदार असणार नाही ; मात्र त्याबद्दल पैसे देण्यासाठी तिच्याजवळ मालकाचा किंवा मालकास येणे असलेला पुरेसा पैसा असेल, किंवा तिच्या स्वत:च्या अयोग्य कृत्याच्या किंवा कसुरीच्या अभावी तिच्याजवळ असा पैसा राहिला असेल तर अशा बाबतीत, उक्त गोष्ट करण्यास ती जबाबदार असेल. मालकाच्या, अभिकर्त्याच्या किंवा विश्वस्ताच्या जबाबदारीची मर्यादा.

(२) कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (१) खालील अनुतोष मिळण्याचा हक्क प्राप्त करून देणारी वस्तुस्थिती सिद्ध करण्याचा भार अशा व्यक्तीवर राहील.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीने अनुतोष मिळविला असेल तेव्हा, आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, अशा व्यक्तीस असा अनुतोष मिळाला नसता तर जी जबाबदारी पार पाडणे तिला भाग पडले असते अशी कोणतीही जबाबदारी पार पाडण्यासाठी, मालकाच्या वतीने किंवा मालकाच्या उपयोगासाठी जो पैसा पहिल्यांदा तिच्या हाती येईल त्याचा विनियोग करण्यास तिला फर्मावता येईल, आणि जी कोणतीही व्यक्ती अशा नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर करील ती व्यक्ती अशी जबाबदारी पार पाडण्यास व्यक्तिश: जबाबदार आहे असे मानले जाईल.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, आयुक्तास आवश्यक ती कामे पार पाडण्यास आणि प्रत्यक्ष मालकाकडून खर्च वसूल करण्यास प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

---

* आता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) पहा.

## प्रकरण एकतीस

## निरसन आणि सुधारणा

विवक्षित अधिनियम शहरास लागू होण्याचे बंद होणे.

**४९०.** यात यापुढे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ मुंबई नगरपालिका बरो अधिनियम, १९२५ आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ हे शहरात समाविष्ट असलेल्या कोणत्याही भागास लागू होण्याचे बंद होईल.

१९०१ चा मुंबई २. १९२५ चा मुंबई १८. १९३३ चा मुंबई ६.

विवक्षित अधि-नियमितीत सुधारणा.

**४९१.** परिशिष्ट तीन च्या दुसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमातील त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येतील.

निरसन.

**४९२.** पुणे शहर आणि पुणे उपनगर नगरपालिका बरो (नगरपालिका आयुक्तांची नेमणूक करण्याबाबत) अधिनियम, १९४८ हा याद्वारे निरसित करण्यात आला आहे.

१९४८ चा मुंबई ८०.

संक्रमण-कालीन तरतुदी.

**४९३.** परिशिष्ट चार च्या तरतुदी या महानगरपालिकेची रचना करण्याच्या बाबतीत आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अन्य बाबतीत लागू होतील.

---

## परिशिष्ट एक

(कलम २८२ पहा)

### सुधारणेच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यासंबंधी नियमन करणाऱ्या भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदी

भाग एक.— प्रारंभिक ;— कलम ३, खंड (ङ) व (च) वगळून.

भाग दोन.— संपादन करणे—कलम ४ चे पोट-कलम (१), कलम ६, आणि कलम १७, पोट-कलम (२) वगळून.

भाग तीन.— न्यायालयाकडे बाब निर्णयासाठी पाठविणे आणि त्यावरील कार्यपद्धती—कलम २३, पोट-कलम (२), आणि कलम २४, खंड (६) व (७) वगळून.

भाग चार.— भरपाईचे संविभाजन. भाग पाच—प्रदान.

भाग सहा.— जमिनीचा तात्पुरता भोगवटा करणे.

भाग सात.— किरकोळ.

---

## परिशिष्ट दोन

(कलम ३९२ पहा)

## शास्तींचा तक्ता

### भाग एक

| कलमे, पोट-कलमे व खंड | | लादता येईल असा दंड |
|---|---|---|
| १ | | २ |
| ३०९ (२), ३११ (ङ), ३११ (च), ३११ (छ) | .. | दहा रुपये |
| १९७ (२), २९५, ३३४ (२), ३७३ (१), ३७४, ३७५, ३७६ (६) | .. | वीस रुपये |
| १७२, १९६ (२) परंतुक, २०८, २२७ (३), २२८, २३३ (१), २३६ (२), २३८ (२), २४०, २४६, २९७, ३३० (१), ३३३, ३७७ (१), ३८१, ३८४, ३८५, ३८६ (५). | .. | पन्नास रुपये |
| ६०, १०८ (२), १४५ (२), १६३, १६४, १६५, १६८ (१) (ख), १६९ (ख), १७४, १८४, १८६, १८७ (१), १८७ (२), १९९, २००, २१२ (२), २२३, २२७ (३), २२९ (१), २३० (१), २३२, २३९ (१), २४१ (१), २४३ (१), २४४ (१), २४४ (३), २४८ (१), २५१, २६५ (४), २६६, २९८ (५), ३०८, ३१८, ३१९, ३२६, ३३५ (१), ३६६, ३६७, ३६८, ३६९, ३७९, ३८०, ३८२. | .. | शंभर रुपये |
| १६१, १७८ (१), १७९, १९५ (१), १९८, २२६ (१), २२६ (२), २२६ (४), २४२, २४७ (१), २६५ (२), २६५ (३), २६७ (१), २६८ (४), २९९ (१), ३०७ (१), ३०७ (२), ३७८ (१), ३८३, ४१७ (३). | .. | दोनशे रुपये |
| १६० (२), १७१ (१), २२१ (१), २५७, २६१ (१), २६३, २६४ (१), २६४ (२), २९८ (२), ३०१ (१), ३०४ (३), ३२२, ३२५ (१). ३७६ (१). | .. | पाचशे रुपये |
| २१० (४), २६२, २६९ (७), ३१३, ३१४, ३३१ (२) | .. | एक हजार रुपये |

परिशिष्ट दोन--चालू

**भाग दोन**

| कलमे, पोट-कलमे व खंड<br>१ | लादता येईल असा प्रत्येक दिवसाबद्दल दंड<br>२ |
|---|---|
| २२७ (३), २२८, २९७, ३०८, ३७५, ३७६ (६), ३७९, ३८१. .. | पाच रुपये |
| १६१, १६३, १६४, १६५, १६८ (१) (ख), १६९ (ख), १७२, १७४, १८४, १८६, १८७ (१), १८७ (२), १९५ (१), २००, २२३, २२६ (२), २२६ (४), २२९ (१), २३० (१), २३२, २४१ (१), २४४ (१), २४४ (३), २४७ (१), २४८ (१), २६५ (४), २९८ (५), ३३० (१), ३८२, ३८४, ३८५, ३८६ (५). .. | दहा रुपये |
| ६०, १९८, २४३ (१), २४६, २५६ (२), २६५ (३), २६७ (१), २६८ (४), ३०७ (१), ३०७ (२), ३८३. .. | वीस रुपये |
| १६० (२), १७१ (१), २१२ (२), २३९ (१), २४०, २६६, २९८ (२), २९९ (१), ३०१ (१), ३७६ (१), ३७८ (१), ४१७ (३). .. | पन्नास रुपये |
| २१० (४), २५७, २६३, २६४ (१), २६४ (२), २६९ (७). .. | शंभर रुपये |
| ३१३, ३१४. .. | पाचशे रुपये |

**परिशिष्ट तीन**

(कलम ४९१ पहा )

**सुधारलेल्या अधिनियमिती**

| क्रमांक व वर्ष<br>१ | संक्षिप्त नाव<br>२ | सुधारणा<br>३ |
|---|---|---|
| सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १. | मुंबई नगररचना अधिनियम, १९१५. | कलम ४ चे पोट-कलम (१), कलम १० चे पोट-कलम (२), कलम २६ चे पोट-कलम (१), कलम ४४ चे पोट-कलम (३) आणि कलम ४५ चे पोट-कलम (३) यामध्ये "मुंबई शहर" या शब्दांऐवजी "ज्या भागासाठी कोणत्याही अधिनियमितीअन्वये महानगरपालिकेची रचना करण्यात आली असेल असा कोणताही भाग" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

**परिशिष्ट तीन--** चालू

| क्रमांक व वर्ष<br>१ | संक्षिप्त नाव<br>२ | सुधारणा<br>३ |
|---|---|---|
| सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५. | मुंबई भेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९२५. | १. कलम २, खंड (ग) मध्ये "मुंबई शहर" या शब्दाऐवजी "ज्या भागासाठी कोणत्याही अधिनियमितीअन्वये महानगरपालिकेची रचना करण्यात आली असेल असा कोणताही भाग" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>२. कलम १९, पोट-कलम (१) मध्ये "मुंबई शहराच्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेशी विचार विनिमय केल्यानंतर" या मजकुराऐवजी "ज्या भागासाठी कोणत्याही अधिनियमितीन्वये महानगरपालिकेची रचना पित करण्यात आली असेल अशा कोणत्याही भागाच्या बाबतीत अशा महानगरपालिकेशी विचारविनिमय केल्यानंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२. | लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय अधिनियम, १९४७. | १. कलम ६, पोट-कलम (२) मध्ये--<br>(१) मूळ परिच्छेद "ख" ऐवजी पुढीलप्रमाणे सुधारित परिच्छेद दाखल करण्यात येईल:--<br>"ख. पुणे महानगरपालिकेचे पुढीलप्रमाणे चार पदसिद्ध प्रतिनिधी :--<br>(एक) महापौर, हा अध्यक्ष असेल,<br>(दोन) अध्यक्ष, स्थायी समिती,<br>(तीन) अध्यक्ष, नगरपालिका शाळा मंडळ,<br>(चार) पुणे महानगरपालिका आयुक्त."<br>(२) परिच्छेद "ग" मधील "पुणे शहर बरो नगरपालिका" या शब्दाऐवजी "पुणे महानगरपालिका" हे शब्द दाखल करण्यात येतील.<br>२. कलम १७, मध्ये "मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ पुणे शहर बरो नगरपालिका" या शब्दाऐवजी "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ पुणे महानगरपालिका" हे शब्द दाखल करण्यात येतील. |

**परिशिष्ट तीन--** चालू

| क्रमांक व वर्ष<br>१ | संक्षिप्त नाव<br>२ | सुधारणा<br>३ |
|---|---|---|
| | | ३. कलम २१, पोट-कलम (२), [१][खंड (ख)] मध्ये "पुणे शहर बरो नगरपालिका" या शब्दाऐवजी "पुणे महा-नगरपालिका" हे शब्द दाखल करण्यात येतील. |
| सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७. | मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७. | कलम १०-क मध्ये पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :--<br>"(४) कोणत्याही शहरातील कोणत्याही जागेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि-नियम, १९४९, कलम १२९ अन्वये बसवण्यात आलेला सामान्य कर हा, कोणत्याही मालकाने अशा जागेच्या संबंधात इमारतींवरील, घरांवरील किंवा जमिनींवरील पट्टीबद्दल किंवा कराबद्दल ३१ मार्च १९४९ चा समावेश असलेल्या आकारणीच्या कालावधीसाठी कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्यास दिलेल्या रकमेपेक्षा अधिक होत असेल, तर या कलमाच्या प्रयोजनांसाठी अशा पट्टीत किंवा करात वाढ झाली आहे असे मानले जाईल." |
| [२][सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०.] | पुणे विद्यापीठ अधिनियम, १९४८. | कलम १६, पोट-कलम (१) मधील वर्ग दोन, परिच्छेद (क), खंड (चार) मध्ये—<br>(१) उपखंड (क) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—<br>"(क) पुणे महानगरपालिकेचे दोन सदस्य"<br>(२) उपखंड (ख) वगळण्यात येईल. |

१ सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम ३, अनुसूची २ अन्वये "खंड (ड)" या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

२ सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये "सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९," या मजकुराऐवजी, हा मजकूर, दाखल करण्यात आला.

**परिशिष्ट तीन--** चालू

| क्रमांक व वर्ष<br>१ | संक्षिप्त नाव<br>२ | सुधारणा<br>३ |
|---|---|---|
| सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९. | मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८. | कलम २५ मध्ये,—<br>(१) पोट-कलम (१) मधील "मुंबई नगरपालिका अधिनियम, १८८८, मधील प्रकरण १२-ख," या मजकुराऐवजी "[1][महाराष्ट्र [2][राज्यातील] ] कोणत्याही भागासाठी महानगरपालिका प्रस्थापित करण्यासाठी त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही अधिनियमिती" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(२) पोट-कलम (२) मधील "मुंबई नगरपालिका अधिनियम, १८८८" या मजकुराऐवजी "वर सांगितल्याप्रमाणे अशी कोणतीही अधिनियमिती" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७९. | मुंबई दुकाने व व्यापारी संस्था अधिनियम, १९४८. | कलम २, खंड (१५) मध्ये, "मुंबई नगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये प्रस्थापित केलेली नगरपालिका" या मजकुराऐवजी "त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमिती अन्वये प्रस्थापित केलेली महानगरपालिका" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

१ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द, दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतातील" या शब्दांऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

## परिशिष्ट चार

(कलम ४९३ पहा)

## संक्रमणकालीन तरतुदी

### भाग एक : सर्वसाधारण

[1][१. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, *मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ किंवा मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यांच्या व्यतिरिक्त, एखाद्या शहरात नियत दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा त्याखाली काढलेल्या व अशा दिनांकास उक्त शहरात अंमलात असलेल्या कोणत्याही नियमामध्ये, आदेशामध्ये किंवा अधिसूचनेमध्ये कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही नगरपालिका किंवा इतर स्थानिक प्राधिकरणे याबाबतचे निर्देश, अन्य हेतू असल्याचे दिसून येत नसेल तर, यथास्थिति त्या शहरासंबंधीचे किंवा उक्त शहराच्या महानगरपालिकेसंबंधीचे निर्देश असल्याप्रमाणे त्यांचा अन्वयार्थ लावण्यात येईल आणि अशी अधिनियमिती, नियम, आदेश किंवा अधिसूचना उक्त शहरास किंवा महानगरपालिकेस लागू होईल.]

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४०. १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५. १९५९ चा मुंबई अधि- नियम ३. १९३० चा मुंबई अधि- नियम ३०.

अधिकाराचे हस्तांतरण. २. ज्या क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली आहे त्या क्षेत्राच्या नगरपालिकेचे किंवा अन्य कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे सर्व अधिकार हे, नियत दिवशी, उक्त क्षेत्रासाठी प्रस्थापित केलेल्या महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

येणे असलेल्या रकमा. ३. ज्या भागाची शहर म्हणून रचना करण्यात आली आहे त्या क्षेत्राच्या उक्त नगरपालिकेस किंवा स्थानिक प्राधिकरणास येणे असलेल्या सर्व रकमा— मग त्या कोणत्याही कराबद्दल असोत किंवा अन्य कोणत्याही गोष्टीबद्दल असोत— उक्त शहराच्या आयुक्तास वसूल करता येतील आणि अशा वसुलीच्या प्रयोजनासाठी जर हा अधिनियम अंमलात आला नसता आणि उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली नसती तर उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या प्राधिकाऱ्यास जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कार्यवाही दाखल करता आली असती ती उपाययोजना करण्यास किंवा ती कार्यवाही दाखल करण्यास आयुक्त सक्षम असेल.

ऋणे, दायित्वे, संविदा आणि प्रलंबित कार्यवाह्या. ४. (१) नियत दिवसाच्या निकटपूर्वी उक्त नगरपालिकेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्या वतीने, जी ऋणे व दायित्वे पत्करली असतील आणि ज्या संविदा केल्या असतील आणि जी ऋणे, दायित्वे व संविदा उक्त दिवशी अस्तित्वात असतील अशी सर्व ऋणे, दायित्वे व संविदा उक्त शहराच्या आयुक्ताने, या अधिनियमान्वये त्यास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून पत्करली आहेत आणि केल्या आहेत असे मानले जाईल आणि त्याप्रमाणे ती अंमलात राहतील.

---

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ८ (१) अन्वये परिच्छेद १ ऐवजी सदर परिच्छेद दाखल करण्यात आला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ आणि ३ अनुसूची नोंद क्रमांक ७४ द्वारे, दिनांक १ मे १९६० पासून "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधि" अशी संक्षिप्त नावात सुधारणा करण्यात आली.

(२) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये आयुक्तापुढे दाखल करणे किंवा आयुक्ताने हाती घेणे आवश्यक असलेल्या ज्या कार्यवाह्या उक्त दिवशी, उक्त नगरपलिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे प्रलंबित असतील अशा सर्व कार्यवाह्या, आयुक्तांकडे हस्तांतरित करण्यात आल्या पाहिजेत व त्याने त्या पुढे चालवल्या पाहिजेत आणि अशा अन्य सर्व कार्यवाह्या, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये, त्या ज्या प्राधिकाऱ्यांपुढे दाखल करावयाच्या असतील किंवा ज्या प्राधिकाऱ्याने हाती घ्यावयाच्या असतील त्या प्राधिकाऱ्याकडे शक्य असेल तेथवर, हस्तांतरित करण्यात आल्या पाहिजेत आणि त्याने त्या पुढे चालवल्या पाहिजेत.

(३) उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे उक्त तारखेस प्रलंबित असलेली सर्व अपिले ज्यावेळी दाखल करण्यात आली त्यावेळी उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली होती असे समजून ती अपिले व्यवहार्य असेल तेथवर निकालात काढण्यात आली पाहिजेत.

(४) उक्त नगरपालिकेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्यावतीने दाखल केलेले व उक्त तारखेस प्रलंबित असलेले सर्व खटले आणि उक्त नगरपालिकेने, स्थानिक प्राधिकरणाने किंवा उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्याच्याविरूद्ध दाखल केलेले व उक्त तारखेस प्रलंबित असलेले सर्व वाद व अन्य कायदेशीर कार्यवाह्या या, असा खटला, वाद किंवा कार्यवाही ज्यावेळी दाखल करण्यात आली त्यावेळी उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली होती असे समजून, यथास्थिति, उक्त शहराच्या आयुक्ताने किंवा महानगरपालिकेने किंवा आयुक्ताविरूद्ध किंवा महानगरपालिकेविरूद्ध चालू ठेवल्या पाहिजेत.

नेमणुका, कर, अर्थसंकल्पीय अंदाज, आकारण्या इत्यादी चालू राहणे.

**५.** या परिशिष्टाच्या तरतुदींन्वये किंवा परिच्छेद २२ अन्वये काढलेल्या अधिसूचनेअन्वये किंवा परिच्छेद २३ अन्वये दिलेल्या आदेशान्वये स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त,--

१९६५ चा महाराष्ट्र ४०.

(अ) [१][महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये] किंवा नियत दिवसाच्या निकटपूर्वी, शहर म्हणून रचना करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली अधिसूचना, नोटीस, आदेश, योजना, परवानगी, यथास्थिति, या अधिनियमान्वये किंवा वर सांगितल्याप्रमाणे अन्य कोणत्याही कायद्यान्वये केलेल्या कोणत्याही नेमणुकीने, अधिसूचनेने, नोटिशीने, आदेशाने, योजनेने, लायसन्सने, परवानगीने त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहील ;

(ब) [१][महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये] किंवा नियत दिवसाच्या निकटपूर्वी, शहर म्हणून रचना करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये केलेले सर्व अर्थसंकल्पीय अंदाज, आकारण्या, मूल्यनिर्धारणे, मोजण्या आणि विभागण्या या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असतील तेथवर, या अधिनियमान्वये करण्यात आल्या आहेत असे मानले जाईल ;

---

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ८ (दोन) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

(क) नियत दिवसाच्या निकटपूर्वी उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नोकरीत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, या अधिनियमान्वये महानगरपालिकेने नेमलेले अधिकारी व कर्मचारी असतील आणि या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अन्य तरतूद करण्यात येईपर्यंत, अशा तारखेस त्यांस जे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क होता आणि ते सेवेच्या ज्या शर्तींच्या अधीन होते, तेच वेतन व भत्ते त्यांस मिळतील आणि ते त्याच सेवेच्या शर्तींच्या अधीन असतील :

परंतु, अशा अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी नियत दिवसापूर्वी केलेली सेवा ही, महानगरपालिकेच्या सेवेत असताना केलेली सेवा आहे असे मानले जाईल :

आणखी असे की, महानगरपालिकेच्या मते जो कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी नगरपालिका सेवेसाठी आवश्यक किंवा योग्य नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, त्याच्या सेवेच्या अटींप्रमाणे जी नोटीस देणे आवश्यक आहे अशी नोटीस दिल्यानंतर त्यास सेवेतून काढून टाकण्यास महानगरपालिका सक्षम असेल आणि ज्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास अशा रीतीने सेवेतून काढून टाकण्यात आले असेल अशा प्रत्येक अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, हा अधिनियम पारित झाला नसता तर, सेवेस अपात्र ठरवल्यावर, जी रजा, निवृत्तीवेतन किंवा उपदान घेण्याचा किंवा मिळण्याचा हक्क असता ती रजा, निवृत्तीवेतन किंवा उपदान घेण्याचा किंवा मिळण्याचा हक्क असेल.

[१] [**५-अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाने जे क्षेत्र महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ खाली रचना केलेल्या दोन किंवा अधिक नगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये किंवा अशा एका किंवा अधिक नगरपालिकांच्या आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ खाली रचना केलेल्या एका किंवा अधिक जिल्हा परिषदांच्या क्षेत्रामध्ये पूर्वी पूर्णत: किंवा अंशत: समाविष्ट होते अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्राची, कलम ३ खाली, शहर म्हणून रचना केली असेल त्या बाबतीत, राज्य शासनास, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या कलम १२९ (क) मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, त्या शहरात समाविष्ट केलेल्या विनिर्दिष्ट नगरपालिकेच्या कोणत्याही क्षेत्रात महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ खाली किंवा नियत दिवसाच्या लगतपूर्वी, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली केलेल्या कोणत्याही नेमणुका, काढलेल्या कोणत्याही अधिसूचना, आदेश, नोटिसा, लादलेले कर, तयार केलेल्या योजना, दिलेली लायसन्स, परवानग्या, केलेले नियम, उपविधी किंवा नमुने हे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर यथास्थिति, या अधिनियमाखाली किंवा पूर्वी म्हटल्याप्रमाणे इतर कोणत्याही कायद्याखाली निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, त्या शहराच्या संपूर्ण क्षेत्रात अंमलात असण्याचे चालू राहील].

---

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ८ (तीन) परिच्छेद ५ अ समाविष्ट केला.

**६.** वरील परिच्छेदात नगरपालिकेसंबंधी किंवा स्थानिक प्राधिकरणासंबंधी केलेला कोणताही निर्देश हा अशा नगरपालिकेचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे अधिक्रमण किंवा विसर्जन करण्यात आले असेल तर त्या बाबतीत, अशा नगरपालिकेसंबंधीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणासंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये अशा नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा त्यांची कामे पार पाडण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संबंधी केलेला निर्देश आहे असे मानले जाईल. अधिक्रमण किंवा विसर्जन करण्यात आलेल्या नगरपालिके-साठी किंवा स्थानिक प्राधिकरणा-साठी तरतुदी.

[1] [**६-अ.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ४५८ अन्वये उपविधि करण्यात येईपर्यंत किंवा कलम ३ अन्वये ज्या तारखेस कोणत्याही स्थानिक क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली असेल किंवा ते शहरात समाविष्ट करण्यात आले असेल, त्या तारखेपासून एक वर्ष संपेपर्यंत, यांपैकी जी तारीख आधीची असेल त्या तारखेपर्यंत, महानगरपालिकेस, शहर म्हणून रचना करण्यात आलेल्या किंवा शहरात समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात इमारती उभारणे किंवा पुन्हा उभारणे, इमारतींची, छपरांची व इमारतींच्या बाहेरील भिंतीची जास्तीत जास्त उंची, इमारती मागे हटवणे, आणि इमारतींशी संबंधित असलेल्या अन्य बाबी यांच्या बाबतीत विशेष शर्ती विहित करता येतील. विवक्षित क्षेत्रात इमारती उभारणे आणि पुन्हा उभारणे इत्यादींसाठी विशेष शर्ती.

(२) कोणत्याही व्यक्तीस, अशा कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून कोणतीही इमारत उभारता येणार नाही किंवा पुन्हा उभारता येणार नाही किंवा कोणतेही काम पार पाडण्यास सुरुवात करता येणार नाही.]

[2][ * * * * * ]

## भाग तीन : पुणे शहरासंबंधी विशेष तरतुदी

**१४.** (१) नियत दिवशी व त्या दिवसापासून पुणे शहराच्या बाबतीत पुणे शहर व पुणे उपनगर बरो नगरपालिका (नगरपालिका आयुक्ताची नेमणूक) अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ अन्वये नेमलेला व नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस पद धारण करत असलेला पुणे शहर व पुणे उपनगर बरो नगरपालिकेचा नगरपालिका आयुक्त हा, कलम ३६ अन्वये नेमलेला आयुक्त आहे असे मानले जाईल आणि तो, उक्त कलमाच्या पोट-कलम (३) मधील तरतुदींच्या अधीन राहून, हा अधिनियम, पुणे शहरात अंमलात आला नसता तर, पुणे शहर व पुणे उपनगर बरो नगरपालिकेचा, नगरपालिका आयुक्त म्हणून त्याने ज्या कालावधीसाठी ते पद धारण केले असते त्याच कालावधीसाठी ते पद धारण करील. आयुक्ता-संबंधी तरतुदी. १९४८ चा मुंबई ८०.

१ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२, कलम २ अन्वये हा परिच्छेद, दाखल करण्यात आला.

२ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये भाग दोन अहमदाबाद शहरासंबंधी विशेष तरतुदी आणि त्याखालील परिच्छेद ७ ते १३ हे, वगळण्यात आले.

(२) आयुक्तास नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस पुणे शहर व पुणे उपनगर बरो नगरपालिकेचा, नगरपालिका आयुक्त म्हणून ज्या वेतन श्रेणीनुसार वेतन व भत्ते मिळत होते त्याच वेतन श्रेणीनुसार त्यास वेतन व भत्ते मिळतील.

आयुक्ताने महानगरपालिकेच्या आणि स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करणे आणि त्यांची कामे पार पाडणे.

**१५.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्ताने, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रभागाच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येईपर्यंत आणि महानगरपालिकेची पहिली सभा भरवण्यात येईपर्यंत, या अधिनियमान्वये आणि त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये, महानगरपालिकेच्या व स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर केला पाहिजे आणि त्यांची कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

[१] [राज्य] शासनाला सल्लागार मंडळ नेमता येईल.

**१६.** (१) [१] [राज्य] शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आयुक्त जोपर्यंत व जेथवर महानगरपालिकेच्या व स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करील आणि त्यांची कर्तव्ये पार पाडील, तोपर्यंत व तेथवर, त्यास सल्ला देण्यासाठी, [१] [राज्य] शासनाला योग्य वाटेल तितक्या परंतु बारापेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींची नेमणूक करता येईल.

(२) आयुक्ताने, वेळोवेळी, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तींची सभा बोलावणे ही गोष्ट धरून, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये महानगरपालिकेने किंवा स्थायी समितीने ज्या गोष्टी करणे, मंजूर करणे, मान्य करणे किंवा कायम करणे आवश्यक आहे त्या सर्व गोष्टीसंबंधी याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तींच्या मतांविषयी खात्री करून घेतली पाहिजे.

(३) [१] [राज्य] शासनाने तसा निदेश दिला तर, आयुक्ताने ज्या बाबतीत याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तींपैकी बहुसंख्य व्यक्तींच्या मतानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने वागण्याचे योजले असेल, अशी कोणतीही बाब त्याने निर्णयासाठी [१] [राज्य] शासनाकडे पाठविली पाहिजे आणि त्यानंतर अशा निर्णयास अनुसरून वागले पाहिजे.

निवडणुका घेणे इत्यादींसाठी आयुक्ताने उपाययोजना करणे.

**१७.** (१) आयुक्ताने, ताबडतोब नगरपालिका मतदारांची यादी तयार करण्यास सुरुवात केली पाहिजे आणि शक्य असेल तेथवर, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रभागाच्या सार्वत्रिक निवडणुका घेतल्या पाहिजेत.

(२) या अधिनियमांन्वये घेतलेल्या पहिल्या निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी, जी कोणतीही व्यक्ती, हा अधिनियम अंमलात आला नसता तर, पुणे शहर बरो नगरपालिकेचा किंवा पुणे उपनगर बरो नगरपालिकेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास अनर्ह ठरली असती, ती व्यक्ती या अधिनियमान्वये निवडून येण्यास आणि सदस्य होण्यास अनर्ह आहे असे मानले जाईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये प्रांतिक या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

(३) ज्या कोणत्याही व्यक्तीची शहरात स्थावर मालमत्ता असेल, आणि नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस, शहराच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याने बसवलेली घरपट्टी किंवा जमिनीवर व इमारतींवर बसवलेल्या पट्टीच्या स्वरूपातील कोणताही कर, त्या मालमत्तेवर आकारण्यात आला असेल, अशा व्यक्तींजवळ, पहिल्या नगरपालिका मतदारांच्या यादीत नाव दाखल करून घेण्याच्या प्रयोजनासाठी कलम ८, पोट-कलम (३) अन्वये करासंबंधी आवश्यक अर्हता आहे असे मानले जाईल.

१९३० चा मुंबई २५.

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० संबंधी व्यावृत्ती.

**१८.** मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या तरतुदी, नियत दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी पुणे शहर बरो नगरपालिका आणि पुणे उपनगर बरो नगरपालिका यांच्या लेखापरीक्षेच्या बाबतीत आणि अशा लेखापरीक्षेशी संबंधित असलेल्या किंवा अशा लेखापरीक्षेतून उद्‌भवणाऱ्या अन्य सर्व गोष्टींच्या बाबतीत, जणू हा अधिनियम अंमलात आला नव्हता असे समजून लागू राहतील ;

१९३० चा मुंबई २५.

परंतु, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील स्थानिक प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा स्थानिक प्राधिकारी यासंबंधी केलेले निर्देश हे आयुक्तांसंबंधी केलेले निर्देश आहेत असे मानले जाईल.

१९४८ चा मुंबई २०.

पुणे शहर आणि पुणे उपनगर बरो नगरपालिका यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पुणे विद्यापीठ विधिसभेच्या सदस्यांच्या बाबतीत व्यावृत्ती.

**१९.** पुणे विद्यापीठ अधिनियम, १९४८, कलम १६ अन्वये पुणे शहर बरो नगरपालिकेने आणि पुणे उपनगर बरो नगरपालिकेने निवडून दिलेले पुणे विद्यापीठाच्या विधिसभेचे सदस्य हे, महानगरपालिकेने निवडून दिलेले सदस्य आहेत असे मानले जाईल आणि त्यांना मूलतः ज्या कालावधीसाठी निवडून देण्यात आले होते त्या कालावधीपर्यंत ते पद धारण करणे चालू ठेवतील.

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विश्वस्त मंडळावरील महानगर-पालिकेच्या प्रतिनिधी संबंधी तात्पुरती तरतूद.

**२०.** लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय अधिनियम, १९४७ कलम ६, पोट-कलम (२) च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विश्वस्त मंडळामध्ये महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून, महापौर आणि स्थायी समितीचा अध्यक्ष निवडून देण्यात येईपर्यंत आणि त्यांनी ते पद धारण करीपर्यंत, पुणे नगरपालिका शाळा मंडळाचा अध्यक्ष आणि आयुक्त यांचा समावेश होईल.

पुणे शहर नगरपालिका शाळा मंडळ हे त्या शहराचे नगरपालिका शाळा मंडळ आहे असे मानणे.

**२१.** नियत दिवसांच्या निकटपूर्वीच्या तारखेस अधिकारावर असलेले पुणे शहर नगरपालिका शाळा मंडळ हे, त्या शहराचे नगरपालिका शाळा मंडळ आहे असे मानले जाईल आणि पालिका सदस्यांच्या प्रभागांच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्यानंतर आणि पालिका सदस्यांनी पद धारण केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, *मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ कलम ४, पोट-कलमे (२) व (५) अन्वये सदस्यांचे नामनिर्देशन आणि निवडणूक याद्वारे नवीन शाळा मंडळाची रचना करण्यात येईपर्यंत, उक्त मंडळ अधिकारावर राहील. १९४७ चा ६१.

पुणे शहरात समाविष्ट करण्यात आलेल्या विवक्षित क्षेत्रात सामान्य कर बसवण्यासंबंधी तात्पुरती तरतूद.

[1][**२१-अ.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, यापुढे जोडलेल्या यादी एक मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात, यापुढे जोडलेल्या यादी दोन मधील स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वर्गातील इमारतींवर व जमिनींवर, स्तंभ (२) ते (५) मधील शीर्षकात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत उक्त स्तंभात प्रत्येक वर्गासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी सामान्य कर बसवण्यात येईल; आणि असे दर अशा कालावधीत कलम १५० अन्वये वाढवले जाण्यास पात्र असणार नाहीत. उक्त स्तंभात असा कोणताही दर विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल तेव्हा, या अधिनियमान्वये, तरतूद केलेल्या दराने आणि रीतीने सामान्य कर बसवण्यात येईल ;

परंतु, उक्त यादी एक मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात असलेल्या ज्या जमिनींचे आणि इमारतींचे वार्षिक करयोग्य मूल्य पन्नास रुपयांपेक्षा अधिक होत नसेल, अशा सर्व जमिनींच्या आणि इमारतींच्या बाबतीत १ एप्रिल १९५४ ते ३१ मार्च १९५६ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत सामान्य कर बसवण्यापासून सूट देण्यात येईल.

---

१ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ३ अन्वये परिच्छेद २१-अ, दाखल करण्यात आला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ व ३, अनुसूची नोंद क्रमांक २८ द्वारे, दिनांक १ मे १९६० पासून "महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम" अशी संक्षिप्त नावात सुधारणा करण्यात आली.

## यादी एक

### पुणे शहराच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या पुढील महसुली गावांची क्षेत्रे

१. बोपोडी
२. धानोरी
३. लोहगाव
४. वडगाव शेरी
५. घोरपडी
६. मुंढवा
७. हडपसर
८. कोंढवे खुर्द
९. धनकवडी
१०. हिंगणे बुद्रुक
११. कोथरुड
१२. पाषाण
१३. औंध
१४. वानवडी
१५. कसबे पुण्यातील बिबवेवाडी महसुली भूमापन क्रमांक ५५९ ते ५९५; ५९८ ते ६९५; ७३२ आणि ४४०.

## यादी दोन

| जमिनींचे आणि इमारतींचे वर्ग | १ एप्रिल १९५४ ते ३१ मार्च १९५६ पर्यंतचा कालावधी (दोन्ही दिवस धरून) | १ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९५८ पर्यंतचा कालावधी (दोन्ही दिवस धरून) | १ एप्रिल १९५८ ते ३१ मार्च १९६० पर्यंतचा कालावधी (दोन्ही दिवस धरून) | १ एप्रिल १९६० ते ३१ मार्च १९६२ पर्यंतचा कालावधी (दोन्ही दिवस धरून) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य ५० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल अशा जमिनी आणि इमारती. | काही नाही | करयोग्य मूल्याच्या ६ टक्के. | करयोग्य मूल्याच्या ८ टक्के. | करयोग्य मूल्याच्या १० टक्के. |
| २. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य ५० रुपयांपेक्षा अधिक होत असेल परंतु ५०० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल अशा जमिनी आणि इमारती. | करयोग्य मूल्याच्या ६ टक्के. | करयोग्य मूल्याच्या ८ टक्के. | करयोग्य मूल्याच्या १० टक्के. | -- |
| ३. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य ५०० रुपयांपेक्षा अधिक होत असेल परंतु १००० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल अशा जमिनी आणि इमारती. | करयोग्य मूल्याच्या ८ टक्के. | करयोग्य मूल्याच्या १० टक्के. | -- | -- |

**यादी दोन--** चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य १,००० रुपयांपेक्षा अधिक होत असेल परंतु २,००० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल अशा जमिनी आणि इमारती. | करयोग्य मूल्याच्या १० टक्के. | -- | -- | -- |
| ५. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य २,००० रुपयांपेक्षा अधिक होत असेल परंतु ५,००० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल अशा जमिनी आणि इमारती. | करयोग्य मूल्याच्या १२ टक्के. | -- | -- | -- |
| ६. ज्यांचे वार्षिक करयोग्य मूल्य ५,००० रुपयांपेक्षा अधिक होत असेल अशा जमिनी आणि इमारती. | करयोग्य मूल्याच्या १४ टक्के किंवा कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने ठरविलेला दर यांपैकी जो कमी असेल तो दर. | -- | -- | -- |

[1][ **भाग चार** * * * * * * * * * ]

**भाग पाच : अडचणी दूर करण्याचा अधिकार**

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२३.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या बाबतीत किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही अधिनियमिती अंमलात आणण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास, [2] [राज्य] शासनाला, प्रसंगानुरूप आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल ;

परंतु, नियत दिवसापासून एक वर्ष संपल्यानंतर या परिच्छेदान्वये कोणताही आदेश देता येणार नाही.

१. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ द्वारे परिशिष्ट चार मधील भाग-चार वगळण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये प्रांतिक या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## [1] [अनुसूची 'अ'

(कलम १५२ अ पाहा)

### उपकरांच्या प्रदानास पात्र असलेल्या वस्तू

| अनुक्रमांक | मालाचे वर्णन | बसवण्यायोग्य उपकराचे कमाल दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **वर्ग १--अन्नपदार्थ व पेय** | |
| १ | वाळवलेली गवार, सोयाबीन, वाळवलेले धान्य व भात यांसह सर्व प्रकारचे धान्य, पीठ, डाळी व तृणधान्ये. | .. ४ टक्के |
| २ | (अ) साखर | .. २ टक्के |
| | (ब) सर्व प्रकारचा गूळ | .. २ टक्के |
| ३ | मद्य आणि स्पिरिटे आणि बिअर | .. १० टक्के |
| ४ | तूप | .. ५ टक्के |
| ५ | वनस्पती व हायड्रोजनेटेड तेले | .. ४ टक्के |
| ६ | चहा, कॉफी व कॉफीच्या बिया | .. ४ टक्के |
| ७ | केशर | .. ७ टक्के |
| ८ | खाण्याचे बेकन व हॅम्स, टेबलबटर, टेबलबटरखेरीज अन्य लोणी, मार्गारीन, ताजी फळे व सुपारी खेरीज करून सुकवलेली किंवा टिकवून ठेवलेली फळे व कठीण कवचाची फळे, डबाबंद मासे, चीज, मिठाई, जॅम व जेली, संघनित व टिकवून ठेवलेले दूध, आईस्क्रीम, सर्व प्रकारचे पिष्टमय अन्न, लोणची, कोको, कोकोच्या बिया व चॉकलेट, बिस्किटे व केक, डुकराची चरबी किंवा खाण्यास योग्य अशी जनावरांची चरबी, खवा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, पाक व सर्व पेये, ग्लुकोज, डेक्सट्रोज किंवा कोणतीही फलशर्करा, टिकवून ठेवलेली अन्नसामग्री, बेकिंग पावडर किंवा कढीचा मसाला, सॅकरीन, सर्व प्रकारचे खाण्याचे रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, माल्ट एक्स्ट्रॅक्ट, मध, पापड, बटाटावेफर्स, ताजे किंवा कोणत्याही उपयोगासाठी टिकवून ठेवलेले मांस आणि सकस दूध किंवा बनीव दूध किंवा मलईरहित दुधाची भुकटी खेरीज करून विनिर्दिष्टपणे तरतूद करण्यात न आलेले सर्व प्रकारचे अन्न किंवा पेये. | .. ७ टक्के |
| ९ | खारका | .. ६ टक्के |
| १० | खजूर | .. ४ टक्के |

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ द्वारे अनुसूची 'अ', 'ब' आणि 'क' समाविष्ट करण्यात आली.

**अनुसूची 'अ'**--चालू

| १ | २ | | ३ |
|---|---|---|---|
| ११ | मिरच्या, हळद, धणे, मेथी किंवा ओवा किंवा धणे, मेथी वा ओवा यांची पूड, अख्खे किंवा फोडलेले चिंचोके. | .. | ३ टक्के |
| १२ | पाळीव खाद्यपक्षी, त्यांची अंडी व मांस | .. | २ टक्के |
| १३ | असोला नारळ, सुका नारळ व खोबरे | .. | १ टक्का |
| १४ | सकस दूध, बनीव दूध व मलईरहित दुधाची भुकटी आणि दही | .. | ५ टक्के |
| १५ | खाद्य तेलाच्या तेलबिया आणि खाद्यतेले | .. | ४ टक्के |
| | **वर्ग दोन--जनावरे** | | |
| १६ | मेंढ्या, बकरे, कोकरे आणि करडे | .. | १ टक्का |
| १७ | बैल, गायी, म्हशी, वासरे व घोडे | .. | १ टक्का |
| १८ | डुकरे | .. | १ टक्का |
| १९ | सर्व प्राणी, जंगली जनावरे तसेच या अनुसूचीच्या नोंद क्र. १६, १७ व १८ मध्ये ज्यांचा समावेश आहे अशी जनावरे वगळून अन्य पाळीव जनावरे. | .. | १० टक्के |
| २० | जनावरांची हाडे, शिंगे व खूर | .. | २ टक्के |
| | **वर्ग तीन--इंधन, दिवाबत्ती, धुलाई व औद्योगिक वापर यांकरिता वापरण्यात येणाऱ्या वस्तू** | | |
| २१ | लोणारी कोळसा, कोळसा व दगडी कोळसा | .. | ४ टक्के |
| २२ | फटाके, दारूकाम व त्याचे घटक, कॅल्शियम कार्बाईड व धोकादायक नसलेली सुरुंगाची वात. | .. | ७ टक्के |
| २३ | झुंबरे, ग्लोब्ज, धुराडी, विजेचे बल्ब व विजेची किंवा गॅसची प्रकाश व्यवस्था यासाठी लागणाऱ्या वस्तू. | .. | ६ टक्के |
| २४ | सर्व प्रकारचा साबण, बूट व धातूंना झिलई देण्याच्या वस्तू | .. | ४ टक्के |
| २५ | पोटॅश, रिठे, सोडा, तुरटी, क्षारयुक्त पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, कॉस्टिक सोडा, रिफाईन्ड सॉल्ट, पीटर फिनाईल आणि कपडे, खोलीच्या फरशा आणि भांडी धुण्यासाठी वापरण्यात येणारे पदार्थ. | .. | ४ टक्के |
| २६ | खाण्यास अयोग्य असलेल्या तेलाच्या तेलबिया | .. | ४ टक्के |
| २७ | खाण्यास अयोग्य असलेली वनस्पती तेले | .. | ४ टक्के |
| २८ | मेथिलेटेड व विप्रकृत स्पिरिटे व औद्योगिक कारणांसाठी वापरण्यात येणारे अल्कोहोल. | .. | ६ टक्के |

**अनुसूची 'अ'--**चालू

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| २९ | (अ) सर्व प्रकारची खनिज तेले, डिझेल ऑईल, पेट्रोल, विमानाचे स्पिरिट, सर्व प्रकारची वंगणाची तेले, व्हाईट ऑईल, चातीचे तेल, भट्टीचे तेल, नैसर्गिक वायू व द्रवरूप पेट्रोलियमजन्य वायू यांसह पेट्रोलियम उत्पादने, मावा ऑईल, सेवसॉल द्रावक तेल, इंधनाची इतर तेले, कीटकनाशके म्हणून वापरली जाणारी तेले, नैसर्गिक गॅसोलीन, रंगलेप द्रावणे व मिश्रणे, (परंतु, यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या कोणत्याही वस्तूमध्ये घासलेट व क्रूड ऑईल यांचा समावेश नसेल.) .. | ५ टक्के |
| | (ब) क्रूड ऑईल .. | ५ टक्के |
| | (क) ग्रीस व पेट्रोलियम जेली .. | ५ टक्के |

**वर्ग चार--इमारती, रस्ते व इतर संरचना यांच्या बांधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू आणि लाकडाच्या व वेताच्या वस्तू.**

| | | |
|---|---|---|
| ३० | सर्व प्रकारचे सिमेंट .. | ४ टक्के |
| ३१ | डांबर, ॲस्फाल्ट, बिटुमेन, फरसबंदी करण्यासाठी दगड, मॅन्गॅनीज, एमरी दगड किंवा भुकटी, खडूची भुकटी, दगडाच्या कपच्या, आग्रा दगड, इमारती दगड, खंगर व कोळशाची राख. .. | ४ टक्के |
| ३२ | झिलईदार विटा, फरशा, संगमरवरी दगड, तापसाहीविटा, विटा, सर्व प्रकारची छपरी कौले, जमिनीवर बसवण्यासाठी फरशी, चायना मोझेक चिपा, मोझेक संगमरवरी दगड, मोझेक किंवा टॅरॅझो फरशा, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲस्बेस्टॉस सिमेंट पत्रे. .. | ५ टक्के |
| ३३ | इमारतींना रंग देण्यासाठी वापरावयाचे रंगलेप, डिस्टेंपर व रंग, वॉर्निश, अळशीचे उकळविलेले तेल, टर्पेटाईन, झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड. .. | ५ टक्के |
| ३४ | पिवळीमाती व लालमाती व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची माती. .. | ४ टक्के |
| ३५ | काच, काचेच्या वस्तू, चिनीमातीच्या वस्तू, एनॅमलच्या वस्तू, इमारतींचे बांधकाम किंवा सुशोभीकरण करण्यासाठी व सॅनिटरी खिळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या चिनीमातीच्या वस्तू, धातूच्या झडपा, पितळेच्या तोट्या व त्यांच्या खिळण्या. .. | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'--**चालू

| १ | २ | | ३ |
|---|---|---|---|
| ३६ | छपरी बुरणूस (रूफिंग फेल्ट) | .. | ५ टक्के |
| ३७ | इमारती लाकूड, बल्ल्या, वेत व त्यापैकी कशापासूनही तयार केलेल्या वस्तू, दरवाजे, खिडक्या, चौकटी, फर्निचर, खुंट्या, जिने, चंदनाचे लाकूड व अशा लाकडांपासून तयार केलेल्या वस्तू. | .. | ६ टक्के |
| ३८ | प्लायवूड, सॉफ्ट बोर्ड, हार्ड बोर्ड, मॅसोनाईट किंवा कोणतेही घटक असलेले, कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू. | .. | ६ टक्के |
| | **वर्ग पाच--सुगंधी द्रव्ये, प्रसाधनाच्या वस्तू, रंग व गृहोपयोगी वस्तू** | | |
| ३९ | (अ) केसांचे तेल, सुगंधी तेले, सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सेंट, अत्तरे, सुवासिक वस्तू, सुवासिक रसायने, प्रसाधनगृहातील धूपकाड्या सर्व प्रकारची प्रसाधन सामग्री व केसांचे चाप, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, टूथ पेस्ट, सुगंधी केशतेल (पोमेड), फण्या-कंगवे, ब्रश, आरसे, हेअरपिना, ब्रीचेस, गार्टर्स सस्पेंडर्स. | .. | ५ टक्के |
| | (ब) कात्र्या, वस्तरे, सेफ्टी रेझर्स, पाती (ब्लेडस), सुऱ्या, चाकू, चमचे, काटे, सर्व प्रकारची कटलरी, सर्व प्रकारच्या सुया, कुलुपे व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान. | .. | ४ टक्के |
| | (क) लेस, फिती, लाकडी व धातुच्या रिंगा, भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, नकली मोती, नकली जडजवाहिराच्या वस्तू, प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू, प्लास्टिकची भुकटी, बेकेलाईट व बेकेलाईटच्या वस्तू. | .. | ४ टक्के |
| ४० | (अ) नकली दागिने | .. | ६ टक्के |
| | (ब) सर्व प्रकारची खेळणी | .. | ४ टक्के |
| ४१ | सर्व प्रकारची चिनी मातीची भांडी | .. | ४ टक्के |
| ४२ | काच आणि बांगड्या, बाटल्यांसह काचेच्या वस्तू, चिनी मातीच्या वस्तू, पोर्सेलीनच्या व मातीच्या वस्तू (इमारतीचे बांधकाम किंवा सुशोभीकरण यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू वगळून). | .. | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'--चालू**

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| | **वर्ग सहा--तंबाखू ओढण्यासाठी आवश्यक वस्तू** | |
| ४३ | सिगार व सिगारेट होल्डर, स्मोकिंग पाईप, सिगारेटचा कागद, तंबाखूच्या डब्या, पिशव्या, सिगारेटच्या व सिगारच्या डब्या, हुक्का व धूम्रपानासाठी लागणाऱ्या वस्तू व सिगारेट लायटर. .. | ८ टक्के |
| | **वर्ग सात--कापडाचे तागे, सर्व प्रकारचे सूत आणि धागे आणि खळीची व पांजणीची सामग्री, कातडे, कातड्यांच्या वस्तू, रबरी वस्तू** | |
| ४४ | लोकर, रेशीम, लिनन, अंबाडी आणि कृत्रिम व सिन्थेटिक सामग्री यापासून तयार केलेले कापडाचे तागे आणि अन्यथा विनिर्दिष्ट करण्यात आल्या नसतील अशा, वरीलपैकी कोणतीही सामग्री पूर्णपणे किंवा अंशतः वापरून बनवलेल्या वस्तू, १०० टक्के सुती कापड, १०० टक्के सुती कापडापासून बनवलेले तयार कपडे, १०० टक्के सुती कापडापासून बनवलेला विणमाल, सॅनिटरी टॉवेल, नॅपकिन, एकदा वापरून फेकून द्यायचे लहान मुलांचे लंगोट, कापसाच्या गाद्या व उशा आणि शस्त्रक्रियेसाठी लागणारा कापूस. .. | ३ टक्के |
| ४५ | सरकी काढलेला किंवा न काढलेला कापूस .. | ४ टक्के |
| ४६ | टाकाऊ कापूस, टाकाऊ सूत आणि हार्डवेस्ट .. | ४ टक्के |
| ४७ | कच्ची किंवा न कातलेली लोकर, अंबाडी, ताग, नारळी आणि इतर तंतू वनस्पती आणि त्यापासून बनविलेले दोरखंड व इतर वस्तू. .. | ४ टक्के |
| ४८ | सर्व प्रकारचे सूत आणि धागे .. | ५ टक्के |
| ४९ | सर्व प्रकारच्या खळी, साबुदाणा, तांदूळ आणि पीठ, तवकील टॅपिओका आणि त्यांचे पीठ, चिंचेची भुकटी, पिष्ट (फॅरिना) खळ आणि पांजणी सामग्री, चरबी, पांजणी तेले आणि अशा प्रकारची प्रतिद्रव्ये. .. | ४ टक्के |
| ५० | चामडी आणि कातडी .. | ४ टक्के |
| ५१ | कमावलेली कातडी तसेच ओढण, खोगीर पिशव्या, पेटद्या, जोडे, चपला, स्लिपर, सँडल्स, चामड्याचे पट्टे आणि कमावलेल्या कातड्यापासून तयार केलेल्या सर्व वस्तू. .. | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'--**चालू

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| ५२ | रबरी टायर आणि ट्यूब नळ्या-- | |
| | (अ) रबर, रबराच्या वस्तू, गट्टा, परचा आणि (संपूर्णत: किंवा अंशत:) त्यापासून बनविलेल्या वस्तू, रबर, द्रावण आणि रबराचा चीक. .. | ४ टक्के |
| | (ब) कच्चे रबर .. | ४ टक्के |
| | **वर्ग आठ--धातू आणि धातूपासून तयार केलेल्या वस्तू** | |
| ५३ | लोखंड आणि पोलाद-- | |
| | (अ) अशुद्ध लोखंड .. | ४ टक्के |
| | (ब) ब्लूम, लगडी आणि लाद्या .. | ४ टक्के |
| | (ग) घडणीचे-- .. | ४ टक्के |
| | (एक) सांधे | |
| | (दोन) पन्हळी (चॅनेल्स) | |
| | (तीन) सारख्या आकाराचे किंवा वेगवेगळ्या आकाराचे कोन (अँगल) | |
| | (चार) बल्ब किंवा टो. | |
| | (पाच) लहान रूळ | |
| | (सहा) लहान रुळांसाठी रूळ जोडपट्टी | |
| | (सात) कुलपी गोळा (शेल), पोलादी ढेपी (ब्ल्यूम), लगडी आणि गज (कांबी). | |
| | (आठ) काळे किंवा जस्त विलेपित सपाट किंवा पन्हळीदार पत्रे. | |
| | (नऊ) पट्टिका, बाष्पित्र आणि उच्च ताण क्षमतेच्या जहाज बांधणीच्या किंवा बंदुकीच्या गोळ्यांना रोधणाऱ्या पोलादासह सामान्य मृदू पोलाद. | |
| | (दहा) गज (कांबी) आणि सळ्या | |
| | (अकरा) बोल्ट, नट, वायसर, रिव्हेट आणि अशा प्रकारच्या इतर वस्तू. | |
| | (बारा) काटेरी, टेलीग्राफची किंवा इतर प्रकारची काळी जस्त विलेपित तार. | |

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| | (तेरा) तार खिळे | |
| | (चौदा) स्प्रिंग पोलाद, वाहनासाठी लागणाऱ्या (व्हेईक्युलर) किंवा सपाट कांबी. | |
| | (पंधरा) नालकड्या (हूप) व पट्ट्या आणि | |
| | (सोळा) नळ | |
| ५४ | लोखंड व पोलाद-भंगार .. | ४ टक्के |
| ५५ | लोखंड व पोलाद-कटलरी, लोखंडी वस्तू आणि यंत्रे किंवा विनिर्दिष्ट-पणे तरतूद न केलेले यंत्रांचे सुट्टे भाग याहून अन्य अशा लोखंड किंवा पोलाद यांपासून बनविण्यात आलेल्या इतर वस्तू. .. | ४ टक्के |
| ५६ | यंत्रसामग्री आणि तिचे घटक भाग व सुटे भाग-- .. | ४ टक्के |
| | (अ) (एक) वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरण यांसाठी विद्युत यंत्रसामग्री आणि मोटारी व जनित्रे आणि त्यांचे घटक व सुटे भाग. | |
| | (दोन) विद्युत घट (सेल), बॅटऱ्या आणि तांब्याच्या पट्ट्या आणि हॉर्न इलेक्ट्रिक यांसह विजेच्या वस्तू. .. | ४ टक्के |
| | (तीन) विजेच्या खिळण्या आणि साहित्य .. | ४ टक्के |
| | (चार) विजेची घरगुती वापराची उपयंत्रे .. | ४ टक्के |
| | (पाच) सर्व प्रकारची विजेची यंत्रसामग्री, नियंत्रण संच, स्विच गियर जनित्रे, प्रत्यावर्तित्रे (ऑल्टरनेटर) आणि डायनामो, मोटारी परिवर्तित्रे (ट्रान्सफॉर्मर) आणि टर्बो वीजनिर्मिती यंत्रसंच. .. | ४ टक्के |
| | (ब) कृषी यंत्रसामग्री आणि तिचे भाग .. | ४ टक्के |
| | (क) तेल इंजिने, डिझेल इंजिने, वाफ इंजिने, पेट्रोल आणि गॅस इंजिन आणि द्रविक दाबाच्या सहाय्याने चालणारी यंत्रे आणि त्यांचे भाग. .. | ४ टक्के |
| | (ड) सर्व प्रकारची हत्यारे .. | ४ टक्के |
| | (ई) मुद्रणालयाची यंत्रे व सुटे भाग .. | ४ टक्के |
| | (फ) कोणतीही इतर यंत्रसामग्री आणि विनिर्देशपूर्वक तरतूद न केलेले तिचे घटक व सुटे भाग. .. | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'**--चालू

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| ५७ वाहने-- | | |
| | (अ) मोटारी, मोटार सायकली, साटेचे (चॅसिस) व मालमोटारी .. | ५ टक्के |
| | (ब) सायकली, बाबागाड्या, वाहन गाड्या, सर्व प्रकारची वाहने आणि त्यांचे घटक व सुटे भाग. .. | ४ टक्के |
| ५८ उपकरण संच, सामग्री उपयंत्रे आणि त्यांचे भाग-- | | |
| | (अ) शिवण यंत्रे, मोठी घड्याळे व घड्याळे आणि टंकलेखन यंत्रे व त्यांचे सुटे भाग. .. | ४ टक्के |
| | (ब) रेडिओ, रेडिओग्राम, दूरचित्रवाणी संच किंवा उपकरण संच, ध्वनिक्षेपक व ग्रामोफोन, ध्वनिवर्धक (ॲम्प्लिफायर्स), बिनतारी यंत्रांचे (वायरलेस) साहित्य, व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर्स, व्हिडिओ कॅसेट प्लेअर्स, सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू व त्यांचे घटक व सुटे भाग. .. | ५ टक्के |
| | (क) छायाचित्रणाची यंत्रसामग्री आणि छायाचित्रणाची रसायने, फिल्म आणि माऊंट यांसह छायाचित्रण साहित्य व सामग्री आणि त्यांचे घटक भाग व सुटे भाग. .. | ५ टक्के |
| | (ड) सिनेमा प्रक्षेपण यंत्रसामग्री, त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि त्यात उपयोगात आणलेले साहित्य. .. | ५ टक्के |
| | (इ) सर्वेक्षण उपकरण संच .. | ५ टक्के |
| | (फ) शास्त्रीय उपयंत्रे .. | ५ टक्के |
| | (ग) दृष्टिसहायक वस्तू, त्यांचे सुटे भाग व उपसाधने, शस्त्र-क्रियाविषयक उपकरणे, रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि त्यांचे सुटे भाग व उपसाधने. .. | ५ टक्के |
| | (ह) गिरणी आणि मुसा, कापसाचे दोर आणि सुटे भाग यांसह सरकी काढण्याचे यंत्र. .. | ४ टक्के |
| | (आय) सर्व प्रकारचे उपकरण संच, उपयंत्रे आणि सुटे भाग .. | ४ टक्के |
| ५९ अलोह धातू म्हणजे पितळ, तांबे, कथील, ॲल्युमिनियम, शिसे, जस्त, जर्मन सिल्वर, स्टेनलेस स्टील, त्यांचे मिश्र धातू, तारांच्या वस्तू आणि पत्रे, ढेपी आणि वेटोळी इत्यादी. .. | | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'--**चालू

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| | **वर्ग नऊ--संकीर्ण वर्ग** | |
| ६० | रंगद्रव्ये, काळवट रंग ( टॅन ), नीळ आणि छपाई पेस्ट, शाई आणि औद्योगिक वापराचे रंग यांच्यासहित रंगाचे सर्व पदार्थ. .. | ५ टक्के |
| ६१ | कागद-- | |
| | (अ) वृत्तपत्री कागद .. | ७ टक्के |
| | (ब) कार्डबोर्ड, स्ट्रॉबोर्ड, ग्रेबोर्ड आणि मिलबोर्ड .. | ७ टक्के |
| | (क) सर्व प्रकारचा कागद मग तो कोणत्याही मिश्रणाचा किंवा जाडीचा असो. .. | ७ टक्के |
| ६२ | लाख आणि कॉर्क झाडाची साल आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू .. | ४ टक्के |
| ६३ | लाकूड, दगड, चिकण माती किंवा धातू यांच्या नक्षीकाम केलेल्या वस्तू इतर वस्तू आणि मातीची भांडी. .. | ४ टक्के |
| ६४ | चिनी मातीची भांडी, पोर्सलिनची भांडी आणि अन्यथा विनिर्दिष्ट न केलेले विद्युतनिरोधक. .. | ४ टक्के |
| ६५ | (अ) सिनेमा फिल्म, सर्व कच्च्या फिल्म .. | ७ टक्के |
| | (ब) प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म किंवा रिळे .. | ७ टक्के |
| ६६ | काकवी .. | ७ टक्के |
| ६७ | एक प्रकारची पंचांगे (ऑल्मनॅक्स), पंचांगे व प्रवासी वाहतूक सेवांची वेळापत्रके तालिका यांसह पुस्तके आणि नियतकालिके, वाणिज्यिक प्रयोजनांसाठी माल, सेवा व वस्तू यांची प्रसिद्धी करणारी व सर्व प्रकाशने, रेस कार्डस्, लेखापुस्तके, रोजनिशी, दिनदर्शिका, कार्यालयीन फायली व दस्तऐवज, उत्तरपत्रिका (कोऱ्या किंवा वापरलेल्या), टॅग्ज, लग्नपत्रिका, शुभेच्छा पत्रिका, निमंत्रण पत्रिका, पोस्टकार्डे, चित्र पोस्टकार्ड, विशेष प्रसंगांकरिता कार्डे, नामपत्रिका, छायाचित्र संग्राहिका (फोटो अलबम), कागदांपासून बनविलेल्या तिकीट संग्राहिका (स्टॅम्प अलबम), पत्ते आणि वृत्तपत्रे. .. | ३ टक्के |

**अनुसूची 'अ'**--चालू

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| ६८ | वैरण व केवळ जनावरांसाठी तयार केलेले आंबोण यांसह पशुखाद्य, सरकी, पेंड आणि पूरक चारा. .. | २ टक्के |
| ६९ | विडीची पाने .. | २ टक्के |
| ७० | जळाऊ लाकूड, बांबू व खेळणी वगळून बांबूच्या बनविलेल्या इतर वस्तू .. | २ टक्के |
| ७१ | ताजे व सुके मासे व माशांचे तेल .. | २ टक्के |
| ७२ | ताजी फुले, ताजा भाजीपाला, बटाटे, रताळी, सुरण (याम), आले, कांदे, लसूण, ताजी फळे व सुपारी. .. | १ टक्का |
| ७३ | नागवेलींच्या पानांपासून तयार करण्यात आलेले पान, तांबूल, विडा किंवा पट्टी. .. | २ टक्के |
| ७४ | केळीची पाने, पळसाची पाने, पत्रावळ, द्रोण .. | १ टक्का |
| ७५ | मीठ .. | ३ टक्के |
| ७६ | दगडी पाट्या व पाटी पेन्सिली, खडू व रंगकाड्या, सराव वह्या व चित्रकलेच्या वह्या, शिसपेन्सिली, दर्शक यंत्रे व त्यांचे भाग, फाऊंटन पेन्स, बॉल पेन्स, स्टाईलग्राफ पेन्स, प्रॉपेलिंग पेन्सिली व रिफिल्स. .. | ३ टक्के |
| ७७ | ऊस .. | २ टक्के |
| ७८ | खनिज जल, औषधी, विशुद्ध किंवा खनिजविरहित पाणी, इंजेक्शन-साठी असलेले पाणी आणि वायुमिश्रित पाणी वगळता साधे पाणी. .. | ४ टक्के |
| ७९ | फुलांचे बी, फळाचे बी, भाज्यांचे बी, विलायती गवत व इतर वैरण चारा यांचे बी, भांग, ताग यांचे बी, कंदधान्य, मूळरूपी कांदे, चोशक खोडे व ग्रंथी असलेली खोडे (खाद्य ग्रंथीसहित), डोळ्यावर केलेली कलमे, छेद कलमे, दाब कलमे, बीजरोपे व वनस्पती. .. | २ टक्के |
| ८० | केवळ पाळीव पक्षी व इतर पक्षी यांच्याकरिता असलेले खाद्य व सत्व .. | ३ टक्के |
| ८१ | (सामान्यतः दारूकाम म्हणून वापरण्यात येणाऱ्या आगपेट्या वगळून) आगपेट्या. .. | ५ टक्के |
| ८२ | खेळांचे साहित्य, व्यायामशाळेचे साहित्य, गारगोटी, गोट्या व वाद्ये .. | ४ टक्के |

**अनुसूची 'अ'**--चालू

| १ | २ | | ३ |
|---|---|---|---|
| ८३ | कीटकनाशके म्हणून वापरण्यात येणारी तेले वगळता इतर कीटक-नाशके व कीटकनाशके, बुरशीनाशके व तृणनाशके. | .. | ४ टक्के |
| ८४ | बर्फ व सुका बर्फ. | .. | ३ टक्के |
| ८५ | सर्व प्रकारचे कुक्कुटवर्गीय पक्षी, बदके व पक्षी | .. | ३ टक्के |
| ८६ | मानवी केस व जनावरांचे केस | .. | ५ टक्के |
| ८७ | पारा | .. | ४ टक्के |
| ८८ | मधमाश्यांच्या पोळ्यातील मेण, बेबीबेरीपासून मिळणारे मेण व पेट्रोलियम मेण वगळता इतर मेण. | .. | ३ टक्के |
| ८९ | झाडू | .. | ३ टक्के |
| ९० | जीवनसत्वे | .. | ६ टक्के |
| ९१ | केरोसिन | .. | ४ टक्के |
| ९२ | लाल माती | .. | ४ टक्के |
| ९३ | हातमाग व हातमागाचे सुती कापड यांसाठी वापरण्यात येणारे सूत | .. | ५ टक्के |
| ९४ | या अनुसूचीच्या मागील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू वगळून सर्व वस्तू. | .. | ४ टक्के |

## अनुसूची ‘ब’

[ कलम १५२ क (१) पाहा. ]

### उपकरांच्या प्रदानापासून मुक्त असलेल्या वस्तू

| अनुक्रमांक<br>१ | मालाचे वर्णन<br>२ |
|---|---|
| १ | वीज |
| २ | हेलीकॉप्टरसहित सर्व प्रकारची विमाने आणि त्यापैकी कोणाचेही घटक, भाग व उपसाधने. |
| ३ | माइका ग्रॅफाईट आणि संक्रियित माती. |
| ४ | चलनी नोटा व नाणी. |
| ५ | रासायनिक खते व रसायनयुक्त खतासह खते. |
| ६ | रेशमाच्या किड्यांची अंडी व रेशमाच्या किड्यांचे कोश. |
| ७ | जीवनरक्षक औषधे आणि औषधे म्हणून किंवा अन्यथा वापरण्यात येत असलेले दंतमंजन किंवा टूथपेस्ट, सौंदर्य प्रसाधने, प्रसाधनासाठी आवश्यक असलेली सामग्री व साबण वगळता इतर औषधे, रक्त व गावठी औषधे. |

## अनुसूची 'क'

[ कलम १५२ क (२) पाहा. ]

### ज्या मालावर महानगरपलिकेला उपकर देय नसेल अशा मालाची यादी

| अनुक्रमांक<br>१ | मालाचे वर्णन<br>२ |
|---|---|
| १ | हवाई, सागरी, नदी, रेल्वे किंवा रस्ते या मार्गाने येणाऱ्या प्रवाशांचे खरेखुरे वैयक्तिक सामान आणि आयातीच्या वेळी आधीच वापरण्यात आलेल्या असतील अशा त्यांच्या खाजगी आणि वैयक्तिक वापराच्या वस्तू. |
| २ | शैक्षणिक संस्थांच्या खऱ्याखुऱ्या वापराकरिता श्रमशक्तीद्वारे चालवली जाणारी यंत्रे. |
| ३ | दौऱ्यावर असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची शिबीर सामग्री. |
| ४ | सैन्य तुकडीचा प्रमुख असणाऱ्या अधिकाऱ्याने त्यांच्या सैनिकांच्या व छावणीतील लोकांच्या प्रत्यक्ष व अनन्य वापरासाठी खरेदी केलेली (खाण्यापिण्याची वस्तू नसलेली) आवश्यक सामग्री व वस्त्रे, मात्र ही सामग्री उपकर हद्दीत प्रवेश करील त्यावेळी तिच्यासोबत प्रमुख अधिकाऱ्याने दिलेले असेल, ती तशा उद्देशासाठी असल्याबाबतचे प्रमाणपत्र असेल तर आणि तेव्हा. |
| ५ | खुद्द प्रदर्शनाच्या आगगाडीतून किंवा उपकराच्या हद्दीत भरविण्यात यावयाच्या कोणत्याही प्रदर्शनात मांडण्यासाठी परंतु विक्रीसाठी नव्हे असा उपकराच्या हद्दीत प्रवेश करणारा माल, यांपैकी दुसऱ्या बाबतीत उक्त प्रदर्शनाच्या कार्यवाहीने किंवा त्याचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यवस्थापकाने दिलेले तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केल्यावर. |
| ६ | मुक्त वाटपाकरिता असलेले व हस्तांतरण किंवा विक्री याकरिता नसलेले आणि आयातकाने तसे प्रमाणित केलेले खरेखुरे व्यापारविषयक नमुने. |
| ७ | रेल्वे, सागरी किंवा हवाई मार्गाने आयात केलेला आणि रेल्वे, गोदी, बंदरे, धक्के आणि विमानतळांच्या आवारातून न हलवता पुन्हा नोंदणी केलेला आणि निर्यात केलेला माल. |
| ८ | न्यायालयाच्या आदेशानुसार त्याच्या कार्यालयीन वापराच्या संबंधात आयात केलेला माल. |
| ९ | उपकर हद्दीच्या बाहेर होणारी पार्टी, विवाह समारंभ व सार्वजनिक समारंभ यासाठी भाड्याने नेलेले, वापरलेले फर्निचर, तंबू, खोळदऱ्या, चिनी मातीची भांडी, भांडी, दिवे, बॅलीज ते साहित्य उपकर प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने बाहेर नेलेले असेल आणि उपकराच्या हद्दीमध्ये ते पुन्हा आणताना उक्त लेखी परवानगीसह आणले जात असेल तेव्हा. |

**अनुसूची 'क'--**चालू

| अनुक्रमांक | मालाचे वर्णन |
|---|---|
| १ | २ |
| १० | दुरुस्तीसाठी किंवा प्रक्रिया करण्यासाठी उपकर हद्दीच्या बाहेर नेलेली यंत्रे, उपकरणे व इतर साधने आणि त्यांचे घटक भाग उपकर प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने उपकराच्या हद्दीमध्ये पुन्हा आणताना उक्त लेखी परवानगीसह आणले जात असतील तेव्हा. |
| ११ | कोणत्याही विदेशी सरकारकडून किंवा भारतात कार्यरत असलेल्या त्यांच्या मान्यताप्राप्त संस्थांकडून मदत किंवा सहाय्य म्हणून निःशुल्क देण्यात आलेला कोणताही माल. |

**स्पष्टीकरण एक.--**या नोंदीच्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे, राज्य शासनाने **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून अशी संस्था म्हणून विनिर्दिष्ट केलेली संस्था.

**स्पष्टीकरण दोन.--**कोणतेही विशिष्ट बक्षीस या नोंदीखाली सवलतीकरिता पात्र आहे किंवा नाही याबद्दल कोणतीही शंका उद्‌भवली तर, ते प्रकरण, राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविले जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

१२ कुटुंब नियोजन प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारी सर्व संतती प्रतिबंधक साधने, औषधे किंवा उपयंत्रे.

१३ (एक) कापसाचे हातकताईचे सूत आणि खादीचे कापड.

(दोन) हातकताईचे लोकरीचे सूत आणि हाताने विणलेले कपडे घोंगड्यांसह.

(तीन) हातकताईची व रेशीम सुताची रीळ व हाताने विणलेले रेशमी कपडे, टसर सूत व कापडासह.

(चार) ग्रामोद्योग उत्पादने.

**स्पष्टीकरण.--**या नोंदी खालील मालाला उपकर शुल्क भरण्यातून द्यावयाची सूट, ही महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने किंवा खादी व ग्रामोद्योग आयोगाने माल प्रमाणित केलेला असावा या शर्तीच्या अधीन राहून देण्यात येईल.

१४ भारतीय रिझर्व्ह बँकेने तिच्या अभीकरण बँकांकडे किंवा त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे रवाना करावयाचा शासकीय निधी भरण्यासाठी अभीकरण बँकांकडे पाठविलेल्या रिकाम्या निधी पेट्या.

१५ भारत सरकारने पुरविलेला सवलतींच्या दराचा चांगल्या प्रतीचा पांढरा छपाईचा कागद.

१६ शहराच्या हद्दींमधून पाठविण्यात आलेल्या परंतु माल घेणाऱ्याने पूर्णपणे किंवा अंशतः घेण्याचे नाकारल्यामुळे माल पाठविणाऱ्याकडे निर्यातीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत परत पाठविण्यात आलेल्या स्थानिक पातळीवर उत्पादित केलेल्या वस्तू, पुरेसा लेखी पुरावा जोडण्याच्या शर्तीच्या अधीनतेने.

**अनुसूची 'क'**--चालू

| अनुक्रमांक १ | मालाचे वर्णन २ |
|---|---|
| १७ | (एक) फ्लॅट प्लेट सोलर कलेक्टर्स. |
| | (दोन) कॉन्सेन्ट्रेटिंग आणि पाईप प्रकारचे सोलर कलेक्टर्स. |
| | (तीन) सोलर कुकर. |
| | (चार) सोलर वॉटर हीटर्स आणि प्रणाली. |
| | (पाच) हवा/गॅस/द्रायु (फ्लुइड) उष्मन पद्धती. |
| | (सहा) सोलर क्रॉप ड्रायर्स आणि प्रणाली. |
| | (सात) सोलर स्टील आणि डीसॅलीनेशन पद्धती. |
| | (आठ) सोलर थर्मलवर आणि सोलर फोटोव्होटाईक कन्व्हेंजनवर आधारित सोलर पंप. |
| | (नऊ) सौरशक्ती वीजनिर्मिती प्रणाली. |
| | (दहा) वॉटर पम्पिंग व इतर उपयोगाकरिता सोलर फोटो व्होल्टाईक मॉड्यूल आणि पॅनल. |
| | (अकरा) पवनचक्की आणि पवनचक्क्यांवर चालणारी विशेषरीत्या बनवलेली साधने. |
| | (बारा) पवन ऊर्जेवर चालणारी विद्युत जनित्रे आणि पंप यांसह अन्य कोणतीही विशेष साधने. |
| | (तेरा) बायोगॅस संयंत्रे आणि बायोगॅस इंजिन. |
| | (चौदा) शेतीशी संबंधित कचरा आणि महानगरपालिकेने गोळा केलेला कचरा यातून ऊर्जा निर्माण करण्याची साधने. |
| | (पंधरा) सागरी लाटा आणि औष्णिक ऊर्जा यांच्या वापराकरिता साधनसामग्री. |

(१८) शासनाने मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यासाठी आयात केलेले चित्रपट.

(१९) फिरती सर्कस किंवा नाटके, लोकनाट्ये किंवा तमाशा सादर करणाऱ्या फिरत्या नाटक कंपन्या यांच्या मालकीचे आणि नाटके, लोकनाट्ये, किंवा यथास्थिति, तमाशा सादर करण्यासाठीच वापरावयाचे खरेखुरे सामान व साहित्यपेटी.

(२०) (अ) पाव (हाताने बनविलेला).

(ब) गणेश चतुर्थीच्यावेळी आणण्यात येणाऱ्या शाडूच्या किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती.

९. (१) मुंबई प्रांतिम महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २००८ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००८ चा महा. अध्या. ७.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा काढण्यात आलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

## [१][अनुसूची-घ]*

(कलम ४५३ पाहा)

### प्रकरण एक

### निवडणूक नियम

### नगरपालिका मतदारांची यादी

मतदारांची यादी लोकांना पाहण्यासाठी ठेवणे.

[२][१. नगरपालिका मतदारांच्या यादीच्या छापील प्रती लोकांना पाहण्यासाठी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात आणि आयुक्तास योग्य वाटेल अशा अन्य ठिकाणी ठेवल्या पाहिजेत.]

### पालिका सदस्यांच्या निवडणुका

नामनिर्देशनांचे दिनांक.

७. (१) लगत पूर्ववर्ती सार्वत्रिक निवडणुकांत निवडून आलेल्या पालिका सदस्यांचा पदावधी कलम ६ अन्वये ज्या दिनांकास संपणार असेल त्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या तीन महिन्यांतील जे दिवस आयुक्तास योग्य वाटतील त्या दिवशी पालिका सदस्यांच्या प्रभागाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येतील, असे आयुक्ताकडून ठरवण्यात आले पाहिजे.

(२) नैमित्तिक रिकाम्या जागा निर्माण झाल्यानंतर सोयीप्रमाणे, शक्य तितक्या लवकर, आयुक्तास योग्य वाटेल अशा दिवशी, अशा रिकाम्या जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुकांसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येतील असे आयुक्ताकडून ठरवण्यात आले पाहिजे.

प्रभागाच्या निवडणुकांसाठी उमेदवारांच्या नामनिर्देशनांसाठी ठरवलेल्या दिवसासंबंधी नोटीस देणे.

८. प्रभागाच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी ठरवलेल्या दिवसापूर्वी निदान पंधरा दिवस अगोदर, आयुक्ताने त्यासंबंधी नोटीस दिली पाहिजे. अशी नोटीस राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन आणि अशी निवडणूक ज्या प्रभागासाठी घेण्यात येणार असेल त्या प्रभागातील ठळक ठिकाणी मोठ्या जाहिराती लावून दिली पाहिजे.

उमेदवारांच्या नामनिर्देशनां-संबंधी तरतुदी.

९. (१) प्रभागाच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींनुसार रीतसर लेखी सादर करण्यात आली पाहिजेत.

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ८ (अ) द्वारे "अनुसूची" या शीर्षकाऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. मूळ नियम १ ते ६ ऐवजी नियम १ हा, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

* महाराष्ट्र राज्य विधानमंडळाद्वारे अधिनियमित केलेल्या अधिनियमानुसार या अनुसूचीतील सुधारणा समाविष्ट केलेल्या आहेत.

(२) अशा नामनिर्देशनपत्रांच्या बाबतीत, पोट-नियम (३) च्या अधीन, पुढील तरतुदी लागू असतील :--

(अ) नामनिर्देशनपत्रे नमुना 'अ' मध्ये असली पाहिजेत ;

(ब) आयुक्ताने नामनिर्देशनपत्रांचे छापील नमुने पुरवले पाहिजेत आणि निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी ठरवलेल्या दिवसापूर्वी सात दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी व त्या दिवशी दुपारी चार वाजेपर्यंत, त्या व्यक्तीस असे जितके नमुने आवश्यक असतील तितके नमुने आयुक्ताने विनामूल्य पुरवले पाहिजेत ;

(क) प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे नाव, राहण्याचे ठिकाण व वर्णन संपूर्णपणे नमूद केले पाहिजे आणि निवडणुकीत मत देण्याचा हक्क असणाऱ्या दोन व्यक्तींनी सूचक व अनुमोदक म्हणून त्यावर स्वाक्षऱ्या केल्या पाहिजेत आणि अशा रीतीने नामनिर्देशित करण्यास संमती असल्याचे दर्शक म्हणून त्यावर अशा रीतीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने सही केली पाहिजे ;

(ड) वर सांगितल्याप्रमाणे स्वाक्षरी व सही केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र, उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी ठरवलेल्या दिवशी दुपारी पाच वाजण्यापूर्वी आयुक्ताच्या कार्यालयात दिले पाहिजे ;

(ई) प्रत्येक उमेदवाराचे नामनिर्देशन वेगवेगळ्या नामनिर्देशनपत्राने करण्यात आले पाहिजे ;

[१] [ * * * * ]

(फ) आयुक्ताने नामनिर्देशनपत्र मिळाल्यावर त्या नामनिर्देशनपत्रावर त्याचा अनुक्रमांक लिहिला पाहिजे आणि त्यास ज्या दिनांकास व ज्यावेळी ते नामनिर्देशनपत्र मिळाले असेल तो दिनांक व ती वेळ नमूद करणारे प्रमाणपत्र देऊन त्यावर सही केली पाहिजे ;

(ग) कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा [२] [अधिक नामनिर्देशनपत्रांवर स्वाक्षरी केली असेल तर, पहिले नामनिर्देशनपत्र मिळाल्यानंतर मिळालेली नामनिर्देशनपत्रे बेकायदेशीर आहेत असे मानले जाईल.]

(ह) [३] [(एक) कोणतीही नामनिर्देशित व्यक्ती, कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हताप्राप्त नसेल;]

(दोन) तिने, नियम १०, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली रक्कम अनामत म्हणून ठेवली नसेल किंवा ठेवण्याची व्यवस्था केली नसेल, किंवा

(तीन) ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये पालिका सदस्य होण्यास अनर्ह असेल तर, आयुक्ताने, अशा व्यक्तीचे नामनिर्देशन बेकायदेशीर असल्याचे जाहीर केले पाहिजे ;

(आय) एकही कायदेशीर नामनिर्देशन नसेल तर, एकही पालिका सदस्य निवडून आला नाही असे मानले जाईल आणि रिकामी किंवा रिकाम्या जागा भरण्यासाठी कलम १८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल ;

---

१. हा मजकूर, सन १९६७ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ३ (अ) (एक) अन्वये वगळण्यात आला.

२. मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) (दोन) अन्वये दाखल करण्यात आला.

३. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ८ द्वारे मूळ उप-खंड (एक) ऐवजी हा उपखंड दाखल केला.

(ज) कायदेशीर नामनिर्देशनांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, नामनिर्देशित व्यक्ती निवडून आल्या आहेत असे मानले जाईल आणि रिकाम्या राहिलेल्या जागेसाठी किंवा जागांसाठी कोणताही पालिका सदस्य निवडून आला नाही असे मानले जाईल, आणि अशी रिकामी किंवा रिकाम्या जागा भरण्यासाठी कलम १८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल ;

(के) कायदेशीर नामनिर्देशनांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येइतकीच असेल तर, नामनिर्देशित व्यक्ती निवडून आल्या आहेत असे मानले जाईल ;

(ल) कायदेशीर नामनिर्देशनांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर, नामनिर्देशित व्यक्तींमधून पालिका सदस्यांची निवडणूक घेण्यात येईल आणि अशा निवडणुकीस "लढवलेली निवडणूक" असे म्हटले जाईल :

परंतु, कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेला कोणताही उमेदवार मरण पावला किंवा उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवसानंतर सात दिवसांच्या आत, निवडणूक न लढवण्याचा आपला उद्देश आहे असे त्याने आयुक्तास लेखी कळवले तर, राहिलेल्या कायदेशीर नामनिर्देशनांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल किंवा रिकाम्या जागांच्या संख्येइतकीच असेल तेव्हा, कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेले बाकीचे उमेदवार निवडून आले आहेत असे मानले जाईल :

आणखी असे की, ज्या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली असेल त्या उमेदवारास, उमेदवारी मागे घेतल्याचे रद्द करण्यास किंवा त्याच निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून पुन्हा नामनिर्देशित केले जाण्यास परवानगी देण्यात येणार नाही ;

(म) निरनिराळ्या प्रभागांसाठी दोन किंवा अधिक प्रभागांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या असतील तेव्हा, कोणतीही व्यक्ती, खंड (झ) किंवा खंड (ञ) अन्वये एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून आली आहे असे मानले गेले असेल तर, तिने, त्याबाबत आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत, आपली संमती स्वतःच्या सहीने, आयुक्तास लेखी कळवली पाहिजे किंवा तिने तसे करण्यात कसूर केल्यास, आयुक्ताने अशा पसंतीसाठी देण्यात आलेली वेळ संपेल तेव्हा, ती व्यक्ती अशा प्रभागांपैकी कोणत्या प्रभागांसाठी काम करील तो प्रभाग घोषित केला पाहिजे; अशा रीतीने केलेली पसंती किंवा घोषणा निर्णायक असेल, आणि ज्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी त्या व्यक्तीने काम करावयाचे नसेल त्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी करण्यात आलेले त्या व्यक्तीचे नामनिर्देशन, रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल ;

(न) वर सांगितल्याप्रमाणे प्रभागांच्या निवडणुका घेण्यात आल्या असतील तेव्हा, जी कोणतीही व्यक्ती, खंड (झ) किंवा खंड (ञ) अन्वये कोणत्याही एका किंवा अधिक प्रभागांसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून आली आहे असे मानले गेले असेल अशी कोणतीही व्यक्ती, ज्या प्रभागांसाठी नामनिर्देशनांची

संख्या, ही रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल अशा कोणत्याही एका किंवा अधिक प्रभागांसाठी देखील रीतसर नामनिर्देशित करण्यात आली असेल तर, तिने, त्याबाबत आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत, ज्या प्रभागातून ती निवडून आली असेल त्या प्रभागासाठी काम करणार आहे किंवा कसे, किंवा ती ज्या प्रभागातून निवडून आली असेल त्या प्रभागांपैकी कोणत्याही एका प्रभागासाठी काम करणार आहे किंवा कसे, किंवा अन्य प्रभागांसाठी किंवा प्रभागासाठी लढवण्यात येणाऱ्या निवडणुकीसाठी किंवा निवडणुकांसाठी उमेदवार म्हणून उभी राहणार आहे किंवा कसे याविषयी आपली पसंती स्वतःच्या सहीने आयुक्तास लेखी कळवली पाहिजे. तिने तसे करण्यात कसूर केल्यास, आयुक्ताने, अशा पसंतीसाठी देण्यात आलेली वेळ संपेल तेव्हा, ती व्यक्ती ज्या प्रभागातून ती निवडून आली आहे त्या प्रभागासाठी किंवा ती ज्या प्रभागातून निवडून आली आहे त्या प्रभागांपैकी एखाद्या प्रभागासाठी काम करील असे घोषित केले पाहिजे, आणि अन्य कोणत्याही प्रभागासाठी करण्यात आलेले त्या व्यक्तीचे नामनिर्देशन रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल. अशा व्यक्तीने, लढवण्यात येणाऱ्या निवडणुकीसाठी किंवा निवडणुकांसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचे, वर सांगितल्याप्रमाणे लेखी पसंत केले असेल तर, ज्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी ती निवडून आली असेल त्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी करण्यात आलेले तिचे नामनिर्देशन रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल. या खंडान्वये केलेली कोणतीही पसंती किंवा घोषणा निर्णायक असेल.

(३) कोणताही पालिका सदस्य [१][अनुसूचित जातीचा सदस्य] नसेल तर, तो कोणत्याही प्रभागात [२][अनुसूचित जातीच्या सदस्यांसाठी] राखून ठेवलेल्या जागेवर पोट-नियम (२) अन्वये निवडून आला आहे असे मानले जाणार नाही आणि अशा कोणत्याही जागेच्या बाबतीत आणखी पुढील तरतुदी लागू होतील :---

(अ) [२][अनुसूचित जातीच्या सदस्यांसाठी] राखून ठेवलेल्या कोणत्याही रिकाम्या जागेसाठी अशी जागा भरण्यासाठी पात्र असलेला एकही उमेदवार कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेला नसेल तर, कोणताही पालिका सदस्य निवडून आला नाही असे मानले जाईल आणि रिकामी जागा भरण्यासाठी कलम १८ अन्वये कार्यवाही करण्यात आली पाहिजे ;

(ब) अशा कोणत्याही रिकाम्या जागांसाठी अशा रीतीने पात्र असलेल्या व कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, असे उमेदवार निवडून आले आहेत असे मानले जाईल आणि राहिलेल्या रिकाम्या जागेसाठी किंवा जागांसाठी, कोणताही पालिका सदस्य निवडून आला नाही असे मानले जाईल आणि अशी रिकामी जागा किंवा अशा रिकाम्या जागा भरण्यासाठी कलम १८ अन्वये कार्यवाही करण्यात आली पाहिजे ;

(क) अशा कोणत्याही रिकाम्या जागांसाठी अशा रीतीने पात्र असलेल्या व कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येइतकीच असेल तर, असे उमेदवार निवडून आले आहेत, असे मानले जाईल ;

---

१. मूळ शब्दांऐवजी हे शब्द, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २, अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

२. मूळ शब्दांऐवजी हे शब्द, वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

(ड) अशा रीतीने पात्र असलेला व कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेला कोणताही उमेदवार मरण पावला किंवा उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिनांकानंतर सात दिवसांच्या आत, निवडणूक न लढवण्याचा आपला उद्देश आहे असे त्याने आयुक्तास लेखी कळवले तर, अशा रीतीने पात्र असलेल्या व कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेल्या बाकी उमेदवारांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल किंवा रिकाम्या जागांच्या संख्येइतकीच असेल तेव्हा, अशा रीतीने पात्र असलेले व कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेले बाकीचे उमेदवार निवडून आले आहेत असे मानले जाईल.

उमेदवारांनी अनामत रक्कम ठेवणे.

**१०.** (१) प्रभागांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी प्रत्येक उमेदवाराने आयुक्ताकडे रुपये शंभर इतकी रोख किंवा त्या दिवशीच्या बाजारभावाप्रमाणे तितक्याच मूल्यांच्या सरकारी कर्जरोख्यांच्या स्वरूपात अनामत रक्कम म्हणून ठेवली पाहिजे किंवा ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि अशा रीतीने अनामत रक्कम ठेवण्यात आली नसेल तर, कोणताही उमेदवार रीतसर नामनिर्देशित करण्यात आला आहे असे मानले जाणार नाही.

(२) (अ) उमेदवार रीतसर निवडून आला आहे असे जाहीर करण्यात आले किंवा तसे मानले गेले,

(ब) उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवसानंतर सात दिवसांच्या आत निवडणूक न लढवण्याचा आपला उद्देश आहे असे उमेदवाराने आयुक्तास लेखी कळवले,

(क) उमेदवारांचे नामनिर्देशन बेकायदेशीर ठरवण्यात आले,

(ड) नामनिर्देशन पत्रांच्या छाननीनंतर आणि मतदान सुरू होण्यापूर्वी उमेदवार मरण पावला, किंवा

(ई) उमेदवार निवडून आला नसेल परंतु, त्याने पोट-नियम (४) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या संख्येपेक्षा अधिक कायदेशीर मते मिळवली असतील,

तर अनामत रक्कम परत करण्यात आली पाहिजे.

(३) अनामत रक्कम ज्या व्यक्तीने ठेवली होती त्या व्यक्तीस ती परत करण्यात आली पाहिजे. मतदानासाठी ठरवलेल्या दिनांकापूर्वी उमेदवार मरण पावल्यास, त्याने अनामत रक्कम ठेवली असेल तर ती त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीस परत केली पाहिजे आणि ती अनामत रक्कम त्या उमेदवाराने ठेवली नसेल तर, ज्या व्यक्तीने ती ठेवली होती त्या व्यक्तीस ती परत केली पाहिजे.

(४) उमेदवार निवडून आला नाही आणि त्यास मिळालेल्या कायदेशीर मतांची संख्या ही, ज्या प्रभागासाठी उमेदवार नामनिर्देशित केला असेल त्या प्रभागात निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येने मतदान झालेल्या एकूण कायदेशीर मतांच्या संख्येस भागले असता येणाऱ्या संख्येच्या एक-अष्टमांशाइतक्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, त्याची अनामत रक्कम जप्त होऊन महानगरपालिकेकडे जमा केली जाईल.

(५) अनामत रक्कम जप्त झाली नाही तर, ती, नियम ३९ अन्वये निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर परत करण्यात आली पाहिजे :

परंतु, एखादा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी रीतसर नामनिर्देशित केलेला असेल तर, त्याने किंवा त्याच्या वतीने ठेवलेल्या अनामत रकमांपैकी फक्त एक अनामत रक्कम परत करण्यात येईल आणि बाकीच्या अनामत रकमा जप्त होऊन महानगरपालिकेकडे जमा केल्या जातील.

११. (१) प्रभागासाठी निवडणूक लढवण्यात येईल तेव्हा, उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवसानंतर एकवीस दिवसांपेक्षा आधीची नसेल असा जो दिनांक आयुक्त ठरवील अशा दिनांकास मतदान घेतले पाहिजे. अशा मतदानाच्या वेळी उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवशी अंमलात असलेली नगरपालिका मतदारांची यादी ही, निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी ज्या यादीचा संदर्भ केला पाहिजे ती यादी आहे असे मानले जाईल. प्रभागासाठी निवडणूक लढवण्यात येईल तेव्हा मतदान घेणे आणि कायदेशीररीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करणे.

(२) मतदानाच्या दिवसाच्या निदान तीन दिवस अगोदर, आयुक्ताने, रीतसर नामनिर्देशित करण्यात आलेल्या सर्व व्यक्तींची नावे, त्यांची अनुक्रमे राहण्याची ठिकाणे आणि वर्णने राजपत्रात आणि स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१२. प्रभागाच्या लढवण्यात येणाऱ्या निवडणुकांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :— प्रभागाच्या लढवण्यात येणाऱ्या निवडणुकां-संबंधी तरतुदी.

(अ) मते गुप्त मतदान पद्धतीने व जातीने देण्यात आली पाहिजेत, बदली व्यक्तीमार्फत कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

(ब) आयुक्ताने, ज्या कोणत्याही उमेदवाराचे नाव, नियम ११, पोट-नियम (२) अन्वये कायदेशीररीत्या नामनिर्देशित म्हणून प्रसिद्ध केले नसेल अशा उमेदवारांसाठी कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

(क) ज्या प्रभागासाठी निवडणूक घेण्यात येत आहे त्या प्रभागाचा मतदार म्हणून त्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीत ज्या व्यक्तीचे नाव दाखल करण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

[१][ * * * * * * ]

[२][ (ई) प्रत्येक मतदारास फक्त एक मत देण्याचा हक्क असेल, आणि त्यास ते मत उमेदवारांपैकी कोणत्याही एकाच उमेदवारास देता येईल ; ]

[३][ * * * * * * ]

(ग) कोणत्याही उमेदवारामध्ये समसमान मते पडल्याचे आढळून येईल आणि एका मताची भर घातली असता त्या उमेदवारांपैकी कोणत्याही एका उमेदवारास निवडून आल्याचे जाहीर केले जाण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर, ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना असे जादा मत देण्यात आले आहे असे मानले जाईल ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती आयुक्ताच्या समक्ष, तो ठरवील अशा रीतीने, चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात आले पाहिजेत ;

१. खंड (ड) हा, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० (ब) अन्वये वगळण्यात आला.

२. मूळ खंड (ई) ऐवजी हा खंड, सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ (ब) (एक) अन्वये दाखल करण्यात आला.

३. खंड (फ) हा, वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) (दोन) अन्वये वगळण्यात आला.

(ह) एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून आला असेल तर, त्याने त्याबाबत आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत आपली पसंती स्वतःच्या सहीने आयुक्तास लेखी कळवली पाहिजे, किंवा त्याने तसे करण्यास कसूर केल्यास, आयुक्ताने, अशा पसंतीसाठी देण्यात आलेली वेळ संपेल तेव्हा, तो उमेदवार अशा प्रभागांपैकी कोणत्या प्रभागासाठी काम करील ते घोषित केले पाहिजे आणि अशा रीतीने केलेली पसंती किंवा घोषणा निर्णायक असेल ;

(आय) अशी कोणतीही पसंती किंवा घोषणा करण्यात येईल तेव्हा, पूर्वोक्त उमेदवार ज्या प्रभागासाठी काम करणार नसेल अशा कोणत्याही प्रभागात त्याच्यासाठी नोंदलेली मते ही, देण्यात आली नाहीत असे मानले जाईल आणि उक्त मतांच्या अभावी जो उमेदवार, तसा उमेदवार असल्यास, अशा प्रभागासाठी निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले असते तो उमेदवार त्या प्रभागासाठी निवडून आला आहे, असे मानले जाईल :

(ज) आयुक्ताने, शक्य तितक्या लवकर मतदानाचा निकाल जाहीर केला पाहिजे व त्यात प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या कायदेशीर मतांची एकूण संख्या विनिर्दिष्ट केली पाहिजे ; तसेच, त्याने प्रत्येक प्रभागासाठी याद्या तयार करून त्यात सर्व उमेदवारांची नावे व प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या कायदेशीर मतांची एकूण संख्या विनिर्दिष्ट करण्याची व्यवस्था केली पाहिजे ; आयुक्त या प्रयोजनासाठी तयार करील अशा नियमांस अनुसरून आणि तो विहित करील अशी फी देण्यात आल्यावर अशा यादीची एक प्रत प्रभागाच्या कोणत्याही उमेदवारास पुरवण्यात आली पाहिजे आणि ती यादी प्रभागातील कोणत्याही मतदारास पाहण्यासाठी उपलब्ध करून दिली पाहिजे.

**प्रभागाच्या निवडणुकांतील मतदान**

मतदानास सुरुवात होण्याची व ते बंद होण्याची वेळ.

**१३.** मतदानासाठी नियम ११ अन्वये ठरवलेल्या दिनांकास ज्या वेळी मतदानास सुरुवात होईल व ज्या वेळी मतदान बंद होईल त्या वेळा आयुक्ताने ठरवल्या पाहिजेत.

मतदान केंद्रे आणि मतदान केंद्राध्यक्ष.

**१४.** (१) आयुक्ताने, प्रत्येक प्रभागासाठी त्यास आवश्यक वाटतील इतकी मतदान केंद्रे निवडली पाहिजेत आणि अशा रीतीने निवडलेली मतदान केंद्रे व ज्या मतदान क्षेत्रासाठी ती अनुक्रमे निवडण्यात आली असतील ती मतदान क्षेत्रे दर्शविणारी एक यादी त्यास पुरेशी वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे.

(२) आयुक्ताने प्रत्येक मतदान केंद्रासाठी एका मतदान केंद्राध्यक्षाची नेमणूक केली पाहिजे आणि मतदान केंद्राध्यक्षास साहाय्य करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा अन्य व्यक्तींची, ज्यांचा यात यापुढे मतदान अधिकारी असा उल्लेख करण्यात आला आहे, नेमणूक केली पाहिजे.

(३) प्रत्येक मतदान अधिकाऱ्यास, मतदान केंद्राध्यक्षाने तसा निदेश दिल्यास, या नियमान्वये मतदान केंद्राध्यक्षाकडे सोपवलेली सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडता येतील.

(४) मतदान केंद्राध्यक्षास आजारीपणामुळे किंवा अन्य अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्रावर उपस्थित राहता आले नाही तर त्याची कर्तव्ये, आयुक्त याबाबत मतदान अधिकाऱ्यांपैकी ज्या मतदान अधिकाऱ्यास रीतसर प्राधिकृत करील त्या मतदान अधिकाऱ्याने पार पाडली पाहिजेत.

मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये.

**१५.** (१) मतदान केंद्राध्यक्षाने मतदान केंद्रावर सुव्यवस्था राखली पाहिजे, निवडणूक योग्य प्रकारे घेण्यात येत आहे याकडे लक्ष दिले पाहिजे, एका वेळी आत जाऊ द्यावयाच्या मतदारांच्या संख्येचे नियमन केले पाहिजे, आणि तसेच, त्याने –

(अ) मतदान अधिकारी, उमेदवार आणि उमेदवाराने लेखी नेमलेला व आयुक्ताने याबाबत प्राधिकृत केलेला प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी (ज्याचा यात यापुढे मतदान प्रतिनिधी असा उल्लेख करण्यात आला आहे );

(ब) मतदान अधिकारी किंवा कामावर असलेले अन्य लोकसेवक ; आणि

(क) मतदारांना ओळखण्याच्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राध्यक्ष वेळोवेळी प्रवेश देईल अशा अन्य व्यक्ती ;

यांच्या व्यतिरिक्त अन्य सर्व व्यक्तींना बाहेर काढले पाहिजे.

[१][(२) मतदान केंद्राध्यक्षाने, नियम १३ अन्वये त्याबाबतीत निश्चित केलेल्या वेळी मतदान केंद्र बंद केले पाहिजे आणि त्यानंतर, त्याने कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश करू देता कामा नये :

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना मतदान करण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे.

(३) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे यासंबंधी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, मतदान केंद्राध्यक्षाने त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे व त्याचा निर्णय अंतिम असेल].

गैरवर्तणुकी-बद्दल मतदान केंद्रातून बाहेर काढणे.

**१६.** कोणतीही व्यक्ती, स्वत: मतदान केंद्रावर गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षांच्या किंवा मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडणाऱ्या मतदान अधिकाऱ्याच्या कायदेशीर आदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर, त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा अशा मतदान अधिकाऱ्यांच्या आदेशावरून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा मतदान केंद्राध्यक्षाने किंवा अशा मतदान अधिकाऱ्याने त्या व्यक्तीस बाहेर काढण्यासाठी लेखी प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मतदान केंद्रातून ताबडतोब बाहेर काढता येईल ; आणि अशा रीतीने बाहेर काढलेल्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षांच्या किंवा अशा मतदान अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, त्या दिवशी मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश करू देता कामा नये :

परंतु, कोणत्याही मतदान केंद्रात मत देण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास अशा मतदान केंद्रात मत देण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने या अधिकाराचा वापर करता कामा नये.

[२][ * * * * * * ]

---

१. पोट-नियम (२) व (३) हे, सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ (१) (अ) अन्वये मूळ पोट-नियम (२) च्या ऐवजी दाखल करण्यात आले.

२. नियम १७ हा, सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ (१) (ब) अन्वये वगळण्यात आला.

मतदान कक्ष. **१८.** प्रत्येक मतदान केंद्रात मतदारांना आपली मते लोकांना दिसणार नाहीत अशा रीतीने नोंदता यावीत म्हणून, आयुक्तास आवश्यक वाटतील इतक्या मतदान कक्षांची तरतूद केली पाहिजे.

निवडणुकीची सामग्री व मतपेट्या पुरवणे. **१९.** आयुक्ताने प्रत्येक मतदान केंद्रात, मतदारांना मतपत्रिकांवर खुणा करता याव्यात म्हणून पुरेशी सामग्री, आवश्यक असतील तितक्या मतपेट्या आणि अशा मतदान केंद्रात मतदान करण्याचा हक्क असलेल्या मतदारांची नावे ज्यात असतील अशा मतदारांच्या यादीच्या किंवा अशा यादीच्या अशा भागाच्या प्रती यांची तरतूद केली पाहिजे.

मतपेट्यांना मोहोर लावणे. **२०.** प्रत्येक मतपेटीची रचना अशी करण्यात आली पाहिजे की, तीत मतपत्रिका टाकता येतील, परंतु तिचे कुलूप काढल्याशिवाय त्यामधून मतपत्रिका काढता येणार नाहीत. मतदान सुरू होण्याच्या निकटपूर्वी, कोणत्याही मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षाने अशा मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या व्यक्तींना रिकामी मतपेटी दाखविली पाहिजे म्हणजे ती रिकामी असल्याविषयी त्यांची खात्री होईल, आणि त्यानंतर त्याने तिला कुलूप लावून तिच्यावर अशा रीतीने आपली मोहोर लावली पाहिजे की, अशी मोहोर तोडल्याशिवाय ती मतपेटी उघडता येणार नाही. त्यानंतर त्याने ती मतपेटी मतपत्रिका टाकण्यासाठी, त्यास दिसेल अशा जागी आणि अशा रीतीने कुलूप लावून मोहोरबंद केलेल्या स्थितीत ठेवली पाहिजे.

मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वीची कार्यपद्धती. **२१.** मतदारास मतपत्रिका देण्याच्या निकटपूर्वी, मतदारांच्या यादीत नमूद केल्याप्रमाणे त्या मतदाराचा क्रमांक, नाव व वर्णन पुकारण्यात आले पाहिजे, आणि मतदाराचा क्रमांक स्थळप्रतीत दाखल केला पाहिजे व मतदारांच्या यादीच्या प्रतीत मतदाराच्या क्रमांकासमोर, त्यास मतपत्रिका मिळाली आहे असे दर्शविण्यासाठी परंतु त्यास जी मतपत्रिका मिळाली असेल तिचा तपशील न दाखवता, खूण केली पाहिजे. स्थळप्रतीत प्रभागाचे नाव, मतदान केंद्राचे नाव किंवा त्याचा व्यवच्छेदक क्रमांक आणि मतदाराची सही किंवा त्याच्या अंगठ्याचा ठसा दाखल केला पाहिजे.

मतदान. **२२.** मतदाराने मतपत्रिका मिळाल्यावर ताबडतोब मतदान केंद्रातील कक्षांपैकी एका कक्षात गेले पाहिजे. [१] [आणि त्याने, त्या कारणासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने, मतपत्रिकेवर, एकतर, फुलीचे चिन्ह करण्यासाठी तरतूद केलेल्या जागेवर किंवा त्याला ज्या उमेदवारास मत द्यावयाचे असेल त्या उमेदवाराच्या नावावर व चिन्हावर किंवा त्याच्याजवळ खूण केली पाहिजे ] आणि आपले मत दिसणार नाही अशा रीतीने मतपत्रिकेची घडी केली पाहिजे आणि अशा रीतीने घडी केलेली आपली मतपत्रिका मतपेटीत टाकली पाहिजे. प्रत्येक मतदाराने गैरवाजवी विलंब न लावता मतदान केले पाहिजे आणि त्याने आपली मतपत्रिका मतपेटीत टाकल्यावर लवकरात लवकर मतदान केंद्रातून बाहेर गेले पाहिजे.

मतदारांना साहाय्य. **२३.** मतदान केंद्राध्यक्षाने, जो कोणताही मतदार अपंगत्वामुळे किंवा निरक्षरतेमुळे विहित केलेल्या रीतीने मतदान करण्यास असमर्थ असेल अशा मतदारास आवश्यक असेल असे साहाय्य दिले पाहिजे.

मतदारांची ओळख. **२४.** मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, मतदान केंद्राध्यक्षास किंवा मतदान अधिकाऱ्यास मतदाराच्या ओळखीविषयी किंवा अशा मतदान केंद्रात मतदान करण्याच्या त्याच्या हक्काविषयी शंका घेण्यास संयुक्तिक कारण असेल तर, त्यास स्वतःहून मतदारास पुढील प्रश्न विचारता येतील आणि उमेदवाराने किंवा मतदान अभिकर्त्याने तसे करणे सांगितल्यास त्याने पुढील प्रश्न विचारले पाहिजेत:—

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ (१) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१) यादीत नाव दाखल केलेली व्यक्ती तुम्हीच आहात काय ? (यादीतील संपूर्ण नोंद वाचून दाखवावी) आणि

(२) या प्रभागातील चालू निवडणुकीत तुम्ही यापूर्वीच मतदान केले आहे काय ? आणि सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी —

(३) या निवडणुकीत अन्य कोणत्याही प्रभागात तुम्ही यापूर्वीच मतदान केले आहे काय ?

आणि मतदाराने या प्रश्नांपैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार दिला तर, आणि त्याने पहिल्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले नसेल तर व दुसऱ्या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले नसेल तर आणि सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी, तिसऱ्या प्रश्नाचेही नकारार्थी उत्तर दिले नसेल तर, त्यास मतपत्रिका देता कामा नये.

मतपत्रिकेचा नमुना.

**२५.** (१) मतपत्रिका नमुना ''ख'' मध्ये असली पाहिजे.

(२) मतपत्रिकांवर अनुक्रमांक असले पाहिजेत आणि हे अनुक्रमांक स्थळप्रतीवर आणि मतपत्रिकेच्या मागील बाजूवर छापलेले असले पाहिजेत.

प्रदत्त मते.

**२६.** एखादी व्यक्ती, मतदारांच्या यादीत नाव असलेला विशिष्ट मतदार मीच आहे असे सांगेल आणि असा मतदार म्हणून दुसऱ्या व्यक्तीने मतदान केलेले असतानाही मतपत्रिका मिळण्यासाठी विनंती करील तर अशी विनंती करणाऱ्या व्यक्तीस, तिने मतदान केंद्राध्यक्ष विचारील अशा प्रश्नांची योग्य उत्तरे दिल्यानंतर मतपत्रिकेवर अन्य कोणत्याही मतदाराप्रमाणेच खूण करण्याचा हक्क असेल. अशी मतपत्रिका (जिचा यात यापुढे ''प्रदत्त मतपत्रिका'' असा उल्लेख करण्यात आला आहे ) मतपेटीत टाकण्याऐवजी मतदान केंद्राध्यक्षाकडे दिली पाहिजे आणि त्याने त्यावर मतदाराचे नाव, मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक आणि ती मतदारांची यादी ज्या प्रभागांशी संबंधित असेल त्या प्रभागाचे नाव पृष्ठांकित केले पाहिजे. अशी मतपत्रिका एका स्वतंत्र पाकिटात घालून बाजूला ठेवली पाहिजे व आयुक्ताने ती मोजता कामा नये. मतदाराचे नाव, मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक आणि ती मतदारांची यादी ज्या मतदान केंद्राशी संबंधित असेल त्या मतदान केंद्राचे नाव किंवा व्यवच्छेदक क्रमांक नमुना ''क'' मधील यादीत लिहिला पाहिजे आणि अशा यादीवर ''प्रदत्त मतांची यादी'' असे शीर्षक लिहिले पाहिजे. अशी मतपत्रिका देणाऱ्या व्यक्तीने त्यावर आपले नाव व पत्ता लिहून सही केली पाहिजे आणि अशा व्यक्तीस लिहिता येत नसेल तर, तिने त्या यादीतील नोंदीपुढे आपल्या अंगठ्याचा ठसा उमटवला पाहिजे.

आक्षेपित मते.

**२७.** कोणत्याही व्यक्तीने मतपत्रिका मिळण्यासाठी विनंती करून तोतयेगिरीचा अपराध केला आहे असे कोणत्याही मतदान अभिकर्त्याने जाहीर केले व तसे सिद्ध करण्याची जबाबदारी पत्करली तर, मतदान केंद्राध्यक्ष अशा व्यक्तीस आक्षेपित मतांच्या यादीत (ही यादी नमुना ''ड'' मध्ये ठेवण्यात आली पाहिजे.) तिचे नाव व पत्ता लिहिण्यास किंवा तिला लिहिता येत नसेल तर, त्यावर तिच्या अंगठ्याचा ठसा उमटवण्यास सांगू शकेल आणि तसेच, त्यास अशा व्यक्तीस स्वत:च्या ओळखीविषयी पुरावा सादर करण्यास सांगू शकेल. नियम २४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रश्न विचारण्यात आल्यावर अशा व्यक्तीने पहिल्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले आणि अन्य प्रश्नांचे उत्तर नकारार्थी दिले तर, तिला तोतयेगिरीबद्दल होणाऱ्या शास्तीसंबंधी माहिती देण्यात आल्यावर तिला मतदान करण्याची परवानगी देण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्षाने आक्षेपित मतांच्या यादीत त्या परिस्थितीसंबंधी व स्वत:च्या निर्णयासंबंधी नोंद केली पाहिजे :

परंतु, अशा प्रत्येक आक्षेपाबद्दल २० रुपये अनामत म्हणून ठेवण्याची मागणी करता येईल. असा आक्षेप थिल्लरपणे घेतला आहे व सद्‌भावनेने घेतलेला नाही असे चौकशी केल्यावर आढळून आले तर, अशी रक्कम जप्त करण्यात येईल.

खराब झालेल्या मतपत्रिका.

**२८.** एखाद्या मतदाराने आपली मतपत्रिका तिचा मतपत्रिका म्हणून सोयीस्करपणे उपयोग करता येणार नाही अशा रीतीने अनवधानाने हाताळली तर, त्याने ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाधीन केल्यावर व अनवधानाबद्दल त्याची खात्री करून दिल्यावर, त्यास खराब झालेल्या मतपत्रिकेऐवजी दुसरी मतपत्रिका मिळू शकेल, आणि मतदान केंद्राध्यक्षाने खराब झालेल्या मतपत्रिकेवर व तिच्या स्थळप्रतीवर ती रद्द केल्याची खूण केली पाहिजे.

मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिकाऱ्यांनी मतदान करणे.

**२९.** (१) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी [1] [ किंवा मतदान प्रतिनिधी किंवा इतर लोकसेवक हा, त्यास ज्या मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क नाही अशा मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ निवडणूकविषयक कामावर असेल तर ], ज्या प्रभागाच्या संबंधात त्यास कामावर नेमण्यात आले असेल तर त्या प्रभागाच्या किंवा अन्य कोणत्याही प्रभागाच्या निवडणुकीत मत देण्याचा त्यास हक्क आहे असे प्रमाणपत्र आयुक्ताने त्यास दिले असल्यास, त्यास त्या मतदान केंद्रात आपले मत देण्याची परवानगी देण्यात येईल, त्यास अन्यथा ज्या मतदान केंद्रात मतदान करण्याचा हक्क प्राप्त झाला असता त्या मतदान केंद्राचे नाव व ज्या प्रभागात ते मतदान केंद्र असेल त्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक मतपत्रिकेच्या स्थळ प्रतीत दाखल केला पाहिजे. या नियमान्वये दिलेले प्रमाणपत्र नमुना "ई" मध्ये असले पाहिजे.

(२) मतदान केंद्राध्यक्षाने अशी मतपत्रिका एका पाकिटात घालून ते पाकीट मोहोरबंद केले पाहिजे आणि पोट-नियम (१) मध्ये उल्लेख केलेल्या प्रमाणपत्रासह ते आयुक्ताकडे पाठवले पाहिजे, आणि आयुक्ताने अशी मतपत्रिका समुचित प्रभागाच्या कायदेशीर मतपत्रिकांमध्ये समाविष्ट करण्याची, व्यवस्था केली पाहिजे.

मतपत्रिका पाठविणे.

**३०.** प्रत्येक मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाने मतदान बंद झाल्यावर, शक्य तितक्या लवकर, जे कोणतेही उमेदवार किंवा मतदान प्रतिनिधी उपस्थित असतील त्यांच्यासमक्ष पुढील गोष्टींची वेगवेगळी पुडकी करून त्यावर स्वतःची मोहोर लावून आणि ज्या उमेदवारांची किंवा प्रतिनिधींची स्वतःची मोहोर लावण्याची इच्छा असेल त्या उमेदवारांच्या किंवा प्रतिनिधींच्या मोहरा लावून मोहोरबंद केली पाहिजेत –

(१) प्रत्येक मतदान केंद्रात उपयोगात आणलेली, बंद असलेली परंतु बरोबर किल्ली असलेली प्रत्येक मतपेटी ;

(२) न वापरलेल्या मतपत्रिका ;

(३) प्रदत्त मतपत्रिका ;

(४) खराब झालेल्या मतपत्रिका ;

(५) मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत ;

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ (१) (ड) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) मतपत्रिकांची स्थळप्रत ;

(७) प्रदत्त मतांची यादी ; आणि

(८) आक्षेपित मतांची यादी.

आणि अशा प्रत्येक पाकिटावर त्यामधील वस्तूंचे वर्णन लिहून अशी पाकिटे आयुक्ताच्या स्वाधीन केली पाहिजेत.

मतपत्रिकांबरोबर आयुक्ताकडे विवरणपत्र पाठवणे.

**३१.** मतदान केंद्राध्यक्षाने पाकिटांबरोबर नमुना "फ" मध्ये एक विवरणपत्र पाठवले पाहिजे व त्यात त्याच्याकडे सोपवलेल्या मतपत्रिकांची संख्या दर्शविली पाहिजे आणि मतपेटीतील मतपत्रिका, न वापरलेल्या मतपत्रिका, खराब झालेल्या मतपत्रिका व प्रदत्त मतपत्रिका आणि नियम २९ अन्वये उपयोगात आणलेल्या मतपत्रिका या शीर्षकाखाली त्या मतपत्रिकांचा हिशेब दर्शविला पाहिजे.

मतदान पुढे ढकलणे, मतदान तहकूब करणे.

**३२.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, मतदानासाठी ठरवलेला दिनांक पुढे ढकलता येईल किंवा मतदानासाठी ठरवलेला कालावधी वाढवता येईल व त्याची पुरेशी कारणे लेखी नमूद करावी लागतील. सार्वजनिक शांततेचा भंग होणे, यासारख्या आणीबाणीच्या परिस्थितीत, मतदान केंद्राध्यक्ष, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेने, मतदान बंद करता येईल आणि मतदान नंतरच्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात आल्याचे जाहीर करता येईल.

नंतरच्या ज्या दिनांकापर्यंत मतदान पुढे ढकलण्यात आले असेल किंवा तहकूब करण्यात आले असेल तो दिनांक आयुक्तास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करण्यात येईल.

## मतांची छाननी व मोजणी करणे आणि निकाल जाहीर करणे

मतमोजणीसाठी दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करणे.

**३३.** आयुक्ताने, मतदान बंद झाल्यावर व्यवहार्य असेल तितक्या लवकर, सर्व उमेदवारांना मतमोजणीसाठी त्याने ठरवलेला दिनांक, वेळ व ठिकाण यासंबंधी लेखी सूचना दिली पाहिजे.

मतमोजणीच्या वेळी कोणास उपस्थित राहता येईल.

**३४.** (१) आयुक्त आणि मतमोजणीसाठी त्यास साहाय्य करण्यासाठी तो नेमील अशा व्यक्ती, उमेदवार आणि याबाबत उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेला प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येता कामा नये.

(२) निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी, कोणत्याही उमेदवाराने किंवा त्याच्यावतीने कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीसाठी साहाय्य करण्यासाठी नेमण्यात येता कामा नये.

मतमोजणीच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.

**३५.** नियम ३३ अन्वये नेमलेल्या दिवशी व वेळी आयुक्ताने पुढीलप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे :—

(अ) प्रत्येक मतदान केंद्राशी संबंधित असलेली मतपेटी किंवा मतपेट्या किंवा यथास्थिति, ज्यात मतपत्रिका असतील अशी पाकिटे एकामागून एक उघडली जातील आणि आयुक्ताने त्यातून मतपत्रिका बाहेर काढल्या पाहिजेत, त्या मोजल्या पाहिजेत किंवा मोजण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि त्यांची संख्या विवरणपत्रात नमूद केली पाहिजे; असे विवरणपत्र कोणत्याही उमेदवारास किंवा उमेदवाराच्या कोणत्याही प्रतिनिधीस दाखवता कामा नये.

(ब) त्यानंतर आयुक्ताने, अशा रीतीने बाहेर काढलेल्या सर्व मतपत्रिका एकत्र केल्या पाहिजेत आणि त्यांचे सोयीस्कर असे गठ्ठे करून ते मतमोजणीसाठी साहाय्य करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना वाटून दिले पाहिजेत.

(क) मतपत्रिका अशा रीतीने वाटून देण्यात आल्यानंतर परंतु त्यापूर्वी नव्हे, आयुक्ताने उमेदवारांना व त्यांच्या प्रतिनिधींना मतपत्रिकांना हात न लावता त्यांची पाहणी करण्याची वाजवी संधी दिली पाहिजे आणि पूर्णत: किंवा अंशत: बाद ठरवलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर "बाद" असा शब्द पृष्ठांकित केला पाहिजे. कोणत्याही उमेदवाराने किंवा प्रतिनिधीने बाद ठरवण्याच्या अचूकपणाविषयी हरकत घेतल्यास आयुक्ताने त्या मतपत्रिकेवर बाद ठरवण्याची कारणेदेखील नमूद केली पाहिजेत. कोणत्याही उमेदवारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस कोणत्याही मतपत्रिकेच्या मागील बाजूवरील अनुक्रमांक पाहण्याची परवानगी देता कामा नये ;

(ड) आयुक्ताने, व्यवहार्य असेल तितपत, मतमोजणीचे काम सतत चालू ठेवले पाहिजे, आणि, आवश्यक अशा मधल्या कोणत्याही कालावधीत मतमोजणीचे काम स्थगित ठेवावे लागले तर, अशा कालावधीत मतपत्रिका, पुडकी व निवडणुकीशी संबंधित अशी अन्य कागदपत्रे आयुक्ताने स्वत:ची मोहोर लावून व ज्या उमेदवारांची किंवा प्रतिनिधींची मोहोर लावण्याची इच्छा असेल त्या उमेदवारांच्या किंवा प्रतिनिधींच्या मोहरा लावून मोहोरबंद करून ठेवली पाहिजेत आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी योग्य खबरदारी घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(ई) मतमोजणी पूर्ण झाल्यावर, आयुक्ताने नियम १२ च्या तरतुदीच्या अधीन राहून, निवडणुकीचा निकाल ताबडतोब जाहीर केला पाहिजे.

मतपत्रिका बाद ठरवण्याची कारणे.

**३६.** (१) (अ) मतपत्रिकेवर नोंदलेल्या मतांची संख्या ही, भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा आधिक असेल ;

(ब) मतपत्रिकेवर कोणतेही मत नोंदविलेले नसेल ;

(क) कोणत्याही एका उमेदवाराच्या नावापुढे एकापेक्षा अधिक मते नोंदवण्यात आली असतील ;

(ड) अनिश्चिततेमुळे ती अग्राह्य ठरत असेल ;

(ई) ज्या खुणेमुळे मतदार ओळखता येईल अशी कोणतीही खूण मतपत्रिकेवर असेल ;

तर, अशी मतपत्रिका बाद ठरवण्यात आली पाहिजे.

(२) मतपत्रिकेच्या कायदेशीरपणाविषयी आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल ; मात्र, निवडणूक विनंती अर्जाद्वारेच केवळ त्या जागेवर दावा करण्यात आला असता असा निर्णय फिरवता येईल.

**३७.** आयुक्ताने, प्रदत्त मते, मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत किंवा मतपत्रिकांच्या स्थळप्रती यांची मोहोरबंद पाकिटे उघडता कामा नयेत. त्याने, नियम ३१ अन्वये मतदान केंद्राध्यक्षाने सादर केलेले विवरणपत्र, मोजलेल्या मतपत्रिकांची संख्या, आणि बाद ठरवलेल्या, खराब झालेल्या मतपत्रिका व नियम २९ अन्वये कार्यवाही केलेल्या मतपत्रिका, तसेच, त्याच्या, ताब्यातील न वापरलेल्या मतपत्रिका व प्रदत्त मतांची यादी यांच्याशी ताडून ते पडताळून पाहिले पाहिजे आणि नंतर, त्याने उघडलेले प्रत्येक पाकीट पुन्हा बंद केले पाहिजे व त्यावर मोहोर लावली पाहिजे आणि प्रत्येक पाकिटावर त्यातील वस्तूंचे वर्णन व ते ज्या निवडणुकीशी संबंधित आहे त्या निवडणुकीचा दिनांक नमूद केला पाहिजे. पडताळणी.

**३८.** त्यानंतर आयुक्ताने, पुढील गोष्टी नमूद करणारे एक विवरण तयार करून ते प्रमाणित केले पाहिजे :— विवरण.

(१) नियम ३७ मध्ये निर्देश केलेल्या पडताळणीचा परिणाम ;

(२) ज्या उमेदवारांना विधिग्राह्य मते देण्यात आली आहेत त्या उमेदवारांची नावे ;

(३) प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या विधिग्राह्य मतांची संख्या ;

(४) निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव ;

(५) विधिअग्राह्य ठरवण्यात आलेल्या मतांची संख्या; आणि,

(६) देण्यात आलेल्या प्रदत्त मतांची संख्या,

आणि कोणत्याही उमेदवारास किंवा नियम ३४ अन्वये रीतसर प्राधिकृत करण्यात आलेल्या त्यांच्या प्रतिनिधीस अशा विवरणाची प्रत किंवा त्यातील उतारा घेण्याची परवानगी दिली पाहिजे.

**३९.** (१) निवडणूक झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, आयुक्ताच्या सहीने नगरपालिकेच्या, मुख्य कार्यालयात एखाद्या ठळक ठिकाणी नोटीस लावून प्रत्येक निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला पाहिजे ; अशा नोटिशीत, कोणत्याही व्यक्ती निवडून आल्या असल्यास त्यांची नावे, आणि लढवण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत, प्रत्येक उमेदवारासाठी नोंदवण्यात आलेल्या मतांची संख्या नमूद करून ती प्रमाणित करण्यात आली पाहिजे. निवडणुकांचे निकाल जाहीर करणे.

(२) पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तींची नावे, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली पाहिजेत.

### मतपत्रिकांची विल्हेवाट

**४०.** निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, आयुक्ताने, नियम ३७ आणि ३८ मध्ये निर्दिष्ट केलेली पाकिटे व विवरण आणि निवडणुकीशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे आपल्या अभिरक्षेत ठेवली पाहिजेत. निवडणुकीच्या कागदपत्रांची अभिरक्षा.

निवडणुकीची कागदपत्रे सादर करणे व त्यांची पाहणी करणे.

**४१.** मतपत्रिकांची पाकिटे,— मग अशा मतपत्रिका मोजलेल्या असोत, बाद ठरवलेल्या असोत किंवा प्रदत्त असोत,— मतपत्रिकांच्या स्थळप्रतींची पाकिटे आणि मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत ठेवलेली पाकिटे आयुक्ताच्या अभिरक्षेत असतील तेव्हा, ती न्यायाधीशाच्या आदेशान्वये असेल त्यांव्यतिरिक्त उघडता कामा नये आणि त्यातील वस्तू तपासता कामा नये किंवा त्या वस्तू सादर करता कामा नये, परंतु, निवडणुकीशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे, महानगरपालिका विहित करील अशा शर्तीच्या आणि अशी फी भरण्याच्या अधीन राहून, लोकांना पाहण्यासाठी खुली असतील; आणि कोणत्याही व्यक्तीस अशा शर्तीचे अनुपालन केल्यावर व अशी फी भरल्यावर, अशा कागदपत्रांची किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची प्रत किंवा प्रती मिळण्याचा हक्क असेल.

निवडणुकीची कागदपत्रे नष्ट करणे.

**४२.** नियम ४१ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे निवडणुकीशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे एक वर्षाच्या कालावधीपर्यंत ठेवून घेण्यात आली पाहिजेत आणि त्यानंतर ती, न्यायाधीशाने तद्विरुद्ध दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीन राहून, नष्ट करण्यात आली पाहिजेत.

## सर्वसाधारण तरतुदी

मतदारांच्या यादीतील मुद्रण प्रमादांकडे किंवा लेखन प्रमादांकडे दुर्लक्ष करण्याचा आयुक्ताचा किंवा मतदान केंद्राध्यक्षाचा अधिकार.

**४३.** मतदारांच्या यादीतील एखादी नोंद विवक्षित व्यक्तीसंबंधी आहे किंवा कसे याविषयी या नियमान्वये आयुक्ताने किंवा मतदान केंद्राध्यक्षाने निर्णय देण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास, आयुक्तास किंवा यथास्थिति, मतदान केंद्राध्यक्षास, मतदारांच्या यादीत कोणताही लेखन प्रमाद किंवा मुद्रण प्रमाद असला तरी, उक्त नोंद उक्त व्यक्तीसंबंधी आहे किंवा नाही याविषयी त्याची कारणे लेखी नमूद करून निर्णय देता येईल.

आयुक्ताने विवक्षित अधिकार इत्यादी प्रत्यायोजित न करणे.

**४४.** कलम ६९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्ताने नियम [१][* *] ७, ८, ९, ११, १२ आणि ३९ अन्वये त्यास देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा त्यांच्यावर लादण्यात आलेली किंवा त्याच्याकडे निहित केलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी, कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास प्राधिकृत करणे हे कायदेशीर असणार नाही.

अडचणीच्या प्रसंगी आयुक्ताचे अधिकार.

**४५.** या अधिनियमान्वये कोणतीही निवडणूक घेण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण उद्भवल्यास, आयुक्तास निवडणूक योग्य रीतीने घेण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी अधिनियमाशी किंवा नियमाशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल.

---

१. हे आकडे, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० (क) अन्वये "३, ४ (१), ५" हे आकडे व कंसे वगळण्यात आले.

**४६.** कलम १६ [1][ * * ] च्या तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्ताने, या प्रकरणातील नियमांन्वये त्यास देण्यात आलेल्या अधिकारांन्वये दिलेले सर्व निर्णय अंतिम असतील. आयुक्ताने दिलेले निर्णय अंतिम असणे.

प्रकरण दोन

## महानगरपालिका, स्थायी समिति, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज

### महानगरपालिकेचे कामकाज

**१.** (अ) प्रत्येक महिन्यात महानगरपालिकेची निदान एक तरी सर्वसाधारण सभा भरवण्यात आली पाहिजे आणि ती त्या महिन्याच्या वीस तारखेच्या आत भरवण्यात आली पाहिजे. महानगर-पालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी.

(ब) सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर महानगरपालिकेची पहिली सभा सोयीस्कर होईल तितक्या लवकर, आयुक्त ठरवील अशा दिवशी, अशा वेळी व अशा ठिकाणी भरवण्यात आली पाहिजे आणि ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर, ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखाद्या दिवशी भरवण्यात आली पाहिजे.

(क) अन्य प्रत्येक बाबतीत सभेचा दिवस, वेळ व ठिकाण महापौराने ठरवले पाहिजे, किंवा महापौराचे पद रिकामे असेल किंवा महापौर मरण पावला असेल किंवा त्याने राजीनामा दिला असेल किंवा तो पालिका सदस्य असण्याचे बंद झाले असेल किंवा तो काम करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रसंगी, उप-महापौराने, किंवा महापौर व उप-महापौर हे दोघेही नसल्यास, स्थायी समितीच्या अध्यक्षाने असा दिवस, वेळ व ठिकाण ठरवले पाहिजे.

(ड) महापौरास किंवा वर सांगितलेल्या प्रसंगी उपमहापौरास, त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा विशेष सभा बोलावता येईल आणि त्याने पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या कमीत कमी एक-चतुर्थांश पालिका सदस्यांनी किंवा स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या करून लेखी मागणी केल्यावर अशी विशेष सभा बोलावली पाहिजे, आणि महानगरपालिकेची प्रत्येक सभा, सभा बोलावण्यासंबंधीच्या नोटिशीत निर्दिष्ट केलेल्या विशेष कारणांसाठी असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात भरवण्यात आली पाहिजे.

(ई) प्रत्येक सभा लोकांना खुली असली पाहिजे ; मात्र, महानगरपालिकेपुढे प्रलंबित असलेली कोणतीही चौकशी किंवा चर्चा ही अशा स्वरूपाची आहे की ती गुप्त रीतीने चालविली पाहिजे असे सभेस, उपस्थित असलेले बहुसंख्य पालिका सदस्य ठरावाद्वारे ठरवतील तर, अशा सभा लोकांना खुली असणार नाही, असा ठराव अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने स्वत: होऊन किंवा उपस्थित असलेल्या कोणत्याही पालिका सदस्यांच्या विनंतीवरून, आधी चर्चा न करता मांडला पाहिजे; आणखी असे की अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास, जी कोणतीही व्यक्ती कामकाजात व्यत्यय आणील अशा व्यक्तीस कोणत्याही वेळी बाहेर काढण्याची व्यवस्था करता येईल ;

(फ) सभा चालू असताना कोणत्याही वेळी, अध्यक्षस्थानी असलेला प्राधिकारी धरून उपस्थित पालिका सदस्यांची संख्या ही, पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा कमी आहे असे अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आणण्यात आले तर, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने ती सभा, सभेसाठी त्यास सोयीस्कर वाटेल अशी वेळ व ठिकाण ठरवून, अन्य एखाद्या दिवसापर्यंत तहकूब केली

---

१. हा मजकूर, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० (ड) अन्वये "आणि नियम २" हा मजकूर वगळण्यात आला.

पाहिजे आणि अशा सभेत जे कामकाज निकालात काढावयाचे राहिले असेल ते कामकाज अशा तहकूब सभेत निकालात काढण्यात आले पाहिजे, किंवा ही नंतरची सभा पुन्हा तहकूब करण्यात आली तर, असे कामकाज त्यानंतरच्या कोणत्याही तहकूब सभेत निकालात काढण्यात आले पाहिजे – मग अशा सभेत गणपूर्ती झालेली असो किंवा नसो ;

(ग) प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान, सभा भरवण्यासाठी, नेमलेल्या वेळी महापौर उपस्थित असेल तर, त्याने स्वीकारले पाहिजे, आणि महापौराचे पद रिकामे असेल किंवा महापौर अनुपस्थित असेल तर, उपमहापौराने, किंवा उपमहापौराच्या अनुपस्थितीत, सभेकडून त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यात येईल अशा, उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांपैकी एका पालिका सदस्याने अध्यक्षस्थान स्वीकारले पाहिजे ;

(ह) तहकूब सभेव्यतिरिक्त अन्य प्रत्येक सभेची सर्वसाधारणपणे निदान सात पूर्ण दिवसांची नोटीस दिली पाहिजे. परंतु, तातडीच्या प्रसंगी अशी कोणतीही सभा, वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार करण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्याव्यतिरिक्त, स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या केलेल्या लेखी मागणीनुसार, तीन पूर्ण दिवसांची नोटीस दिल्यावर बोलावता येईल ; तहकूब सभेच्या बाबतीत, तहकुबीचा कालावधी लक्षात घेऊन व्यवहार्य असेल अशी आगाऊ नोटीस देण्यात आली पाहिजे,

(आय) सभेच्या प्रत्येक नोटिशीत, अशी सभा ज्यावेळी व ज्या ठिकाणी भरवावयाची असेल ती वेळ व ते ठिकाण आणि कलम ४४ खालील प्रश्नांखेरीज अशा सभेत चालवावयाचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे आणि अशी नोटीस, नगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या निदान एका स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे दिली पाहिजे आणि व्यवहार्य असेल तितपत, अशा नोटिशीची एक प्रत प्रत्येक पालिका सदस्याच्या शेवटच्या माहीत असलेल्या पत्त्यावर साध्या पोस्टाने पाठवली पाहिजे ;

(ज) कोणत्याही सभेत कलम ४४ खालील कोणत्याही प्रश्नांखेरीज कोणतेही कामकाज पुढे आणण्याची किंवा अशा सभेच्या नोटिशीत पूर्वीच विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल असा कोणताही मूळ प्रस्ताव मांडण्याची ज्या कोणत्याही पालिका सदस्यांची इच्छा असेल अशा पालिका सदस्याने, त्या सभेसाठी ठरवण्यात आलेल्या दिवसाच्या निदान तीन पूर्ण दिवस अगोदर नगरपालिका सचिवास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे, आणि ज्या कामकाजाची किंवा प्रस्तावाची अशा रीतीने नोटीस देण्यात आली असेल, त्या कामकाजाची किंवा प्रस्तावाची एक पूरक घोषणा उक्त सचिवाने सभेच्या आदल्या दिवसाच्या आत स्थानिक वृत्तपत्रात दिली पाहिजे ;

(के) तातडीच्या प्रसंगी मागणीवरून बोलावलेल्या सभेव्यतिरिक्त अन्य सभेत किंवा कोणत्याही सभेतील अर्थसंकल्पीय अंदाजावरील चर्चेव्यतिरिक्त अन्य चर्चेच्या वेळी, खंड (झ) अन्वये प्रसिद्ध केलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कामकाजाखेरीज आणि कलम ४४ अन्वये विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नाखेरीज किंवा स्थायी समितीला, परिवहन समितीला किंवा आयुक्ताला सभेपुढे आणणे इष्ट वाटेल असे उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट न केलेल्या तातडीच्या कामकाजाव्यतिरिक्त अन्य कोणतेही कामकाज कोणत्याही सभेत चालवता कामा नये आणि जो कोणताही मूळ प्रस्ताव उक्त नोटिशीत किंवा खंड (ञ) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या पूरक घोषणेत, तशी घोषणा असल्यास, निर्दिष्ट करण्यात आला नसेल, किंवा स्थायी समितीने, परिवहन समितीने, किंवा आयुक्ताने सभेपुढे आणलेल्या कोणत्याही तातडीच्या कामकाजाच्या संदर्भात वरील प्राधिकरणांच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या शिफारशीच्या पृष्ठ्यर्थ नसेल असा मूळ प्रस्ताव मांडता कामा नये किंवा त्यावर चर्चा करता कामा नये :

परंतु, कोणत्याही सभेपुढे, वर सांगितल्याप्रमाणे कोणतेही तातडीचे कामकाज आणण्यास अशा सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांपैकी निदान तीन–चतुर्थांश पालिका सदस्यांनी–असे तीन-चतुर्थांश सदस्य हे, पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-चतुर्थांशापेक्षा कमी असता कामा नयेत– अनुमती दिली नसेल तर, असे कोणतेही कामकाज अशा सभेपुढे आणता येणार नाही.

(ल) तातडीच्या प्रसंगी मागणीवरून बोलावलेल्या सभेत आणि कोणत्याही सभेतील अर्थसंकल्पीय अंदाजावरील चर्चेच्या वेळी, ज्या कामकाजासाठी तातडीची सभा बोलावण्यात आली आहे त्या कामकाजाशी, किंवा यथास्थिति, अर्थसंकल्पीय अंदाजाशी ज्याचा प्रत्यक्षपणे संबंध नाही असे कोणतेही कामकाज चालवता येणार नाही; आणि असा कोणताही मूळ प्रस्ताव मांडता येणार नाही किंवा त्यावर चर्चा करता येणार नाही, आणि स्थायी समितीने जे कर लादण्याचे योजले आहे त्या करात किंवा परिवहन समितीने जे भाडे किंवा आकार बसवण्याचे योजले आहे त्या भाड्यात किंवा आकारात ज्यामुळे कोणताही बदल होईल किंवा अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या कोणत्याही बाबीत ज्यामुळे वाढ किंवा घट होईल असा कोणताही प्रस्ताव, ज्या कोणत्याही सभेत अशा अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार चालू असेल अशा सभेत मांडता येणार नाही किंवा त्यावर चर्चा करता येणार नाही; मात्र, असा प्रस्ताव खंड (झ) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या सभेच्या नोटिशीत किंवा खंड (ञ) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या पूरक घोषणेत तशी घोषणा असल्यास, विनिर्दिष्ट करण्यात आला असेल तर, किंवा तहकूब सभेच्या बाबतीत, खंड (ड) च्या परंतुकात निर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींपैकी प्रत्येक शर्त पूर्ण करण्यात आली असेल तर, असा प्रस्ताव अशा सभेत मांडता येईल किंवा त्यावर चर्चा करता येईल.

(म) कोणतीही सभा, उपस्थित असलेल्या बहुसंख्य पालिका सदस्यांच्या संमतीने वेळोवेळी, त्याच दिवशी नंतरच्या वेळेपर्यंत किंवा अन्य कोणत्याही दिवसापर्यंत तहकूब करता येईल, मात्र कोणत्याही तहकूब सभेत, जी सभा तहकूब करण्यात आली असेल त्या सभेत जे कामकाज किंवा प्रस्ताव निकालात काढावयाचे राहिले असतील त्यांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कामकाज चालवता येणार नाही आणि यात यापुढे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, अन्य कोणत्याही प्रस्तावावर चर्चा करता येणार नाही :

परंतु, ज्या कोणत्याही तहकूब सभेत अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार चालू असेल अशा तहकूब सभेत, खंड (ढ) मध्ये वर्णन करण्यात आल्याप्रमाणे, कोणताही बदल घडवून आणणारा प्रस्ताव पुढील शर्तींपैकी प्रत्येक शर्त पूर्ण करण्यात आली असेल तर, मांडता येईल आणि त्यावर चर्चा करता येईल – मग असा प्रस्ताव हा जी सभा तहकूब करण्यात आली आहे त्या सभेत निकालात काढावयाचा राहिलेला प्रस्ताव नसला तरी चालेल –

(एक) जी सभा तहकूब करण्यात आली आहे त्या सभेत अशा प्रस्तावाची लेखी नोटीस देण्यात आली असली पाहिजे ;

(दोन) सभा दोन पूर्ण दिवसांच्या कालावधीसाठी तहकूब करण्यात आली असली पाहिजे ; आणि

(तीन) अशा प्रस्तावाची विशेष घोषणा नगरपालिका सचिवाने (अशी घोषणा देणे हे त्याच्यावर बंधनकारक असेल) तहकूब सभेच्या आदल्या दिवसाच्या आत स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दिलेली असली पाहिजे.

(न) नगरपालिका सचिवाने, प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज यासंबंधीचे एक कार्यवृत्त सभेच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, तयार केले पाहिजे आणि, ते या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या पुस्तकात ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने सही केली पाहिजे; आणि उक्त कार्यवृत्त पुस्तक कोणत्याही पालिका सदस्यास विनामूल्य व अन्य कोणत्याही व्यक्तीस आठ आणे फी दिल्यावर सर्व वाजवी वेळी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात पाहता येईल ;

(ओ) एखाद्या, सभेपुढे नोटीस न देता तातडीचे कामकाज आणण्यास स्थायी समितीस, परिवहन समितीस किंवा आयुक्तास परवानगी द्यावी किंवा कसे या प्रश्नाव्यतिरिक्त अन्य प्रत्येक प्रश्नावर, या अधिनियमात किंवा त्याअन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या पालिका सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल ;

(प) एखादा प्रस्ताव पारित झाला आहे अशी अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने केलेली घोषणा आणि कार्यवृत्त पुस्तकात तशा अर्थाची केलेली नोंद ही, अशा घोषणेच्या वेळी कमीत कमी चार पालिका सदस्यांनी मतदानाची मागणी केली नाही तर, त्या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल ; मग अशा प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरुद्ध देण्यात आलेल्या मतांची संख्या सिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही ;

(क्यू) मतदान घेण्यात येईल तेव्हा अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने नेमलेल्या गणकांनी उपस्थित असलेल्या व प्रस्तावावर मतदान करणाऱ्या प्रत्येक पालिका सदस्याचे मत घेतले पाहिजे आणि अनुक्रमे प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरुद्ध मतदान करणाऱ्या पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्त पुस्तकात लिहिण्यात आली पाहिजेत ;

(र) महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात, तो पारित झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र, अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी, किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत, या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल ; खंड (ज) मधील आवश्यक गोष्टी पूर्ण करून अशा सभेची नोटीस देण्यात आली असली पाहिजे आणि अशा नोटिशीत, ज्या ठरावात, अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजिले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पूर्णपणे नमूद केला पाहिजे.

[१] [(स) जेथे, आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत महानगरपालिका, नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील. मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्तांकडून शासनाला पाठविण्यात येईल आणि तो शासनाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करील.

---

१. सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३० (क) द्वारे खंड (स) दाखल केला.

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता या अधिनियमाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अनुरूप असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल.

पालिका सदस्यास निघून जाण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

**२.** (१) अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने सभेत सुव्यवस्था राखली पाहिजे आणि त्यांच्या मते ज्या पालिका सदस्याची वर्तणूक अत्यंत गैरशिस्तीची आहे, अशा कोणत्याही पालिका सदस्यास महानगरपालिकेच्या सभेतून ताबडतोब निघून जाण्याविषयी त्यास निदेश देता येईल आणि अशा पालिका सदस्याने ताबडतोब तसे केले पाहिजे व त्या दिवशीच्या सभेच्या राहिलेल्या कालावधीत अनुपस्थित राहिले पाहिजे ;

(२) कोणत्याही पालिका सदस्यास, निघून जाण्याविषयी पंधरा दिवसांच्या आत दुसऱ्यांदा आदेश देण्यात आला असेल तर, अध्यक्षपदी असलेल्या प्राधिकाऱ्यास तो ठरवील अशा पंधरा दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी अशा पालिका सदस्यास महानगरपालिकेच्या सभांना उपस्थित राहण्यापासून निलंबित करता येईल आणि अशा रीतीने निदेश देण्यात आलेल्या पालिका सदस्याने त्याप्रमाणे अनुपस्थित राहिले पाहिजे :

परंतु, निलंबनाधीन असलेल्या पालिका सदस्याने अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने क्षमायाचना केली असता अशा प्राधिकाऱ्यास निलंबनाचा कालावधी कमी करता येईल :

आणखी असे की, महानगरपालिकेच्या सेवेतून अशा रीतीने निलंबित केल्यामुळे कोणत्याही पालिका सदस्यास तो ज्या कोणत्याही समितीचा सदस्य असेल त्या समितीच्या कामकाजात भाग घेण्यास प्रतिबंध होणार नाही.

(३) अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास, सभेत अतिशय गैरशिस्त निर्माण होईल अशा प्रसंगी तीन दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी अशी सभा तहकूब करता येईल.

## स्थायी समितीचे कामकाज

स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी.

**३.** (अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यात आली पाहिजे.

(ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिली सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर, ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखाद्या दिवशी भरवण्यात आली पाहिजे; आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी व अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे ;

(क) आयुक्ताच्या मते जे कोणतेही कामकाज स्थायी समितीच्या पुढील सर्वसाधारण सभेपर्यंत लांबणीवर टाकता येणार नाही असे कामकाज चालवण्यासाठी, आयुक्ताने सही करून लेखी मागणी केल्यावर, स्थायी समितीच्या अध्यक्षाने चोवीस तासांच्या आत उक्त समितीची विशेष सभा बोलावली पाहिजे ;

(ड) स्थायी समितीच्या सभेत त्या सभेच्या सुरुवातीपासूनच शेवटपर्यंत निदान पाच सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज उरकता कामा नये ;

(ई) स्थायी समितीच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान सभा भरवण्यासाठी नेमलेल्या वेळी अध्यक्ष, उपस्थित असेल तर त्याने स्वीकारले पाहिजे, आणि अध्यक्ष अनुपस्थित असेल तर, सभेकडून त्या प्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यात येईल, अशा उपस्थित सदस्यांपैकी एका सदस्याने स्वीकारले पाहिजे ;

(फ) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आलेली असेल त्या व्यतिरिक्त प्रत्येक प्रश्नावर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल ;

(ग) उपसमितीला आपल्या सभांसाठी अध्यक्ष निवडता येईल असा कोणताही अध्यक्ष निवडण्यात आला नसेल किंवा कोणतीही सभा भरवण्यासाठी नेमलेल्या वेळी तो उपस्थित नसेल तर, सभेत उपस्थित असलेल्या उपसमितीच्या सदस्यांनी आपल्यापैकी एका सदस्यास अशा सभेचा अध्यक्ष म्हणून निवडले पाहिजे ;

(ह) उपसमित्यांना, त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे सभा भरवता येईल व तहकूब करता येईल, परंतु स्थायी समितीच्या अध्यक्षास, त्यास योग्य वाटेल तेव्हा, अशा उपसमितीची विशेष सभा बोलावता येईल आणि त्याने, उपसमितीच्या कमीत कमी दोन सदस्यांनी लेखी विनंती केल्यावर, अशा उपसमितीची विशेष सभा बोलावली पाहिजे,

(आय) उपसमितीच्या कोणत्याही सभेतील प्रश्नांवर, उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा, सभेच्या अध्यक्षास दुसरे किंवा निर्णायक मत असेल; परंतु, अशा कोणत्याही सभेत त्या सभेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपसमितीच्या सदस्यांपैकी निदान दोन-तृतीयांश सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज उरकता कामा नये ;

(ज) नगरपालिका सचिवाने, स्थायी समितीच्या आणि उपसमितीच्या प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज यासंबंधीचे एक कार्यवृत्त, या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या पुस्तकात नमूद करून ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने सही केली पाहिजे.

[१] [(के) जेथे, आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास या अधिनियमाच्या तरतुदींन्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल.

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता या अधिनियमाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अनुरूप असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल.]

---

१. सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३० (ख) द्वारे खंड (के) दाखल केला.

## परिवहन समितीचे कामकाज

४. (अ) कामकाज उरकण्यासाठी परिवहन समितीची सभा नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात किंवा महानगरपालिका ठरवील अशा अन्य ठिकाणी भरवण्यात आली पाहिजे ; परिवहन समितीच्या सभा.

(ब) परिवहन समितीची सभा पंधरवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यात आली पाहिजे ;

(क) परिवहन समितीची पहिली सभा महापौर ठरवील अशा दिवशी व अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर, ती महापौर ठरवील अशा नंतरच्या एखाद्या दिवशी भरवण्यात आली पाहिजे; आणि समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी व अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे ;

(ड) परिवहन समितीच्या अध्यक्षास, त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, कोणतेही कामकाज चालवण्यासाठी समितीची विशेष सभा बोलावता येईल आणि आयुक्ताने किंवा परिवहन व्यवस्थापकाने, किंवा समितीच्या कमीत कमी तीन सदस्यांनी सही करून लेखी मागणी केल्यावर, परिवहन समितीच्या अध्यक्षाने, त्यास अशी मागणी मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, असे कोणतेही कामकाज चालवण्यासाठी उक्त समितीची विशेष सभा बोलावली पाहिजे ;

(ई) परिवहन समितीच्या सभेत, त्या सभेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत निदान चार सदस्य उपस्थित असल्याखेरीज, कोणतेही कामकाज उरकता कामा नये ;

(फ) परिवहन समितीच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान, सभा भरवण्याच्या वेळी अध्यक्ष उपस्थित असेल तर त्याने स्वीकारले पाहिजे आणि अध्यक्ष अनुपस्थित असेल तर, सभेकडून त्या प्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यात येईल अशा सदस्यांपैकी एका सदस्याने स्वीकारले पाहिजे ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदीच्या अधीन राहून, प्रत्येक प्रश्नावर सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या परिवहन समितीच्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल ;

(ह) परिवहन समितीने, समितीच्या प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज यासंबंधीचे एक कार्यवृत्त, या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या पुस्तकात नमूद करून ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत, समितीने अशा सभेत ते कायम केल्यानंतर, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने सही केली पाहिजे.

### प्रश्न

५. (१) पुढील शर्तीच्या अधीन राहून, पालिका सदस्यास या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहराचे नगरपालिका शासन यासंबंधी किंवा त्याच्याशी संबंधित असलेले कोणतेही प्रश्न विचारता येतील :— प्रश्न विचारण्याचा हक्क.

(अ) प्रश्न विनिर्दिष्ट करणारी सात पूर्ण दिवसांची लेखी नोटीस नगरपालिका सचिवास देण्यात आली पाहिजे ;

(ब) पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये :--

(एक) ज्यात मत व्यक्त करण्याविषयी किंवा तात्त्विक कायदेविषयक प्रश्नावर निर्णय देण्याविषयी मागणी करण्यात आली असेल किंवा जो गृहित गोष्टीच्या अनुषंगाने असेल असा कोणताही प्रश्न ;

(दोन) जो, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, भारताच्या प्रदेशातील कोणत्याही भागातील कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे प्रलंबित असलेला कोणताही वाद किंवा कार्यवाही यासंबंधी किंवा त्याच्याशी संबंधित असेल असा कोणताही प्रश्न ;

(तीन) जो नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या चारित्र्यासंबंधी किंवा वर्तणुकीसंबंधी, त्याच्या पदाच्या नात्याने किंवा सार्वजनिक दृष्टीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत असेल असा कोणताही प्रश्न ;

(चार) जो, कोणत्याही व्यक्तीची किंवा जमातीची किंवा जमातीच्या कोणत्याही भागाची बदनामी करणारा असेल किंवा ज्यातून तसे ध्वनित होत असेल, किंवा ज्यातून त्यांच्याविरुद्ध वैयक्तिक चारित्र्याबाबत आरोप करण्यात आला असेल किंवा तसे ध्वनित होत असेल असा कोणताही प्रश्न ;

(२) महापौराने, ज्या कोणत्याही प्रश्नामुळे त्याच्या मते, पोट-नियम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन होत असेल असा प्रश्न विचारण्यास परवानगी देता कामा नये.

(३) कोणताही प्रश्न पोट-नियम (१) अन्वये लादलेल्या निर्बंधाच्या कक्षेत येतो किंवा नाही याबाबत कोणतीही शंका उपस्थित झाल्यास त्या मुद्द्यावर महापौराने निर्णय दिला पाहिजे आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(४) अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने अन्यथा निदेश दिला नसेल तर, महानगरपालिकेच्या सभेत प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्ताने दिले पाहिजे.

(५) आयुक्ताच्या मते महानगरपालिकेच्या हितास बाध येऊ न देता, एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणे शक्य नसेल तर किंवा त्यास जी माहिती गोपनीयरीत्या कळवण्यात आली आहे, ती माहिती एखाद्या प्रश्नात विचारण्यात आली असेल तर, अशा प्रश्नाचे उत्तर देणे आयुक्तावर बंधनकारक असणार नाही.

(६) महानगरपालिकेच्या कोणत्याही छापील अभिलेखात उपलब्ध असेल अशी कोणतीही माहिती कोणत्याही प्रश्नाद्वारे विचारण्यात आली असेल तर, आयुक्ताने, आपल्या उत्तरात अशा अभिलेखाकडे लक्ष वेधणे पुरेसे होईल.

(७) या नियमान्वये कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्तास परिवहन उपक्रमांसंबंधी जी माहिती आवश्यक असेल ती माहिती परिवहन व्यवस्थापकाने गैरवाजवी विलंब न लावता आयुक्तास पुरवली पाहिजे.

## प्रकरण तीन

## विवक्षित नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीची पद्धत आणि त्यांची कर्तव्ये व अधिकार

### एक. नेमणुकीची पद्धत

**१.** कलम ४५, पोट-कलम (७) अन्वये करण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणुका आणि कलम ५८ अन्वये करण्यात आलेल्या हंगामी नेमणुका याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस नियम ३ अन्वये याबाबत विहित केलेली अर्हता तो धारण करत असल्याखेरीज, ज्या पदांवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहे अशा पदांपैकी कोणत्याही पदावर नेमणूक करता कामा नये. नेमणुका करण्याची रीत.

**२.** नियम १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पदावर नेमणूक करण्यापूर्वी, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन अशा पदासाठी अर्ज मागविण्यात आले पाहिजेत आणि आलेल्या अर्जाची आयुक्ताने छाननी केली पाहिजे. महानगरपालिकेने तसे फर्मावले असल्यास, आयुक्ताने, ज्या व्यक्तींनी अर्ज केले असतील त्या व्यक्तींपैकी त्याच्या मते, ज्या व्यक्ती त्या पदासाठी अर्हताप्राप्त असतील अशा व्यक्तींची एक यादी पसंतीच्या क्रमानुसार तयार करून समितीमार्फत महानगरपालिकेस सादर केली पाहिजे :

परंतु, नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा, उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे, असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पद्धती न अनुसरता, अशा अधिकाऱ्याची उक्त पदावर नेमणूक करता येईल.

**३.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, महानगरपालिकेने [१][राज्य] शासनाच्या मान्यतेने ज्या पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहे अशा प्रत्येक पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हता वेळोवेळी विहित केल्या पाहिजेत. [१][राज्य] शासनास, अशी मान्यता देताना, महानगरपालिकेने विहित केलेल्या अर्हतांमध्ये त्यास योग्य वाटतील असे फेरबदल करता येतील किंवा त्यास योग्य वाटेल अशी भर त्यात घालता येईल.

**४.** महानगरपालिकेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याने केलेल्या नेमणुकांच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस, तिने विनियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेली अर्हता धारण केलेली असल्याखेरीज, सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी अस्थायी किंवा तात्पुरत्या भरावयाच्या पदांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पदांवर नेमता कामा नये.

### दोन. मुख्य लेखापरीक्षक

**५.** (१) महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने यात यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, त्याला लगतनंतर दुय्यम सहायक लेखापरीक्षक, लिपिक आणि कर्मचारी यांच्या साहाय्याने महानगरपालिकेची लेखापरीक्षा केली पाहिजे.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) या नियमान्वये आपली कामे पार पाडताना महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने :—

(एक) महानगरपालिकेच्या महसुलातून झालेला खर्च, उसनवारी कामांसाठी झालेला खर्च आणि विशेष निधीतून केलेला खर्च यांची लेखापरीक्षा केली पाहिजे आणि त्यात संवितरित करण्यात आलेला म्हणून दाखविलेला पैसा हा, तो ज्या सेवेसाठी किंवा प्रयोजनांसाठी उपयोजित करण्यात आला असेल किंवा आकारण्यात आला असेल, त्या सेवेसाठी किंवा प्रयोजनांसाठी कायदेशीररीत्या उपलब्ध किंवा उपयोजित करण्यायोग्य होता किंवा कसे आणि खर्च ज्या आधिकाराने नियंत्रित असेल त्याला अनुसरून आहे किंवा कसे याविषयी खात्री करून घेतली पाहिजे ;

(दोन) महानगरपालिकेचे ऋण, ठेवी, कर्जनिवारण निधी, आगाऊ रकमा, निलंबन लेखा आणि वित्तप्रेषण व्यवहार यांची लेखापरीक्षा केली पाहिजे आणि ते लेखे व त्यासंबंधी शिल्लक रकमांच्या पडताळणीचा निकाल याविषयी अहवाल सादर केला पाहिजे.

(३) महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने, महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात व्यापारी तत्त्वावर चालविण्यात येत असलेल्या सेवांसंबंधी लेखी विवरणपत्र व असे लेखे महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या किंवा परिवहन समितीच्या आदेशान्वये ठेवण्यात येत असतील तेव्हा, ताळेबंदासहित लेखा विवरणपत्राचे निरीक्षण करून लेखापरीक्षा केली पाहिजे ; आणि त्या लेख्यांसंबंधी प्रमाणपत्र व अहवाल सादर केला पाहिजे.

(४) महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने, स्थायी समितीशी विचारविनिमय करून आणि महानगरपालिकेने दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीन राहून, महानगरपालिकेच्या लेख्यांसंबंधी आपले अहवाल ज्या नमुन्यात व ज्या रीतीने तयार करावयाचे तो नमुना व ती रीत ठरवली पाहिजे आणि असे अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही माहिती पुरविण्याविषयी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास फर्मावण्याचा त्यास प्राधिकार असेल.

**६.** (१) महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकास, महानगरपालिकेच्या ज्या कोणत्याही लेख्यांची लेखापरीक्षा करणे त्यास आवश्यक असेल त्या लेख्यांच्या संबंधात, त्यास योग्य वाटेल अशी विचारणा करता येईल आणि अभिप्राय व्यक्त करता येईल आणि अशा लेख्यांच्या संबंधात त्यास योग्य वाटतील अशी प्रमाणके, विवरणपत्रे, विवरणे आणि स्पष्टीकरणे मागविता येतील.

(२) पूर्वोक्त अशी प्रत्येक विचारणा किंवा अभिप्राय, ज्यास उद्देशून असेल त्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने त्यावर ताबडतोब विचार केला पाहिजे आणि तो विलंब न लावता, आवश्यक ती प्रमाणके, कागदपत्रे किंवा स्पष्टीकरणे यांसह मुख्य लेखापरीक्षकाकडे परत पाठवला पाहिजे.

(३) महानगरपालिकेच्या महसुलातून झालेला खर्च नामंजूर करण्याबाबत महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाचे अधिकार आणि अशा खर्चावरील आक्षेपांचे निरसन करण्याबाबतची कार्यपद्धती ही, विनियमांनी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**७.** महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकास, त्याने ज्या कोणत्याही लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक आहे अशा सर्व लेख्यांची किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची लेखापरीक्षा, ज्या कार्यालयांमध्ये असे लेखे तयार करण्यात आले असतील त्या कार्यालयामध्ये करणे इष्ट वाटत असेल तर, ते लेखे व त्यांच्याशी संबंधित असलेली सर्व पुस्तके व कागदपत्रे सर्व वाजवी वेळी उक्त कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली पाहिजेत, असे फर्मावता येईल.

८. महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकास, त्याने ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक आहे त्या लेख्यांशी संबंधित असलेली कोणतीही पुस्तके किंवा अन्य दस्तऐवज त्याच्या पाहणीसाठी पाठविण्यात आली पाहिजेत असे फर्मावण्याचा अधिकार असेल :

परंतु, कागदपत्रे गोपनीय स्वरूपाची असतील तर, त्यातील मजकूर उघड होऊ न देण्यास तो जबाबदार असेल.

९. महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकास, लेखापरीक्षेसंबंधी सर्व बाबतीत विशेषत: लेखापरीक्षेची पद्धती व व्याप्ती आणि आक्षेप घेणे व त्यांचे निरसन करवून घेणे याविषयी नियम तयार करण्याचा आणि त्याबाबत निर्देश देण्याचा प्राधिकार असेल.

१०. महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने खर्चासाठी दिलेल्या मंजुरींची महानगरपालिकेकडून नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याने लेखापरीक्षा केली पाहिजे.

## प्रकरण चार

## अत्यावश्यक सेवा

### वर्ग १

(अ) रस्ते किंवा जागा यांची साफसफाई किंवा त्या स्वच्छ करणे,

(ब) नाल्या सुस्थितीत ठेवणे, दुरुस्त करणे, स्वच्छ करणे किंवा पाण्याने साफ करणे,

(क) घरे, शौचकूप, संडास, मुताऱ्या किंवा मलकुंड्या यातून मलमूत्र व घाण काढून नेणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे,

(ड) जनावरांचे मृतदेह काढून नेणे,

(ई) सर्वसाधारणपणे उपद्रव होण्यास प्रतिबंध करणे.

### वर्ग २

(अ) अग्निशामक पथक सेवा,

(ब) पुढील व्यक्तींची कामे धरून, नगरपालिकेची कोणतीही जलव्यवस्था केंद्रे, नाल्या, पंपकेंद्रे किंवा अग्निशामक नळखांब सुस्थितीत आणि दुरुस्त स्थितीत ठेवण्यासंबंधी कामे –

(एक) निरीक्षक,

(दोन) उपनिरीक्षक,

(तीन) कार्यदेशक,

(चार) यांत्रिक,

(पाच) चालक,

(सहा) पहारेकरी,

(सात) मजूर,

(आठ) कामगार.

(क) दिवाबत्ती करणारे.

वर्ग ३

(क) विद्युत उपक्रम सेवा,

(ख) परिवहन सेवा.

## प्रकरण पाच

## संविदा

संविदा करण्याची पद्धती. १. (१) आयुक्ताने, महानगरपालिकेच्या वतीने केलेली प्रत्येक संविदा ही, आयुक्ताने आपल्या स्वत:च्या वतीने ती केली असती तर, ज्या रीतीने व ज्या नमुन्यात केल्याने ती त्याच्यावर बंधनकारक करण्याची झाली असती त्या रीतीने व त्या नमुन्यात केली पाहिजे आणि तशाच रीतीने व तशाच नमुन्यात तीत पद्धतीबदल करता येईल व तीपुरी करता येईल :

परंतु, –

(अ) अशी जी कोणतीही संविदा, जर ती आयुक्ताने केली असती तर ती मुद्रेनिशी करावी लागली असती ती संविदा महामंडळाच्या सामान्य मुद्रेनिशी मुद्रांकित केली पाहिजे.

(ब) कोणतेही काम करण्याबाबत किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरविण्याबाबत केलेल्या ज्या संविदेमुळे, पाचशे रुपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका, [१][राज्य] शासनाच्या मान्यतेने, वेळोवेळी विहित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक, खर्च होणार असेल अशी प्रत्येक संविदा लेखी असली पाहिजे आणि त्यावर पोट-नियम (२) मध्ये विहित केलेल्या रीतीने महानगरपालिकेची सामान्य मुद्रा लावली पाहिजे ; मात्र अशी संविदा, आयुक्तांचे समाधान होईल अशा रीतीने पूर्वीच करण्यात आलेल्या कामासंबंधी किंवा पूर्वीच पुरवण्यात आलेल्या सामग्रीसंबंधी किंवा मालासंबंधी असेल आणि आयुक्त, लेखी आदेशाद्वारे असा लेख, लेखी करण्याची आवश्यकता नाही असे ठरवील तर, असा लेख, लेखी करण्याची व त्यावर, वर सांगितल्याप्रमाणे मुद्रा लावण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) महानगरपालिकेची सामान्य मुद्रा नगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे आणि ती स्थावर मालमत्तेच्या किंवा तीमधील हितसंबंधाच्या किंवा तिच्याबाबतच्या हक्कांच्या संपादनाशी संबंधित असलेल्या संविदेव्यतिरिक्त, लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर [२][स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा, महानगरपालिका उपआयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या ] उपस्थितीत लावण्यात आली पाहिजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखांवर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून [३][उक्त दोन व्यक्तींनी] त्यावर सह्या केल्या पाहिजेत. [४][उक्त व्यक्तींच्या] सह्या या, अशी कोणतीही संविदा किंवा लेख केल्याबद्दल कोणत्याही साक्षीदारांनी केलेल्या सह्यांपासून वेगळ्या असल्या पाहिजेत.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३१ (क) (एक) द्वारे "स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क) (तीन) द्वारे "उक्त सदस्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. (१) यात यापुढे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, आयुक्ताने किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने जे कोणतेही काम करण्यासाठी किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरवण्यासाठी, [१][दोन लाख] रुपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका, [२][राज्य] शासनाच्या मान्यतेने, वेळोवेळी विहित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल असे कोणतेही काम करण्याबाबत किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरवण्याबाबत कोणतीही संविदा करण्यापूर्वी, निदान सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे नोटीस देऊन अशा संविदासाठी निविदा मागविल्या पाहिजेत. [३][परंतु दोन लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सूचना, महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.] विवक्षित संविदांसाठी निविदा मागविणे.

(२) अशा नोटिशीस अनुसरून जी कोणतीही निविदा देण्यात येईल ती स्वीकारणे आयुक्तावर बंधनकारक असणार नाही ; परंतु, कलम ७३, खंड (ग) च्या तरतुदींच्या अधीन राहून, अशा रीतीने देण्यात आलेल्या निविदांपैकी जी कोणतीही निविदा, सर्व परिस्थिती विचारात घेता, सर्वात फायदेशीर आहे असे त्यास वाटेल ती निविदा त्यास स्वीकारता येईल :

परंतु, स्थायी समितीला, तिच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करून, आयुक्तास, यात तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा त्या मागविल्यानंतर त्याच्याकडे ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्वीकारता, संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल.

३. नियम २ अन्वये आयुक्त निष्पादित करील अशा प्रत्येक संविदेचे यथायोग्य पालन करण्यासाठी त्याने पुरेशी प्रतिभूती मागितली पाहिजे आणि त्यास, या अधिनियमान्वये तो करील अशी अन्य कोणतीही संविदा योग्य रीतीने पूर्ण करण्यासाठी आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार प्रतिभूती मागता येईल. संविदा पालन करण्यासाठी प्रतिभूती केव्हा घेता येईल.

४. या प्रकरणातील तरतुदी शक्य असेल तेथवर, परिवहन उपक्रमासंबंधीच्या संविदांना लागू होतील : परंतु, त्याअन्वये स्थायी समितीने किंवा तिच्या सदस्यांनी आणि आयुक्ताने करावयाची कामे ही, यथास्थिति, परिवहन समितीने किंवा तिच्या सदस्यांनी आणि परिवहन व्यवस्थापकाने केली पाहिजेत. परिवहन उपक्रमा-संबंधीच्या संविदांना हे प्रकरण लागू होणे.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क) द्वारे ‘‘तीन हजार’’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

३. सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३१ (ख) (दोन) द्वारे हे परंतुक जादा दाखल केले.

## प्रकरण सहा

## विशेष निधी

दंड निधी स्थापन करणे.

**१.** प्रकरण २० च्या तरतुदींन्वये नेमलेले नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून कलम ५६ अन्वये वसूल करण्यात आलेला दंड हा "दंड निधी" या नावाच्या वेगळ्या निधीत जमा करण्यात आला पाहिजे आणि त्याचे उत्पन्न, प्रकरण २० च्या तरतुदींन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्या हितसंवर्धनासाठी आणि स्थायी समिती, वेळोवेळी देईल अशा निदेशांस अनुसरून, जे अधिकारी व कर्मचारी नगरपालिकेच्या सेवेत असताना मरण पावतील अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या उत्तरजीवी विवाहसाथीस किंवा मुलांना आणि उत्तरजीवी विवाहसाथी किंवा मुले नसतील तर, आई-वडील, भाऊ व बहिणी असल्यास, त्यांना अनुकंपा भत्ते देण्यासाठी खर्च केला पाहिजे.

कल्याण निधी स्थापन करणे.

**२.** कलम ३६०, पोट-कलम (१), खंड (ग) च्या तरतुदींन्वये नगरपालिका निधीकडे बदली केलेल्या रकमा "कल्याण निधी" या नावाच्या विशेष निधीत जमा करण्यात आल्या पाहिजेत आणि त्या, प्रकरण २० च्या तरतुदींन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांसह नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आणि स्थायी समिती, वेळोवेळी ठरवील अशा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी स्थायी समिती, वेळोवेळी ठरवील अशा लाभांची व सुखसोयींची तरतूद करण्यासाठी खर्च केल्या पाहिजेत.

महानगरपालिकेच्या मान्यतेने विशेष निधी निर्माण करता येतील.

**३.** (१) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने, ज्या उद्दिष्टांसाठी विशेष निधी निर्माण करणे इष्ट आहे असे मानले जाईल त्या उद्दिष्टांशी ज्या रकमांचा स्पष्टपणे संबंध असेल अशा, नगरपालिका निधीत वेळोवेळी जमा करण्यायोग्य सर्व रकमा नगरपालिकेच्या लेख्यांमध्ये एका वेगळ्या शीर्षकाखाली जमा करण्यात आल्या पाहिजेत आणि ज्या उद्दिष्टांशी स्पष्टपणे संबंध आलेला सर्व खर्च, अशा शीर्षकाखाली खर्ची टाकण्यात आला पाहिजे.

(२) तशीच मान्यता घेऊन, नगरपालिका निधीचा एखादा भाग, ज्या विनिर्दिष्ट उद्दिष्टासाठी विशेष निधी निर्माण करणे इष्ट आहे असे मानले जाईल अशा एखाद्या विनिर्दिष्ट उद्दिष्टाशी संबंध असलेला खर्च भागविण्यासाठी निधी राखून ठेवण्याच्या प्रयोजनासाठी, नगरपालिकेच्या लेख्यांमध्ये एका वेगळ्या शीर्षकाखाली वेळोवेळी जमा करता येईल आणि असा निधी निर्माण करण्यात येईल तेव्हा, फक्त अशा उद्दिष्टांशी स्पष्टपणे संबंध असेल असाच खर्च अशा विशेष शीर्षकाखाली खर्ची टाकण्यात आला पाहिजे.

(३) जर महानगरपालिकेचे कोणत्याही वेळी असे मत होईल की, या नियमान्वये निर्माण करण्यात आलेला विशेष निधी हा यापुढे चालू ठेवणे आवश्यक नाही तर, महानगरपालिकेस असा निधी बंद करण्याविषयी निदेश देता येईल आणि अशा निधीतील खर्च न झालेली शिल्लक रक्कम असल्यास, त्या रकमेचे महानगरपालिका निदेश देईल अशा रीतीने विनियोजन केले पाहिजे.

**४.** प्रकरण २० अन्वये नेमलेले नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून कलम ५६ अन्वये वसूल करण्यात आलेला दंड, उतारूंकडून मिळालेल्या देणग्या आणि परिवहन उपक्रमाच्या वाहनात मिळालेल्या व हक्क न सांगण्यात आलेल्या गहाळ वस्तूंच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न हे, परिवहन उपक्रमाच्या लेख्यांमध्ये "परिवहन कर्मचारीहितार्थ निधी" या नावाच्या एका वेगळ्या शीर्षकाखाली जमा करण्यात आले पाहिजे आणि अशा रीतीने जमा करण्यात आलेल्या रकमा अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितसंवर्धनासाठी आणि जे अधिकारी व कर्मचारी नगरपालिकेच्या सेवेत असताना मरण पावतील अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या विधवांना आणि परिवहन समिती, वेळोवेळी ठरवील अशा या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अन्य नातेवाईकांना अनुकंपा भत्ते देण्यासाठी खर्च करण्यात आल्या पाहिजेत. परिवहन कर्मचारी हितार्थ निधी स्थापन करणे.

**५.** (१) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने, परिवहन समितीस असा निदेश देता येईल की, ज्या उद्दिष्टासाठी विशेष निधी निर्माण करणे इष्ट आहे असे मानले जाईल, त्या उद्दिष्टाशी ज्या रकमांचा स्पष्टपणे संबंध असेल अशा परिवहन निधीत वेळोवेळी जमा करण्यायोग्य कोणत्याही रकमा परिवहन उपक्रमाच्या लेख्यांमध्ये एका वेगळ्या शीर्षकाखाली जमा करण्यात आल्या पाहिजेत आणि अशा उद्दिष्टाशी स्पष्टपणे संबंध असलेला सर्व खर्च अशा शीर्षकाखाली खर्ची टाकण्यात आला पाहिजे. अन्य विशेष निधी.

(२) तशीच मान्यता घेऊन, परिवहन निधीचा एखादा भाग, ज्या विनिर्दिष्ट उद्दिष्टासाठी विशेष निधी निर्माण करणे इष्ट आहे असे मानले जाईल अशा एखाद्या विनिर्दिष्ट उद्दिष्टाशी संबंध असलेला खर्च भागवण्यासाठी निधी राखून ठेवण्याच्या प्रयोजनासाठी परिवहन उपक्रमाच्या लेख्यांमध्ये एका वेगळ्या शीर्षकाखाली वेळोवेळी जमा करता येईल आणि असा निधी निर्माण करण्यात येईल तेव्हा, फक्त अशा उद्दिष्टाशी स्पष्टपणे संबंध असेल असाच खर्च अशा विशेष शीर्षकाखाली खर्ची टाकण्यात आला पाहिजे.

(३) परिवहन समितीचे कोणत्याही वेळी असे मत होईल की, या नियमान्वये निर्माण करण्यात आलेला विशेष निधी हा यापुढे चालू ठेवणे आवश्यक नाही, तर परिवहन समितीस, महानगरपालिकेच्या मंजुरीने असा निधी बंद करण्याविषयी निदेश देता येईल आणि अशा निधीतील खर्च न झालेली शिल्लक रक्कम असल्यास, ती रक्कम परिवहन समिती निदेश देईल अशा रीतीने विनियोजित करण्यात आली पाहिजे.

## प्रकरण सात

## अर्थसंकल्प

**१.** अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या बाजूचे प्रधान शीर्षे, गौण शीर्षे, दुय्यम शीर्षे आणि प्राथमिक घटक यांखाली वर्गीकरण करण्यात आले पाहिजे :–

(अ) "प्रधान शीर्षे" म्हणजे, अर्थसंकल्पीय अंदाजात खर्चाचे ज्या निरनिराळ्या सेवांखाली वर्गीकरण करण्यात आले आहे त्या सेवांनुरूप असलेले मुख्य लेखाशीर्ष आणि त्याची दोन किंवा अधिक गौण शीर्षांत विभागणी करता येईल. अर्थसंकल्प शीर्षाचे वर्गीकरण.

(ब) "गौण शीर्ष" म्हणजे, प्रत्येक प्रधान शीर्षाचे ज्या शीर्षात वर्गीकरण करण्यात येते असे प्रधान शीर्षाला लगेच दुय्यम असलेले लेखाशीर्ष आणि याची आणखी दोन किंवा अधिक दुय्यम शीर्षांत पोटविभागणी करता येईल.

(क) "दुय्यम शीर्ष" म्हणजे, प्रत्येक गौण शीर्षाचे ज्या शीर्षात वर्गीकरण करण्यात येते असे गौण शीर्षाला लगेच दुय्यम असलेले लेखाशीर्ष आणि त्याची आणखी दोन किंवा अधिक प्राथमिक घटकांत पोटविभागणी करता येईल.

(ड) "प्राथमिक घटक" म्हणजे, अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या वेगवेगळ्या बाबी ज्या एक किंवा अनेक गटांत मांडण्यात येतील असा एक किंवा अनेक अंतिम गट.

रक्कम कमी करणे किंवा बदली करणे. २. (१) कलम १०१, पोट-कलम (१) च्या तरतुदीच्या अधीन राहून, महानगरपालिकेस स्थायी समितीने सरकारी वर्षात वेळोवेळी केलेल्या शिफारशींवरून, कोणतीही रक्कम, एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(२) स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी –

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल ;

(ब) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम, एका गौण शीर्षातून दुसऱ्या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षातून दुसऱ्या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल ;

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुसऱ्या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुसऱ्या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल ;

(३) आयुक्तास, सरकारी वर्षात कोणत्याही वेळी, एका गौण शीर्षाखालील पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुसऱ्या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुसऱ्या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल ; मात्र अशा बदलीमुळे आवर्ती दायित्व निर्माण होता कामा नये :

परंतु, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या पाचशे रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या प्रत्येक बदलीबाबत आयुक्ताने, ताबडतोब स्थायी समितीस कळवले पाहिजे.

(४) पोट-नियम (१), (२) आणि (३) अन्वये कोणतीही बदली करताना या अधिनियमाच्या सर्व आवश्यक गोष्टींकडे योग्य लक्ष पुरविण्यात आले पाहिजे.

(५) पोट-नियम (२), खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कमी करण्यात येणारी कोणतीही रक्कम पाचशे रुपयांपेक्षा अधिक असेल तर, महानगरपालिकेस, त्याबाबतीत तिला योग्य वाटेल असा आदेश देता येईल आणि असा आदेश अंमलात आणणे हे स्थायी समितीचे व आयुक्ताचे आवश्यक कर्तव्य असेल.

(६) परिवहन निधीतून करावयाच्या खर्चाच्या प्रयोजनासाठी या नियमाच्या तरतुदी जणू "स्थायी समिती" या शब्दाऐवजी "परिवहन समिती" हे शब्द आणि "आयुक्त" या शब्दाऐवजी "परिवहन व्यवस्थापक" हे शब्द दाखल करण्यात आले आहेत हे समजून लागू होतील.

## प्रकरण आठ

## कराधान नियम

### मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इत्यादी विषयी नोटीस

मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकी-हक्काच्या सर्व हस्तांतरणा-संबंधी आयुक्तास नोटीस देणे.

**१.** (१) कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा जागेसंबंधीच्या किंवा अशा जागेवरील मालकीहक्काचे असे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा, ज्या व्यक्तीच्या मालकीहक्काचे असे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने आणि ज्या व्यक्तीकडे उक्त मालकीहक्काचे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने, हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर किंवा त्याची नोंदणी करण्यात असेल तर, त्याच्या नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आला नसेल तर अशा रीतीने हस्तांतरण करण्यात आल्यानंतर तीन महिन्यांच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) वर सांगितल्याप्रमाणे प्रथमत: कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती मरण पावल्यास, मयत व्यक्तीच्या मालकीहक्काचे, वारस म्हणून किंवा अन्यथा ज्या व्यक्तीकडे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या मृत्यूपासून एक वर्षाच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस दिली पाहिजे.

नोटिशीचा नमुना [1][ आणि मालकी हक्काच्या हस्तांतरणाबाबतची देय फी ]

**२.** (१) नियम १ अन्वये द्यावयाची नोटीस ही, आयुक्त, वेळोवेळी जाहीर नोटिशीद्वारे विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात असली पाहिजे आणि तीत उक्त नमुन्यानुसार आवश्यक असलेला सर्व तपशील स्पष्टपणे व बिनचूकपणे नमूद केला पाहिजे.

(२) अशी कोणतीही नोटीस मिळाल्यानंतर, आयुक्तास, त्यास तसे करणे आवश्यक वाटले तर, हस्तांतरण लेख असल्यास, तो हस्तांतरण लेख किंवा [2][ * * * ] नोंदणी अधिनियम, १९०८ च्या कलम ५७ अन्वये मिळवलेली त्याची एक प्रत किंवा मयत व्यक्तीच्या मालकीहक्काचे हस्तांतरण करण्यात आले असेल तर त्याबाबतीत, अशा हस्तांतरणाचा पुरावा असलेला अन्य कोणताही दस्तऐवज सादर करण्याविषयी फर्माविता येईल. (१९०८ चा १६.)

(३) अशी नोटीस, ज्या जागेसंबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत, नोटिशीच्या दिनांकास देय असलेला मालमत्ता कर भरण्यात आला नसेल तर आणि स्थायी समिती नोटीस स्वीकारण्यासाठी वेळोवेळी विहित करील अशी फी भरण्यात आली नसेल तर, अशी कोणतीही नोटीस कायदेशीररीत्या देण्यात आली आहे, असे मानले जाणार नाही.

हस्तांतरणाच्या कोणत्याही नोटिशीच्या अभावी मालमत्ता कर देण्याचे दायित्व चालू राहणे.

**३.** (१) मालमत्ता कर देण्यास प्रथमत: दायी असलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा जागे-संबंधीच्या किंवा अशा जागेवरील मालकीहक्कांचे हस्तांतरण करण्यात आले असेल अशी व्यक्ती, अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस देण्यात कसूर करील तर, अशा निष्काळजीपणामुळे अन्य जे कोणतेही दायित्व तिला प्राप्त होईल त्याशिवाय आणखी, ती अशी नोटीस देईपर्यंत किंवा आयुक्ताच्या पुस्तकात अशा हस्तांतरणाची नोंद करण्यात येईपर्यंत, उक्त जागेच्या बाबतीत, वेळोवेळी देय असलेली सर्व मालमत्ता कर देण्यास दायी असण्याचे चालू राहील.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २१ (१) द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २१ (२) द्वारे "भारतीय" हा शब्द वगळण्यात आला.

(२) या नियमातील कोणत्याही मजकुरामुळे, उक्त मालमत्ता कर देण्याचे हस्तांतरितीचे दायित्व कमी होते किंवा त्या जागेच्या बाबतीत येणे असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीसाठी कलम १४१ अन्वये आयुक्तास प्रदान करण्यात आलेल्या उक्त जागेवरील अग्रहक्कास बाध येते असे समजता कामा नये.

आयुक्तास निबंधकाकडून माहिती मागविता येईल.

४. (१) आयुक्ताने लेखी विनंती केल्यावर, [१][ * * * ] नोंदणी अधिनियम, १९०८ च्या प्रयोजनांसाठी रचना करण्यात आलेल्या ज्या जिल्ह्यात किंवा उपजिल्ह्यात ते शहर असेल तर जिल्ह्याच्या किंवा उपजिल्ह्याच्या निबंधकाने किंवा उपनिबंधकाने त्या शहरातील स्थावर मालमत्तांवरील मालकीहक्कांच्या हस्तांतरण लेखांच्या नोंदणीसंबंधी जो तपशील आयुक्त वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असा तपशील पुरवला पाहिजे. १९०८ चा १६.

(२) हस्तांतरण लेखाची नोंदणी करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर किंवा आयुक्ताने तशी विनंती केल्यास, आयुक्त ठरवील अशा कालांतरांनी द्यावयाच्या नियतकालिक विवरणांद्वारे अशी माहिती पुरविण्यात आली पाहिजे.

नवीन इमारत उभारणे, इत्यादींसंबंधी आयुक्तास नोटीस देणे.

५. (१) कोणतीही नवीन इमारत उभारण्यात येईल किंवा कोणतीही इमारत पुन्हा बांधण्यात येईल किंवा वाढविण्यात येईल किंवा जी कोणतीही इमारत रिकामी असेल अशा इमारतीचा पुन्हा भोगवटा करण्यात येईल तेव्हा, [२][ किंवा संपूर्ण इमारत किंवा इमारतीच्या भागांमधील वापरकर्त्यांमध्ये बदल करण्यात येईल तेव्हा ] त्या इमारतीवर आकारण्यात आलेले मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीने पंधरा दिवसांच्या आत, आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) उक्त पंधरा दिवसांचा कालावधी हा नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थिति पुरी होणे किंवा तिचा भोगवटा करणे यांपैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या दिनांकापासून किंवा इमारत वाढवल्याच्या दिनांकापासून आणि जी इमारत रिकामी असेल त्या इमारतीच्या बाबतीत, तिचा पुन्हा भोगवटा करण्यात आल्याच्या दिनांकापासून [३] [ आणि संपूर्ण इमारत किंवा इमारतीच्या भागांमधील वापरकर्त्यांच्या बदलाच्या प्रकरणामध्ये वापरकर्त्यांच्या अशा बदलांच्या दिनांकापासून ] मोजण्यात आला पाहिजे.

इमारत पाडून किंवा काढून टाकल्यासंबंधी आयुक्तास नोटीस देणे.

६. (१) आयुक्ताच्या आदेशानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा, मालमत्ता करास पात्र असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून किंवा काढून टाकण्यात येईल तेव्हा, उक्त कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीने आयुक्तास, त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) अशी नोटीस देण्यात येईपर्यंत, पूर्वोक्त व्यक्ती अशी इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून किंवा काढून टाकण्यात आला नसता तर, ती व्यक्ती अशा इमारतीच्या बाबतीत जो मालमत्ता कर देण्यास दायी झाली असती असा प्रत्येक मालमत्ता कर देण्यास दायी असण्याचे चालू राहील :

परंतु, या नियमातील कोणताही मजकूर, जी इमारत किंवा इमारतीचा जो भाग पडला असेल किंवा जळून गेला असेल त्या इमारतीच्या बाबतीत किंवा इमारतीच्या त्या भागाच्या बाबतीत लागू होणार नाही.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे "भारतीय" हा शब्द वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २३ (१) द्वारे हा मजकूर दाखल केला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २३ (२) द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

**७.** (१) मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरवण्यासाठी ज्या वार्षिक भाड्याने अशी जमीन किंवा इमारत वर्षावर्षाने वाजवीरीत्या भाड्याने देता येईल अशा अपेक्षा असेल अशा वार्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या १० टक्के इतकी रक्कम वजा केली पाहिजे आणि उक्त वजा केलेली रक्कम ही दुरुस्तीसाठी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी वजा केलेली रक्कम म्हणून असेल. करयोग्य मूल्य कशा प्रकारे ठरवता येईल.

(२) कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा इमारतीवर किंवा जमिनीवर असलेली व आयुक्ताने महानगरपालिकेच्या मान्यतेने जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या वर्गांपैकी कोणत्याही वर्गात मोडणारी सर्व सयंत्रे व यंत्रसामग्री ही, पोट-नियम (१) अन्वये अशा इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरवण्याच्या प्रयोजनासाठी अशा इमारतीचा किंवा जमिनीचा भाग असल्याचे मानले जाईल ; परंतु, वर सांगितल्याप्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त, अशा कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा इमारतीवर किंवा जमिनीवर असलेल्या कोणत्याही संयंत्राचे किंवा यंत्रसामग्रीचे मूल्य जमेस धरता कामा नये.

(३) आयुक्ताने, पोट-नियम (२) अन्वये वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या संयंत्रांचे व यंत्रसामग्रीचे वर्ग स्पष्टपणे दर्शविणारे आणि अशा प्रत्येक वर्गात कोणते संयंत्र व यंत्रसामग्री येते याचे तपशीलवार वर्णन नमूद करणारे एक विवरणपत्र स्थायी समितीच्या निदेशांनुसार तयार केले पाहिजे आणि ते विवरणपत्र लोकांना सर्व वाजवी वेळी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात पाहण्यासाठी खुले असले पाहिजे.

(४) पोट-नियम (३) अन्वये तयार करण्यात आलेल्या विवरणपत्राच्या छापील प्रती आयुक्त ठरवील अशा किमतीत नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात विक्रीसाठी ठेवण्यात आल्या पाहिजेत.

भांडवली मूल्य कसे निर्धारित करणे.

[1] [(७-अ) (१) मालमत्ता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी, आयुक्त, * मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याच्या तरतुदींन्वये, तयार केलेले मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजार मूल्य ठरवणे) नियम, १९९५ अन्वये, तयार केलेल्या व त्या त्यावेळी अंमलात असलेल्या मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये दर्शवलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मूल्य [2] [ आधारभूत मूल्य म्हणून ] लक्षात घेईल अथवा जिचे भांडवली मूल्य निर्धारित करणे आवश्यक आहे अशी इमारत किंवा जमीन ज्या क्षेत्रातील असेल अशा कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील कोणत्याही मालमत्तेचे मूल्य मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये दाखविण्यात आले नसेल तर किंवा एखाद्यावेळी असे मुद्रांक शुल्क सिद्ध गणक अस्तित्वात आले नसेच तर, त्याबाबतीत आयुक्तास,

[3] [ अशा इमारतीचे किंवा जमिनीचे बाजार मूल्य आधारभूत मूल्य म्हणून विचारात घेऊन तिचे भांडवली मूल्य निश्चित करता येईल. आयुक्त, उपरोक्तप्रमाणे, भांडवली मूल्य निश्चित करताना, पुढील घटकदेखील विचारात घेईल :— ]

जमिनीचे बाजार मूल्य आधारभूत मूल्य म्हणून विचारात घेऊन, तसेच पुढील घटकदेखील विचारात घेऊन तिचे भांडवली मूल्य निश्चित करता येईल.

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २४ द्वारे नियम ७-अ समाविष्ट केला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूची ३ व ४ नोंद ६७ द्वारे, १ मे १९६० पासून "महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम," अशी संक्षिप्त नावात सुधारणा करण्यात आली.

२ वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) (१) (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १३ (क) (१) (ख) द्वारे "अशा इमारतीचे किंवा जमिनीचे बाजारमूल्य आधारभूत मूल्य म्हणून विचारात घेऊन, तसेच पुढील घटकदेखील विचारात घेऊन तिचे भांडवली मूल्य निश्चित करता येईल." या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल केला.

(क) जमिनीचे स्वरूप व प्रकार आणि इमारतीची संरचना ;

(ख) जमिनीचे क्षेत्र किंवा इमारतीचे चटई क्षेत्र ;

(ग) वापरकर्ता प्रवर्ग म्हणजे (एक) निवासी, (दोन) वाणिज्यिक (दुकाने किंवा तत्सम), (तीन) कार्यालये, (चार) हॉटेले (चार तारांकितपर्यंत), (पाच) हॉटेले (चार तारांकितपेक्षा अधिक), (सहा) बँका, (सात) उद्योग व कारखाने), (आठ) शालेय व महाविद्यालयीन इमारत किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी इमारत, (नऊ) मॉल आणि (दहा) वरीलपैकी कोणत्याही प्रवर्गामध्ये समाविष्ट नसलेली अन्य कोणतीही इमारत किंवा जमीन ;

(घ) इमारत किती वर्ष जुनी आहे ; किंवा

(ङ) पोट-नियम (२) अन्वये केलेल्या विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अन्य काही घटक.

(२) आयुक्त, पोट-नियम (१) अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी स्थायी समितीच्या मान्यतेने, इमारतींच्या किंवा जमिनींच्या प्रर्वगाचा तपशिलांच्या बाबतीत अशा विविध प्रवर्गांना नेमून द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत विनियम तयार करील.

(३) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पोट-नियम (१) अन्वये निश्चित केलेले भांडवली मूल्य दर पाच वर्षांनी सुधारित करता येईल :

परंतु, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करून, उक्त पाच वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतींचे किंवा जमिनींचे भांडवली मूल्यांचे सुधारित करता येईल आणि तद्नुसार तो, नियम २० अन्वये, अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या संबंधात, आकारणी पुस्तकात त्याअनुसार सुधारणा करील.

(४) नियम ७ चे पोट-कलम (२) (३) व (४) याच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी देखील लागू असतील. ]

आयुक्तास मालकाकडून किंवा भोगवटा-दाराकडून माहिती किंवा विवरण मागवता येईल आणि आकारणीयोग्य जागांत प्रवेश करता येईल व त्यांची पाहणी करता येईल.

८. (१) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मूल्य ठरवणे आणि तिच्या संबंधात बसवण्यायोग्य असलेला कोणताही मालमत्ता कर देण्यास कोणती व्यक्ती प्रथमत: पात्र आहे, हे ठरवणे आयुक्तास शक्य व्हावे म्हणून त्यास अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या मालकास किंवा भोगवटादारास याबाबत आयुक्त विहित करील अशा वाजवी मुदतीच्या आत पुढील गोष्टींसंबंधी माहिती पुरवण्याविषयी किंवा अशा मालकाने किंवा भोगवटादाराने सही केलेले लेखी विवरण पुरवण्याविषयी फर्मावता येईल :—

(अ) अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे नाव व राहण्याचे ठिकाण किंवा असा मालक व भोगवटादार या दोघांची नावे व राहण्याची ठिकाणे ;

(ब) अशा इमारतीचे, जमिनीचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे क्षेत्रफळ आणि अशा इमारतीसाठी किंवा जमिनीसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी मिळणारे भाडे असल्यास ते भाडे ; आणि

(क) अशा इमारतीचे किंवा जमिनीचे [१] [ करयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य ] ठरवण्याच्या संबंधातील प्रत्यक्ष खर्च किंवा अन्य विनिर्दिष्ट तपशील.

[२] [ (ड) अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संबंधात नियम ७ क च्या पोट-नियम (१) च्या खंड (क) ते (ड.) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही किंवा सर्व बाबींच्या बाबतीतील तपशील.]

(२) ज्या मालकास किंवा भोगवटादारास असा कोणताही आदेश देण्यात आला आहे असा प्रत्येक मालक किंवा भोगवटादार हा, त्याचे अनुपालन करण्यास आणि आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी माहिती देण्यास किंवा खरे विवरण सादर करण्यास बांधलेला असेल.

(३) जो कोणी, अशा कोणत्याही आदेशाचे अनुपालन करणार नाही किंवा आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी माहिती देण्यात किंवा खरे विवरण सादर करण्यात कसूर करील त्यास, ज्या कोणत्याही शास्तीस तो पात्र असेल. त्याशिवाय आणखी, तो ज्या इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात आयुक्ताने केलेल्या कोणत्याही आकारणीस आक्षेप घेण्यास प्रतिबंध करण्यात आला पाहिजे.

(४) तसेच, आयुक्तास पूर्वोक्त प्रयोजनांसाठी, अशा कोणत्याही इमारतीची किंवा जमिनीची पाहणी करता येईल.

## आकारणी पुस्तक

आकारणी पुस्तकात कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत.

९. आयुक्ताने [३] [ स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरवील अशा नमुन्यात व रीतीने "आकारणी पुस्तक" या नावाचे एक पुस्तक ठेवले पाहिजे ] प्रत्येक सरकारी वर्षी पुढील गोष्टी नमूद केल्या पाहिजेत :-

(अ) शहरातील सर्व इमारतींची व जमिनींची यादी ; तीत आयुक्तास योग्य वाटेल अशा रीतीने एकतर नावावरून किंवा क्रमांकावरून प्रत्येक इमारत किंवा जमीन ही वेगवेगळी दाखवली पाहिजे आणि तीत प्रत्येकीचे स्थान किंवा स्वरूप यासंबंधी जो तपशील तिची ओळख पटवण्यासाठी त्याच्या मते पुरेसा होईल, असा तपशील असला पाहिजे ;

(ब) या अधिनियमाच्या व नियमाच्या तरतुदींनुसार ठरवलेले अशा प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मूल्य [४] [ किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य ] ;

---

१ वरील अधिनियमाच्या कलम २५ (१) द्वारे 'मूल्य' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम २५ (२) द्वारे खंड (ड) दाखल केला.

३ वरील अधिनियमाच्या कलम २६ (१) द्वारे हा मजकूर दाखल केला.

४ वरील अधिनियमाच्या कलम २६ (२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

(क) अशा प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेले मालमत्ता कर असल्यास, ते मालमत्ता कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव ;

[१][ (ड) अशी कोणतीही इमारत किंवा जमीन सामान्य कराच्या आकारणीस जबाबदार नसेल, तर किंवा तिला मालमत्ता कर भरण्यातून संपूर्णत: किंवा तिच्या काही भागाकरिता सूट मिळाली असेल, तर, ती अशी जबाबदार नसल्याबद्दलची किंवा यथास्थिति, सूट मिळाल्याबद्दलची कारणे;]

(ई) त्या वर्षासाठी बसवावयाच्या मालमत्ता करांचे दर महानगरपालिकेने रीतसर ठरवले असतील आणि आकारणी पुस्तकाच्या कोणत्याही भागात नमूद केलेल्या करयोग्य मूल्याच्या [२][ किंवा यथास्थिति, भांडवली मूल्याच्या ] रकमेविरुद्ध केलेल्या तक्रारी स्वीकारण्यासाठी, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे जाहीर नोटिशीद्वारे ठरवून दिलेली मुदत संपली असेल तेव्हा आणि अशा ज्या कोणत्याही नोंदीविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल त्या नोंदीच्या बाबतीत, अशी तक्रार यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात आली असेल तेव्हा, आकारणी पुस्तकाच्या अशा भागात नमूद केलेल्या प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्यायोग्य मालमत्ता कर असल्यास, त्या प्रत्येक मालमत्ता कराची आकारणी अशा इमारतीवर किंवा जमिनीवर ज्या रकमेने करण्यात येईल ती रक्कम ;

(फ) कलम १३४ किंवा १३५ अन्वये कोणत्याही इमारतीस किंवा जमिनीस पुरवलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार बसवण्यात आला असेल किंवा पाणीपट्टी किंवा पाण्याबद्दल मोजणी करून बसवलेला आकार याबद्दल तडजोड करण्यात आली असेल तर किंवा कलम १३७ अन्वये कोणत्याही इमारतीसाठी किंवा जमिनीसाठी विशेष दराने साफसफाई कर ठरवण्यात आला असेल तर, अशा आकाराचा तडजोडीचा किंवा दराचा तपशील व रक्कम :

(ग) आयुक्तास ज्याविषयी वेळोवेळी निदेश देणे योग्य वाटेल असा अन्य तपशील असल्यास तो तपशील.

प्रत्येक प्रभागासाठी वेगळे आकारणी पुस्तक तयार करणे आणि आवश्यक असल्यास त्याचे भाग पाडणे.

**१०.** (१) आयुक्तास योग्य वाटेल तर, [३][ प्रशासकीय प्रयोजनासाठी ] त्यावेळी शहराची ज्या प्रभागांमध्ये विभागणी करण्यात आली असेल अशा प्रत्येक प्रभागासाठी एक याप्रमाणे आकारणी पुस्तकाची "प्रभाग आकारणी पुस्तके" या नावाची वेगळी पुस्तके तयार करता येतील आणि प्रत्येक प्रभाग आकारणी पुस्तकाचे, आयुक्त ठरवील अशा प्रयोजनांसाठी व अशा अनेक नावांचे दोन किंवा अधिक भाग करता येतील.

(२) प्रभाग आकारणी पुस्तके व त्यांचे संबंधित भाग असल्यास, ते भाग या सर्वांचे मिळून आकारणी पुस्तक होईल.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २६ (३) द्वारे खंड (ड) दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २६ (४) द्वारे हा मजकूर दाखल केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे "निवडणुकांच्या प्रयोजनासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

दोन किंवा अधिक व्यक्तींना पृथकपणे भोगवटा करण्यासाठी भाड्याने दिलेली मालमत्ता कशी आहे म्हणून समजणे.

**११.** (१) कोणतीही इमारत किंवा जमीन दोन किंवा अधिक व्यक्तींना पृथकपणे धारण करण्यासाठी भाड्याने देण्यात आली असेल तेव्हा, आयुक्तास, अशा इमारतीवर किंवा जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी करण्याच्या प्रयोजनासाठी ती संपूर्ण एकच मालमत्ता आहे असे समजण्यात येईल किंवा अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाच्या लेखी संमतीने तिच्यातील प्रत्येक पृथक धारण जमीन किंवा अशा दोन किंवा अधिक पृथक धारण जमिनी एकत्रपणे किंवा प्रत्येक मजला किंवा फ्लॅट स्वतंत्र मालमत्ता आहे, असे समजण्यात येईल.

(२) आयुक्ताने, या कलमान्वये कोणत्याही एका इमारतीत किंवा जमिनीत समाविष्ट असलेल्या सर्व पृथक धारण जमिनी या एकच मालमत्ता आहेत असे समजण्याचे ठरवले असेल तेव्हा, त्यास याबाबत स्थायी समिती वेळोवेळी विहित करील अशा कोणत्याही सामान्य शर्तीच्या अधीन राहून, ज्या कोणत्याही सहामाहीसाठी उक्त मालमत्तेच्या संबंधात सामान्य कराचा हप्ता बसवण्यायोग्य होईल, अशा सहामाहीच्या पहिल्या दिवसापूर्वी सात दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, अशा रीतीने बसवण्यायोग्य असलेल्या सामान्य कराच्या एकपंचमांश भागाचा करप्रतिग्रह मंजूर करता येईल.

(३) जी व्यक्ती, पोट-नियम (२) अन्वये करप्रतिग्रहासाठी अर्ज करील अशा कोणत्याही व्यक्तीने ज्या मालमत्तेच्या संबंधात करप्रतिग्रहासाठी मागणी करण्यात आली असेल अशा मालमत्तेसंबंधी आणि तिच्यातील पृथक धारण जमिनीसंबंधी संपूर्ण व बिनचूक माहिती, याबाबत स्थायी समितीने विहित केलेल्या सामान्य शर्तींना अनुसरून, आयुक्त, ज्या नमुन्यात व ज्या तपशीलांसह पुरवण्यास फर्मावील, त्या नमुन्यात व त्या तपशीलासह त्यास पुरवली पाहिजे.

प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव निश्चित करता येत नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१२.** (१) कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव निश्चित करता येत नसेल तेव्हा, आकारणी पुस्तकात आणि या अधिनियमान्वये उक्त व्यक्तीवर बजावणे आवश्यक असेल अशा कोणत्याही नोटिशीत, आणखी वर्णन न देता, त्या व्यक्तीस अशा जागेची "धारक" असे संबोधण्यास ते पुरेसे होईल.

(२) अशा कोणत्याही बाबतीत अशा जागेचा भोगवटा करणारी कोणतीही व्यक्ती वर सांगितल्याप्रमाणे प्रथमत: कोण पात्र आहे, हे निश्चित करण्यासाठी आवश्यक असेल अशी खरी माहिती देण्याचे नाकारील तर, अशी माहिती मिळेपर्यंत, अशी व्यक्ती ज्या जागेचा भोगवटा करत असेल तर त्या जागेवर बसवण्यायोग्य असलेले सर्व मालमत्ता कर देण्यास ती जबाबदार असेल.

कोणत्याही प्रभागातील मालमत्तेचे मूल्यमापन पूर्ण होईल तेव्हा जाहीर नोटीस देणे.

**१३.** (१) कोणत्याही प्रभाग आकारणी पुस्तकातील नियम ९, खंड (क), (ख), (ग) आणि (घ) अन्वये आवश्यक असलेल्या नोंदी, व्यवहार्य असेल तितपत, पूर्ण करण्यात आल्या असतील तेव्हा, आयुक्ताने, त्याबाबत आणि ज्या ठिकाणी प्रभाग आकारणी पुस्तक किंवा त्याची प्रत पाहण्यास मिळेल त्या ठिकाणासंबंधी जाहीर नोटीस दिली पाहिजे.

(२) अशी जाहीर नोटीस, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन आणि तसेच संपूर्ण प्रभागातील ठळक ठिकाणी मोठ्या जाहिराती लावून [१][ किंवा आयुक्तास वाटेल अशा इलेक्ट्रॉनिक, प्रसार माध्यमांसह अन्य कोणत्याही पद्धतीद्वारे ] देण्यात आली पाहिजे.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २८ द्वारे हा मजकूर दाखल केला.

आकारणी पुस्तक पाहण्यासाठी खुले असणे.

**१४.** (१) आकारणी पुस्तकात नोंद केलेल्या एखाद्या जागेचा मालक किंवा भोगवटादार आपण आहोत असा वाजवीरीत्या दावा सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस किंवा अशा कोणत्याही मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या अभिकर्त्यास उक्त पुस्तक पाहण्यास आणि त्यातील उक्त जागेशी संबंधित असलेल्या कोणत्याही भागातून उतारे घेण्यास विनामूल्य परवानगी देण्यात आली पाहिजे.

(२) ज्या व्यक्तीस पोट-नियम (१) अन्वये विनामूल्य आकारणी पुस्तक पाहण्याचा किंवा त्यातील कोणत्याही भागातून उतारे घेण्याचा हक्क नाही अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त, याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी विहित करील अशी फी तिने दिल्यावर, तसे करण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे.

मूल्यनिर्धारणा-विरुद्ध तक्रारी सादर करण्यासाठी वेळ जाहीर करणे.

**१५.** (१) आयुक्ताने नियम १३ मध्ये विहित करण्यात आलेल्या वेळी व तशा रीतीने एक जाहीर नोटीस देऊन प्रभाग आकारणी पुस्तकात नमूद केलेल्या कोणत्याही करयोग्य मूल्याच्या [१][ किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या ] रकमेविरुद्ध केलेल्या तक्रारी त्याच्या कार्यालयात ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी स्वीकारण्यात येतील तो दिनांक जाहीर केला पाहिजे ; मात्र, हा दिनांक अशी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून [२][ एकवीस दिवसांच्या ] आतील असता कामा नये.

(२) कोणतीही जागा मालमत्ता कर देण्यास पात्र म्हणून प्रथमच आकारणी पुस्तकात नोंदण्यात आली असेल किंवा असे कर देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जागेचे करयोग्य मूल्य वाढवण्यात आले असेल अशा प्रत्येक बाबतीत, आयुक्ताने पोट-नियम (१) अन्वये जाहीर नोटीस देण्यात आल्यानंतर, सोयीप्रमाणे होईल तितक्या लवकर, उक्त जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास एक विशेष लेखी नोटीस दिली पाहिजे आणि अशा नोटिशीत अशा नोंदीचे स्वरूप विनिर्दिष्ट केले पाहिजे व अशी विशेष नोटीस बजावल्यापासून [३][ एकवीस दिवसांच्या ] आत कोणत्याही वेळी अशा नोंदीविरुद्ध कोणतीही तक्रार त्याच्या कार्यालयात स्वीकारण्यात येईल, असे त्यास कळवले पाहिजे.

मूल्यनिर्धारणा-विरुद्ध तक्रारी सादर करण्याची वेळ व रीत.

**१६.** (१) आकारणी पुस्तकात नोंदण्यात आलेल्या कोणत्याही करयोग्य मूल्याच्या [१][ किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या ] रकमेविरुद्ध किंवा मालमत्ता कर देण्यास प्रथमत: जबाबदार म्हणून कोणत्याही व्यक्तीचे नाव नमूद करण्याविरुद्ध किंवा कोणतीही इमारत किंवा जमीन सामान्य कर आकारला जाण्यास पात्र म्हणून समजण्याविरुद्ध करावयाची प्रत्येक तक्रार ही, आयुक्ताकडे लेखी अर्ज करून सादर करण्यात आली पाहिजे आणि असा अर्ज पूर्वोक्त जाहीर किंवा विशेष नोटिशीत याबाबत ठरवलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा अशा शेवटच्या दिवशी आयुक्ताच्या कार्यालयात सादर करण्यात आला पाहिजे.

(२) अशा प्रत्येक अर्जात, ज्या कारणांवरून मूल्यनिर्धारणाविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे, ती कारणे थोडक्यात परंतु, संपूर्णपणे नमूद करण्यात आली पाहिजे.

**१७.** आयुक्ताने, अशा रीतीने मिळालेल्या सर्व तक्रारींची या प्रयोजनासाठी ठेवावयाच्या पुस्तकात नोंद

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २९ (१) (ख) आणि २९ (२) (क) द्वारे हा मजकूर दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २९ (१) (क) आणि २९ (२) (ख) द्वारे 'पंधरा दिवसांच्या' या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे हा मजकूर दाखल केला.

करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि तक्रार करणाऱ्या प्रत्येकास ज्यावेळी व ज्या ठिकाणी त्याच्या तक्रारीची चौकशी करण्यात येईल तो दिवस, ती वेळ व ते ठिकाण निर्दिष्ट करणारी लेखी नोटीस दिली पाहिजे.

तक्रारी करणाऱ्यांना त्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी ठरवलेल्या दिवसांची नोटीस देणे.

१८. (१) अशा रीतीने ठरवलेल्या वेळी व ठिकाणी आयुक्ताने, तक्रार करणारी व्यक्ती उपस्थित असल्यास तिच्यासमक्ष आणि ती उपस्थित नसल्यास, तिच्या अनुपस्थितीत तक्रारीची चौकशी करून ती निकालात काढली पाहिजे ;

तक्रारीची सुनावणी.

(२) आयुक्तास, वाजवी कारणासाठी, वेळोवेळी चौकशी तहकूब करता येईल.

(३) तक्रार निकालात काढल्यानंतर तिच्या निर्णयासंबंधी नियम १७ अन्वये ठेवण्यात आलेल्या तक्रार पुस्तकात नोंद करण्यात आली पाहिजे आणि आकारणी पुस्तकात अशा निर्णयानुसार कोणतीही आवश्यक सुधारणा करण्यात आली पाहिजे.

१९. (१) तक्रारी असल्यास अशा सर्व तक्रारी निकालात काढल्यानंतर आणि प्रभाग आकारणी पुस्तकात नियम ९, खंड (ड·) अन्वये आवश्यक असलेल्या नोंदी पूर्ण करण्यात येतील तेव्हा, आयुक्ताने उक्त पुस्तक अधिप्रमाणित केले पाहिजे आणि आपल्या सहीने असे प्रमाणित केले पाहिजे की, ज्या बाबतीत त्यात दर्शवल्याप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत अशा बाबी असल्यास, त्या बाबी सोडून, उक्त पुस्तकात नमूद करण्यात आलेल्या योग्य करयोग्य मूल्याविरुद्ध [1][ किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्याविरुद्ध ] कोणताही कायदेशीर आक्षेप घेण्यात आलेला नाही.

सर्व तक्रारी निकालात काढल्यानंतर प्रभाग आकारणी पुस्तके अधिप्रमाणित करणे.

(२) त्यानंतर उक्त आकारणी पुस्तक हे, नियम २० च्या तरतुदींन्वये त्यात त्यानंतर करण्यात येतील अशा फेरफारांच्या अधीन राहून, ज्या सरकारी वर्षाशी ते पुस्तक संबंधित असेल त्या सरकारी वर्षात त्या प्रभागातील प्रत्येक इमारतींवर व जमिनींवर बसवण्यायोग्य असलेल्या प्रत्येक मालमत्ता कराच्या रकमेबाबतचा निर्णायक साक्षीपुरावा म्हणून स्वीकारण्यात आले पाहिजे.

२०. (१) पोट-नियम (२) मधील तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्तास, कोणत्याही संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असेल त्या सरकारी वर्षात कोणत्याही वेळी, अन्य कोणतीही माहिती मिळाल्यावर त्या आकारणी पुस्तकात :–

आयुक्तास सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करता येतील.

(अ) ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा रीतीने दाखल करणे आवश्यक असेल अशा व्यक्तीचे नाव त्यात दाखल करून किंवा पूर्वी वगळण्यात आलेल्या कोणत्याही जागा त्यात दाखल करून ;

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३१ द्वारे हा मजकूर दाखल केला.

(ब) मालमत्ता कर देण्यास जबाबदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव काढून टाकून ;

(क) कोणत्याही करयोग्य मूल्याची [१][ किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्याची ] आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करून ;

(ड) ज्या कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे मूल्य चुकीचे ठरवण्यात आले असेल किंवा जिची आकारणी लबाडीने, अभावितपणे किंवा चुकीने करण्यात आली असेल त्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील आकारणीत फेरफार करून ;

(ई) आकारणी पुस्तक तयार करण्यात आल्यानंतर पूर्णत: किंवा अंशत: उभारण्यात आलेल्या, पुन्हा उभारण्यात आलेल्या, फेरफार करण्यात आलेल्या, वाढवण्यात आलेल्या किंवा पुन्हा बांधण्यात आलेल्या कोणत्याही इमारतीसंबंधी नोंद दाखल करून किंवा अशा नोंदीत फेरफार करून ;

(फ) कोणताही मालमत्ता कर देण्याच्या दायित्वातून कोणत्याही जागेस सूट देणारी कोणतीही नोंद दाखल करून किंवा रद्द करून ;

सुधारणा करता येईल.

(२) ज्या सुधारणेमुळे कोणत्याही व्यक्तीवर मालमत्ता कर देण्याची अशी कोणतीही जबाबदारी लादण्यात येत असेल की, जी अशा सुधारणेच्या अभावी तिच्यावर लादली गेली नसती किंवा ज्या सुधारणेमुळे आकारणी पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही जागेच्या करयोग्य मूल्यात [१][ किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्यास ] वाढ होत असेल, अशी कोणतीही सुधारणा पोट-नियम (१) अन्वये करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्ताने, नियम १५, पोट-नियम (२) मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे विशेष लेखी नोटीस दिली पाहिजे आणि शक्य असेल तेथवर, नियम १६, १७ आणि १८ मध्ये घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरण्यात आली पाहिजे.

(३) फेरफार केलेल्या नोंदीनुसार संबंधित व्यक्तीची असलेली जबाबदारी किंवा तिला मिळणारी सूट ठरवण्याच्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक सुधारणा, ही सुधारणेचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तेव्हा, चालू सरकारी वर्षातील सर्वात अगोदरच्या दिवसापासून करण्यात आली आहे, असे मानले जाईल.

प्रत्येक सरकारी वर्षी नवीन आकारणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता असणार नाही.

**२१.** (१) प्रत्येक सरकारी वर्षी नवीन आकारणी पुस्तक तयार करण्याची आवश्यकता असणार नाही. पोट-नियम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्तास, निकटपूर्वीच्या वर्षाच्या पुस्तकातील नोंदी या, त्यात त्यास योग्य वाटतील असे फेरफार करून, प्रत्येक नवीन वर्षाच्या नोंदी म्हणून स्वीकारता येतील :

परंतु, प्रत्येक वर्षी नियम १३ आणि १५ यांस अनुसरून जाहीर नोटीस देण्यात आली पाहिजे आणि उक्त नियमाच्या व नियम १६ ते २० दोन्ही धरून, याच्या तरतुदी प्रत्येक वर्षी लागू होतील.

(२) दर [३][ पाच वर्षातून] निदान एकदा तरी नवीन आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहिजे.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (१) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३२ (२) द्वारे हा मजकूर दाखल केला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १३ (ख) द्वारे "चार वर्षातून" या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल केला.

## वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कराबाबत विशेष तरतुदी

**२२.** (१) वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कर हा, ज्या वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत बसवण्यायोग्य असेल अशा कोणत्याही वाहनाच्या, नावेच्या, किंवा जनावराच्या मालकाकडून किंवा त्याचा ताबा असणाऱ्या किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यायोग्य असेल :

वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती.

परंतु, सामान्यत: कोणतेही वाहन ओढण्यासाठी उपयोगात आणण्यात येणाऱ्या किंवा लावण्यात येणाऱ्या जनावरांच्या बाबतीत, अशा जनावरासंबंधीचा कर, अशा वाहनाच्या मालकाकडून किंवा अशा वाहनाचा ताबा असणाऱ्या किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यायोग्य असेल--मग असे जनावर अशा मालकाच्या किंवा व्यक्तीच्या मालकीचे असो वा नसो,

(२) या नियमाच्या प्रयोजनांसाठी, मोटार वाहन अधिनियम, १९३९ * अन्वये ज्या व्यक्तीच्या नावे एखादे
१९३९ मोटार वाहन त्या वेळी नोंदण्यात आले असेल अशी व्यक्ती, तद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, अशा मोटार
चा ४. वाहनाचा मालक आहे, असे किंवा ते तिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

**२३.** (१) आयुक्ताने एक पुस्तक ठेवले पाहिजे आणि त्यात वेळोवेळी पुढील गोष्टींची नोंद केली पाहिजे :–

वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कराचे पुस्तक ठेवणे.

(अ) नियम २२ अन्वये कोणताही कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तींची यादी ;

(ब) ज्या वाहनांच्या, नावांच्या किंवा जनावरांच्या बाबतीत उक्त व्यक्ती अनुक्रमे उक्त करास पात्र असतील त्या वाहनांचे, नावांचे आणि जनावरांचे वर्णन ;

(क) अशा प्रत्येक व्यक्तीने देय असलेल्या कराची रक्कम आणि ती ज्या कालावधीसाठी देय आहे, तो कालावधी ;

(ड) कलम १४४ अन्वये केलेल्या प्रत्येक तडजोडीचा तपशील.

(२) उक्त पुस्तकात ज्या व्यक्तीच्या नावाची नोंद करण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या अभिकर्त्यास अशा पुस्तकाची पाहणी करण्याची आणि अशा पुस्तकातील जो कोणताही भाग अशा व्यक्तीशी संबंधित असेल अशा भागातील उतारे घेण्याची विनामूल्य परवानगी देण्यात येईल.

(३) ज्या व्यक्तीस पोटनियम (२) अन्वये आकारणी पुस्तकांची विनामूल्य पाहणी करण्याचा आणि त्यातील कोणत्याही भागातील उतारे घेण्याचा हक्क नाही अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने, वेळोवेळी विहित करील अशी फी तिने दिल्यावर, तसे करण्याची परवानगी देण्यात येईल.

**२४.** (१) वाहने, नावा व जनावरे यांवरील कर देण्यास पात्र असलेली वाहने, नावा व जनावरे यांची मालकी असणाऱ्या किंवा त्यांचा ताबा किंवा त्यांवर नियंत्रण असणाऱ्या एकापेक्षा अधिक व्यक्तींना भाड्याने दिलेल्या किंवा त्यांच्या भोगवट्यात असणाऱ्या कोणत्याही जागेच्या मालकाने, प्रत्येक वर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी किंवा त्यापूर्वी आपल्या सहीने एक लेखी विवरण आयुक्तास सादर केले पाहिजे आणि त्यात उक्त व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीचे नाव व पत्ता आणि उक्त व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीच्या मालकीची किंवा तिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेली अशा मालकाच्या जागेत ठेवलेली जनावरे, नावा व वाहने नमूद केली पाहिजेत.

जागांचे मालक आणि कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्ती यांनी विवरण सादर करणे.

---

* आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा अधिनियम क्रमांक ५९) पहा.

(२) वाहने, नावा व जनावरे यांवरील कर देण्यास पात्र असलेले वाहन, नाव व जनावर ज्या व्यक्तीच्या मालकीची असेल किंवा तिच्या कब्जात असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, प्रत्येक वर्षी १ एप्रिल किंवा १ ऑक्टोबर रोजी किंवा त्यापूर्वी किंवा आयुक्तांकडून याबाबत विशेष नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, आपल्या सहीने एक लेखी विवरण आयुक्तास सादर केले पाहिजे आणि त्यात अशा व्यक्तीच्या मालकीचे किंवा तिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेले वाहन, नाव किंवा जनावर असल्यास, त्यासंबंधी आयुक्त जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी माहिती नमूद केली पाहिजे.

(३) अनुक्रमे पोट-नियम (१) आणि पोट-नियम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला प्रत्येक मालक किंवा व्यक्ती, आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरे विवरण सादर करण्यास बांधलेली असेल,- मग ती कर देण्यास पात्र असो किंवा नसो.

ज्या वाहनासंबंधी, नावेसंबंधी किंवा जनावरासंबंधी कर देण्याची पात्रता उद्‌भवेल अशा वाहनाचा, नावेचा किंवा जनावराचा मालक होणाऱ्या किंवा त्याचा कब्जा मिळवणाऱ्या व्यक्तीने आयुक्तास द्यावयाची नोटीस.

**२५.** (१) जी व्यक्ती, ज्या कोणत्याही वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत उक्त कर बसवण्यायोग्य आहे, अशा वाहनाचा, नावेचा किंवा जनावराचा मालक होईल किंवा त्याचा कब्जा किंवा त्यावर नियंत्रण मिळवील अशा प्रत्येक व्यक्तीने ती अशा वाहनांचा, नावेचा किंवा जनावराचा मालक झाल्यापासून किंवा तिने त्याचा कब्जा किंवा त्यावर नियंत्रण मिळवल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, ती अशा वाहनाचा, नावेचा किंवा जनावराचा मालक झाला आहे किंवा यथास्थिति तिने अशा वाहनांचा, नावेचा किंवा जनावराचा कब्जा किंवा त्यावर नियंत्रण मिळविले आहे या गोष्टींची आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) जी व्यक्ती, ज्या कोणत्याही वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत उक्त कर बसवण्यायोग्य आहे अशा वाहनांचा, नावेचा किंवा जनावराचा मालक राहणार नाही किंवा जिचा त्यावरील कब्जा किंवा नियंत्रण समाप्त होईल, अशा प्रत्येक व्यक्तीने, ती अशा वाहनांचा, नावेचा किंवा जनावराचा मालक राहिलेली नाही किंवा तिचा त्यावरील कब्जा किंवा नियंत्रण संपुष्टात आले आहे, या गोष्टींची आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे. अशी व्यक्ती अशी नोटीस देईपर्यंत, ती ज्या कोणत्याही अन्य शास्तीस पात्र होईल त्याशिवाय आणखी अशा वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत वेळोवेळी बसवण्यायोग्य असलेला उक्त कर देण्यास पात्र असण्याचे चालू राहील :

परंतु, यातील कोणत्याही मजकुरामुळे, जी व्यक्ती अशा वाहनाचा, नावेचा किंवा जनावराचा मालक होईल किंवा त्याचा कब्जा किंवा त्यावर नियंत्रण मिळवील, अशा कोणत्याही व्यक्तीची उक्त कर देण्याची जबाबदारी कमी होते असे किंवा अशा कोणत्याही वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत येणे असलेल्या कोणत्याही कराच्या वसुलीसाठी अशा वाहनावरील, नावेवरील किंवा जनावरावरील आयुक्ताच्या अग्रहक्कास बाध येतो असे समजता कामा नये.

## जकात व पथकर यासंबंधी विशेष तरतुदी

जकातीच्या दराचा तक्ता विवक्षित जागी लावणे.

**२६.** आयुक्ताने त्या वेळी बसवण्यायोग्य असलेल्या जकातीची कोष्टचे तक्ते करून त्यात, ती ज्या दरांनी व ज्या वस्तूंवर बसवण्यायोग्य आहे ते दर व त्या वस्तू विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत आणि ती, महानगरपालिका याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेत किंवा भाषांत छापण्याची आणि ज्या ठिकाणी उक्त जकात बसवण्यात येत असेल अशा प्रत्येक ठिकाणी ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

पथकरांचा तक्ता ठळक जागी लावणे.

**२७.** आयुक्ताने त्या वेळी बसवण्यायोग्य असलेल्या पथकराचा एक तक्ता तयार करून त्यात, पथकर देण्याच्या जबाबदारीच्या बाबतीत ठराविक कालावधीने रकमा देऊन करावयाची तडजोड ज्या रकमांवर व ज्या अटींवर करता येईल अशा रकमा व अशा अटी विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत आणि ते, महानगरपालिका याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा भाषेत किंवा भाषांत छापण्याची आणि ज्या ठिकाणी उक्त पथकर बसवण्यात येत असेल अशा प्रत्येक ठिकाणी ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

मालाच्या उत्पादनावर जकात बसवण्याऐवजी व्यक्तीचे, भागीदारी संस्थेचे किंवा सार्वजनिक संस्थेचे चालू खाते ठेवण्याचा अधिकार.

**२८.** (१) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही वेळी, ज्या मालावर जकात बसवण्यायोग्य आहे असा माल शहरात आणण्याच्या वेळी त्याबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून, व्यापारी भागीदारी संस्थेकडून किंवा सार्वजनिक संस्थेकडून जकात घेण्याऐवजी अशा व्यक्तीकडून, व्यापारी भागीदारी संस्थेकडून किंवा सार्वजनिक संस्थेकडून अशा रीतीने येणे असलेल्या जकातीचे एक चालू खाते महानगरपालिकेच्या वतीने ठेवण्याविषयी निदेश देता येईल.

(२) अशा खात्याचा हिशेब जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालांतरांनी चुकता करण्यात आला पाहिजे आणि अशा व्यक्तीने, भागीदारी संस्थेने किंवा सार्वजनिक संस्थेने त्यांच्याकडून अशा बाकी रकमांच्या बाबतीत कोणत्याही वेळी देय असलेल्या रकमेसंबंधी आयुक्तास, पुरेशी वाटेल अशी माहिती किंवा तपशील आणि उक्त रकमेची भरपाई होण्यासाठी त्यास पुरेशी वाटेल अशी ठेव किंवा प्रतिभूती दिली पाहिजे.

(३) अशा कोणत्याही कालांतराच्या समाप्तीनंतर अशा रीतीने येणे असलेली रक्कम ही, जणू ही रक्कम उक्त कसूरदाराकडून येणे असलेली मालमत्ता कराची रक्कम आहे असे समजून, कसूरदारांच्या जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून किंवा स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून, वसूल करता येईल.

जकात देण्यास पात्र असलेल्या मालाची तपासणी करण्याचा अधिकार.

**२९.** (१) कोणताही माल शहराच्या हद्दीच्या आत आणणाऱ्या किंवा शहराच्या हद्दीच्या बाहेरून आलेला माल स्वीकारणाऱ्या व्यक्तीने याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने फर्मावल्यावर आणि अशा मालावर जकात देय आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी आणि आकारण्यात येणाऱ्या कराची रक्कम निश्चित करण्यासाठी आवश्यक असेल तेथवर, पुढील गोष्टी केल्या पाहिजेत :---

(अ) सर्व माल किंवा त्यापैकी, असा अधिकारी फर्मावील असा माल उतरवला पाहिजे व पुन्हा चढवला पाहिजे ;

(ब) त्या अधिकाऱ्यास अशा मालाची पाहणी, तपासणी किंवा वजन करू दिले पाहिजे किंवा असा माल ओळखण्याच्या प्रयोजनांसाठी त्यावर शिक्का मारू दिला पाहिजे, मोहोर लावू दिली पाहिजे किंवा अन्य प्रकारे खूण करू दिली पाहिजे ;

(क) ज्या कोणत्याही जनावरावर किंवा वाहनात असा माल चढवला असेल त्या जनावरांचे किंवा वाहनांचे अशा अधिकाऱ्यास निरीक्षण आणि तपासणी करू दिली पाहिजे ;

(ड) अशा जनावरांसंबंधी किंवा मालासंबंधी तिच्याजवळ असलेली कोणतीही माहिती त्या अधिकाऱ्यास दिली पाहिजे आणि तिच्याजवळ असलेले कोणतेही बिल, बीजक किंवा तशाच स्वरूपाचा दस्तऐवज त्यास दाखवला पाहिजे ;

(ई) त्या अधिकाऱ्यास दाखवलेल्या दस्तऐवजाचा बिनचूकपणा व अचूकपणा यासंबंधी त्याच्याकडे लेखी प्रतिज्ञापन केले पाहिजे.

(२) अशा वाहनाचा कब्जा असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, अशा वाहनातून नेण्यात येणाऱ्या मालासंबंधी संपूर्ण व बिनचूक प्रतिज्ञापन केले पाहिजे.

(३) कोणतेही वाहन किंवा गठ्ठा शहराच्या हद्दींच्या आत आणणाऱ्या किंवा शहराच्या हद्दीच्या बाहेरून आत स्वीकारणाऱ्या व्यक्तीने, याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मागणी केल्यावर, त्या अधिकाऱ्यास, त्या वाहनात किंवा गठ्ठ्यात जकात देण्यायोग्य असे काही आहे किंवा काय याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी त्यातील वस्तूंचे निरीक्षण करू देण्यास नकार दिला तर, त्या अधिकाऱ्यास अनावश्यक विलंब न लावता, ते वाहन किंवा गठ्ठा दंडाधिकाऱ्यापुढे किंवा आयुक्त याबाबत नेमील अशा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यापुढे नेण्याची व्यवस्था करता येईल आणि त्या दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने आपल्या उपस्थितीत त्याचे निरीक्षण केले जाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**कर गोळा करणे**

मालमत्ता कर सहा महिन्यांनी आगाऊ देय असणे.

**३०.** मालमत्ता करांपैकी प्रत्येक कर हा, [१][ नियम ३९ किंवा ४० किंवा ५५ अन्वये देण्यात आलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे ] प्रत्येक वर्षी १ एप्रिल व १ ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्यांनी आगाऊ देय असेल.

वाहने, नावा आणि जनावरे यावरील कर आगाऊ देय असणे.

**३१.** (१) कलम १४३, पोट-कलम (१), खंड (च) च्या परंतुकान्वये देय असलेला कर धरून वाहने, नावा व जनावरे यांवरील कर हा, प्रत्येक वर्षी १ एप्रिल व १ ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्यांनी आगाऊ देय असेल.

कोणत्याही सहामाहीत एखादे वाहन, नाव किंवा जनावर असा कर देण्यास पात्र होईल तर, ज्या सहामाहीत असे वाहन, नाव किंवा जनावर अशा करास पात्र होईल त्या सहामाहीच्या सर्वात आधीच्या दिवसापासून त्यावर असा कर बसवण्यायोग्य होईल आणि अशा सहामाहीसाठी बसवण्यायोग्य कराची रक्कम ही, जर असा सर्वात आधीचा दिवस –

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३३ द्वारे हा मजकूर दाखल केला.

(अ) अशा सहामाहीच्या पहिल्या दोन महिन्यांत येत असेल तर अशा सहामाहीच्या संपूर्ण कराइतकी असेल ;

(ब) अशा सहामाहीच्या तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यांत येत असेल तर अशा सहामाहीच्या संपूर्ण कराच्या दोनतृतीयांशाइतकी असेल ;

(क) अशा सहामाहीच्या शेवटच्या दोन महिन्यांत येत असेल तर अशा सहामाहीच्या संपूर्ण कराच्या एक तृतीयांश इतकी असेल, परंतु, असा सर्वात आधीचा दिवस अशा सहामाहीच्या शेवटच्या वीस दिवसात येत असेल तर अशा सहामाहीसाठी कोणताही कर बसवण्यायोग्य असणार नाही.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही असले तरी, आयुक्तास, महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने, जाहीर नोटिशीद्वारे असे घोषित करता येईल की, मोटार वाहनांव्यतिरिक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा वर्गातील वाहनांच्या बाबतीत आणि तीत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा जनावरांच्या बाबतीत देय असलेला कर हा, दरवर्षी १ एप्रिल रोजी आगाऊ देण्यात आला पाहिजे आणि अशी नोटीस देण्यात आल्यावर, अशी नोटीस लागू होत असेल असे एखादे वाहन किंवा जनावर त्या वर्षात अशा करास पात्र होईल तर, त्यावर अशा वर्षातील सर्वात आधीच्या दिवसापासून असा कर बसवण्यायोग्य होईल आणि अशा वर्षासाठी बसवण्यायोग्य कराची रक्कम ही, जर असा सर्वात आधीचा दिवस —

(अ) अशा वर्षाच्या पहिल्या तिमाहीत येत असेल तर, अशा वर्षाच्या संपूर्ण कराइतकी असेल ;

(ब) अशा वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत येत असेल तर, अशा वर्षाच्या संपूर्ण कराच्या दोन-तृतीयांश इतकी असेल ;

(क) अशा वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत येत असेल तर, अशा वर्षाच्या संपूर्ण कराच्या एकद्वितीयांशाइतकी असेल ;

(ड) अशा वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत येत असेल तर, अशा वर्षाच्या संपूर्ण कराच्या एकतृतीयांशाइतकी असेल :

परंतु, असा सर्वात आधीचा दिवस अशा वर्षाच्या शेवटच्या वीस दिवसात येत असेल तर, अशा वर्षासाठी कोणताही कर बसवता येणार नाही.

वाहने, नावा व जनावरे यांवरील कर देण्यास पात्र असलेल्या वाहनांवर प्रतीके, बिल्ले किंवा तबकड्या लावणे.

**३२.** (१) जी व्यक्ती कोणत्याही वाहनांच्या संबंधात वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कर देत असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, ज्या कालावधीसाठी कर देण्यात आला आहे तो कालावधी स्पष्टपणे दर्शविणारे आणि विभिन्न क्रमांक असलेले प्रतीक, बिल्ला किंवा तबकडी देण्यात येईल आणि तिने असे प्रतीक, बिल्ला किंवा तबकडी सर्व वेळी अशा वाहनांवर ठळकपणे लावली पाहिजे.

(२) असे कोणतेही प्रतीक, बिल्ला किंवा तबकडी न लावलेले कोणतेही वाहन शहरात आढळून आल्यास, त्या वाहनाचे, जर वाहने, नावा, जनावरे यांवरील कर देण्यास असे वाहन पात्र आहे असे समजण्यास आधार असेल तर, आणि अशा वाहनाचा मालक माहीत नसेल किंवा सापडत नसेल तर, आयुक्ताने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास अभिग्रहण करता येईल आणि अटकावून ठेवता येईल.

(३) पोट-नियम (२) अन्वये एखाद्या वाहनाचे अभिग्रहण केल्यापासून एक महिन्याच्या आत कोणत्याही व्यक्तीने त्या वाहनावरील आपला हक्क आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केला तर आयुक्ताने अशा व्यक्तीकडून येणे असलेली कराची रक्कम असल्यास, ती रक्कम आणि अशा वाहनाचे अभिग्रहण करण्याचा व अटकावून ठेवण्याचा खर्च म्हणून आयुक्त ठरवील अशी रक्कम, तिने दिल्यावर असे वाहन अशा व्यक्तीस देण्याविषयी आदेश दिला पाहिजे.

(४) उक्त एक महिन्याच्या कालावधीच्या आत कोणत्याही व्यक्तीकडून त्या वाहनावर हक्क सांगण्यात आला नाही किंवा पोट-नियम (३) अन्वये सांगण्यात आलेला कोणताही हक्क आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध करण्यात आला नाही तर, त्या वाहनाचा जाहीर लिलाव करून विक्री करता येईल आणि अशा रीतीने विक्री करून आलेले उत्पन्न, त्यातून येणे असलेल्या कराची रक्कम असल्यास, ती रक्कम आणि वाहनाचे अभिग्रहण करणे, अटकावून ठेवणे व त्याची विक्री करणे यासाठी झालेला सर्व खर्च, वजा करुन जी कोणतीही व्यक्ती, अशा रीतीने विक्री करण्यात आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्या वाहनावरील आपला हक्क सिद्ध करील, त्या व्यक्तीला दिले पाहिजे किंवा असा कोणताही हक्क सांगण्यात किंवा सिद्ध करण्यात आला नाही तर असे उत्पन्न महानगरपालिकेकडे जमा केले पाहिजे.

(५) पोट-कलम (१) अन्वये देण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रतीकासाठी, बिल्ल्यासाठी किंवा तबकडीसाठी, स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने प्रत्येक प्रकारच्या प्रतीकासाठी, बिल्ल्यासाठी किंवा तबकडीसाठी आयुक्ताने विहित केलेली फी दिली पाहिजे.

मागणी करण्यात आल्यावर जकात देणे.

**३३.** (१) मागणी करण्यात आल्यावर जकात दिली पाहिजे.

(२) जकातीची मागणी करण्यासाठी आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीने, ज्या व्यक्तीकडे मागणी करण्यात आली आहे अशा प्रत्येक व्यक्तीस एक बिल दिले पाहिजे आणि त्यात करपात्र माल, मागणी केलेली रक्कम आणि ज्या दराने कराची परिगणना करण्यात आली आहे, तो दर विनिर्दिष्ट केला पाहिजे.

मागणी करण्यात आल्यावर पथकर देणे.

**३४.** (१) मागणी करण्यात आल्यावर पथकर दिला पाहिजे.

(२) पथकराची मागणी करण्यासाठी आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीने, ज्या व्यक्तीकडे मागणी करण्यात आली आहे, अशा प्रत्येक व्यक्तीस एक बिल दिले पाहिजे आणि त्यात पथकराची रक्कम व ज्या दराने मागणी करण्यात आली आहे, तो दर दर्शविला पाहिजे.

जकात व पथकर यांची वसुली कशाप्रकारे करता येईल.

**३५.** जकात व पथकर, त्याबाबत नेमलेल्या नगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना आयुक्ताच्या आदेशान्वये वसूल करता येईल किंवा आयुक्तास योग्य वाटेल तर, त्यास स्थायी समितीच्या मान्यतेने एकावेळेस जास्तीत जास्त एक वर्षाच्या कोणत्याही कालावधीसाठी जकात व पथकर वसूल करण्याचा मक्ता देता येईल किंवा आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने, या प्रयोजनासाठी ज्या व्यक्तीस आपला अभिकर्ता म्हणून नेमील अशा कोणत्याही व्यक्तीच्या आदेशान्वये किंवा तद्नुसार अशी जकात व पथकर वसूल करता येईल.

**३६.** नाट्यगृहावरील कर हा, ज्या प्रयोगाबद्दल तो देय आहे अशा प्रयोगाची व्यवस्था पाहण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीने अशा प्रयोगास सुरूवात होण्यापूर्वी निदान बारा तास अगोदर नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात किंवा आयुक्त याबाबत वेळोवेळी ठरवील अशा अन्य ठिकाणी भरला पाहिजे. नाट्यगृहावरील कर आगाऊ देय असणे.

**३७.** कोणतेही मनोरंजनाचे किंवा करमणुकीचे अनेक प्रयोग लागोपाठ करण्याचा उद्देश असेल तेव्हा त्याबाबतीत नाट्यगृहावरील कर भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीशी, आयुक्तास, अशा व्यक्तीने प्रत्येक प्रयोगाबद्दल वेगळा कर भरण्याऐवजी एका वेळी जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत होणाऱ्या लागोपाठच्या प्रयोगांबद्दल एका रकमेत कर भरण्याविषयी, तडजोड करता येईल. लागोपाठच्या प्रयोगांबद्दल नाट्यगृहांवरील कर ठोक रकमेत भरणे.

**३८.** कोणत्याही प्रयोगाच्या बाबतीत नाट्यगृहावरील कर भरण्यात आला नाही तर आयुक्ताने कसूरदारास, लेखी नोटिशीद्वारे, देणे असलेली रक्कम, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या आत भरण्याविषयी फर्मावले पाहिजे आणि विनिर्दिष्ट कालावधीच्या आत अशी रक्कम भरण्यात आली नाही तर, आयुक्तास, अशी रक्कम ही, जणू ती रक्कम कसूरदाराकडून येणे असलेली मालमत्ता कराची रक्कम आहे असे समजून, उक्त कसूरदाराच्या जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून किंवा स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून, वसूल करता येईल. नाट्यगृहावरील कर भरण्यात कसूर केल्यास तो वसूल करणे.

**३९.** (१) कोणताही मालमत्ता कर किंवा वाहने, नावा व जनावरे यांवरील कर किंवा ज्या कराच्या बाबतीत, तो, मालमत्ता कर वसूल करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल, असे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा, आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रकमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहिजे. विवक्षित करांबद्दल बिले सादर करणे.

(२) अशा प्रत्येक बिलात, ज्या कालावधीसाठी कर आकारण्यात आला आहे तो कालावधी आणि ज्या जागेच्या, मालमत्तेच्या, व्यवसायाच्या, वाहनाच्या, नावेच्या, जनावराच्या किंवा वस्तूच्या बाबतीत असा कर आकारण्यात आला आहे ती जागा, मालमत्ता, व्यवसाय, वाहन, नाव, जनावर किंवा वस्तू विनिर्दिष्ट करण्यात आली पाहिजे आणि तसेच, त्यात अशा कराविरुद्ध करावयाचे अपील ज्या मुदतीच्या आत करता येईल त्या मुदतीबद्दल आणि यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे असा कर भरण्यास कसूर केल्यास होणाऱ्या परिणामांबद्दल नोटीस देण्यात आली पाहिजे.

**४०.** (१) एकाच मालमत्तेवर बसवलेला सर्व किंवा कोणत्याही मालमत्ता कराबद्दल कोणत्याही एका व्यक्तीकडून प्रत्येक कालावधीसाठी येणे असलेल्या सर्व रकमा अशा व्यक्तीवर एकाच बिलात आकारण्यात आल्या पाहिजेत आणि त्या त्याच्याकडून ठोक रकमेत वसूल करता येतील : अनेक करांच्या मागण्यांबद्दल एक बिल केव्हा सादर करता येईल.

परंतु, यातील कोणत्याही मजकुरामुळे, करयोग्य मूल्यात सुधारणा केल्यामुळे उक्त मालमत्तेबद्दल अशा व्यक्तीवर ज्या वाढीव कराची आकारणी करण्यात येईल, असा कोणताही वाढीव कर भरण्याच्या तिच्या जबाबदारीवर परिणाम होणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक मालमत्तांच्या संबंधात उक्त करांपैकी सर्व किंवा कोणताही कर भरण्यास पात्र असेल तर आयुक्त, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, अशा मालमत्तांबद्दल अशा व्यक्तीने देय असलेल्या पृथक रकमा तिच्यावर एका किंवा पृथक बिलात आकारण्यात सक्षम असेल :

परंतु, अशा व्यक्तीने आयुक्तास, लेखी नोटीस देऊन, तिला पृथक बिले देण्यात यावीत अशी विनंती केली तर, आयुक्तास नोटीस मिळाल्यानंतर उक्त व्यक्ती ज्या करास पात्र होईल, अशा उक्त सर्व करांच्या बाबतीत, आयुक्ताने अशी विनंती मान्य केली पाहिजे.

**४१.** [१][ ४१. (१) उपरोक्तप्रमाणे दिलेले असेल अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची

बिलाच्या न दिलेल्या रकमेवर शास्ती आकारणी.

असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल, आणि जर, कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील :

परंतु, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर (गुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) अधिनियम, २०९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "२००९ चा सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे; असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहीला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त २००९ च्या सुधाणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल.

(२) बिलामधील अन्य कर किंवा मागणी केलेल्या देय रकमा, बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास न भरल्यास, पोट-कलम (१) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, अशा न भरलेल्या रकमेला लागू होतील. ]

अटकावणी किंवा जप्ती.

४२. (१) [२][ ज्या व्यक्तीला बिल देण्यात आले आहे अशा व्यक्तींने या अधिनियमाच्या तरतुदींन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यासह कर भरला नसेल तर, ती व्यक्ती, त्या कराची रक्कम भरण्यास पात्र असेल.] आणि यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे उक्त कराविरूद्ध कोणतेही अपील करण्यात आले नाही तर, अशी रक्कम, वसुलीच्या सर्व खर्चासह, आयुक्ताने नमुना 'ह' मध्ये किंवा तशाच अर्थाच्या काढावयाच्या अधिपत्रान्वये, कसूरदाराच्या जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून किंवा कसूरदाराची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून किंवा, कसूरदार हा, ज्या जागेच्या बाबतीत मालमत्ता कर येणे आहे अशा कोणत्याही जागेचा भोगवटादार असेल तर, उक्त जागेत सापडेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून किंवा कोणत्याही वाहनाच्या, नावेच्या किंवा जनावराच्या बाबतीत कर येणे असेल तर अशा वाहनाची, नावेची किंवा जनावराची अटकावणी व विक्री करून, तो कर वसूल करता येईल-— मग ते वाहन, नाव किंवा जनावर कोणाच्याही मालकीचे, कब्जातील किंवा नियंत्रणाखाली असो.

(२) [३][ जी व्यक्ती, तिला देण्यात आलेल्या बिलानुसार कर भरण्यास पात्र असेल अशा व्यक्तीने, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कर भरला असेल, परंतु कराच्या न भरलेल्या रकमेवर देय असेल त्याप्रमाणे, शास्तीचे किंवा व्याजाची अथवा दोन्ही रकमा संपूर्णपणे किंवा अंशतः भरल्या नाहीत तर अशा अदत्त राहिलेल्या रकमेबद्दल, जणू काही अशी रक्कम कराबद्दल येणे असलेली रक्कम आहे असे समजून आयुक्त त्याच रितीने, अनुसूची "ह" च्या नमुण्यात, अधिपत्र योग्य त्या फेरफारासह काढू शकेल. ]

**४३.** (१) अटकावून ठेवण्यास किंवा जप्त करण्यास पात्र असेल अशी कसूरदाराची कोणतीही

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३४ द्वारे कराधान नियमाचे नियम ४१ दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३५ (१) द्वारे "नियम ४१ अन्वये" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "पुरेसे कारण दाखविले नाही" या मजकूराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३५ (२) अन्वये पोट-नियम (२) एवजी हा पोट-नियम दाखल केला.

मालमत्ता किंवा कोणतेही वाहन, नाव किंवा जनावर हे शहरात असेल तेव्हा, नियम ४२ अन्वये काढलेले अधिपत्र महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या नावाने दिले पाहिजे.

कसूरदाराची मालमत्ता जेथे जेथे सापडेल तेथे तेथे अटकावून ठेवता येईल किंवा जप्त करता येईल.

(२) अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर शहराबाहेर असेल तेव्हा, असे अधिपत्र –

(अ) जर अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर मुंबई शहरात असेल तर, प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या नावाने दिले पाहिजे ;

(ब) जर अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर एखाद्या शहरात असेल तर, आयुक्ताच्या नावाने दिले पाहिजे ;

(क) जर अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर एखाद्या नगरपालिका बरोत किंवा नगरपालिका क्षेत्रात असेल तर अनुक्रमे मुख्य अधिकाऱ्याच्या किंवा उपाध्यक्षाच्या नावाने दिले पाहिजे ;

(ड) जर अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर एखाद्या छावणीत असेल तर छावणीच्या कार्यकारी अधिकाऱ्याच्या नावाने दिले पाहिजे ;

(ई) जर अशी मालमत्ता, वाहन, नाव किंवा जनावर अन्य ठिकाणी असेल तर महालकऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा सरकारी अधिकाऱ्याच्या नावाने दिले पाहिजे ;

(३) पोट-नियम (२) अन्वये ज्या अधिकाऱ्याच्या नावाने अधिपत्र देण्यात आले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास असे अधिपत्र आपल्या हाताखालील अधिकाऱ्याकडे पृष्ठांकित करता येईल.

जंगम मालमत्तेच्या बाबतीत अधिपत्राची अंमलबजावणी कशी करावयाची.

४४. (१) कोणत्याही जंगम मालमत्तेच्या अटकावणीसाठी व विक्रीसाठी कलम ४२ अन्वये काढण्यात आलेले अधिपत्र ज्या अधिकाऱ्याच्या नावाने देण्यात आले आहे किंवा ज्याच्याकडे पृष्ठांकित करण्यात आले आहे, अशा अधिकाऱ्याने जर अधिपत्रान्वये जप्त केली जाण्यास पात्र असलेली मालमत्ता एखाद्या इमारतीत आहे असे मानण्यास त्यास वाजवी कारण असेल आणि जर आपला प्राधिकार व प्रयोजन अधिसूचित करून प्रवेश मिळण्याची रीतसर मागणी केल्यानंतर त्यास अन्यथा प्रवेश मिळू शकत नसेल तर, अधिपत्रात निर्देशित केलेली कोणतीही अटकावणी करण्यासाठी सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी अशा कोणत्याही इमारतीचे कोणतेही बाहेरचे किंवा आतले दार किंवा खिडकी फोडून उघडणे कायदेशीर असेल :

परंतु, अशा अधिकाऱ्याने, स्त्रियांच्या उपयोगासाठी असलेल्या कोणत्याही दालनात,अशा स्त्रियांना तेथून निघून जाण्याची संधी दिल्याशिवाय, प्रवेश करता कामा नये किंवा त्याचे दार फोडून उघडता कामा नये.

(२) तसेच, अशा अधिकाऱ्याने, उक्त अधिपत्रात कसूरदार म्हणून ज्या व्यक्तीचे नाव देण्यात आले आहे, अशा व्यक्तीची कोणतीही मालमत्ता जेथे जेथे सापडेल तेथे तेथे अटकावून ठेवणे कायदेशीर असेल ;

परंतु त्याने पुढील मालमत्ता अटकावून ठेवता कामा नये.—

(अ) कसूरदार, त्याची पत्नी व मुले यांचे परिधान करावयाचे आवश्यक कपडे व बिस्तरा ;

(ब) कारागीरांची हत्यारे ;

(क) कसूरदार हा शेतकरी असेल तर, त्याची शेतीकामाची अवजारे, बियाण्यांचे धान्य आणि त्यास त्याच्या उपजीविकेसाठी आवश्यक असतील, अशी गुरेढोरे.

स्थावर मालमत्तेच्या बाबतीत अधिपत्राची अंमलबजावणी कशी करावयाची.

**४५.** (१) स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी व तिची विक्री करण्यासाठी नियम ४२ अन्वये अधिपत्र काढण्यात आले असेल तेव्हा, कसूरदारास अशा मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास किंवा तिच्यावर भार निर्माण करण्यास आणि सर्व व्यक्तींना अशा हस्तांतरणापासून किंवा भारापासून कोणताही लाभ मिळवण्यास मनाई करणाऱ्या आदेशाद्वारे ती जप्त करण्यात आली पाहिजे आणि तसेच, उक्त आदेशाद्वारे, वसुलीचा खर्च धरून [१][ येणे असलेली कराची रक्कम, शास्ती किंवा व्याज अथवा दान्ही कोणतेही असल्यास, अशी येणे असलेली आणि एकत्र भरावयाची रक्कम ] [२][ एकवीस दिवसाच्या आत] नगरपालिका कार्यालयात भरण्यात आली नाही तर उक्त मालमत्ता विकण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले पाहिजे.

"(२) असा आदेश मालमत्तेच्या कोणत्याही ठळक जागी व महानगरपालिका कार्यालयाच्या कोणत्याही ठळक जागी लावून, तसेच उक्त मालमत्ता हे राज्य शासनाला महसूल देणारी जमीन असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावून उद्घोषित करण्यात येईल."

(३) जप्त केलेल्या मालमत्तेवरील भाराचे किंवा त्यातील कोणत्याही हितसंबंधाचे आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय केलेले कोणतेही हस्तांतरण ही जप्तीअन्वये अंमलात आणण्याजोग्या महानगरपालिकेच्या सर्व दाव्यांच्या संबंधात निरर्थक असेल.

अटकावून ठेवलेल्या वस्तूची सूची आणि त्यांच्या विक्रीची नोटीस.

**४६.** अटकावणीच्या अधिपत्राच्या अंमलबजावणीचे काम सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्याने, अशा अधिपत्रान्वये त्याने जप्त केलेल्या जंगम मालमत्तेची किंवा वाहनांची, नावांची किंवा जनावरांची एक सूची ताबडतोब तयार केली पाहिजे आणि जप्त करण्याच्या वेळी अशी मालमत्ता किंवा वाहने, नावा किंवा जनावरे ज्या व्यक्तींच्या कब्जात असतील त्या व्यक्तीस नमुना 'आय' मध्ये किंवा तशाच अर्थाच्या नमुन्यात, उक्त मालमत्ता किंवा वाहने, नावा किंवा जनावरे नोटिशीत निर्दिष्ट केल्याप्रमाणे विकण्यात येतील, अशी लेखी नोटीस त्याचवेळी दिली पाहिजे.

विक्री.

**४७.** (१) जप्त केलेली मालमत्ता त्वरित व नैसर्गिकपणे सडण्याची शक्यता असेल किंवा अशी मालमत्ता कब्जात ठेवण्याचा खर्च आणि वसूल करावयाची रक्कम मिळून एकूण रक्कम तिच्या किंमतीपेक्षा अधिक होण्याची शक्यता असेल तेव्हा अशी, मालमत्ता अटकावून ठेवण्यात आली त्यावेळी ती ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस आयुक्ताने, ती ताबडतोब विकण्यात येईल, अशा अर्थाची नोटीस ताबडतोब दिली पाहिजे आणि येणे असलेली रक्कम व वसुलीचा खर्च ताबडतोब देण्यात आला नाही तर ती त्याप्रमाणे विकली पाहिजे.

(२) अटकावून ठेवलेली किंवा जप्त करण्यात आलेली मालमत्ता पोट-नियम (१) अन्वये ताबडतोब विकण्यात आली नाही तर ती मालमत्ता आणि स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, तिचा पुरेसा भाग, आयुक्ताने अधिपत्र तहकूब केली नाही तर किंवा कसूरदाराकडून येणे असलेली रक्कम व वसुलीचा खर्च त्याने दिला नाही तर, नियम ४५, पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला किंवा यथास्थिति, नियम ४६ अन्वये बजावण्यात आलेल्या नोटिशीत सांगितलेला कालावधीसंपल्यानंतर आयुक्ताच्या आदेशान्वये जाहीर लिलावाने [३][ किंवा मोहोरबंद बोली मागवून त्याद्वारे लिलावाने ] विकता येईल आणि आयुक्ताने, विक्री करून आलेली रक्कम किंवा तिचा आवश्यक असेल तेवढा भाग, येणे असलेली रक्कम व वसुलीचा खर्च भागविण्यासाठी उपयोजित केला पाहिजे.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३६ (१) (क) द्वारे "येणे असलेली रक्कम" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३६ (१) (ख) द्वारे "पाच दिवसाच्या आत" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) काही रक्कम शिल्लक राहिल्यास, ती ताबडतोब नगरपालिका निधीत जमा करण्यात आली पाहिजे : परंतु विक्रीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत आयुक्ताकडे लेखी अर्ज करून तिच्यावर हक्क सांगण्यात आला तर, अटकावून ठेवण्याच्या किंवा जप्त करण्याच्या वेळी अशी मालमत्ता ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस ती रक्कम परत करण्यात आली पाहिजे आणि वर सांगितल्याप्रमाणे सहा महिन्यांच्या आत हक्क न सांगितलेली कोणतीही शिल्लक रक्कम महानगरपालिकेची मालमत्ता होईल.

(४) अशी विक्री करण्यात येण्यापूर्वी कसूरदाराने देय असलेली रक्कम व वसुलीचा खर्च दिला तर जप्त करण्यात आलेली मालमत्ता त्यास परत केली पाहिजे आणि स्थावर मालमत्तेवरील जप्ती, असल्यास, अशी जप्ती काढून टाकण्यात आली आहे असे मानले जाईल.

(५) या नियमान्वये करावयाची स्थावर मालमत्तेची विक्री ही, स्थायी आदेशात नमूद केलेल्या रीतीने करण्यात आली पाहिजे.

(६) वर सांगितल्याप्रमाणे स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आल्यानंतर आयुक्ताने, खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या व्यक्तीस तिचा कब्जा दिला पाहिजे आणि तिला, प्रमाणपत्रात नमूद केलेली मालमत्ता तिने खरेदी केली आहे, अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

(७) विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताने, नाममात्र बोली बोलणे हे कायदेशीर असेल, परंतु अशा रीतीने बोली बोलण्यासाठी स्थायी समितीची पूर्वमान्यता मिळवण्यात आली पाहिजे.

(८) पोट-नियम (६) ला अनुसरून केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत जी व्यक्ती आयुक्तास अडथळा करील अशा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून अशा स्थावर मालमत्तेतून बाहेर काढण्याविषयी आयुक्तास निदेश देता येईल आणि त्यास, उक्त मालमत्तेत प्रवेश करण्यासाठी वाजवीरित्या आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

**शहराबाहेर विक्री.**

४८. (१) शहराबाहेर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नावाने अधिपत्र देण्यात आले असेल तेव्हा आयुक्तास, पृष्ठांकनाद्वारे अशा व्यक्तीस, अटकावून ठेवलेली किंवा जप्त केलेली मालमत्ता विकण्याविषयी निदेश देता येईल आणि अशा बाबतीत, अशा व्यक्तीने उक्त मालमत्ता विकणे आणि नियम ४७ च्या तरतुदींनुसार विक्रीस आनुषंगिक असतील अशा सर्व गोष्टी करणे आणि अशा विक्रीच्या बाबतीत अधिपत्र तहकूब करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त, उक्त नियमान्वये आयुक्ताच्या अधिकारांचा वापर करणे व त्याची कर्तव्ये पार पाडणे हे कायदेशीर असेल.

(२) अशा व्यक्तीने, अधिपत्रान्वये वसूल केलेल्या रकमेतून तिने वसुलीसाठी केलेला सर्व खर्च वजा केल्यानंतर राहिलेली रक्कम आयुक्ताकडे पाठविली पाहिजे आणि आयुक्ताने उक्त नियमांतील तरतुदींनुसार तिचा विनियोग केला पाहिजे.

जकात किंवा पथकर न दिल्यास त्याबाबत विशेष तरतुदी.

**४९.** (१) आयुक्ताने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने मागणी केल्यावर कोणतीही जकात किंवा कोणताही पथकर देण्यात आला नाही तर अशा बाबतीत, अशा व्यक्तीस, ज्यावर जकात आकारण्यायोग्य आहे, असा कोणताही माल किंवा ज्यावर पथकर आकारण्यायोग्य आहे असे कोणतेही वाहन किंवा जनावर किंवा अशा वाहनातील किंवा जनावरावरील ओझ्याचा जो कोणताही भाग हा, असे जनावर, माल वाहन, ओझे किंवा त्याचा भाग जप्त करणे, अडवून ठेवणे आणि परिणामत: त्याची विक्री करणे याच्या अनुषंगाने होणारा खर्च धरून मागणीची रक्कम भागवण्यास तिच्या मते पुरेशी असेल इतक्या किंमतीचा आहे, असा भाग, जप्त करता येईल आणि अडवून ठेवता येईल. त्यानंतर तिने, अशा रीतीने, जप्त करण्यात आलेले वाहन, जनावर किंवा वस्तू ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस नमुना 'आय' मध्ये लेखी नोटिशीसह मालमत्तेची यादी दिली पाहिजे.

(२) जप्त केलेली कोणतीही मालमत्ता त्वरित सडण्याची शक्यता असेल किंवा अशी मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा खर्च आणि आकारण्यायोग्य जकातीची किंवा पथकराची रक्कम मिळून एकूण रक्कम तिच्या किंमतीपेक्षा अधिक होण्याची शक्यता असेल तेव्हा, अशी मालमत्ता जप्त करणाऱ्या व्यक्तीने, ती ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस, ती ताबडतोब विकण्यात येईल असे कळवले पाहिजे आणि मागणी केलेली जकातीची किंवा पथकराची रक्कम व जप्तीच्या अनुषंगाने झालेला खर्च ताबडतोब देण्यात आला नाही तर, त्याप्रमाणे ती विकली पाहिजे किंवा विकण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(३) विक्रीस सुरूवात होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, ज्या व्यक्तीच्या कब्जातून अशी मालमत्ता जप्त करण्यात आली होती त्या व्यक्तीने झालेल्या सर्व खर्चाची रक्कम आणि देय असलेल्या जकातीची व पथकराची रक्कम नगरपालिका कार्यालयात दिली तर आयुक्ताने, जप्त करण्यात आलेली मालमत्ता ताबडतोब त्या व्यक्तीच्या स्वाधीन केली पाहिजे.

(४) याप्रमाणे रक्कम देण्यात आली नाही तर जप्त केलेली मालमत्ता विकता येईल आणि विक्री करून आलेली रक्कम, अशी जकात भरण्यासाठी आणि जप्त करण्याच्या, अटकावून ठेवण्याच्या व विक्री करण्याच्या अनुषंगाने झालेला खर्च भागवण्यासाठी उपयोजित केली पाहिजे.

(५) विक्री करून आलेल्या रकमेपैकी काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती नगरपालिका निधीत जमा करण्यात आली पाहिजे आणि विक्रीपासून लगेच सहा महिन्यांच्या आत आयुक्ताकडे लेखी अर्ज करण्यात आला असता, अशी मालमत्ता जप्त करण्याच्या वेळी ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस ती रक्कम देता येईल आणि असा कोणताही अर्ज करण्यात आला नाही तर ती रक्कम महानगरपालिकेची मालमत्ता होईल.

(६) या नियमान्वये कोणतीही मालमत्ता जप्त करण्याच्या अनुषंगाने होणारा खर्च हा, आयुक्त, याबाबत विनिर्दिष्ट करील अशा रीतीने ठरवण्यात येईल, परंतु तो कोणत्याही बाबतीत, देय असलेल्या जकातीच्या किंवा पथकराच्या रकमेच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये.

**५०.** काढलेल्या प्रत्येक अधिपत्राबद्दल, केलेल्या प्रत्येक अटकावणीबद्दल किंवा जप्तीबद्दल आणि जप्त केलेल्या कोणत्याही जनावराची देखभाल करण्यासाठी महानगरपालिका [1][राज्य] शासनाच्या मंजुरीने वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दरांनी फी आकारण्यात येईल आणि अशी फी, वसुलीच्या खर्चात समाविष्ट केली पाहिजे. काढलेली अधिपत्रे इत्यादीबद्दल फी.

[2] [ **५१.** आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० अन्वये खालील फी किंवा वसुलीचा खर्च पूर्णत: आकारण्यायोग्य असलेली किंवा अंशत: माफ करता येईल.] वसुलीच्या खर्चाबद्दलची फी माफ करता येईल.

**५२.** (१) कलम १४०, पोट-कलम (१) अनुसार, कोणत्याही मालमत्ता कराबद्दल येणे असलेल्या कोणत्याही रकमेसाठी जागेच्या भोगवटादारास बिल देण्यात आले असेल तेव्हा, आयुक्तास, असे बिल देण्याच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, भोगवटादारावर एक नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा नोटिशीद्वारे, उक्त कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीस भोगवटादाराने देणे असलेले किंवा देय होणारे कोणतेही भाडे, उक्त देय रक्कम चुकती करण्यास आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत, महानगरपालिकेस देण्याविषयी त्यास फर्मावता येईल. येणे असलेल्या भाड्याबद्दल जप्ती.

(२) मालमत्ता कराबद्दल येणे असलेली उक्त रक्कम देण्यात व चुकती करण्यात येईपर्यंत, अशी नोटीस ही, उक्त भाड्याची जप्ती असल्याप्रमाणे अंमलात राहील आणि भोगवटादाराने अशा नोटिशीनुसार महानगरपालिकेस दिलेली कोणतीही रक्कम, उक्त भाड्याची रक्कम त्याने ज्या व्यक्तीस द्यावयाची असेल त्या व्यक्तीच्या खाती, भोगवटादाराच्या नावे जमा म्हणून धरली जाण्याचा त्यास हक्क असेल.

(३) भोगवटादाराने देय असलेले किंवा देय होणारे जे भाडे देण्याविषयी, वर सांगितल्याप्रमाणे, त्याच्यावर बजावण्यात आलेल्या नोटिशीनुसार त्यास फर्माविण्यात आले असेल, असे भाडे महानगरपालिकेस देण्यात त्याने कसूर केली तर, महानगरपालिकेस अशा भाड्याची रक्कम, जणू ती रक्कम कलम १४० अन्वये मालमत्ता कराची थकबाकी आहे असे समजून, त्याच्याकडून वसूल करता येईल ;मात्र, उक्त कलमाचे पोट-कलम (३) हे अशा वसुलीच्या बाबतीत लागू होणार नाही.

**५३.** (१) आयुक्तास, कोणत्याही वेळी, ज्या कोणत्याही व्यक्तीकडून जकात, पथकर किंवा नाट्यगृहावरील कर याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कराची कोणतीही रक्कम येणे आहे अशी व्यक्ती ताबडतोब शहर सोडून जाण्याच्या बेतात आहे असे समजण्यास सबळ कारण असेल तर त्यास, अशा व्यक्तीकडून येणे असलेली रक्कम ताबडतोब भरण्याविषयी त्या व्यक्तीस निदेश देता येईल आणि त्या रकमेबद्दल त्या व्यक्तीस बिल देण्याची व्यवस्था करता येईल. शहर सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तीविरुद्ध संक्षिप्त कार्यवाही करता येईल.

---

१ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३८ द्वारे कराधान नियमाच्या नियम ५१ दाखल करण्यात आला.

(२) असे बिल देण्यात आल्यावर, उक्त व्यक्तीने तिच्याकडून येणे असलेली रक्कम ताबडतोब भरली नाही किंवा तसे न करण्याबद्दल आयुक्ताचे समाधान होईल असे कारण दाखवले नाही तर, अशी रक्कम यात यापूर्वी विहित करण्यात आलेल्या रीतीने अटकावणी व विक्री करून वसूल करण्यात आली पाहिजे ; [1][* * * *] आणि अटकावणी व विक्री यासाठी आयुक्ताचे अधिपत्र कोणताही विलंब न लावता काढता येईल व बजावता येईल.

आवश्यक असल्यास थकबाकीबद्दल कसूरदाराच्या विरूद्ध दावा दाखल करता येईल.

**५४.** यात यापूर्वी तरतूद करण्यात आल्याप्रमाणे अटकावणी, जप्ती आणि विक्री करून कसूरदाराविरूद्ध कारवाई करण्याऐवजी, किंवा कसूरदाराविरूद्ध अशा रीतीने केलेली कारवाई अयशस्वी झाल्यानंतर किंवा अंशत: यशस्वी झाल्यानंतर, एखाद्या कराबद्दल अशा कसूरदाराकडून येणे असलेली कोणतीही रक्कम किंवा यथास्थिति, येणे असलेल्या रकमेपैकी राहिलेली बाकी, सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करून त्याच्याकडून वसूल करता येईल.

कराबद्दलची बिले बजावण्याबाबत विशेष तरतुदी.

**५५.** कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नगरपालिका कराबद्दलचे बिल, त्या करास पात्र असलेल्या व्यक्तीस, शहरातील तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणाच्या पत्त्यावर, तिच्या नावावर, टपाल दाखला घेऊन, आगाऊ आकार भरलेल्या पत्राद्वारे साध्या डाकेने पाठवता येईल आणि अशा रीतीने पाठवण्यात आलेले प्रत्येक बिल, ते ज्या पाकीटातून किंवा आवेष्टनांतून पाठवण्यात आले असेल ते पाकीट किंवा आवेष्टन ज्या दिवशी टपालाने टाकण्यात आले असेल त्या दिवसाच्या लगेच नंतरच्या दिवशी ते बिल देण्यात आले आहे असे मानले जाईल आणि अशा रीतीने बिल दिल्याचे सिद्ध करताना, ज्या पाकिटातून किंवा आवेष्टनातून असे बिल पाठवण्यात आले असेल त्या पाकिटावर किंवा आवेष्टनावर योग्य रीतीने पत्ता लिहिलेला होता आणि ते टपाल दाखला घेऊन टपालात टाकण्यात आले होते, असे सिद्ध करणे हे पुरेसे होईल.

मालमत्ताकराची रक्कम भरण्याच्या सुविधेसाठी विशेष तरतूद.

५५-अ [2][ या अधिनियमान्वये कराची रक्कम किंवा अन्य कोणत्याही देय रकमा भरण्यास पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महानगरपालिकेने तिचा अधिकार क्षेत्रात प्रसृत होणाऱ्या दोन अग्रगण्य वर्मानपत्रात जाहीर नोटीस देऊन त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेत किंवा कोणत्याही अभिकरणाकडे त्या रकमेचा भरणा करण्याच्या सुविधेचा उपयोग करून घेता येईल; आणि स्वत:ला अशा सुविधेचा उपयोग करून घेणारी व्यक्ती, आयुक्त निर्धारित करील त्याप्रमाणे, अशा बँकेकडे, किंवा यथास्थिती, अभिकरणाकडे त्यासंबंधातील अशी फी भरण्यास पात्र असेल. ]

## परतावे

जागा रिकामी राहिल्यामुळे मालमत्ता कराची रक्कम परत देणे.

**५६.** (१) कोणतीही इमारत किंवा जमीन किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये आकारणीच्या प्रयोजनांसाठी वेगळी मालमत्ता म्हणून समजण्यात आली असेल असा कोणत्याही जागेचा कोणताही भाग, लागोपाठ तीस दिवसांच्या कालावधीसाठी रिकामा राहिला असेल तेव्हा, आयुक्ताने, यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीन राहून, जितके दिवस अशी इमारत, जागा इत्यादी रिकामी राहिली असेल, त्या दिवसांबद्दल पाणीपट्टी आणि साफसफाई कर यांची रक्कम दिलेली असल्यास, ती रक्कम परत केली पाहिजे.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३९ द्वारे "मात्र कसूरदारावर मागणीची कोणतीही नोटीस बजावण्याची आवश्यकता असणार नाही" हा मजकूर वगळण्यात आला.

२. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४० द्वारे कराधान नियमांचे नियम ५५-अ दाखल केले.

(२) कोणतीही इमारत किंवा जमीन किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये आकारणीच्या प्रयोजनासाठी वेगळी मालमत्ता म्हणून समजण्यात आला असेल असा कोणत्याही जागेचा कोणताही भाग, लागोपाठ साठ दिवसांच्या कालावधीसाठी रिकामा राहिला असेल तेव्हा, आयुक्ताने, यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीन राहून, जितक्या दिवस अशी इमारत, जागा, इत्यादी रिकामी राहिली असेल त्या दिवसांबद्दल दिलेल्या सामान्य कराच्या रकमेच्या, तशी रक्कम असल्यास, दोनतृतीयांश रक्कम परत केली पाहिजे :

परंतु, ज्या कोणत्याही बाबतीत आयुक्ताने नियम ११ च्या तरतुदीन्वये करप्रतीग्रह मंजूर केला असेल अशा बाबतीत सामान्य कराच्या कोणत्याही परताव्याची मागणी करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनासाठी, —

(अ) जागेचा भोगवटा करण्यात येत नसेल आणि तिच्यापासून भाड्याचे उत्पन्न मिळत नसेल तरच ती जागा रिकामी आहे असे मानले जाईल ;

(ब) एखादी जागा, तिचा सतत भोगवटा करण्याचा हक्क असणाऱ्या भाडेकऱ्यास भाड्याने देण्यात आली असेल तर तिच्यापासून भाड्याचे उत्पन्न मिळते असे मानले जाईल—मग असा भाडेकरी तिचा प्रत्यक्षपणे भोगवटा करत असो किंवा नसो ;

(क) मालकाने स्वत:च्या भोगवट्यासाठी आवश्यक असेल तेव्हा तेव्हा भोगवटा करण्यासाठी सुसज्ज केलेली किंवा राखून ठेवलेली जागा ही भोगवट्यात आहे असे मानले जाईल,—मग मालक तिचा प्रत्यक्षपणे भोगवटा करत असो किंवा नसो ;

(ड) हंगामी स्वरूपाच्या अशा कोणत्याही उद्योगाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचा उद्देश असलेली जागा, वर्षातील ज्या कालावधीत किंवा कालावधीमध्ये हंगामी कामे, सामान्यत: स्थगित ठेवण्यात येतात, अशा कालावधीत किंवा कालावधीमध्ये भोगवट्यात नव्हती, किंवा तिच्यापासून भाड्याचे उत्पन्न मिळत नव्हते, केवळ याच कारणावरुन ती रिकामी आहे असे मानले जाणार नाही ;

(ई) जी जागा संपूर्ण फेब्रुवारी महिन्यात रिकामी राहिली असेल ती लागोपाठ तीस दिवसांपेक्षा कमी नाही अशा कालावधीसाठी रिकामी राहिली होती असे मानले जाईल.

जागा रिकामी असल्याविषयी आयुक्तास नोटीस दिल्याशिवाय परताव्याची मागणी करता येणार नाही.

**५७.** (१) कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने किंवा तिच्या अभिकर्त्याने जागा रिकामी असल्याविषयी आयुक्तास, लेखी नोटीस दिल्याशिवाय, वर सांगितल्याप्रमाणे आयुक्ताकडून कोणत्याही मालमत्ता कराच्या कोणत्याही परताव्याची मागणी करता येणार नाही.

(२) अशी जागा रिकामी झाल्यापासून सात दिवसांच्या आत नोटीस देण्यात आली नसेल तर अशी नोटीस मिळाल्याच्या दिवसाच्या पूर्वीच्या कोणत्याही कालावधीसाठी आयुक्ताने कोणताही परतावा देता कामा नये ; वर सांगितल्याप्रमाणे सात दिवसांच्या आत नोटीस देण्यात आली असेल तर अशा बाबतीत, अशी जागा रिकामी झाल्याच्या तारखेपासून परतावा देण्यात येईल.

(३) ज्या कालावधीबद्दल मालमत्ता कर किंवा त्याचा कोणताही हप्ता वसुलीयोग्य आहे, अशा एका कालावधीपासून लगेच नंतरच्या दुसऱ्या कालावधीतही एखादी जागा रिकामी राहिली असेल तेव्हा, उक्त लगेच नंतरचा कालावधी सुरू झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, अशी

जागा सतत रिकामी राहिल्याविषयी आयुक्तास वर सांगितल्याप्रमाणे नोटीस दिल्याशिवाय, त्याबद्दल वर सांगितल्याप्रमाणे आयुक्ताकडून कोणत्याही मालमत्ता कराचा परतावा मिळण्यासाठी, कोणतीही मागणी करता येणार नाही आणि पोट-नियम (१) अन्वये देणे आवश्यक असलेली नोटीस, ज्या कालावधीत अशी जागा रिकामी राहिली आहे तो कालावधी संपेपर्यंत देण्यात आलेली नसली तरीसुद्धा, अशी जागा रिकामी राहिली असल्याविषयी नोटीस देणे आवश्यक असेल.

पाणीपुरवठा बंद करण्या-विषयी अर्ज करण्यात आला असल्याशिवाय पाणीपट्टीचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

**५८.** पाणीपुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था असलेल्या रिकाम्या जागेचा पाणीपुरवठा बंद करण्याविषयी आयुक्ताकडे लेखी अर्ज करण्यात आला नसेल तर त्या बाबतीत पाणीपट्टीच्या कोणत्याही परताव्याची मागणी करता येणार नाही.

परताव्यासाठी करावयाचे अर्ज केव्हा व कसे करावयाचे.

**५९.** कोणत्याही मालमत्ता कराच्या परताव्याची मागणी, ज्या कालावधीसंबंधी असेल तो कालावधी संपल्यानंतर तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे त्याविषयी लेखी अर्ज केला नाही तर आणि ज्या कराच्या रकमेतून, [१][ नियम ३९, ४० वा ५५ अन्वये अर्जदाराला सादर करण्यात आलेल्या बिलाची रक्कम देण्यासाठी मूळ पावती किंवा कोणताही वैध पुरावा सोबत नसेल तर, ] अशी कोणतीही मागणी नामंजूर करणे हे आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन असेल.

वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कराचा परतावा केव्हा आणि कोणत्या मर्यादेपर्यंत मिळू शकेल.

**६०.** (१) कोणत्याही सहामाहीबद्दल कोणत्याही वाहनावर, नावेवर किंवा जनावरावर बसविलेला कर देण्यात आला असेल आणि अशा सहामाहीत असे वाहन, नाव किंवा जनावर शहरात ठेवण्याचे बंद झाले असेल किंवा ते शहराबाहेर ठेवण्यात येत असल्यास, शहरात वापरण्याचे बंद झाले असेल किंवा ते नष्ट झाले असेल किंवा अन्यथा वापरण्यासाठी अयोग्य झाले असेल किंवा अशा वाहनाची किंवा नावेची दुरूस्ती चालू असेल किंवा असे जनावर अपंग किंवा अनुपयोगी जनावरे ठेवण्याच्या कोणत्याही संस्थेत ठेवण्यात आले असेल किंवा ते वापरण्यासाठी अयोग्य झाले आहे असे पशुशल्यचिकित्सकाने प्रमाणित केले असेल व वापरण्यात आले नसेल तर, ज्या व्यक्तीने अशा वाहनावर, नावेवर किंवा जनावरावर बसविलेला कर दिला असेल त्या व्यक्तीस, यात यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीन, आणि आयुक्ताचे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचे त्याबाबत समाधान झाल्यावर, अशा सहामाहीतील ज्या कालावधीसाठी असे वाहन, नाव किंवा जनावर शहरात ठेवण्यात आले नसेल किंवा असे वाहन, नाव किंवा जनावर नष्ट झाल्यामुळे किंवा वापरण्यासाठी अयोग्यझाल्यामुळे किंवा अशा वाहनाची किंवा नावेची दुरूस्ती चालू असल्यामुळे किंवा असे जनावर अपंग किंवा अनुपयोगी जनावरे ठेवण्याच्या कोणत्याही संस्थेत ठेवण्यात आल्यामुळे किंवा असे जनावर वापरण्यासाठी अयोग्य झाले आहे असे पशुशल्यचिकित्सकाने प्रमाणित केले असल्यामुळे वापरण्यात आले नसेल तो कालावधी—

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४१ द्वारे "परताव्यासाठी मागणी केली आहे." या मजकूराने सुरू होणाऱ्या व "पाठवले नाही तर," या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी  हा मजकूर दाखल केला.

(अ) एकशेसत्तर दिवसांपेक्षा कमी नसेल, तर, दिलेल्या कराची पूर्ण रक्कम ;

(ब) एकशेपन्नास दिवसांपेक्षा कमी नसेल, तर, दिलेल्या कराच्या तीनचतुर्थांश रक्कम ;

(क) एकशेवीस दिवसांपेक्षा कमी नसेल, तर, दिलेल्या कराच्या दोनतृतीयांश रक्कम ;

(ड) नव्वद दिवसांपेक्षा कमी नसेल, तर, दिलेल्या कराच्या एकद्वितीयांश रक्कम ;

(ई) साठ दिवसांपेक्षा कमी नसेल, तर, दिलेल्या कराच्या एकतृतीयांश रक्कम ;

आयुक्ताकडून परत मिळण्याचा हक्क असेल.

असा कालावधी साठ दिवसांपेक्षा कमी असेल तर कराचा कोणताही परतावा दिला जाणार नाही.

(२) नियम ३१, पोट-नियम (२) अन्वये नोटीस देण्यात आली असेल तेव्हा, नोटिशीखाली येणाऱ्या वाहनांच्या व जनावरांच्या बाबतीत हा नियम, जणू तीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपैकी प्रत्येक कालावधीऐवजी, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या दुप्पट कालावधी दाखल केला आहे असे समजून, लागू होईल.

आयुक्तास नोटीस दिल्याशिवाय परताव्याची मागणी करता येणार नाही.

**६१.** (१) नियम ६० अन्वये आयुक्ताकडून कराच्या परताव्याची मागणी ज्या परिस्थितीमुळे उद्‌भवेल अशी परिस्थिती निर्माण झाल्याविषयी किंवा ज्या परिस्थितीमुळे अशी मागणी उद्‌भवण्याची शक्यता आहे अशी परिस्थिती सुरू झाल्याविषयी लेखी नोटीस ज्या व्यक्तीने कर भरला आहे त्या व्यक्तीने किंवा तिच्या अभिकर्त्याने आयुक्तास दिली नसेल तर अशा कोणत्याही कराच्या परताव्याची कोणतीही मागणी करता येणार नाही.

(२) वर सांगितल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाल्यापासून किंवा ती सुरू झाल्यापासून तीन दिवसांच्या आत आयुक्तास अशी नोटीस मिळाली नाही तर, कोणताही परतावा देण्याच्या प्रयोजनांसाठी नियम ६० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची संगणना करताना उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपूर्वीचा कालावधी वगळण्यात आला पाहिजे.

(३) कराच्या परताव्याची कोणतीही मागणी ज्या सहामाहीसंबंधी असेल ती सहामाही संपल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत अशा मागणीसंबंधी आयुक्ताकडे लेखी अर्ज करण्यात आला नसेल आणि त्यासोबत ज्या कराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आली असेल, त्या कराच्या रकमेबद्दल नियम ३९ अन्वये अर्जदारास देण्यात आलेले बिल, किंवा असे कोणतेही बिल देण्यात आले नसेल तर अशा रकमेबद्दलची अधिकृत पावती पाठवण्यात आली नसेल तर, कराच्या परताव्याची अशी कोणतीही मागणी नामंजूर करणे हे आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन असेल.

माल निर्यात केल्यावर जकातीचा किंवा पथ-कराचा परतावा.

**६२.** कोणताही माल जकातीची रक्कम भरल्यापासून सहा महिन्यांच्या आत शहराच्या हद्दीपलिकडे निर्यात करण्यात आला असेल तर, स्थायी आदेशांच्या अधीन राहून, अशा मालावर भरण्यात आलेल्या जकातीच्या रकमेच्या कमीत कमी नव्वद टक्क्यांइतकी रक्कम परत करण्यात आली पाहिजे :

(अ) परताव्यासाठी करावयाचा अर्ज निर्यातीच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत करण्यात आला पाहिजे ;

(ब) परताव्याची देय रक्कम पाच रुपयांपेक्षा कमी असता कामा नये.

(क) माल निरनिराळ्या ठिकाणी ठेवण्यात आला असेल तर अशा बाबतीत, स्थायी आदेशात याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यास पूर्वसूचना देण्यात आली पाहिजे आणि माल साठविण्याचे ठिकाण किंवा ठिकाणे त्यास वेळोवेळी कळवली असली पाहिजेत.

नाट्यगृहावरील कराचा परतावा.

**६३.** (१) विशिष्ट प्रयोगाच्या बाबतीत भरलेल्या नाट्यगृहावरील कराच्या संबंधात, आयुक्तासमोर ठेवलेल्या पुराव्यांवरून आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी केल्यानंतर,—

(अ) असा प्रयोग प्रत्यक्षात झालाच नाही आणि इच्छूक प्रेक्षकांकडून रक्कम जमा करण्यात आली असल्यास, ती रक्कम पूर्णपणे परत करण्यात आली आहे ; किंवा

(ब) अशा प्रयोगाच्या निव्वळ उत्पन्नाची सर्व रक्कम सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी खर्च करण्यात येणार आहे आणि अशा प्रयोगाचा सर्व खर्च हा एकूण जमा रकमेच्या वीस टक्क्यांपेक्षा अधिक नाही, अशी त्याची खात्री झाली

तर, आयुक्ताने उक्त कराची रक्कम परत दिली पाहिजे.

(२) ज्या नियोजित प्रयोगाच्या संबंधात कर भरण्यात आला असेल त्या प्रयोगाच्या दिवसापूर्वी तीन दिवसांच्या आत किंवा, यथास्थिति, प्रयोगाच्या तारखेनंतर सात दिवसांच्या आत, कराच्या परताव्याच्या मागणीसंबंधी आयुक्ताकडे लेखी अर्ज करण्यात आला नसेल तर, कराच्या परताव्याची अशी कोणतीही मागणी नामंजूर करणे हे आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन असेल.

## प्रकरण नऊ

## जलनि:सारण आणि जलनि:सारणाची कामे

नगरपालिकेच्या नाल्यांवर परवानगीशिवाय इमारत इत्यादी उभारावयाची नाही.

**१.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय नगरपालिकेच्या कोणत्याही नालीवर कोणतीही इमारत, भिंत किंवा अन्य बांधकाम नव्याने उभारता येणार नाही, आणि कोणताही रस्ता किंवा लहान लोहमार्ग बांधता येणार नाही.

(२) कोणतीही इमारत, भिंत किंवा अन्य बांधकाम अशा रीतीने उभारण्यात आले किंवा कोणताही रस्ता किंवा लहान लोहमार्ग बांधण्यात आला तर, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, तो काढून टाकता येईल किंवा अन्य प्रकारे त्याची व्यवस्था लावता येईल आणि त्यामुळे झालेला खर्च अपराध करणाऱ्या व्यक्तीने दिला पाहिजे.

कोणत्याही नाल्यांवर परवानगीशिवाय इमारत इत्यादी उभारावयाची नाही.

**२.** (१) पोट-नियम (३) अन्वये आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय नगरपालिकेच्या नालीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नालीवर कोणतीही इमारत, भिंत किंवा अन्य बांधकाम नव्याने उभारता कामा नये.

(२) कोणतीही इमारत, भिंत किंवा अन्य बांधकाम अशा रीतीने उभारण्यात आले असेल तर, आयुक्तास अपराध करणाऱ्या व्यक्तीस आपल्या उद्देशाविषयी दहा दिवसांची नोटीस दिल्यावर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे उक्त इमारत, भिंत किंवा अन्य बांधकाम काढून टाकता येईल किंवा अन्य प्रकारे त्याची व्यवस्था लावता येईल आणि त्यामुळे झालेला खर्च, अपराध करणाऱ्या व्यक्तीने दिला पाहिजे.

(३) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, एखाद्या सार्वजनिक रस्त्यातून नगरपालिकेची उघडी नाली, पाट, चर किंवा गटार ओलांडल्याखेरीज ज्या कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर जाता येत नाही अशा, इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास उक्त नाली, पाट, चर किंवा गटार यांवर उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रकारच्या, अशा आकाराच्या व अशा सामग्रीच्या आणि उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा हवा खेळती ठेवण्याच्या साधनांची तरतूद असलेल्या लहान पुलांची किंवा आवरणांची तरतूद करण्यास फर्मावता येईल.

(४) पोट-नियम (३) अनुसार तरतूद केलेला प्रत्येक लहान पूल किंवा प्रत्येक आवरण उक्त मालकाने किंवा भोगवटादाराने स्वत:च्या खर्चाने सुस्थितीत ठेवले पाहिजे आणि अडथळ्यापासून मुक्त ठेवले पाहिजे.

**३.** आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय आणि याबाबत स्थायी समिती सर्वसाधारणपणे विहित करील अशा शर्तींना अनुसरून असल्याशिवाय, कोणतीही नाली एखाद्या इमारतीच्या कोणत्याही भागाखालून जाईल अशा रीतीने बांधता कामा नये. इमारतीखालून नाल्या न नेणे.

**४.** आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही रस्त्यावरील कोणत्याही इमारतीच्या मालकास इमारतीच्या छपरांवरील व अन्य भागांवरील पाणी एकत्र करण्यासाठी व वाहून नेण्यासाठी आणि ते कोणत्याही रस्त्यावर पडणार नाही किंवा त्यामुळे कोणत्याही रस्त्याचे किंवा महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या अन्य कोणत्याही मालमत्तेचे नुकसान होणार नाही अशा रीतीने ते वाहून जाण्यासाठी योग्य व पुरेसे पन्हळ व नळ लावण्यास व ते सुस्थितीत ठेवण्यास फर्मावता येईल. इमारतींच्या छपरांवरील पाणी एकत्र करण्यासाठी पन्हळ व नळ यांची तरतूद करणे.

## खाजगी रस्त्यांवरील नाली आणि जागांमधील जलनि:सारण

**५.** (अ) खाजगी रस्त्याच्या मालकाने, अशा रस्त्यावरील नाली नगरपालिकेच्या नालींशी जोडण्याचे काम सुरू करण्यापूर्वी त्या रस्त्याचा एक नकाशा आयुक्तास सादर केला पाहिजे आणि असा नकाशा लायसन्सदार सर्वेक्षकाने किंवा त्यांच्या देखरेखीखाली तयार केला आहे याचे दर्शक म्हणून त्यावर अशा लायसन्सदार सर्वेक्षकाने सही केली असली पाहिजे व तो, आयुक्त फर्मावील अशा सोयीस्कर प्रमाणात काढलेला असला पाहिजे. अशा नकाशात नियोजित नालीची जागा, मार्ग आणि आकार, तसेच तिचे एक किंवा अनेक छेद आणि आयुक्तास आवश्यक वाटेल व तो फर्मावील असा त्यासंबंधी अन्य तपशील दाखवण्यात आला पाहिजे, आणि आयुक्ताच्या लेखी मान्यतेशिवाय किंवा त्याच्या निदेशांविरूद्ध अशी कोणतीही नाली बांधण्यास सुरुवात करता कामा नये ; खाजगी रस्त्यांवरील नाल्या नगरपालिकांच्या नाल्यांशी जोडण्याचा अधिकार.

(ब) अशा खाजगी रस्त्यावरील नाली, अशा रस्त्याच्या मालकाच्या खर्चाने, आयुक्त निदेश देईल अशा आकाराची, अशी सामग्री वापरून व अशा वर्णनाची बांधण्यात आली पाहिजे आणि ती सर्व बाबतीत, आयुक्त निदेश देईल तशा रीतीने व तशा प्रकारे नगरपालिकेच्या नालीशी जोडण्यात आली पाहिजे ;

(क) आयुक्तास योग्य वाटेल तर त्यास, महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा जागेत किंवा रस्त्याखाली किंवा जागेखाली येत असेल अशा नालीचा भाग किंवा अशी नाली नगरपालिकेच्या नालीशी जोडण्यासाठी आवश्यक असेल अशा बांधकामाचा असा भाग बांधता येईल आणि अशा बाबतीत, आयुक्ताने केलेला खर्च खाजगी रस्त्याच्या मालकाने दिला पाहिजे.

**६.** कोणत्याही इमारतीचे कोणतेही अंगभूत अंगण, आवार किंवा पटांगण किंवा अशा इमारतीत जाण्यायेण्याचा कोणताही मार्ग हा, त्याच्या पृष्ठभागावरील किंवा पृष्ठभागाखालील पाण्याचा योग्य तऱ्हेने निचरा होईल अशा रीतीने बनवलेला, फरशी बसवलेला, डांबरी किंवा फरसबंदी केलेला नसेल तर आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे अशी उणीव दूर करण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असतील अशी कामे पार पाडण्याविषयी उक्त इमारतीच्या मालकास फर्मावता येईल. इमारतींचे अंगभूत अंगण, आवार किंवा अशा इमारतीत जाण्यायेण्याचा मार्ग यांतील जलनि:सारण.

**स्पष्टीकरण.**— हा नियम दोन किंवा अधिक इमारतींच्या भोगवटादाराकडून सामाईकपणे वापरण्यात येत असलेले परंतु सार्वजनिक रस्ता नसलेले कोणतेही अंगण, आवार, पटांगण किंवा मार्ग यांच्या बाबतीत देखील लागू असेल.

उद्योगधंद्याच्या नि:सृता संबंधी विशेष तरतुदी.

**७.** (१) कोणत्याही धंद्याच्या जागेतून वाहून येणारे उद्योगधंद्यापासून निर्माण होणारे नि:सृत अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने आयुक्तास दिलेल्या लेखी नोटिशीनुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा कोणत्याही प्रकारे नगरपालिकेच्या नालीत सोडता कामा नये. अशा नोटिशीस यात यापुढे "उद्योगधंद्याच्या नि:सृतासंबंधी नोटीस" असे म्हटले आहे. या नोटिशीत पुढील गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत :–

(अ) उद्योगधंद्यापासून निर्माण होणाऱ्या नि:सृताचे स्वरूप किंवा त्यातील घटक द्रव्य ;

(ब) कोणत्याही एका दिवसात उद्योगधंद्याचे नि:सृत ज्या कमाल प्रमाणात वाहू देण्याचे योजिले असेल ते कमाल प्रमाण ; आणि

(क) उद्योगधंद्याचे नि:सृत ज्या कमाल वेगाने वाहू देण्याचे योजिले असेल तो कमाल वेग ;

आणि ज्या दिवशी आयुक्तास नोटीस देण्यात आली असेल त्या दिवसापासून दोन महिन्यांचा कालावधी संपेपर्यंत किंवा आयुक्त कबूल होईल असा कमी कालावधी संपेपर्यंत अशा नोटिशीस अनुसरून कोणत्याही उद्योगधंद्यापासूनचे नि:सृत वाहू देता कामा नये. अशा कालावधीस यात यापुढे "प्रारंभिक कालावधी" असे म्हटले आहे.

(२) कोणत्याही जागेच्या संबंधात उद्योगधंद्याचे नि:सृतासंबंधी आयुक्तास नोटीस देण्यात आली असेल तेव्हा, आयुक्तास, प्रारंभिक कालावधीच्या आत कोणत्याही वेळी, त्या जागेच्या मालकास किंवा, यथास्थिती, भोगवटादारास प्रारंभिक कालावधीनंतरच्या विनिर्दिष्ट तारखेपर्यंत त्याने नोटिशीस अनुसरून कोणत्याही उद्योगधंद्याचे नि:सृत वाहू देता कामा नये असा निदेश देता येईल ; आणि उद्योगधंद्याच्या नि:सृतासंबंधी नोटिशीस अनुसरून कोणत्याही उद्योगधंद्यापासूनचे नि:सृत वाहू देणे कायदेशीर होण्यासाठी जेथवर आयुक्तांची संमती आवश्यक असेल तेथवर आयुक्तास, अशी संमती बिनशर्त, किंवा खालील गोष्टींच्या बाबतीत त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, देता येईल :-
–

(अ) उद्योगधंद्याच्या नि:सृतासंबंधी नोटिशीस अनुसरून कोणत्याही उद्योगधंद्याचे नि:सृत ज्यात नेऊन सोडता येईल अशी नाली किंवा अशा नाल्या ;

(ब) अशारीतीने जे नेऊन सोडण्यात येईल अशा उद्योगधंद्याच्या नि:सृताचे स्वरूप किंवा त्यातील घटक द्रव्ये ;

(क) सामान्यपणे किंवा एखाद्या विवक्षित नालीत कोणत्याही एका दिवशी उद्योगधंद्याचे नि:सृत अशा रीतीने ज्या कमाल प्रमाणात नेऊन सोडता येईल ते कमाल प्रमाण ;

(ड) सामान्यपणे किंवा एखाद्या विवक्षित नालीत उद्योगधंद्याचे नि:सृतासंबंधी नोटिशीस अनुसरून उद्योगधंद्याचे नि:सृत ज्या कमाल वेगाने नेऊन सोडता येईल तो कमाल वेग ; आणि

(ई) या अधिनियमान्वये ज्या कोणत्याही बाबीविषयी उपविधी करता येतील अशी अन्य कोणतीही बाब :

परंतु, वर सांगितलेली अशी कोणतीही शर्त जर व जेथवर अशा रीतीने केलेल्या व त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीशी विसंगत असेल तर व तेथवर, ती परिणामकारक असणार नाही.

८. कोणत्याही व्यक्तीने,—

(अ) कोणत्याही इमारतीच्या कोणत्याही भागाखाली किंवा कोणतेही तळे, तलाव, जलाशय, ओढा, झरा किंवा विहीर [1][यापासून] वीस फुटांच्या आत ; किंवा

(ब) आयुक्ताने लेखी मान्यता दिली नसेल अशा कोणत्याही जागेवर किंवा कोणत्याही स्थितीत ; मलकुंडी बांधता कामा नये.

मलकुंड्यांची जागा.

**९.** (१) प्रत्येक नालीस आणि मलकुंडीस — मग ती महानगरपालिकेच्या मालकीची असो किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची असो — योग्य वक्रनलिका व झाकणे आणि हवा खेळती राहण्याची योग्य साधने बसवण्यात आली पाहिजेत.

(२) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही नालीच्या किंवा मलकुंडीच्या मालकास, अशी नाली किंवा मलकुंडी महानगरपालिकेच्या मालकीची असती तर तिला जशी वक्रनलिका व झाकणे आणि हवा खेळती राहण्याची साधने बसविण्यात आली असती तशी वक्रनलिका व झाकणे आणि हवा खेळती राहण्याची साधने उक्त नालीस किंवा मलकुंडीस बसवण्यास सांगता येईल.

सर्व नाल्या व मलकुंड्या योग्य रीतीने झाकणे आणि त्यात हवा खेळती राहण्याची व्यवस्था करणे.

**१०.** कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या परवानगीने असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेल्या किंवा वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही मलकुंडीत किंवा अशा कोणत्याही मलकुंडीशी जोडलेल्या कोणत्याही नालीत कोणतेही मलमूत्रयुक्त पदार्थ सोडता कामा नये किंवा सोडावयास लावता कामा नये किंवा सोडू देता कामा नये.

मलमूत्रयुक्त पदार्थ मलकुंडीत न सोडणे.

**११.** (१) कोणत्याही जागेत संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा नसेल, किंवा अशा कोणत्याही जागेत राहणाऱ्या किंवा कामावर असलेल्या व्यक्तींसाठी सध्या असलेली संडास, शौचकूप, मूत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा यांची अपुरी सोय, अकार्यक्षम, किंवा स्वच्छताविषयक कोणत्याही कारणांवरून आक्षेपार्ह आहे असे आयुक्ताचे मत असेल तर, आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे, अशा जागेच्या मालकास पुढील गोष्टी करण्यास भाग पाडता येईल :—

(अ) आयुक्त विहित करील अशा संडास, शौचकूप, मुत्र्या किंवा स्नानाच्या किंवा धुण्याच्या जागा किंवा असे अधिक संडास, शौचकूप, मुत्र्या किंवा स्नानाच्या किंवा धुण्याच्या जागा यांची तरतूद करणे ;

(ब) सध्या असलेले संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची किंवा धुण्याची जागा यात आयुक्त विहित करील असे संरचनात्मक किंवा अन्य फेरफार करणे ;

(क) कोणत्याही शौचकुपाऐवजी जलधौत संडासाची सोय करणे.

(२) पोट-नियम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशात कलम १७८, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही तपशील समाविष्ट करता येईल.

संडास व अन्य सोयी पुरेशा प्रमाणात करण्यास भाग पाडण्याचा आयुक्ताचा अधिकार.

---

१ सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

कारखाने इत्यादींसाठी शौचकूपांची सोय करण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

**१२.** कोणतीही जागा ही, बाजार, शाळा किंवा नाट्यगृह किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी म्हणून किंवा ज्या जागेत दहापेक्षा अधिक व्यक्ती कोणत्याही वस्तूनिर्मितीत, व्यापारात किंवा धंद्यात कामावर लावल्या आहेत किंवा कामगार किंवा मजूर म्हणून कामावर लावल्या आहेत अशी जागा म्हणून वापरण्यात येत आहे किंवा वापरण्याचा उद्देश आहे असे आयुक्तास आढळून येईल तेव्हा, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, उक्त जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास, स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी वेगवेगळे पुरेसे संडास, शौचकूप व मूत्र्या बांधण्यास आणि त्या सुस्थितीत ठेवण्याची व दररोज साफ करण्याची व्यवस्था करण्यास भाग पाडता येईल.

आरोग्यास अपायकारक अशा शौचकूपां-संबंधी आयुक्ताचा अधिकार.

**१३.** कोणताही शौचकूप कोणत्याही इमारतीपासून पुरेशा प्रमाणात अलग ठेवण्यात आला नसल्यामुळे अशा इमारतीत राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या आरोग्यास त्यामुळे अपाय होण्याचा संभव आहे असे आयुक्ताचे मत असेल तेव्हा, आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने, ज्या जागेत किंवा जागेवर असा शौचकूप असेल त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास, लेखी नोटिशीद्वारे,—

(अ) असा शौचकूप कोणत्याही व्यक्तीने वापरण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने तो बंद करण्यास, आणि त्याऐवजी, आयुक्त विहित करील अशा जलधौत संडासाची किंवा शौचकूपाची सोय किंवा मुत्रींची सोय करण्यास, किंवा

(ब) उक्त संडास आणि उक्त इमारतीचा कोणताही भाग यांच्यामध्ये, आयुक्त विहित करील अशी, वरच्या बाजूने पूर्णपणे उघडी असलेली व संपूर्णपणे उक्त जागेच्या हद्दीतच असलेली अशी मोकळी जागा ठेवण्यास,

भाग पाडता येईल.

**१४.** (१) ज्या कोणत्याही जागेवर शौचकूप असेल अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने —

शौचकूपा-संबंधी तरतुदी.

(अ) असा शौचकूप आणि माणसांनी राहण्यासाठी वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचा उद्देश असलेली कोणतीही इमारत किंवा जागा किंवा जेथे कोणतीही व्यक्ती कोणत्याही वस्तूनिर्मितीसाठी, व्यापारासाठी किंवा धंद्यासाठी कामावर लावण्यात येईल किंवा लावण्याचा उद्देश असेल अशी कोणतीही इमारत किंवा जागा, यांच्यामध्ये निदान तीन फूट रुंदीची व वरच्या बाजूने पूर्णपणे उघडी असलेली अशी मोकळी जागा ठेवली पाहिजे.

(ब) असा शौचकूप जवळपास राहणाऱ्या किंवा तेथून जाणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीस पडणार नाही अशा रीतीने त्यावर पुरेसे छप्पर घालून, भिंत किंवा कुंपण घालून बंद करण्यात आला पाहिजे.

(क) यात यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे अशा शौचकूपाचा सध्याचा कोणताही दरवाजा किंवा चोर दरवाजा चालू ठेवण्यास आयुक्ताने त्यास परवानगी दिली नसेल तर आणि ज्या कालावधीसाठी परवानगी देण्यात आली असेल त्या कालावधीव्यतिरिक्त अन्य कालावधीत तो बंद केला पाहिजे, आणि अशा शौचकूपास रस्त्यावर उघडेल असा कोणताही दरवाजा किंवा चोरदरवाजा ठेवता कामा नये :

परंतु,—

(एक) उक्त संडासास अनुसरून नवीन शौचकूप बांधण्यासाठी मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या जागेत मोकळी जागा उपलब्ध नसेल तर ; आणि

(दोन) अस्तित्वात असलेल्या शौचकूपाव्यतिरिक्त कायमच्या इमारतीचा अन्य कोणताही भाग न पाडता, अस्तित्वात असलेला शौचकूप पाडून वर सांगितल्याप्रमाणे नवीन शौचकूप बांधता येत नसेल तर नियत दिवशी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही शौचकूपास खंड (अ) लागू होतो असे मानले जाणार नाही.

(२) शौचकूपाच्या रस्त्यावर उघडत असलेल्या कोणत्याही दरवाजामुळे किंवा चोरदरवाज्यामुळे उपद्रव निर्माण होत नसेल तर, आयुक्तास, योग्य वाटेल अशा कालावधीसाठी असा दरवाजा किंवा चोरदरवाजा चालू ठेवण्याची परवानगी देता येईल.

**१५.** ज्या कोणत्याही जागेवर संडास असेल अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने.—

संडासांसंबंधी तरतुदी.

(अ) असा संडास, माणसांनी राहण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या किंवा ज्यात कोणतीही व्यक्ती कोणत्याही वस्तूनिर्मितीसाठी, व्यापारासाठी किंवा धंद्यासाठी कामावर लावण्यात येईल किंवा लावण्याचा उद्देश असेल अशा इमारतीच्या किंवा जागेच्या कोणत्याही भागापासून आयुक्तास पुरेशा वाटतील अशा साधनांनी अलग केला पाहिजे.

(ब) ज्याच्या बाजूंपैकी निदान एक बाजू ही बाहेरची भिंत असेल अशा रीतीने असा संडास बांधला पाहिजे ;

(क) अशा संडासाची बैठक बाहेरच्या भिंतीसमोर करून घेतली पाहिजे ;

(ड) अशा संडासाच्या भिंतीपैकी एका भिंतीत थेट उघड्या हवेत उघडेल अशी खिडकी किंवा द्वारक करून किंवा एखादा वायुवीजनाचा दांडा बसवून किंवा दुसऱ्या एखाद्या योग्य रीतीने किंवा साधनाने अशा संडासाला, आयुक्तास योग्य वाटतील अशी, हवा कायम खेळती राहण्याची साधने बसवण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(ई) अशा संडासास पाण्याची टाकी, पाण्याने साफ करण्याची साधने, सांडपाण्याचे पात्र किंवा ते गोळा करण्याचे साधन आणि आयुक्तास आवश्यक वाटेल अशा सामग्रीची, आकाराची व वर्णनाची अन्य साधने बसवून घेतली पाहिजेत :

परंतु, कधीही, ज्या टाकीतून संडासास पाणी पुरविण्यात येत असेल ती टाकी अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी पाणी पुरवण्यासाठी वापरता कामा नये किंवा जी अन्य टाकी अशा अन्य प्रयोजनासाठी पाणी पुरवण्यासाठी वापरण्यात येत असेल, त्या टाकीशी जोडता कामा नये ;

(फ) संडास, पाण्याने साफ व स्वच्छ करण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटेल अशा सामग्रीच्या, आकाराच्या व वर्णनाच्या पाण्याच्या टाक्यांना, कायम व पुरेसे पाणी पुरवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१६.** कोणत्याही व्यक्तीने एखादा शौचकूप किंवा संडास,—

शौचकूप व संडास यांची जागा.

(अ) एखाद्या इमारतीतील शौचकूप किंवा संडास किंवा स्नानाची जागा, स्नानगृह किंवा सज्जा, मार्ग किंवा गच्ची या व्यतिरिक्त, अन्य कोणतीही खोली किंवा भाग यांच्या प्रत्यक्षपणे वर किंवा खाली येईल ;

(ब) ज्या कोणत्याही विहिरीचे किंवा कोणत्याही झऱ्याचे, तलावाचे किंवा ओढ्याचे पाणी मानवी वापरासाठी किंवा घरगुती प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्यात येण्याचा संभव असेल (मग ते नैसर्गिक अवस्थेत येत असो किंवा निर्मित अवस्थेत वापरण्यात येत असो) अशा विहिरीपासून किंवा झऱ्यापासून, तलावापासून किंवा ओढ्यापासून वीस फूट अंतराच्या आत येईल किंवा कोणत्याही विहिरीचे, झऱ्याचे, तलावाचे किंवा ओढ्याचे पाणी त्यामुळे अन्यथा दूषित होईल ;

अशा ठिकाणी व अशा रीतीने बांधता कामा नये.

रस्त्यांवरील किंवा रस्त्यांवरुन जाण्याचा मार्ग असलेले संडास, इत्यादींवर नियंत्रण.

**१७.** (१) रेल्वेच्या जागेत बांधलेला किंवा शासनाने बांधलेला संडास, शौचकूप किंवा मुत्री, याव्यतिरिक्त, अन्य कोणताही सार्वजनिक संडास, शौचकूप किंवा मुत्री, आयुक्ताच्या संमतीशिवाय कोणत्याही रस्त्यावर किंवा त्यात रस्त्यावरून जावे लागेल अशा रीतीने बांधता कामा नये आणि आयुक्तास आपली संमती देताना, तो संडास, शौचकूप किंवा मुत्री यांच्या वापराबाबत किंवा त्यास आवश्यक वाटेल तेव्हा तो संडास, शौचकूप किंवा मुत्री कोणत्याही वेळी काढून टाकण्याबाबत त्यास योग्य वाटतील अशा अटी लादता येतील.

(२) आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे,–

(अ) जो संडास, शौचकूप किंवा मुत्री पोट-नियम (१) चे उल्लंघन करून बांधण्यात आली असेल किंवा जो संडास, शौचकूप किंवा मुत्री काढून टाकण्यास भाग पाडण्याचा आयुक्तास हक्क आहे अशा संडासाच्या, शौचकूपाच्या किंवा मुत्रीच्या मालकास असा संडास, शौचकूप किंवा मुत्री काढून टाकण्यास भाग पाडता येईल ;

(ब) जो संडास, शौचकूप किंवा मुत्री रस्त्यावर उघडत असेल किंवा ज्यामुळे उपद्रव होईल किंवा सार्वजनिक सभ्यतेस बाधा येईल अशा ठिकाणी असेल किंवा अशा रीतीने बांधण्यात आला असेल अशा संडासाच्या, शौचकूपाच्या किंवा मुत्रीच्या मालकास असा संडास, शौचकूप किंवा मुत्री काढून टाकण्यास किंवा कायमची बंद करण्यास भाग पाडता येईल.

स्नानासाठी किंवा कपडे अथवा घरगुती उपयोगाची भांडी धुण्यासाठी जागांचा वापर करणे.

**१८.** ज्या कोणत्याही जागेच्या कोणत्याही भागात, आयुक्तास योग्य वाटेल अशा फरशीची आणि त्यातील सांडपाणी गोळा करण्यासाठी व ते तेथून वाहून नेण्यासाठी आयुक्ताच्या मते आवश्यक असतील अशा सर्व साधनांची व जोडकामांची तरतूद करण्यात आली नसेल, अशा कोणत्याही जागेचा कोणताही भाग, स्नानाची जागा म्हणून किंवा कपडे किंवा घरगुती उपयोगांची भांडी धुण्याची जागा म्हणून कोणत्याही व्यक्तीने वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये.

लायसन्सदार नळकारागिराने काम करणे : नाली म्हणून उपयोग करण्यास परवानगी.

**१९.** (१) लायसन्सदार नळकारागिराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने या प्रकारामध्ये किंवा या अधिनियमाच्या प्रकरण १२ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम करता काम नये आणि कोणत्याही व्यक्तीने लायसन्सदार नळकारागिराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस असे कोणतेही काम करू देता कामा नये :

परंतु, आयुक्ताच्या मते उक्त काम किरकोळ स्वरूपाचे असेल तर त्यास, लायसन्सदार नळकारागिराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीने असे काम करण्यासाठी लेखी परवानगी देता येईल.

(२) जी व्यक्ती, असे कोणतेही काम करण्यासाठी लायसन्सदार नळकारागिरास कामावर लावील अशा प्रत्येक व्यक्तीने, तसे करणे आवश्यक असेल तेव्हा ; अशा नळकारागिराचे नाव आयुक्तास कळविले पाहिजे.

(३) अशा प्रत्येक व्यक्तीने असे कोणतेही काम पूर्ण झाल्यापासून एक महिन्याच्या आत, आणि ते काम किंवा त्यांचा कोणताही भाग भरून काढण्यास किंवा झाकून टाकण्यास परवानगी देण्यापूर्वी, असे काम पूर्ण झाल्याची लेखी नोटीस आयुक्तास त्याच्या कार्यालयात दिली पाहिजे किंवा पाठविली पाहिजे किंवा देण्याची किंवा पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि ज्या लायसन्सदार नळकारागिराने असे काम केले असेल त्या लायसन्सदार नळकारागिराने सही केलेले व आयुक्त वेळोवेळी विहित करील अशा नमुन्यातील प्रमाणपत्र अशा नोटिशीस जोडले पाहिजे ; आणि याद्वारे, अशा नळकारागिराने काम पूर्ण झाल्यावर आणि त्यास कामावर लावणाऱ्या व्यक्तीने मागणी केल्यावर ताबडतोब अशा प्रमाणपत्रावर सही करून ते अशा व्यक्तीस देणे आवश्यक असेल, आणि अशा व्यक्तीने अशा कामाची पाहणी करण्यासाठी आयुक्तास आवश्यक अशा सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत :

परंतु,—

(अ) काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत अशी पाहणी करण्यात आली पाहिजे, आणि

(ब) आयुक्तास, अशी पाहणी केल्यानंतर सात दिवसांच्या आत, ज्या व्यक्तीकडून काम पूर्ण झ ााल्याची नोटीस मिळाली असेल अशा व्यक्तीच्या नावे लेखी सूचना लिहून व ती अशा नोटिशीत नमूद केलेल्या तिच्या पत्त्यावर पाठवून, किंवा अशा पत्त्याच्या अभावी, ज्या जागेत असे काम करण्यात आले असेल त्या जागेच्या एखाद्या ठळक भागावर अशी सूचना लावून,—

(एक) असे काम भरून काढण्यास किंवा झाकून टाकण्यास परवानगी देता येईल ; किंवा

(दोन) असे काम भरून काढण्यापूर्वी किंवा झाकून टाकण्यापूर्वी ज्या कोणत्या विवक्षित बाबतीत ते काम आयुक्ताने पूर्वी दिलेल्या आदेशास अनुसरून नसेल किंवा त्यामुळे या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा उपविधिच्या तरतुदींचे उल्लंघन होत असेल अशा कोणत्याही विवक्षित बाबतीत ते काम आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने सुधारले पाहिजे असे फर्माविता येईल.

(क) कोणत्याही व्यक्तीने,—

(क) पोट-नियम (३) च्या परंतुक (ब) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली परवानगी मिळेपर्यंत ; किंवा

(ख) आयुक्ताने वर सांगितल्याप्रमाणे असे काम भरून काढण्याची किंवा झाकून टाकण्याची परवानगी त्याने नाकारली असल्याची सूचना काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्यानंतर चौदा दिवसात दिली नसेल तोपर्यंत ;

असे कोणतेही काम नाली म्हणून किंवा नालीचा भाग म्हणून वापरण्यास परवानगी देता कामा नये.

## नाली किंवा मलकुंड्या यांत हवा खेळती राहण्यासाठी वायुवीजनाचे दांडे उभारण्याची किंवा नळ लावण्याची रीत

नाली किंवा मलकुंड्या यात हवा खेळती राहण्यासाठी वायुवीजनाचा दांडा इत्यादी उभारणे.

**२०.** कलम १७५ अन्वये कोणत्याही नालीत किंवा मलकुंडीत हवा खेळती राहण्याच्या प्रयोजनांसाठी आयुक्ताने उभारलेला कोणताही वायुवीजनाचा दांडा किंवा लावलेला कोणताही नळ, —

(अ) त्यापासून चाळीस फूट अंतराच्या आत असलेल्या कोणत्याही गवाक्षापेक्षा किंवा खिडकीपेक्षा निदान पंधरा फूट उंच नेलेला असला पाहिजे ;

(ब) जर तो छपराच्या वळचणीला आधार देणाऱ्या भिंतीवर बसवण्यात आला असेल तर अशा वळचणीपेक्षा निदान पाच फूट उंच नेलेला असला पाहिजे ;

(क) जवळपास राहणाऱ्या व्यक्तींना शक्य तितका कमी उपद्रव किंवा गैरसोय होईल अशा रीतीने उभारलेला किंवा लावलेला असला पाहिजे ;

(ड) तो ज्या जागेवर, इमारतीवर किंवा झाडावर उभारलेला किंवा लावलेला असेल अशा जागेच्या इमारतीच्या किंवा झाडांच्या मालकाची, कोणत्याही वेळी, आपल्या मालमत्तेत जो कोणताही बदल, असा वायुवीजनाचा दांडा किंवा नळ हलविल्याशिवाय करता येत नसेल किंवा गैरवाजवी गैरसोयीशिवाय करता येत नसेल असा बदल करण्याची इच्छा असेल तर आयुक्ताने अशा वायुवीजनाचा दांडा किंवा नळ हलविल्याशिवाय करता येत नसेल किंवा गैरवाजवी गैरसोयीशिवाय करता येत नसेल असा बदल करण्याची इच्छा असेल तर आयुक्ताने अशा वायुवीजनाचा दांडा किंवा नळ एखाद्या अन्य ठिकाणी हलवला पाहिजे.

## प्रकरण दहा

## पाणीपुरवठा

व्याख्या.

**१.** विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, या प्रकरणात,—

(अ) "पाणी वाहून नेणारा नळ" याचा अर्थ नगरपालिकेच्या मुख्य नळापासून नगरपालिकेच्या थोप तोटीपर्यंत जाणारा नळ, असा होतो आणि त्यात थोप तोटीचाही समावेश होतो ;

(ब) "उपभोक्ता" याचा अर्थ, नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून मिळणारे पाणी जी व्यक्ती वापरते किंवा जिला असे पाणी पुरवण्यात येते किंवा जिच्या अर्जावरून असे पाणी पुरवण्यात येते अशी कोणतीही व्यक्ती, असा होतो आणि त्यात, नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून पुरवण्यात आलेल्या पाण्याबद्दल या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नगरपालिकेस पाणीपट्टी किंवा कोणतीही रक्कम देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(क) "उपभोक्त्याचा नळ" याचा अर्थ, कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या संबंधात वापरला जाणारा आणि महानगरपालिकेची मालमत्ता नसलेला नळ, असा होतो ;

(ड) "वितरण नळ" याचा अर्थ, नगरपालिकेच्या मुख्य नळाच्या पाण्याच्या दाबाखाली नसलेला कोणताही नळ, असा होतो ;

(ई) "जोडणीकाम" या संज्ञेत नळ, कपलिंग, फ्लँज, शाखा, बेंड, थोप, लोहवलय, थोप तोटी, द्विमुखी तोटी, स्प्रिंग तोटी, स्तंभ तोटी, गोलक तोटी, गोलतोटीनलिका, बाष्पक, पंप, मीटर, नळखांब आणि महानगरपालिकेने पुरवलेले पाणी वाहून नेण्याच्या किंवा साठवण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारे अन्य कोणतेही उपकरण किंवा वस्तू यांचा समावेश होतो ;

(फ) "नगरपालिका, थोप तोटी" याचा अर्थ, नगरपालिकेच्या मुख्य नळातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारी थोप तोटी असा होतो ;

(ग) "पुरवठा नळ" याचा अर्थ, नगरपालिका थोप तोटीपासून साठवण टाकी असल्यास त्या टाकीच्या गोल तोटीपर्यंत जाणारा नळ आणि नगरपालिकेच्या मुख्य नळाच्या पाण्याच्या दाबाखाली असलेला कोणताही नळ असा होतो.

## खाजगी पाणीपुरवठा

खाजगी पाणीपुरवठा ज्या शर्तीवर करता येईल त्या शर्ती.

२. (१) पोट-नियम (२), (३) आणि (४) च्या तरतुदींच्या अधीन राहून, नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून कोणत्याही जागेत खाजगी पाणीपुरवठा करण्यासाठी असलेले पुरवठा नळ, जागेच्या मालकाकडून किंवा उक्त जागेवरील मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीकडून लेखी अर्ज आला असेल किंवा लेखी अनुमती मिळाली असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा, अशा जलव्यवस्था केंद्राशी जोडता येणार नाही.

(२) शहराच्या ज्या कोणत्याही भागात आयुक्ताने कलम १३०, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये नोटीस दिली आहे, अशा भागात असलेल्या कोणत्याही जागा, उक्त जागांमध्ये मिळू शकणाऱ्या आणि उक्त जागांचा नेहमी भोगवटा करणाऱ्या किंवा त्याठिकाणी कामावर असलेल्या व्यक्तींच्या गरजा भागवण्यास पुरेसा असेल अशा शुद्ध पाण्याच्या पुरवठ्याविना आहेत असे आयुक्तास आढळून येईल तर, आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे, उक्त जागांच्या मालकास किंवा त्यावरील मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीस नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून वर सांगितल्याप्रमाणे पुरेसा पाणीपुरवठा मिळवण्यास आणि पुरवठा व वितरण नळ, टाक्या आणि जोडणीकामे यांची तरतूद करण्यास आणि त्या प्रयोजनासाठी आयुक्ताच्या मते आवश्यक असतील अशी कामे करण्यास भाग पाडता येईल.

[1][(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही जागेच्या संबंधात, मालमत्ता कर भरण्यास प्रामुख्याने जबाबदार असणारा मालक किंवा व्यक्ती, वाजवी कालावधीत पोट-कलम (१) अन्वये अर्ज करण्यात किंवा स्वत:ची संमती देण्यास कसूर किंवा अर्ज करण्याचे किंवा आपली अनुमती देण्याचे नाकारील त्याबाबतीत, असा पाणीपुरवठा अशा जागेस करण्यासाठी असे पुरवठा नळ, अशा जागेच्या भोगवटादाराने आयुक्तास लेखी अर्ज केल्यावर आवश्यक ती चौकशी केल्यानंतर पाणीपुरवठा नळ जोडण्याचा खर्च देण्यात आल्यानंतर व आयुक्तास (पाणीपट्टी व पाण्याचा आकार देण्यासंबंधीच्या शर्तीसह) ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा इतर शर्तींच्या अधीन, अशा जलव्यवस्था केंद्राशी जोडून देता येतील.]

---

१. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २२ द्वारे मूळ पोट-नियमाऐवजी पोट-नियम (३) दाखल करण्यात आला.

(४) कोणत्याही जागेतून सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था अपुरी आहे किंवा पाणी वाहून नेणाऱ्या नळातून पाणीपुरवठा केल्यास अशी जागा आरोग्यास अपायकारक होण्याची किंवा त्यामुळे उपद्रव होण्याची शक्यता आहे अशी आयुक्ताची खात्री होईल तर, सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा आरोग्यास अपायकारक अशी स्थिती किंवा उपद्रव निर्माण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी आयुक्त निदेश देईल अशी उपाययोजना करण्यात आली नाही तर आयुक्तास अशा जागांच्या बाबतीत या नियमान्वये नळ जोडण्यास नकार देता येईल.

नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी नळ जोडण किंवा पुन्हा जोडणे.

३. (१) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी नळ जोडण्याचे किंवा पुन्हा जोडण्याचे कोणतेही काम,—

(अ) आयुक्ताने त्याबाबत अधिकार दिलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याव्यतिरिक्त किंवा कर्मचाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने करता कामा नये ; आणि

(ब) पोट-नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले प्रमाणपत्र देण्यात येईपर्यंत करता काम नये.

(२) नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी नव्याने नळ जोडण्याचे काम करण्यात येईल किंवा विद्यमान नळ पुन्हा जोडण्यात येईल अशा प्रत्येक बाबतीत, त्यासाठी आवश्यक असे पाणी वाहून नेणारे सर्व नळ व जोडण्या आयुक्ताकडून पुरविण्यात आल्या पाहिजेत, आणि असे पाणी वाहून नेणारे नळ व उपकरणे बसवण्याचे व लावण्याचे काम आयुक्ताच्या आदेशान्वये नगरपालिकेने पार पाडले पाहिजे. परंतु, अशा रीतीने नळ जोडणीचे किंवा पुन्हा जोडण्याचे काम करण्यासाठी आणि अशा रीतीने पुरवण्यात आलेल्या पाणी वाहून घेणाऱ्या सर्व नळांसाठी व जोडण्यांसाठी आणि अशा रीतीने पार पाडण्यात आलेल्या कामासाठी आलेला खर्च, ज्या व्यक्तीच्या अर्जावरून किंवा ज्या व्यक्तीच्या जागेसाठी नळ जोडण्याचे किंवा पुन्हा जोडण्याचे काम करण्यात आले आहे त्या व्यक्तीने दिला पाहिजे.

(३) अशा रीतीने नव्याने जोडण्यात आलेला किंवा पुन्हा जोडण्यात आलेला प्रत्येक नळ, पाणी वाहून नेणारे नळ व जोडण्या यांच्यासह, त्यानंतर महानगरपालिकेमध्ये निहित होईल आणि नगरपालिका जलव्यवस्था केंद्र म्हणून नगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने सुस्थितीत राखण्यात येईल.

(४) वर सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेमध्ये निहित नसलेले सर्व पुरवठा व वितरण नळ, टाक्या आणि जोडणीकामे, आयुक्ताने याबाबत नेमलेल्या नगरपालिका अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली आणि त्याचे समाधान होईल अशा रीतीने बसवली पाहिजेत व लावली पाहिजेत आणि अशा अधिकाऱ्याने, असे पुरवठा व वितरण नळ, टाक्या आणि आवश्यक ती सर्व जोडणी समाधानकारक रीतीने बसवण्यात व लावण्यात आल्यावर आणि सांडपाणी वाहून जाण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात आल्यावर आपल्या सहीने एक प्रमाणपत्र विनामूल्य दिले पाहिजे.

(५) या नियमाचे उल्लंघन करून कोणताही पुरवठा किंवा वितरण नळ, टाकी किंवा अशी जोडणी बसवण्यात किंवा लावण्यात आली असेल किंवा त्यात भर घालण्यात आली असेल किंवा फेरफार करण्यात आले असतील किंवा कोणताही नळ जोडण्याचे काम करण्यात आले असेल तेव्हा, आयुक्तास, असा पुरवठा किंवा वितरण नळ, टाकी, जोडणी किंवा जोडलेला नळ काढून टाकता येईल, किंवा

त्यातील भर किंवा फेरफार काढून टाकता येईल आणि असा नळ, टाकी, जोडणी किंवा जोडलेला नळ पूर्ववत करता येईल, आणि असा पुरवठा किंवा वितरण नळ, टाकी किंवा जोडणी किंवा जोडलेला नळ ज्या जागेत किंवा ज्या जागेस पुरवठा करण्यासाठी बसवण्यात किंवा लावण्यात आला असेल किंवा त्यात भर घालण्यात आली असेल किंवा फेरफार करण्यात आले असतील त्या जागेचा मालक व भोगवटादार हे, असे करण्यास आयुक्तास आलेला खर्च भरून देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील.

खाजगी व्यक्तींसाठी जोडलेले नळ आयुक्तास ताब्यात घेता येतील.

४. (१) उपभोक्त्याशी करार करून महानगरपालिकेच्या वतीने उपभोक्त्याचे सर्व किंवा कोणतेही नळ आणि जोडणीकामे आयुक्तास ताब्यात घेता येतील :

परंतु, असे कोणतेही नळ किंवा जोडणीकामे ही, केवळ महानगरपालिकेमध्ये विहित नसलेले, पाणी वाहून नेणारे नळ किंवा जोडणीकामे असतील तर आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, असा करार न करता असे नळ किंवा जोडणीकामे ताब्यात घेता येतील :

(२) या नियमान्वये आयुक्त ज्या नळाचा आणि जोडणीकामाचा ताबा घेईल असे उपभोक्त्याचे कोणतेही नळ आणि उपकरणे ही त्यानंतर महानगरपालिकेमध्ये निहित होतील आणि नगरपालिका जलव्यवस्था केंद्र म्हणून नगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने सुस्थितीत राखण्यात येतील.

जोडलेल्या नळांची जागा बदलण्याचा आयुक्ताचा अधिकार.

५. कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी जोडलेल्या विद्यमान नळांची किंवा उपभोक्त्याच्या कोणत्याही नळांची किंवा त्यांच्या जोडणीकामाची जागा बदलणे इष्ट आहे असे आयुक्तास कोणत्याही वेळी वाटेल तर, त्यास अशा जोडलेल्या नळाच्या किंवा जोडणी कामाच्या मालकास आपला तसे करण्याचा उद्देश असल्याविषयी कमीत कमी चार दिवसांची आगाऊ नोटीस दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशा अन्य जागी उक्त जोडलेला नळ, उपभोक्त्यांचा नळ किंवा जोडणीकाम हलविण्याविषयी आणि तो निदेश देईल अशा जागी पुन्हा बसविण्याविषयी व लावण्याविषयी किंवा त्यांच्याऐवजी दुसरे नळ किंवा जोडणीकामे बसविण्याविषयी किंवा लावण्याविषयी फर्माविता येईल ; आणि अशा प्रत्येक बाबतीत अशी सर्व कामे नगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने पार पाडण्यात येतील आणि असे नव्याने जोडलेले नळ उपभोक्त्याचे नळ आणि जोडणीकामे त्यानंतर महानगरपालिकेमध्ये निहित होतील आणि नगरपालिका जलव्यवस्था केंद्र म्हणून नगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने सुस्थितीत राखण्यात येतील.

नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी जोडण्यासाठी वापरावयाच्या टाक्या व अन्य जोडणी कामे इत्यादींसंबंधी तरतुदी.

६. (१) आयुक्तास, तसे करणे त्यास आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा, कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून खाजगी पाणीपुरवठा मिळत असलेल्या कोणत्याही जागेच्या मालकास लेखी नोटिशीद्वारे, त्यास योग्य वाटेल अशा आकाराच्या, सामग्रीच्या, प्रतीच्या आणि वर्णनाच्या टाक्या व जोडणी कामे उक्त जागेत, उक्त नोटिशीत विहित करण्यात येईल अशा वाजवी कालावधीच्या आत व त्यास योग्य वाटेल अशा ठिकाणी व तेथे जाण्याच्या सुरक्षित व सोप्या साधनांसह बसवण्यास भाग पाडता येईल.

(२) आयुक्तास, तशाच रीतीने, कोणत्याही विद्यमान टाकीकडे सहज जाता येईल असे साधन नाही असे नियम ११ अन्वये तपासणी केल्यावर आढळून येईल तेव्हा, अशा टाकीकडे जाण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा जाण्याच्या सुरक्षित व सोप्या साधनांची तरतूद करण्याविषयी कोणत्याही जागेच्या मालकास भाग पाडता येईल.

(३) खाजगी पाणीपुरवठा मिळत असलेल्या कोणत्याही जागेतून कोणतीही टाकी काढून टाकणे आयुक्तास आवश्यक किंवा इष्ट वाटेल तेव्हा तेव्हा आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे अशा जागेच्या मालकास नोटिशीत विहित करण्यात आलेल्या कालावधीच्या आत अशा जागेतून अशी टाकी तिच्या सर्व जोडकामांसह काढून टाकण्यास भाग पाडता येईल.

(४) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी जोडावयाच्या किंवा त्यातून पाणी वाहून नेण्याच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे नळ व जोडणीकामे यांचे आकार, सामग्री, दर्जा, वर्णन व जागा आयुक्ताने वेळोवेळी विहित केली पाहिजे ; आणि कोणत्याही व्यक्तीने अशा रीतीने विहित करण्यात आले आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही रीतीने असे नळ जोडता कामा नयेत किंवा असे पाणी वाहून नेता कामा नये.

(५) नियम ११ अन्वये तपासणी केल्यावर जे नळ, टाक्या किंवा जोडणीकामे ही परिणामकारक रीतीने दुरुस्त करता येणार नाहीत इतकी सदोष आहेत असे आढळून आलेले कोणतेही नळ, टाक्या किंवा जोडणीकामे यांच्याऐवजी बसवण्याच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे नळ, टाक्या आणि जोडणीकामे यांचा आकार, सामग्री, दर्जा व वर्णन आयुक्ताने विहित केले पाहिजे.

(६) कोणत्याही जागेत किंवा जागेवर पोट-नियम (४) मध्ये विहित करण्यात आले आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणताही जोडलेला नळ किंवा पाणी वाहून नेणारा नळ आढळून येईल तर, तद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत असा जोडलेला नळ किंवा पाणी वाहून नेणारा नळ हा अशा जागेच्या मालकाच्या निदेशान्वये किंवा त्यानुसार परवानगीने बसवण्यात आला आहे असे गृहित धरण्यात येईल.

(७) आयुक्तास, कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी जोडावयाच्या किंवा त्यातून पाणी वाहून नेण्याच्या कोणत्याही प्रयोजनासाठी वापरावयाच्या सर्व नळांवर, चाव्यांवर, तोट्यांवर, जोडणी कामांवर व सामग्रीवर नगरपालिकेद्वारे शिक्के मारण्याची तरतूद करण्याविषयी आदेश देता येईल ; आणि अशा आदेशाद्वारे, अशा रीतीने शिक्के मारण्याबद्दल फी देण्याविषयी तरतूद करता येईल ; आणि उक्त जोडावयाच्या नळांच्या बाबतीत व पाणी वाहून नेण्याच्या नळांच्या बाबतीत अशा रीतीने शिक्के मारण्यात आलेले नळ, चाव्या, तोट्या, जोडणीकामे किंवा सामग्री यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नळ, चाव्या, तोट्या, जोडणीकामे किंवा सामग्री वापरण्यास मानाई करता येईल.

टाक्या कुलूप लावून बंद ठेवण्याची तरतूद.

**७.** (१) आयुक्तास, ज्या जागेत टाकीची सोय करण्यात आली आहे किंवा ज्या जागेच्या बाबतीत त्याने टाकीची सोय करण्यास फर्मावले आहे अशा कोणत्याही जागेच्या मालकास उक्त टाकीसाठी लेखी नोटिशीद्वारे, आयुक्त उक्त नोटिशीत विहित करील अशा नमुन्याच्या, सामग्रीच्या व दर्जाच्या कुलूप-किल्लीची तरतूद करण्यास फर्मावता येईल आणि तसेच, नियम ११ अन्वये तपासणी केल्यावर कोणतेही कुलूप किंवा किल्ली सदोष असल्याचे आढळून आले तर असे कूलूप किंवा किल्ली बदलण्यास सांगता येईल.

(२) अशा रीतीने कुलपाची तरतूद करण्यात आलेली प्रत्येक टाकी कायम कुलूप लावून बंद ठेवली पाहिजे आणि त्यानंतर किल्ली आयुक्ताच्या स्वाधीन केली पाहिजे.

८. (१) कोणत्याही नगरपालिका जलव्यस्था केंद्रातून खाजगी पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने, उक्त जलव्यवस्था केंद्रातून अशा जागेकडे पाणी वाहून नेण्यासाठी असलेला प्रत्येक पुरवठा व वितरण नळ आणि नगरपालिकेचे मीटर नसेल असे पाणी मोजण्याचे प्रत्येक मीटर व प्रत्येक टाकी आणि अशा कोणत्याही नळातील किंवा नळास जोडलेले जोडणीकाम हे पाणी वाया जाण्यास परिणामकाराक रीतीने प्रतिबंध व्हावा म्हणून, पूर्णपणे स्वच्छ ठेवणे आणि सुस्थितीत ठेवणे व नेहमी दुरुस्त स्थितीत ठेवणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य असेल.

जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने पाणी वाहून नेणारे नळ नेहमी दुरुस्त स्थितीत ठेवणे.

(२) कोणत्याही जागेच्या भोगवटादारावर नियम ११, पोट-नियम (२) अन्वये, नोटीस बजावण्यास आली असेल तेव्हा, त्यास, ज्या व्यक्तीला आपले भाडे देण्यास तो जबाबदार आहे त्या व्यक्तीला तीन दिवसांची लेखी नोटीस दिल्यानंतर, स्वत:च्या दुरुस्त्या करवून घेता येतील आणि अशा प्रसंगी, त्यास, भाडेदारीच्या अटींमध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर, त्याने अशा व्यक्तीस देय असलेल्या किंवा देय होणाऱ्या कोणत्याही भाड्यातून नियम ११, पोट-नियम (२) अन्वये बजावण्यात आलेल्या नोटिशीचे अनुपालन करताना त्यास आलेला प्रत्यक्ष खर्च वजा करण्याचा हक्क असेल.

९. (१) मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा, आयुक्तास, मीटरची तरतूद करता येईल आणि त्याबद्दल स्थायी समिती याबाबत वेळोवेळी विहित करील असे भाडे उपभोक्त्यावर आकारता येईल किंवा या प्रयोजनांसाठी आयुक्त मान्य करील अशा आकाराचे, सामग्रीचे व वर्णनाचे असे उपभोक्त्याचे स्वत:चे मीटर बसवण्यास उपभोक्त्यास परवानगी देता येईल.

मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा मीटरची तरतूद करणे.

(२) आयुक्ताने कोणत्याही व्यक्तीस भाड्याने दिलेले सर्व मीटर आणि पाणी मोजण्याची अन्य साधने ही पाणीपुरवठ्याची अचूक नोंद होण्यासाठी आयुक्ताने सर्व वेळी योग्य स्थितीत ठेवली पाहिजेत आणि त्याने तसे करण्यात कसूर केल्यास, कसूर करणे चालू राहील अशा कालावधीत अशी व्यक्ती त्याबद्दल भाडे देण्यास जबाबदार असणार नाही.

(३) (अ) पोट-नियम (१) अन्वये ज्याला मीटर भाड्याने दिले असेल अशा कोणत्याही उपभोक्त्यास मीटरची तपासणी करून घेण्यासाठी कोणत्याही वेळी आयुक्ताकडे लेखी अर्ज करता येईल, आणि आयुक्त वेळोवेळी विहित करील अशी फी अशा प्रत्येक अर्जासोबत पाठविली पाहिजे.

(ब) असा अर्ज आणि फी मिळाल्यावर आयुक्ताने अशा मीटरची तपासणी करण्यासाठी वेळ व ठिकाण विहित करणारी एक नोटीस ताबडतोब उपभोक्त्यास दिली पाहिजे आणि अशा मीटरची अशा वेळी व अशा ठिकाणी तपासणी करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(क) अशी तपासणी केल्यानंतर असे मीटर दोन टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात चुकीचे असल्याचे आढळून आले तर उपभोक्त्याने दिलेली फी त्यास परत देण्यात आली पाहिजे आणि आयुक्ताने असे मीटर दुरुस्त करण्यासाठी किंवा त्या मीटरऐवजी दुसरे मीटर बसवण्यासाठी ताबडतोब उपाययोजना करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

मीटरची नोंदवही ही पुरावा असणे.

**१०.** मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा मीटरची किंवा पाणी मोजण्याच्या अन्य साधनांची नोंदवही, ही वापरलेल्या पाण्याच्या परिणामासंबंधी प्रथमदर्शनी पुरावा असेल.

मीटर, पाणी वाहून नेणारे नळ इत्यादींची तपासणी करण्यासाठी आयुक्त इत्यादीस जागांची पाहणी करता येईल.

**११.** (१) ज्या जागांना महानगरपालिकेकडून खाजगी पाणीपुरवठा करण्यात येत असेल अशा कोणत्याही जागांची पुढील कारणासाठी आयुक्तास पाहणी करता येईल :—

(अ) पाणी मोजण्याचे कोणतेही मीटर काढून टाकणे, त्याची चाचणी घेणे, ते तपासणे किंवा त्यांच्याऐवजी दुसरे मीटर बसविणे ;

(ब) कोणताही पुरवठा किंवा वितरण नळ, टाकी, कुलूप, जोडणीकाम यांची तपासणी करणे ; किंवा

(क) त्या ठिकाणी पाणी वाया जात आहे किंवा पाण्याचा गैरवापर करण्यात येत आहे काय हे पाहणे.

(२) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास, त्यास नगरपालिकेचे मीटर नसेल अशा, भाड्याने दिलेल्या कोणत्याही मीटरमध्ये किंवा अशा कोणत्याही पुरवठा किंवा वितरण नळात, टाकीत, कुलूपात किंवा जोडणीकामात जो कोणताही दोष आढळून येईल तो काढून टाकण्यास किंवा असा नळ, टाकी, कुलूप किंवा जोडणीकाम साफ करण्यास फर्मावता येईल.

## खाजगी पाणीपुरवठा तोडून टाकणे

खाजगी पाणीपुरवठा तोडून टाकण्याचा किंवा पाणी बंद करण्याचा अधिकार.

**१२.** (१) आयुक्तास, खालील बाबतीत, कोणतेही नगरपालिका जलव्यवस्था केंद्र आणि ज्या जागेस महानगरपालिकेकडून खाजगी पाणीपुरवठा करण्यात येत असेल अशी कोणतीही जागा यामधील जोडणारा नळ तोडून टाकता येईल किंवा अशा जागांचे पाणी बंद करता येईल :—

(अ) पाणीपट्टीचा कोणताही हप्ता किंवा पाण्याबद्दल किंवा मीटरच्या भाड्याबद्दल किंवा नियम ३, ९ किंवा १७ च्या तरतुदींन्वये किंवा तरतुदींच्या आधारे केलेल्या कोणत्याही कामाच्या खर्चाबद्दल देय असलेल्या कोणत्याही रकमेचा कोणताही हप्ता, अशा पट्टीबद्दल किंवा रकमेबद्दल मागणीची नोटीस योग्य रीतीने बजावण्यात आल्यानंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसूर करण्यात आली तर ;

(ब) जागेचा मालक नियम ६, पोट-नियम (१), (२) किंवा (३) अन्वये किंवा नियम ७ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीमध्ये याबाबत विहित करण्यात आलेल्या कालावधीच्या आत कोणतीही टाकी, जोडणीकाम, कुलूप किंवा किल्ली किंवा अशा टाकीकडे जाण्याची कोणतीही साधने यांची तरतूद करण्यासंबंधी किंवा कोणतीही टाकी काढून टाकण्यासंबंधी आयुक्ताने त्यास दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यात हयगय करील तर ;

(क) जागेचा मालक किंवा भोगवटादार, नियम ११, पोट-नियम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीमध्ये याबाबत विहित केलेल्या कालावधीच्या आत, अशा नोटिशीच्या अटींच्या अनुपालन करण्यात किंवा नियम ६, पोट-नियम (५) अन्वये विहित केलेल्या प्रकारच्या वस्तू वापरण्यात कसूर करील तर ;

(ड) जागेचा मालक किंवा भोगवटादार त्यास, तसे न करण्याविषयी ज्याद्वारे फर्माविण्यात आले आहे अशी लेखी नोटीस आयुक्ताकडून मिळाल्यानंतर,—

(एक) कोणत्याही उपविधिंचे किंवा कलम १३४, पोट-कलम (२) अन्वये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीन्वये विहित केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून पाणी वापरण्याचे किंवा वापरण्यास परवानगी देण्याचे चालू ठेवील तर ;

(दोन) मोजणी न करता पाण्याबद्दल आकार देण्यात येत असेल तेव्हा, ज्या जागेच्या बाबतीत पाणीपट्टी देण्यात येते किंवा जोडलेल्या नळाच्या आकारानुसार पुरवण्यात आलेल्या पाण्याबद्दल आकार देण्यात येतो अशा जागेत न राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अशा मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या जागेतून नगरपालिका जलव्यवस्था केंद्रापासून मिळालेले पाणी नेण्यास परवानगी देण्याचे चालू ठेवील तर ;

(ई) जागेचा मालक किंवा भोगवटादार, अशा जागेतील कोणतेही मीटर, नळ, टाकी किंवा जोडणीकाम किंवा त्याचे कुलूप यांस बुद्धिपुरस्सर किंवा हयगयीने हानी पोचवील किंवा त्याचे नुकसान करील तर ;

(फ) जागेचा मालक किंवा भोगवटादार नियम १८, पोट-नियम (२) अन्वये लायसन्सदार नळकारागिराचे नाव पुरवण्याबद्दल आयुक्ताने त्यास दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करील तर ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये ती जागा माणसांनी राहण्यास अयोग्य असल्याचे जाहीर करण्यात आले असेल तर ;

(ह) कोणत्याही जागेत अपघाताने किंवा अन्यथा पाण्याच्या मुख्य नळाला नुकसान पोचल्यामुळे जास्त प्रमाणात पाणी वाया जात असेल तर ;

(आय) नियम ६ च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही पाणी वाहून नेणारे नळ किंवा उपकरणे बसवण्यात किंवा लावण्यात आली असतील किंवा त्यामध्ये भर घालण्यात आली असेल किंवा त्यात फेरफार करण्यात आले असतील तर :

परंतु,—

(एक) खंड (क) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत, आयुक्ताने पट्टीच्या किंवा रकमेच्या बाबतीत मागणीच्या नोटिशींची एक प्रत, कमीत कमी एक महिन्याच्या कालावधीच्या आधी अशा जागेच्या ठळक भागावर लावण्यात आली असल्याशिवाय, कारवाई करता कामा नये ;

(दोन) खंड (ख) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत, आयुक्ताने, नियम ६, पोट-नियम (१), (२) किंवा (३) अन्वये किंवा यथास्थिती, नियम ७ अन्वये देण्यात येणाऱ्या नोटिशीची एक प्रत, कमीत कमी पंधरा दिवस आधी अशा जागेच्या ठळक भागावर लावण्यात आली असल्याशिवाय, कारवाई करता कामा नये ;

(तीन) अन्य बाबतीत, आयुक्ताने अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास कमीत कमी चोवीस तास आधी लेखी नोटीस दिल्याशिवाय, कारवाई करता कामा नये.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही बाबतीत, जोडलेला नळ तोडून टाकण्याचा किंवा पाणी बंद करण्याचा खर्च अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने दिला पाहिजे.

(३) पोट-नियम (१), खंड (क) खालील कोणत्याही बाबतीत देय असलेली पट्टी किंवा रक्कम, ही, त्यातील अटीनुसार ठरवलेल्या कालावधीच्या आत, ती देण्यास प्रथमत: दायी असलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त त्या जागेचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून देण्यात आली असेल तर, अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना, त्याबद्दल, प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीच्या खाती तितकी रक्कम आपल्या नावे जमा करण्याचा हक्क असेल आणि प्रथमत: दायी असलेल्या व्यक्तीस देय असलेल्या कोणत्याही भाड्याच्या रकमेतून अशा रीतीने दिलेली रक्कम, वसुलीच्या अन्य कोणत्याही उपायांस बाधा येऊ न देता, वजा करण्याचा हक्क असेल.

मीटरच्या बाबतीत लबाडी करण्यास मनाई.

**१३.** कोणत्याही व्यक्तीने लबाडी करून,—

(अ) कोणत्याही मीटरच्या दर्शकांमध्ये फेरफार करता कामा नये किंवा पुरवण्यात आलेल्या पाण्याच्या परिमाणाची कोणत्याही मीटरमध्ये योग्य रीतीने नोंद होण्यास प्रतिबंध करता कामा नये ;

(ब) पाणी मोजण्याच्या प्रयोजनासाठी बसवलेल्या मीटरमध्ये पाण्याची नोंद होण्यापूर्वीच पाणी काढता किंवा वापरता कामा नये.

(२) असा कोणताही फेरफार करणे, प्रतिबंध करणे, पाणी काढणे किंवा वापरणे ज्यामुळे साध्य होईल अशी कृत्रिम साधने उपभोक्त्याच्या नियंत्रणाखाली असणे हे, उपभोक्त्याने अशा गोष्टी लबाडी करून केल्या आहेत याविषयी पुरावा म्हणून समजण्यात येईल.

## सर्वसाधारण तरतुदी

**१४.** कोणत्याही व्यक्तीने बुद्धिपुरस्सर किंवा हयगयीने,— जलव्यवस्था केंद्राच्या बाबतीत बुद्धिपुरस्सर किंवा हयगयीने कृत्ये करण्यास मनाई.

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही मीटरचे किंवा अशा कोणत्याही मीटरच्या कोणत्याही जोडणीकामाचे नुकसान करता कामा नये किंवा करू देता कामा नये ;

(ब) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्राशी संबंधित असलेले कोणतेही कुलूप, मोहोर, तोटी, व्हॉल्व, नळ, काम, इंजिन, टाकी किंवा जोडकाम फोडता कामा नये, त्याचे नुकसान करता कामा नये किंवा ते उघडता कामा नये ;

(क) पाणी वाया जाईल अशा रीतीने अशा कोणत्याही जलव्यवस्था केंद्रातून पाणी जोराने बाहेर काढता कामा नये किंवा सोडता कामा नये ;

(ड) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातील किंवा त्यातून मिळणारे पाणी वाया जाईल असे कोणतेही कृत्य करता कामा नये किंवा करू देता कामा नये ;

(ई) पाण्याच्या कोणत्याही मुख्य नळास किंवा नळास अडथळा करता कामा नये, त्याची दिशा बदलता कामा नये, किंवा त्याचे कोणत्याही प्रकारे नुकसान करता कामा नये किंवा त्यात फेरफार करता कामा नये.

(फ) आयुक्ताची परवानगी असल्याशिवाय, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये पुरवण्यात आलेले कोणतेही कुलूप उघडता कामा नये, फोडता कामा नये, त्याचे नुकसान करता कामा नये किंवा त्याची मोडतोड करता कामा नये ;

(ग) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातील पाणी घाण करता कामा नये, दूषित करता कामा नये किंवा अन्यथा मानवी वापरासाठी अयोग्य करता कामा नये ;

**१५.** नियम १३ किंवा १४ चे कोणत्याही रीतीने उल्लंघन केल्यामुळे महानगरपालिकेचे जे कोणतेही नुकसान होईल त्याबद्दल अपराध्याने भरपाई दिली पाहिजे. नियम १३ किंवा १४ विरुद्ध अपराध करणाऱ्यांनी भरपाई देणे.

**१६.** ज्या जागेस महानगरपालिकेकडून खाजगी पाणी पुरवठा करण्यात आला असेल अशा कोणत्याही जागेत या अधिनियमाच्या एखाद्या तरतुदींविरुद्ध किंवा पाणी पुरवठ्यासंबंधीच्या एखाद्या नियमाविरुद्ध किंवा उपविधिविरुद्ध अपराध घडला आहे असे दाखवून देण्यात येईल तर, उक्त जागेचा मालक, पाणीपट्टी भरण्यास प्रथमत: पात्र असलेली व्यक्ती आणि त्या जागेचा भोगवटादार हे त्यासाठी संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील. या अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींखालील अपराधाबद्दल कोणत्या व्यक्ती जबाबदार असतील.

या प्रकरणाखालील कामे करण्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींना ती करण्यासाठी विकल्प न देता आयुक्तास ती कामे स्वत: पार पाडता येतील.

**१७.** (१) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, ज्या व्यक्तीस या प्रकरणात वर्णन केलेले कोणतेही काम करावे लागले असते किंवा कोणत्याही टाकीसाठी कुलूप व किल्ली पुरवावी लागली असती त्या व्यक्तीस ते काम करण्यासाठी किंवा अशा रीतीने कुलूप व किल्ली पुरवण्यासाठी सर्वात प्रथम विकल्प न देता, आपल्या स्वत:च्या आदेशान्वये महानगरपालिका किंवा अन्य संस्थेकडून ते काम करवून घेता येईल, किंवा अशा रीतीने कुलूप व किल्ली पुरवण्याची व्यवस्था करून घेता येईल.

(२) अशा रीतीने केलेल्या कोणत्याही कामाचा किंवा कुलूप व किल्ली पुरवण्याचा खर्च, नगरपालिका निधीतून खर्च करून असे काम करण्यास किंवा कुलूप व किल्ली पुरवण्यास महानगरपालिकेने सामान्य किंवा विशेष आदेशान्वये किंवा निर्णयान्वये मंजुरी दिली नसेल तर, उक्त व्यक्तीने दिला पाहिजे अशी मंजुरी देण्याविषयी महानगरपालिकेस याद्वारे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

या प्रकरणाखालील काम लायसन्सदार नळ कारागिराने करणे.

१८. (१) कुलूप व किल्लीची तरतूद करण्याच्या कामाव्यतिरिक्त या प्रकरणामध्ये वर्णन केलेले कोणतेही काम लायसन्सदार नळकारागिराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने करता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने लायसन्सदार नळकारागिराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस असे काम करण्याची परवानगी देता कामा नये.

(२) जी व्यक्ती असे कोणतेही काम करण्यासाठी लायसन्सदार नळकारागिरास कामावर लावील अशा प्रत्येक व्यक्तीने, तिला तसे करण्याविषयी फर्माविण्यात आल्यावर, अशा नळ कारागिराचे नाव आयुक्तास कळविले पाहिजे.

(३) कोणतीही व्यक्ती पोट-नियम (१) चे उल्लंघन करून नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून कोणत्याही जागेत खाजगी पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असेल असा कोणताही नळ टाकण्याची टाकी किंवा जोडकाम बसवण्याची किंवा अन्य कोणतेही काम करण्याची व्यवस्था करील किंवा तसे करण्यास परवानगी देईल तेव्हा, ती अशा उल्लंघनासाठी विहित करण्यात आलेल्या शास्तीस पात्र असेलच ; त्याशिवाय आणखी, अशा नळात, टाकीत, जोडकामात, किंवा कामात दोष, असल्यास, तो दोष आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने काढून टाकण्यात येईपर्यंत अशा व्यक्तीस स्वतंत्र नळ टाकून मिळण्याचा किंवा नळाची शाखा टाकून मिळण्याचा हक्क असणार नाही.

## प्रकरण अकरा

# रस्ते

### एक. आकाश चिन्हे

१. (१) कलम २४४ च्या प्रयोजनांसाठी, "आकाश चिन्ह" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर किंवा बांधकामावर पूर्णत: किंवा अंशत: कोणताही स्तंभ, खांब, प्रमाणबरहुकूम चौकट किंवा अन्य आधार यांच्या आधाराने ठेवलेला किंवा त्यास जोडलेला जाहिरातीच्या घोषणेच्या किंवा निदेशनाच्या स्वरूपाचा कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, खूण किंवा प्रतिकृती असा असून असे आकाश चिन्ह किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही रस्त्यातील एखाद्या ठिकाणावरून आकाशात दिसले पाहिजे ; आणि या संज्ञेत अशा कोणत्याही स्तंभाचा, खांबाचा, प्रमाणाबरहुकूम चौकटीच्या किंवा अन्य आधाराचा आणि त्यांच्या प्रत्येक भागाचा समावेश होतो. तसेच, कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर किंवा बांधकामावर किंवा कोणत्याही रस्त्यावर कोणत्याही जाहिरातीच्या, घोषणेच्या किंवा निदेशाच्या प्रयोजनासाठी पूर्णत: किंवा अंशत: उपयोगात आणलेला कोणताही मोठा फुगा, हवाई छत्री किंवा तत्सम अन्य साधन यांचाही त्यात समावेश होतो.

आकाश चिन्हाची अर्थ उकल.

(२) आकाश चिन्हात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही :—

(अ) कोणताही ध्वजदंड, खांब, वात कुक्कुट किंवा पवन कुक्कुट – कोणतीही जाहिरात, घोषणा किंवा निदेशन यांच्या प्रयोजनासाठी पूर्णत: किंवा अंशत: योजण्यात किंवा वापरण्यात येत नसतील तर ;

(ब) कोणत्याही इमारतीच्या भिंतीच्या वरच्या टोकावर किंवा कठड्यावर, किंवा कोणत्याही भिंतीच्या कंगोऱ्यावर किंवा रोधक स्तरावर, किंवा छपराच्या कडेवर मजबूतपणे बसवलेले कोणतेही चिन्ह किंवा कोणताही फलक, चौकट किंवा अन्य साधन :

परंतु, असा फलक, चौकट किंवा अन्य साधन अखंड पातळीचे असले पाहिजे व खुले असता कामा नये आणि ते ज्यावर किंवा ज्याच्या आधारावर बसवलेले असेल अशा भिंतीच्या, कठड्याच्या किंवा कडेच्या कोणत्याही भागाच्या वर तीन फुटांपेक्षा अधिक उंच असता कामा नये ;

(क) केवळ रेल्वे प्रशासनाच्या कामकाजाशी संबंधित असलेला व रेल्वे प्रशासनाच्या मालकीचा कोणताही रेल्वेमार्ग, रेल्वे स्टेशन, आवार, फलाट किंवा स्टेशनकडे जाणारा मार्ग यांवर पूर्णत: लावलेला व कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पडणार नाही अशा रीतीने लावलेला, पूर्वोक्त असा कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, खूण किंवा प्रतिकृती ;

(ड) विकावयाच्या किंवा भाड्याने द्यावयाच्या जमिनीवर किंवा इमारतीवर, अशी जमीन किंवा इमारत विकण्यासंबंधी किंवा भाड्याने देण्यासंबंधी लावलेली कोणतीही नोटीस.

## दोन. रस्त्यांना नावे किंवा क्रमांक देणे आणि [1][जागांना] क्रमांक देणे

**२.** (१) आयुक्तास, वेळोवेळी,—

रस्त्यांना नावे किंवा क्रमांक देणे आणि [1][जागांना] क्रमांक देणे.

(अ) महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेमध्ये निहित असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा ज्या क्रमांकाने ओळखण्यात येईल ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

(ब) अशा रस्त्याच्या प्रत्येक टोकाजवळ, कोपऱ्यावर किंवा प्रवेशस्थानी किंवा त्याच्याजवळ असलेल्या कोणत्याही घराच्या ठळक भागावर आणि अशा रस्त्यावर अंतराअंतराने किंवा अशा रस्त्याच्या एखाद्या सोयीस्कर भागावर, अशा रस्त्याचे अशा रीतीने ठरवलेले नाव किंवा क्रमांक लावण्याची किंवा रंगवण्याची व्यवस्था करता येईल ;

(क) महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणाचे नाव दर्शवणाऱ्या योग्य पाट्या किंवा फलक लावण्याची किंवा रंगवण्याची व्यवस्था करता येईल ;

(ड) कोणतीही जागा किंवा अशा जागेचा कोणताही भाग ज्या क्रमांकावरून किंवा पोट-क्रमांकावरून ओळखण्यात येईल तो क्रमांक किंवा पोट-क्रमांक ठरवता येईल ;

[2][ (ई) लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही जागेच्या किंवा तिच्या भागाच्या मालकास, अशा जागेवर किंवा तिच्या भागावर अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा रीतीने क्रमांक किंवा पोट-क्रमांक दर्शवणारी धातूची पाटी लावण्याविषयी किंवा आयुक्ताच्या आदेशाखाली असे काम पार पाडण्यात यावे अशी आपली इच्छा असल्याबद्दल लेखी कळविण्याविषयी फर्मावता येईल ; ]

**स्पष्टीकरण.**— या पोट-नियमाच्या तरतुदी या कोणत्याही रस्त्याचे किंवा सार्वजनिक ठिकाणाचे नाव किंवा क्रमांक, किंवा कोणत्याही जागेचा किंवा तिच्या भागाचा क्रमांक, किंवा पोट-क्रमांक यांचे नवीकरण करण्याच्या बाबतीत, किंवा ते पुसून टाकण्याच्या बाबतीत किंवा विरूप करण्याच्या बाबतीत, असे नाव किंवा क्रमांक पहिल्यांदा लावण्याच्या किंवा रंगवण्याच्या बाबतीत अशा तरतुदी ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे लागू होतील.

(२) (अ) कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगिशिवाय किंवा अन्य कायदेशीर प्राधिकाराशिवाय असे कोणतेही नाव, क्रमांक किंवा पोट-क्रमांक नष्ट करता कामा नये, ते काढून टाकता कामा नयेत, विरूप करता कामा नयेत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यास क्षती पोचवता कामा नये किंवा त्यात फेरफार करता

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (२) (ई) अन्वये ''घरांना'' या शब्दाऐवजी हा शब्द, दाखल करण्यात आला.

२ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (२) (अ) अन्वये मूळ परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद, दाखल करण्यात आला.

कामा नये, [1][किंवा कोणताही क्रमांक किंवा पोट-क्रमांक लिहिलेली धातूची पाटी नादुरुस्त स्थितीत किंवा अन्यथा वाचता येणार नाही अशा स्थितीत राहू देण्यास परवानगी देता कामा नये किंवा ती तशा स्थितीत राहू देता कामा नये किंवा आयुक्ताच्या आदेशान्वये जे नाव किंवा जो क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावण्यात किंवा रंगवण्यात आला असेल त्यापेक्षा वेगळे असे कोणतेही नाव किंवा क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावता किंवा रंगवता कामा नये ] ;

(ब) कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय रस्त्याच्या कोणत्याही नावापासून किंवा क्रमांकापासून किंवा कोणत्याही जागेच्या किंवा तिच्या भागाच्या क्रमांकापासून किंवा पोट-क्रमांकापासून बारा इंचाच्या आत कोणतीही नोटीस किंवा फलक किंवा जाहिरात लावता किंवा चिकटवता कामा नये ; आणि आयुक्तास, त्याच्या परवानगीशिवाय चिकटवण्यात किंवा लावण्यात आलेली अशी कोणतीही नोटीस, फलक किंवा जाहिरात काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबद्दल येणारा खर्च अशा व्यक्तीने दिला पाहिजे ;

[2][ (क) कोणतीही व्यक्ती परिच्छेद (अ) किंवा (ब) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तर त्या व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर, वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.]

(३) पोट-नियम (१), परिच्छेद (ई) अनुसार आयुक्ताच्या आदेशान्वये कोणत्याही जागेवर किंवा तिच्या एखाद्या भागावर क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावण्यात आला असेल [3][ * * * ] तेव्हा, अशा कामाचा खर्च, आयुक्त वेळोवेळी ठरवील अशा दराने [4][जागेच्या मालकाने किंवा यथास्थिती जागेच्या भागाच्या मालकाने] दिला पाहिजे.

[5][**स्पष्टीकरण.—** या नियमातील "जागा" या संज्ञेत, ज्या जमिनीवर बांधकाम करण्यात आले नाही अशा जमिनींचा, तसेच, केवळ व्हरांडे, पक्के बांधलेले ओटे, जोते, दारापुढील पायऱ्या, भिंती, आवाराच्या भिंती, कुंपण किंवा तत्सम गोष्टी याचा समावेश होत नाही.]

---

१ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (२) (ब) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

२ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (२) (ब) (दोन) अन्वये हा परिच्छेद, दाखल करण्यात आला.

३ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (२) (क) (एक) अन्वये हे शब्द, वगळण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) (क) (दोन) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द, दाखल करण्यात आले.

५ वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) (ड) अन्वये स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

## तीन. खाजगी रस्त्यासंबंधी तरतुदी

कलम २१७ अन्वये नोटीस देणाऱ्या व्यक्तींकडून मागवता येईल अशी माहिती.

३. कलम २१८ च्या प्रयोजनांसाठी, आयुक्तास, कलम २१७ अन्वये नोटीस देणाऱ्या व्यक्तींकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही दस्तऐवज मागवता येतील :—

(एक) नियोजित खाजगी रस्त्याच्या अचूक नकाशांच्या व त्यांच्या भागांच्या दोन प्रती ; असे नकाशे व त्यांचे भाग हे, दहा फुटास दीड इंच यापेक्षा कमी नसेल असे आडवे प्रमाण धरून काढलेले असले पाहिजेत आणि त्यात, जमिनीच्या विद्यमान पृष्ठभागाची सपाटी ही तिच्या जवळील एखाद्या माहीत असलेल्या आधारसामग्रीच्या सपाटीच्या किती वर आहे ते, नियोजित नवीन रस्त्याची सपाटी व उताराचे प्रमाण, असा रस्ता ज्या रस्त्याशी जोडण्याचे योजले असेल त्या रस्त्याची सपाटी व उतार आणि ज्या रुंदीचा अनुक्रमे गाडीरस्ता व पायरस्ता करण्याचे योजले असेल त्या रुंदीचे प्रमाण या गोष्टी दर्शवलेल्या असल्या पाहिजेत ;

(दोन) उक्त रस्ता आणि त्याचे पदपथ बांधताना वापरावयाच्या सामग्रीचे तपशीलवार वर्णनासह विनिर्देश ;

(तीन) अशा रस्त्याच्या आणि बांधण्याचे योजलेल्या इमारतींच्या जलनि:सारणाचे नियोजित मार्ग, प्रत्येक नालीचा नियोजित आकार, खोली व उतार, आणि नालीत हवा खेळती राहण्यासाठी योजलेल्या व्यवस्थेचा तपशील या गोष्टी दर्शवणारा एक नकाशा ;

(चार) प्रत्येक इमारतीच्या भूखंडाचा आकार व क्षेत्रफळ आणि मोकळ्या जागांचा आकार दर्शवणारा नकाशा ;

(पाच) अशा व्यक्तींच्या अन्य जमिनीवर किंवा अशा जमिनीच्या आयुक्तास आवश्यक वाटेल इतक्या भागावर रस्ते, भूखंड आणि मोकळ्या जागा यांची आखणी करण्यासंबंधी योजना-नकाशे व त्यांचे भाग यांसह.

## प्रकरण बारा

## इमारत विनियम आणि इमारत कर्जे

अधिक माहिती देण्याविषयी व ज्या व्यक्तीने नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस उपस्थित राहण्याविषयी फर्मावता येईल.

१. (१) कलम २५३ किंवा कलम २५४ अन्वये देण्यात आलेली नोटीस किंवा पुरवण्यात आलेले दस्तऐवज यांमध्ये, एखाद्या प्रकरणावर समाधानकारक रीतीने कार्यवाही करण्यासाठी आयुक्तास जी माहिती आवश्यक वाटेल अशी सर्व माहिती नसेल तर, आयुक्तास, उक्त दस्तऐवज मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीद्वारे, त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी सविस्तर माहिती आणि तपशील सादर करण्याविषयी फर्मावता येईल.

(२) उक्त कालावधीत कोणत्याही वेळी, आयुक्तास लेखी नोटिशीद्वारे, ज्या व्यक्तीने नोटीस दिली आहे त्या व्यक्तीस नियोजित पायाचा कोणताही भाग किंवा कोणतेही भाग किंवा विद्यमान इमारतीच्या पायाचा किंवा भिंतींचा कोणताही भाग पाहणीसाठी उघडण्याविषयी फर्मावता येईल.

## नोटिशीचे नमुने

**२.** आयुक्ताने, कलम २५३ किंवा २५४ च्या प्रयोजनांसाठी असलेले नोटिशींचे छापील नमुने, ज्या कोणत्याही व्यक्तीस त्यांची आवश्यकता असेल अशा व्यक्तीस, तिने प्रत्येक नमुन्यासाठी, स्थायी समितीच्या मान्यतेने, आयुक्त याबाबत वेळोवेळी विहित करील अशी फी दिल्यावर, देण्याची व्यवस्था केली पाहिजे. नोटिशींचे छापील नमुने लोकांस पुरवणे.

**३.** कलम २५३ किंवा २५४ अन्वये कोणतीही नोटीस मिळाल्यावर किंवा नियम १ अन्वये अधिक माहिती मागवलेली असल्यास तशी अधिक माहिती मिळाल्यावर तीस दिवसांच्या आत आयुक्ताने नियम ५, पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) अन्वये आदेश दिला नाही किंवा ज्या व्यक्तीने उक्त नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस, तिने बांधण्याचे योजलेल्या इमारतीबद्दल किंवा पार पाडण्याचे योजलेल्या कामाबद्दल आपली अमान्यता लेखी कळवली नाही तर ; किंवा उक्त कालावधीच्या आत आयुक्ताने उक्त इमारतीबद्दल किंवा कामाबद्दल आपली मान्यता उक्त व्यक्तीस लेखी कळवली तर, उक्त व्यक्तीस, नियम ५, पोट-नियम (३) व (४) च्या तरतुदींस अधीन राहून, आयुक्तास नोटीस दिल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, नोटिशीत किंवा वर सांगितलेल्या दस्तऐवजांपैकी कोणत्याही दस्तऐवजात वर्णन केल्याप्रमाणे आपल्या उद्देशानुसार, परंतु या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होणार नाही अशा रीतीने ती इमारत किंवा ते काम सुरू करता येईल. इमारत किंवा बांधकाम केव्हा सुरू करता येईल.

**४.** (१) ज्या इमारतीच्या किंवा कामाच्या बाबतीत वर सांगितल्याप्रमाणे नोटीस देण्यात आली असेल अशी कोणतीही इमारत किंवा काम किंवा त्यांचा कोणताही भाग किंवा तपशील, या अधिनियमाच्या किंवा एखाद्या नियमाच्या किंवा उपविधीच्या एखाद्या तरतुदीचे त्यामुळे उल्लंघन होईल किंवा अशी इमारत किंवा काम असुरक्षित होईल या कारणांमुळे आयुक्त अमान्य करील तर, त्याने, नोटीस मिळाल्यापासून किंवा नकाशा, छेद, वर्णन किंवा नियम १ अन्वये अधिक माहिती मागवलेली असल्यास अशी अधिक माहिती मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, लेखी नोटिशीद्वारे, ज्या व्यक्तीने या नियमात यापूर्वी निर्दिष्ट करण्यात आलेली नोटीस प्रथम दिली असेल त्या व्यक्तीस आपली उक्त अमान्यता व त्याबद्दलची कारणे कळवली पाहिजेत आणि ज्या अटींच्या अधीन राहून, ती इमारत किंवा काम सुरू करता येईल त्या अटी विहित केल्या पाहिजेत किंवा काम सुरू करण्यात येऊ नये, असे कळवले पाहिजे. जी इमारत किंवा जे काम आयुक्ताने अमान्य केले असेल ती इमारत किंवा ते काम, अटींच्या अधीन राहून, सुरू करता येईल, किंवा सुरू करता कामा नये.

(२) ज्या व्यक्तीने अशा कोणत्याही इमारतींसंबंधी किंवा कामासंबंधी नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस, वर सांगितलेल्या अटींच्या अधीन राहून, परंतु अन्यथा नव्हे, तसे करण्याची स्पष्टपणे परवानगी देण्यात आली असेल तर, याबाबत तसे करण्याची स्पष्ट परवानगी समाविष्ट असलेली लेखी, नोटीस पोट-नियम (१) अन्वये तिला मिळाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी परंतु या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होणार नाही अशा रीतीने, अशी इमारत किंवा काम सुरू करता येईल.

विवक्षित परिस्थितीत नकाशांवर कार्यवाही करण्याचे काम रोखून ठेवण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**५.** (१) नियम ३ व ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या सार्वजनिक सुधारणांसाठी कोणत्याही इमारतीची किंवा कामाची जागा किंवा अशा जागेचा कोणताही भाग संपादन करणे आवश्यक होईल अशा सार्वजनिक सुधारणा करणे इष्ट व आवश्यक आहे असे आयुक्तास कोणत्याही बाबतीत दिसून येईल तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे, कलम २५३ किंवा कलम २५४ अन्वये दिलेल्या नोटिशीस अनुसरून, अशा नोटिशीच्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असा निदेश देता येईल.

(२) वर सांगितलेल्या कोणत्याही जागेच्या बाबतीत पुढील गोष्टींपैकी कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होण्याचा संभव आहे असे आयुक्तास कोणत्याही बाबतीत दिसून येईल तर, त्यास, तशाच प्रकारचा आदेश देता येईल :—

(अ) सार्वजनिक रस्त्याची नियमित रेषा विहित करणे ;

(ब) सार्वजनिक रस्त्याच्या विद्यमान नियमात रेषेऐवजी नवीन रेषा विहित करणे ;

(क) सार्वजनिक रस्ता वाढवणे किंवा त्यात फेरफार करणे ;

(ड) खाजगी रस्ता रुंद करण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची कोणतीही योजना.

(३) उक्त तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत पोट-नियम (१) मध्ये उल्लेख केलेल्या सार्वजनिक सुधारणा किंवा पोट-नियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट, पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) मध्ये उल्लेख केलेला परिणाम ज्यामुळे होईल अशा रीतीने पूर्णपणे अंमलात आणल्या गेल्या असतील तर, कलम २५३ किंवा कलम २५४ अन्वये दिलेली नोटीस रद्द झाली आहे, असे मानले जाईल.

(४) पोट-नियम (३) मध्ये समाविष्ट नसलेल्या कोणत्याही बाबतीत, कलम २५३ किंवा कलम २५४ अन्वये दिलेली नोटीस, पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीन महिन्यांचा कालावधी ज्या दिनांकास संपला असेल त्या दिनांकास नव्याने देण्यात आली आहे, असे मानले जाईल.

बांधकाम केव्हा सुरू करता येईल.

**६.** (१) कोणत्याही व्यक्तीने, पुढील गोष्टी करण्यात येईपर्यंत नवीन इमारत बांधण्यास किंवा कलम २५४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे कोणतेही काम पार पाडण्यास सुरुवात करता कामा नये :-----

(अ) अशी इमारत बांधण्याच्या किंवा असे काम पार पाडण्याच्या आपल्या उद्देशाविषयी, यात यापूर्वी फर्माविण्यात आल्याप्रमाणे, तिने नोटीस दिल्याशिवाय, आणि नियम ३ किंवा ४ मध्ये याबाबत विहित करण्यात आलेल्या कालावधीच्या आत, आयुक्ताकडून अशा इमारतीबद्दल किंवा कामाबद्दल त्याची मान्यता किंवा अमान्यता कळवण्यात येईपर्यंत :

परंतु, असा कालावधी मोजताना नियम ५ च्या तरतुदी विचारात घेतल्या पाहिजेत ;

(ब) काम सुरू करण्याच्या नियोजित दिनांकाबद्दल तिने शहर अभियंत्यास नोटीस देईपर्यंत :

परंतु, अशा रीतीने अधिसूचित करण्यात आलेल्या दिनांकापासून पूर्ण सात दिवसांच्या आत कामास सुरुवात झाली नाही तर, नोटीस देण्यात आली नव्हती, असे मानले जाईल ;

(क) कामावर लावलेल्या कामगारांसाठी आयुक्तास आवश्यक वाटेल अशी स्वच्छताविषयक व्यवस्था तिने करीपर्यंत ;

(ड) ते काम सुरू करण्यासाठी अनुक्रमे नियम ३ व नियम ४ मध्ये विहित करण्यात आलेला एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, किंवा असे काम एकदा सुरू केल्यानंतर ते तहकूब केल्याच्या किंवा बंद केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर.

(२) नियम ३ किंवा ४ अन्वये कोणतीही इमारत किंवा काम सुरू करण्याचा ज्या व्यक्तीस हक्क आहे अशी व्यक्ती, उक्त नियमांमध्ये अशी इमारत किंवा काम सुरू करण्यासाठी अनुक्रमे विहित करण्यात आलेल्या एक वर्षाच्या कालावधीच्या आत अशी इमारत किंवा काम सुरू करण्यात कसूर करील तर, तिला, नंतर कोणत्याही वेळी अशी इमारत बांधण्याच्या किंवा असे काम पार पाडण्याच्या आपल्या उद्देशाविषयी नवीन नोटीस देता येईल ; आणि त्यानंतर, यात यापूर्वी समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदी अशी नवीन नोटीस ही जणू अशा व्यक्तीच्या इराद्याविषयी देण्यात आलेली पहिली नोटीस आहे, असे समजून लागू होतील.

## संरचना, सामग्री इत्यादीसंबंधी तरतुदी

**७.** नव्याने बांधावयाच्या इमारतींच्या बाबतीत, त्यावेळी अंमलात असलेल्या उपविधींच्या तरतुदींशिवाय आणखी पुढील तरतुदी अंमलात येतील :— नव्याने बांधावयाच्या इमारतींसंबंधी तरतुदी.

(अ) आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने नवीन रस्ता समतल केलेला, खडी घालून पक्का केलेला किंवा फरसबंद केलेला, मलप्रणाल व नाली यांची तरतूद केलेला असल्याशिवाय आणि तसे करण्यात येईपर्यंत, अशा नवीन रस्त्याच्या कोणत्याही बाजूस अशी कोणतीही इमारत बांधणे आयुक्तास अमान्य करता येईल ;

(ब) शहराच्या ज्या कोणत्याही भागात, भविष्यकाळात आवश्यक असण्याचा संभव असलेल्या रस्त्यांची जागा व दिशा अद्याप निर्धारित करण्यात आली नसेल किंवा ठरवण्यात आली नसेल, किंवा ज्या भागात कलम २०५ अन्वये सार्वजनिक रस्ता आखणे इष्ट असल्याचे मानण्यात आले असेल, अशा कोणत्याही भागात अशी कोणतीही इमारत बांधणे हे, अशा इमारतीसाठी योजलेली जागा, आयुक्ताच्या मते, तिच्या जवळपास पूर्वीच असलेल्या इमारतींची, कोणत्याही असल्यास, जागा विचारात घेता, जवळपासच्या सर्व इमारतींचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तींच्या सोयीसाठी आणि जलनिस्सारण, पाणीपुरवठा व हवा खेळती राहण्याच्या प्रयोजनांसाठी सोयीस्कर असे एक किंवा अनेक नवीन रस्ते भविष्यकाळात बांधण्यास अडचण होणारी असेल तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या अनुमतीने, अशी इमारत बांधणे अमान्य करता येईल;

परंतु, ज्या व्यक्तीच्या इमारतीच्या बाबतीत अशा रीतीने अमान्य करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्तास लेखी नोटीस देऊन, तिच्या नियोजित इमारतीच्या जवळपासच्या भावी रस्त्याची किंवा कलम २०५ अन्वये योजलेल्या रस्त्याची जागा व दिशा ताबडतोब निर्धारित करण्यात व ठरवण्यात यावी अशी विनंती करता येईल आणि अशी विनंती केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत तिचे अनुपालन करण्यात आले नाही तर, अशा व्यक्तीस, तिच्या इमारतीस लागू असलेल्या या अधिनियमाच्या आणि नियमांच्या अन्य सर्व तरतुदींच्या अधीन राहून, अशी इमारत बांधण्यास सुरुवात करता येईल ;

(क) अशी कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग, हा ज्या कोणत्याही रस्त्याची जागा व दिशा आयुक्ताने स्थायी समितीच्या मान्यतेने निर्धारित केली असेल, परंतु जो प्रत्यक्षात बांधण्यात आला नसेल अशा रस्त्याच्या रेषेच्या आत किंवा नवीन सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत किंवा विद्यमान सार्वजनिक रस्त्याच्या वाढीची जी नियमित रेषा आखण्यास आयुक्तास कलम २०५ अन्वये प्राधिकृत करण्यात आले असेल अशा नियमित रेषेच्या आत येत असेल तर, आयुक्तास, शहरातील कोणत्याही भागात अशी कोणतीही इमारत बांधणे अमान्य करता येईल ;

(ड) जी कोणतीही जागा मलमूत्र किंवा जनावरांची प्रेते किंवा अन्य दुर्गंधियुक्त किंवा घाणेरडे पदार्थ यांनी भरलेली असेल किंवा असे पदार्थ साठविण्याची जागा म्हणून वापरण्यात येत असेल अशा कोणत्याही जागेवर, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने असे पदार्थ योग्य रीतीने काढून टाकण्यात येईपर्यंत किंवा ते अनुपद्रवी करण्यात येईपर्यंत, अशा कोणत्याही इमारतीचा पाया बांधता कामा नये ;

(ई) ओलसरपणा किंवा जागेची परिस्थिती यामुळे खबरदारी घेणे आवश्यक असेल तेव्हा, इमारतीच्या भूपृष्ठाखालील मातीतील पाणी परिणामकारक रीतीने काढून टाकले पाहिजे, आणि भूपृष्ठाखालील मातीतून उद्‌भवणाऱ्या ओलसरपणापासून इमारतीचे परिणामकारक रीतीने संरक्षण होईल अशी उपाययोजना करण्यास आयुक्तास फर्माविता येईल.

बाहेर पडण्यासाठी पुरेशा साधनांची तरतूद करणे.

८. (१) आग लागली असता सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी कोणत्याही इमारतीतून बाहेर पडण्याची साधने पुरेशी नाहीत, किंवा कोणत्याही कारणामुळे अपुरी झाली आहेत असे आयुक्ताचे मत असेल तेव्हा, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास, कोणताही विद्यमान जिना, ओसरी, मार्ग किंवा जिन्याचा टप्पा यात आयुक्त विहित करील अशा रीतीने व अशा सामग्रीने फेरफार करण्यास किंवा पुन्हा बांधण्यास, किंवा तो विहित करील अशा अधिक किंवा संकटकाली बाहेर पडण्यासाठी वापरावयाच्या जिन्यांची किंवा मार्गाची तरतूद करण्यास भाग पाडता येईल.

(२) प्रत्येक इमारतीचा प्रत्येक मजल्यावरील प्रत्येक जिना, जिन्याचा टप्पा, सपाटी किंवा सामाईक मार्ग अडथळाविरहित ठेवण्यात आला पाहिजे, आणि कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही इमारतीच्या कोणत्याही जिन्यात, जिन्याच्या टप्प्यात किंवा सामाईक मार्गात, लोकांनी उक्त इमारतीत प्रवेश करण्याच्या, इमारतीमधून जाण्याच्या किंवा इमारतीतून बाहेर पडण्याच्या मार्गात व्यत्यय येईल अशा रीतीने कोणतीही वस्तू राहू देता कामा नये.

(३) कोणत्याही इमारतीतील अशा कोणत्याही जिन्यात, जिन्यावरच्या सपाटीत किंवा सामाईक मार्गात कोणतीही वस्तू असणे, हे इमारतीच्या मालकाने किंवा भोगवटादाराने ती वस्तू त्या ठिकाणी ठेवली असल्याबद्दल किंवा राहू दिली असल्याबद्दल प्रथमदर्शनी पुरावा असेल.

## इमारती पूर्ण झाल्यावर त्यांची पाहणी करणे व त्यांचा भोगवटा करणे

इमारती पूर्ण झाल्यावर त्यांची पाहणी करणे व त्यांचा भोगवटा करणे.

९. कलम २६३ च्या प्रयोजनासाठी —

(अ) काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत निरीक्षणाचे काम सुरू करण्यात आले पाहिजे; आणि

(ब) आयुक्तास, असे पाहणीचे काम सुरू केल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, ज्या व्यक्तीकडून काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाली असेल त्या व्यक्तीच्या नावे लेखी सूचना देऊन व ती, अशा नोटिशीत नमूद करण्यात आलेल्या तिच्या पत्त्यावर पाठवून, किंवा अशा पत्त्याच्या अभावी, अशी नोटीस ज्या इमारतीसंबंधी असेल अशा इमारतीच्या एखाद्या ठळक जागी लावून,—

(एक) अशा इमारतीचा भोगवटा करण्यास किंवा अशा कामाचा परिणाम झालेली इमारत किंवा तिचा भाग वापरण्यास परवानगी देता येईल, किंवा

(दोन) या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा उपविधींच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होईल अशा रीतीने अशी इमारत उभारण्यात आली असेल किंवा असे काम पार पाडण्यात आले असेल तर त्या बाबतीत अशी परवानगी नाकारता येईल, किंवा

(तीन) कलम २२० अन्वये ठरवण्यात आलेला व निर्धारित करण्यात आलेला खाजगी रस्ता किंवा अशा इमारतीत प्रवेश करावयाचे अन्य मार्ग योग्य रीतीने बांधण्यात येईपर्यंत व ते आयुक्ताकडून मान्य करण्यात येईपर्यंत अशी परवानगी नाकारता येईल, किंवा

(चार) इमारतीची जागा किंवा यथास्थिती, तिच्या लगतची जागा, तेथील इमारतीची उरलेली सर्व सामग्री, दगड, विटा, माती, केरकचरा आणि इमारतीच्या प्रयोजनासाठी वापरलेली हत्यारे बाजूला करून, योग्य रीतीने साफ करण्यात आली नसेल तर अशी परवानगी नाकारता येईल.

आयुक्ताच्या परवानगी-शिवाय, इमारत ज्या प्रयोजनां-साठी बांधण्यात आली असेल याव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी तिचा वापर करता कामा नये.

**१०.** कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय, किंवा अशा परवानगीच्या अटींना धरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने,—

(अ) इमारतीचा जो कोणताही भाग मूलतः लोकांनी राहण्यासाठी म्हणून वापरण्यासाठी बांधण्यात आला नसेल किंवा त्या प्रयोजनासाठी वापरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आला नसेल असा भाग त्या प्रयोजनासाठी वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये ;

(ब) ज्या कोणत्याही इमारतीची, मूलतः लोकांना राहण्यासाठी वेगवेगळ्या अनेक खोल्या बनवण्याच्या उद्देशाने बांधलेली चाळ किंवा इमारत म्हणून वापरण्यासाठी रचना करण्यात आली नसेल किंवा तिचा तसा, उपयोग करण्याचे प्राधिकृत करण्यात आले नसेल अशा इमारतीचे अशा चाळीत किंवा इमारतीत रूपांतर करता कामा नये किंवा त्या प्रयोजनासाठी ती वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये ;

(क) जी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग मूलतः लोकांनी राहण्यासाठी म्हणून वापरण्यासाठी बांधण्यात आली असेल किंवा त्या प्रयोजनासाठी प्राधिकृत करण्यात आली असेल अशी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग गोदाम, वखार, कर्मशाळा, कारखाना, तबेला, मोटारघर, दुकान, गाळा, हाट किंवा बाजार यासाठी म्हणून वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये ;

(ड) जी कोणतीही विद्यमान इमारत मूलतः लोकांनी राहण्यासाठी म्हणून वापरण्यासाठी बांधण्यात आली असेल किंवा त्या प्रयोजनासाठी प्राधिकृत करण्यात आली असेल अशी इमारत गोदाम, वखार, कर्मशाळा, काम करण्याची जागा, कारखाना, तबेला, मोटारघर, दुकान, गाळा, हाट किंवा बाजार यासाठी म्हणून वापरण्याच्या प्रयोजनासाठी किंवा वापर करवून घेण्याच्या प्रयोजनासाठी अशा इमारतीत कोणतेही फेरफार करता कामा नयेत किंवा करवून घेता कामा नयेत ;

(ई) जी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग मूलत: गोदाम, वखार, कर्मशाळा, काम करण्याची जागा, कारखाना, तबेला, मोटारघर, दुकान, गाळा, हाट किंवा बाजार यासाठी म्हणून वापरण्यासाठी बांधण्यात आली नसेल किंवा त्या प्रयोजनासाठी वापरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आली नसेल अशी इमारत किंवा तिचा भाग अनुक्रमे अशा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये.

**स्पष्टीकरण .–** "चाळ" या संज्ञेचा अर्थ, स्वच्छताविषयक व अन्य सोयी सामाईक असलेले दोन किंवा अधिक गाळे असलेली इमारत, असा होतो. कोणतीही इमारत चाळ आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल.

इमारतीत जो कोणताही फेरफार केल्यामुळे कोणत्याही नियमाचे किंवा उपविधीचे उल्लंघन होईल असा फेरफार न करणे.

**११.** कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही विद्यमान इमारतीत जो कोणताही फेरफार केल्यामुळे या अधिनियमातील किंवा नियमातील किंवा उपविधीतील आवश्यक गोष्टींचे उल्लंघन होत असेल असा फेरफार, या अधिनियमान्वये असा फेरफार करण्यासाठी कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या परवानगीची किंवा मंजुरीची आवश्यकता नसली तरी, करता कामा नये.

इमारतींची छपरे व बाहेरील भिंती ज्वालाग्राही सामग्रीच्या असता कामा नयेत.

**१२.** (१) नियत दिवसापासून बांधलेली किंवा नवीकरण केलेली कोणतीही बाहेरील भिंत आणि कोणतेही छपराचे आच्छादन हे, आयुक्ताच्या लेखी परवानगीने असेल. त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, लाकूड, कापड, कॅन्व्हास, गवत, पाने, चटया, यांचे किंवा अन्य कोणत्याही ज्वालाग्राही सामग्रीचे असता कामा नये.

(२) कोणतीही बाहेरील भिंत किंवा छपराचे आच्छादन हे, नेमलेल्या दिवसापूर्वी अशी कोणतीही सामग्री वापरून बनवण्यात आले असेल तर, आयुक्तास, अशी भिंत किंवा छप्पर ज्या इमारतीचे असेल त्या इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास, लेखी नोटिशीद्वारे, अशी भिंत किंवा आच्छादन काढून टाकण्याविषयी फर्माविता येईल.

(३) पोट-नियम (१) अन्वये परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, किंवा पोट-नियम (२) अन्वये कोणतीही भिंत किंवा छप्पर काढून टाकण्याविषयी फर्मावण्यात आले नसेल तेव्हा, आयुक्तास लेखी आदेशाद्वारे, आगीचा धोका टाळण्यासाठी तो विनिर्दिष्ट करील अशी खबरदारी घेण्यास फर्मावता येईल.

**१३.** दोन किंवा अधिक वेगवेगळ्या गाळ्यांमध्ये विभागलेल्या इमारतीच्या किंवा इमारतीतील कोणत्याही जिन्यात, मार्गात किंवा खाजगी आवारात किंवा अशा इमारतीतील संडास किंवा मुत्र्या किंवा धुण्याच्या जागा यांच्या जवळच्या किंवा त्याच्याकडे जाण्याच्या जागेत रात्रीच्या वेळी दिवे लावण्याचे व असे दिवे विझवण्याचे कोणतेही साधन नसेल तर, किंवा अशा इमारतींच्या भोगवटा करणाऱ्या किंवा तीत कामावर असलेल्या व्यक्तींसाठी अशा कोणत्याही इमारतींच्या किंवा अशा इमारतीतील जिना, मार्ग, किंवा खाजगी आवार यात किंवा अशा इमारतीतील संडास किंवा मुत्र्या किंवा धुण्याच्या जागा यांच्या जवळच्या किंवा त्यांच्याकडे जाण्याच्या जागेत उपलब्ध असलेले दिवे लावण्याचे व असे कोणतेही दिवे विझवण्याचे विद्यमान साधन आयुक्ताच्या मते अपुरे असेल तेव्हा आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या मालकास,— जिना इत्यादींत रात्री दिवे लावणे.

(अ) जिन्यात, मार्गात किंवा खाजगी आवारात, किंवा संडास किंवा मुत्र्या किंवा धुण्याच्या जागा यांच्या जवळच्या किंवा त्यांच्याकडे जाण्याच्या जागेत, आयुक्त विहित करील अशा दिवे लावण्याच्या साधनांची किंवा दिवे लावण्याच्या जादा साधनांची तरतूद करण्याविषयी, ते बसवण्याविषयी व सुस्थितीत ठेवण्याविषयी, आणि आयुक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करील अशा वेळेपर्यंत ते दिवे चालू ठेवण्याविषयी फर्माविता येईल ;

(ब) त्याने पुरविणे आवश्यक असेल अशा, आवश्यक त्या दिव्यांची, ब्रॅकेटची आणि गॅस, वीज किंवा दिवे लावण्याच्या अन्य कोणत्याही साधनांचा आवश्यक तो पुरवठा करण्याची आणि कोणतेही दिवे विझविण्याची सर्व साधने पुरविण्याविषयी फर्माविता येईल.

(क) दिवे लावण्याच्या व ते विझवण्याच्या कोणत्याही विद्यमान साधनांऐवजी, आयुक्त विहित करील अशी, दिवे लावण्याची व ते विझवण्याची अन्य साधने बसवण्याविषयी फर्माविता येईल.

**१४.** याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणत्याही वेळी किंवा रात्री १० वाजेपर्यंत, नियम १३ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीतील अटींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करण्यात आले आहे किंवा कसे याविषयी खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही इमारतींत नोटिस न देता प्रवेश करता येईल. दिवसा किंवा रात्री इमारतींची पाहणी करणे.

## इमारती बांधण्यासाठी कर्जे

**१५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्तास, स्थायी समितीच्या पूर्व मंजुरीने,— राहण्यासाठी घरांची वाढ करण्याच्या प्रयोजनांसाठी कर्जे देण्याच्या आयुक्ताचा अधिकार.

(अ) समाजातील गरीब वर्गातील लोकांना उपयोग व्हावा या उद्देशाने, इमारती बांधणाऱ्या किंवा त्यात फेरफार करणाऱ्या किंवा इमारती बांधण्याचे काम किंवा त्यात फेरफार करण्याचे काम हाती घेणाऱ्या ;

(ब) ज्या बाबतीत, अशा दुरुस्तींचा खर्च किंवा अर्जदारांची आर्थिक स्थिती विचारात घेता असे साहाय्य देणे योग्य आहे असे आयुक्तास वाटेल अशा बाबतीत, अशा इमारतींची दुरुस्ती करणाऱ्या किंवा दुरुस्तीचे काम हाती घेणाऱ्या ;

व्यक्तींना किंवा व्यक्तीच्या संस्थांना कर्ज देता येईल.

(२) अशा कर्जाच्या रुपाने साहाय्य घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या संस्थांना, अशा रीतीने बांधावयाच्या, फेरफार करावयाच्या किंवा दुरुस्त करावयाच्या इमारतींच्या प्रतिभूतीवर गहाणाच्या रूपाने कर्ज मिळण्यासाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आयुक्ताकडे अर्ज करता येईल आणि आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी, चौकशी केल्यानंतर आणि पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्तींच्या व महानगरपालिका विहित करील अशा अन्य शर्तींच्या अधीन राहून, असे कर्ज देता येईल.

(३) असे प्रत्येक कर्ज, अन्य शर्तींबरोबर पुढील शर्तींच्या अधीन राहून देण्यात येईल :—

(अ) ज्या इमारतींच्या बाबतीत कर्ज द्यावयाचे असेल अशी इमारत बांधकामाचे, फेरफार करण्याचे किंवा दुरुस्ती करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर लोकांना राहण्यासाठी सर्व बाबतीत योग्य अशी झाली पाहिजे आणि ती पूर्णत: किंवा मुख्यत: राहण्याच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात आली पाहिजे ;

(ब) ज्या कालावधीच्या आत कर्जाची परतफेड केली पाहिजे तो कालावधी, इमारत बांधण्याचे, तीत फेरफार करण्याचे किंवा दुरुस्ती करण्याचे काम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून तीस वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(क) परतफेड करण्याचा कालावधी कोणताही असला तरी, कर्जाची रक्कम ही, इमारत (उपगृहे व त्यांच्याशी संबंधित कोणतीही अन्य कामे असल्यास ती धरून), बांधण्याच्या, तीत फेरफार करण्याच्या, किंवा दुरुस्ती करण्याच्या कामाच्या खर्चाच्या रकमेच्या साठ टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(ड) कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संस्थेच्या बाबतीत, कर्जाची एकूण रक्कम दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(ई) कर्जाची रक्कम व त्यावरील व्याज यासाठी प्रतिभूती म्हणून इमारत (उपगृहे व त्यांच्याशी संबंधित कोणतीही अन्य कामे असल्यास ती धरून), तसेच, ती ज्या जागेवर असेल ती जागा महानगरपालिकेच्या नावे गहाण ठेवण्यात आली पाहिजे, आणि त्यासाठी विहित करण्यात येतील अशा प्रसंविदा व शर्ती असतील ;

(फ) गहाण ठेवावयाच्या मालमत्तेत पट्टेदारीचा हितसंबंध असेल तेव्हा, असा हितसंबंध हा कर्जाच्या दिनांकास कर्जाच्या परतफेडीचा कालावधी संपल्यानंतर किमान दहा वर्षे शिल्लक राहील इतक्या कालावधीचा नसेल तर, कोणतेही कर्ज देता कामा नये.

## प्रकरण तेरा

### अग्निशामक पथकांच्या अधिकाऱ्यांचे अधिकार

आगीच्या ठिकाणी अग्निशामक पथकांच्या अधिकाऱ्यांचे अधिकार.

आगीच्या प्रसंगी अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिकाऱ्यांस किंवा अन्य कोणत्याही प्रभारी अधिकाऱ्यांस पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही कृती करता येतील :—

(अ) अग्निशामक पथकाच्या कामात आपल्या अस्तित्वाने ज्या व्यक्ती व्यत्यय आणत असतील अशा कोणत्याही व्यक्तींना घालवून देणे किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही अग्निशामक कर्मचाऱ्यांस किंवा अन्य अधिकाऱ्यांस किंवा व्यक्तीस अशा व्यक्तींना घालवून देण्याविषयी आदेश देणे ;

(ब) अशी आग विझवण्याच्या किंवा ती पसरू न देण्याच्या प्रयोजनासाठी, फारसे नुकसान न होऊ देता, कोणत्याही जागेत किंवा जागेमधून शिरणे किंवा तिचा कब्जा घेणे किंवा ती पाडून टाकणे याबाबतच्या अधिकारांचा वापर स्वत: किंवा आपल्या हाताखालील व्यक्तींद्वारे करून जीवित व मालमत्ता यांचे रक्षण करण्यासाठी इष्ट वाटतील असे कोणतेही उपाय सामान्यपणे योजणे ;

(क) ज्या क्षेत्रात आग लागली असेल त्या क्षेत्रात पाण्याचा अधिक पुरवठा व्हावा व तो अधिक दाबाने व्हावा म्हणून कोणत्याही क्षेत्रातील मुख्य नळातील व नळांमधील पाणी बंद करण्याची व्यवस्था करणे आणि अशी आग विझवण्याच्या व ती पसरू न देण्याच्या प्रयोजनासाठी उपलब्ध असेल अशा कोणत्याही ओढ्याचे, तलावाचे, टाकीचे, विहिरीचे, किंवा तळ्याचे पाणी वापरणे ;

(ड) आगीच्या जागेतील किंवा अशा जागेजवळील कोणताही रस्ता किंवा मार्ग बंद करणे ;

(ई) त्यास उचित वाटेल असे साहाय्य देण्याबद्दल कोणताही आगीचा बंब ताब्यात असलेल्या व्यक्तीस आदेश देणे ;

(फ) कोणताही लवचिक नळ किंवा अन्य उपकरणे नेण्यासाठी कोणत्याही जागेचा वापर करणे ;

(ग) जीवित किंवा मालमत्ता यांच्या रक्षणासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे कोणतेही उपाय सामान्यपणे योजणे.

## प्रकरण चौदा

## स्वच्छताविषयक तरतुदी

### मेहतरकाम आणि साफसफाई

धूळ इत्यादी गोळा करणे व टाकणे हे मालक व भोग-वटादाराचे कर्तव्य असेल.

१. (१) सर्व जागांच्या मालकांनी आणि भोगवटादारांनी आपापल्या जागेतील सर्व धूळ, राख, केरकचरा, कचरा आणि धंद्यातील केरकचरा गोळा करण्याची व्यवस्था करणे आणि आयुक्त जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी ठरवील अशा, वेळी अशा रीतीने आणि अशी खबरदारी घेऊन, तो तात्पुरता टाकण्यासाठी किंवा त्याची अंतिमरीत्या विल्हेवाट लावण्यासाठी कलम २९२ अन्वये पुरवलेल्या किंवा नेमून देण्यात आलेल्या सार्वजनिक कचऱ्याच्या डब्यात किंवा जागेत किंवा ठिकाणी टाकण्याची व्यवस्था करणे हे, त्यांचे अवश्य कर्तव्य असेल :

परंतु, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही जागेच्या भोगवटादारास आणि मालकास किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकास, उक्त जागेतील सर्व धूळ, राख, केरकचरा आणि कचरा – परंतु, धंद्यातील केरकचरा नव्हे – दररोज किंवा अन्यथा ठराविक काळाने गोळा करण्याची आणि उक्त जागेचा भाग असलेली जी कोणतीही जागा याबाबत आयुक्त नेमून देईल त्या जागेत तो टाकण्याची व्यवस्था करण्याविषयी फर्मावता येईल आणि त्याप्रमाणे उक्त वस्तू गोळा करण्याची व टाकण्याची व्यवस्था करणे हे उक्त भोगवटादाराचे आणि मालकाचे किंवा त्यांच्यापैकी कोणाचेही अवश्य कर्तव्य असेल.

(२) सर्व जागांच्या मालकांनी, अशा जागांतील गोळा करावयाची सर्व धूळ, राख, केरकचरा, कचरा आणि धंद्यातील केरकचरा डब्यात गोळा करण्यासाठी आयुक्त, लेखी नोटिशीद्वारे, वेळोवेळी निदेश देईल इतके व अशा जागी ठेवावयाचे, आयुक्ताने विहित करावयाच्या आकाराचे व सामग्रीचे, कचऱ्याचे डबे पुरवणे आणि असे कचऱ्याचे डबे सर्व वेळी चांगल्या दुरुस्त स्थितीत व सुस्थितीत ठेवणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य असेल.

(३) पोट-नियम (१) च्या आवश्यक गोष्टी पार पाडण्याच्या आणि त्यांचे अनुपालन करण्याच्या प्रयोजनासाठी नोकर कामावर लावण्याविषयी आयुक्ताकडून लेखी नोटिशीद्वारे फर्मावण्यात येईल तेव्हा तसे करणे हे देखील सर्व जागांच्या मालकांचे आणि भोगवटादारांचे किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाचे अवश्य कर्तव्य असेल.

मलमूत्र आणि घाण पदार्थ गोळा करणे आणि वाहून नेणे याबाबत भोगवटादारांनी केव्हा तरतूद केली पाहिजे.

**२.** शहराच्या ज्या कोणत्याही भागासाठी आयुक्ताने कलम १३१, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये जाहीर नोटीस दिली नसेल आणि ज्यामधील संडास किंवा शौचकूप नगरपालिका नालीशी जोडलेला नसेल अशा भागात असलेल्या कोणत्याही जागेच्या भोगवटादाराने, त्याच्या जागेवर जमा होणारे मलमूत्र आणि सर्व घाण पदार्थ गोळा करण्याची आणि ते, कलम २९२, खंड (घ) अन्वये या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या जवळच्या कचऱ्याच्या डब्यात किंवा जागेत, आयुक्त जाहीर नोटिशीद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा वेळी, अशा वाहनातून किंवा पात्रातून, अशा मार्गाने व अशी खबरदारी घेऊन वाहून नेण्याची व्यवस्था करणे, हे त्याचे अवश्य कर्तव्य असेल.

कोणतीही व्यक्ती केरकचरा इत्यादी काढून टाकण्यास बांधलेली असेल तेव्हा, तसे करण्यात कसूर करण्यास मनाई.

**३.** (अ) जी व्यक्ती धूळ, राख, केरकचरा, कचरा आणि धंद्यातील केरकचरा, किंवा मलमूत्र व घाण पदार्थ काढून टाकण्याची व्यवस्था करण्यास नियम १ किंवा नियम २ अन्वये बांधलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीने अशा वस्तू आपल्या जागेवर चोवीस तासांपेक्षा अधिक वेळ साचू देता कामा नये किंवा कचऱ्याच्या योग्य डब्याव्यतिरिक्त अन्य रीतीने त्या ठेवता कामा नयेत किंवा त्या प्रयोजनासाठी पुरविलेल्या किंवा नेमून दिलेल्या कचऱ्याच्या जागेत, डब्यात किंवा ठिकाणी त्या वस्तू हलवण्याची व्यवस्था करण्यात हयगय करता कामा नये ;

(ब) कोणत्याही व्यक्तीने, नियम १ अन्वये त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही जाहीर किंवा लेखी नोटिशीतील आवश्यक गोष्टींना धरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने कोणतीही धूळ, राख, केरकचरा, कचरा किंवा धंद्यातील केरकचरा, किंवा मलमूत्र किंवा कोणतीही घाण हलवता कामा नये किंवा मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ हलवण्यासाठी ज्या वाहनाला किंवा पात्राला आतील मलमूत्र किंवा घाण यांचा कोणताही भाग सांडण्यास किंवा त्याचा दुर्गंध पसरण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य असे आच्छादन नसेल असे कोणतेही वाहन किंवा पात्र वापरता कामा नये ;

(क) कोणत्याही व्यक्तीने, कोणतीही धूळ, राख, केरकचरा, कचरा किंवा धंद्यातील केरकचरा किंवा मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ हलवत असताना कोणत्याही रस्त्याच्या ज्या कोणत्याही भागावर अशा पदार्थाचा कोणताही भाग सांडेल तो रस्त्याचा भाग ताबडतोब पूर्णपणे झाडण्यात आणि तो केरकचरा पूर्णपणे हलवण्यात कसूर करता कामा नये ;

(ड) कोणत्याही व्यक्तीने, मलमूत्र किंवा दूषित पदार्थ हलवण्यासाठी कोणत्याही रस्त्यावर कोणतेही वाहन किंवा पात्र ठेवता कामा नये, किंवा वाजवीरीत्या आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक काळ कोणत्याही रस्त्यावर ते राहू देता कामा नये ;

(ई) कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही रस्त्यावर किंवा या प्रयोजनासाठी कलम २९२ अन्वये किंवा नियम १ अन्वये न पुरविलेल्या, नेमून देण्यात न आलेल्या कोणत्याही जागेत कोणतीही धूळ, राख, केरकचरा, कचरा किंवा धंद्यातील केरकचरा किंवा मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ टाकता किंवा ठेवता कामा नयेत ;

(फ) जी व्यक्ती कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशा इमारतीतून किंवा जमिनीतून कोणतीही घाण वाहू देता कामा नये, झिरपू देता कामा नये किंवा टाकू देता कामा नये, किंवा कोणत्याही व्यक्तीस उपद्रव होईल अशा रीतीने कोणतीही गोष्ट तीत किंवा तीवर ठेवता कामा नये किंवा ठेवू देता कामा नये, किंवा आपल्या जागेतील घाण किंवा कचरा टाकण्यासाठी असलेले संडासातील पात्र, किंवा अन्य कोणतेही पात्र किंवा जागा घाणेरड्या स्थितीत किंवा आरोग्यास अपायकारक होईल अशा स्थितीत हयगयीने राहू देता कामा नये.

नियम ३, [1][खंड (ड्.)] खालील अपराधी म्हणून कोणास गृहीत धरता येईल.

४. नियम ३, [1][खंड (ड्.)] चे उल्लंघन करून एखाद्या इमारतीतून किंवा जमिनीतून कोणत्याही रस्त्यावर किंवा जागेवर धूळ, राख, केरकचरा, कचरा किंवा धंद्यातील केरकचरा, किंवा मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ टाकण्यात किंवा ठेवण्यात आले आहेत असे कोणत्याही बाबतीत दाखवण्यात येईल तर, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, उक्त इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादाराने उक्त अपराध केला आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

जागांवर मोठ्या प्रमाणांत साचणारा कचरा व घाण हलवणे.

५. (१) जी कोणतीही व्यक्ती नियम १ अन्वये धूळ, राख, केरकचरा, कचरा, किंवा धंद्यातील केरकचरा गोळा करण्याची आणि टाकण्याची व्यवस्था करण्यास किंवा नियम २ अन्वये मलमूत्र व दूषित पदार्थ गोळा करण्याची आणि हलवण्याची व्यवस्था करण्यास बांधलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती आपल्या जागेवर अशी धूळ, केरकचरा, घाण इत्यादी चोवीस तासांपेक्षा अधिक वेळ साचू देईल किंवा कचऱ्याच्या योग्य डब्याव्यतिरिक्त अन्य रीतीने ते ठेवील किंवा त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या किंवा नेमून दिलेल्या कचऱ्याच्या डब्यात, जागेत किंवा ठिकाणी ते वाहून नेण्याची व्यवस्था करण्यात हयगय करील तर, आयुक्तास या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही चालू करण्याशिवाय आणखी, लेखी नोटिशीद्वारे, अशा व्यक्तीस अशा जागेवर साचलेली अशी सर्व धूळ, राख, केरकचरा, कचरा व धंद्यातील केरकचरा, किंवा मलमूत्र किंवा दूषित पदार्थ ताबडतोब गोळा करण्याविषयी आणि ते, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद केलेल्या रीतीने व अशा जागेत ताबडतोब काढून नेण्याविषयी फर्मावता येईल.

(२) अशा व्यक्तीने पोट-नियम (१) अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास, आयुक्तास, अशा जागेत साचलेली धूळ, राख, केरकचरा, कचरा आणि धंद्यातील केरकचरा किंवा मलमूत्र किंवा दूषित पदार्थ काढून नेण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा रीतीने काढून नेण्याच्या खर्चाबद्दल, आयुक्त स्थायी समितीच्या मंजुरीने ठरवील असा आकार अशा व्यक्तीने दिला पाहिजे.

---

१ मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये दाखल करण्यात आला.

कचरा किंवा घाण काढून नेण्याविषयी मालकाबरोबर किंवा भोगवटा-दाराबरोबर संविदा करणे.

**६.** आयुक्तास, कोणत्याही जागेतून कचरा किंवा घाण काढून नेण्याविषयी, काढून नेण्याची वेळ व कालावधी आणि अन्य बाबी यासंबंधी आयुक्तास योग्य वाटतील अशा अटीवर आणि महानगरपालिका ठरवील अशा दराने फी देण्यात आल्यावर अशा जागेच्या मालकाबरोबर किंवा भोगवटादाराबरोबर संविदा करता येईल.

## जागांची पाहणी, त्यांचे स्वच्छताविषयक नियमन

कोणत्याही जागेतून इमारतीची सामग्री काढून नेण्याविषयी फर्मावता येईल.

**७.** कोणत्याही जागेत किंवा जागेवर आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय कोणतीही कौले, दगड, वासे, इमारतीची सामग्री किंवा इमारतीच्या सामग्रीचे अवशेष हे, घुशी किंवा अन्य जीवजंतूचे आश्रयस्थान होईल किंवा त्यांची वाढ होण्याचे ठिकाण होईल किंवा उक्त जागेच्या भोगवटादारांना किंवा जवळ राहणाऱ्या व्यक्तींना धोका किंवा उपद्रव पोहचेल अशा परिमाणात किंवा प्रमाणात किंवा अशा रीतीने साठवण्यात किंवा जमवण्यात आले आहेत असे आयुक्तास दिसून आले तर, त्यास लेखी नोटिशीद्वारे, अशा जागेच्या मालकास किंवा त्यास अशा रीतीने साठवलेल्या किंवा जमा केलेल्या सामग्रीच्या किंवा अवशेषांच्या मालकास, ते काढून नेण्याविषयी किंवा त्याची विल्हेवाट लावण्याविषयी, किंवा त्याचा उपद्रव नाहीसा करण्यासाठी किंवा त्याचा पुनरुद्‌भाव होऊ नये म्हणून आयुक्ताच्या मते त्याची जी व्यवस्था करणे आवश्यक व इष्ट असेल अशी व्यवस्था करण्याविषयी फर्मावता येईल.

माल साठवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या बाबतीत, घुशी, इत्यादी विरुद्ध उपाययोजना करण्याविषयी फर्मावता येईल.

**८.** माल साठविण्यासाठी वापरण्यात येणारी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग हा, घुशी, उंदीर, किंवा ज्यांना प्लेग लवकर होतो असे अन्य प्राणी, किंवा अन्य जीवजंतू यांना आश्रय मिळेल अशा रीतीने वापरण्यात येत आहे असे आयुक्तास दिसून येईल तेव्हा, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, मालकास किंवा भोगवटादारास, घुशी, उंदीर किंवा अन्य प्राणी किंवा अन्य जीवजंतू यांचा नाश करण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे उपाय योजण्याविषयी किंवा ज्यामुळे अशा इमारतीच्या, किंवा इमारतींच्या भागाच्या भिंती व जमिनी अशा प्राण्यांचा उपद्रव होणार नाही इतक्या मजबूत होतील अशी कामे पार पाडण्याविषयी फर्मावता येईल.

सोडून दिलेल्या किंवा भोगवटा न केलेल्या जागा.

**९.** कोणतीही जागा सोडून दिल्यामुळे किंवा तिच्या मालकीसंबंधी वाद असल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे रिकामी किंवा भोगवटा न करता राहिली असेल आणि त्यामुळे ती टवाळखोरांचा अड्डा किंवा आयुक्ताच्या मते, उपद्रवकारक ठिकाण झाले असेल तर आयुक्तास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा जागेचा मालक माहित असेल आणि शहरात राहात असेल तर त्यास, किंवा जी कोणतीही व्यक्ती मालक असल्याचा दावा सांगणारी व्यक्ती म्हणून माहीत असेल किंवा समजण्यात येत

असेल आणि ती शहरात राहत असेल तर त्या व्यक्तीस, लेखी नोटीस देता येईल, आणि त्याने उक्त नोटिशीची एक प्रत उक्त जागेच्या ठळक ठिकाणी लावली पाहिजे व अशा नोटिशीद्वारे, उक्त जागेत कोणतीही संपत्ती, अधिकार किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना, उक्त जागा वर सांगितल्याप्रमाणे टवाळखोरांचा अड्डा होण्यास किंवा उपद्रवकारक ठिकाण म्हणून राहण्यास प्रतिबंध होण्यासाठी आयुक्ताच्या मते तिच्यासंबंधी जी व्यवस्था करणे आवश्यक असेल अशी व्यवस्था करण्याविषयी फर्मावले पाहिजे.

दुर्लक्षित जागा किंवा खाजगी रस्ते.

**१०.** (१) कोणत्याही जागेत आरोग्यास अपायकारक किंवा जवळ राहणाऱ्या रहिवाशांना उपद्रवकारक अशा वनस्पती, झाडे किंवा झुडपे वाढलेली आहेत, किंवा ती जागा अन्यथा अपायकारक किंवा घाणेरड्या स्थितीत आहे, किंवा ती योग्य रीतीने बंद न केल्यामुळे लोक नैसर्गिक विधी करण्यासाठी तिचा उपयोग करत आहेत, किंवा तिच्यामुळे जवळ राहणाऱ्या रहिवाशांना अन्यथा उपद्रव होत आहे असे आयुक्तास दिसून येईल तर, त्यास लेखी नोटिशीद्वारे, अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास ती जागा साफ करण्याविषयी, स्वच्छ करण्याविषयी व बंद करण्याविषयी फर्मावता येईल, किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने, आयुक्तास त्या जागेसंबंधी जी अन्य व्यवस्था करणे आवश्यक वाटेल अशी व्यवस्था करण्याविषयी त्यास फर्मावता येईल.

(२) कोणत्याही खाजगी रस्त्यावर अपायकारक किंवा उपद्रवकारक वनस्पती वाढल्या आहेत किंवा ती जागा अन्यथा अपायकारक किंवा घाणेरड्या स्थितीत आहे असे आयुक्तास दिसून येईल तर, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, उक्त रस्त्यासमोर किंवा रस्त्यालगत असलेल्या किंवा अशा रस्त्यावर असलेल्या निरनिराळ्या जागांच्या मालकांना तो रस्ता साफ करण्याविषयी किंवा स्वच्छ करण्याविषयी फर्मावता येईल, किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने, आयुक्तास त्या रस्त्यासंबंधी जी अन्य व्यवस्था करणे आवश्यक वाटेल अशी व्यवस्था करण्याविषयी त्यांना फर्मावता येईल :

परंतु, यातील कोणत्याही मजकुरामुळे कलम २९० च्या तरतुदींना बाध येणार नाही.

(३) वर सांगितल्याप्रमाणे अशा जागेची किंवा रस्त्याची अपायकारक किंवा घाणेरडी स्थिती ही, किंवा त्यापासून होणारा उपद्रव हा, नगरपालिका नाली किंवा तिला जोडलेली उपसाधने यातून घाण वाहत असल्यामुळे किंवा त्यात कोणताही दोष असल्यामुळे होत असेल तर, तितक्या मर्यादेपर्यंत अशी जागा किंवा रस्ता साफ करणे हे आयुक्ताचे अवश्य कर्तव्य असेल.

सदोष छपरामुळे किंवा तळ-मजल्याच्या पृष्ठभागातून किंवा भिंतीतून उत्पन्न होणाऱ्या ओलाव्यामुळे होणारा उपद्रव.

**११.** (१) कोणतीही इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग हा, तिच्या छपरातून किंवा तिच्या छपराच्या कोणत्याही भागातून पावसाचे पाणी गळत असल्यामुळे किंवा तिच्या तळमजल्याच्या पृष्ठ भागातून किंवा तिच्या भिंतीतून उत्पन्न होणाऱ्या ओलाव्यामुळे उपद्रव होत आहे किंवा उपद्रव होण्याचा संभव आहे अशा स्थितीत आहे असे आयुक्तास दिसून येईल तर, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या मालकास, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत आणि विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजून व अशी कृत्ये करून उपद्रव बंद करण्याविषयी किंवा तो पुन्हा होऊ न देण्याविषयी फर्मावता येईल.

(२) त्यानंतर कोणत्याही वेळी, असा उपद्रव पुन्हा होऊ शकेल असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास, इमारतीच्या मालकाने पोट-नियम (१) अन्वये मूळचा उपद्रव बंद केला असेल तरीही, उक्त मालकास आणखी लेखी नोटीस देऊन तिच्याद्वारे, संभाव्य उपद्रव नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीच्या आत व विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीने बंद करण्याविषयी फर्मावता येईल.

(३) ज्याच्या कृत्यामुळे, कसुरीमुळे किंवा ज्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा उपद्रव उद्‌भवला असेल किंवा चालू असेल असा इमारतीचा मालक माहीत नसेल किंवा सापडत नसेल तर, आयुक्तास, असा उपद्रव बंद करण्यासाठी किंवा तो पुन्हा उद्‌भवू न देण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असतील असे उपाय योजता येतील किंवा असे काम पार पाडण्याची किंवा अशा गोष्टी करण्याची व्यवस्था करता येईल.

राहण्याच्या जागेसंबंधी विवरणपत्र मागवण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**१२.** (१) इमारतीच्या मालकाने आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसांच्या कालावधीच्या आत अशा इमारतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत पुढील तपशील असलेले एक प्रमाणपत्र स्वत:च्या सहीने दिले पाहिजे :—

(अ) इमारतीमधील खोल्यांची एकूण संख्या,

(ब) प्रत्येक खोलीची लांबी, रुंदी व उंची; आणि

(क) त्याने उक्त इमारत, किंवा स्वतंत्र गाळा म्हणून भोगवटा करण्यात येत असलेला त्या इमारतीचा प्रत्येक भाग ज्या व्यक्तीस भाड्याने दिला असेल त्या व्यक्तीचे नाव.

(२) इमारतीच्या भोगवटादाराने किंवा स्वतंत्र गाळा म्हणून इमारतीच्या कोणत्याही भागाचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीने, वरीलप्रमाणे नोटीस मिळाल्यानंतर आणि वरील कालावधीच्या आत, वर सांगितल्याप्रमाणे त्याच्या भोगवट्यात असलेल्या इमारतीच्या बाबतीत किंवा इमारतीच्या भागाच्या बाबतीत, पुढील तपशील असलेले एक प्रमाणपत्र स्वत:च्या सहीने दिले पाहिजे :—

(अ) इमारतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या,

(ब) दिवसा व रात्री प्रत्येक खोली वापरण्याची रीत; आणि

(क) झोपण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक खोलीचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीची संख्या, स्त्री किंवा पुरुष व वय.

राहत्या घरांतील स्वयंपाक घरांच्या धुरामुळे होणारा उपद्रव.

**१३.** (१) राहत्या घरातील स्वयंपाकघराचे कोणतेही धुराडे हे, त्यामधून निघणाऱ्या धुरामुळे उपद्रव होईल अशा स्थितीत आहे असे आयुक्तास कोणत्याही वेळी दिसून येईल तर, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या मालकास, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत आणि विनिर्दिष्ट करण्यात येतील, असे उपाय योजून व अशी कृती करून उपद्रव बंद करण्याविषयी किंवा तो पुन्हा होऊ न देण्याविषयी फर्मावता येईल.

(२) कोणत्याही राहत्या घरामध्ये कोणत्याही धुराड्याच्या तरतुदीच्या अभावी स्वयंपाकघरातील धुरामुळे उपद्रव निर्माण होत आहे असे आयुक्तास कोणत्याही वेळी दिसून येईल तर, त्यास, लेखी नोटिशीद्वारे मालकास असा उपद्रव बंद करण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजण्याविषयी आणि अशी कृती करण्याविषयी फर्मावता येईल.

(३) ज्याच्या कृतीमुळे, कसुरीमुळे किंवा ज्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा उपद्रव उद्‌भवला असेल किंवा चालू असेल असा इमारतीचा मालक माहीत नसेल किंवा सापडत नसेल तर, आयुक्तास, असा उपद्रव बंद करण्यासाठी किंवा तो पुन्हा उद्‌भवू न देण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असे उपाय योजता येतील किंवा असे काम पार पाडण्याची किंवा अशा गोष्टी करण्याची व्यवस्था करता येईल.

**१४.** कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर दगडी कोळसा, कोळसा, राख, निखारे, पोती, लोकर, कापूस किंवा कोणतीही सामग्री साठवल्यामुळे, जमा केल्यामुळे किंवा ठेवल्यामुळे, किंवा असा दगडी कोळसा, कोळसा, राख, निखारे, किंवा सामग्री चाळल्यामुळे, फोडल्यामुळे, त्याचे तुकडे केल्यामुळे किंवा ते जाळल्यामुळे किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया केल्यामुळे त्यामधून बाहेर पडणारी धूळ, हवेत उडणारे कण, धूर दुर्गंध किंवा आवाज यामुळे किंवा अन्यथा, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या जवळपासच्या रहिवाशांना उपद्रव होत आहे किंवा उपद्रव होण्याचा संभव आहे असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास, नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास असा उपद्रव बंद करण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजण्याविषयी फर्मावता येईल.

धूळ, धूर, इत्यादीमुळे उपद्रव बंद करणे.

**१५.** (१) या नियमाच्या प्रयोजनासाठी, उपद्रव या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

उपद्रवकारक असतील अशी डबकी, इत्यादी भरून काढणे.

(अ) कोणतेही डबके, दलदल, चर, तलाव, विहीर, तळे, खाणीचा खड्डा, नाली, जलप्रवाह किंवा कोणतेही साचलेले पाणी ;

(ब) इमारतीच्या आतील किंवा बाहेरील, कोणतीही पाण्याची टाकी किंवा अन्य पात्र, किंवा पावसाळ्यात पावसाचे पाणी जमा होऊ शकेल अशी कोणतीही वस्तू किंवा गोष्ट ;

(क) ज्यावर पाणी साचते किंवा साचू शकेल अशी कोणतीही जमीन ;

(ड) आयुक्ताच्या मते डासांचे उत्पत्तिस्थान आहे किंवा होण्याचा संभव आहे, किंवा अन्य कोणत्याही बाबतीत, कलम २, खंड (४०) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे उपद्रवकारक आहेत अशा भोगवट्यात असलेल्या किंवा भोगवट्यात नसलेल्या किंवा बांधण्यात, पुन्हा बांधण्यात किंवा पाडण्यात येत असलेल्या कोणत्याही जागा किंवा कोणत्याही जागेचा कोणताही भाग.

(२) जिच्या कृतीमुळे, कसुरीमुळे किंवा जिने दुर्लक्ष केल्यामुळे उपद्रव उद्‌भवला असेल, होत असेल किंवा चालू असेल किंवा उद्‌भवण्याचा संभव असेल अशा व्यक्तीस, आणि ज्या जमिनीवर, इमारतीत किंवा जागेत उपद्रव उद्‌भवला असेल, होत असेल किंवा चालू असेल किंवा उद्‌भवण्याचा संभव असेल अशा जमिनीच्या, इमारतीच्या किंवा जागेच्या मालकास, पट्टेदारास व भोगवटादारास, किंवा अशा व्यक्तीपैकी, मालकापैकी, पट्टेदारापैकी व भोगवटादारापैकी कोणाही एकास किंवा अधिक व्यक्तींना, लेखी नोटिशींद्वारे, आयुक्त अशा नोटिशीत विहित करील अशा कालावधीच्या आत आणि अशा रीतीने असे उपाय योजून व असे काम पार पाडून असा उपद्रव दूर करण्याविषयी, बंद करण्याविषयी किंवा नाहीसा करण्याविषयी आयुक्तास फर्मावता येईल.

(३) तसेच, आयुक्तास अशा व्यक्तीस, मालकास, पट्टेदारास आणि भोगवटादारास, किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकास किंवा अधिक व्यक्तींना पोट-नियम (२) अन्वये कोणतीही नोटीस देऊन किंवा अन्य नोटीस देऊन त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकास किंवा अधिक व्यक्तींना उपद्रव पुन्हा उद्‌भवू नये म्हणून आवश्यक व अपरिहार्य असतील असे सर्व उपाय योजण्याविषयी फर्मावता येईल आणि त्यास तसे करणे इष्ट वाटले तर, त्या प्रयोजनासाठी पार पाडावयाचे कोणतेही काम किंवा करावयाच्या कोणत्याही उपाययोजना विनिर्दिष्ट करता येतील, आणि असा उपद्रव नाहीसा किंवा दूर करण्यात आला असला तरीही, तो पुन्हा उद्‌भवण्याचा संभव आहे असे त्यास वाटेल तर, त्यास अशी कोणतीही आणखी नोटीस देता येईल :

परंतु, अशी कोणतीही नोटीस दिल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना अशी नोटिस देण्यात आली असेल अशा व्यक्तीने किंवा व्यक्तींनी अशा नोटिशीत समाविष्ट असलेल्या आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यामुळे उपद्रव पुन्हा उद्‌भवेल तर, अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, आणखी कोणतीही नोटीस न देता, या नियमाखालील अपराधांसाठी तरतूद करण्यात आलेल्या शास्तीस पात्र असतील.

(४) कोणतीही जागा किंवा कोणत्याही जागेचा कोणताही भाग बांधण्याच्या, पुन्हा बांधण्याच्या किंवा पाडण्याच्या संबंधात उपद्रव उद्‌भवला असेल, किंवा होत असेल किंवा उद्‌भवण्याचा किंवा पुन्हा उद्‌भवण्याचा संभव असेल तेव्हा, आयुक्तास, पोट-नियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही एका किंवा अधिक व्यक्तींना नोटीस देण्याशिवाय आणखी कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञास, सर्वेक्षकास, कंत्राटदारास किंवा असे बांधण्याचे, पुन्हा बांधण्याचे किंवा पाडण्याचे काम पार पाडण्यासाठी कामावर लावलेल्या अन्य व्यक्तीस आणि तसेच, अशा कंत्राटदाराने किंवा अन्य व्यक्तीने कामावर लावलेल्या कोणत्याही दुय्यम कंत्राटदारास, किंवा असा कंत्राटदार, व्यक्ती आणि दुय्यम कंत्राटदार यांच्यापैकी कोणाही एका किंवा अधिक व्यक्तींना अशी कोणतीही नोटीस देता येईल.

(५) कोणत्याही जागेतील छपरावरील पन्हाळी, त्यात पाणी साचल्यामुळे डासांचे उत्पत्तिस्थान होण्याचा संभव असेल तर, अशा छपरावरील पन्हाळींचे नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याकडून निरीक्षण करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही व्यक्तीस, मालकास, पट्टेदारास, व भोगवटादारास किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही एका किंवा अधिक व्यक्तींना ( कायम बसवलेल्या किंवा काढता येणाऱ्या अशा ) शिडीची किंवा शिड्यांची तरतूद करण्याविषयी फर्मावता येईल.

(६) पोट-नियम (२) किंवा पोट-नियम (३) अन्वये देण्यात आलेल्या आदेशान्वये ज्या कोणत्याही व्यक्तीस एखादी विहीर भरून काढण्याविषयी, तिच्यावर आच्छादन घालण्याविषयी किंवा तिच्यातील पाणी काढून टाकण्याविषयी फर्मावण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, त्याच्या अनुपालनासाठी विहित करण्यात आलेल्या मुदतीच्या आत अशा आदेशाविरुद्ध लेखी हरकती आयुक्तास सादर करील तर, आयुक्ताने, अशा हरकती स्थायी समितीस कळवल्या पाहिजेत आणि त्याबाबतीत आणखी चौकशी केली पाहिजे, आणि त्याने, अशा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करण्यात आल्याबद्दल, स्थायी समितीच्या मान्यतेने असेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत, कलम ४८१ अन्वये कोणताही खटला भरता कामा नये ; परंतु, अशा आदेशानुसार फर्मावण्यात आलेले काम पार पाडणे तातडीचे व महत्त्वाचे आहे असे आयुक्तास वाटेल तर, त्यास, कलम ४७९ अनुसार खटला भरता येईल, आणि उक्त विहीर कायमची भरून काढण्यात यावी, आच्छादित करण्यात यावी किंवा अन्यथा तिची व्यवस्था करण्यात यावी किंवा कसे या प्रश्नावर स्थायी समिती निर्णय देईपर्यंत डासांचा शिरकाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी आयुक्तास, अशा विहिरीवर मजबूत आच्छादन घालण्याची व्यवस्था करता येईल, आणि अशा प्रत्येक बाबतीत, आयुक्ताने, स्थायी समितीच्या मान्यतेने, वर सांगितल्याप्रमाणे आधीच करण्यात आलेल्या कोणत्याही कामाचा खर्च अशा व्यक्तीने दिला पाहिजे की, आयुक्ताने नगरपालिका निधीतून दिला पाहिजे, की त्या दोघांनी विभागून दिला पाहिजे हे, आणि तो अशा रीतीने विभागून द्यावयाचा असेल तर, कोणत्या प्रमाणात विभागून दिला पाहिजे हे, ठरवले पाहिजे.

**१६.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय कोणतीही नवीन विहीर, तलाव, तळे, हौद किंवा कारंजे खोदता किंवा बांधता कामा नये. नवीन विहीर इत्यादीसाठी परवानगी.

(२) अशा परवानगीशिवाय असे कोणतेही काम सुरू करण्यात आले असेल किंवा पूर्ण करण्यात आले असेल तर, आयुक्तास,—

(अ) लेखी नोटिशीद्वारे, मालकास किंवा ज्या अन्य व्यक्तीने असे काम केले असेल त्या व्यक्तीस, आयुक्त विहित करील अशा रीतीने असे काम भरून काढण्याविषयी किंवा पाडून टाकण्याविषयी फर्मावता येईल; किंवा

(ब) असे काम राहू देण्याविषयी लेखी परवानगी देता येईल ; परंतु, अशा परवानगीमुळे अशा मालकास, पोट-नियम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध करण्यात येणाऱ्या कार्यवाहीतून सूट मिळणार नाही.

**१७.** (१) पुरेशी दुरुस्ती, संरक्षण किंवा कुंपण नसल्यामुळे कोणताही तलाव, तळे, विहीर, खड्डा, ओढा, बांध, किनारा किंवा अन्य जागा जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस किंवा जवळपास राहणाऱ्या व्यक्तींना धोकादायक अशी आहे असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, त्यापासून कोणताही धोका होऊ नये म्हणून तो भरून काढण्याविषयी, काढून टाकण्याविषयी, दुरुस्त करण्याविषयी, सुरक्षित ठेवण्याविषयी किंवा तिला कुंपण घालण्याविषयी मालकास फर्माविता येईल. धोकादायक तलाव, विहीर, खड्डे इत्यादींच्या बाबतीत खबरदारी.

(२) आयुक्ताच्या मते तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक असेल तर, त्यास, अशी नोटीस देण्यापूर्वी किंवा नोटिशीची मुदत संपण्यापूर्वी धोका होऊ नये म्हणून त्यास योग्य वाटतील असे तात्पुरते उपाय योजता येतील, आणि तसे करण्याचा खर्च मालकाने दिला पाहिजे.

**१८.** (१) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, ज्यातील पाणी पिण्यासाठी, स्नानासाठी किंवा कपडे धुण्यासाठी वापरण्यात येत असेल अशा कोणत्याही खाजगी जलप्रवाहाच्या, झऱ्याच्या, तलावाच्या, विहिरीच्या किंवा अन्य जागेच्या मालकास किंवा तीवर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीस, तो जलप्रवाह, झरा, इत्यादी चांगल्या प्रकारे दुरुस्त स्थितीत ठेवण्याविषयी, आयुक्त निदेश देईल अशा रीतीने स्वच्छ करण्याविषयी, आणि नोटिशीत तरतूद करण्यात येईल अशा रीतीने पृष्ठभागावरील सांडपाण्याने किंवा अन्य पदार्थांनी दूषित होण्यापासून सुरक्षित राखण्याविषयी फर्माविता येईल. ज्यातील पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असेल असा कोणताही खाजगी जलप्रवाह, झरा, तलाव, विहीर, इत्यादी स्वच्छ करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

(२) ज्या कोणत्याही खाजगी तलावाचे, विहिरीचे किंवा अन्य जागेचे पाणी, यथास्थिती, पिण्यासाठी, स्नानासाठी किंवा कपडे धुण्यासाठी वापरण्यात येत असेल, त्या तलावाचे, विहिरीचे किंवा अन्य जागेचे पाणी त्या प्रयोजनांसाठी अयोग्य आहे, असे आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध करण्यात, आले तर, आयुक्तास, नोटिशीद्वारे, मालकास किंवा असा तलाव, विहीर इत्यादींवर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीस –

(अ) असे पाणी वापरण्यापासून किंवा वापरण्यास परवानगी देण्यापासून परावृत्त होण्यास, किंवा

(ब) अशी जागा बंद करण्याविषयी किंवा भरून काढण्यास, किंवा पक्क्या भिंतीने किंवा कुंपणाने ती परिवेष्टित करण्यास ;

फर्माविता येईल.

सार्वजनिक विहीर किंवा साचलेल्या पाण्याचे डबके यांच्या बाबतीत आयुक्ताचे कर्तव्य.

**१९.** कोणतीही सार्वजनिक विहीर किंवा साचलेल्या पाण्याचे डबके आरोग्यास अपायकारक किंवा जवळपास राहणाऱ्या लोकांस त्रासदायक होण्याचा संभव आहे असे आयुक्तास दिसून येईल तर, त्यास, ती विहीर किंवा ते डबके स्वच्छ करण्याची, किंवा ते भरून काढण्याची व्यवस्था करता येईल.

धोकादायक असे खाणीचे काम बंद करता येईल.

**२०.** कोणत्याही खाणीचे काम किंवा कोणत्याही जागेतून दगड, माती किंवा इतर पदार्थ काढून नेण्याचे काम हे, आयुक्ताच्या मते, त्या खाणीच्या किंवा जागेच्या जवळपास राहणाऱ्या किंवा त्यामधून जाण्याचा कायदेशीर हक्क असणाऱ्या व्यक्तींना धोकादायक असे असेल किंवा त्यापासून उपद्रव होत असेल किंवा उपद्रव होण्याचा संभव असेल तर, आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, लेखी नोटिशीद्वारे, उक्त खाणीच्या किंवा जागेच्या मालकास, त्या खाणीचे काम किंवा अशा जागेतून दगड, माती किंवा इतर पदार्थ काढून नेण्याचे काम बंद करण्याविषयी, किंवा अशा खाणीपासून किंवा जागेपासून होणारा धोका न होऊ देण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्यापासून होणारा किंवा होण्याचा संभव असलेला उपद्रव बंद करण्याच्या प्रयोजनासाठी अशा खाणीच्या किंवा जागेच्या बाबतीत आयुक्तास आवश्यक वाटेल अशी व्यवस्था करण्याविषयी फर्मावता येईल.

झाडे, झुडपे, आणि कुंपणे काढून टाकणे आणि छाटणे.

**२१.** (१) आयुक्ताच्या मते,—

(अ कोणतेही कुंपण कोणत्याही वेळी पुरेसे कापलेले किंवा छाटलेले नसेल किंवा त्यावर काटेरी झाडे किंवा अन्य वनस्पती माजल्या असतील ;

(ब) कोणतेही झाड किंवा झुडूप सार्वजनिक सुरक्षिततेस धोका पोचेल अशा रीतीने पडले असेल किंवा पडण्याचा संभव असेल किंवा कोणत्याही रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना गैरसोयीचे किंवा धोकादायक होईल अशा रीतीने अशा रस्त्यावर किंवा रस्त्यावरील दिव्यावर लोंबकळत असेल किंवा अडथळा आणत असेल ;

(क) कोणत्याही जागेत असलेले कोणतेही झाड पडले असेल किंवा असे कोणतेही झाड किंवा त्याची कोणतीही फांदी किंवा फळ पडण्याचा संभव असेल आणि अशा जागेचा भोगवटा करणाऱ्या, तेथे येणाऱ्या किंवा जागेमधून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, किंवा त्या जागेच्या जवळपासच्या कोणत्याही बांधकामास किंवा ठिकाणास कोणत्याही रीतीने धोक्याचे असेल ; किंवा

(ड) कोणत्याही जागेत असलेल्या कोणत्याही झाडामुळे अशा जागेचा किंवा जवळपासच्या कोणत्याही जागेचा भोगवटा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस गैरसोय किंवा उपद्रव होत असेल किंवा होण्याचा संभव असेल ;

तर, आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, ज्या जमिनीवर असे कुंपण, झाड किंवा झुडूप असेल किंवा वाढत असेल अशा जमिनींच्या मालकास किंवा भोगवटादारास,—

(एक) असे कुंपण चार फुटांपेक्षा अधिक उंच राहणार नाही आणि तीन फुटांपेक्षा अधिक रुंद राहणार नाही अशा रीतीने कापण्याविषयी, आणि त्यावरील असे कोणतेही काटेरी झाड किंवा अन्य वनस्पती काढून टाकण्याविषयी ; किंवा

(दोन) असे झाड किंवा झुडूप, यथास्थिती, काढून टाकण्याविषयी, कापण्याविषयी, तोडण्याविषयी किंवा छाटण्याविषयी किंवा त्याचे फळ काढून टाकण्याविषयी ;

फर्माविता येईल.

(२) पोट-नियम (१), खंड (ख) किंवा (ग) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत, सार्वजनिक सुरक्षिततेसाठी तसे करणे आयुक्तास आवश्यक वाटेल तर, त्यास, वर सांगितल्याप्रमाणे उक्त मालकास किंवा भोगवटादारास आगाऊ नोटीस न देता, कोणतेही झाड किंवा झुडूप काढून टाकण्याची, कापण्याची, तोडण्याची किंवा छाटण्याची, किंवा त्याचे कोणतेही फळ काढून टाकण्याची किंवा रस्त्यांच्या एखाद्या भागावर कुंपण घालण्याची, किंवा धोका टाळण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी अन्य कोणतीही उपाययोजना करण्याची व्यवस्था करता येईल, आणि तरीसुद्धा, त्याचा खर्च मालकाने किंवा भोगवटादाराने दिला पाहिजे.

**जनावरे पाळणे आणि मारून टाकणे**

**२२.** (१) कोणत्याही व्यक्तीने,—

(अ) आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय किंवा अशा परवानगीच्या अटींना धरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने, शहराच्या कोणत्याही भागामध्ये कोणतेही डुक्कर, घोडे, गुरेढोरे, बकऱ्या, मेंढ्या, गाढवे किंवा आयुक्त, जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी निदेश देईल अशी अन्य चतुष्पाद जनावरे, पाळता कामा नये किंवा पाळू देता कामा नये ;

जनावरे पाळण्यास प्रतिबंध.

(ब) कोणत्याही जनावरास मलमूत्र, शेण, तबेल्यातील केरकचरा किंवा अन्य घाण पदार्थ खाऊ घालता कामा नये किंवा खाऊ घालण्यास परवानगी देता कामा नये किंवा खाऊ देता कामा नये ;

(क) उपद्रव होईल किंवा धोका पोचेल अशा रीतीने आपल्या जागेत कोणतेही जनावर किंवा पक्षी पाळता कामा नये.

(२) आयुक्तास,—

(अ) लेखी परवानगीमध्ये, विवक्षित जागेत पाळावयाच्या जनावरांच्या संख्येची मर्यादा विनिर्दिष्ट करता येईल ; किंवा

(ब) कोणत्याही जागेत जनावरे पाळणे हे कोणत्याही व्यक्तीस उपद्रवकारक किंवा धोकादायक आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा स्वच्छतेच्या कारणावरून त्यास हरकत घेता येईल असे आयुक्ताचे मत असेल तर, परवानगी देण्याचे किंवा तिचे नवीकरण करण्याचे नाकारता येईल.

(३) कोणतेही डुक्कर भटकताना आढळल्यास त्यास ताबडतोब मारून टाकता येईल आणि आयुक्त निदेश देईल अशा रीतीने त्या डुकराच्या प्रेताची विल्हेवाट लावता येईल, आणि अशा रीतीने मारून टाकलेल्या कोणत्याही डुकराबद्दल भरपाई मिळण्यासाठी कोणताही दावा सांगता येणार नाही.

(४) ज्या जनावरांच्या बाबतीत पोट-नियम (१), अन्वये परवानगी देण्यात आली असेल अशी जनावरे ओळखण्याच्या प्रयोजनांसाठी आयुक्ताने अशा जनावरांवर खुणा करण्याची तरतूद केली पाहिजे.

परवानगी देण्यात आलेल्या जनावरांच्या संख्येपेक्षा अधिक जनावरे बांधण्यास मनाई.

**२३.** कोणत्याही व्यक्तीने, नियम २२ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही परवानगीअन्वये प्राधिकृत केलेल्या मर्यादेबाहेर, कोणतेही जनावर बांधता कामा नये किंवा बांधण्याची व्यवस्था करता कामा नये किंवा बांधण्यास परवानगी देता कामा नये किंवा शहराच्या कोणत्याही भागातील कोणत्याही ठिकाणी कोणतेही जनावर भटकू देता कामा नये.

राहत्या घरात जनावरे बांधण्यास किंवा धान्य साठवण्यास मनाई.

**२४.** एखादी इमारत किंवा तिचा कोणताही भाग लोकांनी राहण्यासाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्याचा उद्देश असेल आणि इमारतीचा कोणताही भाग पुढीलपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी म्हणजे,—

(अ) कोणताही घोडा, गाय, म्हैस, बैल, बकरी, मेंढी किंवा गाढव पाळण्यासाठी, किंवा

(ब) धान्य, बी-बियाणे किंवा किराणा माल यांच्या घाऊक व्यापाराच्या संबंधात, गोदाम किंवा साठा करण्याची जागा म्हणून ;

वापरण्यात येत असेल तेव्हा, आयुक्तास, स्वच्छतेच्या कारणांसाठी त्यास तसे करणे आवश्यक वाटेल तर, लेखी नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास अशा कोणत्याही प्रयोजनांसाठी अशा इमारतीचा वापर करण्याचे बंद करण्याविषयी फर्मािवता येईल :

परंतु, आयुक्तास, त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा शर्तीच्या अधीन राहून, असा वापर करण्यास परवानगी देता येईल.

## कारखाने, व्यवसाय इत्यादींचे नियमन

नवीन कारखाने.

**२५.** (१) कलम ३१३ अन्वये परवानगी मिळण्यासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज हा, लेखी असला पाहिजे अणि उपविधिअन्वये विहित करण्यात येईल अशी माहिती त्यात असली पाहिजे व असे नकाशे त्यासोबत जोडले असले पाहिजेत.

(२) आयुक्तास, अर्ज मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर,—

(क) अर्ज करण्यात आलेली परवानगी, एकतर बिनशर्त, किंवा त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, देता येईल, परंतु, असा कारखाना, कर्मशाळा, कामाची जागा किंवा बेकरी यांचे स्थान हे, हा अधिनियम किंवा कोणताही नियम, विनियम, उपविधी किंवा स्थायी आदेश याअन्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही गोष्टीशी विसंगत असता कामा नये ; किंवा

(ड) अशा कारखान्याची, कर्मशाळेची, कामाच्या जागेची किंवा बेकरीची नियोजित जागी स्थापना करण्यास, त्या जागेच्या जवळपास दाट लोकवस्ती असल्याच्या कारणावरून हरकत घेता येईल किंवा ती कोणत्याही कारणांमुळे जवळपासच्या रहिवाशांस उपद्रवकारक होईल असे आयुक्ताचे मत असेल तर, अशी परवानगी देण्याचे नाकारता येईल.

(३) कारखाना, कर्मशाळा, कामाची जागा किंवा बेकरी स्थापन करण्यासाठी पोट-नियम (२) अन्वये देण्यात आलेली कोणतीही लेखी परवानगी, आयुक्ताने कलम ३८६, पोट-कलम (३) अन्वये आपल्या अधिकाराचा वापर करून रद्द केली तर, कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताकडून अशा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात येईपर्यंत किंवा नवीन लेखी परवानगी देण्यात येईपर्यंत, अशा कारखान्याचे, कर्मशाळेचे, कामाच्या जागेचे किंवा बेकरीचे कामकाज किंवा वापर चालू ठेवता कामा नये किंवा सुरू करता कामा नये.

व्यवसायासाठी किंवा निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या भट्ट्यांमधील धूर त्यांच्यातच नाहीसा होईल अशी व्यवस्था करणे.

**२६.** (१) आयुक्तास, जाहीर नोटिशीद्वारे, कोणत्याही व्यवसायाच्या किंवा वस्तुनिर्मितीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी किंवा वापरावयाची प्रत्येक भट्टी ही, तिच्यात निर्माण होणारा धूर व्यवहार्य असेल तितपत, तिच्यातच नाहीसा होईल अशा रीतीने बांधण्याविषयी, तिला जोड देण्याविषयी किंवा तिच्यात फेरफार करण्याविषयी निदेश देता येईल.

(२) अशा रीतीने निदेश देण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने,—

(अ) कोणत्याही व्यवसायाच्या किंवा वस्तुनिर्मितीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या ज्या कोणत्याही भट्टीत निर्माण होणारा धूर व्यवहार्य असेल तितपत, तिच्यातच नाहीसा होत नसेल अशी भट्टी वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये ; किंवा

(ब) अशी कोणतीही भट्टी, तिच्यात निर्माण होणारा धूर व्यवहार्य असेल तितपत, तिच्यातच नाहीसा होणार नाही अशा रीतीने हयगयीने वापरता कामा नये किंवा वापरण्यास परवानगी देता कामा नये.

(३) या नियमातील कोणतीही गोष्ट, कोणत्याही लोहमार्गावरील वाहतुकीच्या प्रयोजनासाठी किंवा रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या लोकोमोटिव्ह इंजिनास लागू होते, असे मानले जाणार नाही.

(४) जी कोणतीही व्यक्ती या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील त्या व्यक्तीस,— मग ती व्यक्ती ज्या जागेत भट्टी असेल त्या जागेचा मालक असो किंवा भोगवटादार असो, किंवा मालकाने किंवा भोगवटादाराने त्या भट्टीची व्यवस्था पाहण्यासाठी कामावर ठेवलेला अभिकर्ता किंवा एखादी व्यक्ती असो— तिचा पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि दुसरा किंवा नंतरच्या अपराध सिद्ध झाल्यानंतर, निकटपूर्वीचा अपराध सिद्ध झाल्याच्या वेळी तिच्यावर लादण्यात आलेल्या द्रव्यदंडाच्या रकमेच्या दुपटीइतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कारखाने इत्यादीचे स्वच्छता-विषयक नियमन.

**२७.** (१) जेव्हा आयुक्तास,—

(अ) कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा किंवा जिच्यात वाफेच्या, पाण्याच्या, विद्युत किंवा यांत्रिक शक्तीचा वापर करण्यात येत आहे अशी कोणतीही इमारत किंवा जागा, किंवा कोणतीही बेकरी स्वच्छ स्थितीत ठेवण्यात आलेली नाही किंवा त्या ठिकाणी चालू असताना निर्माण होणारा व उपद्रवकारक असलेला कोणताही वायू, बाष्प, काजळी, धूळ किंवा अन्य अपद्रव्य यापासून शक्यतोवर अपाय होणार नाही अशा रीतीने त्यात हवा खेळती राहण्याची व्यवस्था केलेली नाही किंवा त्या ठिकाणी काम चालू असताना, तेथे कामावर असलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका किंवा अपाय होईल इतकी बेसुमार गर्दी झालेली आहे ; किंवा

(ब) तेथील कोणतेही इंजिन, मिल-गिअरिंग, उच्चलनयंत्र किंवा अन्य यंत्रसामग्री ही, जीवितास किंवा शरीराच्या एखाद्या अवयवास धोका पोचेल अशा रीतीने बसवण्यात आली आहे किंवा अशा असुरक्षित रीतीने त्यांस कुंपण घातलेले आहे ;

असे आढळून येईल तेव्हा, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, अशा कारखान्याच्या, कर्मशाळेच्या, कामाच्या जागेच्या किंवा अन्य इमारतीच्या किंवा जागेच्या किंवा बेकरीच्या मालकास, त्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी व राखण्यासाठी, किंवा हवा खेळती राहण्यासाठी, किंवा गर्दी होऊ नये म्हणून किंवा तेथील कोणतेही इंजिन, मिल-गिअरिंग, उच्चलनयंत्र किंवा अन्य यंत्रसामग्री यामुळे जीवितास किंवा शरीराच्या एखाद्या अवयवास धोका पोहोचू नये म्हणून, आयुक्तास योग्य वाटेल अशी व्यवस्था करण्याविषयी फर्मावता येईल.

(२) या नियमातील कोणत्याही मजकुरामुळे भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३ च्या कोणत्याही तरतुदीस बाध येतो असे मानले जाणार नाही, आणि या नियमातील, कोणतेही इंजिन, मिलगिअरिंग, उच्चलनयंत्र किंवा अन्य यंत्रसामग्री बसवण्यासंबंधीचा किंवा त्यास कुंपण घालण्यासंबंधीचा कोणताही मजकूर, कारखाने अधिनियम, १९४८ च्या तरतुदी ज्या कारखान्यास लागू असतील अशा कोणत्याही कारखान्यास लागू होणार नाही.

आयुक्ताच्या परवानगी-शिवाय वाफेची शिट्टी किंवा वाफेची तुतारी वापरण्यास मनाई.

२८. (१) कोणत्याही व्यक्तीने, आयुक्ताच्या लेखी परवानगीशिवाय, कोणत्याही कारखान्यात किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी कामावर लावलेल्या कामगारांना किंवा व्यक्तींना कामावर बोलवण्याच्या किंवा कामावरून सोडून देण्याच्या प्रयोजनासाठी वाफेने, हवेच्या दाबाने, विजेने किंवा अन्य यांत्रिक साधनाने वाजवली जाणारी कोणतीही शिट्टी, तुतारी, भोंगा किंवा कर्णा वापरता कामा नये किंवा बसवता कामा नये.

(२) आयुक्तास, पूर्वोक्त असे कोणतेही साधन वापरण्यासाठी त्याने दिलेली अशी कोणतीही परवानगी, असे साधन वापरणाऱ्या व्यक्तीस एक महिन्याची नोटीस देऊन कोणत्याही वेळी रद्द करता येईल :

परंतु, कलम ३८६, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणांसाठी आयुक्त अशी कोणतीही परवानगी तहकूब करील किंवा रद्द करील तर, पोट-नियम (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे आयुक्ताने एक महिन्याची नोटीस देणे आवश्यक आहे असे मानले जाणार नाही.

**२९.** (१) ज्या ठिकाणी वाफेची, पाण्याची, विजेची, किंवा यांत्रिक शक्ती वापरण्यात येत आहे अशा कोणत्याही कारखान्यात, कर्मशाळेत, कामांच्या जागेत किंवा कोणत्याही इमारतीत किंवा जागेत वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या जळणामुळे किंवा निर्माण होणाऱ्या गोंगाटामुळे किंवा कंपनामुळे किंवा अन्य कोणत्याही रीतीने उपद्रव होत आहे असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास, त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करावयाच्या वाजवी मुदतीच्या आत, असा उपद्रव नाहीसा करण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

वाफेमुळे किंवा अन्य शक्तीमुळे होणारा उपद्रव नाहीसा करण्यासाठी आयुक्तास निदेश देता येतील.

(२) अशा निदेशांचे अनुपालन करण्यात बुद्धिपुरस्सर कसूर करण्यात आली असेल किंवा उपद्रव नाहीसा करणे अव्यवहार्य वाटत असेल तर, आयुक्तास,—

(अ) विशिष्ट प्रकारचे जळण वापरण्यास मनाई करता येईल ; किंवा

(ब) अशा निदेशांचे पालन करण्यात येईपर्यंत किंवा संध्याकाळी ६ ते सकाळी ६ या वेळेच्या दरम्यान किंवा अशा वेळेपैकी कोणत्याही विशिष्ट वेळेत किंवा वेळांमध्ये असा कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा यांचे काम चालू ठेवण्यास पूर्णपणे मनाई करता येईल.

## रसायने इत्यादींनी पाणी दूषित करण्यास मनाई

**३०.** (अ) आयुक्तास, कलम ३७६ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या कोणत्याही वस्तुनिर्मितीशी किंवा व्यवसायांशी संबंधित असलेल्या कोणत्याही कामांच्या, नळांच्या किंवा प्रणालांच्या मालकास, किंवा त्यांचे व्यवस्थापन किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीस कमीत कमी चोवीस तासांची आगाऊ लेखी नोटीस दिल्यानंतर, उक्त कामे नळ किंवा प्रणाल उघडता येतील आणि तपासता येतील.

तपासणी करण्याचा अधिकार.

(ब) अशी तपासणी केल्यानंतर, उक्त काम, नळ, किंवा प्रणाल यामध्ये असलेल्या किंवा त्यामधून येणाऱ्या कोणत्याही पदार्थामुळे कलम ३१४ चे उल्लंघन झाले आहे असे दिसून येईल तर, अशा रीतीने उक्त काम इत्यादी उघडण्याचा व तपासण्याचा खर्च आणि ज्यामुळे असे उल्लंघन झाले असेल त्या गोष्टीस आळा घालण्यासाठी आयुक्त, स्वविवेकानुसार जी कोणतीही उपाययोजना करण्यास फर्मावील त्या उपाययोजनेचा खर्च उक्त कामांच्या, नळांच्या किंवा प्रणालांच्या मालकाने किंवा त्यांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीने किंवा जिच्या हयगयीमुळे किंवा कसुरीमुळे उक्त कलमांचे उल्लंघन झाले आहे अशा व्यक्तीने दिला पाहिजे.

(क) उक्त कलमाचे उल्लंघन झालेले नाही असे दिसून येईल तर, उक्त खर्च आणि वर सांगितल्याप्रमाणे काम इत्यादी उघडल्यामुळे किंवा तपासल्यामुळे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दलची भरपाई आयुक्ताने दिली पाहिजे.

**३१.** ज्या ठिकाणी वाफेची, पाण्याची, विजेची किंवा यांत्रिक शक्ती वापरण्यात येत असेल अशा कोणत्याही कारखान्यात, कर्मशाळेत, कामाच्या जागेत किंवा कोणत्याही इमारतीत किंवा कोणत्याही जागेत, किंवा कोणत्याही बेकरीत अशी शक्ती वापरण्यात येत असल्यामुळे किंवा अशा जागी काम चालू असताना उत्पन्न होणाऱ्या गोंगाटामुळे किंवा कोणताही वायू, बाष्प, धूर, कंपन किंवा धूळ, अन्य उपद्रव्य यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे उपद्रव होत आहे किंवा जवळपास राहणाऱ्या व्यक्तींच्या जीवितास, आरोग्यास किंवा मालमत्तेस धोका आहे किंवा होण्याचा संभव आहे असे आयुक्तास दिसून येईल तेव्हा तेव्हा, त्यास, लेखी नोटिशीद्वारे, अशा कारखान्याच्या, कर्मशाळेच्या, कामाच्या जागेच्या, इमारतीच्या किंवा जागेच्या किंवा बेकरीच्या मालकास किंवा भोगवटादारास अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, त्यांचा उपयोग करण्याचे बंद करण्याविषयी फर्माविता येईल.

कारखाना इत्यादींच्या मालकास किंवा भोगवटा-दारास अशा कारखान्याचा उपयोग करण्याचे बंद करण्याविषयी फर्मावण्याचा आयुक्ताचा अधिकार.

परिटांनी कपडे धुण्याच्या बाबतीत नियम व धुण्याच्या जागांची तरतूद.

**३२.** (१) आयुक्तास जाहीर नोटिशीद्वारे, परिटांनी आपल्या व्यवसायक्रमात कपडे धुण्यासाठी आयुक्त ज्या जागा नेमून देईल अशा जागांव्यतिरिक्त अन्य जागी कपडे धुण्यास मनाई करता येईल.

(२) अशी कोणतीही मनाई करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्ताने या प्रयोजनासाठी नेमून दिली नसेल अशा कोणत्याही जागी कपडे धुण्यास जागेच्या मालकाने परवानगी देता कामा नये ; तसेच, व्यवसायाने परीट असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अशा जागी कपडे धुता कामा नये ; मात्र, अशा व्यक्तीला स्वत:साठी किंवा अशा जागेच्या मालकासाठी किंवा भोगवटादारासाठी अशा जागी कपडे धुता येतील.

(३) परिटांनी आपल्या व्यवसायक्रमात कपडे धुण्यासाठी योग्य जागांची तरतूद आयुक्ताने केली पाहिजे, आणि त्यांनी अशी कोणतीही जागा वापरण्यासाठी, स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्त वेळोवेळी ठरवील अशी फी देण्याविषयी, त्यास फर्माविता येईल.

## दुर्धर रोगांच्या फैलावास प्रतिबंध

दुर्धर रोग अस्तित्वात असल्याबद्दल माहिती देणे.

**३३.** (१) सार्वजनिक रुग्णालयातील अंतररुग्णाव्यतिरिक्त, शहरातील कोणत्याही व्यक्तीस भयंकर रोग झालेला असेल अशा प्रसंगी,—

(अ) प्रत्येक वैद्यक व्यवसायीने किंवा उघडपणे व नेहमी वैद्यकीचा व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, असा व्यवसाय करताना त्यास अशी गोष्ट आढळून आल्यास, आणि

(ब) असा रोग झालेली व्यक्ती ज्या इमारतीत राहत असेल त्या इमारतीच्या भोगवटादाराने, किंवा रोग झालेली व्यक्तीच भोगवटादार असेल तर घरातील प्रत्येक घरातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीने, आणि

(क) असा रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीचा ताबा असणाऱ्या किंवा तिची शुश्रुषा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने,

त्यास ती गोष्ट आढळून आल्यावर लवकरात लवकर, आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यास त्याबाबत कळवले पाहिजे किंवा कळवण्याची व्यवस्था केली पाहिजे :

परंतु, अशा रीतीने कळवण्यात आले असेल तर, अशा रीतीने कळवणे किंवा कळवण्याची व्यवस्था करणे कोणत्याही व्यक्तीवर बंधनकारक असणार नाही.

संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या जनावरां-संबंधी कळविणे.

(२) संक्रामक किंवा सांसर्गिक रोग झालेल्या कोणत्याही जनावराच्या मालकाने किंवा ते ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीने, त्यास ती गोष्ट आढळून आल्यावर लवकरात लवकर, आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यास त्याबाबत कळवले पाहिजे किंवा कळवण्याची व्यवस्था केली पाहिजे :

परंतु, अशा रीतीने कळवण्यात आले असेल तर, अशा रीतीने कळवणे किंवा कळवण्याची व्यवस्था करणे, कोणत्याही व्यक्तीवर बंधनकारक असणार नाही.

**३४.** (१) कोणत्याही विहिरीतील, तळ्यातील किंवा अन्य ठिकाणाच्या पाण्यामुळे धोका पोचण्याचा किंवा कोणत्याही दुर्धर रोगाचा फैलाव होण्याचा संभव आहे असे आयुक्तास दिसून येईल तर, त्यास, जाहीर नोटिशीद्वारे, उक्त पाणी नेण्यास किंवा वापरण्यास मनाई करता येईल.

ज्यामुळे दुर्धर रोग होण्याचा संबंध आहे असे पाणी पिण्यासाठी वापरण्यास मनाई.

(२) ज्या पाण्याच्या बाबतीत अशी कोणतीही जाहीर नोटीस काढण्यात आली असेल असे पाणी कोणत्याही व्यक्तीने नेता कामा नये किंवा वापरता कामा नये.

**३५.** (१) आयुक्तास किंवा त्याने याबाबत अधिकार दिलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने किंवा यथोचित अर्हता प्राप्त केलेल्या कोणत्याही वैद्यक व्यवसायीने सही केलेले प्रमाणपत्र मिळाल्यावर, ज्या व्यक्तीस दुर्धर रोग झालेला असेल आणि ज्या व्यक्तीस, अशा वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याच्या किंवा अन्य वैद्यक व्यवसायीच्या मते, राहण्याची योग्य जागा किंवा सोय नसेल, किंवा जी व्यक्ती एकापेक्षा अधिक कुटुंबांकडून भोगवटा करण्यात येणाऱ्या एखाद्या इमारतीत राहत असेल, किंवा संक्रमणाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी योग्य अशी खबरदारी घेता येणे शक्य नाही किंवा घेण्यात येत नाही अशी परिस्थिती ज्या व्यक्तीच्या बाबतीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही रुग्णालयात किंवा ज्या ठिकाणी उक्त रोग झालेले रोगी वैद्यकीय उपचारांसाठी दाखल करून घेतले जात असतील अशा ठिकाणी नेण्याविषयी निदेश देता येईल किंवा नेण्याची व्यवस्था करता येईल.

रुग्णालयात नेण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

(२) पोट-नियम (१) अन्वये ज्या व्यक्तीच्या बाबतीत आदेश देण्यात आला असेल अशा व्यक्तीचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल, अशी व्यक्ती असल्यास, अशा व्यक्तीने अशा आदेशाचे पालन केले पाहिजे.

(३) पोट-नियम (१) अन्वये ज्या व्यक्तीस रुग्णालयात किंवा उक्त ठिकाणी नेण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशा रुग्णालयाच्या किंवा ठिकाणाच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय असे रुग्णालय किंवा ठिकाण सोडता कामा नये किंवा त्या व्यक्तीला तेथून हलवले जाता कामा नये.

**३६.** (१) वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने, अर्ज केल्यावर, सार्वजनिक रुग्णालयातील दुर्धर रोग झालेल्या रुग्णासाठी, रुग्णालय सोडल्यावर ज्या ठिकाणी रोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी योग्य अशी खबरदारी घेता येईल अशा ठिकाणी राहण्याच्या जागेची किंवा सोयीची तरतूद करता येणार नाही अशी वर्ग तीनचा दंडाधिकारी नसलेल्या दंडाधिकाऱ्याची खात्री होईल तर, अशा दंडाधिकाऱ्यास रुग्णालयातील अशा रुग्णाला महानगरपालिकेच्या खर्चाने अशा रुग्णालयात अटकावून ठेवण्याविषयी निदेश देता येईल.

परत जाऊन राहण्यास योग्य जागा नसलेल्या संसर्गबाधित व्यक्तीस रुग्णालयात अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशानुसार त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत, अटकावून ठेवण्याविषयी निदेश देता येईल ; परंतु दंडाधिकाऱ्यास, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेला कालावधी त्यास तसे करणे आवश्यक आहे असे वाटेल तेव्हा तेव्हा वाढवता येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती पोट-नियम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करून रुग्णालय सोडून जाईल अशा व्यक्तीवर अशा उल्लंघनासाठी जी कोणतीही शास्ती लादली जाईल त्याबरोबरच आणखी, त्या व्यक्तीस त्या रुग्णालयात परत नेण्यात यावे, असा न्यायालयास आदेश देता येईल.

(४) एखाद्या व्यक्तीस अटकावून ठेवण्याविषयी दिलेल्या आदेशाच्या बाबतीत या नियमान्वये दिलेला आदेश रुग्णालयाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठवता येईल, आणि पोट-नियम (३) अन्वये दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याकडे व रुग्णालयाच्या किंवा संस्थेच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे

पाठवता येईल, आणि आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यास तो आदेश अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कृत्ये करता येतील किंवा ती करण्याचा प्राधिकार देता येईल.

इमारती जंतुविरहित करणे.

**३७.** संक्रमित रोग टिकून राहिला असल्याचा संभव असलेली एखादी इमारत किंवा इमारतीचा एखादा भाग किंवा त्यात असलेली कोणतीही वस्तू स्वच्छ केल्यास किंवा जंतुविरहित केल्यास कोणत्याही दुर्धर रोगाच्या फैलावास प्रतिबंध होईल किंवा आळा बसेल असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास अशी इमारत किंवा तिचा भाग किंवा त्यातील अशी वस्तू नगरपालिका निधीच्या खर्चाने स्वच्छ करण्याची किंवा जंतुविरहित करण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी अशी इमारत रिकामी करण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु, आयुक्ताच्या मते, मालक किंवा भोगवटादार हा अशा रीतीने इमारत इत्यादी स्वच्छ करण्याचे किंवा जंतुविरहित करण्याचे काम परिणामकारक रीतीने पार पाडण्यास समर्थ असेल तर, आयुक्तास, संक्रमित रोग टिकून राहिला असल्याचा संभव असलेली उक्त इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा त्यातील वस्तू, अशा इमारतींच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून आणि अशा मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या खर्चाने स्वच्छ करवून घेण्याची किंवा जंतुविरहित करवून घेण्याची व्यवस्था करता येईल.

कपडे इत्यादी जंतुविरहित करण्यासाठी जागेची तरतूद करता येईल.

**३८.** (१) आयुक्तास, संक्रमित रोगाने दूषित झालेले सर्व कपडे, बिस्तरे किंवा अन्य वस्तू जंतुविरहित करण्यासाठी, आवश्यक ती सर्व उपकरणे व परिचर्या यासह एखाद्या जागेची तरतूद करता येईल आणि त्यास, स्वेच्छानिर्णयानुसार, एखादी वस्तू जंतुविरहित करण्यासाठी अशा जागेत वस्तू आणण्याची व्यवस्था करता येईल आणि याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने तो वेळोवेळी ठरवील अशी फी देण्यात आल्यावर किंवा ज्या कोणत्याही बाबतीत त्यास योग्य वाटेल अशा बाबतीत काहीही फी न घेता अशा वस्तू जंतुविरहित करण्याची व्यवस्था करता येईल.

रोगसंक्रामित वस्तू धुण्यासाठी सुद्धा जागेची तरतूद करणे.

(२) आयुक्तास, जाहीर नोटिशीद्वारे, वेळोवेळी, कोणत्याही दुर्धर रोगांच्या जंतूंनी दूषित झालेले कपडे, बिस्तरे किंवा अन्य वस्तू ज्या जागेत धुता येतील अशी जागा नेमून देता येईल, आणि कोणत्याही व्यक्तीने अशा कोणत्याही वस्तू, त्या आधी जंतुविरहित केल्याशिवाय, अशा रीतीने नेमून न दिलेल्या कोणत्याही जागी धुता कामा नये.

ज्यामुळे भयंकर रोग पसरण्याची शक्यता आहे अशा व्यक्ती किंवा वस्तू उघड्यावर आणण्यास मनाई.

**३९.** (१) आपल्याला दुर्धर रोग झालेला आहे हे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, कोणताही रस्ता, सार्वजनिक जागा, करमणुकीची किंवा एकत्र जमण्याची जागा, शाळा, क्लब, धार्मिक पूजाअर्चेची जागा, हॉटेल, पांथगृह, धर्मशाळा, निवासगृह, भोजनगृह, कारखाना, दुकान, बाजार, किंवा लोक जमण्याची अन्य जागा, येथे आपल्या उपस्थितीने किंवा वागण्याने अन्य व्यक्तींना रोगसंसर्गाचा धोका उत्पन्न करता कामा नये.

(२) आपण काळजी घेत असलेल्या व्यक्तीस दुर्धर रोग झालेला आहे हे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने वर सांगितलेल्या अशा कोणत्याही जागेत त्या व्यक्तीस आपल्या उपस्थितीने किंवा वागण्याने अन्य व्यक्तींना रोगसंसर्गाचा धोका उत्पन्न करू देता कामा नये किंवा करण्यास परवानगी देता कामा नये.

(३) कोणत्याही व्यक्तीने, जे कोणतेही कपडे, बिस्तरे किंवा चिंध्या अशा कोणत्याही रोगामुळे दूषित झाल्याचे त्यास माहीत असेल असे कपडे, बिस्तरे किंवा चिंध्या, किंवा जी कोणतीही अन्य वस्तू अशा रीतीने दूषित झाल्याचे त्यास माहीत असेल व ज्यामुळे अशा रोगाचा फैलाव होईल अशी कोणतीही वस्तू, आधी जंतुविरहित केल्याशिवाय, देता कामा नये, उसनी देता कामा नये, विकता कामा नये, पाठवता कामा नये किंवा उघडी ठेवता कामा नये :

परंतु, एखाद्या व्यक्तीने कोणतीही वस्तू जंतुविरहित करण्याच्या प्रयोजनासाठी योग्य खबरदारी घेऊन पाठविली तर तिच्यावर या नियमात मोडणारी कोणतीही जबाबदारी ओढवणार नाही.

(४) कोणत्याही व्यक्तीने, कचरापेटीत किंवा कचरा टाकण्याच्या अन्य पात्रात, जो कोणताही पदार्थ एखाद्या दुर्धर रोगाच्या जंतूंनी दूषित झाल्याचे त्या व्यक्तीस माहीत असेल आणि जो जंतुविरहित करण्यात आला नसेल असा कोणताही पदार्थ ठेवता कामा नये किंवा ठेवण्याची व्यवस्था करता कामा नये.

दुर्धर रोग झालेल्या व्यक्तीने धोका निर्माण होईल असा व्यवसाय करता कामा नये.

**४०.** आपल्याला एखादा दुर्धर रोग झालेला आहे हे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने जो कोणताही व्यापार, धंदा किंवा व्यवसाय असा रोग पसरण्याचा धोका न राहता त्या व्यक्तीस करता किंवा चालवता येणे शक्य नसेल असा व्यापार, धंदा किंवा व्यवसाय करता कामा नये किंवा चालवता कामा नये.

**स्पष्टीकरण.–** या नियमाच्या प्रयोजनांसाठी, माणसांनी खाण्याचा कोणताही पदार्थ किंवा पेय तयार करणे, विक्रीसाठी वाहून नेणे किंवा देऊ करणे, किंवा असा पदार्थ किंवा पेय तयार करण्याच्या, विक्रीसाठी वाहून नेण्याच्या किंवा देऊ करण्याच्या धंद्यात भाग घेणे या गोष्टी, आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असा अन्य कोणताही व्यापार, धंदा किंवा व्यवसाय हा, दुर्धर रोग झालेल्या व्यक्तीस असा रोग पसरण्याचा धोका न राहता करता येणे किंवा चालवता येणे शक्य नाही असा व्यापार धंदा किंवा व्यवसाय आहे असे मानले जाईल.

दुर्धर रोग झालेल्या व्यक्तींसाठी वाहने.

**४१.** दुर्धर रोग झालेल्या व्यक्तींना कोणताही आकार न घेता वाहून नेण्यासाठी योग्य वाहनाची किंवा योग्य वाहनांची आयुक्तास तरतूद करता येईल व ती सुस्थितीत ठेवता येतील, आणि अशी तरतूद करण्यात येईल तेव्हा, जाहीर नोटिशीद्वारे, अशा व्यक्तींना सर्व किंवा कोणत्याही सार्वजनिक वाहनांतून नेण्यास मनाई करता येईल.

दुर्धर रोग झालेल्या व्यक्तींनी सार्वजनिक वाहने वापरण्या-संबंधी तरतुदी.

**४२.** (१) आपल्याला दुर्धर रोग झालेला आहे हे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने,—

(अ) वेगवेगळ्या भाड्याने माणसांना नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वजनिक वाहनात प्रवेश करता कामा नये ; किंवा

(ब) नियम ४१ अन्वये आयुक्ताने कोणतीही नोटीस दिली नसेल तर, अन्य कोणत्याही सार्वजनिक वाहनात, आपल्याला असा रोग झाला आहे हे त्या वाहनाच्या मालकास किंवा चालकास आगाऊ कळवल्याशिवाय, प्रवेश करता कामा नये.

(२) आपण काळजी घेत असलेल्या व्यक्तीस दुर्धर रोग झालेला आहे असे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, अशा रोग झालेल्या व्यक्तीस,—

(अ) वेगवेगळ्या भाड्याने माणसांना नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वजनिक वाहनातून नेऊ देता कामा नये ; किंवा

(ब) नियम ४१ अन्वये आयुक्ताने कोणतीही नोटीस दिली नसेल तर, अन्य कोणत्याही सार्वजनिक वाहनातून, त्या व्यक्तीला असा रोग झाला आहे हे त्या वाहनाच्या मालकास किंवा चालकास आगाऊ कळवल्याशिवाय, नेऊ देता कामा नये.

(३) जी व्यक्ती नियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्या व्यक्तीस, ती ज्या कोणत्याही शास्तीस पात्र असेल त्याशिवाय आणखी, त्या वाहनाचा मालक, चालक किंवा वाहक म्हणून त्या वाहनांशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे, असे वाहन जंतुविरहित करण्याच्या बाबतीत झालेले कोणतेही नुकसान व खर्च भरून निघण्यास पुरेशी होईल इतकी रक्कम अशा व्यक्तीस देण्याबद्दल, न्यायालयाने आदेश दिला पाहिजे.

**दुर्धर रोग झालेल्या रोग्यांच्या बाबतीत सार्वजनिक वाहनाचा मालक इत्यादींचे कर्तव्य.**

**४३.** (१) वेगवेगळ्या भाड्याने प्रवाशांना नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सार्वजनिक वाहनाच्या मालकाने, चालकाने किंवा वाहकाने, ज्या व्यक्तीस भयंकर रोग झाल्याचे त्यास माहीत असेल अशा व्यक्तीस अशा वाहनातून नेता कामा नये.

(२) अन्य कोणत्याही सार्वजनिक वाहनाच्या मालकास किंवा चालकास, नियम ४१ अन्वये आयुक्ताने कोणतीही नोटीस दिली नसली तरीही, असे वाहन जंतुविरहित करण्याच्या बाबतीत होणारे कोणतेही नुकसान व खर्च भरून निघण्यास पुरेशी होईल इतकी रक्कम त्यास देण्यात येईपर्यंत, दुर्धर रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस त्या वाहनातून नेण्याचे नाकारता येईल.

(३) दुर्धर रोग झालेल्या एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक वाहनातून नेण्यात येईल तर, ते वाहन ताब्यात असणाऱ्या व्यक्तीने, व्यवहार्य असेल तितक्या लवकर आणि अन्य कोणत्याही व्यक्तीस त्या वाहनात प्रवेश करू देण्यापूर्वी, ते वाहन जंतुविरहित करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**दुर्धर रोग झाल्याची बाब नुकतीच घडून गेल्यावर घरे, किंवा हॉटेलमधील खोल्या भाड्याने देण्यासंबंधी तरतूद.**

**४४.** (१) (अ) ज्या कोणत्याही व्यक्तीचा एखादे घर किंवा घराचा भाग भाड्याने देण्याशी, किंवा घर किंवा घराचा भाग भाड्याने देण्याच्या उद्देशाने इतरांना दाखवण्याशी संबंध आहे ; किंवा

(आ) ज्या कोणत्याही व्यक्तीने एखाद्या घराचा किंवा घराच्या भागाचा भोगवटा करण्याचे नुकतेच बंद केले आहे,

अशा व्यक्तीने, घर किंवा घराचा भाग भाड्याने घेण्यासाठी बोलणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने घराच्या कोणत्याही भागात दुर्धर रोग झालेली व्यक्ती आहे किंवा मागील सहा आठवड्यांत होती किंवा कसे असा प्रश्न तिला विचारल्यास त्या प्रश्नाचे जाणूनबुजून खोटे उत्तर देता कामा नये.

(२) कोणत्याही व्यक्तीने, ज्या घरात दुर्धर रोग झालेली एखादी व्यक्ती राहत असल्याचे तिला माहीत असेल असे कोणतेही घर किंवा घराचा भाग ते घर आणि रोगसंक्रमित राहण्याची शक्यता असेल अशा त्यातील सर्व वस्तू, वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याचे किंवा अन्य एखाद्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे समाधान होईल अशा रीतीने जंतुविरहित केल्याशिवाय आणि तसे केल्याचे प्रमाणित करणारे उक्त अधिकाऱ्याच्या किंवा वैद्यक व्यवसायीच्या सहीचे प्रमाणपत्र मिळवल्याशिवाय, भाड्याने देता कामा नये.

(३) हॉटेलच्या, निवासगृहाच्या, सराईच्या किंवा धर्मशाळेच्या कोणत्याही मालकाने किंवा व्यवस्थापकाने, तेथील ज्या कोणत्याही खोलीत दुर्धर रोग झालेली एखादी व्यक्ती राहत असल्याचे त्यास माहीत असेल अशा खोलीत, ती खोली आणि संक्रमित रोगाने दूषित राहिल्या असल्याची शक्यता असेल अशा त्यातील सर्व वस्तू वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याचे किंवा अन्य एखाद्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे समाधान होईल अशा रीतीने जंतुविरहित केल्याशिवाय आणि तसे प्रमाणित करणारे उक्त अधिकाऱ्याच्या किंवा वैद्यक व्यवसायीच्या सहीचे प्रमाणपत्र मिळवल्याशिवाय, अन्य कोणत्याही व्यक्तीस राहण्याची परवानगी देता कामा नये.

ज्याच्यामुळे दुर्धर रोग पसरण्याची शक्यता आहे अशा मुलास शाळेत उपस्थित न राहण्याबद्दल आदेश देता येईल.

**४५.** जे मूल दुर्धर रोगाने आजारी आहे किंवा आजारी होते किंवा ज्या मुलास अशा रोगाचा संसर्ग झाला आहे किंवा झाला होता, अशा मुलाची काळजी घेणाऱ्या व्यक्तीने उक्त मुलास शाळेत पाठवता कामा नये अशी वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याकडून नोटीस मिळाल्यानंतर, उक्त वैद्यकीय अधिकाऱ्याकडून, त्या मुलाकडून इतरांना रोगाची बाधा होण्याचा धोका नसल्यामुळे त्याने शाळेत जाण्यास आपल्या मते हरकत नाही असे प्रमाणपत्र मिळेपर्यंत, त्या मुलास शाळेत जाण्यास परवानगी देता कामा नये. अशा प्रमाणपत्रासाठी कोणताही आकार घेता येणार नाही.

संक्रमित रोगाने दूषित झालेले कपडे धुलाईघरात पाठवता कामा नयेत.

**४६.** (१) कोणत्याही व्यक्तीने, ज्या कोणत्याही वस्तूस दुर्धर रोगाचा संसर्ग झाल्याचे तिला माहीत आहे अशी वस्तू, धुण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही परिटाकडे किंवा कोणत्याही धुलाईघरात किंवा परिटांनी आपल्या व्यवसायक्रमासाठी राखून ठेवलेल्या जागेत, किंवा अशी वस्तू स्वच्छ करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही सार्वजनिक जलप्रवाहावर, तलावावर किंवा विहिरीवर पाठवता कामा नये किंवा नेता कामा नये ; मात्र, अशी वस्तू वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीने किंवा त्याचे समाधान होईल अशा रीतीने, जंतुविरहित केली असेल, किंवा तिला रोगाचा संसर्ग झाला असल्याची नोटीस देऊन ती जंतुविरहित करण्याच्या प्रयोजनासाठी योग्य ती खबरदारी घेऊन धुलाई घरात पाठविली असेल तर, वरील मजकूर लागू होणार नाही.

(२) ज्या कोणत्याही इमारतीत दुर्धर रोग झालेली व्यक्ती असेल अशा इमारतीच्या भोगवटादाराने वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याकडून तसे फर्मावण्यात आले तर, रोग झालेला असताना, घरातील वस्तू धुण्याच्या किंवा स्वच्छ करण्याच्या प्रयोजनासाठी ज्या कोणत्याही परिटाकडे किंवा ज्या कोणत्याही धुलाईघरात किंवा अन्य जागी पाठवण्यात आल्या असतील किंवा पाठवण्यात येतील अशा परिटाचा, धुलाईघराचा किंवा जागेचा पत्ता उक्त वैद्यकीय अधिकाऱ्यास दिला पाहिजे.

ज्या जागेत दुर्धर रोग अस्तित्वात असेल तेथे करण्यात येणारे काम करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

**४७.** (१) कोणत्याही जागेत दुर्धर रोग उद्‌भवला असेल तर,– मग असा दुर्धर रोग झालेली व्यक्ती त्या जागेतून हलवण्यात आलेली असो किंवा नसो,– वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यास, ज्या बाबतीत हा नियम लागू आहे असे कोणतेही काम त्या जागेत किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्या जागेच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या किंवा काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस देण्यास मनाई करणारा आदेश देता येईल, आणि अशा रीतीने देण्यात आलेला कोणताही आदेश ज्या कारखान्यामधून किंवा अन्य जागेमधून असे काम देण्यात येत असेल अशा कोणत्याही कारखान्याच्या किंवा जागेच्या भोगवटादारावर किंवा अशा कोणत्याही भोगवटादाराने नेमलेल्या कोणत्याही कंत्राटदारावर बजावता येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये दिलेला आदेश हा, विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत, किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी जागा किंवा जागेचा कोणताही भाग वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने जंतुविरहित करण्यात येईपर्यंत चालू राहील असे, किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अन्य कोणतीही योग्य खबरदारी जोपर्यंत घेण्यात येईल तोपर्यंत चालू असणार नाही, असे त्या आदेशात स्पष्ट करता येईल.

(३) परिधान करावयाचे कपडे तयार करण्यास, स्वच्छ करण्यास, धुण्यास, त्यात फेरफार करण्यास, त्यावर कलाकुसर करण्यास, त्याचे परिष्करण करण्यास किंवा ते दुरुस्त करण्यास, व तत्सम कोणतेही काम करण्यास आणि आयुक्त, जाहीर नोटिशीद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य प्रकारच्या कामास हा नियम लागू हाईल.

ग्रंथालयातील पुस्तकांसंबंधी तरतुदी.

४८. (१) आपल्याला दुर्धर रोग झालेला आहे असे माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक किंवा फिरत्या ग्रंथालयातून आपल्या उपयोगासाठी कोणतेही पुस्तक आणता कामा नये, आणावयास लावता कामा नये किंवा आणलेले कोणतेही पुस्तक वापरता कामा नये.

(२) कोणत्याही व्यक्तीने सार्वजनिक किंवा फिरत्या ग्रंथालयातून आणलेले व तिच्या ताब्यात असलेले असे कोणतेही पुस्तक ज्या व्यक्तीस दुर्धर रोग झाल्याचे तिला माहीत आहे अशा कोणत्याही व्यक्तीस वापरू देता कामा नये.

(३) सार्वजनिक किंवा फिरत्या ग्रंथालयातून आणलेल्या पुस्तकास, ते ग्रंथालयातून आणणाऱ्या व्यक्तीच्या माहितीप्रमाणे, दुर्धर रोगाचा संसर्ग झाला असेल तर, त्या व्यक्तीने ते पुस्तक ग्रंथालयात परत न करता ग्रंथालयाच्या प्रभारी व्यक्तीस, त्या पुस्तकास अशा रीतीने संसर्ग झाला असल्याबद्दल नोटीस दिली पाहिजे.

(४) पोट-नियम (३) अन्वये देण्यात आलेली नोटीस मिळाल्यावर ग्रंथालयाच्या प्रभारी व्यक्तीने ते पुस्तक जंतुविरहित करण्याची व ग्रंथालयाकडे परत केले जाण्याची व्यवस्था केली पाहिजे किंवा ते नष्ट करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**४९.** (१) एखादी व्यक्ती मागील सहा आठवड्यात एखाद्या घरात किंवा घराच्या भागात दुर्धर रोगाने आजारी होती हे माहीत असणाऱ्या व उक्त घरात किंवा घराच्या भागात राहण्याचे बंद करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने,— घराचा भोगवटा करण्याचे बंद करणाऱ्या व्यक्तीने त्या ठिकाणी नुकताच दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे मालकास कळवले पाहिजे आणि ते घर जंतुविरहित केले पाहिजे.

(अ) ते घर किंवा घराचा भाग आणि रोगसंक्रमित राहण्याची शक्यता असेल अशा त्यातील सर्व वस्तू वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याचे किंवा अन्य एखाद्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे समाधान होईल अशा रीतीने जंतुविरहित केल्या पाहिजेत आणि तसे केल्याचे प्रमाणित करणारे उक्त अधिकाऱ्याच्या किंवा वैद्यक व्यवसायीच्या सहीचे प्रमाणपत्र मिळवले पाहिजे ;

(ब) त्या घराच्या किंवा घराच्या भागाच्या मालकास, पूर्वी रोग अस्तित्वात असल्याची नोटीस दिली पाहिजे ; आणि

(क) मालकाने, त्या घरात किंवा घरांच्या भागात मागील सहा आठवड्यात दुर्धर रोग झालेली एखादी व्यक्ती होती किंवा कसे असा प्रश्न विचारल्यास त्या प्रश्नाचे खरे व बिनचूक उत्तर दिले पाहिजे.

(२) वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने, कोणत्याही घरात एखादी व्यक्ती दुर्धर रोगाने आजारी असल्याचे त्यास माहीत झाल्यावर, अशा घराच्या भोगवटादारास आणि तसेच, मालकासही या नियमाच्या तरतुदींची नोटीस दिली पाहिजे.

**५०.** दुर्धर रोगाने आजारी असताना मरण पावलेल्या व्यक्तीचे प्रेत ज्या जागेत पडलेले असेल अशी कोणतीही जागा ताब्यात असणाऱ्या किंवा नियंत्रणाखाली असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, अन्य व्यक्तींचा उक्त प्रेताशी विनाकारण संपर्क येऊ नये किंवा त्यांनी प्रेताजवळ जाऊ नये म्हणून, वाजवीरीत्या शक्य असतील असे सर्व उपाय योजले पाहिजेत. दुर्धर रोग झालेल्या व्यक्तीच्या देहाशी संपर्क येण्याचे टाळणे.

**५१.** (१) कोणत्याही व्यक्तीने, वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याच्या लेखी मंजुरीशिवाय, सार्वजनिक शवघराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेत, दुर्धर रोगाने आजारी असताना मरण पावलेल्या कोणत्याही व्यक्तीचे प्रेत बारा तासांपेक्षा अधिक काळपर्यंत ठेवता कामा नये. विवक्षित बाबतीत प्रेतांची विल्हेवाट लावणे.

(२) सार्वजनिक शवघरात न ठेवलेले असे कोणतेही प्रेत पूर्वोक्त मंजुरीशिवाय बारा तासांपेक्षा अधिक काळपर्यंत विल्हेवाट न लावता तसेच पडून राहील किंवा कोणत्याही व्यक्तीचे प्रेत कोणत्याही इमारतीत तिच्यामधील किंवा लगतच्या किंवा शेजारच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका पोचेल अशा रीतीने तसेच ठेवण्यात येईल तर, दंडाधिकाऱ्यास, आयुक्ताकडून अर्ज आल्यावर, विनिर्दिष्ट कालावधीच्या आत उक्त प्रेत नेण्याविषयी व त्याची विल्हेवाट लावण्याविषयी आदेश देता येईल, आणि असा आदेश देण्यात आल्यावर, मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी किंवा मित्रांनी आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीच्या आत उक्त प्रेताची विल्हेवाट लावण्याचे काम हाती घेतले नाही किंवा विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली नाही तर आयुक्ताने, अशा प्रेताची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली पाहिजे, अशी व्यवस्था करण्यासाठी आयुक्तास वाजवीरीत्या आलेला कोणताही खर्च, आयुक्ताने गरीबीच्या कारणावरून असा खर्च वसूल करण्याचे सोडून दिले असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, प्रेताची विल्हेवाट लावण्याचा खर्च देण्यास कायदेशीररीत्या जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने दिला पाहिजे.

विवक्षित बाबतीत रुग्णालयात मरण पावलेल्या व्यक्तींना तेथून नेण्यावर निर्बंध.

**५२.** (१) कोणतीही व्यक्ती दुर्धर रोगाने आजारी असताना रुग्णालयात किंवा आजाऱ्यांची सोय करण्यासाठी नेमून दिलेल्या अन्य जागेत मरण पावेल, आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी किंवा अन्य एखादा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी त्याच्या मते रोगाचा फैलाव होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, ते प्रेत थेट शवघरात किंवा प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी राखून ठेवलेल्या जागेत नेण्याच्या प्रयोजनाखेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी हलवणे इष्ट नाही असे प्रमाणपत्र देईल तर, कोणत्याही व्यक्तीने अशा प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी ते प्रेत रुग्णालयातून किंवा अशा जागेतून हलवणे कायदेशीर असणार नाही.

(२) वर सांगितलेल्या बाबतीत, विल्हेवाट लावण्याच्या प्रयोजनासाठी प्रेत रुग्णालयातून किंवा अन्य जागेतून किंवा ज्या शवघरात ते नेण्यात आले असेल त्या शवघरातून हलवण्यात येईल तेव्हा, ते ताबडतोब प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी राखून ठेवलेल्या जागेत थेट नेले पाहिजे आणि त्या ठिकाणी त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

**दुर्धर रोगाच्या उद्रेकास आळा घालण्यासाठी विशेष उपाय**

विशेष उपाय.

**५३.** (१) कलम ३१९ अन्वये आयुक्ताने योजावयाचे विशेष उपाय आणि करावयाचे तात्पुरते विनियम यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(अ) राहण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या रोगसंक्रामित इमारतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात नेहमी किंवा तात्पुरते राहणाऱ्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना ती इमारत किंवा तिचा भाग सोडून जाण्यास भाग पाडावे ; परंतु सर्व संबंधित व्यक्तींना राहण्यासाठी इतरत्र पुरेशी सोय उपलब्ध असली पाहिजे किंवा ती करण्यात आली पाहिजे ;

(ब) विनिर्दिष्ट क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या, राहणाऱ्या किंवा ते सोडून जाणाऱ्या व्यक्तींना सक्तीने देवी काढणे किंवा रोगप्रतिबंधक लस टोचणे ;

(क) विनिर्दिष्ट क्षेत्रात बाहेरून येणाऱ्या किंवा त्या क्षेत्रातील कोणत्याही रोगसंक्रमित इमारतीला लागून असलेल्या कोणत्याही इमारतीत राहणाऱ्या व्यक्तींची वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करून घेणे आणि आवश्यक असल्यास, अशा व्यक्तीचे कपडे, बिस्तरे किंवा रोगाचा संसर्ग झाल्याचा संशय असेल अशा अन्य वस्तू जंतुविरहित करून घेणे, अशा व्यक्तीचे पत्ते लिहून घेणे आणि अशा व्यक्तींनी, जास्तीत जास्त दहा दिवसांच्या कालावधीपर्यंत, विनिर्दिष्ट वेळी व जागी वैद्यकीय तपासणीसाठी रोज हजर राहण्यास त्यांना भाग पाडणे ;

(ड) कोणत्याही जागेत—मग ती सार्वजनिक असो किंवा खाजगी असो—किंवा कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी पन्नासपेक्षा अधिक व्यक्तींनी जमण्यास, सामान्यत: किंवा कोणत्याही एखाद्या विशिष्ट बाबतीत विशेष आदेशाद्वारे, मनाई करणे ;

(ई) कोणतेही नाट्यगृह, सिनेमागृह किंवा करमणुकीची अन्य जागा विनिर्दिष्ट करावयाच्या कालावधीपर्यंत बंद ठेवणे ;

(फ) एखाद्या शाळेच्या प्रभारी प्राधिकाऱ्यांस लेखी नोटीस देऊन, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत अशी शाळा बंद ठेवणे ;

(ग) ज्यांना दुर्धर रोगाचा संसर्ग झाला आहे किंवा ज्यांच्यामुळे अन्य व्यक्तींना अशा कोणत्याही रोगाचा संसर्ग होण्याचा संभव आहे अशा व्यक्तींच्या हालचालींवर निर्बंध घालणे ;

(ह) दुर्धर रोगाचा संसर्ग पोचलेला किंवा संसर्ग दोष राहण्याचा संभव असलेला किंवा ज्यामुळे व्यक्तींना अशा कोणत्याही रोगाचा संसर्ग पोचण्याचा संभव आहे असा कोणताही माल किंवा वस्तू विनिर्दिष्ट क्षेत्रात आयात करण्यावर किंवा अशा क्षेत्रातून निर्यात करण्यावर किंवा अशा क्षेत्रात त्याची वाहतूक करण्यावर निर्बंध घालणे, किंवा अशा कोणत्याही मालाचा किंवा वस्तूंचा नाश करणे ;

(आय) सडक मार्गाने किंवा रेल्वेने शहरातून, निर्यात केलेले किंवा शहरात आयात केलेले कोणतेही धान्य किंवा इतर खाद्यपदार्थ, कापड किंवा कपडे, शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही जागी, आवश्यक असल्यास, तपासणे, खाली उतरवणे आणि जंतूविरहित करणे ;

(ज) सर्व किंवा कोणतेही विद्यमान हाट व बाजार बंद करणे आणि ज्या जागी हाट किंवा बाजार भरवता येईल अशा विशेष जागा नेमून देणे.

(२) सक्तीने देवी काढण्यास किंवा लस टोचण्यास भाग पाडणारा कोणताही विनियम अंमलात असेल तेव्हा, त्या विनियमास अनुसरून ज्या व्यक्तीस देवी काढावयाच्या असतील किंवा लस टोचावयाची असेल अशा व्यक्तीस, किंवा ज्या मुलास देवी काढावयाच्या असतील किंवा लस टोचावयाची असेल अशा मुलाची काळजी घेणाऱ्या व्यक्तीस, दुसऱ्या वर्गाच्या अधिकारांपेक्षा कमी नसतील अशा अधिकारांचा वापर करणाऱ्या, दंडाधिकाऱ्यापुढे, अशा रीतीने देवी काढणे किंवा लस टोचणे हे, यथास्थिती, आपल्या आरोग्यास किंवा मुलांच्या आरोग्यास अपायकारक होईल असे आपल्याला वाटते असे प्रतिज्ञापन करता येईल, आणि दंडाधिकाऱ्यास वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांस नोटीस दिल्यानंतर, आणि त्याने किंवा त्याच्या वतीने केलेल्या, कोणत्याही अभिवेदनाच्या सुनावणीनंतर, अशा व्यक्तीस किंवा मुलास देवी काढण्यापासून किंवा लस टोचण्यापासून सूट देता येईल ; मात्र दंडाधिकारी निदेश देईल अशा वर्णनाच्या जागी व अशा कालावधीपर्यंत आणि अशा निर्बंधाच्या, तसे निर्बंध असल्यास, अधीन राहून वर सांगितलेल्या व्यक्तीने व तिच्या कुटुंबातील व्यक्तींनी वेगळे राहिले पाहिजे या शर्तीवर अशी सूट देता येईल.

(३) आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, या नियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा या नियमास अनुसरून केलेल्या कोणत्याही विनियमान्वये कोणत्याही मालमत्तेचा नाश केल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तींचे बरेच नुकसान झाले असेल अशा व्यक्तींस त्याबद्दल भरपाई देता येईल ; परंतु, आयुक्ताने परवानगी दिली असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबतीत, उक्त नियमात किंवा विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या, अधिकारांचा वापर केल्यामुळे झालेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल किंवा हानीबद्दल भरपाई मिळण्यासाठी कोणताही दावा करता येणार नाही.

## प्रकरण पंधरा

## बाजार आणि कत्तलखाने

१. (१) आयुक्तास,—

खाजगी बाजाराकडे जाण्याचे मार्ग आणि भोवतालची जागा यासंबंधी तरतुदी.

(अ) कोणत्याही खाजगी बाजाराच्या हद्दी निश्चित करता येतील किंवा ठरवता येतील, किंवा अशा बाजाराचे कोणते भाग अशा बाजाराकडे जाणाऱ्या किंवा बाजारात असलेल्या विद्यमान प्रवेशमार्गाचे, रस्त्यांचे आणि वाटांचे भाग होतील, ते जाहीर करता येईल.

(ब) अशा बाजाराच्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, लेखी नोटिशीद्वारे, अशा मालकास किंवा भोगवटादारास,—

(एक) आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने, अशा बाजाराकडे जाणारे किंवा बाजारात असलेल्या आयुक्तास योग्य वाटतील असे प्रवेशमार्ग, रस्ते, मार्ग किंवा वाटा आखण्यास, बांधण्यास, त्यात फेरफार करण्यास, त्या स्वच्छ करण्यास, रुंद करण्यास, त्यांना फरसबंदी करण्यास, त्यात नाली बांधण्यास आणि दिवाबत्ती करण्यास ;

(दोन) अशा बाजारात जमणाऱ्या व्यक्तींच्या उपयोगासाठी आयुक्तास योग्य वाटेल अशा सोयींची तरतूद करण्यास, आणि

(तीन) बाजाराच्या इमारतीत, किंवा दुकाने व गाळे धरून अशा इमारतीच्या कोणत्याही भागात आयुक्तास योग्य वाटेल अशी हवा खेळती राहण्याची व प्रकाशाची पुरेशी तरतूद करण्यास ;

भाग पाडता येईल.

(२) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, अशा मालकास किंवा भोगवटादारास, अशा बाजाराकडे जाणारे किंवा बाजारात असलेले प्रवेशमार्ग, रस्ते, मार्ग आणि वाटा, तसेच, बाजारात, जमणाऱ्या व्यक्तींच्या उपयोगासाठी, तरतूद केली असेल अशा अन्य सोयी, योग्य स्थितीत ठेवण्यास फर्माविता येईल.

खाजगी बाजाराच्या इमारतीत व कत्तलखान्यात योग्य रीतीने फरसबंदी करण्यास आणि गटारे बांधण्यास भाग पाडण्यासंबंधी तरतुदी.

२. आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही खाजगी बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या मालकास, मक्तेदारास किंवा भोगवटादारास पुढील गोष्टींची व्यवस्था करण्यास भाग पाडता येईल :—

(अ) बाजाराच्या इमारतीच्या, बाजाराच्या जागेच्या किंवा कत्तलखान्याच्या सर्व जमिनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची पातळी वर घेणे किंवा त्यावर घडवलेल्या दगडाची किंवा अन्य योग्य सामग्रीची फरसबंदी करणे ;

(ब) आयुक्तास, आवश्यक वाटेल अशा सामग्रीची, आकाराची व वर्णनाची अशा पातळीवर आणि अशा, पातमुखाची गटारे बाजाराच्या इमारतीत, बाजारांच्या जागेत किंवा कत्तलखान्यात, किंवा त्यातून बाहेर पडतील, अशा रीतीने बांधणे ;

(क) अशा बाजाराची इमारत, बाजाराची जागा किंवा कत्तलखाना, स्वच्छ व चांगल्या स्थितीत ठेवण्याची पाणीपुरवठ्याची, तरतूद करणे ;

(ड) कोणत्याही खाजगी बाजारातील कोणतेही दुकान, गाळा, छपरी, उभ्याने माल विकण्याची जागा किंवा कोणतेही बांधकाम यात आयुक्तास आवश्यक वाटेल अशा रीतीने फेरफार करणे किंवा सुधारणा करणे ;

(ई) आयुक्तास, आवश्यक व इष्ट वाटेल अशा जागी व अशा रीतीने कोणताही शौचकूप, संडास, किंवा मुत्री किंवा अन्य कोणतीही स्वच्छताविषयक व्यवस्था करणे किंवा बांधणे ; आणि

(फ) सार्वजनिक आरोग्याच्या किंवा स्वच्छतेच्या दृष्टीने त्याच्या मते आवश्यक असतील अशा अन्य कोणत्याही उपाययोजना करणे.

## प्रकरण सोळा

## परिवहन उपक्रम

### भाडी आणि आकार

भाडी आणि आकार यांची यादी प्रदर्शित करणे.

**१.** त्या वेळी बसवण्यात आलेली सर्व भाडी आणि आकार यांची त्याबाबत महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा भाषेत किंवा भाषांत तयार केलेली छापील यादी लोकांच्या वाहतुकीसाठी परिवहन उपक्रमाकडून वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक वाहनाच्या आतील बाजूस एखाद्या ठळक जागी लावण्यात आली पाहिजे.

**२.** परिवहन समिती भाड्याच्या यादीस जोडावयाच्या नोटिशीद्वारे विहित करील अशा व्यक्तींना परिवहन सेवेच्या विहित केलेल्या मार्गावरील किंवा मार्गाजवळील, ठिकाणी, आणि उक्त समिती विहित करील अशा रीतीने व अशा विनियमान्वये भाडी व आकार दिले पाहिजेत.

## प्रकरण सतरा

## जीवनविषयक आकडेवारी

### मृत्यू प्रमाणपत्राचे नमुने

नमुन्यांची तरतूद करणे.

कलम ३६९ च्या प्रयोजनांसाठी आयुक्ताने मृत्यू प्रमाणपत्रांच्या छापील नमुन्यांची तरतूद केली पाहिजे आणि शहरांत राहणाऱ्या कोणत्याही यथोचितरीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने अर्ज केल्यावर, त्यास असे नमुने विनामूल्य पुरवले पाहिजेत.

## प्रकरण अठरा

## ज्या वस्तू ठेवण्यासाठी आणि जे धंदे व व्यवसाय करण्यासाठी लायसन्सची आवश्यकता आहे अशा वस्तू, धंदे व व्यवसाय

### भाग एक

### लायसन्सशिवाय कोणत्याही जागेत किंवा जागेवर ठेवता येणार नाहीत अशा वस्तू

डायनामाईट.

सुरुंगाची दारू.

फल्मिनेट ऑफ मर्क्युरी.

गन-कॉटन.

नायट्रो-ग्लिसरीन.

फॉस्फरस.

**भाग दोन**

लायसन्सशिवाय कोणत्याही एका वेळी कोणत्याही जागेत किंवा जागेवर ज्या कोणत्याही वस्तू त्यांच्यासमोर अनुक्रमे दर्शविलेल्या कमाल परिमाणापेक्षा अधिक परिमाणात ठेवता येणार नाहीत अशा वस्तू

| वस्तू<br>(१) | लायसन्सशिवाय कोणत्याही एका वेळी ठेवता येईल असे कमाल परिमाण<br>(२) |
|---|---|
| विडीची पाने .. .. .. .. | ४ हंड्रेडवेट. |
| कापूर .. .. .. .. | १/२ हंड्रेडवेट. |
| सेल्युलॉईड<br>सेल्युलॉईडचा माल .. .. .. | ४ हंड्रेडवेट. |
| चलचित्रपट .. .. .. | २० पौंड. |
| खोबरे .. .. .. .. | ४ हंड्रेडवेट. |
| खराब कापूस व गाळ कापूस .. .. | ४ हंड्रेडवेट. |
| सरकी .. .. .. .. | १२ हंड्रेडवेट. |
| वाळलेली पाने (पत्रावळी इत्यादी). . .. | ४ हंड्रेडवेट. |
| बंदुकीची दारू .. .. .. .. | ५ पौंड. |
| आगपेट्या .. .. .. .. | ५ ग्रोस पेट्या |
| अपेय स्पिरीट व विप्रकृत स्पिरीट .. | १० गॅलन. |
| रंग .. .. .. .. | ५ हंड्रेडवेट. |
| विक्रीसाठी, किंवा घरगुती उपयोगाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी ठेवलेले जुने कागद (रद्दी), जुनी वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, इत्यादी धरून. | ४ हंड्रेडवेट. |
| पेट्रोलियम अधिनियम, १९३४ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले पेट्रोलियम. | १० गॅलन. |
| तेल (अन्य प्रकारचे) .. .. .. | २० गॅलन. |
| सरकीव्यतिरिक्त अन्य गळित धान्ये .. | १ टन. |
| गंधक .. .. .. .. | १/२ हंड्रेडवेट. |
| टार, पिच, डांबर किंवा बिट्यूमेन .. | १/२ हंड्रेडवेट. |
| टर्पेटाईन .. .. .. .. | १० गॅलन. |
| व्हर्निश .. .. .. .. | ४० हंड्रेडवेट. |

## भाग तीन

कोणत्याही जागेत किंवा जागेवर विक्रीसाठी, किंवा घरगुती उपयोगाव्यतिरिक्त अन्य उपयोगासाठी लायसन्सशिवाय ठेवता येणार नाहीत अशा वस्तू (—) मग त्या एकावेळी कोणत्याही परिमाणात ठेवलेल्या असोत किंवा अशा वस्तूसमोर अनुक्रमे दर्शवलेल्या कमाल परिमाणापेक्षा अधिक परिमाणात कोणत्याही एकावेळी ठेवलेल्या असोत.

| वस्तू | लायसन्सशिवाय कोणत्याही एका वेळी ठेवता येईल असे कमाल परिमाण, कोणतेही असल्यास |
|---|---|
| (१) | (२) |
| बांबू .. .. .. .. .. | १० हंड्रेडवेट. |
| हाडे .. .. .. .. .. | .. |
| काथ्या .. .. .. .. .. | .. |
| कोळसा .. .. .. .. .. | .. |
| दगडी कोळसा .. .. .. .. | .. |
| कोक .. .. .. .. .. | .. |
| चरबी .. .. .. .. .. | .. |
| जळाऊ लाकूड .. .. .. .. | .. |
| दारूकाम .. .. .. .. .. | .. |
| मासळी (सुकी) .. .. .. .. | .. |
| गवत (सुके) .. .. .. .. | .. |
| पोती .. .. .. .. .. | .. |
| केस .. .. .. .. .. | .. |
| वाळलेले गवत व वैरण .. .. .. | .. |
| ताग .. .. .. .. .. | .. |
| गोणपाट .. .. .. .. .. | .. |
| कातडी (वाळवलेली) .. .. .. | .. |
| कातडी (ओली) .. .. .. .. | .. |
| खूर .. .. .. .. .. | .. |
| शिंगे .. .. .. .. .. | .. |
| खोकी किंवा लाकडी पेट्या किंवा पिंपे (तयार करणे व साठवणे). | .. |
| चिंध्या .. .. .. .. .. | .. |
| चामडी .. .. .. .. .. | .. |
| इमारती लाकूड .. .. .. .. | .. |
| लोकर (कच्ची) .. .. .. .. | ३ हंड्रेडवेट. |

**भाग चार**

कोणत्याही जागेत किंवा जागेवर किंवा लायसन्सशिवाय जे धंदे किंवा धंद्याशी संबंधित असलेली जी कामे करता येणार नाहीत असे धंदे किंवा अशी कामे.

लोकांनी खाण्यासाठी ( घरगुती उपयोगाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी ) पाव, बिस्किटे किंवा पिठाचे बनवलेले अन्य पदार्थ भाजणे किंवा तयार करणे.

धातूंचे ओतकाम.

मसाला तयार करणे.

निळीत किंवा अन्य रंगात कापड किंवा सूत रंगवणे.

विद्युत विलेपन.

खाद्यगृहे चालवणे.

खाद्यगृहे म्हणून आधीच लायसन्स मिळालेल्या जागेव्यतिरिक्त अन्य जागी मिठाईची दुकाने चालवणे.

केस कापण्याची दुकाने किंवा न्हाव्याची दुकाने चालवणे.

ओली किंवा वाळलेली कातडी किंवा चामडी कमावणे, दाबणे किंवा आवेष्टित करणे.

पुढीलपैकी कोणत्याही वस्तू निर्माण करणे, आवेष्टित करणे, दाबणे, स्वच्छ करणे, साफ करणे, वितळवणे किंवा कोणत्याही प्रक्रियेने तयार करणे —

वायुमिश्रितपेय.

हाडे.

विटा किंवा कौले.

जनावराच्या आतड्यापासून केलेली तार.

कापूस किंवा खराब कापूस किंवा सरकी.

दाबलेला दगडी कोळसा.

डांबर.

डायनामाईट.

चरबी.

दारूकाम.

बर्फ, आईसकँडी, आईसफ्रूट किंवा आईस्क्रीम.

चुना.

आगपेट्या.

कागद.

**भाग चार** - चालू

रबरी माल.

तपकीर.

साबण.

साखर, खडीसाखर.

टार.

वनस्पती तेल.

## प्रकरण एकोणीस

दंड

१. जो कोणी,— दंडाची शिक्षा होण्याजोगे विवक्षित अपराध.

(क) पुढील कोष्टकातील पहिल्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नियमांच्या, पोट-नियमांच्या आणि खंडांच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन करील ; किंवा

(ख) उक्त नियम, पोट-नियम किंवा खंड यापैकी कोणत्याही नियमान्वये, पोट-नियमान्वये किंवा खंडान्वये त्यास कायदेशीररीत्या देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यास कसूर करील ;

त्यास, अशा प्रत्येक अपराधाबद्दल, त्याबाबत उक्त कोष्टकाच्या दुसऱ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या रकमेच्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

| नियम, पोट-नियम किंवा खंड<br>(१) | लादता येईल असा दंड.<br>(२) |
|---|---|
| **प्रकरण आठ** | |
| १, २ (२), ५, २५ .. .. .. .. .. | पन्नास रुपये. |
| २९ (१), २९ (२) .. .. .. .. .. | शंभर रुपये. |
| **प्रकरण नऊ** | |
| २ (३), २ (४), ४, ९ (२), ११ (१), १४ (१), १५, १७ (१), १८, १९ (२), १९ (३). | पन्नास रुपये. |
| १ (१), २ (१), ५ (क), ६, १०, १७ (२) .. .. .. | शंभर रुपये. |
| २, ७ (१), ७ (२), ८, १२, १३, १६, १९ (१), १९ (४) .. .. .. | दोनशे रुपये. |

| नियम, पोट-नियम किंवा खंड (१) | लादता येईल असा दंड. (२) |
|---|---|
| **प्रकरण दहा** | |
| ३ (१), ६, ७, ११ (२), १८ (२) .. .. .. .. | पन्नास रुपये. |
| २ (२), २ (३), ८ (१), १३, १४ .. .. .. .. | शंभर रुपये. |
| २ (१), ३ (१), १८ (१) .. .. .. .. .. | दोनशे रुपये. |
| **प्रकरण अकरा** | |
| २८८ (१) (ङ), २८८ (२) .. .. .. .. .. | वीस रुपये. |
| **प्रकरण बारा** | |
| १२ (१), १२ (२), १२ (३) .. .. .. .. .. | दहा रुपये. |
| ८ (२), १३ .. .. .. .. .. | पन्नास रुपये. |
| ८ (१) .. .. .. .. .. | शंभर रुपये. |
| ११ .. .. .. .. .. | दोनशे रुपये. |
| १० .. .. .. .. .. | पाचशे रुपये. |
| ६ (१) .. .. .. .. .. | एक हजार रुपये. |
| **प्रकरण चौदा** | |
| १, २, १३ (१), १३ (२), ३२ (२) .. .. .. .. | वीस रुपये. |
| ३, ५ (१), ७, १०, ११ (१), ११ (२), १४, १७, १८ (१), २१ (१), २४, २८ (१), ३४ (२), ४१, ४८ (१), ४८ (२), ४८ (३), ४८ (४). | पन्नास रुपये. |
| ८, १८ (२), २२ (१), २३, ३३ (१), ३५ (२), ३५ (३), ३६, ३८ (२), ३९ (१), ३९ (२), ३९ (४), ४०, ४४, ४५, ४६ (२), ४९ (१), ४२ (१), ४२ (२), ५०, ५१ (१). | शंभर रुपये. |
| १२, १५, २९ (१), ३४ (२), ४६ (१), ५२ (१), ५२ (२) .. .. | दोनशे रुपये. |
| १६ (१), १६ (२), २७ (१), ४७ .. .. .. .. | दोनशे पन्नास रुपये. |
| २०, २९ (२), ३१, ३९ (३), ४३ (१), ४३ (३), ४४ (२), ४४ (३) .. | पाचशे रुपये. |
| २५ (३) .. .. .. .. .. | एक हजार रुपये. |
| **प्रकरण पंधरा** | |
| १ (१) (ख), १ (२), २ .. .. .. .. .. | दोनशे रुपये. |

अपराध करणे चालू असेल अशा बाबतीत.

**२.** जो कोणी,—

(अ) पुढील कोष्टकातील पहिल्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नियमांच्या, पोट-नियमांच्या आणि खंडांच्या कोणत्याही तरतुदी किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल त्यास सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर ; किंवा

(ब) उक्त कलमे, पोट-कलमे किंवा खंड यापैकी कोणत्याही कलमान्वये, पोट-कलमान्वये किंवा खंडान्वये त्यास कायदेशीररीत्या देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल त्यास दोषी ठरवण्यात आल्यावर ; उक्त तरतुदींचे उल्लंघन करण्याचे चालू ठेवील किंवा उक्त आदेशाचे अनुपालन करण्यात हयगय करण्याचे चालू ठेवील किंवा, यथास्थिती, उक्त तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही काम किंवा कोणतीही गोष्ट काढून टाकण्यात किंवा दुरुस्त करण्यात कसूर करील, त्यास, ज्या ज्या दिवशी तो असा अपराध करण्याचे चालू ठेवील अशा प्रत्येक दिवसाबद्दल, त्याबाबत उक्त कोष्टकाच्या दुसऱ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या रकमेच्या द्रव्य दंडाची शिक्षा देण्यात येईल.

| नियम, पोट-नियम किंवा खंड (१) | प्रत्येक दिवसाबद्दल लादता येईल असा द्रव्यदंड (२) |
|---|---|
| **प्रकरण नऊ** | |
| २ (३), २ (४), ४, ९ (२), ११ (१), १४ (१), १५, १७ (१). . . . | पाच रुपये. |
| १ (१), २ (१), ३, ५ (क), ६, १०, १७ (२), १८, १९ (२), १९ (३). . | दहा रुपये. |
| १२, १३ . . . . . . . . . . | वीस रुपये. |
| ७ (१), ७ (२), १९ (१), १९ (४) . . . . . . . . | पन्नास रुपये. |
| **प्रकरण दहा** | |
| ७, ११ (२), १८ (२) . . . . . . . . . . | पाच रुपये. |
| ६, ८ (१) . . . . . . . . . . | दहा रुपये. |
| १८ (१) . . . . . . . . . . | पन्नास रुपये. |
| **प्रकरण अकरा** | |
| २८८ (१) (ड), २८८ (२) (ख) . . . . . . . . | पाच रुपये. |
| **प्रकरण बारा** | |
| १२ (२), १२ (३) . . . . . . . . . . | पाच रुपये. |
| ८ (२), १३ . . . . . . . . . . | दहा रुपये. |
| ८ (१) . . . . . . . . . . | वीस रुपये. |
| ६ (१), १० . . . . . . . . . . | शंभर रुपये. |

| नियम, पोट-नियम किंवा खंड | प्रत्येक दिवसाबद्दल लादता येईल असा द्रव्यदंड |
|---|---|
| (१) | (२) |
| **प्रकरण चौदा** | |
| ७, ८, १३ (१), १३ (२), २१ (१), ३२ (२) .. .. .. | पाच रुपये. |
| १, २, ३, ५ (१), ८, १४, १७, १८ (१), २८ (१) .. .. | दहा रुपये. |
| ११ (१), ११ (२), १५, २२ (१) .. .. .. .. | पंधरा रुपये. |
| १२, १६ (२), १८ (२), २३, २४ .. .. .. .. | वीस रुपये. |
| २९ (१), ४०, ४५, ४७ .. .. .. .. .. | पन्नास रुपये. |
| २०, २७ (१), २९ (२), ३१ .. .. .. .. .. | शंभर रुपये. |
| २५ (३) .. .. .. .. .. | पाचशे रुपये. |
| **प्रकरण पंधरा** | |
| २ .. .. .. .. .. | पन्नास रुपये. |

## नमुने

## नमुना 'अ'

(प्रकरण १, नियम ९ पहा.)

### नामनिर्देशन पत्र

प्रभागाचे नाव व क्रमांक .. .. .. ..

उमेदवाराचे नाव .. .. .. ..

वडिलांचे/पतीचे नाव .. .. .. ..

वय .. .. .. ..

पत्ता .. .. .. ..

ज्या प्रभागातील मतदारांच्या यादीत उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यात आले आहे तो प्रभाग.

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील उमेदवाराचा क्रमांक ..

जमात व जात (ही माहिती उक्त [1][अनुसूचित जातींच्या सदस्यां-
साठी ] [2][राखून ठेवलेल्या जागेसाठी निवडणूक असेल तेव्हा]
[3][अनुसूचित जातीचा सदस्य असलेल्या] उमेदवाराने भरावी ).

सूचकाचे नाव . . . . . . . .

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील सूचकाचा क्रमांक . . . .

सूचकाची सही . . . . . . . .

अनुमोदकाचे नाव . . . . . . . .

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील अनुमोदकाचा क्रमांक . .

अनुमोदकाची सही . . . . . . . .

**उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

मी, याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, हे नामनिर्देशन मला मान्य आहे.

दिनांक : उमेदवाराची सही.

(ही माहिती आयुक्ताने भरावी.)

**स्वाधीन केल्याबाबत प्रमाणपत्र**

अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र दिनांक . . . . . . . . . . . . . . रोजी . . . . . . . . . . . . . . वाजता माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन करण्यात आले.

आयुक्ताची सही.

---

[1] मूळ शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २, अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

[2] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[3] मूळ शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २, अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

## नमुना ‘ब’

(प्रकरण १, नियम २५ पहा.)

### मतपत्रिकेचा नमुना

### मतपत्रिकेच्या दर्शनी बाजूचा नमुना

स्थळ प्रत

अनुक्रमांक

प्रभाग . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

मतदान केंद्राचे नाव आणि क्रमांक . . . . . . .

मतदारांच्या यादीतील मतदाराचा क्रमांक . . . .

मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा . . . . .

बाह्य प्रत

दर्शनी बाजू

| उमेदवाराचे नाव व निशाणी | फुली |
|---|---|
| | |
| | |
| | |

बाह्यप्रतीची मागील बाजू

### सूचना

[१] [१. तुम्हाला एक मत आहे.]

२. फुली ( × ) करून मत दर्शवण्यात यावे. प्रत्येक फुली म्हणजे एक मत होय.

३. कोणत्याही एका उमेदवाराच्या नावापुढे एकापेक्षा अधिक फुल्या करू नयेत.

[२] [ * * * * * * * * * ]

अनुक्रमांक

---

**टीप.—** मतपत्रिकेच्या बाह्यप्रतीची संपूर्ण जागा, उमेदवारांची नावे व निशाण्या आणि मते नोंदण्यासाठी असलेली रिकामी जागा यांच्या चौकटींनी व्यापलेली असणे महत्त्वाचे आहे.

१ मूळ नोंद १ ऐवजी ही नोंद, सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (ब) (एक) अन्वये दाखल करण्यात आली.

२ नोंद ४ ही, वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (दोन) अन्वये वगळण्यात आली.

## नमुना 'क'

(प्रकरण १, नियम २६ पहा.)

### प्रदत्त मतांची यादी

**मतदान केंद्र**

| प्रभागाचे नाव<br>(१) | मतदाराचे नाव<br>(२) | मतदाराच्या यादीतील क्रमांक<br>(३) | नोंदवलेल्या मतांची संख्या<br>(४) | मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## नमुना 'ड'

( प्रकरण १, नियम २७ पहा )

### आक्षेपित मतांची यादी

स्वाक्षरी पत्र क्रमांक : . . . . . . . . . . . . . . . . . . .

| मतदारांच्या यादीतील क्रमांक<br>(१) | नाव<br>(२) | मतदार साक्षर असेल तर त्याची सही आणि निरक्षर असेल तर त्याच्या अंगठ्याचा ठसा<br>(३) | ओळख पटवणारा असल्यास त्याचे नाव<br>(४) |
|---|---|---|---|
| | | | |

(प्रत्येक बाबतीत) मतदान केंद्राध्यक्षाचा आदेश.

## नमुना 'ई'

(प्रकरण १, नियम २९ पहा.)

मतदान केंद्राध्यक्ष मतदान अधिकारी किंवा मतदान प्रतिनिधी [1][ किंवा इतर लोकसेवक ] यास ज्या मतदान केंद्रावर काम करण्यासाठी नेमण्यात आले आहे त्या मतदान केंद्रावर मतदान करण्याचा त्यास हक्क देणारे प्रमाणपत्र

अ.ब. यांची ·············· प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील क्रमांक ·········· चा मतदार म्हणून रीतसर नोंदणी करण्यात आली आहे आणि मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी/ मतदान प्रतिनिधी [2][ इतर लोक सेवक ] म्हणून ·············· ·········· या मतदान केंद्रावर काम करण्यासाठी त्यांची रीतसर नेमणूक करण्यात आली असून त्यांना त्या मतदान केंद्रावर मतदान करण्याचा हक्क आहे.

नगरपालिका आयुक्त,

दिनांक : ··············· शहर.

---

१ १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ (२) (अ) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

## नमुना 'फ'

(प्रकरण १, नियम ३१ पहा)

### मतदान केंद्राध्यक्षाच्या विवरणांसोबत पाठवावयाच्या विवरणपत्राचा नमुना

प्रभागाचे नाव

मतदान केंद्राचे नाव

| मतदारांच्या यादीत दर्शविल्याप्रमाणे उक्त मतदान केंद्रासाठी असलेल्या मतदारांची एकूण संख्या | मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाधीन केलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या | वापरलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या | वापरलेल्या मतपत्रिकांचा हिशेब | | | मतपेटीत शिल्लक असावयास पाहिजेत अशा मतपत्रिकांची संख्या | न वापरलेल्या मतपत्रिकांची संख्या | वापरलेल्या मतपेट्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अन्य मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क असलेले मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि मतदान प्रतिनिधी यांच्या मतदानासाठी वापरलेल्या मतपत्रिका (नियम २९) | प्रदत्त मतपत्रिका (नियम २६) | खराब झालेल्या मतपत्रिका (नियम २८) | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |

**स्तंभ १.**—मतदारांच्या यादीत तुमच्या मतदान केंद्रासाठी असलेल्या नावांची एकूण संख्या येथे नमूद करावी.

**स्तंभ २.**—आयुक्ताकडून तुम्हास मिळालेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या येथे नमूद करावी.

**स्तंभ ३.**—दिलेल्या मतपत्रिकांच्या स्थळप्रती मोजाव्यात आणि ती संख्या येथे नमूद करावी.

**स्तंभ ४.**—अन्य मतदान केंद्रांत मत देण्याचा हक्क असलेले मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि मतदान प्रतिनिधी यांनी वापरलेल्या मतपत्रिकांच्या स्थळप्रतींची एकूण संख्या येथे नमूद करावी.

**स्तंभ ५.**—प्रदत्त मतांच्या स्थळप्रतींची एकूण संख्या ; या स्थळप्रती कोऱ्या असतील ; नमुना "क" मधील एकूण संख्या या एकूण संख्येशी जुळली पाहिजे.

**स्तंभ ६.**—"रद्द" म्हणून खुणा केलेल्या स्थळप्रतींची एकूण संख्या (नियम २८) ; ही संख्या, मतदान केंद्राध्यक्षाजवळ असलेल्या खराब झालेल्या मतपत्रिकांच्या एकूण संख्येवरून पडताळून पाहिली पाहिजे.

**स्तंभ ७.**—स्तंभ ४, ५ व ६ मधील एकूण संख्यांची बेरीज करून येणारी संख्या स्तंभ ३ मधील एकूण संख्येतून वजा करावी.

**स्तंभ ८.**—न वापरलेल्या मतपत्रिका मोजाव्यात आणि त्यांची एकूण संख्या येथे नमूद करावी.

## नमुना 'ग'

(प्रकरण ८, नियम ४१ पहा)

### मागणीच्या नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब.

राहणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

यांस,

नोटीस देण्यात येते की, . . . . . . . . . . . . . . . . शहर नगरपालिका आयुक्त तुमच्याकडे दिनांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २० , रोजी सुरू होणाऱ्या (किंवा संपणाऱ्या) सहामाहीबद्दल (किंवा तिमाहीबद्दल ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (येथे ज्या जागेबद्दल, वाहनाबद्दल, जनावराबद्दल, धंद्याबद्दल किंवा गोष्टीबद्दल कर वसूल करावयाचा असेल त्याचे वर्णन लिहावे.) तुमच्याकडून येणे असलेल्या रुपये . . . . . . . . . . . . . . . . इतक्या रकमेची मागणी करत आहे ; आणि ही नोटीस, बजावल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त रक्कम . . . . . . . . . . . . येथील नगरपालिका कार्यालयात भरण्यात आली नाही, किंवा ती न भरण्याबद्दल आयुक्ताचे समाधान होईल असे पुरेसे कारण दाखवण्यात आले नाही, तर ती रक्कम खर्चासह वसूल करण्यासाठी अटकावणीचे किंवा जप्तीचे अधिपत्र काढण्यात येईल.

दिनांक . . . . . . . . . . . . . . . (सही)

. . . . . . . . . . . . . शहर,

नगरपालिका आयुक्त.

---

## नमुना 'ह'

(प्रकरण ८, नियम ४२ पहा.)

### अटकावणीच्या किंवा जप्तीच्या अधिपत्राचा नमुना

(अधिपत्र बजावण्याचे काम ज्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले असेल त्या अधिकाऱ्याचे नाव येथे लिहावे.)

यांस,

ज्याअर्थी, श्री. अ. ब., राहणार . . . . . . . . . . . . . . . , यांनी दिनांक . . . . . . . . . २० . . रोजी सुरू होणाऱ्या किंवा संपणाऱ्या सहामाहीबद्दल ( किंवा तिमाहीबद्दल ) समासात निर्दिष्ट केलेल्या * . . . . . . . . . . . . . . . . . . करावद्दल येणे असलेली रक्कम रुपये . . . . . . . . . . . भरलेली नाही, किंवा ती न भरण्याबद्दल माझे समाधान होईल असे पुरेसे कारण दाखवलेले नाही ; आणि उक्त अ. ब. यांच्याकडे उक्त रकमेची रीतसर लेखी मागणी करण्यात आली असून त्या रकमेच्या मागणीची नोटीस त्यांच्यावर बजावल्यापासून पंधरा दिवस होऊन गेले आहेत ;

---

* येथे कराचे वर्णन नमूद करावे.

त्याअर्थी, याद्वारे, तुम्हास असा समादेश देण्यात येत आहे की, उक्त अ. ब. यांची उक्त · · · · · · · किमतीची आणि उक्त रकमेच्या वसुलीचा खर्च भरून निघण्यास पुरेशी होईल अशा आणखी रकमेच्या किमतीची जंगम मालमत्ता अटकावून ठेवावी/कोणतीही मालमत्ता (किंवा यथास्थिती,) ज्या जागेच्या बाबतीत उक्त कर येणे असेल त्या जागेवरील कोणतीही जंगम मालमत्ता जप्त करावी ; आणि या अधिपत्रान्वये तुम्ही जप्त केलेल्या मालमत्तेचा/अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेचा सर्व तपशील प्रमाणित करून तो, या अधिपत्रासह ताबडतोब माझ्याकडे सादर करावा.

(सही)

दिनांक. · · · · · · · · · · · ·  नगरपालिका आयुक्त,

· · · · · · · · · · · शहर.

---

## नमुना ‘आय’

(प्रकरण ८, नियम ४६ व ४९ पहा.)

श्री. अ. ब.

राहणार · · · · · · · · · · · · · · · · ·

यांस,

नोटीस देण्यात येते की, मी आज रोजी, दिनांक . . . . . . . २० . पासून सुरू होणाऱ्या (किंवा संपणाऱ्या ) सहामाहीबद्दल (किंवा तिमाहीबद्दल ) समासात निर्दिष्ट केलेल्या · · · · · · · · · · · कराबद्दल येणे असलेल्या रुपये · · · · · · · · · · इतक्या रकमेसाठी, याखाली दिलेल्या वस्तुसूचित विनिर्दिष्ट केलेली जंगम मालमत्ता जप्त केली आहे ; आणि या नोटिशीच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत तुम्ही, · · · · · · · · · · · · · · येथील नगरपालिका कार्यालयात उक्त येणे असलेली रक्कम, वसुलीच्या खर्चासह भरली नाही तर, ती जंगम मालमत्ता विकण्यात येईल.

दिनांक : · · · · · · · · · · · · · ·  (अधिपत्र बजावणाऱ्या अधिकाऱ्याची सही )

### वस्तुसूची

(येथे जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशील नमूद करावा.)

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६